# ॥ शंका-समाधान ॥



॥ शंका-समाधान ॥
स्वामी श्री अड़गड़ानन्दजी

MARATHI

स्वामी श्री अड़गड़ानन्दजी

॥ ॐ नमः सद्गुरुदेवाय ॥

# शंका-समाधान

*संकलनकर्ता व टीकाकार:*

**परमपूज्य श्री परमहंस महाराजांचा कृपाप्रसाद**

**स्वामी अडगडानन्द**

**श्री परमहंस आश्रम शक्तिषगढ़,**

**ग्राम पोस्ट- शक्तिषगढ़, जिल्हा- मिर्जापुर**

**उत्तर प्रदेश, भारत**

अनन्तश्री विभूषित,

योगिराज, युग पितामह

**परमपूज्य श्रीस्वामी परमानन्दजी**

**श्री परमहंस आश्रम अनुसूया**

(चित्रकूट)

यांच्या परम पावन चरणी

सादर समर्पित

***-अन्तः प्रेरणा***

# गुरु–वन्दना

।। ॐ श्री सद्गुरुदेव भगवान् की जय।।

जय सद्गुरुदेवं, परमानन्दं, अमर शरीरं अविकारी।
निर्गुण निर्मूलं, धरि स्थूलं, काटन शूलं भवभारी।।
सूरत निज सोहं, कलिमल खोहं, जनमन मोहन छविभारी।
अमरापुर वासी, सब सुखराशी, सदा एकरस निर्विकारी।।
अनुभव गम्भीरा, मति के धीरा, अलख फकीरा अवतारी।
योगी अद्वेष्टा, त्रिकाल द्रष्टा, केवल पद आनन्दकारी।
चित्रकूटहिं आयो, अद्वैत लखायो, अनुसुइया आसन मारी।
श्री परमहंस स्वामी, अन्तर्यामी, हैं बड़नामी संसारी।।
हंसन हितकारी, जग पगुधारी, गर्व प्रहारी उपकारी।
सत्–पंथ चलायो, भरम मिटायो, रूप लखायो करतारी।।
यह शिष्य है तेरो, करत निहोरो, मोपर हेरो प्रणधारी।
जय सद्गुरु.........भारी।।




श्री श्री १००८ श्री स्वामी परमानन्दजी महाराज ( परमहंसजी )
जन्मः शुभ सम्वत् विक्रम १९६९ ( १९११ ई. )
महाप्रयाण ज्येष्ठ शुक्ल ७, २०२६, दिनांक २३/०५/१९६९ ई.
परमहंस आश्रम अनुसुइया, चित्रकूट



श्री स्वामी अड़गड़ानन्द जी महाराज

# दर्शन

बंधूनो,

परम आदरणीय, परमपूज्य, श्रध्देय श्री परमानन्दजींचे जीवन चरित्र ''जीवनादर्श एवं आत्मानुभूति'' वरून समजले की श्री परमहंसजी हे एक विरह वैराग्याने युक्त असणाऱ्या साधनेत सतत अनुरक्त राहणारे महापुरुष होते. इष्टदेवाने केलेल्या आकाशवाणीच्या आधारे महाराजांनी चित्रकूट मध्ये असणाऱ्या अनुसूयेच्या निबिड अरण्यात प्रवेश केला. त्यावेळीस भारताच्या स्वातंत्र्यासाठी जोरात चर्चा सुरू होती. अरण्यात येऊन बसताच ते म्हणाले ''नेहरू देशाचा राजा होणार आहे. दिल्लीच्या भरलेल्या दरबारात मी त्याला राजतिलक करून आलो आहे. मला भगवंताने सांगितले आहे आणि तेच होईल''. काही दिवसांनंतर याचे प्रत्यंतर आले. कारण देशाला स्वातंत्र्य मिळाले व स्वतंत्र भारताचे नेहरूजी पहिले पंतप्रधान झाले.

अनुसूयातील त्यांच्या वास्तव्याची सुरुवात उपवासाने झाली. चौदाव्या दिवशी अत्यंतिक उष्णतेमुळे लघुशंकेत थोडे रक्त पडू लागले तेव्हा त्यांना थोडे दु:ख झाले. ते भगवंताला म्हणाले, ''अरे, अशा घोर जंगलात तू मला सोडून दिलेस? ना काही खाण्याची व्यवस्था ना कोणी सेवक. अरे हे, शरीरच राहिले नाही तर भजन कोण करेल?'' तेव्हा त्यांना आदेश मिळाला की तुला खायचेच असेल तर उद्यापासून खायला सुरुवात कर. दुसऱ्या दिवसापासून आवश्यक वस्तू मिळायला सुरुवात झाली. उपजीविकेतील अनिश्चितता संपली. वास्तविक तेथे ना शेती होती, ना कोणी शेठ सावकार, ना एखादे मंदिर ना एखादी वाटिका परंतु साधे एक छप्पर आणि उपवासाने सुरुवात झालेला महाराजांचा निवास थोड्याच कालावधीत सुव्यवस्थित आश्रमात परिणत झाला. सती अनुसूयेच्या अरण्यातील हाच पहिला आश्रम होय.

क्रमाक्रमाने तेथे विरक्त असे शिष्य प्रवेश करू लागले. पूज्य स्वामी श्री सच्चिनदान्दजी महाराज, पूज्य स्वामी श्री अखडानन्दजी महाराज, अनुसूया आश्रमस्थित पूज्य स्वामी भगवानानन्दजी महाराज, स्वामी श्री शिवानन्दजी, स्वामी श्री स्वयमानन्द

इत्यादी आठ दहा प्रतिभावंत शिष्य महाराजांचे जणू प्रतिबिंब बनले आणि त्यांच्या ब्रह्मविद्येच्या प्रकाशात सांप्रत साधक, समाजाचे मार्गदर्शन करीत आहेत.

श्री परमहंस महाराजांच्या पश्चात या शिष्यांमध्ये सर्व प्रथम प्रवेश तसेच उत्कट भक्तीच्या प्रभावामध्ये स्वामी श्री सच्चिदानन्दजी महाराज सर्वश्रेष्ठ आहेत. त्यांच्याच प्रेरणेने, निर्देशनाने व देखरेखीमध्ये या पुस्तक-पुस्तिकांच्या माध्यमातून समाजात व्यापून असणाऱ्या मूल भ्रान्तीचे निवारण करण्याच्या हेतूने हा प्रयास केला आहे. की ज्यात आपण सर्वजण आनंदाचे भागीदार आहोत. ही ग्रंथसामग्री लवकरच आपल्यापर्यंत पोहचवण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सांप्रत स्वामीजींचे वीस-पंचवीस आश्रम आहेत. ज्यांमध्ये सेवा, साधना तसेच सतत चिंतनात प्रवृत्त असणारे दोनशे अडीचशे विरक्त शिष्य व हजारो अनन्य सेवक आहेत; श्रध्दाळू भक्त आहेत. या सर्वांवर तसेच सर्व आश्रमांवर महाराज अंत:प्रेरणेने कृपादृष्टी ठेवीत असतात.

महाराजांचा मूळ निवास, धारकुण्डी आहे. ''सर्व सुखाय सर्व हिताय'' अनेकानेक रचनात्मक कार्यक्रम श्री परमहंस आश्रम, धारकुण्डी, सतना- मध्य प्रदेश येथील तप:स्थानापासून प्रसारित होत असतात. परंतु स्वत:च्या जबाबदारीच्या बाबतीत सतर्क न राहिल्यामुळे आम्ही सर्वजण त्याचा समग्र लाभ घेऊ शकत नाही. कारण ''श्रध्दावाँल्लभते ज्ञानम् तत्पर : संयतेन्द्रिय ।'' जो श्रध्दावान आहे, तत्पर संयतेन्द्रिय आहे असा पुरुषच त्याला प्राप्त करू शकतो. तेव्हा कृपया श्रध्देने परमपूज्य गुरुदेवांच्या कृपा प्रसादाने प्राप्त झालेल्या या वाणीचे अध्ययन, मनन व चिंतन करावे. प्रश्न व सूचनांबद्दल आपले व आपल्या सूचनांचे सहर्ष स्वागतच होईल.

निवेदक:

**स्वामी अडगडानन्द**

# दोन शब्द

प्रश्न तर जगभरचे आहेत; पण त्यांची कथानके भारतीय आहेत. काही धार्मिक प्रश्न आपल्या स्वरूपापासून दूर गेले आहेत. कल्याणप्रद असे अनेक प्रश्न आज आपला आशय हरवून बसले आहेत व अंधविश्वासाचे स्रष्टा बनले आहेत. उदाहरणार्थ युग हे योगपथाचा क्रमोन्नत सोपान आहे. युग म्हणजे अंत: करणाच्या अवस्था आहेत; परंतु अनेक लोकांनी त्यांना कालगणना मापण्याचे साधन समजले आहे. सामाजिक व्यवस्थेमध्ये यौगिक नामकरणाचे औचित्य तर आहेच; परंतु त्यांच्या मूळ आशयावर आवरण घालणे उचित आहे का ?

या प्रकारे अहिंसेबाबत लोकांच्या भ्रामक धारणा आहेत. योग साधनेची आठ अंगे आहेत. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी. यातही यमाचे पाच विभाग अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. तेव्हा योगामध्ये प्रवेश केल्यानंतर अहिंसा येते. परंतु समाजात उंदीर मारला तर गाय दान म्हणून द्या, मांजर मारले तर सोन्याचे मांजर दान म्हणून द्या, अहो कीडा, कीटक, मुंगी अगदी डासाची हत्या करणे म्हणजे सुध्दा हिंसा-अहिंसेचा प्रश्न त्या लोकांनी बनवला. करोडो देव, देवी-देवतांच्या आकर्षणामुळे भजन-भक्ती कोणाची करावी याचा निर्णय लोकांना करता येत नाही. आपल्याला भवपार कोण करेल? एका परमात्म्याच्या शिवाय गायीची शेपटी पकडून परमधामाची यात्रा करणारे लोक भारतामध्ये पाहावयास मिळतात. शास्त्राच्या नावावर देवी-देवतांची स्तुती करणे, हनुमान चालिसासारखी स्तोत्रे म्हटली की झाला शास्त्र पाठ !

अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्याच्या हेतूने श्री परमहंस आश्रम जगतानन्द येथून बारा लहान पुस्तिका प्रसारित झाल्या होत्या. प्रत्येक पुस्तिकेत भजनाच्या विषयामध्ये एकच शिकवण असते. सोयीसाठी वेळोवेळी प्रकाशित झालेल्या या पुस्तिकाना एका लहान पुस्तकाचे स्वरूप दिले जात आहे. सामाजिक भेदांचे उन्मूलन तसेच धार्मिक भ्रान्तीचे निवारण करण्याच्या हेतूने या पुस्तकाचे अनुशीलन करावे

**आश्रमाच्या सौजन्याने**

# शास्त्र-सार

● संपूर्ण सृष्टीमध्ये धर्म एकच आहे – अमृत तत्त्वाची प्राप्ती, सदैव राहणारी शाश्वत शांती, अनंत सुख आणि त्याचा प्रारंभ आहे परमात्म्यावरील अतूट श्रध्दा.

● सत्य म्हणजे एकमात्र परमात्मा होय. जो या सत्याला बळकट करीत नाही तो धर्म नव्हे. जर धर्मात हे सत्य नसेल तर ते जीवन पण निरर्थक आहे.

● ज्या व्यक्तीची परमात्म्यावर अतूट श्रध्दा आहे व जो ॐ अथवा राम या परमात्म्याच्या परिचित नामाचे सतत स्मरण करतो तो धर्माचे स्वरूप जाणत नसला तरीही तो शुध्द धार्मिक आहे असे समजावे.

● जो शाश्वत आहे, अपरिवर्तनशील आहे, सनातन आहे तो धर्म आहे आणि जो आज आहे परंतु उद्या टिकणारा नाही तो धर्म नव्हे; तो अधर्म आहे, नश्वर आहे.

● जगामध्ये धर्म एकच आहे, एकमात्र शाश्वत अशा परमात्म्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न म्हणजे धर्म होय. परमात्मा जर दोन असतील तर ते धोक्याचे आहे. आणि समजा दुसरा भगवंत असेल तर त्यासाठी दुसरी सृष्टी पाहिजे – भगवंताला रहाण्यासाठी व्याप्त होण्यासाठी!

# आमची प्रकाशने




**यथार्थ गीता–**

'यथार्थ गीते' मध्ये श्रीकृष्णांच्या वाणीचा आशय चांगल्या प्रकारे, जसाच्या तसा समजाविला आहे. ही एक कालजयी कृति आहे

२८ भाषांमध्ये




**अंग क्यों फडकते हैं और क्या कहते हैं?–**

मानवी शरीराच्या विभिन्न भागांमध्ये होणाऱ्या स्पंदनांचे कारण आणि त्याद्वारे मिळणाऱ्या संकेतांचे विश्लेषण केले गेले आहे की जे साधना करताना सहाय्यक ठरते.

४ भाषांमध्ये




**जीवनादर्श एवं आत्मनुभूति–**

पूज्य गुरु परमहंस स्वामी श्री परमानंदजी महारांजांचे जीवन चरित्र, त्यांचे अनुभव तसेच त्यांच्या उपदेशांचे संकलन केले आहे. साधकांसाठी हा अतिशय उपयुक्त ग्रंथ आहे.

४ भाषांमध्ये.




**अनाकलनीय प्रश्न**

वर्ण, मूर्तिपूजा, ध्यान, हठ, चक्र-भेदन आणि योग अशा विषयांचे स्पष्टीकरण करुन, भ्रमात असले-ल्या समाजाला मार्गदर्शन केले आहे.

३ भाषांमध्ये




**शंका समाधान–**

समाजामध्ये प्रचलित असलेल्या सर्व वाईट रिती, रुढि, आवडंबर आणि अंधविश्वास ह्याबद्दल असलेल्या शंकांचे निरसन केले आहे

५ भाषांमध्ये.



**एकलव्याचा अंगठा–**

शिक्षण देणारा गुरु आणि सद्गुरु मधील फरक सांगितला आहे. शिक्षक हा लोकजीवनाची कला शिकवितो तर सद्गुरु जीवनामध्ये समृद्धि बरोबरच परम श्रेयाची जागृति आणि त्या परमपदाची प्राप्ति करवितो ज्यामुळे मनुष्याचा जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ति मिळते.

३ भाषांमध्ये.



**भजन कोणाचे करावे?**

धर्माच्या नावावर गाय, पिंपळ, देवी-देवता, भूत-भवानी ह्यांची पूजा लोक करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकात ह्या सर्व भ्रांतिंचे निवारण करुन स्पष्ट केले आहे की सनातन धर्म कोणता? इष्ट म्हणजे कोण? साधना कोणाची करावी व कशी करावी?

६भाषांमध्ये.




**षोडशोपचार पूजा पद्धति–**

ह्या पुस्तकामध्ये हे सांगितले गेले आहे की एका परमात्म्यावर श्रद्धा स्थिर ठेऊन, त्या एका परमात्म्याचे चिंतन करायला शिकविणे म्हणजेच कर्मकांड होय.

३ भाषांमध्ये.

# आमची प्रकाशने



**योगशास्त्रीय प्राणायाम–**
योगशास्त्रीय प्राणायाम मध्ये आपण सांगितले आहेत की यम, नियम आणि आसन साध्य होताच श्वास–प्रश्वासाचे शांत प्रवाहित होणे म्हणजेच प्राणायाम होय. प्राणायाम नावाची वेगळी अशी कोणती क्रिया नाही. ही योग–चिंतनाची एक अवस्था आहे. त्याचेच निरसन ह्या पुस्तकात केले गेले आहे.
**३ भाषांमध्ये.**




**बारहमासी –**
आपले पूज्य गुरु श्रीपरमानंदजी महाराजांना आकाशवाणीने प्राप्त झालेले भजन (ईश्वरीय गायन) बारहमासीचे संकलन तसेच त्याचे विवेचन केले आहे. ह्यामध्ये लक्ष्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशापासून ते पराकाष्ठेपर्यंतचा मार्ग दाखविला आहे.
**हिंदी भाषेमध्ये.**




**योगदर्शन– प्रत्यक्षानुभूत**
व्याख्या– महर्षि पतंजलि कृत ह्या पुस्तकात सांगितले गेले आहे की 'योग' प्रत्यक्ष दर्शन आहे, तो लिहिता किंवा सांगता येत नाही. क्रियात्मक होऊनच साधकाच्या लक्षात येते की जे काही महर्षिंनी लिहीले आहे त्याचा वास्तविक अर्थ काय आहे? साधनेस उपयोगी असे पुस्तक आहे.
**३ भाषांमध्ये.**




**ग्लोरिज ऑफ योग–**
हठ, चक्र, भेदन आणि योग, प्राणायाम, ध्यान ह्या बद्दल पूर्ण माहिती.
**इंग्रजी भाषेमध्ये.**



**प्रश्न समाज के उत्तर गीता से–**
ह्या पुस्तकामध्ये सामाजिक, आध्यात्मिक तसेच धार्मिक असे कोणतेही प्रश्न असतील, त्यांचे गीतेच्या दृष्टि कोनातून निरसन केले आहे.
**हिंदी भाषेमध्ये.**



**अहिंसे चे स्वरुप–**
अहिंसा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मूळतः हा यौगिक, आंतरिक साधनेचा शब्द आहे. ह्या पुस्तकात आपल्याला दिसेल की आपल्या पूर्वीच्या महापुरुषांनी अहिंसेला कोणत्या संदर्भात घेतले.
**४ भाषांमध्ये.**

MP3 ऑडियो सिडिज



**६ भाषांमध्ये**

श्री स्वामीजींच्या मुखातून निःसृत अमृतवाणीचे संकलन व्हात्युम १ ते ६० पर्यंत




**हिंदी भाषेमध्ये.**

# अणुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भजन कोणाचे करावे? | १ |
| २. | कर्मकांड | ३७ |
| ३. | यज्ञ (हवन) | ५१ |
| ४. | ब्रह्मचर्य | ६७ |
| ५. | गायत्री | ७३ |
| ६. | युग-धर्म | ७९ |
| ७. | अहिंसा | ९५ |
| ८. | पाप आणि पुण्य | १२७ |
| ९. | सनातन धर्म | १५७ |
| १०. | वर्ण व्यवस्था | १९९ |
| ११. | विप्र एक स्थिती | २२७ |
| १२. | आर्य | २६३ |
| १३. | गोरक्षा | २७३ |
| १४. | सती | ३२५ |
| १५. | अवतार एक अनन्त तत्त्व | ३६३ |
| | कबीर आणि अवतार | ३६५ |
| | कच्छपावतार - 'सागर-मंथन' | ३६७ |
| | मत्स्यावतार | ४१९ |
| | वराह-अवतार | ४२७ |
| | नरसिंह अवतार | ४२८ |
| | अजमिलाचा उध्दार | ४३१ |
| | गजराजाचा उध्दार | ४३३ |

| | | |
|---|---|---|
| | अवताराचे विस्तृत दर्शन | ४३६ |
| | १. ''महापुरुष'' | ४३६ |
| | २. श्रीकृष्ण परिचय | ४३९ |
| | ३. श्रीकृष्णाच्या शब्दांमध्ये 'अवतार' | ४४९ |
| | उपसंहार | ४५४ |
| | एका भाविकाचा प्रश्न | ४५६ |
| १६. | आस्तिकतेच्या नावावर | ४५९ |
| १७. | वेदांच्या नावावर | ५०१ |
| १८. | दान | ५४१ |
| १९. | पूज्य श्री स्वामीजींद्वारा विरचित दोहे (ज्ञान-गंगा) | ५५७ |

# भजन कोणाचे करावे?

**सत्याचा अभाव नाही**
**आणि त्याला नष्ट ही करता येत नाही**
**विचार फक्त एवढाच करायचा आहे की सत्य काय आहे?**

महाकुम्भाच्या वेळी चण्डीद्वीप (हरिद्वार)मध्ये
दि.१०-४-८६ च्या जनसभेत
**स्वामी श्री अडगडानंदजींनी**
दिलेले प्रवचन

# भजन कोणाचे करावे?

बंधूनो,

सागर-मंथनातून निघालेल्या अमृत-कुंभातील जल जेथे जेथे सांडले तेथे तेथे आज कुंभमेळे भरत असतात. त्या अमृत-तत्त्वाचे शास्त्रोक्त ज्ञान व्हावे, त्यामागील हेतू समजावा यासाठी कुंभमेळे भरत असतात. मेळ्यात निर्हेतूक सामील होण्यासाठी, तेथे स्नान करण्यासाठी किंवा तेथील दृश्य केवळ पहाण्यासाठी कुंभमेळे भरत नसतात. तर लोकांना खऱ्या धर्माबाबत, परमेश्वराबाबत व जीवनाच्या कल्याणप्रद मार्गाबाबत ज्ञान व्हावे व ततसंबंधीच्या भ्रामक कल्पना नष्ट व्हाव्यात यांसाठी कुंभमेळ्याचे आयोजन होत असते. मात्र सांप्रत लोक, गीता आणि अन्य योगाशास्त्रांनुसार सर्वत्र व्यापून असणाऱ्या एकमेव परमेश्वरप्राप्तीच्या सांगितलेल्या मार्गाचे अनुसरण न करता अन्य पूजाविधीचे व पूजापद्धतींचे अनुसरण करीत असतात. त्यामुळे कोणी गायीला धर्म समजतात, कोणी पिंपळाला धर्म समजतात; तर कोणी धर्मामध्ये वर्णाश्रम अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असे समजतात. या भ्रांतीमुळे सनातन धर्म म्हणजे काय? हा प्रश्न अत्यंत जटील झाला आहे. आजही इष्ट किंवा **ईश्वर म्हणजे काय?** व **भजन कोणाचे करावे** हा प्रश्न असाच जटील बनला आहे. लोकांना अद्यापही त्याचे आकलन होत नाही.

वास्तविक जगात सर्वांत अधिक धार्मिक वृत्तीचा, भजन-चिंतन करणारा व पूजापाठादि विधी करणारा हिंदू मनुष्यच असतो. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, जीवनाच्या अंतीम घटकेपर्यंत हा अत्यंत श्रध्दाशील मनुष्य आपला इष्टदेव कोण याचा निर्णय करू शकत नाही. कोणाची पूजा केल्याने कल्याणप्रद मार्ग प्राप्त होईल हे शेवटपर्यंत त्याला समजत नाही. असे होण्याचे मुख्य कारण म्हणजे बहुईश्वरवादाचा प्रचार हेच होय. अहो, एखाद्या कुटुंबात दहा लोक असतील तर त्या प्रत्येकाचा देव वेगळा वेगळा असतो. कोणी हनुमानाचा भक्त असतो, तर कोणी शंकराचा, कोणी देवीचा; तर कोणी अन्य देवतेचा! इतकेच नव्हे तर आपापल्या देवी-देवतांवरून लोक आपापसात भांडत असलेलेही दिसून येते. मात्र शाश्वत तत्त्व कोणते आहे? कोणाची उपासना केल्याने शाश्वतधामाची प्राप्ती होते हे माहीत नसते. अनेक देव-देवतांचा आमच्या मनावर इतका जबरदस्त पगडा असतो की अंतीम घटकेपर्यंत आम्ही त्यांपैकी एकावरही

श्रध्दा टिकवून धरू शकत नाही. मृत्युशय्येवर असताना आजूबाजूला असणारा आमचा परिवार म्हणतो की, दादा आता देवाचे नाव घ्या. सर्व चिंता सोडून एका ईश्वराचे स्मरण करा. तेव्हा दादा एका झटक्यात स्मरण सुरू करतात- हे शिव शंकरा, हे श्रीरामा, हे विठ्ठला पांडुरंगा, हे दत्तात्रया, हे मारुतिराया, हे दुर्गे, हे शीतला माते, हे विंध्यवासिनी देवी, हे तुळजाभवानी, हे अंबामातें, हे शिरडीच्या साईबाबा... अशा प्रकारे पंचवीस-तीस देवतांची नावे घेतात. अशी ही भ्रांती शेवटपर्यंत संपत नाही. मग ''एक मंदिर दस देवता क्यों कर बसे बजार?'' हृदय एक मंदिर आहे. त्यात आम्ही एकाच देवतेची स्थापना करू शकतो. अनेक देवतांचा बाजार तेथे भरवू शकत नाही. ''दुविधामे दोऊ गये, माया मिली न राम'' द्विधा वृत्तीने आम्ही सर्वच गमावून बसतो. शेवटी रामही हातात राहत नाही. तेव्हा हृदयरूपी देशात, कोणा एकाचीच प्रतिष्ठापना करणेच उचित होइल.

या, आपण पाहूया की या संदर्भात आपल्या पूर्व महापुरुषांनी, काय सांगितले आहे? भगवान श्रीकृष्णांनी कोणाला इष्ट म्हटले आहे? भगवान श्रीरामांनी कोणाचे भजन करण्यास सांगितले आहे? भगवान शिवशंकरानी कोणाचे स्मरण करावयास सांगितले आहे? या आप्तपुरुषांनी स्वत: कोणाचे चिंतन केले? ही साधी गोष्ट जर आम्ही जाणून घेतली व त्याप्रमाणे ती स्वीकारली तर सर्व संदेह नष्ट होईल व पुढेही कधी तो निर्माण होणार नाही. दु:ख याच गोष्टीचे आहे की आपण त्यावर विचारच करत नाही. कदाचित विचार येतही असेल; पण या देवतांविषयीचे भय आमच्या मनात ठाण मांडून बसले आहे. आम्हांला वाटते आमचे जुने उपास्य देव आमच्यावर रूष्ट तर होणार नाहीत ना? त्यामुळे आम्ही आमचे जुने निर्णय बदलण्यास धजावत नाही. आम्हांला वाटते असे केल्याने आमच्या जुन्या देवता आम्हांला दु:ख देतील.

या विषयावर योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेमध्ये आपला विचार स्पष्टपणे मांडला आहे.- पाहा-

**मामुपेत्य पुनर्जन्म दु:खालयशाश्वतम्।**
**नाप्नुवन्ति महात्मान: संसध्दिं परमां गता:।८/१५**

अर्जुना, मजप्रत आल्यानंतर, दु:खाची खाण असलेला, दु:खाचे आगर असणारा व क्षणभंगुर असा पुनर्जन्म त्याला प्राप्त होत नाही. उलट तो भक्त मजप्रत येतो. ज्याला

पुनर्जन्म प्राप्त होतो तो दु:खाच्या खाईत पडतो. मला प्राप्त करून घेतल्यानंतर मात्र त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही; उलट 'स्थानम प्राप्स्यसि शाश्वतम' शाश्वत असे जे परमधाम ते त्याला प्राप्त होते. हा पुनर्जन्म कोणाकोणाला प्राप्त होतो ते आता पाहा.-

**आब्रहनभुवनातल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्येते।।गीता ८/१६**

अर्जुना, ब्रह्मलोकासकट सर्व चौदा भुवने- चराचर जगत पुनर्जन्म पावणारे आहे. परंतु मजप्रत आल्यानंतर मात्र त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही. उलट त्याला शाश्वतधामाची प्राप्ती होते. यावरून स्पष्टपणे दिसून येते की, ब्रह्मदेव आणि त्यांनी निर्माण केलेली सर्व सृष्टी ही नश्वर आहे- क्षणभंगुर आहे. या सृष्टीमध्ये देवता, पितृलोक, दानव, ऋषी, सूर्य, चंद्र या सर्वांचा समावेश होतो. मानवजीवनाचे परम लक्ष्य आहे- अमरत्वाची प्राप्ती! श्रीकृष्णांच्या म्हणण्याप्रमाणे ही अमरत्वाची प्राप्ती फक्त एका परमात्म्याच्या चिंतनानेच होत असते. उदाहरणार्थ- आपल्याला समुद्र पार करावयाचा आहे. तो अथांग समुद्र पार करण्यासाठी जर तुम्ही कागदाच्या होडीचा सहारा घेतलात तर थोडेसे अंतर कापताच ती नाव नष्ट होईल व त्याबरोबर तुम्हीही बुडून जाल. अशा प्रकारे कोणतेही साधन जे तकलादू आहे, स्वत: नष्ट होणारे आहे त्याच्या सहाय्याने पैलतीरी जाण्याची आशा करणे म्हणजे निराशाच पदरात घेण्यासारखी आहे. याप्रकारे जे साधन स्वत: तकलादू आहे, नश्वर आहे ते तुम्हाला शाश्वतधाम देऊ शकणार नाही, ते तुम्हाला अमरत्व देऊ शकणार नाही. हो! ते तुम्हाला मरण मात्र अवश्य देऊ शकेल. तेव्हा एका परमेश्वराचे एकचित होऊन चिंतन करा असा गीतेचा उपदेश आहे.

गीतेनुसार जर देवता अशाश्वत व दु:खाचे आगर आहेत तर मग त्यांची पूजा का केली जाते? यावर श्रीकृष्णांनी सांगितले आहे (अध्याय-७)- अर्जुना, ज्यांची बुध्दी अनेक कामनांनी ग्रस्त आहे असे मूढबुध्दी लोकच अन्य देवतांची पूजा करीत असतात. तेथे देवता नावाची कोणी समर्थ वस्तू किंवा तत्त्व असतच नाही. उलट पाणी, दगड, वृक्ष किंवा जेथे व ज्यावर मनुष्याची श्रध्दा बसेल तेथे मीच स्वत: उभा राहतो व त्यांच्या श्रध्देला पुष्टी देतो. पूजणाऱ्याला त्याच्या भक्तीप्रमाणे फळ देतो. परंतु ते फळ भोगल्याबरोबर नष्ट होते. म्हणजे फळ मिळवण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम तर केले; परंतु एवढे करून जे फळ मिळविले ते नष्ट झाले सारांश, सर्व परिश्रम वाया गेले.

पण अल्पबुध्दी लोकांना वाटते भले नंतर फळ नष्ट झाले; पण थोडे दिवस तरी ते फळ भोगता येते ना! मग त्यात काय वाईट आहे? यावर नवव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात की, या नश्वर देवतांना पूजणारे खरोखर माझीच पूजा करीत असतात, परंतु ते पूजन अविधीपूर्वक असल्याने नष्ट होत असते. वास्तविक अत्यंत परिश्रम घेऊन, अनेक गोष्टींचा त्याग करून, रक्त आटवून पूजा करायची व त्याचा परिणाम काय होतो? तर मिळालेले फळ नष्ट होते. कारण तुमचे पूजन अविधीपूर्वक असते. मग श्रम जर करायचेच आहेत तर ते विधीपूर्वक का करू नयेत? मार्ग आक्रमायचाच आहे; मग खरा मार्गच का पकडू नये?

जर पूजापध्दती अविधीपूर्वक आहे तर मग विधीपूर्वक पूजन कोणते? यावर अठराव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात की, अर्जुना, आपल्या स्वभावाच्या क्षमतेनुसार नियत कर्म करणारा मनुष्य कशा प्रकारे भगवत्प्राप्तिरूप परमसिध्दी प्राप्त करून घेऊ शकतो तो विधी तू माझ्याकडून ऐक. ज्या परमात्म्यापासून सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली आहे, जो संपूर्ण जगतात व्यापून राहिलेला आहे त्या परमेश्वराची उपासना आपल्या स्वभावधर्मानुसार- क्षमतेनुसार करून परमेश्वराला संतुष्ट केल्याने मनुष्याला परमसिध्दी प्राप्त होत असते. म्हणजे परमेश्वराचे पूजन हाच विधी आहे. हे पूजन म्हणजे चिंतनाची एक निर्धारित क्रिया आहे. यामध्ये श्वासाचे यजन, इंद्रियांचा संयम, यज्ञस्वरूप महापुरुषाचे ध्यान इत्यादी क्रियांचा समावेश होतो. याची चर्चा भगवान श्रीकृष्णांनी चौथ्या अध्यायातील यज्ञाच्या प्रकरणामध्ये तसेच गीतेमध्ये ठिकठिकाणी केली आहे. 'सनातन धर्म' या प्रकरणात आपणही ते सविस्तर वाचू शकता.

तुम्ही केवळ एका परमेश्वरावर श्रध्दा ठेवून त्याच्या कोणत्याही नावाचा- ओम् किंवा रामाचा जर श्रध्देने जप केलात तरी (धर्म न जाणताही) तुम्ही शुध्द धार्मिक आहात. संपूर्ण क्रिया जाणत नसतानाही क्रियावान आहात. व यापासून प्राप्त होणारे फळ ना नष्ट होते ना तुम्ही!

संपूर्ण गीतेमध्ये योगेश्वर श्रीकृष्णांनी कधीही देवतांचे समर्थन केलेले नाही. नवव्या अध्यायात ते म्हणतात की काही लोक माझी पूजा करून स्वर्गाची अभिलाषा करतात. मी त्यांना स्वर्गलोकीचे वैभव भोगण्यास देतो; परंतु- 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' त्यांचे पुण्य क्षीण झाले, संपत आले की, ते पुन्हा खाली येतात, परंतु खाली पडल्यानंतरही

त्यांचा नाश होत नाही. कारण ते नेहमी विहित कर्मच करीत असतात. व हाच खरा विधी आहे. अर्जुना, या विहित कर्मामध्ये आरंभाचा नाश होत नाही. यामध्ये साधकाची कोणतीही इच्छा भगवान पूर्ण करतात. इच्छा-भोग हे शाश्वत नसतात ते भोगून संपतात. पण त्या भक्ताचा विनाश होत नाही. कारण तो विधीपूर्वक भगवंताचे पूजन करतो. वास्तविक ब्रह्मापासून उत्पन्न झालेले ब्रह्मलोक, देवलोक, पशु-पक्षी-कीटक-पतंगादि सर्व लोक म्हणजे केवळ भोग योनी आहेत. केवळ मनुष्यच कर्म करू शकतो. या कर्माद्वारे तो परमेश्वरास प्राप्त करू शकतो. मोक्ष मिळवू शकतो. शरीरधारणेच्या बाबतीत आपण देवतांपेक्षाही भाग्यवान आहोत. कारण हे शरीर प्राप्त होणे अत्यंत दुर्लभ असते व ते आपल्याला प्राप्त झाले आहे. आपण त्यापासून कोणती अपेक्षा करतो? तुम्हाला देव बनायचे असेल तर बनू शकता, ब्रह्माची स्थिती प्राप्त करून घ्यायची असेल तर ती प्राप्त करून घेऊ शकता. परंतु जोपर्यंत मनाचा निरोध व विलय यांच्याबरोबर परमेश्वराचा साक्षात्कार करून त्या परमभावामध्ये जोपर्यंत मन स्थित होत नाही तोपर्यंत मनुष्याचा पुनर्जन्म टळत नाही. तेव्हा गीतेने सांगितलेले विहित कर्म करीत भगवंताचे पूजन करणे हाच खरा विधी होय.

सोळाव्या अध्यायात शेवटी भगवन म्हणतात अर्जुना, तू शास्त्रद्वारा निर्धारित असणारे कर्म कर. पण कोणते शास्त्र? त्या शास्त्राच्या शोधासाठी अन्यत्र भटकण्याची आवश्यकता नाही ''किमन्यै: शास्त्र विस्तरै:'' अन्य शास्त्रांचा शोध करण्याची काय आवश्यकता? भगवान श्रीकृष्णांनी स्वयं सांगितले आहे- ''इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ''- (गीता १५/२०) अर्जुना, हे अत्यंत गुह्यतम असे शास्त्र मी तुला सांगितले आहे. पुढच्याच श्लोकात ते म्हणतात की, आपणास करण्यास योग्य काय, अयोग्य काय हे आपल्या बुध्दीने ठरवून चालणार नाही. त्याचा निर्णय शास्त्राच्या दृष्टीनेच केला पाहिजे. म्हणून तू शास्त्रद्वारा जे नियत कर्म आहे ते तू कर. जो शास्त्रविधी डावलून आपल्या इच्छेनुसार वागतो त्याला ना कधी सुख प्राप्त होते ना ही परम गती, ना लोक प्राप्त होतो, ना परलोक, म्हणून आपण सर्वांनी शास्त्रद्वारा प्रमाणित असे जे कर्म त्याचे आचरण करावे. भूतादि व इतर देवतादिंची पूजा करीत आपण आपला हा लोक व परलोक बिघडवू नये.

यावर अर्जुनाने विचारले जे लोक शास्त्र विधींचा त्याग करतात, परंतु परमात्म्याला अत्यंत श्रध्देने भजतात त्यांना कोणती गती प्राप्त होते? यावर भगवन् म्हणाले की

अर्जुना, हा पुरुष श्रध्दामय आहे. कोठे ना कोठे त्याची श्रध्दा ही असतेच. अशा या श्रध्दावानांची श्रध्दा तीन प्रकारची असते. सात्त्विक, राजस व तामस. सात्त्विक श्रध्दावान देवतांची पूजा करतात, राजस श्रध्दावान यक्ष-राक्षसांचे पूजन करतात व तामसी श्रध्दावान लोक भूत-प्रेतांची पूजा करतात. हे तीन प्रकारचे श्रध्दाशील लोक केवळ पूजनच करतात असे नाही तर त्यासाठी अथक परिश्रम घेतात, घोर तपाचे आचरण करतात; परंतु अर्जुना, या तीन प्रकारचे श्रध्दाशील लोक शरीररूपात स्थित असणाऱ्या भूत समुदायास आणि अंत:करण स्थित मला अंतर्यामी परमात्म्याला क्षीण करणारे असतात. मला ते भजत नाहीत तर माझ्यापासून दूर जातात. अर्जुना, या सर्वांना तू असुर समज. अर्थात्, देवी-देवतांना पूजणारे सर्व असुर आहेत असे तू जाण.

असुरचा अर्थ काय? दोन शिंगांचा, मोठ्या-मोठ्या दातांचा कोणी भेसूर-विचित्र जीव? नाही तो असुर नव्हे परमदेव परमात्म्याच्या देवत्वापासून जे वंचित राहतात त्यांना असुर म्हटले जाते. श्रीकृष्णाच्या मतानुसार जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक देवतांप्रमाणे असणारे व दुसरे असुरांप्रमाणे असणारे असतात. दैवी संपदेचे गुण असणारे देवतांप्रमाणे असतात व आसुरी संपदेचे गुण असणारे म्हणजे दुर्गुण धारण करणारे पुरुष असुरी वृत्तीचे असतात. आपला एक सख्खा भाऊ दैवी संपदेचा असू शकतो तर दुसरा आसुरी वृत्तीचा असू शकतो. योगेश्वर म्हणतात की, या वृत्तीच्या सर्वांना तू असुर समज.

बंधूंनो, तुम्ही इतके श्रम केलेत, शास्त्रविधींना डावलून एवढे तप केले. पण उपयोग काय झाला! परिणाम काय झाला? की त्या परमत्म्याच्या देवत्त्वापासून वंचितच राहिलात? 'असुरजान' असुर बनलात. ज्या आत्म्याला परमात्म्याला प्रसन्न करावयाचे होते ते अधिक दुर्बल झाले आणि परमात्म्यापासून अधिक दूर गेले. तेव्हा श्रम करावयाचेच असतील तर अशा पद्धतीने करा की ज्यायोगे परमात्मा प्रतिकूल न होता अनुकूल होईल. तेव्हा मग शास्त्रविधींना नियत असणारे कर्मच का करू नये? देव-देवता ज्या एका परमात्म्याचा अंशमात्र आहेत त्या परमात्म्याचे भजन करा. यावर श्रीकृष्णांनी सतत भर दिला आहे. परमात्म्याचे चिंतन हा गीतेचा मूळ उपदेश आहे.

पण असे चिंतन कोण करू शकेल? आम्ही तर खूप पापी आहोत. अर्जुनासारखे आमचे भाग्य कुठले? असा समज करून घेऊ नका. असे हताश होऊ नका.- कारण

योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात- हे अर्जुना,

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्य: सम्यग्व्यवसितो हि स: ।९/३० (गीता)**

अत्यंत दुराचारी पुरुषदेखील जर अन्य देवतांची उपासना न करता अनन्य भावाने केवळ माझीच उपासना करेल तर त्यालादेखील साधुत्व प्राप्त होईल. कारण त्याचा निश्चय यथार्थ आहे. **'क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति'** या प्रकारे एकाग्र चित्ताने परमात्म्याचे चिंतन करणारा धर्मात्मा बनतो. परमधर्म परमात्म्यासारखे त्याचे अंत:करण बनते व त्याला शाश्वत शांती प्राप्त होते.

तेव्हा तुम्ही अगदी दुराचारी असलात किंवा दुराचाऱ्यांचा मुकुटमणी किंवा शिरोमणी असलात तरी जर ईश्वराप्रती अढळ श्रध्दा असेल व परमात्म्याच्या प्राप्तीसाठी तुम्ही शास्त्रविधींनी युक्त असे पूजन करीत असाल, नियत कर्म करीत श्रध्दायुक्त अंत:करणाने ईश्वराचे भजन करीत असाल तर तुम्ही लवकरच धर्मात्मा बनाल **''कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्त: प्रणश्यति''**- अर्जुना, माझा भक्त कधीही नष्ट होत नाही हे सत्य तूं निश्चितपणे जाण. येथे अन्य कोणत्याही देवतेचे पूजन केले जात नाही.

ठीक आहे, एकमेव असणाऱ्या परमात्म्याच्या ठिकाणी तुमची श्रध्दा स्थिर झाली, धर्माचरणासाठी तयारही झालात परंतु त्या एकमेव असणाऱ्या परमेश्वराला शोधायचे कोठे? तीर्थक्षेत्री की मंदिरात? त्या ईश्वराचे भजन करायचे ते कोठे? यावर अठराव्या अध्यायातील एकविसाव्या श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात-

**ईश्वर: सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।गीता १८/६१**

अर्जुना, अरे तो ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात वसत असतो. मग तो इतका जवळ आहे तर दिसत का नाही? त्यावर ते म्हणतात की मायारूपी यंत्रावर आरूढ होऊन सर्व लोक भ्रमवश झालेले आहेत व त्यामुळे ते सर्वत्र वृथा भटकत आहेत. म्हणून त्यांना ईश्वर दिसत नाही. मग काय करावे? कोणाला शरण जावे?

गीतेतील १८/६२ व्या श्लोकात भगवान म्हणतात तमेव शरणं गच्छ- अर्जुना, त्या हृदयात स्थित असणाऱ्या परमेश्वराला शरण जा. 'सर्वभावेन' म्हणजे सर्व भावांसह

त्याला शरण जा. अर्धा भाव देवीमध्ये, तर देवतांमध्ये असे करू नका. त्या ईश्वराला संपूर्ण हृदयासह समर्पित व्हा. स्वत:ला संपूर्णपणे त्याला अर्पण करा. यापासून काय लाभ होईल? तेव्हा ते म्हणतात, **'तत्प्रसादात्परां शान्ति, स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम'**- त्याच्या कृपा-प्रसादाने तुम्हांला परमशांती प्राप्त होईल. जे शाश्वत आहे, सदैव आहे असे स्थान तुम्हांला प्राप्त होईल. अशा प्रकारे परमेश्वराच्या प्राप्तीचे स्थळ हृदयात आहे बाहेर कोठेही नाही.

परंतु समस्या ही आहे की, हृदयस्थ ईश्वर आरंभी दिसून येत नाही. मग भक्ताने हृदयपूर्वक त्याला कसे शरण जावे? तेव्हा पुढच्या श्लोकात ते सांगतात- अर्जुना, अत्यंत गोपनीयाहून गोपनीय अशी एक गुह्य गोष्ट तुला सांगतो? कोणती?

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसिमे। गीता १८/६५**

हे अर्जुना, तू माझ्या ठिकाणी मन ठेवणारा हो म्हणजे सर्वांगानी तू माझ्याशीच मिळून राहा. तू माझा भक्त हो. माझ्या ठिकाणी तू परिपूर्ण श्रध्दा ठेव. मला नमस्कार कर. मी जी सांगितलेली आहेत ती नियत कर्मेच तू कर. असे केल्याने तू माझ्याप्रतच येशील.

प्रथम सांगितले होते तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा. आता सांगतात ईश्वर हृदयदेशात आहे त्याला शरण जा म्हणजे तुला शाश्वत स्थान प्राप्त होईल. आणि येथे सांगतात मला शरण या- माझ्या आश्रयाला या. याचे कारण म्हणजे योगेश्वर श्रीकृष्ण आणि भगवान एकदुसऱ्यांना पूरक आहेत. त्यामुळे शाश्वत धाम प्राप्त करणे किंवा जे परमात्म भावामध्ये स्थित आहेत अशा सद्गुरुला प्राप्त करणे दोन्ही एकच आहे. त्यामुळे सद्गुरुला शरण जाणे अत्यंत आवश्यक आहे. परमेश्वराच्या दरबारात प्रवेश देणारी चावी म्हणजे सद्गुरू होय. परमेश्वराचे अस्तित्व आहे, पण सद्गुरूच्या अभावामुळे त्याचे दर्शन व त्याच्या ठिकाणी प्रवेशाला विलंब होतो. श्रीकृष्ण एक योगेश्वर होते, सद्गुरू होते. ही गोष्ट आम्ही सहजपणे स्वीकारू शकत नाही. म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण पुन्हा निश्चयपूर्वक सांगत आहेत-

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।गीता १८/६६**

अर्जुना, सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्यालाच तू शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करेन मी प्रतिज्ञेवर तुला सांगतो की, निश्चितपणे तू माझ्या स्वरूपाला प्राप्त करशील. तेव्हा शोक करू नकोस. खेद करू नकोस.

प्रत्येक महापुरुषाने हेच सांगितले. भगवान राम म्हणतात- 'भगति मोरि'। गौतम बुध्द असेच म्हणतात- ''बुध्द शरणं गच्छामि ।'' जैन म्हणतात- 'सम्यक् दर्शन ज्ञान चरित्राणि'- तीर्थंकरांचे दर्शन, त्यांनी सांगितलेले ज्ञान आणि त्यांच्याप्रमाणे चरित्र घडवणे हेच मोक्षाचे साधन आहे. शीख धर्मगुरू म्हणतात 'वाहे गुरू'. इस्लाम धर्म म्हणतो - महंमद पैगंबर अल्लाचे दूत आहेत. येशू ख्रिस्त म्हणतात- 'संसाराच्या भाराने खचून गेलेल्या माझ्या मुलांनो, तुम्ही माझ्याजवळ या मी तुम्हाला आराम देईन''. पूज्य महाराजश्री म्हणतात, ''अरे, आम्ही भगवंताचे दूत आहोत. मला भेटल्याशिवाय कोणी ईश्वराला भेटू शकत नाही.'' म्हणजे सर्वजण तुम्हांला बोलवत आहेत. तुम्ही कोणाकोणाजवळ जाल? महापुरुषांच्या या सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, आपल्या समकालीन अशा तत्त्ववेत्त्याला तुम्ही शरण जा.

म्हणजे तुम्ही स्वत:ला परमेश्वराच्या ठिकाणी समर्पित करा आणि ज्याला ईश्वराचा साक्षात्कार झाला आहे अशा महापुरुषाच्या सान्निध्यात राहा, त्याची सेवा करा. नंतर दोन-तीन अक्षरांचे ईश्वराचे कोणतेही नाव निवडा जसे 'राम' किंवा 'ॐ' व त्याचा निर्विकार मनाने जप करा. मात्र एकदा 'राम' एकदा 'ॐ' असा सारखा फेरबदल करू नका. कोणतेही एकच नाव पसंत करा. जर तुम्ही मराठी जाणत नसाल तर अणुरेणूमध्ये भरलेल्या ईश्वराचा वाचक असा दोन-तीन अक्षरांचा कोणताही शब्द निवडा व त्याचा जप करा. जेव्हा तुम्ही नामाच्या सूक्ष्म पातळीवर पोहचाल तेव्हा हे छोटे नाव तुमच्या श्वासात मिसळून जाईल.

## श्री रामचरित मानसच्या मते इष्ट कोणाला म्हणायचे?

आता आपण रामचरित मानसाच्या विचाररूपी प्रकाशात विचार करू त्याच्या मते इष्ट कोण आहे? भजन कोणाचे करावे? 'मानस' ज्यांच्या हृदयाची निर्मिती आहे ते भगवान शंकर म्हणतात-

**धर्म परायण सोइ कुल ताता। राम चरन जा कर मन राता ।।**

**नीति निपुन सोई परम सयाना। श्रुति सिध्दान्त नीक तेहिं जाना**

**सो कुल धन्य उमा सुनु, जगत पूज्य सुपुनीत।**
**श्री रघुवीर परायन, जेहिं नर उपज विनीत।। उत्तरकांड-११६**

ज्याचे मन एकमात्र रामचरणी अनुरक्त आहे तोच खरा धर्मपरायण आहे, तोच नीतीनिपुण आहे, तोच खरा विद्वान आहे, त्यानेच वेदांचे सार चांगल्या प्रकारे जाणले आहे; असे समजावे.

संपूर्ण रामायणामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत आम्ही भजन कोणाचे करावे ही गोष्ट पुन:पुन्हा जोर देऊन सांगितलेली आहे. श्रीरामाच्या वनवास कालातील प्रसंग आहे- भगवान राम शृंगवेरपूरमध्ये झोपले होते. दर्भ आरिण पानांपासून बनवलेल्या शय्येवर झोपलेल्या श्रीरामांना पाहून निषादराज गुहला फार दु:ख झाले. तो जवळ बसलेल्या लक्ष्मणाला म्हणाला, ''रघुनंदन राम आणि जानकीच्या सुखाच्या क्षणी त्यांना दु:खात लोटणारी कैकयी फार कुटिल स्त्री आहे''. यावर लक्ष्मण म्हणाला- छे छे! असे नाही.

**काहु न कोउ सुख दु:ख कर दाता। निजकृत करम भोग सब भ्राता।।**
**जोग-वियोग भोग भल-मंदा। हित-अनहित-मध्यम भ्रम फंदा।।**
**धरनि-धाम-धन-पुर-परिवारु। सरगु-नरक जहँ लगि व्यवहारु।।**
**देखिय सुनिय गुनिय मन माहीं। मोह मूल परमाथु नाहीं।।**

सुख-दु:ख कोणी कोणासाठी निर्माण करीत नाहीत. ते तर प्रत्येकाला त्याच्या कर्माप्रमाणे वाट्याला येत असते. ही धरणी, धाम, धन, परिवार, जन्म-मृत्यू, संपत्ती-विपत्ती, स्वर्ग-नरक या सर्व विषयांबाबत काही बोलणे, ऐकणे किंवा त्याबाबत विचार करणे हे मोहमूलक आहे. लोक स्वर्गाची इच्छा करतात तेही मोहमूलकच आहे. येथे परमार्थाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. मग खरा परमार्थ कोणता? परमार्थ म्हणजे केवळ एका परम पुरुषाचे- परमात्म्याचे चिंतन होय.

**सखा परम परमारथ एहू। मन क्रम वचन राम पद नेहू।।**

या प्रकरणात सांगितले आहे की स्वर्ग आणि नरकाचा विचार करणेसुध्दा मोहमूलक आहे. मोहाचा तो उद्गम आहे. आणि तुम्ही या स्वर्गाच्या अधिपती असणाऱ्या देवतांचे पूजन मोहापासून मुक्त होण्यासाठी करीत आहात? किती विसंगत आहे हे?

## (क)

**हम देवता परम अधिकारी। विषय वस्य तव भगति बिसारी।।**

आम्ही देवता पूर्वी श्रेष्ठ अधिकारास पात्र होतो; पण आम्ही विषयांच्या आधीन झालो आणि भक्तीलाच विसरून गेलो. 'विषय वस्य सुर नर मुनि स्वामी' सुर, नर आणि मुनी हे विषयांच्या आधीन आहेत. देवतादेखील विषयांच्या आधीन आहेत. म्हणजे आपण देवतांची सेवा करतो याचा अर्थ आपण विषयांची सेवा करीत असतो.

## (ख)

**विधिप्रपंच गुन-अवगुन साना।**

**दानव देव ऊँच अरू नीचू। अमिय सुजीवन माहुर मीचू।।**

**सरग-नरक अनुराग-विरागा। निगमागम गुन-दोष विभागा।।**

विधात्याचा प्रपंच गुण आणि अवगुणांनी भरलेला आहे. प्रपंच म्हणजे काय? पाप आणि पुण्य, उच्च व नीच जाती, सुंदर अमृतमय व विषमय जीवन, जीवन व मृत्यू, स्वर्ग आणि नरक हे सर्व म्हणजे विधात्याचा प्रपंच आहे. संतुष्टचित्त असणाऱ्या महापुरुषांनी याचेच विभाजन केले होते. जर आपण देवतांची पूजा करीत असाल तर याचा अर्थ आपण प्रपंचाची पूजा करीत आहात व तो प्रपंच म्हणजे या संसारातील गुण-दोषांचे चित्रण आहे. देवता किंवा स्वर्ग म्हणजेही या संसाराचाच एक भाग आहे.

## (ग)

एकदा पक्षिराज गरुडाला मोह झाला-त्याला चित्तभ्रम झाला तो ब्रह्माकडे गेला. ब्रह्मदेव मनात म्हणाले या गरुडाला तर मीच बनवले आहे. अरे, पण भगवंताच्या मायेने खुद्द मला अनेकदा नाचवले आहे. तेथे या पक्षिराज गरुडाने मोहवश व्हावे यात आश्चर्य ते काय?- 'विपुल बार जेहि मोह नचावा।' जेथे देवतांचे पितामह ब्रह्मदेवदेखील भगवंताच्या मायेने वश होऊन नाचू लागतात, मग ज्यांचे पूजन करायला तुम्ही धावता त्या देवता मोहमायेपासून तुम्हांला काय वाचवणार?

**सोई प्रभु भ्रू विलास खगराजा।**

**नाच नटी इव सहित समाजा।।**

तीच माया मात्र भगवंताच्या इशाऱ्यावर नाचत असते. आणि आपण मायेला वश होऊन नाचणाऱ्यांची पूजा करीत असतो. तेव्हा जर पूजा करायचीच असेल तर, ज्याच्या इशाऱ्यावर प्रत्यक्ष माया नाचते त्या भगवंताची पूजा करा. गरुडराजा म्हणतात की मी अगदी प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे की, माया ही रघुवीराची दासी आहे आणि ती त्यांच्या कृपेशिवाय सुटत नाही. तेव्हा जो या मायेचा अधिपती आहे, स्वामी आहे त्या परमात्म्याचे भजन करा. रामचरित मानसमध्ये वारंवार ह्याच गोष्टीवर भर देऊन सांगितले आहे.

## (घ)

**अग-जग जीव नाग नर देवा। नाथ सकल जग काल कलेवा।।**

देवता व मनुष्यादी चराचर जगत म्हणजे काळाची न्याहारी आहे. देवतादेखील काळाची न्याहारीच आहेत, काळाच्या चहापाण्याची ती सामग्री आहे. मग आता पाहा. आपण कोणाचे भजन करता? काळाच्या या न्याहारीचे? का? **'भजसि न मन तेहि राम कहै, काल जासु को दण्डा।'** 'भुवनेश्वर कालहु कर काला।' काळाचेपण काळ व या चराचर जगताचे स्वामी असणाऱ्या भगवान श्रीरामाचे भजन का करीत नाही? जो स्वयं मरणारा आहे, तो आपल्याला मृत्यू प्रदान करु शकतो. मृत्यूपासून आपल्याला वाचवू शकत नाही. मग त्याचे भजन करण्यात काय अर्थ?

## (ङ)

इतकेच नव्हे तर देवता आपले मनोगत जाणण्याइतपत देखील सक्षम नसतात. एकदा देवर्षी नारद हिमालयातील एका गुहेमध्ये तपस्यारत होते. देवतांचा राजा इंद्र याला वाटले की माझे इंद्र-पद हिरावून घेण्यासाठी नारद ही घोर तपस्या करीत आहे. अरे देवतांचा राजा जो इंद्र त्याला एवढेही समजू नये की, नारद कशासाठी भजन करीत आहेत? अशा या देवता तुमची मनोकामना काय पूर्ण करणार?

## (च)

लक्षात ठेवा की, या देवताच भगवतमार्गातील अवरोध आहेत. त्या केवळ नारदालाच नव्हे तर जे जे भजनामध्ये अग्रिम झाले-श्रेष्ठ झाले त्या सर्वांना तेथून खाली ढकलण्याचा खूप प्रयत्न केला आहे. ते सामान्य मनुष्यालासुध्दा या मार्गावर जाऊ देत नाहीत.

**इन्द्रिय द्वार झरोखा नाना। तहँ तहँ सुर बैठे करि थाना।।**
**आवत देखहि विषय बयारी। ते हठि देहिं कपाट उघारी।।**

हृदयरूपी घराला इंद्रियरूपी अनेक खिडक्या आहेत. त्या प्रत्येक खिडकीवर देवतांनी आपला अड्डा बनवला आहे. विषयरूपी हवेला आलेले पाहताच या देवता हृदयरूपी घराच्या खिडक्या उघडून त्या हवेला आत घेतात. ती हवा लागताच मनुष्याला विषयाची गुंगी चढते. इंद्रिये आणि त्यांच्या देवतांना ज्ञान बिलकूल आवडत नाही. त्यांच्याशी तर आपल्याला लढायचे आहे. त्या म्हणजेच विकार आहेत. भगवत् मार्गातील अवरोध आहेत. जर तुम्ही देवतांची पूजा करीत असाल तर तुम्ही विकारांची पूजा करीत आहात, अवरोधाची पूजा करीत आहात.

**विषय करन सुर जीव समेत। सकल एक से एक सचेता।।**
**सबकर परम प्रकाशक जोई। राम अनादि अवधपति सोई।।**

विषय, इंद्रिये, त्यांच्या देवता आणि जीवात्मा (चढत्या क्रमात) हे सर्व परस्परांच्या सहाय्याने क्रियाशील आहेत आणि या सर्वांच्या वर परम प्रकाशक, अनादि अवधपति असा राम स्थित आहे. या परम प्रकाशक श्रीरामाचा प्रकाश घेऊनच सर्व देवता प्रकाशित होत असतात. तेव्हा त्या मूळ परमात्म्याचे तुम्ही चिंतन करा.

## (छ)

या देवता त्रिकालज्ञ नाहीत. राम-रावणाचे युध्दाचीच गोष्ट घ्या- भयंकर युध्द सुरू होते. देवता नुसत्या पाहत होत्या. रावण मरणारच होता ते निश्चित होते. पण तरीही देवता कोणाचाही पक्ष घेत नव्हत्या कारण जय निश्चित कोणाचा होईल ते सांगता येत नव्हते. त्या 'विकल बोलहि जय जये'- जय हो, जय हो असा नुसता जयजयकार करीत होत्या. कारण कोण जिंकेल ते माहीत नव्हते. रामाचा जय असो- असे म्हणण्यात धोका होता. जेव्हा रामाचा विजय होणार हे निश्चित झाले तेव्हाच देवराज इंद्राने आपला रथ रामाच्या सहाय्यासाठी पाठवला. आणि जेव्हा रावण मेला तेव्हा लगेच तेथे स्वार्थी देवता पोहचल्या, त्यांचे पितामह देखील तेथे पोहचले आणि म्हणू लागले-

**कृतकृत्य विभो सब वानर ए। निरखंति तवानन सादर ए।।**
**धिग जीवन देव सरीर हरे। तव भक्ति बिना भव भूलि पर।।**

हे प्रभो, आपल्या मुखारविन्दाचे दर्शन करणारे हे वानर कृतकृत्य आहेत. जे आपली भक्ती न करता या भवसागरात डुंबत आहोत त्या आम्हा देवतांच्या शरीराचा धिक्कार असो. अरे ज्या देवता स्वत:च चुकीच्या रस्त्यावर चालत आहेत त्या आपल्याला काय रस्ता दाखवणार? देवता म्हणतात-

**भव प्रवाह संतत हम परे। अब प्रभु पाहि सरन अनुसरे।।**

ज्या स्वत: प्रवाहपतीत आहेत त्या आपल्याला काय भवपार करणार? त्यांना भवपार होणे माहीत असते तर स्वत: भवपार झाल्या नसत्या का? ज्या भवसागरातून स्वत:ला वाचवण्यासाठी त्राही त्राही करीत आहेत त्या तुम्हाला काय पार करणार? हो तुमच्या खांद्यावर बसून कदाचित त्या भवपार होतील. मग तुम्ही कुठल्या किनाऱ्याला पोहचाल? तेव्हा देवताही ज्यांना शरण जातात आपण सरळ त्या भगवंतालाच शरण जा त्याचाच आश्रय घ्या. ज्या देवता स्वत: विपत्तीमध्ये सापडल्या आहेत त्या तुमची काय सहाय्यता करणार?

## (ज)

गोस्वामी तुलसीदास यांनी देवतांचे समर्थन कोठेही केले नाही. 'माया विवश बिचारे' (विनय पत्रिका) ज्या देवता विवश आहेत, बिचाऱ्या आहेत, ज्यांच्याजवळ दुसरा काही मार्गच नाही अशा देवतांकडे तुम्ही का जाता? अरे देवता म्हणजे आपला इष्टदेव नव्हे हे नीट लक्षात ठेवा.

## (झ)

देवतांचा पराक्रम कोणता व किती? गोस्वामी तुलसीदासांनी आपल्या रामचरित मानसमध्ये ठिकठिकाणी ते सांगितले आहे.

**रावण आवत सुनेऊ सकोहा। देवन्ह तकेऊ मेरू गिरि खोहा।।**

रावण क्रुध्द होऊन येत आहे असे देवांनी नुसते ऐकले, अरे लढण्याचा विचार तर दूरच पण नुसते त्यांनी ऐकले की क्रोधित होऊन येत आहे तर 'देवन्ह तकेऊ मेरू गिरि खोहा'- मेरू पर्वताच्या गुहांमध्ये ते जाऊन लपले. पण देव किती धावणार? रावणांने त्यांना पुष्पक विमानात बसवले व घेऊन गेला.

**देव यक्ष गंधर्व नर किन्नर नाग कुमारि।**
**जीति बरी निज बाहुबल बहु सुन्दर वर नारि।।**

देव, यक्ष, गंधर्व, किन्नर व नाग सुंदरीनां जिंकले, त्यांचे वरण करून त्यांना निशाचरांत वितरित केले व देवलोकामध्ये जे सुखोपभोग होते ते त्यांना मिळावे अशी व्यवस्था केली. जेव्हा देवांना कळले की आपल्या सर्वांचा परिवार रावणाकडे बंदिवान आहे तेव्हा आता एकटे किती दिवस व कसे जगायचे? तेव्हा आपल्या परिवाराला सोडवण्यासाठी ते सर्वजण लंकेला गेले. तेव्हा रावणाने त्यांना सेवक बनवून कामाला लावले. **कर जोरे सब दिसिप विनीता। भृकुटि विलोकहिं सकल सभीता।। बिचारे देवगण!** सर्वजण हात जोडून नम्रपणे उभे राहत असत. आपल्या उठण्या-बसण्यात काही चूक होऊ नये, आदेश-पालनात वेळ लागू नये, रावणाने नाराज होऊ नये यासाठी ते रावणाच्या भृकुटीकडे सतत लक्ष ठेवून असत.

**रवि ससि पवन वरून धनधारी।**
**अगिनी काल जन सब अधिकारी।।**

सूर्य, चंद्रमा, अग्नी, यमराज, कुबेर आणि देवतांचे सर्व अधिकारी रावणाच्या आज्ञेचे पालन करीत असत. ते अत्यंत भयभीत झालेले होते. त्यामुळे ते रोज रावणाच्या चरणी नमन करीत असत, प्रतिदिनी त्याच्या सेवेत तत्परतेने उपस्थित राहत. जो वेळेवर पोहोचू शकत नव्हता तो घरुनच प्रार्थना करून निघत असे की रावणाने कोणती तक्रार करू नये किंवा रावणाची भ्रुकुटी चढू नये. अशी देवतांची अवस्था! तरीही आम्ही त्यांची पूजा करतो.

## (ञ)

आता या प्रकरणात जे जे देवतांचे सहाय्य मागायला गेले त्यांच्याबाबतीत काय झाले ते पाहू. देवतांनी त्यांना कशी मदत केली? एकदा निशाचरांच्या त्रासाला कंटाळून गाईचे रूप घेऊन पृथ्वी देवगणांकडे गेली. ती त्यांना म्हणाली तुम्ही माझे रक्षण करा. देवतागण म्हणाले की आम्ही तुझे रक्षण करण्यास असमर्थ आहोत. पृथ्वीबरोबर सुर, मुनी, गंधर्व हे सर्व देवतांचे पितामह जे ब्रह्मदेव त्यांच्याकडे गेले. ते का आले आहेत ते ब्रह्मदेवाने मनात जाणले म्हणाले मी तरी काय करणार? मीही अगदी विवश आहे. तेव्हा ते पृथ्वीला म्हणाले- ज्याची तू दासी आहेस, ज्याचा कधी नाश होत नाही म्हणजेच जो

अविनाशी, जो अजरामर, शाश्वत आणि अमृतस्वरूप आहे त्या परमात्म्याची प्रार्थना करा. तो परमात्माच आम्हा सर्वांचा सहाय्यकर्ता आहे.

परंतु प्रश्न हा होता की, परमेश्वराला शोधायचे कोठे? ‘‘**पुर वैकुण्ठ जान कह कोई। कोई कह पयनिधी बस प्रभु सोई।**’’ कोणी परमात्मा वैकुंठात राहतो तेव्हा तिकडे चल असे म्हणत होते. तर कोणी म्हणत होते की, परमात्मा क्षीर-सागरात राहत असतो तेव्हा तिकडे जाऊ. या सर्व देवतांमध्ये भगवान शंकरही होते. पण त्यांना कोणी बोलायला संधीच देईनात. ‘‘अवसर पाइ वचन एक कहेऊँ’’ संधी मिळताच ते म्हणाले-

**हरि व्यापक सर्वत्र समाना।**<br>
**प्रेम ते प्रकट होहिं मैं जाना।।**<br>
**अग जग मय सब रहित विरागी।**<br>
**प्रेम ते प्रभु प्रगटइ जिमि आगी।।**

भगवान शंकरांनी त्यांना माहित असणारा उपाय सांगितला की, भगवान कणाकणामध्ये भरलेला आहे. मनाचा संपूर्ण संयम करून हृदयपूर्वक त्याला शरण जा तो लगेच प्रकट होईल. भगवान शंकरांचे मत सर्वांना पटले. ब्रह्मदेवाने देखील दुजोरा दिला. त्या विधीनुसार भगवंताचे स्मरण केल्याबरोबर आकाशवाणी झाली की, तुम्हा लोकांचे सर्व दु:ख मी दूर करेन.

या समस्त प्रकरणामध्ये देवतांनी कोणता निर्णय दिला आणि कोणती मदत केली? ज्यांना भगवंताचे चिंतन कसे करावे हे माहीत नाही त्या देवता तुम्हाला कोणते मार्गदर्शन करणार? ज्यांना परमकल्याणाचा मार्ग माहीत नाही ते तुमचे कसले रक्षण करणार, ते तुमचे कसले कल्याण करणार?

तरीदेखील आम्ही त्याचाच पाठलाग करतो. केवढी ही मूर्खता! याचे मूळ कारण काय? यामध्ये कोणाचा दोष आहे? यात आमचा दोष आहे का? नाही यात आमचा पण दोष नाही. कारण ही रुढी ही मूर्खता आम्हांला वारसा हक्काने मिळत असते. कारण लहानपणापासून मूल आपल्या मातांना, शेजार-पाजाऱ्यांना, घरातील इतर मंडळींना काही ना काही पूजा-पाठ करीत असलेले पाहते. मुलाच्या ते मनावर बिंबते. त्याची

छाप त्या मुलाच्या मनावर पडते. त्यामुळे नंतर अनेकदा समजावूनसुध्दा त्यांना ते पटत नाही. साधारणत: अनेक ठिकाणी स्त्रिया आपल्या मुलांना पिंपळ, वड, औदुंबरसारख्या झाडांना देव समजून त्या झाडाची पूजा करायला लावतात, त्या झाडाखाली बसवतात, धूपारती करवतात. तर कधी कुठल्या साधूला किंवा कुठल्या बाबाला नमस्कार करायला सांगतात. कधी गावातल्या एखाद्या देवाला ग्रामदेवता आहे त्याला नमस्कार कर म्हणून सांगतात. लहानपणी झालेले हे संस्कार मुलाचा पिच्छा सोडत नाहीत. त्यामुळे लहानपणापासूनच ते मूल भयभीत झालेले असते. आणि जे मूल लहानपणी भयभीत झालेले असते ते मरेपर्यंत तसेच भयभीत राहते. अंधारात किंवा एखाद्या एकांत जागी ते मूल जायला घाबरते. रात्रीच्या वेळी झाडाच्या सळसळणाऱ्या पानांची देखील त्याला भीती वाटते. या प्रकारे लहानपणापासूनच त्याच्या मनावर पगडा बसतो. मोठे झाल्यावर कदाचित तो त्या देव-देवतांचा त्यागही करतो; पण मन मात्र शंकेखोरच राहते. तेव्हा सर्व माता-पित्यांना माझी अशी नम्र विनंती आहे की, आपण आपल्या मुलाचे भविष्य अंधकारमय बनवू नका.

## (ट)

सीतेलादेखील अशा देव देवतांची पूजा वारसा हक्काने मिळालेली होती- ''गिरिजा पूजन जननि पठाई'' सीता गिरजेची पूजा करायला रोज तेथे जात असे. स्वयंवराचे आयोजन चालले होते. एक दिवस पार्वतीची पूजा करून सीता परत येत होती. त्या वाटिकेतून परत येत असताना तिची दृष्टी वाटिकेत बसलेल्या श्रीरामावर पडली. दृष्टी तेथेच खिळून राहिली. वास्तविक सीता पार्वतीची पूजा करून परतत होती. पण ती पुन्हा पार्वतीच्या मंदिरात धावत गेली. हात जोडून म्हणाली ''माते, मी आजपर्यंत तुझी खूप सेवा केली आहे. तेव्हा त्या सेवेला स्मरून मला आता वाटिकेत ज्याचे दर्शन झाले ती सावळी मूर्ती मला वर म्हणून देण्याची कृपा कर.''

पार्वतीने काही आशीर्वाद दिला नाही. पण तिला आवाज आला- ''**नारद वचन सदा सुचि साँचा। सो वर मिलिहिं जाहि मन राचा।**' तुमचे गुरू महर्षी नारद यांनी तुला वर दिलेला आहे की ज्याच्यावर तुझे मन बसेल तो वर तुला मिळेल तेव्हा त्यांचे वचन सत्य आहे- ते निर्दोष आहे. ते खोटे पडणार नाही. पार्वतीने नारदाच्या या वराचे तिला स्मरण करून दिले. सीता निश्चित झाली.

स्वयंवराच्या ठिकाणी, धनुष्य-यज्ञाच्या ठिकाणी ती पोहचली तेव्हा तिला दिसले की त्या धनुष्यावर बाण चढवण्यासाठी दहा हजार राजे आले होते. श्रीरामापेक्षा बलदंड! कसोटी सुरू झाली. पण ते दहा हजार राजे धनुष्यावर बाण चढवण्यात असफल झाले. सीतेच्या मनात आले की एवढ्या बलदंड राजांना जमले नाही ते या सुकुमाराला जमेल का? सीतेच्या मनात शंकाकुल भय निर्माण झाले.

**तब रामहि विलोकि वैदेही। सभय हृदय विनवत जेहि तेही।।**

तेव्हा ज्या ज्या देवांची तिला आठवण झाली त्या देवतेचे ती स्मरण करू लागली- ''**होहु प्रसन्न महेश भवानी**''- भगवान शंकराची प्रार्थना करू लागली. पुन्हा ते स्मरण सोडून भवानीची प्रार्थना करू लागली. पण जिच्याकडे वरदान मागितले होते तिच्या ठिकाणीपण तिचे मन स्थिर होईना. ती गणनायकाकडे वळली.- ''**गननायक वरदायक देवा। आज लगि कीन्हिउ तव सेवा।**- आजपर्यंत आपली पुष्कळ सेवा मी केली आहे तेव्हा परमेश्वरा, तू माझ्यासाठी धाव. माझ्या विनंतीला मान देऊन धनुष्य हलके कर. नंतर त्यालाही सोडले व ''**सुर मनाव धरि धीर**''- अशा प्रकारे इतर देवतांना ती विनवू लागली. धनुष्याचीसुध्दा ती प्रार्थना करू लागली की माझी प्रार्थना दुसरे कोणी ऐकत नाही निदान आता तू तरी ऐक आता मला तुझाच भरोसा आहे. तेव्हा आता तू स्वत:च हलका हो. परंतु आतापासूनच हलका होऊ नकोस नाहीतर दुसरा कोणी प्रत्यंचा लावेल. श्रीरामाला बघून मगच हलका हो.

कुठेही यश येत नाही पाहून सीतेने मनातील इतर सर्व देव-देवतांचा नाद सोडला व एका परमात्म्यावर तिने आपली श्रद्धा दृढ केली. तो परमात्मा की जो सर्वांच्या हृदयात स्थित असतो.

**तन मन वचन मोर पनु साँचा।**
**रघुपति पद सरोज चितु राचा।।**
**तौ भगवान सकल उरवासी।**
**करिहिं मोहि रघुवर कै दासी।।**

मनसा-वाचा-कर्मणा माझे प्रेम जर खरे असेल, जर ते रामचरणीच स्थिर झालेले असेल तर हे भगवन, मला दासी बनव. हृदयात एकमेव परमात्म्यावर श्रध्दा स्थिर होताच

''कृपा निधान राम सब जाना''- त्या अंतर्यामी भगवंताने जाणले की ही आता खऱ्या मार्गाने पूजा करीत आहे. त्यानंतर मनाचे समाधान झालेल्या सीतेला अन्य देवी-देवतांकडे जावे लागले नाही- ''तेहि छन राम मध्य धनु तोरा।'' कारण मग श्रीरामानेच ते धनुष्य तोडले. सीतेला यश प्राप्त झाले. तात्पर्य हेच की, आम्हाला वारसा हक्कानी जरी अनेक देव देवतांची उपासना, पूजाविधी प्राप्त झालेली असली तरी जेव्हा परम परमात्म्याच्या ठिकाणी आमची बुध्दी स्थिर होईल तेव्हाच आम्हाला यश प्राप्त होईल.

## (ठ)

अशाच प्रकारची पूजा माता कौसल्याने केली होती. रामाला राज्याभिषेक होणार आहे हे ऐकून ती आनंदविभोर झाली व पूजागृहात गेली. **''पूजी ग्राम देवी सुर नागा। कहेउ बहोरि देन बलि भागा।''** तिने ग्राम देवता, इतर देवता आणि नागदेवांची वैभवपूर्ण पूजा केली. माझे काम सफल झाले, सिध्दीस गेले तर मी बळी चढवेन असेही तिने त्या सर्व देवतांना सांगितले.

अजूनपर्यंत देवतांना रामाच्या राज्याभिषेकाची सूचना नव्हती परंतु ग्रामदेवींना माता कौसल्येकडून समजले तेव्हा त्यांनी देवतांना सांगितले आणि देवतांनी इंद्रदेवांना सूचना दिली. ते त्वरित सरस्वतीकडे गेले.

**सारद बोलि विनय सुर करहीं। बारहिं बार पायँ लै परहीं।।**
**विपति हमार बिलोकि बड़ मातु करिय सोइ आनु।**
**राम जाहिं बन राजु तजि, होइ सफल सुर काजु।।**

हे माते, आम्ही फार संकटात आहोत. आपण असा काही चमत्कार करा की, ज्यायोगे राम वनात जातील व देवतांचे काम होईल. वास्तविक आपली मनोकामना सफल होण्यासाठी प्रार्थना केली होती माता कौसल्याने पण येथे देवता सांगत होत्या की कौसल्या राम-सीता हे सर्व कर्माधीन आहेत. त्यांना त्यांच्या कर्म फलावर सोडून द्या व तुम्ही प्रथम आम्हा देवतांचे हित पाहा.

माता सरस्वती म्हणाली, 'अरे शुभ कार्यात विघ्न उभे करायला तुम्हाला काही लाज वाटत नाही का? राम वनात गेल्यावर त्या मातेला किती कष्ट होतील? त्या पित्याचे काय होईल? अयोध्या अनाथ होईल. लोक मला काय म्हणतील? तरीदेखील

देवता आपला हट्ट सोडेनात. त्या पुन:पुन्हा विनवीत राहिल्या- **''जीव करम वश सुखदुख भागी। जाइय अवध देव हित लागी।।''** अयोध्येच्या लोकांची चिंता तुम्ही कशाला करत आहात? ते तर जीव आहेत. त्यांच्या कर्माप्रमाणे ते सुखदु:ख भोगत असतात तेव्हा ते भोगायला त्यांना त्यांच्या कर्मावर सोडून द्या. आणि देवतांच्या हितासाठी (कौसल्येच्या हितासाठी नाही) कौसलपूरला चला. वास्तविक देवतांची पूजा माता कौसल्याने केली होती. अशा प्रकारच्या देवतांपासून तुम्ही कोणती आशा बाळगाल? त्यांची पूजा करून तुम्हाला काय प्राप्त होणार? त्यापेक्षा गोस्वामींनी ज्याच्यावर भर दिला आहे व ज्याचे नाव 'भेटत कठिन कुअंक भाल के' आहे, ज्याची आराधना केल्याने कर्मबंधन नष्ट होते त्या भगवंताची पूजा तुम्ही का करीत नाही?

देवतांनी विनंती केल्यावरही माता सरस्वती त्यांच्या मनासारखे करण्यास बिचकत होती. तेव्हा पुन:पुन्हा तिचे चरण पकडून देवता तिची विनवणी करू लागल्या- **''बार बार गहि चरन संकोची। चली विचारि विबुध मति पोची।।** सरस्वती भांभावून गेली. तिच्या मनात सारखे येत होते की या देवता स्वर्गात राहत असूनही त्याची बुध्दी अशी खराब का असावी? किती वाईट वृत्तीच्या आहेत या देवता? त्यांचे वास्तव्य उच्च कोटीत (स्वर्गात) आहे; पण त्यांची करणी मात्र अगदी नीच कोटीची आहे. ते कोणाचे उच्च यश किंवा वृध्दी सहन करू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये इर्ष्या व मत्सरबुध्दी फार आहे. अशा या देवतांचा आदर्श कोणाला सांगावा? मग आता तुम्हीच सांगा की हे तुमचे आदर्श आहेत का?

**हरषि हृदय दशरथ पुर आई। जनु ग्रह दशा दुसह दुखदाई।।**

देवतांची माता सरस्वती अयोध्येला येत होती. अयोध्यावासीयांचे केवढे सौभाग्य। परंतु गोस्वामीजी म्हणतात, नाही, 'जनु ग्रह दशा दुसह दुखदाई' सरस्वती मातेचे आगमन म्हणजे अयोध्येच्या लोकांसाठी संकटांचा डोंगर कोसळण्यासारखे होते. म्हणतात की शनी हा दुष्ट ग्रह आहे. तो साडेसात वर्षे मनुष्याला कष्ट देतो. पण येथे तर सरस्वती चौदा वर्षांची दुर्दशा घेऊन आली. स्वत:राम कल्याणस्वरूप होते. ती त्यांचे काय कल्याण करणार? ते तर स्वत: देवतांचेदेखील कल्याण करायला आले होते. पण येथे देवतांची पूजा केली होती माता कौसल्याने पण तिला तिचे काय फळ मिळाले? जीवनभर सहन करावे लागणारे दु:ख व वैधव्य!

**नाम मन्थरा मन्दमति, चेरि कैकई केरि।**
**अजस पेटारि ताहि करि, गई गिरा मति फेरि।।**

अयोध्येत मंथरा नावाची मंद बुध्दीची दासी होती. सरस्वतीने तिच्या मस्तकात प्रवेश केला आणि तिची बुध्दी विकृत करून ती निघून गेली. यावरून तुमच्या एक गोष्ट लक्षात येईल की, बुध्दिमान आणि विवेकी लोकांवर या देव-देवतांचा प्रभाव चालत नाही. केवळ मंद बुध्दीचे लोकच या देवी-देवतांपासून प्रभावित होतात.

देव देवतांचे चरित्र अशाच प्रकारे त्यावेळी पाहावयास मिळत असे. जेव्हा भरत श्रीरामाला घेऊन जाण्यासाठी आला तेव्हा त्यांची अशीच वृत्ती पाहावयास मिळते. येथेही राम व भरताचे मीलन होऊ नये म्हणून देवतांनी प्रयत्न केला. त्यांच्या कुत्सित चरित्राची पराकाष्ठा राम व भरत यांच्या भेटीतील संवादाचेवेळी मानसकारांनी पाहिली. व म्हणून ते म्हणतात- **''मधवा महा मलीन, मुए मारि मंगल चहत''** इंद्र किती दुष्ट बुध्दीचा आहे! आधीपासूनच दु:खी असणाऱ्या अयोध्या व जनकपूरच्या प्रजेला अधिक कष्ट देत आहे. मेलेल्याला मारून तो स्वत:चे मंगल करू इच्छित आहे.

**कपट कुचालि सींव सुरराजू। पर अकाज प्रिय आपन काजू।।**
**काक समान पाक रिपु रीती। छली मलीन कतहुँ न प्रतीती।।**

देवराज इंद्र म्हणजे कपट आणि दुष्ट आचारांची सीमा आहे. त्याला दुसऱ्यांची हानी आणि स्वत:चा लाभ या दोन गोष्टीच प्रिय आहेत. अशा देवतांपासून आपण कोणत्या लाभाची अपेक्षा करणार? राम व भरताच्या त्या हृदयस्पर्शी भेटीच्या वेळीपण देवतांनी तेथे आपले वाईट विचार, कपट आणि भय यांना पाठवले. यालाच त्यांची देवमाया म्हणतात. तुम्हांला घ्यायचे असतील तर हे गुण तुम्ही त्यांच्याकडून घेऊ शकता. या त्यांच्या मायेचे शिकार कोणकोण झाले?

**भरत जनकु मुनिजन सहित, साधु सचेत बिहाइ।**
**लागि देवमाया सबहि, यथा जोग जनु पाइ।।**

भरत, राजा जनक, मुनी, साधू, संत आणि इतर बुध्दिमान लोक सोडून इतर सर्वांवर ज्यांचा जसा बुध्दीचा स्तर त्याप्रमाणे मायेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. तात्पर्य, मंदबुध्दी असणाऱ्यांवरच देवतांचा प्रभाव पडत असतो.

सरस्वती मंथरेच्या जवळ आली तर मंथरेला काय मिळाले? सरस्वतीच्या कृपेनेच (?) मंथरेची बुध्दी विकृत बनली. ती वायफळ गोष्टींचा विचार करू लागली. षडयंत्राचा तिला सूत्रधार बनावे लागले आणि शेवटी तिला लाथ खावी लागली.

**कूबरू टूटे फूट कपारू। दलित दसन मुख रुधिर प्रचारू।।**

तिला इतका लत्ताप्रहार खावा लागला की, तिची कंबर तुटली, कपाळ फुटले, दात तुटले, तोंडातून रक्त वाहू लागले. एवढ्यावरच तिची दुर्दशा संपली नाही तर तिच्या झिंज्या पकडून तिला फरफटत नेले. वास्तविक जिच्या गळ्यात सरस्वती बसली आहे तिचा उलट सन्मान व्हायला पाहिजे होता; परंतु ती अशी अभागी होती की, या प्रसंगानंतर संपूर्ण रामायणात तिचे कुठेही नावसुध्दा नाही. आणि आजपर्यंत कोणतीही माता आपल्या कन्येचे नाव 'मंथरा' ठेवण्याचे धाडस करीत नाही. मंथरा देवी-देवतांच्या पूजेत रममाण असणाऱ्या मंद बुध्दी लोकाची प्रतिनिधी आहे. मंथरेची ही गोष्ट सांगून गोस्वामी आपल्याला काय सांगू इच्छित आहेत? कोण पूजनीय आहे याचा कधी तुम्ही विचार केला आहे का?

**(ड)**

रामचरित मानसमध्ये सरस्वतीचा प्रयोग तीन वेळा केला आहे. एक तर या मंथरेच्या घटनेमध्ये. दुसरा प्रसंग म्हणजे राम आणि भरताच्या भेटीमध्ये देवतांनी सरस्वतीची प्रार्थना करून भरताची बुध्दी विकृत करायला सांगितले तेव्हा. देवतांचा परिवार सुखी करण्यासाठी सरस्वतीने हे काम करावी अशी देवतांची इच्छा होती. परंतु यावेळी मात्र सरस्वती संतापली. म्हणाली की सहस्त्र नेत्र असूनही तुला मेरू पर्वत दिसत नाही का? भरताच्या अंत:करणात कोणता मेरू पर्वत उभा होता? ''**भरत हृदय सियराम निवासू। तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू।।**'' अरे जेथे सूर्य प्रकाश आहे तेथे अंधाराला थारा कोठून असणार? पण भरताच्या अंतरंगात कोणता प्रकाश आहे? भरताच्या हृदयात राम आणि सीतेचा निवासरूपी प्रकाश आहे. तेथे माझे कपट किंवा चातुर्याचा काही उपयोग होणार नाही. येथे अनेकांना अशी शंका येईल की येथे अंधकार म्हणजे काय? प्रकाश म्हणजे काय? तर अंधकार म्हणजे देवता! व प्रकाश म्हणजे एक परमात्मा! या ठिकाणी आणखी एक गोष्ट स्पष्ट होत आहे की, ज्याच्या हृदयात भगवंताचा निवास आहे, देवता त्याच्या केसालाही धक्का लावू शकत नाहीत. तेव्हा मनसा वाचा

कर्मणा तुम्ही एका परमात्म्याला समर्पित व्हा. जर तुम्ही हृदयपूर्वक पाहाल तर तुमच्या हृदयाचे स्वामी देखील तुम्हाला पाहतील. तुमच्या रक्षणाची जबाबदारी घेतील.

तिसऱ्या वेळेस सरस्वती आम्हाला कुंभकर्णाजवळ भेटते. त्याच्या उग्र तपस्येवर संतुष्ट होऊन ब्रह्मदेव त्याच्याजवळ वर देण्यासाठी गेले. ब्रह्मदेवाने विचार केला की, हा अगदी दुष्ट आहे. तो काहीही करेल. नुसते बसून जेवत बसला तरी हे जग उजाड बनवेल. तेव्हा **''सारद प्रेरि तासु मति फेरी। मागेसि नींद मास षट केरी।।''** त्यांनी सरस्वतीला बोलवून घेतले त्याची बुध्दी मंद केली- विकृत करून टाकली तेव्हा कुंभकर्णाने सहा महिन्यांची झोप मागून घेतली. येथे कुंभकर्णामध्ये सरस्वतीचा प्रवेश त्याच्या मृत्यूस कारण ठरला. देवतांच्या पूजानाने कोणाचे व कसले कल्याण होणार?

## (ढ)

वर्तमान काळात समस्त देवतांमध्ये तीन देव श्रेष्ठ समजले जातात- ब्रह्मा, विष्णु आणि महेश. महाराज मनू घर-दार सोडून नैमिषारण्यात तप करण्यासाठी गेले आणि चिंतनात मग्न झाले. त्यांचे कोणते लक्ष्य होते? कोणाचे उपासक होते? ते मनातल्या मनात विचार करीत होते- **''विष्णु विरंचि शंभु भगवाना उपजहिं जासु अंश ते नाना।।''** ज्या भगवंताच्या अंशमात्राने अनेक ब्रह्मा, विष्णू आणि शंकर निर्माण होतात. ''ऐसेऊ प्रभु सेवक वश अहई'', जो भगवंत भक्ताला मात्र वश असतो, जो भक्तासाठी नेहमी धाऊन येतो त्या भगवंताचे मी भजन करेन. जो भगवंत माझी अभिलाषा पूर्ण करेल. असा विचार करून मनू चिंतनात मग्न झाले. साधनेला थोडा वेग आला. साधना जरा सुदृढ झाली तोच देवता तेथे पोहचल्या.

**विधि हरि हर तप देखि अपारा। मनु समीप आये बहुबारा।।**
**माँगहु बर बहु भाँति लोभाए। परमधीर नहिं चलहिं चलाए।।**

ब्रह्मा, विष्णु आणि महेश तेथे पोहचले. मनूला प्रथमपासूनच यांचे आगमन होणार हे माहीत होते, नाही तर तेही भरकटले असते. त्यांना माहीत होते की हे ब्रह्मा, विष्णु, महेश म्हणजे भगवंताच्या अनेक अंशांपैकी एक अंशच आहेत. म्हणून मनूने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. 'आमचे अहोभाग्य म्हणून आपले मला दर्शन घडले' असेही त्यांना म्हटले नाही. परंतु हे देवच स्वत: इतके निगरगट्ट होते की स्वाभिमान सोडून पुन:पुन्हा

मनूच्या जवळ जात होते. त्यांच्या ध्यान-धारणेत विघ्न आणणे हाच त्यांचा हेतू होता. मनूचे कल्याण करणे त्यांचा हेतू नव्हता, तो त्यांना काही देणार नव्हते. ते त्यांना प्रलोभन देत होते. 'बहु भाँति लुभाए'। लोभच मोहाची प्रबलधारा आहे. 'काम-क्रोध, लोभादि-मद, प्रबल मोह के धारि' ही मोहाचीच सेना आहे. त्यामुळे मनूने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. आपल्या चिंतनातच निमग्न राहिले **''आस्थिमात्र होइ रहे सरीरा। तदपि मनाग मनहिं नहिं पीरा।।''** ते चिंतनात इतके निमग्न होते शरीरात हाडाचा नुसता सापळा मात्र राहिला; परंतु मनात लेशमात्रही पीडा नव्हती. ध्यान-चिंतन उत्तम प्रकारे सुरू होते.

भगवंतांनी पाहिले हा भक्त काया, वाचा, मने मला शरण आलेला आहे. त्याचे मन संपूर्णपणे माझ्या ठिकाणी रत आहे. तेव्हा त्यांनी आकाशवाणी केली की, वर माग त्यांनी मनूना वर मागायला सांगितले, तेव्हा मनूने मागितले-

**जो स्वरूप बस शिव मन माहीं। जेहि कारन मुनि जतन कराही।।**
**जो भुशुण्डि मन मानस हंसा। अगुन सगुन जेहि निगम प्रशंसा।।**
**देखहिं हम सो रूप भरि लोचन। कृपा करहु प्रनतरति मोचन।।**

मनू भगवान शंकराच्या दर्शनाने संतुष्ट नव्हते. ते पुन:पुन्हा मनुजवळ आलेही; परंतु मनूने त्यांच्याजवळ काही मागितले नाही. भगवान शंकर मूलतत्त्वात स्थित असणारे, तत्त्वस्वरूप महापुरुष होते. पूर्ण प्राप्ती त्यांना झालेली होती. पण केवळ त्यांचे दर्शन करून राहणे व पुढे मार्ग-क्रमण सोडून स्वस्थ राहणे त्यांना पटत नव्हते. भगवान शंकरांच्या हृदयात जी अनुभूती होती ती स्वत: प्रयत्न करून प्राप्त करणे हे मनूचे लक्ष्य होते. स्वत: आचरण करूनच ही अनुभूती प्राप्त होते हे मनू जाणत होते. एखाद्या पहेलवानाला केवळ नमस्कार करून पहेलवान होता येत नाही. किंवा वैद्याच्या किंवा डॉक्टराच्या केवळ दर्शनाने रोग नाहीसा होत नाही.

महात्मा गौतम बुध्ददेखील आपल्या शिष्यांना सांगत असत की, मी जो उपदेश दिला आहे त्यानुसार आचरण केलेत तर दूर राहूनही माझ्या समीप आहात. जर तुम्ही आचरण केले नाहीत तर माझ्याजवळ राहून किंवा रोज माझे दर्शन घेऊन काही उपयोग नाही. उलट जवळ असूनही खूप दूर राहाल. यासाठी आचरण करा.

शंकर सच्चे आहेत ही गोष्ट मनूला माहीत होती. तरीदेखील मनूने त्यांच्याकडे काही मागितले नाही. पण जेव्हा भगवंतानी आकाशवाणी करून वर मागायला सांगितले तेव्हा शंकराच्या हृदयात जी अनुभूती होती, जे मूल तत्त्व स्थित होते तेच मागितले 'जेहि कारन मुनि जतन कराही'- की ज्यासाठी मुनी प्रयत्न करीत असतात. पण आजकालचे मुनी असे राहिले नाहीत. त्यांच्या अंगात कधी भवानी येते कधी मारुती येतो. हे सर्व खरे मुनी नाहीत. जे सच्चे मुनी असतात ते त्या परमतत्त्व परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतात. पण सध्या हे मुनी बहकले आहेत.

मनूने इच्छा व्यक्त केल्यावर भगवान प्रकट झाले- 'विश्वास प्रकटे भगवान।' कोणता भगवान? ''हरि व्यापक सर्वत्र समाना''- जसे शिवशंकराने सांगितले होते, ''जेहि जाने जग जाई हेराई''- मनूने पाहिले की, विश्वात सर्वत्र म्हणजे जेथे जेथे जाल तेथे भगवंताचा वास आहे. दगड, पाणी... सर्व ठिकाणी, जेथे जेथे दृष्टि जाईल तेथे तेथे त्यामध्ये मनूला ईश्वर दिसू लागला. सारे जग ईश्वराने व्यापलेले पाहिल्यावर ते स्वत: हरवून गेले. विश्वाला पण हरवून बसले, मनू स्वत:चा जीव-संस्कारही हरवून बसले. जेथे त्यांना पूर्वी विश्व दिसत होते तेथे त्यांना सर्वत्र ईश्वर दिसू लागला.

**''ईशावास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्याम् जगत्।''**

ही अवस्था ज्या ज्या महापुरुषांना प्राप्त झाली त्या सर्वांनी हेच म्हटले आहे की, जे दिसते, जे ऐकायला येते तेथे सर्वत्र ईश्वराचा वास आहे. तो सर्वत्र भरला असल्याचे अनुभवाला येते; पण आम्हाला तो प्रत्यक्ष दिसत मात्र नाही. याचे कारण काय असावे? ''जेहि जाने जग जाइ हेराई। जागे यथा स्वपन भ्रम जाई'' अस प्रभु अछत हृदय अविकारी'. ईश्वर जरी सर्वत्र भरलेला दिसला तरी श्रीरामाचा वास खऱ्या भक्ताच्या हृदयात असतो तो बाहेर असत नाही. तुमच्या तो हृदयात आहे पण झोपलेला आहे- सुप्त आहे. त्याला जाणण्यासाठी परमात्म्यावर नितांत श्रध्दा पाहिजे आणि त्या परमात्म्याला आपल्या हृदयात जागृत करू शकेल अशा महापुरुषाचे सान्निध्य हवे आहे. लक्षात ठेवा की बाहेरच्या जगात ना कोणती देवी आहे ना कोणती देवता. बाहेरच्या वस्तू पुजून कधीही तुमचे कल्याण होणार नाही आणि ती वस्तूही प्राप्त होणार नाही- हेच रामायणाने सांगितले आहे.

## (ण)

जगातील कोट्यवधी देवता त्या परमतत्त्व परमात्म्याचा अंश आहे. कागभुशुण्डि म्हणतात- **''राम काम सतकोटि सुभग तन। दुर्गा कोटि अमित अरि मर्दन।''** परमेश्वर अब्जो कामदेवांप्रमाणे सुंदर आहे. कोट्यावदी पर्वततुल्य शत्रूंचा नाश करण्यास तो सक्षम आहे. 'शारद कोटि अमित चतुराई' अनंत कोटी सरस्वत्यांप्रमाणे तो चतुर आहे. ''विधि सतकोटी सृष्टि निपुनाई''- अब्जावधी ब्रह्मदेवांप्रमाणे सृष्टी रचनेमध्ये ते निपुण आहेत. ''विष्णु कोटिसम पालनकर्ता। रुद्र कोटिसत सम संहर्ता॥'' जगाचे पालन करण्यात कोट्यावधी विष्णूंप्रमाणे आहे व संहार करण्यात अब्जो रुद्रांप्रमाणे आहे. कोट्यावधी इंद्रांप्रमाणे त्याचे ऐश्वर्य आहे, अब्जावदी कुबेरांप्रमाणे तो धनवान आहे आणि अब्जावदी कामधेनूंप्रमाणे इच्छित वस्तू देण्यास तो सक्षम आहे. कोट्यावधी सूर्य त्याच्यापुढे काजव्याप्रमाणे आहेत. तरीदेखील आम्ही पूजा करतो त्या सूर्याची. त्या प्रभूची नाही. तुम्ही त्या मुळालाच का पकडत नाही की हे सर्व त्याचे अंशमात्र आहेत. ''तुलसी मूलहि सेइये फूलइ फलइ अधाइ'' तुम्ही जर झाडाचे मूळ शोधाल, त्याची पूजा कराल तर फल, वृक्ष, पाने, फुले, फांद्या सर्व तुमचेच आहे. आणि पानांचे मागे धावाल म्हणजे पानांची पूजा करीत बसाल तर वृक्ष (मूळ परमात्मा) हातचा घालवून बसाल. निरनिराळ्या देवतांमध्ये, दगड, पाणी, पशू,पक्षी यांच्यामागे स्वतःचे कल्याण साधण्यासाठी तुमचा अमूल्य वेळ नष्ट करू नका. स्वत: आपला उध्दार करा.

## (त)

भरत देव-देवतांची पूजा करीत नसे; परंतु कोणत्याही कार्यारंभी शंकराची पूजा करीत असे. रामाच्या राज्यभिषेकापासून अयोध्येत जे षडयंत्र सुरू झाले तेव्हा भरत त्याच्या आजोळी होता. त्याला रात्री एकदा भयंकर स्वप्न पडले. मन नाना कुविचारांनी भरून गेले. त्याचे शमन व्हावे म्हणून **''विप्र जवाइ देहि दिन दाना। शिव अभिषेक करहि विधि नाना॥''** भरताने ब्राह्मण भोजने घातली. दाने दिली, अनेक प्रकारे शंकराला अभिषेक केले. **''माँगहि हृदय महेश मनाई। कुशल मातु पितु परिजन भाई॥''** आणि हृदयपूर्वक शंकराची प्रार्थना करीत होते की माझी आई, वडील, भाऊ आणि माझे सर्व कुटुंबीय या सर्वांना सुखी ठेव.

पण एवढी प्रार्थना करूनही काय प्राप्त झाले? पिताजी स्वर्गवासी झाले. आई विधवा झाली, भाऊ वनात गेले. सात दिवस म्हणजे भरत अयोध्येला पोहचेपर्यंत अयोध्येला कोणाच्या घरात चूल पेटली नव्हती. मग भगवान शंकराची पूजापण चुकीची आहे का? नाही. **''शिव सेवा कर फल सुत सोई। अविरल भगति राम पद होई।।''** आदिगुरू भगवान शंकराच्या सेवेचे एकमात्र फळ हे आहे की, उपासकाच्या मनात भगवान श्रीरामाविषयी उत्कट भक्ती निर्माण होते. भगवान शंकर त्यांच्या भक्तीने इतके संतुष्ट होत नाहीत. ते नेहमी रामाच्या भक्तीने अतीव संतुष्ट होतात. त्यामुळे भरताच्या मागण्यांकडे लक्ष न देता त्यांनी भरताला श्रीरामाचा अप्रतिम भक्त बनवला. शंकराचे जे कर्तव्य होते ते त्यांनी पूर्ण केले. यानंतर भरताने आजीवन रामाची अविरत भक्ती केली. त्यांनी पुन्हा शंकराची भक्ती केली नाही.

असेच उदाहरण कागभुशुण्डिजीचे आहे. मागील जन्मी ते भगवान शंकराचे अनन्य भक्त होते. बाकी कोणत्याही देवाला ते मानीत नव्हते. त्यांचे गुरू अत्यंत दयाळू होते. नीति-निपुण होते. ते नेहमी त्यांना सांगत की, भगवान शंकराच्या सेवेचे फळ म्हणजे भगवान श्रीरामाच्या चरणाची भक्ती हे आहे. तथापि त्यांचा हा उपदेश कागभुशुण्डिना आवडत नसे ते आपल्या गुरुदेवांची सतत अवहेलना करीत असत.

एक दिवस कागभुशुण्डि शिवजीच्या मंदिरात बसून शंकराचा जप करीत होते. तेव्हा तेथे त्यांचे गुरुदेव आले; पण कागभुशुण्डि उठून उभे राहिले नाहीत व त्यांना प्रणामही केला नाही. गुरुदेव अत्यंत दयाळू वृत्तीचे होते. त्यांनी या अपमानाकडे दुर्लक्ष केले; पण स्वयं श्रीशंकर भगवानांना गुरूचा हा अपमान सहन झाला नाही. त्यांनी रूष्ट होऊन त्यांना शाप दिला की तू अजगर बनशील व हजारो जन्म घेशील आणि मरशील. म्हणजे ज्या शंकराची ते भक्ती करीत होते ते शिव शंकरच त्यांच्यावर रुष्ट झाले. शेवटी गुरू महाराजांनाच दया आली त्यांनी भगवान शंकराची हृदयपूर्वक प्रार्थना करून आपल्या शिष्यावर अनुग्रह करण्याची प्रार्थना केली. शंकर त्यांच्या प्रार्थनेने संतुष्ट झाले. म्हणाले, त्याला जन्म तर घ्यावाच लागेल. परंतु जन्म आणि मृत्यूमधील असहनीय पीडा त्याला होणार नाही. कोणत्याही जन्मात त्याच्या पूर्व जन्मीचे ज्ञान नष्ट होणार नाही आणि शेवटी मनुष्य शरीर प्राप्त झाल्यावर तो रामाची भक्ती करेल.

म्हणजे कागभुशुण्डी शंकराचे भक्त होते परंतु शंकरांनी प्रसन्न होऊन त्यांना काय दिले? तर रामाची भक्ती. त्यांच्या शेवटच्या जन्माला त्यांना **''मन के सकल वासना**

**भागी। केवल राम चरण लव लागी।।"** शिवसेवेचे फल काय मिळाले तर "अविरल भक्ति राम पद होई" रामचरणी त्यांचे ध्यान लागले व शेवटी त्या चरणाशीच समर्पित झाले.

## (थ)

आजही भारतात शिवपूजा रूढ आहे. भगवान शंकराची पुष्कळ मंदिरे येथे आहेत. जर तेथे सांगितले गेले की शिवजींनी कोणाची उपासना केली होती? त्यांची कोणती विद्या होती? त्यांनी कसे तप केले होते? त्यांनी काय संदेश दिला? आम्ही त्यांना कसे प्राप्त करून घेऊ शकतो?- तर ते मंदिर सार्थकी लागेल. केवळ ते शिकण्यासाठीच आपण तेथे जात असतो. जेथे महापुरुषाने सत्य कसे प्राप्त केले हे सांगितले जात नाही तिथे जाण्याने आपल्याला फायद्याऐवजी नुकसानच होईल. केवळ चरणामृत वाटणारी मंदिरे आम्हाला लाभ देण्याऐवजी आम्हाला क्षती पोहचवणारी आहेत. भगवान शंकराच्या चरणाश्रयी जो गेला त्याला त्यांनी श्रीरामचरणी सोपवले. स्वयं शंकर सतत श्रीरामाचा जप करीत होते.

**तुम पुनि राम राम दिन राति। सादर जपहु अनग अराती।।**
**काशी मरत जन्तु अवलोकी। जासु नाम बल करउँ विसोकी।।**

काशीमध्ये भगवान शंकर आपल्या पराक्रमाने भक्ताला मुक्ती देत नाहीत; परंतु नामाच्या बळावरच ते मोक्ष प्रदान करीत असतात. भगवान शंकरानी एकाच परमात्म्याच्या चिंतनावर भर दिला आहे.

अशाच प्रकारे हनुमान एक सच्चे सेवक व संत होते. तेही श्रीरामाचाच जप करायचे "**सुमि रि पवनसुत पावन नामू। अपने वश करि राखे रामू।।**" पवनसुत हनुमानाने त्या परम पावन रामनामाचा जप केला होता. त्यांनी हनुमान-हनुमान असा जप करायला कधीही सांगितले नाही. त्यांना जे जे अधिकारी भक्त मिळाले त्यांना त्यांनी रामचरणीच नेले.

**हनुमान सम नहिं बडभागी। नहिं कोउ राम चरन अनुरागी।।**

हनुमानाप्रमाणे भाग्यशाली कोणीही नव्हते. तर मग भाग्याचा स्त्रोत काय आहे? "नहिं कोउ राम चरन अनुरागी" रामचरणांचा अनुराग हाच भाग्याचा स्त्रोत आहे- जन्मदाता आहे.

या दोन्ही महापुरुषांच्या कथनावरून हे स्पष्ट होते की देवतांच्यामध्ये काही महापुरुषही आहेत जे आमचे पूर्वज आहेत. परंतु लाखो लाखो देवतांमध्ये त्यांची संख्या एक टक्काही नाही. परंतु त्यांच्याविषयी आमच्या मनात श्रध्दा असली पाहिजे कारण त्यांनी उग्र साधना करून परमात्म स्वरूपाची प्राप्ती करून घेतली होती. त्यांच्या पिढीसाठी ते सद्गुरू होते. परंतु आज त्यांची पूजा किंवा नाम-जप करायचे कारण नाही. परंतु तरीही श्रध्देने कोणी या महापुरुषाची पूजा केली किंवा नाम-जप केला तर ते महापुरुष त्या व्यक्तीला परमात्म्याकडे किंवा तिच्या समकालीन असणाऱ्या सद्गुरुकडे वळवतात. तेव्हा तुम्ही प्रथम पासूनच एका परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करा. यामुळे तुमचा वेळ वाया जाणार नाही आणि तुम्हांला सतत त्याच्यापासून प्रेरणा प्राप्त होईल.

## (द)

गोस्वामी तुलसीदास यांनी रामचरित मानसाची रचना केल्यानंतर शेवटी त्याच्या विरुध्द अशा मानसरोगाबद्दलही त्यांनी सांगितले आहे. ''मोह सकल व्याधिन्ह कर मूला''- सर्व व्याधींचे मूळ म्हणजे मोह होय. काम म्हणजे वात आहे, कफ हा लोभ आहे व क्रोध म्हणजे पित्त आहे. काम, क्रोध व लोभ ही तीन भावंड जेव्हा एका ठिकाणी एकत्र होतात तेव्हा तिन्ही दोषांचा शरीरात प्रकोप होतो व मनुष्य त्रासून जातो. ''अहंकार अति दुखद डमरूआ तृष्णा उदर वृद्धि अति भारी।'' या प्रकारे तुलसीदासांनी पंधरा-वीस रोगांचे चित्रण करून शेवटी त्यांनी सांगितले- ''मानस रोग कछुक मै गाये'' मी येथे थोड्याच मानसरोगांचे वर्णन केले आहे. ''है सबके लखि विरलन्ह पाये।'' हे रोग सर्वांच्या शरीरात आहेत पण फार थोडे लोक त्यांना ओळखतात. मग या रोगांपासून कशी मुक्ती मिळेल? यावर ते म्हणतात-

**सदगुरु बैद बचन विश्वासा। संयम यह न विषय कै आशा।।**
**रघुपति भगति संजीवनि मूरी । अनुपान श्रध्दा मति पूरी।।**
**एहि विधि भलेही सो रोग नसाहीं। नाहिं त कोटि जतन नहिं जाहीं।।**

तुलसीदास म्हणतात की, सद्गुरू हेच उत्तम वैद्य आहेत. त्यांच्या वचनावर पूर्ण श्रध्दा ठेवावी. भगवंताची भक्ती (म्हणजे देवी-देवतांची भक्ती नाही तर केवळ भगवंताची भक्ती) हीच यावर संजीवनीप्रमाणे आहे. अनुपानासाठी सद्गुरूवर दृढ श्रध्दा ठेवली

तरच रोग नष्ट होतील अन्यथा लाखो उपाय केल्यानंतरही ते दूर होणार नाहीत. मग आपण ते अन्य उपाय का करतो? मानसरोग नष्ट करणाऱ्या त्या प्रभूची भक्ती तुम्ही का करीत नाही?

## (ध)

आतापर्यंत तुम्हांला समजले असेल की तुमचा इष्टदेव कोण आहे? जो आम्हांला अनिष्ट गोष्टींपासून वाचवतो. त्याला इष्टदेव म्हणतात. आणि क्षती व आपले नुकसान करणाऱ्या गोष्टीला अनिष्ट असे म्हणतात. दैनंदिन जीवनात मनुष्याला नेहमी लहान-मोठी हानी सोसावीच लागते. कोणाचे डोके दुखते, कोणाच्या नोकरीत अडचण निर्माण होते, कधी वाहन बंद पडते, कधी अपघात होतो अशा प्रकारच्या अडचणी मनुष्याच्या जीवनात सतत येत असतात. तसेच मनुष्याच्या मनात अनेक प्रकारच्या इच्छा असतात. तेव्हा जो मनुष्याचे अनिष्टापासून रक्षण करतो आणि त्याच्या इच्छांची पूर्ती करतो तो इष्टदेव!

पण सर्व काही सुरक्षित झाल्यानंतर व समृध्द जीवन प्राप्त झाल्यानंतरही त्याचा उपभोग किती घेणार? अहो, हे शरीर तर क्षणभंगुर आहे. ते आज आहे तर उद्या नाही. त्या शरीराचा काही भरोसा नाही. ते नश्वर आहे. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की अर्जुना, अरे, हे शरीर नश्वर आहे फक्त त्या शरीरातील आत्मा शाश्वत आहे. ''अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम। (गीता ९/३३)''. म्हणजे प्राप्त झालेले वैभव विलास हे सर्व आम्हांला येथेच ठेवून जावे लागणार आहे. हा काळ आम्हांला केव्हाही ओढत-फरफटत घेऊन जाईल. मग या जन्म-मृत्यूच्या पलीकडे जाण्यासाठी काही उपाय आहे का? या भयंकर अनिष्टापासून आम्हांला वाचवून शाश्वत स्वरूप प्राप्त करून देणारे या जगात कोणी आहे का? आम्हांला शाश्वत धाम प्रदान करणारे, अक्षय शांती देणारे कोणी आहे का? हो हे सर्व देणारा एकमात्र परमात्मा आहे- एकमात्र परमतत्त्व शाश्वत परब्रह्म त्याचे नाव आहे श्रीराम! त्याचा जप करा. तेच इष्ट आहे.

## (न)

एकदा भगवान श्रीरामांनी सभा बोलावली-

**एक बार रघुनाथ बोलाए। गुरु द्विज पुरवासी सब आये।।**
**बैठे गुरु मुनि अरु द्विज सज्जन। बोले वचन भक्त भव भंजन।।**

गुरू-मुनी-द्विज-सज्जन सर्व बसले होते, तेव्हा भक्तांचे जन्म-मरणाचे दु:ख दूर करणारे राम म्हणाले-

**बडे भाग्य मानुष तन पावा। सुर दुर्लभ सदग्रन्थन्ह गावा।।**
**साधन धाम मोक्ष कर द्वारा। पाइ न जेहिं परलोक सँवारा।।**

अत्यंत पुण्याईने हे मनुष्यशरीर प्राप्त झाले आहे. ते देवतांनासुध्दा दुर्लभ आहे. उत्तम आचरणाचे फलस्वरूप म्हणून देवता भोग भोगत असतात; परंतु स्वर्गसुखही क्षणिक असते. त्यामुळे देवतादेखील मानवशरीराची अपेक्षा करतात. कारण हे शरीर साधनेचे धाम आहे, मुक्तीचे द्वार आहे. हे मानवशरीर प्राप्त केल्यानंतर जे आपला परलोक सुधारत नाहीत ते जन्मजन्मांतरीचे दु:खी होतात. त्यांना पश्चाताप होतो. काल-कर्म आणि ईश्वरास ते उगाचच दोष देतात. वास्तविक तुम्हांला मनुष्यशरीर प्राप्त झालेले असताना परलोक प्राप्त करण्याचा जर तुम्हांला उद्योग करता आला नाही तर दोष ना काळाचा असतो, ना कर्माचा ना ईश्वराचा असतो. सर्व दोष त्या व्यक्तीचाच असतो.

साधारणत: मनुष्य स्वत:ला दोषी समजत नाही. तो म्हणतो की माझ्या तर कर्मातच (नशिबात) हे लिहिलेले नाही तर कोठून मिळणार? म्हणजे येथे तो कर्माला दोष देतो. सध्या मला वेळ अनुकूल नाही, असे म्हणून काळाला दोष देतो आणि सर्व कर्ता-करविता ईश्वरच आहे असे म्हणून तो ईश्वराला दोष देतो. परंतु स्वत: भगवान रामचंद्रानी सांगितले आहे की जर मनुष्य शरीर प्राप्त झाले आहे तर त्यात दुसऱ्या कोणाचाही दोष नाही दोष असेल तर तो आपलाच आहे श्रीराम अन्यत्र म्हणतात.

**नर तन भव वारिधि कहँ बेरो। मनसुख मरूत अनुग्रह मेरो।**
**करनधार सद्गुरू दृढ नावा। दुर्लभ साज सुलभ करि पावा।।**
**जो न तरै भवसागर, नर समाज अस पाइ।**
**सो कृत निंदक मंदमति, आत्माहन गति जाइ।।**

हे मानवशरीर म्हणजे संसार सागर पार करणारी नाव आहे. सद्गुरू त्या नावेचा नाविक आहे. माझी कृपा म्हणजे अनुकूल वायू आहे. अशा प्रकारचा दुर्लभ संयोग व व्यवस्था असताना जो भवसागर पार करू शकत नाही तो स्वत:च आपल्या पौरुषाचा निंदक आहे. तो मंद बुध्दीचा आहे व आपल्या आत्म्याची हत्त्या करणारा आहे.

पण भवपार होण्याचा उपाय काय आहे?

**जो परलोक इहाँ सुख चहुहूँ। सूनि मम वचन हृदय दृढ गहहूँ।**
**सुलभ सुखद मारग यहु भाई। भक्ति मोर पुरान श्रुति गाई।।**

जर आपल्याला परलोक पाहिजे असेल, परमश्रेय असे शाश्वत धाम तुम्हांला पाहिजे असेल, अमृततत्त्व प्राप्त करू इच्छित असाल अथवा या लोकात आपल्या सर्व कामना पूर्ण करू इच्छित असाल तर मी केलेला उपदेश ऐका आणि अत्यंत दृढतेने त्याचे आचरण करा. भगवंताच्या कोणत्या उपदेशाचे आचरण करावयाचे? फक्त एकच गोष्ट करावयाची आहे. ती म्हणजे 'भगति मोरि' माझी भक्ती करा. एखाद्या नागाची किंवा देवतेची भक्ती करू नका. माझीच भक्ती करा. हेच श्रुतीनीही सांगितलेले आहे. तेव्हा इष्ट कोण आहे? एक परमतत्त्व परमात्मा। (या परमात्म्याशिवाय आम्हाला अनिष्ट गोष्टींपासून वाचवणारे दुसरे कोणीही नाही. आम्ही त्या भगवंताला मानत नसल्यामुळेच आम्हांला दारिद्रय प्राप्त होत असते.)

रामाचे नाव घेताच साधारणत: सर्वजण दचकतात. त्यांना वाटते कोण राम? मानसकार तुलसीदासांनी श्रीरामाचा परिचय दिला आहे- ''राम ब्रह्म व्यापक अविनाशी'' जो व्यापक आहे, चिन्मय आहे, कणाकणात भरून राहिलेला आहे, जो अविनाशी आहे त्याचेच दुसरे नाव राम आहे. इष्ट कोण आहे? एक परमतत्त्व परमात्मा म्हणजे इष्ट होय. यावर संपूर्ण भरवसा ठेवून किंवा श्रध्दा ठेवून आपल्या कार्यात जो मग्न असतो त्याच्या घरात समृध्दीचा वास असतो. त्याला सुखी व दीर्घ आयुष्य प्राप्त होते. त्याला स्नायूंचे रोग होत नाहीत. तो तणावमुक्त जीवन जगू शकतो. आपण मग अगदी संसारात गुरफटलेला असलात तरी परलोकातील आपले स्थान सुरक्षित आहे असे समजावे. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात- अर्जुना, परमेश्वरावर नितांत श्रध्दा ठेवून जो निष्काम कर्म करतो त्या पुरुषाचा कधी विनाश होत नाही. या मार्गामध्ये आरंभाचा कधी नाश होत नाही. आपण जर अतीव श्रध्देने बीजारोपण केलेत तर ती श्रध्दा तुम्हांला परमश्रेयापर्यंत नेऊन पोहचवते. तुमच्या कामना तुमच्या अडचणी निर्माण करतात; पण सत्याच्या अनुष्ठानाला त्या नष्ट करू शकत नाहीत. तेव्हा मानसकार म्हणतात की परमतत्त्व परमात्मा हाच इष्टदेव आहे.

देवी-देवता म्हणजे भ्रांती. मानसकारांनी अशा देवी-देवतांची पूजा करावयास कोठेही सांगितलेली नाही वा अशा देवदेवतांना पूजून कोठेही व कोणालाही यश प्राप्त

झालेले नाही. पण दुर्देवाने अशी पूजा आम्हांला वारसा हक्काने मिळत असते आणि आम्ही त्याचा डांगोरा पिटत असतो. पण त्याहीपेक्षा दु:ख याचे वाटते की या वारशाने प्राप्त झालेल्या या पूजेचा डांगोरा विरक्त महात्मादेखील पिटत असतात. रामकृष्ण परमहंस कालीमातेची पूजा करीत होते पण ती पूजा त्यांनी आपला अनन्य शिष्य विवेकानंद याला शिकवली नाही. विवेकानंदांच्या उपदेशात आपणास कधी देवीचे नाव देखील ऐकायला मिळत नाही.

अयोध्यावासी जनांचा असाच गैरसमज ते चित्रकूटला श्रीरामांना परत आणायला गेले तेव्हा झाला. कारण ते चित्रकूटवर गेले तेव्हा श्रीराम ''गनप गौरी त्रिपुरारी''ची पूजा करीत होते. परंतु श्रीरामाचा राज्याभिषेक झाल्यावर ते आपल्या मुलांना शिकवतांना म्हणतात-''भनहु प्रणत प्रतिपालक रामहि''- प्रतिज्ञेचे पालन करणाऱ्या श्रीरामाला तुम्ही भजा. ज्याप्रमाणे पापण्या डोळ्यातील बुबुळांचे रक्षण करतात त्याप्रमाणे तुमचे रक्षण करणाऱ्या त्या श्रीरामाला तुम्ही भजा. त्यांच्याकडून देवतांच्या पूजनाचा प्रश्नच येत नाही.

याप्रमाणे तुम्हांला आढळून येईल की, गीतेच्या शब्दांनी श्रीरामचरित मानसाची गोस्वामी तुलसीदासांनी सुरुवात केली आणि शेवटपर्यंत क्रमाक्रमाने एका परमात्म्यावर भर देऊन उत्तरार्धात शेवटी त्यांनी सांगितले आहे की- **''सोई कवि कोविद सोइ रणधीरा। जो छल छाडि भजई रघुवीरा।''** ज्याचे मन रामाच्या चरणी अनुरक्त आहे तोच कवी आहे, पंडित आहे, तोच रणधीर आहे. तोच कुलधर्म परायण आहे, तोच नीतिनिपुण आणि अत्यंत शहाणा आहे. तोच अत्यंत दक्ष व समस्त गुणांनी युक्त आहे. वेद उत्तमप्रकारे जाणतो.

असे असनूही लोक श्रीरामाचे भजन का करीत नाहीत ते समजत नाही. प्रवचन करणारे लोक कथा रामाची सांगतात परंतु भजनाच्या वेळी मात्र हनुमान चाळीसा म्हणतात, सप्तशतीचा पाठ करतात. कमीत कमी त्यांनी रामायणाचा संदेश लक्षात घेऊन आचरण केले पाहिजे. अजूनपर्यंत त्यांनी तसे आचरण केले नसले तर आता तरी त्यांनी रामायणाचा संदेश लक्षात घ्यावा आणि लोकांनाही समजून देण्याचा प्रयत्न करावा. रामचरित मानसाच्या अंतिम पंक्तीपर्यंत गोस्वामी आपल्याला आग्रहपूर्वक सांगत आहेत की रामाशिवाय अन्य कोणाचीही भक्ती किंवा भजन तुम्ही करू नका- **''परामहि सुमिरिय गाइय रामहि। संतत सुनिय राम गुण ग्रामहि।''** रामाचेच स्मरण करा, रामाचेच भजन करा आणि त्यांच्याच गुणांचे श्रवण करा.

**सुंदर सुजान कृपा निधान अनाथ पर कर प्रीति जो।**
**सो एक राम अकाम हित निर्वानप्रद प्रभु आन को॥**

सुंदर, सुजाण, कृपानिधान आणि अनाथांवर प्रेम करणारा एकमात्र राम आहे. त्यांच्यासारखा तुमचे नि:स्वार्थपणे हित करणारा आणि मोक्ष देणारा दुसरा कोण आहे?

स्वयंसिद्ध अशा एका इष्टदेवाच्या स्थानी अनेक इष्टदेव निर्माण करून आज आम्ही सर्वत्र विखुरले गेले आहोत. तेव्हा लक्षात ठेवा की, शाश्वत असा एकमात्र सर्वव्याप्त परम ईश्वर परमात्मा आहे व म्हणून संपूर्ण विश्वाचा इष्टदेव असा एकमात्र परमात्माच आहे. आमच्यापैकी जे नश्वराची पूजा करतात ते नास्तिक आहेत असे समजावे. जे नश्वर आहे अस्तित्वहीन आहे त्यांची पूजा करणे, करवणे किंवा तिला प्रोत्साहन देणे म्हणजे नास्तिकतेला पोसणे होय किंवा प्रोत्साहन देणे होय. ब्रह्मदेवापासून यच्चयावत् या परिवर्तनशील जगामध्ये अविनाशी व अमृतस्वरूप परमात्मा भरलेला आहे. म्हणूनच संपूर्ण जगताचा तो अमृतस्वरूप परमात्माच इष्टदेव आहे. त्याची आवश्यकता समाजात सदैव आहे व सर्वांना आहे. तेव्हा सर्व व्यवहार करीत असताना परमतत्त्व परमात्म्याचे दोन-अडीच अक्षराचे नाव ॐ किंवा राम याचा जप केला तर आम्ही आस्तिक आहोत कारण आम्ही अस्तित्वाची पूजा करीत असतो. त्या परमात्म्याच्या भजनाची सुरुवात त्याच्यावर असीम श्रध्देने व त्याच्या नामजपाने होत असते. हो, पण अमृतस्वरूप परमात्म्याची प्राप्ती सद्‌गुरूमुळे होत असते. कारण सद्‌गुरूला ही क्रिया अनुभवगम्य असते व सूक्ष्म असते.

या सृष्टीमध्ये भगवंत एकच आहे. दोन किंवा अनेक असू शकत नाहीत. तो कणाकणामध्ये भरलेला आहे. जर दुसरा भगवंत असेल तर सर्वत्र व्यापून राहण्यासाठी त्याला दुसरे जग किंवा सृष्टी हवी. पण हा भगवंत राहतो कुठे? ''**अस प्रभु हृदय अक्षत अविकारी। सकल जीव जग दीन दुखारी॥**'' भगवंताचा निवास सर्वांच्या हृदयात असतो; परंतु तो कोणाला दिसत नाही. आता त्याला पाहावे कसे? त्याचा विधी असा- ''**नाम निरुपण नाम जतन ते। सो प्रगटन जिमि मोल रतन ते॥**'' प्रथम नामाचे निरुपण करा म्हणजे ते कशा प्रकारचे आहे त्याचा शोध घ्या. त्याचा जप कसा केला जातो? श्वासात उठणारी धून कशी पकडली जाते? त्याला प्रेरणा देणारा कोण आहे? खूप प्रयत्न करून त्याला जाणून घेण्याचा प्रयत्न करा; म्हणजे तो प्रगट होईल.

तो परमात्मा म्हणजे एक धाम आहे. आणि त्यात प्रवेश करून देणारा म्हणजे माध्यम आहे सद्गुरू! ''गुरु राखई जो कोप विधाता! 'गुरु रुठे नहीं कोउ जग त्राता।'' जरी तुमचे नशीब तुम्हांला साथ देत नसेल, अनंत यातना तुम्हांला सहन करायला लागतात तेव्हाही सद्गुरूच तुमचे रक्षण करीत असतो. पण सद्गुरूच उपलब्ध नसेल तर भगवंताला तुम्ही ओळखू शकणार नाही. भगवंत तुमच्या हृदयात वास करीत असतो पण जर सद्गुरु नसेल तर त्या भगवंताला तुम्ही ओळखू शकत नाही. जो गुरु परपात्मप्राप्तीचा मार्ग दाखवीत नाही जो सत्यामध्ये प्रवेश देऊ शकत नाही, जो आमच्यातल्या सुप्त शक्तीला जागृत करीत नाही, एवढा जर तो सक्षम नसेल तर असा गुरू हा सद्गुरू नाही, कुलगुरू आहे. जोपर्यंत सद्गुरू उपलब्ध नसतात तेव्हा परमात्म्याचा परिचय करून देणारे दोन अडीच अक्षरांचे नाव आणि परमात्म्यावर असीम श्रध्दा जर तुमच्यात असेल तर तुमचा जप, भजन आणि इष्टदेव बरोबर आहे असे समजावे, या श्रध्देमुळे आपले मन एका परमेश्वराच्या ठिकाणी केंद्रित होते, एका ठिकाणी स्थिर होते व तेच मग तुमचे पुण्य बनते, तुमचा तो पुरुषार्थ ठरतो. याबरोबरच तुमचा आत्मा जागृत होऊन सद्गुरूबरोबर भेट घडवून आणेल आणि सद्गुरू भेटले की, आपल्या हृदयात यौगिक क्रियेची जागृती सुरू होईल. आणि आपल्याला निरनिराळे अनुभव येऊ लागतील, संकेत मिळतील व इष्टदेवाचे आदेश मिळणे पण सुरू होईल. तुमचा तटस्थ असणारा आत्मा जागृत होईल.

असे म्हटले जाते की, ईश्वर हृदयात वास करीत असतो. परंतु चार-सहा महिने एखाद्या तत्त्वदर्शी महापुरुषाची सेवा केली, त्यांनी सांगितलेली साधना केली की आमच्या हृदयातला देव जागृत होतो. तो मग तुमच्याशी बोलू लागतो, तुम्हांला मार्गदर्शन करू लागतो. तो ईश्वर तुम्हांला चालवतो. त्यांच्या निर्देशाप्रमाणे चालून साधक त्याला प्राप्त करतो. 'न अयम आत्मा प्रवचनेन लभ्य'' हा आत्मा ना प्रवचनाने प्राप्त होतो ना विशिष्ट बुध्दीने प्राप्त होतो ना पुष्कळ ऐकल्याने प्राप्त होतो. परंतु लाखो श्रध्दाशील लोकांमध्ये ज्याची तो निवड करतो त्याच्या हृदयात जागृत होऊन त्याचे बोट धरून त्याला चालवू लागतो. तोच श्रध्दाशील मनुष्य त्याच्या आदेशाप्रमाणे चालून त्या भगवंताला प्राप्त करून घेऊ शकतो. जेव्हा परमतत्त्व परमात्म्यावर अतुट श्रध्दा असेल आणि तत्त्वदर्शी सद्गुरू उपलब्ध असतात तेव्हाच तो भगवंत तुमचे बोट पकडेल.

॥ॐ॥

# कर्मकांड

कर्मकांड निरर्थक नसते
मानव-जीवनाची ती अनिवार्य आवश्यकता आहे.

आणि ही गोष्ट प्रत्येक मनुष्याच्या
हृदयापर्यंत पोहचवणे हाच पुरोहितांचा हेतू असतो.

-स्वामी अडगडानंद

# कर्मकांड

मनुष्याच्या जीवनात घडणारी प्रत्येक घटना म्हणजे एक कांड असते-एक प्रकरण असते. आणि त्या प्रत्येक घटनेबाबत कर्तव्याचे ज्ञान करून देणे म्हणजे कर्मकांड होय. प्रत्येक घरात काही ना काही घटना घडतच असते. उदा. लहान मुलाचा जन्म होतो, एखाद्या घरात एखाद्याचा मृत्यु होतो. कोणाकडे लग्नाचा प्रसंग असतो, तर कोठे भोजनाचा कार्यक्रम असतो. भारतीय मुनींनी मनुष्याच्या जीवनात नेहमी घडणाऱ्या अशा पंधरा-सोळा प्रमुख घटना निवडल्या आणि त्या घटनेवर परमात्म्याचे आंशिक बीजारोपण करण्यासाठी सोळा संस्कार रूढ केले. गर्भावस्थेपासूनच मुलामध्ये परमात्म्याचे बीज रूजवणे, त्याच्यावर परमात्म्याचा संस्कार करून, परमात्म्याची प्राप्ती करून घेणे हे तुझे कर्तव्य आहे अशा प्रकारे त्याला कर्माचा किंवा कर्तव्याचा बोध करून देणे म्हणजे शुद्ध कर्मकांड होय. येथे कर्मकांड म्हणजे कर्माचा अतिरेक नव्हे तर कर्माचे शुद्ध ज्ञान करून घेणे म्हणजे कर्मकांड होय.

वैदिक युगामध्ये घरोघरी जाऊन पुरोहित शाश्वत परमात्म्याचे ज्ञान करून देत असत. ते त्यांचे कर्तव्य समजले जाई. तसेच विवाहादी प्रसंगांच्या वेळी पुरोहित वेदातील पुरुष-सूक्ताच्या ऋचा म्हणत असत. त्याबरोबरच त्यांना त्यांच्या प्रिय वस्तू, भोजन, ताम्बुल, नवीन वस्त्र सुगंधी द्रव्ये इत्यादी अर्पण केले जात असे. हे सर्व ईश्वराला अर्पण करीत आहोत असे यजमानाच्या मनावर ठसवून परमात्म्याला प्राप्त करण्याची भावना त्याच्या मनावर ठसवली जात असे. म्हणजे प्रत्येक वस्तू धारण करताना परमात्म्याची आठवण राहवी ही यामागे भावना असे. या मंत्रांच्या शेवटी अर्घ्यं, बाद्य, नैवेद्य म्हणजे पुरोहित भगवंताचे हात-पाय धुण्याचा अविर्भाव करतात व प्रत्येक वस्तू त्या भगवंताची आहे असे सुचवतात. वास्तविक पुरोहित ना भगवंताचे हात धुतात ना पाय. ना स्वत:चे हात पाय ते धुतात. परंतु यजमान याबाबतीत अज्ञानी असल्याने ज्या घरात कार्य चाललेले असते त्या घरातील मुख्य माणसाचे हातपाय तो धुतो. याचा अर्थ फक्त एवढाच आहे की हात धुताना, पाय धुताना, पाणी पिताना, भोजन करताना, वस्त्रे घालताना, गंध लावताना, शय्येवर जाताना किंबहुना प्रत्येक मंगल वस्तूच्या उपयोगामध्ये त्या परमप्रभूचे चिंतन करावे. त्या वस्तू हृदयात वास करणाऱ्या परमेश्वराला अर्पण केल्या जातात,

हात-पाय धुतले जातात. यात त्या मुनींचा हाच उद्देश होता की, प्रत्येक मुलाला असे समजावे की, आपल्या हृदयात ईश्वराचा वास आहे व त्या ईश्वरास मला पहावयाचे आहे, त्याला जाणायचे आहे. असे झाले तर सार्वभौम कल्याण होऊ शकेल आणि लक्ष्यापासून विचलित होण्याचा कोणाला अवसरच मिळणार नाही.

याप्रमाणे हृदयस्थ परमेश्वराला प्रत्येकाने सदैव जाणावे, सतत त्याचे स्मरण करावे व स्वत:चे कल्याण करून घ्यावे ही मुनींची भावना किंवा मुनींचा हा उद्देश कालांतराने लुप्त झाला आणि बुद्धिजीवी वर्गाने आपल्या जीवन निर्वाहासाठी प्रत्येक क्रियेला 'कांड' अशी संज्ञा देऊन बृहत कर्मकांडाची रचना केली. यामध्ये शौचाला जाताना म्हणायचा मंत्र, स्नान करताना म्हणावयाचा मंत्र, भोजन करण्यापूर्वी म्हणण्याचा मंत्र अशा अनेक कृती करताना म्हणण्याचे मंत्र, विधी-निषेध आणि त्यांचे आचरण करताना काही चूक झाली तर प्रायश्चित म्हणून दान देणे या गोष्टी विस्ताराने सांगितल्या आहेत. म्हणजे हृदस्थ परमात्म्याचा शोध करण्याचा हेतू लुप्त झाला आणि त्या ऐवजी अनेक देवीदेवतांच्या पूजेला कर्म म्हणून घोषित केले गेले व तत्संबंधीच्या पूजनविधींचा कर्मकांडाच्या रूपाने प्रचार केला गेला. यामुळे परमात्म्याला जाणण्याचा हेतू मागे पडला आणि त्याऐवजी अनुष्ठान व मंत्र लोक लक्षात ठेवू लागले. एका धर्माच्याजागी सांप्रदायिक वर्ग बनले. शाश्वताचा पुजारी नश्वराच्या मागे धावू लागला.

अंड्याला सुरक्षित ठेवायचे असेल तर अगदी सुरुवातीपासून त्याची काळजी घेणे आवश्यक असते. पिल्लू आत तयार झाल्यावर ते नीट तोडणेही आवश्यक असते नाहीतर आत ते पिल्लू गुदमरून मरून जाईल. आमचा धर्म असाच गुदमरून गेला आहे. आमच्या पुर्वजांना अनेक कु रीती सहन कराव्या लागल्या. आज आता ती परिस्थिती राहिलेली नाही. सामाजिक शिष्टाचार तसेच राहणी-करणीच्या प्रत्येक उपयुक्त-अनुपयुक्त नियमांना धर्म म्हणून लोकांची दिशाभूल करण्यात आता काही औचित्य राहिले नाही. आता अनेक शतकांपूर्वीच्या सुखी भौतिक जीवनाची व्यवस्था लोकमनावर आधारित असणाऱ्या राज्याच्या हातात निघून गेली आहे. यासाठी येथे एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे की 'धर्म' म्हणजे केवळआवागमनरहित अशा शाश्वत शांतीचा शोध करणे. ही शांती सर्वत्र व्यापून असणाऱ्या शाश्वत परमात्म्यामध्ये आहे. त्याला शोधण्यासाठी प्रत्येक मनुष्याला आपल्या हृदयात खोल उतरायचे आहे.

अशा परमात्म्याचे चित्रण वेदातील पूरुष-सूक्तात आहे. पुरुष सूक्त म्हणजे ''पुर: शेते इति पुरुष:''- ईश्वर हृदयरूप नगरात राहात आहे व म्हणूनच त्या परमपुरषाचा शोध घेण्याची जागा म्हणजे तुमचे हृदयरूपी नगर. ईश्वराला बाहेर शोधण्याची गरजच नाही. आजदेखील कर्मकांडाच्या नावावर पुरुष-सूक्ताचे तेच मंत्र म्हटले जातात. परंतु सर्वसामान्य लोकांना संस्कृतचे ज्ञान नसल्यामुळे त्या सूक्ताचा अर्थ त्यांना समजत नाही.

तेव्हा पुरोहिताने या ऋचांचा अर्थ त्या प्रादेशिक भाषेत समजावून सांगितला पाहिजे की परमात्मा एकच आहे आणि तोच शाश्वत आहे. ब्रह्मापासून यच्चयावत् जगत नाशवंत आहे. बह्मदेवापासून उत्पन्न झालेल्या देवी-देवतादेखील ''क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति'' - त्यांचे पुण्य संपले की त्या मृत्युलोकात परततात. त्या पराधीन आहेत. म्हणूनच त्यांची पूजा करणे योग्य नव्हे . ती पूजा बंद करून एका परमात्म्यावर दृढ श्रध्दा ठेवा.

**हिरण्यगर्भ: समवर्तताग्रे भूतस्य जात: पतिरेकअसित् ।**
**स दाधार पृथ्वीन्यामुते मां, कस्मै देवाय हविषा विधेम् ?**
**(ऋवेद १/१२१/१)**

म्हणजे सोन्याप्रमाणे चकाकणारा परमात्मा सर्वात प्रथम उत्पन्न झाला. उत्पन्न झालेल्या सर्व प्राण्यांचा तो एकमात्र पती बनला. त्याने पृथ्वी आणि आकाशाला धारण केले. याच्याशिवाय तुम्ही कोणत्या देवतेची हवीद्वारे पूजा कराल?

एकमात्र परमात्म्याला प्राप्त करणे आमचे कर्तव्यकर्म आहे. याच नियत कर्माचे गीतेमध्ये वर्णन आहे. या नियत कर्मामध्ये दैवी संपदा नावाच्या सद्गुणांचा विकास करणे, एकांतवासात राहणे, श्वास-प्रश्वासद्धारा ॐ चा किंवा भगवंताच्या दोन-अडीच अक्षरी नावाचा जप करणे, इंद्रियांचे दमन करणे, मनाचे शमन करणे, सतत चिंतन करणे, युक्त आहार-विहार ठेवणे आणि तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जाणे या गोष्टींचा अंतर्भाव होतो. हे नियत कर्म करीतच हृदयस्थ परमेश्वराला जाणण्याखेरीज मृत्युला जिंकण्याचा अन्य दुसरा कोणताही मार्ग नाही.

साधना संपन्न पूर्वजांनी ज्या शाश्वत सत्याला प्राप्त केले होते, जाणले होते ते सत्य म्हणजे परमात्मा होय- व तो परमात्मा प्रत्येकाच्या हृदयातच वसत आहे. ही गोष्ट

त्यांनी त्यावेळीस प्रत्येकांच्या मनावर बिंबवली होती. आणि आजदेखील हे काम जे करत आहेत ते सर्वांच्या श्रद्धेला प्राप्त होत असतात. याच्या बदल्यात त्यांना दक्षिणा देणे म्हणजे शाश्वत सत्याला कायम ठेवणे होय. यामुळे प्रत्येक मनुष्यापर्यंत शाश्वत सत्याचा संदेश पोहचवायला त्यांना प्रोत्साहन मिळेल.

काही प्रदेशात भगवंताला फुलाचा हार, गंध वगैरे अर्पित करताना पुरुष-सूक्तापेक्षा वेगळेच असे इतर वैदिक तसेच लौकिक मंत्रपाठ म्हणण्याची पद्धत आहे. उदा.-

**त्वां गन्धर्वोऽअत्खनस्त्वांमिन्द्रस्त्वा बृहस्पति : ।**

**त्वामोषधे सोमो राजा विद्वान यक्ष्मादमुच्यत : ॥**

हे दिव्य वनस्पती गंधर्व, इंद्र तसेच बृहस्पतींनी खणले. तुमच्या रसप्राशनाने विद्वान सोमराजा राजयक्ष्मापासून मुक्त झाला.

**औषधी : प्रतिमोध्वं पुष्पवती प्रसूवरी :**

**अश्वाऽइव सजित्वरी व्वीरुध: पारयिष्णव : ॥**

हे वर्धिष्णू वनस्पतींनो, तुम्ही फलाफळांनी बहरलेल्या होऊन आनंदात रहा. आणि अश्वाच्या शीघ्र गतीने आमची दु:खे दूर करा.

**धूरसि, धूर्व्व धूर्व्वतंयोस्मान्धूर्व्वति : तं धूर्व्वयं धूर्व्वाम:**

**देवानामासि वह्नि तम मे सास्नितमे पप्रितमे जुष्ट मतन्देवहूतमम् ॥**

तुम्ही सर्वांना कापणाऱ्या आहात. हे दिव्य वनस्पतींनो जो आम्हाला कंपित करतो त्याचा तुम्ही नाश करा. आम्हाला जो आवडत नाही त्याचाही नाश करा. आपण देवतांचे वाहन आहात, सामर्थ्यवान आहात, प्राशनीय आहात, तसेच देवांकडून आमंत्रित केलेल्या आहात.

**ये तीर्थानि प्रचरन्ति शस्त्रहस्ता निषंगिण: ।**

**तेषां सहस्त्र योजनेव धन्वानि तन्मसि ॥**

शस्त्र धारण करणारे-शस्त्रधारी-लोक आमची तीर्थक्षेत्रे दुषित करतात, अपवित्र

करतात त्यांना धनुष्यातून सुटणाऱ्या बाणाप्रमाणे हजारो योजने दूर टाकून द्या.

त्या काळी धनुष्यबाण आणि घोड्यांचा अत्यंत उपयोग केला जात असल्याने वेगवान गोष्टींसाठी त्यांची उपमा दिली जात असे. आज त्यांच्यापेक्षाही अधिक वेगवान वस्तूंचे शोध लागलेले आहेत. सांगण्याचे तात्पर्य हे की, या मंत्रांनी ना परमपुरुषाचा महिमा व्यक्त होतो ना आजच्या वैज्ञानिक युगातील शस्त्रास्त्रांसमोर ते टिकणारे आहेत. ते आज समाजाच्या कामाला मात्र उपयोगी पडतात. कोणी तरी औषधी वनस्पती शोधून काढली, तिचे परीक्षण केले आणि रोग्याला देऊन त्याला बरे करण्यात आले. परंतु औषधी वनस्पतीला नुसते हात जोडल्याने ती काय देणार ? ती घोड्याप्रमाणे धावत येणार नाही. जेव्हा तिला प्रयोगशाळेत नेऊन तिचे परीक्षण केले जाईल तेव्हाच औषध म्हणून तिचा लोकांना फायदा होईल. ज्या चिकित्सा प्रणालीने शोध चालू ठेवले त्या आज प्रगतिपथावर आहेत. ज्या वनस्पतींचा अत्यंत फायदा झाला त्यांना लोक देवता समजू लागले. नुसते हातावर हात ठेवून बसणे म्हणजे मंदबुद्धीचे लक्षण आहे. 'जो आम्हाला कापतो त्याला नष्ट करा' हा काही धार्मिक मंत्र नाही. तर केवळ ही व्यक्तिगत सुरक्षा झाली. आज धनुष्य-बाणाने आपले रक्षण होणार नाही. आज त्या पद्धती नष्ट झाल्या आहेत. केवळ मंत्र आहे म्हणून पठण करण्यात काही अर्थ नाही. जे बोधप्रद आहे, जे शाश्वत आहे अशा ऋचांचे पठण करा. या ऋचा तुम्हाला मोक्षाचा संदेश देणाऱ्या आहेत.

ज्यांचे खरोखर पठण करणे आवश्यक आहे त्या प्रभूचा महिमा सांगणाऱ्या ऋचांचे अवलोकन करूया.

**अथ पुरुष-सूक्तम्**

**ॐ सहस्त्रशीर्षा: पुरुष: सहस्त्रक्ष: सहस्त्रपात् ।**

**स भूमि विश्वतो वृत्वात्यीतष्ठद्दशांगुलम् ॥ १ ॥**

तो परमपुरुष सहस्त्र मस्तकांचा, सहस्त्र नेत्रांचा आणि सहस्त्र चरणांचा आहे. तो विश्वातील समस्त भूमी व्यापून पंचमहाभूत आणि पंचसूक्ष्मामध्ये (रूप, रस, गंध, शब्द आणि स्पर्श) तो निवास करीत असतो. अशा प्रभूची मी कामना करतो त्याचे आवाहन

करावे.

**ॐ पुरुष एवेदं सर्व युभ्दतं यच्च भाव्यम् ।**

**उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ २ ॥**

भूत, भविष्य आणि वर्तमान हे सर्व म्हणजे तो परमपुरुषच आहे. तोच अमरत्वाचा स्वामी आहे. ईश्वरीय चिंतनरूपी अन्न सेवन करून तो वाढत असतो. सामान्य अन्नाने शरीराचे पोषण होते, परंतु आत्म्याचे पोषण ईश्वरीय चिंतनरूपी अन्नाने होत असते. यामुळे हृदयस्थ ईश्वराची वाढ होते. वास्तविक परमात्मा कधी घटत नाही किंवा वाढतही नाही. परंतु साधकासाठी तो घटत व वाढतही असतो. भगवंताला आसन द्यावे.

**ॐ एतावनस्य महिमातो ज्यायांश्च पुरष: ।**

**पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृत दिवि ॥ ३ ॥**

भूत, भविष्य आणि वर्तमानाशी निगडित असणारे हे समस्त ब्रह्मांड हे या परमपुरुषाचे वैभव आहे आणि तो या सर्वाहून श्रेष्ठ आहे. आकाश, पृथ्वी इ. सर्व चराचर जगत या परमात्म्याचा अंश आहे. तसेच तो ज्योतिस्वरूप आहे आणि त्याच्यामध्ये तीन अंश अमृत भरलेले आहे आणि म्हणून त्या एक भगवंतालाच धारण करणे योग्य आहे अन्य कोणालाही नाही. अशा या भगवंताचे पाय धुवावेत.

**ॐ त्रिपादूर्ध्व उदैत् पुरुष: पादोऽस्येहाभवत्पुन:**

**ततो विष्वङ्व्यक्रामत साशनानशने अभि ॥ ४ ॥**

वरील तीन अंशांनी युक्त असा हा परमपुरुष उत्तम मुक्तिस्वरूप आहे. तो या जगताहून पृथक्पणे प्रकट होत असतो. त्यांच्या चरणकमलापासूनच हे जग निर्माण झालेले आहे आणि तोच या संपूर्ण जड-चेतनामध्ये व्याप्त आहे. एकमात्र तोच मुक्ती देणारा आहे . अशा भगवंताला अर्ध्य द्यावे, त्यांचे तोड धुवावे.

**ॐ तस्माद्वि राङजायत विराजो अधि पूरष: ।**

**स जातो अत्यरिच्यत पश्चाद भूमिमथो पुर: ॥ ५ ॥**

त्या परमपुरषापासून विराट ब्रह्मांड निर्माण झाले व त्या विराट ब्रह्मांडाचा तो

अधिपती बनला. तो उत्पन्न होऊन अत्यंत प्रकाशित झाला. त्यानंतर त्यांनीच ही भूमी व तसेच शरीर निर्माण केले. यासाठी त्याला जाणले पाहिजे. त्या भगवंताला स्नान घालावे.

**ॐ यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत ।**

**वसन्तोऽस्यासीदाज्यं ग्रीष्मः इध्म शरद् हविः ॥ ६ ॥**

देवतांनी या परमपुरुषाला हव्य देण्याच्या इच्छेने यज्ञ संपन्न केला. या यज्ञामध्ये वसंतऋतू तूप, ग्रीष्म इंधन आणि शरद हवी होता. या प्रकारे दिव्य वृत्तींनी प्रत्येक वस्तूमध्ये त्याचे चिंतन करून त्याला जाणले. यासाठीच नेहमी त्याचेच चिंतन केले पाहिजे. त्या भगवंताला वस्त्र अर्पण करावे.

**ॐ तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन् पुरुषं जातमग्रतः ।**

**तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ॥ ७ ॥**

देवाः म्हणजे दैवी संपदेला हृदयात उतरवणारे साध्य, साध्याः म्हणजे परमात्म्याच्या प्राप्तीसाठी साधना करणारे योगाभ्यासी तसेच कवी मनाचा विरोध करणाऱ्या ज्ञानी लोकांनी शरीरस्थ पुरुषाला साधनेच्या द्वारे विशुद्ध केले आणि त्याला अग्रजन्मा म्हणजे अग्रगण्य बनवले, पुरुषोत्तम बनवले. अशा प्रकारे यजन करून, आत्म-शोधन करून सर्वांनी मोक्ष मिळवला. तुम्हालाही हेच करायला पाहिजे. भगवंताला आता गंध लावावे.

**ॐ तस्माद यज्ञात सर्वाहुतः सम्भृतं पृषदाज्यम् ।**

**पशून्तांश्चक्रे वायव्यानारण्यान् ग्राम्याश्च ये ॥ ८ ॥**

ज्यामध्ये सर्व काही हवन केले होते त्या यज्ञातून पुष्कळ तूप निर्माण झाले. त्या परमपुरुषाने यज्ञातूनच हवेत उडणारे, नगरात राहणारे, वनात राहणारे व इतर पशु-पक्षी निर्माण केले. त्या सर्वांमध्ये या परमेश्वराचाच प्रकाश आहे. अशा त्या परमेश्वराला जाणा. त्याला फुलाहार अर्पण करावा

**ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जाज्ञिरे ।**

**छन्दासि जज्ञिरे तस्माद् यजुस्तस्मादजायत ॥ ९ ॥**

ज्यामध्ये सर्व हवन केले आहे त्या यज्ञातून ऋग्वेद आणि सामवेद प्रकट झाले,

त्यातूनच अथर्ववेद प्रकट झाला. त्यापासूनच यजुर्वेदाची म्हणजे यज्ञ विधीच्या मंत्रांची उत्पत्ती झाली. अशाप्रकारे वेदांचे मूळही यज्ञच आहे. तेव्हा यज्ञाद्वारे त्या परमपुरुषाला जाणले पाहिजे. त्या भगवंताला धूप दाखवावा.

**ॐ तस्मादश्वा अजायन्ते ये के चोभयादत: ।**
**गवो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावय: ॥ १० ॥**

त्या परमपुरुषापासून घोडे उत्पन्न झाले. याशिवाय दोन्ही दात असणारे प्राणी, गाय, बकरी इत्यादी पशुपक्षी हेही त्यापासूनच उत्पन्न झाले. तात्पर्य या जगातील सर्वांची उत्पत्ती त्या परमात्म्यापासूनच झालेली आहे. त्या एकमात्र परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे, श्रद्धा ठेवली पाहिजे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही पूजनीय नाही. त्याला अत्तर लावावे.

**ॐ यत्पुरुषं व्यदधु: कतिधा व्यकल्पयन् ।**
**मुखं किमस्य कौ बाहू क ऊरू पादा उच्चेते ॥ ११ ॥**

आत्तापर्यंत ज्या परमपुरुषाचा विचार करीत आहोत त्या परमपुरुषाची कल्पना अनेकांनी अनेक प्रकारे केली आहे. त्याचा चेहरा काय आहे. ? त्याचे हात आणि पाय काय आहेत ? आता ते पुढे पहा. त्या देवाला फळे अर्पण करा.

**ॐ ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् वाहू राजन्य: कृत: ।**
**ऊरू तदस्य यद् वैश्य पदभ्यां शूद्रो अजायत ॥ १२ ॥**

ब्राह्मण त्याचे मुख होते. क्षत्रीय त्याचे दोन हात बनले. वैश्य त्याच्या दोन जांघा बनले आणि त्याच्या पायांपासून शूद्र उत्पन्न झाले-जन्माला आले. या भगवंताला द्रव्य अर्पण करा.

(विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे केवळ शूद्रच जन्माला आले कारण उत्पत्तिकालात भजन केवळ शूद्र स्तरावरचे असते. विकासापासून वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण असे स्तर बनतात किंवा अशा प्रकारे विकास होत जातो. जो भजन करीत नाही तो शूद्रही नसतो तो केवळ जडजीवमात्र असतो. साधनेच्या या चार श्रेणी पार केल्यानंतर

साधक ब्राह्मण पण राहात नाही. 'न ब्राहमण न क्षत्रिय न वैश्यो न शूद्रः चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहम्'' ही स्थिती प्राप्त होते)

अर्थात साधनेच्या या चार पायऱ्यांना चार जाती समजून समाजात रूढ केले ते चुकीचे आहे आणि त्या प्रथेला दुजोरा देऊन शूद्र पायापासून निर्माण झाले म्हणून सर्वात निकृष्ट समजले गेले हेही चुकीचे आहे. वास्तविक परमपुरुष तर सर्वत्र हात-पाय आणि तोंड असलेला असा होता. जेथे पाय होता तेथे काय डोके नव्हते ? एकाच पायामध्ये संपूर्ण सृष्टी सामावलेली आहे. या दृष्टीने विचार केला तर सर्वच शूद्र ठरतात. ईश्वराच्या ज्या चरणांतून पतीतपावन गंगा निघाली त्याच चरणातून जन्माला आलेला शूद्र इतका अपवित्र असावा की तो शिकल्याने संपूर्ण धर्मच नष्ट होतो ? तो परमपुरुषच अगदी मरून जातो ? किती भ्रममूलक कल्पना आहे ही !

ही वस्तूस्थिती लपवून मनुस्मृतिकार म्हणतात की जन्मतः सर्वच शूद्र असतात. त्यांच्यावर संस्कार केल्यानंतर ते ब्राह्मण बनतात. संस्काराच्या नावावर गळ्यात यज्ञोपवीत घालून दोन-चार मंत्र म्हटले की झाला तो ब्राह्मण ! जर अशा प्रकारे ब्राह्मण बनत असतील तर मग सर्वांना ब्राह्मण बनवून आपली संख्या का ते वाढवीत नाहीत ? वास्तविक केवळ यज्ञोपवीत घालणे म्हणजे संस्कार नाही. संस्कार म्हणजे- ''स अंश आकार'' त्या परमात्म्याचा आंशिक आकार तुमच्यात घालणे, त्याच्याबद्दलची आवड मनात निर्माण करणे म्हणजे संस्कार होय. तेव्हा वेदाच्या नावावर मनुष्या-मनुष्यात फूट पाडू नका. परमात्मा सर्वांमध्ये आहे आणि या दृष्टीने सर्वजण समान आहेत. त्या परमात्म्याची प्राप्ती करून घेण्याचा सर्वांना अधिकार आहे.

**चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत**
**मुखादिन्द्रश्चग्निश्च प्राणाव्दायुर जायत ।। १३ ।।**

त्या परमपुरुषाच्या मनापासून चंद्र उत्पन्न झाला. नेत्रांमधून सूर्य प्रकट झाला. कानातून वायू आणि प्राण तसेच मुखातून अग्नी उत्पन्न झाला. भगवंताला निरांजन ओवाळावे.

**ॐ नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो घौः समवर्तत ।**

**पद्भ्यां भूमीर्दिश: श्रोत्रात्तथा लोकाँअकल्पयन ।। १४ ।।**

त्या परमपुरषाची नाभी म्हणजे अंतरीक्ष होय. त्याच्या मस्तकातून स्वर्ग निर्माण झाला. पायांपासून पृथ्वी व कानांपासून दिशा निर्माण झाल्या. या प्रकारे समस्त लोक त्या परमपुरुषात विद्यमान आहेत. कल्पिलेले हे सर्व म्हणजे एकाच पुरुषाच्या विभूती आहेत. त्यांना जाणण्याचा प्रयत्न करा. आता भगवंताला नैवेद्य अर्पण करावा.

**ॐ सप्तास्यासन परिधयास्त्रि: सप्तसमिधा कृता: ।**
**देवायज्ञं तन्वाना अवध्नन्पुरुषं पशुम ।। १५ ।।**

दैवी संपदेने युक्त असणाऱ्या लोकांनी यज्ञ करताना योगाच्या सात भूमिकांमध्ये प्रकृती, महतत्व, अहंकार, पंच स्थूलभूत व पंच सूक्ष्मभूत, पाच ज्ञानन्द्रिये तसेच तीन गुण या एकवीस समिधांचे हवन करून त्या पुरुषरूपी पशूला बांधून टाकले. या सर्वांचे हवन झाल्यानंतर जे शेषं राहते त्याला समजून घ्या. साधनेच्या द्वारे तो परमात्मा अवश्य प्राप्त होतो. भगवंताला तांदुळ अर्पण करावे.

**ॐ यज्ञेन यज्ञं अजयन्त देवस्तानि धर्माणि प्रथमान्यासन ।**
**ते ह नाकँ महिमान: सचन्त यत्र पूर्वेसाध्या: सन्ति देवा: ।। १६ ।।**

दैवी संपदेच्या गुणांना हृदयात धारण करणाऱ्यांनी परमपुरुषाची प्राप्तिरूपी उपरोक्त यज्ञाद्वारा यज्ञरूपी परमपुरुषाचे सेवन केले. अशाप्रकारच्या यज्ञातून सर्वप्रथम धर्माची उत्पती झाली. त्याच्या सेवनाने-आचरणाने जेथे साधनसंपन्न योगी तसेच दैवी गुणसंपन्न लोक निवास करतात तो स्वर्ग प्राप्त करतात. आता प्रदक्षिणा करावी.

(नोंद- खालील दोन श्लोक ऋग्वेदामध्ये मिळत नाहीत; परंतु 'मूल उपनिषद', 'परमात्मिकोपनिषद' महावाक्योपनिषद् व 'चित्युपनिषदा' त पुरुषसूक्त नावाने ते उपलब्ध आहेत.

**ॐ वेदाहमेतं पुरुषं महान्तमादित्यवर्ण तमसस्तु परि ।**
**सर्वाणि रूपाणि विधित्य धीरो नांमानि कृत्वाभिवंदन यदास्ते ।। १७ ।।**

जो सूर्य देवासमान स्वयं प्रकाशरूप आणि अंधाराच्या पलीकडे असणाऱ्या त्या महापुरुषाला मी जाणले आहे तो जगातील सर्व रूपांची रचना करतो व त्यांचे नामकरण

करतो. आणि अशाच प्रकारे व्यवहार करीत सर्वांच्या बुद्धीत रममाण होतो. तो इष्ट देव होय.

**ॐ धाता पुरस्ता दमुजहारं शक्रः प्रतिदान प्रदिशश्चतस्त्र ।**
**तमेव विदानमृत इह भवति नान्यः पन्था; विद्यते अयनाप ॥ १८ ॥**

पूर्वी ब्रह्मदेवाने ज्याची स्तुती केली होती, जो चारही दिशांमध्ये व्यापून आहे असे इंद्राने जाणले होते त्या परमपुरषाला जो जाणतो त्याला येथेच या जन्मामध्ये अमृतपद प्राप्त होते. याव्यतिरिक्त अमर होण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. त्या एकमात्र परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे आणि याच जन्मात त्याला प्राप्त केले पाहिजे.

पुरुषसूक्तातील मंत्रांच्या अभ्यासावरून हे स्पष्ट आहे की एकमेव परमात्म्यावर आपली श्रद्धा दृढ करणे-स्थिर करणे हेच कर्मकांडाचे ध्येय आहे. या परमात्म्याला कोठेही बाहेर शोधण्याची आवश्यकता नाही. पूरुषसूक्तात असे सांगितले आहे की या परमात्म्याला केवळ मानसिक यज्ञाद्वारेच प्राप्त केले जाते. या शिवाय त्याला प्राप्त करण्याचा दुसरा मार्ग नाही. परंतु आज जे कर्मकांड केले जाते त्यामध्ये यज्ञासाठी वेदी बनवली जाते, चौक भरला जातो व भगवंताला नैवेद्यही अर्पण केला जातो. या बाह्य कृतीचा अर्थ एवढाच आहे की भगवंताला प्राप्त करण्यासाठी अशा प्रकारे हृदय पवित्र बनवणे आवश्यक आहे. अशाच प्रकारची स्वच्छता, समर्पणाची भावना आपल्या हृदयात निर्माण करणे जरूरी आहे. बाहेरची कृती म्हणजे फक्त एक नमुना आहे. शेवटी भगवंताला दाखवलेला नैवेद्य (अर्पण केलेला सात्विक पदार्थ) सर्वांनी वाटून खाण्याची प्रथा आहे. यामागे आत्मीयता, संगठन आणि एकतेचा संबंध ठेवण्याची भावना असते.

आज सुबुद्ध समाज या बाह्य कर्मकांडाला निरर्थक व मिथ्या समजतो. त्याचा असा आक्षेप आहे की, एका विशिष्ट वर्गाच्या लोकांची या धार्मिक कृत्याबाबत मक्तेदारी आहे व ते लोक यावर आपला उदारनिर्वाह चालवत असतात. पूर्वी या पुरोहितांना समाजात प्रतिष्ठा होती, लोक त्यांना मान देत होते. आज त्याच पुरोहितांची दशा भ्रममूलक कल्पनांमुळे अत्यंत दीनवाणी झाली आहे. आज समाजात त्यांना मान नाही- प्रतिष्ठा नाही. वास्तविक समाजात गौरवाचे स्थान व प्रतिष्ठा कोणाला नको आहे ? पण यासाठी धार्मिक विधीचा प्रचार सर्वांना समजेल अशा प्रचलित व सोप्या भाषेत

केला पाहिजे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर ते ठसवले पाहिजे. हृदयावर बिंबवले पाहिजे.

सर्व पुरोहितांनी एक गोष्ट नेहमी ध्यानात ठेवावी की एका परमपुरुषाच्या व्यतिरिक्त अन्य देवी-देवतांवरील श्रद्धेला प्रोत्साहन देऊ नये. कारण ब्रह्मापासून यच्चयावत जग जन्ममृत्युच्या फेऱ्यात फिरत आहे. या फेऱ्याला काही अस्तित्व नाही. तेव्हा त्याला प्रोत्साहन देणे हे अज्ञानी लोकांचे काम आहे. ज्ञानीजन असे कधी करत नाहीत. तेव्हा अस्तित्वहीन गोष्टीला प्रोत्साहन देणे म्हणजे नास्तिकतेला प्रोत्साहन देण्यासारखेच आहे.

॥ॐ॥

# श्री परमहंसमहाराजांची उक्ती

## निद्रा

चोवीस तासांपैकी योग्याने चार तासांपेक्षा अधिक झोपणे त्याला घातक आहे. उत्कट भक्ती व कडक वैराग्याचे आचरण करणाऱ्या योग्याला झोप येत नाही. त्यांचा एक एक दिवस शतकासारखा असतो. ज्यांच्याजवळ ही लक्षणे नसतात ते शत्रुरूपी निद्रेपुढे पराजित होऊन झोपून जातात. आणि जन्म-जन्मांतरीही झोपायचेच असते. योग्यासाठी श्वान-निद्रा सांगितलेली आहे श्वान-निद्रा म्हणजे श्वानासारखी सावध झोप. ज्याप्रकारे पाने हालताच कुत्रा जागा होऊन भुंकायला लागतो. त्या प्रकारे बाहेरील विजातीय परमाणू आपल्यावर आक्रमण तर करणार नाहीत ना या चिंतेमध्ये चूर असणाऱ्या योग्याला शांततेने झोप लागत नाही. तो श्वानासारखा सतत सावध असतो. तसेच जो विरही असतो त्यालाही झोप येत नाही. म्हणूनच मनाला सतत धिक्कारत राहून त्याच्याशी सतत संघर्ष करीत राहिले पाहिजे.

**''जीवनादर्श एवं आत्मानुभूति''**
**मधून उद्धृत**

# हवन

## यज्ञावर एक दृष्टिक्षेप

बाहेर अग्नी प्रज्ज्वलित करून यज्ञ
करायला कुठेही सांगितलेले नाही.
तरीही अग्नी हवन का?

या जटिल प्रश्नावर तर्कशुद्ध विचार

-स्वामी अडगडानंद

# हवन

कर्मकाण्डातील पूजाविधीमध्ये प्रत्येक श्लोकात परमपुरुष परमात्म्याच्या विविध अवस्थांचे चित्रण आहे. प्रत्येक श्लोकात शेवटी मांगलिक-पवित्र वस्तू समर्पित केल्या जात. कर्मकांडाचा दुसरा भाग आहे हवन. यामध्ये वेदी बनवून आम्र वृक्षाच्या किंवा इतर सुगंधित वृक्षांच्या सालींनी अग्नी प्रज्वलीत करून त्यात, तीळ, जव, इत्यादी वस्तूंचे मिश्रण करून आहुती दिली जाते. हे करीत असताना अनेक देवतांची व अनेक वस्तूंची नावे उच्चारित हे माझ्यासाठी नाही हे आपल्यासाठी आहे याचा स्वीकार करा असे म्हटले जाते. परंतु येथे आम्ही कित्येक शतकापासून एक चूक सतत करीत आहोत. आम्ही त्या परमपुरुषाचा महिमा सांगणारे श्लोक म्हणत असतो, ज्यांचा अर्थ आहे की त्या परमपुरषाच्या व्यतिरिक्त सर्व काही नाशवंत आहे. परंतु 'स्वाहा' म्हणताना तेहत्तीस कोटी देव-देवतांच्या नावाने समर्पण करतो. वास्तविक या देव-देवतांचे काही अस्तित्त्वच नाही. अगदी वेद उघडून पाहिले तरी ही गोष्ट तुम्हालां दिसून येईल.

हवन करताना पंचवीस-तीस देवी-देवतांची नावे तर घेतली जातातच; पण त्यानंतर जड-चेतन जीवाची नावे सुरू केली जातात. कारण सर्व देवतांची नावे कोणाला माहीत नसतात. समुद्रेभ्यो नम: म्हटल्यानंतर पुन्हा पुढे क्षीर-समुद्र, दधि-समुद्र, धृत समुद्र, इक्षु समुद्र आणि सुरा-समुद्रेभ्यो नम: असे म्हटले जाते. वास्तविक या सर्व खाण्यापिण्याच्या वस्तू आहेत. एवढेच नव्हे तर नद्या, लहान-मोठे नाले, तलाव यांनाही स्वाहा. त्यानंतर सहा-सात प्रकारच्या सर्पांची नावे घेतली जातात. जसे सहसनाग, वासुकी, कर्कोटकाय, तक्षकाय नम: स्वाहा पुढे वृश्चिकाय (विंचवाला) नम: कृकलाय (सरड्याला) स्वाहा. त्यानंतर शरीराच्या इंद्रियांचापण यात समावेश केला जातो. जसे- भगाय नम: । स्वर्गातील अप्सरांनादेखील समर्पण केले जाते. जसे मेनकाये स्वाहा. उर्वश्यै नम: तिलोत्तमाये नम: स्वाहा । तसेच मानवनिर्मित काल-मापन (शक) आणि ग्रहनक्षत्रांनाही समर्पण केले जाते. जसे- सोमाय नम: भौमाय नम:, ध्रुवाय नम:; राहवे - केतवे नम:. याच क्रमात अस्त्र शस्त्रांना नमन केले जाते. जसे- दण्डाय नम:, गदा-अंकुश-पाश-त्रिशूल आणि चक्राय नम: । वास्तविक ही शस्त्रे आता हजारो वर्षे जुनी झालेली आहेत. यापुढे म्हटले जाते- इंद्र आणि त्याचा उच्छृंखल मुलगा जयंत याला स्वाहा । पिंपळापासून पिपीलिकापर्यंत (मुंगी) समर्पण केले जाते. भूतांपासून भगवानीपर्यंत नमन करायला

शिकवले जाते. सारांश, प्रचलित हवनपद्धतीमध्ये शाश्वत परमात्म्याऐवजी क्षणभंगुर प्राणिमात्रांमध्ये आमची श्रद्धा वाटली जाते असे का ?

पुण्य संपुष्टात आले की देवातासुद्धा मृत्युलोकात कोसळतात. ''क्षीणे पुण्ये मर्त्यलोको विशन्ति'' देवतांचा राजा बनणारा नहुष मृत्युलोकात कोसळला व अजगर बनला. हे तेहतीस कोटी देव कोणी, कसे व केव्हा मोजले आहेत हे काही माहीत नाही. आजपर्यंत त्यातून किती कोसळले ? उपग्रहामधून पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्यांनी; ज्या शेषनागाने आपल्या फण्यावर पृथ्वीचा भार पेलला आहे असे म्हटले जाते- त्या शेषनागाला पाहिले आहे का ? ज्या शेषाला आपण स्वाहा म्हणतो, ज्याला आपण हवी अर्पण करतो तो अस्तित्वात तरी आहे का ?

यावर काहींचे असे म्हणणे आहे की, मुनींना सर्वत्र परमात्म्याचे स्वरूप दिसले म्हणून सर्व जड-चेतनाला नमस्कार केला जातो. परंतु साक्षात्कारी महापुरुषांचा हा अनुभव आहे. दुसऱ्यांना त्याचा काय उपयोग ? अहो प्रत्येक काष्ठात अग्नी आहे. परंतु त्याला प्रज्वलित केल्याशिवाय-पेटवल्याशिवाय भोजन शिजेला का ? लाकडात अग्नी आहे पण त्याने तो स्वत: कधी पहिलेला नाही, पेटवण्याची पद्धत त्या लाकडाला माहीत नाही, तो ती क्रिया करू शकत नाही. मग लाकडात नुसता अग्नी असून उपयोग काय ?

अशा प्रकारे परमात्मा कणाकणात भरलेला आहे. असे भगवंताच्या साक्षात्काराच्या वेळी महापुरुषांना दिसले; परंतु म्हणून ते महापुरुष जड-चेतन सर्वांना समर्पण करायला बसत नाहीत. कारण त्यांचा हृदयस्थ ईश्वरच त्यांना बाहेर सर्वत्र दिसतो व त्या सर्वत्र दिसणाऱ्या ईश्वराला ते प्रणाम करतात अन्य कोणालाही नाही. आपल्या विविध विभूती दाखवल्यावर श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, जास्त जाणून घेण्याची तुला आवश्यकता नाही. तू एवढेच लक्षात ठेव की जगात जे जे तेजयुक्त आहे तो सर्व माझ्याच तेजांशाचा प्रभाव आहे. श्रीकृष्णांनी असे सांगितल्यावर त्या सर्वांची अर्जुन पूजा करू लागला का ? त्याने चंद्र-सूर्यांची पूजा केली ? नाही. त्याने स्वत:ला फक्त श्रीकृष्णाला समर्पित केले. जो भक्त आहे त्याला भगवंताच्या साक्षात्काराचे वेळी सृष्टी दिसत नाही. त्याला सर्वत्र परमेश्वरच भरलेला दिसून येतो. मात्र बाकी सर्वांना सर्वत्र पसरलेला संसार व सृष्टीच भरलेली दिसून येते. परमेश्वर त्यांना कुठेच दिसत नाही. ईश्वर भले सर्वत्र असला तरी साधना करणाऱ्यांनाच तो प्राप्त होतो- दिसतो. तुम्हा-आम्हाला नाही. योगसाधना

करणाऱ्यांसाठी भगवंत सर्वत्र आहे याचा अनुभव येतो. केवळ तो सर्वत्र आहे असे समजून बसून राहणाऱ्यांसाठी भगवंत सर्वत्र नाही.

असे म्हटले जाते की ज्या उपयोगी वस्तूंचा आम्ही प्रयोग करतो म्हणजेच जी वस्तू आम्ही उपयोगात आणतो त्या वस्तुबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या मंत्रांनी त्यांना समर्पण केले जाते. मग असे जर असेल तर आधुनिक वस्तुंनाही अशा मंत्रांनी का समर्पण केले जात नाही ? जसे पंपसेटाय स्वाहा । फाउण्टनपेनाय नमः, टेलीविजनाय स्वाहा, ट्रॅक्टराय नमः, कम्प्युटराय नमः स्वाहा । नंबर दोनची कमाई नमः स्वाहा । स्टेनगनाय नमः । आता परमाणू पिस्तूलचे जग आहे दंड-सोट्याचा आता काय उपयोग?

समाधानासाठी काही लोक असे मानतात की देवी-देवता या भगवंताचीच अन्य स्वरूपे आहेत किंवा अन्य नाम आहे. परंतु ज्या ज्या नावांनी आपण हवन करतो, त्यातून एकाच परमात्म्याचा बोध होतो का ? लोक लहान मोठ्या देवतांची कल्पना करून त्यांच्या मागे धावत राहतात. तर काही लोक असे समजतात की देवता म्हणजे भगवंताच्या शरीराचे अवयव आहेत किंवा सेवक आहेत तेव्हा त्यांना वश करून घेणे किंवा त्यांची कृपा संपादन आवश्यक आहे. कारण एखादे काम करून घ्यायचे असेल तर निष्कारण परमेश्वराला का कष्ट द्या ? देवतांकडूनच करून घेतलेली बरी. वास्तविक असे नसते. उपनिषदामध्ये म्हटले आहे की, ''देवतांची उपासना करणारा भगवंताच्या एखाद्या अंगाची म्हणजे एक कान किंवा एक डोळा याचीच पूजा करीत असतो व ती खरी उपासना नव्हे. तो अशा एक देवतांचा पशु आहे. देवता त्याचे शोषणच करतात.'' अशा उपासनेच्या मागे लागल्याने ते परमात्म्याचे चिंतन करायला वेळ काढू शकत नाहीत. त्यामुळे परमश्रेयापासून ते वंचित राहतात.

वास्तविक देवता आणि असुर हे हृदयातील दैवी आणि आसुरी गुणांना दिलेली नावे आहेत. परमदेव परमात्म्याप्रत जाण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले शम, दम, यम-नियम, ध्यान-धारणा किंवा मोक्षाप्रत नेणारे अगर मोक्ष मिळवून देणारे जे गुण ते दैवी गुण होत. आपल्याजवळ असणाऱ्या या गुणांचा विकास करणे कठीण आहे हे समजल्यावर काहीनी या गुणांची प्रतीक असणाऱ्या देवतेची कल्पना केली व तिचे पूजन करण्यात संतोष मानू लागले. जसे बुध्दीची देवता, क्रोध देवता, समृद्धीची देवता, भोजनाची देवता, आजारांचे निवारण करणाऱ्या देवता, त्यांच्या पत्नी, मुले, निवास, त्यांचे वाहन इत्यादी कल्पित गोष्टी उभ्या केल्या. त्यांना पूजणे हे उचित नाही. हे फक्त

गुण आहेत. ते ज्याच्यामध्ये जितक्या प्रमाणात असतात त्या प्रमाणात त्यांच्याजवळ त्या गुणांची शक्ती असते. सर्व गुण भगवंतामध्ये परमोच्चकोटीत असतात. तेव्हा या उच्च गुणांनी युक्त अशा कल्पित प्रतिकांची-प्रतिमांची पूजा करू नये. तर ह्या सर्व दैवी गुणांचा एक मात्र आशय असणाऱ्या परमात्म्याचे पूजन किंवा त्या परमेश्वराला समर्पण हेच उचित होय.

पूजेचे श्लोक क्लिष्ट संस्कृतमध्ये असल्याने तसेच शिक्षणात त्याचा समावेश नसल्याने साधारण लोकांना त्यांचा अर्थ समजत नसे. परंतु हवनाचे मंत्र मात्र सरळ (सुलभ) संस्कृतात असल्याने तसेच हिंदी-मराठीत त्यातील अनेक शब्द प्रचलित असल्याने आणि आता शिक्षणाचा प्रसारही बराच झालेला असल्याने थोडे फार समजू लागले आहेत. त्यामुळे ज्या घरात धार्मिक विधी किंवा उत्सव होत असतात त्या घरांमधील स्त्रियांच्या व मुलांच्या मनावर अस्तित्वहीन देवतांचे संस्कार दृढ होतात व मग आजीवन ते मनातून जात नाहीत. ते परमात्म्याचे नाव तर घेतात परंतु त्याच्याबरोबरच दुसऱ्या पंधरा-वीस देवी-देवतांचेही नाव घेतात. त्यामुळे लहानपणापासूनच त्या घरातील सर्वांनाच या इतर देवतापण पिढिजात रूढीमुळे प्राप्त होत असतात. त्यामुळे खूप समजावले तरी ते सर्वजण त्या देवतांचे नाव घेण्याचे सोडत नाहीत. कारण त्यांना वाटते की त्या देवतांचे नाव घेणे सोडले तर त्या देवता आपल्यावर नाराज होतील. हजारो रूपयांचा खर्च करून लोक शाश्वताला सोडून नश्वर देवतांची पूजा करतात.

पूजेमध्ये पुरुषसूक्ताच्या मंत्राद्वारे परमात्म्याला सर्व काही समर्पण केले जाते व ते योग्य आहे. पण स्वाहा म्हणताना शाश्वताचा हा पुजारी नश्वराच्या मागे भरकटत जातो. या छोट्याशा चुकीमुळे हवन पद्धती कलंकित झाली आहे. यामध्ये आम्ही सुधारणा करू शकणार नाही का ?

पूर्वी बहुतांशी लोक अशिक्षित होते. धर्माच्या नावावर काहीही सांगणे सोपे होते. आता लोक साक्षर झाले आहेत. अनेक गोष्टी त्यांना समजू लागल्या आहेत. त्यांनी जर विचारले की प्रत्येक मंत्रानंतर तुम्हाला या एकमेव शाश्वत परमेश्वराला बाजूला सारून नश्वराच्या मागे लागण्याचा अधिकार कोणी दिला ? तर मात्र उत्तर देणे तुम्हाला कठीण जाईल. तेव्हा तुम्ही आतापासूनच (वेदाच्या मूळ ऋचा सांगतात त्याप्रमाणे) त्या शाश्वत परमात्म्याचे नाव घ्यायला सुरुवात करा.

भगवान महावीर, गौतम बुद्ध, गुरू नानक इत्यादी महापुरुषदेखील परमात्म्याचे अस्तित्व मानीत होते. परमात्म्याच्या अनंत नामांपैकी आठ-दहा नावांचा त्यांनी सतत उपयोग केलेला दिसून येतो. उदा. बुध्दांनी म्हटले आहे की, साधनेच्या पूर्तिकालात, रात्रीच्या चौथ्या प्रहरी मी त्या अविनाशी तत्त्वाला प्राप्त केले की जे प्राचीन महर्षी प्राप्त करू शकले होते. त्या क्षणी मला सर्वज्ञता प्राप्त झाली. मी सर्वज्ञ बनलो. मग गौतम बुध्दांचा धर्म नवा कसा बनला ? त्यांच्या पूर्वीच्या महर्षींना त्याच सत्याचे ज्ञान झाले होते. गीतेमध्येही तेच सांगितले आहे की तो आत्मा अविनाशी आहे, शस्त्र त्याला तोडू शकत नाही, वायू त्याला सुकवू शकत नाही, तो आत्माच सर्वज्ञ आहे. मग बुध्दांनी कोणती नवी कुऱ्हाड मारली ? त्याच नावाचा तर त्यांनी प्रयोग केला आहे.

महावीर स्वामी देखील त्याच परमात्म्याच्या नावाचा वारंवार उल्लेख करतात की आत्माच सत्य आहे. त्यांनी या परमात्म्यासाठी अनेकविध नावांचा प्रयोग केलेला नाही. कारण लोकांनी या नावांनाच वेग वेगळ्या देवी-देवतांचे रूप देऊ नये म्हणून त्यांनी ही सावधगिरी घेतली होती. त्यांनी फक्त 'आत्मा' च घेतला. गीतेमध्येही (२/१६) म्हटले आहे की असत् वस्तूला अस्तित्वच नसते आणि सत्य वस्तूचा तिन्ही काळात अभाव नसतो. अर्जुना हा आत्माच सत्य आहे. त्याची प्राप्ती म्हणजे परमसिद्धि होय. बरोबर याच सुरात महावीरस्वामींनी सर्वासिद्धी, सर्वसमर्थ, आत्मा अशा पर्यायाचा प्रयोग परमात्म्यासाठी केलेला आहे.

गुरू नानक यांनी सांगितले की ओंकारच सत्य आहे. ईश्वराची अनंत नावे आहेत. ज्यात राम-नाम हे सर्वश्रेष्ठ आहे. या प्रकारे संपूर्ण ग्रंथसाहेबमध्ये सव्वीस हजार सातशे बारा भगवंताची नामे त्यांनी दिलेली आहेत. जशी - राम, हरी, ओम्, प्रभू, कर्ता पुरुष, अकाल पुरुष इत्यादी. गीतेमध्ये म्हटले आहे की मी काळाच्याही पलीकडे गेलेलो आहे. बरोबर हीच गोष्ट ग्रंथसाहेबामध्ये सांगितलेली आहे. आपल्या रामचरीत मानस, पातंजली योगदर्शन, उपनिषद, वेद या सर्वांचा एकच निर्णय आहे - एकच सांगणे आहे व त्याचेच समर्थन गुरू नानकपण करतात.

**सुखमनि साहिब**

**''सिमिरहु सिमिरि सिमिरि सुख पावहु ।**
**कलि कलेस तन माहि मिटवहु ॥''**

मग कोणाचे स्मरण करावे ? ''सिमिरहु जासु बिसम्भर एके । नाम जपत अनगनत अनेके ॥'' त्याची नावे अनेक आहेत, मोजता न येण्याइतकी असंख्य आहेत. परंतु ''वेद पुरान सुमृति सुधाकर । कीन्हें राम नाम इक आखर ॥'' राम-नाम सर्वश्रेष्ठ आहे - ''किनका एक जासु जिय बसावै । ताकी महिमा ठानी न जावै ।'' रामनामाचा एक कणदेखील ज्याच्या हृदयात जाऊन बसतो त्याचा महिमा अपार आहे. ''कांरवी एकै दरस तुम्हारे । नानक उन संग मोहि उधारों ।'' ज्या रामनामाचा जप करीत असताना त्याच्या दर्शनाचा त्यांना ध्यास लागतो. हे ईश्वरा मला नानकला त्यांच्यातलाच एक समजून माझा उद्धार कर.

अशा प्रकारे जैन, बौद्ध, शिख इत्यादी सर्व त्या सनातनाचेच अनुयायी आहेत. परमात्म्याकडे उन्मुख अशा विश्वातील प्रत्येक व्यक्ती सनातनधर्मी आहे; मग त्याची भाषा भले कोणतीही असो. परमेश्वराला आपल्याहून भिन्न समजणे हे भ्रममूलक आहे आणि सत्यापासून दूर पळून जाणे होय. तेव्हा विद्वान पुरोहितांनी वेद, उपनिषदे, गीता इत्यादी शास्त्रांमध्ये भगवंताची जी नावे मान्य केली आहेत त्या नावांनी हवन करावे. जे एका परमेश्वराचे परिचय करून देणारे आहे. जसे- **('सर्वसुखाय सच्चिदानन्दात्मने नमः')**- सर्व प्रकारची सुखे देणारा तोच आहे. सत्-चित्-आनन्दघन तोच आहे. **(सर्व उरालये स्थितये नमः)**- सर्वांच्या हृदयात तोच वास करीत असतो. **('अगोचराय, अचिन्त्याय नमः')**- इंद्रिये व चित्ताचा निरोध केल्याने हळूहळू त्याला प्राप्त करण्याचा मार्ग सुलभ होतो. **(परम पुरुषाय नमः)**- परम पुरुष तोच आहे. **('शाश्वताय अमृताव अकालपुरुषाय नमः')** - तो म्हणजे अमृत होय. मृत्यूच्या पलीकडे असणारा अनाकलनीय पुरुष तोच आहे. या प्रकारे परमात्म्याच्या या परिचयामुळे कर्मविधितील सर्व नियम रितीरिवाज पूर्ण होतात. परमेश्वर हाच या लोकात समृध्दी देणारा व परलोकात शाश्वत शांती आणि मोक्ष- परधाम प्राप्त करून देणारा आहे. मग मनुष्याला यापेक्षा अधिक काय हवे आहे? जर या लोकी समृध्दी आणि परलोकात मुक्ती पाहिजे असेल तर त्या परमपुरुष परमात्म्याची आराधना केली पाहिजे. अन्यत्र कोठेही कल्याणच नाही तर कोठून प्राप्त कराल ? तेव्हा आमच्या सर्व प्रकारच्या निष्ठा एकत्र करून एका परमात्म्याच्या ठिकाणी त्या केंद्रित करून मग आपापला उद्योग करावा.

## यज्ञाचे वास्तविक स्वरूप

देवी-देवतांच्या ऐवजी एकमेव असणाऱ्या परमात्म्याचे नाव घेऊन यज्ञ करण्याचे ठरले. एवढी तर सुधारणा झाली. परंतु तरीही अद्याप एक भ्रममूलक कल्पना जिवंत आहे. कारण ज्यामध्ये हवन होते तो अग्नी उपलब्ध नाही. व यज्ञासाठी तर ''योग अग्नि करि प्रकट तब, करम शुभाशुभ लाई'' म्हणजेच अनुकूल अग्नी पाहिजे.

इतर शास्त्रांप्रमाणे गीतेमध्ये (अध्याय ४, श्लोक २५ ते ३०) यज्ञाचे उत्तम प्रकारे वर्णन केले आहे. अनेक योगी लोक यज्ञस्वरूप महापुरुषाला माध्यम बनवून ब्रह्मरूपी अग्नीमध्ये यज्ञाचे हवन करतात. अर्थात सद्गुरूच्या स्वरूपाचे ध्यान करतात. येथे ब्रह्म एक अग्नी आहे. दुसरे योगी इंद्रियांच्या बहिर्मुखी प्रवाहांना म्हणजे विकारांना ''संयमाग्निषु जुह्वति ।'' येथे संयम एक अग्नी आहे. दुसरे काही योगी शब्दादि विषयांना ''इंद्रियाग्निषु जुह्वति''- इंद्रियरूपी अग्नीमध्ये हवन करतात. म्हणजेच दर्शन-श्रवण इत्यादींद्वारा जे विषय निर्माण होतात त्यांचा आशय साधनापरत्वे बदलून ग्रहण करतात. येथे इंद्रिये हा एक अग्नी आहे. ''आत्मसंयम योगाग्नौ''- येथे योग हा अग्नी आहे. अंत:करणाचा परमतत्त्वाशी संयोग कराणारा हा अग्नी आहे. अनेक योगी लोक प्राणवायूला अपानाग्नीमध्ये व अपानवायूला प्राणवायूमध्ये हवन करतात. अनेक जण प्राणवायूला केवळ प्राणवायूमध्येच हवन करतात. म्हणजे प्राणाच्या ठिकाणी ध्यान केंद्रित करतात. जेव्हा जेव्हा ते श्वास घेतात तेव्हा तेव्हा ते ओम्‌चे स्मरण करतात आणि अंतिम अवस्थेत अनेक योगीजन प्राण आणि अपानाचे नियमन करून प्राणायाम-परायण होऊन राहतात. या स्थितीत ना आत कसल्या विचार लहरी किंवा इच्छा-संकल्प निर्माण होतात ना बाहेरच्या वातावरणातील संकल्प आत प्रवेश करतात. अशा अवस्थेत प्राणांचा निरोध म्हणजेच नियमन होते आणि हीच मनाची विजेतावस्था आहे. मन किंवा चित्ताचा प्रसार म्हणजेच जगत होय. जेथे मन संकल्प-विकल्पापासून अलिप्त होते तेथे या मनातील जगताचेच हवन होते. या मानस यज्ञात संपूर्ण जग म्हणजेच सांसारिक संबंधांचे हवन हीच हवन सामुग्री असते. हीच गोष्ट भगवंतानी आपल्या शब्दांत सांगितली आहे.

**इहैव तैर्जित: सर्गो येषां साम्ये स्थितं मन: ।**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिता: ।।५/१९**

ज्याचे मन ब्रह्मरूपामध्ये स्थित होते त्या मनुष्याकडून जिवंत अवस्थेत सर्व जग-संसार जिंकला जातो त्यावर विजय मिळविला जातो का? मनाच्या समत्वावर (ब्रह्मरूपामध्ये स्थिर होणे) आणि या जगाला जिंकण्याचा काय संबंध? या जगताला जिंकल्यानंतर जिंकणारा उरतोच कुठे? यावर योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की 'निर्दोषं हि समं ब्रह्म'- ते ब्रह्म निर्दोष व सम आहे आणि इथे याचे मनदेखील समत्वामध्ये स्थित झाले आहे. 'तस्माद् ब्रह्मणि ते स्थिता:'- म्हणजेच ते ब्रह्मामध्ये स्थित-स्थिर झाले आहे. या अवस्थेला यज्ञामध्ये म्हणतात- प्राणायामाची अवस्था- जेथे प्राणांचा व्यवहार-व्यापार (मनाची धावपळ) शांत होत असतो. ही मनाची विजेतावस्था आहे. या येथेच फळ प्राप्त होते. किंबहुना ही अवस्था प्राप्त होणे हेच यज्ञाचे फळ होय.

**।। यज्ञ शिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।।**

यज्ञपूर्तीनंतर जे अवशिष्ट उरते त्या ज्ञानामृताचे पान करणारा योगी 'यान्ति ब्रह्म सनातनम्'- शाश्वत परब्रह्माला प्राप्त होतो व जो यज्ञ करीत नाही त्या पुरुषाला 'नायं लोकोऽस्ति कुतोऽन्य: कुरुसत्तम् ।' मनुष्यलोकसुद्धा प्राप्त होत नाही. म्हणजेच मनुष्यशरीरसुद्धा पुन्हा प्राप्त होत नाही मग परलोक कोठून प्राप्त होणार ? या प्रकारच्या यज्ञांनी ज्यांचे पाप नष्ट झाले आहे ते यज्ञाचे महत्व व प्रयोजन जाणत असतात. तेव्हा आपण देखील या यज्ञांमधून आपली श्रेणी निवडावी व यज्ञ करावा. हा चिंतनक्रम सर्वांसाठी अगदी सुलभ आहे.

या जगात द्रव्ययज्ञसुद्धा प्रचलित आहे. या यज्ञामध्ये धर्मशाळा बांधणे, विहिरी खोदणे, तलाव निर्माण करणे इत्यादी गोष्टींसाठी व मानवसेवेमध्ये द्रव्य खर्च केले जाते; परंतु गीतेच्या दृष्टीने हे अल्पज्ञ आहे. योगेश्वरांनी सांगितलेल्या यज्ञात सर्व स्तरावर मन आणि इंद्रियांचे संयमन आहे. मन आणि इंद्रियांच्या संयमानेच तो यज्ञ संपन्न होत असतो. त्यासाठी भौतिक जगातील एका पैशाचीसुद्धा वस्तू लागत नाही. हाच मानसिक यज्ञ वेदाच्या पुरुष-सूक्तात आहे. या यज्ञात वसंत ऋतू आज्य म्हणजे धृत आहे, ग्रीष्म ईधन आहे आणि शरद हवी आहे. म्हणजेच कोणत्याही वेळी किंवा काळी हा यज्ञ करता येतो.

**सप्तास्यासन परिधयस्त्रि: सदा समिध: कृत: ।**

**देवा यज्ञं तनवाना अवध्नन पुरुषं पशुम ।।**

दैवी संपत्तियुक्त लोकांनी यज्ञ करते वेळी यज्ञाच्या सात टप्प्यांमध्ये प्रकृती, महतत्त्व (बुद्धी), अहंकार, पंच स्थूलभूते, पंच सूक्ष्मभूते, पंच ज्ञानेंद्रिये व त्रिगुण-अशा एकवीस समिधांचे हवन करून त्या पुरुषरूपी पशूला बांधून टाकले. या सर्वांचे हवन झाल्यानंतर जे अवशिष्ट राहते त्याला जाणून घ्या. कारण तेच परम आराध्य असते. तोच सर्वश्रेष्ठ परमात्मा असतो.

श्रीकृष्णांनीही हेच सांगितले आहे की जगातील सर्व संस्काराचे हवन झाल्यानंतर मनाची साम्यस्थिती निर्माण होते व त्यानंतर ईश्वर ज्ञान शेष राहते. त्यालाच ज्ञान म्हणतात. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' ज्ञानासारखे पवित्र आणि शुद्ध दुसरे काहीही नाही. तत्स्वयं- त्या ज्ञानाला तू स्वत: 'योगसंसिद्ध:काले'- योगासिद्धिच्या समयी (सुरुवातीला नाही, मध्ये नाही, फक्त परिपक्व अवस्थेत) 'आत्मनि विन्दति'- आपल्या अंतरात्म्यात पाहशील. त्याचा अनुभव घेशील. ज्ञान ही अनुभव घेण्याची गोष्ट आहे, अभ्यासण्याची नाही. या ज्ञानालाच योगेश्वर अग्नी म्हणतात. त्या अग्नीमध्ये समस्त कर्म, कर्म संस्कार आणि कर्मकाण्ड जळून जातात.

**यस्य सर्वे समारम्भा: काम संकल्प वर्जिता ।**
**ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तमाहु: पण्डितं बुधा ।।**

'यस्य सर्वे समारम्भा:' ज्याचे सर्व उद्योग-क्रिया, इच्छा व संकल्प इतक्या उच्च स्तराला जातात की 'काम संकल्प वर्जिता:' - त्याचे मन संकल्प विकल्प विरहित बनते. (कामना-इच्छा व संकल्पांचे नियमन म्हणजेच मनाची विजेतावस्था होय.) इच्छा व संकल्पावर मनुष्य जेव्हा विजय मिळवतो तेथे 'ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं' ज्याला जाणण्याची इच्छा असते त्या तत्त्वाचे त्याला ज्ञान होते. तत्त्व विदित होणे, त्यालाच ज्ञान म्हणतात. या ज्ञानाग्नीने त्याची सर्व कर्मे जळून जातात. अशा लोकांचा बोधस्वरूप महापुरुष 'पंडित' म्हणून गौरव करतात.

या प्रकारे ज्याच्या ऋचा आपण धार्मिक विधींमध्ये म्हणतो त्या वेदांमध्ये व भगवद् गीतेत ज्याचे सार आहे त्या उपनिषदांमध्ये बाहेर अग्नी प्रज्वलित करून यज्ञ करायला कोठेही सांगितलेले नाही. मग तरीही अग्नीमध्ये हवन का व कशासाठी केले जाते ?

भगवद् गीतेच्या अनुसार सृष्टीमध्ये जीव धारण करणारा प्राणी आहे, भूत आहे. 'ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' (१८/६१) ईश्वर त्या सर्व भूतमात्रांच्या

(प्राण्यांच्या) हृदयात निवास करीत असतो. या जगातील यच्चयावत भूतमात्र ज्याच्यापासून निर्माण होतात त्यांचे नाव आहे पंच महाभूते- पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. त्यात मन, बुद्धी आणि अहंकार मिसळले की तिला अष्टधा मूळ प्रकृती म्हटले जाते. यांपैकी आम्ही कोणाची पूजा करीत असू तर ती फक्त या भूताची- पंचतत्त्वाची.

या पंच महाभूतांनीच या जगातील वस्तु व शरीरे निर्माण होत असतात. आणि शेवटी अस्तित्वहीन असे सर्व प्राणी पुन्हा या महाभूतांमध्येच विलीन होत असतात. अग्नी त्यांना जाळून आपल्यातच आत्मसात करतो, पृथ्वी आपल्यात समावून घेते. पाणी आपल्यात प्रवाहित करते तर आकाश त्यांना आपल्यामध्ये समाहित करते. अग्नी वगैरे तर तोंड उघडून सर्वांचा ग्रास घ्यायला जय्यत उभेच आहेत. या अग्नीमध्ये आहुती देऊन आपण कोणाला तृप्त करीत आहोत. ? अर्थात ही फक्त रूढीची पुनरावृती आहे. तेव्हा तुम्ही या परमात्म्याला जाणण्याचा प्रयत्न करा की ज्याच्या शक्तिशिवाय अग्नी एक काडी सुद्धा जाळू शकत नाही. आजपर्यंत आम्ही जड-चेतना कलेवरांची नावे घेत, कल्पित देव-देवतांचे नाव घेत आम्ही स्वाहा करीत होतो- समर्पण करीत होतो. आता त्यांच्या जागी ईश्वराच्या परिचित अशा नावाचे नामस्मरण करीत त्याच अग्नीत हवन करतो. ही सुध्दा आमची एक चूक आहे कारण येथेही त्याच नश्वर पंचमहाभूतांचेच पूजन आम्ही करीत असतो.

प्रत्येक पूजेच्या पूर्वी आम्ही, 'श्री गणेशाय नम:' असे म्हणण्याची प्रथा आहे. कारण असे समजले जाते की, प्रत्येक कार्यात विघ्न निर्माण करणे हे गणेशाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे कोणत्याही कार्यारंभी त्याची पूजा केली तर, तो कार्य विघ्नरहित पार पाडतो- तो विघ्ननाशक बनतो.

ही पण एक दान घेण्याची फक्त योजना आहे. ज्या नामजपासाठी श्री गणेशाला सर्वश्रेष्ठ समजले गेले आहे त्या नामाचा जप करण्यासाठी कोणीही वेळ देत नाही. केवळ गणेशाय नम: असे म्हणून हात जोडण्याने काय प्राप्त होणार आहे ? तेव्हा 'यज्ञांनी जप यज्ञोस्मि' भगवान श्रीकृष्ण म्हणतात की यज्ञामध्ये सर्वश्रेष्ठ जप यज्ञ आहे. त्यात मीच स्थित असतो. तेव्हा त्या परम पुरुषाचा परिचय करून देणारे नाम ॐ अथवा रामाचा जप आम्ही केला पाहिजे. विविध उत्सव व पर्वामध्येही त्या ईश्वराचेच नाम

आम्ही जपले पाहिजे. त्यामुळे मनुष्याला त्याच्या विविध आकांक्षांच्या पूर्तीचे स्त्रोत व परमश्रेय प्राप्त होऊ शकेल.

असे म्हणतात की अग्नीमध्ये हवन केल्याने चांगली वृष्टी होते. परंतु हे तितकेसे तर्कसंगत नाही. कारण भारतात सर्वांत अधिक यज्ञ राजस्थानातील धर्मपरायण जनता करत असते. मग धर्मासाठी केलेले प्राणांचे हवन असो किंवा अग्नीमध्ये हवन असो. पण असे हवन शेकडोंनी करूनसुद्धा राजस्थानमध्ये मुबलक वृष्टी होत नाही. राजस्थान रेगीस्तान आहे. याउलट जेथे यज्ञाचा कधी विचारही केला जात नाही त्या चेरापुंजी येथे व हवाई व्दीपाच्या वायव्येस अले नावाच्या पर्वतप्रदेशात जगातील सर्वांत अधिक पाऊस पडतो. वास्तविक हे सर्व यज्ञ ज्या ज्या अग्नीमध्ये व ज्या ज्या प्रकारे होतात ते सर्व प्रकार मानसिक आहेत, चिंतनाचा एक विशिष्ट प्रकार आहे. जो जो तुम्ही या मानसिक यज्ञात प्रवेश कराल तो तो तुमच्यावर ईश्वरीय विभूतींची वृष्टी होईल. आणि मग हळू हळू तुम्ही त्या ब्रह्मामृताच्या आकंठ पानाने तृप्त व्हाल. तुम्हाला असे अन्न मिळेल की ज्यामुळे नेहमीसाठी क्षुद्धा निवृत्ती होईल. अशा महापुरुषांच्या इच्छाशक्तीने कोणतेही रूप बनू शकते- पाण्याची ही वृष्टी होऊ शकते. परंतु बाह्य यज्ञ आणि अग्नीपासून वृष्टी होत नाही.

तरीही आम्ही अगरबत्ती लावतो, दशांग धूप जाळतो, दिवा लावतो. का ? कशांसाठी ? फक्त हवा - सभोवतीचे वातावरण शुद्ध करण्यासाठी. विषारी जीवजंतूंचा नाश करण्यासाठी. प्राचीनकाळी यज्ञामध्ये हवन करण्याची प्रथा ही केवळ सभोवतीचे वातावरण शुद्ध करण्यासाठी होती. त्या प्रथेलाच अध्यात्मिक रूप देण्यात आले. ज्याप्रमाणे अग्नी सर्व वस्तूंना आपले स्वरूप प्रदान करतो त्याप्रमाणे परमात्म्याने आम्हाला आपले रूप द्यावे, आम्हाला आपलेसे करावे ही त्यामागे कल्पना असावी किंवा हेतू असावा. अर्थात सध्याच्या विज्ञानयुगात जीवजंतूचा नाश करण्यासाठी कमी खर्चात रसायनांचा उपयोग केला जात आहे. त्यामुळे आता हवनामध्ये काही औचित्य राहिले नाही. परंतु जीवजंतूचा नाश करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचे प्रमाण अधिक झाले तर ते हानिकारक ठरते. तसेच कोणतीही वस्तू अधिक प्रमाणात जळली तर आधुनिक शोधाप्रमाणे हवेतील ऑक्सीजनचे प्रमाण कमी करून कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढवते आणि जे मनुष्याला हानिकारक असते. म्हणजे हवनामुळे केवळ सीमित- मर्यादित क्षेत्रातीलच हवा शुद्ध होते-तुमच्या घरातील वातावरण ते शुद्ध करू शकते.

मात्र त्यासाठी दिवसातून सहा सात वेळा गुगळ, तूप साखर इत्यादी पदार्थांचे हवन करावे लागते. अर्थात अशा प्रकारचे हवन मोक्षासाठी नसते. भौतिक सुखासाठी व मोक्षासाठी भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेलाच अग्नी पाहिजे. त्यातच परमश्रेय आहे. त्या संयमाग्नीमध्ये, योगाग्नीमध्ये, प्राण अपानाच्या अग्नीमध्ये, श्वास उच्छ्वासाच्या अग्नीमध्ये संस्कारांचे हवन करण्यासाठी जप-जाप यज्ञ केला पाहिजे की ज्यात सर्व प्रकारचे यज्ञ समाविष्ठ आहेत.

जेव्हा एखादा पुरोहित परमेश्वराचा परिचय करून देणारा मंत्र सांगून परमेश्वराचा शोध आपण आपल्या स्वत:च्या हृदयात घ्यावा असे शिकवतो व जो त्यात परमात्म्याच्या नावे अग्नीमध्ये पाच सहा वेळा हवन करून त्या मंगलाची प्रार्थना करतो, नंतर वीस पंचवीस मिनीट त्या परमात्म्याचा दोन अडीच अक्षराचा मानसिक जपाचा अभ्यास करायला लावतो आणि प्रतिदिन नियमितपणे सकाळ संध्याकाळ त्या नावाचा एकांतात जप करायाला प्रोत्साहन देतो असा पुरोहित श्रद्धापात्र ठरतो कारण त्याने परमात्म्याचा एक विशिष्ट छाप (ठसा) निर्माण केला आहे व सत्याचा मार्ग दाखवून आमचे डोळे त्याने उघडले आहेत. पूर्वजांनी संपादित केलेल्या कर्म मार्गाचा अवलंब करून या मानव शरीराला नष्ट होण्यापासून वाचवले आहे. असाच पुरोहित कल्याणमय मार्गाचा प्रणेता बनू शकतो. जगामध्ये त्याच्या या कर्ममार्गाकडे बोट दाखवण्याचीही हिंमत होऊ शकत नाही.

कानाकोपऱ्यात, घराघरात, झोपडीझोपडीत जाऊन कल्याणमय मार्ग दाखवणारा पुरोहित एक शिक्षकच आहे. अव्यक्ताचा व शाश्वताचा मार्ग दाखवणाऱ्या या शिक्षकाचा आपण आदर केला पाहिजे. या ज्ञानाची संथा देणाऱ्या शाळा आपण टिकवल्या पाहिजेत. त्या नष्ट होऊ देता कामा नये. या कल्याणमार्गामध्ये आज ज्या त्रुटी आहेत त्या दूर केल्या पाहिजेत, अवरोध नष्ट केले पाहिजेत. म्हणजेच आम्ही आमची पूर्व प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करू शकणार आहोत. कारण आज आशिया युरोप आणि अमेरिकेमध्येही (जिला नवे विश्व म्हणून संबोधले जाते) भारतीय संस्कृतीचे अवशेष प्राप्त होऊ लागले आहेत. पारशी, यहुदी ईसाई आणि इस्लाम विचारप्रणालीचा स्त्रोत भारतीय विचारप्रणालीतच दिसून येतो. लक्षात ठेवा की, शाश्वताचा मार्ग दाखवणारा शिक्षक सत्याच्या मार्गावरून चालत होता तोपर्यंत भारतीय संस्कृती सर्वत्र पसरली आणि जेव्हा मिथ्या ज्ञानाच्या ती आहारी गेली तेव्हा ती नष्ट होऊ लागली.

हल्ली संस्कृतीमध्ये झालेल्या सुधारणेमुळे पुरोहितांच्या उपजिवीकेवर गदा आली आहे असा गैरसमज करून घेऊ नये. उलट यात झालेल्या सुधारणेमुळे ती कमजोर होणार नाही उलट तिची मुळे अधिक बळकट होतील. तसेच रूढी-जर्जर हिंदू समाजातील उपेक्षित लोकदेखील तिच्याकडे आकर्षिले जातील व हीच आपली खरी संस्कृती आहे असे समजून तिला कवटाळतील. मग उरलो ते आपण मूठभर लोक ! मग कोणाला आपण कर्मकांडाचे विधी करायला सांगणार ? कोणाला आपण शिकवणार ?

तेव्हा पूर्वग्रह आणि बढाया मारण्याचे सोडून वेदातील पुरुषसूक्तामध्ये सांगितलेला संदेश किंवा त्यातील शिकवण आपण त्यात तीळमात्र बदल न करता समाजाला तसेच जगाला प्रदान केली तर आपली शान पुन्हा वाढेल. जे आपला तिरस्कार करीत होते ते आपला आदर करू लागतील. जे आपला त्याग करून गेले आहेत ते पुन्हा परत येतील आणि अशा प्रकारची शिकवण देणारा पुरोहित सर्वांच्या श्रद्धेस व आदरास पात्र होईल.

परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की प्रखर ज्ञानाग्नीमध्ये ज्यांचे कर्म जळून गेले आहे व जो पूर्ण ज्ञाता बनला आहे अशा महापुरुषांशी विचारविनिमय करण्याचे किंवा त्यांचे मार्गदर्शन घेण्याचे विसरू नये. कारण शिक्षकांसाठी देखील एखादे प्रशिक्षण स्थळ असले पाहिजे. आणि ते स्थान म्हणजे महापुरुष होत. अर्थात, महापुरुष कोणाला म्हणायचे हा प्रश्न येथे गौण आहे म्हणजे येथे त्याची चर्चा नको. खरा महापुरुष ठरविणे हाही एक कठीण प्रश्न आहे.- कठीण काम आहे. कारण सध्या महापुरुषांचा मोठेपणा सिद्ध करण्याचीही स्पर्धा सुरू आहे. तेव्हा महापुरुषाला ओळखणे कठीण असले तरी महापुरुषांचा अभाव नाही. तेव्हा त्यांच्याशी विचारविनिमय करणे किंवा त्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. म्हणजे चुका होण्याची शक्यता कमी असते. जर बहुमताने संमत झालेला निर्णय घेत बसलात किंवा पदवीधरांच्या संस्था बनवून निर्णय घ्याल तर ''अन्धे अन्धन्ह ठेलिया, दोऊ कूप परन्त'' तेव्हा आपल्या वंशजांना, शिष्यांना तसेच जगातील मानवमात्राला परमात्म्याचा संदेश आवर्जून सांगा.

**विशेष :-**

कर्मकाण्डामध्ये सर्वतोभद्र सारखी यंत्रे (चक्र) बनविण्याची प्रथा आहे. सर्वतोभद्राचा अर्थ आहे सर्वत्र सुख, सर्वत्र यश, दाही दिशांना कल्याण ! यामध्ये वेगवेगळ्या देवतांना ओळखण्यासाठी निळे, पिवळे, काळे, अशा विविध रंगाचे तांदूळ बनवून वेगवेगळ्या खणात ठेवून त्या त्या विशिष्ट देवतांना आवाहन केले जाते व

त्यांच्याकडे कल्याणाची याचना केली जाते. वास्तविक ज्या देवता स्वत: अमर नाहीत ज्या स्वत:चे कलेवर बदलून निघून जाणार आहेत, त्या देवता तुमचे काय कल्याण करणार ? स्वत: अपूर्ण असणाऱ्या त्या तुम्हांला पूर्णत्वाला कोठून नेणार ? म्हणजे देवतांकडून व वस्तूंकडून कल्याणाची कामना करण्याची चूक आम्ही येथे पुन्हा करीत आहोत.

वरील कर्मठ विधीवर खर्च न करणे व त्यात अधिक न गुंतणे यातच तुमचे कल्याण आहे. तुमच्या मानसिक समाधानासाठी एखादे चक्र बनवा; पण त्यातील रंग देवतांना देऊ नका. ते सफलतेचे प्रतीक असले पाहिजेत; जसे हिरवा रंग जीवनासाठी, पिवळा रंग समृध्दीसाठी, पांढरा रंग बुध्दीसाठी इत्यादी आणि शक्ती, बुध्दी, आयुष्य अथवा यशाची कामना सरळ परमात्म्याजवळ करा. त्याच्याकडे याचना करा देवतांकडे याचना करू नका. ''सर्व समृद्धि प्रदे परमात्मने नम:। आयु वर्धकाय परमात्मने नम:। अशा आशयाची परमात्म्याची स्तुती करा. म्हणजे सर्वतोभद्र शक्य आहे. परमात्म्यावरील असीम श्रध्दाच सुख, शांती व समृध्दीचे मूलस्थान आहे. आम्ही परमात्म्याला मानत नसल्यानेच आम्ही दरिद्री आहोत. आमची श्रध्दा अनेक देव-देवतांमध्ये विखुरलेली आहे व तेच आमच्या दु:खाचे व दैन्याचे कारण आहे व हेच भेदाचेही कारण आहे. तेव्हा प्रथमच सावध व्हा आणि आपली श्रध्दा, निष्ठा परमात्म्याचे ठिकाणी केंद्रित करून स्वत:चे कल्याण साधा.

॥ॐ॥

“जब बोले तो हरि गुन गावै, मौन रहे तो नाम जपावै।'' धार्मिक विधींचा हेतू फक्त परमेश्वराचे स्मरण करणे हाच आहे. वास्तविक तो स्वत: अनामिक आहे. स्तुतीमुळे त्याच्याबद्दलची श्रध्दा जागृत होण्यास मदत होते म्हणून परमात्म्याची स्तुती करावी सर्वतोभद्रादी चक्रांसाठी आर्षग्रंथामधील काही नावांची निवड करता येईल. जसे सहस्त्रशीर्ष्ण नम: (वेद), योगेश्वराय नम:, क्षेत्रज्ञाय नम: (गीता), णमो सर्वसिध्दानाम आत्मने नम: (जैन ग्रंथ), सर्वज्ञाय नम: अविनाशिने नम: (बौध्द ग्रंथ), एक ओंकाराय नम: अकाल पुरुषाय नम: (ग्रंथ साहेब) अनुभवगम्याय नम: स्वान्तस्थमीश्वराय नम:, प्रणन प्रतिपालकाय नम:, नर तनधारकाय नम: (रामचरित मानस मधून).

**प्रश्न-** महाराजश्री, घरामध्ये भगवंताचे भजन होऊ शकत नाही का?

**उत्तर-** हो घरामध्ये भगवंताचे भजन (भक्ती) होऊ शकते. मात्र त्या भजनामुळे निवृत्ती- मोक्ष प्राप्त होत नाही. तेव्हा निर्धारित हेतू सफल होईपर्यंत भगवद् पूजन (सेवा) व भजन उत्कटतेने चालू ठेवले पाहिजे. त्यानंतर परमेश्वर स्वत:च घर सोडण्याची प्रेरणा देईल. आज आम्हाला असे वाटते घराचा त्याग करणे कठीण आहे; परंतु इष्टदेवाची कृपा झाल्यावर सर्व गोष्टी सुलभ होतात.

**''जीवनादर्श एवं आत्मानुभूति''**

(द्वितीय उच्छ्वास प्र. ५)

मधून उद्घृत

# ब्रह्मचर्य

मनाने विषयाचे चिंतन करायचे सोडून द्या.
त्या परमात्म्याचे निरंतर चिंतन
म्हणजेचे ब्रह्मचर्यपालन होय.

**-स्वामी अडगडानंद**

# ब्रह्मचर्य

ब्रह्मचर्याबाबत लोकांच्या अनेक गैरसमजुती आहेत. कामसुखाचा त्याग करणे किंवा त्याबाबत संयम ठेवणे यालाच लोक ब्रह्मचर्यपालन असे समजतात. परंतु हे खरे नव्हे. जर कोणी कामवासना उत्तेजित करणाऱ्या वस्तूला स्पर्श करीत असेल किंवा कानाने वासना उद्दीपक शब्दांचे श्रवण करीत असेल, डोळ्यांनी तशा प्रकारची अश्लील दृश्ये पाहत असेल किंवा मनाने विषयाचे चिंतन करीत असेल तर असा मनुष्य पाखंडी होय. तो ब्रह्मचर्यव्रताचे पालन करू शकत नाही. भगवान श्रीकृष्णांच्या मते-जो निग्रहपूर्वक इंद्रियांचा संयम करतो पण मनात मात्र विषयाचे चिंतन करीत असेल तर असा मनुष्य ब्रह्मचारी नसून दंभाचारी व पाखंडी होय.

पूज्य महाराजश्री सांगत की त्यांना या आधीच्या जन्मातच खरोखर मोक्ष मिळायला हवा होता परंतु स्त्रीचा उपभोग घेण्याची व गांजा ओढण्याची इच्छा त्यांच्या मनात घर करून होती. शरीराला तर त्यांनी निग्रहाने विषयापासून दूर ठेवले; पण मनात मात्र विषयाचे चिंतन सुरू असे. त्यामुळे त्यांना मोक्ष मिळाला नाही. पुन्हा जन्म घ्यावा लागला. जन्मानंतर लवकरच भगवंताने विषयाबाबत दाखवून व ऐकवून ''विषय चिंतन म्हणजे महा पाप आहे तेव्हा भजन कर- माझी भक्ती कर'' असे सांगितले तसेच ''गुरू महाराजांची सेवा कर'' असाही उपदेश दिला. या प्रकारे आकाशवाणी झाल्यानंतर गुरू महाराजांचे दर्शन झाले, श्रध्दा स्थिर झाली, दृढ झाली. आणि तिसऱ्या दिवसापासूनच अनुभव यायला सुरुवात झाली. इष्टदेव हृदयात स्थिर झाले व मोक्ष प्राप्त झाला.

आम्ही त्यांना विचारले, की महाराजश्री, गांजा ओढल्याने भजन करण्यात काही अधिक मदत होते का ? तेव्हा ते खूप हसले आणि म्हणाले ''नाही रे बाबांनो नाही, गांजा पीकर धरे ध्यान, गृहस्थ होकर छांटे ज्ञान, साधू होकर कूटे भंग, कहैं कबीर ये तीनों ढंग।'' अरे गांजा ओढल्याने जर ध्यान करता आले असते तर लोक क्लोरोफॉर्म हुंगून व नशायुक्त पदार्थ खाऊन भजन करीत बसले असते. या गोष्टींचा भजनाशी काही संबंध नाही. भजन म्हणजे अणुरेणूमध्ये भरलेल्या भगवंताचे स्मरण होय. सर्व गोष्टी विसरून परमात्म्याचे चिंतन करणे म्हणजेच भजन होय. प्रत्येक क्षणी अंत:करणात त्या एका ईश्वराचेच स्मरण झाले पाहिजे, हृदयात निरंतर भगवंताचेच स्फुरण हवे नाहीतर मन झटकन तिथून सटकेल व मायेत गुरफटेल सारांश मनात विषयाचे चिंतन सुरू असताना शरीराला रोखणे कठीण आहे. कदाचित शरीराने संयम केला तरी असा संयम व्यर्थ

होय. हा केवळ दांभिकपणा होय. त्यामुळे पुन:पुन्हा जन्म घ्यावे लागतात व भोग भोगावे लागतात. महापुरुषांच्या जीवन-चरित्रातून ही गोष्ट प्रत्ययास आलेली आहे.

ब्रह्मचर्य म्हणजे ''ब्रह्म आचरति स: ब्रह्मचारी''- जो ब्रह्माचे आचरण करतो, शाश्वत, सनातन ब्रह्मप्राप्तीसाठी जो प्रयत्नशील असतो तोच खरा ब्रह्मचारी होय. ''यदिच्छन्तो ब्रह्मचर्य चरन्ति'' त्या शाश्वत परब्रह्माला जाणून घेण्यासाठी जेवढी साधने आहेत ती साधने प्राप्त करण्याचा प्रयत्न मनुष्य ज्या दिवसापासून करतो त्या दिवसापासून तो ब्रह्मचारी असतो. आयुष्यभर घरात राहून दहा मुलांना जन्म देऊन वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी ज्या दिवशी हा मायापाश सोडून ईश्वरप्राप्तीसाठी जो प्रवृत्त होतो अशा मनुष्यालाही महापुरुष ब्रह्मचारी असे संबोधतात. साधनेला प्रारंभ करण्यापूर्वी तर सर्व अज्ञानीच असतात. मायेमध्ये गुरफटलेले असतात वाट चुकलेले असतात, परंतु ज्या दिवसापासून तो मनसा, वाचा कर्मणा, काम, क्रोध, लोभ, मोह, अर्थ व धर्म यांची चिंता सोडून केवळ ''इच्छा राखे मोक्ष की, ताहि शिष्य पहचान'' भगवंताच्या दर्शनाची- मोक्षाची इच्छा ठेवून त्याप्रमाणे ईश्वराची साधना करायला सुरुवात करतो व त्या संदर्भात असणाऱ्या सर्व प्रक्रिया आत्मसात करण्यास सुरुवात करतो त्या दिवसापासून तो ब्रह्मप्राप्तीच्या मार्गावरील साधक असतो- ब्रह्मचारी असतो.

प्रारंभी संगदोषाने मन लगेच भरकटते इंद्रिये साधनेच्या मार्गावरून त्याला खेचण्याचा प्रयत्न करतात प्रवृत्ती प्रबळ बनते, कधी उत्थान तर कधी पतन अशी परिस्थिती असते तरीही स्वत:च्या लक्ष्याकडे निग्रहाने जाणारा व प्रयत्नशील साधक ब्रह्मचारीच असतो. अर्थात तो अद्यापि ब्रह्मचारी झाला नसला तरी अशा निग्रहाने प्रयत्न करणारा साधक ब्रह्मचारी बनेल यात शंकाच नाही. ब्रह्मचर्यव्रताचे निग्रहाने पालन करणारा हा साधक जेव्हा इंद्रियांचा संयम करून मनाला ईश्वरामध्ये विलीन करतो- प्रवाहित करतो तेव्हा त्याला 'स्वामी' ही पदवी प्राप्त होते. आता तो इंद्रियांचा गुलाम नाही पण त्यांचा स्वामी असतो. आता इंद्रिये त्याला खेचून विचलित करू शकत नाही परंतु तो त्याच्या मताप्रमाणे इंद्रियांना ताब्यात ठेवू शकतो. एवढे सामर्थ्य आलेले असल्याने त्याला स्वामी म्हटले जाते.

क्रमश: अभ्यास करता करता जेव्हां साधकाची साधना परम सीमेला पोहचते तेव्हा साधक सर्व इच्छांवर ताबा मिळवण्यास समर्थ बनतो. आणि ''सर्व संकल्प संन्यासी योगारूढस्तदोच्यते'' जेव्हा सर्व इच्छा नष्ट होतात, संकल्प नाहीसे होतात तेव्हा त्या स्थितीलाच योगारूढ स्थिती किंवा संन्यास म्हणतात. या अवस्थेत ज्या ईश्वराला तो शोधीत होता त्या प्रभूचे दिग्दर्शन व स्पर्श त्याला प्राप्त होतो व त्या प्रभूचा त्याला

साक्षात्कार होतो. मग जेव्हा ब्रह्माशी तो समरस होतो तेव्हा मग आचरण कशाचे व कशासाठी करायचे? येथे त्याचे ध्येय, त्याचे व्रत पूर्ण होत असते.

साधनेच्या बाबतही समाजात अनेक गैरसमजुती आहेत. कोणी काहीही कृती करतो व म्हणतो ही साधना आहे. वास्तविक योग-साधनेची आठ अंगे आहेत- यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी. ही आठ अंगे आणि योग शब्दाबद्दलही समाजात अनेक मतमतांतरे आहेत. मात्र योगेश्वर श्रीकृष्णाच्या मते प्रकृतीशी संयोग आणि वियोगरहित असा जो अत्यंत शांत आणि सम आहे त्या परमेश्वराशी- परमतत्वाशी मिलन म्हणजे योग होय. तो साधण्यासाठी आम्ही जेव्हा प्रयत्न करतो तेव्हां त्यासाठी वर निर्देश केलेली आठ अंगे ही साधने आहेत.

यमाच्या अंतर्गत अंहिसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह यांचा समावेश होतो. अंहिसेच्या नावावर लोक हत्या करण्याचे टाळतात. अगदी मुंगीला मारणेही पाप समजतात. परंतु अशा प्रकारच्या अंहिसेचा यौगिक अंहिसेशी काहीच संबंध नाही. अहो, आम्ही जर योगाच्या सर्व अंगाचे पालन करणार नसू किंवा करत नसू तर केवळ मुंगीला वाचवण्यात काय अर्थ आहे? ज्यांनी जन्म घेतला आहे त्यांना मरायचे तर आहेच. तुम्ही तिचे रक्षण केल्यानेदेखील तिचे रक्षण होणार नाही. कारण शरीररूपी वस्त्र एक दिवशी बदलावे लागतेच- नव्हे ते बदलले जातेच. ज्यांना हात आहेत त्यांचे भोजन बिन हातवाले प्राणी हे असतात. पाय असणाऱ्यांचे भोजन बिन पायवाले प्राणी असतात. समर्थ लोकांचे भोजन कमजोर प्राणी असतात. तात्पर्य चराचर जगत हे एकदुसऱ्याचे भोजन असते. मग सर्व जगत हे एक दुसऱ्याचे भोजन आहे तर रक्षण कोणाचे करणार? ज्याला भोजन मिळणार नाही तो भुकेने मरून जाईल. अहो, हानी-लाभ, जीवन-मरण, यश-अपयश या गोष्टी आपल्या हातात नसतातच. मग मुंगीला वाचवण्याचा आपण दांभिकपणा का करतो? वास्तविक आपल्या आत्म्याला अधोगतीकडे जाण्यापासून वाचवणे म्हणजेच खरी अहिंसा होय.

सत्य म्हणजे काय? योगेश्वर श्रीकृष्णांच्या मते आत्मा हेच शाश्वत तत्त्व आहे, तोच सनातन आहे. या आत्म्यावर दृष्टी केंद्रित करणे म्हणजेच सत्य प्राप्त करणे होय. अस्तेय म्हणजे काहीही न लपवणे. जे हृदयात आहे तेच वाणीमध्येही असले पाहिजे. जर साधकाला कोणाकडून काही घ्यायचे नाही, या सृष्टीमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रयोजन नाही तर लपवायची वृत्ती कशाला? व तो काय लपवत आहे? कोणाला तो शोधत आहे?

या प्रकारे विषयवासनेचा संयम करणे म्हणजे ब्रह्मचर्य नव्हे. रूप, रस, गंध, शब्द सर्वच तर स्पर्श आहेत. सर्व विषय इंद्रियांचे स्पर्शमात्र आहेत. ''मात्रास्पर्शास्तु कौन्तेय''

चिंतनात इंद्रियांचे विषय बाधा निर्माण करतात. या सर्वांचे संचालन करणारे मन आहे. इष्टदेवाचे चिंतन करीत असताना हीच इंद्रिये बाहेरच्या जगात आपला खुराक शोधण्याचे बंद करतात आणि हृदयामध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंधाचा आशय शोधतात. इष्टदेवाच्या स्वरूपात त्यांना तो आशय प्राप्त होतो. आणि त्या दिवसापासून तो साधक 'यमच्या' योग्यतेस प्राप्त होतो. जर कोणतेही इंद्रिय बाहेर स्पर्श-रस घ्यायला लागले तर तो भगवंताकडे चाललाच कुठे ? म्हणजे भगवंताकडे तो जाऊच शकणार नाही.

तेव्हा केवळ कामसुखाबाबत संयम ठेवणे हे साधकाचे मुख्य लक्ष्य असू शकत नाही. मुख्य लक्ष्य परमतत्त्वाची परमात्म्याची प्राप्ती हे आहे व त्यासाठी इंद्रियांच्या सर्व बाह्य प्रवृत्तींचा संयम करणे आवश्यक आहे. व त्यासाठी मनामध्ये परमात्म्याचे निरंतर स्मरण आवश्यक आहे. त्यामुळे केवळ कामेंद्रियालाच संयम होतो असे नाही तर सर्व इंद्रियांचा संयम होतो. स्पर्श नावाचे इंद्रिय अधिक भयंकर समजले जाते. स्पर्शइंद्रिय पातकी कोण व पवित्र कोण हे ठरविणारा जणू मापदंड आहे. ''श्रृंगी की भृंगी करि डारी, पाराशर के उदर बिदार।'' परंतु इंद्रियांचे बाह्य स्पर्शाकडे आकर्षिले जाणे याचा अर्थ असा झाला की त्यासाठी प्रथम मनाने अनुमती दिली. त्या इंद्रियाबरोबर ते वाहवत गेले आणि ब्रह्म आचरणातून अर्थात ब्रह्मचर्यापासून च्यूत झाले. तेव्हा परमात्म्याचे निरंतर चिंतन हीच ब्रह्मचर्य प्राप्त करण्याची गुरुकिल्ली आहे.

**पुरुष नपुंसक नारि वा जीव चराचर कोय ।**
**सर्वभाव भज कपट ताति, मोहि परमप्रिय कोय ।।**
**(रामचरित मानस)**

भगवान श्रीराम म्हणतात की पुरुष असो की नपुंसक (नपुंसक कोणत्या ब्रह्मचर्य व्रताचे पालन करणार?) असो, स्त्री असो किंवा चराचर जगातील कोणीही असो, जो सर्वभावे, संपूर्ण हृदयाने माझे चिंतन करतो तो मला अत्यंत प्रिय असतो. तेव्हा मनसा, वाचन कर्मण्या जो इष्टदेवाचे (परात्पर ब्रह्माचे) चिंतन करतो त्या दिवसापासून तो ब्रह्मप्राप्तीचे आचरण करणारा ठरतो व म्हणून तो ब्रह्मचारी आहे. प्रकृतीशी असणारा संबंध तोडून जो आपल्याला त्या परमात्म्याशी समरस करतो, जो त्याच्या चिंतनात स्वत:चे मन विलीन करतो त्या दिवसापासून तो ब्रह्मचारी होय (ब्रह्माच्या मार्गावर चालणारा) आणि या दृष्टीने विचार करता नपुंसकदेखील ब्रह्मचारी होऊ शकतो.

।।ॐ।।

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**

**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।।**

जो पुरुष 'ओम इति' ओम् या अक्षय ब्रह्माची ओळख करून देणाऱ्या शब्दाचे स्मरण करीत प्राणत्याग करतो त्या पुरुषाला परमगती प्राप्त होते. श्रीकृष्ण एक योगी होते, परमतत्त्वामध्ये स्थित असे महापुरुष होते, सद्गुरू होते. योगेश्वर श्रीकृष्णांनी सांगितले आहे की, ओम हा अक्षरब्रह्माचा परिचय करून देणारा शब्द आहे. तू त्याचाच जप कर; मात्र ध्यान माझे कर; ईश्वरप्राप्ती झालेल्या प्रत्येक महापुरुषाचे नाव तेच असते की ज्याची त्याला प्राप्ती होते व ज्यात तो विलीन होतो. म्हणून श्रीकृष्णांनी जप 'ॐ'चा करायला सांगितला व ध्यान आपले करायला सांतिगले. त्यांनी 'कृष्ण-कृष्ण' असा नामजप करावयास सांगितला नाही. परंतु कालान्तराने भाविकांनी त्यांचा नामजप सुरू केला. अर्थात त्यांना त्यांच्या श्रध्देप्रमाणे फळ मिळत असते. कारण योगेश्वरांनी सांगितले आहे की ''जेथे मनुष्याची श्रध्दा दृढ होते तेथे मीच त्याच्या श्रध्देला पुष्टी देत असतो, तसेच त्याला तसे फळही देत असतो. त्या फळाचा मनुष्य उपभोग घेतो; परंतु माझा भक्त मात्र माझ्या प्रत मला प्राप्त होतो. त्याचे पतन होत नाही.''

**'यथार्थ गीताः श्रीमद्भगवद्गीता'**

मधून उद्घृत

# गायत्री

गायत्री मंत्र हे अणुरेणूत व्याप्त असणाऱ्या
परमेश्वराच्या ठिकाणी स्वत:ला समर्पित करण्याचे
संस्कृतमधील एक सूत्र आहे.

**-स्वामी अडगडानंद**

# गायत्री

## ‘‘वेद माता गायत्री, ब्राह्मण माता गायत्री’’

**प्रश्न:- गायत्री हे काय आहे? तिला वेद-माता आणि ब्राह्मण-माता का म्हटले जाते?**

धर्मनिष्ठ लोक व धर्मपंडित गायत्रीचे महत्त्व चांगल्या प्रकारे जाणून आहेत. हा एक सिध्दिदायक मंत्र आहे. धर्माचा प्राण वेद आणि वेद-माता गायत्री, धर्मोपदेशक ब्राह्मण आणि ब्राह्मणाची माता गायत्री. गायत्री-जप हे ब्राह्मणांचे अनिवार्य असे दैनिक कर्म आहे. हल्ली या गायत्री मंत्राचे महत्त्व सांगण्यासाठी एक धार्मिक संस्थाही स्थापन करण्यात आली आहे. ‘गायत्री परिवार’ या नावाने ती प्रसिध्द आहे. दर महिन्याला एक पत्रिका व दरवर्षी एक पुस्तक या संस्थेतर्फे प्रकाशित होते. त्यातून गायत्री मंत्राचे महत्त्व सांगितले जाते, त्याबाबत विवेचन केले जाते. गायत्रीच्या प्रत्येक अक्षराची व प्रत्येक शब्दाची धर्मशास्त्र व योगशास्त्राच्या दृष्टिकोनातून व्याख्या केली जाते. या मंत्राच्या सतत पठणाने व सतत केलेल्या अभ्यासानेच जीवनातील लौकिक तसेच पारलौकिक सुखाचा अनुभव शक्य होतो. तेव्हा या मंत्राचे ऐतिहासिक महत्त्व पाहून त्याचा उद्भव कसा झाला त्याचा शोध घेऊ.

प्राचीनकाळी गाधीपुत्र विश्वरथ एक क्षत्रिय राजा होता. तोच पुढे स्वत:च्या गुणांच्या जोरावर विश्वामित्र नावाने प्रसिध्द पावला. एक दिवस राजा विश्वरथ आपल्या सेनेसह शिकारीसाठी जंगलात गेला. पुष्कळवेळ शिकार केल्यानंतर भुकेने व तहानेने व्याकूळ झालेला राजा फिरत फिरत वसिष्ठ मुनींच्या आश्रमात पोहचला. वसिष्ठ मुनींनी राजाचा व त्याच्या सेनेचा शाही सत्कार केला. ते पाहून राजा विश्वरथ आश्चर्यचकीत झाला. कारण अशा घोर जंगलात इतक्या मोठ्या प्रमाणात सर्व प्रकारची सोय व उत्तम भोजन एक मुनी कसा काय देऊ शकतो? तेव्हा राजाने आश्रमातील या उत्तम व्यवस्थेचे कारण विचारताच वसिष्ठ मुनींनी सांगितले की आश्रमात कामधेनूची कन्या नंदिनी नावाची एक गाय आहे. तिच्या कृपेनेच अशा प्रकारची उत्तम व्यवस्था आम्ही ठेवू शकतो.

नंदिनीचे सामर्थ्य पाहून राजाच्या मनात विचार आला की नंदिनी म्हणजे एक रत्न आहे व अशा प्रकारचे रत्न राजमहालातच शोभून दिसते. तेव्हा राजा वसिष्ठ मुनींजवळ गेला आणि त्याने नंदिनीची मागणी केली. वसिष्ठ मुनी म्हणाले, ‘राजा नंदिनीच्या

सहाय्याने तर अशा या घोर जंगलात आश्रम टिकून आहे. माझे यज्ञादि धार्मिक विधी तिच्यामुळे तर होऊ शकतात. तेव्हा राजा, मी नंदिनी तुला देऊ शकत नाही.' राजा विश्वरथने नंदिनी देण्याची प्रथम विनंती केली, नंतर हट्ट धरला व त्यानंतर आपल्या सामर्थ्याचा उपयोग करण्यास तो उद्युक्त झाला. त्याने नंदिनीचे अपहरण करण्याचा सैनिकांना आदेश दिला. सैनिक आपली शक्ती पणाला लावून नंदिनीला खेचू लागले. तेव्हा क्रोधित झालेल्या नंदिनीने आपले शरीर हलवले ती जोराने हंबरली त्याबरोबर तिच्या शरीरातून स्फुल्लिंग बाहेर पडले व त्या प्रत्येक स्फुल्लिंगाबरोबर यवन, शक, म्लेंच्छ इत्यादि अनेक जातींचे सैनिक हातात शस्त्र घेऊन बाहेर पडले. त्या सैनिकांनी राजाच्या सैनिकांना हाकलून लावले. तेव्हा विश्वरथाने तपश्चर्येच्या बळावर प्राप्त केलेल्या सर्व शस्त्रांचा प्रयोग वशिष्ठ मुनींवर केला. मुनी वशिष्ठांनी जेव्हा पाहिले की आपल्यावर अस्त्रांचा प्रयोग केला जात आहे. तेव्हा त्यांनी आपल्या समोर एक दंडा पुरून ठेवला आणि ते शांतपणे बसून राहिले. विश्वरथाने सोडलेल्या सर्व अस्त्रांचे त्या दंड्याने भस्म करून टाकले. हताश होऊन विश्वरथाने आपल्या क्षात्रतेजाची निर्भत्सना केली.

**धिग्बळं क्षत्रियबलं ब्रह्मतेजो बलं बलम् ।**
**एकेन ब्रह्म दण्डेन सर्वाणि अस्त्राणि हतानि मे ।।**

शेवटी विश्वरथाने निश्चय केला की उग्र तपस्येच्या द्वारा मी ब्राह्मणत्व प्राप्त करेन. त्यानंतर घरी आल्यावर राज्याची जबाबदारी आपल्या मुलांवर सोपवून तो वनात निघून गेला. त्याने घोर तपस्येला आरंभ केला; तेव्हा स्वर्गात निवास करणाऱ्या देवतांही भयभीत झाल्या. त्यांनी विश्वामित्राची तपस्या भंग करण्याचे अनेक प्रयत्न केले.

सर्वप्रथम स्वर्गलोकाची अप्सरा मेनका आली तिने त्यांचा अनुनय करून अत्यंत नम्रतेने रात्रभर कुटीत राहण्याची परवानगी मागितली. दयावश होऊन विश्वरथाने तिला राहण्याची परवानगी दिली. परंतु तिच्या अद्वितीय लावण्याच्या जादूने विश्वामित्र इतका घायाळ झाला की तो कामवासनेच्या आहारी गेला व आपले धैर्य हरवून बसला. मग ती विश्वरथाच्या आश्रमात पुष्कळ दिवस राहिली तिथे तिने एका मुलीला जन्म दिला आणि मग अदृश्य झाली. तिच्या विरहाने व्याकूळ झालेला विश्वरथ तिला शोधण्यासाठी जंगलात भटकू लागला. त्याच वेळेस आकाशवाणी झाली. ब्राह्मतेज प्राप्त करण्यासाठी निघाला होतास पण तू तर पतीत झाला आहेस.

तेव्हा विश्वामित्रांना आपली चूक समजली. त्यांनी पुन्हा तपस्येला आरंभ केला. काही दिवसानंतर इंद्राने पुन्हा एक चाल खेळली. त्याने राजा अंबरीषाच्या यज्ञाचा घोडा

चोरला घोड्याच्या ऐवजी बळी देण्याच्या स्थानांवर शुनश्शेफ नावाच्या एका मुनिकुमाराला खरेदी केले. पण संयोगाने तो विश्वामित्राचा भाचा होता. त्याने विश्वामित्राजवळ आपल्या प्राणांची याचना केली. विश्वामित्राने आपल्या शंभर पुत्रांपैकी कोणी एकाने त्याच्याऐवजी बळी जावे असे सांगितले; पण त्याच्या एकाही पुत्राने ते मानले नाही. यामुळे विश्वामित्र अत्यंत संतप्त झाले व त्यांनी स्वत:च्या पुत्रांनाच नष्ट होण्याचा शाप दिला, तेव्हा पुन्हा आकाशवाणी झाली- विश्वामित्रा, तू तुझ्या क्रोधामुळे पुन्हा पतीत झालास. पुन्हा घोर तपाला आरंभ केला तेव्हा त्या वेळेस राजा त्रिशंकूला स्वर्गात पोहचवण्याच्या मोहामुळे त्याची तपस्या नष्ट झाली. एकदा भगवान शंकरानी त्याची परीक्षा घेतली तेव्हा त्यातही ते अयशस्वी झाले. एकदा अप्सरा रंभामुळे त्यांची तपश्चर्या नष्ट झाली.

वास्तविक काम आणि क्रोध हे साधनेच्या मार्गावरील सर्वांत मोठे शत्रू आहेत. थोड्याश्या बेसावधपणाने अनेक वर्षांच्या तपस्येवर (परिश्रम) पाणी पडते. आज प्रत्येक मनुष्यासमोर विश्वामित्राची तीच अवस्था व साधनेतील त्याच समस्या आजही उभ्या आहेत.

अशा प्रकारे पुन:पुन्हा येणाऱ्या विघ्नाना पाहून विश्वामित्र विचार करू लागले- मी इतका अथक परिश्रम करीत आहे, आपली बुध्दी आणि विवेकाच्या जोरावर साधनेत थोडीशी ही त्रुटी राहू देत नाही, तरीही काही ना काही चूक राहतेच. पुष्कळ विचार केल्यानंतर त्यांनी निर्णय घेतला की, मी स्वत:लाच भगवंताला समर्पित का करू नये? माझे मन, बुध्दी, हृदय सर्वकाही त्यालाच अर्पण करून माझ्या योगक्षेमाची काळजी तेच वाहतील असा निश्चय केल्यावर ते अत्यंत आनंदित झाले व त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले-

**ॐ भूर्भुव: स्व: तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य**
**धीमहि धियो यो न: प्रचोदयात् ॥**

ॐ शब्दोच्चार असणाऱ्या, तिन्ही लोकांमध्ये व्यापून असणाऱ्या, स्वत: प्रकाशरूप असणाऱ्या, एकमात्र शरणस्थान असणाऱ्या हे प्रभो आम्हाला अशी बुध्दी दे की, ज्यामुळे मी आपल्या तत्त्वस्वरूपाला जाणू शकेन, परमश्रेयाला प्राप्त करू शकेन.

मनुष्याने आज त्याच समर्पणभाव व्यक्त करणाऱ्या छंदाचे अध्ययन, चिंतन व मनन केले पाहिजे. अशा प्रकारे परमेश्वराला सर्वभावे समर्पित होऊन जेव्हा विश्वामित्राने पुन्हा तपश्चर्येला प्रारंभ केला तेव्हा ते सतत पुढे पुढे जात राहिले. कित्येकदा विघ्न उपस्थित करणाऱ्या देवता घाबरून गेल्या. काम आणि क्रोधाचा कुठे पत्ता नाही, ''रवि सन्मुख तम कबहु कि जाही।'' जेथे जेथे प्रत्यक्ष भगवंतच स्वत: रक्षक म्हणून उभे

आहेत तेथे कोण काय करू शकणार आहे? तेव्हा देवता ब्रह्मदेवाकडे गेल्या आणि त्यांची प्रार्थना करून त्यांना त्यांनी विनंती केली की विश्वामित्राला जे पाहिजे ते द्या आणि त्याची तपश्चर्या संपवायला त्याला भाग पाडा अन्यथा आम्ही सर्वजण त्याच्या उग्र तपस्येने भस्मिभूत होऊन जाऊ.

ब्रह्मदेव विश्वामित्राकडे आले आणि म्हणाले आजपासून जितेन्द्रिय ब्रह्मर्षी झाला आहात. विश्वामित्रांची मनोकामना पूर्ण झाली. म्हणाले- मी ब्रह्मर्षी आहे, मी ब्राह्मण आहे ब्राह्मणाची जननी कोण? गायत्री! याचा अर्थ काय? त्या परमश्रेष्ठ, शाश्वत परमात्म्याला मनसा वाचा कर्मणा, समर्पित होणे म्हणजेच गायत्री. तिच्यावर भार टाकून चिंतनात मग्न व्हा. जेव्हा ती प्रार्थना ऐकेल तेव्हा तुम्हांला परमश्रेयाची प्राप्ती होईल.

विश्वामित्र म्हणाले जर मी ब्राह्मण असेन तर वेदांनी माझा स्वीकार करावा. ब्रह्मदेवांनी तथास्तु म्हणताच वेद विश्वामित्राच्या हृदयात उतरले. आजपर्यंत जे तत्त्व विदित नव्हते ते विदित झाले. वास्तविक परमात्म्याचे प्रत्यक्ष ज्ञान म्हणजेच वेद होय. अविदित तत्त्व विदित होणे म्हणजेच वेदांचे हृदयात उतरणे होय. आणि भगवतकृपेनेच शक्य होणारे आहे. व म्हणूनच वेदांना अपौरुषेय असे म्हटले जाते. वेद हे कोणत्या पुस्तकाचे नाव नाही. वेदस्वरूपात जो ग्रंथ उपलब्ध आहे, तो ग्रंथ म्हणजे वेदमंदिरात शिरण्याची प्रवेशपत्रिका आहे. तो ग्रंथ आम्हाला फक्त प्रेरणा देत असतो. विश्वामित्रांच्या हृदयात वेदांना उतरविण्याचे श्रेय कोणाला मिळाले ? गायत्रीला. वेदांची जननी कोण? गायत्री!

अशा प्रकारे गायत्री मंत्र म्हणजे एक निर्णायक उपदेश आहे. कणाकणात भरलेल्या परमात्म्याच्याप्रती स्वत:ला समर्पित करणारे संस्कृत भाषेतील एक सूत्र आहे. गायत्री म्हणजे कोणती देवी किंवा देवता नाही. परंतु लोक गायत्री देवीची मूर्ती बनवतात तर कोणी हिला तीन देवतांमध्ये विभागून ब्रह्मा, विष्णू व महेशाचे ध्यान करतात. काही लोकांचे म्हणणे असे आहे की, हा एक गृह्य असा महामंत्र आहे. हा मंत्र उलटून म्हणजे ''तयादचोप्र: न: यो'' असा जप करावा असेही सांगितले जाते. विश्वामित्रांच्या जीवनचरित्रातूनच हे स्पष्ट झाले आहे की साधनेच्या मार्गात देवताच शत्रूरूप असतात. तरीही जन्म जन्मांतरापासून आम्ही देवतांमुळे इतके प्रभावित झालेले आहोत की, जे खूप उत्तम वाटते त्याला देवता समजून पुजू लागतो.

परंतु ही खरी पूजा नव्हे. शाश्वत व स्वयं प्रकाशस्वरूप भगवंताच्या चरणी सर्व कर्म (तप) समर्पण करणे म्हणजेच गायत्री होय. जर आम्ही या प्रकारे पूजन केले, भजन (भक्ती) केले तर आम्हाला निश्चितपणे यश मिळेल. त्या सर्वशक्तिमान प्रभूकडून निर्मल

बुध्दी (जी परमश्रेय प्राप्त करून देणारी आहे) प्राप्त करून घेण्यासाठी गायत्री ही प्रार्थना मात्र आहे. त्यासाठी जीवनाच्या अंतापर्यंत केवळ प्रार्थनाच करावयाची नाही तर कर्मपण करावे लागते. नियत कर्मावर ध्यान केंद्रित करणे आवश्यक आहे. अशा स्थितीत परिणाम काही हाती लागणार नाही. पण लक्षात ठेवावे की नियत कर्म हे एकमेव साधन आहे की जे तुम्हांला तुमच्या लक्ष्यापर्यंत पोहचवू शकते. कार्य निर्विघ्नपणे पार पाडावे यासाठी प्रार्थना केली जाते.

समर्पणाबरोबर दोन-अडीच अक्षरांचे एखादे नाव घेऊन जप सुरू करावा. एखाद्या अनुभवी महापुरुषाला शरण जाऊन पुढे मार्ग-क्रमण करावे. तेव्हाच तुमच्यात ब्राह्मणतत्त्व निर्माण होईल. त्यानंतर तुमच्यात वेदांचे स्फुरण होईल ते तुमच्या हृदयात स्थिर होतील. तुमच्या हृदयात निर्माण होणाऱ्या या दोन्ही गोष्टींचा उगम गायत्री आहे. जेव्हा विश्वामित्र पूर्ण बनले, वेदज्ञ आणि ब्रह्मस्थित झाले तेव्हा त्यांच्यानंतर त्यांना काही शोधायचे किंवा काही प्राप्त करावयाचे उरलेच नाही. जेव्हा स्वत:च ब्रह्मस्वरूप झाले तेव्हा कोणाची प्रार्थना करणार? व कशासाठी प्रार्थना करावी? ''जानत तुमहिं तुमहिं होई जाई'' आता गायत्रीशिवाय ते कोणाचे आवाहन करणार? गायत्रीचे महत्त्व क्षत्रिय श्रेणीमधील साधकासाठी असते. कारण सर्वभावे स्वत:ला समर्पित करण्याची क्षमता अशा साधकामध्ये अधिक असते. जो ईश्वरासाठी तडफडत असतो, ईश्वराच्या वियोगाने एक एक क्षण ज्याला युगासारखा वाटतो तोच गायत्री मंत्राचा अधिकारी असतो अन्य कोणी नसतो. वैश्य आणि शुद्र स्तरावरील साधक स्वत:ला चांगल्या प्रकारे समर्पित करू शकत नाहीत. वैश्य, शुद्र, क्षत्रिय हे स्तर येथे जातिवाचक नाहीत तर साधकाच्या चिंतनाचा सोपान आहे. साधनेचे चारी सोपान पार केल्यानंतरच साधकाला परमसिध्दी प्राप्त करून घेता येते.

एकदा धर्मविधीमधील जाणकार मुलाला मी विचारले की, गायत्री काय आहे? तो उत्तरला ज्याप्रमाणे ''बल, बुध्दी, विद्या देहु मोहि हरहु कलेश विकार'' अशी एक प्रार्थना आहे तसाच तो एक मंत्र आहे- एक प्रार्थना आहे, मी विचारले पण त्या दोन्हीत काय फरक आहे? तो म्हणाला बल, बुध्दी, विद्या हे भगवंताच्या सेवकाकडे मागितली गेली आहे आणि गायत्रीची प्रार्थना प्रत्यक्ष भगवंताकडे केली आहे. जर मागायचेच आहे तर सरळ ईश्वराकडेच मागणे चांगले- 'तुलसी मूलहि सीचिए फूलइ फरइ अधाइ।' खालचे काय देणार? भक्तीचा मार्ग दाखवतील पण सद्गुरूशिवाय भक्ती मिळत नाही.

**''संतो भगती सद्गुरू आनी''- संत कबीर**

**।।ॐ ।।**

# युग-धर्म

युग धर्म म्हणजे चार प्रकारचे धर्म नसून
साधनेचे चार सोपान आहेत. साधकाला हे चार सोपान
चढावे लागतात.

युगांचा चढ-उतार मनाच्या अंतरंगात होत असतो.
सर्वांच्या मनात हे घडत असते.

**-स्वामी अडगडानंद**

महाकुंभाच्या उत्सवाच्या वेळी चण्डद्वीप हरिद्वार येथे
दिनांक १८-४-८६ या दिवशी विशाल जनसमूहासमोर
**स्वामी अडगडानन्दजींनी**
दिलेल्या प्रवचनातील काही भाग.

# युग-धर्म

बंधूनो,

आपल्याला रोज असे ऐकायला मिळते ''अरे बाबांनो, महाभयंकर कलियुग आले आहे. आता कसला धर्म व कसले पुण्य कर्म!'' त्यांच्या मते सृष्टीच्या प्रारंभी सत्ययुग होते. जेव्हा भारतात वेद प्रकट होतात तेव्हा लोक अत्यंत धार्मिक वृत्तीचे असतात. त्रेता, द्वापर आणि कलियुगापर्यंत वेद, गंगा आणि धर्माचा ऱ्हास होत होत ते त्या मृत्युलोकातून ब्रह्मलोकात निघून जातात. चार लाख बत्तीस हजार मानव निर्मित वर्षांचे कलियुग. त्याच्या दुप्पट द्वापर, कलियुगाच्या तिप्पट त्रेता आणि चौपट सत्ययुग व ही वर्षे मिळून ब्रह्मदेवाचा एक दिवस आणि तेवढ्याच मोठ्या रात्रीला एक कल्प असे म्हणतात. एक्काहत्तर महायुगे म्हणजेच तीस करोड सदुसष्ट लाख वीस वर्षांचे एक मन्वन्तर असते. त्यात देवराज इंद्र आणि मनूसारखे मोठमोठे पदाधिकारीसुध्दा काळाच्या पोटात गडप होतात. प्रत्येक मन्वंतराच्या अंती एक महाप्रलय होतो एकतीस पद्म दहा नील चाळीस खर्व मानव वर्षांमध्ये एका ब्रह्मदेवाचे आयुष्य पूर्ण होते. अशा ब्रह्माच्या हजार पट आयुष्य एका विष्णूचे आणि अशा विष्णूच्या बारा लाख म्हणजे चव्वेचाळीस लाख अठ्याहत्तर हजार नऊशे शहाहत्तर महाशंख वर्षे भगवान शंकराचे आयुष्य समजले जाते. जेवढ्या वेळात अनंत कोटी ब्रह्मांड- भांडोदरी ब्रह्मशकती जगदंबा एकदाच आपल्या पापणीची उघडझाप करते, तेवढ्या वेळात भगवान शंकर एक खर्व पन्नास अश्व वेळा आपल्या पापण्यांची उघडझाप करून ब्रह्मांडात पूर्ण प्रलय करून ब्रह्मामध्ये लय पावत असतात. अशा प्रकारे पुन्हा सृष्टी निर्माण होते. अशा प्रकारची काल गणना 'देवी-मीमांसा', 'देवीभागवत', 'शक्तिरहस्य', 'मार्कण्डेय पुराण', 'मनुस्मृति', इत्यादि ग्रंथांमध्ये केल्याचे आपल्याला पहावयास मिळते. याचे तात्पर्य असे की युगांच्या चढ-उताराबरोबर मनुष्याच्या क्षमतेमध्येही चढउतार होत असतो. मग त्याच्या मनात असूनही धर्माचे आचरण तो करू शकत नाही. त्यामुळे प्रत्येक युगातील धर्म वेगळा वेगळा असतो. जसे गोस्वामी तुलसीदासांच्या रामचरित मानसामध्ये दिसून येते. गीतेमध्येही भगवान श्रीकृष्ण प्रत्येक युगामध्ये मी अवतार घेत असतो असे सांगत आहेत. जर कलियुगामध्ये धर्माचा उत्तरोत्तर ऱ्हासच होणार असेल तर धर्माचरण कशाला करायचे?

तेव्हा प्रथम युग म्हणजे काय या प्रश्नाचा प्रथम विचार करू या. याबाबत आपले ऋषीमुनी या संदर्भात काय म्हणतात? रामचरित मानसामध्ये कलियुगाचे वर्णन केले आहे. त्यावरून असे समजते की कधी सत्ययुग होते व आज कलियुग आले आहे असे मुळीच नाही. कागभुशुण्डीने आपल्या पूर्वजन्माचा वृतांत सांगताना मल-मूल-कलियुगाचे वर्णन ज्या शब्दांत केले आहे, बरोबर त्याच शब्दांत आणि त्याच लक्षणांचा उल्लेख गोस्वामीजींनी उत्तरकाण्डात असंत (दुष्ट) लक्षण तसेच बालकाण्डामध्ये रावणाची उत्पत्ती आणि निशाचरांच्या भयंकर आचरणाचे (आतंकाचे) वर्णन करताना केले आहे. कलियुगात ''सब नर काम लोभ रत क्रोधी'' असतात तर दुष्ट ''काम, क्रोध, मद लोभ परायण'' असतात. दोन्ही गोष्टी एकच आहेत. कलियुगात ''परत्रिय लंपट कपट सयाने'' असे लोक असतात तर दुष्ट ''पर द्रोही, पर दार रत, परधन पर अपवाद'' असे असतात. अशाच प्रकारे निशाचरांचे भयंकर कृत्य वर्णन करताना निशाचरांना ''बाढे खल बहुचोर जुआरा। जे लंपट परधन परदारा॥'' असे साम्य दिसून येते.

बारीक सारीक सांगितलेले अनेक संदर्भ आहेत परंतु वरील तीन चार प्रमुख ठिकाणी कलियुगाच्या गुणधर्मावर प्रकाश टाकला आहे. कलियुगाची त्यांनी अनेक लक्षणे सांगितली आहेत.

**बरन धर्म नहिं आश्रम चारी । श्रुति विरोध रत सब नर नारी।**
**द्विज श्रुति चेचक भूप प्रजासन कोई नहीं मान निगम अनुसासन ॥**
**याच प्रकारे**
**नारि विवस नर सकल गोसाई । नाचहि नट मर्कट की नाई ॥**
**मातृ पिता बालकन्हि बोलावहिं । उदर भरै सोइ धर्म सिखावहिं ॥**
**ब्रह्म ज्ञान बिनु नारि नर, कहहिं न दूसरि बात ।**
**कौड़ी लागि बस करहिं विप्र गुरु घात॥७/९९ क**

इत्यादि पाचशे लक्षणे त्यांनी सांगितली व शेवटी निष्कर्ष काढला की

**ऐसे अधम मनुज खल, कृतयुग त्रेता नाहिं ।**
**द्वापर कछुक वृन्द बहु, होइहै कलियुग माहिं ॥७/४०**

म्हणजे अशी अधम माणसे सत्ययुगात व त्रेतां युगात असत नाहीत. द्वापर युगात थोडी असतात आणि कलियुगात पुष्कळ संख्येने असतात. प्रश्न असा निर्माण होतो की सत्ययुगात आणि त्रेता युगात अधम माणसेच नव्हती का?

परंतु ऐतिहासिक पुराव्याप्रमाणे सत्ययुगात हिरण्यकश्यपू नावाचा एक राजा होऊन गेला, त्याने आपल्या वेधशाळेत असा प्रयोग केला की स्वत:ला ना दिवसा मरण यावे, ना रात्री, ना शस्त्राने ना अस्त्राने, ना पशुपक्ष्यांकडून ना मानवाकडून स्वत:ला मरण यावे. जेव्हा त्याला समजले की, जगात आपल्याला आता मरणच नाही, मग त्या भगवंताची आता मला आवश्यकता काय? जरूर काय ? त्यामुळे त्याने जाहीर केले की मीच भगवान आहे, जो माझ्याशिवाय अन्य कोणा भगवंताचे नाव घेईल त्याला मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल. तो आपल्या सिध्दान्तांच्या बाबतीत अत्यंत कडक होता. इतका की, आपला एकुलता मुलगा त्याला सुध्दा त्याने क्षमा केली नाही. प्रल्हादाला त्याने सुळावर चढवले त्याला मारून टाकण्यासाठी अनेक उपाय त्याने केले. पण ईश्वर प्रल्हादाच्या मागे उभा होता. त्यामुळे त्याचे सर्व प्रयत्न फोल गेले. अहो अगदी लहान बालकाच्यापण मागे जरी ईश्वर उभा राहिला तरी जगातील कोणतीही शक्ती त्या मुलाला मारू शकत नाही. प्रल्हादामुळे त्या युगात भक्तीची एक लाट सर्वत्र पसरली.

म्हणजे पाहा की सत्ययुगात अशी परिस्थिती निर्माण झाली होती की केवळ धर्माची चर्चा केली तरी मृत्युदंडाची शिक्षा होत असे आणि येथे तुलसीदास म्हणतात की अशी अधम माणसे ''कृत किंवा त्रेता युगात नाही''. अधम माणसे जर सत्ययुगात व त्रेतायुगात नव्हते तर मग त्याच सत्ययुगात भगवंताचे नुसते नाव घेतले तरी फाशीची शिक्षा कशी होत असे? आज असे भगवंताचे नाव घेतल्यावर फाशी दिले जात नाही. फार तर मोठा भक्त बनू बघतोय किंवा आलाय मोठा भक्त अशा प्रकारची कुचेष्टा करतील पण तेवढेच त्या भक्ताभोवती प्रशंसक पण गोळा होतील. त्याची प्रशंसा करतील.

आता त्रेतायुगाकडे एक नजर टाकू त्रेता युगातपण अधम माणसे होती. ''धर्म सुनई जो कान। आपुन उठि धावइ, रहइ न पावै'' धर्माचे नाव कानावर पडताच रावण

क्रोधित होऊन तिथून निघून जाई. धर्माला नष्ट करण्यासाठी सैन्य पाठवे. अधर्मी लोकांना नष्ट करण्याची आज्ञा नव्हती, केवळ धर्मालाच नष्ट करण्याचा हेतू होता. चोर-लूटारूंना नष्ट करायचे नव्हते तर राम राम म्हणणाऱ्यांना नष्ट करायचा आदेश होता. ऋषी-मुनींकडून, महात्म्यांकडून रक्ताच्या रूपात कर वसूल केला जात असे. त्यांचा अपराध फक्त एवढाच होता की ते भगवंताचे चिंतन करीत होते. निशाचरांच्या टोळ्या धर्मशील लोकांना मारण्यासाठी दबा धरून असत संधी मिळताच त्यांना मारून टाकत असत. वनवासी राम जेव्हा चित्रकुटाहून पुढे गेला तेव्हा मनुष्यांच्या हाडांचा एक डोंगर त्यांच्या दृष्टीस पडला.

**आस्थि समूह देखि रघुराया।**
**पूछा मुनिन्ह लागि अति दाया ।।३/८/६**

हाडांचा भयंकर ढीग पाहून रामाने मुनींना विचारले की ही मनुष्यांची हाडे इथे एवढ्या मोठ्या प्रमाणात कशी आहेत? तेव्हा मुनीं म्हणाले, आपण स्वत: अंतर्यामी असताना आम्हांला का विचारीत आहात? पण जर विचारातच आहात तर सांगितलेच पाहिजे,

**निशिचर निकर सकल मुनि खाये ।**

श्रीरामा, हा निशाचरांनी खाल्लेल्या त्या मुनींच्या हाडांचा ढीग आहे. आज आपण भगवंताचे नाव हवे तेव्हा व हवे तितक्यांदा घेऊ शकतो. कोणी त्याबद्दल आपल्याकडून टॅक्स तर वसूल करीत नाही. वेद-पुराणे सांगितल्याबद्दल देशातून हकालपट्टी तर होत नाही. अवघा देश रावणाच्या ताब्यात होता तेव्हा देशातून हाकलून देण्याचा प्रश्नच कुठे होता? या जगालाच राम राम ठोकावा लागायचा ! वेद-पुराणे सांगणाऱ्यांना आज असे कोणी मारून तर टाकीत नाही? पण त्रेतायुगात मात्र धर्माचे-ईश्वराचे नाव घेण्याऱ्याची हत्या केली जात होती आणि गोस्वामी म्हणतात की अशी अधम-दुष्ट माणसे कृतयुग आणि त्रेतायुगात नव्हती.

त्रेतायुगातील आणखी एक संदर्भ पाहा-

**सौभागिनी विभूषण हीना।**
**विधवन्ह के शृंगार नवीना।।७/९८/५**

त्या त्रेतायुगातील शुर्पणखा विधवा होती. तिचा पती विद्युत-जिन्ह युध्दामध्ये मारला गेला तेव्हा आकांत करीत ती रावणाला म्हणते तू माझा भाऊ आहेस की शत्रू? तू मला विधवा बनवलेस? ‘‘रावण तिचे सांत्वन करीत म्हणाला, ‘ताई, माझी चूक झाली हे खरे, पण आमच्या जातीतील स्त्री विधवा होते का? आम्ही पुरुष हजारो स्त्रिया ठेवीत असतो, तसेच तुम्ही स्त्रियासुध्दा हजारो पुरुष ठेवू शकता. आपले बंधू खर-दूषणा बरोबर जा आणि माहेरी शांततेने राहा वाटेल तिकडे भटक’’. आणि अशी भटकत असतानाच

**पंचवटी सो गई एक बारा। देखि विकल भई जुगल कुमारा।।**

एकदा ती पंचवटीत रामाकडे गेली. श्रीरामांचे सुंदर रूप पाहून ती मधुर स्मित करीत म्हणाली

‘‘मन माना कछु तुम्हहि निहारी।’’ तुम्ही खूप सुंदर आहात असे नाही. हो, पण मला चालेल, म्हणून तर अजून मी कुमारी आहे. वास्तविक एकही कुकर्म करायचे तिने बाकी ठेवले नव्हते. अशी शूर्पणखे सारखी अध:पतिता आजसुध्दा पहावयास मिळणार नाही. तरीही गोस्वामी म्हणतात की त्रेतायुगात आजसारखी अधम माणसे नव्हती.

अहो, त्रेता युगात अधम माणसे नव्हती तर रामाला लढण्याची गरजच काय होती? श्रीरामांचे चरित्र हाच एक प्रत्यक्ष पुरावा आहे की त्रेतायुगात अधम व दुष्ट माणसे होती आणि ती केवळ अस्तित्वातच होती असे नव्हे तर त्यांच्या अत्याचाराने धरती हैराण होऊन गेली होती. विचार केला तर असे दिसून येते की आजच्यापेक्षाही अधिक अधम व दुष्ट माणसे त्या वेळेस होती. मग गोस्वामी तुलसीदासांना खरे काय म्हणावयाचे आहे?

युग-धर्म! दोन गोष्टींना युग म्हटले जाते स्त्री-पुरुष, चांगले-वाईट, पाप-पुण्य, सुख-दु:ख सर्व दोन दोन आहे परंतु तसे नाही. या प्रकृतीच्या दोन बाजू आहेत प्रकृतीमध्ये स्थित असणारा जीव-जगत अचेत आहे, प्रसुप्त आहे. ‘‘या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी’’ केवळ संयमी पुरुष जागा असतो. ज्या दिवशी त्याला जाग येते त्या दिवसापासून तो परमतत्त्व परमात्म्याच्या संमुख होतो. एक बाजूस तो संयमी पुरुष व

दुसऱ्या बाजूस परमात्मा- हेच युग होय. ज्या दिवसापासून तो परमात्मा सांभाळू लागतो, त्या आत्म्याचा प्रचालक बनतो, त्या दिवसापासून युगधर्माची सुरुवात होते.

समाज ज्याला युग मानतो वास्तविक ती एक कालगणना होय, धर्म नाही. काल अनंत आहे, असीम आहे, सृष्टी अनादी आहे व या प्रकारे ती निरंतर गतीने चालत असते. जीवाची निर्मिती केव्हा झाली? या जगाची उत्पत्ती कशी झाली? या प्रश्नाचा खल करीत बसणे गौतम बुध्दांनी देखील अनावश्यक समजले. योगेश्वर श्रीकृष्णाच्या मते

**प्रकृति पुरुष चैव विध्दयनादि उभावपि। गीता १३/१९**

म्हणजे प्रकृती व पुरुष दोन्ही अनादि आहेत. केव्हापासून सृष्टीची उत्पत्ती झाली हा प्रश्नच निर्माण होत नाही. श्रीकृष्णाच्या मते सृष्टी निरंतर चालत आली आहे, ती नित्य आहे. फक्त पोथ्या पुराणांमध्ये सृष्टीचे नित्यत्व न समजल्याने सृष्टीला रेखांकित करण्याचा असफल व अनावश्यक प्रयत्न केला आहे.

सभ्यतेच्या या विकासक्रमात पाश्चात्य विद्वानदेखील सृष्टीचा तिथी-क्रम निश्चित करण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु सभ्यता हा तिचा मापदंड नाही. पूर्वी झाडांवर राहणारे लोक जंगली पशूंच्या तुलनेत सभ्य ठरले. बुध्दी आणि शक्तीच्या जोरावर आकाशात उडू लागले पाण्यात पोहू लागले. प्रगतीच्या परमोकर्षबिंदूवर पोहचलेला मानव कधी-कधी युध्दातील भयानक दृष्यांनी श्रापित झाला. धन जन एवं संचित ज्ञानराशि नष्ट झाल्या. एक दीप येथे जळत आहे तर दुसरा उत्तर ध्रुवावर जळत आहे. माणूस माणसाला पहावयास तडफडत आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे आणि प्राकृतिक जीवन जगण्यासाठी लोक पुन्हा विवश होत आहेत. यानंतर लोकांचा उत्तरोत्तर विकास झाला की जुन्या लोकांना असभ्य-असंस्कृत म्हटले जाते. या प्रकारे हा काळ अबाधित गतीने उत्थान आणि पतन या दोन्ही गोष्टी पाहत पुढे चालत आहे. परंतु ज्या दिवसापासून युगधर्माचे बी तुमच्या हृदयात पडते त्या दिवसापासून या काळाचे गणित मांडले जाते. काळ कमी-जास्त होऊ लागतो. काळाची सीमारेषा ठरवली जाते, मर्त्य मनुष्य मृत्युवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करतो. कालातीत पुरुष अमृततत्त्व परमात्म्याकडे प्रवेश मिळवू शकतो-

‘‘काल न खाय, कलप नहिं व्यापै, देह जरा नहिं छीजै।।’’ युग-धर्म काय आहे? तो कोठे असतो? कसा असतो? याचे स्पष्टीकरण करताना गोस्वामी म्हणतात-

**नित युग धर्म होहिं सब केरे**
**हृदय राम माया के प्रेरे।।७/१०३/१**

सर्व युगांमध्ये धर्म सर्वांच्या हृदयात असतो, कसा असतो? तो ‘राममायेच्या प्रेरणेने मनात उद्‌भवतो. ‘राम-माया’ ‘आत्म-माया’ योग-माया इत्यादी एकदुसऱ्याचे पर्याय आहेत. आणि त्याचेच दुसरे नाव विद्या आहे. युगधर्माचा श्रीगणेशा राममायेच्या प्रेरणेने होत असतो. जोपर्यंत राममाया जागृत होत नाही तोपर्यंत युगधर्माचा अजून आरंभ झाला नाही असे समजावे. ही राम-माया किंवा विद्या काय आहे? राम-माया म्हणजे काय ते पाहूया-

जेव्हा भगवान राम वनवासकाळात पंचवटीमध्ये झोपडी बनवून आराम करीत होते. त्या वेळेस

**‘लाछिमन वचन कहे छल हीना’’**

लक्ष्मणाने विनम्र होऊन श्रीरामाला काही प्रश्न विचारले की माया काय आहे? ईश्वर काय आहे? जीव काय आहे? ज्ञान-वैराग्य काय आहे? आणि कोणत्या भक्तीने आपण प्रसन्न होता? तेव्हा भगवान श्रीराम म्हणाले- ‘थोरोहि महँ सब कहउँ बुझाई। सुनहु तात मति मन चित लाई।। ३/१४/१।। याचे श्रीरामाने दिलेले उत्तर मी थोडक्यात सांगतो. अत्यंत लक्षपूर्वक ऐका:

**मैं अरु मोर तोर तै माया। जेहिं बस कीन्हें जीव निकाया।।**

‘मी आहे’, ‘हे माझे आहे’, ‘तू आहेस’, ‘हे तूझे आहे’ ही माया आहे. तिने चराचराला पराधीन करून ठेवले आहे. ‘तेहिं कर भेद सुनहुं तुम सोऊ। विद्या अपर अविद्या दोऊ।। या मायेचे दोन प्रकार आहेत. एक विद्या व दुसरी अविद्या ‘‘एक दुष्ट अतिशय दु:ख रुपा। जा बस जीव परा भव कूपा।। अविद्या अत्यंत दुष्ट आहे. तिला विवश झाल्यामुळेच जीवाला या भवसागरात पडावे लागले आहे. ‘‘एक रचइ जग गुन बस जाके। प्रभु प्रेरित नहिं निज बल ताके।। ’’ दुसरी विद्या या जगताची रचना करते.

त्याला सजवते आणि 'गुण वश जाके' म्हणजे गुण जिच्या काबूत आहेत. म्हणजेच सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांना ती नियंत्रित करू शकते, परंतु ही विद्या प्रभुप्रेरित आहे. जोपर्यंत ईश्वर प्रेरक म्हणून उभे राहत नाही तोपर्यंत ही विद्या येत नाही. कारण तिच्याजवळ तिची अशी काही शक्ती नाही. ती तिन्ही गुणांना नियंत्रित करून त्या गुणांच्या पलीकडे जाण्यास मदत करते. परंतु जेव्हा स्वयं प्रभू जागृत होऊन प्रेरणेच्या रूपात उभे राहतात, व आपण त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालतो तेव्हाच हे शक्य बनते. ज्या दिवशी या विद्येचा प्रादुर्भाव आपल्यामध्ये होतो त्या दिवसापासून आपल्या अंत:करणात युगधर्म सुरू होतो. स्वामी आणि सेवक आमोरे सामोरे होतात व म्हणून याचेच नाव युग आहे.

''पूर्वी सत्ययुग होते आणि आज कलियुग आहे'' असे विधान खरे नव्हे. गोस्वामी म्हणतात, ''नित युग धर्म होहिं'' युगधर्म नित्य आहे. एकाच वेळी म्हणजे एकाच काळात एक सत्ययुगी तर दुसरा कलियुगी होऊ शकतो. मग कोणते युग कार्यरत आहे हे कसे जाणावे? यावर ते म्हणतात- ''तामस बहुत रजोगुन थोरा। कलि प्रभाव विरोध चहुँ ओरा॥२२ ७/१०३/५ जेव्हा तामस गुणाचे बाहुल्य असते, सर्वत्र वैर-इर्षा-विरोध अशा प्रकारचे तामसी वातावरण असेल तेव्हा ते कलियुग आहे असे समजावे. अशा परिस्थितीमध्ये त्याने भगवतचिंतनाचा आरंभ कोठून करावा? यावर ते म्हणतात- ''कलियुग केवल हरि गुनगाहा। गावत नर पावहिं भव थाहा॥'' भगवंताच्या लीलांचे भजन करा आणि त्याची सेवा करा. म्हणजे या भवसागराचा थांग लागू शकेल.

साधना अधिक उत्कट बनवली, साधकाचा स्तर वाढला तर ''बहुरज स्वल्प सत्व कछु तामस । द्वापर धर्म हरष भय मानस'' राजस गुणांचे बाहुल्य होते. व असे राजसगुण वाढले, थोडे सात्त्विक गुणही त्यात मिसळले, मनात हर्ष व भय दोन्ही असतील तर अशा द्विधाजन्य स्थितीला द्वापार युग असे म्हटले जाते त्या वेळेस ''द्वापार करि रघुपति पद पूजा। नर भव तरहि उपाय न दूजा॥'' तो साधक भगवंताची पाद्य पूजा करण्याचा भगवंतचरणी मन एकाग्र करण्याचा तसेच भगवतचरणांचे चिंतन करण्याचा प्रयत्न करतो. (अर्थात ध्यान तर लागत नाही कारण मन द्विधा अवस्थेत असते. मात्र त्या साधकात अभ्यास करण्याची क्षमता मात्र असते) या प्रकारे साधना करून तो भवसागर पार करू शकतो.

यापेक्षा साधना अत्यंत उत्कट झाल्यावर व मन अधिक परिपक्व बनल्यावर ''सत्व बहुत रज कछु रति कर्मा। सब विधी सुध त्रेता कर धर्मा।'' म्हणजे जेव्हा सत्त्वगुणाचे बाहुल्य असते, थोडे राजस गुण असतात पण तमोगुण संपूर्णपणे नष्ट झालेला असतो. सर्व प्रकारची सुख समृध्दी असते तेव्हा त्रेताधर्म सुरू आहे असे समजावे. अशा परिस्थितीमध्ये भजन (भक्ती) कोणत्या श्रेणीचे असते? ''त्रेता विविध यज्ञ नर करहीं। हरिहिं समर्पि करम भव तरहीं।।'' विविध प्रकारचे यज्ञ मनाचे शमन, इंद्रियांचे दमन, नित्य चिंतन आणि 'यज्ञानां जप यज्ञोऽस्मि'- यज्ञामध्ये सर्वश्रेष्ठ यज्ञ म्हणजे जपयज्ञ (यज्ञ श्रेणीच्या साधकांच्या जपाचा चढ-उतार श्वासावर अवलंबून असतो) म्हणून श्वास-प्रश्वासाचे यजन आणि याच प्रकारे गीतेमध्ये ईश्वरप्राप्ती बाबत ज्या यज्ञाची चर्चा केली आहे त्या सर्वांची यात क्षमता आहे. सर्व प्रकारच्या क्रिया त्याच्यापुढे जागृत झालेल्या असतात.

दीर्घकाळाच्या सततच्या अभ्यासामुळे साधना जेव्हा सूक्ष्म बनते तेव्हा

''शुध्द सत्त्व समता विज्ञान । कृत प्रभाव प्रसन्न मन जाना ।'' प्रथम सांगितले होते.

विद्या गुणांना नियंत्रित करते. ती विद्या प्रभू-प्रेरित विद्येची देणगी आहे, आता रज व तम गुण संपूर्णपणे शांत झाले. केवळ सात्त्विक गुण मात्र राहिला- अनुभव उपलब्धी आहे- अनुभवातून प्राप्त होणारी आहे. तो साधक बुध्दीची मदत घेत नाही तर आकाशातून प्राप्त होणाऱ्या शब्दांच्या (हृदयाकाशातून) आधाराने चालण्याची क्षमता त्याच्यात असणारा तो वैज्ञानिक आहे. त्याच्यामध्ये विषमतेला बिलकूल थारा नसतो. त्याच्याजवळ सर्वांसाठी समभाव असतो- हा सर्व सत्ययुगाचा प्रभाव आहे, ''कृत प्रभाव प्रसन्न मन जाना'' तो सदैव प्रसन्नचित राहतो. ही अवस्था प्राप्त झालेली व्यक्ती करत काय असते? त्याचे चिंतन कशा प्रकारे जाणायचे? त्याचे वजनमाप कोणते आहे? ''कृत युग सब योगी विज्ञानी। करि हरि ध्यान तरहि भव प्रानी।।'' या स्तरावर असणारे सर्व योगी असतात. ईश्वरीय निर्देशाप्रमाणे चालणारे ते वैज्ञानिक आहेत. अगदी सहजतेने ते ध्यानमग्न होऊ शकतात आणि भवसागर ते पार करतात. आज आपण ध्यानमग्न होऊ शकत

नाही; पण त्या युगाची योग्यता ज्याला प्राप्त होते तेव्हा तो सहजतेने ध्यानाची प्राप्ती करू शकतो व भवपारही करू शकतो.

वरील विवेचनावरून असे वाटते की चार भवसागर असावेत; पण असे काही नाही भवसागर एकच आहे. भव म्हणजे जन्माला येणे- उत्पन्न होणे. जन्म व पुनर्जन्म, जन्ममरणाचे फेरे याला भवसागर म्हणतात. हा भवसागर प्राप्त करण्यासाठी चिंतनाच्या मार्गाला चार श्रेणींमध्ये विभागले आहे. त्यालाच कलियुग, द्वापर, त्रेता आणि सत्ययुग असे संबोधले जाते. सुरुवातीला तमो गुणाचे प्राबल्य असते; तेव्हा भगवंताच्या लीलांचे गायन आणि नाम-जप करून भवसागराचा थांग लावता येतो. दीर्घकालपर्यंत भगवंताची सेवा व चिंतन चालू ठेवल्याने तोच साधक द्वापर श्रेणीमध्ये परिणत होतो. कलियुगातून सरळ भवसागरामधून पार होता येत नाही तर प्रथम द्वापार युगात प्रवेश मिळतो. तेव्हा मनाच्या अंतरंगात पाद्यपूजेची क्षमता निर्माण होईल. ही क्षमता अधिक तीव्र झाली तर साधक त्रेतायुगात प्रवेश करू शकतो. त्यावेळी श्वास-उच्छ्वासाचे यजन ईश्वरचरणी कर्मसमर्पण करण्याची योग्यता त्याच्यामध्ये निर्माण होते. चिंतन यापेक्षाही अधिक सूक्ष्म झाले तर त्या साधकामध्ये ध्यान आणि समाधीची क्षमता निर्माण होते. अशा वेळी साधकाची इतकी तयारी असते की, तो जेव्हा पाहिजे त्या क्षणी ईश्वरस्वरूपात मन केंद्रित करू शकतो. अशा वेळी प्रत्येक समस्येचे निराकरण बुध्दीने तो करीत नाही तर ईश्वराच्या निर्देशानुसार करतो. अशा प्रकारे प्रयत्न केला तर तो भवसागर पार करू शकतो.

अशा प्रकारे युगधर्म म्हणजे एकाच साधकाचे चार सोपान आहेत. चार प्रकारचे धर्म किंवा चार भवसागर नव्हेत. साधकाला या चारी सोपानावरून जावे लागते. गीतेमध्ये यालाच चार वर्ण म्हटले आहे. महर्षी पातंजली यांनी आपल्या 'योगदर्शन'मध्ये या चार सोपानांना अति उत्तम, उत्तम, मध्यम आणि निकृष्ट प्रतीच्या साधकांचे रूप असे म्हटले आहे. गोस्वामी तुलसीदासांनी अरण्यकांडामध्ये ''उत्तम के अस बस मन माही'' मातांच्या माध्यमातून या चारी युगधर्माचे निरुपण केले आहे

जोपर्यंत ईश्वर आमच्यापासून वेगळा आहे तोपर्यंत युगधर्म चालत राहणार. साधना जेव्हा परमोत्कर्षबिंदूवर पोहचते तेव्हा युगधर्म आणि त्याची केंद्रभूमी दोन्हीही शांत

होतात. मनामध्ये प्रवाहित असणारे तीन गुणसुध्दा राममायेद्वारे त्यात विलीन होतात. हीच त्रिगुणातीत किंवा त्या गुणांच्या पलीकडे जाण्याची अवस्था आहे. या अवस्थेचे वर्णन गीतेमध्ये केलेले आहे. यालाच राममयी स्थिती म्हणतात. ''जानत तुम्हहि तुम्हहि होई जाई'' व येथे युगधर्माचे कार्य पूर्ण होते-''कालधर्म व्यापई नहिं ताहि। रघुपति चरन प्रीति अति जाहीं॥''

साधारणत: दोन गोष्टींना युग म्हटले जाते. तुलसीमानसाच्या मते विद्या जागृत होताच स्वामी संचालक बनतात, सेवक चालत असतो. स्वामी व सेवक समोरासमोर आहेत. हीच ती दोन युगे. त्या दिवसापासून युगधर्माची सुरुवात होते आणि मग अनंत असणाऱ्या काळाच्या अंताचे गणित- कालगणना सुरू होते, काळाचे बंधन नाहीसे होण्यास सुरुवात होते आणि या सात्विक गुणांच्या शमनाबरोबरच युगांचाही अंत होतो. प्रकृति शांत झाली की पुरुषही थोडाच उरतो आणि त्याच्या अनुभूतीबरोबरच ''सो जानइ जेहि देहु जनाई। जानत तुम्हहि तुम्हहि होई जाई॥'' आणि असे जाणल्यानंतर द्रष्टा आपल्या स्वरूपात स्थिर होतो. आत्मभाव परमात्म स्थिती प्राप्त होते. त्या वेळी कालक्रम 'युग' देखील संपते- त्या युगांचादेखील अंत होतो. याव्यतिरिक्त दुसरे युग होऊच शकत नाही. ''सहजे सहज समानी।''

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी याच युगावर भर दिला आहे की ''संभवामि युगे युगे''- मी युगा-युगात प्रकट होतो. वास्तविक प्रत्येक युगात इष्ट प्रत्यक्ष साथ देत असतो, त्यामुळे तर युगधर्म सुरू होतो. हो, एक मात्र खरे की, उच्च श्रेणीमध्ये, अनुकूलतेचा चांगला अनुभव येतो. कनिष्ठ श्रेणीमध्ये (युगांमध्ये) इष्टचा सहयोग क्षीण असतो. तर मग आपण कसे प्रगट होता? यापूर्वीच एका श्लोकात सांगितले आहे-

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानमीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायच ।।गीता ४/६।।**

अजन्मा आणि समस्त भूतप्राण्यामध्ये असणारा ईश्वर, अव्यक्त असूनही आत्ममायेच्या द्वारा आपल्या त्रिगुणमयी प्रकृतीला स्व-अधीन ठेवून प्रकट होत असतो. जी गोष्ट गीतेमध्ये सांगितली आहे तीच मानसमध्येही सांगितली आहे. मानसमध्ये

म्हटले आहे की विद्या गुणांना आपल्या काबूत ठेवते, वश करून ठेवते. गीतेमध्ये तेच म्हटले आहे की आत्ममाया गुणांना स्वअधीन करून ताब्यात ठेवते. वास्तविक आत्म्याची स्थिती देणारी आत्ममाया गुणांना स्वअधीन करून ताब्यात ठेवते. वास्तविक आत्म्याची स्थिती देणारी आत्ममाया आहे. दुसऱ्या शब्दांत परमात्म्याशी जोडणारी, त्याच्याशी मिलन करून देणारी योगमाया आहे. तीच या भौतिक जगाशी संयोग-वियोग रहित, शाश्वत नैष्कर्म्य परमसिध्दी प्राप्त करून देते. तिचेच तिसरे नाव विद्या आहे.

जेव्हा भाविक भक्ताच्या हृदयात भगवान स्वयं जागृत होऊन अधिष्ठित होतात तेव्हाच विद्या उत्पन्न होते. त्यामुळे येथे भगवंताचेच महत्त्व आहे साधक केवळ निमित्तमात्र आहे. ज्या विद्येच्या द्वारा साधक भवपार होतो ती विद्या म्हणजे ईश्वराचीच देणगी आहे व म्हणूनच येथे परमेश्वराची गरज आहे. योगेश्वर म्हणतात- मी प्रत्येक युगायुगात प्रकट होत असतो 'संभवामि युगे युगे' ज्या दिवसापासून ईश्वर जागृत होतो त्यावेळी तमोगुणाचे प्राबल्य असते कारण नुकताच तर तो जागृत होऊ लागला आहे. याच वेळी साधकामध्ये रजोगुण अल्पांशाने तेथे असतो व सात्त्विक गुण सुषुप्त अवस्थेत असतो. येथे पथिक कलियुगीन आहे; परंतु आत्ममाया जागृत आहे. ईश्वराच्या लीलांचे गुणगान करून, भजन करून, सेवा करून व आपली कर्मे समर्पित करून तो ईश्वराच्या समीप जातो. अर्थात ईश्वराप्रती ही ओढ हीदेखील ईश्वराची देणगी आहे. तो ईश्वर प्रत्येक युगात समोरासमोर उभा राहतो. जर ते सांगत नसतील तर अजून विद्या जागृत झाली नाही. युगधर्माचा प्रश्नच निर्माण होत नाही.

म्हणून बंधूनो, आज कलियुग आहे व लवकरच सत्ययुग येणार आहे ही समजूत खरी नाही. आजचे धर्मपंडित असे सांगत आहेत पण ते विसरून जा. सृष्टीमध्ये अशी युगे असूच शकत नाहीत. जगात केवळ भारतात आणि तेही केवळ हिंदुशास्त्रांमध्येच त्याची चर्चा आहे. केवळ भारतातच सृष्टीच्या गतीचा धर्माशी संबंध असण्याचा भ्रम आहे. जर चार युगांचा सृष्टीशी संबंध आहे किंवा सृष्टीसाठी त्यांची निर्मिती झाली आहे तर जगात सर्वत्रच ते पाहिजे होते; परंतु असे नाही. भारतातील अध्यात्मिक ग्रंथांमध्येच फक्त या युगांचा उल्लेख सापडतो. पण लक्षात ठेवा की हे कल्याणमय मार्गाचे नियम आहेत. या नियमांना समजून न घेतल्यानेच सामाजिक व्यवस्था

ठेवणाऱ्यांनी स्मृतिकारांनी तिला बाहेर ठेवणे अधिक पसंत केले. वास्तवतेपासून ते फार दूर गेले. त्यांनी सांगून टाकले- चार लाख बत्तीस हजार वर्षांचे कलियुग होते त्याच्या दुप्पट वर्षांचे द्वापर, तिप्पट त्रेता आणि चौपट सत्ययुग होते. वास्तविक बीन बुडाच्या भांड्यासारखी ही गोष्ट झाली की ज्याचा काही उपयोग नाही, जी निरर्थक आहे. याचा उपयोग त्यांनी आपल्या सांप्रदायिक देवतांचे महत्त्व वाढवण्यासाठी आणि चकित करून सोडणाऱ्या गोष्टींचे सृजन करून साध्या-भोळ्या जनतेला भयभीत करण्यासाठी केला. तुलसीमानसमधील एक कथानक यावर चांगला प्रकाश टाकते. राजा प्रतापभानूला एक कपटी मुनी भेटतो. सृष्टीच्या उत्पत्ती व प्रलयाची आश्चर्यकारक गोष्ट सांगून राजाचा विश्वासघात करतो. वास्तविक अशा प्रकारची कालगणना होऊच शकत नाही आणि आर्षग्रंथांमध्ये त्याचे तसे समर्थनही केलेले नाही.

मनुस्मृती व पराशर स्मृती दोन्ही समकालीन आहेत. दोन्हीत फारसे अंतर नाही. दोन्ही ग्रंथ गौतमबुध्दाच्या काळाच्या थोडे मागेपुढे लिहिले गेले आहेत. परंतु पराशर स्मृतीमध्ये म्हटले आहे की मनुस्मृती तर सत्ययुगातील लोकांसाठी होती. कलियुगासाठी तर पराशर स्मृतीच प्रमाण आहे. या स्मृतिकारांना तर कलियुग काय आहे हेही माहीत नाही. वर सांगितल्याप्रमाणे युगांचा चढउतार मनुष्याच्या मनात होत असतो. सर्वांच्या अंतरंगात हा व्यवहार होत असतो. सर्व युगे आपल्यासाठी आहेत. आणि क्रमशः प्रगती करीत सर्व युगांचा परिणाम पाहावयाचा आहे.

**बुध युग धर्म जानि मन माही ।**
**तजि अधर्म रति धर्म करहिं ॥७/१०३/६ ॥**

विवेकी पुरुष युगधर्माला मनामध्ये जाणून असतो. शरीरामध्ये किंवा बाहेर समाजात, सूर्य, चंद्र, नदी आणि डोंगरामध्ये तो या युगधर्माला पाहत नाही. तेथे युगधर्म नाही. मनाच्या अंतरंगातच तो जागृत होण्याचा संभव आहे हे त्याला माहीत आहे. व म्हणूनच विवेकी पुरुष अधर्माचा त्याग करून धर्मामध्ये आपले मन केंद्रित करत असतो आणि प्रभूचा संचार व त्याची प्रेरणा प्राप्त करतो. या प्रकारे युगांना जागृत करून क्रमशः चार युगांना पार करीत परम भाव प्राप्त करतो. आता या युगांचा सामाजिक उपयोग काय हेही पाहायला पाहिजे. समाज हा व्यक्तीने बनत असतो. जर आपल्याला

समाजाचे कल्याण करायचे असेल तर सर्वांनी मिळून सत्य शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे जेव्हा बहुतांशी लोक सत्यप्रधान असतील तर वातावरणात स्वत:हून सत्ययुग येईल. समाजात आपल्याला कल्याणकारी मार्गाचा निर्माता समजले जाईल. लोककल्याणही होईल व आपणही कल्याणमय मार्गासाठी योग्य ठराल.

अनुभवी अंतप्रेरक महापुरुष युगधर्म कसे पार करावेत हे जाणतात. तेव्हा अनुभवी तत्त्वदर्शी महापुरुषाच्या सतत शोधात राहा. अशा महापुरुषाच्या भेटीची लालसा मनात धरा.

**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवामां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।**

अभ्यास करता करता अनेक जन्मांच्या शेवटच्या जन्मामध्ये म्हणजे ज्या जीवनात ईश्वराची प्राप्ती होणार असते त्या जन्मात ईश्वराचा साक्षात्कार झाल्यानंतर 'हे सर्व विश्व वासुदेव होय' असे ज्ञान प्राप्त होऊन तो ज्ञानी माझी उपासना करतो, तो मला येऊन मिळतो. तथापि असे जाणणारा महात्मा दुर्लभ आहे. हा ज्ञानी वासुदेवाचा फोटो पुढे ठेवून किंवा मूर्ती बनवून तिची उपासना करीत नाही तर तो वासुदेवाला स्वतःच्या हृदयात पाहत असतो व त्याला भजत असतो. अशा या ज्ञानी महात्म्याला श्रीकृष्ण तत्त्वदर्शी असेही म्हणतात. अशा महापुरुषांमुळेच समाजाचे कल्याण होते. अशा प्रकारचे तत्त्वदर्शी महापुरुष अत्यंत दुर्लभ असतात असे श्रीकृष्ण म्हणतात.

**-'यथार्थ गीताः श्रीमद्भगवद्गीता'**

(अध्याय ७, श्लोक १९)

# अहिंसा

अंहिसा योग-साधनेचे एक अंग आहे.

महाकुंभाच्या उत्सवाच्या वेळी चंडद्वीप हरिद्वार येथे
दिनांक १९-४-८६ या दिवशी जनसमुदायासमोर
**स्वामी अडगडानंद**
महाराज यांनी दिलेल प्रवचन.

# अहिंसा

बंधूनो,

जगात साधारणत: प्रत्येक देशात, प्रत्येक काळात अहिंसेचा उपदेश देणारे उपदेशक झाले आहेत, परंतु भारतात अहिंसेचे जेवढे अधिक समर्थक आणि तिचे कट्टर पालन करणारे झाले आहेत तेवढे जगातील अन्य कोणत्याही देशात झाले नसतील. आत्म्याप्रमाणेच अहिंसा या शब्दानेही भारतीयांना मोठेपण मिळवून दिले आहे. मूसा, ईसा, महम्मद साहेब, झरतुष्ट कफ्युशियस, लाओत्से तसेच प्राचीन ग्रीस उपदेशकांनी वाईटाचा बदलाही चांगुलपणात द्यावा असे सांगितले आहे. सर्वांनी प्रेम, शांती, दया करुणा आणि सेवाभावी वृत्तीचा संदेश दिला आहे. परंतु या सर्वांच्या मुळाशी आहे भारतीय ऋषींचे चिंतन, आणि ती परंपरा वेद, उपनिषद, महावीरस्वामी, गौतम बुद्ध व नानकापासून आजपर्यंत अखंड सुरू आहे.

परंतु किती विरोधाभास आहे ते पहा- अनादि कालापासून जो भारत चिरंतनाच्या, शाश्वताच्या शोधाचे स्थळ बनला, जगासाठी जो प्रकाशस्तंभ बनून राहिला, ज्याचा विश्वगुरू म्हणून गौरव करण्यात आला त्या भारतातील निवासीलोकच आज गुणहिन बनत चालले आहेत आणि या अध:पतनाचे एक कारण अहिंसा हेही सांगितले जाते. खरोखर ही केवढी विटंबना की परमतत्त्वाच्या शोधाचे स्थान असणाऱ्या देशात अंहिसेबद्दल अशी भ्रामक समजूत असावी !

आज अशी स्थिती आहे की लोक विंचू किंवा मुग्यांना मारायलाही घाबरत आहेत. सापाला मारायला ते भीत आहेत. तरीही सर्पदंशाने मृत्यू पावण्याच्या घटना घडत आहेत. लोक असे ढेकणांना मारण्यासही घाबरत आहेत. त्यांना वाटते असे केल्याने हातून पाप घडेल. या भयामुळे देश कायर-भित्रा बनला आहे. आमच्यावर आक्रमण होत- युद्धात आमचे लोक मारले जातात. पण तोपर्यंत आम्हांला आमच्या सुरक्षेचे भान नसते, जेव्हां भान येते तोपर्यंत आमचे पुष्कळ नुकसान झालेले असते. दु:खाची गोष्ट तर ही आहे की (अंहिसेचा उदो उदो करणारे) लोक मांस-मच्छी खातात, आपल्या शेजाऱ्याचा हक्क हिसकावून घेण्याचा प्रयत्न करतात पण जेव्हा सुरक्षेचा प्रश्न

येतो तेव्हा घरात दडून बसतात. याला अहिंसा पालन म्हणत नाहीत तर भित्रेपणा म्हणतात.

कोणत्याही जीवाला न मारण्यामागची दोन करणे असतात. एक तर असे समजले जाते की जीवन दु:खमय आहे; परंतु त्यापेक्षाही दु:खमय मृत्यू आहे. घोर काबाडकष्ट करणारादेखील मरू इच्छित नसतो. तेव्हा जेवढे शक्य असेल तेवढे मृत्यूपासून दूर राहिले पाहिजे. अगदी आपले नुकसान होत असताना सुद्धा ! किती आश्चर्य आहे पहा की, भारतीय लोकही मृत्यूला घाबरत आहेत. वास्तविक जगात भारतीयांनी सर्वांत कमी प्रमाणात मृत्यूला घाबरले पाहिजे. कारण त्यांनीच तर शोधून काढले आहे की आत्मा अमर आहे. मग मृत्यू काय आहे ? जीर्ण वस्त्राप्रमाणे नश्वरदेहाचे परिवर्तन म्हणजे मृत्यू.

अंहिसेच्या अत्यंत आहारी जाण्याचे दुसरे कारण म्हणजे आमचे स्मृती ग्रंथ की ज्यात सांगितले आहे की साप किंवा उंदीर मारल्यावर लोखंडाची छडी दान द्यावी. मांजर मारले तर सोन्याचे मांजर दान द्यावे, मुंगूस, बेडूक कावळा, कुत्रा अथवा शूद्र यापैकी काहीही हातून मारले गेले तर एक पांढरा बैल आणि दहा गायी ब्राह्मणाला दान द्याव्यात असे सांगितले आहे. बकरी मारल्यानंतर, हत्ती मारल्यानंतरही अमुक एवढे दान द्यावे असे सांगितले आहे. म्हणजे जसा जीव तसे दान ! अहो बिन हाडाचे कीडे-कीटक मारल्यानंतर सुद्धा दहा गायी आणि एक बैल द्यावयास सांगितले आहे. हिंसाजन्य पापाची कहाणी एवढी पुढे गेली आहे की, पाणी भरणेसुद्धा पाप आहे; मग द्या दान. चूल पेटवली- द्या दान ! मग उखळ व जात्याची तर गोष्टच सोडा. बंधूनों, केर काढण्यानेसुद्धा हिंसा होते असे समजले जाते. यासाठीही दान द्या. फाशी देणारा, मच्छी मारणारा, चिमण्या मारणारा व प्राण्यांची शिकार करणारा व्याध जितकी हिंसा करतो तेवढीच हिंसा शेतकरी शेत नांगरण्याने करत असतो. या हिंसेपासून मुक्त होण्यासाठी पिकांचा एक भाग जो ब्राह्मणाला दान करीत नाही त्याला ब्रह्महत्येचे पाप लागते असे समजले जाते.

या प्रकारे जीवनातील प्रत्येक गोष्टीत हिंसा जाहीर करणे व ती हिंसा केल्याबद्दल मृत्यूचा कर वसूल करणे या धार्मिक दंडेलशाहीमुळे मनुष्य अत्यंत विवश झाला-घायाळ झाला. त्याने पाहिले की, कोणत्याही प्राण्याकडे साधे बोट दाखविले तरी मृत्यूकर

भरावा लागत आहे आणि नाही दिला तर त्यापेक्षाही भयंकर अशा सामाजिक बहिष्काराचे दु:ख सहन करावे लागत आहे, नरकाचे भय याशिवाय वेगळेच. त्यामुळे लोकांचे मन इतके घाबरून गेले की ते मुंगी मारायलासुद्धा घाबरू लागले, या मृत्युकराचा त्रास इतका वाढला की लोक 'जीव-हत्त्या' या केवळ विचाराने ते कापू लागले.

या मनोवृत्तीमुळेच तैमूरलंगाच्या मूठभर शिपायांनी लाखो बंदीवान हिंदूनां तलवारीने कापून काढले. दिल्लीला बंद दरवाजाच्या आत पंधरा दिवसपर्यंत कत्तलखाना सुरू होता. त्यावेळेस तोफा किंवा बंदुका नव्हत्या केवळ तलवार होती. त्यामुळे शस्त्रहीन लोक तुटून पडले असते (त्या मूठभर सैनिकांवर) तर इतिहास काही वेगळाच झाला असता. पण तसे होणार नव्हते कारण आमचे स्मृतिग्रंथ-ज्यामध्ये लिहिले आहे की, शस्त्र हातात घेणे पाप आहे. शंभरात सात क्षत्रिय आणि त्यातही स्त्रिया व मुले म्हणजे लढणारे राहिले फक्त तीन. त्या तीन लोकांवर कब्जा केला की बाकीच्यांना मेंढरांप्रमाणे हाकलायचे.

स्मृतीमध्ये हिंसाजन्य पापाचे निराकरण करण्यासाठी दान हा उपाय सांगितला आहे. तर रामचरित मानस मध्ये "**सनमुख होइ जीव मोहि जबहीं । जन्म कोटि अद्य नासहिं तबहीं ॥**" भगवंताला सामोरे जण्याने अनंत जन्मांची पापे नाहीशी होतात. परंतु स्मृतिकारांनी आपल्या स्मृतींमध्ये सांगितले आहे की कितीही भयंकर, नीच प्रकारची पापकर्मे केली तरी ब्राह्मणाला दान दिले की सर्व पापातून मुक्ती मिळते. म्हणजे द्या दान व्हा पुण्यवान ! त्यावेळी बुद्धिजीवी वर्गाच्या उपजीविकेचे साधन म्हणजे अशी ही दाने होती. त्यामुळे अनेक प्रकारची पर्वे आणि धार्मिक समारंभ, सण यामध्ये अधिकाधिक दान मिळवण्यासाठी अहिंसा त्यांना कवचासारखी उपयुक्त ठरली. ती त्यावेळच्या ब्राह्मणांची चूक नव्हती; तर त्यावेळची परिस्थिती तशी होती.

या दुसऱ्याच्या आधाराने जगणाऱ्यांनी एकीकडे अहिंसेवर भर दिला, तर दुसरीकडे आपल्या मांसाहाराची तजवीजही करून ठेवली. त्यासाठी त्यांनी हिंसा उचित ठरवली. अहो हिंसा किंवा अहिंसा यांच्याशी खरे पाहता त्यांचा काही संबंधच नव्हता. संबंध होता फक्त दान मिळवण्याशी. मग ते दान हिंसेने मिळो की अहिंसेने! मंत्र म्हणून प्राण्याला कापले गेले की ते देवभोजन झाले. ती अहिंसाच आहे हिंसा नव्हेच. मात्र मंत्रशिवाय प्राण्याला कापले की मात्र ती हिंसा ठरते. ते आसुरीभोजन समजले जाते. अहो मंत्रांशी

तरी काय संबंध ! संबंध फक्त मंत्र म्हणणाऱ्याला दक्षिणा मिळवण्याशी असतो. मंत्रांमध्ये काय म्हणायचे ? 'स्वर्गम् गच्छेत्' असे केवळ म्हणण्याने मरणारा पशू खरोखर स्वर्गात जाऊन पोहचतो का ? असे तर पोपनी पण केले. 'अछिद्रमस्तु' म्हणण्याने यज्ञातील सर्व त्रुटी खरोखर भरून निघते का ? हिंसेचे समर्थन करण्याच्या नशेत असणाऱ्या त्यांना वैदिक यज्ञांमध्येदेखील हिंसा आढळून आली. व म्हणून त्यांनी त्याचे निराकरण करण्यासाठी सांगून टाकले की ''वैदिकी हिंसा हिंसा न भवति ।'' वेदामध्ये वर्णिलेली हिंसा ही हिंसा नाही. तर मग वेदांमध्ये हिंसा आहे ? याचा निर्णय महाभारतकारांकडूनच ऐका-

**सुरां मत्स्यान मधु मांसमासवं कृसरौदनम् ।**
**धूर्तै: प्रवर्तितं ह्येतन्नैतद् वेदेषु कल्पितम् ।। (शांतिपर्व १६५/९)**

महर्षी व्यासांचे असे म्हणणे आहे की, मांस व मदिरेची व्यवस्था तर मागून आलेल्यांनी केली. वेदांमध्ये अशा प्रकारची कल्पनाही नाही. त्या ऋचांचा अर्थ त्यांना समजू न शकल्यामुळे व मांसाहारही आपल्याला करता यावा या उद्देशाने स्मृतिग्रंथामध्ये यज्ञामध्ये कापण्यास योग्य असणाऱ्या पशुपक्षांची मोठी यादी दिली आहे. श्राद्धामध्येसुध्दा त्यांच्या मांसाचे तर्पण अधिक पुण्यदायक सांगितले गेले.

या वाईट रूढींची निर्भत्सना सनातनधर्मी महात्मा बुद्धांनीही केली आहे. आपल्या उपजीविकेचे भांडे फुटलेले पाहताच समाजात प्रभावी ठरलेल्या तथागतांना या बुद्धिजीवी लोकांनी भगवंताच्या दहा अवतारातील एक अवतार ठरवून टाकले आणि त्यांच्या संघात शिरून गेले. जसे त्यांचे संघठन मजबूत झाले तसे संप्रदायातही वाईट रूढी शिरल्या. आता ते म्हणू लागले की गौतम बुद्ध अवतारी पुरुष तर खरेच परंतु ते अवतार असुरांसाठी आहे. त्यांची शिकवणही आसुरांसाठी आहे. त्यांनी सांगितले की बुद्धांच्या शिकवणीमुळे भारतातील शस्त्राभ्यास बंद पडला. मौर्य साम्राज्याचे पतन झाले, बुद्धाच्या निवृत्तिमार्गी शिकवणुकीमुळे भारत अकर्मण्यवादी बनला. किती उलटी गोष्ट सांगितली पाहा की, त्या महापुरुषाच्या उपदेशामुळे भारत अहिंसावादी बनला आणि चीन हिंसक ! भारत अकर्मण्यवादी बनला व जपान कर्मठ!

आधुनिक भारतात अहिंसेचा प्रश्न अत्यंत गोंधळात टाकणारा ठरला आहे. कोणी म्हणतो जीवांची हत्या न करणे अहिंसा आहे- कोणी म्हणतो नम्रतेला अहिंसा म्हणावी,

कोणी म्हणे दया म्हणजे अहिंसा, कोणी वेळेच्या अपव्ययाला हिंसा म्हणतो तर कोणी म्हणतो आवश्यकतेपेक्षा अधिक गोष्टींचा साठा करून ठेवणे म्हणजे हिंसा होय. समाजातील एक वर्ग श्वासोच्छ्वासाने सूक्ष्म जीवजंतू नष्ट होऊ नयेत म्हणून तोंडावर पट्टी बांधत असतो. या प्रकारे अहिंसेच्या मूळाशी सजीवांना न मारण्याची भावना अधिक दिसून येते. आणि उत्तरोत्तर त्याचा विचार विस्तार आणि आत्यंतिक प्रयोग !

प्रश्न असा की अहिंसेचे औचित्य काय? जीवजंतूची हत्या का करू नये ? या प्रश्नाबाबतही अनेक मतभेद आहेत. कोणाचे म्हणणे असे की प्रत्येक जीवात भगवंत आहे. अहो, मग तर फार कठीण होईल. अहो, ईश्वर कुठे नाही ? सर्वत्र आहे. मग तर जीवन फार कठीण होईल. मग दही किंवा मध खाल्ल्याने हिंसा होणार नाही ? अहो, दह्यामध्ये करोडो कीटाणू असतात, एक वाटी दही खाल्ले तर लाखो कीटाणू आपल्या पोटात जातात. मग जर सर्वांत एकच परमेश्वर आहे तर काही जीवांची हिंसा लहान काही मोठी असे का ? कमीतकमी माणसा-माणसांत तर अंतर असता कामा नये. पण शुद्राला मारणे म्हणजे कुत्र्याला मारण्या बरोबर आहे. म्हणजे कुत्र्याला मारण्याने जेवढी हिंसा लागेल तेवढ्या हिंसेचे पाप लागेल, पण ब्राह्मणाला मारले तर शुद्राच्या तिप्पट पाप लागेल. जाणून बुजून मारल्यानंतर तर पापाला काही बंधनच नाही म्हणजे अगणित पाप लागेल. तुमच्या विचाराने देखील कोणाला त्रास होत असेल तर मग आपण आपल्या मुलालासुद्धा पथभ्रष्ट होण्यापासून वाचवायचे नाही ? चोर, डाकू, बलात्कारी व आततायी लोकांनाही लगाम घालायचा नाही ? मग काय त्यांच्यासमोर हात जोडून उभे राहावयाचे ? त्रास नाहीसा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातील कष्ट, उपाय, नाईलाजाने घडणारे मृत्यू ही काय हिंसा समजायची?

अहिंसेचा दुसरा पक्ष असे म्हणतो की ज्या वस्तू आपण उत्पन्न करू शकत नाहीत त्यांना नष्ट करण्याचा आम्हाला अधिकार नाही. जर तुम्ही कोणाला जीवन देऊ शकत नाही तर ते नष्ट ही करू शकत नाही. अन्न आणि वनस्पतींचे उत्पादन आपण वाढवू शकता, त्यांचा वंश (प्रकार) बदलू शकता. म्हणून त्यात हिंसा क्षम्य आहे. हीच गोष्ट मत्स्य-पालन व कुक्कुट-पाळणारे पण मानतात. अन्य सर्व पशु-पक्षांच्या उत्पत्तीमध्येपण ते बदल करू शकतात. शेतकरी लोक नांगरणी-कुळवणीमध्ये होणाऱ्या कीटकांच्या हत्येकडे लक्ष देत नाहीत. उलट कीटकनाशक औषधांचा वापर करून वाळवी वगैरे दिसणाऱ्या आणि न दिसणाऱ्या असंख्य कीटाणूंचा संहार करण्याचा अधिकार त्यांना

कोणी दिला ? त्यांच्या हातून होणाऱ्या या हिंसेने ते विचलितही होत नाहीत. उलट त्याच पिकाच्या रक्षणासाठी मग उत्पात करणारी वानरे आणि चरणाऱ्या गायींना हाकलून लावण्याच्या प्रश्नावर ते हिंसा आणि अहिंसेचा वाद घालत बसतात. देवी, मलेरिया सारख्या रोगांच्या कीटाणूंचा व मच्छरांचा नाश मोठ्या प्रमाणात केला जातो हे त्यांना दिसत नाही. ज्या सूक्ष्म कीटकांच्या हिंसेपासून दूर राहण्यासाठी समाजातील एक वर्ग नाकावर पट्टी बांधतो, व दुसरीकडे तशाच प्रकारच्या कीटकांना मारण्यासाठी अँटी-बायोटिक' औषधे बिनदिक्कतपणे खातात. चर्मउद्योग कशा प्रकारे चालतो याची तुम्ही कल्पना ही करू शकणार नाही. म्हणजे कातडी वस्तूंचा ते उपयोगही करतात व अहिंसेची चिंताही करतात. म्हणजे कशाला समजायचे अहिंसा ?

आता अहिंसेच्या समर्थनासाठी एकच तर्क उपयोगी पडेल. तो म्हणजे ज्या वस्तू मानव समाजाला उपयुक्त आहेत त्यांचे रक्षण म्हणजे अहिंसा समजावी व ज्या कमी उपयुक्त आहेत किंवा अनुपयोगी आहेत त्यांची उपेक्षा केली तरी चालेल. म्हणजे उपयुक्तता हा आधार झाला, अहिंसा नाही. पण जर उपयुक्तता आधार समजलो तर भिकारी, आंधळे, बहिरे, पांगळे किंवा भयंकर रोगग्रस्त रोगांमुळे जे समाजासाठी समस्या बनले आहेत अशा लोकांचे काय करावे ? वृद्ध मातापितांनाही अनुपयोगी समजायचे ? जर डॉक्टरची भावना उदास असेल तर म्हणतात की त्याने केलेली हिंसापण अहिंसाच होय. म्हणजे आता महत्व हिंसा किंवा अहिंसेचे नाही तर त्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या भावनेचे आहे. यामुळे असाध्य रोगाने तडफडणाऱ्या मनुष्यांना किंवा पशुंना सहज मरण द्यावे की नाही ? परिवार नियोजन किंवा भ्रूण-हत्या अहिंसेला अनुकूल आहे की प्रतिकूल ? फाशीची सजा उचित आहे की अनुचित इत्यादी प्रश्न आज विवादास्पद बनले आहेत. तेव्हा अहिंसा समजून घेताना आम्ही काही चूक तर करीत नाही ना ? अहिंसा काय आहे ? जर हीच अहिंसा असेल तर शेतकरी अहिंसेपासून वंचित राहतील. गृहस्थधर्मी लोकांनाही अहिंसेचे पालन करता येणार नाही. विदेशी लोकांची तर गोष्टच सोडा. मांसमच्छी खाणाऱ्या हिंदूनाही त्यातून बाजूला ठेवावे लागेल. मग हा आपला धर्म विश्वव्यापक होऊ शकणार नाही. अहिंसेची ही ही प्रचलित धारणा म्हणजे अहिंसा आहे का ?

खरी गोष्ट अशी आहे की यांपैकी कोणत्याही प्रश्नाचा संबंध अहिंसेशी नाही. यात दोष अहिंसेचा अर्थ बदलणाऱ्यांचा दोष आहे. ज्यांनी आम्हाला अहिंसेची देणगी

दिली आहे त्या आमच्या पूर्व ऋषींनी अहिंसेचा अर्थ काय सांगितला आहे ? अहिंसा शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग छांदोग्य उपनिषदात केलेला आढळतो. या उपनिषदातील तिसऱ्या अध्यायातील चौदाव्या खंडात सांगितले आहे की हे सर्व जग ब्रह्मरूप आहे. आणि ते विदित करण्यासाठी याच उपनिषदाच्या पंधराव्या खंडात प्राणापान यज्ञ आणि सोळाव्या खंडात समर्पणाबरोबर महापुरुषाची उपासना सांगितली आहे. सतराव्या खंडात सांगितले आहे की ''अथ यत्तपोदानमार्जवमहिंसा सत्यवचनमिति ता अस्य दक्षिणा: ।'' म्हणजे तप, दान, आर्जव, अहिंसा आणि वचन हीच यज्ञातील खरी दक्षिणा आहे.

यज्ञ पूर्ण झाल्यानंतर ही दक्षिणा अपेक्षित आहे. अहिंसा या आत्मयज्ञाची दक्षिणा आहे. म्हणजेच दान, अहिंसा, सत्य इत्यादी त्याच्या क्षेत्रातील वस्तू आहेत की ज्यामुळे तो आत्मयज्ञ केला जातो; आत्म्याला ज्यांनी जाणले जाते. 'ईक्षावास्यामिंद सर्वम्' ज्याने पाहिले आहे तोच सांगू शकतो. 'तत्त्वमसि', 'वसुधैव कुटुम्बकम्' चा उद्घोष तोच करू शकतो. चराचर जगातातील अंतिम ऐक्य-आत्मैक्य ज्याने स्वयं पाहिले आहे, अहिंसा त्याचीच वस्तू आहे. जर तोच सर्वत्र आहे, दुसरा कोणीच नाही मग विरोध कोणाशी, हत्या कोणाची ? हीच गोष्ट मानसकार सांगतात-

**उमा जे राम चरन रत, विगत काम मद क्रोध ।**
**जिन प्रभुमय दीरवहि जगत, केहि सन करहि विरोध ।।**

तोच शुद्ध अहिंसक आहे. परंतु ही स्थिती केव्हा प्राप्त होते ? जेव्हा 'विगत काम मद क्रोध'- म्हणजे जेव्हा काम-क्रोध-मद इत्यादी विकार नष्ट झाले आहेत, सर्वथा शांत झाले आहेत, ज्याला हे जग प्रभुमय दिसत आहे अशा साधकासाठी अहिंसा आहे. अशा भक्तासाठी अहिंसा आहे. अहिंसा पालन नाही- ती आचरण्यासाठी नाही; तर अहिंसा म्हणजे परिणाम आहे, दक्षिणा आहे. म्हणूनच ज्याने काम क्रोधादि विकारांवर विजय मिळवून आत्म्याला जाणले आहे तोच शुद्ध अहिंसक आहे. सदन कसाई मांसाहारी असूनसुद्धा अहिंसक होते. तसेच महाभारतातील धर्म-व्याध यांचाही यांतच समावेश होतो. मात्र जो काम-क्रोधादि विकारांचा दास आहे, संसार हे जग जो नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहे पण जोडीला स्वत:ला अहिंसावादी समजून जो दररोज मुंग्यांना पीठ खायला घालतो, ढेकूण सुद्धा मारीत नाही, अहिंसेच्या पालनासाठी जो फलाहार करतो

तरीही अशा माणसाची अहिंसा ही खरी अहिंसा नव्हे. तो एक देखावा आहे, तो एक प्रकारचा दांमिकपणा आहे. तो आत्मज्ञानाचा सूचक किंवा ज्ञानी मुळीच नसतो. हीच गोष्ट महाभारताच्या अनुशासन पर्वामध्ये आहे. भीष्माने युधिष्ठिरास समजवले की ''अहिंसा परमो धर्म:''। परम धर्म म्हणजे परमात्मा होय आणि त्याच्या परिघामध्ये अहिंसा समाविष्ट आहे.

याच गोष्टीची पुनरुक्ती तुलसीदास करीत आहेत - ''**परम धरम श्रुति विदित अहिंसा**'' श्रुती म्हणजे वेद आणि परमात्म्याच्या प्रत्यक्ष ज्ञानाचे नाव वेद आहे. त्या परमात्म्याला सर्वत्र पाहू शकणाऱ्या ऋषींचा मुख्य गुण अहिंसा आहे. त्यांचे आचरण, त्यांची राहणी म्हणजे अहिंसा आहे. असे तत्त्वदर्शी लोकांनी यजुर्वेदात सांगितले आहे की- ''**पशुन पाहि । गां मा हिंसी: अजांमांहिंसी । अविर्मा हिंसी: । इमं मा द्विपाद । मां हिंसी रेकशके पशुम् । मा हिंस्यात् सर्वभूतानि**'' 'पशुंचे रक्षण करा, गायींना मारू नका, बकऱ्यांना मारू नका, मेंढ्यांना मारू नका, दोन पाय असणाऱ्या प्राण्यांना मारू नका, एक खुर असणाऱ्या प्राण्यांना मारू नका. थोडक्यात कोणत्याही प्राण्याची हिंसा करू नका. व म्हणूनच ज्यांनी आपला आत्मा या सर्व प्राण्यांत पाहिला आहे त्यांची अनुभूती म्हणजे अहिंसा होय. एकत्वाची किंवा ऐक्याची अनुभूती आणि तज्जनित अहिंसा आत्म दर्शनामुळे होते; शरीरामुळे नाही. शरीर धारण करीत राहणे म्हणजे तर हिंसा आहे. जेथे पोहचल्यानंतर पुन्हा शरीर धारण करावे लागत नाही ती शुद्ध अहिंसा होय.

वेदांमध्ये प्रतिपादित धर्म यज्ञ हा मुख्य आहे. यज्ञाला वैदिक वाङ्मयात 'अध्वर' असेही म्हणतात. ध्वर म्हणजे हिंसा. अध्वरचा अर्थ अर्थातच अहिंसा असा होतो. या यज्ञाचे आचरण म्हणजे अहिंसाचारण आहे. आता कोणता यज्ञ केला जात असे की जो करणे म्हणजे अहिंसा आहे ? महाभारतातील अनुशासन पर्वामध्ये संकेत आहे -

**श्रूयते हि पुरा कल्पे नृणां ब्रीहिमय: पशु: ।**
**येनायजयन्त यज्वान: पुण्यलोक परायणा: ।। ११५/५६**

म्हणजे पूर्वी कल्पांमध्ये पुण्यवान व तत्पर असणारे असे यज्ञकर्ते ब्रीहिमय पशुंचा यज्ञात उपयोग करीत असत. हे ब्रीही म्हणजे काय ? तर ब्रीही म्हणजे साळ भात असा अर्थ आहे. मग तीळ, जव व साळ यांनी यज्ञ करीत होते ? वेदी बनवून ? नाही. अथर्व

वेदाचे ऋषी म्हणतात **''प्राणापानौ ब्रीहियवौ अनड्वान प्राण उच्यते।।''** ब्रीही आणि यव हे क्रमश: प्राण व अपानाला म्हटले आहे. अनड्वान हेदेखील प्राणाचेच नाव आहे. म्हणजे ते यज्ञ प्राण-अपान किंवा श्वास-प्रश्वासावर आधारित होते. आणि गीतेमध्ये श्रीकृष्ण सांगतात की याच यज्ञाचा परिणाम म्हणजे सनातन ब्रह्मप्राप्ती होय. **''यज्ञशिष्टामृत भुजौ यान्ति ब्रह्मन सनातनम् ।''** ब्रह्माची प्राप्ती झालेला महापुरुष सर्वत्र आपल्या आत्म्याला पाहून अहिंसे विषयी बोलत असेल तर त्यात आश्चर्य काय ? श्वास प्रश्वासाचा यज्ञ करणाराच वेदाच्या भाषेत शुद्ध अहिंसक आहे.

म्हणूनच पराकाष्ठेची अत्युच्य अशी अहिंसा ही सर्वत्र आत्मदर्शन करणाऱ्या तत्त्वदर्शी लोकांच्या क्षेत्रातील गोष्ट आहे. तसेच जे प्राण-अपानाचा यज्ञ करतात, जे या अध्यात्माच्या मार्गातील पथिक आहेत, ज्यांची ईश्वराच्या ठिकाणी अत्यंतिक निष्ठा आहे असे लोकसुद्धा तिचा आंशिक उपयोग करू शकतात. ज्यांनी त्या मार्गाचा कधी उपयोगच केला नाही त्यांच्यासाठी अहिंसेचा काय उपयोग ? ज्यांनी वैद्यकीय क्षेत्रात पाऊलही टाकले नाही त्याला ऑपरेशन बॉक्स सोपवल्यानंतर जो परिणाम होईल तोच परिणाम अहिंसेच्या बाबतीत आज सुरू आहे. जो नपुंसक आहे त्याला लग्नमंडपाचा किंवा मुडावळ्यांचा उपयोग काय ?

हीच गोष्ट योगाबाबत घडत आहे. दर्शनकारांचा तोच अनुभव आहे. योगाच्या नावावर न जाणो लोक काय काय करतात ? परंतु भगवान श्रीकृष्ण म्हणतात (गीता अध्याय ६ वा तेविसावा श्लोक) की, या संसाराच्या संयोग व वियोग विहीन अशा अनन्त आनंदाशी मिलन म्हणजे योग होय. महर्षी पातंजली हाच योग सांगतात ''योगाश्चितवृत्ति निरोध:'' चित्तवृत्तींचा निरोध होणे म्हणजे योग होय. पण चित्तवृत्तीचा निरोध होण्याने लाभ काय ? यावर ते म्हणतात 'तदा द्रष्ट: स्वरूपेऽवस्थानम्'। त्यावेळी द्रष्टा आपले शाश्वत स्वरूप जो परमात्मा त्यामध्ये स्थिर होतो. त्या परमतत्त्वापर्यंतचे जे अंतर कापण्याचा जो साधनक्रम त्याची आठ अंगे आहेत - यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी. याला अष्टांगयोग असे म्हणतात. यात यमाची पुन्हा पाच अंगे आहेत - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या प्रकारे योगाच्या आठ अंगां पैकी एका अंगाचे उपांग आहे अहिंसा. मग ज्याने योगमार्गावर अजून एक पाऊलपण टाकले नाही त्याला अहिंसेचा काय उपयोग ?

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने हेच सांगितले आहे की अर्जुना असत् वस्तूचे अस्तित्त्व नसते आणि सत्य वस्तूचा तिन्ही काळात अभाव नसतो. आत्माच सत्य आहे, परमसत्य आहे, अशीर्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे. तो नेहमी राहणारा आहे, त्याचा कधी अभाव नसतो पण प्राणिमात्रांचे शरीर नाशवंत आहे, त्याला अस्तित्वच नसते.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायातच श्रीकृष्णांनी म्हटले आहे ''वासांसि जीर्णानि यथा विहाय'' - म्हणजे जुन्या वस्त्रांचा त्याग करून मनुष्य ज्याप्रमाणे नवे वस्त्र धारण करतो. त्या प्रकारे प्राणिमांत्रांचा स्वामी जो जीवात्मा तो शरीररूपी वस्त्राचा त्याग करून दुसरे नवीन शरीर धारण करतो. शरीर एक वस्तू आहे. जर आपल्यावर कोणी हल्ला केला तर आपण आपले वस्त्र पकडून ठेवल्याने आपले रक्षण होणार आहे का ? कधीच नाही. तसेच आमच्यात जे नश्वर आहे, अस्तित्वहीन आहे अशा वस्तूचे रक्षण करून ते सुरक्षित राहणार नाही. त्याला तर एक दिवस जावेच लागणार आहे, समजा बर्फाचा तुकडा हातावर ठेवला तर थोड्या वेळातच त्याचे पाणी होऊन जाईल. जमिनीत मिसळून जाईल. त्याचे नाव-निशाण राहणार नाही तर आपण त्याला कसे वाचवणार आहात ? आपले जगणे म्हणजे परस्परांतील दया आणि सहदयतेचे आदान-प्रदान आहे. संगठित आणि सुरक्षित राहून खाण्यापिण्याचे एक व्रत आहे, सामाजिक नियम आहे, अमूल्य मानव शरीराचे रक्षण करण्याची एक सुरक्षापद्धत आहे, ही अहिंसा नाही.

अध्याय तीन मध्ये योगेश्वर श्रीकृष्ण सांगतात तो मुढबुद्धि आणि अविवेकी आहे, पापायु आणि व्यर्थ जीवन जगणारा आहे, जो फक्त आपल्या शरीराचे पोषण करण्यासाठी धडपडतो. मग अहिंसा काय आहे ? यावर योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात हे अर्जुना, या निष्काम कर्मयोगाचे आचरण केल्याशिवाय ते शाश्वत सत्य ना कोणाला प्राप्त झाले ना भविष्यात ते कोणाला प्राप्त होईल. परंतु ज्यांनी आत्म्याला जाणले, जो आत्म्यामध्ये स्थित आहे आणि त्याच्यामध्ये ओतप्रत आहे त्या पुरुषाने कर्म केल्याने ना त्याला कसला लाभ होणार किंवा सोडल्याने ना त्याचे कसले नुकसान होणार. परंतु तरीही आपल्या मागून येणाऱ्यांसाठी ते महापुरुष आपले कर्म उत्तम प्रकारे करीत असतात. निष्काम कर्म म्हणजे चिंतन, आराधना. ते करीत तो आत्मदर्शनाकडे जात असतो.

कर्म करता करता साधना इतकी सूक्ष्म बनते की मनाच्या निरोधाबरोबर त्याला आत्म्याचे ज्ञान होते. त्यामुळे तृप्त झालेला तो त्यामध्येच स्थिर होतो, आत्मभावाने परिलूप्त होतो. अशा महापुरूषाने आता कर्म केले तरी त्याला त्यापासून काही लाभ

मिळत नाही किंवा कर्म करण्याचे सोडल्याने त्याचे काही नुकसान होत नाही कारण यापुढे आता दुसरी कोणतीही महासत्ता नाही की ज्याचा त्याने शोध घ्यावा. आता कर्म करून शोधायचे कोणाला ? आणि कर्म नाही केले तरी त्याचे आता कोणतेच नुकसान होणार नाही, कारण जे प्राप्त करायचे होते ते त्याने प्राप्त केले आहे. कायमचे त्याने ते प्राप्त केले आहे. तरीही अशा अवस्थेतील महापुरुष मागाहून येणाऱ्या अनुयायासाठी आपले कर्म चांगल्या प्रकारे करत राहतात.

अशा या महापुरुषांशी तुलना करून योगेश्वर श्रीकृष्ण स्वत:चा परिचय देताना म्हणतात की हे अर्जुना, तिन्ही काळामध्ये मलाही कोणत्याही प्रकारचे कर्तव्य किंवा कर्म करावयाचे कारण नाही, प्राप्त होण्यासारखे आता काहीही राहिलेले नाही तरीसुध्दा मागाहून येणाऱ्यांच्या हितासाठी मी माझे नियत कर्म उत्तम प्रकारे करत असतो. जर मी या प्रकारे सावधान होऊन वागलो नाही तर मी प्रजेला नष्ट करणारा-हनन करणारा ठरेन, आणि वर्णसंकराचा कर्ता ठरेन. अर्थात श्रीकृष्ण एक योगी होते, योगेश्वर होते, आत्मभावामध्ये परमतत्त्वामध्ये स्थित परमात्मास्वरूप होते. ते सांगतात की जर मी सावधपणाने माझे कर्म केले नाही, माझ्या मागुन येणाऱ्याकडून कर्म करवून घेतले नाही तर मी प्रजेचा हत्यारा ठरेन. वर्णसंकर करणारा (कर्ता) ठरेन.

जीवात्म्याचा शुद्ध वर्ण परमात्मा आहे आणि कर्माच्या द्वारेच त्याच्या स्वरुपाची प्राप्ती होणार आहे. जर महापुरुषांनी मागाहून येणाऱ्यांना योग्य मार्गावर चालवले नाही तर ते साधक आत्मपथावर घसरतील, ते प्रकृतीमध्ये गुरफटतील आणि हे मिश्रण म्हणजेच वर्णसंकर होय. ते साधक आत्मपथावरून घसरतील, च्यूत होतील हेच त्यांचे हनन आहे. आणि याचेच नाव हिंसा आहे आणि परमात्म्याच्या स्वरूपाकडे जाणे याचेच नाव शुद्ध अहिंसा आहे. खरे पाहता खरे अहिंसक तर ते महापुरुषच होत की जे तत्त्वामध्ये स्थिर असूनसुध्दा नियत कर्मे करून मागाहून येणाऱ्यांना योग्य मार्ग दाखवतात, योग्य मार्गावर चालवतात, सर्व भ्रान्ती दूर करून आत्म्याला जागृत करतात. आणि नंतर आत्मपथावर चालवतात. आणि असे हळूहळू चालत चालत साधक आपल्या स्वरूपाला जाणतो, आत्मस्थिती प्राप्त करून घेतो व असा जन्म मिळवतो की ज्याला पुन्हा मृत्यू नाही. हीच शुद्ध अहिंसा होय. शुद्ध अहिंसेचेच पालन तुम्ही केलेत तरी तुम्हीही अहिंसक बनाल. या प्रकारे महापुरुष सर्वांचे रक्षण करतात आणि साधकांना योग्य मार्गावर चालवतात. जर त्यांनी तसे केले नाही तर ते मारेकरी

ठरतील. याप्रमाणे श्रीकृष्णाच्या मते आपल्या स्वरूपाकडे जाणे आणि इतरांनाही तशी प्रेरणा देणे यालाच अहिंसा म्हणतात. आणि त्यातून च्यूत होणे याला हिंसा म्हणतात.

गीतेच्या सहाव्या अध्यायात योगेश्वर म्हणतात की हे अर्जुना, अरे आपला आत्मा हा आपला मित्रही आहे व शत्रूही आहे. ज्या पुरुषाकडून मनासहित सर्व इंद्रियांवर विजय मिळवला गेला किंवा त्यांना वश केले, अंकित केले तर त्याच्याबरोबर आत्मा मित्र बनून मित्रासारखा वागतो. त्याचे परम कल्याण करतो. पण जो पुरुष इंद्रियांना जिंकू शकत नाही, त्यांचा निरोध करू शकत नाही त्याच्यासाठी त्याचा आत्मा शत्रूसारखा आहे. तो त्याच्याशी शत्रूप्रमाणे वागतो. व म्हणून मनुष्याने स्वत:च स्वत:चा उद्धारकर्ता बनले पाहिजे. आपल्या आत्म्याचे त्याने अध:पतन होऊ देऊ नये. अधोगतीला जाणे, प्रकृतीच्या अनंत योनींमध्ये फेकले जाणे ही हिंसा होय आणि स्वत:चा उद्धार करणे म्हणजे आत्मभावाची प्राप्ती करून घेणे ही अहिंसा होय. तुलसीमानसाच्या मते - ''जो न तरै भवसागर, नर समाज अस पाइ । सो कृत निन्दक मन्दमति आत्माहन गति जाइ ।'' मनुष्य शरीर प्राप्त केल्यानंतर जो मनुष्य भवसागर पार करू शकत नाही तो मतिमंद होय, तो कृत निंदक आहे. तो काम करू शकत असला तरी तो आत्म्याचा हत्यारा आहे हिंसक आहे. भवसागर पार न करू शकणारा आपल्या आत्म्याचा हत्यारा आहे, ही आत्महत्या आहे, भयंकर हिंसा होय. भवसागर पार करणे म्हणजेच अहिंसा होय.

म्हणून योगेक्ष्वर श्रीकृष्णांच्या मते महापुरुषांनी आपल्या मागून येणाऱ्यांना आत्मपथावर चालवावे. छांदोग्याचे ऋषी यालाच आत्मयज्ञाची दक्षिणा समजतात. महापुरुषांचे हे कृत्य म्हणजेच सामूहिक अहिंसा आहे. प्रत्येक व्यक्तिचे हे कर्तव्य आहे की तिने आपल्या आत्म्याला अधोगतीला जाऊ देऊ नये. हीच व्यक्तिगत अहिंसा होय. त्याबरोबरच अहिंसेचे व्रत घेतलेल्या व्यक्तिने शेजाऱ्यांबरोबर अत्यंत सहृदयतेने व प्रेमाने जगावे. त्यामुळे तो देखील अहिंसेच्या मार्गावर चालायला लागेल व आपण त्याला चालवणारे ठराल.

बाह्य मारझोड, खून इत्यादी बाबत श्रीकृष्णाचे काय मत आहे ? त्यांचा काय दृष्टिकोन आहे ? यावर ते म्हणतात (गीता- अध्याय-१८ वा) अर्जुना शुभ अथवा अशुभ अशी प्रत्येक गोष्ट (कार्य) घडण्यामध्ये पाच माध्यमे (कारणे) काम करीत

असतात.- कर्ता हे मन असते, इंद्रिये ही त्या कार्याचे कारण असतात, तसेच निरनिराळे व्यापार, प्रयत्न हे आधार अर्थात साधन (कारण व्यापार अनेक असतात परंतु त्या इच्छा पूर्तीसाठी आधारही आवश्यक असतो) आणि पाचवे कारण म्हणजे दैव हे होय. दैव म्हणजे प्रारब्ध, संस्कार, पूर्वीचे केलेले कर्म. शुभ अथवा अशुभ कर्म घडण्यामध्ये ही पाच कारणे असतात. मग तुम्ही शाश्वत परमात्म्याकडे जात असाल किंवा प्रकृतीच्या मायाजालाकडे जात असाल- त्या सर्व कर्मांमागे ही पाच कारणे आहेत. असे असूनदेखील जो मूढबुद्धी कैवल्यस्वरूप परमात्म्याला कर्ता समजतो, त्याला तसे म्हणतो तो अज्ञानी यथार्थाला जाणत नाही असेच म्हणावे लागेल. याच्या पुढच्याच श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात की, हे अर्जुना, जो पुरुष या पाच कारणांना चांगल्या प्रकारे जाणतो त्याने या जगातील मनुष्यांना ठार मारले तरी तो मारेकरी होत नाही किंवा त्या पापाने तो बध्दही होत नाही तसेच आपल्या कर्माने बांधलाही जात नाही.

याप्रमाणे योगेश्वर श्रीकृष्णांच्या मते बाह्य मारझोड, खून इत्यादी गोष्टी म्हणजे केवळ सामाजिक समस्या होत, बदल्याची भावना आहे, शांती आणि व्यवस्थेचा प्रश्न आहे. समाजामध्ये जो संघटित राहील तो सामर्थ्यवान असतो व जो फटकून वागतो तो दुर्बल असतो. जो संशोधक आहे, बुद्धिजीवी आहे तो बलवान असतो आणि जो फक्त शारिरिक बलाला सामर्थ्य समजतो तो दुर्बल असतो. भीमाजवळ शारीरिक बळ होते परंतु अनेक प्रसंगी बुद्धिमान युधिष्ठिरानेच त्याला वाचवले. अर्जुनाने पण त्याला वाचवले कारण त्याच्याजवळ दिव्यास्त्र होते, बुद्धी होती. चक्रव्यूह फोडण्याचे तंत्र अभिमन्यूला होते त्यामुळे तो चक्रव्यूहाच्या सातव्या वर्तुळापर्यंत जाऊन पोहचला, परंतु स्वतःच्या बाहुबलावर भरोसा असणारा भीम आपली गदा नुसती फिरवत राहिला. जेथे शारीरिक सामर्थ्याबरोबर बुद्धिचीही साथ असते, संगठन असते, तोच अधिक बलवान असतो. आणि जेथे या उलट असते जेथे फूट अधिक असते तो गुलाम असतो. आफ्रीकेमध्यें विविध संघटना अधिक आहेत, त्यामुळे फूटही अधिक आहे. त्यामुळे तो देश आजही गुलामीचे दु:ख भोगत आहे. सारांश संघटन अपेक्षित आहे.

येथे योगेश्वर श्रीकृष्णांचे म्हणणे आहे की बाह्य मारझोड ना पाप आहे ना पुण्य. ते एक सामाजिक दायित्व अवश्य आहे. एक दुसऱ्यांसाठी सहृदय व दयाशील झालेच पाहिजे. आणि जो तुमचे काही नुकसान करीत नाही त्यांची अकारण हत्या तुम्ही कशाला

कराल ? पशुंपासून वेगळे राहून या मानव समाजाने अजूनपर्यंत एवढी सभ्यता शिकली आहे तेव्हा परस्पर सहाय्यता केलीच पाहिजे. अशा सहाय्यते मुळेच ''लोक लाहु परलोक निबाहू'' उभयपक्षी विकास होतो.

परंतु भौतिक समृद्धीदेखील शाश्वत शांती देऊ शकत नाही. जन्म, मृत्यू, जरा व्याधी, दु:ख आणि दोषांमुळे व्यथित झाल्यानेच आमचे पूर्वज शाश्वत आनंदाच्या शोधात निघाले आणि जेव्हा त्यांनी शाश्वताचा शोध लावून ते प्राप्त केले तेव्हा ते स्वत:पुरते सीमित न ठेवता सर्वत्र त्याचा प्रचार व प्रसार केला. त्यासाठी ते अधीर बनले - ''पाप दु:ख द्रवहि संत सुपुनीता'' मनुष्यामध्येच परमात्म्याच्या शोधाची अधिक क्षमता पाहून ऋषींनी त्यांना सर्वश्रेष्ठ स्थान दिले- ''न हि मुनुष्यात् श्रेष्ठतरं हि किंचित् ।'' दगड, पाणी, गाय, बकरी काही ही मनुष्यापेक्षा श्रेष्ठ नाही. म्हणूनच कुशल ऋषींनी स्वत: कष्ट सहन करून मनुष्यांपर्यंत पोहोचणे, त्यांना शिकवणे, स्मरण करून देणे तसेच त्यांची सुरक्षा व सेवा या गोष्टीही त्यांनी अहिंसेत समाविष्ट केल्या. कारण जर मनुष्य जिवंतच राहिला नाही तर अहिंसेच्या मार्गावर, आत्मोद्धाराच्या पथावर चालेल कोण ? आत्मोद्धारासाठी त्यांनी शरीररक्षा, परस्पर सहयोग आणि सहृदयता यावर भर दिला. असो शरीराचे रक्षण आवश्यक आहे; परंतु ते म्हणजे अहिंसा नव्हे.

एकदा भ्रमण करता करता आम्ही नैमिषारण्यात गेलो. तेथे एक हत्याहरण कुंड आहे, तेथे आठ-दहा मुली सुंदर वस्त्र परिधान करून पान चघळत पलंगावर बसल्या होत्या. लोक कुण्डात स्नान करून, त्या मुलीचे चरणस्पर्श करून व त्याच्यापुढे दक्षिणा ठेवून पापंमुक्त होत होते. जवळपास पण्डे फिरत होते, लोकांना बोलवत होते, काही लोक दूर उभे राहून तमाशा बघत होते. तेवढ्यात जाडजूड असे काही पुरोहित आमच्याकडे आले व म्हणाले, ''इकडे या । या कुण्डात स्नान करून त्या कन्यांचा चरणस्पर्श घेऊन या आणि जन्मभराच्या सर्व पापांपासून मुक्त व्हा । आम्ही त्यांना म्हणालो- ''अरे बाबा आम्ही तर कोणाची हत्या केलेली नाही''. ते त्यावर म्हणाले. ''वा ! असे कसे होऊ शकते ? तुम्ही नैमिषारण्यामध्ये पायी फिरत आहात. तुमच्या पायाखाली कितीतरी कीडे व मुंग्या तुडवल्या गेल्या असतील व मेल्या असतील याची तुम्हालाही कल्पना नाही. अहो, हत्येपासून कोण मनुष्य वाचला आहे !'' आम्ही त्यांना खड्या आवाजात सुनावले- ''अरे बाबा त्या मुंग्या मेल्या त्यांच्या मरणाने ! आम्ही तर त्यांना मुद्दामहून मारले नाही किंवा आम्ही जाणूनबुजूनं त्यांच्यावर पाय ठेवला नाही. परमेश्वराने स्वत:

त्यांच्याकडे जाण्यास मला प्रेरणा दिली असेल. कारण ‘‘हानि-लाभ, जीवन-मरण, यश-अपयश विधि हाय ।’’ ही तर त्या विधात्याची व्यवस्था आहे. त्यात आम्ही काय करू शकतो ? ज्याचा जेव्हा नंबर लागतो तेव्हा तो जाणार हे ठरलेले आहे. प्रत्येक शरीर कोणत्या कारणामुळे नष्ट होणार आहे हे प्रथमपासूनच नियत असते, नक्की असते मग मुंग्यांचे हे अकाल मरण कसे काय ? अरे बाबा जोपर्यंत काळ येत नाही तोपर्यंत कोण मरणार ? मग तर जगातील अधिकांश महापुरुष अकाली मेले असे म्हणावे लागेल.

परंतु ते पण्डे ऐकायला व आमचे म्हणणे कबूल करण्यास तयार नव्हेत. त्यांचा हेतू फक्त आमच्याकडून दक्षिणा उकळणे हाच होता. कारण ते पुढे म्हणाले, ‘‘ठीक आहे स्नान करू नका. पण कन्याकाचा चरणस्पर्श तर घ्या’’ आम्ही म्हटले, ‘‘आमच्या गुरू महाराजांनी याच गोष्टीला मनाई केली आहे. कारण त्यांच्या मते जो स्त्रीचे दर्शन करतो, संभाषण करतो, तिला स्पर्श करतो, तिचे स्मरण करतो तो संन्यासी एक दिवस संन्यासी राहणार नाही. स्पर्श करू तर मनामध्ये कोणत्याही प्रकारची हत्या तर होणारच. तेव्हा क्षमा करा’’ तेव्हा ते पण्डे लगेच तोंड फिरवून दुसरीकडे गेले. आणखी आपल्या ग्राहकांना आम्ही फोडू नये म्हणून त्यांनी आमचा नाद सोडला. तेव्हा नश्वर शरीराचे रक्षण करणे म्हणजे अहिंसा नाही तर आत्म स्वरूपाचे रक्षण करणे म्हणजे अहिंसा होय. आत्म्याला अधोगतीकडे नेणे म्हणजे हिंसाच होय.

काय खावे आणि काय न खावे ? यावर श्रीकृष्ण म्हणतात, ‘अर्जुना, भोजन तीन प्रकारचे असते. आयुष्य, बुद्धी, बल, आरोग्य, सुख आणि प्रीती वाढवणारे, रसयुक्त सुंदर आणि स्थिर राहणारे तसेच स्वभावामुळेच हृदयाला प्रिय वाटणारे भोजन सात्त्विक पुरुषाला प्रिय असते; कडू, आंबट, फरसाण, अत्यंत गरम, तिखट, रुक्ष, दाहकारक’ आणि रोग उत्पन्न करणारा आहार राजसी पुरुषांना प्रिय असतो. तर जे भोजन एक प्रहर म्हणजे तीन तासांपूर्वी बनवलेले आहे ‘गतरस’- रसरहित, दुर्गंधयुक्त, शिळे, उष्टे आणि अपवित्र आहे ते तामसी पुरुषाला प्रिय असते. अर्जुना या जगामध्ये भोजन तीन प्रकारचे असते. प्रत्येकाच्या स्वभावानुसार ते ते भोजन त्याला प्रिय असते. त्यांनी असे सांगितलेले नाही की कांदा खाऊ नका लसूण खाऊ नका.

जेथे हृदयाला आवडण्याचा प्रश्न आहे तेथे काही प्रदेशानुसारही विशिष्ट आवड ठरलेली असते, जसे बंगाली लोकांना मासे, मद्राशांना भात, पंजाब्यांना रोटी, युरोपियन्सना

बीफ, अरेबियन्सना दुम्बा आणि सर्व सामान्य भारतीयांना भाज्या प्रिय असतात. विकासोन्मुखी बुद्धीमध्ये विदेशी लोक मागे नाहीत. आरोग्य आणि दीर्घ आयुष्याच्या बाबतीत त्यांचा विश्वस्तर अधिक उच्च प्रतीचा आहे आणि गीतेच्या अनुसार आयु, बल आणि बुद्धी वाढवणारा प्रत्येक भोज्य पदार्थ सात्त्विक आहे. ज्या आहारात उपर्युक्त गुण आहेत तो आहार स्वीकारावा.

योगेश्वर श्रीकृष्णाचा हेतू फक्त एवढाच आहे की समाजात राहण्यासाठी व भगवद् भक्तीसाठी सुदृढ शरीर आवश्यक आहे. प्राचीन योगी यासाठीच आसने करीत होते, बुद्ध सम्यक् व्यायामाला योगाचे आवश्यक अंग समजत होते आणि श्रीकृष्णांनीसुद्धा व्याधीमुक्त शरीर ठेवून भक्तीमध्ये लागण्यासाठी युक्त आहार-विहारावर भर दिला आहे. ते म्हणतात- हे अर्जुना, पुष्कळ खाणाऱ्याकडून किंवा काहीच न खाणाऱ्याकडून हा योग सिद्ध होत नाही, केला जात नाही. अधिक भोजनाने आळस येतो, झोप येते कधी कधी नशाही चढते. तर भोजन घेणे सोडून दिल्याने म्हणजे कडक उपवासाने इंद्रिये शिथिल होतात, चिंतनाला बसण्याची क्षमता राहत नाही. तेव्हा चिंतनाला सहाय्यक ठरेल तशा प्रकारचा आहार घ्यावा.

आहारातील हे तथ्य समजल्यामुळेच गौतम बुद्धादी महापुरुषांनी अहिंसेवर भर दिला; परंतु आहारा-बाबत कडक नियम बनवले नाहीत. त्यांचा चुलत भाऊ देवदत्त याने त्यांना विचारले ''भद्र, तुम्ही अहिंसेचे पूजक असूनही भोजनाबाबत कडक नियम का बनवत नाही ?'' भगवान बुद्ध म्हणाले, ''मी आहाराबाबत कडक नियम करू शकत नाही. कारण तुम्हां श्रीमंतांच्याप्रमाणे गरीब लोक पौष्टिक आहार घेऊ शकत नाहीत त्यांना, चिमण्या, होले, मासे असे मिळू शकते. ते खाऊन ते आपली भूक भागवतात, जिभेची आवड पुरी करतात. जर आहाराबाबत मी कडक नियम बनवले तर ते बिचारे उपाशी मरतील.'' तेव्हा देवदत्ताने पुन्हा प्रश्न विचारला, ''भगवन, मग भिक्षूंनी कोणत्या प्रकारचे भोजन घ्यावे ?'' यावर बुद्धांनी उत्तर दिले, ''जे गृहस्थाच्या घरी शिजले जात आहे तेच अन्न भिक्षूंनी घ्यावे. त्यांच्यासाठी वेगळी अशी काही व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही. अशी सोय करायला गृहस्थांना कष्ट पडतील. घरातील परिस्थिती चांगली नसेल तर भिक्षू त्यांना ओझे बनतील.''

देवदत्ताचे अद्याप शंकानिरसन झाले नव्हते. बुद्धांचे सांगणे व वागणे यात किती अंतर आहे. त्याची परीक्षा घेण्याचे त्याने ठरवले. आणि एक दिवस त्यांना डुकराचे

मांस खायला छातले. या भोजनाने ते आजारी पडले. त्यांचा शरीरान्त झाला कारण अशा प्रकारचे भोजन त्यांनी यापूर्वी कधी घेतलेच नव्हते. तेव्हा तात्पर्य असे की काय खावे आणि काय खाऊ नये याच्याशी अहिंसेचा काही संबंध नाही.

अर्थात, याचा अर्थ असा नाही की, जे काहीही मिळेल ते उदरस्थ करावे ! ज्यांच्याजवळ निष्ठा नाही जे अश्रद्ध आहेत त्यांचे आचरण आदर्श नसते. तेव्हा महापुरुषांच्या आचरणाचे अनुकरण करू नका ते जे सांगतात त्याचे आचरण करा. पूज्य महाराजश्रींच्या जीवनातील एक घटना येथे उधृत करावीशी वाटते. ते एकदा दिगंबर अवस्थेत मुंबईच्या गल्ली-बोळातून जात होते. लोक अजून निद्रावस्थेत होते. सकाळ अजून झाली नव्हती. एक स्त्री दुसऱ्या मजल्यावरून सडकेवर काही फेकणार होती. तेवढ्यात तिची नजर महाराजाच्यावर पडली. ती त्यांना म्हणाली, ''बाबाजी, परोठे घेणार का ?'' महाराजांनी विचार केला न मागता मिळत आहे. हीच दूध-भिक्षा आहे. ते थांबले. ती स्त्री खाली आली आणि तिने भिक्षा महाराजांना दिली. मऊ लुसलुसीत परोठे आणि त्यावर अळकुडी सारखी भाजी ।

चिंतनात लीन असणाऱ्या महाराजांनी एक घास तोंडात घातला आणि ते चमकले. माशांसारखा स्वाद ! लहान असतांना ते मच्छी खात होते. त्यामुळे ही भाजी म्हणजे मच्छी आहे हे लगेच त्यांच्या लक्षात आले. विचार करू लागले की साधूने मांस व मदिरेचे सेवन करता कामा नये. परंतु न मागता भिक्षा त्या स्त्रीने दिली आहे. एक प्रकारे ही दूधाभिक्षा आहे. आणि न मागता जे मिळते त्याचा त्यागही करता कामा नये. आम्ही तर मागयलाही गेलो नव्हतो. तर मग देवाने आम्हांला हे का दिले ? हे अन्न खाऊ की फेकून देऊ ? मनाला एकदा वाटत होते की फेकून द्यावे हे अन्न, तर दुसऱ्यांदा मनात येत होते की न मागता भिक्षा मिळालेली फेकायची कशी ? या द्विधा विचारात कित्येक मैल ते चालत पुढे गेले. तोंडात घातलेला घास अद्याप तोंडातचं होता. शेवटी महाराजांनी ते अन्न फेकून दिले. आणि एक नळावर तोंड धुऊ लागले. इतक्यात शेजारीच पानाचे दुकान होते. तो पानवाला महाराजांना म्हणत होता, 'महाराज, पान घ्या'. महाराजांनी पान घेतले आणि पुढे निघाले त्यांचे तोंड शुद्ध झाले.

आम्ही महाराजांना विचारले की, महाराजश्री, पण आपल्याला भिक्षेत मच्छी का मिळाली ? महाराज म्हणाले, एक दिवस रेल्वेने मुंबईला चाललो होतो बाजूलाच एक मुसलमान बसला होता. तो मासे खात होता. माझ्या मनात विचार आला की मासे

खाण्याची ही खरी पद्धत, असे पकडायचे व असे खायचे ! भगवंताना समजले की चिंतन सोडून मच्छीचा विचार करीत आहे म्हणून भगवंतानी भिक्षेत मच्छी देवऊन त्यापासून मनाला निवृत्त केले.

ज्याने घरदार सोडून जो संत झाला आहे त्याने सतत चिंतनपरायणच राहिले पाहिजे. मांस मदिरा त्यांच्या कामाची नाही. एक दिवस महात्मा बुद्ध आपल्या शिष्यांसह एका गावाजवळून चालले होते तेव्हा गावकऱ्यांनी त्यांना सांगितले, ''महन्त, आपण या मार्गाने जाऊ नका. कारण त्या मार्गावर एक मोठा सर्प राहात असून जवळ जवळ पाचशे जणांना तो चावला आहे. ते सर्वजण मरण पावले आहेत. आम्ही लोकांनी तर त्या रस्त्याला जायचे सोडून दिले आहे. परंतु ज्यांना माहीत नाही ते त्या रस्त्याने जातात व बिचारे मृत्युमुखी पडतात.'' बुद्ध त्याच गावात थांबले.

महात्मा बुद्धांचा एक शिष्य पूर्वी गारुड्याचा व्यवसाय करणारा होता. तो गुपचूप त्या रस्त्याने पुढे गेला. गावकऱ्यांचे लक्ष जाताच त्याला त्या रस्त्याने जाऊ नकोस असे सांगितले. तेव्हा तो उत्तरला. ''घाबरू नका, मी नागाला वश करण्याची कला जाणतो.'' तेव्हा लोकांनी त्याला त्या रस्त्याने जाऊ दिले. पावलांचा आवाज ऐकताच फुत्कार टाकीत सर्प बाहेर आला. सापाला पाहताच भिक्षूने सर्प-विद्येचा त्याच्यावर प्रयोग केला. साप एकदम शिथिल पडू लागला. शेवटी भिक्षूने त्याला पकडले. त्याचे दांत तोडले, त्याच्या तोंडातील विषग्रंथी काढून टाकली आणि सापाच्या कातीप्रमाणे सापाला जमिनीवर फेकून दिले.

गाववाले अत्यंत प्रभावित झाले. ''महाराज, आमचे खूप मोठे संकट तुम्ही दूर केलेत. आम्ही आपली कोणती सेवा करू ते सांगा. आपल्याला काय खायला देऊ ? भिक्षू म्हणाला, जर तुम्ही माझ्यावर खरोखर खुश असाल तर मला द्राक्षाची दारू द्या.'' लगेच दारूची व्यवस्था करण्यात आली. सर्वांनी दारूची फक्त चव घेतली, परंतु त्या भिक्षूने मात्र खूप दारू प्यायली आणि शेवटी बेशुद्ध होऊन पडला. इतर भक्तांनी त्याला उचलून बुद्धांच्याजवळ आणले. त्याचे डोके बुद्धांच्या चरणाशी ठेवून त्याला झोपवले आणि बुद्धांना म्हणाले, ''महंत, याने नागाला वश तर केले; पण अधिक दारू प्यायल्याने तो बेहोश झाला आहे''. हे शब्द कानावर पडताच तो भिक्षू आवेशाने उठला; परंतु दुसऱ्याच क्षणी आपले पाय बुद्धांच्या चरणाशी टेकून पुन्हा बेभान झाला.

तेव्हा गौतम बुद्धांनी विचारले, ''काय, ज्याने नागाला वश केले तो हाच भिक्षू आहे ?'' ''महंत, अशा अवस्थेतपण तो नागाला वश करू शकेल का ?'' बुद्ध उत्तरले, ''नाही, शिष्यगण, जर तो नाग अशा अवस्थेत त्याच्या जवळ आला असता तर याची काय स्थिती झाली असती ?'' ''महंत, मग तर तो मेलाच असता'' तेव्हा बुद्ध म्हणाले, ''शिष्यानो, म्हणून तर मी 'तुम्हाला मांस आणि मदिरेचे सेवन वर्ज्य करायला सांगितले आहे. मांस व मदिरेच्या सेवनाने स्मृतिभ्रंश होतो आणि स्मृती हे तर मानवाचे कवच आहे. स्मृतीमुळे तर तो उठू शकतो बसू शकतो, चिंतन करू शकतो. स्मृतीमुळे तो फसू शकत नाही. स्मृतीमुळेच तो स्वत:ची प्रगती करू शकतो. मांस व मदिरेच्या सेवनाने मनामध्ये विपरीत विचार येतात आणि म्हणूनच चिंतनपरायण लोकांसाठी मांस व मदिरा सेवन मी निषिद्ध मानले आहे. मांस-मदिरा सेवन करणं म्हणजे पाप किंवा पुण्य किंवा हिंसा किंवा अहिंसा नाही.

पूज्य महाराजही याविषयी एक गोष्ट सांगत असत. एक महात्मा होते. जीवनभर त्यांनी फक्त भजनच केले होते. त्यांच्या झोपडीसमोर एक तलाव होता. जेव्हा त्यांची अंतिम घटका जवळ येऊन ठेपली तेव्हा त्यांनी पाहिले की एक बगळा मासे पकडत आहे. त्यांनी बगळ्याला उडवून लावले. नंतर लगेचच ते मरण पावले व ते नरकात गेले. त्यांच्या शिष्याच्या स्वप्नात ते आले आणि त्याला म्हणाले- ''बेटा, जीवनभर आम्ही फक्त भजन केले. दुसरे काहीही पाप केले नाही''. फक्त अंतिम समयी बगळ्याला उडवले व त्यामुळे आम्हाला नरकवास भोगावा लागत आहे.

जेव्हा शिष्याची अंतिम घटका जवळ आली तेव्हा तेच दृश्य पुन्हा समोर आले. बगळा मासे पकडत होता. गुरूच्या सूचनेप्रमाणे त्याने बगळ्याला उडवले नाही; पण मेल्यावर तोही नरकात गेला. नरकात जाताना त्याने गुरुबंधूला ओरडून सांगितले की, गुरूनी बगळ्याला उडवले म्हणून त्यांना नरकात जावे लागले; मी बगळ्याला उडवले नाही म्हणून नरकात जात आहे तेव्हा सावध राहा.

गुरुबंधूची जेव्हा अंतिम घटका आली तेव्हा संयोगवशात पुन्हा बगळा मासे मारताना दिसला. तेव्हा गुरुबंधूने भगवंताला नमस्कार करून म्हटले, भगवन्, आपण माशामध्येही आहात आणि बगळ्यामध्येही आहात. आम्हांला माहीत नाही की यात काय खोटे आहे आणि काय खरे आहे ? पाप कशात आहे ? आणि पुण्य कशात आहे ? भगवंता,

ते तुम्ही पाहा. मला तर फक्त आपल्या चिंतनात रस आहे. तेव्हा प्राणत्यागानंतर त्याला स्वर्गप्राप्ती झाली.

नारदांनी विचारले, ''भगवन, पण गुरु व शिष्य नरकात का गेले ? महात्माजींनी बगळ्याला उडवून काही पाप तर केले नव्हते'' भगवन म्हणाले, ''नारदा, त्या दिवशी बगळ्याचे भोजन मासेच होते. महात्म्याने त्याला उडवल्यामुळे भुकेने तडफडून बगळा मरण पावला म्हणून महात्म्याला नरकवास मिळाला कारण ''त्याच्या हातून पाप घडले'' नारदाने विचारले ''शिष्याने तर बगळ्याला नव्हते उडवले; मग तो का नरकात गेला ? '' त्यावर ते म्हणाले, ''त्या दिवशी बगळ्याचे पोट भरलेले होते. तो गंमत म्हणून मासे पकडत होता. त्या दिवशी खरोखर बगळ्याला उडवायला पाहिजे होते. शिष्याच्या हातून चूक झाली म्हणून त्याला नरकवास प्राप्त झाला.'' नारदांनी विचारले मग तिसरा ? भगवंत म्हणाले ''तिसरा माझ्या चिंतनात मग्न होता. सर्व जबाबदारी त्याने माझ्यावर टाकली. जे व्हायचे होते ते त्या दिवशी घडले; पण माझ्या चिंतनात अत्यंत मग्न राहिल्याने त्या चिंतनाच्या प्रभावाने तो माझ्याप्रत येऊन पोहचला'' म्हणूनच-

**पाप पुण्य की करे न आसा । सो पहुँचे रघुनायक पासा ।।**

पापपुण्याची चिंता न करता जो निरंतर माझ्या चिंतनात राहतो तो माझ्याप्रत येतो. भगवंताचे भजन हेच पुण्य आहे बाकी सर्व पाप आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

''यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधन:'' यज्ञाच्या व्यतिरिक्त जे काही कर्म केले जाते ते या लोकी बंधनकारक असते. या कर्मात खाणे पिणे सर्व काही येते. जर बंधनकारक काम करतच असता तर हत्येची चिंता कशाला ? नियत कर्म करा म्हणजे या भवबंधनातून तुमची सुटका होईल.

श्रीमद्‌भागवत महापुराणात म्हटले आहे की, सृष्टीतील सर्व जीव एक दुसऱ्याचा आहार आहे. हात असणाऱ्या प्राण्यांचा हात नसणारे प्राणी आहार असतात. पाय असणाऱ्यांचा पाय नसणारे प्राणी आहार असतात. या प्रकारे चराचर जगत हा एकदुसऱ्यांचा आहार आहे. दुर्बल सबलांचा आहार असतो. जो संगठित असतो तो सबल असतो व जो असंगठित असतो तो दुर्बल असतो. तेव्हा आपापसात फूट पडण्याची, वितुष्ट निर्माण होण्याची जी कारणे आहेत ती नष्ट करा, खांद्याला खांदा लावून म्हणजेच संगठित होऊन काम करा. शूरवीर बना. देशकालानुसार खाण्यापिण्याचा प्रश्न हा

बदलणारा असतो म्हणजे विशिष्ट देश, तेथील हवामान, पिके, वेळ, विज्ञान त्याप्रमाणे आहार ठरत असतो. लोक पूर्वी कच्चे मांस खात होते; परंतु आज ? हिमालयात फिरताना गरम पेयाची गरज भासते; तर वाळवंटातील रेतीच्या ढिगाऱ्यावरून फिरताना थंड पेयाची गरज भासते. हे निर्धारण म्हणजे सृष्टीची देणगी आहे. ही ना अहिंसा ना तिचा धर्माशी काही संबंध !

हां, राम-कृष्ण बुद्धादी महापुरुषांनी समाजाला आत्मिक-पथावर चालण्यासाठी सुधारण्याचे जे प्रयत्न केले तीही एक प्रकारची अहिंसाच होती. या चिंतनाच्या मार्गावर आंतरिक विकारांच्या बरोबर बाह्य विरोधी अशा अनेक विचारधारा नष्ट करणे म्हणजेच अहिंसा होय. नास्तिकतेला आस्तिकतेत बदलणे म्हणजे अहिंसा आहे. योगेश्वर श्रीकृष्णांच्या मते जो आत्मपथावर चालत नाही तो आपल्या आत्म्याचाच हत्यारा होय. तसेच जे महापुरुष इतरांना आत्मपथावर चालवत नाहीत ते सर्वांत मोठे हत्यारे आहेत आणि जे आत्मपथावर चालू देत नाहीत ते पण सर्वांत मोठे हत्यारे होत. समाजातील एक वर्ग नेहमी आत्मपथाचा विरोध करीत असतो. त्यांचे म्हणणे असे की, ईश्वर नावाची कोणती वस्तूच या जगात नाही. स्त्री आणि पुरुषांच्या संयोगातून ही सृष्टी उत्पन्न होते एवढेच सत्य आहे. तेव्हा खा, प्या आणि मजा करा. या विचारसरणीचे लोक आत्म्याचे हत्यारे आहेत. तसेच जे रूढीवादी आहेत तेदेखील ईश्वराच्या स्वरूपापासून स्वत:ला वंचित ठेवीत असतात. परमात्म्यापासून दूर जात असतात. त्यांची हत्या न करता त्यांना न मारता त्यांचे हृदयपरिवर्तन करणे म्हणजेसुद्धा अहिंसेचे एक अंगच आहे.

परमदेव परमात्म्यापासून दुरावा निर्माण करणाऱ्या आसुरी प्रवृत्तीच्या लोकांना नष्ट करण्यासाठी दोन्ही पद्धती वापरलेल्या दिसतात. एक हृदयपरिवर्तन करून त्यांना बदलले व दुसरी पद्धत म्हणजे जे स्वत:ला सुधारायला किंवा बदलायला तयार नाहीत त्यांचा समूळ उच्छेद केला. धर्मप्रचारासाठी रामाचे अनुकरण करून शस्त्रांचा प्रयोग काहीनी केला. ख्रिस्ती लोक हृदयपरिवर्तन गौतम बुद्धापासून शिकले; परंतु त्याच्या मोबदल्यात ते काय शिकवत आहेत ? फक्त कुरिवाज ! काळे गोरे हा भेद ! वास्तविक परमात्म्याच्या प्राप्तीचा क्रमबद्ध विधी समाजाला शिकवण्यांचा व समाजाला आत्मपथावर चालायला शिकवण्याचा मक्ता ना अल्लाच्या रसूलांना मिळाला आहे ना महात्मा येशूला मिळाला आहे.

हृदय परिवर्तन हे प्रत्येक महापुरुषाच्या हृदयातील वस्तू आहे, परंतु जीवानिशी मारणे ही अवतारी पुरुषाच्या अधिकार क्षेत्रातील गोष्ट आहे. अवतारी पुरुष म्हणजे महापुरुषच होत. आकाशातून उतरलेले कोणी चमत्कार करणारे काल्पनिक जीव नाही. तोही एक मनुष्यच होय. साधना करून त्यांनी ती स्थिती प्राप्त केलेली असते. वास्तविक परमेश्वराच्या साक्षात्कारानंतर सर्व साधकांना एकसारखीच अनुभूती मिळत असते, परंतु काही विशिष्ट महापुरुषांना समाजाच्या कल्याणाची काही जबाबदारी भगवंत सोपवतात व त्यामुळे त्यांना विशेषाधिकार प्राप्त बनवतात. ज्या महापुरुषाला जी लोक कल्याणाची जबाबदारी सोपवलेली असते तेवढी भूमिका पार पाडली की ते या जगातील रंगभूमीवरून निघून जातात. कोणाकडून किती कार्य करून घ्यायचे किंवा कोणत्या कार्यासाठी कोणाची निवड करायची हे त्या प्रभूवर अवलंबून असते.

प्राप्ती आणि स्थिती या दोन्ही दृष्टीतून सर्व महापुरुष समानच असतात; परंतु समाजातील त्यांच्या भूमिकेप्रमाणे महापुरुषांची राहणी वेग वेगळी वाटते. अवतार फक्त चोवीस झाले नाहीत. जर आपण आत्मानुभूती प्राप्त करू आणि तशा प्रकारचा समाज असेल तर आपल्या हृदयातसुद्धा अवतार शक्य आहे. समाजातील त्यांच्या कार्यावरून आम्ही कोणाला लहान अवतार तर कोणाला मोठा अवतार असे समजतो; परंतु आंतरिक प्राप्तीच्या दृष्टीतून पाहिले तर सर्व महापुरुष एक सारखेच असतात. जेव्हा समाजातील आसुरी वृत्ती एका सीमेपलीकडे जाते, समाज अत्यंत रूढिप्रधान बनतो, कितीही समजावले तरी समजून घेऊ शकत नाही, अशा वेळी विशेषाधिकार संपन्न महापुरुषाचा उदय होतो. यालाच पूर्वीच्या मुनींनी 'अवतार' हे नाव दिले. भगवान राम आणि कृष्णांनी समाज सुधारण्यासाठी दोन्ही उपायांचा प्रयोग केला आहे. त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व पाहून असभ्य वनवासीसुद्धा धार्मिक वृत्तीचे बनले. आदिवासींनी स्वत: म्हटले

**सपनेहु धरम बुद्धि कस काऊ । यह रघुनन्दन दरस प्रभाऊ ॥**

मग माणसांची तर गोष्टच सोडा. रामाने तर वानर आणि अस्वलांचेही हृदयपरिवर्तन केले. ''जड चेतन मग जीव घनैरे । जिन्ह चितए प्रभु चिन्ह प्रभु हेरे ॥'' तो सब भये परम पद जोगू ।

ज्या महापुरुषांची दृष्टी जड व चेतन कशावरही पडली तरी त्यांच्यात परमपद प्राप्त करण्याची प्रेरणा जागृत झाली. ही तर महापुरुषांची देणगी आहे, हीच त्यांची

अहिंसा होय. वास्तविक हृदयात आसुरी वृत्तीच्या जागी दैवी संपदेचे गुण निर्माण करणे म्हणजेच मनाला परमेश्वरभक्तीकडे वळविणे- मनात भक्तिभाव निर्माण करणे हेच हृदयपरिवर्तन आहे. आणि म्हणूनच महापुरुषांनी एक नवीन सूत्र समाजाला दिले की, पापी मनुष्याला नष्ट केल्याशिवाय पण पापाचे उन्मूलन करता येते. भगवंताच्या सतत भक्तीने पाप नष्ट होते हे लक्षात ठेवावे. ''अरिहुक अनभल कीन्ह न रामा'' जे रामाकडे शत्रुत्वाच्या भावनेने पाहत होते त्यांचेकडेही श्रीराम कल्याणाच्या भावनेनेच पाहत असत. त्यामुळे ''बैरिउ राम बड़ाई करही'' त्यांचा वैरीदेखील त्यांची प्रशंसा करी.

योगदर्शनकार महार्षी पंतजलींनी साधन पादाच्या पस्तीसाव्या सूत्रात अहिंसेचे एक महत्वपूर्ण लक्षण सांगितले आहे. - ''अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैर त्याग:'' जेव्हा साधकामध्ये अहिंसा उत्तम प्रकारे मुरते तेव्हा त्या साधकाच्या सहवासात येणारे सर्व प्राणी वैरभावाचा त्याग करतात. असा हा साधक सहिष्णूच नव्हे तर जयिष्णूदेखील होतो. त्या महापुरुषांत सर्वांना संभाळण्याची क्षमता आणि सर्वांच्या कल्याणाची तळमळ असते.

या प्रकारची अहिंसा भगवान श्रीरामात पूर्णपणे बाणली होती. लोक त्यांचा आदर करण्यास इच्छुक होते. त्यांच्या सहवासात ''करि केहरि कपि कोल कुरंगा । विगत वैर विरहि एव संगा'' किंवा ''खग-मृग सहज बयरु विसराई'' वन्य पशू देखील स्वत:चा हिंस्रपपणा सोडून देत होते. इतकेच नव्हे तर 'जिन्हहिं निरखि मग सांपिनि बीछी । तजहि विषम विष तामस तीछी । विषारी नागीणदेखील त्यांना पाहून आपल्या तीव्र विषाचा त्याग करीत असे.

अशा अहिंसाव्रतधारी रामाने पुन:पुन्हा समजावून आणि अनेक वेळा निरोप-संदेश पाठवून देखील ज्यांचे हृदयपरिवर्तन नाही झाले त्या सर्वांना श्रीरामाने नष्ट केले. ''रहा न कुल कोड रोवनिहारा''- अयोध्यावासियांना त्यांनी आत्मिक पथावर चालण्याची व भवसागर पार करण्याची प्रेरणा दिली. त्या पथावरून विचलित झालेल्या लोकांना ते इशाराही देत असत. - ''काल रूप तिन्ह कहँ मैं भ्राता ।'' तात्पर्य हे की अहिंसा म्हणजे कोणालाही मारू नये, किंवा कोणालाही कसले दु:ख अगर पीडा देऊ नये असा अर्थ होत नाही. अहिंसा म्हणजे शाश्वत स्वरूपाची प्राप्ती करून घेणे आणि त्या स्वरूपापर्यंत पोहचणे आणि तिथपर्यंत पोहोचण्यासाठी निर्धारित क्रियेचे, कर्माचे आचरण करणे. या

अहिंसेच्या रस्त्यावर जे विघ्न निर्माण करतात व आत्मिक पथावरून चालण्याची इच्छा असणाऱ्यांना जे त्रास देतात, वाटेत विघ्ने निर्माण करतात त्यांचा विनाश करणे ही एक प्रकारची अहिंसाच आहे. विनाश म्हणजे काय ? आत्मा शरीररूपी वस्त्र सोडून दुसरे वस्त्र धारण करतो; परंतु जेथून साधना सोडली होती त्या रस्त्यावर तो पुन्हा तेथून पुढे सुरुवात करतो. अहिंसाव्रतधारी जेवढा कोमल असतो तेवढाच तो कठोरही होऊ शकतो -

**''कुलसहु चाहि कठोर अति, कोमल कुसुमहि चाहि ।**
**चित्र खगेस राम कर, समुझि परइ कहु काहि ।।''**

अहिंसा म्हणजे भित्रेपणा नव्हे. भित्रेपणा तर हिंसेपेक्षासुध्दा वाईट गोष्ट आहे. भित्रा मनुष्य बदला तर घेण्याची इच्छा ठेवतो, परंतु मरणाला घाबरतो. त्याला असे वाटत असते की, आपले रक्षण दुसऱ्यांनी करावे. परंतु अहिंसाव्रतधारी लोक लोककल्याणासाठी आपले प्राण द्यायलादेखील तयार असतात. विश्वात होऊन गेलेल्या महान विभूती मानवतेच्या कल्याणासाठी आपले प्राण द्यायला नेहमीच तत्पर राहिल्या. त्या त्याबाबतीत कधीही मागे राहिल्या नाहीत. अहिंसाव्रतधारी धर्माच्या रक्षणासाठी आणि आपल्या आस्तित्वाच्या रक्षणासाठी आपले डोके कापून द्यायलादेखील तयार असतो. आणि स्वभावजन्य जडता (मूर्खता) कोणत्याही प्रयत्नाने गेली नाही तर आपले शीर उतरून द्यायला तयार असतो- प्राण द्यायला तयार असतो.

परंतु एक लक्षात ठेवा की, आत्मपथास विरोध करणाऱ्या समाजास नष्ट करणे हा जन-सामान्यांचा विषय नाही. जन-सामान्यांसाठी अहिंसा किंवा अहिंसेच्या प्रतिष्ठेला शून्य महत्व असते. शाश्वत स्वरुपाची प्राप्ती करून देणाऱ्या महापुरुषाच्या कक्षेतील ही गोष्ट आहे कारण त्यांना विशेष अधिकार दिले गेलेले असतात. या पद्धतीने मुक्ती नाही मिळाली तर दुसरी पद्धत त्यांना अवगत असते. त्यामुळे रावणाचे तेज रामामध्ये सामावले. कुंभकर्णाचे तेज रामामध्ये आले. श्रीकृष्णाने कंस आणि शिशुपाल यांना मारले तेव्हा त्यांचेही तेज श्रीकृष्णामध्ये सामावले गेले.

हीच गोष्ट हजरत मुहम्मद साहेबांची. त्यांनी मुसलमानांना शिकवले की जो एक परमात्मा आणि एका गुरूला मानत नसेल तर त्याला ठार मारा किंवा आपल्यात सामावून घ्या. परंतु तत्कालीन समाजातील खूप थोड्या लोकांनी त्यांचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न केला. अनेकजण त्यांच्या शब्दांचा कीस काढत बसले. मुहम्मद साहेबांवर

तर कुराणातील वाक्यांचा वर्षाव होत असे. त्यांना भगवंताचा आवाज ऐकायला येत होता (ही अत्यंत वैयक्तिक गोष्ट आहे. परमात्म्याचा आवाज ऐकणे हे त्यांच्या क्षेत्रातील गोष्ट आहे. अन्यांसाठी ते अर्थशून्य आहे) ते जिवंत असेपर्यंत तलवार चालवणे उचित समजले जात असे. परंतु नंतर अनुयायांनी आपल्या विशेषअधिकारांचे अनुकरण केले. धर्म-प्रचाराच्या भावनेने ते आपली राहणी, करणी, लोकांवर लादण्याचा प्रयत्न करू लागले त्यामुळे समाजात कलहाचे बीज रोवले गेले. लक्षात ठेवा की, समाजाची राहणी, करणी त्याचे खाणे-पिणे किंवा वेशभूषा म्हणजे धर्म नाही. त्याचे पालन इंद्रिये आणि मन किंवा अंत:करणाच्या क्रियेतून होत असते. भजन-भक्ती ही मानसिक असते. आपल्या शेजारी बसलेल्या व्यक्तिला सुद्धा भजन सुरू आहे हे कळत नाही.

आत्मिक शोधाच्या विधीबाबत जगातील सर्व महापुरुषांचे एकच मत आहे आणि त्याचा विधी किंवा रीत केवळ एवढीच आहे की १) सर्वत्र व्यापून असणाऱ्या परमेश्वरावर नितांत श्रद्धा. २) त्या परमात्म्याचा परिचय देणाऱ्या दोन अडीच अक्षरांचा प्रत्येक श्वासाबरोबर जप. (हे नाव कोणत्याही भाषेचे असू शकते, हे नाव कोणते ही असू शकते. अट फक्त हवढीच असते की त्यातून परमात्म्याच्या व्यापकतेचा बोध व्हावा) आणि ३) साधना करीत असताना परमेश्वराची प्राप्ती करून घेणाऱ्या एखाद्या समकालीन महापुरुषाची सेवा करणे. त्यांना सर्व समर्पण करणे, त्यांना मग गुरू, सद्‌गुरू किंवा पैगंबर असे काहीही नाव द्या. पण अशा प्रकारे आचरण करून आपल्या हृदयात अंतर्यामी वासकरणाऱ्या परमेश्वराला जाणणे त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणे - बस्स हीच अहिंसा होय. आपल्या स्वरूपाची प्राप्ती करण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच अहिंसा होय.

जगात साक्षात्कारी अशा सर्व महापुरुषांच्या म्हणण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, अहिंसेचे स्थान एक आहे, धर्माची मान्यतापण एकच आहे. परंतु परिवर्तनशील व्यवस्थेच्या संबंधात ते जे निर्देश करतात त्यांनाच त्यांचे अनुयायी धर्म मानण्याची चूक करतात. परंतु महापुरुषांनी त्यावेळी सांगितलेले नियम हे तत्सामायिक असतात. स्थायी नसतात, समाजातील काही विशिष्ट गोष्टींसाठी असतात, ते सार्वभौम नसतात. धर्म सार्वभौम असतो. धर्मातून राहणी-करणीचे नियम काढून टाकले तर धर्माच्या नावावर होणाऱ्या झगड्याचे कारणच समूळ नष्ट होईल. जेव्हा या महापुरुषांचे अनुयायी एका विशिष्ट संप्रदायाची शाल अंगावर पांघरून घेण्याची चूक करतात तेव्हा खरी समस्या

येते. कारण हे अनुयायी धर्माच्या बरोबर आपली रहाणी, करणी, रीती-रिवाज, सामाजिक परंपरा, आपले सण, खाणे-पिणे, विशिष्ट प्रकारचा निवास (घर), विशिष्ट प्रकारचा पोषाख, भाषा थोडक्यात आपली सभ्यता दुसऱ्यांवर लादण्याचा प्रयत्न करतात, आणि झगडतात. बरं झगडा परमेश्वराला माना किंवा त्यावर श्रद्धा ठेवा हे सांगण्यासाठी नाही; तर त्या परमेश्वराला कोणत्या नावाने संबोधले जावे यावरून वाद करतात. त्याला राम म्हणावे, अल्ला म्हणावे की गॉड म्हणावे याबाबत वाद करतात.

केवळ एखाद्या शब्दाला किंवा शब्दांना पकडून बसल्याने हातून चूक घडते. येथे तीच चूक ते करतात. जर आम्ही म्हटले की येशूच्या नावाचा जप केल्याशिवाय तुम्हाला स्वर्गात प्रवेश मिळणार नाही. पण येशूच्या काळात ही गोष्ट ठीक होती कारण सद्‌गुरु हेच परमात्म्याच्या धामाची किल्ली आहे. त्याच्याशिवाय परमेश्वरापर्यंत पोहचता येणार नाही. परंतु आज ? आज आपण त्यांच्यापासून फक्त प्रेरणा घ्या आणि एखाद्या महापुरुषाला प्राप्त करा. सर्वांवर श्रद्धा ठेवा, साक्षात्कारी महापुरुषांचा अपमान करू नका. मग तो कोणत्याही काळातील असू द्या. कारण सर्वांनी एकच प्रकारचे कर्म केलेले असते. सर्वांनी त्या परमात्म्याचे निरंतर चिंतन ध्यान आणि इंद्रिय संयमन केले आहे आणि त्या सर्वांनी एकाच परमात्म्याला प्राप्त केले आहे. कोणाला हिंदू देव किंवा कोणाला मुसलमान देव किंवा कोणाला ख्रिस्ती देव प्राप्त झाला नाही.

जर परमात्मा दोन असतील तर एकामध्ये निश्चितपणे धोका आहे. अहो, जर एक इश्वर सर्वत्र व्यापून असेल तर दुसरा राहील कोठे ? आणि समजा दुसरा ईश्वर असला तरी त्याच्यासाठी दुसरी सृष्टी हवी. कारण या सृष्टीच्या कणाकणामध्ये तो परमात्मा भरलेला आहे. आणि समजा त्यात दुसरा व्यापून असला तरी एक तत्त्वरूप म्हणजे एकच असतो. दोन नाही. भगवान दोन आहेत असे म्हणणारे नितान्त भ्रमामध्ये आहेत.

या जगात एकच शाश्वत परमेश्वर आहे. त्याला मग कोणी गॉड फादर म्हणते, दुसरा कोणी परमपिता म्हणतो. कोणी त्याला यहोवा, अल्ला, अहुरमजदा म्हणतो किंवा अशाच दुसऱ्या नावाने म्हणजे जे हृदयात आहे त्या नावाने संबोधले तरी चालेल. आपल्याला त्याचे जे नाम रुचेल ते घ्या मात्र ते नाव छोटेसे असू द्या म्हणजे ते तुमच्या

श्वासात सहज मिसळेल. आणि त्याच नावाने त्याला साद घाला. ही तर तुम्ही व तुमच्या हृदयस्थ परमेश्वरातील अंतस्थ गोष्ट आहे. मुख्य गोष्ट ही आहे की तुम्ही त्या एकमात्र परमात्म्याला मानता की नाही ? त्यावर श्रद्धा ठेवता की नाही ? त्याच्या प्राप्तीसाठी एक विशिष्ट प्रकारचे आचरण करता की नाही ? इतके जर कोणी करत असेल तर त्याच्याशी वाद घालण्याचा काही प्रश्नच निर्माण होत नाही. त्याचे धर्मपरिवर्तन पण केले जाऊ शकत नाही. आणि केलेत तरी त्याला कोणत्या नव्या धर्माची तुम्ही दिक्षा द्याल ? तेव्हा आपली राहणी-करणी किंवा आपला महापुरुष कोणावरही लादणे म्हणजे धर्म नव्हे. आपल्यासाठी आपला समकालीन महापुरुषच ठीक आहे कारण तोच आपल्या हृदयात योग्य जागृती करू शकतो व आपल्याला योग्य मार्ग दाखवू शकतो, प्राचीन महापुरुष नाही. अहो प्राचीन महापुरुषाकडूनच जर अशी हृदयात जागृती होत असती तर अन्य महापुरुषांची परंपराच निर्माण झाली नसती. या आत्म मार्गाचे एक वैशिष्ट्य असते की आपल्याला स्वर्ग किंवा नरकापर्यंत केवळ सोडून देत नाही. कारण यात तुम्हाला सुधारण्याचा अवसर नसतो ना गुलामी पासून मुक्ती त्यात मिळत असते. जोपर्यंत तुम्ही त्या परमात्म्याशी तद्रूप होऊ शकत नाही तोपर्यंत या गुलामीपासून व अध:पतनापासून मुक्ती असंभव आहे. या साक्षात्काराची क्रिया आपल्याला गुलाम नाही तर मालक बनवते. नियत कर्म करण्यासाठी ही स्थिती प्रत्येक देशात व कोणत्याही कालाच्या व्यक्तिसाठी संभव आहे मग एखाद्या प्राचीन महापुरुषाला चिकटून राहण्यात काय औचित्य आहे ?

ते महापुरुष आमचे सन्मानीय पूर्वजच आहेत. त्यांच्यापासून आम्ही सर्वांनी प्रेरणा घ्यावी पण मार्गदर्शनासाठी आपल्या समकालीन अशा एका महापुरुषाच्या प्राप्तीची इच्छा ठेवावी किंवा त्यांचा शोध घ्यावा म्हणजे नियत कर्माच्या आचरणाद्वारा तुम्ही तसेच बनण्याचा प्रयत्न करावा. तुम्ही केवळ एका परमेश्वरावर श्रद्धा ठेवून त्याच्या नामजपासाठी थोडा वेळ काढा. तुमचा पुण्यसंचय झाला, योग्य वेळ आली की आपल्यासाठी निर्धारित असणारे संत किंवा सद्गुरू आपोआप तुम्हांला मिळतील. तुमच्या पुण्यसंचयापूर्वीच एखादा महापुरुष तुमच्यावर लादला गेला तर त्यापासून तुमचा काहीच फायदा होणार नाही. यामध्ये लादणाऱ्याचा स्वार्थ असला तरी ज्याच्यावर तो महापुरुष लादला गेला त्याला त्या महापुरुषाच्या रूढींशिवाय काहीही प्राप्त होणार नाही. तेव्हा आमच्या सद्गुरुंनाच तुम्ही आपले सद्गुरू बनवा असा दुराग्रह करण्यात काही अर्थ नाही.

आमच्या ऋषीमुनींनी हेच केले. त्यांनी मानवाची अश्रद्धा नाहीशी करून त्याला सश्रद्ध बनवण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी आपली राहणी-करणी किंवा आपल्या खाण्यापिण्याचे नियम त्याच्यावर लादले नाहीत. खाणे-पिणे, पोषाख, भाषा इत्यादी गोष्टी तुम्हाला दूर-म्हणजे चुकीच्या मार्गाकडे, चुकीच्या विचारसरणीकडे नेतात पण धर्म आपल्याला आत्मैक्याची प्रत्यक्ष अनुभूती करवतो. कोणत्या केंद्राबिंदूवर तुम्ही एक आहात ते धर्म सांगतो. धर्म अनेकतेमध्ये-विविधतेमध्ये निहित आत्मिक एकतेची दृष्टी देतो. किती विरोधाभास आहे पाहा ! धर्माच्या नावावर कितीतरी लोक एकमेकांपासून दुरावले गेले, आजही दुरावले जात आहेत. आपापसात भांडत आहेत. वास्तविक महापुरुषांच्या व धर्माच्या नावावर भांडण्यात काहीच अर्थ नाही कारण धर्म आत्मैक्याची अनुभूती देतो, तो कल्याणाचा मार्ग दाखवतो, लढाई-झगडे करायला प्रेरणा देत नाही. पण समृद्धी प्राप्त करण्यासाठी व आपला अहंकार पोसण्यासाठी लोक भांडत असतात.

मनुष्यमात्राच्या कल्याणासाठी एका धर्माचा संदेश घेऊन आमचे पूर्वज चीन-जपानपासून इजिप्त पर्यंत गेले. अमेरिकेतसुद्धा त्यांच्या काही स्मृतिखुणा आज मिळू लागल्या आहेत. दक्षिण-पूर्व आशियाला तर लोक बृहन भारतच म्हणू लागले होते. समुच्य विश्वाने त्यांच्या शिकवणुकीचा स्वीकार केला होता आणि त्यांच्या धर्मप्रसाराला सहकार्य दिले आणि ज्यांनी ज्यांनी धर्माच्या नावावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला त्यांना त्यांना त्यांनी सक्त इशारा दिला. ही गोष्ट सम्राट अशोकाच्या शिलालेखावरून स्पष्ट दिसून येते. अहिंसेचे व्रत घेतलेल्या त्या सम्राटाजवळ सुसंगठित असे सैन्यबळही होते । अर्थात याला अहिंसेचे उल्लंघन म्हणता येणार नाही. परंतु अहिंसेच्या प्रतिष्ठेसाठी विघ्नरूप असामाजिक तत्त्वांसाठी ती एक प्रकारची शिक्षाच होती.

ज्याने आपल्या राज्यात अशोकाप्रमाणे जीवहिंसा बंद केली त्या सम्राट हर्षवर्धनाने आत्मिक मार्गामध्ये येणाऱ्या कुरीती दूर करण्यासाठी प्रयागमध्ये विद्वानांचे सम्मेलन आयोजित केले. त्यामध्ये गौतम बुद्धाचे अनुयायी असणारे चीनी प्रवासी ह्युएनसांग यांच्या विचाराला प्राधान्य मिळाले. ईर्षेने पेटलेल्या काही विद्वानांनी त्याला अपमानित करण्याची एक योजना आखली. या कटाचा सुगावा लागताच सम्राट हर्षाने घोषित केले की जर कोणी त्या विद्वानाला कसल्याही प्रकारची इजा पोहचविण्याचा प्रयत्न करेल तर मी त्याला मृत्युदंडाची शिक्षा देईन. एकीकडे अहिंसेचे पुजारी म्हणवायचे व

दुसऱ्या हातात तलवार घ्यायची ! पण लक्षात ठेवा हर्षाची कृती योग्यच होती. कारण आत्मिक मार्गावर चालणे आणि इतरांना चालवणे आणि त्या मार्गावर उद्‌भवणाऱ्या बाधक तत्त्वांचा समूळ नाश करणे हीच खरी अहिंसा होय.

भारताच्या इतिहासात अहिंसेच्या स्थापनेसाठी केवळ दोनच महापुरुषांनी शस्त्राचा प्रयोग केला. एक भगवान श्रीरामांनी व दुसरा श्रीकृष्णानी. जेव्हा त्यांच्यापुढे दुसरा कोणता मार्गच शिल्लक राहिला नाही तेव्हांच त्यांनी हातात शस्त्र धरले. इतर महापुरुषांनी हृदय-परिवर्तन करण्याचे काम केले. भगवान बुद्धांनी तेच केले. एकदा एक ब्राह्मण सातशे वासरे, सातशे बकऱ्या आणि सातशे मेंढ्या घेऊन यज्ञामध्ये हवन करण्याच्या तयारीत होता. तेवढ्यात गौतम बुद्ध तेथे पोहचले. ते त्याला म्हणाले, ''या मूक पशूंना मारण्याने परमेश्वर खुश होतील असे तुला वाटते का ?'' या सृष्टीमध्ये अनेक जीव जन्मत असतात व मरत असतात. त्यांना मारण्याने परमेश्वराला काय आनंद होणार ? तुम्ही तर या जीवांना मारत मारतच मरून जाल. चिंतन करायला तुमच्या जवळ वेळ आहेच कुठे ? तुमच्याजवळ भगवत्‌चिंतनाची काही पद्धत, काही विधी तरी आहे का ? अरे बाबा, ही नाहक हत्या सोड व माझ्याजवळ ये मी तुला मोक्ष देईन. ''एवढे सांगून ते गप्प बसले नाहीत किंवा त्याला मोक्षाचा विधी सांगत राहिले नाहीत तर त्या मार्गाला त्यांनी त्याला लावले आणि जगातील सर्वांत विरक्त शिष्य आणि मुक्त महापुरुष बनवले. आणि जेव्हा या जगातून तो निघाला किंवा शरीर सोडताना त्या शिष्याजवळ-नव्हे बुद्धांनी ज्याला महान बनवले त्या महापुरुषाजवळ पाचशे जीवनमुक्त सिद्ध पुरुष बसलेले होते.

भगवान बुद्ध भिक्षूंना उपदेश करण्याची वेळ वेगळी ठेवीत असत व संसारी लोकांना उपदेश करण्याची वेळ वेगळी ठेवीत असत. दोघांसाठी नियमही वेगळे वेगळे असत. कारण संसारी लोकांना संसाराचे ओझेपण संभाळायचे असते; पण भिक्षूंना केवळ भगवत् चिंतन करावयाचे असते. कोणत्याही महात्म्याच्या अंतरंगातील एखादे तत्त्व बाहेर शोधायला जाल तर जीवन एक ओझे बनेल. ज्याप्रमाणे महापुरुषांच्या जीवनातील अहिंसेच्या पैलूला आपल्याकडे खेचून आपण भार बनवला तशी स्थिती होईल.

जेव्हा एखादा श्रद्धाशील-भावीक भक्त साधनेला लागतो तेव्हा प्राथमिक अवस्थेत भगवंत त्याला थोडी थोडी अनुभूती देतो. जेव्हा साधना एकदम सूक्ष्म

होते तेव्हा एक स्तर असा येतो की, आजपर्यंत ज्या स्तरावर प्रकृती दिसत होती तेथे आता परमात्म्याचे स्वरूप त्याला दिसू लागते- ''सरग नरक अपवरग समाना । जहँ तहँ देखे धरे धनु बाना।'' ना स्वर्ग स्वर्गाच्या रूपात राहिला ना नरक नरकाच्या रूपात राहिला. जेथे जेथे दृष्टी पडेल तेथे तेथे आराध्य देवाचे साजिरे रूपच दिसू लागते. झाडात, अचेतन वस्तूत, पानात चेतनशील जीवात-म्हणजे कुठेही, जेथे दृष्टी जाईल तेथे तेथे आराध्य देवतेचे मोहक रूपच दिसते. जेव्हा अशी स्थिती होते तेव्हा त्या महापुरुषाला मुंगी मारण्याचेपण जीवावर येते, वनस्पती किंवा झाडाची पाने तोडायचेही त्यांना दु:ख होते. कारण चराचरात त्याला ईश्वराच्या स्वरूपाचा प्रत्यय येत असतो.

पूज्य महाराजांचीही अशीच अवस्था झाली होती. तेव्हा आम्ही त्यांना विचारले की, आपल्या दातांना पायोरिया का झाला ?'' ते म्हणाले 'अरे, दोन वर्षांपासून आम्ही दातनच केले नाही. आम्ही विचारले, ''भगवन, का बरे ? याचे कारण काय?'' ते उत्तरले, ''त्यावेळी आम्ही विवस्त्र अवस्थेत सर्वत्र भटकत होतो. ईश्वराच्या चिंतनात मग्न होतो. एकदा अशी अवस्था आली की माझी जेथे दृष्टी पडेल तेथे तेथे माझ्या आराध्य देवतेचे स्वरूप मला दिसू लागले. जेव्हा दात घासण्यासाठी झाडावरचे दातन मी तोडायला लागलो तेव्हा मला जाणवले की अरे, माझ्या शरीरावरचा एकजरी केस उपटला तरी किती त्रास होतो तसाच झाडाला ही त्रास होतच असेल ना ! म्हणजे आत्मा आणि बाहेरील वस्तूत ऐक्य निर्माण झाले. व म्हणून झाडाचे दातन तोडण्याचे बंद केले. सुकी पाने चिरडून तेच दातावर घासत असे व काम चालवीत असे. यामुळे दात किडले व पायोरिया झाला.

आम्ही म्हटले, ''भगवन, त्या दर्शनाचे स्वरूप कशा प्रकारचे होते ?'' म्हणाले, ''हो, त्यावेळी साधनेचे ते एक अंग होते. आज ज्या स्तरावर-ज्या अवस्थेत मी आहे तेथून जेव्हा पाहतो तेव्हा समजते की, ते सर्व अज्ञान होते.''

तेव्हा भगवंत सर्वत्र आहे म्हणून बसून राहण्याची आवश्यकता नाही. साधनेच्या मार्गावर चालत असताना एक विशिष्ट स्तरावर-अवस्थेत मुंगी मारण्यास, झाडाची पाने तोडण्यास दु:ख वाटते. कारण हा अहिंसेचा स्तर असतो, श्रेणी असते. परंतु ही अहिंसा साधनेद्वारेच सुलभ होते. या अवस्थेत असणारा साधक कोणालाही दुखवत

नाही. ते त्याला सहनही होत नाही. म्हणूनच काया वाचा मने कोणाला पीडा न देणे, दु:ख न देणे म्हणजेच अहिंसा आहे. समाजामध्ये प्रचलित अहिंसा महापुरुषांच्या या अवस्थेचे केवळ एक अनुकरण आहे. केवळ एक नक्कल आहे. अहिंसा ही चिंतन मार्गावरील एक पायरी आहे. साधनेचे एक क्रमगत अंग आहे. आत्मिक पथावर चालू लागलात तर जगात तुम्हीच काय पण कोणालाही अहिंसक होता येईल.

**''गुरुदेव भगवान की जय''**

॥ॐ॥

# पाप आणि पुण्य

जन्म-मृत्यूचे कारण बनणारे कर्म हे
पाप कर्म आहे. जे कर्म, त्यातून सुटका
करून शाश्वत परमधाम प्राप्त करून
देते ते कर्म पुण्यकर्म आहे.

**-स्वामी अडगडानंद**

महाकुंभ पर्वानिमित्त चंडीद्वीप हरिद्वारमध्ये
दिनांक २०-४-८६च्या सभेत
**स्वामी अडगडानंद**
महाराजांचे झालेले प्रवचन

# पाप और पुण्य

बंधूनो,

पाप म्हणजे काय आणि पुण्य म्हणजे काय ? या विषयाच्या बाबतीत समाजात अनेक गैरसमजूती आहेत.कोणी म्हणते खोटे बोलणे पाप आहे तर कोणी म्हणते चोरी करणे पाप आहे. हत्या आणि प्रत्येक मृत्यू म्हणजे पाप होय. कोणालाही फसवणे-धोका देणे पाप आहे.शेत किंवा घर पेटवणे पाप आहे. पाप करणे तर पाप आहेच; पण पापकर्माला समर्थन देणे किंवा ते नुसते पाहत राहणे ही पाप आहे. पण पापातून मुक्त होणेही सोपे व सरळ आहे. असे समजले जाते की दान केल्याने, तीर्थस्थानी स्नान केल्याने किंवा तेथे जाऊन मुंडण केल्याने पापमुक्त होता येते कारण पापाचा वास केसांमध्ये असतो.

ज्या स्मृतिवचनांचा पगडा हजारो वर्षांपासून हिंदू समाजावर आहे त्या स्मृतींचे म्हणणे आहे की, काही जाती तर जन्मापासूनच पापी असतात म्हणून तर त्या अस्पृश्य असतात. त्यांनी वेद वाचल्यांनी किंवा ऐकल्याने पण त्यांना पाप लागते. इतकेच नव्हे तर मासे मारणारा कोळी, पशुपक्षी पकडणारा पारधी, तेल काढणारा तेली यांच्याकडून जेवढे पाप वर्षभरात होते तेवढे पाप शेतकरी जमीन नांगरतो तेव्हा एक दिवसात करतो. तेव्हा या पापातून मुक्त होण्यासाठी पिकाचा एक भाग दान द्यायला पाहिजे नाहीतर त्याला ब्रह्महत्येचे पाप लागते.

स्मृतिग्रंथात मनुष्या-मनुष्यानी आपापसातील व्यवहाराबाबत काही नियम सांगितले आहेत आणि म्हटले आहे की सामाजिक व्यवस्थेचे नियम तोडणे पाप आहे आणि त्यांचे पालन करणे हे पुण्यकर्म आहे- वास्तविक समाजासाठी केलेले नियम हे परिवर्तनशील असतात, परिस्थितीनुसार- काळानुसार ते बदलत असतात; पण आजही स्मृतिवचनांचा पगडा आमच्यावर इतका आहे की ते नियम तोडणे आजही आम्हांला पाप वाटते. एक वेळ अशी होती की दहा मुलं जन्माला घालणाऱ्याला पुण्यात्मा समजले जाई, पण आज एक किंवा दोन मुलेच पुरेशी आहेत. कालान्तराने एवढ्या मुलांसाठीही कदाचित दंड किंवा शिक्षा मिळू शकेल. पूर्वी भ्रूण-हत्या मोठे पाप समजले जाई पण

आज भ्रूण-हत्या क्षम्य समजली जात आहे. पूर्वी जोहार करणारी- सती जाणारी स्त्री सरळ स्वर्गातच पोहचते असे समजले जाई; आज ती पध्दत दंडनीय शिक्षापात्र समजली जात आहे. आज ही पद्धत म्हणजे अपराध गणला जात आहे. या अपराधाची शिक्षा देणाराही मनुष्य असतो व घेणाराही मनुष्य असतो. म्हणजे याचा निर्णय मनुष्यच घेत असतो. तेव्हा काळानुसार समाजात ठरवलेले कायदे किंवा दंड-विधान यांना पापपुण्याची निर्धारक सीमारेषा ठरवता येत नाही.

याच प्रमाणे या जगात धर्म एकच आहे; परंतु धर्माच्या नावावर अनेक संप्रदाय प्रचलित आहेत. हिंदू गाईचे रक्षण व पूजन करून पुण्य कमवित असतो तर मुसलमान तिला कापून स्वत:चा पुरुषार्थ-पराक्रम दाखवतो. जैन लोक आपल्या मंदिरात तीर्थंकरांचे दर्शन घेणे पुण्य समजतात तर हिंदू लोक जैन मंदिर किंवा बौध्द विहारात जाणे भयंकर पाप समजतात. कधी असे सांगितले गेले की राजाला विरोध करणे पाप आहे कारण राजामध्ये सर्व देवतांचे तेज संचित झालेले असते. त्याच राजांचे आज संपूर्ण उन्मूलन झाले आहे. देवतांचे ते तेज, पाप-पुण्याची ती कल्पना भूतकाळात जमा झाली. पूर्वी लाकडी नांगराला लोखंडाचे फाळ लावून धरती मातेचे पोट चिरणे पाप समजले जाई. आज ट्रॅक्टरच्या धारदार टोकांनी (किंवा नख्यांनी) हरित क्रान्तीची गाणी लिहिली जात आहेत. काही ठिकाणी अंडी मांसाहार आहे तर काही ठिकाणी अंड्यांना शाकाहार समजले जाते. काही वर्षांपूर्वी ॲलोपथीचे औषध घेणे पाप समजले जाई, साबण लावणे पाप समजले जाई, समुद्रप्रवास करणे किंवा विदेश-गमन करणे पाप समजले जाई. पण आज त्याशिवाय कामच चालत नाही. कदाचित घरातील कोणी मुलगा परदेशी जाणार असेल तर ते कुटुंब स्वत:ला आता भाग्यशाली समजते. पुरोहितसुध्दा स्वास्तिवाचन करून त्याला निरोप देतात.

हिवाळ्यात पंचवीस डिग्री सेल्सीयस तापमानाला गरमी म्हटले जाते. तर उन्हाळ्यात त्याच तापमानास एयर कण्डीशन म्हटले जाते. मग कशाला गरमी म्हणावी व कशाला थंडक म्हणावे ? बरोबर त्याच प्रकारे मानवाच्या रोजच्या व्यवहारात पाप कोणते व पुण्य कोणते हे निश्चितपणे सांगता येत नाही. परिवर्तनशील अशा सामाजिक, साम्प्रदायिक, राजनैतिक, आर्थिक तसेच स्वास्थ्यसंबंधी नियमांचे सुगमतापूर्वक पालन करण्याच्या नादात त्याचे बरोबर पाप-पुण्याच्या कल्पना जोडून देण्याने पाप आणि पुण्याचा मूळ आशय मलीन झाला आहे. अधिकांश समाज या प्रश्नांबाबत साशंक आहे, तासनतास

परामर्श करूनसुद्धा कोणतेही निर्णायक उत्तर कोणीही देऊ शकत नाही. म्हणून पाप म्हणजे काय व पुण्य म्हणजे काय याचा साधक-बाधक विचार केला पाहिजे.

## वेदः

पाप आणि पुण्याचे संक्षिप्त परंतु स्पष्ट वितरण सर्वप्रथम वैदिक साहित्यात मिळते. सामवेदाच्या तलवकार शाखेच्या अंतर्गत असलेल्या छान्दोग्य ब्राह्मणाच्या प्रथम अध्यायामध्ये उल्लेख आहे की, ओम परमात्म्याचा परिचायक आहे. ओमच्या यजनद्वारे देवतांनी असुरांना नष्ट करायचे ठरवले. त्यांनी वाणी, डोळे, कान, नाक तसेच मनाच्या द्वारे ही उपासना करायचे ठरवले; तेव्हा असुरांनी त्या सर्वांना रागद्वेषरूपी पापाने विध्द केले. त्यामुळे इंद्रिये राग आणि द्वेषांनी युक्त झाली. त्यामुळे मनुष्य आपल्या इंद्रियांद्वारा चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे कार्य (कर्म) करीत असतो. तेव्हा देवतांनी प्राणद्वारा ओंकाराची उपासना केली. असुरांनी प्राणालाही दूषित करण्याचा प्रयत्न केला; पण प्राणाजवळ ते जाताच छिन्नविछिन्न झाले. त्यामुळे देवतांचे यज्ञ यशस्वी झाले. यावरून स्पष्ट झाले आहे की, इंद्रियांचे वासनांनी विध्द होणे पाप आहे आणि त्यापासून मुक्त होणे पुण्य आहे.

## उपनिषद :

या घटनेचा असाच उल्लेख बृहदारण्यक उपनिषदातही आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना ऋषी म्हणतात की ''प्राणाचा आश्रय घेण्याने देवता मृत्यूच्या पलीकडे गेल्या आहेत. वाणी अग्नीमध्ये बदलली आहे, प्राण वायू बनला, श्रोत दिशा बनला, चक्षू सूर्य बनला आणि मन जेव्हा मृत्यूच्या पलीकडे गेले तेव्हा ते चंद्र बनून गेले'' तात्पर्य हे की, प्राण संयमाचे द्वारे अंत:करण जेव्हा ईश्वरीय गुणधर्मांनी रंगले, आसुरी प्रवृत्ती शांत झाल्या आणि त्या कायमच्या पापातून मुक्त झाल्या. तेव्हा त्यासाठी प्राण-अपानची क्रिया म्हणजे काय ते जाणून घेतले पाहिजे. ती कशी असते ? कुठे मिळते ? यावर सर्वांनी लक्ष ठेवले पाहिजे.

याच उपनिषदात पुढे म्हटले आहे की तो महान अजन्मा आत्मा हृदयाकाशात शयन करीत असतो व संपूर्ण शरीराला व्यापून असतो. श्वास-प्रश्वासाच्या क्रियेचे कारण प्राण आहे, बोलण्याचे कारण वाक् आहे, पाहण्याचे कारण चक्षू आहे, ऐकण्याचे

कारण श्रोत आहे व मनन करण्याचे कारण मन आहे. हे त्याचे कर्मानुसारी नाव आहे तेव्हा तो यातल्या एकेकाची उपासना करतो. सूर्य, चंद्र किंवा दिशांची उपासना करतो. किंवा दुसऱ्या शब्दांत डोळे, कान किंवा नाकाची उपासना करीत असतो. आत्म्याव्यतिरिक्त दुसऱ्याचीच पूजा तो करत असतो हे त्याला समजत नाही. तो म्हणजे एक-एक देवतेचा पशू आहे. ज्या प्रकारे पशू माणसांना जगवतात, त्यांचे पालन करतात त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्य देवतांना पोसत असतो. व त्यामुळे मनुष्याने आत्मतत्त्व जाणून घेणे त्यांना पसंत नाही कारण आत्मतत्त्व जाणल्यावर मनुष्य देवतांकडे फिरकणारही नाही. ''आत्म्याला न जाणणारा मनुष्य जरी या लोकात कितीही पुण्यकर्म करणारा असला तरी अन्ती त्याचे हे कर्म क्षीण होत जाते.''

''म्हणून आत्म्याची उपासना केली पाहिजे. यासाठी एकाच व्रताचे आचरण करा ते म्हणजे प्राण-अपानचे चिंतन करा. आत्मभाव प्राप्त झाल्यानंतर पाप किंवा पुण्याशी त्यांचा काही संबंधच उरत नाही. सर्व प्रकारच्या शोकाच्या तो पलीकडे जातो. तेव्हा पाप त्याला क्लेश देऊ शकत नाहीत उलट तोच पापांना कष्टी करतो तो पापरहित, निष्काम व संपूर्णपणे ब्राह्मण बनतो.'' अर्थात या परात्पर ब्रह्माला अंत:करणात विदित केल्यानंतर ब्राह्मण ही स्थिती प्राप्त होत असते. मुण्डकोपनिषदाचा हाच निर्णय म्हणजे हेच मत आहे. आत्म्याची तीव्र उपासना केल्यानंतर ही स्थिती प्राप्त होत असते. उपासना म्हणजे प्राण-अपानद्वारा परमात्म्याचे चिंतन. उपनिषदांच्या मते पापापासून स्वत:ला वाचवण्याचा व पुण्य प्राप्त करण्याचा हाच एक उपाय आहे- प्राण-अपानचे चिंतन. त्याच्या व्यतिरिक्त या जगात काही प्राप्त करण्यासाठी जे काही केले जाते ते सर्व नश्वर आहे.

**इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठो नान्यच्छ्रेयो वेद्यन्ते प्रमूढा ।**
**नाकस्य पृष्ठे सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं होनतरं वा विशन्ति ।।१/२/१०।।**

इष्टपूर्ती करणाऱ्या भिन्न भिन्न देवतांसाठी वेदी बनवून यज्ञ-यागादि श्रोत कार्ये केली जातात त्यांना इष्ट कर्म किंवा तलाव, विहिरी खोदणे, बगीचे लावणे इत्यादि स्मृतिविहित धर्मकृत्यांना पूर्त कर्मे म्हणतात. या इष्ट आणि पूर्त कर्मांना श्रेष्ठ मानणारे

मूढ लोक त्यापेक्षा वास्तविक श्रेयाला जाणत नाहीत. या पुण्य कर्माच्या फलस्वरूप स्वर्गातील उच्च अशा स्थानी तेथील सुखोपभोगांचा अनुभव घेत या मृत्युलोकातील विभिन्न योनींमध्ये जन्म घेतात. परंतु ''स: योह वै तत्परं ब्रह्म वेद, ब्रह्मैव भवति, तरति शोकम् तरति पाप्मानं, गुहा ग्रान्थिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति''. साधनेच्या योग्य क्रियेद्वारा जो कोणी त्या परम ब्रह्माला जाणतो तो ब्रह्मरूप बनून जातो. तो शोकाच्या पलीकडे जातो, पापांतून तरून जातो आणि हृदयाच्या गाठीतून नेहमीसाठी सुटून अमर बनतो.

लक्षात ठेवा की, पुस्तकांचे पाठांतर करणारा वेदज्ञ होऊ शकत नाही. वेद हे कोण्या पुस्तकाचे नाव नाही; पण या प्राण-अपान चिंतनाची क्रिया तीव्रतेने करून अविदित परमतत्त्व परमात्म्याला जाणणे, तसेच त्याच्याशी ऐक्यभावाची अनुभूती घेणे म्हणजे वेद होय. त्या अनुभूतीचे नाव आहे ज्ञान. व म्हणूनच कोणत्याही पोथ्यांना प्रमाण न समजणारे गौतम बुध्द खरे वेदज्ञ आहेत, खरे ब्राह्मण आहेत.

परमात्म्याचे ज्ञान देणाऱ्या अनुभवसिद्ध ऋचांचे संकलन म्हणजे वेद होय. व्याकरणाच्या बळावर वेदांचे रहस्य समजत नाही. वेदांचे रहस्य समजण्यासाठी प्राण-अपानाचे चिंतन करून त्या स्तरापर्यंत पोहोचून ऋषींनी परमात्म्याची वाणी ऐकली होती. या स्तरावर पोहोचल्याशिवाय व प्राणअपानाची साधना केल्याशिवाय केवळ व्याकरणाच्या व निसर्गाच्या बळावर वेदांचा अर्थ कोणी लावेल तर त्यामुळे गैरसमजच अधिक पसरतील. यामुळेच वेदाच्या एकाच ऋचेचा अर्थ सायणाचार्यांनी वेगळा, दयानन्दांनी काही वेगळा तर मेकेडॉनल, कीथ, मॅक्समूल्लर इत्यादि पाश्चात्य विद्वानांनी तिसराच अर्थ लावला आहे. म्हणून या उपनिषदात हे स्पष्ट केले आहे की जो ब्रह्मनिष्ठ आहे, जो ब्रह्माशी एकरूप झाला आहे तोच श्रोत्रिय आहे.

आता त्या पापातून तरून जाण्यासाठी त्या ब्रह्माला जाणण्यासाठी, प्राण-अपानाच्या क्रियेच्या माहितीसाठी काय कराल? उपनिषदात ऋषी म्हणतात ''तद्विज्ञानार्थ स गुरुमेवाभिगच्छेत्''- त्या परब्रह्माला जाणण्यासाठी सदगुरूला शरण जावे. सद्‌गुरू कसे ? ''श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठम्'' ज्यांनी वेदांचे रहस्य जाणलेले आहे व जे परब्रह्म परमात्म्यामध्ये स्थित आहेत असे सद्‌गुरू.

अशा प्रकारे पाप आणि पुण्याच्या प्रश्नावर वेद आणि उपनिषद यांचे एकमत आहे की राग आणि द्वेष हे पापाचे मूळ आहे. इंद्रिये व मन त्यांचा निवास आहे. आत्म्यास

किंवा परमात्म्यास जाणल्यानेच पापापासून मुक्ती मिळते. प्राण व अपानचे चिंतनच परमात्म्याला जाणून घेण्याचा खरा उपाय आहे आणि या सर्वांचे माध्यम सद्गुरू आहेत.

## गीता:

हाच निर्णय योगेश्वर श्रीकृष्णांच्या गीतेचाही आहे.

**(क) इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेतौ ह्यस्य परिपन्थिनौ ।।३/४।।**

इंद्रिये आणि इंद्रियांच्या उपभोगात राग आणि द्वेष स्थित असतात. या दोघांच्या मोहात अडकता कामा नये कारण हे दोघे आत्मपथावरील लुटारू आहेत.

श्रीकृष्णांच्या काळात धर्म-अधर्म तसेच पाप आणि पुण्याच्या बाबतीत समाजात अनेक रुढी प्रचलित होत्या; त्यापैकी काही रुढींना अर्जुनही बळी पडलेला होता. त्याने असे ऐकले होते की कुळाचा क्षय करणे पाप आहे, स्त्रियांनी स्वैराचार करणे पाप आहे, वर्णसंकर होणे पाप आहे, पिण्डोदक क्रिया नष्ट होणे पाप आहे, मित्रद्रोह पाप आहे, राज्य आणि सुखासाठी स्वजनांना मारणे महापाप आहे; परंतु त्याच्या या सर्व समजुतीना मान्यतांना योगेश्वर श्रीकृष्णांनी ''क्षुद्रं हृदय दौर्बल्यं'' असे म्हटले. 'कश्मल' म्हणजे अज्ञानमूलक असे म्हटले. ते म्हणाले मान्यवर पुरुषांनी या प्रकारचे कधी आचरण केले ना हे आचरण यश देणारे आहे ना स्वर्ग देणारे आहे. म्हणून हे सिध्द होते की, सामाजिक व्यवस्थेसाठी बनवलेल्या नियमांशी पापपुण्याचा काही संबंध नाही. श्रीकृष्णांचे मते या नियमांना पापपुण्य समजणे अज्ञानमूलक आहे. म्हणजे त्या सर्व समजुती म्हणजे अज्ञानच होत्या. मग पाप कशाला म्हणायचे?

(ख) यावर श्रीकृष्ण म्हणतात (अध्याय २, श्लोक ३३) की हे अर्जुना, सुख-दु:ख, लाभ-हानी, जय-पराजय यांना समान समजून तू युध्द कर. जर तू युध्द केले नाहीस तर तुला पापच लागेल. म्हणजे येथे युध्द न करणे पाप आहे असे म्हटले आहे. अध्याय ३, श्लोक ३० मध्ये युध्दाचा विधीही त्यांनी सांगितला आहे.

**मयि सर्वाणि कर्माणि सन्यस्याध्यात्म चेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वर ।।**

'अध्यात्म चेतसा'- म्हणजे अंतरात्म्यामध्ये चित्ताचा निरोध करून म्हणजेच ध्यानस्थ होऊन तुझी सर्व कर्मे मला अर्पण करून आशा- माया-ममता आणि क्रोधरहित होऊन युध्द कर. अर्जुना, जो मनुष्य माझ्या या मताप्रमाणे आचरण करतो तो सर्व कर्मांपासून मुक्त होतो. आणि जे दूषित दृष्टीचे लोक माझ्या या मताप्रमाणे वागत नाहीत म्हणजे जे या प्रकारचे युध्द करीत नाहीत त्या जड बुध्दीच्या लोकांना तू संपूर्ण ज्ञानापासून भ्रष्ट झालेले समज. ते कर्मबंधनातून मुक्त होत नाहीत. कारण कर्मबंधनातून सुटण्याचा उपाय युध्द हा आहे.

वास्तविक ही आंतरिक हृदयातली मनातील लढाई आहे. ज्याचे मन सर्व बाजूंनी म्हणजे संपूर्णपणे संयमित होऊन ध्यानामध्ये स्थिर झाले आहे, सर्व इंद्रियांचा निरोध केला आहे, एकान्तवासात जो राहात आहे, जवळपास कोणाचाही वावर नाही किंवा कोणीही नाही. मग अशा ध्यानमग्न अवस्थेत कोण लढणार आणि कोणाशी लढणार? तुम्ही सर्व बाजूंनी चित्ताचा निरोध करून त्याला ईश्वराच्या ठिकाणी केंद्रित करून स्थिर करून ध्यानमग्न होण्याचा प्रयत्न करता तेव्हा काम-क्रोध, राग-द्वेष, आशा-तृष्णा इत्यादी विजातीय प्रवृत्ती अडथळा बनून आड येतात. या प्रवृत्तींवर विजय मिळवून ध्यानस्थ होणे म्हणजेच वास्तविक युध्द आहे. हे युध्द केवळ अर्जुनाचे नाही. श्रीकृष्ण म्हणतात की सर्वांनी माझ्या मतानुसार वागावे.

**काम एष क्रोध एष रजोगुण समुद्भवः ।**
**महाशनो महापाप्पा विध्दयेनमिह वैरिणम् ।।३/१७।।**

अर्जुना, रजोगुणातून निर्माण होणारे काम-क्रोध अतृप्त अग्नीप्रमाणे भोगांनी कधीही तृप्त होत नाहीत. ते महान पापी आहेत. म्हणजे काम आणि क्रोध हेच पापाचे मूळ आहे. (येथे काम म्हणजे कामना-इच्छा)

इंद्रिये, मन आणि बुध्दी यांना कामक्रोधाचे निवासस्थान म्हटले आहे. म्हणून हे अर्जुना, तू प्रथम इंद्रियांचे संयमन करून ज्ञान व विज्ञानाचा नाश करणाऱ्या या कामरूपी पाप्याला मार. म्हणजे कामच पापी आहे आणि इंद्रियांचे संयमन करून त्याला मारण्यास सांगितले आहे.

(घ) दुसऱ्या अध्यायात म्हटले आहे की, इंद्रियांद्वारा विषयांचे ग्रहण न करणाऱ्या पुरुषांचे विषय निवृत्त होतात कारण ते विषयांचे ग्रहणच करीत नाहीत; परंतु विषयांची आसक्ती किंवा मोह थोडा शिल्लक असतो; परंतु परमात्म्याचा साक्षात्कार होताच ती आसक्तीही नाहीशी होते. म्हणजे परमेश्वराचा साक्षात्कार होईपर्यंत पापाचे मूळ समूळ नष्ट होत नाही.

(ङ) योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेमध्ये हे सत्य ही गोष्ट पुन:पुन्हा सांगितली आहे. तिसऱ्या अध्यायातील १३व्या श्लोकात ते म्हणतात की, यज्ञामध्ये शेष राहिलेले उरलेले अन्न ग्रहण करणारे संतजन सर्व पापांपासून मुक्त होतात. योगेश्वरांच्या मते यज्ञ म्हणजे चिंतनाची एक निर्धारित प्रक्रिया आहे ज्यात मनामध्ये स्थित असणाऱ्या चराचर जगताचे संस्कारच यज्ञातील हवन-सामग्री असते. राग-द्वेष हे तर मनातच राहतात. तेव्हा यज्ञामध्ये मनातील हे संस्कार स्वाहा होताच यज्ञाचा परिणाम दिसून येतो- ''यज्ञशिष्टामृत भुजो यान्ति ब्रह्म सनातनम्'' यज्ञ पूर्ण होताच यज्ञ ज्याची संरचना करतो त्या ज्ञानामृताचे पान करणारा योगी शाश्वत सनातन ब्रह्म प्राप्त करतो. यज्ञामध्ये फक्त परमात्माच उरत असतो. प्रकृती लुप्त होते- नष्ट होते फक्त पुरुषच शेष उरतो. आणि ते ब्रह्मच अन्न आहे. ते ब्रह्म प्राप्त करून घेणारे संतजन सर्व पापांपासून मुक्त होतात. परंतु जे चिंतन तर करतात, पण त्याच्या बदल्यात शरीरासाठी उपभोगांची इच्छा ठेवतात असे लोक श्रीकृष्णाच्या मते पापी आहेत. अर्थात वारंवार शरीर प्राप्त होणे हेच पाप आहे आणि जो ब्रह्माला जाणतो तोच पुण्यकर्म करीत असतो. कारण ब्रह्माला जाणणे म्हणजेच पुण्यकर्म होय.

(च) १०व्या अध्यायातील ३ऱ्या श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात की, जो मला जन्ममृत्युरहित, आदिअंतरहित व सर्व लोकांमध्ये श्रेष्ठ-महेश्वर; असे माझ्या साक्षात्कारासह जाणतो तोच ज्ञानी आहे व तोच सर्व पापांपासून मुक्त होतो. तेव्हा ईश्वराच्या साक्षात्कारासह त्याची प्राप्त होणारी माहिती म्हणजेच ज्ञान होय. साक्षात्कार होताच पापांपासून निवृत्ती मिळते. त्यापूर्वी पापापासून मुक्ती मिळत नाही.

(छ) सातव्या अध्यायातील २७-२८ व्या श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात की, अर्जुना, इच्छा व द्वेष यांपासून उद्‌भवणाऱ्या द्वंद्वाच्या योगाने मोहित झालेल्या या जगातील लोकांना अति अज्ञानता प्राप्त होते; परंतु 'पुण्य-कर्म' करणाऱ्या ज्या

पुरुषांचे पाप नष्ट झाले आहे ते रागद्वेषादि द्वंद्वापासून मुक्त होऊन आपल्या व्रतामध्ये दृढ राहून मला भजतात. जे मला शरण येऊन जरा-मरणापासून सुटण्याचा प्रयत्न करतात ते त्या ब्रह्माला जाणतात, सर्व कर्मांसहित मला जाणतात आणि तत्क्षणी माझ्या ठिकाणी निरंतरासाठी स्थित होतात. म्हणजेच जरा-मरणापासून मुक्ती देणारे कर्म ते खरे पुण्य-कर्म होय. जे शाश्वताचे ज्ञान करून देते आणि जे शाश्वतामध्येच साधकाला स्थिर करते ते खरे पुण्य कर्म आहे. या पुण्यकर्माच्या आचरणासाठी आपण श्रीकृष्णाला शरण गेले पाहिजे आणि ब्रह्माला जाणून घेऊन निरंतरासाठी श्रीकृष्णामध्ये स्थित झाले पाहिजे. तात्पर्य असे की, या पुण्यकर्माचे माध्यम म्हणजे सद्गुरू आहेत. बरोबर हीच गोष्ट उपनिषदातील ऋषींनी सांगितली आहे.

(ज) याच 'पुण्य-कर्मा'ला योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेमध्ये 'विहित कर्म', 'यज्ञार्थ कर्म', 'कार्यम् कर्म' 'नियत कर्म' किंवा 'निष्काम कर्म' अशा विविध नावांनी संबोधले आहे. या कर्मामध्ये पुढील तीन गोष्टींचा अंतर्भाव होत असतो- १) परमात्म्यामध्ये अत्यंतिक श्रध्दा २) त्या परमात्म्याचा नाम जप आणि ३) समकालीन तत्त्वदर्शी महात्म्यांची सेवा करणे आणि त्यांना आपली सर्व कर्मे अर्पित करणे, की ज्यासाठी ते प्रेरणा देतात की, ''तध्दिद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया'' (गीता, अध्याय ४) म्हणजे तत्त्वदर्शी महापुरुषांना शरण जाऊन निष्कपट भावाने त्यांची सेवा करणे आणि प्रश्न विचारून ते ज्ञान प्राप्त करणे की ज्याची प्राप्ती झाली असता सर्व प्रकारचे पाप समूळ नष्ट होते.

(झ) ८व्या अध्यायात याच्यावर पुन्हा जोर देताना श्रीकृष्ण म्हणतात की, 'ॐ' हा अक्षय ब्रह्माचा परिचय करून देणारा शब्द आहे. त्याचा जप कर आणि ध्यान माझे कर. १८व्या अध्यायात ते सांगतात की, सर्व धर्मांची चिंता सोडून तू मला शरण ये. मी तुला सर्व पापांतून मुक्त करेन. प्रथम त्यांनी सांगितले की, हृदयस्थ ईश्वराला शरण जाण्याने पाप नष्ट होते नंतर सांगितले की, तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जाण्याने पाप नष्ट होते आणि आता येथे म्हणतात की तू मला शरण ये, मी तुला समस्त पापांतून मुक्त करेन. अर्थात श्रीकृष्ण एक योगी होते, परमात्म भावामध्ये स्थित असणारे योगेश्वर होते; सद्गुरू होते. अर्जुनाने म्हटले ही होते की 'शिष्यस्तेऽहं' भगवन् मी आपला शिष्य आहे.

सारांश योगेश्वर श्रीकृष्णदेखील पापपुण्याचा निर्णय देतात. आपल्याला वेद-उपनिषदाच्या त्याच स्तरावर उभे करतात की, राग आणि द्वेष किंवा काम आणि क्रोधच पापाचे मूळ आहे. इंद्रिये आणि मनच त्यांचा निवास आहे. पापातून मुक्त होण्याचा एकच रस्ता आहे. परमात्म्याला जाणणे. वेद आणि उपनिषदे ज्याला प्राण-अपानाचे चिंतन म्हणतात; त्यालाच योगेश्वर 'यज्ञार्थ कर्म' असे म्हणतात आणि त्या कर्मांनीच परमात्मा प्राप्त करून घेता येतो असे म्हणतात. नियत यज्ञामध्ये प्राण-अपानाचे द्वारे नाप-जप ही मुख्य क्रिया आहे. त्याबरोबरच योगेश्वर दैवी संपदेचे अर्जन (प्राप्ती) आणि इंद्रिय-संयमावर भर देतात. तसेच उपनिषदांनी ज्याचे पुन:पुन्हा समर्थन केले आहे ते म्हणजे सद्‌गुरूला शरण जाणे आणि ईश्वराचे निरंतन चिंतन करणे यावरही त्यांनी भर दिला आहे. कठोपनिषदात द्वितीय वल्लीमध्ये सांगितले आहे की ज्याने दुश्चरित्र सोडलेले नाही म्हणजेच जो दुराचारी आहे, जो इंद्रियांचे संयमन करू शकत नाही, ज्याचे मन चंचल आहे त्याला परमात्म्याची प्राप्ती होऊ शकत नाही. पापातून मुक्ती किंवा 'पुण्य कर्म' द्वारा आत्मानुभूती याबाबत क्रमबध्द, स्पष्ट, बोधगम्य आणि संपूर्ण विवरण जेवढे गीतेमध्ये केलेले आहे तेवढे व तसे विवरण दुसऱ्या कोणत्याही धर्मग्रंथामध्ये नाही. व म्हणूनच गीता हे विश्वातील मनुष्यमात्रांना अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक असे विशुद्ध शास्त्र आहे. इतकेच नव्हे तर योगेश्वर श्रीकृष्ण उपनिषदापेक्षा अधिक खोल जाऊन सांगतात की पापाचे मूळ राग किंवा कामाचे मूळ आसक्ती आहे. आणि आसक्तीचे मूळ म्हणजे विषयाचे चिंतन आहे. तेव्हा विषयाचे चिंतन करणे सोडून द्या उलट मनाला निरंतर परमात्म्याच्या नामजपात व सद्‌गुरूच्या ध्यानामध्ये गुंतवा. म्हणजे पापाचे मूळ जे विकार त्याचे अस्तीत्वच नाही असे तुम्हांला वाटेल. विकारांना त्यांच्या विरोधी विचारांद्वारा जिंकणे अशक्य आहे. परमात्म्याच्या निरंतर चिंतनानेच ते विकार मनातून पूर्णपणे निघून जातील. लोक प्रयत्न करीत नाहीत म्हणून अन्यथा निरंतर चिंतनाच्या द्वारा विकारांचे निवासस्थान जे मन त्याला सुध्दा नेस्तनाबुद करता येईल. हा मार्ग इतका सुगम आहे की यापेक्षा सुगम दुसरे काही नाही.

पापाचे मूळ काम आहे व म्हणून सर्व प्रकारच्या कामना त्याज्य होत. मात्र एक कामना याला अपवाद आहे (गीता-अध्याय ७). 'धर्माविरुध्दो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ' जी इच्छा धर्माला विरोध करीत नाही, जी धर्माला अनुकूल आहे, जी परमधर्म परमात्म्याला अनुकूल आहे अशी कामना मी आहे. तेव्हा माझ्या प्राप्तीची कामना

केली पाहिजे. ही कामना अशी आहे की जी केवळ उचितच नाही तर आवश्यक आहे- ‘मामिच्छाप्तुं धनंजय’ माझ्या प्राप्तीची इच्छा कर. (गीता, अध्याय १२) त्यासाठी ‘मत्कर्मपरमो भव’ माझ्या प्राप्तीसाठी नियत कर्म कर कारण हेच एक असे कर्म आहे की जे अन्य सर्व कर्मांची बंधने तोडून टाकते व स्वत:ही जळून जाते आणि या प्रकारे जन्म-मरणाचे फेरे नेहमीसाठी संपतात.

सर्व प्रकारच्या परिस्थितींमध्ये शाश्वत अशा एकमात्र परमात्म्याच्या प्राप्तीसाठी नियत कर्माचे आचरणच पुण्य आहे आणि आत्मिक कर्मामध्ये अवरोध उत्पन्न करणे पाप आहे. संपूर्ण गीतेमध्ये या व्यतिरिक्त पापपुण्याच्या अन्य मान्यतेला पुष्टी दिलेली नाही. व म्हणून ईश्वरावर असीम श्रध्दा आणि त्याच्या प्राप्तीसाठी निर्धारित यज्ञ, (जसा श्रीकृष्णांनी सांगितला आहे तसा) त्यामधून तुम्ही जितके करू शकाल, जितका वेळ देऊ शकाल तेवढे सतत चिंतन करावे. हा चिंतनाचा अभ्यास क्रमश: वाढवावा. ६व्या अध्यायातील ३५व्या श्लोकात याबाबत श्रीकृष्णांनी सांगितले आहे की प्रयत्नपूर्वक अभ्यास करणारा योगी अर्थात परमात्म्याच्या मिलनासाठी यत्नशील व्यक्ती सर्व पापातून उत्तम प्रकारे शुध्द होऊन उत्तम प्रकारची परमगती प्राप्त करतो.

### रामचरित मानसामध्ये पाप आणि पुण्य :

पाप आणि पुण्याबाबत गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे तेच मत गोस्वामी तुलसीदासांनी रामचरित मानसामध्ये व्यक्त केले आहे. पापाचे मूळ जे राग किंवा काम याला सांख्यशास्त्रात मोह म्हटले आहे. गोस्वामी तुलसीदासपण म्हणतात- ‘‘करहि मोह वश नर अद्य नाना’’- मोहाला वश होऊन जे करायला नको ते पाप लोक करून बसतात. ‘‘क्रोध पाप कर मूल’’ येथे क्रोध पापाचे मूळ आहे. जसे गीता म्हणते-

**काम एष क्रोध एष रजोगुण समुभ्दवः ।**
**महाशनो महापाप्मा विध्दयेनमिह वैरिणम् ।।**

काम आणि क्रोध हेच पापाचे मूळ आहे. आता ते राहतात कोठे ते पाहा-

**तात तीन अति प्रबल खल, काम क्रोध अरू लोभ ।**
**मुनि विज्ञान धाम मन, करहिं निमिष महँ छोभ ।।**

हे विज्ञान धाम मुनींचे मनदेखील क्षणभर क्षोभित करतात. असो काम, क्रोध आणि लोभ हे तीन दुष्ट राक्षस मनात राहतात आणि योगेश्वर श्रीकृष्णांचे मत आहे की त्यांचा निवास मन आणि इंद्रिये हे आहेत. ते कसे दूर जातील ? तर-

**रामहि सुमिरिय गाइय रामहि । संतत सुनिय रामगुन ग्रामहि ॥**

सदैव एका रामाचे चिंतन केले पाहिजे.

रामचरित मानसाच्या मतानुसार भगवंताच्या संमुख होण्याने पापाचे निवारण होत असते- ''सन्मुख होइ जीव मोहिं जबहीं । जनम कोटि अघ्र नासहिं तबहिं ॥ एकमात्र रामावर, परमतत्त्व परमात्म्यावर नितांत श्रध्दा ठेवणारे श्रध्दावान प्रेमळ व्हा म्हणजे कोट्यवधी जन्मांच्या पापाचे शमन होईल. तुम्ही काहीही करा, कुठेही राहा मात्र एका परमात्म्याच्याप्रती अनन्य भावांनी श्रध्दाशील बना. ''पापिउ जाकर नाम सुमिरहीं । अति अपार भवसागर तरहीं ॥'' व्यक्ती कितीही पापी असली तरी ती जर परमात्म्याच्या परिचित नावाचा निरंतर जप करेल तर ती भवसागर पार करू शकेल. ''शरण गये मो से अधराशी ॥ होहि शुध्द नमानि अविनाशी'' कोणी अगदी पापाची राशी असेल तरी भगवंताच्या आश्रयाला जाताच तो शुध्द बनून जातो.

मध्यकालीन भारतात हा विचार दृढ झाला होता की काही जाती जन्मापासूनच पापी असतात. उदा. गवळी, भिल्ल, पारधी, कोळी, तेली, कुंभार, अंत्यज, वैश्य, शुद्र आणि स्त्रिया. परंतु प्राचीन आर्य ग्रंथात याचे कोठेही समर्थन केलेले नाही किंवा महापुरुषांनीही या रुढीला कोठेही मान्यता दिलेली नाही. त्यांची छाया पडताच सवर्ण भले स्नान करीत असले तरी महापुरुषांनी त्यांच्याकडे समान दृष्टीनेच पाहिले आहे. त्यांना सर्वजण पवित्रच दिसत. पापातून मुक्त होण्याचा उपाय जसा सवर्णांना आहे तसाच तो तथाकथित अस्पृश्यांना पण आहे.

**श्वपच शवर खस जनम जड पामर कोल किरात ।**
**नाम लेत पावन परम, होत भुवन विख्यात ॥**

त्या परम पवित्र ईश्वराचे नाम घेताच तो पवित्र बनतो. जगात जर कोणी पवित्र असेल तर तोच होय. जगातील सर्वांसाठी एकच प्रकारचे पाप असते व

एकच प्रकारचे पुण्य असते आणि ते प्राप्त करण्याचा सर्वांना समान अधिकार आहे.

''जासु नाम पावक अघ तूला''- भगवंताचे नाम म्हणजे पापरूपी कापसासाठी अग्नीप्रमाणे आहे. ''गिरिजा जासु नाम जपि, नर कटाहिं भव पाश ।''- नामजपाने चार वर्णातील कोणतीही व्यक्ती भवपाश पार करू शकते.

**राम भगत जग चारि प्रकाश । सुकृति चारिउ अनध उदारा ।**

गोस्वामींच्या दृष्टींने पुण्य करणारे हे चार प्रकारचे लोक आहेत. ते मनाने निर्मळ व निष्पाप आहेत परंतु या पुण्याचा सुकृतीचा आधार काय आहे?

तर भगवंताचे नाव

**चहूँ चतुर कहँ नाम अधारा । ज्ञानी प्रभुहिं विशेष पियारा ।।**

परंतु ज्ञानी पाप आणि पुण्य या दोन्हींच्या पलीकडे असतो म्हणून तो विशेष प्रिय असतो.

या चारी सोपानांना गोस्वामींनी चार प्रकारचे भव (भवसिंधू, भवसरिता, भवकूप आणि गोपद) असे संबोधले आहे. चिंतन केल्यानेच भगवंताची प्राप्ती होते असे म्हटले जाते परंतु आपापल्या क्षमतेप्रमाणे लोक या चारी सोपानावरून चालत नाहीत. ज्याची क्षमता उच्च आहे त्याची ते नक्कल करतात. त्यामुळे जीवात्म्याचे आपल्या शुध्द वर्ण परमात्म्याकडे होणारी वाटचाल थांबते. व्यक्ती प्रकृतीमध्ये मिसळू लागते. असे वागणाऱ्याच्या वाट्याला पाप येते. आणि हेच वर्णसंकराचे स्वरूप आहे-

**भये बरन संकर कलि, भिन्न सेतु सब लोग ।**
**करहिं पाप पावहिं दु:ख, भय रूज शोक वियोग ।।**

तेव्हा जशी मानवाची क्षमता त्याप्रमाणे चिंतन केले पाहिजे.

युगे ही देखील साधनेचे चार सोपान आहेत, ज्यामध्ये कलियुगीन व्यक्तीला गोस्वामीजी एक महत्त्वपूर्ण आश्वासनसुध्दा देतात-

**कलि कर एक पुनीत प्रतापा । मानस पुन्य हेहि नहिं पापा ।।**

कलियुग भगवत पथावरील आरंभिक सोपान आहे. अचेत आत्मा जागृत होणे हे आत्मपथावरील पहिले पाऊल आहे. तमो गुणाच्या प्राबल्यामुळे असा साधक संत सद्गुरूच्या सेवेने तसेच भगवंतांच्या गुणगायनाने कलियुगाला पार करून साधक द्वापरमध्ये प्रवेश मिळवतो. आता त्याला मनाला समजण्याची क्षमता नसते. त्यामुळे आता मनात कितीही संकल्प आले, तर शरीराकडून चूक झाली नाही, विकारांना कार्यरूप दिले नाही तर पाप लागत नाही; परंतु मनाने तो सत्पथावर चालण्याचा संकल्प करतो तेव्हा ते त्याचे पुण्य असेल कारण तो त्या पुण्यमार्गाला लागलेला असतो. परंतु हाच साधक तिसऱ्या आणि चौथ्या श्रेणीत पोहोचतो तेव्हा संकल्पमात्राने पाप होईल आणि मग त्याचे प्रायश्चित घ्यावे लागते.

पुण्याच्या एकमात्र उद्गमाची घोषणा भगवान राम अयोध्येच्या जनसभेत करतात- ''पुण्य एक जग महँ नहिं दूजा । मन क्रम वचन विप्र पद पूजा'' जगात तेच एकमात्र पुण्य आहे. दुसरे कोणतेही नाही. कोणते? हेच की मन, क्रम आणि वचनाने ब्राह्मणाच्या चरणांची पूजा करा. असे उपनिषदांचेही म्हणणे आहे. कारण ब्राह्मण म्हणजे कोणती व्यक्ती नाही तर ब्राह्मण ही एक स्थिती आहे. जो ब्रह्मपरायण आहे, जो ब्रह्मपूरित आहे तोच ब्राह्मण आहे. त्यालाच संत म्हटले जाते. त्यांच्या चरणांचा आश्रय घेणे हे पुण्य आहे. गोस्वामीजी इशारा देत आहेत. संकेतही करीत आहेत- 'वंदउ प्रथम महीसुर चरना' त्यांचे लक्षण काय आहे? ते म्हणतात 'मोह जनित संशय सब हरना'- ते मोहामुळे उत्पन्न झालेले सर्व संशय दूर करतात. हेच लक्षण संतांचेही आहे. संतांच्या सहवासाने संशय आणि सर्व भ्रम दूर होतात. तेच खरे ब्राह्मण की जे द्वैतावर विजय मिळवून परमात्म्याशी एकरूप होतात. त्यांचा आश्रय घेणे पुण्य आहे. तेच पूजनीय आहेत.

आदि शंकराचार्य म्हणतात- 'को पूजनीय: शिवतत्त्वनिष्ठ:' पूजनीय कोण आहे? शिवतत्त्वामध्ये स्थित असणारे महापुरुषच पूजनीय असतात. याला संत तुलसीदासांनी सुध्दा पुष्टी दिली आहे. मानसचे मंगलाचरण पाहा.- ''वन्दे बोधमय नित्य गुरुम शंकर रूपिणम् ।'' त्या ज्ञानस्वरूप नित्य स्वरूप, शिवस्वरूप गुरुदेवांना मी नमस्कार करतो की ज्यांच्या आश्रयाला जाताच खोडसाळ चंद्रदेखील सर्वत्र वंदनीय होतो. ''मन ससि चित्त महान।'' मन हाच चंद्र आहे. तो वाकड्या-खोडसळ स्वभावाचा आहे, परंतु सद्गुरूचा आश्रय घेताच तो वंदनीय बनला.

याच प्रकरणात व अन्यत्रही भगवान राम म्हणतात की, ब्राह्मणाच्या पूजेने केवळ पुण्यच मिळत नाही; सर्व देवदेवतांसह मीही त्याला वश होतो. 'मन क्रम वचन कपट तजि, जो कर भूसुर देव। मोहि समेत विरंचि शिव, वश ताके सब देव'। ''शंकर भजन बिना नर, भगति न पावइ मोरि''। भक्ती माझी मिळेल परंतु सेवा श्रीशंकराची, शिवस्वरूप गुरुदेवाची ! ''मोते अधिक संत कर लेखा''- माझ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ संतांची सेवा आहे. ''मोते अधिक गुरुहि जिय जानी । सकल भाँति सेवइ सनमानी''. श्रध्दा परमात्म्यावर, पण पूजा सद्गुरूची म्हणजे लक्ष्य परमात्मा परंतु माध्यम सद्गुरू ''हरि तोषन व्रत द्विज सेवकाई'' हरीला संतुष्ट करावयाचे आहे परंतु सेवा ब्राह्मणाची करावी. ध्यान गुरुपद-नरव का किन्तु सुझेगा रामचरित। हीच तर पध्दत आहे.

रामचरित मानस लिहिता लिहिता गोस्वामींनी काही मानसिक रोगांचेही वर्णन केले आहे. जसे ''मोह सकल व्याधिन्ह कर मूला। तिन्ह ते पुनि उपजहि बहु शूला।'' समस्त व्याधींचे मूळ मोह आहे. ज्यातून अनेक प्रकारचे शूळ निर्माण होतात. काम हा वात आहे, कफ लोभ आहे, क्रोध पित्त आहे जो छातीचा दाह करतो. अहंकार हा गाठीचा रोग आहे. या प्रकारे काही रोगांचे विवरण केल्यानंतर शेवटी त्यांनी सांगितले आहे की मोहातून निर्माण होणारे असे अपार रोग आहेत. 'जाने ते छीजहि कुछ पापी।' त्यांना जाणल्यानंतर ते पापी थोडे क्षीण होतात. काम, क्रोध, मोह हेच पापाचे उद्गम स्थान आहेत.

हे रोग समूळ कसे नष्ट करता येतील ? यावर ते म्हणतात (उत्तरकांड-दोहा-२)

**रघुपति भगति सजीवनी मूरी । अनुपान श्रध्दा मति पूरी ।**
**सद्गुरु वैद वचन विश्वास । संयम यह न विषय कै आशा ॥**
**एहि विधि भलेहिं सो रोग नसाहीं**
**नाहिंत कोटि जतन नहि जाहीं**

भगवान श्रीरामाची भक्ती हीच संजीवनी आहे. त्यांच्यावरील श्रध्दा हेच अनुपान आहे. सद्गुरु है वैद्य आहेत. त्यांच्यावर अतूट विश्वास असावा. त्यांच्या निर्देशाप्रमाणे चालावे. तिसरी गोष्ट आहे विषयांपासून विरक्त होणे. या प्रकारे पापाचे उद्गम असणारे

हे रोग नष्ट होतील अन्यथा करोडो उपायांनीदेखील नष्ट होऊ शकत नाहीत. अन्य लाखो उपायांनी हे रोग नष्ट होणार नसतील; तर पाप नष्ट करण्यासाठी आपण कोणता उपाय करणार आहात ?

इंद्रिय संयम हीच हरीवरील श्रध्दा आणि हरीची पूजा आहे. 'हरिहर निन्दा सुनइ जे काना।' ज्यांची इंद्रिये ताब्यात नाहीत तेच हरीहराची निंदा ऐकू शकतात. मग इंद्रियांचे सर्व दरवाजे उघडे आहेत. निंदा करणे व ऐकणे हेच त्यांच्याजवळ राहते जे भयंकर पाप आहे.

संत किंवा सद्‌गुरुचे दर्शन हे अत्यंत पुण्यकारक आहे. या उलट दुर्जनाचे दर्शन व सान्निध्य मग ते कोणत्याही रूपात असो ते पापाचे कारण बनते की जसे प्रतापभानूच्या बाबतीत घडले. रामचरित मानसमधील घटना आहे. प्रतापभानू नावाचा एक चक्रवर्ती राजा होता. त्याच्याकडून पराभूत झालेला एक राजा मुनीचा वेश घेऊन एका घोर जंगलात संधीची वाट पाहत होता. एकदा शिकार करीत असताना राजा प्रतापभानू रस्ता चुकल्याने त्या घोर जंगलात घुसला; परंतु मुनीवेशातील राजाला तो ओळखू शकला नाही. त्याच्या वाणीने प्रभावित झालेल्या प्रतापभानूने आपल्या साठी एकछत्री, अकंटक राज्य आणि शेकडो कल्पपर्यंत सुख भोगण्यासाठी जरा-मरण व दु:खरहित शरीराची कामना व्यक्त केली की जे हे सर्व प्रतापभानुजवळ होतेच.

मुनी वेशधारी राजाने या कामनापूर्तीसाठी असा उपाय सांगितला की, प्रतापभानूला आपले राज्य व वैभव हातचे घालवावे लागले. त्याच्या वंशाचा समूळ उच्छेद झाला आणि 'भये सकल अधरूप' ते सर्वच्या सर्व पापस्वरूप बनले. वास्तविक जीवनभर त्यांनी पुण्यकर्मच केले होते मग कोणत्या कर्मामुळे हे भोगणे आले ? त्यांनी गुरू, देवता, संत, पितरे आणि ब्राह्मणांची सेवा केली होती; राजधर्माचे पालन केले होते, दान केले होते, वेदशास्त्र व पुराणे यांचे श्रवण केले होते, विहिरी, तलाव, ब्राह्मणांसाठी निवास तसेच प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणी मंदिरे बांधली होती, वेद-पुराणोक्त असे प्रत्येक यज्ञ हजार-हजार वेळा केला होता. या सर्व कर्माच्या फलाची कामनाही केली नव्हती. तरीही ''भये सकल अधरूप ?'' एकाही पुण्याने साथ दिली नाही. गोस्वामी या कथानकामधून काय सांगू इच्छितात ?

वास्तविक आपण वर उपनिषदांचे मत ऐकले. तेच गोस्वामी येथे सांगत आहेत. आत्मदर्शनाच्या निर्धारित क्रियारहित प्रत्येक कर्माचे पुण्य सामाजिक आहे परम कल्याणासाठी ते नसते. ते पुण्य अत्यल्प असते. प्रतापभानूची कामना परमात्म्यासाठी असती तर या जगातील सर्व इच्छा पूर्ण झाल्या असत्या. या भौतिक इच्छातृप्तीसाठी व्याकूळ होऊन वर लोक भगवंताला शरण जातात. आणि त्यांची इच्छा तो तृप्तही करतो. ध्रुवाला अचल स्थान मिळाले. बिभीषणाला कल्पाचे राज्य मिळाले. कागभुशुण्डी कालजयी बनले. जन्म, मृत्यू, जरा, व्याधी आणि दु:खांपासून मुक्ती मिळवण्यासाठी तर आपल्या पूर्वजा नी परमात्म्याची कामना केली. प्रतापभानूचीही हीच कामना होती.

कामना हे पापाचे मूळ आहे. श्रीकृष्ण म्हणतात, केवळ एक कामना अपवाद आहे व ती म्हणजे परमात्म्याची कामना आणि त्यासाठी निर्धारित कर्म अवश्य केले पाहिजे. परमात्म्याची प्राप्ती झाल्यानंतर दुसरे काहीही प्राप्त होण्याचे शिल्लक राहत नाही. पूज्य गुरुदेव म्हणत 'इच्छा राखे मोक्ष की ताहि शिष्य पहचान ।' ज्याला मोक्षाची इच्छाच नाही तो कसला शिष्य ? या प्रकारे जो शिष्याला मोक्षपथावर चालण्यास शिकवित नाही, त्याच्या हृदयाचा रथी बनून त्याला बोध देत नाही तो कसला सद्गुरू ?

वास्तविक सद्गुरूचा आश्रय महान पुण्याचे फल आणि अक्षय पुण्याचा स्त्रोत आहे; परंतु जोपर्यंत अशा प्रकारचा सद्गुरू मिळत नाही तोपर्यंत तुम्ही संतांवर श्रध्दा ठेवा. त्यांची सेवा करा. त्यांच्याकडून परम कल्याणाची इच्छा ठेवा. एका परमात्म्यावर निष्ठा ठेवा, त्याचा नामजप करा. भुकेलेल्यांना भोजन द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, प्रेम द्या. या सर्व पुण्यांचा संचय होऊन तो तुम्हांला कल्याणप्रेरक संतांपर्यंत किंवा सद्गुरूपर्यंत पोहचवून देईल. शास्त्रामध्ये याच गोष्टीवर भर दिला आहे की, ''पुण्य पुंज बिन मिलहि न सन्ता।''

''सन्त दरस जिमि पातक हरई''- संतांच्या दर्शनाने पापे नष्ट होतात टळतात. आणि भगवंताची प्राप्ती झाल्याने तुम्ही मुक्त होता. आणखीही एक समजूत आहे की, तीर्थयात्रा केल्याने पापे नष्ट होतात व पुण्यसंचय वाढतो आणि कदाचित तीर्थस्थानी कोणाकडून पाप घडले तर पाप अनेक पटीने वाढते- 'जिमि तीरथ कर पाप।' तेव्हा एक

नवीन प्रश्न उपस्थित होतो की, तीर्थ काय आहे? यावरदेखील विचार करणे असंयुक्तिक ठरणार नाही. महापुरुषांची वाणी पहा।

**साधूनां दर्शनम् पुण्यम् तीर्थभूता हि साधनः ।**

**काले फलन्ति तीर्थानि, सद्य साधु समागमः ।।**

संताचे दर्शनच पुण्य आहे. भूतकाळातील संतांचे राहण्याचे स्थान ते आजचे तीर्थस्थळ आहे. तीर्थस्थान तर कालान्तराने फळ देणारे असते; परंतु साधूचे दर्शन तात्काळ फळ देणारे असते. केवळ भारतातच नाही तर जगातील सर्व लोकांना तीर्थस्थळांना पापनाशक आणि पुण्यदायक समजण्याची प्रथा आहे. वास्तविक संतांच्या तपस्येचे स्थळ हे खरे तीर्थस्थळ होय. जगातील जेवढी तीर्थक्षेत्रे आहेत ती सर्व संतांच्या जीवनलीला जेथे घडल्या ती स्थानेच आहेत त्या व्यतिरिक्त काही नाही. मग ते संत कोणत्याही धर्माचे असोत किंवा ते स्थळ जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असले तरी त्या महात्म्याच्या पदचरणाने पुनीत झालेले असल्याने ते तीर्थस्थान म्हणून प्रसिध्द आहे. कोठे ते स्थळ म्हणजे जन्मस्थान आहे तर कोठे ते साधनास्थळ आहे, कोठे शिष्याना उपदेश केलेली जागा आहे तर कोठे ते महाप्रयाणाचे स्थळ आहे. एक गोष्ट मात्र खरी आहे; ती म्हणजे काही दिवस गेल्यानंतर त्या संबंधित महापुरुषांच्या जीवनाशी व त्या स्थानाशी काही चमत्कार जोडले जातात.

सारांश तीर्थांच्या मुळाशी तर संतच आहेत. महापुरुषांना ते सत्य कसे प्राप्त झाले ? बस हे मार्गदर्शन, प्रेरणा आणि सामुहिक उपदेश केंद्राच्या रूपातच त्या स्थळांचा उपयोग होत असतो. संतांच्या चरणधुळीमुळे, तिथले वायुमंडल शुध्द असते. त्यांनी मनन केलेली ती जागा शुध्द असते. भगवतचिंतनाच्या भावाने तेथे गेल्यास लगेच तुमचे मन ध्यानास अनुकूल बनते. त्या महापुरुषांना आम्ही नमन करीत असतो. त्यांच्याकडून शाश्वत सत्य प्राप्त करण्याची आणि समृध्दीची कामना करतो. तेथे थोडेफार दान-पुण्यही होते. आणि खरोखर साधना करीत असणारे जे साधक परमात्म्यामध्ये स्वत:ला विसरले आहेत अथवा त्या मार्गावरील पथिक आहेत असे क्रियावान पुरुष दानाचे अधिकारी असतात. पण्डे, पुजारी, बडवे अशा लोकांमुळे तेथील वातावरण थोडे कलुषित होते हे खरे, पण काळ स्वत:च त्यांची धुलाई करीत असतो. आणि मुख्य म्हणजे

तीर्थस्थानाची पवित्रता ठेवणे हे सर्वांचे कर्तव्य असते आणि या ठिकाणी सर्वांनी सतर्क राहावे.

समाजातील जवळजवळ अर्ध्यापेक्षा अधिक लोकांना तीर्थाचा उपयोग आहे. या ठिकाणी वरचेवर आल्याने ज्याला आत्मिक मार्गाचा बोध झाला, जो या मार्गावर चालू लागला, मनाच्या अंतर्यामी चित्तवृत्तींना प्रवाहित करण्याची क्षमता प्राप्त झाली तर त्या वृत्तींना संयमित करून आत्मदर्शनाकडे त्याने जायचे असते. पार्वतीला भगवान शंकर म्हणतात-

**इदं तीर्थं इदं तीर्थम्, भ्रमन्ति तामसा जनाः ।**
**आत्मतीर्थं न जानन्ति कुतः मोक्षः श्रृणु प्रिये ।।**

हे तीर्थ आहे, हे तीर्थ आहे असे म्हणत तामसी लोक भटकत असतात. ते आपल्या अंतर्यामी असणाऱ्या आत्म-तीर्थाला जाणत नाहीत. अशा लोकांना मोक्ष कोठून मिळणार ? वास्तविक चिंतनरत साधकांसाठी तीर्थांची जरूरी नसते उलट अधिक वेळ त्यांनी चिंतनात घालवायचा असतो. परंतु असा मनुष्य हजारात एखादाच असतो. 'नर सहस्त्र महँ सुनहु पुरारी । कोई एक होई धर्म व्रत धारी ।।'' बाकीच्या नऊशे नव्याण्णव लोकांसाठी तीर्थाचे महत्त्व असते. कारण मंदिर हेच आरंभिक प्रेरणा-स्थळ असते.

**तीर्थाटन साधन समुदाई । योग विराग ज्ञान निपुनाई ।।**
**जटँ लगि साधन वेद बरवानी । सबकर फल हरि भगति भवानी ।।**

तीर्थाटन इत्यादी सर्व साधनांचे एकमात्र फळ आहे भगवंताची भक्ती. व म्हणूनच जेथे जाण्याने अंतरंगातील सर्व प्रकारची श्रध्दा एका परमात्म्याच्या ठिकाणी स्थिर होत नसेल, जेथे आत्मदर्शनाचा विधी सांगितला जात नसेल, लोक स्वत: होऊन आत्मपथावर चालण्याचे ठरवित नसतील, जेथे जाण्याने विषयांपासून वैराग्य आणि इंद्रिय संयमांची प्रेरणा मिळत नसेल, प्रोत्साहन मिळत नसेल तर ते तीर्थ तीर्थ नव्हे. ते मंदिर मंदिर नव्हे. अशा स्थळी जाण्याने तुमचे नुकसान होईल. कल्याण कधीच होणार नाही.

जे स्वत: पवित्र झाले आहेत व दुसऱ्यांना पवित्र करण्याची ज्यांच्यात क्षमता आहे ते तीर्थ आहेत. व म्हणून जैन समाजात महापुरुषांना तीर्थंकर म्हटले जाते. आणि चिंतनाच्या या पवित्र मार्गामध्ये जो येतो तो या तीर्थाचा निवासी आहे. पूज्य महाराजजी

सांगत की घरात राहून भगवंताचे भजन करा. जर चूक कराल तर भगवान क्षमा करेल; पण घर सोडल्यानंतर चिंतनाच्या या मार्गावर थोडी जरी चूक झाली तरी भगवन तुम्हांला क्षमा करणार नाहीत. त्याचा इलाज करतील. ''जिमि तीरथ कर पाप''.

प्रश्नोत्तरामध्ये आदि शंकराचार्य सांगतात- तीर्थ परं कि ? सर्वश्रेष्ठ तीर्थ कोणते? 'स्वमनो विशुध्द:' प्रयत्नाने शुध्द केलेले आपले मनच सर्वश्रेष्ठ तीर्थ आहे. ज्या महापुरुषांमध्ये लोकांना पवित्र करण्याची क्षमता आली की मग बाहेर त्यांच्या निवासस्थानावरसुध्दा त्यांच्या या क्षमतेचा प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही. व म्हणून तीर्थ दोन प्रकारचे असतात. रामचरित मानसामध्येसुध्दा प्रयाग, चित्रकूट, काशी, कैलास, अयोध्या इत्यादि तीर्थस्थाने व गंगा, यमुना, गोदावरी, शरयू, आणि मंदाकिनी प्रभृती ज्या नद्यांचे वर्णन आहे ते सर्व बाह्य स्थानांबरोबरच मानसिक तीर्थदेखील आहेत. आणि या तीर्थस्थानांच्या वैशिष्ठ्यांचे वर्णन मानसमध्ये आहे तसे बाहेर या कोणत्याही तीर्थस्थानी शोधूनही सापडणार नाही.

उदाहरणार्थ प्रयाग घ्या. ज्या महापुरषांच्या अंत:करणात प्रयागची स्थिती आली त्यांचे निवासस्थलपण प्रयागच बनले. स्वयं भगवान म्हणतात- ''तीरथपति पुनि देखु प्रयागा । निरखत जनम कोटि अद्य भागा ।'' चौऱ्याऐंशी लाख जन्मांचेच केवळ नाही तर करोडो जन्मांचे पाप प्रयागचे दर्शन घेतल्याने नष्ट होते. परंतु खरोखर जेव्हा लोक प्रयागला जाऊन प्रयागचे दर्शन घेतात पण त्यांचा शोक, संताप कमी होत नाही. पापाचे परिणाम म्हणजे भय, शोक, वियोग, जन्म-मरण हे सर्व चालूच आहे मग पाप दूर झाले असे कसे मानावे ? असे सांगतात की प्रयागमध्ये ''चारि पदारथ मग भंडारू। '' परंतु या जन्मात हे सर्व मिळाल्याचे तर दिसत नाही.

प्रयागचे दुसरेही वर्णन मानसमध्ये केलेले आहे.

**मुद मंगलमय सन्त समाजू । जो जग जंगम तीरथराजू ।।**

प्रयाग म्हणजे मंगलमय संतांच्या समुदायाचे वास्तव्य. हे प्रयाग प्रेमाचे आहे, भक्तीचे आहे, मांगल्याचे आहे. या प्रयागमध्ये भगवंताच्या चरण कमलाप्रती अपार प्रेम मनात दाटते ज्यामुळे ''**लहाहि चारि फल अछत तन, साधु समाज प्रयाग** । चार प्रकारची फळे मेल्यानंतर नव्हे; पण या शरीरातच जीवंतपणीच प्राप्त होतात. दोन प्रयागांचे वर्णन करून गोस्वामी काय सांगू इच्छितात ? हेच की प्रयाग

म्हणजे मानस तीर्थ ही आहे आणि लोकांत प्रचलित प्रयागाऐवजी संत समागमातून पैदा होणारे प्रयाग प्रत्यक्ष फल देणारे व श्रेष्ठ आहे. व म्हणून या मानस तीर्थाचा स्वत:मध्ये शोध घ्या. या तीर्थाला स्वत:मध्ये मिसळून टाकण्याचा- प्रवाहित करण्याचा, एकजीव करण्याचा प्रयत्न करा. म्हणजे अनंत कोटी तीर्थांहून अधिक पवित्रता तेथे येते. ''**तीरथ अमित कोटि सम पावन नाम अखिल अध पूग नसावन ।।**'' तर तिकडे नामजपाने पापाचे निवारण होते. नामदेखील पवित्र आहे. ''**काहि नाम बारक तेपि पावन होहिं राम नमामि ते।**'' परमेश्वराच्या ''**पावनम् पावनानाम्।**'' नावामध्ये तीर्थाच्या सृजनाची क्षमता असते.

याच प्रकारची मानसिक नदी आहे - मानसची मंदाकिनी !

गोस्वामींनी लिहिले आहे-

''**सुरसरि धार नाउँ मन्दाकिनी। जो सब पातक पोतक डाकिनि ।।**''

ही मंदाकिनी म्हणजे गंगेची धार आहे असे गोस्वामी म्हणतात. म्हणजे त्यांना भूगोलाचेही ज्ञान नसावे. असेच ते शरयू नदीच्या बाबतीतही लिहितात- ''नदी पुनीत सुमानस नन्दिनी। मानस मूल मिली सुरसरही।।'' पवित्र शरयू नदी मानससरोवरातून निघाली आहे आणि गंगेला ती मिळते. वास्तविक ना मंदाकिनी निघाली आहे ना शरयू नदी मानससरोवरातून निघाली आहे. गोस्वामींजीना हे माहीत नाही का ? तसेच ना मंदाकिनी गंगेला मिळते ना शरयू । मग त्यांनी असे का लिहिले आहे ? कारण त्यांनी लिहिलेले सत्यच आहे. खोटे नाही. कारण गोस्वामींच्या दृष्टीतून रामभक्ती हीच गंगेची धारा आहे व रामकथा मंदाकिनी आहे. कथा भक्तीचेच एक अंग असते, आरंभिक स्तर असतो. मंद गतीने चालणाऱ्यांच्या अवस्थेचे प्रतीक मंदाकिनी आहे. म्हणून पापाला नाही तर 'पातक पोतक' पापांच्या पिल्लांनाच खाण्यात ती सक्षम आहे. थोडेसे असेच स्वरूप शरयू नदीचे आहे; तसेच अन्य तीर्थांचे सुध्दा.

बाह्य तीर्थ मानसिक तीर्थाची योग्यता प्रदान करू शकते, परंतु मानसिक पवित्रता तेथे मिळणे कठीण आहे. याचेच प्रतिपादन संत कबीरांनीही केले आहे.

**तीरथ गये एक फल, सन्त मिले फल चारि ।**
**सद्गुरू मिले अनन्त फल, कहै कबीर विचारी ।।**

तीर्थाला जाण्याने एकच फळ मिळते ते म्हणजे पुण्य-पुरषार्थाचे वाढ होते. ते पुण्य आपल्याला संतांची भेट घडवून देते. ''संत मिले फल चारि''- मात्र संतांच्या भेटीने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारींचे स्त्रोत मोकळे होतात. या संतांमध्ये सद्‌गुरूंचाही समावेश आहे. कारण त्यातलाच कोणी सद्‌गुरूच्या पदाला पोहचलेला असतो. असा जेव्हा, सद्‌गुरू प्राप्त होतो तेव्हा प्राप्त होते 'अनन्त फल' जे अनन्त आहे, असीम आहे. त्यांच्या कृपेमुळे ते शाश्वत परमतत्त्व-परमात्मा प्राप्त करून घेणे सुलभ होते.

समाजातील व्यवस्थेसाठी सामाजिक नियमांच्या बरोबर पाप आणि पुण्याची अवधारणा जोडली गेलेली आहे. गोस्वामी त्याला जगाचा अंतर्गत आणि विधात्याचा प्रपंच समजतात- ''विधि प्रपंच गुन अवगुन साना'' प्रपंच म्हणजे काय? ''दु:ख-सुख पाप-पुण्य छिन-राती।'' पाप आणि पुण्य प्रपंच आहे. जगामध्ये या नियमांच्या पालनाला पुण्य मानण्याची परंपरा आहे; परंतु आत्मदर्शनरहित क्रियेमुळे उपनिषदाप्रमाणे गोस्वामीजी याला प्रपंच म्हणतात आणि कदाचित तो आत्म दर्शनामध्ये अडथळा रूप होणार असेल तर गोस्वामी तो जळून गेला तरी चालेल अशी इच्छा व्यक्त करतात- ''जो सुख धरम करम जरि जाऊ । जहँ न राम पद पंकज भोऊ।। '' सामाजिक मर्यादा आपल्या जागी असतात, त्या योग्य ही असतात, परंतु आत्मदर्शनाच्या मार्गावर या मर्यादांचे पापपुण्याशी काही प्रयोजन असत नाही. भगवान म्हणतात ''गुरु पितु मातु बन्धु पति देवा। सब मोहि कहँ जामे दृढ सेवा'' त्याने सर्व काही मीच समजून माझीच सेवा करावी. अन्य कोणाच्याही बाबत त्याचे काही कर्तव्य शिल्लक राहत नाही. ''पाप-पुण्य की करे न आशा। सो पहुंचे रघुनायक पासा।।''

एकीकडे ते म्हणतात ''नाहिं असत्य सम पातक पुंजा''- असत्यासारखे दुसरे कोणते पाप नाही परंतु त्याच मानसमध्ये ते म्हणतात- ''समुझि न परइ' झूठ का साँचा ?'' एका दृष्टिकोनातून पाहिले तर ती गोष्ट सत्य वाटते. पण तीच गोष्ट दुसऱ्या दृष्टिकोनातून असत्य खोटी दिसते. तुम्ही म्हणता हे वस्त्र आमचे आहे. हे माझे नाव आहे. आपल्या दृष्टिने आपण सत्य बोलत आहात. पण जेथे तुमचे हे शरीरच तुमचे नाही तेथे हे वस्त्र तुमचे कसे झाले ? गर्भामध्ये तुम्ही असताना तुमचे हेच नाव होते ? पुढेही तुमचे तेच नाव राहील ? कोठपर्यंत ? जे तुमचे आहे त्यावर तर तुमचा अधिकार पाहिजे ना? मग तुमचे स्वजन अवेळीच का बरे निघून जातात ? व म्हणूनच जेव्हा गोस्वामी म्हणतात-

''नहिं असत्य सम पातक पुंजा'' त्याचा मतितार्थ काय आहे? वास्तवात परमात्मा हे एकमेव सत्य आहे. ''व्यापक एक ब्रह्म अविनाशी। सत चेतन धन आनन्द राशि'' या ब्रह्मांडाला व्यापून असणारा परमात्माच सत्य आहे. तो परम चेतन, आणि अनंत आनंदाची राशी आहे. याशिवाय दुसरे काही सत्य नाही. त्याचे पालन म्हणजेच पुण्य होय आणि त्याच्या उलट होणे, विपरीत होणे म्हणजेच सत्याला विसरणे म्हणजेच परमात्म्याला विसरणे म्हणजे पापाचा संचय होय. पापाचा पर्वत होय.

## उपसंहार :

आम्ही चांगलेच कर्म-कार्य का करावे ? याबाबत गीता म्हणते की, मनुष्यच कर्माचा कर्ता आहे- ''कर्मानुबन्धीनी मनुष्य लोके'' या शरीरामध्ये चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे संस्कार होतात- घडतात आणि नष्ट होतात. जर मनुष्य रागद्वेषांनी प्रेरित होऊन कर्म करेल तर त्याच्या मनात तशा प्रकारचे संस्कार तयार होतील. अंतसमयी ही तो त्याच प्रकारच्या कर्माचे चिंतन करेल आणि त्यामुळे त्या कर्माप्रमाणेच त्याला पुढील जन्मात शरीर प्राप्त होईल. आणि सतत ही कर्मे केल्याने तो आपल्या खऱ्याखुऱ्या कल्याणापासून वंचित राहील. म्हणजे पाप आणि पुण्य केवळ संस्कार बनवतात तर परमात्म्याला जाणण्याची क्रिया या संस्कारांना थांबवण्याचे काम करते.

मन एक क्षणही शांत राहू शकत नाही. संकल्पाचे दुसरे नाव तर मन आहे. ते नेहमी काही ना काही करीत राहते; परंतु एका वेळी ते केवळ एकच काम करते. नियत कर्म म्हणजे आराधना तसेच माता-पिता गुरुजनांची सेवा, देश-सेवा, समाज-सेवा आणि त्याच्या विपरीत अविहित कर्म म्हणजे चोरी, बेईमानी अशा प्रकारची जी कृत्ये तुम्ही करता त्यांनी आपल्या मनात अनेक संस्कार तयार होतात ज्यांना आपल्यालाच भोगायचे आहे व भोगण्यासाठी तर शरीर धारण केले आहे. व म्हणून जास्तीत जास्त वेळ चिंतनासाठी द्या जे तुम्हाला जन्म-मरणांच्या बंधनातून सोडवून आपल्याला अनंत-असीम आनंदाची स्थिती प्रदान करते. पापातून मुक्त होण्याचा किंवा पापापासून स्वत:ला दूर ठेवण्याचा व पुण्य मिळवण्याचा हा एकमात्र स्त्रोत आहे. विकार मनात निर्माण होतात शरीरात नाही, शरीरावरील लवेत नाही. तेव्हा केवळ शरीर स्वच्छ करून विकार कधीही नष्ट होणार नाही. या मानसिक विकारांवर भगवद् भजन हा एकच मानसिक उपचार आहे.

सारांश पाप आणि पुण्याच्या प्रश्नाबाबत वेद, उपनिषद, गीता, रामचरित मानस आणि जगातील सर्व महापुरुषांचे एकच मत आहे. इसाई, यहुदी आणि इस्लाम विचार-सरणीतही ह्याच विचारांचे सूत्र आहे. तेही पापाचे कारण सैतानच समजतात. सैतान हा एक अदृश्य जीव आहे जो मनुष्य शरीराच्या बाहेर राहूनही त्या अल्लाची किंवा गॉडची आज्ञा मानण्यापासून मनुष्याला परावृत्त करतो, किंवा त्याला ती आज्ञा मानू देत नाही. तर भारतीय ही गोष्ट अधिक स्पष्ट करतात. ते देवतांना आणि असुरांना मनुष्यातील अन्तर्निर्हित गुणांच्या स्वरूपात पाहतात. व मानव शरीरातच चराचर जगताचे बीज आणि त्याचा नियामक जो परमात्मा त्याचा वास असल्याचे सांगतात. राग आणि द्वेष हे विकारांच्या जन्मदाता असुरांच्या स्वरूपात तसेच याच्या उलट शम, दम, विवेक, वैराग्य, धारणा, ध्यान इत्यादि दैवी संपदेच्या स्वरूपात मानवाच्या अंतर्मनात वास करतात. व ही विचारसरणी आज ग्राह्य समजली जात आहे.

भारतीयेतर विचारसरणीतही पापाचा परिणाम मृत्यू असतो असे मानले आहे. आदमचे मूळ पाप आम्हांला जन्म घेऊन भोगावे लागत आहे. आणि जीवनामध्ये जो पाप करतो त्याचा परिणाम म्हणजे त्याला नेहमीसाठी नरक भोगावा लागतो. त्याला स्वत:ला सुधारण्याचा दुसरा काही उपाय नाही. या उलट भारतीय मुनींनी सांगितले आहे की पापाचा परिणाम म्हणजे पुनर्जन्म व या पुनर्जन्मामध्ये पुण्यसंचय करून नारकीय जीवनापासून मनुष्य मुक्ती मिळवू शकतो. पापाच्या कर्माचा परिणाम म्हणजेच जन्म-मृत्यूचे राहाटगाडगे चालत राहते. आजकाल जगात पुनर्जन्माच्या अनेक घटना प्रकाशात येत आहेत. त्यांचा विचार न करताही आम्ही समजा समजले की हे जीवन हेच अंतिम जीवन आहे तर मग ईश्वर आणि समाजातील नैतिक नियमांचे काही औचित्यच राहत नाहीत. या ईश्वराची सत्ता आम्ही पाहू शकत नाही आणि त्या विषयाबाबत काही दिसूनही येत नाही तर मग त्यांना न मानण्याने मेल्यानंतर नरकवास भोगावा लागतो यावर कसा विश्वास ठेवायचा? जर ती सत्ता आहे तर ती जाणता आली पाहिजे यावर श्रीकृष्ण म्हणतात, अहो तेच तर एकमात्र सत् आहे त्याला या शरीरात, या जीवनात केवळ जाणता येते असे नाही, तर त्याचे दर्शन, स्पर्श व साक्षात्कार या गोष्टीही सुलभ आहेत. प्रत्येक भारतीय महापुरुषांची हीच अनुभूती आहे. 'जाने बिन न होइ परतीति' कोणतीही गोष्ट जाणल्याशिवाय किंवा तिची प्रतीती आल्याशिवाय त्या गोष्टीवर विश्वास ठेवणे म्हणजे त्याला अंधविश्वास म्हटले जाते.

इस्लाम धर्मात पुण्याचा परिणाम स्वर्गप्राप्ती. जेथे थंड-शीतल पाण्याचे तलाव, दारूचे झरे, सुक्या मेव्याची रेलचेल आणि सुंदर बगीचे व अप्सरा, म्हणजे या जगात ज्या गोष्टी दुर्लभ आहे अशा वस्तूंचा भरपूर भोग असे सांगितले आहे. तर भारतीय ऋषी-मुनींच्या मते पुण्याची परिणती त्या परमात्म्याच्या प्राप्तीमध्ये होत असते, जो परमात्मा अनंत आहे, आनंदस्वरूप व अनिर्वचनीय आहे त्या परमात्म्याची प्राप्ती होते. आणि जो असीम आनंद प्राप्त होतो, तो भोगाचा नाही, परंतु परमात्म्याच्या प्राप्तीचा आनंद होतो. या बाबतीत येशूचे विचार भारतीय विचाराच्या निकट आहेत कारण त्यांनी म्हटले आहे की, परमात्म्यावर आणि येशूवर दृढ विश्वास ठेवल्याने अनन्त जीवन.. प्राप्त होते. शब्दांमध्ये साम्य आहे. येशूच्या इतर उक्तीही अशाच आहेत- ''मी प्रभू आहे व प्रभू माझ्यात आहे. मी तुमच्या आणि माझ्या पित्याकडे जातो. जो माझ्यावर दृढ विश्वास ठेवेल. तो माझ्यासारखेच कार्य करेल किंबहुना माझ्यापेक्षाही मोठे कार्य तो करेल.'' परंतु ख्रिश्चन लोक येशू हा एकटाच परमात्म्याचा पुत्र आहे असे समजतात. व स्वत: तसा पुत्र होण्याचा प्रयत्न सोडून देतात. इस्लाम धर्माचे अनुयायीसुध्दा मनुष्य परमात्मा होऊ शकत नाही असे समजतात. मुहम्मद पैगंबर फक्त दूत होते. सर्व ईश्वराच्या दूतावर प्रामाणिकपणाचे लेबल लावा पण इस्लाम धर्मालाच माना. 'मुहम्मद साहेब अंतिम ईश्वर दूत आहेत. म्हणजे पुढे पैगंबरासारखे कोणी व्हायचेच नाही. त्यांचा रस्ता बंद.

परंतु ज्या सुफी लोकांनी मुहम्मदाचा आशय समजून घेतला, त्यांच्यासारखी साधना केली त्यांना ईश्वराच्या निर्वाण दिनाची वाट पाहावी लागली नाही, ना स्वर्गात जावे लागले ना नरकवासाशी सामना करावा लागला. ते परमेश्वराशी एकरूप झाले. अशाच प्रकारचे चिंतन भारतीय धर्मामध्ये आहे.

पाप-निवारणाबाबत ईसाई लोक प्रार्थनेवर भर देतात. धर्मगुरूच्या (पोपच्या) समोर पाप कबूल करून त्यांच्याकडून क्षमेचे दान घेतात. कुराण शरीफमध्येही सांगितले आहे की, जो कृतकृत्यांचा पश्चाताप व्यक्त करून पुन्हा तसे न करण्याची प्रतिज्ञा करतो, गुन्हा प्रामाणिकपणे कबूल करतो, प्रामाणिकपणाने काम करतो मी त्यांच्या गुन्ह्यांना माफ करतो. पापांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी हृदयपूर्वक पश्चाताप करण्याचे महत्त्व भारतीय तत्वज्ञानातही सांगितले आहे; परंतु पाप समूळ नष्ट करण्यासाठी एक निर्धारित क्रिया-कर्म करून परमात्म्याकडे प्रवेश मिळवण्याचे त्यात विधान आहे. या दोन्ही

धर्मांमधील विचारसरणीमध्ये फरक असण्याचे कारण हे नाही की त्या महापुरुषांना त्या क्रिया किंवा ते कर्म सांगण्याचे आणि त्याबरहुकूम समाजाला क्रिया करायला लावण्याची संधीच त्यांना मिळाली नाही. चुकीच्या मार्गाला लागलेल्या समाजाला परमेश्वरापुढे झुकवण्याचा प्रयत्न करण्यातच त्यांचा वेळ पूर्ण झाला जो आत्मिक पथावर जाण्याचा प्रवेश होता.

भारतीय विचारसरणीत जे महत्त्व सद्गुरूचे आहे थोड्याफार फरकाने तेच स्थान पैगंबरांचे आहे. म्हणजे सद्गुरू किंवा पैगंबरांच्याशिवाय परमेश्वराला कोणी भेटू शकत नाही. किंवा स्वर्गाच्या राज्यात प्रवेश मिळवू शकत नाही; किंवा कोणाचे पाप माफ केले जात नाही. परंतु ते समजतात की पैगंबर या मानवतेसाठी अंतिम व्यक्ती होते. आपल्या लोकांच्यामध्ये त्यांच्यासारखे बनणे केवळ असंभवच नाही उलट ती स्थिती प्राप्त करण्याची इच्छा ठेवणेही त्यांची बेअदबी करण्यासारखे आहे. या उलट भारतीय विचारसरणीमध्ये गुरू शिष्याला आपल्यासारखा बनवतो. आणि प्रत्येक शिष्य गुरूचे गुरुत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतो. भारतीय तत्त्वज्ञानात सद्गुरूला इष्टच्या-ईश्वराच्या रूपात पूजणे आणि त्यांच्या द्वारा अचेत आत्म्याला जागृत करणे व हृदयात यौगिक क्रियेची त्यांच्या द्वारा जागृती करणे असे सांगितले आहे.

एक परमात्मा आणि एका गुरूवरचा विश्वास आपल्याला सत्यापर्यंत घेऊन जाऊ शकतो परंतु सत्याच्या अनुभूतीसाठी हृदयात सद्गुरूंविषयी अपार निष्ठा आणि त्यांनी निर्दिष्ट केलेल्या क्रियांद्वारे परमात्म्यात प्रवेश मिळवता येतो की जेथे पोहचल्यानंतर पापांचे शमन होते. उपनिषदातील ऋषींची अशी अनुभूती आहे की अशी व्यक्ति पाप आणि पुण्याच्याही पलीकडे गेलेली असते. म्हणजे पाप-पुण्याशी त्यांचा काही संबंध नसतो. गीतेमध्ये अर्जुनाने पाहिले की कौरव पक्षातील लोकांनंतर पांडव पक्षातील लोकदेखील श्रीकृष्णांमध्ये समाहित होत होते. त्यांच्या मुखात त्या लोकांचे चूर्ण होत होते. पुण्याचे अर्जन केले जाते; परंतु पापांचे शमन झाल्यानंतर पुण्य स्वत: शांत होऊन जाते. तेव्हा निर्दिष्ट क्रियांचे आचरण करणे हेच एकमात्र पुण्य आहे.

समाजाच्या अंतर्गत सदाचार आणि सद्व्यवहार पुण्य आहे ज्यामध्ये खरे बोलणे, परोपकार करणे व इमानदारीने वागणे हे पुण्य आहे. अधिकांश धर्मग्रंथात तसेच कन्फ्यूशियस, व प्राचीन यूनानी विचारसरणीमध्येपण आहे. परंतु या छोट्या छोट्या

स्तरांवरून चालता चालता जर परमेश्वराला तुम्ही आपल्यासमोर आणाल, त्या आत्म दर्शनाच्या क्रियेचे चांगल्या प्रकारे पालन कराल तर ते उत्तम प्रकारचे पुण्य आहे; मग भले मध्येच स्वर्गाची इच्छा होवो ! श्रीकृष्ण म्हणतात- मी तेही देतो. भगवान राम म्हणतात- ''जन कहँ नहिं अदेय कछु मोरे'' नि:श्रेयसबरोबर लौकिक समृध्दी आपोआप मिळते- ''तिमि सुख सम्पति बिनहिं बोलाये, धरम शील पाहिं जाहिं सुटाये।'' हे सर्व प्राप्त होतेच, परंतु परमात्म्याची मागणी केल्यामुळे, साधना विधी सम्मत झाल्यामुळे तो पुरुष शाश्वत धाम प्राप्त करतो मग त्याचे पतन होत नाही.

शेवटी पुन्हा पापपुण्याबद्दल स्पष्टता करूया. जे अध:पतनाकडे नेते, जे नैतिक पतन करते ते पाप होय. न केवळ परलोकात पण या लोकीसुध्दा जीवन दु:खमय बनवते. आणि पुण्यकर्म ते आहे जे पूर्णत्व प्रदान करते. हे पुण्य आपल्याला या लोकात भरपूर म्हणजेच समृध्द व तृप्त ठेवते आणि परलोकात आपल्याला शाश्वत धाम देववते. जे जन्म-मरणाचे निमित्त बनते ते पापकर्म आहे, व जे कर्म यातून बाहेर काढून साधकाला परमधाम देते ते पुण्यकर्म होय. हे पुण्यकर्म साधकाला आपली श्रध्दा ईश्वराच्या ठिकाणी दृढ करण्याने आणि ईश्वरासाठी निर्धारित क्रिया करण्याने प्राप्त होत असते. आत्मदर्शनाच्या निर्धारित कर्माच्या आचरणाने जगातील सर्व सुखभोग तर प्राप्त होतातच- ''सुर दुर्लभ सुख करि जग माहीं। अन्तकाल रघुपति पुर जाही।'' पण शेवटी शाश्वत धामामध्ये प्रवेशही मिळतो. आमचे दु:ख, दैन्य आणि गरिबीचे एकमात्र कारण आमची ईश्वराच्या प्रती अश्रध्दा आहे. अन्य काहीही नाही.

सत्य, इमानदारी, निष्कपट स्वभाव इत्यादीदेखील खरोखर पुण्यच आहे कारण कोणत्याही व्यक्तीचे असे आचरण त्याच्या स्वच्छ मनाचे प्रतिबिंब आहे. जर एखादी व्यक्ती दैनिक जीवनात सदाचारी, राहणी-करणीत स्वच्छ, स्वच्छ चारित्र्याची अशी असेल तर आत्मिक पथावरदेखील तो तशाच सरळपणाने चालेल.

**निर्मल मन जन सो मोहिं पावा । मोहिं कपट छल छिद्र न भावा ।।**

व म्हणून संत-पुरुषांद्वारा अनुमोदित सदाचार, शिष्टाचार व सद्व्यवहाराचे पालन करीत आत्मदर्शनाच्या क्रियेमध्ये रत व्हावे, चिंतनाच्या नियत क्रियेमध्येदेखील आपल्याला केवळ एवढेच तर करावयाचे आहे की एका परमात्म्यामध्ये श्रध्दा, त्याच्या नामाचा जप आणि सद्गुरूचे सान्निध्य ! आपण एवढेही करू शकत नाही का? हाच तर धर्म

आहे. जर एवढेच धर्माचे मूळ आहे तर याच्या व्यतिरिक्त आपण काय करता व कशासाठी करता? तेव्हा तुम्ही तुमचा प्रपंच नेटकेपणाने करा पण तो करीत असताना परमेश्वरासाठीही थोडा वेळ अवश्य द्या. ''जासु नाम पावक अघ तूला'' नामचिंतनाचा अग्नी प्रज्वलित होताच पापाचा कापूस अगदी लाख मण कापूस असला तरी तो जळायला फार वेळ लागत नाही. ''राम नाम आधी रती, तुलसी पाप पहार'' पापाचा डोंगर जरी पुढे उभा असला तरी चिंतनाची खरी पद्धत स्वीकारताच तोही जळून जातो. असो सांगण्याचे तात्पर्य एवढेच की खऱ्या पध्दतीने ईश्वराच्या रूपाचे चिंतन केले पाहिजे.

**(विचार विमर्शासाठी आपल्या सूचनांचे सदैव स्वागत आहे.)**

॥ॐ॥

**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।**

हे अर्जुना, 'सुकृतिन:'-उत्तम म्हणजे नियत कर्म (ज्यामुळे श्रेयाची प्राप्ती होते) करणारे, अर्थार्थी म्हणजे सकाम, आर्त: म्हणजे दु:खापासून मुक्त होण्याची इच्छा करणारे, 'जिज्ञासु:' म्हणजे परमेश्वराला जाणण्याची इच्छा करणारे आणि 'ज्ञानी' म्हणजे ज्यांना धर्मज्ञान प्राप्त झाले आहे असे चार प्रकारचे भक्तजन मला भजतात.

**-यथार्थ गीता: श्रीमद्भगवद्गीता**
(अध्याय ७, श्लोक १६)

धर्मासाठी भांडण तंटा करणे व्यर्थ आहे.
या विश्वात एकच धर्म आहे, जर दोन धर्म
असतील तर धोका आहे.

# सनातन धर्म

ज्यामध्ये सत्य नाही तो धर्म नव्हे.
धर्मामध्ये सत्यता नसेल तर ते जीवनपण निरर्थक आहे.

# सनातन धर्म

या जगात छोट्या किटकापासून चक्रवर्ती सम्राटापर्यंत सर्वजण कोणत्या ना कोणत्या दु:खापासून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करीत असतात. तरीही या दु:खातून मुक्ती मिळत नाही. मृगजळाप्रमाणे मनुष्य ज्या गोष्टींच्या-विषयांच्या मागे सुख समजून धावतो त्या गोष्टी प्राप्त झाल्यानंतर ते सुख नसून दु:खच असल्याचे त्याच्या प्रत्ययाला येते. आणि मग वाटते सुख थोडे याच्यापुढे आहे. अशा परिस्थितीमध्ये प्राचीन मुनींनी दु:खाच्या पलीकडे असणाऱ्या सुखाचा व नश्वराच्या पलीकडे असणाऱ्या शाश्वताचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्यांनी शोध घेतल्यानंतर ते म्हणाले, 'श्रृण्वन्तु विश्वेऽमृतस्य पुत्रा:' अमृताच अंश असणाऱ्या विश्वभरच्या लोकांनो ऐका. 'वेदाश्मेतंपुरुषं महात्तमां' मी त्या परमपुरुष परमात्म्याला चांगल्या प्रकारे जाणले आहे. तो 'आदित्यवर्ण: तमस: परस्तात' प्रकाशस्वरूप व अंधाराच्या पलीकडे आहे. 'तमेव विदित्वा अति मृत्युमेति' त्याला जाणल्यानंतर तुम्हांला मृत्यूपासून मुक्ती मिळते. 'नान्य: पन्था विद्यते अयनाय' त्याच्या व्यतिरिक्त अन्य कोणताही शाश्वत सुखाचा मार्ग नाही.

या शोधाच्या संदर्भात याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी यांची एक कथा आहे. याज्ञवल्क्यांचे मन सांसारिक उपभोगांनी तृप्त होत नव्हते; तेव्हा ते ऋषींना भेटले. त्यांच्याकडून साधनेचा क्रम समजून घेऊन परमात्म्याच्या शोधाच्या हेतूने ते जंगलात जायला निघाले. आपली भार्या जी मैत्रेयी हिला आपली धनदौलत देऊ लागले. तेव्हा मैत्रेयीने त्यांना विचारले की, या संपत्तीने मी अमर होईन का ? याज्ञवल्क्य म्हणाले नाही; पण धनीक लोक जसे आपला जीवन-निर्वाह करतात तसा तूही करू शकशील. त्यावर मैत्रेयी म्हणाली मृत्यूचे भय राहणारच असेल तर मग ही धनदौलत घेऊन मी काय करू ? तुम्ही मला अशी वस्तू द्या की ज्याने मी अमर होऊ शकेन व मला कसलाही शोक राहणार नाही. तेव्हा याज्ञवल्क्यांनी तिला ही परमात्म्याच्या प्राप्तीचा विधी सांगितला. वैदिक युगातील महान नारींमध्ये या मैत्रेयीचे नाव आजही मोठ्या श्रद्धेने घेतले जाते.

जीवन व मृत्यूचे हे रहस्य जाणण्यासाठी दु:खातून मुक्त होण्यासाठी व समस्त प्राण्यांना दु:खापासून मुक्त होण्याचा, त्यातून वाचण्याचा विधी सांगण्यासाठी गौतम बुद्धांनी प्रतिज्ञा केली की, जोपर्यंत त्या विधीचे ज्ञान मी प्राप्त करू शकणार नाही

राजधानी कपिलवस्तूत मी पाय ठेवणार नाही. महात्मा येशू म्हणतात- ("For what is a man profited if he shall gain the whole world and lose his soul") जरी मनुष्याला विश्वाची दौलत मिळाली; पण तो जर स्वतःचा आत्माच हरवून बसला तर त्यासारखे भयंकर नुकसान-भयंकर हानी दुसरी कोणतीही असणार नाही. तेव्हा प्रथम ईश्वराच्या राज्यात प्रवेश मिळवा म्हणजे बाकीच्या सर्व वस्तू तुम्हांला आपोआप मिळतील.

मुहम्मद साहेबपण म्हणतात- ''ज्यांनी अल्लाला जाणले नाही-ओळखले नाही, त्यांनी स्वतःचे खूप नुकसान केले आहे''. या प्रकारे सर्व महापुरुषांनी एकच गोष्ट सांगितली आहे की दुःखापासून स्वतःला वाचवण्यासाठी, शाश्वत शांती व भौतिक समृद्धीसाठी परमेश्वाराला जाणणे अत्यंत आवश्यक आहे. या शोधाची स्मृती अक्षय-अमर ठेवण्यासाठी महर्षी व्यासांनी ऋषींच्या द्वारे अनुभूत ऋचांचे संकलन वेदाच्या रूपात केले. वेद चार आहेत. त्यांना चांगल्या प्रकारे समजण्यासाठी व समजवण्यासाठी आचार्य व्यासांनी उपवेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यक आणि उपनिषदे यांची रचना केली, आणि त्या सर्वांचा सारांश महर्षी व्यासांनी श्रीकृष्णोक्त गीतेमध्ये प्रस्तुत केला आहे.

सर्ववेदाः यत्पदम् आमनन्ति- सर्व वेद जे एकमात्र परमात्म्याचे मनन-चिंतन करतात; त्या परमात्म्याला पाहण्याचा-जाणण्याच्या विधीचे वर्णन मुनींनी सूत्ररूपाने दर्शनशास्त्रांत केले आहे. दृष्यते अनेन 'इति दर्शनात- ज्यांचे द्वारा त्या भगवंताला पाहता येईल अशी सहा शास्त्रे आहेत. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत या नावानी ती प्रसिद्ध आहेत. तथापि त्यांचे अनुयायी ''ईश्वर उपादान कारण आहे की निमित्त कारण आहे ? साधक अंती ईश्वर बनतो की ईश्वरासमान बनतो ?'' या प्रश्नांची व्यर्थ चर्चा करता करता ते द्वैत, अव्दैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाव्दैत इत्यादी संप्रदायांमध्ये बंदिस्त झाले. हृदयस्थ परम-पुरुषाच्या शोधाची प्रक्रिया शिथिल बनली व शास्त्रार्थाला अधिक महत्व प्राप्त झाले. एका धर्माच्या जागी तांत्रिक, पाशुपत, पांरात्र, शाक्त सौर, गाणपत्य, शैव, वैष्णव, नाथपंथी, जैन, बौद्ध, हीययान, महायान, ब्रजयान, सौतांत्रिक, वैभाषिक, योगाचार, माध्यमिक, श्वेतम्बर, दिगम्बर, दक्षिणमार्गी, वाममार्गी अशा शेकडो परस्परविरोधी पूजाविधींचे प्रस्थ वाढत गेले. शाश्वताचा पुजारी नश्वराच्यामागे धावू लागला आहे.

सध्याचा प्रचार-प्रसार विन्मुख सनातनी हिंदू, जैन, शीख, पारशी, यहुदी व प्रचाराच्यामागे धावणारे बौद्ध, इसाई आणि इस्लाम यांची विचारसरणी म्हणजे धर्म नाही. प्रत्येक देशात व प्रत्येक काळात महापुरुष झाले आहेत. त्यांचा उपदेश जिवंत ठेवण्यासाठी संस्था बनवल्या जातात, ग्रंथ लिहिले जातात. त्या आदर्श पुरुषाची स्मृती म्हणून मूर्ती बनवल्या जातात. परंतु कालांतराने संस्था, पूजन-स्थान, त्यांच्या गादीवर बसणारे आचार्य आणि त्यांचेकडून होणारी कर्मे-क्रिया हाच धर्म समजला जातो. महापुरुषाला गौण बनवले जाते. मंदिर, मशीद, चर्च आणि गुरुद्वारांमध्ये जाणे हाच धर्म बनला आहे. राम, कृष्ण, येसू आणि गुरू नानक यांची नावे अस्पष्ट होऊ लागली आहेत. धर्माच्या नावावर प्रचलित विचारसरणी, नाव तर आध्यात्मिकतेचे घेते, पण त्यातील आध्यात्मिकता तर कधीच विस्मृत झाली आहे. त्यामध्ये फक्त असहिष्णू संगठन वृत्ती शिल्लक राहिलेली आहे. दुसऱ्या संप्रदायांशी झगडण्यासाठी मात्र सर्व एक आहेत.

स्वत:ला सनातन म्हणवणारा हिंदू धर्मसुद्धा दोन भागांत विभागला गेला आहे- श्रोत धर्म आणि स्मार्त धर्म. श्रोत-धर्मात संस्कार आणि कृति येतात ज्यांचा उल्लेख वैदिक संहितेमध्ये आहे उदा- अग्नीची प्रतिष्ठा यज्ञ आणि सोमकृत्यात आहे, की ज्या विधींना समाज आज जाणतही नाही. स्मार्त धर्मात स्मृतिग्रंथात वर्णन केलेल्या कर्तव्यांची चर्चा आहे ज्यांना धर्मशास्त्रदेखील म्हटले जाते.

या धर्मशास्त्रामध्ये धर्माची अनेक रूपे पाहावयास मिळतात. उदा. विशिष्ट धर्म तो होय की ज्याचे पालन वर्णाश्रम मानणाऱ्या सदस्यांनी आवश्यक ठरवले आहे. म्हणजे आपल्या चरितार्थासाठी ब्राह्मणांनी, अध्ययन-अध्यापन करावे. यज्ञ व दानाचा आश्रय घ्यावा. क्षत्रियांनी रक्षणाचा कार्यभार संभाळावा. वैश्यांनी गोरक्षा आणि व्यापार करावा. शुद्रांनी सेवाकार्य करावे. आश्रम-धर्मा मध्ये जीवनातील पहिली पंचवीस वर्षे विद्याध्ययन, पन्नास वर्षापर्यंत लग्न आणि परिवाराचे पालन-पोषण त्यानंतर वानप्रस्थ आश्रमात गृहाचा त्याग करून विषयांच्या प्रलोभना पासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच पंचाहत्तर वर्षांनंतर मोक्षसाधना सांगितले आहे.

तर सामान्य धर्म सर्वांसाठी असतो. त्याचे पालन सर्वांनी करावयाचे असते, जसे कोणत्याही जीवाला कष्ट न देणे, खरे बोलणे, देण्याघेण्याचा व्यवहार प्रामाणिकपणाने करणे, दान करणे दया-क्षमावृत्ती बाळगणे, तसेच चोरी, व्यभिचार, अभक्ष्य भोजन,

इर्षा, चहाडखोरवृती, मान-सन्मान, कपटी वृत्ती इत्यादींचा त्याग करणे, तसेच यज्ञ, दान आणि तप इत्यादी काम्यकर्मे आपल्या स्वार्थासाठी न करणे हा सामान्य धर्म होय.

तर निमित्त धर्म विशिष्ट वेळीच केले जातात. देश धर्म आणि युग-धर्माप्रमाणे संकटाच्या वेळी या नियमांमध्ये दिलेली सूट किंवा शिथिलतेला आपद् धर्म व राजकीय कर्तव्यांना राजधर्म म्हटले आहे. ज्याचे अनुयायी भिन्न आहेत त्याला परधर्म म्हटले आहे त्याच प्रकारे अल्प काळ राहणाऱ्या धर्माला व धर्मभासाला चल-धर्म असे म्हटले जाते. या धर्मापासून जे च्यूत होत आहेत अशा लोकांना या धर्माचे पालन करायला भाग पाडणे हे राजाचे कर्तव्य आहे.

आता आपणच विचार करा की, धर्माच्या मर्यादांमध्ये ईश्वराच्या शोधाचा भाग किती आहे ? अहो, ही फक्त सामाजिक व्यवस्था आहे. चार वर्णांमध्ये समाजाचे स्तरीकरण आणि चार आश्रमांच्या रूपात मानवी आयुष्याचे केलेले हे फक्त स्तरीकरण आहे-व्यवस्था आहे. समाजविरोधी कृत्यांचे उन्मूलन करण्याचे जे काम आज राज्य व्यवस्था करीत आहे ते कार्य प्राचीन काळी स्मृती धर्माच्या नावावर करीत होत्या. याला काय धर्म म्हणायचे ?

सनातन धर्माच्या नावावर रूढी आणि कुरूढी पूजल्या जात आहेत. जगात हिंदू लोक सर्वांत अधिक श्रद्धेने भजन करीत असतात, परंतु सर्वांत अधिक अधार्मिकपण तेच आहेत. जाती, देवता आणि गैरसमजुती-बस एवढाच सनातन धर्म राहिला आहे.

जर वर्ण-व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था हाच जर सनातन धर्म आहे तर शूद्रांसाठी तो अत्यंत वाईट आहे. धर्मातील एकाही गोष्टीचा त्यांनी विचार करणे म्हणजे त्यांना नरकवासाचे पाप भोगण्यासाठी आरक्षण करण्यासारखे आहे. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. ब्रह्मचर्य आश्रम त्यांच्यासाठी नव्हता मग त्यांना संन्यास कशाला मिळणार ? अहो पायाच ढासळला तर घर कसे उभे राहणार ? त्यांनी वैराग्यप्राप्तीसाठी धडपड करावी हे त्यांना शिकवलेच कधी गेले ? जर हा सनातन धर्म आहे तर हा धर्म तर समाजातील विशेष अधिकार असणाऱ्या काही थोड्या लोकांचाच धर्म झाला.

आधुनिक सुधारणावादी अध्वर्यू देशसेवा, सदाचार आणि परस्पर मानवप्रेम यालाच सनातन धर्म समजू लागले आहेत. जर हाच सनातन धर्म आहे तर आपल्याला हे गुण परदेशी लोकांकडून शिकायला लागतील. कारण देशभक्ती व प्रामाणिकपणाच्या

क्षेत्रात आपल्यापेक्षा अधिक श्रेष्ठ लोक परदेशात आहेत. मग तरीही भारत विश्वगुरू कसा ? पन्नास कोटी हिंदूमध्ये तेहत्तीस कोटीहून अधिक देवता ! त्यांची पूजा करणाऱ्या हिंदूच्या वेग-वेगवेगळ्या संगठना वेग-वेगळे संप्रदाय! हा काय धर्म झाला ?

वास्तविक हा धर्म नाही पण भयंकर भ्रम आहे. या सर्वांनी देशाला गुलाम बनवले आहे-राजनीतीच्या दृष्टीने व वैचारिक दृष्टीने पण ! ज्या प्रकारची वेळ आली, परिस्थिती आली त्यानुसार सामाजिक नियम धर्माच्या नावावर स्वीकारले गेले. पूर्वीच्या सतीच्या पद्धतीप्रमाणे आजदेखील जाती प्रथा, अस्पृश्यता, वेश्यावृत्ती, देवदासी प्रथा, बाल विवाह, हुंडा पद्धत, नशाखोरी, घटस्फोट, शाकाहार- मांसाहार, व्यवसायाची निवड, कुटुंबनियोजन या आजच्या सामाजिक समस्या आहेत व त्या सोडवण्यासाठी लोकशाही शासन तंत्र आहे. हे धर्माचार्यांचे क्षेत्र नाही व यात त्यांनी लुडबुड करू नये.

मानव समाज गतिशील आहे. तेव्हा सामाजिक व्यवस्थेच्या संबंधित असे आज उपयुक्त वाटणारे नियम, प्रथा आचार-विचार, आहार-विहार इत्यादी गोष्टी उद्याच्या परिस्थितीत कालबाह्य किंवा अनुपयोगी ठरतील. तेव्हा ज्या रितीरिवाजांना आणि संस्थांना आमच्या पूर्वजांनी स्थापित केले आहे त्यांना त्यांची ठेव समजून जसेच्या तसे त्यांना अनुसरणे आवश्यक नाही किंवा बंधनकारकही नाही. धर्माच्या नावावर प्रचलित या रिवाजात काव्य आहे, चरित्र आहे तसेच सामाजिक व्यवस्थापण आहे; परंतु हा धर्म कसा होऊ शकतो ? एक विशिष्ट परिस्थितीत आवश्यक वाटणारा नियम जर आज बाधक ठरत असेल तर आम्ही तो विसर्जित केला पाहिजे आणि आता नियमांचा अंत खरोखर आलेलाच आहे.

प्राचीन काळातील यज्ञ प्रथा, बलिप्रथा, दासप्रथा, स्वयंवर प्रथा आज नष्ट झाली आहे. इंद्र व वरुणाची पूजा लुप्त झाली व त्यांचे जागी ब्रह्म-विष्णू-महेश आणि इतर नवनव्या देवता विराजित झाल्या आहेत. सोम यज्ञाऐवजी आज अखंड कीर्तन आणि अखंड रामायण होत आहे. स्त्री व शूद्रांविषयींचे नियम, भोजन, आचार, पोषाख सर्व काही बदलू लागले आहे. जर हाच सनातन धर्म होता तर त्यात का बदल होत आहे. ? ज्यात बदल होतो तो सनातन कसा ?

जी सदैव टिकणारी सत्ता असते तिला सनातन म्हटले जाते. आणि ती सत्ता म्हणजे परमात्मा ! हा परमात्मा पूर्वी होता आणि आजही आहे. जर परमात्मा दोन आहेत तर त्यांना व्याप्त होण्यासाठी त्यांच्यासाठी सृष्टीपण वेग-वेगळी हवी. पण तसे नाही. ती एकच आहे व एकच राहील. त्याचा शोध घेणे म्हणजे तर धर्म होय, जो ऋषीमुनींनी जाणला होता. सृष्टीमध्ये धर्म एकच आहे तो म्हणजे अमृततत्त्वाची प्राप्ती, सदैव टिकून असणाऱ्या शाश्वतधामाची प्राप्ती. चराचर जगाचा धर्म एकच आहे. जर धर्म दोन असतील तर एकात निश्चितपणे धोका आहे.

आज 'धर्म' हा शब्द केवळ विशेषण म्हणून उरला आहे. स्थूल धर्म, सूक्ष्म धर्म, उप धर्म, कुल धर्म, गुणधर्म, श्रौतधर्म, वर्णधर्म, आश्रमधर्म, असे अनेक धर्म आहेत. या सर्व धर्मांच्या गदारोळात वास्तविक धर्म आपली ओळखच विसरून गेला आहे. धर्म शब्दाला त्याच्या शुद्ध रूपात पुन:प्रतिष्ठित करण्याने व्रतवैकल्ये, उपासतापास, तीर्थयात्रा, सणवार शुद्धिश्राद्ध, देवी देवता, भूतप्रेत, पशुपक्षी, वृक्षपूजा, नागपूजा तसेच मूर्तिपूजा अशा प्रकारचे थोतांड कुरिती नष्ट होतील. सामाजिक नीती तसेच अर्थव्यवस्था या समाजाला उपयोगी असणाऱ्या गोष्टींना धर्म म्हणणे आता सोडून द्यायला हवे. आजच्या परिस्थितीमध्ये हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की धर्माच्या अंतर्गत फक्त एकच गोष्ट येते व ती म्हणजे ती निर्धारित क्रिया, ते निर्धारित कर्म की जे करण्याने आत्मसाक्षात्कार होतो.

धर्माचे शुद्ध स्वरूप जाणण्यासाठी धर्म ज्यांच्या रोमरोमात खेळत आहे, धर्म ज्यांची देणगी आहे त्या महापुरुषांद्वारे समजून घ्यायला हवा. या व्यतिरिक्त दुसरा अन्य मार्ग नाही. पोथ्या वाचून किंवा पोथ्यांभोवती फिरून कोणताही धर्म प्राप्त होत नाही. वेदशास्त्र भले खरे असले तरी एखादा महापुरुषच ते शास्त्र वाचतो व त्यांच्या निर्देशाप्रमाणे काही थोडे साधक वाचतात. सर्वजणच वाचत नाहीत. किंवा सर्वजण जाणतही नाहीत. त्यातील शास्त्रार्थ जाणण्यास महापुरुषच सक्षम आहेत कारण ते शास्त्र त्यांच्या हृदयात उतरले आहे.

वेद काय आहेत ? त्या परमात्म्याची वाणी ! परमेश्वर तर कधी बोलायला आलाच नाही. बोलणारे तर शे सवाशे महापुरुषच होते. कधी नारायण ऋषी तर कधी दुसरे ऋषी ! त्या ऋषींच्या मनात जे प्रस्फुटित होत होते, तेथे बुद्धि केवळ यंत्रवत् होती अंत:करणात स्फुरत होते. त्याच्याद्वारे जे व्यक्त होत होते ते परमात्म्याचे निर्देशन होते, ती परमात्म्याची

आज्ञा होती. त्या महापुरुषांच्या त्या अंत:स्फुरित वाणींचे संकलन म्हणजे वेद होय. आजदेखील जो इष्टाची परीसीमा गाठेल त्याच्या हृदयाकाशात तो इष्ट आपली वाणी प्रस्फुटित करेल. सत्य व असत्याचा निर्णय देईल. ज्याच्या हृदयात परमात्मा जागृत आहे, ज्याच्या हृदयात शास्त्र अवतरित होत आहे तोच उत्तम प्रकारे जाणू शकतो की, जुन्या शास्त्रात काय सांगितले आहे ? कारण जी गोष्ट त्यांच्यात उतरली होती-त्यांना समजली होती, तीच त्यांच्यात उतरत आहे. आता या महापुरुषांनी 'धर्म' चा अर्थ काय सांगितला आहे ते आपण पाहू या. तसे पाहता धर्म शब्द धृज- धातूपासून बनला आहे. धृज् म्हणजे धारण करणे. 'धारयतीति धर्मः' परमेश्वर सर्वांना धारण करण्यास सक्षम आहे व तोच एकमात्र सर्वांना धारण करण्यात सक्षम आहे व तोच एकमात्र धर्म आहे. खरा धर्म तोच आहे की जर आम्ही त्याच्यापुढे वाकलो, त्याला शरण गेलो, तर तो आम्हाला धारण करील, मार्ग दाखवेल, आमचे बोट धरून आम्हाला चालवेल. हृदयात रथी बनेल व मग हृदयात ईश्वरीय आदेशांचे स्फुरण होऊ लागेल.

मीमांसाकार जैमिनी म्हणतात की, **'चोदना लक्षणो धर्मः ।'** ईश्वरीय आदेशांचे पालन करणे हेच धर्माचे लक्षण आहे. अर्थात जोपर्यंत हृदयात रथी होऊन तो निर्देश करीत नाही-आज्ञा करीत नाही व जोपर्यंत त्याच्या आज्ञेनुसार आम्ही चालण्यास आरंभ करीत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने धर्माचे लक्षण प्रगट होत नाही.

'वैशेषिक दर्शन' मध्ये कणाद म्हणतात - **'येतोऽभ्युदय नि:श्रेयस सिद्धिः स धर्म'** ज्याचेद्वारा जीवनातील प्रत्येक परिस्थितीत सर्वांगीण विकास होतो तसेच जो नि:श्रेयस परमश्रेयाची प्राप्ती करून देतो तो खरा धर्म आहे.

न्यायशास्त्राचे प्रणेते गौतम म्हणतात की **'विहित कर्मजन्यो धर्मः'** धर्म विहित कर्मजन्य असतो. विहित कर्म, नियत कर्म, कार्य कर्म, पुण्य कर्म इत्यादी कर्मांना गीतेमध्ये ईश्वर प्राप्तीची क्रिया असे म्हटले आहे. ही क्रिया म्हणजे यज्ञाची प्रक्रिया आहे, चिंतनाचा विधीविशेष आहे, आत्मदर्शनाची पद्धत आहे.

योगेश्वर श्रीकृष्णाच्या मते आपल्या स्वभावाच्या क्षमतेनुसार नियत कर्माचे (यज्ञाची प्रक्रिया) आचरण हेच धर्माचरण आहे. ज्या विधीने किंवा क्रियेने आत्म्याचे ज्ञान होते त्या विधीला क्रियान्वित करणे म्हणजे धर्माचे आचरण आहे. श्रीकृष्ण म्हणतात की जर तुमची बुद्धी त्या विधीला क्रियान्वित करण्यास सक्षम नसेल तर धर्माची सर्व प्रकारची

चिंता सोडून तू मला शरण ये, माझ्या आश्रयाला ये. मला शरण येणे हाच धर्म आहे.

भगवान बुद्धांनी सांगितले की, सम्यक वाणी, सम्यक् दृष्टी, सम्यक् जीवन, सम्यक् कर्म, सम्यक् संकल्प, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधीचे जो उत्तम प्रकारे आचरण करतो तो परिनिर्वाण प्राप्त करू शकतो.

महाराज मनुने धर्माची दहा लक्षणे सांगितली आहेत. धृती, क्षमा, दम, अस्तेय, शौच, इंद्रिय निग्रह, धी, विद्या, सत्य आणि आक्रोश ! एके ठिकाणी ते म्हणतात - **'विद्वद्‌भिः सेवितः पन्था नित्यमव्देषरागभिः हृदयेनाभ्यनुज्ञात यो धर्मः'** विद्वानांनी राग-द्वेषरहित हृदयाने ज्याला प्राप्त केले त्या नित्य मार्गाचे सेवन म्हणजे धर्म होय.

विद्वान म्हणजे जो शिक्षणाने लुप्त आहे- उत्तम शिक्षित आहे असा अर्थ नाही. **'विद्या हि का ब्रह्मगति प्रदाया'**- जी आपल्या जवळ येणाऱ्याला ओढून घेते व ब्रह्मगती प्रदान करते ती विद्या होय. वनवास काळात भगवान रामाने लक्ष्मणाला सांगितले की, विद्या आणि अविद्या मायेचे दोन पैलू आहे. अविद्या मनुष्याला अधोगतीला नेते व भवकूपात टाकते तर विद्या परमश्रेयास प्राप्त करून देणारी आहे. परंतु ती आहे-हरिप्रेरित ! आम्ही ज्या ठिकाणी उभे आहोत, ज्या परमात्म्याची आम्हाला इच्छा आहे तो आमच्या हृदयरूपी आकाशात जागृत व्हावा आणि आम्हाला प्रेरित करून आम्हाला त्याने चालवावे.

यामुळेच योगमार्गावरील जेवढे उत्तम विद्वान झाले ते पार्थिव शिक्षणात शून्य होते. कुशाग्रबुध्दी असणारे कागभुशुण्डी बुद्धी असनूही शिकले नाहीत कारण शिकण्यात त्यांना रस वाटला नाही. तरीसुद्धा ते त्यांच्या युगातील श्रेष्ठ विद्वान होते. ज्या ज्ञानी गरुडाच्या शंका स्वतः ब्रह्मदेवही दूर करू शकले नाहीत; कागभुशुण्डीच्या आश्रमात जाताच त्याच्या सर्व शंका दूर झाल्या. त्याचे समाधान झाले. तात्पर्य हे की भगवत्पथासाठी ज्या विद्येचा उपयोग असतो ती विद्या स्वतः भगवान देत असतात.

तेव्हा जी व्यक्ति परमात्म्यावर अतूट दृढ-श्रद्धा ठेवते, ॐ अथवा रामाचे (परमात्म्याचे परिचायक नाव) स्मरण करते तिला धर्माचे जरी ज्ञान नसले किंवा धर्म म्हणजे काय हे त्याला समजतच नसले तरीही तो शुद्ध धार्मिक आहे.

या प्रकारे सर्व महापुरुष एकाच परमात्म्यावर दृढ विश्वास ठेवतात. परंतु सर्वसामान्य लोक मात्र परमात्म्या ऐवजी नश्वराच्या मागे भटकत आहेत. आजकाल धर्माच्या नावावर ज्याप्रमाणे अनेक कुरिवाज कुरूढी चालू आहेत त्याप्रमाणे श्रीकृष्णांच्या वेळीही तशा रूढी होत्या. त्यापैकी काही रुढींचा बळी अर्जुनपण बनला होता. कारण कुळाचे रक्षण करणे याला सनातन धर्म समजत होता. पितरांना पिंड देणे यास सनातन धर्म समजत होता. आणि म्हणून श्रीकृष्णाला तो म्हणू लागला की, कुलक्षय करणारे असे हे युद्ध मी केले तर सनातन धर्म नष्ट होईल; परंतु योगेश्वर श्रीकृष्णांनी त्याला सांगितले की - अर्जुना, या अवघड प्रसंगी हे अज्ञान तुझ्यात कोठून आले ? अहो, अर्जुन तर सनातन धर्माचे रक्षण करण्यासाठी तर युद्ध करावयाचे नाही असे म्हणत होता. मग सनातन धर्माचे रक्षण करणे हेही अज्ञान आहे ? यावर श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले की ज्या गोष्टींसाठी तू इतका विकल झाला आहेस त्यासाठी श्रेष्ठ पुरुष कधीही विकल झाले नाहीत किंवा ना त्यांनी तसे कधी पाऊल उचलले. अरे त्या तुझ्या वागण्याने ना तुला कधी स्वर्ग मिळेल ना तुझी त्याने कधी किर्ती वाढेल. म्हणजे जो मार्ग कल्याणकारक नाही, कीर्ती देणारा नाही, संभावित पुरुषांनी ज्याचे चुकीने सुद्धा कधी आचरण केले नाही तो मार्ग अज्ञानमूलक आहे हे स्पष्ट आहे.

तेव्हा अर्जुनाने नम्रतेने विचारले-भगवान् जर हा धर्म नाही तर मग धर्म कशाला म्हणायचे ? मी तर तो धर्म जाणतच नाही. धर्माच्या या मार्गाविषयी मी खरोखरच अज्ञानी आहे - मूर्ख आहे - मूढचित्त आहे. तेव्हा जो धर्म निश्चितपणे कल्याणकारी आहे तो धर्म तुम्ही मला सांगा.

भगवंतानी सांगितले की - अर्जुना, असत् वस्तूचे अस्तित्व नाही आणि सत् वस्तूचा तिन्ही काळात अभाव नाही. मग ते सत्य काय आहे ? तेव्हा ते म्हणाले - अर्जुना, हा आत्मा हे सत्य आहे. आत्मा परमसत्य आहे. आत्माच सनातन आहे आणि सर्व प्राणिमात्रांचे शरीर नाशवंत आहे. त्यांना काही अस्तित्वच नाही. शरीरांना रोखता येत नाही. ती अशाश्वत आहेत. फक्त आत्मा शाश्वत आहे.

आपण कोण आहात ? सनातन धर्मी ! सनातन काय आहे ? तर आत्मा ! मग सनातनधर्मी कोण ? तर आत्म्याचा पुजारी हा सनातनधर्मी होय. जर आम्ही आत्मिक पथ जाणत नसू तर मग आम्ही सनातधर्मी कसे झालो ? या आत्म्याला शस्त्र कापू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, वायू त्याला कोरडे करू शकत नाही. पाणी

त्याला भिजवू शकत नाही, आकाश त्याला स्वत:मध्ये समाहित करू शकत नाही. पंचतत्त्वातून निर्माण झालेला कोणताही पदार्थ जर आत्म्याला स्पर्श करू शकत नाही तर पंचतत्त्वातून निर्माण झालेले अन्नपाणी त्याला कसे स्पर्श करू शकतील ? मग कोणी स्पर्श केल्याने किंवा कोणाच्या हातचा दोन घास भात खालल्याने किंवा दोन घोट पाणी प्यायल्याने आमचा शाश्वत सनातन धर्म कसा नष्ट झाला ? म्हणजे आमचे पूर्वज धर्माच्या नावावर ज्याचे पालन करीत होते, ती त्यांची चूक होती म्हणून तर श्रीकृष्णाने त्यांचे खंडन केले. ही चूक आजपण आम्ही करतच आहोत ज्यामुळे आम्ही सख्या भावांना सनातन धर्मापासून दूर राहण्यास विवश केले आहे.

जर आमचे शरीरच नाशवंत आहे तर मग त्याच्या जन्मावर आधारित असणारी जातिव्यवस्था कशी सनातन झाली ? तसेच जीवन निर्वाहासाठी - शरीरपोषणासाठी-शरीरनिर्वाहासाठी आवश्यक असणारी वर्णव्यवस्था सनातन कशी झाली ? अचलोऽयं सनातन: - हा सनातन आत्मा अचल आहे, शाश्वत आहे, अपरिवर्तनशील आहे तर मग तो बदलला कसा ? जो सनातनधर्मी आहे त्याचे धर्मपरिवर्तन कसे झाले? काय रामतत्व बदलून गेले ? नाही तो बदलत नाही. तो बदलत नाही आणि ज्यानी या प्रकारचे परिवर्तन केले किंवा करत आहेत ते केवळ एक कुरिती सोडून दुसऱ्या कुरितीमध्ये अडकत असतात. त्यातून त्यांना कोणताही धर्म प्राप्त होत नाही. ते धर्माला जाणतच नाहीत. जर आम्ही आत्म पक्षच जाणू शकत नाही, आत्म्याची स्थिती प्राप्त करून देणारे विधीविशेष जाणत नाहीत तर मग सनातन धर्माशी त्यांचा काय संबंध ? प्राणिमांत्रांचे सर्व शरीर नाशवंत आहे. ब्रह्मापासून निर्माण झालेले चराचर जगत् परिवर्तनशील, अशाश्वत आणि क्षणभंगुर आहे तरीही सनातनच्या नावावर कोणी झाडाची पूजा करीत आहेत तर कोणी दगडाला देव समजून त्याची पूजा करीत आहेत.

आत्मा अकाट्य, अशोक्य आणि अपरिवर्तनशील आहे. तो सर्वत्र सर्वांमध्ये आहे; परंतु त्याला शोधण्याचे व प्राप्त करण्याचे स्थळ हृदय देश आहे, बाहेर नाही. 'हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' परंतु अकाट्य, अशोष्य, अजर-अमर अशी एखादी सत्ता हृदयात दिसून येत नाही. उलट सूक्ष्म निरीक्षण केले तर शोक-संताप मृत्यू आणि मोह तेथे ठाण मांडून बसलेले दिसून येतात. यावर श्रीकृष्णांनी सांगितले आहे की, आत्म्याचे स्वरूप असेच आहे, परंतु तो अचिन्त्य व अगोचर आहे. जोपर्यंत चित्त आणि चित्ताची लहर असते तोपर्यंत तो अगोचर आहे. तो दिसत नाही. (अगोचर म्हणजे इंद्रिये असून

सुद्धा भगवंतला पाहू शकत नाही असा नाही. ईश्वर दिसतो पण इंद्रियांचा संयम केल्यानंतर त्या प्रभूच्या दृष्टितून. अकराव्या अध्यायात त्यांनी स्वत: म्हटले आहे की माझी अनन्य भक्ती केल्याने मी भक्ताला दिसू शकतो आणि माझ्यामध्ये प्रवेशही मिळवता येतो.

आता एक नवीन प्रश्न उपस्थित झाला की, चित्ताचा निरोध कसा होऊ शकतो? यावर श्रीकृष्ण म्हणाले अर्जुना, तू कर्म कर. यज्ञाला कार्यरूप देणे हे नियत कर्म आहे. सुरुवातीपासूनच हृदयात दैवी संपदेच्या गुणांचे पुष्कळ ग्रहण करणे हा एक यज्ञ आहे. आहार आणि इंद्रियांचा संयम करणे हा यज्ञ आहे. साधना सूक्ष्म झाल्यावर श्वास-प्रश्वासाचा जप म्हणजे यज्ञ होय. यज्ञस्वरूप महापुरुषाचे ध्यान करणे म्हणजे यज्ञ होय. या प्रकारे चौदा अंगांनी यज्ञाचे चित्रण त्यांनी चौथ्या अध्यायात प्रस्तुत केले आहे. सर्व इंद्रियांचा संयम करून चित्ताचा निरोध करणे हा विधिविशेष आहे. त्यांचे आचरण केल्याने प्राणांचे आयाम होते. अशा अवस्थेत ना आतून संकल्प यायला सुरवात होते ना बाह्य वायूमंडळातून संकल्प आत प्रवेश करतात. ही चित्ताची अचिंत्य अवस्था होय. मनाची निरोधावस्था होय. साम्यावस्था होय.

प्राणांचा व्यापार शांत होताच यज्ञ पूर्ण होतो. त्याचा परिणामही दिसून येतो. कारण पुढच्या श्लोकात ते म्हणतात 'यज्ञशिष्टामृत भुजो यान्ति ब्रह्म सनातनम् - यज्ञ पूर्ण झाल्यानंतर यज्ञ ज्याची संरचना करतो ते अमृत असते. ते ज्ञानामृत प्राप्त करणारा योगी सनातन ब्रह्माप्रत जातो. प्रथम त्यांनी सांगितले - आत्मा सनातन आहे. येथे सांगतात - ब्रह्म सनातन आहे. वस्तुत: आत्मा, परमात्मा, तत्त्व, परमतत्त्व, ईश्वर, सच्चिदानंद भगवान, शाश्वत, ब्रह्म इत्यादी एकाच परमात्म्याची विविध नावे आहेत.

या प्रकारे चित्ताच्या अचिंत्यअवस्थेत, निरोधावस्थेत ते अगोचर सनातन त्याच इंद्रियांमध्ये प्रवाहित झाले. प्रवाहितच नाही तर ते त्या इंद्रियांना ते प्राप्त झाले. परंतु एवढ्यावरच श्रीकृष्ण थांबत नाहीत. तर ते पुढे स्पष्टीकरण देऊ इच्छितात की, **'ब्रह्मदेवता ब्रह्मैव भवति'** 'जानत तुम्हहि तुम्हहि होईजाई । त्यांच्याच शब्दात पाहा **- इहैव तैर्जित: सर्गो येषां साम्ये स्थितम मन:** - ज्यांचे मन समत्त्वात स्थिर झाले त्या पुरुषांकडून जिवंतपणीच सर्व जग जिंकून घेतले जाते. आता समत्वाची स्थिती आणि जग जिंकणे यात काय संबंध आहे ? जर संसार जिंकून घेतला आहे तर मग तो

गेला कुठे ? थांबलाय कोठे ? यावर ते म्हणतात **निर्दोषं हि समं ब्रह्म** - ते ब्रह्म निर्दोष आणि सम असते. इकडे त्याचे मनपण समत्त्व स्थितीने परिपूर्ण झालेले असते. **तस्माद ब्रह्माणि ते स्थिता** व म्हणून तो परब्रह्म्यामध्ये स्थिर होतो.

ही स्थिती ज्या यज्ञातून मिळते त्या यज्ञाला कार्यरूप देणे हेच कर्म होय. म्हणूनच कर्मावर भर देत, योगेश्वर श्रीकृष्णांनी दुसऱ्या अध्यायातील ३९ व्या श्लोकात सांगितले आहे की आता तू निष्काम कर्म योगाच्या बाबतीत ऐक. ज्यांनी युक्त असलेला तू कर्मबंधनाला समूळ नष्ट करशील. तेव्हा जे कर्मबंधनापासून आपल्याला मुक्त करते ते खरे कर्म होय. या नियत कर्माचे दुसरे वैशिष्ट्य सांगताना ते म्हणतात **'नेहाभिक्रम नाशोऽस्ति'** या निष्काम कर्मयोगामध्ये आरंभाचा कधी नाश होत नाही. जर कर्म करण्यास आरंभ केला तरी त्या पुरुषाचा व त्या क्रियेचा कधी नाश होत नाही. ते मनुष्याचे कल्याणच करते. त्वरीत कल्याण झाले नाही तरी त्या कल्याणाचे आरक्षण झाले आहे असे समजावे. या जन्मात जेथून साधना खंडित होते, पुढच्या जन्मात ती तेथूनच सुरु होते आणि दोन-चार जन्मानंतर तो परमगतीला किंवा परमपदाला पोहोचतो. या कर्माचे तिसरे वैशिष्ट्य ते सांगतात **'प्रत्यावायो न विद्यतें** हे विहित कर्म केल्याने कसलेही विपरीत आणि सीमित फलरूपी दोषही त्याला लागत नाही. की जे त्याला स्वर्ग- वैकुण्ठ, ऋध्दी-सिद्धी, धर्मशाळा-पाठशाळा किंवा आश्रमात आसक्तीमध्ये उभे करेल. चौथे वैशिष्ट्य हे आहे की **'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्'** या धर्माचे थोडे जरी पालन केले तरी ते त्याचा जन्म-मृत्यूच्या महान भयातून उद्धार करणारे ठरते.

तुम्ही म्हणाल कसला धर्म ? या नियत कर्माचे आचरण म्हणजेच धर्म होय. याच्यापासूनच धर्माचे आचरण सुरू होते की ज्याच्या परिणामस्वरूप सनातनत्व त्याला विदित होते. ज्या कर्माचे आचरण म्हणजे धर्म आहे त्या कर्माला योगेश्वर श्रीकृष्णांनी साधकाच्या अन्त:दुर्बलतेच्या आधारावर चार भागात विभागले आहे. चौथ्या अध्यायाच्या १३ व्या श्लोकात ते म्हणतात **'चातुर्वर्ण्य मया सृष्टं'** चार वर्णांची रचना मी केली आहे. म्हणजे श्रीकृष्णांनी स्वत: मनुष्याची चार भागात विभागणी केली ? यावर ते म्हणतात नाही असे नाही **'गुणकर्म विभागश:'** मनुष्याच्या गुणाप्रमाणे त्याचे कर्म चार भागात मी वाटले आहे.

म्हणजे या विभाजना चा मापदंड गुण आहेत. जेव्हा अंत:करणात तामसी गुणांचे प्राबल्य होते तेव्हा आलस्य, निद्रा, प्रमाद या गुणांनी युक्त कर्तव्य कर्मात प्रवृत्त न होण्याचा स्वभाव, अकर्तव्य कार्य न ओळखण्याचा त्याचा स्वभाव असतो. मोहमयी प्रवृत्तींचा मनावर दबाव असतो. दोन तास ध्यानाला बसला तर दहा मिनिटेसुद्धा मन स्थिर ठेवून तो ध्यान करू शकत नाही ? अशा परिस्थितीत तो धर्माचे आचरण कोठून सुरू करणार ? यावर ते म्हणतात **'परिचर्यात्मकं कर्म'** हे कर्म सेवेने सुरू करा.

याच प्रकारे अर्धे तामसी गुण समाप्त झाले असेल तर तो वैश्य होय. या गुणांचे प्राबल्य असते तेव्हा ध्यानामध्ये थोडे मन लागू लागते, इंद्रियसंयमाची त्याच्याजवळ क्षमता असते. तामसी गुणांच्या बरोबर अर्धे राजस गुणदेखील शांत झाले आणि अर्धे सात्विक गुण जेव्हा येतात तेव्हा तो क्षत्रिय वर्णाच्या योग्यतेचा होतो. या गुणांचे प्राबल्य असताना तो प्रकृतीच्या व्दंव्दाने न घाबरणारा असतो. शौर्य व तेजाने तो युक्त असतो. आणि निष्काम कर्माचे चांगल्या प्रकारे तो आचरण करू शकतो. जेव्हा रजोतमो गुण बिलकुल शांत होतात, सात्त्विक गुणच कार्यरत असतात तेव्हा त्याच्या स्वभावात ब्रह्मपद प्राप्त करण्याची योग्यता असते. व म्हणून ब्राह्मण श्रेणीचे व्यक्तिमत्व आहे असे समजावे. या व्यक्तीमध्ये मनाचे शमन, इंद्रियांचे दमन, तप, धारणा, ध्यान ईश्वरीय अनुभूती इत्यादी ब्रह्मामध्ये प्रवेश देणारी योग्यता त्याच्या ठिकाणी असते. व म्हणून तो ब्राह्मण श्रेणीच्या कर्माचा कर्ता असतो. हे सर्व **'स्वभाव प्रभवैर्गुण:'**- स्वभावातून उत्पन्न होणाऱ्या गुणांवर आधारीत असतात. आणि त्यानुसार कर्म करणे हा त्या व्यक्तीचा धर्म असतो.

१८ अध्यायातील ४५ व्या श्लोकात योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात **'स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धि लभते नर:'** स्वभावातून निर्माण होणाऱ्या कर्माच्या क्षमतेप्रमाणे कर्माचरण करून मनुष्य भगवत्प्राप्तिरूपी परम सिद्धि प्राप्त करू शकतो. अर्जुना, मनुष्याच्या स्वभावामध्ये असणाऱ्या क्षमतेप्रमाणे कर्म करणारा मनुष्य परमसिद्धी कशा प्रकारे मिळवू शकतो ते तू माझ्याकडून ऐक. तुम्ही सर्वांनीच या विधानाकडे लक्ष द्या. (अध्याय १८ श्लोक ४६) ज्या परमात्म्यापासून सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली आहे, जो सर्वत्र व्यापून आहे त्या परमात्म्याला स्वभावामध्ये असणाऱ्या क्षमतेप्रमाणे किंवा प्राप्त झालेल्या कर्मांनी परमेश्वराचे अर्चन करून, त्याचे अत्यंत श्रद्धेने पूजन करून (ज्याचे वर्णन गीतेमध्ये ठिकठिकाणी केले आहे) मनुष्य परमसिद्धी प्राप्त करू शकतो.

यावरून स्पष्ट होते की सर्वत्र व्यापून असणाऱ्या परमेश्वराचे अर्चन, सर्वांगीण पूजन करणे किंवा क्रमश: साधनेचा सोपान चढणे हा मुख्य विधी आहे.

या स्वभावगत कर्मालाच भगवंतानी पुढे धर्म म्हटले आहे (१८ व अध्याय - श्लोक ४७) **'श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात्'** - स्वभावगत कर्म करण्याच्या क्षमतेनुसार कर्मामध्ये प्रवृत्त होणे हा आमचा धर्म आहे ते आमचे दायित्व आहे. तो लोकांच्या दृष्टीने भले शूद्र स्तरावरील असला तरी तो जर सेवापरायणवृत्तीने भगवंताचे पूजन-अर्चन करणारा असेल तर त्यालासुध्दा परमश्रेय प्राप्त होते. जर क्षमता नसतांना सक्षम साधकांची भक्तांची नक्कल करून अनुष्ठान करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याला परमश्रेय प्राप्त होत नाही तर त्याला भय प्राप्त होते व म्हणून स्वभावगत कर्माच्या श्रेणीनुसार धर्माचरण करून तुम्ही संपूर्ण पापापासून म्हणजेच जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त व्हा.

ब्राह्मणश्रेणीचे कर्मदेखील दोषयुक्त असते कारण अजून प्रकृतीचा अंतिम सात्त्विक गुण शिल्लक आहे. त्यातही अधोगतीचे लक्षण विद्यमान आहे. तो ढासळूही शकतो. तेव्हा तो गुण जोपर्यंत शांत होत नाही तोपर्यंत स्वभावगत कर्म हाच आमचा स्वधर्म आहे. व याचे क्रमश: पालन करीत मनुष्य शाश्वत-अमृत तत्त्व चांगल्या प्रकारे जाणू शकतो, त्याचे दर्शन करू शकतो, त्याच्यामध्ये प्रवेश मिळवू शकतो.

गीतेच्या मते या धर्माचरणाचा अधिकार कोणाला असतो ? हा धर्म फक्त सांधूंसाठी व महात्म्यांसाठीच आहे व संसारी मनुष्य या धर्माचे पालन करू शकणार नाही असा तर तुम्ही गैरसमज करून घेतला नाही ना ? हा गैरसमज दूर करताना श्रीकृष्ण म्हणतात (अध्याय ४/३६) अर्जुना, तू सर्व पापी लोकांपेक्षा अधिक पाप करणारा असलास तरी (अध्याय ९ व्या मधील तिसावा श्लोकपण **'अपि चेत् सुदुराचारो'**- अर्जुना, अत्यंत दुराचारी मनुष्य) जर अनन्य म्हणजे माझ्याशिवाय अन्य देवतांना न भजता जो केवळ अनन्य भावाने मला भजतो तो साधू मानण्यास योग्य आहे. कारण मला भजण्याचा त्याने दृढ निश्चय केलेला असतो. 'क्षिप्रं भवति धर्मात्मो' - तो लवकर धर्मात्मा बनतो. परमधर्म परमात्म्यात त्याचे मन विलीन होते व शाश्वत शांति त्याला प्राप्त होते.

तेव्हा तात्पर्य तुम्ही कितीही दुराचांरी असलात किंवा दुराचारांच्या इतर अनेक गोष्टी ठरवलेल्या असल्यात तरी परमात्म्याच्या ठिकाणी अनन्य श्रद्धा ठेवून त्याच्या प्राप्तीची क्रिया म्हणजे यज्ञ प्रक्रिया अत्यंत श्रद्धेने जर करत असाल तर तुम्हीही संत आहात. शुद्ध धार्मिक आहात. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवावी की तत्त्वदर्शी व्यक्तीबद्दल अतीव श्रद्धा आणि तिचे सान्निध्य आवश्यक आहे. त्या परमात्म्याच्या शिवाय सृष्टीमध्ये दुसरे काहीही सत्य नाही. अन्य कोणाचे पूजन करण्याची आवश्यकता नाही.

नोट- इतका स्पष्ट निर्देश असतानाही लोक दगडाला पूजतात, पाण्याचे पूजन करतात. ते म्हणतात ''का दगडात भगवान नाही का ? मूर्तिपूजा सगुणोपासना आहे. हृदयामध्ये ध्यान लावणे हा तर ज्ञानमार्ग आहे'' वस्तुत या सर्व गोष्टी म्हणजे भ्रामक समजुती आहेत. चला, गीतेच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाचाही विचार करू या.

योगेश्वर श्रीकृष्णांनी म्हटले आहे की आत्मा अकाटय आहे. अशोच्य आहे, सनातन आहे, अमृतस्वरूप आहे, सदा सर्वत्र राहणारा हाच एक शाश्वत आहे. मग प्रश्न उपस्थित होतो की तुम्ही भगवान आहात म्हणून असा म्हणता का ? यावर श्रीकृष्ण म्हणतात - नाही. अर्जुना आत्मा अजर, अमर, शाश्वत, सनातन, सर्वव्यापी, अमृतस्वरूप इत्यादी गुणधर्मांनी युक्त असणारा आहे. असे तत्वदर्शी लोकांनी पाहिला आहे. कोणी पाहिला ? तत्त्वदर्शी लोकांनी पाहिला आहे. तो दहा भाषांच्या विद्वानांनी पाहिलेला नाही, ना व्याकरणकारांनी, ना कोण्या श्रीमंताने; परंतु तत्त्वदर्शी व्यक्तीने त्याला पाहिले आहे. श्रीकृष्णही ते सत्य सांगत आहेत आणि हे सत्य नेहमी एकसारखेच राहिलेले आहे. वेळोवेळी या सत्याच्या नावावर अनेक भ्रामक-गैरसमजुती निर्माण झाल्या. पण जगात जेवढे महापुरुष होऊन गेले त्या सर्वांनी या गैरसमजुतींचे निराकरण करून समाजाला पुन्हा तेच सत्य सांगितले. श्रीकृष्णांनीदेखील तेच सत्य सांगितले आहे जे **'ऋषिभिर्बहुधा गीतं'**

आता एक नवीन प्रश्न उपस्थित होतो की ते तत्त्वदर्शन म्हणजे काय ? तत्त्वदर्शी कोण आहे ? काय आम्हीपण तत्त्वदर्शी आहोत का ? यावर १८ व्या अध्यायातील ४९ व्या श्लोकात ते म्हणतात की अर्जुना, तत्त्वदर्शनाची इच्छा करणाऱ्या पुरुषाने नेहमी एकान्तवासात राहिले पाहिजे. इंद्रियांना वश करून त्यांचे नियमन करून मनाला ध्यानामध्ये केंद्रित केले पाहिजे. संन्याशाने (बैराग्याचा वेश घेऊन बनणारा नव्हे)

सतत ध्यानमग्न राहून काम, क्रोध, लोभ, मोह, मद-मत्सर या बहिर्मुखी प्रवृत्तींचा त्याग करून, विवेक, वैराग्य, शम, दम, धारणा, ध्यान यात सतत लीन असले पाहिजे. अशी स्थिती प्राप्त करून घेतलेला मनुष्य ब्रह्माला जाणण्यास योग्य बनतो सत्पात्र बनतो.

वास्तविक गोष्ट होती तत्त्वाची. पण मध्येच नवीन गोष्ट मध्ये शिरली की ती व्यक्ती ब्रह्म जाणण्यास योग्य बनते. वस्तुत: तत्त्व, ब्रह्म, भगवंत, आत्मा, ईश्वर सर्व एकच आहे.

जेव्हा व्यक्तीमध्ये पूर्ण योग्यता निर्माण होते तेव्हा ती व्यक्ती ब्रह्म जाणण्यास योग्य बनते. श्रीकृष्णांच्या शब्दात त्या योग्यतेचे नाव पराभक्ती होय. पराभक्ती म्हणजे भक्ती पराकाष्ठेच्या पलीकडे असते. ती योग्य परिणाम देण्याच्या अवस्थेत असते. या पराभक्तीच्या अवस्थेमध्ये तो पुरुष तत्त्वाला जाणतो.

तो तत्त्वाला जाणतो पण ते तत्त्व काय आहे ? लोक जसे मोजतात पाच तत्त्वे, पंचवीस तत्त्वे अशा प्रकारे आहे का ? नाही, हे तत्त्व प्रकृतिजन्य असते. श्रीकृष्ण म्हणतात की अजर, अमर, शाश्वत, अलौकिक अशा गुणांनी युक्त असणाऱ्या मला तो जाणतो व जाणल्याबरोबर लगेच माझ्यात प्रवेश करतो. तेव्हा तत्त्व म्हणजे तो परमात्मा ! प्राप्तिकालामध्ये साधक प्रथम भगवंताला पाहतो, परंतु दुसऱ्या क्षणी तो स्वत:च अजर, अमर-शाश्वत-सनातन इत्यादी गुणधर्मांनी युक्त अशा आपल्या आत्म्याला पाहतो. व यालाच तत्त्वदर्शी म्हणतात. त्या तत्त्वदर्शी लोकांनी आत्मा किंवा परमात्मा हा शाश्वत व सनातन असल्याचे पाहिले आहे. त्यांची ही अनुभूती आहे की तो कणाकणात व्यापून राहिलेला आहे. **''ईशावास्यमिदं सर्वं'' सीय राम मय सब जग जानी**', 'वासुदेव सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ:' आता तो महान आत्मा आहे. दगड-पाणी पुजून तर तो तत्त्वदर्शी झालेला नाही उलट प्रारंभिक साधनेचा प्रवेश तत्त्वदर्शीच आहे.

आमच्यासाठी श्रीकृष्णांनी सांगितले आहे की, आपल्या स्वभावगत कर्माच्या क्षमतेनुसार नियत कर्माचे (यज्ञ प्रक्रियेचे) आचरण म्हणजेच धर्म आहे. हा विधी कशा प्रकारे करावा त्याची रीत त्यांनी गीतेमध्ये सांगितली आहे. त्यामुळे या विधीच्या नावावर पाखंडीपणा करण्यासाठी कोणाला संधी मिळू नये. परमेश्वराचे खरेखुरे शोधस्थान किंवा वसतिस्थान म्हणजे आपले हृदय होय. **'तमेव शरण गच्छ'** त्या हृदयस्थ ईश्वरालाच

शरण जाण्यास श्रीकृष्ण स्पष्टपणे सांगत आहेत. आणि त्या हृदयस्थ ईश्वराची अनुभूतीचे स्थळपण हृदयच आहे. **'आत्मानि विन्दति'** बाहेर काही नाही. तेव्हा जे लोक तत्त्वप्राप्तीसाठी बाहेर भटकत आहेत ते अद्याप भ्रमात आहेत असे समजावे. भगवान भले सर्वत्र भरलेला असला तरी हृदयात त्याचे भावपूर्ण ध्यान केल्यानेच त्याची प्राप्ती होते 'हृदि अयम्' हा हृदयात आहे. येथे हृदय शब्दाची निष्पत्ती देखील आहे.

सारांश योगेश्वर श्रीकृष्णांनी सांगितले आहे की आत्मा शाश्वत आहे, आत्मा सनातन आहे आणि तेच अविनाशी अमृत तत्त्व आहे. या परमतत्वाची प्राप्ती करून घेणे आमचे - मानवमात्राचे दायित्त्व आहे. या दायित्वालाच (जबाबदारीलाच) श्रीकृष्णांनी धर्म असे म्हटले आहे. आणि हाच सनातन धर्म आहे. सनातन धर्म म्हणजे काय ? सनातनत्वापर्यंतचे अंतर पूर्ण करण्याच्या क्रियेचे आचरण म्हणजे सनातन धर्म.

जर तुम्ही आत्मदर्शनाचा विधी किंवा विशिष्ट प्रक्रिया जाणत नसाल तर तुमच्याजवळ धर्म नावाची कोणतीही वस्तू नाही. जर धर्मासाठी श्वासोच्छ्वास करीत असाल तर तुम्ही आशावादी आहात, पण धार्मिक म्हणता येणार नाही. त्यासाठी भले हृदयात बेचैनी झाली तरी चालेल पण परमात्म्याची प्राप्ती तेव्हाच होईल की जेव्हा क्रिया उपलब्ध असेल व जेव्हा परमात्म्यावर अतूट श्रद्धा असेल.

परमेश्वराची भक्ती हा सृष्टीचा एकमात्र धर्म आहे. रामचरित मानसमध्ये गोस्वामी तुलसीदासांनी त्या धर्माला चार प्रकारे सांगितले आहे. १) धरम न दूसर सत्य समाना २) परहित सरिस धरम नहि भाई ३) परम धरम श्रुति विदित अहिंसा आणि ४) एकइ धरम एक ब्रत नेमा । या चारही प्रकारचा अर्थ एकच आहे की क्रिया एक आणि त्याचा परिणामही एकच आहे. यापैकी प्रथम सांगितले आहे की

**धर्म न दूसर सत्य समाना । आगम निगम पुरान बरवाना ।। २/८४/५ ।।**

म्हणजे सत्याशिवाय दुसरा कोणता धर्म नाही. त्याची प्रशंसा वेद, पुराण आणि शास्त्रांमध्ये केलेली आहे. प्रश्न हा आहे की, सत्य काय आहे ? कोणी म्हणते मी नेहमी खरे बोलतो, खोटे बोलू नका. कोणी म्हणते पृथ्वी डोलत असते - हे खरे आहे, तर कोणी दुसरेच काही म्हणत असते. लोकांनी नश्वर प्रकृतीमध्ये खऱ्या व खोट्याच्या सीमा रेषा बनवल्या आहेत. कोणी त्या सीमारेषेच्या आत सांगितले तर सत्य आणि त्या परिघाच्या बाहेरच सांगितले तर खोटे ! आपल्या विनय पत्रिकेत गोस्वामीजी म्हणतात

- ''कोउ कह सत्य झूठ कह कोऊ, युगल प्रबल करि माने'' कोणी या सृष्टीला सत्य म्हणतात तर कोणी या जगाला खोटे समजतात. तर कोणी ब्रह्म आणि संसार या दोन्हीना सत्य समजतात. परंतु ''तुलसीदास परिहरे तीन भ्रम, सो आतम पहिचाने'' तुलसीदासजी म्हणतात की हे तिन्ही विचार भ्रामक आहेत. या तिन्ही भ्रामक गोष्टींचा त्याग केल्यानेच आत्मानुभूती शक्य आहे. अर्थात सृष्टीमध्ये कोठे सत्य नाहीच आहे. **झूठइ लेना झुठइ देना । झूठइ भोजन झूठ चबेना ।।** या जगामधील व्यवहार खोटा आहे. भगवान शंकरांचा निर्णय असा आहे की, **जेहि जाने जग जाइ हेराई । जागे जथा सपन भ्रम जाई** (मानस १-१११-२) - ज्या प्रकारे जागे झाल्यानंतर स्वप्नांचा भ्रम नाहीसा होतो. त्या प्रकारे प्रभूला जाणल्यानंतर हे जगच हरवून जाते. म्हणजेच जग हा एक प्रकारचा भ्रम आहे जो हरवला जातो. त्या परमेश्वराला जाणल्यानंतर हे जग नेहमीसाठी समाप्त होते म्हणजेच या जगातील जन्ममरणाचे फेरे सदासाठी बंद होतात. आणि जे समाप्त होते त्यात सत्य कसले ? ज्याचे काही अस्तित्वच नाही ते जग कसले ? सृष्टी सत्य आहे किंवा असत्य आहे किंवा दोन्हीही आहे असे विचार भ्रममूलक आहेत. या तीनही विचारांचा जो त्याग करतो तोच आपल्या स्वरूपास ओळखतो. असो, आता एक गोष्ट स्पष्ट झाली की सृष्टीमध्ये सत्य नाही. मग सत्य काय आहे ? यावर त्या महापुरुषांनी स्वत: निर्णय दिला आहे.

**व्यापक एक ब्रह्म अविनाशी । सत्य चेतन धन आनंद राशी ।।**
**अस प्रभु हृदय अछत अधिकारी । सकल जीव जग दीन दुखारी।।**

परमेश्वर कणकणामध्ये भरलेला आहे. तो एकच आहे. एकाशिवाय दोन ईश्वर आजपर्यंत कधी झाले नाहीत. तो बृहत आहे म्हणून त्याला ब्रह्म म्हटले जाते. तो अविनाशी आहे. त्याचा, कधी विनाश होत नाही. तो सत्, चेतन आणि आनंदस्वरूप आहे. तेच परम सत्य आहे. असा ईश्वर सर्वांच्या हृदयात वास करतो. तो विकारी आहे. कोणी कुत्रे, मांजर किंवा इतर काहीही खात असले तरी त्या विकारांशी त्याचा काही संबंध नसतो. तो द्रष्ट्याच्या स्वरूपात हृदयात विद्यमान असतो. अशा हृदयदेशात बसत असलेल्या ईश्वराला कसे ओळखावे ? ''**नाम निरुपण नाम जतन ते । सोइ प्रकटत जिमि मोल रतन ते ।**'' प्रथम तर नामाचे निरुपण केले पाहिजे की नाव म्हणजे काय ? आणि जेव्हा ते नाम म्हणजे काय ते समजते तेव्हा दिवस रात्र त्याचे नाव इतके उत्कटतेने घ्यावे की हृदयात बसणाऱ्याला त्याला प्राप्त करण्यासाठी यत्न करावा की ज्या योगे जो

प्राप्त होईल. रामनाम जपण्यासाठी अनेक श्रेणी पार कराव्या लागतात. - रामनामात अंतर असते. नाम तेच असते, पण कोठे ते हिऱ्याप्रमाणे असते तर कोठे दगडाच्या स्वरुपात । म्हणजे कोणी चोवीस तास जप करून कोणाच्या हातात खडे येतात; तर कोणी तेवढेच जप करून हिरे हाती येतात. कारण नामजपाचा विधी महापुरुषांचे (गुरूचे) द्वारा जागृत होत असतो. त्यांच्या निर्देशानुसार चालणे हाच धर्म आहे. हृदयात असणाऱ्यां नामजपाचेद्वारा आपली श्रद्धा समर्पित करून त्याला जागवले पाहिजे. त्या परमात्म्याचे प्रती समर्पण करून श्रद्धा स्थिर करणे हे धर्माचरण आहे.

२ - एके ठिकाणी धर्माचे स्वरूप स्पष्ट करताना गोस्वामींनी म्हटले आहे - **परहित सरिस धर्म नाही भाई । पर पीडा सम नहिं अधमाई** (७-४०-१). या सृष्टीमध्ये जे जीव दिसतात किंवा जेवढे जीव अस्तित्वात आहेत ते सर्व प्रकृतीच्या अंतर्गत आहेत. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ केवळ आत्मा आहे - **'प्रकृति पार प्रभु सब उरवासी''** ।

आत्मा प्रकृतीच्या पलीकडे आहे म्हणून त्याला श्रेष्ठ समजले जाते. या आत्म्याचे हित पाहणे यासारखा दुसरा श्रेष्ठ धर्म नाही आणि त्या आत्म्याला दु:ख देण्यासारखे दुसरे अधर्म कृत्य नाही. भगवान श्रीकृष्णांनीपण गीतेत म्हटले आहे की, अर्जुना, आत्माच शत्रू आहे व आत्माच मित्र आहे. ज्या मनुष्याने मनासहित सर्व इंद्रिये जिंकली आहेत त्याच्यासाठी तो आत्मा मित्र बनून त्याचे परम कल्याण करतो तर ज्याने मनासहित इंद्रियांना जिंकले नाही किंवा जो त्यांना वश करू शकला नाही त्याच्यासाठी तो आत्मा शत्रू बनतो व शत्रूप्रमाणे त्याच्याशी वर्तन करून त्याला अधोगतीला नेतो आणि नीच योनीत त्याला फेकतो. व म्हणून हे अर्जुना तू आपल्या स्वत:च्या द्वारेच आपल्या आत्म्याचा उद्धार कर. त्याला अधोगतीला नेऊ नकोस. वास्तविक हेच परहित आहे. आत्मा प्रकृतीच्या पलीकडे आहे म्हणून तो पर आहे - श्रेष्ठ आहे. परंतु **''स सो माया वश भयउ गोसाई । बंधेउ कीर मरकड की नाही''** तो मायेने गुरफटला गेलेला आहे. बांधला गेला आहे. त्या बंधनातून आत्म्याला सोडवून त्याला त्याचे सहज स्वरूप प्राप्त करून देणे म्हणजेच धर्म होय. त्याशिवाय दुसरा धर्म नाही.

३ ''परम धरम श्रुति विदित अहिंसा ।'' श्रुती म्हणजे वेद । वेद म्हणजे भक्तीमध्ये निमग्न असणाऱ्या महात्म्यांनी वेळोवेळी केलेले प्रभूने दिलेल्या माहितीचे संकलन आहे.

जे महापुरुष ईश्वराच्या समीप पोहचले होते, जे ईश्वराशी तद्रूप झालेले होते त्यांच्या अनुभूतींचा संग्रह म्हणजे वेद. ईश्वरप्राप्तीनंतर ईश्वर कोणाला शिकवणार व कोण शिकणार ? जोपर्यंत थोडे अंतर असते तोपर्यंत परमेश्वर काही समजवतात. या अनुभूती काही पर्यंत शिष्यांना सांगितल्या गेल्या. वेदव्यासांनी त्याला पुस्तकाचे स्वरूप दिले; परंतु जर तुम्ही भजन कराल, भक्ती कराल तर वेद आपल्यासाठी नव्या स्वरूपात उतरतील. हे काम पुस्तक करू शकणार नाही कारण ईश्वर सदा बोलत असतो समजावत असतो. जड-चेतन सर्वांशी तो बोलतो त्या निर्देशांना समजणाऱ्या साधकालाच या गोष्टींची अनुभूती येते, व हळू हळू साधकात दृष्टी जागृत होते. त्या दृष्टीने ईश्वराच्या विभूती दिसू लागतात. ऐकायला येतात व समजल्या जातात; परंतु पुस्तक आम्हाला दृष्टी देवू शकत नाही. ते आम्हाला फक्त बोध देते की आम्ही प्रयत्न कोणत्या दिशेने करावा ?

निर्देशाप्रमाणे प्रयत्न केल्याने आत्मा जागृत होऊन मार्गदर्शन करू लागतो. परमात्म्याच्या ठिकाणी नजर केंद्रित केल्याने जे काही समजते त्यानुसार आचरण करणे परम धर्म आहे. धर्माची ही परिभाषा प्रयोगात्मक आहे. ईश्वराने केलेल्या निर्देशाचे पालन अहिंसा आहे आणि जर साधक या आदेशाची अवहेलना करेल, ते आदेश त्याने पाळले नाहीत म्हणजेच त्याप्रमाणे त्याने आचरण केले नाही तर ती हिंसा होय व तो हत्यारा होय. अहिंसेचा शुद्ध अर्थ आहे परमात्म्याचे चिंतन ।

भगवान रामाने एक दिवस सभा बोलवली व एक दृष्टान्त सभेपुढे मांडला की, मनुष्याचे शरीर भवसागर पार करण्यासाठी जहाजस्वरूप आहे. माझी अनुकूलता ही अनुकूल वायुप्रमाणे आहे.सद्गुरू कर्णधार आहे म्हणजे केवट आहे. हा दुर्लभ संयोग उपलब्ध असूनही जर तो साधक भवसागर पार करत नसेल, भजन करीत नसेल तर तो निंदक आहे. उद्यावर ढकलणारा आहे, मंदबुद्धी आहे आणि आपल्या आत्म्याचा हत्यारा आहे. ही हिंसा होय. परंतु जो जो नजर ईश्वराशी केंद्रित कराल तो तो परमेश्वराचे स्मरण प्राप्त होत जाईल. त्यानुसार आचरण ही अहिंसा आहे हेच धर्माचरण आहे.

**४- एकई धर्म एक व्रत नेम । काय वचन मन पति पद प्रेम ।।**

सृष्टीमध्ये एकच धर्म आहे. मन, कर्म वचनाने पतीच्या चरणकमलाशी प्रेम अर्पण करणे. स्त्रिया तर पतीच्या चरणांची सेवा करतील; परंतु असे वाटते की पुरुष वर्ग या धर्मापासून वंचित राहील. परंतु वस्तुत: तसे नाही. आध्यात्मिक परिवेशात महापुरुषांनी

परमात्म्यालाच पती इत्यादी शब्दांनी संबोधला आहे. किष्किन्धाकांडाच्या प्रकरणात एक प्रसंग आहे की, जेव्हा हनुमान रामाला भेटले तेव्हा आपले दैन्य त्यांना निवेदित केले व त्यांच्याजवळ तक्रार केली की, प्रभू सेवकाला का विसरले आहेत ? तेव्हा भगवंतानी त्यांना आश्वासन दिले की, हनुमंता तू मनात लेशमात्रही शंका आणू नकोस. तू लक्ष्मणापेक्षाही मला अधिक प्रिय आहेस. **''देखि पवनसुत पति अनुकूला । हृदय हरष बीती सब शूला ।।''** हनुमान आपल्या स्वामीची अनुकूलता पाहून अत्यंत प्रफुल्लित झाला. त्याचे सर्व दुःख दूर झाले. हनुमान काय स्त्री होते ? ते तर वानरजातीतील पुरुष होते. पण येथे पती म्हणजे अब्रूचे रक्षण करणारा तो पती होय. 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्' या दयनीय स्थितीतून बाहेर काढून सहज स्वरूपाची स्थिती देण्यास समर्थ असणारा फक्त परमात्मा आहे. तो वास्तविक समस्त जीवांचा पती आहे व हनुमानाने भगवान श्रीरामाला येथे पती म्हणून संबोधले आहे. संतांनी सांगितले आहे की **''अस अभिमान जाइ जनि भोरे । मैं सेवक रघुपति मोरे''** तात्पर्य, जर आम्हाला नियमाचे पालन करावयचे आहे, व्रत घ्यायचे आहे, धर्माचरण करावयाचे आहे तर मन कर्म व वाचेने आपली पत राखणाऱ्या अब्रू रक्षण करणाऱ्या परमात्म्याच्या चरण कमलावर भावपूर्ण प्रीती केली पाहिजे हेच पातिव्रत आहे. एका परमेश्वराच्या प्रती समर्पण तसेच सतपुरुषांची सेवा या एका व्यतिरिक्त सृष्टीमध्ये दुसरा धर्मच नाही.

**सोइ धर्मज्ञ गुनी सोइ ज्ञाता । सोइ महिमंडित पंडित दाता ।।**
**धर्म परायन सोइ कुल ताता । राम चरन जाकर मन राता ।।**

ज्याचे मन राम चरणाशी - परमात्म्याच्या चरणाशी लीन आहे, अनुरक्त आहे तो धर्मज्ञ आहे, धर्माचा विशेषज्ञ आहे, तोच गुणी आहे, ज्ञाता आहे, तोच सर्व काही जाणत असतो. त्याच्या पांडित्यात काही कमी नाही. तोच दाता आहे. म्हणजे त्याच्याजवळ देण्यासारखे निश्चितपणे आहे व तोच पूर्णपणे धार्मिक आहे. एका परमात्म्याच्या प्राप्तीची क्रिया म्हणजेच धर्म होय. रामनामात दंग होणे हाच धर्म आहे. गोस्वामींच्या मते एका परमात्याच्या प्रती समर्पण हा सनातन धर्म आहे.

सनातन धर्म म्हणजे केवळ हिंदू म्हणवणाऱ्या लोकांचा धर्म नाही, केवळ भारताचा धर्म नाही; परंतु तो सार्वभौम आहे. उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत सर्व मनुष्यमात्रात एकसारखीच धारणा असते. तीच दहा इंद्रिये व एक मन, प्रकृतीची लिप्सा (मिळवण्याची

इच्छा) आणि शांतीचा शोध या सर्व गोष्टी सर्व प्रकारच्या मानवात विद्यमान आहेत. प्रकृतीच्या थपडा खाल्ल्यानंतर घाबरून जेव्हा तो सुख आणि शांतीच्या शोधासाठी निघेल तेव्हा त्याला याच शाश्वत सनातनाला शरण यावे लागेल. 'राम विमुख सुख सपनेहु नाही' जे रामापासून विन्मुख होतात त्यांना स्वप्नामध्येही सुख प्राप्त होत नाही मग त्याची प्राप्ती कोठून होणार ? त्याला या आत्म-दर्शनाच्या क्रियात्मक पथावर यावेच लागेल. आणि या जगात जो या आत्मपथाकडे, शाश्वत शांतीकडे वळतो तोच शुद्ध सनातनधर्मी आहे.

आत्म्याला जाणण्याच्या क्रियेचा अविष्कार विश्वामध्ये कोठेही होऊ शकला असता, परंतु सुदैवाने तो भारतात झाला. भारतानेच सर्वांना ही देणगी दिली व म्हणून भारताला विश्वगुरू म्हटले जाते. भारतामधील महापुरुषच बुद्ध बनला. अर्धे विश्व बुद्धांचे अनुनायी बनले. त्यांच्या अनुयायांच्या परंपरेतच येशू ख्रिस्त झाले. एकमेव असणाऱ्या परमेश्वराचा उपदेश ते करीत असतानाच त्यांना सुळावर चढवण्यात आले. अशीच अवस्था मुहम्मद पैगंबरांची झाली. आत्म्याला जाणण्याच्या क्रियेचे क्रमश: वर्णन करण्याचा अवसर त्यांनाही मिळाला नाही. त्यामुळेच धर्माच्या बाबतीत अधिकांश समाजाची वाट चुकली आहे. कोणी त्याला पोकळ नळकांडे समजते तर कोणी त्याला बेकार समजते - निरुद्योगी आळशी लोकांचा उद्योग असे समजते, तर कोणी त्याला भित्र्या लोकांचे सुरक्षा कवच समजतात, तर कोणी याला परोपजीवी लोकांचा स्वर्ग समजतात. असे म्हणणाऱ्यांचा दोष नाही. धर्म त्यांना सांगितलाच कधी ?

धर्माच्या नावावर काहीही करण्याने किंवा बाह्य विचारांना बौद्धिक मान्यता देण्याने कोणी धार्मिक बनत नाही. जो आत्मदर्शनाच्या नियमांचे उत्स्फूर्तपणे पालन करतो तोच खरा धार्मिक होय. त्याचे आत्मानुशासन, एकाग्रता, युक्तहार-विहार व त्याचे इंद्रिय संयमन इत्यादी गुण देशाला आणि मानव समाजाला उन्नतीच्या शिखरावर घेऊन जाण्यास- समर्थ असतात. धर्मावर दृढ श्रद्धा निर्माण झाल्यावर मनुष्याला स्नायुरोग किंवा इतर कोणताही घातक रोग कधीही होत नाही कारण विनय आणि श्रद्धेने त्याचे हृदय द्रवीभूत असते. आपले सर्व प्रभू पाहून घेईल असा त्याला पूर्ण-दृढ विश्वास असतो. मानसिक ताण-तणावापासूनही तो मुक्त असतो. समृद्धी ही देखील ईश्वराचे देणे आहे असे मानतो व संपत्तीचा अहंकार करीत नाही. परमार्थ मार्गावर आपण जर अग्रेसर

असाल व आपण जर सामूहिक माहिती ठेवत असाल तर तुम्ही एका संघटनेमध्ये व एक सूत्राने बांधले जाल. जो समाज असा एका सूत्रामध्ये बांधलेला आहे त्याच्या जवळ दु:ख फिरकतच नाही.

बंधूनों, धर्माला जाणण्यासाठी तुम्ही तीर्थयात्रेला जाता. पण लक्षात ठेवा की धर्मामध्ये जर सच्चेपणा नसेल तर जीवन व्यर्थ होय. या सृष्टीमध्ये मनुष्याचे शरीर सर्वोत्कृष्ट आहे - 'न हि मानुषात् श्रेष्ठ तर हि किंचित् ।' कारण सृष्टीमध्ये तोच एकमात्र विचारशील प्राणी आहे. त्याच्यामध्ये परमात्म्याचा शोध घेण्याची क्षमता आहे. मनुष्याच्या शरीराचा सर्वात मोठा उपयोगपण हाच आहे की, परमात्म्याची अनुभूती घेणे.

मनुष्य जेव्हा या दिशेने चालू लागतो तेव्हा काही पूजा पद्धती, काही पंथ त्याला वारसा हक्काने मिळत असतात. आम्हालाही मिळाले होते; पण पंथ, संप्रदाय, पूजा पद्धती, वेष, आखाडे हे लक्ष्य नाही. या सर्वांचे समर्थन करण्यासाठी मनुष्याला शरीर मिळाले नाही. श्रीकृष्णांच्या मते हे सर्व अविवेकी आणि मूढबुद्धी लोकांनी दिलेली भेट आहे. भगवत् पथामध्ये निर्धारित क्रिया तर एकच आहे; परंतु अविवेकी लोकांची बुद्धी अत्यंत शंकाखोर आणि अनेक फाटे फोडणारी असते. त्यामुळे ते एका निर्धारित कर्माच्या जागी दुसऱ्या अनेक विधींची संरचना ते करतात. एवढेच नव्हे तर अत्यंत मधुर वाणीने ते विधी लोकांना सांगतात. त्या दिखाऊ वाणीची छाप ज्या लोकांच्या मनावर पडते अर्जुना, त्या लोकांची बुद्धी भ्रष्ट होते. मग त्यांना खरी गोष्ट कितीही पटवून देण्याचा प्रयत्न केला तरी ते ऐकतच नाहीत. कारण ते पूर्वग्रहाला इतके चिकटून बसलेले असतात की आपला पूर्वग्रह सोडायला ते लवकर तयार होत नाहीत. त्यांना वाटते, ''सर्वजण तर तसे करतात. मी जर तसे केले नाही- वागलो नाही तर समाज मला काय म्हणेल ?'' वास्तविक कोणत्याही धर्माच्या अनुयांयाची संख्या ही धर्माची कसोटी नाही. यावर संत कबीरांनीही कटाक्ष करीत म्हटले आहे.

**मै भी भागा जाइयाँ, लोक वेद के साथ ।**
**आगे ते सतगुरु मिल्या, दीपक दीन्हा हाथ ।।**
**दीपक दीन्हा तेल भरि, बाती दई अघट्ट ।**
**पूरा किया बेसाहुणा, बहुरि न आवौ हट्ट ।।**

धर्म मनुष्यासाठी आहे. मनुष्य धर्मासाठी नाही. ज्या प्रकारे भाकरी मनुष्यासाठी आहे. मनुष्य भाकरीसाठी नाही. तेव्हा मनुष्याच्या स्वत:च्या कल्याणासाठी तसेच समष्टीच्या कल्याणासाठी हे सांगणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रत्येक मनुष्याच्या अंतरंगात एक परमात्मा आहे. ज्याचा शोध घेणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. शाश्वत परमात्म्याच्या प्राप्तीसाठी केलेले नियत कर्म म्हणजेच धर्म होय. ज्यामध्ये लोकरूढीचा लेशमात्र समावेश नाही, फक्त परमात्म्याच्या प्राप्तीचेच विधान आहे तो आमचा व मानवमात्राचा विशुद्ध धर्म आहे आणि तीच भगवान श्रीकृष्णांची गीता आहे की जिच्यामध्ये स्वभावगत क्षमतेप्रमाणे केवळ एका परमेश्वराचे जे चिंतन त्यालाच नियत कर्म म्हटले आहे. आणि या नियत कर्माच्या अंतर्गत त्या परमात्म्याचा परिचय देणारे दोन अडीच अक्षरांचे नाव 'ॐ' अथवा 'राम' यांचा जप तसेच समकालीन तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जावे हा विधी सांगितला आहे.

सर्व महापुरुषांनी तत्त्वदर्शी महात्म्यांना शरण जाणे व त्यांच्या सहवासात राहणे यावर भर दिला आहे. कारण धर्म म्हणजे त्यांना आलेली अनुभूती होय. एकदा अनुसूया आश्रमात अलाहाबाद विश्वविद्यालयाचे काही प्रोफेसर आले. त्यांनी पूज्य गुरुदेवांना एक प्रश्न विचारला की ''भगवान, आम्ही तत्त्वज्ञान शिकवतो, कबीर शिकवतो परंतु हे सर्व शिकवूनही साधना कशी करावी ते समजत नाही''. पूज्य महाराजश्री म्हणाले ''बरोबर, दोन दोन पैशात सध्या वेदान्त विकला जात आहे (त्या वेळी गोरखपूरच्या गीता प्रेसची गीता दोन पैशात मिळत होती.) लोक न जाणे काय लिहीत आहेत; पण लोक ते वाचत आहेत''. साधना ही अशी गोष्ट आहे की जी लिहिता येत नाही. ती तर अत्यंत समर्थ अशा महापुरुषांद्वारा अत्यंत दृढ निश्चय व भगवंतावर दृढ श्रद्धा असणाऱ्या अधिकारी पुरुषाच्या मनात जागृत केली जाते. अशा महापुरुषाच्या सान्निध्यात तीन-चार महिने राहिल्याने व त्यांची थोडीफार सेवा केल्याने आत्मदर्शनाची क्रिया हृदयात जागृत होते. व मग तो हृदयात जागृत झालेला इष्ट साधकाला निर्देशन, संकेत आणि अनुभव प्रदान करू लागतो, मार्ग दाखवू लागतो आणि त्याला धारण करून टाकतो.

व म्हणूनच भगवान श्रीराम म्हणाले 'भगति मोरि'। श्रीकृष्णांनी सांगितले 'मामेकं शरणं व्रज' मला फक्त शरण या. धर्माची चिंता सोडून मला शरण या. प्रथम सांगितले की हृदयस्थ ईश्वराला शरण जा, नंतर सांगितले समकालीन तत्त्वादर्शीला शरण जा. कशासाठी ? तर हे धर्माचरण शिकण्यासाठी. तर येथे म्हणतात की धर्माला पण सोडा व मलाच शरण या. या भगवंताना शेवटी काय सांगावयाचे आहे. ?

वास्तविक समर्पित बुद्धी धारण करणाऱ्या साधकाचा धर्म, कर्म, भगवान सर्व काही तो तत्त्वद्रष्टा महापुरुषच असतो. कारण त्याने धर्माची प्रत्यक्ष अनुभूती घेतलेली असते. तो धर्मस्वरूप असतो, कर्मस्वरूप असतो आणि त्या धर्मकर्माप्रमाणे चालणारा म्हणजे सर्व काही तोच असतो. पूज्य महाराजश्री म्हणतात -

**।। तात मोर अति पुन्य बहूता । देखेऊँ नयन राम कर दूता ।।**

हो, आम्ही भगवंताचे दूत आहोत. आम्हाला भेटल्याशिवाय कोणीही भगवंतापर्यंत पोहोचू शकत नाही. भगवंताचे अस्तित्व निश्चितपणे आहेच; परंतु तत्त्वदर्शी सद्गुरूशिवाय त्याचे दर्शन व त्याच्यामध्ये प्रवेश अप्राप्य आहे. कारण ईश्वराची अनुभूती अंत:करणात होत असते व म्हणून हृदयात योग क्रिया जागृत करू शकणाऱ्या तत्त्वदर्शी महापुरुषाच्या अभावी त्या परमात्म्याचा आम्हाला काही उपयोग होत नाही. परंतु परमेश्वरावर दृढ श्रद्धा आणि त्या प्रभूचा परिचय करून देणारा दोन किंवा अडीच अक्षरी नामाचा जप हे धर्मनिष्ठेचे एक अंग आहे.

बौद्ध म्हणतात -'बुद्ध शरणं गच्छामि', जैन म्हणतात 'सम्यग दर्शन ज्ञान चरित्राणि' म्हणजे तीर्थकराचे दर्शन, त्यांनी सांगितलेले ज्ञान आणि त्यांच्याप्रमाणे चरित्र बनवण्याने म्हणजे आपले चारित्र्य त्यांच्यासारखे शुद्ध राखल्याने मोक्ष मिळतो. इस्लाम धर्माचे अनुयायी म्हणतात की मुहम्मद पैगंबर हेच अल्लाचे दूत आहेत, संदेशवाहक आहेत. शिख म्हणतात - 'वाहे गुरु' । येशू ख्रिस्त म्हणतात संसाराच्या ओझ्याने वाकलेल्या लोकांनो, माझ्याकडे या मी तुम्हाला विश्रांती देईन. जो माझ्या मागोमाग येईल त्याने स्वत:ला विसरायला हवे आणि मलाच अनुसरायला हवे. -

(come to me, all that are weary and heavy ladden and I will give you rest. If any man will come after me let him deny himself and follow me.)

सर्व महापुरुष आपल्याकडे बोलवत आहेत. वाटते की जणू हे महापुरुष परमार्थाची दुकाने उघडून बसले आहेत; परंतु तसे नाही. आपले व परके ही भावना आमच्या अंत:कारणात आहे, म्हणून आम्हाला तसे दिसते. महापुरुषांचा आशय फक्त इतकाच आहे की ज्या महापुरुषाने आपल्या साधनेद्वारे हृदयस्थ परमात्म्याची प्राप्ती करून घेतली आहे त्या आपल्या समकालिन तत्त्वदर्शीला शरण जा.

परंतु तत्त्वदर्शीला आम्ही कसे ओळखावे ? छदमी लोकांनीसुद्धा हा वेश धारण करून स्वत:चा फायदा करून घेतला आहे. राजा प्रतापभानू आणि भगवती सीता अशा दिखाऊ वेषालाच फसले तर हनुमंत फसता फसता वाचले. पण सर्व जण तत्त्वदर्शी होण्याचा दावा करू लागले तर ?

वास्तविक असे नसते. ही काही मोठी समस्या नाही. हृदयातील परमात्म्याला जागृत करण्याची क्षमता असणारे महापुरुष जर आम्हाला दिसत नसतील तर आपले पुण्य कमी पडत आहे असे समजावे. 'पुण्य-पुंज बिन मिलहि न संत ।' तेव्हा तत्त्वदर्शीला ओळखण्याची क्षमता स्वत:मध्ये येईपर्यंत परमेश्वराच्या दोन अक्षराच्या नावाचा जप करावा व पुण्य संचय करावा. ज्या दिवशी हे पुण्य काठोकाठ भरेल तेव्हा ज्या सिंहासनावर सद्गुरू विराजमान झालेले आहेत तेथपर्यंत तुम्ही स्वत:हून पोहचाल किंवा ते स्वत: आपल्याला भेटतील. तुम्ही स्वत:च त्यांना ओळखाल. अनुभवी सूत्रपाताच्या द्वारे ते तुम्हाला ओळखतील.

आत्म्याला विदित करणाऱ्या या मार्गावर जो कोणी अत्यंत निश्चयाने व श्रद्धेने चालतो त्याची मार्गदर्शनाच्या आवश्यकतेची वेळ येताच त्याचा पुण्य-पुरुषार्थ सद्गुरूपर्यंत धडक देतो आणि अशा साधकांना मार्गदर्शन करणे महापुरुषदेखील आपले कर्तव्य समजतात. पूज्य महाराजश्री प्राय: सांगत असत ''या नावाचा, या रंगरूपाचा साधक येईल. त्याला मला मार्गदर्शन करावयाचे आहे'' काही साधकांबाबत हे संकेत एक दोन वर्षे पूर्वीच मिळत असत. साधक नंतर येत असत.

तेव्हा सद्गुरू शोधण्यासाठी कुठे भटकण्याची किंवा कोणालाही सद्गुरू मानण्याची आवश्यकता नाही. त्यांना ज्या दृष्टीने - ज्या नजरेने ओळखायचे ती नजरही पुण्यशील हवी. ज्यांच्याजवळ अशी पुण्यशील नजर नसेल, पुण्य सहयोग नसेल तर संत, सद्गुरूनाच नव्हे पण प्रत्यक्ष भगवान पुढे उभे राहिले तरी त्यांना ते वेडा ठरवतील. म्हणतील कसे रूप देवाने बनवले आहे ? पूज्य महाराजश्रींच्या गुरुदेवांना त्यांच्या भोवतालचे लोक नेहमी वेडाच म्हणत आले. पण महाराजांचे मात्र ते आदरणीय गुरू होते. त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागल्यामुळेच महाराजजी महाराजश्रीच्या पदापर्यंत पोहोचले. साक्षात्कारी महापुरुष बनले. जोपर्यंत पुण्य पुरुषार्थ कमी असतो तो पर्यंत संशय नष्ट होत नाही, जोपर्यंत सर्व संशय नष्ट होत नाही तोपर्यंत संशय-भ्रम नष्ट करणारे सद्गुरू मिळत नाहीत. तेव्हा तोपर्यंत संतांमध्ये श्रद्धा असणे पर्याप्त आहे कारण 'श्रद्धावान लभते ज्ञानम्' श्रद्धावानाला ज्ञान प्राप्त होते.

# प्रश्नोत्तर

हरिद्वारमध्ये हे विचार ऐकून विचार करू शकणाऱ्या काही लोकांनी धर्माबाबत अधिक स्पष्टीकरण करण्यास सांगितले. त्यांनी महाराजश्रींना हेही विचारले का आपण हिंदूधर्म मानतात की नाही ? आपण कोणत्या धर्माला मानता ? आपल्या धर्माचे नाव काय आहे ? धर्मामध्ये कोणकोणत्या गोष्टी येतात ? आपल्या धर्माची व्याख्या काय आहे ?

काही महत्वपूर्ण प्रश्नांना उत्तरे देतांना महाराजश्रींनी सांगितले की, पाहा, धर्म ना तर कधी हिंदू असतो ना मुसलमान ! त्यावर बौद्ध, जैन, पारसी, इसाई, यहुदी किंवा माझा स्वत:चा किंवा इतर कोणाचाही विशेष अधिकार असत नाही. संपूर्ण सृष्टीत एकच धर्म आहे. जो शाश्वत आहे तोच धर्म आहे. तोच शाश्वत धाम देतो. जो नश्वर आहे तो अधर्म आहे - तो मृत्यू देतो. ऋग्वेदामध्ये सांगितले आहे ''अतोधर्मानि धारयन्'' (१/२२/१८) जो सर्वांना धारण करतो (तो परमात्मा असतो) तोच धर्म आहे. तो हिंदू किंवा मुसलमान नसतो.

आता हे खरे आहे की, भारत देशात जो धर्म आहे त्याचे नाव हिंदू असे ठेवण्यात आले आहे. हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद इत्यादी अनेक संघटना हिंदू शब्द घेऊन उभ्या आहेत. बौद्ध, जैन, शिख, या सर्व हिंदू धर्माच्याच शाखा आहेत असे मानले जाते. परंतु या सर्वांचे भांडण आहे ते हिंदुशीच आहे. बौध्द वेगळा व्हायचे म्हणतो ते हिंदू धर्मापासूनच. शिखांना आपली वेगळी संघटना करावयाची आहे- तेही हिंदूशी फारकत घेऊनच. आतंकवाद्याचा आक्रोश सुरु आहे तोही हिंदूंच्या विरुद्धच. खर म्हणजे हिंदू हा धर्मच नाही.

हिंदू हे एक क्षेत्रीय विशेषण आहे. गजनी येथील लुटारूंना भारतीय मंदिरात असणारी संपत्ती लुटण्याची चटक लागली. तेव्हा त्यांनी सीमेवरील सिंधू नदीच्या किनाऱ्यावरील लोकांकडून या देशाविषयी माहिती मिळवली. त्या भागात आजही 'स' चा उच्चार 'ह' करतात. लिहितील 'शेरसिंह' मात्र वाचतील 'हेरहिं' त्यांनी सिंधू नदीला, हिंद नदी, आणि त्या नदीच्या पलीकडे राहणाऱ्यांना हिंदू लोक असे त्यांना म्हटले. वेदामध्ये सरिताचे हरिता वाचणे, सरस्वतीला हर:वती असे वाचणे व बोलताना मासाला

माह, सप्ताहाला हप्ता, केसरीला केहरी म्हणणे हे त्या लोकांच्या उच्चाराचा परिणाम आहे. 'हिन्दुस्तान चलना है' 'हिन्दुओ को पकडो', 'हिन्दुओंको लूटो' म्हणणाऱ्या आक्रस्ताळ्यांच्या हातात शासन व्यवस्था आल्यावर त्यांनी येथे राहणाऱ्या लोकांना हिंदू म्हणण्यास सुरुवात केली. येथील साध्या भोळ्या अशिक्षित जनतेने त्या शब्दाचे पाठांतर केले व हिंदू शब्द रूढ झाला.

त्यावेळी जाणून बुजून लोक अशिक्षित राहिले असे नाही. आमच्या स्मृतींचा तेव्हा कायदाच असा होता की खूप कमी लोकांना शिकता येत होते. यामुळे पुन: पुन्हा हिंदू शब्द लोकांच्या बोलण्यात आला व तो प्रचलित झाला. अन्यथा आमच्या कोणत्याच धर्मशास्त्रामध्ये हिंदू शब्द नाही. संस्कृत ग्रंथाची तर गोष्टच सोडा. रामचरित मानस लिहिले तेव्हा मोगलांचा भारतावर दबदबा निर्माण झाला होता. तेव्हा शेहनशाह अकबराचा शासनकाळ होता. 'हिंदू शब्द प्रचलित झालेला होता. तत्कालिन कवींनी या शब्दाचा प्रयोग केला, परंतु गोस्वामी तुलसीदासांनी या अनावश्यक शब्दाचा प्रयोग आपल्या लेखणीत केला नाही. स्वामी दयानंद सरस्वतीनीसुद्धा 'आर्य' ऐवजी हिंदू शब्दाचा प्रयोग उचित समजला नाही. संतांनी या शब्दाचा वापर फक्त उद्‌बोधनासाठी केला.

तेव्हा हिंदू हा शब्द ना धर्माचा पर्याय आहे ना ही अरब लोकांची भेट आहे. ही तर सिंधूच्या काठी राहणाऱ्या लोकांची देणगी आहे. भेट आहे. हिंदी महासागराच्या पूर्वेकडचा प्रदेश हा हिंद-क्षेत्र म्हणून हिंदुस्थान म्हणून ओळखण्यास येऊ लागला. तेव्हा अशा प्रकारे हिंद शब्द स्थानवाचक आहे, तो धर्मवाचक नाही.

चीनमध्ये राहणाऱ्याला चायनीच म्हटले जाते. अमेरिकेत राहणाऱ्याला अमेरिकन म्हटले जाते, तर अमेरिकन हा काय धर्म झाला ? या प्रकारे हिंदुस्थानामध्ये राहणाऱ्याला हिंदू म्हटले म्हणून तो हिंदू धर्म कसा झाला ? तसे पहावयास गेले तर या देशाचे नाव कधीही हिंदुस्थान असे नव्हते. अत्यंत प्राचीन काळापासून आजपर्यंतच सरकारी दप्तरात 'भारत' हे नाव लिहिले जाते. कोणत्याही देशाचे नाव पृथ्वीच्या एकेका भागाचे नाव आहे तो धर्म नव्हे.

धर्म तर सर्वदेशीय, सार्वकालिक आणि सर्वासाठी असतो व असा आहे केवळ एकच परमात्मा । त्या अव्यक्त मन-वाचेच्या पलीकडे असणाऱ्या सत्तेचे

नाव काय होईल ? तो तर अनिर्वचनीय आहे. पण तरीही ईश्वराच्या सांकेतिक सहस्त्र नामांपैकी काही शब्दांचा उपयोग वेळोवेळी करण्यात आला. उदाहरणार्थ वैदिक वाङ्मयात ज्याला ध्रुव, सत् आणि सनता धर्माणि म्हणजे सनातन धर्म असे म्हटले गेले. परवर्ती भारतात त्याचे नाव होते ब्राह्मण धर्म । येथे ब्राह्मण म्हणजे एखादा सामाजिक वर्ग नाही, गोपथ-शतपथ, ऐतरेय किंवा ताण्डय नावाचा ब्राह्मण ग्रंथ नाही, परंतु ब्रह्मांची प्राप्ती करून घेणारी प्रत्येक व्यक्ती ब्राह्मण आहे आणि या क्रियांचे कर्मांचे अनुशीलन करणारे लोक ते आर्य म्हटले गेले. आर्य याचा अर्थ आर्य समाजी लोक असा नाही.

आमच्या प्राचीन आर्ष ग्रंथात आर्य व अनार्य या शब्दांचाच वापर केला गेलेला आहे. वाल्मीकी रामायणानुसार उत्तर भारतीय, दक्षिण भारतीय, सुग्रीवाचा परिवार, वानर-भालू या सर्व जाती आर्य होत्या. रावण अनार्य होता पण त्याचे पूर्वज पुलस्त्य, विश्रवा तसेच त्याचा भाऊ विभीषण हे सर्व आर्य होते. रणक्षेत्रात विशालकाय कुंभकर्णाला पाहून वानरी सेना विचलित व्हायला लागली तेव्हा अंगदाने त्यांना प्रेरणा दिली की ''शूर वीरांनो आम्ही या आर्यांची मुले आहोत ज्यांनी युद्धात कधी पाठ दाखवली नाही. आज जर आम्ही शत्रूला पाठ दाखवली तर आम्ही अनार्य समजले जाऊ. तेव्हा जो आपल्या लक्ष्यबिंदूवर दृढपणाने-निर्धाराने दृष्टी ठेवून उभा असतो तो आर्य होय. गीतेमध्येही सांगितले आहे ''अनार्यजुष्टम्-अर्जुन । अर्जुना तू हे अनार्यासारखे आचरण कुठून शिकलास ? आळस सोडून युद्ध कर.

आर्य आणि अनार्य या शब्दाबाबत भगवान बुद्धांचे विचार माज्झिम निकायच्या पाशराशी सुत्तामध्ये संकलित आहेत. त्यांनी त्यात म्हटले आहे की, ''भिक्षूंनो, या जगात दोन प्रकारचे शोध (पर्येषण) आहेत. एक आर्य व दुसरा अनार्य । अनार्य म्हणजे जो स्वयं जातधर्मा (जन्माला येणारा) असूनही जातधर्माचाच शोध घेतो. स्वत: जरा धर्मा (म्हातारा होण्याचा स्वभाव असणारा) असून ही जरा-धर्माचेच आव्हान करतो. व्याधी मरण, शोक आणि संक्लेशधर्मा असूनही त्याचाच पुन्हा शोध घेत बसतो. पुत्र आणि भार्या जातधर्मा आहे. सोने, चांदी, तसेच या जगातील सर्व भोग सामग्र जातधर्मा आहे. त्यामध्ये हे पुरुष मोहवश, ग्रासित व आसक्त होऊन स्वत: जन्मणारे असूनही दुसऱ्या नश्वर पदार्थांचा शोध घेत बसतात. यालाच अनार्याचा शोध म्हणतात.

परंतु भिक्षूंनो, काही काही पुरुष स्वत: जातधर्मा असूनही जातधर्माचे दुष्परिणाम पाहिल्यानंतर अजात (जन्मरहित), सर्वोत्तम, मंगलमय निर्वाणाचा शोध घेतो. स्वयं व्याधिधर्मा (व्याधिरहित),मरण-धर्मा (मरणरहित), अमृत, (शोकरहित), स्वय संक्लेशधर्मा (मलरहित) अति उत्तम योगक्षेम, निर्वाणाचा शोध घेतो तो आर्यपथावर आहे.

म्हणजे स्पष्ट आहे की, आर्य एक पथ आहे. मनाची एक निर्धारित दिशा आहे. त्यामुळे आपला एक भाऊ आर्य व दुसरा अनार्य होऊ शकतो. एकच व्यक्ती जीवनात एखाद्या क्षणी आर्य आणि दुसऱ्या क्षणी अनार्य होऊ शकते. एखादी व्यक्ती कधी आस्तिक तर कधी नास्तिक होऊ शकते. जो अस्तित्वाचा उपासक आहे, आस्तिक आहे तो आर्य आहे. निष्ठेबरोबरच परमात्म्याला प्राप्त करण्याच्या विधीचे आचरण म्हणजे आर्य शोध आहे आणि या उलट जो अस्तित्वविहीन, नश्वर, क्षण-भंगुर कलेवराची कामना ठेवून भटकत असतो तो अनार्य आहे. यालाच महापुरुषांनी कधी विद्या आणि अविद्या म्हटले तर कोणी याला अंतर्मुखी-बहिर्मुखी, सजातीय-विजातीय, तर दैवी संपद - आसुरी संपद असे म्हटले. ही एक वृत्ती आहे, प्रवृत्ती आहे. सत्याची प्रवृत्ती आर्य आहे. असत्याची प्रवृत्ती अनार्य आहे. व म्हणूनच सर्व जग आर्य आहे व सर्व जग अनार्य आहे. वेदात म्हटले आहे की 'कृष्वन्तु विश्वमार्यम्' अर्थात विश्वाला आर्य बनवा. म्हणजे आर्य बनवले जाते. जन्मामुळे किंवा स्थानामुळे-पदामुळे कोणी आर्य बनत नाही. जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ वेदापासून गौतम बुद्धांपर्यंत सर्वांनी आर्य या शब्दाचा अर्थ इष्टोन्मुखी प्रवृत्ती असे मानले, गुणवाचक मानले. भारताबाहेरून आलेल्या जातीला त्यांनी आर्य म्हटले नाही. भारतामध्ये त्या परमात्म्याचा शोध घेणारे पुष्कळ होते म्हणून भारताला कधी आर्यावर्तदेखील म्हटले जात होते. ज्यासमाजातील मोठा हिस्सा परमात्म्यासाठी संकल्पवान होता, इंद्रिय संयम आणि मनाचा निरोध करण्यास जो कटिबद्ध होता, त्याची राहणी करणी, खाणे-पिणे, वेशभूषा, लग्न नियम, कायदे हे सर्व सुसंस्कृत होते म्हणून तिला आर्यसंस्कृती म्हटले. परंतु आर्यांची जी मूलभूत क्रिया म्हणजे आचरण संकल्प त्यावर केवळ भारतीयांचे वर्चस्व नाही; तर विश्वातील मनुष्य मात्राला तो अधिकार आहे. आपल्याला ख्रिस्ती मानणारासुद्धा जर त्या अविनाशी परमात्म्याच्या शोधात तत्पर असेल, तर तोही आर्य आहे, अन्य काहीही नाही. समजा तो मुसलमान असला (सूफी संताप्रमाणे) तरी तो जर परमात्म्यासाठी व्याकूळ असेल,

त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असेल, तर तोही आर्यच होय. आर्यत्व हे खाणे-पिणे, वेशभूषा, राहणी करणीची पद्धत किंवा सामाजिक व्यवस्था नाही परंतु ती एक योग क्रिया आहे, की जी केल्याने हा जीवात्मा आपल्या मूळ परमात्म्यापर्यंतचे अंतर दूर करतो. जो दैवी संपदेने युक्त आहे तो आर्य होय व जो आसुरी संपदेने युक्त आहे तो अनार्य आहे.

धर्मासाठी वेदामध्ये सांगितलेला सनातन हा शब्द योग्य आहे. सनातन म्हणजे जो सदैव होता आणि जो सदैव राहणार आहे. आणि असा एकमात्र परमात्मा आहे. त्यांच्या अंशमात्रानेच या सृष्टीचा संचार झाला आहे. येथील प्रत्येक कणात तो भरलेला आहे. प्रत्येक आत्मा परमात्म्यामध्ये प्रवेश करू शकतो. सर्वांना ते अविनाशी तत्त्व प्राप्त करावयाचे आहे व हे तत्वच सनातन आहे, तेच सत्य आहे. त्या प्रभूचा वास सर्वत्र आहे आणि भावपूर्ण व निष्ठापूर्वक स्मरणमात्राने तो जागृत होतो व आपल्या स्वरूपापर्यंत असणारे अंतर तो दूर करतो- हेच सनातन सत्य आहे व म्हणून धर्माचे नाव सनातन आहे.

सत्यान्वेषी महापुरुषांनंतर जर क्रियाहिन लोकांनी त्याचे स्थान ग्रहण करायचा प्रयत्न केला तर धर्मावर एक प्रकारचे आवरण येते. अनेक कल्पित पूजा-पद्धती, विकृती, रीतीरिवाज व अनेक प्रकारच्या अवडंबरामुळे धर्म आच्छादित होतो. व अशी जेव्हा धर्माची तिमिराच्छन्न अवस्था बनते तेव्हा एखादा महापुरुष आलोकपुंज बनून उदयास येतो. त्याच्या अविर्भावासाठी कोणत्याही शिष्य परंपरेची किंवा गादीची-पीठाची आवश्यकता नाही. **''अनेक जन्म संसिध्दस्ततो याति परां गतिम्''** अनेक जन्मांपासून चालत असणारा पथिक कोठेही जन्म घेऊ शकतो. पूर्वजन्मातील अभ्यासामुळे त्याच्यामध्ये योग्यता आलेली असते. त्यामुळे त्यांना कोठेही कोणाच्याही सहाय्याची अपेक्षा नसते. शंभर जन्मांपासून बुद्ध साधू होते. श्रीकृष्णांच्या दहा जन्मांचा उल्लेख महाभारतामध्ये आहे. व म्हणूनच अनेक जन्मांपासून चालत असणाऱ्या साधकाचा भगवंताची प्राप्ती होणारा अंतिम जन्म असतो. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात तो ज्ञानी म्हणजे माझे साक्षात स्वरूप होय. जन्म घेऊन तो ती क्रिया पुन: करेल आणि शीघ्र आपला हेतू तडीस नेईल-आपले लक्ष्य प्राप्त होईल. लक्ष्य विदित केल्यानंतर जेव्हा तो समाजाला संबोधित करेल तेव्हा त्याच्या मुखातून तेच सत्य प्रस्फुटित होईल कारण त्याच्याकडून बोलविता धनी तर ईश्वरच असतो. त्याची बुद्धी यंत्रमात्र असते. त्यामुळे

शाश्वत व सनातन असणारे सत्यच त्याच्या मुखातून बाहेर पडेल. त्यामुळेच जगातील कोणत्याही कोपऱ्यात किंवा कोणत्याही समाजात, कोणत्याही घरात जन्म घेतलेला संत निंदापात्र असत नाही.

त्या महापुरुषांनी नवीन धर्माचा अविष्कार केला आहे किंवा एखादा नवीन मार्ग दाखवला आहे असे होत नसते. तो नेहमी एक सनातन सत्यच सांगत असतो. तेव्हा या आपण सर्व जण एकाच धर्माचे उपासक बनू या जो सत्य आहे, शाश्वत आहे सदा एकरस आहे. त्यामध्ये भिन्नता किंवा अविष्कार-संशोधन होऊच शकत नाही. योगेश्वर श्रीकृष्णांनी तर इथपर्यंत सांगितले आहे की असा हा आत्मा दुसरे काही बनू शकतच नाही. जेव्हा इतर काही होणारेच नाही तर मग दुसरे काय शोधणार? आमचाही अलग असा कोणताही धर्म किंवा पथ नाही. कोणताही महापुरुष नवीन धर्म स्थापन करीत नाही. धर्माचे जे पुरातन नाम आहे त्यामध्ये किंचित परिवर्तन जाणवते; पण त्याचे कारण म्हणजे ईश्वराच्या हजारो नावांपैकी एखाद्या विशिष्ट नावाचाच तो अधिक प्रयोग करतो. उदा. गौतम बुद्ध घ्या. त्यांनी काही कोणता नवीन धर्म स्थापन केला नाही. त्यांनी अथक परिश्रमपूर्वक साधना केल्यानंतर त्यांनी जेव्हा भगवंताच्या कृपेचा अनुभव घेतला तेव्हा त्यांनी सांगितले की, रात्रीच्या अंतिम प्रहरी माझ्या आधीच्या महापुरुषांनी ज्याला प्राप्त केले होते ते अविनाशी तत्त्व मला प्राप्त झाले. ती सर्वज्ञता प्राप्त झाली. (अश्वघोषकृत बुद्धचरित सर्ग १४, श्लोक ८५-८६)

विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे बुद्धांच्या पूर्वी बौद्ध धर्म नव्हता तर मग बुद्धांचे पूर्वज कोण होते ? तेच जे तुमचे आमचे होते. बुद्ध आमच्यातलेच होते. क्षत्रिय कुळात जन्म झाला, त्याच रीतिरिवाजात मोठे झाले. त्यांनी भगवंताची भक्ती केली. मग त्यांनी काय प्राप्त केले ? तर तेच अविनाशी परम पद जे त्यांच्या पूर्वीच्या ऋषिमुनींनी प्राप्त केले होते. महात्मा बुद्धाच्या पूर्वी कोणते महर्षी होते ? तेच भगवान राम, भगवान श्रीकृष्ण, वशिष्ठ, विश्वामित्र वाल्मीकी इत्यादी.

गीतेत म्हटले आहे की सत्‌चा तिन्ही काळात अभाव नाही. शरीर नाशवंत आहे, मृत्यू पावणारे आहे पण शरीरात राहणारा आत्मा परम सत्य आहे, सनातन आहे, शाश्वत आहे. वास्तविक ईश्वराचे कोणते नाव नाही; परंतु विविध दृष्टीतून केलेले संबोधन आहे. त्यापैकी एक संबोधन अविनाशी हे ही आहे. बुद्धांनी सांगितले की मी ते अविनाशी तत्त्व

प्राप्त केले. त्याच परमात्म्याचे दुसरे नाव आहे-सर्वज्ञ. बुद्धांनी सांगितले की मला, सर्वज्ञता प्राप्त झाली. यावरून स्पष्ट होते की बुद्धांनी त्याच शाश्वत सत्याचा पुनरोच्चार केला आहे की जे आदिसत्य आहे, जे मूलसत्य आहे. त्यांनी गीतेत जसे सांगितले आहे त्या अविनाशी सनातन, अमृत तत्त्व, परमात्मा किंवा त्या सर्वज्ञालाच प्राप्त केले व तेच त्यांनी लोकांना सांगितले.

तथागतांच्या मुखातून बोध शब्दाचा अधिक प्रयोग झाला. बोध म्हणजे ज्ञान! आदि शंकराचार्य म्हणतात - 'बोधो हि को यस्तु विमुक्ति हेतुः' - बोध म्हणजे काय? बोध म्हणजे मुक्तिचे साधन आहे. गीतेमध्ये याच बोधाला ज्ञान म्हटले आहे.

**यस्य सर्वे समारम्भा काम संकल्प वर्जिता ।**
**ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तमाहुः पण्डित बुधाः ।।**

वेदामध्येही म्हटले आहे, 'ऋते ज्ञानान्न मुक्तिः-' ज्ञानाशिवाय मुक्ती नाही. या प्रकारे हा बोध शब्द त्या परमात्म्याचेच एक संबोधन आहे, एक विभूती आहे. बुद्धांनी सतत वापरलेल्या शब्दांच्या आधारे मागून येणाऱ्या लोकांनी एक सूत्र गुंफले - 'बुद्धं शरण गच्छामि, संघं शरणं गच्छामि' 'धम्मं शरणं गच्छामि - धर्माला शरण जा. कोणता धर्म ? तोच शाश्वत, सनातन जो तुमचा माझा सर्वांचा धर्म आहे. हा बोध (ज्ञान) शब्द सनातन शब्दाचाच पर्यायी शब्द आहे. याच प्रकारे आमच्या चोविस अवतारापैकी ऋषभदेवांच्या शिष्य परंपरेत महावीर स्वामी झाले. त्यांची तपश्चर्या व सहनशीलता अत्यंत प्रसिध्द आहे. राज्यपरिवारात जन्मलेले असूनही त्यांनी आयाचित भिक्षावृत्तीने आपला निर्वाह केला. काहीनी त्यांना वेडा ठरवून दगड मारले, काहींनी त्यांच्या कानात खिळे ठोकले. पण तरीही ते ना क्रोधित झाले ना क्षोभित झाले. भगवत्‌भक्तीतच ते दंग होते. त्यांना जेव्हा ती स्थिती प्राप्त झाली तेव्हा त्यांनी निर्णय दिला की आत्माच सत्य आहे, शाश्वत आहे. कठोर तपस्येच्या द्वारा, इंद्रिय संयमाचे द्वारे, तीर्थस्वरूप महापुरुष अर्थात तीर्थकरांच्या सेवेच्या द्वारे - याच कर्माचे द्वारा त्याला प्राप्त केले जाते. त्याला शोधा. त्यांच्या या विचार धारेला जैन म्हणून वेगळा धर्म समजला जातो. पण त्यांनी आत्मा व कर्माचा जो सिद्धांत सांगितला आहे तो गीतेत सांगितला आहे की आत्माच सत्य आहे, सनातन आहे. त्याला जाणण्यासाठी एखाद्या तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा.

'जीव अयन स जैन ।' अयन म्हणजे घर । या जीवात्म्याला आपले घर, आपले शाश्वत स्वरूप प्रदान करावे असे जैन विचारसरणीत सांगितले आहे. आणि हे शाश्वत स्वरूप जीन बनल्याने, जितेन्द्रिय बनल्याने, केवली (यती) बनल्याने, कैवल्य (परम पद) प्राप्त केल्याने प्राप्त होते. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण हेच म्हणतात की हृदयस्थित ईश्वराला शरण जा. 'तत्प्रसादात परां शानी स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।' (गीता १८/६२). त्याच्या कृपेने तुम्ही ते शाश्वत असणारे स्थान प्राप्त करू शकता. महावीरांची हीच घोषणा आहे की जीवात्म्याला त्याचे अयन मिळवून देईन. इंद्रिय संयमद्वारा साधनेच्या मार्गावर चालून त्या मूलतत्त्वाचा स्पर्श, आत्म्याचा साक्षात्कार, प्रवेश व स्थिती प्राप्त करून घेणे ही महावीरांची घोषणा आहे. मग त्यांचा धर्म नवा कसा झाला ? सनातनापासून तो भिन्न कसा ? कारण जे श्रीकृष्णांनी सांगितले तेच महावीर स्वामींनी सांगितले आहे. तात्पर्य, कोणताही महापुरुष कोणत्याही नवीन धर्माचे सृजन करीत नाही, उलट शाश्वताच्या नावावर जे अवरोधक रीतिरिवाज त्याला चिकटले जातात, धर्म जेव्हा लुप्त झाल्यासारखा होतो तेव्हा असे युगान्तकारी महापुरुष त्यावरील आवरण धुऊन टाकतात व त्याचा मूल बिंदू समाजाला दाखवून देतात, समाजाला त्या सत्याच्या बिंदूवर आणून उभे करतात. महावीरांच्या या प्रयत्नातच सनातनाचे जे एक नाव 'जैन' ते त्यांच्या उपदेशाला देण्यात आले. गौतम बुद्ध सुद्धा स्वत:ला जिन्, केवली व वेदगू असे म्हणत होते.

बरोबर याच प्रकारे शिख समुदाय आपण सनातन धर्मापासून वेगळे आहोत हे दाखवण्यासाठी संघर्षरत आहेत. शिख याचा अर्थ शिष्य. जो शिकवण प्राप्त करतो तो शिष्य. तेव्हा सद्गुरूच्या शिकवणीप्रमाणे चालणारा प्रत्येक मुनुष्य शिख आहे. हे सुद्धा सनातनाचेच एक नाव आहे. यामध्ये सनातनाकडे जाणाऱ्या माध्यमावर (सद्गुरुवर) अधिक भर देण्यात आला आहे. कोणी लक्ष्यावर भर दिला आहे तर कोणी माध्यमावर. पण सर्वांना एकच गोष्ट (सनातन-शाश्वत तत्त्व) सांगावयाची आहे.

खर म्हटल तर हा सनातन धर्म म्हणजे सद्गुरुच्या उपदेशा प्रमाणे चालणाऱ्या शिष्य परंपरेला दिलेले नाव आहे. गीता हे शुद्ध शास्त्र आहे; परंतु ते पण गुरुशिष्य संवादाव्यतिरिक्त दुसरे काही नाही. म्हणजे गुरू शिष्य परंपरेचे नाव धर्म आहे. केवळ भारतातच नव्हे पण समस्त जगात धर्माच्या नावावर जे काही आहे ते गुरुंच्या मागे व्यवस्थित गोळा झालेला समाज आहे. भारतामध्ये दोन चार प्रकारचे

धर्म नाहीत. वास्तविक धर्म एकच आहे, जो काळाच्या पलीकडे गेलेला पुरुष आहे, जो अविनाशी आहे तो आमचा धर्म आहे. या जीवाला स्वत:चे धाम मिळवून देण्यात तत्पर असणारा जैन आमचा धर्म आहे. परमात्म्याचा सहज बोध करणे व करवणे हा आमचा धर्म आहे. सद्गुरुच्या पदचिन्हांचे अनुकरण करून त्या सत्यात प्रवेश मिळवणे आमचा धर्म आहे. हेच गुरुनानक यांनी सांगितले एक परम प्रभूच फक्त सत्य आहे. या व्यतिरिक्त सृष्टीमध्ये जे काही आहे ते सर्व अस्तित्व विहीन आहे. नश्वर आहे. तेव्हा एक परमात्म्याचेच स्मरण केले पाहिजे.

**सिमरउ सिमरि सिमरि सुख पावहु ।**
**कलि कलेस तन माहिं मिटावहु ।।**

म्हणजे सुमिरन-स्मरण करा; कारण स्मरण करूनच सुख प्राप्त केले जाते व क्लेश नाहीसे होतात. पण कोणाचे स्मरण करावे ? सुखमनी साहेबमध्ये नानक म्हणतात -

**सिमरउ जासु विसम्भर एकै ।**
**नाम जपत अनगणत अनेकै ।।**

म्हणजे जो विश्वाचे भरण पोषण करणारा आहे त्याचे स्मरण करा. तो एकच आहे त्याची नावे अनंत आहेत, अनेक आहेत. मग त्याला कोणत्या नावाने संबोधावे? त्याची किती नामे जपावित ? यावर म्हणतात

**वेद पुरान सिमृति सुधाख्यर ।**
**कीन्हे राम नाम इक आख्यर ।।**

वेद, पुराण, स्मृती हे सर्व एक राम नामाचेच फळ आहे.

**किनका एक जीसु जीय बसावे ।**
**ता की महिमा गनी न आवे ।।**

या रामनामाचा एक कण ज्याच्या हृदयात ठसतो त्याचा महिमा मोजता येत नाही. वर्णन करता येत नाही.

**राम नाम उर मे गह्यो, ताके सम नहिं कोय ।**

**जा सुमिरत संकट कटे, दरस तुम्हारो होय ।**

रामनाम ज्याच्या हृदयात बसते-ठसते त्याच्यासारखे दुसरे काहीही नसते. या नामस्मरणाने संकट दूर होतात आणि प्रभूचे दर्शन घडते. आता तुम्हीच मला सांगा की गुरु नानक वेगळे काय सांगत आहेत ? जे गोस्वामी तुलसीदास, महात्मा बुद्ध, महावीर स्वामी व गीतेने सांगितले आहे तेच सांगत आहेत. नानकांना तुम्ही सनातनापासून कसे अलग करणार ? कारण त्यांनी म्हटले ''एक ओंकार सदगुरू प्रसादि'' सत्य एक ओंकार आहे मग सनातन काय आहे ?

तेव्हा जर हे आमचे नाहीत किंवा हे आमच्या धर्माच्या विपरीत आहेत-विरुद्ध आहेत असे म्हणून जर आम्ही महापुरुषांचा त्याग केला तर आम्ही आमच्याच पूर्वजांना हरवून बसल्यासारखे होईल. त्यांनी जे सत्य सर्वांच्या कल्याणासाठी सांगितले ते आम्ही हातचे घालवले असे होईल. ही आमची चूक ठरेल. तेव्हा लक्षात ठेवा की सत्य उद्‌धाटित करणारा प्रत्येक महापुरुष वंदनीय आहे.

सर्वांसाठी शुद्ध नाव सनातन आहे. 'भोजन अशाच पद्धतीने करा' 'अशीच वस्त्रे परिधान करा' या गोष्टींचा धर्माशी काही संबंध नाही. या गोष्टी सनातन नाहीत. सनातन तर एकमात्र परमात्मा आहे तोच शाश्वत आहे, अविनाशी आहे. त्याला शस्त्रे कापू शकत नाहीत, अग्नी जाळू शकत नाही, पाणी ओले करू शकत नाही, आकाश त्याला स्वत:मध्ये समाहित करू शकत नाहीत. 'न हन्यते हन्यमाने शरीरे' शरीर मरण पावले तरी तो आत्मा मरत नाही. आत्मा म्हणजे सदैव राहणारे अमृत तत्त्व आहे. तो एकमात्र धर्म आहे. तोच सनातन आहे. त्याच्या व्यतिरिक्त सर्व सृष्टी, कश्यप आणि आदितीची मुले, सूर्य चंद्र, पृथ्वी, पाताळ सर्व काही पुनरावर्ती स्वभावाचे आहेत की ज्यांचे काही अस्तित्व नाही. केवळ तो एकमेव परमात्माच शाश्वत आणि सत्य आहे. जर आम्ही त्या परमेश्वराला जीवनाचा उद्देश्य बनवले नाही, त्याच्या सर्वव्यापकतेवर विश्वास ठेवला नाही तर आम्ही सनातनी किंवा धार्मिक कसले ?

आता धार्मिक कोणाला म्हणायचे ? धर्मशास्त्र गीतेचा हा निर्णय आहे की सृष्टीमध्ये जन्माला येणारा कोणताही प्राणी जर अनन्य भावाने एकमेव असणाऱ्या परमेश्वराला भजत असेल तर तो 'क्षिप्रं भवति धर्मात्मा' - शीघ्र-धर्मात्मा बनतो. तेव्हा

गीतेच्या मते धार्मिक होण्यासाठी केवळ एकच अट आहे, धर्मात्म्याची केवळ एकच ओळख आहे की भजते माम् अनन्य भाक् अनन्य म्हणजे अन्य कोणी नाही. केवळ एका परमात्म्याचे जो चिंतन करतो तो धार्मिक आहे. अध्याय अठराव्यात म्हटले आहे की तो ईश्वर सर्वभूतांना हृददेशे.. तिष्ठति' सर्व प्राण्यांच्या हृदयात राहतो. व म्हणून त्याच्यामध्ये प्रवेश करण्याचा अधिकारपण सर्व प्राण्यांना आहे. गरीब-श्रीमंत, काळे-गोरे या सर्वांचा तो आहे व सर्वांसाठी तो सुलभ आहे. त्याला प्राप्त करणे कठीण आहे असे सांगून समाजाला चुकीच्या मार्गाकडे नेणारे सनातन तत्त्वाला जाणत नाही; उलट अचेत आत्म्यांची ते हत्या करतात. त्यांना धर्माचे यथार्थ रूप समजावून सांगितले पाहिजे.

सत्यनिष्ठ सद्गुरूच्या उपदेशांचे पालन करणे व त्यांनी सांगितल्याप्रमाणे आचरण करणे धर्म आहे. जो स्वत: तत्त्वामध्ये स्थिर आहे, ईश्वरीय संकेत ज्याला समजतात व जो समजावू शकतो तोच सद्गुरु आहे त्यांच्याकडे जा असे वेद, गीता, मुहम्मद, महावीर, येशू, बुद्ध नानक आणि झरतुष्ट्र सांगतात. त्याचा विधी शिकण्यासाठी पंडे, पुजारी आणि मौलवी यांच्याकडे जाणे चुकीचे आहे कारण कोणत्याही महापुरुषाने त्यांच्याजवळ जायला सांगितले नाही. ते तर पाठशाळेचे फक्त व्यवस्थापक आहेत.

**गुरोर्वाक्यं सतत् गेयं न ज्ञेयं शास्त्र कोडिभि:** अर्थात जर सद्गुरूचे एखादे वाक्य मिळाले तरी ते सत्य आहे, धारण तसेच अनुकरण करण्यास योग्य आहे. त्या समोर करोडो शास्त्रे व्यर्थ आहेत. 'महाजनो येन गत: स पंथा' वास्तविक ते अविनाशी तत्त्व (परमात्मा) प्राप्त करण्यासाठी ते ज्या मार्गाने गेले तोच एक पथ आहे. त्या आप्त-पुरुषांच्या उपदेशाचे अनुसरण करणे हेच धर्माचरण होय. व म्हणून सृष्टीमध्ये धर्म एकच आहे.

इतिहासविदांनी एकमताने मान्य केले आहे की ऋग्वेद जगातील प्राचीनतम ग्रंथ आहे, तो ग्रंथ म्हणजे पहिले धर्मशास्त्र आहे. सर्वप्रथम धर्म आणि ज्ञानाचा उद्घोष करणाऱ्या वैदिक ऋषींचा सुविख्यात निर्णय पुरुष सूक्तामध्ये आहे की तो एकमेव असणारा परमात्माच सत्य आहे. तेजाच्या अंशमात्राने सृष्टीचे संचालन होत असते. तेच अमृत तत्त्व आहे. त्याला प्राप्त करण्याशिवाय अमर होण्याचा अन्य कोणताही मार्ग नाही. पूर्वीच्या ऋषिमुनींनी त्या अविनाशी परमात्म्याला मानस यज्ञाच्या द्वारे

हृदयामध्ये जाणले. सर्वत्र व्याप्त असूनही त्याचा वास हृदयात आहे. तत्त्वदर्शींच्याजवळ जाऊन हे जाणून घ्या.

आजपासून सहा हजार वर्षांपूर्वी श्रीकृष्णांच्या मुखातून नि:सृत झालेल्या गीतेचा निर्णय आहे की, एकमात्र आत्माच सत्य आहे. शाश्वत, सनातन आणि अमृत-स्वरूप आहे. त्याच्याशिवाय दुसरे काहीही सत्य नाही व पूज्यही नाही. त्याचा निवास हृदयात आहे आणि मानस यज्ञाच्या द्वारेच त्याला प्राप्त केले जाते. त्याचा विधी एखाद्या तत्त्वदर्शी महात्म्याकडूनच प्राप्त होऊ शकतो.

भारतातील विविध भाषांमध्ये आणि विविध ग्रंथामध्ये या मूल ज्ञानाचा (वेद आणि गीता) विस्तार आहे. बुद्ध, महावीर, गुरुनानक, कबीर इत्यादी महापुरुषांच्या उपदेशाचे सार हेच आहे की परमात्मा एक आहे आणि कठोर तपश्चर्येने तो हृदयात जागृत होतो. बुद्धाने तेच तप केले आणि त्या सर्वज्ञाला प्राप्त केले.

आजपासून दोन हजार वर्षांपूर्वी इसा मसीहाने हेच सांगितले, की ईश्वर एक आहे व त्याचा निवास सर्वत्र असूनही त्याची प्राप्ती हृदयात होते. त्यांच्या या उपदेशाचे संकलन त्यांच्या शिष्यांनी बायबल मध्ये केले आहे. ''माझ्याजवळ या म्हणजे तुम्हाला देवाची मुले असे संबोधले जाईल. 'जवळ या' याचा अर्थ ध्यानाचे द्वारा त्या उंचीपर्यंत पोहचणे जेथे महापुरुष उभे आहेत. एकांत सेवन, निरंतर स्मरण आणि पूर्व चुकांबाबत पश्चाताप हाच त्याच्या प्राप्तीचा उपाय आहे. यावरून स्पष्ट दिसत आहे की, जे वेद व गीतेने सांगितले तेच येशू ख्रिस्ताने सांगितले आहे.

मुहम्मद साहेबांनी चौदाशे वर्षांपूर्वी आपली वाणी कुराण यामध्ये त्या परमतत्त्वावर प्रकाश टाकला आहे की जो वेद आणि गीतेचा निर्णय आहे. ''ला इलाह इल्लिल्लाह'' म्हणजे अल्लाहच्या (परमात्मा) शिवाय अन्य कोणीही पूजनीय नाही. त्या अल्लाहाचा निवास हृदयात आहे - ''दिल मत किसी का दुखाओ बन्दे, यह घर खास खुदा का है ।'' प्राणिमात्रांच्या ठिकाणी आपल्या आत्म्याला पाहिल्यामुळे त्यांनी सांगितले की हिरवे गवत कापू नका, कोणत्याही जीवाला मारू नका, कोणत्याही प्राण्याच्या आत्म्याला दुखवू नका. जे या मार्गावर चालतात व प्रार्थना करतात त्यांना अल्लाची आकाशवाणी ऐकू येते. त्याच्या प्राप्तीचे साधन

सांगताना ते म्हणतात की, जे खुदाचे बंदे आहेत, तत्त्वदर्शी संत आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवा. त्यांच्या निर्देशनाप्रमाणे चालून प्रत्येक वस्तूला तिलांजली देऊन, कठोर चिंतन करून हृदयात त्याला प्राप्त करता येते. तात्पर्य हेच की मुहम्मद साहेबांचा उपदेश वेद आणि गीतेच्या उपदेशापेक्षा भिन्न नाही.

वेद तसेच वेदांचा सारांश असणाऱ्या गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी जो निर्णय दिला आहे तेच ज्ञान जगातील अनेक ठिकाणी अनेक भाषांच्या माध्यमातून अभिव्यक्त झाले आहे. कोठेही तात्त्विक भेद नाही. वेद आणि गीतेद्वारे उदघाटित सत्य आणि साधन पद्धती भिन्न लोकांना समजण्यासाठी भिन्न संतांचे द्वारा विभिन्न क्षेत्रीय भाषांमध्ये सांगितले गेले आहे. त्या भक्तांच्या हृदयात आंतरिक अनुभूतींच्या योगे परमात्म्याने एक सारखाच निर्णय दिला आहे.

जर ईश्वर एक आहे, धर्म एक आहे तर मग धर्मनिरपेक्षता कसली ? ती गोष्ट महत्वहीन वाटते. जेव्हा धर्म एकापेक्षा अधिक (दोन-चार) असतील तेव्हा सापेक्ष व निरपेक्ष या गोष्टी बोलणे ठीक आहे. भाषा व वेशभूषा यांचा धर्माशी काही संबंध नाही. यासाठी भारत सरकारने सर्व धर्माचार्यांकडून या पुस्तकाप्रमाणे धर्मतत्त्वाचे निरुपण करणारी पुस्तके मागवून धर्माचे शुद्ध स्वरूप प्रस्तुत करावे. त्यामुळे समाजातील सर्व भांडणे आपोआप मिटतील. ज्या प्रकारे सूर्याची किरणे धुके दूर करते, अंध:कार नष्ट करतात त्या प्रकारे ईश्वरीय प्रकाशाने अज्ञानाचे धुके नाहीसे होईल. एकच प्रकारचा बोध, एक प्रकारचे इष्ट आणि एक सारखाच मार्ग असल्यावर कोणाला भांडण्याचे कारणच राहणार नाही.

राहणी करणी, आचार विचार, वेशभूषा, भाषा दोन असू शकतात; परंतु साधना दोन असू शकत नाहीत. कारण सर्वजण अविनाशी कल्याण तत्त्वाकडे जाणारे, एकच वस्तूचे उपासक । ज्या प्रकारे कपड्यांची पन्नास दुकाने आहेत; परंतु प्रत्येकाचा साइन बोर्ड, प्रत्येकाचा ट्रेडमार्क भिन्न भिन्न असतो; परंतु प्रत्येक दुकानात कापडच मिळेल. बरोबर याच प्रकारे समस्त संप्रदायांमध्ये एकाच अविनाशी सत्याचा शोध सुरु असतो. चिन्ह असले तर त्या गुरूच्या घराण्याचे असते. एखाद्या महापुरुषाच्या शिष्यांची संख्या इतकी वाढते की ते संख्याबळ एखादा धर्म किंवा संप्रदाय बनून जाते.

प्रत्येक संप्रदायामध्ये कालान्तराने सच्चे फकीर व सच्चे साधक कमी होत जातात व मग व्यवस्थेलाच अधिक महत्व प्राप्त होते म्हणजे ते बाह्य ट्रेडमार्कलाच सजवण्यात

दंग होतात. आतली वस्तू विसरून जातात. या प्रकारे धर्माच्या नावावर भ्रामक गोष्टींचे व संकुचितपणाचे प्राबल्य वाढते.

तुम्ही स्वत:च विचार करा की, सर्व संप्रदायामध्ये आराध्य एकच आहे. सर्वत्र व्याप्त असणारे अविनाशी तत्वही एकच आहे. त्याला शोधण्याची पद्धत म्हणजे महापुरुषांचे, जे ईश्वराचे दूत आहेत, तत्त्वदर्शी आहेत, परमतत्त्व परमात्म्याशी तदरूप आहेत, त्याची अनुभूती घेतलेले आहेत - त्यांचे सान्निध्य । प्रकृतीच्या प्रवाहापासून बाजूला सरकून परमात्म्याशी तद्रूप होण्याचे साधनही एकच आहे. मरणधर्मी मनुष्याला अनंत जीवन देणे, दु:खाचे जागी अनंत आनंद देणे व त्याची प्राप्ती होताच देहाध्यास शांत होतो. शाश्वत - जे अपरिवर्तनशील आहे, अमृत तत्त्व जे मृत्यूच्या पलीकडे आहे, अकालपुरुष जेथे काळ नाही, यांची प्राप्ती ज्या विधीने होते तो विधी धारण करणे हाच धर्म होय. वस्तुत: सनातन - जो निरंतर आहे व निरंतर राहील त्या अविनाशी तत्त्वाला धारण करणे, त्याच्या प्राप्तीच्या क्रियेमध्ये अनुरक्त होणे हाच धर्म आहे. या मार्गावर कोणी आरंभी उभे आहेत, कोणी मध्यावर तर कोणी प्राप्ती स्थानी उभे आहेत. यामध्ये संप्रदाय कसला ? भिन्नता कसली ? विरोध कसला ?

मंदिर, मशिद, गुरुद्वारा आणि चर्च हे परमात्म्याच्या प्रार्थनेची स्थाने आहेत. ते ईश्वराचे दरबार आहेत. परमात्म तत्त्वाचा उपदेश शिकवणारी स्थाने आहे, त्या ईश्वरीय पाठशाळा आहेत. जर या ठिकाणी ईश्वर म्हणजे काय, तो कोठे राहतो व त्याला प्राप्त करण्याची पद्धत कोणती किंवा उपाय कोणता हे जर सांगितले गेले नाही तर त्यांना उभे करण्याचा उद्देशच नष्ट होईल. अशी ठिकाणे कालांतराने एखाद्या धोकादायक गोष्टीला जन्म देतील. ज्या ठिकाणी वरील प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत अशी ठिकाणे म्हणजे जेथे काही शिकवले जात नाही अशा शाळांप्रमाणे आहेत. केवळ मूर्तीची पूजा करणारी व प्रसाद वाटणारी मंदिरे मूळ उद्देशापासून दूर गेलेली आहेत असे समजावे. भेदभावाची भिंत उभी करून आपला निर्वाह करणारे लोक सनातन तत्त्वाला जाणत नाहीत. धर्मालाही ते जाणत नाहीत.

सृष्टीमध्ये मनुष्यमात्र एक आहे ईश्वरीय मार्गामध्ये श्रीमंत-गरीब, काळे-गोरे, बुद्धिमान व मूर्ख असा भेद असत नाही. येथे तर अनन्य चिंतनाने व अनन्य श्रद्धेने, अनन्य भावाने जोडले जावयाचे असते. एकमेव परमात्म्याशिवाय अन्यत्र श्रद्धा असेल तर त्या साधकाची वाट चुकलीआहे असे समजावे. ही गोष्ट शोचनीय आहे. त्या परमात्म्यासाठी

जर तुम्ही भगवंताची प्राप्ती झालेल्या महापुरुषाजवळ जाल तर परमात्मा तुम्हाला स्वयं बोध करेल, समोर उभा राहून तुम्हाला समजावेल आणि शेवटी आपल्या स्वरूपात विलीन करेल व याचेच नाव शांती आहे. अनेक जन्म साधना करणारा पथिक हे लक्ष्य बालपणीच साध्य करू शकतो.

**''सद्‌गुरू भगवान की जय''**

**॥ ॐ ॥**

आत्म पथ जागृत झाल्यानंतर वर्ण सुरू होतो.
वर्ण म्हणजे साधन पथाच्या सोपानाच्या चार पायऱ्या आहेत.
सर्व विश्व या चार वर्णांमध्ये समाविष्ट आहे.
वर्ण बाहेर (जाती म्हणजे वर्ण नाही.) असू शकत नाही.

# वर्ण व्यवस्था

स्मृतिशास्त्रे ही समाजासाठी केलेली
व्यवस्था होती, कायदा होता, धर्म नव्हे.

# वर्ण व्यवस्था

(महाकुंभाच्या पर्वानिमित्त चण्डीव्दीप हरिद्वारमध्ये दिनांक ८-४-८६ च्या सत्रात स्वामी अडगडानन्द यांनी वर्ण-व्यवस्था या विषयावर व्यक्त केलेले आपले चिंतन :-)

बंधूनो,

भारताला अत्यंत त्रस्त करणारा, लोकांमध्ये भ्रम निर्माण करणारा एक प्रश्न आहे व तो म्हणजे 'जाती'. या जातींमुळेच देशाचे विभाजन झाले; सांप्रदायिक निवडणूकीची मागणी सुरू झाली. आजदेखील विभिन्न प्रदेशात अशा प्रकारची निवडणूकीची मागणी सुरू आहे. आजही जातींवरून दंगे होत आहेत, मनुष्य एक दुसऱ्याचा खून करायला तयार आहे; जणू तो रक्ताचा तहानलेला आहे. आणि वरून तो घोषणा देत असतो, आरोळ्या ठोकीत असतो की हे सर्व तर ईश्वरानेच बनवले आहे, असे गीतेमध्ये सांगितले आहे. परंतु गीतेमध्ये किंवा कोणत्याही शास्त्रामध्ये एकही असा श्लोक नाही की ज्यात जातींचे विभाजन आहे किंवा जातींमध्ये मनुष्याची वर्गवारी करण्याबाबत सांगितले आहे.

आज आम्ही वर्ण म्हणजे काय याबाबत विचार करू. वर्ण या विषयावर चार वेदांमध्ये फक्त एक ऋचा आहे. स्मृतीमध्ये याची चर्चा केली आहे आणि गीतेमध्ये योगेश्वर श्रीकृष्णांनी त्यावर खूप भर दिला आहे. तेव्हा या वर्णाबाबत शास्त्र काय म्हणते ते पाहू व आपण वर्ण कशाला समजतो तेही पाहू.

सुरुवातीला सर्व शास्त्रे तोंडी होती. सर्वप्रथम कृष्ण द्वैपायन व्यासांनी ती लिपिबद्ध केली व ती भुर्जपत्रावर लिहून काढली. त्या महर्षींनी चार वेद, सहा शास्त्रे, भागवत महापुराण, महाभारत या सर्वांचे संकलन केले. शेवटी त्यांनी असा विचार केला की मी इतके लिहिले आहे की, मनुष्य वाचता वाचता थकून जाईल. त्याचे एक-दोन जन्म त्या वाचण्यात जातील. तेव्हा या सर्वांत सर्वोपरी असे शास्त्र कोणते? तेव्हा स्वयं त्यांनीच निर्णय दिला.

**गीता सुगीता कर्त्तव्या किमन्यै शास्त्रविस्तरैः**
**या स्वयं पद्मनाभस्य मुख पद्माद्विनिः सृता ॥**

जी स्वयं श्रीकृष्णाच्या मुखातून निघाली ती गीता हृदयात धारण करण्यास व मनन करण्यास योग्य असे शास्त्र आहे. अन्य शास्त्राच्या विस्तारात शिरण्याची आवश्यकताच काय आहे ? तेव्हा गीता स्वयं एक पूर्ण शास्त्र आहे. 'इति गुह्यतमं शास्त्र' म्हणून भगवंतानेदेखील तिला शास्त्र ही संज्ञा दिली आहे. परमार्थ धर्माचे शुद्ध शास्त्र म्हणजे गीता होय. गीता सार्वभौम आहे. विश्वातील प्रत्येक मनुष्याचे निर्दोष शास्त्र गीता हेच आहे.

आता गीता काय म्हणते ते पाहूया. एखादा व्यापारी गीता हातात घेतो व म्हणतो 'व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन' गीता म्हणते आपला आपला व्यवसाय करा. क्षत्रियांना म्हणते युद्ध करा. राजनीतिज्ञ म्हणतात तुमच्या लाभासाठी तुम्ही विदेशी कपडे विकत असाल तर तुम्ही सकाम कर्मयोगी आहात. देशातील कपडे देशातच विकाल तर निष्काम कर्मयोगी आहात. कर्मयोग म्हणजे त्यांच्या मते आपला धंदा.

गीतेवर लाखो विद्वानांनी व्याख्याने दिली आहेत. हजारो टीका आहेत, शेकडो टीका ग्रंथ तर संस्कृतमध्ये आहेत; परंतु तरीही गीता कशाला 'कर्म' म्हणते हे आजपर्यंत कोणी सांगू शकला नाही. वास्तविक ज्याला आपण कर्म असे म्हणता त्याला गीता कुकर्म म्हणजेच अचेत कर्म असे म्हणते. असेच वीस पंचवीस प्रश्न आहेत जे आहेत पूर्वेला व आम्ही त्यांना शोधत आहोत पश्चिमेला. हवी आहे हृदयाची योग्यता पण पाहतो बाहेर. त्यामधीलच एक प्रश्न आहे वर्ण व्यवस्था. ज्या जाती प्रथेला आजपर्यंत वर्ण समजले गेले आहे गीता तिला वर्ण म्हणतच नाही.

गीतेच्या चौथ्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' अर्जुना, चार वर्णांची सृष्टी मी केली आहे. विचार करा सृष्टीचा अर्थ काय केवळ भारत असा होतो ? भारताच्या बाहेरही चार वर्ण आहेत का ? जर चार वर्ण भगवंताने बनवले आहेत तर विश्वातील अन्य जाती कोणी निर्माण केल्या ? भगवंताच्या या म्हणण्याचा आशय काय आहे ?

मागे मद्रासमध्ये सामूहिक धर्म-परिवर्तनाची घटना घडली. हरिजनांनी आपला धर्म बदलून ते मुसलमान बनले. लोक धर्माचार्यांच्या जवळ गेले व त्यांनी त्यांना निवेदन केले की 'भगवान, याबाबत काही तरी करा'. त्यांनी सांगितले - ''वर्ण भगवंताने स्वत: निर्माण केले आहेत. त्यामध्ये बदल करण्याचा मनुष्याला काही अधिकार नाही. आम्ही याबाबतीत काही व्यवस्था करू शकत नाही.''

भगवंताची व्यवस्था बदलायला नको होती; परंतु लोक बदलू लागले आहेत. आणि एक नाही दोन नाही करोडो लोक बदलू लागले आहेत. फक्त बारा हजार मुसलमान बाहेरून भारतात आले होते आणि देशाचे विभाजन झाले तेव्हा भारतात २९ कोटी लोक झाले. जन्माने वाढले असतेतर बारा हजारावरून लाख झाले असते, कोटी झाले असते. हे एकोणतीस कोटी कोठून आले ? हे सर्व आपलेच भाऊबंद होते. आपणच तर त्यांना धक्के मारून आपल्यापासून वेगळे केले आहे. चार वर्णाची ईश्वरीय आज्ञा कमीत कमी मानायची तरी होती. चार वर्णाच्या जागी अनेक जाती-उपजाती निर्माण झाल्या.

धर्म-परिवर्तनाच्या वरील घटनेवर दुसऱ्या आचार्यांनी सांगितले की जर वर्ण बदलले तर सनातन धर्म नष्ट होऊन जाईल. वर्ण व्यवस्था तर आमचा सनातन धर्म आहे की तुम्ही शुद्रच राहा आम्ही वैश्य बनून राहू. तुम्ही क्षत्रियच राहा आम्ही ब्राह्मण राहू. जर शूद्र राहिला नाही तर सनातन धर्म राहणार नाही. कारण त्याचे एक अंग मोडून पडेल.

तिसऱ्या आचार्यांनी शंका व्यक्त केली की धर्म परिवर्तनाने त्यांची संख्या पुन्हा वाढेल. ते पुन्हा वेगळ्या राष्ट्राची मागणी करतील. देशाच्या अखंडतेला यामुळे धोका निर्माण होईल व म्हणून भारत सरकारने धर्म-परिवर्तनावर प्रतिबंध घातला पाहिजे. आता सरकार तर आहे धर्म-निरपेक्ष । त्याला तर बहुमत पाहिजे. ते तुमच्या कडून मिळेल की त्यांच्याकडून ? वेगळ्या राष्ट्राची मागणी ते कशाला करतील ? मागणी तर अल्पसंख्याक करतात आणि संख्या आपलीच कमी होईल.

वस्तुत: सनातन धर्माचे गाठोडे फाटू लागले आहे. त्यातील दोन दोन तांदळाचे दाणे सांडू लागले आहेत. जर तुमच्या डोळ्यावरील भ्रान्तीची पट्टी तुम्ही दूर केली नाही तर एक वेळ अशी येईल की, गोठोडे अगदी हल्के होऊन जाईल.

ही गोष्ट खरी आहे की गीतेच्या अनुसार वर्ण भगवंताची सृष्टी आहे; परंतु गीतेमध्ये एकही श्लोक असा नाही की जो मनुष्या मनुष्यामध्ये अंतर किंवा भेद निर्माण करेल. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात तुम्ही स्त्री असा किंवा पुरुष असा किंवा वैश्य किंवा पापयोनीतील कीटक असला तरी जो मला सर्वभावे पूजेल, माझी भक्ती करेल तो मला अत्यंत प्रिय आहे.

इतकेच नव्हे तर 'अपि चेत् सुदुराचारो' दुराचारी लोकांमधील अत्यंत दुराचारी मनुष्यसुद्धा जर 'भजते माम् अनन्यभाक्' माझ्याशिवाय कोणालाही न भजता फक्त मलाच भजेल तर तो सुद्धा 'साधुरेव स मन्तव्य:' साधू म्हणण्यास योग्य आहे. कारण 'सम्यग् व्यवसितो हि स:' तो यथार्थ निश्चयाने माझी भक्ती करत असतो. याचा परिणाम सांगताना ते म्हणतात तो शीघ्र धर्मात्मा बनतो. आणि सदैव राहणारी शाश्वत शांती त्याला प्राप्त होते. पुण्यात्म्यांचा तर उद्धार होतोच पण गीता मूलत: पापी लोकांना उद्धाराचा मार्ग दाखवणारे शास्त्र आहे. मनुष्यात भेद निर्माण करण्याचा हेतू गीतेमध्ये मुळीच नाही.

चौथ्या अध्यायात योगेश्वर श्रीकृष्णाने म्हटले आहे - 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं'- चार वर्णाची सृष्टी मी केली म्हणजे काय मनुष्या मनुष्याचे चार भागात त्यांनी विभाजन केले ? श्रीकृष्ण म्हणतात नाही, 'गुणकर्म विभागश:' गुणांच्या आधाराने कर्माचे चार भागात विभाजन केले. आता तुम्ही कर्माला समजून घेतलेत तर विभाजनदेखील नीट समजून घेऊ शकाल. कारण जी वस्तू विभागली गेली आहे ती आहे कर्म । कोणी म्हणते शेती करणे कर्म आहे, कोणी स्वत:च्या धंद्याला (व्यवसायाला) कोणी देशसेवेला, कोणी समाजसेवेला, कोणी नोकरीला आपले कर्म म्हणतात. तर कोणी म्हणते 'स्वे स्वे कर्मण्यभिरत:' आपले आपले कर्तव्य करा. वास्तविक श्रीकृष्णांनीपण कर्म म्हणजे काय ते सांगितले असेल. जर श्रीकृष्णाने कशाला कर्म म्हटले आहे ते जाणून घेतलेत तर वर्णाबाबत कोणतीही भ्रान्ती राहणार नाही.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायात ते म्हणतात 'नियतं कुरु कर्म त्वं' - अर्जुना, तू निर्धारित केलेले कर्म कर. आता कर्म अनेक प्रकारचे असते. त्यातील कोणते कर्म निर्धारित केले आहे असे समजायचे ? त्याकर्माची विशेषता सांगताना ते म्हणतात की, कर्म न करण्याने तुझी शरीर यात्रापण सिद्ध होऊ शकणार नाही. तेव्हा कर्म

म्हणजे अशी वस्तू आहे जी त्या पुरुषाची शरीर यात्रा यशस्वी करते, पूर्ण करते. हा आत्मा जन्म जन्मान्तराने शरीराची यात्रा करीत आला आहे. कीटकादी जीव जंतूपासून देव-दानव तसेच जड-चेतनातून पार होत तो आला आहे. वस्त्र बदलले जाते; परंतु हे कर्म या प्रकारच्या नश्वर शरीर यात्रेला पूर्ण करून या आत्म्याला ती अचल स्थिती देत आहे की ज्याच्यानंतर ही शरीर यात्रा त्याला करावी लागत नाही.

आता ते निर्धारित कर्म काय आहे ? यावर योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात, 'यज्ञार्थात कर्मणों' - अर्जुना, यज्ञाची प्रक्रिया म्हणजे कर्म आहे. जिच्यामुळे यज्ञ पूर्ण होतो ती क्रिया म्हणजे कर्म होय. या यज्ञाच्या व्यतिरिक्त जगात जे काही केले जाते, दिवस रात्र लोक ज्याच्यात व्यस्त राहतात, काय ते कर्म नाही ? श्रीकृष्ण म्हणतात नाही ''अन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धन:'' - यज्ञाच्या प्रक्रियेच्या व्यतिरिक्त जे काही केले जाते ते या लोकीचे बंधन आहे. या लोकी बांधून ठेवण्याचा उपाय आहे 'तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंग: समाचर' यासाठी हे अर्जुना, या यज्ञाच्या पूर्तीसाठी तू संगदोषरहित होऊन चांगल्या प्रकारे कर्माचे आचरण कर. तेव्हा कर्म म्हणजे असा विधी आहे की, ज्याचे आचरण संगदोष असताना केले जात नाही.

आता तो यज्ञ म्हणजे काय की जो करणे म्हणजे कर्म होय. योगेश्वर श्रीकृष्ण या यज्ञाची विशेषता सांगताना म्हणतात या यज्ञाने देवत्वाची वृद्धी करा. दैवी सम्पदा जो जो प्रबल होईल तो तो तुमची प्रगती होईल. या प्रकारे क्रमश: परस्परांचा विकास करीत परम कल्याण प्राप्त करा. म्हणजे यज्ञ एक अशी वस्तू आहे जी परम कल्याण सुलभ करत असते.

त्या यज्ञामध्ये काय केले जाते ? यावर चौथ्या अध्यायात ते सांगतात - अर्जुना, अनेक योगीजन श्वासाचे प्रश्वासामध्ये हवन करतात. इंद्रियांचा संयम करून मनाला विषयांपासून अलिप्त करून त्याला इष्टाचे ठिकाणी केंद्रित करतात. साधना आणखी सूक्ष्म झाल्यावर श्वास-प्रश्वासाच्या गतीचा निरोध करून ते प्राणायामपरायण होऊन जातात. प्राणाच्या गतीचा याम होतो व मग श्वासच नाही तर प्राणांचा श्वासामध्ये उठणाऱ्या संकल्प विकल्पांचा निरोध होतो. मग ना आत संकल्प निर्माण होतात ना बाह्य वायुमंडळातील संकल्प आत प्रवेश करतात. मनाच्या अंतरंगात उठणाऱ्या तरंगांचे

दुसरे नाव संकल्प आहे. मनाचा असा निरोध केल्यानंतर त्याबरोबरच त्याचा परिणाम दिसून येतो.

**''यज्ञाशिष्टामृत भुजो यान्ति ब्रह्म सनातनम्''**

यज्ञ पूर्ण होताच त्याच्या अंती जे शेष उरते तेच ज्ञानामृत होय व त्या ज्ञानामृताचे सेवन करणारा योगी सनातन, शाश्वत ब्रह्मामध्ये प्रवेश मिळवू शकतो. अर्जुना, हा संपूर्ण यज्ञ मन आणि इंद्रिये यांच्या संयमातून संपन्न होत असतो. त्याच यज्ञाला त्यांनी पुन्हा स्पष्ट केले की, 'यज्ञानां जप यज्ञोऽस्मि' तर मग तीळ, जव, तूप, वेदी इत्यादी भौतिक द्रव्यांनी केला जाणारा यज्ञ काय यज्ञ असत नाही ? श्रीकृष्ण म्हणतात (अध्याय ४ था ३९ वा श्लोक) की अर्जुना, भौतिक द्रव्यांनी सिद्ध होणारा यज्ञ हा अत्यंत अल्प असतो. प्रारंभिक शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून हा यज्ञ उपयुक्त असतो आणि श्रीकृष्णाने सांगितलेला हा यज्ञ संपूर्णपणे मनाच्या संयमाद्वारेच होत असतो. व त्याचा परिणाम म्हणजे ब्रह्माचे दर्शन होण्यात होत असतो. आता बाह्य गोष्टीने तुमच्या श्वासाचे निरोधन होत असेल तर करा, प्राणांच्या गतीचा आयाम करायचा असेल तर करा, कशाने इंद्रियांचे दमन होत असेल तर करा; पण ते कदापि होणार नाही. हे होईल ते सततच्या चिंतनानेच होईल. तेव्हा लक्षात ठेवा की यज्ञाचा अर्थ आहे आराधना. यज्ञाचा अर्थ आहे चिंतनाचा विधी आणि त्या विधीला कार्यरूप देणे कर्म आहे.

योगेश्वर श्रीकृष्णदेखील अर्जुनाला म्हणतात की अर्जुना, कर्म म्हणजे काय व अकर्म म्हणजे काय व विकर्म म्हणजे काय ? या विषयावर मोठमोठ्या विवेकी पुरुषांचा सुद्धा संभ्रम होतो व म्हणून मीच त्याचे स्पष्टीकरण करतो म्हणजे ते जाणल्यानंतर तू संसार बंधनातून चांगल्या प्रकारे सुटून जाशील - मुक्त होशील. त्या कर्माचा अर्थ आहे आराधनेला कार्यरूप देणे.

अर्जुना, जो पुरुष कर्मामध्ये अकर्म पाहतो म्हणजे चिंतन तर करतो; परंतु करणारा मी आहे असे तो समजत नाही. तो समजतो की, गुणांच्याद्वारा प्रेरित झाल्याने मला करावे लागत आहे. इष्टदेव हृदयरूपी रथाचे रथी बनून ते माझ्या कडून करवून घेत आहेत. मी तर एक यंत्रमात्र आहे. या प्रकारे जो कर्मामध्ये अकर्मता पाहतो आणि असे पाहणेच अकर्म आहे. या अकर्माला जो कर्म समजतो व माझ्याकडून बरोबर कर्म केले

जात आहे असे समजतो. इष्टदेवाच्या आदेशांना समर्पित झालेली ती व्यक्ति मनुष्यांमध्ये बुद्धिमान आहे, ती संपूर्ण कर्म करणारी आहे.

आम्ही सतत कर्मच करीत राहावे की कर्म करण्यापासून आम्हाला कधी मुक्ती मिळेल ? यावर योगेश्वर म्हणतात 'यस्य सर्वे समारम्भा:' संपूर्णतेपासून आरंभ होणारे कर्म जेव्हा इतके सूक्ष्म बनते की 'काम संकल्प वर्जिता:' कामना व संकल्पाचा निरोध होतो म्हणजेच मन संकल्प विकल्पांनी रहित बनून शून्यामध्ये स्थिर होते, त्या वेळी 'ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं' ज्याला आम्ही आजपर्यंत जाणत नव्हतो, ज्याच्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो तो अजर-अमर-शाश्वत गुणधर्मत्वाला तो परमात्मा विदित होतो. या अनुभूतीचे नाव आहे ज्ञान व त्या ज्ञानामध्ये 'दग्ध कर्माण' कर्म नेहमीसाठी जळून जाते. अशी अवस्था असणाऱ्यां बोधस्वरूप महात्माजनांना पंडित म्हटले जाते. येथे कर्म अशी वस्तू आहे की जी आमच्या मनाचा संयम करून संकल्पाच्या वर घेऊन जाते. याप्रमाणे कर्म म्हणजे आराधना.

सातव्या अध्यायाच्या शेवटी ते म्हणतात की जो मनुष्य जरामरणातून सुटण्यासाठी मला शरण येऊन यत्न करतो तो संपूर्ण कर्माला जाणतो संपूर्ण अध्यात्माला जाणतो. पूर्णत्वाने मला जाणतो आणि मला जाणून कायमचा तो माझ्यामध्ये स्थित-स्थिर होतो. कर्म जरा मरणातून मुक्ती देववते. अर्जुनाने विचारले - भगवान, ते संपूर्ण कर्म काय आहे ? संपूर्ण ब्रह्म काय आहे आणि संपूर्ण अध्यात्म काय आहे ? योगेश्वरांनी सांगितले, 'अक्षरं ब्रह्म परमं' जो अक्षय आहे, अमिट (अटळ) आहे तेच परब्रह्म आहे. 'स्वभावो अध्यात्मं उच्यते' स्व अर्थात आपल्या स्वरूपात स्थिर भाव, स्वरूप प्राप्तीचा भाव म्हणजे अध्यात्म होय. काही सांगणे म्हणजे अध्यात्म नव्हे. आधि म्हणजे आधिपत्य, स्वरूपाची प्राप्ती झाल्यानंतर व्यक्ती मायेच्या आधिपत्याखालून बाहेर येते व मग तिला आत्म्याचे आधिपत्य प्राप्त होते. हेच अध्यात्म आहे आणि 'भूत भावोभ्दवकरो विसर्ग: कर्मसंज्ञित:' प्राणिमात्रांचे भाव जे काही ना काही ठरवीत असतात जे आपल्या संस्कारांची सृष्टी करीत असतात, अशा भाव-भावना भ्रमण थांबवणे म्हणजेच कर्माची पराकाष्ठा होय. कर्म म्हणजे अशी वस्तू आहे की जी मनाच्या अंतरंगात लपून बसलेल्या संस्कारांचा अंत करून चांगले-वाईट, शुभ-अशुभ संस्कारांवर पूर्ण विराम करून त्यांचा निरोध करून आपले एक वेगळे आस्तित्व उभे करते. तेव्हा कर्म म्हणजे चिंतन ।

सोळाव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात की काम, क्रोध आणि लोभ हे नरकाची तीन द्वारे आहेत. या तिघांचा त्याग केल्यानंतरच कर्माची सुरुवात होते. जे कर्म परमश्रेय देणारे असते. कर्म म्हणजे ती प्रक्रिया आहे की काम, क्रोध व लोभ यांचा त्याग केल्यानंतरच तिच्यात प्रवेश मिळत असतो.

संसारामध्ये जो जितका जास्त गुरफटलेला असतो तितका काम क्रोधांनी तो अधिक युक्त असतो. श्रीकृष्ण ज्याला कर्म समजतात ते कर्म म्हणजे फक्त आराधना होय. त्यागाशिवाय त्याचा आरंभच होत नाही. साधना सिद्ध होताच जो जो हे विकार आतून कमी होत जातील तो तो कर्मामध्ये प्रवेश मिळत जाईल.

या कर्माचीच योगेश्वर श्रीकृष्णांनी चार भागांत विभागणी केली आहे. कारण कोणीही एकदम त्या ध्येयापर्यंत पोहचू शकत नाही. कोणीही ते ध्येय एकदम प्राप्त करू शकत नाही. ज्याप्रकारे संसारी मनुष्याला एखादी विद्या प्राप्त करायची असेल तर त्याला तशा अनेक श्रेणी पार कराव्या लागतात. त्या प्रकारे परमेश्वरापर्यंत पोहचण्यासाठी श्रीकृष्णाने ही विभागणी केली. ते म्हणतात अर्जुना, यासाठी चार वर्णांची मी सृष्टी केली आहे. वर्ण म्हणजे आकृती. या जीवात्म्याचा वर्ण शुद्धवर्ण आहे, शाश्वत आहे, निर्दोष आहे, निर्लेप आहे. 'आदित्यवर्ण: तमस: परस्तात्' तोच आमचा वर्ण आहे. वर्ण याचा अर्थ आहे स्वरूप. चार वर्णाची सृष्टी करून त्यात मनुष्यांची विभागणी केली ? योगेश्वर म्हणतात नाही, 'गुणकर्म विभागश:' गुणांच्या माध्यमातून कर्माची चार भागात वाटणी केली. कर्म म्हणजे चिंतन. कर्म म्हणजे साधनेची पद्धती. त्या साधना पथाची चार श्रेणीत वाटणी केली. वर्ण म्हणजे साधनापथाच्या चार पायऱ्या आहेत जसे-

१) जर तामसी गुणाचे प्राबल्य असेल तर प्रमाद, निद्रा, कर्तव्यकर्म न करण्याचा स्वभाव, जे करावयास नको ते अकर्तव्यकर्म करण्याची वृत्ती स्वभावामध्ये भरलेली असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही डोळे बंद करून ध्यान करायचा प्रयत्न केलात तरी दोन मिनिटेही तुम्ही ध्यान करू शकणार नाही. शरीर दोन तास बसू शकेल पण ज्याला ध्यानात एकाग्र व्हायचे आहे ते मन मात्र हवेशी गप्पा मारीत बसेल. स्वप्नांचे विविध कल्पनांचे जाळे विणत बसेल. अशा या प्रारंभिक अवस्थेमध्ये तुम्ही शूद्र असता, अल्पज्ञ असता. अशा परिस्थितीत डोळे बंद करून ध्यान करण्याचा दंभ करू नका. तर एका

साध्या नियमाचे पालन करा की पंथाचे जे ज्ञाता महापुरुष आहेत त्यांची सेवा करा. 'परिचर्यात्मकं शूद्रस्यपि स्वभावजम्' मन कर्म वचनाने त्याची सेवा करावी ही साधनेची पहिली पायरी आहे.

२) महापुरुषांची सेवा करायला सुरुवात केल्यानंतर हळू हळू तामसी गुण शांत होतात आणि मग राजसी गुणांचा प्रवेश होऊ लागतो. आणि जेव्हा अर्धे राजस गुण आत प्रवेश करतील तेव्हा आपल्या मनामध्ये थोडे स्थिर होण्याची क्षमता येईल. तेथे पुन्हा 'कृषि गौरक्ष वाणिज्यं वैश्य कर्म स्वभावजम्' तुमच्या सवयीला तर स्वभाव म्हणतात. जेव्हा अंतरंगात तामसी गुणांचे दमन झाले व अर्ध्या राजस गुणांचा आत प्रवेश झाला की स्वाभाविकपणेच चिंतन होऊ लागते.

गो रक्षा ? गाई रक्षण तर मग म्हशीला मारले तरी चालेल ? नाही. ''गो गोचर जहाँ लगि मन जाई । सो सब माया जानेहु भाई ।'' गो म्हणजे इंद्रिये. आज गो म्हणजे इंद्रिये हे सांगावे लागते. परंतु वैदिक वाङ्मयात गो शब्द तोंडातून निघताच लोकांचे लक्ष्य मस्तक हात, पाय, नाक व कान याकडे लगेच जात असे.

एक मुसलमान कवाली गात होता - ''जर मुहम्मद झाले नसते तर काहीही झाले नसते.'' आमच्या स्वामीजींनी हे ऐकले तेव्हा म्हणाले 'बरोबर आहे तो म्हणतो ते. जर मोह, मद नसता तर काहीच घडले नसते. जगामध्ये जन्म-मृत्यूचे कारणच राहिले नसते. त्यांनी 'मुहम्मद या शब्दाचा अर्थ विकार असा लावला तर इस्लाम धर्मात मुहम्मद त्यांचे आचार्य आहेत. त्याच प्रकारे गो नाम एका पशूचेही आहे. त्याचे महत्व आहे आर्थिकदृष्ट्या, पण भ्रमवश लोक गाईला धर्म मानून पूजत आहेत. या भ्रांतीचे निराकरण नंतर करू.

येथे गोरक्षाचा अर्थ आहे मायिक प्रवृत्तींपासून आपल्या इंद्रियांचे रक्षण. काम-क्रोध, लोभ-मोह, आशा-तृष्णा यांच्या द्वारे गो विखुरले जाऊन त्याचे तुकडे तुकडे होतात. योनींचे कारण बनतात आणि विवेक-वैराग्य शम-दम, नियम-श्रद्धा आणि समर्पणामुळे इंद्रिये संयत होतात, सुरक्षित होतात. वाणिज्य म्हणजे व्यापार, धन संग्रह. आत्मिक संपत्ती हीच स्थिर संपत्ती आहे. प्रकृतीच्या द्वन्द्वातून हळू हळू आत्मिक संपत्ती प्राप्त करा.

आणि शेती ? जेथे शेत किंवा क्षेत्राचा प्रश्न आला तेव्हा योगेश्वर श्रीकृष्णाने सांगितले आहे की, 'इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते' अर्जुना, हे शरीर म्हणजे क्षेत्र आहे-जमीन आहे. त्यामध्ये चांगले किंवा वाईट ज्या प्रकारचे बीज पेरले जाते ते संस्काराच्या रूपाने उगवत असते. व म्हणून या क्षेत्राची काळजी घे. त्याच्या मध्ये उगवलेले विकारांचे तृण उपटून फेकून दे. व त्यांना काबूत ठेव. हे वैश्य श्रेणीचे कर्म आहे. 'वैश्यकर्म स्वभावजम्' आपल्या स्वभावातून त्याचा जन्म झाला आहे व स्वभाव परिवर्तनशील आहे. जो स्वभाव आज आहे तो उद्या राहणार नाही. वाल्मीकी प्रथम डाकू आणि खूनी होते. संत सत्पुरुषांचा सहवास जेव्हा त्यांना मिळाला तेव्हा 'वाल्मीकी भये ब्रह्म समाना' त्यांचे काय बदलले गेले ? त्यांचे शरीर तेच होते, हात-पाय तेच होते, त्यांचे केवळ गुण बदलले त्याबरोबर स्वभावही बदलला. गुण परिवर्तित झाले.

३) याच प्रकारे जेव्हा तामसी गुण शांत झाले, सात्विक गुणात प्रवेश मिळाला. राजसी व सात्विक गुणांचे प्राबल्य होते तेव्हा तुम्हीच क्षत्रिय आहात. सर्व प्रकारच्या विकारांवर-भावनांवर स्वामीत्व, शौर्य, तेज, दया आणि प्रकृतीच्या द्वन्द्वामध्ये मागे न हटण्याचा स्वभाव -हे क्षत्रिय स्वभावा पासून उत्पन्न होणारे कर्म आहे. तो साधक मोठे संकट आले तरी हताश होऊन चिंतनाचा मार्ग अजिबात सोडत नाही. मीरेला विष देण्यात आले ''लोग कहे मीरा भई बावरी । सास कहे कुलनाशी'' आज जग त्या कुलवान सासूला ओळखीत नाही. पण मीराला मात्र अवघे जग ओळखत आहे. लाख संकटे आली तरी मीरा आपल्या कर्मपथावरून, भगवंताच्या ठिकाणी असणाऱ्या श्रद्धेपासून व समर्पित भावापासून कधीही विचलित झाली नाही. क्षत्रिय स्वभावाची ही श्रेणी आपल्या स्वभावाच्या अंतरंगात निर्माण झाली आहे.

ही श्रेणी उन्नत झाल्यानंतर आता केवळ सात्विक गुणच राहिले. तामस व राजस गुण एकदम शांत झाले, आपल्या अंत:करणात त्यावेळी ब्रह्मामध्ये प्रवेश देणारी पूर्ण योग्यता निर्माण होते.

**शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्म कर्म स्वभावजम् ।।**

मनाचे शमन, इंद्रियांचे दमन, या चिंतन मार्गात इंद्रियांचे तप ध्यान, धारणा व समाधीची क्षमता, अनुभूती अर्थात प्रत्येक कार्यात इष्टाचे प्रत्यक्ष निर्देशन व त्या निर्देशनात चालण्याची क्षमता हे सर्व ब्राह्मण श्रेणीचे कर्म स्वभावातून निर्माण होते व स्वभावात प्राप्त होते.

विज्ञान याचा अर्थ एखादी कल्पना असा नाही. हृदयरूपी देशात रथी बनून इष्ट ज्या संकेतांचे मार्गदर्शन करतो त्याची प्रत्यक्ष अनुभूती (ईश्वरीय अनुशासन) म्हणजे विज्ञान होय. पूज्य महाराज नेहमी सांगायचे की 'हो त्या ठिकाणी (वेळी) भगवंताने आम्हाला वाचवले. भगवंताने आम्हाला हे सांगितले त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिला'. आम्ही विचारले - काय भगवंत आपल्याशी बोलतात ? त्यावर ते म्हणाले हो. ज्या प्रकारे आम्ही तुम्ही जवळ बसून जशा गोष्टी करतो, बोलतो त्या प्रकारे भगवंत आमच्याशी तासन तास सतत बोलत असतात.

वास्तविक ज्या परमेश्वराची आम्हाला आस आहे, त्याच्या ठिकाणी आमची श्रद्धा इतकी दृढ असावी की ज्या स्तरावर आम्ही उभे आहोत, त्या ठिकाणी त्या स्तरावर भगवंतानी स्वत: चालून यावे, आमच्या आत्म्याशी एकरूप होऊन आमच्या मागे उभे राहावे. आम्हाला मार्गदर्शन करावे.

जोपर्यंत भगवंत हृदयरूपी देशात रथी बनून आम्हाला मार्गदर्शन करीत नाहीत तोपर्यंत पूर्ण निवृत्ती देणाऱ्या साधनेचा श्रीगणेश झालाच नाही. काही दिवसानंतर गुरुदेव म्हणतात तशी कृपा होते. तेव्हा या अव्यक्ताचे बोलणे म्हणजे विज्ञान होय. हे आमच्या मनाचे ज्ञान नाही तर विज्ञानाचे ज्ञान आहे ज्याला परमात्म्याचा संचार असे म्हणतात. हा संचार झाल्या नंतर भगवत् चरणी चिंतनाचा दोर आपोआपच बांधला जातो व मग ब्रह्मामध्ये प्रवेश देणारी योग्यता स्वभावामध्ये निर्माण होते. त्या वेळी 'ब्रह्म कर्म स्वभावजम्' हे ब्राह्मण श्रेणीचे कर्म कोणी दिले ? अहो ते तुमच्या स्वभावातच जन्मले आणि स्वभाव परिवर्तनशील आहे.

आता ब्राह्मण श्रेणी सुद्धा दोषमुक्त नसते. **'सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता'** ज्या प्रकारे अग्नी धुराने आवृत्त असतो त्याप्रमाणे सर्व कर्मे

कोणत्या ना कोणत्या दोषाने आवृत्त असतात. केवळ ब्राह्मण श्रेणीचेच कर्म असले, सात्विक गुणच फक्त उरलेले असले तरी जोपर्यंत गुण जीवंत आहेत, प्रकृती जीवंत आहे तोपर्यंत माया यशस्वी होऊ शकते. या चारी सोपानांच्या वरील ब्रह्म स्थिती प्राप्त झाल्यानंतर तो साधक **'न ब्राह्मण, न क्षत्रिय, न वैश्यं, न शूद्रं, चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहम'** ना ब्राह्मण असतो, ना क्षत्रिय ना वैश्य असतो ना शूद्र असतो. त्याचे चित्त परमानंद स्वरूप झालेले असते. कैवल्यस्वरूप बनलेले असते, फक्त शिव शेष राहिलेले असते.

योगेश्वर स्पष्ट म्हणतात - हे अर्जुना, मी मनुष्याची वाटणी केलीच नाही. मग कोणाची विभागणी केली ? 'कर्माणि प्रविभक्तानि' - कर्मांची वाटणी केली आहे. कशा प्रकारे ? 'स्वभाव प्रभवैर्गुणै: - स्वभावामध्ये असणाऱ्या गुणांप्रमाणे कर्म बनत असते-होत असते. त्या गुणांच्या आधारेच कर्म विभागले जाते. जन्मताना सर्वजण फक्त मनुष्यच असतो. जन्मत:च तो ना क्षत्रिय असतो ना वैश्य ना ब्राह्मण ना शूद्र असतो. जो मेडिकलला गेलाच नाही तो कशाचा डॉक्टर ? अरे अजून भर्तीच झाली नाही तर श्रेणी कुठली ?

तेव्हा जोपर्यंत तुम्ही चिंतनाचा मार्ग जाणत नाही, गीतोक्त कर्म - जो साधनेचा एक निश्चित विधी आहे - जाणत नाही आणि जाणल्यानंतर त्या मार्गावर दोन पावले चालत नाही तोपर्यंत तुम्ही ना शूद्र आहात ना क्षत्रिय आहात, ना ब्राह्मण ना वैश्य आहात. तोपर्यंत तुम्ही कोणीही नाही आहात फक्त जड जीव. मात्र आपण जर चिंतनाचा मार्ग समजून घेतल्यानंतर त्या मार्गावर चालण्यास सुरुवात केलीत की मग तुम्ही अरब देशातील असा किंवा ध्रुव प्रदेशातील असा, त्या दिवसापासून तुम्ही शूद्र आहात. चिंतन कर्माच्या पहिल्या पायरीवर उभे आहात म्हणून तुम्ही शूद्र आहात. फरक इतकाच की शूद्र श्रेणीचा साधक अजून प्रारंभिक स्तरावर आहे. ज्या प्रकारे आपला मोठा मुलगा एम. ए मध्ये शिकत असला व धाकटा मुलगा अगदी बालमंदिरात शिकत असेल तर तुम्ही धाकट्याचा तिरस्कार कराल का ? परमेश्वराची प्राप्ती झाल्यानंतर सर्वांना परमात्म्याची एकसारखीच अनुभूती येत असते.

पूजाविधीच्या नावावर साधारणत: लोक वाहत जातात. कोणी देवीची पूजा करतात तर कोणी देवतांची पूजा करतात; परंतु अठराव्या अध्यायात योगेश्वर

श्रीकृष्ण म्हणतात की आपल्या स्वभावात असणाऱ्या क्षमतेप्रमाणे कर्माचे आचरण करून मनुष्य भगवत्प्राप्तीरूपी परमसिद्धीला ज्या प्रकारे प्राप्त करतो तो विधी तू माझ्याकडून ऐक. कोणता विधी ? त्यांनी असा विधी सांगितला की, ज्या परमात्म्यापासून सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली, जो सर्वत्र व्याप्त आहे, हृदयरूपी देशात ज्याचा निवास आहे त्या परमात्म्याला आपल्या स्वभावगत कर्माच्या क्षमतेनुसार अर्चन करून सर्वांगीण समर्पणाने व चिंतनाने संतुष्ट करून मनुष्य भगवत्प्राप्तिरूपी परमसिद्धी प्राप्त करतो. श्रीकृष्णाच्या मते पूजनाचा विधी हाच आहे की केवळ त्या परमात्म्यावर दृढ श्रद्धा हवी. जोपर्यंत त्या परमात्म्यावरील श्रद्धा स्थिर व दृढ होत नाही तोपर्यंत कर्माला सुरुवातच होत नाही. तेव्हा जे लोक पूजेच्या आरंभी श्री गणेशाय नम: देव्यै नम: असे म्हणतात ते अद्याप भयंकर भ्रमात आहेत असे समजावे.

या प्रकारे योगेश्वर श्रीकृष्णाने मनुष्याला नाही; परंतु चिंतन मार्गाला चार पायऱ्यात विभागले आहे. कारण सहसा लोक भगवत्प्राप्तिरूपी परमसिद्धी प्राप्त करू शकत नाहीत. साधना करताना धीराबरोबरच क्रमा क्रमाने या सोपानावर टिकू शकत नाहीत. पुढच्याची स्थिती चांगली आहे हे पाहताच लगेच नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. दोन तीन वर्षे साधुवेशात व्यतीत केले की ते लोक स्वत:ला सन्मान मिळवण्यासाठी स्वत:ला ब्रह्म समजू लागतात. अशा लोकांना सतर्क करण्यासाठी तिसऱ्या व अठराव्या अध्यायात म्हणतात की, 'श्रेयान् स्वधर्मो विगुण:' गुणहीन असतानासुध्दा स्वभावगत कर्मक्षमता हा आमचा धर्म आहे. व तो धर्मच आम्हाला धारण करावयाचा आहे व म्हणून तोच धर्म आहे. व ते आमचे दायित्व आहे. 'परधर्म भयावह:' दुसऱ्यांचा धर्म भयावह असतो. भय प्रकृतीमध्ये असते, आवागमनात (जन्ममरणाच्या फेऱ्यात) असते. तो प्रकृतीमध्ये पोहचवणारा आहे. कारण प्रायमरीचा विद्यार्थी एम. ए. ला बसेल तर तो पास होण्याचे सोडा, पण प्रायमरीमधील स्वत:ची असणारी योग्यताही तो घालवून बसेल. कारण त्याने अभ्यासच कधी केला ? व म्हणून ते म्हणतात 'श्रेयान स्वधर्मो विगुण:'

अठराव्या अध्यायात पुन्हा याच्यावर भर देत योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की अर्जुना, स्वभावगत कर्म केल्याने तू सर्व पापांपासून मुक्त होशील. तात्पर्य हे आहे की क्रमा क्रमानेच चालले पाहिजे. गीतेमध्ये वर्ण म्हणजे अंत:करणाच्या स्थितीचे चित्रण

आहे व सर्वांच्या हृदयात त्याची व्यवस्था आहे. जो हा कर्मपथ समजून आचरणास प्रारंभ करतो त्याच्यासाठी वर्णाची योग्यता सुलभ आहे मग तो विश्वात कोठेही जन्मलेला असो. तो निश्चितपणे प्राप्त करू शकतो. आणि जोपर्यंत तो कर्म करण्यास प्रारंभ करीत नाही तोपर्यंत तो कोणत्याच वर्णाचा नाही. तो मोहरूपी निद्रेमध्ये अचेत पडलेला आहे असे समजावे. तो रात्रदिवस जी धावपळ करतो ती फक्त एक प्रयत्न आहे.

# वेदामध्ये वर्ण

सध्याच्या जाती प्रथेच्या समर्थनार्थ पुरुषसूक्तामधील ज्या वैदिक ऋचेचे उदाहरण दिले जाते त्या सूत्राची समीक्षा करणेपण आवश्यक आहे. या सूक्तात ऋषींनी सांगितले की तो परमात्मा अनंत हातांचा, पायांचा, डोळ्यांचा व अनेक तोंडाचा, आहे. त्यांनी पुढे सांगितले की, तो महापुरुष चार पायांचा आहे ज्याच्या एका पायात संपूर्ण ब्रह्मकांड- सूर्य, चंद्र, पृथ्वी, पर्वत समुद्र आणि नक्षत्रे आहेत. ऋषींनी अनेक प्रकारे त्या परमपुरुषाची कल्पना केली की त्या परमात्म्याच्या पायासारखे कोण ? जांघेसारखे कोण ? त्याच्या हातांप्रमाणे कोण ? आणि मुखासारखे कोण आहे ? पुढील ऋचेत त्यांनी कल्पना केली -

**ब्राह्मणस्य मुखमासीत् बाहू: राजन्यः कृतो**
**उरु तदस्य यदवैश्य.म् पदभ्यां शूद्रोऽजायत् ।।**

अर्थात पायामध्ये शूद्र आहे, जांघेमध्ये वैश्य आहे, बाहूंमध्ये क्षत्रिय आहे आणि त्या परमात्म्याच्या मुखात ब्राह्मण आहेत. जो सर्वत्र व्याप्त व जो सर्वत्र समान आहे त्याला हात पाय कोठून आले ? जेव्हा मनुला दर्शन दिले तेव्हा 'विश्व वास प्रकटे भगवाना' विश्वामध्ये जेथे प्रकृती होती ती मनूसाठी पुरुषत्वात विलीन झाली होती.

एकदा त्या प्रभूचे चरण धुण्यासाठी गंगा निर्माण झाली जिच्यामध्ये तिन्ही लोकांना तारण्याची शक्ति आहे, ज्या चरणांना भरतजी पकडून बसले, ज्या चरणांशी लक्ष्मी एकाधिकाराने बसली आहे, भगवंताचे चरणांना कोणीही स्पर्श करू नये, कोणी अयोग्य अपात्र व्यक्तिने परमेश्वराच्या चरणांना स्पर्श करू नये म्हणून तिने भगवत्‌चरणाशी ठाण मांडले आहे, ज्या चरणांचे रज:कण मस्तकावर धारण करून ऋषी मुनी आपल्याला

धन्य समजतात, ज्याचे चरणोदक घेऊन आम्ही सर्वजण स्वत:ला कृतार्थ समजतो त्या भगवंताच्या 'पावनं पावनानाम्' चरणातून एक असा कीटक निघाला की जर तो भगवंताला स्पर्श करेल तर भगवंत मलीन होतात. तो कीटक म्हणजे शूद्र होय. हा धोका नव्हे तर दुसरे काय आहे ? ही कुरूढी आणि कुरीतीचे कृत्य आहे, अशिक्षित जनतेमध्ये पसरलेला एक विचार आहे. मूर्खांनी पसरवलेला विचार आज आक्रोशात बदलला आहे.

काशीच्या विश्वनाथ मंदिरात हरिजनांनी प्रवेश केल्यानंतर एक धर्माचार्यांने घोषणा केली की, 'शंकरजी नष्ट झाले आहेत, भगवान भ्रष्ट झाले आहेत, आता त्या मंदिरात जाल तर अधोगतीला जाल'. तेव्हा आम्ही लगेच नवीन मंदिर बनवले तेव्हा आचार्य म्हणाले 'या मंदिरातीलं शंकर शुद्ध आहेत आता येथे त्याचे दर्शन करा' केवढी भयंकर भ्रान्ती । शास्त्रामधील एकाही सूक्तात असे म्हटलेले नाही की बाहेर मनुष्यजातीची विभागणी भगवंताने केली आहे. हो आम्ही स्वत: अवश्य आमची वर्गवारी केली आहे. तीनाचे तेरा आणि तेराचे सव्वा लाख होतात. भाऊ भाऊ भांडत राहतात. अफ्रिकेत अद्यापी भेद आहे, अनेक पत्नीत्व आहे व आफ्रिका आजपण गुलामीत सडत आहे. जर ही कबीला पद्धत आपल्यात पण आली तर समजा गुलामी आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे.

वास्तविक या वैदिक ऋचेचा तो आशय आहे जो गीतेमध्ये व्यक्त केला आहे. भक्तीच्या प्रारंभिक अवस्थेत सर्वजण शूद्र आहेत. परमात्म्याच्या चरणांची सेवा करता करता व ज्याच्यांत भगवंताचा वास आहे त्या संतांची सेवा करता करता भक्तीच्या मार्गावर आपल्या पायावर उभे राहण्याची क्षमता येते; तेव्हा आम्ही वैश्य असतो, जणू शिशू मांड्यावर उभा राहू लागला आहे. अशा वेळी आत्मिक संपत्तीला प्राप्त करण्यात आम्ही पुढे असतो. आणि क्षत्रिय क्षय म्हणजे कापणे त्रि म्हणजे तीन गुण । या तीन गुणांनी निर्मित प्रकृतीला कापण्याची क्षमता जेव्हा येते तेव्हा तोच साधक क्षत्रिय असतो. 'बाहू राजन्य कृत' या वेळी इष्टाच्या बाहूबलावर असतो. व अर्जुनाप्रमाणे जेव्हा तो ब्रह्माची अनुभूती प्राप्त करून घेतो तेव्हा परमात्मा त्यामध्ये प्रवाहित होतो. आता ब्रह्मामध्ये प्रवेश मिळवण्याची सर्व योग्यता त्याच्यामध्ये आलेली असते व म्हणून तोच साधक ब्राह्मण असतो. त्या महापुरुषाची बुद्धी आता अगदी यंत्रवत असते. त्याच्या माध्यमातून परमात्माच निर्णय देतो. बोलतो व म्हणून ब्राह्मणाला परमात्म्याचे मुख म्हटले आहे.

नोट - भगवान सर्वांगीण पवित्र आहे; परंतु या प्रभूच्या शरीरापैकी एखादे अंग मनुष्यासाठी हितकारक, विशेष सहाय्यरूप आणि पवित्र असेल तर ते चरण आहे आणि त्याच चरणस्थानी जन्म घेणारा घृणाजनक शूद्र कसा ? कसे शक्य आहे. विचारवंतांनी यावर विचार करावा:

# स्मृती

वर्ण व्यवस्थेच्या संदर्भात अत्री स्मृतीचा एक श्लोक गीतेशी मिळता जुळता आहे; परंतु स्मृतींनी रंगलेले मस्तक तसे नाही

**जन्मना जायते शूद्र संस्कारात द्विज उच्यते ।**

**वेदाध्यायी भवेत विप्र ब्रह्म जानेति ब्राह्मण ।**

अर्थात या धरेवर जन्म घेणारा प्रत्येक प्राणी शूद्र आहे. संस्कारात द्विज उच्यते जेव्हा तो संस्कार प्राप्त करतो तेव्हा तो द्विज बनतो. काही मंत्र म्हटले व यज्ञोपवीत गळ्यात घातले की तो संस्कारी बनतो असा संस्कार या शब्दाचा अर्थ नाही. जेव्हा स: म्हणजे तो परमात्मा व त्याचा आंशिक प्रवाह आपल्या हृदयात उतरतो, संचिताच्या स्तरावर-थरावर, मनाच्या अंतरंगात त्या परमात्म्याचे बीजारोपण होते तेव्हा तो द्विज असतो. त्याने द्वितीय जन्म घेतला. एक प्रकारे जन्म म्हणजे गर्भवास ज्यात चराचर जगातील सर्व प्राणी येऊ शकतात. याच्या बरोबर विरुद्ध आत्म्याचे आपले निर्मळ व शाश्वत स्वरूप असते ज्यात प्रवेश मिळवणे म्हणजे दुसऱ्या प्रकारचा जन्म होय. अद्याप त्याने त्यात प्रवेशच मिळवला आहे, आरंभच केला आहे; परंतु तो निश्चितपणे स्वरूप प्राप्त करेल. श्रीकृष्ण म्हणतात की अर्जुना, या निष्काम कर्मयोगात बीजाचा नाश होत नाही. साधना सुरू कर, बीजारोपण कर मग मात्र त्या सत्याला मिटवण्याचे किंवा नष्ट करण्याचे दुसरे कोणतेही यंत्र मायेजवळ नाही. माया केवळ अवरोध निर्माण करू शकते, विलंब करू शकते, परंतु ती साधनेचा नाश करू शकत नाही.

यामुळे त्या थोड्याशा साधनेच्या प्रभावामुळे प्रत्येक जन्मात तो तीच साधना पुढे सुरु करतो. पहिल्या जन्मात जेथे ती तुटते, पुढील जन्मात तेथूनच पुढे ती साधना सुरू करतो म्हणजेच तेथून त्या साधनेला प्रारंभ करतो. जन्म घेऊन विषयांमध्ये गुरफटलेला

असला तरी मागील जन्मात जेथे साधना तुटली होती, तेथून त्याच्या बुद्धिसंयोगाला तो अनायासे प्राप्त करून घेतो, चिंतन करतो आणखी दोन-चार जन्माच्या फेऱ्या केल्यानंतर तो परमगती किंवा परमधाम प्राप्त करून घेतो. तो परधामापर्यंत पोहोचतो. व म्हणून संस्कारात व्दिज उच्यते - स: म्हणजे परमात्मा. जेथे त्याचा आंशिक आकार हृदयदेशात जागृत होतो, बीजारोपण होते तेथे तो द्विज असतो त्याने दुसरा निर्मळ जन्म प्राप्त केला आता त्याला कोणत्याही परिस्थितीत मुक्त व्हायला पाहिजे.

'वेदाध्यायी भवेत् विप्र' चिंतन अधिक सूक्ष्म झाले की तो अव्यक्त प्रभू आपली ओळख प्रदान करू लागतो व मग जे तत्त्व विदित झाले नव्हते ते विदित होऊ लागते. तो परमात्मा आपली अनुभूती देऊ लागतो, स्वत:ला प्रकट करू लागतो. अनुभूतीमध्ये इष्ट ज्या प्रकारचा मार्ग दाखवतो, जो निर्देश देतो, तो मार्ग व निर्देश अध्यायीने - साधकाने आत्मसात केला पाहिजे. त्याचे उत्तम प्रकारे अध्ययन केले पाहिजे व त्यावर दृढ राहून चालले पाहिजे. इष्टदेवाच्या निर्देशनाप्रमाणे चालवण्याची क्षमता ज्याच्यामध्ये आलेली असते तो विप्र होय. तोच ब्रह्मपरायण होय. आता त्याच्या आचरणामध्ये लेशमात्र त्रुटी राहिलेली नसते. तोच खरा विप्र होय.

'ब्रह्म जानेति स: ब्राह्मण' त्या इष्टदेवाच्या निर्देशनाप्रमाणे चालता चालता जेव्हा मूलभूत स्पर्श तो प्राप्त करतो, त्याला जाणतो तोच ब्राह्मण आहे. या प्रकारे अत्रिस्मृती हा पुरुष कसा बनतो, हे वर्ण कसे बनतात एवढे हे सांगते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र अशी वर्गवारी होत नाही.

वास्तविक वर्ण म्हणजे या साधनासोपानाच्या चार पायऱ्या आहेत. सुरुवातीला निकृष्ट-माध्यम त्यापेक्षा उन्नती केल्यानंतर उन्नत आणि अति उत्तम या प्रकारे एकाच साधकाला या चार पायऱ्यांवरून शाश्वत सनातनाकडे जावे लागते. हा साधन पथ आहे, धर्माचरण आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीचे म्हणणे आहे की सर्व प्राणी आपल्या मातेच्या पोटी समान रूपात जन्म घेतात. त्यांचापैकी ज्यांचावर उपनयन संस्कार केला जातो ते द्विज आहेत. आठव्या वर्षी ब्राह्मणांमध्ये, अकराव्या वर्षी क्षत्रियांमध्ये आणि बाराव्या वर्षी वैश्यांमध्ये उपनयन केले जाते. ज्यांच्यावर हा संस्कार होत नाही ते शूद्र होत. जर केवळ मंत्र म्हटल्याने

किंवा केवळ जानवे घातल्याने ब्राह्मण होत असेल किंवा क्षत्रिय अगर वैश्य होत असेल तर मग सर्वांसाठी मंत्र का म्हटले गेले नाहीत ? जानवे धारण करतेवेळी पुढील मंत्र म्हटला जातो.

**यज्ञोपवीतं परमं पवित्र यजायते: यत्सहजं पुरस्तात**
**आयुस्यप्रयं प्रतिमुञ्च शुभं यज्ञोपवीतं बलमस्तु तेज: ॥**

हा मंत्र म्हटल्याने आठ वर्षाच्या मुलाला काय मिळत असेल ? वास्तविक ही फक्त सामाजिक व्यवस्था होती, धर्माशी तिचा काही संबध नाही. त्यावेळी ह्या संस्कारा द्वारे विद्याध्ययनाचा अधिकार दिला जात असे. बारा वर्षाच्या मुलाला शस्त्र विद्या व संरक्षण विभागात प्रवेश दिला जात असे. ज्या प्रकारे आज एखादा मुलगा नेव्हीमध्ये भरती होतो किंवा एखादा ट्रेनिंग कोर्समध्ये जातो व विशेषज्ञ बनून बाहेर पडतो.

आजकाल ही व्यवस्था सरकारच्या हातात आहे. अध्ययन-अध्यापन उद्योग, नोकऱ्या, रक्षणाचे दायित्व, योग्यता व सामाजिक समानतेवर आधारित आहे. राजा बदलला राजतंत्र बदलले आणि केवळ उपनयन करणाऱ्यालाच शिक्षण ही पद्धती बदलली. स्मृतींनी ठासून सांगितले होते की शूद्रांना शिकवणारा, धर्माचा त्यांना उपदेश करणारा तामसी नरकात जाईल. आज सर्वजण शिकत आहेत, सर्वांना शिकवले जात आहे.

बाह्य वर्ण महाराजा मनूने बनवला आणि सांगितले की वर्णव्यवस्थेचे पालन करणाऱ्यालाच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी घर सोडण्याची आवश्यकता नाही. असे जर होते तर स्वयं महाराजा मनूने त्या कल्याणासाठी घर का सोडले ? नैमिषारण्यात जाऊन तपरत का झाले ? त्यांना तर राजधर्म व क्षत्रिय धर्माचे पालन करावयाचे होते.

प्राचीन काळी हळू हळू सभ्यता आली. महाराज मनूने त्याची व्यवस्था केली. काही लोकांना शिक्षण देण्याच्या व नियम बनविण्याच्या कार्यात नियुक्त कले. त्यांना ब्राह्मण म्हटले गेले. कांहींवर शस्त्र संचालन व संरक्षणाचा भार टाकला, त्यांना क्षत्रिय म्हटले, काहींना धन संपत्ती संग्रह करण्याचे व खाद्य पदार्थ पुरवण्याची जबाबदारी सोपवली

त्यांना वैश्य म्हणण्यात आले आणि या सर्वांच्या सेवेसाठी ज्यांना नियुक्त करण्यात आले त्यांना शूद्र म्हणण्यात आले. परंतु आज महाराज मनू व त्यांचे अनुयायी राहिलेले नाहीत. या व्यवस्थेला कार्यरूप देणाऱ्या राज्यांचे पण १९५२ मध्ये विलिनीकरण झाले व सत्ता जनतेच्या हातात आली.

व्यवस्था बदलली, घटना बदलली, जुने कायदे काढून टाकले, त्या कायदा कानूनचा आज कोणी उच्चारही करीत नाही. मग या वर्ण व्यवस्थेला तेवढा दुजोरा का ? या स्मृती समाजात काट्यासमान आहेत, दरीसमान आहेत.

सुदैवाची गोष्ट ही आहे की या स्मृतींमध्ये लिहिले आहे की यांना कोणाला दाखवू नये; यांना कोणी शिवूदेखील नाही. गर्भधानापासून अंतिम संस्कारांपर्यंतचे मंत्र ज्यांना माहीत आहेत त्यालाच स्मृती वाचण्याचा हक्क आहे. त्यांना सांगू शकता कारण त्याला त्याची गरज आहे. तो सर्व क्रियाकर्म करेल. लाखो ब्राह्मणांत दहा पंधरा त्याचे जाणकार होते. बाकीचे सर्वजण त्यांच्या संकेताप्रमाणे चालत असत. त्यामुळे दोष ब्राह्मणांचा नाही. दोष त्या मूठभर लोकांचा होता जे राजाच्या जवळ बसून कपटी मंत्री बनले होते. त्यांनी जे लिहिले होते राजाने सकाळी उठल्यावर ब्राह्मणाचे पूजन करावे. त्याला विचारूनच राजाने प्रत्येक कार्य करावे. वास्तविक राजा तर ते बनले होते. म्हणजे दोष त्याचाच होता. त्यांनीच धर्माचा आधार घेऊन, नरकाची भीती दाखवून राजसत्तेच्या माध्यमातून निरक्षर जनतेचे मनमानेल तसे शोषण केले. स्मृतींमध्ये सामाजिक व्यवस्थेसाठी काही उपयुक्त नियम-सूत्रेपण आहेत; परंतु आमचे असे विनम्र निवेदन आहे की, पूर्वजांची प्रत्येक उपयोगी-निरूपयोगी व्यवस्था म्हणजे त्यांची अनामत ठेव समजून स्वीकारण्याची काही गरज नाही.

समाजातील जाती, उच्च नीचता, स्पृश्य अस्पृशता हे सर्व मनुष्याच्या अंत:करणात स्थित असणाऱ्या रागद्वेषातून उत्पन्न होणाऱ्या काम-क्रोध मोह-अंहंकार दंभ द्वेष या प्रकृतीजन्य विकारांची देणगी आहे. हे जग सदैव आपल्याला श्रेष्ठ समजत आले आहे. भाऊ-भाऊ भांडत आहेत. हे सर्व अज्ञान आणि अविवेकीपणाचे फळ आहे. अवघे विश्व काळे-गोरे, लाल-पिवळे अशा रंगात विभागले गेले आहे. परस्परांचे दमन करण्यासाठी शस्त्रस्पर्धा सुरू आहे, शीतयुद्धाचे वातावरण सर्वत्र पसरले आहे. कधी

जाती किंवा जमिनीवरून हे युद्ध सुरु आहे तर कधी व्यवसाय आणि आकृतीवरून हे वातावरण बनले आहे. भांडण होणे स्वाभाविक आहे ते होतही राहील, परंतु त्यांचा धर्माशी काही संबंध नाही.

आज जातिवादी कोण नाही ? जाती, संप्रदाय, भाषा आणि क्षेत्रीय विपत्तीला आधार बनवून निवडणुकीमध्ये तिकिट दिले जाते, त्याच जातीचे लोक प्रचारासाठी पाठवले जातात, त्यांच्यामुळे प्रभावित होऊन आम्हीही मते देतो. कर्मचाऱ्यांच्या समूहामध्ये जातिवादाचा अनुभव आपल्याला येत नाही का ? आता बोलण्यापेक्षा आम्हाला आचरण केले पाहिजे, दोष आमचा आहे. सरकारच्या अनामत नीतीचा किंवा धर्माचा दोष नाही. तसेच शास्त्रांमध्येही असा एकही श्लोक नाही की ज्यात भगवंताने मनुष्याला विभाजित केले आहे किंवा स्पृश्यअस्पृश्य असा भेद करावयास सांगितलेले आहे.

गीतेच्या मते या संपूर्ण जगात माणसे दोनच प्रकारची असतात. ना चार प्रकारची ना तीन प्रकारची ना तेरा प्रकारची आणि ना सव्वा लाख ! मनुष्य केवळ दोन प्रकारचा आहे. एक देवतांसारखा व दुसरा असुरासारखा. तो अस्तिक असेल किंवा तो नास्तिक असेल. परमात्म्याकडे त्याला ओढा असेल किंवा मायेकडे असेल. प्रकृतीमध्ये विश्वास असणारा असेल तर तो असुरासारखा आहे असे समजावे आणि परमतत्त्व परमात्म्याचा प्राप्तीसाठी प्रयत्नशील असेल तर देवतेसारखा आहे असे समजावे. जगात याच फक्त दोन जाती आहे की ज्या अंत:करणाच्या दोन प्रवृत्ती आहेत. आसुरी संपद आणि दैवी संपदेवर त्या आधारित आहेत. याचा उल्लेख गीतेच्या सोळाव्या अध्यायात केला आहे. या कसोटीवर आपला एक सख्खा भाऊ असुर तर दुसरा भाऊ देवता असू शकतो. या कारणामुळेच श्रीकृष्णाचे काही जवळचे नातेवाईक असुर होते. स्वत: श्रीकृष्ण स्वयं देवता होते, परमात्म तत्त्वामध्ये स्थित असणारे भगवान होते. योगशास्त्रानुसार जातीचे स्वरूप असे आहे. बाहेर ना कोणती जात आहे ना मनुष्याला विभाजीत करण्याची कोणती पद्धत आहे.

**‘स्मृती म्हणजे व्यवस्था होते, धर्म नाही.’** माणसा-माणसात भयंकर द्वेष पसरवण्याचे काम स्मृतींनी केले आहे. जन्मावर आधारित जाती-प्रथा त्यांचीच देणगी आहे. सर्व स्मृती महाभारताच्या नंतरच्या आहेत आणि काही तर गौतम

बुद्धांच्या नंतरही लिहिल्या गेल्या आहेत. त्यांमध्ये मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती आणि पराशर स्मृती आधिक प्रसिद्ध आहेत. इतिहासातील विद्वानांना माहीत आहे की महाभारत काळापासून आजपर्यंत ना कोणी मनू नावाचा राजा झाला ना गौतम बुद्धांचे नंतर याज्ञवल्क्य ऋषी झाले. वैदिक युगातील या थोर पुरुषांच्या नावावर या स्मृतींची रचना करून बुद्धिजीवी वर्गातील काही विशेष लोकांनी आपल्याला अनुकूल अशी परिस्थिती बनवली, प्रशासनिक व्यवस्था घडवली आणि राजकीय संरक्षणासाठी याच जाती व्यवस्थेचा धर्माच्या नावावर प्रचार केला. वास्तविक या स्मृतींचा धर्माशी काही संबंध नाही.

मनुस्मृती सांगते की प्रारंभी एक अंडे होते. त्या अंड्यातील प्राण्याने आपल्या पराक्रमाने त्या अंड्याला फोडले. त्यातून जो निघाला तो ब्रह्मा होता. या ब्रह्माने आपल्या शरीराचे दोन भाग केले अर्ध्या भागाची स्त्री बनवली व अर्ध्या भागाचा पुरुष आणि जगाच्या विकासासाठी मुख, बाहू, मांड्या आणि पायातून क्रमश: ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांना निर्माण केले. त्या ब्रह्माने मनूला निर्माण केले. मनूने दहा महार्षी आणि त्या महर्षींनी सात मनू, देव-दानव, सुख-दुःख, पाप-पुण्य, स्वर्ग-नर्क, जल-स्थल जड-चेतन व जीवांना उत्पन्न केले. श्रीरामचरित मानसाच्या कसोटीवर हा सर्व विधी म्हणजे प्रपंच आहे-विधि प्रपंच गुण अवगुण साना. ब्रह्माने आपल्या सृष्टीच्या विकासासाठी या वर्गांची रचना केली. हा प्रपंच आहे, शाश्वत व्यवस्था नव्हे. या प्रपंचाच्या एखाद्या अंगाची पूजा केल्याने काय होईल ? अहो, येथे स्वयं ब्रह्मापण आपल्या लोकांसह मरणधर्मा आहे तेथे या प्रपंचातून आम्ही बाहेर कसे निघणार ?

या ब्रह्माजींची आता सृष्टी पाहा. दृषव्दती नदीपासून सरस्वती नदीच्या मधील भागाला ब्रह्मावर्त म्हटले. सध्या कानपूरजवळच्या त्या भागाला बिठूर म्हटले जाते. मथुरेपासून तक्षशिलापर्यंतचा प्रदेश म्हणजे ब्राह्मणांचा पवित्र देश. विंध्याचला पासून हिमालयाच्या पायथ्यापर्यंतचा मध्यप्रदेश आणि त्याच्या दक्षिणेस म्लेंछ देश. एवढ्यातच जगाच्या उत्पत्तीचे वर्ण संपले. या ब्रह्माला एवढेही ज्ञान नव्हते की हिमालयाच्या पलीकडे चीन व जपानपण आहे. समुद्रात मोठमोठे व्दीपही आहेत. वास्तवात ना कोण्या ब्रह्मदेवाने सृष्टीची रचना केली ना त्या स्मृतीकाराला भूगोलाचे काही ज्ञान होते. जीवजंतूमध्ये भारतीय पशुपक्षांची नावे सांगितली गेली आहे, पण कांगारू, झेब्रा, जिराफ यांच्या नावांचा त्या उल्लेख नाही आणि लिहिले की थोडक्यात सृष्टीचे प्रकरण समाप्त झाले.

या ब्रह्मदेवाने पवित्र-अपवित्र सांगून ठिक ठिकाणी भूखंडामध्ये भेद फक्त निर्माण केला, त्यांनी आपल्या शरिराचा कोणता भाग शुद्ध व कोणता भाग अशुद्ध हेही सांगितले. नाभीच्या वरचा भाग शुद्ध आणि खालचा भाग अशुद्ध. ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून निर्माण झाला म्हणून तो जगाचा स्वामी आहे. शूद्र त्याच्या चरणापासून निर्माण झालेला असल्याने अपवित्र आहे. दास आहे. शूद्राचे नाव घृणासूचक राहिले पाहिजे. शूद्राबरोबर बोलायचे असले तर उजवा कान पकडून मग बोलावे कारण ब्रह्मणाच्या उजव्या कानात अग्नी, जल, वेद, सूर्य, चंद्र, तीर्थ आणि गंगेसारख्या पवित्र नद्यांचा वास आहे. हा पराशर स्मृतीचा शोध आहे. पाहा किती मूर्खपणा आहे. ही शुद्ध व अशुद्ध असण्याची कल्पना, उच्च नीच हा भेद, स्वामी व सेवक ही कल्पना, घृणा व द्वेष, मंत्र म्हणून शुद्ध होण्याची कल्पना ही सर्व स्मृतींची भेट आहे.

स्मृतींचे म्हणणे आहे की कामवश होऊन जे माता-पिता संतान निर्माण करतात ते पशुसदृश असतात. पण गर्भाधान मंत्राने संस्कारपूर्वक जी मुलं जन्म घेतात ती द्विज होत. असे जर असेल तर किती लोकांचे वडील वेदाध्यायी आहेत ? स्मृती सांगते संस्काराने मुले सत्यनिष्ठ पराक्रमी व सुंदर जन्माला येतात पण देश बनला गुलाम ! आणखी ब्राह्मण कोण असतो हे सांगताना स्मृती सांगते जो वेदपठण करतो तो ब्राह्मण. वेदाची एखादी शाखा पठण करीत असेल तरी तो ब्राह्मण. सत्ययुगात मनुस्मृती प्रमाण होती व कलियुगात पराशर स्मृती प्रमाण बनवली गेली. शूद्रांना या स्मृती वाचण्याचा अधिकार नाही आणि शेवटी हे लिहिले आहे की स्मृती वाचण्याचे व वेद वाचण्याचे फळ एकच आहे. वेद वाचा की न वाचा, पराशर स्मृती फक्त वाचा म्हणजे तुम्ही वेदाचे ज्ञाते बनाल. सांगितले आहे की अपौरुषेय वेद म्हणजे परमात्म्याची वाणी आहे व पराशर स्मृती म्हणजे कलियुगातील ऋषींनी लिहिलेले पुस्तक ग्रंथ आहे. जर हा ग्रंथ वाचल्याने मनुष्य ब्राह्मण बनत असेल तर मग सर्वांनाच तो ग्रंथ वाचायला देऊन सर्वांनाच ब्राह्मण का नाही बनवले जात ? आता तर सुदैवाने वाचण्याचा अधिकार सर्वांना मिळालेला आहे. जर वेदाचा एक अध्याय वाचल्याने ब्राह्मण बनत असेल तर मग सर्वांना ब्राह्मण बनवून आपली संख्या का वाढवली जात नाही ? आता या स्मृतिकारांना हेही माहीत नाही की युग बाहेर असत नाही. गुणांच्या चढउतारावर म्हणजे गुणांच्या आधारावर अंत:करणात युगे निर्माण होतात.

**बुध युग धर्म जानि मन माही**

**नित युग धर्म होही सब केरे ।**

**हृदय राम माया के प्रेरे ।**

मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे की जर शूद्र लोकांनी द्विजातींना क्रूर वचन बोलले तर त्याला जिव्हाच्छेदनाची शिक्षा दिली पाहिजे कारण त्यांची उत्पत्ती जघन्य स्थानापासून झालेली आहे. जर शूद्र ब्राह्मणाला धर्मोपदेश करण्याचे साहस करेल तर राजाने त्याच्या तोंडात आणि कानात उकळते तेल टाकावे. जर उच्च वर्णीयांच्या बरोबर राहण्याची त्याने इच्छा व्यक्त केली किंवा तो राहिला तर त्याच्या नितंबाचे मांस कापून घ्या.

जर चांडाळ रात्रभर घरात राहिला तर सकाळी घरातून खाद्यसामग्री काढून घेऊन घराला आग लावून द्यावी. पुन्हा तेथे मग लिंपण करून ब्राह्मणाला भोजन घालावे आणि वीस गाई त्याला दान द्याव्यात. तरच तुम्ही शुद्ध व्हाल. नाहीतर कुंभीपाक नरकात जाल. आता पाहा घर तर जाळून टाकले, खाद्यपदार्थ दुसऱ्या दिवशी संपले, वीस गाई पण ब्राह्मणाला दिल्या. आता त्या गरीब मनुष्याजवळ काय उरले ? शुद्र इतका त्याज्य आहे ? परंतु त्याच्या घराचे दूध, तूप, अन्न, मध, व सुंदर स्त्री मात्र ग्राह्य आहे - स्त्री रत्नं दुष्कालादपि'

भोजन करणाऱ्या ब्राह्मणाला जर शूद्राने किंवा कुत्र्याने पाहिले तर ते भोजन राक्षस खाऊन टाकतात. भोजन देणाराही नरकात जातो. शूद्राला उष्टे अन्न, जुने वस्त्र, निःसत्व अन्न, जुनी पांघरुणे आणि गाद्या द्याव्यात. या शूद्रांनी वेदातील एका वाक्याचा जरी विचार केला तरी त्यांना भयंकर नरकवास भोगावा लागेल. शूद्रांना ना कधी नीट खाऊ दिले ना त्यांना नीट नेसु दिले. भगवंताच्या भक्तीपासूनपण त्यांना वंचित ठेवले.

अशा या कट्टरवादीपणामुळे केरळ ख्रिस्ती लोकांच्या हातात गेले. फक्त दहा टक्के सवर्ण लोक आता तेथे उरले आहेत. तेसुध्दा आपली संपत्ती कवडी मोलाने विकून मुंबईकडे धावत आहेत. कोल भील्ल हे आदिवासी लोकसुद्धा ख्रिस्ती बनू लागले आहेत. कारण त्यांना आपण अस्पृश्य म्हणून दूर लोटत आहोत व मिशनरी लोक त्यांना जवळ घेत आहेत. स्पर्श करण्याने व खाण्याने आपला धर्म

नष्ट होतो आणि जेव्हा एखादा शूद्र ख्रिस्ती बनून आल्यानंतर आम्हीच त्याला साहेब म्हणून सलाम ठोकतो. त्याला खुर्चीवर बसवतो, त्याचे कौतुक करतो व घोषणाही देतो की धर्म-परिवर्तन होऊ लागले आहे.

स्मृतींमधील नियम ऋषींनी लिहिले होते. मनुस्मृतीच्या मते ''जो उपनयन संस्कारानंतर २५ वर्षापर्यंत गुरुकुलात वास्तव्य करतो तोच ऋषी होय. त्या ऋषीने नंतर विवाह करावा.'' ऋषी अत्री, दुर्वास व चंद्रमासारखे जितेन्द्रिय होते हे आता विसरून जा. कारण नुकताच डिग्री घेतलेला विद्यार्थी आज ऋषी बनत आहे. प्राचीन जितेन्द्रिय ऋषींच्या जागी आज कृत्रिम ऋषी निर्माण होत आहेत. आज ठिकठिकाणी गुरुकुल उघडले जात आहे. तेथे संस्कृत शिकायला कोणी जात नाही. आपल्या मुलांना का सर्वजण ऋषी बनवत नाहीत ? आणि गुरू कोण आहेत ? मनुस्मृतीच्या मते जो गर्भधानापासून अंतिम संस्कारापर्यंतचे क्रियाकर्म जो करतो त्याला गुरू म्हटले आहे. मनुस्मृती पुढे सांगते की जर गुरूचे देहावसान झाले तर ज्याच्यापासून ब्रह्मधाम प्राप्त होते त्या गुरुच्या पत्नीवर श्रद्धा ठेवा. तीही मरण पावली तर गुरूच्या मुलामध्ये गुरुभाव पाहा. या प्रकारे पोटासाठी नवनवीन परिभाषा बनवणाऱ्या स्मृती त्या शाश्वत सनातन धर्माच्या अनुयायांच्या विनाशाचे कारण बनल्या. समाजात भ्रांती भ्रम यांचे सृजन त्यांनी केले. भारतावर सिंकंदराने आक्रमण केले तेव्हा त्याच्या बरोबर आलेल्या इतिहासकारांनी लिहिले आहे की, क्षत्रिय जेव्हा लढत होते तेव्हा जवळच्याच शेतात असणारे शेतकरी आपले शेत नांगरत होते.

लोक आपापलाच व्यवसाय करीत होते कारण स्मृतींनी सांगितले होते फक्त क्षत्रियच शस्त्र धारण करेल. हो, जर ब्राह्मणांच्या दानावर-दक्षिणेवर काही गदा आली-आपत्ती आली तर मात्र ब्राह्मण पण शस्त्र धारण करू शकतो. ब्राह्मण सेनेच्या मागे राहून स्वस्तिवाचन करीत असत. स्मृतीत लिहिले आहे की, राजाने आपल्या खजिन्यातील सर्व संपत्ती ब्राह्मणांना दान देऊन व पुत्राकडे राज्य सोपवून मग युद्धासाठी प्रस्थान करावे. असे सांगणाऱ्या स्मृती भारताच्या गुलामीचे व मनुष्या मनुष्यातील घृणेचे कारण बनल्या. स्मृतीने लिहिले आहे की, सर्वांत नीच कसाई होय. दहा कसाई बरोबर एक तेली असतो. मोहरी तेली काही पापच करीत नाही. गहू, चणे दळणे आणि मोहरी पेरणे हा वनस्पतीवर केलेला एक प्रयोग आहे. परंतु वाहणारे तेल पाहिल्यावर त्यांना वाटले मोहरी रडत आहे. स्मृतीकार म्हणाले दहा

तेल्यांबरोबर एक कलाल असतो जो अशा प्रकारे दारू बनवतो. दहा कलाला (दारू गाळणारा) बरोबर एक वैश्योपजीवी असतो. व दहा वैश्योपजीवींबरोबर एक राजा असतो. या प्रकारे राजा सर्वांत नीच असतो. जर असे होते तर मनुस्मृतिकार ऋषींनी राजा मनूची पूजा का केली ? आणि वास्तवात खरोखर असा मनू नावाचा राजा असता तर अशा प्रकारे लिहिणाऱ्याला त्याने जीवंत ठेवले नसते. त्यांचा मनू म्हणजे कथेचे एक पात्र असावे जसा कालिदासाचा मेघदूत ! शंभर वर्षांचा क्षत्रिय व दहा वर्षांच्या ब्राह्मणामध्ये ब्राह्मण पिता व क्षत्रिय पुत्र आहे.

स्मृतिकारांनी लिहिले आहे की हवन करण्यापेक्षा ब्राह्मणाच्या मुखात केले गेलेले हवन श्रेष्ठ आहे. श्राद्धामध्ये भोजन करणारा अंधळा ९० सद्‌ब्राह्मणांना, बहिरा ६० ब्राह्मणांना, मोतीबिंदू असणारा १०० ब्राह्मणांना आणि रोगी दात्याच्या एक हजार ब्राह्मणांना भोजन देण्याचे फळ नष्ट करतो. विकलांग लोकांबद्दल हा दृष्टिकोन म्हणजे मानवतेचा अपमान आहे.

कोणाचे अन्न खावे व कोणाकडे खाऊ नये ? यावर ते लिहितात व्याज घेणारा वैश्य, लोहार, कारागीर, यंत्र सामग्री बनवणारा यांचे अन्न म्हणजे आजच्या भाषेत बँक कर्मचारी, डॉक्टर, यांचे अन्न, वेतन घेऊन शिक्षण देणाऱ्यांचे अन्न, नगरात मिळणारे अन्न, व विकणाऱ्यांचे अन्न, तसेच नट, दर्जी, कोळी, सोनार व नपुसंकाकडील अन्न म्हणजे आजच्या युगात कुटुंब नियोजन करणाऱ्याचे अन्न व कुत्रा पाळणाऱ्यांचे अन्न खाता कामा नये. हो, कुत्रे वा हरण पकडून आणणाऱ्याला काही दोष नाही. राजा आणि राज्य कर्मचाऱ्यांचे अन्न, तेजस्वी सोनाराचे अन्न आयुष्य आणि चांभाराकडील अन्न यश नष्ट करते. चिकित्सकाचे अन्न पूवासमान, व्यभिचाऱ्याचे अन्न वीर्यसमान, व्याज घेणाऱ्याचे अन्न विष्ठेसमान व शस्त्र विकणाऱ्याचे अन्न मलसमान असते. जर या लोकांचे अन्न खाल्ले तर सात दिवस गोमूत्रात शिजणारे जव खाल्ले तर देहशुद्धी होईल असे म्हटले आहे. मनुष्यामनुष्यात भेद निर्माण करणे आणि फूट पाडून राज्य करणे ही या स्मृतिकारांचीच देणगी आहे.

या स्मृतीमध्ये लसूण, कांदा, गाजर, सुरण, टोमॅटो, मुळा, हींग, डींक इत्यादी पदार्थांचा निषेध केला आहे. परंतु देव-पितृ कार्यात पशुपक्षांना मंत्रासह कापावयास अनुमती दिली आहे. यावेळी मंत्र म्हणणारे कोण ? आणखी लिहिले

आहे की शूद्रकन्येला ब्राह्मणापासून झालेल्या संतानाचा संस्कार केल्याने ते संतान न्हावी बनते. प्रत्येक मंगल कार्याचे वेळी ब्राह्मणाबरोबर न्हाव्याची उपस्थिती म्हणजे या दूरस्थसंबंधाचा परिणाम असावा. शूद्रांमध्ये त्याचे (न्हाव्याचे) अन्न भक्षणीय आहे असे सांगितले आहे.

आता दक्षिणेबाबत काय आहे ते पाहा. यज्ञामध्येही थोडी दक्षिणा देण्याने इंद्रिय, यश, स्वर्ग, आयुष्य व पशूंचा नाश होतो. ब्राह्मणाचे धन चोरणाऱ्याने स्वत: मुसळ घेऊन जावे व आपला वध करण्यासाठी राजाला निवेदन करावे. ही खाण्याची व जीवन जगण्याची व्यवस्था होती. हा धर्म नव्हे. आणखी लिहिले आहे की ब्राह्मणाने कोणत्याही जातीच्या कन्येशी विवाह केला तरी चालेल, परंतु जर शूद्राने ब्राह्मण स्त्रीशी लग्न करणे म्हणजे महापाप आहे. त्याला शिक्षा फर्मावली आहे - त्याने आपले लिंग व अंडकोष हातात घेऊन नैऋत्य दिशेकडे दुसरा हात ठेवून मरण येईपर्यंत चालत राहिले पाहिजे. ही त्यांची संरक्षण व्यवस्था होती.

ब्राह्मणाला क्षुल्लक काडीने सुद्धा मारता कामा नये. परंतु चुकीमुळे कोणी त्याला मारले तर त्याचे पाप कसे दूर करावे ? यावर लिहिले आहे की जळणाऱ्या अग्नीमध्ये डोके खाली करून तीन वेळा उड्या मारल्या पाहिजेत. राजा अन्य जातीच्या लोकांना प्राणदंड देऊ शकतो, परंतु ब्राह्मणाला मुंडण करणे हाच प्राणदंड होय. ब्राह्मणाने कोणत्याही प्रकारचे पाप केले तरी त्याला दंड देवू नये असे म्हटले आहे. कारण ब्राह्मण स्वयं आपली तपस्या व मंत्राने शुद्ध होत असतो.

आपल्या युगाला अनुरूप अशी स्मृतिकारांनी व्यवस्था केली तेव्हा दोष त्यांचा नाही. दोष तर आमचाच आहे की त्यांचे नियम आजही आम्ही स्वत:साठी बंधनकारक समजत आहोत. व खरी गोष्ट तर ही आहे की ते नियम मानत नसतानाही आम्ही ते नियम मानतो असा खोटा दावा करीत आहोत. त्यांना शिव्या देण्यापेक्षा स्वत:ला सुधारणे खूप महत्त्वाचे आहे.

आता आम्ही वीज बनवत असू तर लाईनमन, लोखंडाचा व्यापार करीत असे तर लोहार, सोन्याचे दागिने घडवत असू तर सोनार - असे म्हणणे वेगळी गोष्ट आहे कारण येथे ही व्यवसायाची नावे आहेत. अशा प्रकारचे वर्गीकरण सदैव व्हावे व होत राहील. परंतु परमार्थमार्गात ना कोणती जात असते ना कोणता संप्रदाय !

‘अपि चेत् सुदाराचारों ’अत्यंत दुराचारीसुद्धा या कर्माचा सच्चा अधिकारी आहे. असो तात्पर्य हे की स्पृश्यअस्पृश्य, उच्च-नीच, जाती व संप्रदाय म्हणजे धर्म नाही आणि त्याला मानणारा आता धार्मिक नव्हे. परमेश्वर एक आहे व त्याची अनुभूती सर्वांना सारखीच येत असते. त्याची अनुभूती घेणारा महात्मा समाजात कधीही भेदाची दरी निर्माण करीत नाही, केवळ अर्धवट ज्ञान आणि गैरसमजामुळे लोक असे समजतात व करत असतात.

**॥ ॐ श्री सद्‌गुरु भगवान की जय ॥**

# विप्र एक स्थिती

**कर्म पथावर चालत ब्रह्माची**
**अनुभूती घेणारे ब्राह्मण आहेत.**
**ही क्रिया म्हणजेच परमात्म्यावरची अतूट श्रद्धा-निष्ठा !**

**- स्वामी अडगडानन्द**

# विप्र एक स्थिती

## भागवतामध्ये 'विप्र'

श्रीमद्भागवताच्या समापनाच्या वेळी भगवान व्यासांनी सांगितले, ''हे परीक्षित, या प्रकारे मी केवळ मनुवंशाचे संक्षेपमध्ये वर्णन केले आहे. मनुवंशात जसे सांगितले तसेच प्रत्येक युगात ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र यांची वंश परंपरा आहे असे समजावे.'' या ग्रंथावरून स्पष्ट होते की काही साहसी क्षत्रिय पुढे जाऊन ब्राह्मण बनले. ब्राह्मणाची उत्पत्ती क्षत्रियांपासून झाली. कारण जेव्हा विधात्याने सृष्टीची रचना केली तेव्हा सनकादी चार पुत्रांना त्याने उत्पन्न केले. विधात्याने त्यांना सांगितले की, तुम्ही सृष्टीची रचना करा. त्यावर ते म्हणाले, 'नाही, आम्ही ब्रह्मचिंतन करू'. त्यांनी सृष्टीची रचना करण्यास नकार दिला. हे चारजण सृष्टीचे आदि ब्राह्मण आहेत असे म्हटले जाते, ज्यांचा वंश पुढे चालला नाही. त्यानंतर ब्रह्माने क्षत्रिय श्रेणीच्या गुणधर्मांनीयुक्त अशा मनूला - व शतरूपाला उत्पन्न केले. मनूच्या तीन मुलींच्या संततीने पुढे सर्व विश्व भरून गेले. प्रत्येक मन्वन्तरात ईश्वरभक्त मनू तसेच त्याच्या वंशजांची गौरव गाथा भागवतामध्ये आहे. आणि या दृष्टीने नृवंश आणि संपूर्ण भागवत म्हणजे क्षत्रियांचा इतिहास आहे. मनूचा वंशज असल्यानेच त्यांना मनुष्य किंवा मानव म्हटले जाते.

ईश्वरपथात साधनेच्या सोपानात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार पायऱ्यांपैकी मनूची मुलं क्षत्रिय श्रेणीत कदाचितच असतील, परंतु इतिहासात हजारो वर्षे क्षत्रियांची जी व्याख्या केली जात आहे - शासन, सुरक्षा, युद्ध, पृथ्वीचा भार संभाळणे, शौर्य इत्यादी जी प्रचलित आहेत ती सर्व लक्षणे या मनूच्या राजवंशामध्ये चांगल्या प्रकारे विद्यमान होती. ब्राह्मणत्व सिद्धीमध्ये त्यांचा अधिक सहभाग आहे.

मनूचा पाचवा मुलगा धृष्ट हाच धार्ष्ट नावाचा क्षत्रिय झाला. तो शरीरानेही ब्राह्मण झाला (९-२-१७). मनूचा नववा मुलगा नरिष्यन्त याच्या दहाव्या पिढीत अग्निवेश्य उत्पन्न झाला. ब्राह्मणांचे अग्निवेश्यायन गोत्र त्याच्यापासून सुरू झाले (९-२-२२). क्षत्रिय मनूचा चौथा मुलगा नाभाग आपल्या कर्मामुळे वैश्य झाला; परंतु त्याच नाभागाच्या बाराव्या पिढीमध्ये उप्तन्न झालेला मरुत्त पुन्हा चक्रवर्ती राजा (क्षत्रिय) झाला. या प्रकारे त्या क्षत्रियांचे ब्राह्मण तसेच वैश्य बनणे आणि पुन्हा क्षत्रिय बनण्याची उदाहरणे भागवतात आहेत.

मनूचा तिसरा पुत्र शर्याती आचार्य बनला. अंगिरा गोत्रातील ऋषींना यज्ञातील दुसऱ्या स्तरावरील यज्ञकर्म त्यानेच सांगितले (९-३-१). स्वयंभू मनूच्या चौथ्या पिढीमध्ये उत्पन्न झालेला आठवा अवतार महाराज ऋषभदेव यांच्या शंभर पुत्रांपैकी दहा राजा बनले, नऊ संन्यासी झाले व राहिलेली एक्याऐंशी मुले कर्मामध्ये कुशल ब्राह्मण बनली. लोक म्हणतात की भगवंताच्या चरणातून शूद्र, मुखातून ब्राह्मण, जांघेपासून वैश्य व भुजांतून क्षत्रिय निर्माण झाले. परंतु येथे तर एका मातापित्याच्या मुलांपैकी काही क्षत्रिय, काही संन्यासी तर बहुसंख्य ब्राह्मण बनले. यावरून स्पष्ट होते की, भागवताच्या मते ब्राह्मण एक योग्यता आहे.

आपल्या पुत्रांना उपदेश करताना भगवान ऋषभदेव म्हणाले की, पंचमहाभूतांपेक्षा वृक्ष श्रेष्ट आहे. वृक्षांपेक्षा चालणारे फिरणारे जीव श्रेष्ठ आहेत. त्यांमध्येही कीटकादिपेक्षा ज्ञानयुक्त पशु श्रेष्ठ आहेत. पशूंपेक्षा मनुष्य, त्यांच्यापेक्षा प्रथमगण, त्यांच्यापेक्षा गंधर्व-सिद्ध-किन्नर हे श्रेष्ठतर आहेत. त्याच्यापेक्षाही असुर श्रेष्ठ आहेत. असुरांपेक्षा देवता, देवतां पेक्षा इंद्र, इंद्रापेक्षा ब्रह्मदेवाचा पुत्र रुद्र, त्याच्यापेक्षा ब्रह्मा व ब्रह्मापेक्षा मी श्रेष्ठ आहे. परंतु ब्राह्मण माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत कारण ते शम-दम-दया-तप-तितिक्षा आणि ज्ञान या आठ गुणांनी संपन्न आहेत. या प्रकारे भागवतकारांचा असा निर्णय आहे की जो ब्रह्मपरायण आहे तोच ब्राह्मण होय. ब्राह्मण म्हणजे विशिष्ट जात नव्हे.

भागवताच्या चौथ्या स्कंधात मनूचा पुत्र ध्रुव याच्या चौथ्या पिढीमध्ये उत्पन्न झालेल्या राजा वेनचा इतिहास आहे. तो नि:संतान मेल्यानंतर ऋषींनी त्याच्या जांघेचे मर्दन केले. त्यातून जो पुरुष उत्पन्न झाला त्याला वेनचा वंशज निषाद म्हटले गेले. त्याच वेनच्या भुजांच्या मर्दनातून पृथू आणि अर्ची उत्पन्न झाले. एका शरीरातून उत्पन्न झाल्याने हे सख्खे बहीण भाऊ होते. पृथूला योग्य समजून ऋषींनी त्याला त्याच्या वडिलांच्या गादीवर बसवले. आणि निषादाला समुद्रापर्यंतचे जंगलाचे राज्य दिले. या प्रकारे निषाद क्षत्रिय वंशात उत्पन्न झालेल्या महाराज पृथूचा सख्खा भाऊ क्षत्रिय आहे. निषादराजा व निषादांचे सामाजिक अवमूल्यन, जंगली राहणी करणी परवर्ती व्यवस्थाकारांची कल्पना आहे.

महाराज पृथूला प्रथम चक्रवर्ती सम्राट होण्याचा गौरव प्राप्त झाला. त्याने धरातलाचे समतलीकरण केले, धरतीला गाय समजून धार काढली, प्रतिकूल बीजे नष्ट करून

अनुकूल बी पेरले. शेती करणे, पशुपालन व झांडावरून उतरून वस्तींमध्ये राहावयास पृथूनेच शिकवले. चोवीस अवतारांपैकी महाराज पृथूदेखील एक अवतार आहे. एकदा त्यांच्या सभेत सनकादि ऋषी आले. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण सभेने त्यांना उत्थापन दिले. ऋषींच्या चरणांवर डोके ठेवून पृथूने त्यांना नमस्कार केला. नंतर सभेला संबोधित करताना महाराज पृथू म्हणाले -

'सभासद हो, ज्या जनपदामध्ये आपल्यासारखे ब्राह्मण आहेत ते लोक धन्य होत. जे केवळ एक दृष्टिक्षेपाने दुसऱ्यांच्या अंत:करणात प्रवेश करू शकतात अशा ब्राह्मणांचे दर्शन दुर्लभ आहे. (फक्त दृष्टी जाताच अनुभवांचे सूत्रपात करणे पूज्य गुरुदेव भगवानांच्या विद्येचा स्वाभाविक गुण होता) परब्रह्माला जाणण्यासाठी निष्ठापूर्वक इंद्रियांचे दमन, मनाचे शमन, स्वाध्याय, विरोधी विचारांचा जे त्याग करतात, दीर्घकालपर्यंत संयमपूर्वक समाधीचा अभ्यास करून त्या ब्रह्माला जाणतात अशा ब्राह्मणांची चरणधूळ मी मरेपर्यंत आपल्या शिरी धारण करेन कारण अशी चरणधूळ धारण करेल त्याच्यामध्येच त्यांचे सद्‌गुण आपोआपच येतील.

या प्रकरणात ब्राह्मण त्याला म्हटले गेले की जो एकमेव असणाऱ्या ब्रह्माच्या प्राप्तीसाठी जप-तप, इंद्रियांचे दमन, मनाचे शमन, धारावाही (सतत) चिंतन, एकांतवासाचे सेवन, स्वाध्यायविरोधी विचारांचा त्याग, योग साधना व ते तत्त्व जाणण्यासाठी समाधीद्वारा सतत प्रयत्नशील असतो. ज्याने ब्रह्मतत्त्व जाणले तो ब्राह्मण।

दहाव्या स्कंधाच्या एक्याण्णव्या अध्यायामध्ये अशी कथा आहे की इक्ष्वाकुवंशीय महाराजा मान्धाता याचा पुत्र राजा मुचकुन्दाच्या एका कटाक्षाने कालयवन भस्म होऊन गेला तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्याला दर्शन दिले व वर मागण्यास सांगितले. त्यावर मुचकुन्द म्हणाला ''मी आपल्या चरणसेवेच्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही वर मागू इच्छित नाही.'' त्याची इच्छा मान्य करून श्रीकृष्ण त्याला म्हणाले ''पुढील जन्मात तू ब्राह्मण बनशील, तसेच मला परमात्म्याला प्राप्त करशील.''

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, ज्याच्या केवळ दृष्टी निक्षेपात राक्षसांना भस्म करण्याची क्षमता आहे अशा तपोधनलासुद्धा पुढील जन्मात ब्राह्मणत्व मिळणार! ब्राह्मणत्व इतके स्वस्त आहे ? स्पष्ट आहे की ब्राह्मणत्व म्हणजे योगाची पराकाष्ठा होणारी स्थिती आहे. अनेक शतकांपासून ज्याच्यासाठी मंदिराचे दरवाजे बंद आहेत व

ज्यांना सांगण्यात आले की मंदिरात जाऊ नका, धर्म, शास्त्रे वाचू नका, वेदवाक्यावर विचार करू नका, झाडाखाली राहा, ठिकऱ्यामध्ये खा, तुमच्यासाठी सत्कर्मच नाही, जेव्हा ब्राह्मण बनाल तेव्हा सर्व करा. इतके कडक प्रतिबंध लावून सत्कर्म करण्यास तुम्ही निषेध करता मग पुढील जन्मात ते ब्राह्मण होणार कसे ? जर असे आचारहीन आम्ही असू तर मग हा कुत्रा लांडगा कोण होईल ? इतक्या मोठ्या तपस्येनंतर श्रीकृष्णांने आर्शीवाद दिला की पुढील जन्मी ब्राह्मणत्व प्राप्त होईल. म्हणजे ब्राह्मण एक स्थिती आहे. परब्रह्म परमात्मा ज्याला विदित झाला आहे, जो त्याच्याने युक्त आहे, जो त्याच्यामध्ये स्थिर आहे, तोच ब्राह्मण होय. आणि त्याची सुरुवात सेवेपासून आहे.

भागवताच्या तृतीय स्कंधामध्ये सेवेचे महत्व मैत्रेय ऋषींनी विदुराला सांगितले की, धर्माच्या सिद्धिसाठी, भगवंताच्या तुष्टीसाठी भगवंताची चरणसेवा व अधिकारी शूद्राचा अविर्भाव झाला. यावरून स्पष्ट होते की श्रीहरीला संतुष्ट करावयाचे असले, धर्माची सिद्धि करावयाची असली तर प्रारंभ सेवावृत्तीपासून करावा. शूद्रापासूनच भगवत पथावर प्रवेश आहे. तीच ईश्वराची उत्पत्ती आहे. शूद्रच श्रम आहे. येथूनच ईश्वरीय जागृती होत असते. राहिलेल्या तीन श्रेणी म्हणजे त्या रोपाचा विकास आहे. मग तर त्या रोपाला वाढायचेच आहे. 'नेहाभिक्रम नाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते' या ईश्वरीय मार्गामध्ये आरंभाचा नाश होत नाही. जर प्रभू प्रसन्न झालेच आहेत तर ते प्राप्तीचा मार्गही सांगतील. जो विधी जाणून घेऊन चालतो तो वैश्य होय. भजनाला आरंभ करण्यासाठी सर्वांना शूद्रतेतूनच आरंभ करावा लागतो. आणि जो शूद्र बनला त्याला ब्राह्मणत्व सुनिश्चितपणे प्राप्त होईल. अत्यंत निश्चयी साधक एका जन्मातच चारही सोपानांवर अतिक्रमण करून परामात्म भाव प्राप्त करतो. ''अर्जुना, तू अत्यंत पापी लोकांमधील अधिक पापी असलास तरी ज्ञानरूपी नौकेद्वारे तू निःसंदेहपणे पार होशील'' (गीता)

भागवतात दहाव्या स्कंधामध्ये कथा आहे की, एकदा भगवान श्रीकृष्ण नारद, वामदेव, अत्री, असित, कण्व, परशुराम, व्यास, शुकदेव, बृहस्पती, मैत्रेय तसेच च्यवन इत्यादी ऋषींच्यासह ब्राह्मण श्रृतदेव याच्याकडे आले. व त्यांनी सांगितले की ''ब्राह्मण जन्मतःच सर्व प्राण्यामध्ये श्रेष्ठ आहे. तेव्हा हे श्रुतदेवा, तू या ब्रह्मर्षींची माझे स्वरूप समजून त्यांची पूजा कर. अशा ब्राह्मणांच्या पूजनाने तर माझी पूजा होते. अन्यथा इतर कोणत्याही प्रकारांनी माझी पूजा होत नाही''. येथे भगवान श्रीकृष्णाने एका ब्राह्मणाला

अशा ब्राह्मणांची पूजा करण्यास सांगितले आहे की जे जन्मत: ब्राह्मण नव्हते. विद्वानांनी विचार केला तर त्यांना समजेल की ब्रह्मर्षींना सामाजिक कुलीनता, जातिगत वरिष्ठता नव्हती. लग्न झालेल्या मातापित्यांचे ते पुत्र नव्हते. परंतु साधनेच्या योग्य मार्गाने जाऊन क्रमश: सर्व पायऱ्या पार करून त्यांनी ब्राह्मण जन्म प्राप्त केला आणि हा स्वरूपात्मक जन्म नि:संदेह भाग्यवानांनाच प्राप्त होतो. परंतु या जन्मासाठी कुलीन मातापित्यांचा सहयोग नसतो. ब्राह्मण ही एक जात नसते, ते एक स्वरुप असते, स्थिती असते. वस्तुत: ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे भगवत्पथाचे सोपान आहे. या भगवत्पथावर चालणाऱ्या पथिकाच्या चार आंतरिक अवस्था आहेत. जो साधना करेल तो हा जन्म प्राप्त करू शकतो. आणि या दृष्टीने पाहता ऋषींमध्ये चांडाळपण ब्राह्मण बनू शकतो.

बाराव्या स्कंधामध्ये मार्कंण्डेयाची कथा आहे. भगवान शंकराने त्यांना म्हटले ''ब्राह्मण चित्ताची एकाग्रता, तपस्या, स्वध्याय, धारणा, ध्यान आणि समाधीच्या द्वारे आमचे वेदमय शरीर धारण करतात. व म्हणून आम्ही तुमच्यासारख्या महात्म्यांची स्तुती व सेवा करीत असतो. आम्ही लोक तर ब्राह्मणालाच नमस्कार करीत असतो.'' या प्रकरणातही आत्मतृप्त, आत्मस्थित महात्म्याला ब्राह्मण म्हटले आहे. व त्यामुळे जन्माने कुलीन नसले तरी नारद, वशिष्ठ, शुकदेव, व्यास, परशुराम, भारद्वाज, च्यवन इत्यादींना विशुद्ध ब्राह्मण मानले जाते.

भागवतामध्ये तर ठिकठिकाणी क्षत्रियांना तपश्चर्या करीत ब्रह्मपद प्राप्त करणारे, ब्राह्मण झालेले दाखवले आहे. महाराज पृथूचे पौत्र बर्हिषदाच्या प्रचेता नावाचे दहा पुत्र नारदजींच्या पासून उपदेश ग्रहण करून भगवद चिंतनाला लागले व ब्रह्मलीन झाले. या प्रचेतांचे पुत्र राजा दक्षाचे अकरा हजार पुत्र नारदाकडून उपदेश घेऊन तपश्चर्येला लागले, ज्यांची गाथा भागवताच्या सहाव्या स्कंधामध्ये आहे. तेव्हा ब्राह्मणत्वाचा मार्ग पाहता सृष्टीचे आदिपुरुष मनू-शतरूपा यांना मानले जाते, त्यांच्यापासून या जगाची उत्पत्ती झाली असे मानण्यात येते. तेव्हा मानवमात्र ब्राह्मण होऊ शकतो. तरीही ब्राह्मणाची योग्यता प्राप्त करण्यामध्ये क्षत्रिय जातीचे लोक अग्रेसर राहिले आहेत. कारण समाजाच्या किंवा राष्ट्राच्या रक्षणामध्ये ज्या साहसाने आणि शौर्याने त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले, आपले शीर दिले, त्याच प्रकारे सत्य आणि इमानदारीने ईश्वरपथावरही चालावे लागते, त्यामुळे ब्राह्मणत्व प्राप्तीमध्ये क्षत्रिय कुमारांना अधिक सफलता मिळाली.

श्रीमद्‌भागवत् परमहंस संहिता आहे. वस्तुत: परमहंस आणि ब्राह्मण हे दोन शब्द एक दुसऱ्याचे पर्यायवाची शब्द आहेत. त्यामुळे जागोजागी यात ब्राह्मणांचा महिमा गायला आहे. भागवतामध्ये जास्त करून राजकुमारांनीच हे पद जास्त प्राप्त केल्याचे दिसून येते. तसेच कोणत्याही परिस्थितीत जन्म घेतलेल्यानीही हे पद प्राप्त केले आहे. - उदा. भारद्वाज! यावरून स्पष्ट होते की हे पद कोणताही मनुष्य प्राप्त करू शकतो. मग तो कोठेही जन्मलेला असला, तो कोणत्याही वृत्तीने जीवन निर्वाह करीत असला तरी साधनेला समजून घेऊन आचरण करणारा ब्रह्माला जणून ब्राह्मणत्त्व मिळवू शकतो.

''बडे भाग्य मानुष तन पावा'' येथे मानव शरीराचे मूल्य आहे कोणत्या जाती किंवा कुळाचे नाही.

**महाभारतामध्ये विप्र शब्दाचा अर्थ**

भागवताचे रचनाकार भगवान वेदव्यास महाभारताचे पण रचनाकार आहेत. या महाभारतामध्ये त्यांनी 'विप्र' चे मौलिक चित्रण सर्वत्र केले आहे. वनपर्वातील कथा आहे. एकदा महाराज नहुषांनी शंभर अश्वमेघ यज्ञ करून इंद्रपद प्राप्त केले. अधिकार मिळताच तो मदान्ध झाला. राजा म्हणाला ''आता मी देवराज इंद्र आहे तेव्हा महाराणी शचीने आता मला वरावे'' शचीने गुरुदेव बृहस्पतीची रक्षणासाठी प्रार्थना केली. त्यावर गुरुदेवांनी उपाय सांगितला की नहुषाला सांग की आपल्याकडे येताना अशा पालखीतून यावे की सप्त ऋषी जिचे वहन करीत असतील. त्याप्रमाणे अगस्त्य, अंगिश, वशिष्ठ इत्यादी ऋषी ज्यामध्ये जोडले गेले आहेत अशा पालखीत बसून महाला कडे निघाला. मिलनासाठी तो अत्यंत आतुर झाला होता त्यामुळे त्या महर्षींना त्यांनी शीघ्र चालावे म्हणून 'सर्प-सर्प' म्हणत राहिला; परंतु त्यांच्या चालीत विशेष फरक पडला नाही. तेव्हा त्याने अगस्ती ऋषींना लाथ मारली. तेव्हा अगस्तीं त्याला शाप दिला की जा, तू सर्पच बन. तत्क्षणी नहुष पालखी मधून खाली पडला. त्याला आपली चूक समजली. त्या महार्षींना विनंती केली व आपल्या उद्धाराचा उपाय त्याने विचारला. तेव्हा ते म्हणाले की जेव्हा तुला कोणी ब्राह्मणाची विशुद्ध व्याख्या सांगेल व तू ती स्वीकारशील तेव्हा तू या सर्पयोनीतून मुक्त होशील (ब्राह्मणाची परिभाषा न जाणल्याने तर नहुषाने सप्तर्षींना पालखी उचलायला सांगण्याचे दुस्साहस केले)

सप्तर्षींनी सांगितले की या वेळी ब्राह्माणाची यथार्थ व्याख्या सांगणारा या भूतलावर कोणी नाही. द्वापर युगात तुझ्याच कुळातील महाराज युधिष्ठिर वनवास काळात तुझ्या जवळ येईल. तो तुला ब्राह्मणाचा महिमा सांगून उचित उपदेश करेल. तो महिमा ऐकता तू सर्पयोनीतून मुक्त होशील. व पुन्हा इंद्रपद प्राप्त करशील. सर्प म्हणाला-भगवान, इतक्या दिवस माझा जीवन निर्वाह कसा होईल ? ऋषी म्हणाले दिवसाच्या चौथ्या प्रहरी जो कोणी तुझ्या अधिकार क्षेत्रात येईल तो कितीही बलशाली असला तरी तुझा आहार बनेल.

अशा परिस्थितीत अजगर बनलेला राजा नहुष जंगलात दिवस कंठीत होता. इकडे पांडवांचा वनवास सुरु झाला. पांडव तर झोपडीत राहत होते; परंतु भीम शिकारीसाठी भटकत भटकत त्या अजगराजवळ पोहोचला. अजगराने भीमाला सावधान करून जवळ न येण्यास सांगितले. तो म्हणाला तुला पाहुन मला दया येत आहे. पण जवळ येशील तर मी भुकेला असल्याने तुला पकडून खाऊन टाकेन. भीम म्हणाला ''हे क्षुद्र जंतू, तू मला खाशील ?'' असे म्हणून भीमाने त्याच्यावर हल्ला केला पण अजगराचा स्पर्श होताच भीम निश्चेष्ट झाला.

तिकडे युधिष्ठिरास अपशकून होऊ लागले त्याने पाहिले की सर्वजण आहेत फक्त भीम नाही. तेव्हा भीम संकटात असावा अशी त्याला शंका आली व पुरोहित धौम्य ऋषींना घेऊन भीमाच्या शोधासाठी युधिष्ठिर निघाला. भीमाकडून मारले गेलेले वाघ, हत्ती, म्हशी, भीमाने उपटून काढलेल्या झाडांच्या अनुषंगाने जाता जात अजगराच्या वेटोळ्यात बद्ध झालेला भीम शिथिल पडला होता. युधिष्ठिर भीमाला म्हणाला, ''भीमा, कोणी साधारण जीव तुला वश करू शकणार नाही. अजगराच्या रूपात हा महाभाग कोण आहे ? भीमाला आता अजगराचा परिचय झाला होता म्हणून तो म्हणाला '' हा अजगर म्हणजे आम्हा लोकांचे पूर्वज महाराज नहुष आहेत ते इंद्रपदापासून पदभ्रष्ट झाले होते''

तेव्हा युधिष्ठिराने हात जोडून प्रार्थना केली की 'राजन, आपण कृपा करून आमच्या भावाला सोडावे. याच्या बरोबर आम्ही या जंगलात निश्चिंतपणे फिरत असतो. जोपर्यंत आम्ही वनवासात होत तोपर्यंत मी आपल्या भोजनाची व्यवस्था करत जाईन.'' सर्प म्हणाला, ''राजन मी दुसरे भोजन करू शकत नाही. माझा शाप काहीसा असाच

आहे. तू उद्यापर्यंत उभा राहिलास तर तुलापण खाऊन टाकेन. युधिष्ठिर म्हणाला, हजारो यज्ञ करण्याऱ्यांची ही दुर्गती कशी झाली ? तेव्हा सर्प म्हणाला की ब्राह्मणाच्या शापाने माझी ही दशा झाली आहे. यावर युधिष्ठिराने प्रश्न केला आपल्या सारख्या महात्म्याकडून अपमान कसा झाला ? आपण ब्राह्मणाच्या महिम्यापासून काय अपरिचित होतात ? ब्राह्मण नाव ऐकताच अजगराला पूर्वजन्माची स्मृती जागृत झाली. तो म्हणाला

**ब्राह्मण को भवेद् राजन वेधं किंच युधिष्ठिर ।**
**ब्रवीह्यतीमति त्वां हि वाक्यैरनुमिमीमहे। १८०/२०**

सर्प म्हणाला - ''राज युधिष्ठिर, मला हे सांग की ब्राह्मण कोण आहे आणि योग्य सत्पात्र ब्राह्मण कोणाला म्हणावे ?

**सत्यं दानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो दया ।**
**दृश्यत्ने यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः । १८०/२१**

नागराज, ज्याच्यामध्ये सत्य, दान, क्षमा, सुशीलता, क्रुरतेचा अभाव (दयाळू वृत्ती), तपस्या, सहृदयता हे सद्गुण असतात त्याला ब्राह्मण म्हटले जाते.

**शूद्रष्वषि च सत्यं च दानमक्रोध एव च ।**
**आनृशंस्यमहिंसा च दया चैव युधिष्ठिर । १८०/२३**

सर्प म्हणाला, सत्य, दान, अक्रोध, सृहृदयता, अहिंसा व दया आदि सद्गुण तर शूद्रामध्येही असू शकतात.

**शूद्रे तु यद् भवतेलक्ष्म द्विजे तच्च न विद्यते ।**
**न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः । १८०/२५**
**यत्रै तल्लक्षते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः ।**
**यत्रै तन्नभवेत् सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत ।। १८०/२६**

युधिष्ठिर उत्तरला ''ज़र शूद्रामध्ये सत्य आदि उपयुक्त गुण असतील व ती ब्राह्मणांत नसतील तर तो शूद्र शूद्र नाही आणि ब्राह्मण ब्राह्मण नाही. सर्प, ज्याच्यामध्ये सत्यादि लक्षणे विद्यमान आहेत तो ब्राह्मण समजला जातो आणि ज्याच्यामध्ये या लक्षणांचा अभाव आहे तो शूद्र समजला जातो''

युधिष्ठिराने असे म्हणताच अजगराचे शरीर सोडून नहुष एक दिव्य पुरुषाच्या रूपात उपस्थित झाला. त्याने पांडवांना विजयाचा आशीर्वाद दिला आणि तो निघून गेला. तेव्हा तात्पर्य हे की, ब्राह्मणत्व म्हणजे योगसाधना सिद्ध झाल्यानंतरची स्थिती आहे. जन्माने कोणीही ब्राह्मण असू शकत नाही. महाभारतातील सुप्रसिद्ध आख्यान यक्ष-प्रश्न यामध्ये या-निर्णयाला पुष्टी दिली आहे. यक्षाने युधिष्ठिराला विचारले

**राजन कुलेन वृत्तेन स्वाध्यायेन श्रुतेन वा ।**
**ब्राह्मण्यं केन भवति प्रबूह्येतत् सुनिश्चितम् ।।**

हे राजन, कुल परंपरा, शास्त्र श्रवण, स्वाध्याय आणि आचरण यांपैकी कोणत्या गोष्टीने ब्राह्मणत्व सिद्ध होते ? राजन् हे निश्चितपणे मला सांग.

**श्रृणु यक्ष कुलं तात न स्वाध्यायो न च श्रुतम् ।**
**कारणं हे द्विजत्वे व वृत्तमेव न संशय: ।। वनपर्व ३१३/१०८**

युधिष्ठिर म्हणाला '' हे यक्षा, ना कुल परंपरेने ना शास्त्र श्रवणाने किंवा ना स्वाध्यायाने ब्राह्मणत्व सिद्ध होत असते. ब्राह्मणत्वाच्या सिद्धीचे कारण फक्त आचार आहे. जो इंद्रियांचे दमन करू शकतो, मनाचे शमन करू शकतो, ज्याचे अंत:करण शुद्ध आहे, मन शांत आहे, ध्यान व समाधिची ज्याच्यामध्ये क्षमता आहे तोच ब्राह्मण होय. ज्याने संयमाने ब्रह्माला जाणले आहे तो ब्राह्मण आहे. साधना करून जो गुणातीत झाला आहे तोच ब्राह्मण होय. तेव्हा तात्पर्य हे की ब्राह्मण ही योग साधनेत प्रवृत्त असणाऱ्या पुरुषाला मिळणारी अवस्था आहे.

यक्षाने पुन्हा प्रश्न केला ''राजन ही लक्षणे तर शूद्रामध्ये देखील असू शकतात. यावर युधिष्ठिराने त्याचे शंका समाधान करताना म्हटले जर ही लक्षणे शूद्रामध्ये असतील तो शूद्र नव्हे परंतु तो ब्राह्मण आहे असे समजावे. यक्ष म्हणाला की, ही लक्षणे नसलेला ब्राह्मणही असू शकतो. युधिष्ठिर म्हणाला तर मग तो ब्राह्मण नव्हे तो शूद्र आहे.

**युधिष्ठिर उवाच -**
**पठका: पाठकाश्चैव ये चान्ये शास्त्रचिन्तका: ।**
**सर्वे व्यसनिनो मूर्खो य क्रियावान स पण्डित: ।। ३१३/३०**

शिकणारे, शिकवणारे तसेच शास्त्राचा विचार करणारे हे सर्व व्यसनी आणि मूर्ख आहेत. जो क्रियावान आहे तो पंडित होय.

**चतुर्वेदोऽपि दुर्वृत: स: शूद्रादतिरिच्यते ।**

**योऽग्निहोत्र परो दान्त: ब्राह्मण इति स्मृत: ।।**

चार वेदांमध्ये पारंगत असणारा मनुष्य जर दुराचारी असेल तर तो अधमतेमध्ये शूद्रापेक्षा अधिक अधम आहे असे समजावे. जो यज्ञामध्ये तत्पर आहे व जो जितेन्द्रिय आहे त्यालाच ब्राह्मण म्हटले जाते.

म्हणजे जन्म घेतल्यानंतर ब्राह्मणत्व सिद्ध केले जाते. यक्षाने (जो स्वत: धर्मराज होता) युधिष्ठिराचे उत्तर प्रमाण मानून त्याचा स्वीकार केला. त्याच्या अनेक भावांना जीवदान दिले व आशीर्वाद देऊन निघून गेला. सर्वांनी ब्रह्मचिंतनाचे आचरण केले पाहिजे. कारण ते आचरण हेच ब्राह्मणत्वाचा स्त्रोत आहे.

**श्रीरामचरितमानसामध्ये विप्र शब्दाचा अर्थ -**

भागवतामध्ये जो निर्णय दिला आहे त्यालाच महाभारतात दुजोरा दिलेला आहे कारण लेखक एकच होते. गोस्वामी तुलसीदासांनी याच निर्णयाचे अनुसरण रामचरित मानसमध्ये केले आहे. भागवतामध्ये भगवान म्हणतात की या ब्राह्मणांच्या पूजनाने मी पूजला जात असतो. गोस्वामी अगदी तसेच लिहितात -

**मन क्रम वचन कपट तजि, जो कर भूसुर सेव ।**

**मोहि समेत विरंचि सिव, बस ताके सब देव ।।**

जो कपट वृत्तीचा त्याग करून वाचा-कर्मणा पृथ्वीची देवता जे ब्राह्मण त्यांच्या चरणांची सेवा करतात ते ब्रह्मा-विष्णू-महेश तसेच संपूर्ण देवातांसहित मला परमात्म्यालाच ते पूजित असतात. अक्षरश: हाच निर्णय भागवताचा पण आहे.

गोस्वामींनी सर्वप्रथम अवतार प्रकरण घेतले आहे. त्यात ते म्हणतात की भगवान ब्राह्मणासाठीच (विप्रासाठी) अवतार घेतात.

**जब जब होइ धरम की हानी । बाढही असुर अधम अभिमानी ।**

**करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहि विप्र धेनु सुर धरनी ।।**

जेव्हा जेव्हा गायी दु:खी होतात, पृथ्वी कष्टी होते, ब्राह्मण आणि देवता कष्टी होतात तेव्हा तेव्हा भगवान विविध प्रकारचे शरीर धारण करून ''हरहिं कृपानिधि सज्जन पीरा'' या सज्जनांची पीडा हरण करतात. अवतार घेऊन त्रास देणाऱ्यांना यांना सतावू नका, दु:ख देऊ नका असे ते समजवतात का ? यावर म्हणतात नाही मग

**असुर मारि थापहि सुरन्ह राखहि निज श्रुति सेतु ।**
**जग विस्तारहि विशद यश, राम जन्म कर हेतु ।।**

ते त्या असुरांचे हृदय परिवर्तन करीत बसत नाहीत तर त्यांना ठार मारून देवतांना भयमुक्त करतात. ''राखहि निज श्रुति सेतु'' वेदामध्ये असणाऱ्या भ्रांती दूर करतात आणि श्रुति सेतूचा पुन्हा विस्तार करतात श्रुतीचे (वेदांचे) पुन्हा स्तवन करतात आणि आपल्या निर्मळ यशाचा विस्तार करतात. हाच रामराज्याचा हेतू आहे.

पंच महाभूतांपैकी एक जड पदार्थ असणाऱ्या पृथ्वीसाठी भगवंत अवतार घेतात. ते आकाशासाठी किंवा वायूसाठी अवतार घेत नाहीत तर पृथ्वीसाठी ते अवतार घेतात. त्या अवताराचे जे सुख दु:ख पृथ्वीला मिळाले ते तेच जाणतात. आपण पृथ्वी तर नाही. आता राहिल्या देवता. भगवान अवतार घेतील भारतात, पण हित करतील देवतांचे. देवता जेथे असतील त्यांचे सुख दु:ख तेच जाणे. पशूंमध्ये विशिष्ट पशू गायही आम्ही नाही की, भगवंताच्या अवताराने आम्हाला काही मिळेल. मनुष्यांमध्ये फक्त ब्राह्मणांसाठी भगवंताचा अवतार असतो. पण जगात तीनशे चारशे देश आहेत. तेथे कोठेही ब्राह्मण मनुष्य मिळणार नाही. आणि विश्वाच्या पसाऱ्यात भारत एक छोटा भाग ! त्यातही अनेक जाती ! अनेक वर्ण ! त्यातही ईश्वराचा अवतार मूठभर लोकांसाठी म्हणजे फक्त ब्राह्मणांसाठी. अन्य लोकांसाठी जर भगवंताचा अवतार नसेल तर आम्ही जगाला काय उपदेश देऊ शकणार ? येथे भगवान तर एक मूठभर समाजाचा झाला. देववशात तुम्ही ब्राह्मण नसाल तर मनुष्यजन्मच व्यर्थ होय. कदाचित त्याचा धावा केल्यानंतर तो आला तरी कुऱ्हाड चालवणारच की ! कारण ब्राह्मण ब्राह्मणाला सतावणार नाही. त्याला लाभदायी ठरेल पण विजातीयांना तर त्रास देणारच ना ! जे लोक त्यांना त्रास देतात, पीडा देतात ते असुर ! भगवंत त्यांचे हृदय परिवर्तन करीत नाहीत, त्यांना सरळ मारण्यासाठीच अवतरतात. तर मग अशा भगवंताला कोण हो भजणार ? ज्यांचे रक्षण तो करतो तेच त्याला भजतील. कारण बाकीच्यांनी त्याला

भजले, त्याची भक्ती केली तरी येऊन तो त्यांचे गळे कापून टाकणार. मग अशा झोपलेल्या वाघाला जागे कोण करणार ?

अन्यत्र म्हणतात - '' निज इच्छा प्रभु अवतारइ सुर महि गो द्विज लागि''। प्रभू आपल्या इच्छेने अवतार घेतात. परंतु त्यांना इच्छा केव्हा होते ? तर जेव्हा देवता, पृथ्वी, गाय आणि ब्राह्मण यांचावर संकट येईल तेव्हा. पुढे तर भगवंत केवळ ''गो द्विज हितकारी जय असुरारी'' - फक्त गाय आणि ब्राह्मणांचे ते हितचिंतक बनतात. म्हणजे भगवान मनुष्यामध्ये फक्त ब्राह्मणवर्गाचीच प्रार्थना ऐकतो की जो वर्ग फक्त भारतातच आहे. अशा ईश्वराला जगातील इतर मानवांशी काय संबंध ? अन्य वर्गातील लोक किंवा धर्म या भगवंतासाठी आपले अश्रू कशाला वाया घालवतील ? मग भारत विश्वगुरु कसा ? तेव्हा येथे द्विज कोणाला म्हटले आहे ज्याच्यासाठी भगवंत अवतार घेतात त्यावर विचार केला पाहिजे.

वास्तवात तुलसी मानसमध्ये जे म्हटलेले आहे की भगवंत ''गो द्विज हितकारी'' आहे ते अगदी खरे आहे. परंतु ज्या ब्राह्मणासाठी ते अवतार घेतात तो ब्राह्मण म्हणजे जगातील एखादी प्रचलित जाती नाही; परंतु भागवत किंवा महाभारत यामध्ये आपण पहिल्याप्रमाणे ब्राह्मण हे एकाअवस्थेचे स्थितीचे नाव आहे. तुलसीमानसाच्या अनुशीलनावरून हे स्पष्ट आहे की अवतार घेतल्यापासून परिनिर्वाणापर्यंतच्या अकरा हजार वर्षांच्या अवधीत परमात्मा रामाने आपल्या श्रीमुखातून ना कधी गो महिमा गायला ना कधी गो एखादी गाय लंकेमधून सोडवून आणली. ज्या गोहितासाठी अवतार घेतला त्या गायीचे कधी नावसुध्दा घेतले नाही. तसेच एकहि विप्राला असे आश्वासन दिले नाही की बाबा रे, मी आता आलोय तू निश्चिंत अस. मग तो भगवंत गो द्विज हितकारी कसा ?

वास्तविक परमात्म्याने जेव्हा अवतार घेतला तेव्हा ज्यांना ज्यांना तारले ते सर्व अधम होते त्यामध्ये तर कोणी द्विज नव्हते. पाहा जेव्हा वनवासाला निघाले तेव्हा प्रथम भेटला केवट -

**लोक वेद सब भाँतिहि नीचा । जासु छाँह छुइ लेइय सींचा ।**
**राम कीन्ह आपन जबही ते । भयउँ भूषण तबहीं ते ।।**

केवट म्हणाला की समाज माझ्या सावलीपासून दूर पळाला. ब्रह्मदेवाने माझ्या हातावर भक्तीची रेखा लिहिलीच नाही; पण श्रीरामाने मात्र मला अंगिकारले. नशिबात नाही लिहिले तर काही हरकत नाही. नशिबात दोन हातपायाचा माणूस होणे तर लिहिले आहे, तेही पुरेसे आहे - ''बडे भाग्य मानुस तन पावा'' मोठ्या भाग्याने तुम्हाला मनुष्य शरीर प्राप्त झालेले आहे तेव्हा तुम्ही आता अतूट-अमाप श्रद्धेने तुमचे मन भरून टाका म्हणजे ईश्वर तुम्हाला प्राप्त होईल. भगवंत अनाथांचा नाथ आहे, अधमउद्धारक आहे. केवट द्विज नव्हता. त्याची सावली अंगावर पडली तरी लोक स्नान करून पवित्र व्हायचे; परंतु रामाने त्याला अंगिकारले. त्याला असे नाही म्हणाले की तू दूर बैस. पण त्यांनी त्याला मिठी मारली. ''**तुम मम सखा भरत सम भ्राता । सदा रहहु पुर आवत जाता ।**'' रामाने केवटासाठी आपल्या घराचा दरवाजा उघडा ठेवला. भरताचे जे स्थान त्यांच्या हृदयात होते तेच स्थान त्यांनी केवटाला दिले व म्हणाले की केव्हाही ये आमचे घर तुझेच आहे असे समज.

श्रीरामाच्या वनवासकाळात कोळ्यांनी, भिल्लांनी श्रीरामाची सेवा केली. रामाने त्यांनाही अंगिकारले. गीधराजाशी मैत्री केली. ''**गीध अधम खरा आमिष भोगी । गति दीन्ही याचत योगी ।**'' मासांहारी व अधम गीधराजाची सेवाही त्यांनी स्वीकारली. योग्यांनादेखील दुर्लभ असणारी गती त्याला दिली. त्याचा दाह संस्कारदेखील भगवान रामाने आपल्या हातांनी केला.

भगवान राम शबरीच्या आश्रमात गेले, त्यांना आपला परिचय देतांना तिने म्हटले '**अधम ते अधम अधम अति नारी । तिन्ह मह मै मतिमन्द अधरि ॥** सर्वांत अधम म्हणजे कोळी-भील्ल हे आदिवासी. त्यातही अधम नारी जात, आणि नारींमध्ये सुद्धा मी अत्यंत बुद्धिहीन व अत्यंत अधम आहे. परमात्मा श्रीराम म्हणाले भामिनी, मी फक्त एकच नाते जाणतो व ते म्हणजे भक्तीचे. ''**भक्तिवन्त अति नीचहु प्राणी। मोहिं परम् प्रिय अस मम बानी।** अत्यंत नीच अधम भक्तिवान सुद्धा मला प्रिय आहे. भगवंत फक्त भक्तीचे नाते पाहतात व त्या नात्यानेच भक्ताकडे ते येतात. भक्ताची जात ते बघत नाहीत.

वाल्मीकी रामायणा प्रमाणे जेव्हा शबरीला रामाने दर्शन दिले तेव्हा ती श्रीरामाच्या चरणी उन्मळून पडली. रामाने तिला क्षेमकुशल विचारले तेव्हा त्यांनी तिला प्रश्न केला - शबरी, तुझी तपश्चर्या चांगल्या रीतीने सुरु आहे ना ? तुम्ही गुरुजनांची सेवा केली

होती त्याचे फळ तर तुला मिळत आहे ना ? जी व्रते तू धारण केली आहेस त्या नियमांचे पालन तुझ्याकडून चांगल्या प्रकारे होत आहे ना ? आता पाहा की धर्माच्या नावावर लिहिल्या गेलेल्या स्मृतींमध्ये शूद्राला भजनाचा अधिकार नाही असे सांगितले आहे पण राम मात्र शबरीला येथे विचारीत आहेत की तुझी तपस्या, व्रत, नियम चांगल्या प्रकारे सुरू आहे ना ? जे द्विजासाठी आले होते त्या भगवान श्रीरामाने शबरीला परम गती दिली.

त्यानंतर भगवान श्रीरामानी वानर आणि अस्वलांना अंगिकारले. शरण येण्यापूर्वी विभीषणाने हनुमंताला विचारले की भगवान राम माझ्यासारख्या निशाचरावर पण कृपा करतील का ? हनुमानांनी विभीषणाला आश्वासन देताना म्हटले **''कहहु कवन मै परम कुलीना । कपि चंचल सबहिं विधि हीना'' अस मैं अधम सखा सुनु..** मी इतका अधम असतानादेखील प्रभूने मला जवळ केले. मग तुम्ही तर राज परिवारातले आहात. तुमच्यावर प्रभू अवश्य कृपा करतील.

निशाचर अधम असतात यात काही शंका नाहीच. **''अधम निशाचर लीन्हे जाई। जिमि मलेंच्छ बस कपिला गाई ''** परंतु जो निशाचर शरण आला, त्या प्रत्येकाचे प्रभूने कल्याणच केले, त्या सर्वांना त्याने अंगिकारले. आता प्रभूचा अवतार झाला होता ब्राह्मणाच्या कल्याणासाठी, परंतु रामाने उद्धार केला या जनसामान्यांचा, कोळीभिल्लांचा, अधम निशाचरांचा, आदिवासी वानर-अस्वलांचा, गिधाडांचा, ज्यांची छायासुध्दा निषिद्ध मानली जात होती त्या पुरुषांचा. एकाही ब्राह्मणाच्या डोक्यावर हात ठेवून त्याला त्यांनी आश्वासन दिले नाही की आपलेसे केले नाही. ज्याच्यासाठी अवतार होतच नाहीत त्या अधमांना त्यांनी तारले. वास्तवात हेच द्विज होत.

वास्तविक अवतार कधी बाहेर होत नाही तो एखाद्या योग्याच्या हृदयात होत असतो. भगवंत खरोखर विप्र हितकारी किंवा द्विजहितकारीच आहेत; परंतु येथे द्विज म्हणजे कोणती जाती नव्हे योग्यता आहे. जे ब्रह्मपरायण आहेत तेच द्विज होत. 'द्वि' म्हणजे द्वितीय 'ज' म्हणजे जन्म, ज्याने द्वितीय जन्म प्राप्त केला आहे भगवान त्यांचा हितैषी आहे. एक जन्म तो आहे जो मल-मूत्र-पू इत्यादींनी भरलेल्या गर्भवासाच्या अनंत अनंत योनींचे भ्रमण आहे. हे शरीर सुटले तर दुसरे धारण करू. या प्रकृतिजन्य जन्मापेक्षा वेगळा आत्मिक स्थितीचा जन्म आहे. जेव्हा साधक त्या ब्रह्माशी परायण होतो, तेव्हा ईश्वरीय संकल्पांना आपल्यात धारण करतो. एकदा ईश्वरीय संस्काराचे बीजारोपण झाले की मग त्या बीजाचा कधी नाश होत नाही. मग त्या स्वरूप साधनाच्या

प्रभावाने तो साधक प्रत्येक जन्मात साधना करतो व काही जन्मानंतर तो त्या ठिकाणी पोहोचतो जे आत्म्याचे शुद्ध स्वरूप आहे. व म्हणून ज्यांच्यात आंशिक आकाराचे बीजोरोपण झाले आहे तो द्विज आहे, त्याने दुसरा जन्म घेतलेला आहे.

ज्याच्यामध्ये आत्मस्वरूप जागृत झालेले आहे तो द्विज आहे. आणि भगवंत अशा द्विजांचे हितचिंतक आहेत. जो कोणी परमार्थाच्या मार्गाची वाटचाल करीत असतो भगवंत त्याची हाक ऐकत असतात, त्याच्यासाठी अवतार घेतात, त्याचे हित करतात. विप्र कोण आहे ? जो ब्रह्मपरायण आहे तो विप्र होय. आणि जो प्रभुपरायण होतो किंवा ईश्वराला शरण जातो, प्रभू त्याचावर कृपा करतात, त्याच्या आत्म्याशी एकरूप होतात. दुसऱ्या शब्दात **''सो केवल भगतन हित लागी । परम कृपाल प्रणत अनुरागी''।** जो प्रणत आहे, समर्पित आहे तोच विप्र आहे. प्रभू त्यांच्यावर प्रेम करतात. ''राम भक्त हित नर तनु धारी सहि संकट किये साधु सुखारी'' भक्ताच्या हितासाठी भगवंत त्या भक्ताचे शरीर धारण करतात. महापुरुषाच्या सेवेने जेव्हा ते हृदयात जागृत होतात तेव्हापासून साधकाच्या हृदयात सद्‌गुणांचा अविर्भाव होतो. त्या दिवसापासून तो साधक वैश्य असतो. द्विजत्वात प्रवेश करणारा प्रवेशक असतो.

भगवंताने ज्यांना ज्यांना तारले ते सर्व विप्र होते. अधमांना तारले कारण ते सर्व विप्र होते. तुलसी मानसाच्या मते ब्राह्मण योगपथाची एक अवस्था आहे. विप्रासाठी अवतार पर्यायवाची आहे. जगामध्ये कुठलाही मनुष्य प्रभूचा विरही बनून, नम्र बनून भगवतचरणी लागतो त्याच्यासाठी भगवंताचा अवतार असतो. म्हणजे विप्र, द्विज किंवा ब्राह्मण आपल्या हृदयातील एका योग्यतेचे नाव आहे. जेव्हा भगवान रामाना समज आली तेव्हापासून ते विप्रांच्या उद्धाराच्या कार्याला लागले. अजून तर सुकुमार-कोवळे बालक होते तेव्हा 'विश्वामित्र महामुनी ज्ञानी' महान ज्ञानी, मुनी विश्वामित्र यज्ञरक्षणार्थ राम आणि लक्ष्मणांना मागायला दशरथाच्या दरबारात आले तेव्हा राजा दशरथ बेचैन झाला, अस्वस्थ झाला व म्हणाला ''चौथेपन पायउँ चारी । विप्र वचन नहि कहेहु विचारी ।'' विप्रवर, आपण विचार करून बोलला नाहीत असे वाटते. राजा दशरथ विश्वामित्राला चांगल्या प्रकारे ओळखत होता. समकालीन नरेश होता. राजाचा नातेवाईक होता; परंतु तरीही दशरथाने विश्वामित्राला विप्रवर म्हणून संबोधित केले. विश्वामित्र 'महामुनी ज्ञानी' होते. जो मुनी आहे, ज्याची इंद्रिये मौन आहेत मिटलेली आहेत, ईश्वराचे ज्ञान ज्याच्यामध्ये प्रसारित झालेले आहे तो विप्र होय. म्हणजे विप्र एक स्थिती आहे.

वनवासकालामध्ये भगवान राम अनेक ऋषींच्या आश्रमात गेले. तेव्हा काही ऋषींना त्यांनी नमन केले, काहींना चरणस्पर्श केला, परंतु एक श्रेष्ठ व वरिष्ठ मुनी वाल्मीकींना मात्र रामाने साष्टांग दंडवत केला - **''मुनि कहँ राम दण्डवत कीन्हा। आशीर्वाद विप्रवर दीन्हा।''** त्या विप्रश्रेष्ठाने आशीर्वाद दिला. वाल्मीकी मुनी होते ज्यांची मनसहित इंद्रिये मिटलेली होती. परमात्म्यामध्ये समाहित होती. यालाच तर विप्र म्हटले जाते. शरीराने पाहिले तर वाल्मीकी **'भील जाती करनी कठिन, धर्म सुना नहिं कान । सद्गुरु के कारन मिला विप्र सम्मान ।।'** कोळ्याच्यांत भिल्लांच्यात लग्न-विवाह, उठणे-बसणे, करणे सवरणे सर्व चाण्डाल पद्धतीने- वृत्तीनेही चाण्डाल, कुलीनतेचे एकही लक्षण नाही. परंतु सद्गुरुच्या कृपेमुळे त्यांना 'विप्र' चे स्वरूप तसेच सन्मान प्राप्त झाला.

ऋषींच्या आश्रमांत फिरत फिरत भगवान श्रीराम पुढे गेले असताना त्यांना हाडांचा ढीग पडलेला दिसला. रामाला आश्चर्य वाटले, त्यांचे हृदय द्रवले व म्हणून जिज्ञासेने त्यांनी मुनींना विचारले. तेव्हा मुनी म्हणाले ''निशिचर निकर सकल मुनि खायो सुनी रघुवीर नयन जल छाये ।।'' निशाचरांनी ऋषिमुनींना मारून खाऊन टाकले त्यांच्या हाडांचा हा ढीग आहे. ऋषिमुनींचा दोष एवढाच की ते परमेश्वराचे भजन करतात- भक्ती करतात. दुराचार सोडून भगवत्भक्ती करणाऱ्या ऋषिमुनींना निशाचरांनी खाऊन टाकल्याचे ऐकून भगवान श्रीरामांचे डोळे भरून आले आणि धनुष्य उचलून त्यांनी प्रतिज्ञा केली -

**निशिचर हीन करउँ महि, भुज उठाइ प्रन कीन्ह ।**
**सकल मुनिन के आश्रमन्हि, जाइ जाइ सुख दीन्ह ।**

त्यांनी प्रतिज्ञा केली की ह्या पृथ्वीला राक्षसरहित करेन. आणि मग प्रत्येक ऋषींच्या आश्रमात जाऊन त्यांनी त्यांना आश्वासन दिले, अभय दिले, त्यांना सुख दिले. वास्तविक मुनी हेच विप्र होत. जे ब्रह्मपरायण आहेत अशांसाठीच परमात्मा अवतार घेत असतो. भगवान शरण आलेल्यांचे रक्षण करणारा असतो. विश्वामित्र विप्र आहे, वाल्मीकी विप्र आहे, समस्त मुनीगण विप्र आहेत. अशा विप्रांच्या अस्थी पाहून श्रीरामाने 'निशिचर हीन करउँ महि' अशी प्रतिज्ञा केली. आपली प्रतिज्ञा त्यांनी पूर्ण केली, अवताराचे प्रोयोजन पूर्ण केले. वास्तवात हेच विप्र होत. 'धरडँ देह नहि आन निहोरे' दुसऱ्या

कोणत्याही प्रकारच्या बोलवण्याने भगवान शरीर धारण करीत नाहीत. तुलसी मानसाच्या मते सर्व मानवमात्रासाठी परमेश्वराचा अवतार सारखाच असतो. तुम्ही फक्त त्याच्यावर अतूट श्रद्धा ठेवा व त्याला प्राप्त करा.

गोस्वामीजींनी द्विज हितैषीलाच नंतर गो हितैषी म्हटले आहे. 'गो' म्हणजे मनासहित इंद्रिये. 'गो गोचर जहँ लगि मन जाई । सो सब माया जानेहु भाई ।' मनाची झेप जेथपर्यंत जाऊ शकते ती सर्व माया आहे. परमात्मा या इंद्रियांच्या सीमे पलीकडे आहे. ''जिति पवन मन गो निरस करि मुनिध्यान कबहुंक पावही'' मुनी लोक इंद्रियांना विषयरसापासून संपूर्ण निरिच्छ करून मगच ध्यानात ईश्वराला पाहू शकतात. आपल्या बुद्धीच्या जोरावर कोणताही साधक इंद्रियांना वश करू शकत नाही. इंद्रिये म्हणजे घोडे होत. मन म्हणजे लगाम होय. त्याला पकडून प्रभू स्वयं संचालन करतात तेव्हा इंद्रिये वश होतात. त्यानंतर त्यांना पुन्हा इंद्रियांचे रूप धारण करावे लागत नाही. त्यानंतर त्यांना सहजस्वरूप प्राप्त होते. इंद्रियांना संयत करण्यासाठीच भगवंताचा अविर्भाव (अवतार) होत असतो. 'माया गुन गो पार' भगवान या मायेच्या पलीकडे आहे. मायेचे दुसरे स्वरूप आहे त्रिगुणमयी प्रकृती व म्हणून भगवंत गुणांच्या पलीकडे आहेत. मायेचे तिसरे स्वरूप आहे इंद्रिये. म्हणून प्रभू इंद्रियांच्या पलीकडे आहेत. मायेच्या पलीकडे जाणे, इंद्रियांच्या पलीकडे जाणे, गुणांच्या पलीकडे जाणे ही एक प्रक्रिया आहे. इंद्रियांच्या पलीकडे गेल्याशिवाय कोणी गुणांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. गुणांच्या पलीकडे गेल्याशिवाय कोणी मायेच्या पलीकडे जाऊ शकत नाही. साधकाच्या संयमाच्या क्रमोन्नत अवस्था आहेत. त्यांना पार केल्यानंतरच भगवंताचे दर्शन होत असते. गाय चरायला नेल्याने दर्शन होत नाही.

राक्षसांच्या संहाराने पृथ्वी जेव्हा त्रस्त होते तेव्हा प्रभू अवतार घेतात. 'धड धरती का एकै लेखा, जो बाहर सो भीतर देखा' जे काही आत हृदयदेशात आहे त्याचाच विस्तार बाहेर पृथ्वीवर आहे. गोस्वामी 'विनयपत्रिका' मध्ये लिहितात -

**असन वसन पशु वस्तु विविध विधि सब रह मनि महँ जैसे ।**
**सरग नरक चर अचर लोक बहु बसत मध्य मन तैसे ॥**

ज्या प्रकारे भोजन वस्त्र सुखसमृद्धीची व्यवस्था मनाच्या अंतरंगात असते त्या प्रकारेच स्वर्ग, नरक-अपवर्ग इत्यादी मनाच्या अंतरंगात राहत असतात. जेव्हा ज्याचा

क्रम येतो तेव्हा मन त्याला प्रकट करीत असते. जेव्हा या पृथ्वीला ग्लानी येते, साधक आपल्या दुर्गुणांच्या पलीकडे जाऊ शकत नाही तेव्हा तो प्रभूला शरण जातो. प्रभू त्याच्या हृदयात आपल्या अविर्भावाची रचना करतात. साधकाच्या आत्म्याचे रथी बनतात आणि त्याच्या शरीररूपी धरतीचा उद्धार करतात.

अंत:करणात दोन प्रवृत्ती आहेत - एक दैवी संपदा व दुसरी आसुरी संपदा । परमदेव परमात्म्याकडून मिळणाऱ्या दैवी संपत्तीला प्रभू स्थिरता प्रदान करतात, ''असुर मारि थापहि सुरन्ह'' प्रभू जेव्हा करुणार्द्र होऊन उतरतात तेव्हा आसुरी संपदा त्यांना प्रतिकार करते, ती संपदा म्हणजे साधनेच्या मार्गातील अवरोध असते. ईश्वर तो अवरोध संपूर्ण दूर करतो व दैवी संपदेला स्थिर करतात. ''राखहि निज श्रुति सेतु'' वैदिक मार्गामध्ये जे गैरसमज भ्रान्ती आहेत त्यांनाही ते दूर करतात- नष्ट करतात व श्रुति सेतूला पुन्हा प्रस्थापित करतात. आपले यश सर्वत्र पसरवतात यशाचा सर्वत्र विस्तार करतात. हाच रामजन्माचा हेतू असतो व म्हणून गो-हितैषी द्विज हितैषी, पृथ्वी हितैषी, देव-हितैषी, संत हितैषी भक्त-हितैषी या सर्वांचा एकच अर्थ आहे तो म्हणजे साधकाच्या क्रमोन्नत अवस्था ।

विप्राचे स्वरूपावरून समाजात अनेक गैरसमज आहेत. अनेक सहृदय विद्वान देखील या प्रकरणावर आक्षेप घेतात. उदाहरणार्थ डॉ. राम मनोहर लोहियांचे घ्या ते म्हणाले होते. 'रामचरित मानस हा ग्रंथ भारतीय समाजाला निसंदेहपणे एकतेच्या सूत्रात गुंफत आहे. परंतु गोस्वामीनी एक-दोन चुका केल्या आहेत व त्या म्हणजे स्त्रियांची निंदा आणि ब्राह्मणांबद्दल पक्षपात' असे वाटते की त्या महापरुषाकडून ती चूक करवली गेली.

**''पूजिय विप्र शील गुण हीना । शूद्र न गुन गन ज्ञान प्रवीना''**

शूद्र ज्ञानात आणि गुणात कितीही श्रेष्ठ असला तरी ताडन करण्यास योग्य असतो. वास्तविक मानस हे एक शास्त्र आहे की ज्याला योगीजनच यथार्थपणे जाणतात. आणि त्यांनी निर्देशन केलेला एखादा क्रियाशील साधकपण त्याला समजू शकतो. केवळ भाषाचातुर्य आणि बुद्धीच्या बळावर त्याला कोणी समजू शकत नाही. तेव्हा प्रखर विद्वान असूनही डॉक्टर साहेबांचा हा आरोप स्वाभाविक आहे.

भागवतामध्ये श्रुतदेव ब्राह्मणाला समजवताना भगवंत म्हणाले की माझ्याबरोबर येणारे महर्षी जगद्गुरु आहेत. जगाचे कल्याण करीत ते फिरत आहेत. त्यांच्या चरणपूजेने

माझी पूजा होत असते. हेच भगवान श्रीरामाने कबंधाला सांगितले. हेच शरणागत विभीषणाला सांगितले की ''ते नर प्राण समान मम, जिन्हके द्विज पद प्रेम'' संतमहिम्यामध्ये नारद तसेच भरतालापण हेच समजावले की माझी पूजा करावयाची असेल तर ब्राह्मणाची पूजा करा. कबंध प्रकरण पाहा -

श्रीराम सीतेच्या शोधात दंडकारण्यात मातंग मुनीच्या आश्रमाकडे निघाले असता रूंद छातीच्या आणि विशालकाय राक्षस कबंधवर त्यांची नजर गेली. कबंध म्हणजे नुसते एक धडमात्र होते. त्याच्या पोटातच दाहक असे दोन डोळे, दोन विशाल भुजा होत्या. पाय नसणारा तो घरंगळत चालत असे. अशा त्या राक्षसाने श्रीराम व लक्ष्मण या दोघांना एकदम पकडून विवश केले. लक्ष्मण संतापला. श्रीरामाने त्यांना शांत केले व दोन्ही भावांनी मिळून कबंधाचे हात तोडून टाकले. नंतर त्याला एका खडड्यात टाकून त्याला अग्नी दिला. श्रीरामाच्या हातून त्याला मरण येताच कबंधाने दिव्य शरीर धारण केले तो म्हणाला-

**दुरवासा मोहि दीन्ही सापा । प्रभु पद पेखि मिटा सो पापा ।।**

**मानस, ३/२३/७**

भगवान रामाला कबंधाची ही गोष्ट आवडली नाही. ते म्हणाले ''गंधर्वा तुमच्याकडून ही चूक कशी झाली ? तुम्ही तर ज्ञानी होतात. ब्राह्मणाचा (विप्रचा) अपमान कसा केलात ?'' गंधर्व म्हणजे ईश्वरीय मार्गावरील तो गायक आहे ज्याच्याकडून श्वासाची तार पकडली जाते. असा साधक साधारणत: उच्छृङ्खल होतो व एवढ्याला प्राप्ती समजून तो महापुरुषांचा अपमान करण्याची चूक करतो. अशाच प्रकारची चूक कबंधाच्या हातून झाली होती. श्रीरामाने त्याला धर्म म्हणजे काय ते सांगितले.

**मन क्रम वचन कपट तजि, जो कर भूसुर सेव ।**
**मोहि समेत विरांचि शिव, बस ताके सब देव ।।**

मन, कर्म व वाणीने कपटबुद्धीचा त्याग करून जो ब्राह्मणाच्या चरणकमलाची सेवा करतो, ब्रह्मा-शिवा आणि चराचर देवतांसहित मी परमात्मा त्याला वश होतो. केवळ एकच सूत्र लक्षात ठेवायचे आहे व ते म्हणजे ब्राह्मणाच्या चरणकमलांची सेवा करणे. चिंता करू नका. तुमच्यावर न कधी विंध्यावासिनी माता रुष्ट होईल ना कोणी अन्य देवता ! केवळ ब्राह्मणाच्या चरणकमलाची

पूजा करीत राहिलात तर तो परमतत्त्व परमात्मा तुम्हाला विदित होईल. एक गोष्ट लक्षात ठेवा

**सापत ताडत परुष कहन्त विप्र पूज्य अस गावाहि सन्त ।।**

शाप देणारा, ताडन करणारा, अपशब्द बोलणारा, शील व गुण या दोन्ही गोष्टींनी कमी प्रतीचा असणारा ब्राह्मण पूजनीय असतो.

**पूजिय विप्र शील गुण हीना ।**
**शूद्र न गुन गन म्यान प्रवीनना ।। ३/३२/२**

असे श्री भगवान रामाचे मत होते. पण जेव्हा त्यांना समजले सीतेचे अपहरण करणारा रावण एक ब्राह्मण आहे तेव्हा त्याची अशी दुर्गती केली की 'रहा न कुल कोऊ रोवनिहारा' त्या रावणाच्या कुळामध्ये कोणी जलदाता किंवा आसू ढाळणारे शिल्लक ठेवले नाही. असे वाटते की या मर्यादेची रचना करणाऱ्या भगवंतानेच ही मर्यादा राखली नाही. राम त्यांना स्वत: मारते तर आपत्तिजन्य झालेच नसते कारण ''प्रभु समरथ कोसलपुर राजा । जो कछु करहि तिनहिं सब छाजा ।।'' परंतु रामाचे अनुयायी जे वानर आणि अस्वल यांनी रावणाच्या वंशाचे मूलोच्छेदन केले. यज्ञ करणाऱ्या रावणाला लातांनी मारले. त्याच्या स्त्रियांना केस पकडून बाहेर फरफटत आणले. राम कमीत कमी आपल्या अनुयायांना तर सांगू शकला असता ना की अरे बाबांनो असे करू नका ब्राह्मण पूजनीय आहेत.

रावण चार वेदांचा प्रकांड विद्वान होता. ज्योतिषविद्येचा मर्मज्ञ होता. ब्रह्माचा लेख वाचून त्याने आपल्या आयुष्याचे ज्ञान करून घेतले होते. नि:संदेश रावण गुणी होता. पण शीलाचा त्याच्याजवळ अभाव होता. गुणांप्रमाणे त्याचे आचरण नव्हते. राम तर शील व गुण या दोघांमध्ये हिन असणाऱ्या ब्राह्मणाला पूज्य मानत होते. ते स्वयं आपल्या नियमांचे पालन करीत नव्हते. वस्तु: गोस्वामी तुलसीदासांना काय सांगायचे आहे. ?

ब्राह्मणांमध्ये उत्तम कुळ असणाऱ्या महर्षी पुलस्तीचा पुत्र विश्रवाचा रावण हा मुलगा होता. त्याचा लहान भाऊ विभीषण रामाला शरण आला. त्याला शंका होती की, राम आपल्याला आश्रय देतील की नाही ? परंतु रामाने आपला सिद्धांत सांगताना म्हणाले

**सगुण उपासक परहित निरत नीति दृढ नेम ।**
**ते नर प्राण समान मम जिन्हके द्विज पद प्रेम ।।**

जो माझ्या सगुण रूपाचा उपासक आहे, दुसऱ्यांच्या हितासाठी जो तत्पर आहे, ज्याची ब्राह्मणाच्या चरणकमलाशी अपार निष्ठा व अतूट प्रेम आहे तो मनुष्य मला माझ्या प्राणांइतका प्रिय असतो.

**सुनु लंकेश सकल गुन तोरे । ताते तुम अतिशय प्रिय मोरे ।।**

विभीषणा तुझ्याजवळ सर्व गुण आहेत व म्हणून तू मला अत्यंत प्रिय आहेस. मानसाच्या मर्मज्ञांनी विचार करावा की विभीषणाचे ब्राह्मणाच्या चरणकमलाशी काय प्रेम होते ? विभीषण किंवा त्याच्या अनुयायांनी वानरांनी-अस्वलांनी कोणत्याही ब्राह्मणाची सेवा केली नाही. मग येथे कोणत्या ब्राह्मणाच्या सेवेबद्दल राम हे म्हणत आहेत ?

वास्तविक द्विज म्हणजे तो महापुरुष होय ज्याने द्वैतावर विजय मिळवला आहे. जो ब्रह्मपरायण आहे, आत्मसाक्षात्कारी आहे, जो क्रियाशील आहे त्याचाच ब्रह्मकुलात समावेश होत असतो. साधनेच्या पूर्तिकालात जो ब्रह्म परिपूरित असतो तोच विप्र होय, तो ब्राह्मण आहे, तो भुसुर आहे, महीसुरही तोच आहे. अशा महापुरुषांसाठी कसलाही विधि-निषेध राहात नाही. त्यांचा मापदंड हा बाह्य क्रियेवर किंवा बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतो परंतु आंतरिक प्राप्ती (उपलब्धी) हा त्यांचा मापदंड असतो. त्यांची वेशभूषा त्यांचे स्नान, ध्यान जनसामान्यांच्या पलीकडे असते. पूज्य महाराजजी म्हणत की महापुरुष केव्हा भजन करतात हे त्यांनी स्वत:हून सांगितल्याशिवाय रात्रदिवस सतत त्यांच्याजवळ राहणाऱ्या साधकाला सुद्धा समजत नाही. अशा महापुरुषांचे आचरण साधकांसाठी निर्धारित आचरणापेक्षा वेगळे असते. योगेश्वर श्रीकृष्ण गीतेमध्ये म्हणतात

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव: ।**
**आत्मन्येव च सन्तुष्टतस्य कार्यं न विद्यते ।। ३/१७**

जो पुरुष आत्म्यामध्ये संतुष्ट असतो त्याच्यातच ओतप्रत असतो व आत्म्यामध्ये स्थित असतो अशा महापुरुषांकडून जे कर्म केले जाते त्याने ना काही लाभ होतो किंवा

कर्म सोडून दिल्याने ना काही हानी होते. कारण त्यांना जे लक्ष्य प्राप्त करावयाचे होते ते त्यांनी प्राप्त केले आहे. त्यात ते ओतप्रत झाले आहेत, त्यामध्ये ते स्थित आहेत तर मग कर्मद्वारा आता तो कोणाचा शोध घेणार ? आता तर 'भजन हमार हरि करे, हम पायो विश्राम' असे महापुरुष जणू पेन्शनर बनतात. महाराजश्री म्हणत असत ''हो मला तर आता पेन्शन मिळाली आहे. तुम्ही आता तुमचे पाहा. काही केल्याशिवाय काही मिळणार नाही. तेव्हा आता निष्ठेने भजन करा''

**वारि मथे घृत होय बरु सिकता ते बरु तेल ।**
**बिन हरि भजन न भव तरिया यह सिद्धान्त अपेल ।।**

परंतु आमची नक्कल करू नका. एखाद्या प्रोफेसरला सांगितले की त्याने रात्री दोन वाजता उठून लाईट लावून वाचावे तर किती हास्यास्पद ठरेल ? महापुरुषांचे सगळे आगळेच असते. संत कबीरांनी त्यांच्या वागण्यावर प्रकाश टाकला आहे.

**अवधू बेगम देश है मेरा ।**
**तहाँ न ईश्वर जीव न माया, पूजक पूज्य न चेरा ।।**

अशा महापुरुषांना अवघे विश्व त्यांना त्याचे घर वाटते. ईश्वर व जीव असे द्वैत त्यांच्याजवळ राहिलेले नसते. पूजण्यास योग्य कोणी त्यांच्यासाठी राहात नाही. पूजणारापण कोणी नसतो. हाच ब्राह्मण असतो. महापुरुष. असा महापुरुष होता जडभरत. असे महापुरुष स्नानसुद्धा करीत नाहीत. अशा महापुरुषाच्या संदर्भात मानसकार म्हणतात

**सापत ताडत परुष कहन्त । विप्र पूज्य अस गावहि सन्त ।।**

शाप देणारा ताडन करणारा व कठोर वचन बोलणारा द्विजसुध्दा पूज्य असतो. महर्षी दुर्वासांचा क्रोध प्रसिद्धच आहे. पूज्य महाराजश्रीसुद्धा सांगत असत की-

''शिव्या देणे हे मला शोभा देत नाही. परंतु काय करू ? भगवंताने मला आदेश दिला आहे की शिवी दिलीस की कल्याण होईल. उद्या फासी होण्याऱ्यालासुद्धा जर माझ्या छडीचा स्पर्श झाला तर त्याला फाशी होणार नाही. बाकी त्याला शिक्षा कोणतीही होईल, पण फाशी होणार नाही व म्हणून ताडन करतो नाहीतर शिवी देणे मला शोभत नाही.''

ब्रह्मपरायण ब्रह्मपरिपूरित असे महापुरुष विप्र होत, परमपूज्य होत. असे संतानी सागितले आहे त्यांचे आचार विचार समाजापासून वेगळे आहेत. त्यांचे बाह्य आचरण पाहून कोणी त्यांची अवहेलनाही करतात व म्हणून भगवंताचा आदेश आहे पूजिय विप्र शील गुण हीना ।

गुणातीत असणाऱ्या त्या महापुरुषाचे काही आचरणही दिसून येत नाही. पण तत्त्व विदित असणाऱ्या त्या महापुरुषांची वेगळी अशी सत्ताच नाही तर ते कशासाठी आचरण करतील ? त्याच्याजवळ अध्ययनही नाही ते त्यांची वाणी हेच वेद आहेत. ज्याच्याजवळ शील नाही, गुण नाही आणि आचरणही नाही तो शूद्र नाही तर त्याला काय म्हणावे ? परंतु मानसकार म्हणतात नाही तो ''शून न गुन गन ज्ञान प्रवीना'' तो शूद्र नाही परंतु ज्ञानवंत आहे हृदयात ईश्वराचे ज्ञान होणे म्हणजे ज्ञान होय. त्या साक्षात परमात्म्याच्या आत्म्याशी जे ओतप्रोत झालेले आहेत व आत्मस्थित आहेत व म्हणून ते प्रवीण आहेत. ते भले शूद्र दिसले तरी ते परमपूज्य आहेत. म्हणजे द्विज एका विशेष स्थितीचे नाव आहे.

सामाजिक व्यवहारात जातिप्रथेची व्यवस्था कशीही असो, पण धर्मग्रंथात ब्राह्मणत्वाचे निर्धारण जन्मावर कधीही ठरविले गेले नाही. वास्तविक जो ब्रह्मपरायण आहे त्याचाच ऋषिकुळात समावेश होतो. भक्तीच्या पूर्तिकाळात जो ब्रह्मामध्ये परिपप्लृत आहे तोच संपूर्ण विप्र होय. तीच ब्राह्मणत्वाची अधिकतम सीमा होय.

वाल्मीकी रामायणातील एक प्रसंग आहे. एकदा विश्वामित्र ऋषींच्या तपस्येवर प्रसन्न होऊन ब्रह्मदेव आले व म्हणाले ''आपण आता ऋषी झालात'' विश्वमित्रांना ऋषी ही उपाधी आवडली नाही. ते पुन्हा तपश्चर्येत मग्न झाले. त्यानंतर अन्य देवतासह पुन्हा ब्रह्मदेव आले व म्हणाले -आजपासून आपण राजर्षी झालात. तरीही त्यांची तपश्चर्या संपली नाही. ते तपस्येत रतच राहिले. तेव्हा ब्रह्मदेवांनी त्यांना महर्षीची उपाधी दिली. तेव्हा विश्वामित्र म्हणाले आपण मला जितेन्द्रिय ब्रह्मर्षी नाही म्हणणार? यावर ब्रह्मदेवाने उत्तर दिले की - अजून तुमच्यात ती क्षमता आलेली नाही. तेव्हा विश्वामित्रांनी पुन्हा तपश्चर्येला सुरुवात केली. त्यांच्या तपश्चर्येचा धूर स्वर्गापर्यंत पोहोचला. ब्रह्मदेव पुन्हा देवतांसह आले आणि म्हणाले विश्वामित्रा आता हट्ट सोडून दे. आजपासून तुम्ही ब्रह्मर्षी झाला आहात. विश्वामित्र म्हणाले - ''जर मी ब्रह्मर्षी झालो आहे तर वसिष्ठांनी येऊन ते सिद्ध करावे आणि वेदांनी माझे वर्णन करावे''.

ब्रह्माजींनी तथास्तु म्हटले. वसिष्ठांनी त्याला समर्थन दिले आणि वेद विश्वामित्रांच्या हृदयात उतरले. वेद म्हणजे अध्ययन केल्याने आत्मसात केले जाणारे पुस्तक नव्हे. वास्तविक वेद म्हणजे ज्या परमात्म्याची आम्हाला ओढ आहे तो चिंतनकालात आम्हाला विदित होणे म्हणजे वेद. तर मग महापुरुष जाणत असतील की ईश्वर कसा चालतो ? तो कसा बोलतो ? कसा ऐकतो ? कसा राहतो ? कर बिन कर्म करै विधि नाना - पण कशा प्रकारे ? ज्याच्या हृदयात वेद उतरले आहेत तीच व्यक्ति या सर्व गोष्टी जाणते व ती व्यक्ति म्हणजेच विप्र आहे. या गोष्टीवरूनही स्पष्ट होते की ब्राह्मण जन्माने बनत नाही, परंतु तपस्येद्वारा मिळणारी ती उपाधी आहे. भागवत महाभारत, भागवत वाल्मीकी तसेच गोस्वामी तुसलदासांनीपण हाच निर्णय दिला आहे.

वनवासी आणि विरही रामाला नारदाने आपल्या मनात सलत असणारी एक शंका विचारली की भगवान तुम्ही मला लग्न का करू दिले नाही ? भगवान उतरले की ज्याप्रमाणे शिशूंचे रक्षण त्याची माता करीत असते तसेच मी आपल्या भक्ताचे सदैव रक्षण करीत असतो. नारदजींच्या मनात कुतूहल निर्माण झाले की माझ्यामध्ये ते लक्षण आहे की नाही ? व म्हणून त्यांनी विचारले की भगवन् ज्या संतांचे तुम्ही रक्षण करता त्यांची लक्षणे काय असतात ? प्रभू म्हणाले -

**सुनि मुनि सन्तन के गुन कहऊँ । जिन्हते मै उनके बस रहऊँ ।**
**षट विकार जित अनघ अकामा ।अचल अकिंचन सुचि सुख धामा ।**

संतांनी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा विकारांवर विजय प्राप्त केलेला असतो. ते पापरहित, कामनारहित पवित्र आणि सुखाचे धाम असतात. याच संदर्भात ते पुढे म्हणाले -

**विरति विवेक विनय विज्ञाना । बोध जथारथ वेद पुराना ।।**

ते विरक्त असतात, त्यांना कोणत्याच गोष्टीचा मोह नसतो. ते विवेकी असतात. आपल्या पथाचे त्यांना यथार्थ ज्ञान असते. ते निरंतर चिंतनपरायण असतात.

**जप तप व्रत संयम नेमा । गुरु गोविंद विप्र पद प्रेमा।। ३-४५-३**

जप-तप संयम नियम, गुरु गोविंद तसेच ब्रह्मणाच्या चरणकमलाची प्रीती इत्यादी संतांची लक्षणे होत. विचार करण्यासारखी एक गोष्ट आहे की जो विरक्त आहे ज्याने

घर सोडले आहे तो कोणत्या ब्राह्मणाचे चरण धरायला जाईल ? एखाद्या गृहसक्त व्यक्तीचे ? नाही. विश्वामित्रांप्रमाणे तपस्येच्या पूर्तिकार्यात ज्याने ब्राह्मणत्व प्राप्त केले आहे असा जगदगुरु म्हणजे विप्र होय. विश्वाला शिकवण्यासारखे, देण्यासारखे त्याच्याजवळ सर्व काही असते.

राज्याभिषेकानंतर भगवान राम एकदा अमराईत बसले होते. भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न, हनुमान इत्यादी त्यांच्या सेवेत होते. इतक्यात त्यांना चार ऋषी दिसले. त्याबरोबर श्रीराम उभे राहिले. पितांबर अंथरले त्याना त्यावर बसवले आणि जोपर्यंत ते तेथे होते तोपर्यंत सर्वजण असतानाही त्यांनी स्वत:च त्यांची सेवा केली. हे पाहून भरताला आश्चर्य वाटले की याच संत वेषाने माता सीतेचे अपहरण केले, याच वेषाने लक्ष्मणाच्या मृत्यूचा प्रयास झाला तरीही या साधूंच्या सेवेसाठी श्रीराम स्वत: का उभे आहेत ? भरताने हनुमानाकरवी श्रीरामाची अनुमती घेऊन प्रश्न केला की, संतांचा महिमा वेद पुराणात आहे. आपणही त्याची प्रशंसा केली आहे. तेव्हा त्या संताची लक्षणे काय आहेत ? भगवंत म्हणाले ''बंधू संतांची अनेक लक्षणे आहेत. ते विषयांपासून विरक्त, गुण व भक्तीचे ते भांडार असतात. ते मदरहित व अजातशत्रू असतात.

**सम अभूत रिपु विमद विरागी लोभामरण हरष भय त्यागी ।**
**शीतलता सरलता मयत्री । द्विज पद प्रीति धरम जनयत्री ।**

ते लोभ, क्रोध, हर्ष व भयरहित असतात. त्यांच्यात शीतलता असते, ते सरळ असतात. सर्वांच्या ठिकाणी मैत्री ते ठेवतात आणि द्विजचरणी त्यांची अतूट प्रीती असते. द्विज-पदप्रीती ही धर्माची जन्मदात्री असते. विचार करा की घरदार सोडून एकांताचे सेवन करणाऱ्या, परम विरक्त असणाऱ्या संतांनी कोणत्या द्विजाचे चरण हृदयाशी धरावे ?

वास्तविक द्विज एक स्थितीविशेष आहे. ही संताची अवस्था आहे. परमस्थित महापुरुषांची ही अवस्था आहे. म्हणून या संतांना भूसुर, महीसुर, महिदेव इत्यादी उपाधींनी संबोधले जाते. मानसच्या मंगलचरणामध्ये गोस्वामीनी सर्वप्रथम महीसुरांच्या चरणांना वंदन केले आहे.

**वन्दउँ प्रथम महीसुर चरना । मोह जनित संशय सब हरना ।।**

सर्वप्रथम मी मोहातून उत्पन्न झालेल्या संशयांचे अपहरण करणाऱ्या विप्राच्या चरणकमलांना वंदन करतो. हीच विप्राची परिभाषा आहे. परंतु जो स्वयं मोहाच्छादित आहे तो दुसऱ्यांचा मोह काय हरण करणार ? स्वत: दलदलीत रुतले जाणारे जीव दुसऱ्यांना कसे बाहेर काढणार ? जन्मावर ब्राह्मणत्वाचे निर्धारण करणारे समाजाचे तथाकथित ठेकेदार मोहजनित संशयाचे शमन करण्यास सक्षम आहेत का ? तुलसीमानसामध्ये ठिकठिकाणी महीसुराला (ब्राह्मणाला) संताचा पर्याय मानला आहे. अशा संतांचा (सद्‌गुरूचा) आश्रय किंवा सान्निध्य जेव्हा वाल्मीकींना प्राप्त झाले तेव्हा वाल्मीकी, नारद, घट्योनी अगस्ती, भरद्वाज इत्यादींना त्रिकालज्ञ ब्रह्मर्षीपद प्राप्त झाले. ते शरीराने म्हणजेच जन्माने फार कुळवंत नव्हते, पण त्यांनी ब्राह्मणत्व प्राप्त करून ब्राह्मर्षीपद मिळवले होते

वास्तविक ब्राह्मण, सद्‌गुरु अथवा ब्रह्मर्षी हे पर्यायवाची शब्द आहेत. क्रियात्मक पथावर चालून ब्रह्माची अनुभूती करणारे ब्राह्मण आहेत. ती क्रिया म्हणजे केवळ परमात्म्यावर निष्ठा. आणि परमात्म्याच्या शोधाचे स्थळ आहे केवळ आपले हृदय. आणि केवळ श्वासद्वारा परमात्म्याच्या दोन अडीच अक्षरांचे नाव राम किंवा ॐ चा जप करणे तसेच त्या नावाच्या अर्थाला अनुरूप स्थिती असणाऱ्या महापुरुषाचे (सद्‌गुरूचे) चिंतन करून किंवा त्यांची सेवा करून ईश्वराचा शोध हृदयात घेता येतो. या कर्मपथावर चालून आत्मस्वरूपात स्थित असणारे महापुरुष वर्णव्यवस्थेच्या वर जातात अशा महापुरुषांना विप्रच्या व्यतिरिक्त काय म्हणणार ? व म्हणून अशा स्वरूपस्थ महापुरुषांची उपाधी ब्राह्मण ही आहे.

## गीतेमध्ये ब्राह्मणाचे स्वरूप

चार वेद, सहा शास्त्रे, भागवत, महाभारत इत्यादी लिपिबद्ध केल्यानंतर भगवान व्यासाने विचार केला की यातील मूळ शास्त्र कोणते ? त्यांनी विचार करून आपले ठरवलेले मत सांगितले की गीता हा ग्रंथ उत्तम प्रकारे हृदयात धारण करण्यास योग्य आहे कारण हा ग्रंथ पद्मनाभ भगवंताच्या श्रीमुखातून नि:सृत झालेली परमात्म्याची वाणी आहे. मग अन्य शास्त्रांचा संग्रह करण्याची आवश्यकता काय आहे ? गीतेत सांगितले आहे -

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।**

**एतदबुद्‌ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत ।।**

गोपनीयतेमध्ये अत्यंत गोपनीय असे ज्ञान मी तुला सांगितले आहे. ते जाणल्यानंतर तू ज्ञानवान तसेच कृतार्थ होशील. म्हणजे आमचे मूळ शास्त्र गीता आहे. शेष शास्त्रे म्हणजे भगवद्गीतेची अनुकृती आहेत. गीतेमध्येही तीन चार ठिकाणी ब्राह्मणत्वावर प्रकाश टाकला आहे.

गीतेच्या मते ब्राह्मण एक स्थिती आहे. भगवत पथाचे चार स्तर आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तसेच शूद्र. त्यामुळे साधकाचेही चार स्तर पडतात. ज्यांनी चिंतनपथामध्ये प्रवेश केला नाही ते शूद्रदेखील नाहीत. योगेश्वरानी कर्माला चार भागांत वाटले जे साधकाचे वर्ण ठरवत असतात. ते कर्म म्हणजे परमात्म्याच्या दर्शनाची साधनपद्धती आहे. याच चिंतन पथावरील सर्वोत्कृष्ट स्तर ब्राह्मण आहे.

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।। १८/४१**

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांचे कर्म स्वभावातून उत्पन्न झालेल्या गुणांच्याद्वारे विभक्त केले आहे. स्वभाव परिवर्तनशील आहे. आज उच्छृंखल स्वभाव असणारा उद्या सौम्य स्वभावाचा होऊ शकतो. वाल्मीकी तसेच अंगुलिमालासारख्या व्यक्ती तपस्येने जीवनमुक्त महापुरुषांत बदलल्या गेल्या. असो. तात्पर्य हे की, गीतेच्या प्रमाणे कर्म एकच आहे - विहित कर्म, नियत कर्म जे आत्मदर्शन व योगसाधनेचा निर्धारित विधी आहे. या कर्मपथाच्या सुरुवातीला प्रत्येक प्राणी शूद्र असतो. ''परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्'' त्याने सेवा करावी. दीर्घकाळपर्यंत सेवा केल्याने त्याचे परिणामस्वरूप साधन सूक्ष्म होऊ लागते. ''कृषि गौरक्ष्य वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम'' हे वैश्यांचे स्वभावजन्य कर्म आहे. आत्मिक संपत्ती हीच स्थिर संपत्ती असते. या संपत्तीचा संग्रह, गोरक्षा अर्थात इंद्रिय संयमाबरोबर होऊ लागतो. क्रमशः ''शौर्य तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्'' शौर्य तेज, पराक्रम, धैर्य, चिंतनात दक्षता, आसुरी वृत्तीपासून युद्धामध्ये मागे हटण्याचा स्वभाव, समर्पण, ईश्वर भाव, सर्व जीवसृष्टीवर स्वामित्वाची भावना इत्यादी ''क्षात्रकर्म स्वभावजम्'' हे क्षत्रिय श्रेणीचे स्वभावजन्य कर्म आहे. जेथे साधना अधिक सूक्ष्म होते तेव्हा तो कर्ता ब्राह्मण श्रेणीचा होतो.

**शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। १८/४२**

शम, दम, यम, नियम, तप, शुद्धता, ईश्वराचे ज्ञान अर्थात विज्ञान, त्यावर चांगल्या प्रकारे चालण्याची क्षमता - हे ब्राह्मणांच्या स्वभावातून उत्पन्न झालेले कर्म आहे. जेव्हा ही दक्षता स्वभावात भिनली जाते तेव्हा तो ब्राह्मण होय. ब्रह्मामध्ये प्रवेश देणारे हे नऊ गुण ज्याच्या स्वभावात कार्यरत आहेत तो ब्राह्मण श्रेणीचा कर्ता आहे. ब्रह्मामध्ये प्रवेश केल्यानंतर तो कोणत्याही श्रेणीच्या कर्माचा कर्ता राहात नाही. जे प्राप्त करावयाचे होते ते प्राप्त केल्यानंतर त्यापुढे कसलीही सत्ता नसल्याने तो कोणाला शोधणार ? आदि शंकराचार्य याच स्तरावर पोहचल्यानंतर म्हणतात - न ब्राह्मण न क्षत्रिय न वैश्यो न शूद्रश्चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहम - आता मी शूद्रही नाही, वैश्यही नाही, क्षत्रियही नाही व ब्राह्मणही नाही माझे चित्त परम आनंद स्वरूपमय आहे. मी कैवल्यधाम, कल्याणस्वरूप शिव आहे. ही अवस्था सर्वांना मिळायला हवी.

अर्जुन क्षत्रिय श्रेणीचा होता. योगेश्वर श्रीकृष्णाने त्याला ब्राह्मणत्व अर्जित करण्याची प्रेरणा दिली.

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्व्दन्द्रो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान । २/१५**

अर्जुना, वेद तीन गुणांपर्यंतच प्रकाश दाखवू शकतात. त्याच्या पुढची अवस्था वेद जाणत नाहीत. म्हणून तू या त्रैगुणाच्या पलीकडे जा. पुढे जाण्याचा विधी सांगताना ते म्हणतात की, 'निर्व्दन्द्व:' सुखदु:खाच्या द्वंद्वरहित, नित्य सत्य वस्तूमध्ये आत्मपरायण हो. आम्हीच जायचे की यापूर्वी कोणी गेले आहे ? आणि पुढे जायचे तर पोहचायचे कोठे ? यावर ते म्हणतात वेद आणि गुणांच्या जो पुढे जातो तो ब्राह्मण आहे.

**यावानर्थ उदपाने सर्वत: संप्लुतोदके ।**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानत: ।। २/४६**

सर्व बाजूंनी परिपूर्ण जलाशय प्राप्त झाल्यानंतर मनुष्याला लहान जलाशयाशी जेवढे प्रयोजन उरते बरोबर त्याच प्रकारे ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणाचे वेदाशी तेवढेच प्रयोजन उरते. अर्थात जो वेदापेक्षा वर जातो तो ब्रह्माला जाणत असतो व तोच ब्राह्मण असतो. श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना तू ब्रह्माला जाण, तू ब्राह्मण बन. तेव्हा ब्राह्मणत्व म्हणजे ईश्वराचे संपूर्ण ज्ञानासह प्राप्त होणारी एक स्थिती आहे. क्षत्रिय श्रेणीचा अर्जुन

त्याचा अधिकारी आहे. वास्तवात अनुरागच अर्जुन आहे. ज्या घरात अनुराग असेल त्यालाच ईश्वर प्राप्त होईल. या प्रकारे खरे पाहता सर्वजण या पथाचे अधिकारी आहेत. योगेश्वर श्रीकृष्ण अत्यंत दुराचारी मनुष्याला कल्याणाचा उपदेश देतात. गीता ९/३०

या यौगिक आत्मदर्शन, ब्रह्मदर्शनाच्या क्रियेला योगेश्वर कर्म म्हणतात. कर्म म्हणजे काय, अकर्म म्हणजे काय, विकर्म म्हणजेही काय हेही चांगल्या प्रकारे जाणून घेतले पाहिजे. या संदर्भात त्यांनी अनुष्ठानाची पद्धत सांगितली -

**यस्य सर्वे समारम्भाः काम संकल्प वर्जिता ।**
**ज्ञानाग्नि दग्ध कर्माणं तमाहुः पण्डितं बुधा ।।**

अर्जुना ''यस्य सर्वे समारम्भाः'' ज्या पुरुषाकडून संपूर्णतेची आरंभिलेली क्रिया विकसित होत होत इतकी सूक्ष्म झाली की ती कामना आणि मनाच्या संकल्पविकल्पाच्या वर निघून गेली (संकल्पाचा चढउतार मनावर अवलंबून असतो. जेव्हा मनच समाप्त (विलीन) होते.) तेथे ''ज्ञानाग्नि दग्ध कर्माण''- ज्याला आजपर्यंत जाणले नव्हते; पण ज्याला जाणण्याची इच्छा होती त्याची ओळख होते. ही प्रत्यक्ष ओळख, प्रत्यक्ष जाणणे म्हणजे ज्ञान आहे. त्या ज्ञानाच्या अग्नीमध्ये कर्म नेहमीसाठी जळून जाते. अशा स्थितीच्या बोधस्वरूप महापुरुषांना पंडित म्हणून संबोधले जाते. तो पूर्ण ज्ञाता असतो व म्हणून पंडित आहे. त्या पंडिताची राहणी कशी असते. ?

**विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाके व पण्डितः समदर्शिनः ५/१८**

ज्ञानद्वारा ज्याचे पाप शमन झाले आहे असे ज्ञानीजन विद्या-विनययुक्त ब्राह्मण तसेच चांडाळांत, गाय हत्ती व कुत्रे या सारख्या प्राणिसृष्टीत समान दृष्टी ठेवतात. विद्याविनययुक्त ब्राह्मणाजवळ ना काही विशेष असते ना चांडाळाकडे काही तुच्छत्व. त्यांच्या दृष्टीने ना गाय हा धर्म असतो ना कुत्रा हा अधर्म असतो. त्यांची दृष्टी शरीरावर नसते तर हृदयस्थ आत्म्यावर असते. फरक एवढाच असतो की कोणी परमात्म्याच्या अधिक निकट असतो तर कोणी अधिक दूर; परंतु सर्वजण त्या पदाचे प्रत्याशी (अभिलाषी) असतात. ज्या विप्रांच्या चरणांची पूजा भगवान श्रीरामाने सांगितली त्या सर्वज्ञ विप्राचे हेच स्वरूप असते.

**भगवान महावीर**

भक्तिमार्गात प्रवेशाबरोबरच जीवाचा क्रमोन्नत विकास म्हणजेच वर्ण होय. प्राप्तिकालात जी आकृती समोर प्रकट होते तिचे चित्रण प्रत्येक महापुरुषाच्या वाणीमध्ये मिळते. व म्हणूनच अडीच हजार वर्षांपूर्वी महावीराने त्याच सत्याला संबोधित केले जे पूर्वतिपूर्व वैदिक ऋषींपासून वाल्मीकी, व्यास इत्यादी महापुरुषांनी सांगितले होते. गीतेचा जो उद्घोष आहे, भागवताचा जो निर्णय आहे बरोबर तशीच अनुभूती भगवान महावीरांना तपस्येद्वारा प्राप्त झाली. ब्राह्मणाच्या स्वरूपाच्या संबंधी त्यांचे विचार अक्षरश: तेच आहेत. जे त्यांचे पूर्वपुरुष भगवान ऋषभदेवांचे व भगवान श्रीकृष्णांचे होते. उत्तराध्ययनाच्या यज्ञीय सूत्रात आपला प्रिय शिष्य गौतम याच्या अनेक शंकांचे समाधान करताना ते म्हणाले -

१) जो प्रिय स्वजनादि लोक आल्याने आसक्त होत नाही आणि गेले तर जो शोक करत नाही, जो आर्य वचन अर्हत वाणीमध्ये रममाण असतो त्याला ब्राह्मण म्हणतात.

२) जो राग, द्वेष आणि भयापासून मुक्त आहे त्याला ब्राह्मण म्हणतात.

३) जो देव, मनुष्य आणि तिर्यकांबाबत मैथुनाचे मन वचन आणि शरीराने सेवन करीत नाही त्या ब्राह्मण म्हणतात.

४) ज्या प्रकारे पाण्यातून उत्पन्न झालेले कमळ पाण्याने लिप्त (ओले) होत नाही, त्या प्रकारे जो कामयोगांपासून अलिप्त राहतो त्याला ब्राह्मण म्हणतात.

५) जो रसदिंमध्ये आसक्त नाही, जो निर्दोष भिक्षेने जीवन निर्वाह करतो, ज्याने घराचा त्याग केलेला आहे, जो अकिंचन आहे, गृहस्थामध्ये अनासक्त आहे त्याला ब्राह्मण म्हणतात.

६) जो स्वजातीची आसक्ती व बांधवांना सोडून पुन्हा त्यांच्यात आसक्त होत नाही त्याला ब्राह्मण म्हणतात.

७) मनुष्य कर्माने ब्राह्मण होतो, कर्माने क्षत्रिय होतो, कर्माने वैश्य होतो किंवा कर्माने तो शूद्र होतो.

८) अर्हतांनी ज्या तत्त्वांचे निरूपण केले आहे त्या प्रमाणे जो साधक पूर्ण होतो, कर्मांनी मुक्त होतो त्याला आम्ही ब्राह्मण म्हणतो.

९) जो आपला आणि दुसऱ्यांचा उद्धार करण्यास समर्थ आहे त्याला आम्ही ब्राह्मण म्हणतो.

१०) सच्चरित्र्यानेच खरे ब्राह्मण होता येते. जातीमुळे कोणताही मनुष्य ब्राह्मण होत नाही, किंवा क्षत्रिय होत नाही, वैश्य होत नाही किंवा शूद्रही होत नाही.

या प्रकारे भगवान महावीरांची वाणी म्हणजे पूर्वीच्या महापुरुषांच्या पदचिन्हांचे अनुसरण आहे किंवा गीतेचा अनुवाद मात्र आहे. राजकुमार व अत्यंत विद्वान असूनही त्यांनी जनतेसाठी अर्धमागधी भाषेचा प्रयोग केला. फरक फक्त भाषेचा आहे. भाव तोच आहे.

### भगवान बुध्द

महावीर स्वामींचे समकालीन असणाऱ्या गौतम बुध्दांच्या महिम्याचा इतका प्रसार झाला की अर्धे विश्व त्यांचे अनुयायी झाले. ते राजकुमार होते, विद्वान होते तरीही उपदेशासाठी प्रादेशिक भाषा पालीचा त्यांनी उपयोग केला. त्या महापुरुषाने तोच निर्णय दिला जो भागवतामध्ये आहे, जो गीतेत आहे, उपनिषदांत आहे, परंपरागत महापुरुषांच्या उपदेशात आहे. अश्वघोषाच्या बुध्दचरित्रामध्ये त्यांची उक्ती आहे की चाळीस दिवसांच्या उपवासानंतर रात्रीच्या चौथ्या प्रहरी मला ते अविनाशी तत्त्व प्राप्त झाले, जे माझ्या पूर्वीच्या ऋषींना प्राप्त झाले होते. मला सर्वज्ञता प्राप्त झाली. गीतेमध्ये बरोबर हेच आहे की आत्मा अविनाशी आहे, तोच सर्वज्ञ आहे. आम्ही ते सर्वज्ञपद प्राप्त केले की जे माझ्या पूर्वीच्या ऋषींनी प्राप्त केले. गौतम बुध्दांच्यापूर्वी काय बुध्दधर्म होता? मग त्यांच्या पूर्वी कोणते ऋषी होते? तेच आपणासर्वांचे राम, कृष्ण, तेच वैदिक ऋषी. त्यांच्यापेक्षा वेगळे गौतम बुध्दाजवळ काही नव्हते. ईश्वर एक, त्याला प्राप्त करण्याचा विधी एक, अनुभूती एक, मग दुसरा कोणी सांगणार तरी काय? आंतरिक योग्यतेनुसार वर्णव्यवस्था ठरविण्याऐवजी ती जन्माने ठरवण्याच्या पध्दतीवर (प्रवृत्तीवर) बुध्दांनी तीव्र टीका केली आहे.

मज्झिम निकायच्या वासेट्ठ (२.५.८) मध्ये एक कथा आहे- एकदा वशिष्ठ व भारद्वाज नावाच्या दोन शिष्यांमध्ये चर्चा सुरू होती की ब्राह्मण कसा होतो? एक म्हणे

तो जन्माने ठरतो, तर दुसरा म्हणे कर्माने ब्राह्मणत्व प्राप्त होते. जेव्हा दोघेही परस्परांना समजावू शकले नाही तेव्हा भगवान बुध्दांकडे ते निर्णय करण्यासाठी गेले. भगवान म्हणाले की, ज्या प्रकारे कीटक, पतंग, लहानमोठे चतुष्पाद प्राणी, सरपटणारे प्राणी, जलचर, आकाशचारी जीवांच्या पृथक् पृथक् जाती असतात त्या प्रकारचा भेद मनुष्यामध्ये असत नाही. ना केसात, ना डोक्यात, ना कानात, ना डोळ्यांत, ना तोंडात, ना नाकात, ना पाठीत, ना पोटात, ना गुप्तांगात ना मैथुन इत्यादीमध्ये जातीचे काहीही पृथक लक्षण सापडत नाही, वशिष्ठा, जो गोरक्षा करून स्वत:चा उदरनिर्वाह करतो त्याला ऋषी म्हणावे. ब्राह्मण नाही. मनुष्यांमध्ये जो पौराहित्य करतो त्याला याचक म्हणावे ब्राह्मण नाही. जन्माने ब्राह्मण मातेच्या योनीमधून उत्पन्न झालेल्याला मी ब्राह्मण म्हणणार नाही. मी ब्राह्मण त्याला म्हणतो जो अपरिग्रही आहे कमळाच्या पानावरील जलाप्रमाणे व आऱ्याच्या टोकावरील मोहरी प्रमाणे जो भोगापासून अलिप्त असतो त्याला मी ब्राह्मण म्हणतो. तप, ब्रह्मचर्य, संयम आणि दम यांनी ब्राह्मणत्व प्राप्त होते.

## गुरु नानक

याच प्रकारे गुरु नानकदेखील त्यांच्या काळातील सर्वश्रेष्ठ महापुरुष होते. स्थिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी मक्का मदीन्यापर्यंतची यात्रा केली. भाई मरदाना इत्यादी अनेक मुसलमानपण त्यांचे शिष्य होते. त्यांचे सांगणे आहे- ''एक नूर ते सब उपज्या है, कौन भला को मन्दा'' म्हणजे ते मानवमात्रात भेदभाव मानीत नाहीत. त्यांचा असा विचार होता की ''वन्दे एक खुदाय के हिंदू मुसलमान। झगडा राम रहीम करी लडदे बेईमान'' सर्वव्यापी परमात्मा रामाचे ते अनन्य भक्त होते. ते म्हणतात ''राम नाम डर मे गयो, ताके सम नही कोय। जा सुमिरत संकट टै, दरस तिहारो होय॥ ज्याच्या हृदयात रामनाम उतरले आहे, त्याच्या सारखे कोणी नाही. या राम नामाच्या स्मरणाने प्रभूचे दर्शन घडत असते. त्यांनी तोच उपदेश केला जो पूर्वीच्या सर्व ऋषींनी केला होता, जी सद्गुरुंची शिकवण आहे; उपदेश आहे. तरीही लोक मात्र चुकीचा समज करून घेतात की शीख हा वेगळा धर्म आहे. ब्राह्मणाच्या बाबतीत गुरू नानकांनी म्हटले आहे ''योग शब्द गियान शब्द ते ब्राह्मण'' ज्ञान शब्द, योगशब्द यांचे जो मर्म जाणतो तो ब्राह्मण आहे. जो योगाचा विधी जाणतो तो ब्राह्मण आहे. ईश्वराला जाणून घेऊन चालणारा ब्राह्मण आहे. ब्राह्मण म्हणजे योगपथाची अवस्था आहे. गीतेमध्ये बरोबर हीच गोष्ट सांगितली आहे. उदा. ''शम दम: तप: शौच: इत्यादी''.

भजनद्वारा प्राप्त झालेल्या योग्यतेच्या अनुकरणात जन्मद्वारा निर्धारित सामाजिक जातीपातीला धर्म समजण्याचे अज्ञान श्रीकृष्णाच्या काळीही काही अंशाने दिसून येते. युध्दाच्या रणांगणात आपल्या आप्तांना पाहून अर्जुन थरथर कापू लागला. युध्दापासून परावृत्त होण्यासाठी तो धर्माचा आधार सांगू लागला की ''कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्मः सनातनाः । (१/४०) भगवन, कुलधर्म हा सनातन धर्म आहे. तो शाश्वत धर्म आहे. अर्जुनाने कुलक्षय, पिण्डोदक क्रियेचा लोप, वर्णसंकर इत्यादी चारपाच शंका बोलून दाखवल्या त्यात त्याने जातीचेपण नाव घेतले की जात म्हणजे धर्म होय. यावर भगवान श्रीकृष्ण हसत हसत त्याला म्हणाले की, ''कुतस्त्वा कश्मलमिंद विषमे समुपस्थितम्'' अर्जुना, या विषयाबाबतचे हे अज्ञान तुझ्यात कोठून निर्माण झाले? म्हणजे अर्जुनाने जे जे काही सांगितले होते त्याला त्यांनी अज्ञान म्हटले. अर्थात जाती म्हणजे धर्म नाही तर पूर्ण अज्ञान आहे. त्यानंतर भगवंतानी धर्माची विस्ताराने व्याख्या सांगितली. या व्याख्येसाठी तुम्ही 'यथार्थ गीता' हे पुस्तक अवश्य पाहावे.

थोडक्यात गीतेमध्ये (२/१८-२९) योगेश्वर श्रीकृष्णाच्या मते असत् वस्तूचे काही अस्तित्वच नसते आणि सत्‌चा कधी अभाव नसतो. परमात्माच सत्य आहे, शाश्वत आहे. अजर, अमर, अपरिवर्तनीय आणि सनातन आहे; परंतु तो परमात्मा अचिन्त्य आणि अगोचर आहे, मनाच्या लहरींच्या पलीकडे आहे. चित्ताचा निरोध करून त्या परमात्म्याला प्राप्त करण्याच्या विशेष विधीचे नाव यज्ञ आहे. यज्ञ हा योगसाधनेचा एक विधी आहे. त्या विधीचे तंतोतंत पालन करणे व त्याला कार्यरूप देणे हेच कर्म आहे, हेच साधकाचे दायित्व आहे. त्याचे उत्तम प्रकारे आचरण करणे हाच आपला धर्म होय. या कर्माच्या विशेषतेवर प्रकाश टाकताना योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात-

**नेहाभिक्रम नाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात ॥२/४०**

अर्जुना, या कर्मयोगात आरंभाचा नाश होत नाही. या कर्मरूपी धर्माच्या साधनेमुळे मनुष्याचा जन्ममृत्यूच्या महान भयापासून उध्दार होतो. अर्थात, या कर्माला कार्यरूप देणे हाच धर्म होय.

या नियत कर्माला (साधन पथ) साधकाच्या स्वभावातील उपलब्ध क्षमतेच्या प्रमाणे चार भागात विभागणी केली आहे. कर्माला समजून घेऊन मनुष्य जेव्हापासून

आरंभ करतो त्या आरंभिक अवस्थेमध्ये तो शूद्र आहे. क्रमशः विधीवर पकड आली तोच वैश्य बनतो. आणि सृष्टीतील संघर्ष झेलण्याची क्षमता आणि शौर्य अंगी बाणल्यावर तीच व्यक्ती क्षत्रिय बनते. आणि ब्रह्माशी तद्रूप होण्याची क्षमता, ज्ञान (वास्तविक ज्ञान), विज्ञान-ईश्वरीय वाणी ऐकू येणे, त्याच्या अस्तित्वावर गाढ विश्वास ठेवण्याची क्षमता अशी योग्यता अंगी आल्यावरच तो ब्राह्मण बनतो. व म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण (गीता, अध्याय १८/४६, ४७) म्हणतात की स्वभावात प्राप्त झालेल्या क्षमतेनुसार कर्माला लागणे हाच स्वधर्म आहे. जन्माने हल्का असला तरी स्वभावत उपलब्ध स्वधर्म श्रेयस्कर आहे व क्षमता प्राप्त केल्याशिवाय दुसऱ्यांचे उच्च प्रकारचे कर्म करणे, त्या कर्माचे परिपालन करण्याचा प्रयत्न करणे हानिकारक आहे. स्वधर्मात मरणे पण श्रेयस्कर आहे कारण वस्त्र बदलल्याने बदलणारा तर बदलला जात नाही. त्यामुळे त्याच्या साधनेचा क्रम जेथे तुटला होता तेथून पुन्हा सुरू होईल. सोपानशः चालून तो परमसिध्दी देणाऱ्या अविनाशीपदाची प्राप्ती करून घेईल.

यावर भर देताना ते पुढे म्हणतात की, ज्या परमात्म्याने सर्व प्राण्यांना निर्माण केले, जो सर्वत्र व्याप्त आहे, स्वभावातून उत्पन्न झालेल्या क्षमतेप्रमाणे चांगल्या प्रकारे म्हणजे अतीव निष्ठेने त्याची पूजा (भक्ती) करून मनुष्य त्या परमसिध्दीला प्राप्त होतो. म्हणजेच निश्चित अशा विधीने परमात्म्याचे चिंतन करणे हाच धर्म होय (१८/४६)

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥९/३०**

अर्जुना, अत्यंत दुराचारी मनुष्यपण मला अनन्य भावाने भजेल (अनन्य म्हणजे अन्य न), माझ्याशिवाय अन्य कोणाचीही भक्ती न करता केवळ जो माझीच भक्ती करतो- जो मलाच भजतो तो 'क्षिप्रं भवति धर्मात्मा' तो त्वरित धर्मात्मा बनतो. त्याचा आत्मा धर्माशी संयुक्त होऊन जातो. म्हणजे श्रीकृष्णांच्या मते जो परमात्म्याची अनन्य निष्ठेने भक्ती करतो, त्याच्यात ओतप्रत होऊन जातो तोच धर्मात्मा होय. धर्मात्मा तो आहे की जो परमात्म्याच्या प्राप्तीसाठी नियत कर्माचे आचरण करतो, धर्मात्मा तो आहे की जो स्वभावातील नियत क्षमतेनुसार परमात्म्याच्या शोधात निमग्न आहे.

**शेवटी ते निर्णय देतात की,**

''सर्वधर्मान्परित्यज्ज मामेकं शरणं व्रज'' अर्जुना, सर्व धर्माची चिंता सोडून तू मला शरण ये. म्हणजे परमात्म्याच्या ठिकाणी समर्पित झालेली व्यक्तीच धार्मिक आहे. एका परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करणे हाच धर्म आहे. त्या परमात्म्याच्या प्राप्तीची निश्चित क्रिया करणे म्हणजे धर्म होय. ही स्थिती प्राप्त झालेला महापुरुष, आत्मतृप्त महापुरुष यांचा सिध्दांतच सृष्टीचा एकमात्र धर्म आहे. त्या महापुरुषांना शरण जाऊन त्यांनी त्या परमात्म्याला कशा प्रकारे प्राप्त करून घेतले हे जाणून घेतले पाहिजे. कोणत्या मार्गाने ते गेले हे समजून घेतले पाहिजे. तो परमात्म प्राप्तीचा मार्ग एकच आहे. त्या मार्गाने चालणे म्हणजे धर्म आहे.

धर्म ही मनुष्याच्या आचरणाची वस्तू आहे. ते आचरण केवळ एकच आहे ''व्यवसायात्मिका बुध्दिरेकह कुरुनन्दन'' (२/४१) या कर्मयोगात निश्चयात्मक क्रिया एकच आहे- इंद्रियांची हालचाल आणि मनाचे व्यापार संयमित करून आत्म्यामध्ये (परात्पर ब्रह्ममध्ये) त्यांना प्रवाहित करणे (४/२७)

गीतेच्या मते धर्माच्या खऱ्या व्याख्येला जर मान्यता मिळाली तर त्यामुळे विभिन्न जातीही फळतील फुलतील, विकास पावतील. पूर्वजांनी जो काही गौरव प्राप्त केला जे पदक प्राप्त केले, तो सम्मान म्हणजेच तर जाती आहेत. पूर्वजांनी जो सम्मान प्राप्त केला आहे त्याचा त्याग करण्याची आवश्यकता नाही, त्या वंशाच्या मर्यादेचे रक्षणपण केले पाहिजे. परंतु याला शाश्वत सनातन म्हणू नये. जे भगवंताने सांगितले आहे, पूर्व महापुरुषांनी जे प्राप्त केले आहे त्याला शाश्वत सनातन म्हणा. त्या शाश्वताला समजण्यासाठी एखाद्या तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा.

**॥ बोला सद्‌गुरुदेव भगवानकी जय ॥**

# आर्य

जो सन्मार्गावर दृढतापूर्वक आरूढ आहे, तो आर्य होय.

- गीता

---

भाग१: ''जीवनादर्श एवं आत्मानुभूति'' पाहा

भाग२: प्रस्तुत लेख

---

# आर्य

अत्यंत प्राचीन वैदिक युगापासून भारतवर्षाला आर्यावर्त असे म्हणतात. याचा अर्थ आहे आर्यांचे निवास स्थान. ईश्वराच्या ठिकाणी नितांत निष्ठा व त्याच्या प्राप्तीसाठी विहित कर्माचे आचरण करणाऱ्याला आर्य म्हटले जात असे व जे भारतामध्ये बहुसंख्येने होते. धार्मिक अनुष्ठानांचा संकल्प सोडताना ''जम्बूद्वीपे भरतखण्डे आर्यावर्तिक क्षेत्रान्तर्गत'' असे म्हणून या व्रताच्या स्मरणाची परंपरा होती. परंतु भारतात आलेल्या यूरोपीय जातींनी 'फूट पाडा व राज्य करा' या योजनेच्या अंतर्गत हा भ्रम पसरविण्याचा प्रयास केला की गोऱ्या रंगाची एक प्रजाती 'आर्य' त्या विदेशीलोकां प्रमाणे भारतात आली, जिने येथील मूळ निवासी काळ्या द्रविडांना दक्षिण भारताकडे ढकलून दिले. याच विचारधारेला अनुसरून काही जण तर असेही म्हणू लागले की ब्राह्मण, क्षत्रिय, कायस्थ (सवर्ण जाती) हे आर्य असून ते बाहेरून आले आहेत व म्हणून त्यांनी हा देश सोडून जायला पाहिजे. येथील मूळ निवासी म्हणजे चांभार इत्यादी दलित तसेच मागासलेल्या जाती आहेत. अशा दूषित वातावरणात विचार करण्यासारखा मुद्दा म्हणजे आर्य कोण आहेत ? आर्यत्वाचे निर्धारण कसे होते ?

साम्प्रत समग्र भारतात हा प्रश्न अजूनही अनिश्चित आहे की भारतात आर्य कोठून आले ? वास्तविकता तर ही आहे की, आर्यत्व ना कोठून येते ना कोठे जाते. आपल्यामधूनच एखादा आर्य बनतो. विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे इंग्रज भारतात आले व त्यांनीच या प्रश्नाचा उहापोह, विचार अधिक केला. या पूर्वी म्हणजे मोगल, तुर्क अथवा राजपूत युगात या प्रश्नाची कल्पनासुद्धा नव्हती. तत्सामायिक कोणत्याही इतिहासकाराने आर्य बाहेरून भारतात आले का या प्रश्नाचे चर्वितचर्वण केले नाही.

लॉर्ड मेकॉले याचे एक वचन प्रसिद्ध आहे की एखाद्या देशाला किंवा जातीला नेहमीसाठी गुलाम बनवायचे असेल तर त्याची भाषा, त्याचा इतिहास व त्याची संस्कृती नष्ट केली पाहिजे. याचीच परिणती म्हणजे आर्य कोठून आले हा प्रश्न निर्माण केला गेला. या कुत्सित प्रश्नाची सुरुवात इटालियन व्यापारी फिलिप्पो याने केली. १५८३ ते १५८८ पर्यंतच्या भारतातील आपल्या या पाच वर्षांच्या वास्तव्यात त्याने सर्वप्रथम असे घोषित केले की भारतातील प्राचीन संस्कृत भाषा ही युरोपातील काही प्रमुख

भाषांशी निश्चितपणे संबंधित आहे. आणि याचे कारण म्हणजे त्यांचे उद्‌गम स्थान एकच आहे. कारण आर्यांचे पूर्वज युरोपातूनच येथे आलेले होते. म्हणजे दोघांचा वेश एकच आहे.

या विचाराला संगठितपणे गती दिली विल्यम जॉन्स याने. त्याने १७८४ मध्ये बंगाल येथील एशियाटिक सोसायटीची स्थापना केली तेव्हा असे सांगितले की विद्वान ज्यांना इण्डो युरोपियन किंवा इण्डो जर्मन भाषा परिवार म्हणतात त्या भाषांचे जग म्हणजे ग्रीक, लॅटिन, ग्रोथिक, संस्कृत तसेच फारसीचे मूलस्थान एकच आहे. या वक्तव्याने विद्वानांना एक नवीन दिशा मिळाली. परिणामत: प्रजातीयता ठरविण्यासाठी भाषा एक महत्वपूर्ण साधन बनली. प्रसिद्ध जर्मन विद्वान मॅक्समूल्लर ज्यांना इ. स. १८५० मध्ये ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात भाषाविज्ञाचा प्राध्यापक म्हणून नियुक्त केले गेले होते - त्यांनी सांगितले की, आर्य शब्द हा प्रजातीचा (वंशाचा) बोधक नाही. परंतु भाषासूचक शब्द आहे आणि जेव्हा आम्ही प्रजातीच्या अर्थाने आर्य शब्दाचा उपयोग करतो तेव्हा त्याचा अर्थ होतो तो वंश जो आर्यभाषी आहे.

डॉ. गाइल्स यांचे मत असे होते की आर्यांचे मूळ निवासस्थान ऑस्ट्रेलिया-हंगेरी चे मैदान किंवा डेन्यूब नदीची घाटी ही असू शकते. कारण आर्य लोक अश्व, गाय, बकऱ्या, मेंढ्या आदि प्राणी पाळत असत आणि शेती करीत असत. तेथे त्या पशूंना चरण्यासाठी व शेती करण्यासाठी योग्य भूमी होती. या सोयीचा आधार घेऊन पार्किन महोदयांनी रशियाच्या दक्षिण मैदानाला आर्यांचे मूळस्थान असण्याची शक्यता व्यक्त केली. काही विद्वानांनी याचाच आधार घेऊन पोलंड आणि कॅस्पियन समुद्राच्या मधील भाग आर्यांचे मूळस्थान असावे असे म्हटले.

एडवर्ड मेयरचे असे मत आहे की आर्यांचे मूल निवासस्थान कॉकेशस पर्वत किंवा पामीरचा पठारी पर्वत हे असावे कारण या प्रदेशातील एक अमर्ना नामक स्थानाच्या उत्खननाच्या वेळी जो रथ मिळाला तो आर्यांचा असावा असे म्हटले जाते. कारण त्या रथाच्या अग्रभागी भुर्जपत्र बांधलेले आहे व ते फक्त कॉकेशस पर्वतावरच प्राप्त झाले आहे व म्हणून आर्य प्रथम येथे राहत असावे.

टर्की येथील बोगाज नावाच्या स्थळी उत्खननात काही अभिलेख प्राप्त झाले आहेत ज्यामध्ये वरूण, मित्र, इंद्र, इ. देवतांची नावे तसेच एक, तेरा, पाच, सात आदि

संख्या कोरलेल्या आहेत. देवतांच्या मिळत्या जुळत्या नावांवरून मॅक्समूल्लरने आर्यांचे मूळ निवास्थान मध्य आशिया असण्याची संभावना व्यक्त केली आहे.

काही विद्वानांचे असे मत आहे की, सोनेरी केस भारतीय जातीचे वैशिष्ट्ये होते. त्यांचे मूलस्थान जर्मन देश असावा. युनानी देवता अपोलोचे केस सोनेरी होते असे सांगितले जाते. रोमन शासकांचे केस भुरकट होते. प्रसिद्ध योगप्रणेता व्याकरणकार पतंजलीच्या मते भारतातील ब्राह्मणांचे केस सोनेरी भुरकट आहेत तेव्हा जर्मन देशाला आर्यांचे मूळनिवासस्थान समजावे.

प्रजातीच्या अनुषंगाने आर्यांचे मूळ निवास्थान शोधणाऱ्यांचे मते आर्यांनी वायू, सूर्य, विद्युत, चंद्रमा, अग्नी इ. प्राकृतिक शक्तींना विचित्र कार्य करताना पाहिले. त्यांची शक्ती पाहिली व घाबरून त्यांनी त्यांना देवता मानले. यामुळेच भारतात देवता अधिक आहेत. सैन्धव सभ्यतेचे प्रणेते अनार्य होते जे सिंधू घाटीचे मूळ निवासी होते. आर्य आणि अनार्य यांच्या दीर्घकालीन सहवासामुळे दोघांच्या विचारांचे आदान-प्रदान झाले. अनार्यांचे धर्म, त्यांची पूजा पद्धती तसेच अंधविश्वासमूलक जादू टोणे इत्यादींनी आर्यांवर आपला प्रभाव टाकण्यास प्रारंभ केला यामुळे इच्छा असूनही आर्य लोक अनार्य संस्कृतीपासून स्वत:ला वेगळे ठेवू शकले नाहीत. त्यांचा चौथा वेद अथर्ववेद यामध्ये तर जादू टोणे, भूत प्रेत तसेच जारणमारणाच्या यंत्रांना आपला वर्णनीय विषय बनवला. या सांस्कृतिक मिलनामध्ये अनार्यांच्या वैराग्यमार्गी परंपरेने आर्य ऋषींना खूप प्रभावित केले आणि ब्राह्मण कालातच तप आणि त्यागाकडे आर्यांचे आकर्षण वाढले. परिणामत: आर्यांनी यती, मुनी आदिंच्या रूपाने वनाच्या शांत वातावरणात आपले आश्रम बनवून राहण्यास प्रारंभ केला आणि ब्राह्मण ग्रंथ लिहिले गेले.

वरील पॅरेग्राफवरून हा निष्कर्ष निघतो की आर्य मूर्ख होते व सिंधू घाटीमध्ये आल्यानंतरच ते थोडे सभ्य बनले. जादू-टोणा, वैराग्य मार्गी परंपरा इत्यादी गोष्टी त्यांनी अनार्यांपासून शिकल्या. यावरून असे प्रतीत होते की ही गोष्ट म्हणजे संस्कृतीचा उच्छेद करून हीनता जागृत करण्याचा प्रयास आहे. भारतातील ज्या ज्या लोकांना विद्वान अनार्य म्हणतात ते सर्व मागासलेले आहेत. त्यांच्याकडून सर्व त्यांच्या पद्धती शिकून आर्य सुसभ्य झाले व अनार्य आपली कल्याण मार्गी परंपरा इतके विसरून गेले की त्यांना शिकवल्यानंतरही ग्रहण करता येत नाही. आणि त्यांचीच वैराग्याची परंपरा व त्यावरच प्रतिबंध ? त्यांनी त्याचे पालन करू नये ? पाश्चात्य विद्वान हे सिद्ध करू

इच्छित आहेत की, आर्य केवळ मूर्खच नाहीत तर भित्रेही होते. कारण ते क्षुद्र प्राकृतिक शक्तींनी भयभीत होऊन त्यांना देवतांचे स्थान दिले. या पाश्चात्य लोकांनी आर्यांच्या चरित्राबाबत जे काही प्रसारीत केले आहे ते विकृती मानसिकतेचे द्योतक आहे.

सारांश पाश्चात्य विद्वानांमध्ये कोणी भाषा आणि पुरातत्त्वाला तर कोणी झाडे-झुडपांना तर कोणी राहणी करणीचा आधार घेऊन असा तर्क केला की आर्य हे आशिया मायनर येथे सीरीया किंवा तुर्कीमधून युरोपात ऑस्ट्रिया, हँगेरी, जर्मन, यूनान, युक्रेन (रशिया) इत्यादी देशांपैकी कोणत्या तरी देशातून भारतात आले असतील. या प्रकारे पंचवीस मते आहेत त्यापैकी दहा बारा मान्य झालेली आहेत. परंतु जे लोक आर्य होते, ज्यांनी आर्य जीवन जगले त्यांनीही आर्य शब्दाचा आशय सांगितलेला आहे. आर्य संस्कृतीचा परिचय प्रस्तुत केला आहे, आर्यत्वावर भरपूर भर दिला आहे. प्रत्यक्ष ज्यांनी आर्य संस्कृती पाहिली आहे जे ती संस्कृती जगले आहेत त्यांनी केलेल्या उपदेशाचा - जसे- भगवान श्रीकृष्ण, भगवान महावीर, भगवान बुद्ध यांची वक्तव्ये, महात्मा वाल्मीकीचे आदिकाव्य रामायण, महर्षी व्यास रचित महाभारत इत्यादी आर्षग्रंथामध्ये ठिकठिकाणी आर्य शब्द आलेला आहे. त्यांना अनुस्यूत असलेला आर्य शब्दाचा अर्थ एकाही युरोपीय पंडिताने विचारात घेतला नाही.

भगवान श्रीकृष्णाच्या मते जो परमात्म्याचे दृढतेने चिंतन करतो- जो चिंतनात प्रवृत्त आहे तो आर्य होय. जो सन्मार्गावर दृढतापूर्वक आरूढ आहे तो आर्य होय. महाभारताच्या युद्धारंभी अर्जुन कुळाच्या रक्षणाला सनातन धर्म मानून त्यासाठी तो विकल बनला तेव्हा भगवंताने 'अनार्यजुष्टम्' असे म्हणून त्याची निर्भत्सना केली आहे. त्यांनी म्हटले हे अर्जुना, हे अनार्यांचे आचरण करण्यास तू कोठून शिकलास ? हे ना आर्य पुरुषांचे आचरण आहे ना या आचरणाने तुझे कल्याण होईल किंवा ना तुझी कीर्ती वाढेल. ज्यामध्ये कीर्ती नाही, कल्याण नाही ती आर्य पद्धती नाही ते अज्ञान आहे. सनातन एक मात्र आत्मा आहे. जो आत्म्याच्या शोधात मग्न आहे तो आर्य आहे.

भगवान बुद्धांच्या मतेपण जो मरणधर्मा असूनही अमरत्वाचा शोध घेतो तो आर्य आहे. दु:खात राहूनही शाश्वत सुखाचा शोध घेणारे आर्य आहेत. हीच आर्यत्वाची श्रेष्ठतम कसोटी आहे. परंतु या आर्यत्वाची सुरुवात जेथून होते ती निम्नतम सीमा

म्हणजे आर्य संस्कारांचे बीजारोपण होय. (आर्य म्हणजे सकर्मांची लांबलचक शृंखला आहे) आणि त्याचे पालन म्हणजे आर्य संस्कृती आहे.

आर्य संस्कृतीचा परिचय ऋषी वाल्मीकींच्या रामायणात भरपूर आहे. कुंभकर्णाला पाहून जेव्हा वानरांची सेना घाबरून पळून जाऊ लागली तेव्हा युवराज अंगद आपल्या सैनिकांना धीर देताना म्हणाला - ''शूर वीरांनो, आमच्या पूर्वजांनी मोठमोठ्या लढाया केल्या आहेत. त्यात त्यांनी विजय प्राप्त केले आहेत किंवा वीरगतीला प्राप्त झाले आहेत. परंतु त्यांनी शत्रूला कधी पाठ दाखवली नाही. आम्ही त्या आर्यांचे वंशज आहोत. आज आम्ही पाठ दाखवून पळून जाऊ तर आम्हाला अनार्य म्हटले जाईल. तेव्हा शूर वीरांनो, परत फिरा. आपला सन्मान-गौरव हरवून बसू नका. अहो प्रत्यक्ष काळ जरी पुढे उभा राहिला तरी आम्ही शत्रूला जिंकू किंवा मरू. अंगदाचे हे वक्तव्य ऐकून सेना परत फिरली. ही होती आर्य संस्कृती. आर्य कधी पाठ दाखवत नाहीत.

पंचवटीमध्ये सुवर्ण मृगाचा आवाज ऐकूनही जेव्हा लक्ष्मण रामाच्या सहाय्याला जायला तयार होईना तेव्हा सीतेने त्याला फटकारले ''कपटी अनार्य लक्ष्मणा, तुझा धिक्कार असो. तू भरताप्रमाणे मोठ्या भावाच्या भक्तीचा अभिनय करत मागे आलास. मनात दुष्ट हेतू ठेवून की, राम कधी संकटात सापडला की सीतेला मी प्राप्त करेन'' हे ऐकून लक्ष्मणाचा धीर खचला आणि त्याला जाणे भाग पडले. ही आर्य संस्कृती आहे. म्हणजे आर्य आपल्या सत् चरित्र्या पासून ढळत नाहीत.

राम आर्य होते. आदिकवींनी वारवार त्यांना आर्य या शब्दाने संबोधित केले आहे. हिंदीमधील रामकथेचे अमर प्रणेते गोस्वामी तुलसीदासांनीपण रामासाठी 'आर्य' शब्दाचा प्रयोग केला आहे ''आरज सुत पद कमल बिनु बादि जहाँ लगि नात'' आर्य संस्कृतीचा एक नमुना गोस्वामीजींच्या रामचरित मानसामध्ये पाहा - **रघुवंसिन्ह कर सहज सुभाऊ मन कुंपथ पग धराई न काऊ ॥** (१-२३०-५) सीतेचे हे रूप पाहून रामाचे मन विव्हल झाले. तेव्हा निष्कपट निश्छल रामाने लक्ष्मणाला सांगितले की लक्ष्मणा, या सर्वांची कारणे तर विधाताच जाणे. बाकी ज्याने चुकूनदेखील कुपंथावर पाऊल ठेवले नाही त्या आपल्या मनावर आमचा पूर्ण भरोसा आहे. हा आर्यांचा स्वभाव आहे.

**''राम कहा सब कौशिक पाही । सरल सुभाउ छुआ छल नाही''** निष्कपट भावनेने सर्व प्रकरण रामाने विश्वामित्रालाही सांगितले. हीच आर्य संस्कृती आहे की आर्य कपटरहित, छलरहित, मनाने व अंत:करणाने सरळ, परोपकारी, चरित्रवान व शरणागत वत्सल असतो.

आर्य शब्दाची बरोबर हीच व्याख्या भगवान महावीरांनीपण केली आहे. त्यांच्या मते जो मनुष्य मनाने सरळ, वाणीने सरळ, आचाराने सरळ, कपटरहित व परोपकारी आहे, जो आपल्या दोषांना लपवत नाही, ज्याची दृष्टी यथार्थ असते तेच आर्यत्व होय. तो शुद्ध आर्य होय. जो मनुष्य वक्र आहे, जो वाणीने आचाराने वक्र आहे, मनाने कपटी आहे, ज्याची दृष्टी मिथ्या आहे तो अनार्य आहे. आर्य हे एका दृष्टिकोनाचे नाव आहे. आर्य म्हणजे निष्ठा, आर्य म्हणजे एक स्थिती आहे. आर्य म्हणजे वंश नव्हे. व म्हणूनच आपला एक भाऊ आर्यत्व प्राप्त करून आर्य बनू शकतो तर दुसरा आर्यत्वापासून च्यूत होऊन अनार्यपण (असुरपण) बनू शकतो.

आर्यांमध्ये रोजच्या जीवनात भावाभावांमध्ये असणारी सहृदयता, मित्रव्यवहार, अतिथिसत्कार, स्त्री-पुरुषांमधील निष्ठापूर्ण संबंध हे निष्कपट व आदर्श होते. शेजाऱ्यांचे ते हित पाहत असत. माता-पिता व गुरुजनांची सेवा, रोगी व वृद्धजनांची निस्वार्थ सेवा दुसऱ्यांच्या दु:खात सहभागी होणे, लोकांचे कल्याण करणे इत्यादी आर्यत्व प्राप्त झालेल्या पुरुषांची लक्षणे होत. व म्हणून भारताने परम कल्याणाचा उपदेश दिला आहे. त्याने दुसऱ्याकडून सभ्यता शिकण्याचा प्रश्नच राहात नाही.

जनकल्याणाच्या भावनेने प्रेरित होऊनच आमच्या पूर्वजांनी कृण्वन्तु विश्वमार्यम् - संपूर्ण विश्वाला आर्य बनवण्याचे व्रत घेतले होते. ते सत्यद्रष्टे होते म्हणून तर विश्वभर ते पसरले. जेथे ते गेले तेथील प्रादेशिक भाषा त्यांनी आत्मसात केली आणि त्या माध्यमातून आर्य प्रणाली ईश्वर पथाचा उपदेश त्यांनी केला. आणि त्यामुळेच भारतीय सभ्यतेशी मिळते जुळते पुरातन अवशेष अवघ्या विश्वात मिळत आहेत. म्हणजे थोडे शब्द किंवा अवशेष मिळाले म्हणजे ते तेथून आले असा त्याचा अर्थ नाही. लोक एवढेही समजत नाहीत की आर्यांजवळ संपूर्ण संस्कृत भाषा होती ती भारतातच होती व त्यांच्या तेथे फक्त थोडे शब्द सापडले. अहो आर्य तेथले होते तर त्यांनी तेथून सर्व वेद येथे आणले व तेथील परिवारासाठी काही ठेवलेच नाही ? म्हणजे आर्यांनी

परदेशात फक्त शब्द ठेवले वेद नाही, इतिहास ठेवला नाही आपली राहणी करणीही ठेवली नाही.

भारतीय ऋषींनी सुप्त आत्म्यांना जागृत केले. परमात्म्याच्या रूपात मनुष्याला एक स्थिती दिली. परंतु नश्वर भौतिक गोष्टींत त्यांनी कधीही रस घेतला नाही. कारण येथे प्रत्येक मुलाला आर्य शिक्षण प्राप्त होते व त्याबरोबरच हेही ज्ञान त्याला प्राप्त होते की सृष्टीमध्ये सत्य काय आहे व असत्य काय आहे किंवा कशाला म्हणावे? श्रीकृष्णाच्या मते आत्माच सत्य आहे. त्याला प्राप्त करण्यासाठी निश्चित, नियत विधीचे आचरण करणे म्हणजेच आर्यधर्म होय. ही आर्यत्वाची पराकाष्ठा आहे. त्याचे विशुद्ध स्वरूप आहे. जोपर्यंत अनुभवी सद्‌गुरु मिळत नाहीत, आर्यत्वाचे हे प्रशिक्षण पूर्ण होत नाही.

आश्चर्याची गोष्ट ही आहे की विल्यम जॉन्सच्या वेळी म्हणजे दोनशे वर्षा पूर्वी, आर्य कोठून आले म्हणजे आर्यांचे मूळस्थान कोणते हा प्रश्न विद्यालयात शिकवून विद्यार्थ्यांचा गैरसमज करून देत होते. परंतु वैदिक काळापासून गौतम बुद्धांपर्यंत विश्वातील कानाकोपऱ्यातून जे आर्य संस्कृतीचे प्रचारक गेले, ज्यांचे साहित्य आर्य संस्कृतीचे दर्पण होते, त्यांनी विभिन्न अनुमानांमध्ये आपले मत सुस्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न का केला नाही ? अर्थात त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली असेल, पण विदेशी शासकांच्या गर्हित मंतव्याला सहाय्यक न होण्याचे त्यांनी ठरविले असेल आणि विरोधी सूर ठेवून त्यांना मान्यताही मिळाली नसती व म्हणून त्यांनी सत्याकडे डोळेझाक केली. तेव्हा आता आर्य इकडून आले तिकडून गेले हे विसरून जा. हे शब्द साधनापूर्वक आहेत. भाषा किंवा वंशसूचक नाहीत. हा विवाद येथेच थांबवून एखाद्या तत्त्वदर्शी महापुरुषाला शरण जा आणि आर्यत्वाचे गुण शिका. आर्य व देवता, अनार्य व दस्यू पर्यायवाचीं आहेत. पूर्वी कधीतरी देवासुराबरोबरच आर्य व दस्यू शब्द प्रचलित होते. कालांतराने आर्य-अनार्य शब्द प्रचलित झाले. आर्य शब्द जातपात, भेदभाव यांच्या पलीकडे आहे. विश्वभरातील मानवमात्र एकच आहे. प्रकृतीच्या थपडांनी घाबरून विश्वातील कोणीही मनुष्य आर्यत्वाच्या शोधासाठी निघतो तेव्हा तो मृत्यूतून अमरत्वाकडे, दु:खातून सहज सुखाकडे गमन करीत असतो.

आर्य आणि अनार्य या शब्दांच्या प्रयोगांनी आमचे प्राचीन ग्रंथ भरलेले आहेत. वाल्मीकी रामायणाच्या प्रमाणे उत्तर-दक्षिण भारतीय, सुग्रीवाचा परिवार, वानर आणि

अस्वलाचा परिवार हे सर्व आर्य होते. रावण अनार्य होता पण त्याचे पूर्वज पुलस्त्य, विश्रवा किंवा त्याचा भाऊ विभीषण आर्य होते.

आर्य आणि अनार्य या शब्दांवर भगवान बुद्धांचे विचार मज्झिम निकायच्या पशराशी सुत्तमध्ये संकलित आहेत. त्यांनी त्यात समजावले आहे की ''भिक्षूनो, या जगात दोन प्रकारचे शोध आहेत - एक आर्य आणि दुसरा अनार्य. अनार्य शोध त्याला म्हणतात की जो स्वत: जन्मणारा असूनही जातधर्माचा (जन्माचा) शोध घेतो. स्वत: जरा धर्मा (म्हातारा होण्याचा स्वभाव असणारा) असूनही जरा धर्मालाच आव्हान देतो. व्याधी-मरण शोक आणि संक्लेश स्वभावाचे असूनही तो त्यांचाच शोध घेत बसतो. पुत्र आणि पत्नी जातधर्मा आहे. सोने, चांदी किंवा सृष्टीमधील सर्व भोग सामग्री जातधर्मा आहे. असे असूनही हा पुरुष ग्रसित मूर्च्छित आणि आसक्त बनून स्वत: जातधर्मा (नश्वर) असूनही दुसऱ्या नश्वर पदार्थांचा शोध घेतो त्याला अनार्य शोध म्हणतात.

परंतु भिक्षूंनो, काही पुरुष स्वत: जातधर्मा असूनही जातधर्माचे दुष्परिणाम पाहून अजात (जन्मरहित) सर्वोत्तम व मंगलमय निर्वाणाचा शोध घेतो. स्वत:, व्याधिधर्मा (व्याधिरहित), मरण धर्मा (मरणरहित), अमृत, शोकधर्मा (शोकरहित) स्वयं संक्लेश धर्मा (मलरहित), अति उत्तम योगक्षेम, निर्वाणाचा शोध घेतो. तो आर्य पथावर आहे असे समजा.

यावरून स्पष्ट होते की आर्य एक पथ आहे. मनाच्या जखमेवरील उपाय आहे. एक निर्धारित दिशा आहे. आपला एक भाऊ आर्य व दुसरा भाऊ अनार्य होऊ शकतो. किंवा एकच व्यक्ति जीवनात काही वेळा आर्य असते तर दुसऱ्या क्षणी ती अनार्यही होऊ शकते. कोणी कधी आस्तिक तर कधी नास्तिक होऊ शकतो. जो त्या अस्तित्वाचा उपासक आहे तो अस्तिक आहे, आर्य आहे. श्रद्धापूर्वक ईश्वराला प्राप्त करणाऱ्या विधीचे आचरण म्हणजे आर्य शोध आहे. या उलट अस्तित्वहीन, नश्वर, क्षणभंगुर गोष्टींची कामना करीत जो भटकतो तो अनार्य होय. यालाच महापुरुषांनी कधी विद्या म्हटले आहे तर कधी अविद्या म्हटले आहे. तर कोणी त्याला अंतर्मुखी व बहिर्मुखी, सजातीय-विजातीय, दैवी संपदा व आसुरी संपदा असेही म्हटले आहे. ही एक वृत्ती आहे, एक प्रवृत्ती आहे. सत्यशोधाची प्रवृत्ती आर्य आहे, असत्याची प्रवृत्ती अनार्य आहे. त्यामुळे अवधे जग आर्य आहे आणि अवधे जग अनार्यही आहे. वेदात म्हटले आहे 'कृण्वन्तु विश्वमार्यम' अर्थात विश्वाला आर्य बनवा. म्हणजे आर्य बनवले जाते.

जन्माने किंवा स्थानाने कोणी आर्य बनत नाही.

जगातील सर्वांत प्राचीन ग्रंथ वेदाने तसेच गौतम बुद्धांनीही आर्य याचा अर्थ इष्टोन्मुखी प्रवृत्ती असे म्हटले आहे. त्याला गुणवाचक मानले आहे. भारताच्या बाहेरून आलेली एक किंवा एका विशिष्ट वर्गाचे लोक म्हणजे आर्य नव्हे. हो, भारतामध्ये परमात्म्याचा शोध घेणारे पुष्कळ लोक होते. त्यामुळे भारताला पूर्वी आर्यावर्त असेही म्हटले जात असे. ज्या समाजातील बहुसंख्य लोक एकमेव असणाऱ्या परमात्म्यासाठी संकल्पवान होते, इंद्रिय संयम आणि मनाचा निरोधासाठी जे प्रतिबद्ध होते, त्यांची राहणी करणी, खाणे पिणे, वेशभूषा कायदे-कानून नियम हे सर्व काही सुसंस्कृत होते, त्या समाजाच्या संस्कृतीला आर्य संस्कृती असे म्हटले. परंतु आर्यांच्या या मूळ क्रियेवर किंवा कर्मावर फक्त भारतीयांचेच प्रभुत्व नाही. हे कर्म तर विश्वातील मनुष्यमात्राचे आहे. स्वत:ला ख्रिस्ती समजणारापण जर त्या अविनाशी परमात्म्याच्या शोधात तत्पर असेल, ज्याच्यामध्ये अनंत जीवन असेल तर तोदेखील आर्यच होय. तो मुसलमान जरी असला (सूफी संताप्रमाणे) तरी परमात्म्यासाठी जर तो हृदयपूर्वक व मन:पूर्वक प्रयत्नशील असेल, तर तो आर्यच्या शोधात आहे, तो आर्यच होय. आर्यत्वाचा परिचय केवळ व्यक्तिच्या खाण्यापिण्यावरून, वेशभूषेवरून किंवा राहण्याच्या पद्धतीवरून होत नाही. किंवा सामाजिक व्यवस्थेवरूनही होत नाही. परंतु आर्यत्व म्हणजे योगक्रिया आहे. या योगमार्गाने जाऊन जीवात्मा आपल्या मूळ परमात्म्यापर्यंत जाऊ शकतो. सनातनप्राप्ती हे आर्यांचे साध्य आहे. जो दैवी संपदेने युक्त आहे तो आर्य होय. जो आसुरी संपदेने युक्त आहेत तो अनार्य आहे. या क्रियांचे अनुशीलन करणाऱ्यांना आर्य म्हटले गेले. आर्य म्हणजे आर्य समाजी नाही तर आस्तिक असा अर्थ आहे. आर्य ही एक स्थिती आहे.

॥ॐ॥

# गोरक्षा

**गो-रक्षा हा आमचा सनातन धर्म आहे**

परंतु

**गाय हा पशू म्हणजे धर्म नव्हे.**

**-स्वामी अडगडानन्द**

# गाय हा पशू म्हणजे धर्म नव्हे

**बंधूनो,**

प्रत्येक दिवशी 'गोवध बंद झालाच पाहिजे' अशी घोषणा केली जाते. यासाठी अनेक धर्माचार्य उपोषणाला बसतात. गोवध बंदीच्या नावावर लाखो रुपयांची वर्गणी गोळा केली जाते. या सर्वांचा परिणाम फक्त एवढाच दिसून आला की सन् १९४२ मध्ये रोज १७,००० गायी कापल्या जात होत्या तेथे आज त्यांची संख्या ५०,००० इतकी वाढली आहे. खरोखर आता या गोष्टीवर विचार झाला पाहिजे किंवा केला पाहिजे की गाय हा आमचा धर्म आहे का? व याच्या समर्थनार्थ वेद, गीता आणि रामचरित मानससारख्या धर्मग्रंथांमध्ये काही सांगितले आहे का? जर काही सांगितलेले नसेल तर हे एक अज्ञान आहे. आम्हांला यापासून सावध राहिले पाहिजे, सतर्क राहिले पाहिजे.

गायीला धर्म समजण्याचा कुपरिणाम समस्त भारताला भोगावा लागला आहे. गायीचे चिन्ह घेऊन आलेल्या मूठभर तुर्कांनी वीर राजपूतांना त्यांच्याच देशात हरवले. हिंदू-मुसलमानांत फूट पाडण्यासाठी इंग्रजांनी गायीचेच शस्त्र वापरले. स्वतंत्र भारतातील जातीय दंग्यांमध्ये कुठे न कुठे गाय अवश्य राहिली आहे. हा शुद्ध वेडेपणा आहे व त्यामागे फक्त एकच कारण आहे की, गाय हाच आमचा धर्म आहे ही आमची धारणा! याच्या समर्थनार्थ तुम्ही काही पुरावे देऊ शकाल का?

श्री रामचरितमानसकारांच्या मते भगवंताचा अवतार फक्त चार गोष्टींसाठी होत असतो:

**गो द्विज देव सन्त हितकारी। कृपा सिन्धु मानुष तनु धारी।।**

★ ★ ★

**निज इच्छा प्रभु अवतरहि, सुर महि गो द्विज लागि।।**

★ ★ ★

**विप्र धेनु सुर सन्त हित, लीन्ह मनुज अवतार।। इत्यादी।।**

★ ★ ★

सर्वसाधारण जनमानसात या दोहे व चौपाईंचा हाच अर्थ प्रचलित आहे की, भगवंत जेव्हा अवतार घेतात तेव्हा प्राण्यांमध्ये गायीसाठी व मनुष्यांमध्ये ब्राह्मण या वर्णासाठीच ते अवतार घेतात. आणि हा ब्राह्मण वर्ग फक्त भारतामध्येच पाहायला मिळतो. जेव्हा गाय आणि ब्राह्मणावर विपत्ती येते तेव्हा- 'सीदहिं विप्र धेनु सुर धरनी' भगवंत त्वरित अवतार घेतात. ही विपत्ती ब्राह्मणावर ब्राह्मणेतर जातीकडूनच येणार. तेव्हा त्यांना मारुन ईश्वर ब्राह्मणाला निर्भय बनवणार. मग जगातील अन्य लोकांनी भगवंताकडून कोणती अपेक्षा ठेवावी? आणि मग ईश्वर सर्वांसाठी नाही का? रामचरितमानसाचे म्हणणे काय आहे? खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे की भगवंत गायीसाठी अवतार घेतात; परंतु ते गायीहून श्रेष्ठ आहेत. खरोखर ही गाय म्हणजे कसल्या प्रकारचे यंत्र आहे की ज्यात अवघा भारत अडकला गेला आहे; पण भगवंत तिच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत तिच्या पलीकडे आहेत? गाय म्हणजे काय? येथे एक प्रश्न आहे- माया गुण गो पार॥

तुलसीदासांच्या मते भगवंताने अवतार तर घेतला; पण ना ब्राह्मणाला सहाय्य केले ना लंकेमधून एकाही गायीला सोडवले. गोशाळा किंवा गायींना चरायला कुरणे बनवण्यावरही मानसने भर दिला नाही. तेव्हा आता तुम्हीच नीट विचार करा की वास्तविक गाय म्हणजे काय? एखादे अज्ञान किंवा एखादी भ्रांतीमूलक समजुत तर आमचा पाठलाग करीत नाही ना?

श्री रामचरितमानसामध्ये जवळ जवळ सत्तर वेळा गाय शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. ज्यात सतरा वेळा गाय फक्त एक दृष्टांत आहे. तेरा वेळा गाय वस्तू आहे, संपत्ती आहे आणि चाळीस वेळा इंद्रियासाठी गायीचा प्रयोग केला गेला आहे. गायीचा दृष्टांत रूपात केला गेलेला प्रयोग पाहा-

**अधम निशाचर लीन्हे जाई। जिमि मलेच्छ बस कपिला गाई॥**

★ ★ ★

**भूप प्रतापभानु बल पाई। कामधेनु भई भूमि सुहाई॥**

★ ★ ★

**पैठत नगर सचिव सकुन्नाई। जनु मारेसि गुरू बाभन गाई॥**

★ ★ ★

येथे गाईचा फक्त दृष्टांत घेतला आहे. याच अर्थाच्या पुढील पंक्ती पाहा-

**श्याम सुरभि पय विषद अति। गुनद करहि सब पान॥**
**गिरा ग्राम्य सिय राम जस, गावहि सुनहि सुजान॥**

गाय काळ्या रंगाची आहे; पण तिचे दूध गुणकारी असल्याने सर्वजण ते प्राशन करतात. या प्रकारे ग्रामीण भाषेत लिहिलेली ही कथा काळ्या गाईप्रमाणे आहे; परंतु श्रीरामाचे यश त्यामध्ये अंकित केलेले असल्याने सर्व जण तिचा स्वीकार करतील. येथे गाय हे फक्त उदाहरण आहे, धर्म नव्हे.

रामजन्माच्या सोहाळ्यांच्या निमित्ताने राजाने 'हाटक धेनु वसन मनि'चे (हाटक = सोने) दान केले. विश्वामित्राने याचना केल्यानंतर दशरथ राजाने सहर्ष सांगितले - 'मागहु भूमि धेनु धन कोसा' जमीन, गाय, धन आणि खजिना सर्व मला सारखेच आहे. काहीही मागावे. जनकजींनी 'गज रथ तुरग दास अरु दासी। धेनु अलंकृत काम दुहासी'॥ या गोष्टी हुंड्यामध्ये दिल्या. म्हणजे हत्ती-घोड्याप्रमाणे गाय पण येथे एक वस्तू आहे. पित्याच्या मृत्यूनंतर भरताने 'धेनु बाजि गज वाहन नाना' यांचे दान देऊन भरतजी शुद्ध झाले. रामराज्यामध्ये वैदेही नगरीप्रमाणे 'मन भावती धेनु पथ स्त्रवही' पाहिजे तितके दूध देणाऱ्या गाई होत्या. थोडे दूध देणाऱ्या गाई कोठे खपवल्या न कळे; पण कमी दूध देणारी एकही गाय तेथे नव्हती. तात्पर्य हे की, हत्ती, घोडा, गाय, दास, दासी, वस्त्र, सोने आणि रत्ने या वस्तू देवाण घेवाणासाठी वापरल्या जात असत. म्हणजे या वस्तू होत्या, धर्म नव्हता.

आता त्या चाळीस प्रसंगांतील काही प्रसंग येथे पाहूया जेथे गो शब्द इंद्रियांचा प्रतीक म्हणून वापरला आहे.

**अनवद्य अखंड न गोचर गो। सब रूप सदा सब होइन गो।**

जो 'अनवद्य' म्हणजे निर्दोष आहे, अखंड आहे, जो दृश्य नाही, जो गो म्हणजे इंद्रिये नाही किंवा इंद्रिये जेथून आपले खाद्य मिळवतात तो विषय म्हणजेही भगवंत नव्हे.

**सो नयन गोचर जासु गुन नित नेति काहि श्रुति गावहीं।**
**जिति पवन मन गो निरस करि, ध्यान कबहुक पावहीं॥**

आज माझ्या डोळ्यांसमक्ष तोच भगवंत प्रत्यक्ष उभा आहे. 'न इति न इति' असे म्हणून श्रुती ज्याची स्तुती गातात तो भगवंत नव्हे. पवन आणि मनाला जिंकून तसेच गो म्हणजे इंद्रियांचा निरोध करून मुनी लोक या ईश्वराला क्वचितच ध्यानात प्राप्त करतात. तर मग गाईचे दूध, रक्त तसेच हाडे सुकवली तर भगवंत ध्यानात येतील का? गो चा निरोध म्हणजे, काय? वास्तविक गो चा अर्थ आहे 'मनासहित इंद्रिये'. जोपर्यंत एकाही इंद्रियाला एकापण विषयात यत्किंचित जरी रस वाटेल तोपर्यंत ध्यानात तोच विषय येईल. तोपर्यंत भगंवताचे दर्शन कधीही होणार नाही. भगवंत अस्पष्ट बनतील. मग गोचा निरोध कसा करावा? किंवा गो ला निरस कसे करावे?

**बलं अप्रमेय अनादि अजम् अव्यक्त एकं गोचरम्॥**
**गोविंद गोपर द्वन्द्व हर, विज्ञान धन धरणी धरम्॥**

त्या भगवंताची शक्ती अतुलनीय आहे. तो अनादी आहे, अजन्मा आहे, अव्यक्त आहे, एक आहे, अगोचर आहे; अर्थात तो इंद्रियांचा विषय नाही. तरीही त्या इंद्रियांमध्ये असणाऱ्या हृदयरूपी देशात त्याचा निवास आहे. व म्हणून तो गोविंद आहे. वास्तविक 'गो' च्या तो पलीकडे आहे. तो इंद्रियांचे द्वन्द्वव अपहरण करणारा आहे. आम्ही आपल्या बुद्धीने विकारांच्या पलीकडे जाऊ शकत नाही आणि यथार्थ निर्णय घेण्याची क्षमता इंद्रियांमध्ये नाही; कारण -

**गो गोचर जहँ लगि मन जाई। सो सब माया जानेहु भाई॥**

इंद्रिये व इंद्रियांच्या विषयांकडे जोपर्यंत मन धावते, तसेच बुद्धी जेथपर्यंत निर्णय घेऊ शकते ती सर्व माया आहे- त्यामुळे तुम्ही स्वत: गो म्हणजे इंद्रियांचा निरोध करू शकत नाही किंवा त्यांना निरस बनवू शकत नाही. जरी बुद्धीने विवेक किंवा विचारपूर्वक एखादा निर्णय घेतला तरी तो मायावी क्षणातीलच लहान-मोठा निर्णय असेल कारण बुद्धीला त्याच्या पुढे काय स्थिती आहे हे जाणता येत नाही. व म्हणूनच मनासहित इंद्रियांना (गोला) निरस करण्यासाठी भगवंताचा अवतार असतो. भगवंत विज्ञान-धन आहे, अनुभवस्वरूप आहे. तो आत्म्यावर आरुढ होऊन (अनुभव आणि आंतरिक निर्देशांद्वारे) या पृथ्वीला धारण करतात. या गाईच्या रक्षणासाठी भगवंत अवतार घेत असतात. गो किंवा इंद्रियजन्य विकारांना दूर करण्यासाठीच साधकाच्या हृदयात ही व्यवस्था प्रसरित होत असते. परंतु काही काही संवेदनाशील साधकांच्या हृदय देशात ही घटना घडली जाते व त्यातून अवतार होतो.

**गीता**- गीतेचा उपदेश करताना योगेश्वर श्रीकृष्ण म्हणाले की सात्त्विक गुणांचे प्राबल्य असताना जो शरीराचा त्याग करतो तो देवयोनी सारखी श्रेष्ठ योनी प्राप्त करतो. राजस गुणांचे प्राबल्य किंवा बाहुल्य असताना जो शरीर त्याग करतो तो मनुष्य मानव बनतो आणि तामसी गुणांचे बाहुल्य असताना जो शरीर त्याग करतो तो पशू-पक्षी, कीटक इत्यादी अधम योनींमध्ये जन्म घेतो. गीतेच्या मतानुसार पशू एक अधम योनी आहे. मग जी स्वत: अधम योनी भोगत आहे ती गाय आपल्याला शाश्वत धाम कसे प्राप्त करून देणार? जी स्वत: दलदलीत अडकली आहे ती तुम्हाला त्या दलदलीतून कशी बाहेर काढणार?

योगेश्वर श्रीकृष्णांच्या मते ज्या प्रकारे मनुष्य जुने जीर्ण वस्त्र टाकून नवीन वस्त्र परिधान करतो, तसेच सर्व प्राणिमात्रांचा स्वामी हा आत्मा जुने शरीर सोडून जसे संस्कार असतील त्याप्रमाणे नवीन शरीर धारण करतो. अर्जुना, हे शरीर नश्वर आहे आणि जे स्वत: नश्वर आहे ते अधम शरीर शाश्वत धाम कसे प्राप्त करून देणार? त्या शरीरापैकीच गाईचेसुद्धा एक शरीर आहे तेव्हा ती शाश्वत सनातन कशी बनणार? आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्मृती आणि पुराणामध्ये गाईचे शेपूट पकडून वैतरणी नदी (यम लोकाच्या वाटेवरील ही नदी आहे अशी समजूत आहे) पार करण्याचे विधान आहे. खरोखर या विधानात काही तथ्य नाही. दिवसभरात शेकडो लोक त्या गाईचे शेपूट पकडून (खेचून) त्या गाईला अर्धमेले करून सोडतात; पण त्या पुजाऱ्यांना दया येत नाही. बिचारी अर्धमेली झालेली गाय आम्हांला वैतरणा नदी पार करून देते कारण त्या गाईच्या शरिरात देवांचा निवास असतो असे सांगितले आहे. जर गाईच्या रोमारोमात देवता आहेत तर मग गाय म्हणजे आणखी जोखीम आहे. अहो बुडून मरण्यासाठी गाय पुरेशी होती; की ज्या गाईमध्ये देवांचा निवास आहे. पण देवताच स्वत: वाहत आहेत- ''भव प्रवाह संतत हम परे' आमच्याप्रमाणे तेही बिचारे प्रवाहाबरोबर वाहत आहेत. मग ते आम्हाला काय तारणार?

**कृत्य कृत्य प्रभो सब वानर ये, निरखति तवानन सादर जे।**
**धिक जीवन देव शरीर हो, तव भक्ति बिना भव भूलि परे॥**

अशा या देवशरीराचा धिक्कार आहे. आपल्या भक्तीशिवाय 'भव भूलि परे' या भवसागरात चुकून ते पडले आहे.

महाभारताचे असे मत आहे की या सृष्टीमध्ये मनुष्य सर्वोत्कृष्ट आहे. 'गुह्यं ब्रह्म तदीतं ब्रवीमि। न हि मनुष्यात् श्रेष्ठतरं हि किंचित.' श्रीकृष्णही म्हणतात, अर्जुना तू सर्व बाजूंनी इंद्रियांचा निरोध करून माझे चिंतन कर. अर्जुना, मी तुला प्रतिज्ञेने सांगतो की तू माझ्या स्वरूपाला प्राप्त करशील. अर्थात जसे स्वरूप श्रीकृष्णाचे आहे त्याच स्वरूपात अर्जुनपण स्थिर होईल. जो मनुष्य या स्वरूपात या स्थितीला प्राप्त करू शकत नाही त्याला श्रीकृष्ण आत्म्याचा मारेकरी म्हणतात. यावरून हे स्पष्ट होते की, परमात्म्याला प्राप्त करून घेणे हा मानवाचा परमधर्म आहे. मनुष्याचे शरीर हे परमात्मप्राप्तीचे साधन आहे. देवतांनासुद्धा मुक्तीसाठी नरदेहाचीच अपेक्षा असते. असा हा नरदेह मोठ्या सौभाग्यानेच प्राप्त होत असतो. या शरीरामुळे तुम्ही देवतांपेक्षासुद्धा श्रेष्ठ आहात. मग दगड, पाणी, पशू, पक्षी, झाडे-झुडपे आपली आदर्श कसे बनू शकणार?

योगेश्वर श्रीकृष्णाच्या गीतेमध्ये दोन ठिकाणी गाईचा स्पष्ट उल्लेख सापडतो. एक तर वैश्य श्रेणी संपादन करण्यासाठी गो-रक्षा म्हणजेच इंद्रिय संयम करावा लागतो आणि दुसरा उल्लेख तत्त्वदर्शी महापुरुष कसे असतात या संबंधी सांगताना आलेला आहे. म्हणजे स्थितप्रज्ञ महापुरुष गाय, कुत्रा, हत्ती किंवा चांडाळ या सर्वांकडे समान दृष्टीने पाहत असतात. ते ना गाईला धर्म समजतास ना कुत्र्याला अधर्म समजतात; किंवा ना विशालकाय हत्तीला काही विशेष समजतात. कारण त्या महापुरुषांची दृष्टी बाह्य स्वरूपावर नसते; पण त्या सर्वांमध्ये संचार करीत असणाऱ्या आत्म्यावर असते.

सर्व लोक गाईंसाठी जीव द्यायलासुद्धा तयार होतात कारण श्रीकृष्ण गाई चरायला नेत असत. श्रीकृष्णांचा जन्म यादव कुळात झालेला होता. त्याच वंशात त्यांचे पालन पोषण झाले होते. गाईंना चरायला नेले नसते तर हत्ती घोडे कोठून प्राप्त झाले असते! रैदासाला भरणपोषणासाठी चामडे मिळाले होते. कबीराला माग तर रामाला धनुष्यबाण मिळाला होता. तर मग त्यांच्या या व्यवसायाला धर्म समजायचे का? श्रीकृष्णाने तर एका चंचल बलरूपी धेनुकासुराला ठार मारले. आणि द्वारकाधीश झाल्यानंतर तर ते एक दिवसही गाई चरायला घेऊन जाऊ शकले नाहीत.

पशूच्या रूपात गाई हे धन आहे- 'गोधन गजधन वाजिधन और रतन धन खान' प्राचीनकाळी गोधन म्हणजे एक विशिष्ट संपत्ती होती. नांगरणी, पेरणी, काढणी, खत, पाणी, प्रदूषण निवारण, पौष्टिक आहार, वाहन तसेच ओझे वाहण्याचे साधन म्हणून

गाईची उपयुक्तता असंदिग्ध होती व त्यामुळे गाईंच्या संवर्धनावर समाजाचा भर होता, त्याबतीत अधिक जागृत होता. ज्या प्रमाणे नागासाकीचे पुनर्वसन करण्यासाठी जे अनेक उपाय योजले होते त्यात अधिक मुले जन्माला घाला असेही एक आवाहन होते. त्यामध्ये एकोणतीस मुलांना जन्माला घालणाऱ्या एका महिलेला मदरलँड ही पदवी देऊन तिला सन्मानित केले. काहीसा असाच प्रकार प्राचीनकाळी झाला असावा आणि गाईची उपयुक्तता पाहून प्राचीनकाळी तिला 'गोमाता' अशी पदवी दिली असावी. ज्याप्रमाणे हल्ली वाघाला राष्ट्रीय पशू म्हणून जाहीर केले असून त्याला ठार करणाऱ्याला शिक्षा ठोठवली जाते, बहुधा प्राचीनकाळी अशीच व्यवस्था गाईच्या बाबतीत होती. आज दंड संहिता आहे, त्याबाबतीत एक विशिष्ट प्रणाली आहे; तेव्हा स्मृती होत्या.

वास्तविक गाईमध्ये वैशिष्टय नाही. ते मानवाच्या डोक्यामध्ये आहे, कारण गाईमध्ये असणारी वैशिष्ट्ये त्याला दिसली. बाकी तिच्या ठिकाणी मानवाला दिसलेली वैशिष्ट्ये म्हणजे गाईचे नैसर्गिक गुण आहेत. सारांश विशेषता लोखंडात नाही, अणूमध्ये नाही; परंतु त्या मानवामध्ये आहे जो त्याचे प्रयोग करून अंतरिक्षात उड्डाण करीत आहे, सागरलहरीवर तरंगत आहे. गरजेनुसार संशोधन करणे हा मानवस्वभाव आहे. मानवाच्या डोक्याचा किंवा बुद्धीचा स्वभाव आहे. त्यामुळे आज आधुनिक वैज्ञानिक उपकरणांसमोर गायीचे महत्त्व कमी होत चालले आहे, नष्ट होत चालले आहे. गाईच्या या अवमूल्यामुळे मनाला दु:ख होत असले तरी विचार करा की गाईला धर्म समजणारे किती लोक स्वत: गायी पाळतात की चरायला नेतात? सात्विक आहारामध्ये फळांनंतर गाईच्या दुधाचेच स्थान आहे. तर मग फळे म्हणजे धर्म बनू शकतील का? किंवा फळांना आपण कधी धर्म समजू का? गाय ही संपत्ती आहे व ती सर्वांची आहे.

प्राचीनकाळी गाय हे विनिमयाचे माध्यमपण होते. आजच्या रुपयाप्रमाणे त्या काळी गाईच्या माध्यमातून आपआपसात वस्तूची अदलाबदल केली जात असे. वैदिककालीन समाज व्यवस्थेमध्ये गाईचा व्यवहार उत्कर्षापर्यंत पोहचला होता. इतकेच नव्हे तर 'सोमयागा' मध्ये तर गाईच्याद्वारेच सोमरस घेणे आवश्यक समजले जात होते. गाईंचा संग्रह समृध्दीचे प्रतीक समजले जात असे. त्यामुळे त्या काळी बुद्धिजीवी वर्गाकडून गाईच्या अधिकाधिक प्राप्तीसाठी नवनव्या स्मृती रचण्याचा उदयोग केला गेला. सामाजिक स्मृती म्हणजे त्याकाळी न्यायशास्त्र होते. दैनिक जीवनातील मनुष्याच्या प्रत्येक कृतीला पाप म्हणणे व त्या पापाच्या परीमार्जनासाठी गाय दान देणे ही जी रुढी

आहे ती म्हणजे स्मृती रचणाऱ्या बुध्दिजीवी वर्गाकडून स्वत:साठी केलेली सोय आहे. कारण त्यांच्या उदरभरणाच्या तीन साधनांपैकी- भिक्षा, शिलोच्छवृत्ती (शेत कापून नेल्यानंतर जे धान्य कण राहतात ते खाऊन राहणे) व दान- फक्त दानाच्या साधनामध्येच तो वाढ करू शकत होता. आणि ते त्याने अशा प्रकारे वाढवले. मुंगूस मारले गेले तर कमीत कमी दहा गाई दान द्यायला हव्यात असे मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे. राजसत्तेला आपल्या मुठीत ठेवून व बहुतांशी जनतेला निरक्षर ठेवून ते स्मृतिकार स्वत:च धर्माचे व्याख्याते बनले. त्यांनी परिभाषा बदलली. उदा. जे गुरुकुलामध्ये शिकवतात त्यांनाच ऋषी म्हणावे, तसेच गो म्हणजे इंद्रियांच्या जागी गाय ठेवून गो म्हणजे गाय हा पशू असे समीकरण मांडणे, गाईच्या धर्माच्या नावावर उदोउदो करणे, राजे-महाराजे व महापुरुष यांच्या नावे नवे नवे नियम तयार करणे ही सर्व त्या स्मृतीकारांची देणगी आहे. खरोखर या स्मृती म्हणजे एका विशिष्ट वर्गाच्या उदरभरणाची व्यवस्था आहे. त्या व्यतिरिक्त त्यांत काही अर्थ नाही.

ज्याला सद्‌भाग्याने लिहिण्यावाचण्याचा अधिकार मिळाला आहे त्या स्वतंत्र भारताच्या नागरिकाला माझे नम्र निवेदन आहे की प्रत्येकाने या स्मृती अवश्य वाचाव्यात कारण न्यायालयात आज देखील हिंदू विधींच्या बाबतीत हिंदू धर्मावलंबियांना न्याय देण्यासाठी स्मृतीनाच प्रमाण मानले जाते. त्याग, तपस्या आणि साधनेचे तर नावच सोडा; पण संपूर्ण स्मृतिग्रंथात परमेश्वराचे एकदाही नाव आलेले नाही. उलट लिहिले आहे की पराशर स्मृती वाचणे म्हणजे वेदपठण करण्यासारखे आहे. म्हणजे तुम्ही स्मृतीग्रंथ वाचलात की वेद न वाचताही तुम्ही वेदज्ञ बनलात.

या स्मृतीकारांच्या या उद्योगामुळेच आज आम्ही गाईच्या नश्वर पिंडामध्ये आमचा सनातन धर्म पाहत आहोत म्हणजे आम्ही घरामध्ये राहत आहोत. पण आमचा धर्म गोठ्यामध्ये बांधलेला आहे. गुराखीसुध्दा झाडाच्या छायेमध्ये बसतो; पण आमचा धर्म मात्र जंगलात भटकत आहे. त्या गायरूपी धर्माला वाघ खाऊन टाकतो, तो मरतो किंवा त्याला कोणी पळवूनही नेऊ शकतो. गाईची पूजा तुम्ही करता व ती आशीर्वाद देते. डेन्मार्कला तेथील गाई दूध देण्याबाबत अत्यंत प्रसिध्द आहेत. मग तर आमचा धर्म तिकडे गेला. परंतु ते लोक गाईची पूजा करीत नाहीत तर तशाच प्रकारची गाय किंवा तिचा वंश उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात.

आणि जर गाय हा धर्म आहे तर जो गाईच्या अत्यंत नजीक आहेत ते गवळी लोक अत्यंत धार्मिक आहेत त्यांनी शेकडो वर्षांपासून अगदी पिढ्यान पिढ्या गाईची सेवा केलेली आहे. आज त्यांच्या अंगावर ना पुरेसे वस्त्र आहे ना पोटभर खायला अन्न आहे. बुध्दीचा निकष लावून त्यांना आम्ही मूर्ख समजत असतो.

केवळ प्राचीन शास्त्रात नव्हे तर प्रत्येक युगातील संताने देखील गोचा अर्थ इंद्रिये असाच सांगितलेला आहे. संत कबीर तर गाय कापण्याची गोष्ट करतात. पाहा-

**माता मारि परम पद पावै, पिता बधे सुख होय ।**
**गो काटे बैकुण्ठ सिधावै, सन्त कहावै सोय ।।**

श्रीकृष्ण म्हणतात की या संसारात त्रिगुणमयी प्रकृतीच माता आहे. व मीच परम चैतन्य बीजरूप पिता आहे याच अर्थाने कबीर म्हणतात की जो या प्रकृतिरूपी मातेचे दमन करतो तो त्या परमपद ईश्वराला प्राप्त करू शकतो. व त्याचेच नाव आहे पिता व ते पद म्हणजे परमात्मा होय. या परमात्म्याचे ज्ञान झाल्यानंतर तो पण भिन्न राहत नाही, तो पूर्ण तत्त्वात मिसळून जातो की जेथे सदैव वास करणारी शाश्वत शांती व शाश्वत सुख प्राप्त होते. परंतु याच्या प्राप्तीसाठी प्रथम 'गो'ला कापून टाकणे, कापूनच टाकीत नाही तर जो इंद्रियांच्या संयमित स्वरूपालासुध्दा नष्ट करतो त्यालाच प्रभूची प्राप्ती होते व तोच संत या उपाधीचा अधिकारी आहे. आणि या कारणास्तवच तुलसीदासांना गोस्वामी म्हटले जाते. एका गुराख्याला घड्याळात किती वाजले ते पाहायला शिकवले. तो साडे तीन वाजल्याचे सांगू शकत होता; परंतु तीन चाळीस वाजल्याचे सांगू शकत नव्हता. बुध्दीची ही पातळी असल्यावर त्यांच्याजवळ समृध्दी कोठून असणार? समृध्दीचे मूळ तर बुध्दी आहे, स्मृती आहे व येथे याचीच तर उणीव आहे. गाईंना चारता चारता डोकेही पशूप्रमाणे जड बनून गेले. कारण संगत मिळाली नाही. नेहमी सांगितले जाते की गाय समृध्दी देईल, मोक्ष देईल. पण मग या गुराख्यांना गाईंनी का काहीच दिले नाही? आज तर जे गवळी लोक थोडे चांगल्या परिस्थितीत आहेत ते आज सत्तर टक्के म्हशीच पाळत आहेत गायी नाहीत.

शास्त्रांनी जे सांगितले आहे ते खरेच आहे, की ईश्वर गो आणि द्विज यांसाठी वारंवार अवतार घेत असतो. परंतु त्या गोचा अर्थ गाय नावाचा पशू नव्हे. तर मनासहित इंद्रिये असा त्याचा अर्थ आहे. जो मायारूपी निद्रेतून जागा होतो, व जो गर्भवासाच्या

यातनांपेक्षा भिन्न असणाऱ्या आत्मस्वरूपाकडे वाटचाल करतो तोच द्विज होय. म्हणजे त्याला दुसरा जन्म प्राप्त झाला म्हणून तो द्विज होय. याच भक्तांसाठी, साधकांसाठी व विरही जनांसाठी भगवंत अवतार घेत असतो; कोणत्याही एका विशिष्ट जातीसाठी किंवा एखाद्या पशूसाठी नव्हे.

आम्ही असे म्हणत नाही की तुम्ही गाईला पूज्य मानू नका. पण गोरक्षेबद्दल ना कोणी विद्वान किंवा सत्तेवर असणारे पुरुष बोलत किंवा श्रेष्ठ अशा धर्मशास्त्रांमध्ये देखील ज्याचा उल्लेख नाही मग त्याचा दिंडोरा का पिटावा? जर असे कोठे असेल तर सांगा म्हणजे आम्हीही तसे मानायला लागू . पण केवळ पूर्वीपासून चालत आलेली एक पध्दत की जी चुकीची आहे, जी दिशाभूल करणारी आहे ती सुधारण्यासाठी आम्ही समाजाला आवाहन करीत आहोत की तुम्ही निर्भयपणे पुढे या व ही पध्दत मोडून टाका. अन्यथा गाईबद्दल हा पूर्वग्रह आम्हांला, तुम्हांला आपणा सर्वांना नष्ट करून टाकेल.

गाय हा एक अत्यंत उपयुक्त प्राणी आहे यात शंका नाही. गाय म्हणजे मूल्यवान धन आहे. धनाचे रक्षण व्हायला पाहिजे असे कोणाला वाटत नाही? तुम्हीही गाईंचे रक्षण करा; परंतु 'गाय हा धर्म आहे', 'गाय म्हणजेच सनातनधर्म आहे' असे सांगून समाजाची दिशाभूल करू नका. याबाबतीत विचार विमर्श करणाऱ्यांचे आम्ही नेहमी स्वागतच करू.

**तात्पर्य-** प्रत्यक्षदर्शी महापुरुषांचे हे म्हणणे अगदी सत्य आहे की, भगवंत गो आणि द्विजासाठी अवतार घेत असतात. परंतु गो म्हणजे गाय नावाचा पशू नव्हे आणि द्विज म्हणजे ब्राह्मण नव्हे. कारण जर या दोन कारणांसाठी भगवंत अवतार घेत असतील किंवा जगात फक्त या दोनच गोष्टी सुरक्षेला पात्र असतील तर अन्य जातींचे काय होईल? मग अन्य सर्वांनी परमात्म्याचे दर्शन प्राप्त करण्यासाठी दुसऱ्या एखाद्या उदार धर्माची कास पकडली पाहिजे. परंतु शास्त्राचे परिपूर्ण ज्ञान असणाऱ्या व पूर्णत्व प्राप्त झालेल्या महापुरुषांनी असे म्हटलेले नाही.

शास्त्रांमध्ये गो चा अर्थ मनसहित इंद्रिये असा आहे. इंद्रिये चंचल स्वभावाची असतात. ती सदैव विषयांकडे धावत असतात. काम-क्रोध-लोभ-मोह आणि अनंत वासनांच्याद्वारा ती विकृत होतात. अनंत योनींचे ती कारण बनतात. हीच गोहत्या आहे.

तीच सनातन परमात्म्यापासून तुम्हांला दूर घेऊन जातात व म्हणूनच सनातन धर्माच्या रक्षणासाठी गोरक्षणाची गरज आहे. याच्या उलट शम, दम आणि नियमांच्या द्वारे इंद्रियांना इष्टाच्या आदेशानुसार संयमित ठेवणे, काबूत ठेवणे म्हणजे गो-रक्षा होय. हेच आमचे कर्तव्य आहे, हाच आमचा धर्म आहे. कारण विवेक, वैराग्य, ध्यान, धारणा सतत चिंतन व त्या परमात्म्याच्या निर्देशानुसार इंद्रियांना वळण देण्याने ते सनातन शाश्वत असे म्हटले जाणारे अमृत तत्त्व विदित होते.

इष्टाच्या आदेशाप्रमाणे चालल्यानंतर इष्टरुप बनलेली संयत इंद्रिये ब्रह्मपीयूष धारण करू लागतात. त्यामुळे त्याला ईश्वरीय आनंदाची अनुभूती होऊ लागते. तेव्हा हीच नंदिनी होय. ज्याच्यामध्ये ईश्वरीय आनंद जागृत आहे, अशा महापुरुषाचे सान्निध्य आणि त्याच्या सेवेमुळे सहजपणे साधकाची कामनापूर्ती होऊ लागते (म्हणूनच पूर्वी राजे लोक महापुरुषांची गाय रोज चरायला घेऊन जात असत) आणि जेव्हा ही संयत इंद्रिये ईश्वराशी तद्रुप होतात तेव्हा ती सर्व कामनांची पूर्ती करणारी होते. व म्हणून ती कामधेनू आहे. त्या महापुरुषाच्या इच्छा इच्छाशक्तीत बदलतात. अगदी ईश्वर सुध्दा त्यांच्या इच्छापुर्ती करण्यास तत्पर राहतात.

**जो इच्छा करिहऊ मन माही । हरि प्रसाद कछु दुर्लभ नाही !**

कामधेनू म्हणजे काही पशू नाही की जी पाहिजे ती गोष्ट पानात टाकेल किंवा ती म्हणजे काही कल्पवृक्ष नाही. वस्तुत: 'सुनु सेवक सुरतरु सुर धेनु' स्वयं परमेश्वरच सेवकासाठी कल्पवृक्ष आणि कामधेनू बनतो. त्यामुळे भक्ताच्या सर्व कामना पूर्ण होतात.

तेव्हा लक्षात ठेवा की गो विकृती (इंद्रियांची विकृती) म्हणजे नरक आहे, अनंत योनी आहेत. मात्र गो ला उत्तम प्रकारे संयमित ठेवल्याने शाश्वत धाम प्राप्त होते. यावरच आमचा शाश्वत सनातन धर्म टिकून राहिला आहे. कारण सनातन परमेश्वर प्राप्तीचा हाच उपाय आहे आणि संपूर्ण जगातही हाच उपाय आहे.

**।। ॐ शान्ति : ।।**

# समीक्षा

## शंका-समाधान

'पशु गाय धर्म नाही' या श्री परमहंस आश्रम जगतानंदद्वारा प्रकाशित झालेल्या पुस्तकावर आक्षेप घेणारी एक पुस्तिका- 'सनातन धर्म की विग्रह स्वरूपा गौ माता' चित्रकूट येथील एका आदरणीय आचार्यांनी लिहिली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, गाय म्हणजे ईश्वर आहे, मोक्ष मिळेल तर गाईपासूनच मिळेल; तेव्हा गाईची पूजा करा. अथर्ववेद ९/७/१-२६ याचा आधार घेऊन त्यांनी सांगितले आहे की गाईच्या शरीरात देवतांचा वास आहे. परमेष्ठी प्रजापती तिच्या शिंगात आहेत. डोक्यात इंद्र, ललाटात अग्नी, गळ्यामध्ये यमराज व मस्तकात चंद्र आहे. वरच्या जबड्यात स्वर्ग, खालच्या जबड्यात पृथ्वी, जिभेत विजेचे तेज आणि दातात मरुताचा वास आहे. पाठीच्या हाडात रुद्राचा वास आहे तर शेपटीत वायूचा वास आहे. जेव्हा ती पूर्वेकडे तोंड करून उभी राहते तेव्हा ती इंद्र असते. जेव्हा दक्षिणा भिमुख उभी राहते तेव्हा ती यमराज असते. याप्रकारे सर्व प्रकारच्या देवतांचा वास गाईमध्ये आहे. म्हणजे सर्व देवांचा समूह म्हणजे गाय होय. सर्व शक्तिशाली देवतांचा वास तिच्यात आहे. वज्रधारी इंद्र व दंडधारी यमाचा वासही तिच्यामध्ये आहे.

दक्षिणेकडे गाईंची कत्तल मोठ्या प्रमाणात होते, तेव्हा त्या देवतांसाठी गाईंचे रक्षण तर केलेच पाहिजे. जिच्या नाभीमध्ये अमृत आहे अशा गाईंची कत्तल भारतातील अनेक राज्यांत आज होत आहे सर्व विश्वात तर किती कत्तल होते त्याची गणतीच नाही.

वास्तविक अथर्ववेदातील नवव्या कांडातील चौथ्या अनुवाकात असणाऱ्या सातव्या सूक्तातील या मंत्रात कोण्या गाईचे वर्णन केलेले नाही. कारण त्यातील तेरावा मंत्र पुढीलप्रमाणे आहे- ''क्रोधो वृक्कौ मन्युराण्डौ प्रजा शेप:'' तिचे दोन्ही मूत्रपिंड म्हणजे क्रोध आहे, तिचे दोन्ही अंडकोश म्हणजे तेज होय व प्रजा म्हणजे तिचे जननेंद्रिय आहे. ही उक्ती गाईसारख्या स्त्रीलिंगीय पशूसाठी समर्पक आहे का?

हीच कल्पना अथर्ववेदातील नवव्या कांडातील चौथ्या सूक्तात (ऋषभ सूक्त) पाहावयास मिळते. या सूक्तात म्हटले आहे की ऋषभाच्या दोन्ही कुल्ह्यामध्ये बृहस्पती, शेपटीमध्ये वायुदेव व ओटीपोटात सूर्यलोक आहे अशी कल्पना आहे. जो ब्राह्मण ऋषभाला प्रसन्न करतो तो शतयाजी म्हणजे शंभर यज्ञ करणारा बनतो. अग्नी त्याला जाळू शकत नाही. सर्व देवता त्याला तृप्त करतात.

आता प्रश्न असा निर्माण होतो की हा ऋषभ म्हणजे कोण? बैल? नाही कारण यजुर्वेदातील सतराव्या अध्यायातील एक्याणवव्या मंत्रात चार शिंगाच्या वृषभाचे वर्णन आहे. तर अथर्ववेदातील ४/५/१/ मध्ये 'सहस्त्र शृंगों वृषभो' - हजार शिंगे असणाऱ्या वृषभाचे वर्णन आहे. यजुर्वेदातील ९/९१ मध्ये त्याचे रहस्य स्पष्ट करताना म्हटले आहे, 'इंद्रस्य रूपमृषभो ।'' असा हा इंद्र, ऋषभ किंवा वृषभ परमेश्वर आहे, कोणी बैल नाही आणि गाय तर मुळीच नाही.

ऋग्वेदीय ऐतरेयोपनिषदाच्या मते तर गाईच्या शरीरात कोणत्याही देवतेचा वास नाही. कोणत्याही देवतेने गाईचे शरीर पसंतच केले नाही. या उपनिषदातील पहिल्या अध्यायातील दुसऱ्या खंडातील चार मंत्रात पुढील प्रमाणे वर्णन आहे. परमेश्वराने निर्माण केलेल्या सर्व देवता म्हणाल्या की आमच्या साठी अशा एका स्थानाची व्यवस्था करा की ज्यामध्ये राहून आम्ही लोक अन्नभक्षण करू शकू. परमेश्वराने त्यांच्यासाठी गाईचे शरीर आणले. तेव्हा देवतांनी सांगितले की निवास करण्यासाठी आम्हाला गाईचे शरीर योग्य नाही. मग ईश्वराने त्यांच्यासाठी मनुष्याचे शरीर आणले. तेव्हा देवता म्हणाल्या वा ! छान हे शरीर आमच्यासाठी सुयोग्य व सुंदर आहे. खरोखर मनुष्याच्या शरीराची रचना सुंदर आहे.

म्हणजे येथे गाईच्या शरीरापेक्षा मनुष्याच्या शरीराला श्रेष्ठ मानले आहे. परमात्म्याने त्या सर्व देवतांना सांगितले की तुम्हाला या शरीरात जे स्थान योग्य वाटेल ते ग्रहण करावे. तेव्हा अग्नी देवता वाक् इंद्रिय बनून मुखामध्ये प्रविष्ट झाली. वायू देवता प्राण बनून नाकाच्या छिद्रात प्रविष्ट झाली. दिशा कानामध्ये व चंद्र देवता मन बनून हृदयात प्रविष्ट झाली. हीच गोष्ट गोस्वामी तुलसीदास सांगतात की ''इंन्द्रिय द्वारा झरोखा नाना । तहँ तहँ सुर बैठे करि याना ।।'' सर्व देवता मनुष्याच्या शरीरामध्ये आत आहेत, बाहेर त्या कोठेही नाहीत. त्यासुध्दा दैवी व आसुरी वृत्तीच्या रूपात

असणाऱ्या देवी-देवता जसे गीतेमध्ये योगेश्वर कृष्णांनी सांगितले आहे.! मग गाईच्या शरीरात देवता आहेत असे कोण म्हणते ?

एका ठिकाणी असे लिहिले आहे की त्रिपुरासुराने अमृताचे कुंभ चोरले होते. अमृताच्या प्रभावामुळे तो मरत नव्हता तेव्हा भगवान विष्णूनी गाईचे रूप घेतले ब्रह्माने वासराचे रूप घेतले , आणि सर्व अमृत पिऊन टाकले. राक्षस मारला गेला म्हणून गाईला देव समजले पाहिजे कारण ती विष्णुस्वरूपा बनली होती.

पण शंकराचे भस्मासुरापासून रक्षण करण्यासाठी विष्णूने एकदा मोहिनीचे रूप घेतले होते. सागर मंथनाच्या वेळी मोहिनी रूपात तर विष्णूने दैत्यांना सुरा दिली होती. मग सर्व लावण्यवती स्त्रियांची पूजा करीत बसायचे का? 'समर जलंधर सन सब हारे' आपल्या पत्नीच्या सतीत्वाच्या प्रभावामुळे जलंधराला मृत्यू येत नव्हता तेव्हा 'छल करि टारेउ तासु ब्रत' याच विष्णूने कपट केले. जलंधराचे रूप घेऊन त्याच्या पत्नीचे सतीत्व नष्ट केले आणि जलंधराला मारण्यात यश मिळवले. जर एकदा विष्णूने गाईचे रूप घेतले म्हणून जर सर्व गाई पूज्य असतील तर मग मर्यादेचे, नीतीचे उल्लंघन करणाऱ्या सर्व चारित्र्यहीन पुरुषांना विष्णूरूप मानायचे का? करा ना मग त्यांची पूजा ! अहो, ईश्वराने मत्स्यावतार, कच्छपावतार किंवा वराह अवतार घेतला होता मग आम्ही माशांना, कासवांना किंवा डुकराना पूज्य मानून त्यांची का पूजा करीत नाही? मग गाईबाबतच हा मोह किंवा भ्रम कशासाठी? ब्रह्मा-विष्णू-शिव हे सृष्टीचे संचालन करतात त्यामुळे ते त्यांच्याप्रमाणे कामे करतात. त्यात पूजण्यासाठी गोष्ट कोठून आली?

प्रायश्चित, तत्त्व, मदन पारिजात, अपरार्क इत्यादी अर्वाचीन पुस्तकांमध्ये गोमती-विद्येचे वर्णन केलेले आहे. ज्यामध्ये गोहत्येच्या पापाच्या शुध्दीसाठी गाईंची स्तुती करताना म्हटले आहे की गाई म्हणजे ब्रह्माच्या मुली आहेत. म्हणजे ब्राह्मण व गाय हे एकाच कुळातील असून दोन विभागात त्यांची वाटणी केली आहे. ज्यात ब्राह्मणांमध्ये वैदिक मंत्र वास करीत असतात व गाईंमध्ये देवतांसाठी असणाऱ्या आहुती राहतात असे म्हटले आहे.

वास्तविक ब्रह्मदेव व ब्रह्मदेवाची सृष्टी दोन्ही नश्वर आहेत ''आब्रह्म भुवनाल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन'' ब्रह्मा आणि त्याची सृष्टी पुनर्जन्माच्या क्षेत्रात येतात. जर तेच शाश्वत व सनातन नाही तर त्यांच्यापासून उत्पन्न झालेली गाय सनातन धर्म कशी बनली? अहो

जे जन्म मरणाच्या सीमेपलीकडे आहे त्याचे भजन का नाही करीत? मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते । गीता ८/१६ जे मला प्राप्त होतात त्यांचा पुनर्जन्म होत नाही व म्हणून ''भजस्वमाम'' माझे भजन कर. गाय किंवा अन्य कशाचे नाही.

रामचरित मानसामध्ये असे लिहिले आहे की ''विधी प्रपंच गुन अवगुन सान ।'' प्रपंच म्हणजे काय? ते सांगतात की ''दानव देव ऊँच और नीचू । अमिय सुजीवन माहुर मीचू ॥ सरग नरक अनुराग विरागा । निगमागम गुन दोष विभागा ॥'' स्वर्ग, नरक, दानव-देवता स्थावर जड चेतन सर्व विधात्याचा प्रपंच आहे, ज्यामध्ये गाय पण आहे. आपण प्रपंचाची, जंजाळाची वा धोक्याची पूजा का करता?''

या सर्व आक्षेपांतून बाहेर पडण्यासाठी लेखक महाशय म्हणतात की गाय ही विधात्याच्या सृष्टीच्या बाहेर आहे, ती लोकोत्तर आहे. तिने स्वेच्छेने पशूचे शरीर धारण केले आहे. तिचा पशुचित आहार-विहार आणि शरीर त्याग म्हणजे फक्त एक लीला आहे. ती सर्व लोकहितासाठी आहे. म्हणजे गाय काय झाली तर भगवान बनली. ठीक आहे, जर गाय पशू नाही तर तिला दुसरे काही नाव द्या. पण ती ईश्वर कसे काय बनली? गाय शरीरधारी आहे. डोळ्याने तिला पाहता येते. बुध्दीने तिला जाणता येते परंतु तो ईश्वर मात्र मनबुध्दीच्या पलीकडे आहे.

गाईने मानवाच्या हितासाठी जर अवतार घेतला आहे तर कोणाला आपले हित वाटले तिचे दूध, दही व तूप सेवन करण्यात, तर कोणाला तिचे कातडे, हाडे, मांस, मज्जा व गोरोचनपासून तयार होणाऱ्या औषधामध्ये स्वत:चे हित आहे असे वाटले तर त्यात वाईट काय आहे? हित कशात आहे हे काही कुठे सांगितलेले किंवा लिहिलेले नाही.

महाभारतामध्ये समरांगणातील दिव्यास्त्रांचा प्रभाव ज्यांच्यावर पडू शकला नाही त्या श्रीकृष्णांनी एका पारध्याचा बाण स्वीकारला व आपला अवतार संपवला जर गायदेखील काही लीला दाखवून शरीराचा त्याग करीत असेल तर तिला तिच्या लीला करू द्या. तिच्या लीलेमध्ये कोण अवरोध निर्माण करणार आहे?

लेखकाच्या मते गाईवर संकट येताच ईश्‍वर अवतार घेईल. भगवंत येताच गाईचे रक्षण होईल. मग मध्येच हा मनुष्य का काळजीत आहे? गाईच्या रक्षणासाठी ती तुमची अपेक्षा करीत असेल तर ती तुमची रक्षण कसे करू शकेल? जो सर्वांचा रक्षणकर्ता

आहे- ‘‘जाकर तै (गाय) दासी सो अविनाशी, हमरउ तीर सहाई’’- त्या अविनाशी भगवंताची भक्ती का करीत नाही?

भगवंताचा अवतार लवकर व्हावा यासाठी नारदासारख्या महर्षींनी कंसद्वारा देवकीच्या सहा अबोध व निरपराध शिशूंची हत्या घडवून आणली. एक महात्मा अशा प्रकारच्या हत्त्येला प्रोत्साहन करत होते. आणि तेही श्रीकृष्णाच्या सख्या भावांची, तरीही नारदाला कसलेही पाप लागले नाही. श्रीकृष्णाकडे त्यांचे येणे-जाणे व आदर सत्कार यथावतच राहिला. त्यात काही फरक पडला नाही. तेव्हा कमीत कमी महात्म्यांनी तरी हे संकट नारदाच्या चरम सीमेपर्यंत पोहचवले पाहिजे ज्यामुळे अवतार घेण्याची गोष्ट भगवंत टाळू शकणार नाहीत.

लेखकाने कवी कालिदास प्रणीत रघुवंश या महाकाव्यातील उदाहरण दिले आहे की महाराज दिलीपने गाईची सेवा केली, ज्यामुळे त्याला पुत्रलाभ झाला. दिलीप चक्रवर्ती राजा होता. जर गाईला चरायला नेण्याने संतानप्राप्ती होत असती तर मग त्याने स्वत:च्या गाईंनाच चरायला का नाही नेले? वास्तविक संतानसुख नसण्याचे दु:ख घेऊन तो गुरू वशिष्ठांकडे अत्यंत नम्रतेने गेला. स्वत:चे दु:ख कथन केले. गुरू वशिष्ठांना दया आली. त्यांनी त्याला गाय साफ करण्याचे काम सोपवले, त्यांच्या जवळ गायच होती तर मोटर साफ करण्याचे काम ते राजा दिलीपला कोठून सांगणार?

खरी गोष्ट तर पुढेच आहे. जेव्हा गाईला वाघाने पकडले तेव्हा राजा दिलीपने वाघाला सांगितले की ही गाय गुरू वशिष्ठांची आहे तेव्हा तिला सोडून दे. त्याने असे नाही म्हटले की गाय धर्म आहे म्हणून तिला सोड. वास्तविक महापुरुषांची केलेली सेवाच आशीर्वाद बनून फळत असते. महापुरुषांची इच्छा तर भगवंतच पूर्ण करीत असतात- ‘‘जो इच्छा करिहउ मन माही । हरि प्रसाद कछु दुर्लभ नाही.’’ आमच्या परमहंस महाराजांनी अनेकांना आशीर्वाद दिला. परंतु हा उपहार किंवा भेट महापुरुषांनी दिलेली असते, गाईची नसते. दशरथाला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद महापुरुषाने दिला होता. त्यावेळी जुना फार्म्युला असतानादेखील महर्षी वशिष्ठांनी राजा दशरथाला गो सेवेची अट घातली नाही. महाराज दशरथाला पुत्रप्राप्तीसाठी दुसरा उपाय सांगितला. महाभारतामध्ये नियोग पध्दतींचा अवलंब केला गेला. गाईला चरायला नेणे हा जर पुत्रप्राप्तीचा उपाय असता तर वंशोच्छेदाचे भय असणाऱ्या अनेक परिवारांमध्ये आशेचे दीप प्रज्वलित झाले असते. कोणीही संतानविहीन राहिले नसते.

गाईंच्या समर्थनार्थ लेखकाने महाभारतातील वशिष्ठांची कामना उध्दृत केली आहे की ज्या प्रकारे नदी सागराला मिळते त्याप्रमाणे भरपूर दूध देणाऱ्या, ज्यांची शिंगे सोन्याने मढवली आहेत अशा गाई मला निरंतर मिळोत. लेखकमहाशय म्हणतात की जर गाय धर्म नसती तर वशिष्ठ मुनींनी गाईंमध्ये राहणे का पसंत केले असते? वास्तविक महर्षी वशिष्ठ चक्रवर्ती राजांचे पुरोहित होते म्हणून तर सोन्याने मढवलेले शिंगे असणाऱ्या गाईंची ते कामना करत होते. सोन्याची शिंगे असणाऱ्या गाई काही उत्पन्न होत नाहीत. तशी शिंगे तर कोणी मढवूनच दिली पाहिजेत. वास्तविक त्यांनी थोड्या गाईंनीही संतुष्ट व्हायला पाहिजे; पण म्हणतात ना ''जिमि प्रतिलाभ लोभ अधिकाई'' संपत्तीने मन संतुष्ट झाले नाही तर त्यात नवल नाही. याचेच तर त्यांना दु:ख होते- उपरोहित्य कर्म अति मन्दा । वेद पुराण सुमृति कर निन्दा ॥''

वशिष्ठांची कशाला? वैदिक ऋषींची कामना पाहा- ''समेयमश्वं गां वासऽ आत्मातं तव पूरुष: । यजु. १२/७८ हे परमात्मा, घोडा, गाय, वस्त्र आणि आत्मा यांचे मला निरंतर सेवन करू दे. ''अन्नवतां ओदनवतां आमिक्षवतां एष: राजा भूयासम ।'' हे भगवन, जेथे अन्न असेल, जेथे नेहमी तांदूळ मिळतील, जेथे दूध, दही व गोवऱ्या सतत प्राप्त होतील अशा लोकांचा मला राजा बनव. आजचे लोक असते तर त्यांनी म्हटले असते भगवन, मला मुंबईला राहावयाचे आहे, तेथे मला फ्लॅट हवा आहे मग काय हा धर्म झाला? वशिष्ठांनी कामना केली तर काय झाले? पुरोहित आणखी काय मागणार? पुष्कळ दानांमध्ये, संपत्तीमध्ये तेव्हा गोधन हेच श्रेष्ठ होते.

महाभारतात गाईपेक्षा श्रेष्ठ अशी एक वस्तू सांगितली आहे व ती म्हणजे सोने होय. अनुशासन पर्वामध्ये असे सांगितले आहे की, क्षत्रियांच्या संहाराचे पापातून मुक्त होण्यासाठी परशुरामाने पृथ्वी, गाय आणि अन्न आदींचे दान केले. अगदी अश्वमेघ यज्ञही केला; परंतु तरीही ते पापातून मुक्त झाले नाहीत. तेव्हा त्यांनी वशिष्ठ इत्यादी ऋषींना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की भृगुनन्दन, पृथ्वीवर भूमी, गाय आणि सर्व दानामध्ये पावन असे सुवर्ण दान होय ते तू दान कर.

ज्या गाईचे रक्षण ईश्वर करीत असतो ती गाय म्हणजे मनासहित इंद्रिये होत. आपल्या स्वत:च्या बळाच्या जोरावर साधक या इंद्रियांना वश करू शकत नाही. ''छूटइ मल कि मलहि के धोये'' कारण ''गो गोचर जहँ लगि मन जाई । सो सब माया जानेहु भाई ।'' तुम्ही बुध्दिपूर्वक विचारपूर्वक एखादी गोष्ट केली तरी मायावी क्षेत्रातीलच तो

लहान मोठा निर्णय असतो. तो मायेपलीकडचा अविनाशी निर्णय असू शकत नाही. यासाठी ''तुलसी मन वश होइ तबहिं जब प्रेरक प्रभू बरजै ।'' जोपर्यंत तो परमेश्वर हृदयावर स्वार होत नाही व मनाचे लगाम हातात घेत नाही, (हृदयावर स्वार होणे, रथी होणे म्हणजेच ईश्वराचा अवतार होय जोपर्यंत ते असे करीत नाही) तोपर्यंत परमेश्वर आपल्यावर कसलीही कृपा करीत नाहीत. भगवंताची आपल्यावर कृपा झाली आहे असे मानण्याने भगवंताची कृपा होत नाही. मानसमध्ये सांगितले आहे की ''जेहि पर कृपा करहि जनु जानी । कवि उर अजिर नचावहिं बानी ॥'' कृपा झाल्याची अनुभूती होऊ लागते. श्रीकृष्ण म्हणतात की साधनेच्या योग्य मार्गावर चालण्यानेच म्हणजेच 'नियत कर्म' करण्यानेच तो निर्लेप, साक्षी परमात्मा हृदयात जागृत होतो. क्रमश: ''अनुमन्ता, उपदेष्टाच भर्ता, भोक्ता महेश्वर: और परमात्मेति'' बनत जातो. पूज्य महाराजश्री म्हणत की ''भगवंत इतका बोलणारा आहे की तुम्ही आम्ही जसे तासन तास गप्पा मारतो तसे भगवंत आमच्याशी बोलत राहतो. भजन कोणी करत नाही; परंतु भगवंत आमच्याकडून करवून घेतो. परमेश्वर आमच्या बरोबर नसेल तर निवृत्ती देणाऱ्या भजनास प्रारंभच होणार नाही.''

बाहेरच्या जगातील पशू योनीतील गाय ही केवळ एक संपत्ती आहे. अथर्ववेदात म्हटले आहे गावो भगो (४/११/५) अर्थात गाय धन आहे. महाभारतात म्हटले आहे की ''गोभि:स्तुल्यं न पश्यामि धनं किंचित इद्राच्युत'' (अनुशासनपर्व ५१/२६) म्हणजे गाईसारखे दुसरे धन या जगात दिसत नाही. ठीक आहे गाय म्हणजे धन आहे. सामाजिक व्यवस्थेसाठी धन आवश्यक आहे. धनोपार्जन्य व धनसंग्रह करण्यासाठी लोक किती कष्ट करीत असतात. तेव्हा धन म्हणून तुम्ही गाईचे रक्षण अवश्य करा पण गाय म्हणजे वैकुंठाचे साधन आहे, ती परम धर्म आहे असे सांगून भोळ्या जनतेला भयभीत करू नका.

या पुस्तिकाच्या लेखकाने एक मनोरंजक तर्क केला आहे. की ''गो द्विज धेनु देव हितकारी'' येथे गोस्वामी तुलसीदासानी गो व धेनू या समानार्थक शब्दांचा उपयोग यासाठी केला आहे की 'गो' शब्दाचा भले लोकांनी अनेक अर्थ काढले तरी 'धेनु' हा शब्द तर गाईशिवाय दुसऱ्या कोणासाठी वापरला जात नाही किंवा 'धेनु' या शब्दातून गाईचाच बोध होतो. हे खरे ना? पण अहो, 'धेनु' शब्द पण अनेकार्थी आहे मग आता काय करावे? वेदामध्ये हा शब्द वाणीसाठी पण वापरला आहे ''सा ते काम दुहिता धेनुरुच्यते यामाहुर्वांच कवयो विराजम'' (अथर्व ९/२/५) येथे धेनू शब्द धनसूचक

आहे. मत्स्य, पुराण, वराह पुराण इत्यादीमध्ये दहा प्रकारच्या धेनूंचे वर्णन आले आहे जसे गुडधेनु, तिलधेनु, मधुधेनु, शर्कराधेनु, दधिधेनु, घृतधेनु, नवनीतधेनु, रत्नधेनु, जलधेनु, लवणधेनु, कपासधेनु, अनाजधेनु- हे सर्व धन नाही तर काय? म्हणजे आजच्या युगात रेडियम धेनु आहे, पेट्रोल धेनू आहे, वीज धेनु आहे.

भौतिक संपत्तीचा उपयोग मानवाच्या आयुष्यापर्यंत सीमित आहे. परंतु मृत्यूनंतर जी संपत्ती साथ देते ती म्हणजे आत्मिक संपत्ती होय. ते त्याचे स्वत:चे धन आहे. हे धन एकदा प्राप्त झाले की निश्चितपणे ते मनुष्याचे कल्याणच करते. गोसंयमाद्वारेच ही आत्मिक संपत्ती प्राप्त होत असते म्हणून गो चे दुसरे नाव धेनू असे आहे. आत्मिक संपत्तीलाच श्रीकृष्णांनी गीतेमध्ये दैवी संपत्ती असे म्हटले आहे. म्हणूनच गोचे तिसरे नाव सुरभी असे आहे कारण ती परमदेव परमात्म्याच्या सुरत्वाला आपल्यासारखे स्थान देते.

असे सांगितले जाते गाई चारून येताना श्रीकृष्णाच्या कपाळी गाईच्या पावलाची धूळ लागलेली असे व म्हणून ती गोमाता धन्य होय. एक जण गोष्ट सांगत होता की एक मौलवी रोज पावशेर दूध विकत घेत असत. एक दिवस मौलवी फार रागवले ते गवळ्याला म्हणाले काल तू कसले दूध दिले होतेस तुझ्या दुधात माशी पडली होती. गवळी हसला व म्हणाला मौलवी साहेब, पावशेर दुधात माशी नाही निघणार तर काय हत्ती निघणार आहे? याप्रमाणे श्रीकृष्ण लहानपणापासून गाई चरायला नेत असत. नंदाकडे तसा रिवाजच होता.

गोधुलीने जर शोभा वाढत असेल तर आजकालच्या गुरख्यांची शोभा का नाही वाढत? हा पण तर्क बरोबर नाही की स्वेच्छेने वा गाईला धर्म समजून गाई चरायला नेत असत कारण जसे अक्रुराकडून समजले, श्रीकृष्ण मथुरेला गेले आणि, त्यानंतर गाईंना चरायला नेण्याचा प्रसंग पाहावयास मिळत नाही. मग कुठे गेली त्यांची इच्छा? त्यांनी आपला गो-चरण धर्म का सोडून दिला? आता गोमूत्राने श्रीकृष्णाला स्नान घालण्याची गोष्ट राहिली. पण आजही आदिवासी व मागासलेल्या भागातील लोक की जेथे दवाखाना नाही तेथे देवी इ. चर्मरोग झाल्यावर शेणाने स्नान घातले जाते, तूप व दुधाच्या डेऱ्यावर शेणाचा लेप करून बाजारात ते घेऊन जातात, ग्रहण लागल्यावर शेण सर्व बाजूला (डेऱ्याच्या) लावले जाते. हा त्यांचा एक तोडगा आहे, रीत आहे दूध-दही-तुपाचे रक्षण करण्याचा, तसेच रोगनिवारण करण्याचा प्रयास आहे, धर्म नव्हे.

विद्वान लेखकमहाशयांनी आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. ते म्हणतात की निशाचर गो-ब्राह्मणांवर अत्याचार करीत असत, डुकरावर किंवा गाढवावर नाही. गाय धर्म नसती तर निशाचरांची सर्वाधिक बळी कशाला झाली असती? परंतु या गोष्टीत काही तथ्य नाही. रावणाकडे ''महिष मानुष धेनु खर अज'' हे सर्वकाही भक्षण केले जात असे केवळ गायच नव्हे तर गाढवाचे मांसही भक्षण केले जात असे. मग कोण म्हणते केवळ गायच नव्हे तर गाढवाचे मांस भक्षण केले जात नसे ते ! हो, एक गोष्ट खरी की गाय त्यावेळची संपत्ती होती आणि ब्राह्मण बुध्दिजीवी होता. दोघेही सामाजिक व्यवस्थेचे आधारस्तंभ होते. त्यामुळे ते दोघे सहज प्राप्य नव्हते. त्यामुळे त्यांना मिळवण्यासाठी रावणाला शक्ती खर्च करायला लागत होती. आजदेखील एखादा देश दुसऱ्या देशावर हल्ला करतो तेव्हा तो तेथील संपत्ती लुटण्याचा व बुध्दिजीवी लोकांना नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. मग ज्याच्यावर अत्याचार होतो त्याला काय सनातन धर्म म्हणायचे? दानव व देवता या दोन्ही विधात्याच्या प्रपंचाचे दोन घटक आहेत. एक गुणाचे नाव आहे व दुसरे दुर्गणाचे नाव आहे. दानव म्हणजे मोठ्या शिंगाचे राक्षस नव्हेत. श्रीकृष्णाला भगवंत म्हटले जात असे, वसुदेवाला देवता, नंद-यशोदा यांना मानव तर बाणासुर व कंस इत्यादी सगे-सोयरे यांना राक्षस संबोधले गेले आहे. म्हणजे ज्यांच्यात ज्या गुणांचे बाहुल्य होते त्या गुणाप्रमाणे त्यांना नाव मिळाले. श्रीकृष्णांच्या मते (गीता अ १६) सृष्टीमध्ये मनुष्य केवळ दोन प्रकारचा असतो. चार किंवा दहा प्रकारचा नसतो. मनुष्याची तिसरी जातच नसते. दैवी गुण असणारी व्यक्ती देवता असते आणि आसुरी गुण धारण करणारी व्यक्ती राक्षस असते. दोन सख्या भावांमध्ये एक देवता तर दुसरा असुर असू शकतो. आणि त्यांचे खाणेपिणे धर्माचा मापदंड होऊ शकत नाही.

महाशय सांगतात की गाय हव्यद्वारा देवतांचे, कव्यद्वारा पितरांचे, दूधदह्याद्वारा मनुष्याचे आणि मूलमत्रद्वारा धान्याचे रक्षण करते. असे समजले जाते की स्वाहा म्हणून हव्यद्रव्य अग्नीमध्ये टाकून जो यज्ञ केला जातो त्यामुळे देवतांचे पालन पोषण होत असते. आता येथे प्रथम हा विचार करायला हवा की अग्नीमध्ये तूप आणि हव्यद्रव्य टाकण्याने खरा यज्ञ होतो का? किंवा या क्रियेला यज्ञ म्हणायचे का? गीतेमध्ये श्रीकृष्णांनी परमात्म्याशी मिलन करवणाऱ्या विधीला यज्ञ म्हटले आहे. श्वास-प्रश्वासाचे हवन म्हणजे यज्ञ. इंद्रियाचे शमन म्हणजे यज्ञ. महापुरुषांच्या स्वरूपाचे स्मरण म्हणजे यज्ञ. श्वास-

प्रश्वासाच्या गतीचा निरोध करून प्राणायामाची स्थिती प्राप्त करणे म्हणजे यज्ञ. संकल्पांचा निरोध म्हणजेच प्राणायाम होय. हीच मनाची विजेतावस्था आहे. चित्तवृत्तीच्या निरोधाची अवस्था होय. आणि हेच यज्ञाचे फलित असते- ''यज्ञ शिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम (४/३१)'' यज्ञाचे फलित असते सनातन ब्रह्म ! ज्या यज्ञाच्या पूर्तीनंतर सनातन ब्रह्म प्राप्त होत नाही तो यज्ञ कसला? स्वाहा म्हणण्याने किंवा चरणामृत प्याल्याने परमात्मा प्राप्त होत नाही.

योगेश्वर श्रीकृष्ण सांगतात की अर्जुना, हे संपूर्ण यज्ञ मन आणि इंद्रियाद्वारेच संपन्न होत असतात. जेव्हा तुम्ही तुमच्या प्राणायामात मग्न होता, तुमचा चेहरा स्थिर होतो तेव्हा तुमची श्रध्दा, तुमचे मन, अनुराग, विरह सर्व काही माझ्यायेथेच केंद्रित होते. श्रीकृष्ण म्हणतात की, भौतिक द्रव्यांनी सिध्द होणाराही यज्ञ आहे, परंतु श्रीकृष्णांनी सांगितलेल्या यज्ञापेक्षा हा यज्ञ अगदी कमी प्रतीचा आहे, अल्प फलित देणारा आहे. तर मग ज्याचे फळ अधिक आहे असा श्रीकृष्णप्रणीत यज्ञ का करू नये? गीतेमध्ये जो यज्ञ सांगितला आहे तोच यज्ञ का करू नये? श्रीकृष्णांनीही ठामपणाने यज्ञाचा हाच शास्त्रविधी आहे असे सांगितले आहे जो हा शास्त्रविधी सोडून नाममात्र यज्ञ करतात म्हणजे त्यांनी त्याला यज्ञ हे नाव दिलेले असले तरी तो खरा यज्ञ नव्हे, असा यज्ञ जे करतात ते यज्ञ करीत नाहीत उलट परमात्म्याचा तिरस्कार करतात. द्वेष करतात म्हणजे प्राप्त होणारी गोष्ट म्हणजे शत्रुत्व असेल व तेही भगवंताशी? मग तर रक्षण असंभव !

जे गीतोक्त विधीप्रमाणे यज्ञ करीत नाहीत त्यांच्याबाबत योगेश्वर म्हणतात की अशा नराधमांना, क्रूरकर्म करणाऱ्यांना आणि पापाचार करणाऱ्यांना मी अपवित्र नरकात टाकत असतो. वारंवार त्यांना पशु योनीत ढकलीत असतो. हाच नरक आहे. नरक म्हणजे पाताळात खोदलेले नरक कुंड नव्हे. या प्रकारे श्रीकृष्णप्रणीत यज्ञामध्ये गाईचे दूध, तूप हवे असे लिहिलेले नाही. हो, त्यांनी गो-संयम आवश्यक आहे असे मात्र जरूर सांगितले आहे. या संयमाने इच्छित रस (परमेश्वरप्राप्तीचा) अवश्य प्राप्त होतो. जेथे गो-संयम केला जातो त्याला सनातन तत्त्व विदित होऊ लागते. यासाठी गोरक्षा आमचा सनातन धर्म आहे. गाई बैलाना पाळणे किंवा राखणे म्हणजे गोरक्षण नव्हे किंवा सनातन धर्मही नव्हे.

वेदामध्येही गाईचे नाभीस्थान कापून यज्ञ करण्याचा विधी सांगितला आहे. गाईला निर्लेप-शुध्द करून तिचे दूध काढावे असे सांगितले आहे- निरस्य रस गविषो दुहन्ति

(क्र १०/७६/७) गोस्वामीदेखील असेच म्हणतात- 'जित पवन मन गो निरस करि मुनि ध्यान कबहुँक पावही ।'' गाईला निर्लेप केल्यानंतर भगवंत ध्यानात येतात. म्हणजे येथे गो म्हणजे गाय का? नाही कारण अन्यत्र ते म्हणतात- ''निरस्य इन्द्रियादिकं यान्ति ते गतिं स्वकं''- इंद्रियांना निर्लेप-शुध्द म्हणजेच विषयरहित केल्यानेच स्वयंस्थिती व स्वरूपामध्ये स्वरूपस्थिति प्राप्त होते. गो म्हणजे गाय हा जरी अर्थ असला तरी आत्म्याच्या सद्‌गतीसाठी परमात्म्याच्या प्राप्तीच्या संदर्भात गो चा अर्थ मनसहित इंद्रिये असा आहे, गाय म्हणजे गाय हा प्राणी नव्हे. ''गच्छन्ति विषयानि इति गाव'' जे विषयामध्ये गमन करतात त्यांना गाय म्हटले आहे. पण गाय म्हणजे इंद्रिये त्यांना विषयांपासून निवृत्त करून परमात्म्याकडे वळवायचे आहे. यालाच साधना म्हणतात. वेदामध्ये सांगितले आहे की, ''शूरो न गोषु तिष्ठति'' (ऋग्वेद ९/१६/६) म्हणजे शूरवीर त्यालाच म्हटले जाते जो इंद्रियांमध्ये रममाण होत नाही. गाईची पूजा केल्याने परमगती प्राप्त होते असे विधान वेदामध्ये कोठेही नाही आणि दुसरीकडेही कुठे लिहिलेले नाही.

जे कावळ्याला खायला घातले जाते त्याला कव्य असे म्हटले जाते. असे मानले जाते की कव्य दिल्याने आमचे पितर तृप्त होतात. परंतु योगेश्वर श्रीकृष्ण काही वेगळेच समजतात. गीतेच्या १५ व्या अध्यायात ते म्हणतात की अर्जुना, वारा ज्याप्रमाणे सुगंधाच्या स्थानाकडून सुगंधाचे अपहरण करून घेऊन जातो, अगदी त्याच प्रमाणे प्राणिमात्रांचा स्वामी जो जीवात्मा ज्या शरीराचा त्याग करतो त्या शरीरातील इंद्रिये आणि मनद्वारा होणारा व्यापार (हालचाल व्यवहार) बरोबर घेऊन दुसऱ्या शरीरात प्रविष्ट होतो आणि दुसऱ्या शरीरात इंद्रियांचेद्वारा पुन: विषयसेवन करू लागतो.

दुसऱ्या अध्यायात ते म्हणतात की ''वासांसि जीर्णानि यथा विहाय''. ज्या प्रकारे तुम्ही आम्ही जुने वस्त्र बदलून नवीन वस्त्र चढवतो बरोबर त्याच प्रकारे आत्मा शरीररूपी वस्त्र बदलत असतो. वस्त्र बदलणारा जिवंत आहे तर मग कव्य कोणाला देता? इकडून त्याचे शरीर सुटले दुसरीकडे त्याला प्राप्त झाले. मध्यंतरी कसला विराम नाही. कसला खड्डा नाही, नरक नाही ज्यात आपले पितर आपली प्रतीक्षा करीत असून तुम्हांला त्यांना तृप्त करायला हवे. आत्मा कोठेही गेला तरी तेथेही भोग आहेतच. मग कोणाला तुम्ही तृप्त करणार? त्या आत्म्याची तृप्ती जेव्हा होईल तेव्हा ती मानव शरीरातच होईल. कव्य अर्पण केल्याने होणार नाही. त्यामुळेच अर्जुनाने ''लुप्त पिण्डोदकक्रिये'चे

भय व्यक्त केले तेव्हा योगेश्वर श्रीकृष्णाने ते अज्ञानमूलक ठरवले- ''कुतस्त्वा कश्मलमिंद विषमे समुपस्थितम'' (२/२) पूर्वजांच्या निमित्ताने जे दान-पुण्य केले जाते ती फक्त श्रध्दा आहे. त्यासाठी तुम्ही कितीही करा त्याने त्यांची तृप्ती कशी होणार? आणि कावळ्याला कव्य दिल्याने मनुष्याच्या आत्म्याला तृप्ती? गीतेने अशा अंधविश्वासाचे कोठेही समर्थन केलेले नाही.

लेखक महाशय लिहितात की केवळ हव्य-कव्यच नव्हे तर गाय मनुष्याला धर्म, अर्थ, काम आणि मोक्षही देते, लोक व परलोक देते व म्हणून गाय धर्म आहे. परंतु याबाबत रामचरितमानस काय म्हणते ते पाहा-

**वरषा रितु रघुपति भगति, तुलसि सालि सुदास ।**
**राम नाम बर बरन युग, सावन भादव मास ।। १/१९**

रघुपतीची भक्ती म्हणजे वर्षा ऋतू आहे धान्य म्हणजे प्रभूचा दास आहे. श्रावण व भाद्रपद हे दोन महिने म्हणजे राम नाम हे दोन शब्द आहेत. म्हणजे भक्ताचे समाधान-तृप्ती या नामजपानेच होणार आहे. गाईमुळे नाही.

**आखर मधुर मनोहर दोऊ । बरन विलोचन जन जिय जोऊ ।।**
**सुमिरत सुलभ सुखद बस काहू । लोक लाहु परलोक निबाहू ।।**

रामाचे नामस्मरण या लोकात समृध्दी आणि परलोकात परम सुख देते. हे रामनामाचे महत्त्व आहे, हा रामनामाचा महिमा आहे, गाईचा नाही सब जगु ताहि अनल ते तात । जो रघुवीर विमुख सुनु भ्राता ।। जो भगवंतापासून विन्मुख आहे त्याच्यासाठी समस्त जग अग्निपेक्षा अधिक जाळणारे ठरते (अरण्य १/८) मग सुखाची गोष्ट कसली?

**अन्धकार वरु रविहिं नसावै ।**
**राम विमुख जीव न सुख पावै ।। ७/१२१/१८**

एका परमात्म्याशिवाय अन्यत्र कोठेही सुख नाही मग मिळणार कोठून?

असे म्हटले जाते की गाय मोक्ष देईल, गोमाता तारेल. पण गोस्वामी म्हणतात-

**रामचन्द्र के भजन बिनु, जो पद चह निर्वान ।**
**ज्ञानवन्त अपि सो नर, पशु बिनु पूछ विषान ।।७/७८ क ।।**

भगवंताच्या भजनाशिवाय- भक्तीशिवाय जर कोणी मोक्षाची अपेक्षा करीत असेल तर तो कितीही ज्ञानी असला तरी गोस्वामीजींच्या शब्दात तो शेपटी व शिंगाशिवाय असणारा पशू आहे, मनुष्य नाही. यापेक्षा अधिक गोस्वामी काय सांगणार?

**वारि मथे घृत होइ बरु, सिकता ते वरु तेल ।**
**बिनु हरि भजन न भव तरिय, यह सिध्दान्त अपेल ।।**

विद्वान लेखकाने आणखी एक तर्क लढवला आहे- वाल्मीकी रामायणात मारीचीने रामाला धर्माचे विशेष ज्ञान सांगितले, व्यासांनी श्रीकृष्णाला धर्म समजावून सांगितला व म्हणून गाय, ब्राह्मण, सती इत्यादी भगवंताचे शरीर आहे या न्यायाने गायपण धर्म बनली. एवढे तर्कशास्त्र सांगण्याची काय आवश्यकता आहे की ती विष्णुस्वरूपा आहे म्हणून धर्म आहे, धारण करते म्हणून धर्म आहे? अहो, वाल्मीकी आणि व्यासांनी जे जे सांगितले ते का मान्य करीत नाही की राम आणि कृष्ण धर्माचे स्वरूप आहेत. ज्यांना अव्यक्त भाव प्राप्त झाला आहे ते महापुरुष वास्तविक धर्माचे ज्ञानस्वरूप असतात. गाईला कुठेही धर्माचे ज्ञान असे म्हटलेले नाही. मग ओढून ताणून गाईला धर्म समजून तिच्या मागे धावण्यात काय अर्थ आहे? याचा अर्थ एवढाच की, भावुकतेमुळे एक रूढी डोक्यात घर करून बसली आहे.

लेखकमहाशय पुढे सांगतात की गाय, ब्राह्मण, वेद, सती, सत्यवादी, लोभरहित व दानी पुरुष पृथ्वीला धारण करतात आणि जे धारण करतात तो धर्म होय. म्हणून गाय धर्म आहे; पण नाही, पृथ्वीला ती धारण करीत नाही. पृथ्वी ग्रहांच्या परस्पर आकर्षणशक्तीने टिकली आहे. आणि अनेक जण पृथ्वीला धारण करणारे आहेत तर मग एकट्या गाईलाच धर्म का मानायचे? आणि पुराणातल्या कल्पना म्हणजे पुराणातली वांगी आहेत. त्याला दुसरा काही अर्थ नाही. पूर्वी सूर्याच्या रथाला घोडे जुंपले आहेत असे म्हणत. चंद्राला मृगाच्या कातड्याने जखम झाली आहे असे मानत. उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत पृथ्वी गाय बनून धावत होती. परंतु विज्ञान युगात या सर्व गोष्टी कपोलकल्पित ठरल्या आहेत. अन्तरिक्षाच्या शोधाने पौराणिक कल्पना सोडून देण्याचे दिवस आता आले आहेत. तेव्हा पृथ्वीला एखाद्या गाईने धारण केले आहे असे म्हणणे आज हास्यास्पद ठरेल. वास्तवात लोभरहित पुरुष, दानी पुरुष, सत्यवादी पुरुष, बुध्दिजीवी वर्ग किंवा गाय हे सर्व सामाजिक व्यवस्था धारण करणारे घटक आहेत आणि कोणतीही व्यवस्था ही कधीही शाश्वत किंवा सनातन असत नाही किंवा ती

धर्मही बनत नाही. यांपैकी अधिकांश गोष्टींचे महत्त्व नष्ट झाले आहे कारण त्यापेक्षाही अधिक उत्तम व्यवस्था आता निर्माण करण्यात येत आहे.

लेखकमहाशय सांगतात की अथर्ववेदात (९/१/४) गायींना ''माता रुद्राणां, दुहिता वसूनां, स्वसा आदित्यानाम्'' असे म्हटले आहे. म्हणजे गाय रुद्राची माता, वसूंची मुलगी आणि आदित्यांची बहीण आहे. जो सर्वांना रडवतो त्याला रुद्र म्हटले जाते. गाईला तुम्ही धर्म मानले नाहीत तर अकरा रुद्र तुम्हाला रडवतील. अहो, जे गायींना कापतात त्यांना तुमचे रुद्र का रडवीत नाहीत? ते म्हणतात की वसू धनाची देवता आहे. गाईला मानले नाही तर वसू तुम्हांला निर्धन बनवतील. पण आज ही सर्व कल्पना केवळ एक दंतकथा आहे. कारण भारतातील थोडे प्रांत सोडले तर बहुतांशी जग मांसाहारी आहे. बीफसाठी (गोमांस) मोठेमोठे फार्म उघडले गेले आहेत. गायींना वेगवेगळ्या भागात विभागण्यात आले आहे. दुधाळ गाई वेगळ्या, भोजनासाठी उपयुक्त असणाऱ्या गाई वेगळ्या ज्याप्रमाणे. मत्स्यपालन केले जाते तसा प्रकार आज गाईंच्या बाबतीत बनला आहे. पंचवीस लीटरपेक्षा कमी दूध देणाऱ्या गाई भक्षणासाठी उपयोगात आणतात, पंचवीस ते साठ लीटर दूध देणाऱ्या गाई पाळल्या जात आहेत. जगाला दुधाची पावडर पुरवतात त्यांची घरे तीस-तीस मजल्यांची आहेत. हॅलीकाप्टरमधून गाई राखल्या जात आहेत. त्यांच्याजवळ ना धनाचा अभाव आहे ना वसूंनी त्यांना निर्धन बनवले आहे किंवा ना रुद्रांनी त्यांना कसली शिक्षा दिली आहे. ज्याप्रमाणे मांत्रिक लोक भोळ्याभाळ्या जनतेला दहशत घालतात की 'पाहा, इकडून भूत येत आहे. सावध व्हा, मला एक कोंबडे द्या' एक बाटली दारू द्या' ही धमकीही थोडी अशीच आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी म्हणजे जेव्हा येथील पुष्कळ लोक निरक्षर होते तेव्हा त्यांच्यामध्ये गाईविषयी अत्यंत पूज्य भाव होता. गाईंची श्रध्देने पूजा केली जात असे. त्यावेळी लोकांच्या छपरावर कौलेपण नव्हती. बघा, इतिहासाची जरा पाने चाळा म्हणजे आमच्या म्हणण्याची खात्री पटेल. वसूंनी त्यांना का धनवान बनवले नाही?

गाय आदित्यांची बहीण आहे हेही विधान विचार करण्यासारखे आहे. अदितीची बारा मुले म्हणजे आदित्य होत. ज्यात विष्णूचापण समावेश आहे. दिती, आदिती, विनिता इत्यादी कश्यपाच्या बारा राण्या होत्या. दितीपासून दानव, आदितीपासून देवता व विनितेपासून पशुपक्षी कश्यपाला झाले. या नात्याने गाय आदित्यांची बहीण होय. परंतु आदित्यांचीच का हो? अहो ती दानवांचीही बहीण आहे. कारण पिता एकच होता.

लेखकमहाशय म्हणतात की गाय माता आहे असे वेदामध्ये सांगितले आहे. गौरवाची गोष्ट आहे. आपली माता आहे तर रक्षण केले पाहिजे. परंतु वेदामध्ये असे कुठे लिहिले आहे की, गाय सनातन धर्म आहे तेव्हा तिची पूजा करा? वेदात गाय ही माता आहे असे म्हटले आहे तर त्यामध्ये गाईचा पती कोण आहे हेही लिहिले आहे. अथर्ववेदातील नवव्या कांडातील चतुर्थ सूक्त ऋषभ सूक्त आहे, ज्यातील दुसऱ्या आणि चौथ्या मंत्रात बैलाला ''पिता वत्सानां पतिरघ्नानामां'' गाईचा पती व तिच्या वासराचा पिता म्हटले आहे. तर मग बैलाची पिता समजून पूजा करायची का? गाईलाच नव्हे तर ऋग्वेदात (१०/६२/६१ मध्ये) पृथ्वीला माता म्हटले आहे, पाण्याला माता म्हटले आहे, यजुर्वेदात (१२/७८ मध्ये) औषधीरिति मातर:' वनस्पतींना माता असे म्हटले आहे. मग या सर्वांना माता म्हटले आहे तर मग त्यांचीही पूजा करायची का? याच प्रकारे मानसामध्ये लिहिले आहे- 'जनु मारेसि गुरु बाभन गाई ।' तिचे विशेष महत्त्व आहे. आणि असायलाही पाहिजे. अनेक वस्तू महत्त्वाच्या असतात. पित्याचे महत्त्व असते, भाऊबहिणीचे महत्त्व असते, तसे गाईचेही महत्त्व आहे. कारण जी वस्तू मानवविकासात सहभागी होत असते तिचे महत्त्व असते. जसे आज विजेचे महत्त्व आहे ती राष्ट्रीय संपत्ती आहे. शोधाचे महत्त्व वाढत असते. कधी कमी होत असते परंतु यामुळे कोणती वस्तू धर्म बनत नाही.

वेदामध्ये असे लिहिले आहे की, अत्यंत खोटे बोलणाऱ्यांना, मारझोड व तोडफोड करणाऱ्यांना, घमेंडी लोकांवर हे राजा, अशा प्रकारे वार कर की, ज्याप्रमाणे गाईला लाथेने मारले जाते व घोड्याला टाच मारली जाते. (अथर्ववेद/८/६/१७) या प्रकारे ऋग्वेदामध्येही लिहिले आहे की- ''रजिष्ठया रज्या पश्व: आ गोस्तू तूर्षति पर्यग्रं दुवस्यु'' (१०/१०१/१२) म्हणजे ज्याप्रकारे सेवक गाय वगैरे पशूंच्या नाकात दोरी बांधून त्या पशूला पीडित करत ढुसण्या देत पुढे नेतात.....। या ऋचेमध्ये गाईला पशू म्हटले आहे व तिला राखण्याची एक पध्दत सांगितली आहे तो काही धर्म नव्हे.

नुकतीच लंकेमध्ये भारताची शांतिसेना गेली होती. तेथे 'लिट्टे'चे सैनिक म्हणत असत जय लंका माता ! आम्ही म्हणतो भारत माता कोणी म्हणते गंगा माता ! अमेरिकेतील आमेजन नदीला पिता म्हणतात. तेव्हा या सर्व मनुष्याने दिलेल्या पदव्या आहेत. ती कोणालाही मिळू शकते. जशी आजकाल मदर टेरेसाला पदवी मिळाली आहे. प्रत्येक पाद्रयाला इंग्रज मनुष्य फादर असे म्हणतात. हिरोशिमेवर बाँब पडला तर

पुनर्वसनाच्या प्रयत्नामध्ये एकोणतीस मुलांना जन्म देणाऱ्या मातेला तेथे मदरलॅन्डची पदवी देऊन तिला विभूषित केले. लिहून ठेवलेली व्यवस्था प्रत्येक काळात उपयुक्त ठरत नाही तिचा पाठपुरावा करीत बसाल तर विकसित देशापेक्षा हजारो वर्षे मागे पोहोचाल- अगदी पुराणकाळात की जेव्हा मोरपंखाने भोजपत्रावर लिहिले जात होते, गारगोट्या किंवा दोन लाकडे एकमेकांवर घासून अग्नी निर्माण केला जात होता. त्याला साठवण्याची व्यवस्थादेखील नव्हती. महाभारत काळापर्यंत अशीच स्थिती होती. एका ब्राह्मणाची अरणी (अग्नी निर्माण करणारे लाकूड) एक हरीण घेऊन पळाले तर युधिष्ठिराने त्याचा पाठलाग केला.

दूरदर्शनवर महाभारत प्रस्तुत करणारे निर्माता व निर्देशक श्री. बी. आर. चोपडांनी सांगितले की त्यांना पात्रांच्या कपड्यांपासून सर्व सामान तयार करवून घ्यावे लागत आहे कारण तेव्हा लोक शिवलेले वस्त्रे अंगावर घालीत नसत, बटन लावीत नसत. कारण बटन आणि सुया दोन्ही हाडांपासून बनविल्या जात असत. बटन हा शब्दच इंग्रजी आहे. भले आम्ही जरी फुशारकी मारत म्हटले की आधुनिक काम्प्युटर, रॉकेट किंवा परमाणू बॉम्बचे सूत्र वेदामध्ये आहे. पण पुरातत्वाकडून प्राचीनतम अवशेष शोधण्यासाठी जे खणले जाते त्यात वायुयान तर सोडा पण साध्या सायकलचेसुध्दा अवशेष मिळालेले नाहीत. वैदिक काळापासून परवर्ती पूर्वजांचे शोध नाकरणे अन्यायाचे होईल, धृष्टतेची पराकाष्ठापण ठरेल की आम्ही उपयोग म्हशींचा करायचा, परंतु गुण गाईंचे गायचे. उपयोग ट्रॅक्टरचा करायचा व गीत बैलांचे गायचे. खतां शिवाय निर्वाह नाही आणि महिमा शेणाचा सांगायचा. गाईच्या घोषणा देणारे किती लोक असे आहेत की जे ज्या बैलांनी आजीवन तुमचे शेत नांगरले आहे ते बैल निरुपयोगी झाल्यावर किंवा थकल्यावर त्यांना घरी बसवून खायला घालतात? क्वचितच कोणी शेतकरी मनाचा मोठेपणा दाखवीत असेल. वृध्द बैलाला पन्नास रुपयात विकणारेही काही कमी नाहीत. त्यांना काय माहीत नसते की या बैलाचे आता काय होणार आहे ते ?.

आचार्य प्रवर लिहितात की गाय पवित्र आहे. मग अपवित्र कोण आहे? म्हैस अपवित्र आहे? अनेक लोक गाईचे दूध पीत नाहीत कारण गाय अभक्ष्य भक्षण करते म्हणून. म्हैस मरून जाईल पण ती अभक्ष्य भक्षण करीत नाही. मग गाय पवित्र व म्हैस अपवित्र कशी? पराशर स्मृतीमध्ये सहाव्या अध्यायात असे सांगितले आहे की कोणत्याही प्रकारचे अन्न गाईने अगर कुत्र्याने हुंगले तर ते अन्न अपवित्र बनते. गोस्वामी

म्हणतात- ‘‘सोई पावन सो सुभव शरीर । जो तन पाइ भजिय रघुबीरा ॥ भजन करणारे शरीर पवित्र आहे. हे आचार्य म्हणतात गाय पवित्र आहे. गोस्वामी म्हणतात की कोणी कसाही असला तरी भगवंताचे नाव घेणारा पवित्र असतो- ‘‘नाम लेत पावन परम, होत भुवन विख्यात ।’’ आणि हे आचार्य म्हणतात गोमूत्र पावन, परम पवित्र !

लेखक महाशय म्हणतात की, शेणाने घरे सारवली जात, लिंपली जात कारण शेणामध्ये लक्ष्मीचा वास असतो. आणि म्हणून गाईची पूजा करावी. दीर्घकालापर्यंत भारतातील लोकांनी शेणाने आपली घरे सारवली, लिंपली ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे गाईचा आदर करायलाच हवा; पण शेणाचा उपयोग का होत होता? कारण त्यावेळेस सीमेन्टचा शोध लागला नव्हता म्हणून. धूळ आणि राखेचे प्रमाण कमी करण्यासाठी हा अविष्कार सुलभ होता. पण गाईचा महिमा गाणारे स्वत: शेणामातीने लिंपलेल्या घरात राहात आहेत का? ते सुध्दा संपन्न लोकांप्रमाणे सीमेंट, संगमरवरने तयार झालेल्या व वातानुकूल व्यवस्था असणाऱ्या घरात राहणे पसंत करतात. भाषणबाजी भले केली तरी त्यावर शेणाचे लिंपण ते सहन करू शकत नाहीत- शकणार नाहीत. संपन्न परिवारांच्या आजुबाजूला एखाद दुसरे कच्चे शेणामातीचे घर दिसले तर त्यांची नजर लगेच त्यावर पडते व पंधरा वीस हजार देऊन लगेच ते घर विकत घेतले जाते. मग शेणामध्ये लक्ष्मीचा निवास आहे यात किती तथ्य आहे? उलट शेणाचे लिंपण म्हणजे आज दारिद्र्याची निशानी आहे, निर्धनतेचे ते प्रतीक आहे. आणि आज अशा घरात कोणीही राहण्याची इच्छा करणार नाही. विवशतेने राहावे लागते म्हणूनच केवळ अशा घरात निर्धन लोक राहतात- अगदी नाइलाजाने.

अनुसूया येथील एक शेतकरी म्हणत होता की आमच्या बैलाच्या शेपटीमध्ये जव, चणे व गहू यांचा निवास आहे. त्याचे असे म्हणणे होते की शेणामुळे हे ध्यान्य शेपटात भरलेले आहे. या प्रकारे जोपर्यंत यूरिया, डाई, पोटॅश, कॅल्शियम इत्यादी उर्वरकांचा शोध लागलेला नव्हता तोपर्यंत शेणामध्ये लक्ष्मीचा वास होता, कारण तेव्हा उत्पन्नाचे माध्यम फक्त शेण होते. त्यावेळी धान्याला धन समजले जात असे. गाय धन होते. मोठमोठे कारखाने नव्हते, औद्योगिक क्रांती इथे झाली नव्हती. व म्हणून त्या काळी शेणामध्ये लक्ष्मीच्या निवास आहे असे मानले जात असे.

आज लक्ष्मीचा निवास निर्यात, आयात मध्ये आहे. तस्करीमध्ये आहे. गाईचे शेपूट सोडून आजकाल लक्ष्मी पंचतारांकित हॉटेलामध्ये राहावयास गेली आहे.

आचार्यांचे हे कथनही ग्राह्य नाही की गाईलाच भगवंताचा वर प्राप्त असल्याने तिच्या मलास 'गोबर' असे म्हटले जाते. अहो गाईला तर शापही मिळालेले आहेत. तरीही आचार्यांचा हा तर्क विचारणीय आहे की शेणाला गोबरच का म्हटले जाते? भैंसवर, शूकरबर असे इतर प्राण्यांच्या नावावरून का नाव दिले गेले नाही? गाय श्रेष्ठ आहे म्हणून तर गोबर असे तिच्यावरून नाव पडले.

वास्तविक असे काहीही नाही. आरंभी मनुष्याला गाईमध्ये अनेक गुण दिसून आले. तसेच गाईचा संपर्क इतर पशूंच्या आधी आला तेव्हा त्यांनी गाईच्या मलास 'गोबर' म्हटले व इतर पशूच्या मलासही तेच नाव दिले. तसेच गाईला जेथे बांधायचे त्याला गोठा म्हणू लागले. त्यावरून गाय, बैल, म्हैस या तत्सम प्राण्यांच्या निवासालाही गोठा म्हणू लागले. गाईंच्या विचार विमर्शासाठी लोक एकत्र होत असत व जे बोलत त्याला 'गोष्ठी' असे म्हणत. आज देखील मोठ्या संमेलनाना 'गोष्ठी' म्हणतात जसे कविगोष्टी. कवी काय नेहमी गाईंबाबत चर्चा करतात का? मग कविगोष्टी का? पूर्वी गाईच्या वंशाला गोत्र म्हणत असत. आज हा शब्द मानव वंशासाठी वापरला जात आहे. हरवलेल्या गाईच्या शोधाला गवेषणा म्हणत असत. आज प्रत्येक शोधाला गवेषणा म्हटले जाते. गाईवर लक्ष ठेवण्यासाठी तयार केलेल्या खिडकीला गवाक्ष म्हणत असत. आज गाई राखण्याच किंवा गाईंवर लक्ष ठेवण्याची जरूर नसतानाही खिडकीला गवाक्ष हा शब्द रूढ झाला आहे. गाईंची पैदास जास्त असणाऱ्या गावाला गोकुळ म्हणण्यात आले. तसेच बौध्द विहार जेथे जास्त असणाऱ्या भारतातील एका प्रदेशाला बिहार म्हटले गेले. सध्या तेथे विहारांपेक्षा दुसऱ्या गोष्टीच अधिक आहेत तरीही त्या प्रदेशाला बिहारच म्हटले जाते. तसेच गोकुळात आज गाई अत्यंत अल्प आहेत. म्हशीच जास्त आहेत तरी त्याला गोकुळच म्हटले जाते. त्याप्रमाणे म्हशीच्या मलासही 'गोबर' म्हटले तर त्यात आश्चर्य काय? एखाद्या धार्मिक विधीत गाईचे गोबर नाही मिळाले तर पंडितजी म्हणतात अरे म्हशीचे गोबर आणा. खुद्द काशीमध्ये तर म्हशीचे गोबरच सर्व ठिकाणी वापरले जाते.

तसेच गाईच्या विकाराला किंवा दोषाला गव्य म्हणणेपण योग्य नाही मग कावळ्याच्या विकाराला कव्य म्हणावे लागेल व असे कव्य पितरांना देणे अयोग्य ठरेल. लेखकमहाशय लिहितात की गाईपासूनच पंचगव्य बनत असते, अन्य पशूपासून नाही. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की गाय जगात सर्वत्र आहे, परंतु पंचगव्याचा प्रयोग

व शोध फक्त भारता पुरताच सीमित का आहे.? भारतातपण केवळ ब्राह्मण आणि ब्राह्मणामध्ये केवळ पुरोहित पंचगव्य बनवत असतात. जर हा शोध सर्वांना उपयुक्त असता तर त्याचा उपयोग जगभर झाला असता. ज्याप्रमाणे टेलिव्हिजनचा उपयोग सर्व करीत आहेत, गाईच्या दुधाची पावडर, गोबरगॅस याचा प्रयोग सर्वत्र होत असतो. तर पंचगव्याचा प्रयोग हा अशुध्द व्यक्ती अथवा वस्तूला शुध्द करण्यासाठी काही स्मृतींमध्ये सांगितला आहे. उदा.- कोणी गाय बांधली आणि गळ्यातील दोरी असतानाच ती मरण पावली तर गाईच्या हत्येचे पाप बांधणाऱ्याला लागते. मग शुध्दीसाठी गाईचे दूध, दही, तूप, मल आणि मूत्र एकत्र करून प्यायला देणे याला पंचगव्य म्हणतात. गोमूत्रात जव उकळून खाणे, गाई चरायला नेणे, गाई दान देणे हे शुध्दीचे प्रकार म्हणजे कोणता उपयुक्त शोध नसून फक्त एक तोडगा होता, रुढी होती. गाईंच्या सुरक्षिततेचा तो एक प्रयत्नपण होता. आज या गोष्टी कोणालाही पटणाऱ्या नाहीत. गाय-बैल आजपण मरतात परंतु गोहत्येचे प्रायश्चित म्हणून भीख मागणे, गोशाळेत झोपणे, पंचगव्य पिणे किंवा गोमूत्रात जव उकळून पिणे या गोष्टी आता कोणीही करताना दिसत नाहीत. प्रत्येक जीवाचा मृत्यू किंवा हत्येनुरूप दान-दक्षिणा देणे ही एका विशिष्ट वर्गाच्या उपजीवीकेची केलेली सोय होती. आज त्याला मान्यता देणे अशक्य आहे व आज ते कोणी मान्यही करणार नाही.

मल-मूत्राच्या आयुर्वैदिक प्रयोगात गाईबरोबर अन्य पशुपक्षांनापण स्थान आहे . काही पक्ष्यांची विष्ठा काही चर्मरोग बरे करण्याच्या उपयोगी पडते. तर बकरी व गेंड्याच्या मूत्राचाही उपयोग होत असतो. भारताचे भूतपूर्व पंतप्रधानांनी तर शिवाम्बूचाही प्रयोग केला होता. तेव्हा केवळ गाईच्या मलमूत्राचाच उपयोग होतो असे म्हणणेही आता अतिशयोक्तीपूर्ण आहे.

अशीच एक अतिशयोक्ती या विद्वान लेखकमहाशयाने केलेली आहे. ते म्हणतात की गाय तर आईपेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे कारण आईची सेवा करावी लागते, ती अन्न खाते पण गाय मात्र गवत व भुसा खाऊन संतुष्ट राहते. मग गाईला काय मालपुवा खायला घालायचा का? पुढे सांगतात की आई आपल्याला वर्षभरच दूध पाजते; पण गाय आजीवन दूध पाजत असते. जर गाय इतकी प्रिय असती तर संकटात वृध्द व्यक्ती 'आई ' करण्याऐवजी 'गाई ' म्हणाला असता; परंतु असे म्हटले जात नाही. हिंदीत एक म्हण आहे की ''हरियर खेती गाभन गाय । तब जानो जब भूख मे जाय'' जर वासरू

मेले तर तिच्या दुधाचा भरोसा नाही. आणि दूध असेल तर ''दुधारू गाय की चार लात'' सहन कराव्या लागतात. वाळलेला पालापाचोळा खाणारी गाय शंभर ग्रॅमपेक्षा अधिक दूध देत नाही. ज्या वासराचा मातेच्या दुधावर पहिला हक्क त्याला एक थेंबही दूध नाही हे पाहून गांधीजींनी गाईचे दूध पिणे बंद केले होते. त्यांनी आपल्यासाठी एक शेळी पाळली होती. तरीदेखील त्यांना विश्ववंद्य बापू म्हटले गेले. ईसा मेंढ्या चरायला नेत असत. मुहम्मद बकऱ्या चरायला नेत, त्यांनी गाई चरायला नेल्या नाहीत तरी देखील ईश्वरीय ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होण्यात काही अडचण आली नाही.

गाय आजीवन दूध देत नाही. ती पाचसहा महिन्यांपेक्षा अधिक दूध देत नाही. गाईच्या दुधामधून भरपूर तूपही निघत नाही. जर म्हैस चार हजारात मिळत असेल तर तेवढेच दूध देणारी गाय दोन हजारात मिळते. म्हशीला घरात बांधले जाते, पण गाईला शेतातपण कोणी विचारत नाही. असे म्हटले जाते की नवजात शिशुसाठी गाईचे दूध उपयोगी असते. जन्मलेल्या मुलाला लगेच आईचे दूधपण उपयोगी पडत नाही तेथे गाईच्या दुधाचे काय ! मूल जन्मल्याबरोबर प्रथम हवेतील ऑक्सीजन घेतो व मरेपर्यंत घेत राहतो. मग ऑक्सीजन धर्म झाला का?

या प्रकारे त्यांच्या संपूर्ण पुस्तकात गाय एक तर वस्तू आहे किंवा देवता । वस्तू असेल तर तिचे रक्षण करा. आपल्या वस्तूचे रक्षण कोण करीत नाही? तिच्यासाठी कोण त्रास सहन करीत नाही? परंतु वस्तूच्या उपयोगाचे प्रमाण कमी अधिक होत असते. पूर्वी घरासाठी शेणाचा उपयोग करीत असत. सीमेंट आल्यावर शेण वापरणे बंद झाले. खतासाठी शेण वापरले जात असे; परंतु यूरियासारखी उत्तम प्रतीची खते उपलब्ध झाल्याने शेणाचा वापर कमी झाला. ज्या प्रकारे म्हशीच्या शोधाने गाईचे मूल्य घटले. तसेच जर्सी गायींमुळे म्हशींचे अवमूल्यन होण्याचा संभव आहे. जर्सी ही गाय नव्हे वर्णसंकराचा प्रकार आहे. म्हणजे वस्तूच्या रूपात गाईचा उपयोग आता कमी झाला आहे. तरीही ती वस्तू आहे तर तिचे चांगल्या प्रकारे रक्षण केले पाहिजे.

आता राहिली गोष्ट गाय देवतास्वरूप असण्याची. तसे तर ऐतरेय उपनिषदात सांगितले आहे की गाईच्या शरीरात कोणी देवता वगैरे राहात नाहीत. तरीही जर गाय देवतांची बहीण, माता किंवा सर्व देवसमूह असला तरी काय झाले? जसे सृष्टीमध्ये सर्व जीव आहेत तशा देवता. त्या देखील ''भव प्रवाह संतत हम परे'' जन्म मृत्यूच्या प्रवाहात निरंतर वाहून जाणाऱ्या आहेत. ''अग नग जीव नाग नर देवा । नाथ सकल जग काल

कलेवा ।।'' देवतादेखील काळाची जलपान सामुग्री मात्र आहे. आम्ही त्या सामुग्रीची प्रार्थना कशासाठी करायची की ''जो काळ तुम्हाला खायला बसला आहे त्याच्यापासून आमचे रक्षण कर'' म्हणून तो सक्षम असता तर स्वयं वाचला नसता का? 'स्वर्गउ स्वल्प अन्त दुखदाई 'नहुष स्वर्गातून खाली पडला अजगर बनला. 'मनुज देह सुर साधु सराहत' प्रशंसा मनुष्याच्या शरीराची होते गाईच्या शरीराची नाही. देवतांपेक्षाही श्रेष्ठ अशी एक वस्तू तुमच्याजवळ आहे व ते आहे मानव तन.। ते अत्यंत दुर्मिळ आहे व ते तुम्हांला प्राप्त झाले आहे. मग तुम्ही एखाद्या देवतेपासून किंवा गाई बैलापासून कसली अपेक्षा ठेवता? गोस्वामीजी म्हणतात-

**काहे फिरत मूढ मन धायो ।**
**तजि हरि चरन सरोज सुधारस रविकर जल लय लायो ।।**
**त्रिजग देव नर असुर अपर जग जोनि सकल भ्रमि आयो ।।१९९**

हे मूर्ख मना तू कुठे धावत आहेस? भगवत चरणाचे अमृत सोडून तू मृगतृष्णेच्या मागे का धावत आहेस? मृगतृष्णा म्हणजे काय? देवांदिकांचे शरीर आणि तू नर त्रैल्योक्यात देवता, नर, असुर इत्यादि तिर्यक योनी फिरून आला आहेस तरी तुला शांती मिळाली नाही !

भगवान रामाच्या मते भव-सागर पार होण्याचा एकच उपाय आहे की 'नर-तन भव वारिधि कहँ बेरो । भवसागर तरून जाण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे मनुष्य देह ! गाय हा काही उपाय नाही.

लेखक महाशय म्हणतात की गाय विष्णुस्वरूप आहे; परंतु तरीही ती परमश्रेय किंवा कल्याणाचे साधन नाही. ते साधन सृष्टिसंचालनाच्या अंतर्गत आहे, सृष्टीच्या बाहेर नाही- 'शम्भु विरंचि विष्णु भगवाना । उपजहि जासु अंश ते नाना ।' पराक्रमाने नव्हे पण ज्याच्यामध्ये अंशमात्राने अनंत ब्रह्मा, अनंत विष्णू आणि अनंत शंकर निर्माण होतात तो कल्याणस्वरूप परमात्मा या विष्णूपेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. किष्किन्धेमध्ये रामाचा परिचय करून घेताना हनुमानाने रामाला विचारले- ''की तुम तीन देव महँ कोऊ । नर नारायण की तुम्हा दोऊ ।। जग कारन तारन भव भजन धरती भार । की तुम अखिल भुवनपति लीन्ह मनुज अवतार ।।'' म्हणजे तीन देव कोणी वेगळेच आहेत, नर

नारायण दुसरे आहेत; परंतु अखिल भुवनपती कोणी वेगळाच आहे. कधी 'अगणित रवि शशि शिव चतुरानन' त्या परमात्म्यापासून निघत आहेत. तर कधी तो 'विष्णू कोटि सम पालनकर्ता' एका रामाच्या उपासनेवर भर दिला गेला आहे.

ब्रह्मा, विष्णू, महेश तसेच अन्य देवी देवतांची श्रेष्ठता म्हणजे पौराणिक कल्पनांची पैदास आहे. अवतार वादाची जी क्षीण रेषा वैदिक साहित्यात दिसून येते आणि जी अत्यंत सरळपणे सांगितली आहे ती रामायण आणि महाभारतापर्यंत येता येता पूर्णत: विकसित झाली आहे. वैदिक युगात प्रजापती तसेच इंद्राची विशेषता हळूहळू विष्णूमध्ये परिवर्तित झाली. आणि महाभारतानंतर सृजित पुराणांमध्ये सांप्रदायिक पूर्वग्रहामुळे एक एक देवी व देवतेपासून दुसरे अनेकानेक देवता निघालेल्या दिसून येतात. गोस्वामीजी देखील त्या शैलीचा प्रयोग करतात. परंतु एक परमात्माच पूज्य आहे ही वैदिक धारणा त्यांच्या संपूर्ण काव्याचा केंद्रबिंदु आहे. वाल्मीकी रामायण व महाभारत दोन्ही संकलन ग्रंथ मानले जातात. अनेक शतकात त्यांचा विस्तार झाला आहे, तरीही रामायणाचा अवतार वाद महाभारताचे एक अंग आहे. पुरुषसुक्तानुसार गाय ही सृष्टीचे एक अंग आहे.

**तस्मादश्वा अजायन्त ये के शोभयादत: ।**
**गावो हि जज्ञिरे तस्मात् तस्माज्जाता अजायव: ।।**

**ऋग्वेद १०/९७/८-१०**

त्या परमपुरुष परमात्म्यापासून घोडे उत्पन्न झाले. वरखाली दात असणारे पशू उत्पन्न झाले. त्याच्यापासून बकऱ्या व मेंढ्या उत्पन्न झाल्या. जसे सर्व पशू तशीच गाय. ती विष्णुस्वरूपा नाही आणि विष्णूपण अविनाशी परमात्मा नाही.

रामचरित मानसाचे असे मत आहे की भवरोगावर केवळ एकच औषध आहे-

**रघुपति भगति सजीवनि मूरी । अनूपान श्रध्दा मति पूरी ।।**
**सद्गुरु वचन वैद विश्वास । संयम यह न विषय कै आशा ।।**
**एहि विधि भलेही सो रोग नसाहीं । नाहिं त जतन कोटि नही जहीं ।।**

याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणता मार्गच नाही मग तुम्ही दुसरा प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे? डावीकडे उजवीकडे प्रयत्न करा किंवा कोट्यान कोटी प्रकारे प्रयत्न करा, गाईला ब्रह्मा-विष्णू म्हणा किंवा म्हशीला तसे समजा, त्यातून काय निष्पन्न

होणार ? हा तर केवळ एक भ्रम आहे, संप्रदायाचा घोटाळा आहे, त्याने कदापि कल्याण होणार नाही.

वेदाचा असा निर्णय आहे, नारायण ऋषी द्वारा प्रसारित पुरुषसूक्ताचा असा निर्णय आहे की, तो अविनाशी परमात्मा हजार हाता-पायांचा व तोंडांचा आहे. त्यानेच अवघे जग व्यापले आहे. त्याच्या तेजाच्या अंशमात्राने चराचर जगताची उत्पत्ती झालेली आहे. ब्रह्मदेवाने यज्ञद्वारा हृदयरूपी देशात त्यालाच प्राप्त केले, इंद्राने त्याला पाहिले. अनादि कालापासून पूर्वीच्या मुनींनी मानस यज्ञाद्वारे ज्याला प्राप्त केले ते अविनाशी तत्त्व हेच होय. त्याला जाणल्याशिवाय अमर होण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही, अन्य कशापासून मुक्ती मिळणार नाही, शांतीही प्राप्त होणार नाही. मग गाईच्या नश्वर कलेवरात तुम्ही कसली मुक्ती शोधत आहात?

लेखकमहाशयांना मोठा क्षोभ होत आहे की या कलियुगात दुष्ट सुखी आहेत व सज्जनांना श्रम करावे लागत आहेत. आम्ही असे ऐकले आहे की ते मानसाचे अभ्यासकपण आहेत. पण त्यांना युग कशाला म्हणतात हेही माहीत नाही. ते केव्हापासून सुरू होते ते कुठे राहते? मानसातच लिहिले आहे की ''बुध युग धर्म जानि मन माही'' विवेकी पुरुष युगाला मनाच्या अंतरंगात जाणत असतात. बाहेर युग असत नाही व असणारही नाही. कलियुग किंवा सत्ययुग हे आपल्या हृदयात येईल. आपण इच्छा केल्याने येणार नाही. जेव्हा रामरूपी माया क्रियाशील होईल तेव्हा ते येईल. ज्याप्रकारे ''तामस बहुत रजोगुण थोरा । कलि प्रभाव विरोध चहुँ ओरा ।'' मनाच्या अंतरंगात तामसी गुणांचे बाहुल्य असेल व जोडीला थोडा रजोगुण असेल तर व्यक्तीची साधना कलियुगीन आहे. या स्तरावर त्याचा स्वभाव सर्वत्र वैर-विरोधाचा असेल. सारांश युग म्हणजे साधकाच्या अंतरंगाच्या क्षमतेची कसोटी आहे. जर कलियुग बाहेर आहे तर कोणी सात्विक नसलेच पाहिजे.

शेवटी हताश होऊन आचार्य म्हणतात की जो श्रृती, स्मृती आणि पुराणांना मानीत नाही त्यांना काहीही सांगणे म्हणजे अरण्य रुदन होय. श्रुती म्हणजे वेद; जे संख्येने चार आहेत. शास्त्रे सहा आहेत- सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदान्त. लोक शास्त्रांना जाणत नसतानाही त्यांना शास्त्रे म्हणत आहेत. तसेच शेकडो पुराणे उपपुराणे आहेत ज्यामध्ये अठरा पुराणे अधिक प्रचलित आहेत. मनु वगैरेंच्या

स्मृतींना धर्मशास्त्र पण म्हणतात. अशी धर्मशास्त्रे शेकड्यांनी आहेत. आता प्रश्न असा की आम्ही या वेदशास्त्रांना मानतो का?

असे म्हटले जाते की पूर्वी सर्व शास्त्रे तोंडी होती. शिष्य परंपरेला शिकवून त्यांच्याकडून पाठ करवून घेतले जात असे. सर्वप्रथम वेदव्यासांनी वेद लिपिबध्द केले. त्यामध्ये चार वेद, वेदान्त, भागवत महाभारत आणि त्यापैकी एक अध्यायरूपात गीतापण आहे. शेवटी त्यांनी विचार केला की आम्ही एवढे प्रच ंड लिहून ठेवले की मनुष्य एक दोन जन्म वाचतच राहील व तरीही तो एका निर्णयावर पोहचू शकणार नाही. यासाठी व्यासांनी स्वत: निर्णय दिला की, ‘‘गीता सुगीता कर्तव्या किमन्ये शास्त्रविस्तरै’’ गीता हे धर्मशास्त्र आहे. ज्यांनी एक अध्यायाच्या रूपात गीता लिहिली आहे तिला शास्त्र मानले व त्याच्या पालनावर भर दिला. वेद आणि ग्रंथाकडे त्यांनी संकेतसुध्दा केला नाही. खरे पाहता या सर्व आर्ष ग्रंथांचे संकलन या वेदव्यासांनीच केलेले आहे. भगवान श्रीकृष्णांनी पण त्याचे समर्थन करीत सांगितले की गीता हे पूर्ण शास्त्र आहे. ‘‘इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।’’ अत्यंत गोपनीय गुह्य असे शास्त्र मी सांगितले आहे. म्हणजे गीता हे शास्त्र आहे. त्याप्रमाणे आचरण करणारा कृतकृत्य होतो; परंतु या शास्त्रात सांगितल्या प्रमाणे आचरण न करता स्वत:च्या मनाला येईल तसे आचरण करतो त्याला ना सुख मिळत ना समृध्दी ना शांती प्राप्त होत. असो आम्हा सर्व मानवमात्राचे शुध्द शास्त्र गीता आहे. त्यामध्ये एका पुरुषोत्तमाला सोडून अन्य कोणाचीही पूजा करण्याचा निर्देश नाही.

तरीदेखील श्रुतीमध्ये काय सांगितले आहे हे जाणण्याची जिज्ञासा राहते. यावर आचार्य म्हणतात की जो श्रुती, स्मृती व पुराणावर विश्वास ठेवतो त्यांना काही सांगणे म्हणजे अरण्य रुदन आहे. विशाल अशा वैदिक वाङ्‌मयाला या छोट्याशा निबंधात समजावून सांगणे कठीण आहे. तरीही त्यामध्ये काय सांगितले आहे याचा सारांश प्रत्येकाने जाणून घेतला पाहिजे. वेदातील पुरुषसूक्ताची चर्चा या लेखात आपण केली आहे. त्याच प्रमाणे दुसरे सूक्त हिरण्यगर्भ सूक्त अथर्ववेदात आहे. त्यात सांगितले आहे की तो परमात्मा ‘भूतस्य जात: पतिरेक आसीत’ सर्व प्राण्यांचा तो एकमेव स्वामी आहे. त्यानेच पृथ्वी व अंतरिक्ष धारण केले आहे. त्याच्या व्यतिरिक्त ‘‘कस्मै देवाय हीवषा विधेम्’’ कोणत्या देवतेसाठी हवी द्यायला सांगू ? या प्रकारे वेदामध्येसुध्दा एक देव हेच प्रधान लक्ष्य आहे.

वेदानंतर उपनिषद हे महत्त्वाचे शास्त्र आहे. यात काय सांगितले आहे ते पाहा.

**तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मण: ।**

**नानुध्यायाद् बहून्छब्दान वाचो विग्लापन हि तत् ।।**

**बृहद ४/४/२१**

बृहदारण्यक उपनिषदानुसार बुध्दिमान ब्राह्मणाने परमात्म्याला जाणण्यासाठी आपली बुध्दी त्याच्याठिकाणी केंद्रित करावी. अन्य नाना प्रकारच्या व्यर्थ शब्दांकडे त्याने लक्ष देऊ नये कारण तो केवळ वाणीचा अपव्यय आहे.

याच प्रकारे मुण्डक उपनिषदात काय म्हटले आहे पाहा-

**यस्मिन द्यौ पृथिवी चान्तरिक्ष मोत मन: सह प्राणैश्च सर्वे: ।**

**तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुंचयामृतस्यैष्य सेतु: ।।**

**२/२/५**

म्हणजे ज्यामध्ये स्वर्ग, पृथ्वी आणि आकाशामधील समस्त प्राणांसहित मन गुंतलेले आहे त्या ''आत्मानम् जानथ'' त्या आत्म्याला जाणा. अन्या: वाच: अर्थात दुसऱ्या सर्व गोष्टींना 'विमुंचय' सोडा. 'अमृतस्य एष: सेतु:' हा अमृताचा सेतू आहे.

कठोपनिषदामध्ये म्हटले आहे की 'सर्वे वेदा यत्पदमातनन्ति' सर्व वेद त्या परमेश्वराचे प्रतिपादन करतात (१/२/१५). या प्रकारे उपनिषदाचे सारसर्व असणाऱ्या गीतेमध्ये भगवंत म्हणतात 'वेदैश्च सर्वेरहमेव वेद्य:' (१५/१५) सर्व वेदांद्वारे मी जाणण्यास योग्य आहे. म्हणजे जे वेदात सांगितले आहे. तेच गीतेमध्ये सांगितले आहे ते म्हणजे एका परमात्म्याचे चिंतन.

गोस्वामीजी हेच म्हणतात-

**नीति निपुण सोई परम सयाना ।**

**श्रुति सिध्दान्त नीक तेहि जाना ।।**

**सोइ कवि कोविद सोइ रणधीरा ।**

**जो छल छाडि भजइ रघुबीरा ।। ७/१२६/४**

ज्याचे मन भगवान रामचरणी अनुरक्त आहे त्याने श्रुतीचा सिध्दांत चांगल्या प्रकारे जाणला आहे. 'श्रुति सिध्दान्त रहई उरगारी । राम भजिय सब काज बिसारी ॥' ७/१२२/२ श्रुतीचा सिध्दान्त हाच आहे की रामाला भजा-एकमात्र रामाला भजा. त्या व्यतिरिक्त सर्व काही विसरून जा. परमेश्वराऐवजी गाईची पूजा करा असे श्रुतीने सांगितलेले नाही. म्हणजे असे उपनिषद सांगत नाही, गीता सांगत नाही, तुलसीमानस सांगत नाही तरीही महाशय म्हणतात की श्रुतीप्रमाणे चालत नाही. श्रुती मानत नाही. तुलसीदास म्हणतात- रामाला भजा आणि तुलसी पीठाधीश्वर म्हणतात की गाईला भजा.

आता पुराणांचे म्हणणे पाहा. असे म्हटले जाते की अठरा पुराणेदेखील व्यासानींच लिहिली आहेत. असे वाटते की पूर्वी व्यास ही एखादी पदवी असावी. जसे आज कथावाचकांना म्हटले जाते, किंवा व्यासोवाच नावाची शैली असावी कारण सर्वत्र एकमेव असणाऱ्या परमात्म्यावर आस्था ठेवणारे श्रीव्यास स्कंदपुराणात म्हणतात शिव मोठा आहे व राम, कृष्ण, ब्रह्मा, विष्णू, देवी-देवता सर्व त्याचे नोकरचाकर आहेत. देवी पुराणात म्हणतात देवीच सर्व काही आहेत त्यांच्या समोर ब्रह्मा, विष्णू, महेश सर्व तुच्छ आहेत. नाही, इंद्र शाश्वत आहे, तर कुठे म्हणतात सूर्य महान आहे. असे दिसते की पुराणातील व्यास निर्णय करू शकत नाहीत. एका परमात्म्याशिवाय काहीही पूजनीय नाही असे ठासून सांगणाऱ्या श्रीव्यासांना झाले आहे तरी काय?

यासाठी पुराणातील एक दृष्टान्त पुरेसा आहे, शिवपुराणात एक कथा आहे- एकदा ब्रह्माजी विष्णूकडे गेले. रागावून म्हणाले, मी सर्वांचा पिता आहे, सर्वांहून मोठा आहे. भगवान आहे, तेव्हा मला प्रणाम कर. विष्णू म्हणाले की माझ्या नाभीतून कमळ आणि कमळातून तू पैदा झाला आहेस, तेव्हा तू मला प्रणाम कर मी भगवान आहे. वादविवादाचे भांडणात रुपांतर झाले. प्रकरण हातघाईला आले. अस्त्र-शस्त्र बाहेर आली. भांडणाचा तमाशा पाहणाऱ्या देवतांनी शिवाला सूचना दिली की दोघे अत्यंत हातघाईवर आले आहेत; तेव्हा शिवजींनी दोघांच्या मध्ये शिवलिंगरूपी स्तंभ उभा केला. दोघांची लढाई थांबली. दोघे एकमेकांना विचारू लागले की आपल्या दोघांमध्ये हा स्तंभ कोठून आला? चला शोध घेऊया. ब्रह्मा हंस बनून त्या स्तंभाची उंची मोजण्यासाठी वर उडाले व वराह बनून विष्णू हजार वर्षे पृथ्वी खोदत बसले.

ब्रह्मदेवाला खोट्या पुराव्यासाठी एक केवड्याचे फूल मिळाले, जसे आजकाल लोक जमिनीचे भाग पाडताना खोटे पुरावे सादर करतात. ब्रह्मदेव विष्णूला म्हणाले आम्ही शोधून काढले स्तंभ कोठून आला तो. मग विष्णूनी त्यांना प्रणाम केला. दोघे आपआपसात वादविवाद करीत गुंतले असतानाच शिवजीनी ब्रह्माच्या पाच डोक्यांपैकी एक कापून टाकले. तेव्हा विष्णूने कबूल केले की ना मी भगवान आहे ना ब्रह्मा. जो जिंकला तो भगवान होय. भगवंताला भगवत्तेचा बोध नाही. जो स्वयं सिध्द आहे, सहज आहे. मानलेत किंवा न मानलेत तरी तो स्वयंसिध्द आहे. आपल्या मानण्या न मानण्याने भगवंतामध्ये चढउतार होत नाही. 'विधि न बनाये, हरि आप बनि आये' परंतु येथे तीन तीन दावेदार लढत आहेत. ज्या प्रकारे आमदारांची निवडणूक आहे. वाटते की हा त्या काळातील राजा तसेच सामंतांमधील भांडण आहे.

शैव संप्रदायाच्या पुराणात सांगितले आहे की शिवभक्त रामभक्तांना मारून टाकतील तर त्यांच्या एकवीस पिढ्यांचा उध्दार होईल. आता तुम्हीच सांगा की गोष्ट मानण्यासारखीच आहे का? आणि सांगत आहेत की पुराणाला जे मानत नाहीत त्यांना काही सांगणे म्हणजे अरण्यरुदन आहे. आता यात मानण्यासारखे काय आहे? शैव, वैष्णव, शाक्त सौर व गाणपत्य या संप्रदायांचा रक्त-रंजित इतिहास मानायचा? शिव-गीतेमध्ये सांगितले आहे की रावणाने सीतेचे हरण केले तेव्हा अगस्त्य मुनींपासून दीक्षा घेऊन राम शिवराधना करू लागले. त्यांनी पाहिले की ब्रह्मा-विष्णू व इतर सर्व देवता हात जोडून शिवाच्या समोर येत आहेत. रामाच्या भक्तीने प्रसन्न होऊन शंकर म्हणाले, रामा, घाबरू नकोस. सर्व राक्षस माझ्या मुखात प्रविष्ट झालेले आहेत. तू निमित्तमात्र होऊन संग्राम कर. तुला कीर्ती प्राप्त होईल. ''इति श्री शिवगीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे शिव-राघव संवादे रामाय वर प्रदानम् नाम पंचमोध्याय: ।'' आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही की भगवान श्रीकृष्णाच्या गीतेच्या पंक्तीमध्ये आपले नाव मिसळून शिवगीता बनवली गेली आणि मूळ गीतेच्या आशयापासून दूर उभे राहिला. या प्रकारे प्रत्येक संप्रदाय आपली प्रशंसा व दुसऱ्या देवतांची नींदा पुराणात करत आली आहे. अनेक सांप्रदायिक उपनिषदे पण लिहिली गेली आहेत उदा. गणपत्युविनिषद कृष्णोपनिषद, रामोपनिषद, नारायणोपनिषद, सूर्योपनिषद, सावित्र्युपनिषद, राधोपनिषद, सीतोपनिषद, रुद्रोपनिषद अगदी अल्लोपनिषद सुध्दा ! या प्रकारे मंत्रद्रष्ट्या ऋषींची वाणी बदलून ती आपल्या वाणीत इतकी मिसळून

टाकली की त्यामध्ये वास्तविकता दबून गेली. यामुळे सर्वसामान्य लोकांना असा प्रश्न पडतो की कोणाला मानावे व कोणाला मानू नये? कारण परस्पर विरोधी ग्रंथ असल्याने सर्वसामान्यांच्या मनाचा गोंधळ न झाला तरच नवल आणि त्यांच्यावर पुन्हा हा आक्षेप की ते वेद, पुराण, स्मृती आणि शास्त्र मानीत नाहीत.

व म्हणून विनय पत्रिकेत गोस्वामी तुलसीदास म्हणतात की ''बहुमत सुनि बहु पंथ पुराननि जहाँ-तहाँ अगरो सो ॥१७३॥ अनेक मते ऐकली (पण वेदाचे मात्र एकच मत आहे). पुराणांतही अनेक पंथ आहेत. त्यांच्यातही आपापसात झगडे आहेत. ''गुरु कहयो राम भजन नीको मोहिं लगत राज डगरो सो'' गुरुदेव म्हणाले की एका रामाचे भजन कर. हाच मला राजमार्गाप्रमाणे चांगला मार्ग वाटला. कल्पना करा गोस्वामी तुलसीदासांच्या वेळचा तो राजमार्ग होता. तो सम्राट अकबराचा शासनकाळ होता. त्या युग-जमान्याच्या विषम रस्त्यांच्या तुलनेत राजमार्ग ! तेव्हा राजा चालू लागला की फुलाच्या पायघड्या घातल्या जायच्या, अत्तराचे सडे टाकले जायचे, ना डास ना माशीचा शिरकाव, ना कोणाला विचारणे. हे असेच आहे एका परमात्म्याचे भजन.

यालाच मानसने म्हटले आहे की ''दम्भिह निज मत कल्पि करि प्रकट किये बहुपंथ'' (७/९७) दांभिक लोकांनी पुष्कळ पंथ निर्माण केले आहेत. विनयमध्ये ते म्हणतात 'बहुपंथ पुराननि' पुराणाने अनेक पंथ निर्माण केले आहेत. म्हणून पुराणातील हे पंथ निर्माण करणाऱ्यांना तुलसीदास दांभिक म्हणत आहेत. आजकाल सुशिक्षित लोक प्राचीन रुढींकडे बोट दाखवतात, तर निरक्षर आचार्यगण खोटे सांगतात की ''राम-राम ! घोर कलियुग आले आहे. धर्म कर्म कसे होणार? 'मारग सोइ जा कहँ जोइ भावा' कलियुगात तर ते असे म्हणणारच कारण गोस्वामींचा आक्रोश वैदिक मार्गाच्या जागी ज्यांनी बहुपंथ निर्माण केले अशा दांभिक लोकांसाठी आहे. वेद म्हणतात की ''नान्य: पन्था विद्यतेऽयनाय'' या मार्गाशिवाय दुसरा कोणता मार्ग नाही, दुसरा कोणता पंथ नाही व पुराणे सांगतात अनेक पंथ आणि तरीही लेखकमहाशय म्हणतात की लोक पुराण मानीत नाहीत.

धर्माच्या तथाकथित ठेकेदारांनी, याच पुराणपंथवाल्यांनी स्मृतींच्या नावावर धर्माचे कायदे केले व अधिकांश जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवले. आणि त्यातून कोणी

शिकले तर त्याची जीभ कापून टाकावी, शास्त्रज्ञान श्रवण केले तर शिसे गरम करून त्याच्या कानात ओतावे आणि तरीही कोणी खरे सांगायचे साहस केले तर त्याला वेगळ्या संप्रदायाचा आहे असे घोषित करून सनातन धर्मातून बहिष्कृत करावे अशी कृत्ये केली. गौतमबुध्दांनी सांगितले की रात्रीच्या प्रथम प्रहरी मी ते अविनाशी तत्त्व प्राप्त केले की जे ऋषींना प्राप्त झाले होते. म्हणजे अगदी जे गीतेमध्ये श्रीकृष्णांनी सांगितले आहे की आत्मा अविनाशी आहे, आत्मा सर्वज्ञ आहे तेच तर ते म्हणाले. महावीर स्वामींनी सांगितले की, आत्मा अजर-अमर आहे. इंद्रिय संयम करा, तीर्थ बाहेर नाही. तीर्थस्वरूप असणाऱ्या एखाद्या महापुरुषाची सेवा करा आणि त्यांनी दाखविलेल्या रस्त्यावर चला. या त्रिरत्नांचे पालन करा म्हणजे तुम्ही आत्म्याला जाणाल- महावीरांनी असे सांगितले तर म्हणाले हा जैन आहे. कोणी उघडी तलवार घेऊन तुमचा पाठलाग करीत असेल आणि समोर जैन मंदिर असेल व तेथे गेल्याने तुमचे प्राण वाचणार असतील तरी तुम्ही तुमचे शीर द्या, पण जैन मंदिरात जाऊ नका. बौध्द स्तूप किंवा विहारात जाल तर धर्म नष्ट होईल. वास्तविक जे गीतेत सांगितले आहे तेच महावीरांनी सांगितले आहे की, आत्मा शाश्वत आहे, आत्माच सत्य आहे. काश्मीरपासून प्रयागपर्यंत आर्यवर्त आहे, राहण्यास योग्य असे स्थान आहे. असे म्हणतात शेष ठिकाणी राहणाऱ्यांनी आर्यावर्तातील लोकांकडून धर्म शिकला पाहिजे कारण ब्राह्मण धर्म येथे संगठित होता आणि त्याच्या पुढे बिहार इत्यादी जी बुध्द व महावीर स्वामींची ठिकाणे आहेत त्यांना ते 'म्लेच्छ' देश असे म्हणतात.

कबीरांनी सत्य ते सांगितले, पण ते म्हणाले की याने वेदसुध्दा वाचलेले नाहीत. तो गावंढळ आहे, कबीरपंथी आहे. दयानंदानी वेद घेतले तर म्हणाले हा आर्यसमाजी आहे. नानकांनी सत्य तत्त्व सांगितले की, 'सिमरहु जासु विश्वम्भर एकै' विश्वाचे भरण-पोषण करणारा एक परमात्मा आहे, त्याचे स्मरण करा- तर त्यांना म्हणाले हा तर शीख आहे. येशूने सांगितले की 'परमात्मा एक आहे, त्यातच सुख आहे, शांती आहे, अनंत जीवन आहे. विश्वभरच्या लोकांनो, तुम्ही माझ्याजवळ या तुम्हालाही अनंत जीवन मिळेल. यावर ते म्हणाले 'येशूमसीह' लोकांना शिकवत आहे, बहकावत आहे. महंमद पैगंबरांनी सांगितले की 'परमेश्वर कणा कणात आहे, तुमच्या अंत:करणातील प्रत्येक गोष्ट तो पाहत असतो. त्याच्यापेक्षा कोणी मोठा नाही. त्याच्यापेक्षा अधिक कोणी पूजनीय नाही तर ते म्हणाले हा म्लेंच्छ आहे. वास्तविक या सर्व महापुरुषांचा आज एक

एक संप्रदाय बनला आहे ज्यामध्ये अनेक वाईट चाली जरी रूढ झाल्या असल्या तरी त्याच्या मूळ विचारधारांचे प्रवर्तक वरील सर्व महापुरुष एकच गोष्ट सांगत आहेत जे आपल्या ऋषींनी सांगितले.

'श्रृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा:' अमृताचा अंश असणाऱ्या विश्वभरच्या लोकांनो ऐका ! मी प्रकाशस्वरूप असणाऱ्या परमात्म्याला जाणले आहे. त्याला जाणल्यानेच मनुष्य मृत्यूपासून वाचू शकतो. या व्यतिरिक्त दुसरा कोणताही रस्ता नाही.

धर्म एक आहे व तो सर्व मानवमात्राला एक सूत्रात बांधत असतो. एक ईश्वर, एक नाम, एक धाम, एक प्रार्थनास्थळ, एक शास्त्र, एक महापुरुषाच्या ऐवजी आजचा मानव समाज विखुरला जात आहे. धर्मक्रियेच्या नावावर वेदद्वारा निर्धारित आणि या सर्वांचा सारांश श्रीकृष्णोक्त गीतेद्वारा निर्धारित नियत कर्माला सोडून बाकी सर्व काही करत असतो. नुकतेच एका वर्तमानपत्रात आले होते की एक मनुष्य वीस वर्षापासून काट्यावर झोपत आहे. कारण? तो म्हणे भजन करीत आहे. कोणी सूर्याकडे बघत राहतो का तर म्हणे त्याचे भजन सुरू आहे. कोणी एका पायावर उभे राहून भजन करीत आहे. कोणी नाक दाबून धरीत आहे तर कोणी कानात बोटे घालून बसला आहे का? म्हणे त्यांचे भजन सुरू आहे. आणि भजन कसे करावे विचारले की म्हणतात डोक्यावर उभे राहा. ते शक्य नसेल तर गुदद्वाराने पाणी खेचा. ना साधनेमध्ये एक निश्चितता ना कोणते लक्ष्य ! तरीही धर्माचार्य म्हणत आहेत की जो वेदपुराण जाणत नाही किंवा मानत नाही त्या मनुष्याचा जन्म व्यर्थ होय. वेदपुराणात काय हेच लिहिले आहे का की काहीही बोला, काहीही सांगा, काहीही करा आणि म्हणा की असे वेदात लिहिले आहे. वेदाला बदनाम करणे, वेद पुराणाच्या नावावर चुकीच्या कल्पनांचे- भ्रान्तीचे सृजन करून जनतेला भयभीत करणे आता तरी सोडा.

म्हणतात शास्त्र माना. कोणते शास्त्र मानायचे रामचरित मानसाचे नाव घ्याल तर ते वाल्मीकीने असे लिहिले आहे. वाल्मीकी रामायणाचे नाव घ्याल तर ते म्हणते गीतेत असे लिहिले आहे. गीतेचा खरा अर्थ सांगा असे म्हणाल तर सांगतील वेदात असे सांगितले आहे. वेदाची गोष्ट कराल तर सांगतील गरुड पुराणात असे लिहिले आहे. तुम्ही शास्त्रांना मानताच कुठे? ज्या महर्षींनी वेद लिहिले, अधिकांश शास्त्रे लिहिली ते म्हणतात की गीता शास्त्र आहे. त्यालाच शास्त्र माना. तर धर्माचार्य म्हणतात स्मृतीला माना. ती पण एक नाही तर सतयुगासाठी मनुस्मृती, द्वापारयुगासाठी शंखस्मृती, त्रेतासाठी

गौतमस्मृती आणि कलीयुगासाठी पराशरस्मृती प्रमाण मानली आहे. तरीही अन्य शेकडो स्मृती आहेत. त्या कोणत्या युगासाठी लिहिल्या गेल्या आहेत ते माहीत नाही.

असे सांगतात की स्मृती म्हणजे वेदाचीच व्याख्या आहे तेव्हा त्यानांच प्रमाण मानावे. गीता प्रमाण मानू नये. रामकृष्ण प्रमाण राहिले नाहीत. कलियुगात स्मृती प्रमाण मानू लागले आहेत. म्हणतात की जे वेदात आहे ते स्मृतीमध्ये आहे. मग पाहूया की स्मृतीमध्ये काय सांगितले आहे? याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये (२०६-२०७) उभयमुखी गोदानाचे वर्णन आहे. गाय प्रसवत असताना वासराचे खुर व डोके बाहेर निघत असताना गाईचे तोंड एका बाजूला तर वासराचे तोंड दुसऱ्या बाजूला असते. अशा क्षणी गोदान करण्याने गाय व वासराच्या शरीरात राहणारे साडे तीन तीन करोड रोमांइतक्या युगापर्यंत स्वर्गवास मिळतो. वाराह पुराणाच्या बाराव्या अध्यायात व अग्नी पुराणात २१०/३३ मध्ये दानाचा महिमा वर्णन केला आहे. विचार करा की ज्या परिवारातील मुले मोठ्या आशेने गाय प्रसवण्याच्या क्षणाची वाट पाहत आहे. पण तो मुहूर्त येताच स्वर्गाचा ठेका घेतलेले धर्माचे ठेकेदार तेथे येणार व मंत्र म्हणून ते गाय व वासरू घेऊन जाणार मुलांना एक दिवस दूधही पिऊ दिले नाही. अहो स्वर्ग मिळेल तेव्हा मिळेल पण या धर्ममार्तंडामुळे परिवाराला मात्र नरक मिळाला. आणि सांगतात की जे वेदांत आहे ते स्मृतीत आहे. वेदात काय असे लिहिले आहे का?

पाराशर स्मृतीमध्ये लिहिले आहे की, ही स्मृती दोन उद्देशांनी (१/१६) बनवली गेली आहे (१) ब्राह्मणांच्या हितासाठी आणि (२) धर्माच्या स्थापनेसाठी मग ज्यांच्यासाठी लिहिली गेली आहे त्यांनी वाचावी. सर्वांनी तिला का मानायचे? ही स्मृती कोणत्या धर्माची स्थापना करणार आहे? या स्मृतीत लिहिले आहे की शूद्राने ब्राह्मणाची सेवा करावयाची सोडून अन्य काही केले तर त्याला नरक प्राप्त होतो (२/१९) शूद्रांनी गाईचे दूध प्यायले किंवा वेदातील एखाद्या वाक्यावर जरी विचार केला तरी त्यांना नरक प्राप्त होतो. हा सनातन धर्म आहे (१/७३-७४). शूद्रांनी सत्त्वहीन अन्न खाल्ले पाहिजे. शूद्राच्या घरचे दूध, दही, तूप, मध व गुळ इ. पदार्थ ब्राह्मण खाऊ शकतो; परंतु ब्राह्मणाने ते त्याच्या घरी खाऊ नयेत नदी किनारी जाऊन खावेत. वेद-वेदांग जाणणाऱ्या पाराशर ऋषींनी असे सांगितले आहे. जर वेद-वेदांगात हेच लिहिले असेल तर मग भगवंतानेच वाचवावे. असे वाटते की ऋषींच्या नावावर या स्मृती लिहून धूर्त लोकांनी वेदांचे नावही खराब करून टाकले आहे. व म्हणूनच

गीतेमध्ये श्रीकृष्णांनी 'वेदवादरता:' लोकांना समजावले आहे की संसारवृक्षाला त्याच्या मूळ परमात्म्यासह जाणतो तो वेदवित आहे (गीता १५/१). पोथी वाचणाऱ्यांना श्रीकृष्णाने वेदज्ञ म्हटलेले नाही; उलट त्यांच्या काळी या पुस्तकांना कंठस्थ करणारे श्रुतिधर लोक होते तरीसुध्दा ! श्रीकृष्णाने त्यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला नाही तर तत्त्वदर्शी महात्म्यांजवळ जाण्याचा सल्ला दिला की तध्दिध्दिप्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया उपदेक्ष्यान्ति ते ज्ञानम ज्ञानिस्तत्वदर्शिन: ।। (गीता ४/३४). एवढेच नव्हे तर त्यांनी तत्त्व काय आहे आणि तत्त्वदर्शिता काय आहे हेही सांगितले. त्या तत्त्वाला जाणण्याचा विधी काय आहे? हेही सांगितले आहे. म्हणजे पाच पंचवीस तत्त्वांमध्ये आपला काही घोटाळा होऊ नये. योगेश्वर श्रीकृष्णाने गीतेमध्ये वैदिक साधना इतकी क्रमबध्द रीतीने समजावून सांगितली आहे की इकडे तिकडे भटकण्याचा काही प्रश्नच निर्माण होत नाही. तरीही म्हटले जाते की अरण्यरुदन आहे !

या स्मृतींनी साठ टक्के पेक्षा अधिक लोकांना शूद्र घोषित करून त्यांना ना स्वस्थतेने खाऊपिऊ दिले ना त्यांना कमवायला वाव दिला. कारण चांगले कमावले तर ते ब्राह्मणांना सतावतील ना ! आणि समजा त्यांनी कमावले तरी यज्ञाच्या नावावर त्यांना लुटा. त्यांनी कधी शिकताच कामा नये. त्यांनी अशिक्षित व तिरस्कृतच राहावे. त्यांनी मंदिरात जाता कामा नये नाही तर भगवंताला टिटॅनस होईल. बनारसच्या मंदिरात ते शिरले तर त्या मंदिरातील शंकरजी मरून गेले. धर्माचार्यांनी दुसरे मंदिर बनवले व सांगितले की या मंदिरातील भगवान शंकर शुध्द आहेत त्या मंदिरातील अशुध्द आहेत.

कोण म्हणते की काशी विद्वानांची नगरी आहे? ज्या काशीमध्ये भगवान शिवजींनी रामचरितमानसला सत्यम शिवम सुंदरम प्रमाणित केले त्याच मानसमध्ये असे लिहिले आहे की, कागभुशुण्डिजी आपल्या गत जन्मात शूद्र शरीर घेऊन उज्जैनीला गेले तेव्हा तेथील वैदिक ब्राह्मण गुरूंनी त्यांना शिवाचा मंत्र दिला. ते शिवमंदिरात बसून जप करीत होते. त्या मंदिरातील भगवान शंकर शूद्राच्या प्रवेशाने मेले नाहीत पण त्या गुरूंची अवहेलना केल्यामुळे त्यांना शाप दिला, कारण स्मृतीमध्ये लिहिले आहे की वेदातील एखाद्या वाक्याचा जरी शूद्राने विचार केला तरी शूद्र नरकात जाईल. गीतेमध्ये भगवान म्हणतात की स्त्रीपुरुष, वैश्य, शुद्र, ब्राह्मण अथवा कोणी पापयोनीवाला असला तरी तो जर मला शरण आला तर त्याला परमगती प्राप्त होते. अत्यंत दुराचारी असणाऱ्या मनुष्याने अनन्य भावाने (अन्य कोणाला नाही म्हणजे गाय, बैल, देवी-देवता, भूत-

भवानी, नागनाथ किंवा सापनाथ यासारख्या अन्य कोणालाही न भजता) मला भजले तर तो साधू होण्यास योग्य आहे; कारण तो योग्य मार्गाला लागलेला आहे. असा मनुष्य शीघ्र धर्मात्मा बनतो. म्हणजे गीतेच्या दृष्टीने शूद्रदेखील धर्मात्मा बनू शकतो. स्मृतीमध्ये मात्र शूद्राला नरक प्राप्त होतो असे सांगितले आहे. गीतेमध्ये सांगितले आहे की स्त्रियादेखील भगवंताची भक्ती करू शकतात. पण स्मृती सांगतात की, स्त्रियांनी केवळ पतीची भक्ती करावी (पती परमेश्वर). पतीची अनुमती नसेल तर तिने भगवंताची भक्ती कधीही करू नये. व जर केली तर त्यामुळे तिचा पती अल्पायुषी होईल किंवा मेल्यानंतर ती नरकात जाईल. (पाराशर ४/१७) तरीही म्हणतात की स्मृतीला माना.

स्मृतीमध्ये लिहिले आहे की अन्नाला जर कावळा, कुत्रा शिवला किंवा ते उष्टे केले किंवा गायीने व गाढवाने ते हुंगले तर त्या अन्नाचा त्याग करा म्हणजे ते फेकून द्यावे. तर वेदवेदांग जाणत असलेले पाराशर मुनी म्हणतात की अन्न अधिक असेल तर फेकू नाही. खराब झालेले अन्न फेकावे पण शेष अन्न सोन्याच्या पाण्याने धुऊन उन्हात सुकवावे किंवा ब्राह्मणद्वारा वेदध्वनीने शुद्ध करावे. (पारा. ६/७१/७४) अहो, अमेरिकेतून जर गहू भारतात आला नसता तर लोक भुकेने मेले असते; परंतु अशा प्रकारे गहू कोणी शुध्द करून घेतला नाही. मग असे सांगणारी स्मृती मानावी का?

स्मृती सांगते की विहिरीतील पाणी खराब झाले असेल तर त्यातील शंभर बादल्या पाणी बाहेर फेकून द्यावे व त्यात पंचगव्य घालावे म्हणजे पाणी शुध्द होईल. आज असे कोणी करीत नाही. आज पाण्यात क्लोरीन ब्लीचिंग, पोटॅशियम इत्यादी केमिकल्स घालतात. अहो, पंचगव्य घालण्याने कॉलऱ्याच्या जंतूना ऐताच खुराक मिळेल. यामुळे तर पटकीची साथ आली की गावेच्या गावे स्वच्छ केली जात असत. स्मृतीमध्ये लिहिले आहे की गर्भपात केल्याने ब्रह्महत्येपेक्षा दुप्पट पाप लागते. तेव्हा असे करणाऱ्या स्त्रीचा त्याग करावा (४/२०). उलट आज गर्भपात करवून घेणाऱ्या स्त्रीला शिवण्याचे मशीन भेट म्हणून मिळत आहे. गर्भपात तर सोडाच पण वंध्याकरणाचे लक्ष्य पूर्ण न झाल्यास आज पगार देखील मिळत नाही, पदोन्नती होत नाही. सारांश ही सर्व समाज व्यवस्था असते धर्म नसतो.

हे सर्व वाचल्यावर तुमच्या मनात प्रश्न निर्माण होईल की पुराणे व स्मृतीमध्ये होण्यासारखे-मानण्यासारखे काही आहे की नाही? पाहा बुध्दिजीवी वर्ग नेहमी समाजावर

शासन करत आलेला आहे. तेव्हा त्यांनी निर्माण केलेले कायदा कानून, राहीणी करणीचे नियम या स्मृतीमध्ये ग्रथित केलेली आहेत. ती प्राचीन व्यवस्था होती. देशाच्या इतिहासाचा विकास पाहताना त्यांचा अवश्य उपयोग आहे. परंतु त्या जमान्याचे कायदे कानून, रीतभात आजच्या समाजावर लादण्यात काय अर्थ आहे? आता प्रश्न उरला त्यातून काही ग्रहण करावे की नाही याचा. तर त्यातून गोस्वामीजींनी जे सांगितले आहे तेच ग्रहण करावे. तुलसीदासांनी म्हटले आहे की- 'श्रुति पुराण सब ग्रन्थ कहाही । रघुपति भजन विना सुख नाही ।'' म्हणजे पुराणात भले काहीही लिहिले असेल तरी गोस्वामीजी तिकडे लक्ष देत नाहीत. ''नाना पुराण निगमागम सम्मत'' केवळ एक गोष्ट त्यांना दिसते की एकमात्र परमात्मा समस्त सुखांचा स्त्रोत आहे. 'रघुपति भजन शिवाय दुसरे कसलेही खरे सुख नाही. आणि तुलसी पीठाधीश्वर म्हणतात की गाय तुम्हांला सुख देईल. 'वेद मत शोधि, शोधि, शोधि-शोधि के पुरान सब' गोस्वामींनी वेदांचा सूक्ष्म अभ्यास केला; पुराणांची पारायणे केली; पण त्यांना त्यातून घेण्यासारखी एकच गोष्ट मिळाली- 'रघुपति भजन बिना सुख नाही.'

आचार्य आपल्या पुस्तिकेमध्ये म्हणतात की, भारतीय संस्कृतीमध्ये पशूंचीपण पूजा केली जाते की जसे गणेशाचे प्रतीक म्हणून हत्तीला पूजले जाते, शंकराचे प्रतीक समजून नीलकंठ पूजला जातो- त्याप्रमाणे गाईला विष्णूची सजीव प्रतिमा समजून तिचे समर्थन केले तर काय हरकत आहे? 'सियाराम मय सब जग जानी । करउँ प्रनाम जोरि युग पानी ।।'' बघा किती सहजपणे ही चौपाई सांगितली गेली आहे. पण ही तेवढी सोपी गोष्ट नाही. पूज्य परमहंस महाराज (गुरुदेव) म्हणत असत की साधनाकाळात एक स्तर असा पण येतो की (महाराजश्रीना पण असा अनुभव आलेला होता) जड चेतन नव्हे कणाकणात इष्टाचे दर्शन घडते. त्यामुळे महाराजश्रींनी काही दिवस दातन करणे सोडून दिले होते. त्यांना असे वाटत होते की ज्याप्रमाणे आपल्या अंगावरचे केस उपटल्यास आपल्याला जशा वेदना होतात, पीडा होते त्याप्रमाणे झाडाला वेदना होत असतील. म्हणून ते काही दिवस दातन करीत नव्हते. परंतु हीही मधली अवस्था आहे. पुढे गेल्यानंतर हेही एक अज्ञान वाटते. असेच होते की साधकाला 'जहँ तहँ देखे धरे धनु बाना' सर्वत्र ईश्वरच भरलेला दिसून येतो. गोस्वामींच्या शब्दात- 'उमा जे राम चरन रत, विगत काम मद क्रोध । निज प्रभुमय देखहिं जगत, केहिं सन करहिं विरोधा ।।'' जेव्हा साधना बरोबर होत असते तेव्हा राम चरणीच ती मग्न होते, काम, क्रोध मद विकार शांत होतात व

अशी व्यक्तीच मग जगाला श्रीराममय पाहू शकते. सर्वजण पाहू शकत नाहीत, जाणू शकत नाही. केवळ मानण्याने जग राममय झालेले दिसत नाही. अहो, मानणे व प्रत्यक्ष जाणणे यात खूप फरक आहे.

पशुपक्षांची पूजा ही आमची संस्कृती नाही. तो एक प्रकारचा अव्यवस्थितपणा आहे. औदार्य नाही तो एक आत्मघात आहे. ही पुराणे म्हणजे स्मृतिकालीन विकृती आहे. ही भारतीय संस्कृती नव्हे. प्रवाहामध्ये अचानक निर्माण झालेला भोवरा आहे, प्रवाहाची स्वच्छ धार नव्हे. शिक्षणाला बंदिस्त करून स्मृतींनी मानव समाजाला मूर्ख बनवून टाकले आहे. आणि मग त्यांना सांगितले की झाडांना पूजा, दगडाची पूजा करा, भूतांना पूजा, सापाची पूजा करा. भोळ्याभाळ्या जनतेला भय दाखवून त्यांना दहशत घातली की कडू निम्बात शीतळा माता राहते, मोहाच्या झाडात वृत्रासुर, वटवृक्षात ब्रह्म तर गाईप्रमाणे पिंपळामध्ये संपूर्ण देवलोक- 'पात्रे पात्रे देवानाम' पानापानात देवता- या प्रकारे विधात्याच्या सृष्टीला, नश्वर शरीरांना हजारो प्रकारे त्यांनी पूजायला सांगितले हे सर्व खोटे मार्ग आहेत, खोट्या पध्दती आहेत. भारतीय संस्कृती नव्हे.

आमची संस्कृती भगवान रामद्वारा प्रदत्त आहे, भगवान श्रीकृष्णद्वारा प्रदत्त आहे. परम प्रभू श्रीरामाने आयोध्येच्या विशाल जनसमूहाला संबोधित करताना म्हटले की, जर तुम्हाला परलोक पाहिजे असेल तर किंवा या लोकीच तुम्हांला सुख समृध्दी पाहिजे असेल तर तुम्ही आमची गोष्ट ध्यानपूर्वक ऐका व हृदयात दृढतापूर्वक ग्रहण करा. या दोन गोष्टींसाठी एकच मार्ग आहे. गरीब व श्रीमंतासाठी एकच सुलभ रस्ता आहे. कोणता? 'भगति मोरि' माझी भक्ती करा. न सीतेची, ना हनुमानाची, ना गाईची, ना म्हशीची. केवळ माझी भक्ती करा.

**जो परलोक इहाँ सुख चहहू ।**
**सुनि मम वचन हृदय दृढ गहहू ।।**
**सुलभ सुखद मारग यह भाई ।**
**भगति मोरि पुरान श्रुति गाई ।।**

हेच पुराण आणि श्रुतीचे गीत आहे. एका परमात्म्याची भक्ती ही आमच्या संस्कृतीचा पहिला चरण आहे आणि दुसऱ्या चरणात आहे सामाजिक मर्यादा जी श्रीरामाने घालून दिलेली आहे- भावाचे भावासाठी असणारे कर्तव्य, पिता-पुत्राचे कर्तव्य, मित्र,

शत्रू तसेच समाजासाठी असणारे दायित्व ह्याचा बोध एवढेच आहे आमची भारतीय संस्कृती ।

या प्रकारे योगेश्वर श्रीकृष्णाने गीतेमध्ये सांगितले की आत्माच शाश्वत आहे, अविनाशी आहे, अमृतस्वरूप आहे, तोच सनातन आहे. आम्ही लोक कोण आहोत? आत्म्याचे उपासक आहोत. गाईचे नाही, देव-देवतांचे नाही किंवा दगड धोंड्यांचे नाही. जर तुम्ही आत्म्याला जाणण्याची क्रिया करीत नसाल तर आपण सनातन धर्मीय कसले? आत्म्याला जाणण्याची जी पध्दत श्रीकृष्ण सांगतात त्यात गाईची पूजा तर सांगितलेलीच नाही. 'यान्ति ब्रह्म-सनातनम' आत्मा, परमात्मा, भगवान, ब्रह्म हे सर्व पर्याय आहेत. श्रीकृष्णही सांगतात तीच एक परमात्म्याची पूजा होय. हाच भारतीय संस्कृतीचा प्रथम पक्ष आहे आणि योगेश्वर श्रीकृष्णाने मित्राचा रथ कसा चालवला , गरिबांवर-सज्जनांवर त्यांनी कशी कृपा केली, त्यांचे संगठन कौशल्य कसे उत्तम होते, त्यांची सफल, समृध्द व जीवंत अशी जीवन शैली कशी होती- हा आमच्या संस्कृतीचा दुसरा पक्ष आहे. कावळ्याची पूजा, घुबडाची पूजा ही आमची संस्कृती नाही. मध्येच निर्माण झालेली ती एक कुरीत आहे.

या कुरीतीची भेट म्हणजे सोमवारी शंकराचे व्रत, मंगळवारी हनुमानाची पूजा, बुधवारी गणेशाची पूजा, गुरुवारी दत्तात्रयाची- बृहस्पतीची, शुक्रवारी संतोषी मातेचे व्रत, शनिवारी शनी ग्रहाची शांती व रविवारी सूर्याची उपासना (अनेक प्रांतात मंगळवार देवीचा व शनिवार हनुमानाचा मानण्याची प्रथा आहे) केली जाते. याला भारतीय संस्कृती म्हटले जाते. सात दिवस देवतांच्या पूजेसाठी वाटून टाकले. म्हणजे आयुष्यभरात परमेश्वराचा विचार करायला एकही दिवस उरला नाही. कुठे एकट्याची पूजा तर कुठे दंपतीची उपासना तर कधी एकदम तीन तीन किंवा पाच पाच देवतांची एकाच वेळी उपासना केली जाते. म्हटले जाते की ही भारताची समन्वयावादी संस्कृती आहे. अहो, पण ही संस्कृती नाही, ही तर विकृती आहे.

म्हटले जाते की जातिव्यवस्था भारतीय संस्कृती आहे. म्हणजे आपापसातील भेद-फूट ही भारतीय संस्कृती झाली. प्रथम या स्मृतींनी व पुराणांनी अवघ्या जगाची चार वर्णात वाटणी केली, ज्यात सांगितले की ब्राह्मणांनी सरस्वती देवीची, क्षत्रियाने दुर्गा देवीची, वैश्याने लक्ष्मीची व शूद्राने कालीची पूजा करायला हवी. म्हणजे भगवंताचे कोठे नावच नाही. ही झाली भारतीय संस्कृती. कायस्थांनी चित्रगुप्ताची पूजा करावी

तर लोहारांनी विश्वकर्म्याची जयंती साजरी करावी. भंगी लोकांनी वाल्मीकी जयंती साजरी करावी. भगवंताच्या पूजेचा कोणाला आदेशच नाही. उलट रामकृष्णांच्या आदेशानुसार एक परमात्म्याशिवाय कोणाला पूजण्याचे विधान नाही.

या पुराणपंथियांच्या मते संपूर्ण ऋध्दी सिध्दीचा दाता श्रीगणेश आहे आणि संपूर्ण ज्ञानाची देवी सरस्वती आहे. मनुष्याला आणखी काय पाहिजे? एक तर ज्ञान किंवा दुसरी समृध्दी या दोन गोष्टी गणेश आणि सरस्वतीकडून मिळतील मग भगवंताची गरज काय? मग ही भारतीय संस्कृती आहे का? प्रत्येक तिथीला वेगवेगळे व्रत, प्रत्येक नक्षत्राचे वेगवेगळे व्रत ! म्हटले जाते की द्वितीयेला अशून्य शय्या व्रत करायवास पाहिजे म्हणजे ज्याप्रमाणे विष्णूच्या शय्येवर सदैव लक्ष्मी राहते त्याप्रमाणे हे व्रत करणाऱ्या पुरुषाची शय्या स्त्रीशिवाय व स्त्रीची पुरुषाशिवाय रिकामी राहात नाही. हीच का आमची संयमप्रधान संस्कृती ! श्रुती म्हणते ''यदिच्छन्तो ब्रह्मचर्य चरन्ति'' येथे शय्या रिकामी राहणार नाही असे प्रलोभन दिले जाते. ही संस्कृती नव्हे. विषयलोलुप असणाऱ्यांकडून निर्माण केलेली विकृती आहे.

भारतीय संस्कृती अत्यंत स्पष्ट व प्रगल्भ असतानादेखील लोक नश्वर कलेवरांच्या पूजेत गुरफटले गेले. कारण ही स्मृती आणि पुराणांची भारतीयांना मिळालेली देणगी आहे, किंवा अगदी खरे सांगायचे म्हणजे या ग्रंथांना विकृत बनवणाऱ्यांचे हे षडयंत्र आहे. श्रीकृष्ण म्हणतात की केवळ एका परमात्म्याचेच अस्तित्व असते बाकी कोणाचे अस्तित्व नसतेच. अस्तित्वाची पूजा करणारा अस्तिक व नश्वर कलेवरांची पूजा करणारा नास्तिक आहे. तरीसुध्दा अनेक आचार्य अज्ञानाने अस्तित्वविहीन देवी-देवता, पशुपक्षी इत्यादी नश्वर कलेवरांची पूजा करण्यात गुंतले आहेत. मज्झिम निकायमध्ये म्हटले आहे की, महात्मा बुध्दाच्या वेळी कूकरव्रती-गोव्रती असे अनेक संप्रदाय भारतात होते. कोणी केशकम्बल होता. म्हणजे केस वाढवून त्यांचा कांबळ्याप्रमाणे उपयोग करणारा तो केशकम्बल ! कुत्र्याप्रमाणे राहणारे कूकरव्रती होते. गोव्रतीबाबत गौतम बुध्दांना विचारले की, ''महाराज, आमचा हा मित्र अनेक वर्षांपासून गाईप्रमाणे चालतो, फिरतो, तोंडाने हंबा हंबा करतो, अन्न तोंड घालून खातो, डोक्याने खाजवतो म्हणजे थोडक्यात त्याचे सर्व आचरण गाईप्रमाणे त्याने बनवले आहे. तेव्हा त्याला काय गती मिळेल? गौतम बुध्द म्हणाले ते न विचाराल तर चांगले तेव्हा खूप आग्रह केल्यानंतर बुध्दांनी सांगितले की, तो सतत गाईचे चिंतन करीत असेल, गाईप्रमाणेच कृती करत असेल तर

त्याला पुढचा जन्म निश्चितपणे गाईचाच प्राप्त होईल. मृगाचे सतत चिंतन करण्याने जड भरताला मृगाचाच जन्म नाही का मिळाला? मग या मित्राबाबत गौतम बुध्दाने काय चुकीचे सांगितले? याच प्रकारे एक ब्राह्मण सातशे गाईची वासरे, सातशे शेळ्या व सातशे मेंढ्या बळी देऊन भगवंताला प्रसन्न करू इच्छित होता, पण बुध्दांनी त्याला समजावले व त्यापासून परावृत्त केले. पुढे तो त्यांचा शिष्य बनला व महाकश्यप नावाने प्रसिध्द झाल.

तात्पर्य हे की एका परमात्म्याशिवाय अन्यत्र कोठेही श्रध्दा ठेवणे हा धर्म नव्हे व भारतीय संस्कृतीही नव्हे, पण हे न समजल्याने आमचे काही जगद्गुरू देवीची पूजा सांगतात. तर काही विष्णूची तर काही गाईची पूजा करायला सांगतात. मूठभर लोकांचे संघटन करायचे व स्वत:ला जगद्गुरू म्हणावयाचे. जग एकच आहे; पण भारतात असे शेंकडो जगद्गुरू असतील. आदि शंकराचार्यांनी 'एको ब्रह्म द्वितीयो नास्ति'चा उपदेश केला; पण त्यांच्या गादीवर बसणाऱ्या शंकराचार्यांनी भूत-भवानी इत्यादींच्या स्तुतीमध्ये एवढे काही लिहिले की आदि शंकराचार्यांचा सिध्दान्तच लोपला गेला. तसेच गोस्वामी तुलसीदासांनी सांगितले की कोणीही कसेही असो पण ''तरइ न बिनु सेये मम स्वामी'' पण त्यांच्या गादीवर बसणारे म्हणतील की गायमाता तुम्हाला तारेल.

या आचार्यांना आपल्या स्वत:ची व समाजाची कीव यायला हवी कारण ज्या प्रपंचाचा त्याग करून विरक्त झाले त्याच जात पात व संपत्तीमध्ये आपले जीवन व्यतीत करीत आहेत. फक्त ब्राह्मणच भगवंताला प्राप्त करू शकतो. त्यामुळे त्याच्यासाठीच भगवंत अवतार घेत असतात- असे सांगून ते आज सुशिक्षित समाजात हस्यास्पद ठरले आहेत. रात्रभर कथा सांगतील रामायणाची ही 'रामहि सुमिरिय गाइय रामहि'; परंतु सकाळी पूजा करतील- ''गणानां त्वां गणपति हवामहे या देवी सर्व भुतेषु छायारूपेण संस्थिता'' न जाणो कोणकोणती स्तोत्रे ते म्हणत बसतात.

तेव्हा बंधूनो, एका परमात्म्याचे स्मरण करा. हाच धर्म आहे. त्या परमप्रभूचे अद्याप काही नाव नाही काही रूप नाही, परंतु साधनेच्या काळात त्याला संबोधनासाठी भारतीय मुनींनी त्याला पुरुषोत्तम, ब्रह्म, भगवान, आत्मा इत्यादी नावाने संबोधले आहे. परमात्मा म्हणजे जो सर्वत्र व्याप्त आहे, त्याची सर्वत्र सार्वभौम सत्ता आहे. जो देश, काल, जाती व संप्रदायाच्या पलीकडे आहे, जो सर्वांचा आहे. भलेही भाषाभिन्नतेमुळे त्याला कोणी गॉड म्हणो की कोणी अल्ला म्हणो. ज्या प्रकारे, जल, आप, पाणी, वॉटर

इत्यादी भिन्न भिन्न नामांनी एकच वस्तू प्राप्त होते त्याप्रमाणे भिन्न भिन्न भाषेमुळे त्या परमात्म्याची नावे भिन्न असली तरी त्या परमतत्त्वाचीच आहेत. त्याचा साक्षात्कार झालेले महापुरुष सांगतात की परमात्मा एक आहे, त्याला शोधण्याचे स्थान हृदय आहे व त्याला प्राप्त करण्याचा विधी आहे मनासहित इंद्रियांना त्या परमात्म्याचे ठिकाणी केंद्रित करणे. हाच मानवाचा धर्म आहे- हीच भारतीय संस्कृती आहे व हाच मोक्षाचा मार्ग आहे. तेव्हा आम्ही सर्वांनी त्या परमतत्त्वाची आराधना करावी की ज्यात आमचे कल्याण आहे. गोस्वामीजी म्हणतात-

**वाक्य ज्ञान अत्यन्त निपुन भव पार पावै कोई ।**
**निशि गृहमध्य दीप की बातन्ह तम निवृत्त नहिं होई ।।**
**जब लगि नहि निज हृदि प्रकाश अरु विषय आश मन महिं**
**तुलसीदास तब लगि जग-योनि भ्रमत सपनेहु सुख नाही ।।**
**(विनय १२३)**

केवळ व्याख्यानबाजी करण्याने काही होत नाही. सर्व प्रथम विषयासक्ती नष्ट करा व त्याचे असे चिंतन करा की आपल्या हृदयात तो प्रकाशरूप परमात्मा जागृत होईल की ज्याची अनुभूती आपल्या पूर्वजांना व वैदिक ऋषींना झालेली आहे.

तो प्रकाश कसा जागृत होईल? गोस्वामी म्हणतात ‘श्रीगुरु पदनख मनि गन ज्योति । सुमिरत दिव्य दृष्टि हिय होती.’ उपनिषदे म्हणतात- ‘तध्दिज्ञानर्थम् स गुरुमेवाभिगच्छेत (मुण्डक १/२/१२) तेव्हा निर्धारित कर्म करीत राहा. हीच भारतीय संस्कृती आहे.

शेवटी आभार प्रदर्शन ! ज्यांनी आमची ही पुस्तिका मनापासून वाचण्यात आपला बहुमूल्य वेळ घालवला, तसेच चित्रकूटचे महाराज प्रज्ञाचक्षूजी यांचाही मी आभारी आहे. कारण त्यांनी आपल्या चित्ताची निरगाठ सोडवून समाजाला सनातन धर्मावर काही सांगण्याची व जाणण्याची संधी दिली.

**म्हणा, गुरुदेव भगवान की जय !**

।। ॐ ।।

(अध्याय ८ श्लोक ९)

**यान्ति देवव्रता देवान् पितृन्यान्ति पितृव्रता: ।**
**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ।।**

अर्जुना, देवतांची पूजा करणारे देवताप्रत जातात. म्हणजे देवतांना प्राप्त करतात. देवता म्हणजे एक परिवर्तीत सत्ता आहे. जीवांच्या सत्कर्मानुसार ते जीवाला फल देतात. पितरांची भक्ती करणारे पितृत्वाप्रत जातात. म्हणजे ते भूतकाळात गुंतून राहतात आणि माझा भक्त माझ्याप्रत येतो. ते माझे साक्षात स्वरूप बनतात. त्यांचे पतन होत नाही.

**‘यथार्थ गीता: श्रीमद्भगवद्गीता**
(अध्याय ९ श्लोक २५)

# सती

**त्या परमपुरुष परमात्म्याशी, शाश्वत सत्याशी**
**ज्याचा स्वभाव जुळला आहे तो सती आहे.**
**जो सत्य परायण आहे त्याला सती म्हणतात.**
**सती हा शब्द स्त्रीलिंगी असल्याने उभयलिंगी**
**असणारा हा शब्द कालांतराने फक्त**
**स्त्रियांशीच जोडला गेला.**

**-स्वामी अडगडानन्द**

---

(कार्तिक पौर्णिमेच्या (५ नोव्हेंबर १९८७) पावन पर्वाचे वेळी त्यागी आश्रम, बिराँव कोट वाराणसीच्या वार्षिक समारंभात स्वामी श्री अडगडानन्दांनी 'सती' या विषयाच्या भ्रामक प्रश्नाचा केलेला रहस्यस्फोट)

---

# सती

राजस्थानातील जयपूर जवळ देवराला गावातील अठरा वर्षाची रूपकुंवर आपल्या पतीबरोबर सती गेली तेव्हापासून सती प्रथा भारतातील बहुचर्चीत समस्या बनली. या प्रकारे सती जाण्याचे (स्वत:ला पतीच्या शवाबरोबर जाळून घेण्याचे) दोन हेतू सांगितले जातात. एक तर पतीबरोबर सती जाण्याने पुढच्या जन्मी तोच पती मिळेल आणि दुसरा हेतू म्हणजे सती जाण्याने पतिपत्नी दोघांनाही परमगती प्राप्त होते; परंतु दोन्ही गोष्टी म्हणजे रूढीची केवळ एक देणगी आहे.

महाकाव्ये आणि पुराणांमध्ये तीन चार प्रकारच्या सतींचा उल्लेख मिळतो. जिचा पती मरण पावला नाही ती उत्तम कोटीतील सती होय. दुसरी ती जिने पतीच्या आदेशावर विचार केला, उचित वाटले तर पालन केले, अनुचित वाटले तर पालन केले नाही. तिसरी एकापेक्षा अधिक पतींना वरणारी पण सती समजली गेली. चौथी कोणतीही श्रेणी नाही पण एक भ्रम असा की पतीबरोबर स्वत:ला जाळून घेणारी खरी सती होय. मग ज्या स्त्रिया अशा जाळून घेत नाहीत त्यांना काय म्हणायचे?

* माता अनुसूया, नर्मदा, सावित्री अशा अनेक अत्युच्च कोटीतील सती आहेत. त्यांनी पतीच्या आदेशाचे तंतोतंत पालन केले आहे- उदा. अत्यंत दुष्काळात पाणी जवळपास प्राप्त होत नव्हते. तेव्हा पतीने आज्ञा करताच अनुसूया पाणी आणण्यासाठी निघाली त्याबरोबर मंदाकिनीचा अजस्त्र स्त्रोत प्रवाहित झाला. एकमेव परमात्म्याच्या भक्तीने या स्त्रियांनी ती क्षमता प्राप्त करून घेतली होती की ''जो इच्छा करिहउ मन माहीं । हरिप्रसाद कछु दुर्लभ नाही'' भगवंतच त्यांची इच्छा पूर्ण करीत होते. जगातील कोणतीही अभीष्ट वस्तू त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणीही (म्हणजे अगदी काळसुध्दा) त्यांच्यापासून हिसकावून घेऊ शकत नव्हता. त्यांच्या भक्तीच्या प्रभावामुळेच सावित्री किंवा नर्मदेने आपल्या पतींना मृत्यूपासून वाचवले. सीतापण याच कोटीतील होती. रावणाने सीतेला जेव्हा रामाचे मायानिर्मित कापलेले डोके दाखवले तेव्हा सीता शोकाने अत्यंत विव्हल झाली व म्हणाली की, माझ्या हातून अवश्य काही तरी चूक झाली असेल अन्यथा मी जिवंत असताना आपण असे मृत्यू पावला नसतात. अशा सतींचा पती मेला नाहीच परंतु त्या साधनेच्या उत्कृष्ट स्तरावर होत्या. पतीच्या शवाबरोबर अनुसूया, नर्मदा किंवा सावित्री जळून मेल्याचा उल्लेख कोठे मिळत नाही.

श्रीरामचरित मानसमध्ये आहे की ''सती सिरोमनि सिय गुन गाया'' (१/४७/७) सीता म्हणजे साधारण किंवा मध्यम श्रेणीची नाही पण सतींचीही शिरोमणी होती. तिची राहणी व आचरण पाहा. जेव्हा राम वनात जायला निघाले तेव्हा सीताही रामाबरोबर निघाली. तेव्हा माता कौसल्येने सांगितले- रामा, तू स्वत: सीतेला समजावून सांग ती आमच्याजवळ राहिली तर तुझ्या वडिलांचे जीवन सुसह्य होईल. मलाही थोडा आधार राहील. श्रीरामाने त्या प्रमाणे केले ''**मातु समीप कहत सकुचाही । बोले समय समुझि मन माही ।।**'' आईसमोर नववधूबरोबर बोलायला श्रीरामाला संकोच वाटत होता (आज असा संकोच कोणाला वाटत नाही) सर्वांसमोर समजावणेच तेव्हा योग्य होते. कारण सीतेने ऐकले नाही तर सर्वांना वाटेल की रामाचीही तिला बरोबर नेण्याची इच्छा होती. म्हणून ते म्हणाले राजकुमारी माझे ऐक. दुसरा कोणताही विचार मनात आणू नकोस; उलट-

**आपन मोर नीक जौं चहहू । वचन हमार मानि गृह रहहू ।**
**आयसु मोर सासु सेवकाई । सब विधि भामिनि...**
**भवन भलाई ।। रामचरित मानस २/६०/३-४**

सीते, केवळ स्वत:चेच नव्हे तर माझेही हित व्हावे असे तुला वाटत असेल तर तू घरीच राहावेस. माझी तुला अशी आज्ञा आहे की तू सासूची सेवा करावीस घरात राहण्यातच तुझे कल्याण आहे. पण हे ऐकताच सीतेचे डोळे भरून आले. पायाच्या अंगठ्याने जमीन उकरू लागली म्हणाली-

**दीन्ह प्राणपति मोहिं सिख सोई ।**
**जेहिं आचरत मोर भल होई ।।**
**मै पुनि समुझि दीख मन माहीं ।**
**पिय वियोग सम दुख जग नाही ।।**

आपण तर मला अशी शिकवण दिली की ज्यात माझे हित आहे. कारण असा प्रसंग कौसल्या मातेवर कधी आला नव्हता ना रामाला असला कधी अनुभव होता. म्हणजे पतिवियोगासारखे भयंकर दुसरे कोणते दु:ख नव्हते.

**भोग रोग सम भूषन भारू ।**
**जम जातना सरिस संसारू ॥**
**प्राननाथ तुम बिनु जग माहीं ।**
**मो कहुं सुखद कतहुँ कछु वाहीं ॥**
**रामचरित मानस, २/६४/५-६**

आपल्याशिवाय सर्व सुखोपभोग रोग आहेत, आभूषणे जड आहेत. येथे मला काहीही सुखकारक असणार नाही. सारांश पतीने आदेश दिल्यानंतरही सीता बरोबर जाण्यासाठी हटून बसली.

रामाला वनात पोहचवून सुमन्त परत फिरताना त्याने रामाला पुन्हा वडिलांचा संदेश सांगितला की सीता परत फिरेल तर मी जगू शकेन. तेव्हा रामाचे कर्तव्य आहे की त्याने सीतेला परत पाठवावे. ''**पितृ संदेश सुनि कृपा निधान । सियहिं दीन्ह सिख कोटि विधाना ।**'' करोडो उदाहरणे देऊन तिला समजावले की, ''**सासु ससुर गुरू प्रिय परिवारू । फिरहु त सब कर मिटै खभारू ।**'' सीते तू जर परत फिरलीस तर सासू, सासरे, गुरू, प्रियजन व प्रजेचे दु:ख नाहीसे होईल. तिला अनेक प्रकारे समजावले. करोड मोजायलाही दोन दिवस लागतील. आजकाल दहा पंधरा लाखाची मतमोजणीतही एक दिवस लागतो. तात्पर्य एवढेच की इतके समजावले तरीही सीतेने ऐकले नाही ती म्हणाली-

**प्रभु करूनामय परम विवेकी ।**
**तनु तजि रहति छाँह किमिछें की ॥**
**रामचरित मानस २/९६/५**

सीतेने आयोध्या सोडले होते. बरेच अंतर कापले होते व म्हणून ती म्हणाली आज आपण हे काय सांगत आहात? आपण तर परम विवेकी आहात ना? आपल्याला आज काय झाले आहे? सावली कधी शरीरापासून अलग होऊ शकते का? चंद्रापासून चांदणी कधी वेगळी जगू शकेल का? रामाला अनेक प्रश्न विचारले व शेवटी ''**पति हिं प्रेममय विनय सुनाई**'' पतीला प्रेमपूर्ण विनयाने सांगितले आणि भक्कम राहिली. ती परत फिरली नाही.

तिसरे उदाहरण वनवास काळातील आहे. रामाचे वास्तव्य पंचवटीत होते. तेव्हा एक दिवस सीतेला कांचन मृग दिसला. सीतेने रामाला सांगितले की मला हा मृग हवा आहे मग जिवंत असो की मेलेला ! मी त्याच्या कातड्याने आपली झोपडी सजवेन. वाल्मीकी रामायणातील अरण्यकाण्डातील त्रेचाळीसाव्या सर्गात सीता म्हणते- ''जरी स्त्रीने आदेश देता कामा नये, हा भयंकर स्वेच्छाचार आहे आणि साध्वी स्त्रियांना ते शोभणारे नव्हे हे मला माहीत आहे तरीही या प्राण्याच्या शरीराने मला मोहविले आहे. तेव्हा आपण त्वरित जावे'' येथे आपली गरज पुरवण्यासाठी ती हट्टपण करू शकत होती.

शेवटी रावण मारला गेला. सीता अयोध्येला परत फिरली. पण एका धोब्याने तिच्यावर आक्षेप घेतला. आपली बाजू भक्कम करण्यासाठी म्हणा किंवा चुकीने म्हणा त्याने आपल्या पत्नीला हाकलूनही दिले होते. लोकमतामुळे रामाने सीतेला परत वनात पाठवले. महर्षी वाल्मीकींच्या प्रयत्नाने जेव्हा लोकापवाद दूर झाला तेव्हा जनसभेत रामाने सांगितले की एकदा सीतेने अग्निपरीक्षा देऊन स्वत: निर्दोष असल्याचे सिध्द केले आहे व म्हणून मी तिचा स्वीकार केला होता; पण जनमताला विवश होऊन मला पुन्हा तिचा त्याग करावा लागला होता. आता सर्वांसमोर सीतेने पुन्हा परीक्षा द्यावी म्हणजे मी तिचा स्वीकार करू शकेन. श्रीरामांना असे वाटत होते की परीक्षा दिल्यानंतर सीतेने त्यांच्या सिहासनाची शोभा वाढवावी पण श्रीरामाची पापणी लवते न लवते तो सीता धरतीमध्ये सामावली गेली.

असे म्हटले जाते की भूमीमधून एक सिंहासन वर आले, सीतेला त्यावर बसवून तिला घेऊन पुन्हा भूमीत गडप झाले. वास्तविक ही केवळ कविकल्पना आहे. साधारणत: महात्म्यांच्याबद्दल अशाच प्रकारची वंदता असते की त्यांना सर्वांना घ्यायला विमान आले होते. मीरा बघता बघता कृष्णमूर्तीत सामावली गेली. संत तुकारामानी इंद्रायणी नदीत जलसमाधी घेतली; तर म्हटले जाते की, आकाशातून त्यांना घेण्यासाठी एक विमान आले व त्यांना घेऊन गेले. वास्तविक पृथ्वीच्या गर्भात ना पाताळ आहे ना आकाशात वैकुंठ आहे, ना तेथे विमानाची काही व्यवस्था आहे. असो सांगायचे म्हणजे अथपासून इतिपर्यंत सीतेने विचारपूर्वक निर्णय घेतला. जी गोष्ट उचित होती ती तिने स्वीकारली परंतु सर्व गोष्टी तिने स्वीकारल्या नाहीत. तरीही ''**सती शिरोमणी सिय गुन गाथा**'' सीता सती होती का?

**सुन सीता तव नाय, सुमिरि नारि पतिव्रत करिहिं ।**
**तोहि प्राण-प्रिय राम, कहिउँ कथा संसार हित ।।३/५ ख**

पतिव्रता स्त्रिया तुमचे अनुकरण करतील कारण 'तोहि प्राण-प्रिय राम' राम तुम्हाला प्राणाइतका प्रिय आहे. वास्तविक जिची श्रध्दा एकमात्र परमात्म्याच्या चरणी केंद्रित झालेली आहे तीच खरी सती आहे. परमात्मा हेच एकमेव सत्य आहे. व या सत्याशी ज्यांचे नाते ज्यांचा स्वभाव जुळला आहे तीच सती होय.

गोस्वामीदेखील म्हणतात 'धर्म न दूसर सत्य समाना' पण हे सत्य आहे काय? तर ''व्यापक एक ब्रह्म अविनाशी । सत चेतन धन आनन्दराशी ।।'' ''सत्य सर्वव्यापक आहे. ते एकच आहे. दोन झाले तर दुसरी दुनियाच निर्माण होईल. आणि झाली नाही तर भगवान कसला? तेव्हा तो एकच आहे व सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे व तोच परमात्माच सत्य आहे. 'अस प्रभु हृदय अछत अधिकारी' तो परमात्मा हृदयदेशात वास करतो. त्याचे जो सतत मनन चिंतन करतो तोच सती होय. तोच सत्पथावर आहे. सीतेमध्ये हाच विशेष गुण होता की राम तिला परमप्रिय होते. व म्हणून ती सती होती. अन्यथा आजदेखील अनेक स्त्रिया चांगल्या प्रकारे आदेश देऊ शकतात, निर्णय घेऊ शकतात. त्यानुरूप आचरण करतात. अकारण लांछित झाल्या तर धरतीमध्ये स्वत:ला गाडून घेतात, कोणी रॉकेल अंगावर घेते तर कोणी पंख्यावर लटकते परंतु हा सतीत्वाचा मापदंड नव्हे. सीतेचे सतीत्व म्हणजे पतीबरोबर सहमरण हे नव्हते.

श्रीराम सीतेचे पती होते म्हणून ती त्यांना प्राणांहून प्रिय मानत नव्हती. परंतु त्या सत्याला मानत होती जे बृहदारण्यक उपनिषदातील दुसऱ्या अध्यायात, चतुर्थ ब्राह्मणाच्या पाचव्या मंत्रात महर्षी याज्ञवल्क्यद्वारा मैत्रेयीला सांगितले गेले की ''**न वा अरे । पत्यु: कामाय पति: प्रियो भवति । आत्मनस्तु कामाय पति: प्रियो भवति । न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवति । आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । न वा अरे सर्वस्व कामाय सर्व प्रियं भवति । आत्मनस्तु कामाय सर्व प्रियं भवति ।**'' याज्ञवल्क्य मैत्रेयीला म्हणतात मैत्रेयी, पती म्हणून पती प्रिय असत नाही आत्म्यासाठी पती प्रिय असतो. स्त्रीच्या प्रयोजनासाठी स्त्री प्रिय होत नाही आत्म्यासाठीच ती प्रिय होत असते. आत्म्यासाठी सर्व काही प्रिय होत असते हीच गोष्ट गोस्वामींनी सोप्या शब्दांत सांगितली आहे की, ''पूजनीय प्रिय परम जहाँ ते । सब मानिअहिं राम के नाते ।'' पतीच्या नात्याने नाही; पण रामाच्या नात्याने त्यावर श्रध्दा

ठेवा. ''नाते नेह राम के मनियत सुहृद सुसेव्य जहाँ लौ । अंजन कहाँ आँख जेहि फुटे, बहुतक कहौं कहाँ लौ । (विनय पत्रिका)

सत्य तर हे आहे की एक परमात्माच सर्वांचा वास्तविक पती आहे. वेदामध्ये सांगितले आहे की ('हिरण्यगर्भ: समणर्तताग्रे भूतस्य जात: पतिरेक आसीत् ।') सर्व प्राणिभूतांचा तोच एक पती आहे. पत म्हणजे मर्यादा (इज्जत). वारंवार गर्भवासातील अनंत योनींमध्ये जन्म घेणे यासारखी आणखी दुसरी कोणती बेइज्जत होऊ शकते? यातून वाचवण्यासाठी व निर्मल रूप प्रदान करण्यास तो एकमात्र भगवानच समर्थ आहे. यासाठी महापुरुषांनी ईश्वराला पती म्हणून संबोधले आणि त्याची आठवण राहावी म्हणून प्रपंचातील एका नात्यालाही तेच नाव देवून टाकले. राणा मरण पावल्यानंतर मीराला जेव्हा सती जाण्यास सांगितले तेव्हा ती म्हणाली-

**ऐसे पति को क्या बरूँ, जो जनमे और मर जाय ।**
**मीरा अविनाशी बयौं, चुडलो अमर हो जाय ।।**

केवळ मीरानेच नाही तर पुरुष महानुभवांनीही ईश्वराला पती मानले आहे. संत कबीर, गोस्वामी तुलसीदास ही त्याची उदाहरणे आहेत. ऋष्यमूक पर्वतावर बहुवेशधारी हनुमानाला श्रीरामानी जेव्हा सांगितले की तू मला लक्ष्मणापेक्षा अधिक प्रिय आहेस तेव्हा 'देखि पवनसुत पति अनुकूला । हृदय हरष बीती सब शूला ।।' ४/३/१ हनुमानाला आपला पती आपल्याला अनुकूल आहे. असे वाटून मनात त्याला खूप आनंद झाला. हनुमान वानर जातीतला पुरुष होता. स्त्री नव्हता, परंतु त्याला आपला पती आपल्याला अनुकूल आहे असे वाटून हर्ष झाला. कारण जो अनंत योनीतून बाहेर काढून आपल्याला जो अनंत जीवन देतो, असीम शांती देतो तो पती होय. असे जीवन व शांती केवळ परमात्माच देऊ शकतो. म्हणून तो खरा पती आहे, स्वामी आहे.

तो परमात्मा कणाकणात व्याप्त आहे- असे सांगितले जाते म्हणून आम्ही काय झाडाची पूजा करायची? मातीचे ध्यान करावयाचे? त्या परमात्म्याला पकडण्याचा विधी काय आहे? त्याच्या प्राप्तीचे एकच साधन आहे- त्या परमतत्त्वाला प्राप्त करून घेणारा, अव्यक्ताला स्पर्श करून अव्यक्त स्थिती प्राप्त करून घेणारा सद्‍गुरू ! त्या सद्‍गुरुशिवाय परमात्म्यामध्ये प्रवेश मिळू शकत नाही. हाच निर्णय गीतेचा आहे, रामचरित मानसाचा आहे आणि परमतत्त्व प्राप्त करून घेणाऱ्या प्रत्येक महापुरुषाचा आहे. परमात्मा

जर परमधाम असेल तर त्याच्या प्रवेशाचा दरवाजा सद्‌गुरू आहे. व म्हणून इज्जत राखणारा, पत राखणारा पती म्हणजे परमात्माच होय, पण साधनेमध्ये प्रवेश करण्यापासून पूर्तीपर्यंत सद्‌गुरूच त्या परमप्राप्तीचा विधी आहे, सद्‌गुरूच परमप्राप्तीची चावी आहे. तेच परम प्राप्तीची युक्ती सांगणारे आहेत. तो पत राखणारा आहे म्हणून तोच पती आहे. म्हणून अनुसूयाने म्हटले आहे-

**मातृ पिता भ्राता हितकारी । मितप्रद सब सुनु राजकुमारी ।।**
**अमित दानि भर्ता वैदेही । अधम सो नारि जो सेव न तेही ।।**
**रामचरित मानस, ३/४/५-६**

माता, पिता, भ्राता इत्यादी एका सीमेपर्यंतच हित करणारे असतात. परंतु असीम, जे कधीही न घटणारे दान देणारा, म्हणजेच शाश्वत दान देणारा एक पतीच असतो. आता तुम्हीच विचार करा की जो मरणधर्मा आहे, अस्तित्वविहीन आहे, ज्याला मर्यादा आहेत असा पती कोणते असीम दान देणार? मागणी व पुरवठा यांच्या नियमाप्रमाणे समाजात कधी मुलींचे महत्त्व वाढते तर कधी मुलांचे, त्यांचा संबंध जोडणारा शब्द आहे संभोग ! जर दोघे एकदुसऱ्यांचा समान भोग घेतात मग कोणी अधिक किंवा कोणी कमी प्रतीचा असे कसे? मीरा तर लौकिक पतीला पती मानतच नाही. ती म्हणते-

**झूठ सुहाग जगत का सजनी, होय होय मिट जासी ।।**
**मै तो इक अविनाशी बरूँगी, जाहि काल नहिं खासी ।।**

वास्तविक लौकिक पती कधी नसतोच. असीम आणि अनन्त परमात्माच एक पती असतो. परंतु तो तर केंद्र आहे, लक्ष्य आहे, अन्तिम परिणाम आहे. साधनेच्या आरंभापासून पूर्तीपर्यंत आत्म्याशी अभिन्न बनून साधकाला घेऊन चालणारे सद्‌गुरूच पती आहे. म्हणून-

**वृध्द रोग वश जड धन हीना । अंध बधिर क्रोधि अति दीना**
**ऐसेहु पतिकर किए अपमाना । नारि पाव जमपुर दुख नाना ।।**
**३/४/९**

कोणाला वृध्दावस्थेत उपलब्धी प्राप्त झाली तर ते महापुरुष जर्जर वृध्दही असू शकतात, रोगीही असू शकतात. ज्याप्रमाणे रामकृष्ण परमहंस यांना कॅन्सर होता, आमचे

गुरु महाराजांचे गुरू सत्संगी महाराज लंगडे होते. दत्तात्रेय उन्मत व पिशाचाप्रमाणे राहत होते (जड भरताप्रमाणे) म्हणजे महापुरुष सिंहासनावर बसणारेच हवेत याची आवश्यकता नाही. त्या महापुरुषाला धुळीत बसण्याची-झोपण्याची सवय असेल. काशीचे हरिहर बाबा नेत्रहीन असूनही त्यांच्या वेळचे पूर्ण महापुरुष होते. दयानंद सरस्वतीच्या वेळचे गुरू बिरजानंदजीही प्रज्ञाचक्षू होते. वास्तविक गुरू म्हणजे शरीर नव्हे. 'नास्ति तत्त्वो गुरो: परम' गुरू एक तत्त्व आहे, जे परमतत्त्व परमात्म्याचे दर्शन करून देणारे, स्पर्श आणि प्रवेश करून देणारे आहे. ज्यांना परमतत्त्व परमात्म्याचे दर्शन विदित आहे आणि त्यांच्या अंतरंगात गुरुत्व आहे. म्हणून साधनकाळात तो सद्गुरुच पती आहे. मग तो ते कोणत्याही वेशात असो त्या सद्गुरूंचा अपमान करता कामा नये. शाश्वताकडे घेऊन जाणाऱ्या कर्णधारांकडूनच आपल्या अब्रूचे पतीचे (पत) रक्षण होत असते. त्यांचा अपमान करण्याने यमपुरी नाना प्रकारची दु:खे झेलावी लागतात. या प्रकारे सीता-अनुसूयेच्या कथेतील 'पती' रहस्यात्मक आहे, अध्यात्मिक आहे.

शास्त्र दोन रीतीने लिहिले जाते- एक तर घटित घटनांचा इतिहास कायम ठेवणे ज्यायोगे लोक आपल्या पूर्वजांनी घालून दिलेल्या निर्धारित मर्यादांप्रमाणे आचरण करू शकतील आणि दुसरे शास्त्र आहे अध्यात्म ! जे प्रकृतीच्या द्वंद्वातून बाहेर काढून आत्म्याचे अधिपत्य देते. आज सर्वांवर मायेचे अधिपत्य आहे. या मायेच्या पंजातून मनुष्याला सोडवून जे ईश्वराच्या मार्गावर चालण्यास प्रेरणा देते आणि आत्म्याचे आधिपत्य देते त्याचे नाव अध्यात्म आहे. यामध्ये प्रतिकांच्या माध्यमातून आंतरिक स्थितीचा बोध करवला जातो. महापुरुषांनी मनाच्या अमूर्त भावांचे समीकरण ऐतिहासिक घटनांनी बनवले आहे. अमूर्ताला मूर्त उदाहरणांद्वारे समजावण्याची कृपा केली आहे. आतापर्यंत ऐतिहासिक दृष्टीने पाहिले. आता अध्यात्मिक स्वरूपात रामकथा व सती प्रसंग पाहूया. ज्याचा आरंभ होतो योगरूपी जनकपुरापासून. चित्ताच्या चंचलतेचा क्रम म्हणजेच चाप होय. ध्यान हेच धनुष्य होय. जेव्हा चित्ताची चंचलता नष्ट होते तेव्हाच शुध्द ध्यान लागते. चित्ताचा चंचलरूपी चाप तोडताच त्वरित ध्यानाची स्थिती बनते. मग हृदयात लपलेली शक्तिरूपी सीता शक्ति योगाच्या स्तरावर आपल्याशी जोडली जाते, शक्तिचा संचार शक्तिसाठीच होत असतो.

राम वनात गेले तेव्हा त्यांनी सीतेला आदेश दिला-

**सुनह प्रिया व्रत रूचिर सुशीला ।**
**मै कछु करब ललित नर लीला ।।**
**तुम्ह पावक महँ करहु निवासा ।**
**जब लगि करहु निशाचर नाशा ।।**

मी आता भयंकर नरलीला करावयास जात आहे तेव्हा जोपर्यंत माझी ही नरलीला पूर्ण होत नाही तोपर्यंत तू अग्नीमध्ये निवास कर. ही 'नरलीला' म्हणजे काय? स्टेजवर केली जाणारी रामलीला नव्हे ना? नाही 'निशाचर नाशा' निशाचरांचा नाश ही श्रीरामाची रामलीला होती.

निशा? 'यहि जग जामिनी जागहि जोगी' हे जग म्हणजेच एक रात्र आहे. 'या निशा सर्वभूतानां' हा संसार म्हणजेच एक भयंकर रात्र आहे. या रात्रीकडे जाण्यास आम्हांला प्रेरित करतात- मोहरूपी रावण, क्रोधरूपी कुंभकर्ण, लोभरूपी नरांतक, प्रकृतिरूपी शूर्पनखा- हे सर्व जगतरूपी रात्रीकडे नेणारे आहेत. म्हणून ते निशाचर आहेत. जोपर्यंत मी या विकारांना नष्ट करीत नाही तोपर्यंत तू अग्नीत निवास कर. वास्तवत: जोपर्यंत विकार शांत होत नाहीत, तोपर्यंत शक्तिरूपी सीता बाहेर पाहावयासच मिळणार नाही. तोपर्यंत योगाग्नीमध्ये ती प्रसुप्त अवस्थेत ती राहते. जो जो योगाचे अनुष्ठान केले जाईल तो तो शक्ती प्रस्फुटित होत जाईल.

मग अशी वेळ आली की सर्व निशाचर मरून गेले. शेवटी एकटा रावण आला. तो अपार सेना घेऊन आला. कुंभकर्ण, मेघनाद इत्यादी पराक्रमी योध्दे तर मरून मेले होते. पण अपार अजून जिवंत आहे. ते आले कोठून? वास्तविक मोहरूपी रावण **''मोह सकल व्याधिन्ह कर मूला । तेहिं ते पुनि उपजहिं बहु शूला ।।''** मोह हा सर्व व्याधींचे मूळ आहे. त्यात अनंत वेदनांची सृष्टी असते. त्यामुळे जरी सर्व काही कापले गेले तरी जर मूळ शिल्लक असेल तर शाखा-प्रशाखा, पाने, फुल सर्व काही पुन्हा निर्माण होणार. या प्रकारे सर्व विकार नष्ट झाले तरी जर मोह शेष असेल तर अंतरंगात काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, राग, द्वेष इत्यादी सर्व विकार प्रसुप्त अवस्थेत असतात. त्यामुळे रावण निघाल्याबरोबर अपार सेनाही त्याच्याबरोबर निघाली. व जेव्हा शांत झाला तेव्हा 'रहा न कुल कोउ रोवनिहारा' तत्क्षणी अग्नी प्रज्वलित झाला. मग सीता प्रगट झाली.

सर्वत्र रामाचे साम्राज्य पसरले- ''राम राज बैठे त्रैलोक हरषित भये गये सब शोका ॥'' जन्म आणि मृत्यूपर्यंतचे सर्व शोक नाहीसे झाले. लवकुशचा जन्म झाला. एका परमात्म्याच्या ठिकाणी मन लागले. आता अन्यत्र आसक्ती राहिली नाही. आता शक्तीचा उपयोग काय? तेथे पुन्हा सीता पृथ्वीमध्ये सामावून गेली. वास्तवत: ''धड धरती का एकै लेखा । जो बाहर से भीतर देखा '' अशा स्तरावर शक्तिरूपी सीता शरीररूपी पृथ्वीमध्ये प्रसुप्त होऊन जाते. ती कुठे निघून जात नाही किंवा मरतही नाही. ती योगीमध्ये अवस्थेत राहते; परंतु योग्याला स्वत:साठी त्याचा काही उपयोग होत नाही. रामदेखील शरयूमध्ये शांत झाले. परमात्म्याच्या अनुभवी सूत्रात सूत्रपाताचा स्वत:साठी काही उपयोग होत नाही परंतु लोकहितासाठी उपयोग होतो. व म्हणूनच राम सदैव राहत असतात. यजनाने पूरित श्वास-क्रिया म्हणजेच शरयू होय. त्यात ते सदैव विद्यमान असतात, या प्रकारे संपूर्ण रामायण हा एक यौगिक शब्दकोष आहे, आमच्या अंत:करणात घडणारी घटना आहे क्षेत्र-क्षेत्रज्ञाची लढाई आहे, परंतु त्याचा सूत्रधार आहे सद्‌गुरूची अंतस्प्रेरणा ! त्याप्रमाणे आचरण करून त्या सत्याला प्राप्त करावयाचे आहे. आपले शरीर भजन करीत नाही तर आपली इष्टोन्मुखी प्रवृत्ती करीत असते. तीच नारी आहे, स्त्री आहे, ती सत्याशी जोडलेली आहे म्हणून ती सती आहे व म्हणूनच त्या सत्यासाठी प्रयत्न करणारा प्रत्येक साधक मग ती स्त्री असो की पुरुष असो तो खरा सती आहे.

या संसारातून विरक्त होऊन योगसंन्यास प्राप्तीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या पुरुषाला यती आणि योगसाधनेसाठी दीक्षित स्त्रीला सती म्हणण्याची परंपरा होती. आजदेखील पूज्य महावीर स्वामींच्या अनुयायांमध्ये हा नियम यथावत आहे. त्या पंथात विरक्त स्त्रियांना सती असे म्हटले जाते. यती व सती या दोघांसाठी नियम-संयमाचे पालन व दोघांची क्षमता एकच आहे. असे म्हटलेही जाते की 'जती सती का बोलबाला'. तुलसी मानसमध्येही दोघांची ओळख एकच दिलेली आहे- डगै न सभु सरासन कैसे । कामी वचन सती मन जैसे ॥'' दहा हजार राजे शिवधनुष्य उचलण्यासाठी उठले; पण धनुष्य उचलले गेले नाही जसे सतीच्या मनात कामविकार वर उठू शकत नाहीत तसे. दुसरा प्रसंग आहे अंगदाचा पाय हलू शकला नाही तो. तेव्हा त्यावर महापुरुष म्हणाले की ''कोटि विघ्न ते संत कर मन जिमि नीति व त्या''- म्हणजे संतांवर करोडो मोहरूपी विघ्नांचे आक्रमण झाले तरी संतांचे मन विचलित होत नाही. दोन्ही ठिकाणी सती

आणि संतांच्या मनाची समता दाखवली आहे. असो, तात्पर्य हे की प्रयत्नशील स्त्रियांना सती म्हटले आहे. पती शवाबरोबर स्वत:ला जाळून घेणे हा त्यांच्या सतीत्वाचा मापदंड नाही.

दुसऱ्या प्रकारच्या सती स्त्रियांमध्ये राणी मदालसा उल्लेखनीय आहे. महाराज ऋतध्वजाबरोबर (कुवलयाश्व) विवाह करताना तिने त्याला एक शर्त घातली की मी जे काही करेन त्याला तुम्ही सहकार देणार असाल तर मी लग्नाला तयार आहे. राजा तयार झाला. मदालसेला क्रमश: तीन मुलगे झाले. त्या तिघांना शुध्दोऽसि, बुध्दोऽसि, निरंजनोऽसि असे म्हणून ब्रह्मविद्येचा उपदेश देऊन तिने त्यांना जंगलाचा रस्ता दाखवला.

वात्सल्य, स्नेह, प्रेम यांनी पूरित असणाऱ्या समाजातील नात्यांचे काय अस्तित्व आहे? याबाबत सती मदालसेने आपल्या पुत्रांना समजवताना सांगितले की-

**तातेति किंचित तनयोति किंचित, अम्बेति किंचित ययेति किंचित्**
**ममेति किंचिन्नममेति किंचित त्वं भूतसंघं बहुमानयेथा ।**

हा पिता आहे, हा पुत्र आहे, ही प्रिय पत्नी आहे, हा पती आहे ही सर्व संबोधने या नश्वर शरीराचा व्यवहार चालवण्यासाठी आहे. 'शुध्दोऽसि ते तात न लेऽस्ति नाम'- तुझे कुठलेही नाव नाही. तू तर शुध्द, अविनाशी, अजर, अमर आत्मा आहेस. मग आपण विचार करा की जेव्हा ही सर्व नाती नश्वर आहेत, केवळ व्यवहार चालवण्यासाठी आहेत तर मग नश्वर नात्यांमध्ये कोणी सती कशी असेल?

राजाच्या सांगण्यावरून आणि मंत्र्याच्या आग्रहावरून माता मदालसेने आपल्या चौथ्या पुत्राला-अलर्कला नाममात्र राजनैतिक शिक्षण दिले; परंतु आपले मूळ शिक्षण जे आत्मज्ञान त्यापासून त्याला वंचित ठेवले नाही. एका ताईतामध्ये (अंगठीत) एक संदेश अलर्कासाठी तिने लिहून दिला. आणि मंत्र्यांना तिने सांगितले की जेव्हा त्याच्यावर महान संकट येईल, त्याला कोणी सहाय्यक राहणार नाही तेव्हा त्याला या ताईताची आठवण करून द्या. राजावरही राणीच्या बुध्दिमत्तेचा प्रभाव पडला. ते दोघेही संपूर्ण ब्रह्मचर्य व्रताचे पालन करण्यासाठी वनात निघून गेले.

कालांतराने अलर्कचा संन्यासी बनलेला मोठा भाऊ सुबाहू याने काशी नरेशाच्या सहाय्याने पित्याचे राज्य जिंकून घेतले. अलर्कचे सैन्य पराजित झाले. कोष रिक्त झाला.

कोणी सहाय्यकर्ता राहिला नाही. तेव्हा मंत्र्यांनी त्याला माता मदालसाने दिलेल्या ताईताची आठवण करून दिली. त्यामध्ये संसाराचा फोलपणा तसेच परमात्म्याच्या सुखशांतीचा स्त्रोत सत्संग आहे हे सांगितले होते. त्या निर्देशाप्रमाणे आचरण करून भगवान दत्तात्रयाच्या कृपेने अलर्क, सूबाहू आणि काशी नरेशांनी परमाशांती प्राप्त केली.

अशी होती सती मदालसेची सत्यनिष्ठा ! पतीच्या अनुनयानंतरही तिने अलर्कला सत्यापासून वंचित ठेवले नाही. एका परमात्म्याच्या ठायी ती कृतनिश्चयी असल्याने तिला महासती म्हटले गेले आहे. म्हणजे त्या सत्याशी जे निष्ठावान आहेत, संयुक्त आहेत ते सती होत.

तिसरी श्रेणी आहे तारा, मंदोदरी, द्रौपदी, कुंती आणि अहिल्येची यांना प्रात:स्मरणीय पंचकन्या असे म्हटले जाते. असे वाटते की या इतक्या प्रभावशाली कुळातील होत्या की कवींची त्यांना काही भलेबुरे म्हणण्याची हिंमतच झाली नाही. म्हणून त्यांनी त्यांना पवित्र कन्या, पंचकन्या, सती इत्यादी नावाने संबोधिले आहे. पाची जणींनी कितीही विवाह केले तरी त्या सदैव कन्याच राहणार किंवा त्यांच्यासाठी पाच पतीही क्षम्य होते. अग्निसमक्ष वेदीभोवती सप्तपदी करण्याचा वैदिक नियमपण त्यांना लागू नव्हता. द्रौपदीला पाच पती होते, विवाहापूर्वी कर्णाची माता बनणाऱ्या कुंतीने आपला पती पांडूच्या सांगण्यावरून तीन देवतांचे आव्हान करून पाच मुले पांडूला दिली. मंदोदरी रावण आणि बिभीषणापर्यंत सीमित राहिली व तारा वाली व सुग्रीवपर्यंत सीमित राहिली. अहिल्येने दुसऱ्याला देह अर्पण केला (त्यात स्वत:च्या इच्छेने नव्हेच) तर तिला शाप मिळाला. वास्तविक पतिव्रता स्त्री प्रत्येक पतीवर सारखीच निष्ठा ठेवत असते. पण महाभारतात एक कथा आहे की द्रौपदी जेव्हा पांडवाच्या बरोबर स्वर्गाकडे निघाली होती तेव्हा हिमालयात ती निष्प्रभ होऊ लागली. भीमाने हे पाहिल्यावर त्याने याचे कारण युधिष्ठिराला विचारले. तेव्हा धर्मराज म्हणाला की नकुल अति सुंदर असल्याने तिला तो सर्वांपेक्षा अधिक प्रिय होता. तिच्या या पापामुळे ती निष्प्रभ होऊ लागली आहे. अहो जी पतिव्रता असते ती आपल्या एखाद्या पतीला लहान किंवा एखाद्याला महान कसे समजेल? तसे समजत असेल तर ते पाप आहे. अहिल्यानेही दुसऱ्या पतीला पती मानले होते. कदाचित खरी गोष्ट समजल्यावर ती विचलित झाली तरीही इंद्राला गौतमापेक्षा तिने कमी का लेखावे? तरीही तिला शाप मिळालाच.

वास्तविक असे काही नाही. हे चांगले झाले की या पंचकन्यांचे आरक्षण संपले आहे ते. म्हणजे आता कोणी सहावी पंच कन्या होणार नाही. एक विवाह, बहु-विवाह अनेक पती किंवा पत्नी करणे ही एक सामाजिक व्यवस्था आहे. त्याचा स्त्रियांच्या सतीत्वाशी काही संबंध नाही. महाभारताच्या आदिपर्वात पांडूने कुंतीला सांगितले की पूर्वी स्त्रिया स्वच्छन्द जीवन जगत असत. आरूणी उद्दालक यांचा पुत्र श्वेतकेतू याने या गोष्टीला विरोध केला. एक बंदिस्त व्यवस्था समाजाला घालून दिली तेव्हापासून विवाहपध्दती सुरू झाली. या कथानकात सत्याचा अंश कितीही असो, पण बहुपतीत्वाचे अस्तित्व नाकारता येत नाही. जर पतीच्या शवाबरोबर जाळून घेणे हेच सतीत्व असेल तर अशा बहुपती असणाऱ्या स्त्रियांना सतीत्वापासून वंचित राहावे लागेल.

द्रौपदी, कुंती, अहिल्या, तारा आणि मंदोदरी यांना महान सती समजण्यात आले आहे याचे मूळ कारण आहे परमात्म्यावर त्यांची दृढ निष्ठा, प्रगाढ श्रध्दा व प्रेम. ताराने वालीला, किंवा मंदोदरीने रावणाला जो उपदेश दिला आहे तो कोणत्याही महात्म्यापेक्षा कमी नाही. कुंतीची भगवंतावर इतकी प्रगाढ निष्ठा होती की जेव्हा जेव्हा तिने स्मरण केले तेव्हा तेव्हा ते आले. तिचे प्रत्येक वेळेस रक्षण केले ते भगवंतानेच. या सर्वांवर जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा भगवंतच सहाय्याला धाऊन आले. अहिल्येला मुक्ती दिली ती भगवंतानीच. तिची श्रध्दा इतकी प्रगाढ होती, तिच्या श्रध्देत एवढी प्रगाढ शक्ती होती की स्वत: परमात्म्याला तिच्याजवळ जावे लागले. या सर्व स्त्रिया त्या सत्यावर आरूढ होत्या म्हणून त्या सती म्हटल्या गेल्या.

भगवान रामाच्या मते मनुष्य देह हा अत्यंत दुर्लभ आहे. तेव्हा त्याचा उपयोग भवसागर तरून जाण्यास करावा, परमात्म्याला जाणण्यासाठी करावा. हे शरीर देवतांनासुध्दा दुर्लभ आहे. तेव्हा एखाद्या मानवी पार्थिव शरीराबरोबर त्याला जाळून हे अमूल्य शरीर फेकून देऊ नये. ज्यासाठी ते प्राप्त झाले आहे ते प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करा कारण ते पुन्हा लवकर प्राप्त होणार नाही.

## वीरांगनांच्या शौर्य कथा

आजकाल समाजात सती या शब्दाचा जो अर्थ केला जातो, (अर्थात चितारोहण) ज्यावरून अनेक जे झगडे, वादविवाद सुरू आहेत, अनेक आचार्य याबाबत काही ना काही मंतव्य करीत आहेत तेव्हा त्याची चर्चा येथे करू या. याबाबतीत माद्रीचे नाव

उल्लेखनीय आहे. पंडूच्या व्यतिरिक्त अश्विनीकुमारांना तिने आवाहन केले होते. त्यातून नकुल सहदेव यांचा जन्म झाला. नंतर पंडूच्या मृत्यूचे कारण स्वत: आहोत असे मानून तिने पंडूबरोबर चितारोहण केले. परंतु शास्त्रकारांनी तिला सती म्हटले नाही.

'तत्रैनं चिताग्निस्थं माद्री समन्वारुरोह ।' (आदिपर्व, ९५-९६) म्हणजे माद्री आपल्या पतीबरोबर सती गेली तरी सती समजले जाते कुंतीला. कारण जेव्हा आम्ही एखाद्या मोहजाळात सापडतो तेव्हा मनाचे सन्तुलन हरवून बसतो. अशा वेळी आम्ही काहीही करून बसतो. आणि मग आपण केलेल्या कृत्याचा महिमा सांगण्याचा व औचित्य सिध्द करण्याचा प्रयत्न करतो. माद्रीने हेच केले.

महाराजा दक्षाच्या कन्येचेही नाव सती होते

**प्रथम दच्छ गृह तव अवतारा ।**
**सती नाम तब रहा तुम्हारा ।।**
**दच्छ जग्य तव भा अपमाना ।**
**तुम अति क्रोध तजे तब प्राना ।।**
**रामचरित मानस, ७/५५/२-३**

तिचा विवाह शंकराशी झाला होता. शंकराच्या आदेशाची अवहेलना करून जिने रामाची परीक्षा घेतली तिने आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी पित्याच्या यज्ञात उडी घेऊन मरून गेली; पण शंकराच्या बरोबर गेली नाही. काही पुरुषांनीपण स्त्रियांसाठी आपले प्राण दिले आहेत. प्रेम-विवाहातील असफलता हे या उन्मादाचे कारण आहे. स्वामिभक्तीमध्ये पुष्कळ पुरुषांनी पुरुषांसाठी स्वत:ला जाळून घेतले आहे. उदा. 'हर्षचरिता'मध्ये हर्षाचे वडील प्रभाकर वर्धनाच्या मृत्यूनंतर अनेक मित्रांनी, मंत्र्यांनी आणि दासांनी स्वत: घात करून घेतला. राजतरंगिणीमध्ये (७/१३८०) एक माता आपल्या पुत्राबरोबर सती गेली. म्हणजे सतीचे पतीबरोबरच जळणे आवश्यक नाही. एक शक्यता अशी वाटते की प्राणत्याग करण्यासाठी ज्या स्त्रियांनी दक्षकन्या सतीच्या कृतीचे अनुकरण केले, त्यांना व्यंगार्थाने सती म्हटले गेले असेल. वास्तविक सती तर कोणी अभावानेच असते. या अभावामुळेच या नाममात्र सतींना समाजाने सतीच्या रूपात पाहिले.

जळून परमगती प्राप्त करण्याची पध्दत स्त्रीला लागू होत नाही कारण भारताच्या बाहेर बहुतेक देशांत स्वच्छन्द विचरण दिसून येते. जोपर्यंत वाटले तोपर्यंत बरोबर राहणे, मनमानेल तेव्हा वेगळे होणे, हा स्वच्छन्दपणा तेथे दिसून येतो. स्त्रीपुरुष दोघांचेही तीन-तीन, चार-चार विवाह ही तेथे सामान्य गोष्ट आहे. ख्रिश्चन लोकांत तर असेच आहे. इस्लामी लोकांमध्येही स्त्री ही केवळ वस्तुमात्र आहे. तेथे घटस्फोट, निका, तात्पुरता विवाह या सर्वांना सूट आहे. बहु पत्नीत्वता, बहु भर्तुकता व पुनर्विवाहाची प्रथा असल्याने या समाजामध्ये सतीत्व संभव नाही.

राहिला भारत ! इथला समाज चार वर्णांत विभागला गेला आहे. यापैकी शूद्र वर्णातील स्त्री चारी वर्णासाठी उपयोगी वस्तू आहे. वशिष्ठ धर्मसूत्राप्रमाणे (१८/१८) ती आमोद प्रमोदासाठी असते. पतिव्रता होण्याची तिला संधीच कधी दिली गेली? जंगली टोळ्यांमध्ये मातृसत्ताक पध्दती आहे. कुमायूँ गढवाल मण्डलमध्येपण अशी पध्दत आहे की एका स्त्रीला अनेक पती असू शकतात. तिने कोणाच्या मृत्यूनंतर स्वत:ला जाळून घ्यावे? याज्ञवल्क्य स्मृतीचे टीकाकार विश्वरूप याने सांगितले आहे की शूद्र स्त्री चितारोहणही करू शकत नाही. त्यांच्या समाजात विधवा विवाह, पुनर्विवाह प्रचलित आहे. त्यांचा पती कधी मरतच नाही कारण एक मेला की दुसरा तयार असतो. तेव्हा त्यांच्यात सती होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

वैश्यांमध्येही ससम्मान विधवाविवाह होत असतात. एक पती मेला तर दुसरा विवाह स्वाभाविक समजतात. तेव्हा जळून मरण्याचा प्रश्न तेथेही उद्‌भवत नाही कारण त्यांचा पती जिवंतच असतो. अपरादित्याने अंगिरा, पैठीनसि इत्यादी धर्मशास्त्रकारांचे म्हणणे उध्दृत करून सांगितले की ब्राह्मण विधवेला सती होण्यास मनाई आहे. विधवा पुनर्विवाहासाठी वेदात शब्द नाही पण अथर्ववेदात आहे. (५/१७/७-९) उत यत् पतयो दश स्त्रिता: पूर्वे अब्राह्मणा: ब्रह्मा चेत हस्तमग्रहीत स एव पतिरेकधा । ब्राह्मण एव पतिर्न राजन्यो न वैश्य: ॥' म्हणजे जर एखाद्या स्त्रीने पहिले अब्राह्मण पती केले व शेवटी एखाद्या ब्राह्मणाशी तिने लग्न केले तर तोच ब्राह्मणच तिचा वास्तविक पती आहे ना क्षत्रिय ना वैश्य. पराशर स्मृतीने तर इथपर्यंत सूट दिली आहे की जर ब्राह्मणाची पत्नी घर सोडून कुठे एकटी निघून गेली आणि शंभर पुरुषांजवळ जाऊनही परत आली तर सगोत्रियांद्वारा अशा स्त्रीवर बहिष्कार घातला जावा. पतिगृही गेल्यानंतरही ते घर तिचे मानले जाते ज्याचेकडे ती येत जात असते. यावरून हे स्पष्ट आहे की नव्यानव टक्के

तिच्यावर बहिष्कार घातला जाणार नाही, मग तिने का जळावे? महाभारत युध्दात ब्राह्मण द्रोणाचार्य मृत्यू पावल्यानंतर त्यांची पत्नी कृपी सती गेली नाही.

स्त्रियांनी स्वत:ला जाळून घेण्याची प्रथा क्षत्रियांपासून आलेली आहे, कारण विजयी राजा पराजित राजांच्या व शूरवीरांच्या पत्नींना पकडून त्यांच्यावर सूड उगवत असत. त्यांना बंदी बनवून घेऊन जात असत. राजपूतांनी जेव्हा हे पाहिले की ज्या मर्यादेचे रक्षण करण्यासाठी ते लढत आहेत त्याचे पराजयानंतर रक्षण होत नाही. तेव्हा पराजयानंतर त्या स्त्रियांना व मुलींना चितेमध्ये जाळून घ्यायला परवानगी दिली. अशा काही घटना घडल्या की, स्त्रिया म्हणाल्या तुम्ही वीर आहात तर आम्ही वीरांगना आहोत. तुम्ही आमची काळजी करू नये तुम्ही वीरगती प्राप्त कराल. तर आम्ही स्वत: चितारोहण करू. या प्रकारे सामूहिक जोहार किंवा व्यक्तिगत जाळून घेण्याची प्रथा पडली. एकदा ही प्रथा पडली की समाजाच्या व्यवस्थापकारांनी त्या प्रथेला करार करून त्यावर भर दिला (आणि राजांना विरोध कोण करणार) आणि जाळून घेण्याने मिळणाऱ्या पुण्याची झड सुरू केली.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की अन्य कोणत्याही वर्णात जळण्याचे विधान नाही मग या क्षत्रियांनाच नष्ट करण्याचे नियम का झाले? सर्वांच्या रक्षणासाठी प्राण देत देत जे अल्पसंख्याक झाले त्यांच्या डोळ्यावर धर्माची पट्टी बांधून त्यांना चुकीची दिशा का दाखवली जाते?

राजा महाराजांसारख्या उच्चवर्गात जेव्हा ही प्रथा व्यापक बनली तेव्हा जनसामान्यांवर पण त्याचा प्रभाव पडला. राजस्थाननंतर स्त्रियांनी जाळून घेण्याच्या अधिक घटना बंगालमध्ये झाल्या कारण कुलीन परिवारामध्ये विवाह करण्याचे खूळ तेथे इतके वाढले होते की मृत्यशय्येवर असणारा श्रीमंत वृध्ददेखील एखाद्या लहान मुलीच्या भांगात कुंकु भरायला तयार होत असे. त्यामुळे एकेका श्रीमंताच्या पत्न्यांची संख्या शंभरपर्यंत पोहचत असे. बंगालमध्ये उत्तराधिकार 'दायभा' नावाच्या पुस्तकात असा उल्लेख आहे की पुत्रहीन विधवादेखील संपत्तीमध्ये पतीच्या बरोबर सम्मानाधिकारी आहे. त्यामुळे पती मरण पावल्यानंतर कुटुंबीय पत्नीच्या पतीभक्तीची इतकी अतिरंजित स्तुती-प्रशंसा करायचे की ती बिचारी चितेबरोबर भस्म व्हायला तयार होत असे.

केवळ विधवेचे नातेवाईकच काय धर्म सांगणारे समाजातील व्यवस्थाकारदेखील संपत्ती मोहाच्या भावनेने ग्रस्त होते. गरुड पुराणात सांगितले आहे के, चितारोहण

करणाऱ्या स्त्रीने प्रथम ब्राह्मणांना दान द्यावे. मग देव मंदिरात जाऊन आपली आभूषणे अर्पण करावीत (१०/३६-४०). बृहदनारदीय पुराणात लिहिले आहे की रजस्वला पत्नी चितारोहण करू शकणार नाही. परंतु इ.स. १७९० मध्ये लिहिलेल्या धर्मसिंधुमध्ये असे लिहिले आहे की जर मासिक धर्माचा दुसरा दिवस असेल तर वीस गाई व तिसरा दिवस असेल तर दहा गाई दान कराव्यात म्हणजे ब्राह्मण तिला शुध्द म्हणून घोषित करेल. व मग ती स्त्री त्यादिवशी चितारोहण करू शकते. सारांश हे काही धार्मिक विधान नव्हे उलट हे प्रजेच्या शोषणाचे विधान आहे.

जगामध्ये स्त्रियांच्या शोषणाचा मोठा इतिहास आहे. स्त्रीला जाळून मारणे ही त्यातलीच एक अभिव्यक्ती आहे. इसवीसनाच्या आठव्या शतकापर्यंत ख्रिश्चन विचारवंतांमध्ये असा मतभेद होता की स्त्रियांना आत्मा असतो की नाही? कारण त्यांचे असे म्हणणे होते की पुरुषांच्या छातीच्या नाजुक बरगड्यांपासून ईश्वराने स्त्रियांना निर्माण केले आहे. इस्लाम धर्मातपण स्त्रीपुरुषांना समान समजले जात नाही. कारण एक पुरुष तेथे अनेक पत्नी करू शकतो. त्या धर्मात स्त्रीला शेत समजले जाते. नमाज तिच्या कानावर पडता कामा नये. तिने मशीदीमध्ये जाता कामा नये असे त्यांनी स्त्रीवर निर्बंध घातले आहेत. धर्माला अफू समजणाऱ्या अनेक साम्यवादी देशामध्ये स्त्रीपुरुषांत समानता असलेली दिसून येत नाही. स्त्रीला तेथे मताधिकार नाही. सारांश जगभर कोणत्या ना कोणत्या रूपात स्त्रीला यातना सहन कराव्या लागत आहेत. फक्त भारतातच स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान सन्मान प्राप्त झाले आहेत. भगवान शंकर अर्ध नारी नटेश्वर आहेत. म्हणजे तो ब्रह्म अर्ध नारी नटेश्वर मिळून या जगाचे सृजन करतो. अर्थात हे खरे काळाप्रमाणे काही विकृती भारतातही घुसल्या गेल्या किंवा निर्माण केल्या गेल्या. जसे चितेला पुरुषानेच का अग्नी द्यायचा? स्त्रीला देखील ही संधी मिळाली पाहिजे. त्याच प्रकारे मुक्तीसाठी पिंडदान आणि पिंडदानासाठी पुत्राची आवश्यकता मुलगा हवा म्हणून भ्रूण परीक्षण, पुत्र जन्मावर विशेष समारंभ, हुंडा इत्यादी प्रथा म्हणजे मानवतेच्या नावावर कलंक आहे. विधवेला सामाजिक बहिष्कार सहन करावा लागतो, तिला अमंगल मानले जाते पण विधुराचा कोणी तिरस्कार करीत नाही किंवा त्याला सामाजिक बहिष्कार सहन करावे लागत नाही. विधुराला विलासी जीवन जगण्यास मुभा आहे; पण विधवा स्त्रीला सुखशांतीने जगण्याचापण अधिकार नाही. विधवाच अनाथ का होतात? महाभारतातील आदिपर्वामध्ये एक कथा आहे की, एकचक्रा नगरीमध्ये स्वत: नवरा राक्षसाचे भक्ष बनला जाणार व आपण विधवा होणार या आशंकेने ती विलाप करत

होती. कारण मांसाच्या तुकड्यावर ज्याप्रमाणे पक्षी तुटून पडतात त्याप्रमाणे पतिहीन स्त्रीवर पुरुष तुटून पडत असतात.

या प्रकारे जेव्हा स्त्रीच्या सतीत्वावर संकट येई, त्यांच्या धर्माचरणात विघ्न निर्माण होई तेव्हा स्त्रिया स्वत:ला जाळून घेत होत्या कारण धर्माचरणाचा एकच शत्रू आहे व तो म्हणजे काम ! गीतेमध्ये आहे- 'काम एष क्रोध एष'. इंद्रिय संयमाबरोबर सतत तपस्येचे व्रत करणाऱ्या वेदवतीने जेव्हा पाहिले की महाबली रावणाने तिचे केस पकडले तेव्हा आपल्या धर्माचरणाला धोका आहे असे वाटून तिने आपले केस कापून टाकले आणि स्वत:ला जाळून घेतले. जो दीर्घकाल इंद्रियाचा संयम करून निरंतर भगवंताचे चिंतन करतो व शाश्वत सत्याच्या प्राप्तीसाठी मनाला वश करण्याचा प्रयत्न करतो अशा साधकाच्या आचरणात काही विघ्न निर्माण झाले तर साधकाने आपल्या शरीराचा त्याग करणेच श्रेयस्कर होय. मग तो पुरुष असो की स्त्री असो. स्त्रियांसाठी बलात्काराचे विघ्न, भय पुरुषांच्या तुलनेत अधिक आहे म्हणून स्त्रियांना एक निश्चित क्षमता येईपर्यंत त्यांनी घरात राहूनच भक्ती करावी असे सांगितले गेले आहे. पतित होण्यापेक्षा शरीरत्याग करणे चांगले. पूज्य गुरुदेव म्हणूनच म्हणत असत की ''साधू होणे आणि मरणे दोन्ही समान आहे'' 'साधन कठिन न मन कर टेका' साधना कठीण नसते पण मनाची जिद्द दृढ असली पाहिजे. हीच गोष्ट ईसा सांगतात की- जर तुझ्या हाताने, पायाने किंवा डोळ्यांनी तुला ठोकर दिली तर त्यांना कापून शरीरापासून अलग कर. ठोकर देणाऱ्या अवयवांपेक्षा त्या अवयवांशिवाय राहणे अधिक चांगले. अशा अवयवांनी नरकात जाण्यापेक्षा त्या विरहित राहणे चांगले (मरकुस ९/४३-४७). वेदवतीने स्वत:ला जाळून घेतले; पण तिला मोक्ष मिळाला नाही परंतु पुनर्जन्म घ्यावा लागला. जेथून साधना तुटली होती तेथून पुन्हा आरंभ करावी लागली. दुसऱ्या जन्मात तीच सीता म्हणून प्रसिध्द पावली. त्या शाश्वत सत्यावर दृढ निष्ठा ठेवल्याने व जन्मोजन्मी सतत साधनापरायण राहिल्याने श्रीराम तिला प्राप्त झाले.

शरीर देऊनही सत्याला सुरक्षित ठेवण्याची गौरवशाली परंपरा आहे, परंतु प्रथा प्रथाच असते ती धर्म बनू शकत नाही. प्रथा ही नेहमी परिस्थितिजन्य असते तर धर्म नेहमी शाश्वत असतो. स्त्रियांनी ज्या काही परिस्थितीमध्ये आपले बलिदान दिले आज ती परिस्थिती राहिली नाही. तेव्हा पूर्वजांची प्रत्येक प्रथा म्हणजे त्यांची अनामत समजून ती तशाच प्रकारे चालू ठेवणे यात काही अर्थ नाही बुध्दिमताही नाही. एक वेळ अशी

होती की ती प्रथा आवश्यक होती पण आता तशी आवश्यकता राहिलेली नाही. तेव्हा हे जाणून घेऊन श्रध्दापूर्वक त्या प्रथेचे विसर्जन केले पाहिजे आणि ते दिवस आता आलेलेच आहेत.

## वेद

चारही वेदांमध्ये पतीबरोबर सहगमन केलेल्या एकाही स्त्रीचे नाव नाही, ना कोठे सती शब्द आला आहे ना कोठे स्त्रियांच्या सहगमनाला धर्म म्हटले आहे, उलट त्याच वेदाने असे सांगितले आहे की एकमेव असणाऱ्या परमात्म्याला जाणून घेण्याचा, जन्म-मृत्यूमधून सुटण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. तेव्हा जगातील सर्व स्त्री-पुरुषांना एकच मार्ग आहे व तो म्हणजे ईश्वराची भक्ती ! गार्गी सारख्या विदुषीने परमात्म्याचा शोध हेच जीवनाचे श्रेय समजले व त्याप्रमाणे आचरण केले. तिने विवाह केलाच नाही. पतीबरोबर सहगमन करणे किंवा स्वत:ला जाळून घेणे हे वेदसम्मत असते तर त्या काळच्या विदुषी स्त्रियांनी ही सुवर्ण संधी हातची घालवली नसती. मैत्रेयीचे पती याज्ञवल्क्य यांनीही आपल्या पत्नीला आत्म्याला जाणून घेण्याचा बहूमूल्य सल्ला दिला जळण्याचा नाही. अपला, विश्ववारा, घोषा कोणत्याही स्त्रीने स्वत:ला जाळून घेतले नाही.

## रामचरित मानस

रामचरित मानसामध्ये भगवान श्रीरामाने सांगितले की ''पुरुष, नपुंसक, नारि वा जीव चराचर कोई'' यांपैकी कोणीही असो जो संपूर्ण भावाने मला भजतो ''सर्वभाव भजि तजि कपट, मोहि परमप्रिय सोई'' तो मला अत्यंत प्रिय आहे.

गोस्वामीजींचा निर्णय आहे की

**वारी मथे घृत होइ बरू, सिकता ते बरू तेल ।**
**बिनु हरिभजन न भव तरिय, यह सिध्दान्त अपेल ।।**

अकाट्य सिध्दान्त आहे की भजन-भक्तीशिवाय कोणीही भवसागर पार करू शकत नाही आणि येथे सर्व प्रथा लोकांनी निर्माण करून ठेवल्या आहेत ज्यांचे असे म्हणणे आहे की त्या प्रथांनी भवसागर पार करता येईल. यापैकीच एक उपाय म्हणजे

पतीच्या शवाबरोबर स्त्रीने सहगमन करणे, मग तर वेद खोटे, गोस्वामी तुलसीदास खोटे, राम आणि कृष्णाचे सांगणेपण खोटेच आहे असे म्हणावे लागेल. परंतु असे काहीही नाही. परमात्म्याकडे जाण्याचा, भव पार करण्याचा अन्य कोणताही मार्ग नाही, दुसरी कृती किंवा क्रिया नाही. बस फक्त एकच क्रिया आहे व ती म्हणजे केवळ एका परमात्म्याचे भजन- भक्ती करणे

## रामायण

वाल्मीकी रामायणात असे आहे की जेव्हा दशरथ मरण पावला तेव्हा शोकविव्हल कौसल्या कैकयीला म्हणते की पतिव्रतेप्रमाणे मीही पतीच्या शरीराला अलिंगन देत चितेमध्ये सहगमन करेन. पण आदिकवी लिहितात की दशरथाच्या चितेला अग्नी दिला त्यानंतर वृध्द रक्षकांनी घेरल्या गेलेल्या दशरथाच्या राण्या शिबिकांमधून व रथांमधून नगरातून बाहेर पडल्या व स्मशानात जाऊन चितेला त्यांनी प्रदक्षिणा घातली. त्यानंतर पुन्हा रथात व शिबिकात बसून शरयू नदीच्या किनारी गेल्या. तेथे राजा दशरथाला जलांजली दिली पण एकीनेही सहगमन केले नाही. तेव्हा सांगण्याचे तात्पर्य हे की पतिव्रता याचा अर्थ पतीच्या शवाबरोबर स्वत:ला जाळून घेणे हा नाही तर जीवनभर त्याच्याबरोबर निष्ठेने वागणे आणि अंतिम घडीपर्यंत त्याच्या सुखदु:खात भागीदार होणे हा अर्थ आहे. चितेमध्ये जळणे ही एक परिस्थितीजन्य शोकजनित प्रथा आहे . काही काही ठिकाणी सती जाण्याच्या घटना घडत असत पण त्याला धर्माची मान्यता कधीच मिळाली नाही. तेराव्या दिवशी अस्थी गोळा करताना पित्याच्या आठवणीने भावविवश होऊन भरत व शत्रुघ्न अग्नीमध्ये उडी घेऊन प्राणत्याग करण्यास प्रवृत्त झाले होते; पण सुमन्ताने त्यांना समजावून शांत केले. कदाचित त्यांनी तसा प्राणत्याग केला असता तर तो काय धर्म झाला असता काय? हाही एक शोकजन्य व्यवहारच झाला असता.

वालीच्या मृत्यूनंतर तारानेही पतीबरोबर सती जाण्याचा निश्चय केला होता. हनुमंत तिला समजावून थकून गेले होते, सुग्रीवदेखील अग्नीमध्ये प्राण देऊ इच्छित होता; पण मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाने त्या दोघांनाही समजावून प्राणत्याग करण्यापासून निवृत्त केले. जर जिवंत जळणे धर्म असता तर श्रीरामांनी त्यांना तसे करण्यापासून का रोकले असते? धर्माच्या रक्षणासाठी, मर्त्यलोकातील प्राण्यांना शिकवण देण्यासाठी तर ते या भूमीवर आले होते. या प्रथेचे त्यांनी मौन समर्थनदेखील केले नाही. आजकालचे धर्माचार्य

म्हणतात की सती गेले पाहिजे आणि त्या वेळचे धर्माचार्य वशिष्ठ इत्यादींनी या गोष्टीला थांबविले आहे, धर्म धुरीन भरताने समजावले आहे. जर हे सत्य असते तर त्या महापुरुषांनी सम्मती दिली नसती का? वाल्मीकी रामायणाच्या अभ्यासातून हे स्पष्ट दिसून येते की श्रीरामाचा प्रभाव जेथे जेथे स्थापित झाला तेथे तेथे त्यांनी अशी अमानुषिक घटना होऊ दिली नाही.

रामचरित मानसामध्येही भगवंतानी ताराला समजावले ते असे.

**छिति जल पावक गगन समीरा । पंच रचित यह अधम शरीरा** म्हणजे हे शरीर पाच तत्त्वांपासून बनले आहे व ते नश्वर आहे. जर या शरीरासाठी रडत असशील तर ते व्यर्थ आहे. कारण हे शरीर अजूनही तुझ्यासमोर आहे. आणि त्या शरीरातून निघून गेलेल्या जीवात्मासाठी शोक करीत असशील तर तो शाश्वत आहे, अमृत आहे, अ-शोच्य आहे, बरोबर हीच गोष्ट गीतेमध्ये श्रीकृष्ण सांगतात. सारांश आमच्या पूर्वजांनी मृत शरीराला कधीही महत्त्व दिलेले नाही व म्हणून त्यांनी दाह-संस्काराची प्रथा सुरू केली. गाडणे, कबर करणे, पिरामिड बनविणे किंवा ममी बनवून त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी उपाय करणे या गोष्टी भारतीय संस्कृतीने स्वीकारल्या नाहीत.

महासती अनुसूयाने सीतेच्या आचरणाची प्रशंसा करताना तिला सांगितले की तुझ्याप्रमाणे ज्या स्त्रिया आहेत (राम जिवंत असताना सीता सती आहे. या प्रकारच्या सती स्त्रिया) त्या उत्तम गुणांनी युक्त असून पुण्यकर्मात सतत मग्न असतात. म्हणून तू सती धर्माचे पालन कर. आपल्या स्वामीची सहधर्मिणी बन. अनुसूयाने तिला आपल्या पतीबरोबर जळण्याचा उपदेश दिला नाही परंतु पतीच्या धर्माचे भागीदार बनण्यास सांगितले. रामाचा धर्म कोणता होता? चित्रकूटात रामाने भरताला सांगितले होते की पिताजींनी जराजीर्ण मानव शरीराचा परित्याग करून दैवी संपदा अर्जित केली आहे जी ब्रह्मलोकात विहार करवणारी आहे. मानवांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या भरता, आपल्या पूज्य पिताजींच्या शुभ आचरणाकडे बघ तसे आचरण कर व आपल्या धार्मिक स्वभावाद्वारा आत्म्याच्या उन्नतीचा प्रयत्न कर. म्हणजे आत्म्याची उन्नती करणे हा धर्म आहे. बरोबर हीच गोष्ट श्रीकृष्णही सांगत आहेत की आत्म्याला अधोगतीकडे घेऊन जाऊ नका. कारण आत्माच सत्य आहे. तात्पर्य जो या सत्यावर आरूढ होईल (सत्य म्हणजे मात्र परमात्मा होय), जो परमात्म्याच्या ठिकाणी निष्ठावान आहे तीच (किंवा ती) खरी सती होय. सहगमनाला श्रीरामाने सती किंवा धर्म म्हटले नाही.

# गीता

वेदांचा सारांश उपनिषद व उपनिषदांचाही सारांश म्हणजे साक्षात योगेश्वर श्रीकृष्णाची वाणी, गीतेमध्ये (अध्याय २/१६) आहे की असत वस्तूचे अस्तित्व नसते आणि सत्याचा तिन्ही कालात अभाव नसतो. सत्य म्हणजे काय? यावर श्रीकृष्ण म्हणतात अर्जुना, आत्माच फक्त सत्य आहे. आत्मा, परमात्मा, ईश्वर, भगवान, किंवा परब्रह्म इत्यादी एक दुसऱ्याचे पर्याय आहेत. आत्माच शाश्वत आहे, आत्मा सनातन आहे. मग आम्ही कोण आहोत? सनातन आहे. मग आम्ही कोण आहोत? आत्मा ! आता आम्ही जर त्या आत्म-पथाला जाणत नसू, त्या आत्म्याला जाणून घेण्याची क्रिया आम्हांला माहीत नसेल तर मग आम्ही कसले सनातन धर्मी? यावरून हे स्पष्ट आहे की आम्ही फक्त धर्मपिपासू आहोत; पण धर्माला जाणत नाही. अद्याप त्याच्या जवळ पण आम्ही पोहोचलेलो नाही. पतीबरोबर जळून मरणे म्हणजे सनातन धर्म नाही; पण आत्म्याला जाणण्याच्या निर्धारित क्रियेचे आचरण म्हणजे सनातन धर्म होय.

गीतेच्या (अध्याय २ श्लोक १८) मते आत्मा सनातन आहे आणि बाकी सर्व भूतादिकांचे शरीर नश्वर आहे म्हणजे शरीराला काही अस्तित्वच नाही. (२/१३) जो शरीरासाठी खातो तो मूढबुध्दीचा होय; कारण शरीर नाशवान आहे, त्याला थांबविता येत नाही. आता या नश्वर शरीरासाठी कोणी शरीराचा त्याग केला तर त्याने ते सत्यासाठी त्यागले असे म्हणता येत नाही. सनातन परमात्म्याच्या पथासाठी त्याने ते त्यागले असे म्हणता येणार नाही. अस्तित्व विहीन, अशाश्वतासाठी प्राण त्यागणारा शाश्वत धाम कसे प्राप्त करू शकेल ?

'वासांसि जीर्णानि यथा विहाय' (गीता अध्याय २, श्लोक २२) ज्या प्रकारे जुने वस्त्र टाकून आपण नवी वस्त्रे धारण करतो (वस्त्र बदलणारा जिवंत आहे. वस्त्र फाटल्यानंतरही आपण जिवंतच असतो) बरोबर तसेच आत्मा केवळ वस्त्र बदलत असेल, तो सदैव जिवंतच असणार मग या आत्म्याला सोडून एका वस्त्रासाठी जळून मरण्याने सनातन शाश्वत धाम कसे प्राप्त होईल? सनातनाला प्राप्त करण्याचा हा विधी नव्हे.

आत्मा सर्वांमध्ये आहे तर शोधायचे कोणाला? योगेश्वर म्हणतात की आत्मा अजर-अमर-शाश्वत आहे (गीता अध्याय २ श्लोक २५) परंतु तो अचिंत्य आहे.

इंद्रिय संयमाबरोबर चित्त अचल-स्थिर होते तेव्हा अंतिम संस्कारांचेपण शमन होते तेव्हा तत्क्षणी जे शेष उरते त्याचे नाव आत्मा-परमात्मा आहे. पुढील जन्मी किंवा एखाद्या कल्पित स्वर्गात पतीच्याबरोबर विहाराची कामना शेष असेल तर सिध्द होते की त्याचे चित्त अद्याप बध्द आहे आणि मग अशा विषम स्थितीत परमगती शक्य नाही.

गीता अध्याय १४ श्लोक १८ मध्ये लिहिले आहे की तामसी गुणांचे प्राबल्य असताना जो शरीराचा त्याग करतो तो पशुपक्षी, कीटक, पतंग यासारख्या अधम योनीमध्ये जन्म घेतो. सात्त्विक गुणवाला उन्नत योनीमध्ये जातो. म्हणजे योनी मिळते, मोक्ष मिळत नाही. राजसी गुणप्रधान व्यक्ती मध्यम शरीर प्राप्त करतो. साधारणत: लोक उचित-अनुचित साधनांनी आपल्या गृहस्थीमध्ये मग्न असतात, ईश्वरचिंतन तर केलेले नसते. त्यामुळे त्यांच्या वृत्ती सात्त्विक, राजस किंवा तामस या गुणांमध्ये गुंतलेली असते. तेव्हा जो ज्या गुणाच्या प्रभावाखाली आहे त्याला तशीच योनी प्राप्त होते. कोणी पशूच्या जन्माला जाते ज्याप्रमाणे नहुष इंद्रपदावरून खाली आला तो अजगर बनला. रामाच्या वेळी कलिंनर आणि विरक्त गादीधारकांची ही परिस्थिती तर सामान्य मनुष्याला पशु योनी मिळाली तर नवल काय? समजा कोणी पशू योनीत जन्माला आला आणि त्याच्या मागून चालत येणाऱ्याला पति-लोकाना जायचे आहे. म्हणजे परमगती तर मिळाली नाही आणि तिचा किंवा त्याचा लोक झाला पशु योनी, जेथे कोणी कोणाचा पती नाही, कोणी कोणाची पत्नी नाही. तेथे तर उन्मुक्त विचरण आहे. मग कोठे सुरक्षित राहिले त्याचे सतीत्व?

गीतेमध्ये सांगितले आहे की, 'यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम । तं तमेवैति कौन्तेय सदा तभ्दाव भावित: ।' (अध्याय ८, श्लोक ६) अंतिम समयी जो ज्याचे स्मरण करीत शरीरत्याग करतो त्याला तीच योनी प्राप्त होते. मृगशावकाचे चिंतन करणाऱ्या महर्षी जड भरताला मृग योनी प्राप्त झाली. या प्रकारे पुरुषाचे स्मरण करीत सहगमन करून मरणारी स्त्री पुढच्या जन्मात पुरुष बनेल. मग पुरुषाचा पती कसा असणार? तात्पर्य हे की जळून मरण्याने सतीत्व प्राप्त होते हा निवळ भ्रम आहे.

योगेश्वर म्हणतात की (८/५) अर्जुना, जो माझे स्मरण करीत शरीर त्याग करतो तो साक्षात माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. माझ्याप्रत आलेला पुन्हा परतून त्याचे आवागमन होत नाही. मग तर अगदी स्वस्त सौदा आहे. जन्मभर मौजमजा करायची व मरताना

भगवंताची आठवण करायची. परंतु मागील श्लोकात श्रीकृष्ण म्हणतात- नाही 'सदा तभ्दाव भावित:' प्राय: तेच चिंतन जोराने उसळून येते. यासाठी हे अर्जुना, तू आजपासूनच, उद्या नको आतापासूनच अगदी या क्षणापासून माझे चिंतन करायला सुरुवात कर. आता आवागमनरहित परमगतीचा रस्ता कोणता? परमात्म्याचे निरंतर चिंतन ! तेव्हा चितेत जळण्याने परमगती प्राप्त होते असे गीताही सांगत नाही. शेवटपर्यंत पतिपरायण वृन्देला जलंधराचा पतिलोकही मिळू शकला नाही. अर्थात ज्याने पतिव्रत्यामध्ये विघ्न निर्माण केले त्या विष्णूची तिला साथ मिळाली, जलंधराची नाही.

शरीर धारण करण्याबाबत गीतेचा निर्णय आहे की शरीरातून उत्क्रमण करताना जीवात्मा मनसहित पाच ज्ञानेंद्रियांचे जीवनभरातील कर्मजन्य संस्कारांनुरूप शरीर धारण करीत असतो. तेव्हा आपापल्या संस्कारानुरूप पतिपत्नीला तसेच त्यांच्या परिवारातील लोकांना भिन्न भिन्न देह प्राप्ती होण्याचा संभव अधिक आहे.

महाभारतासारख्या युध्दकाव्यामध्ये जे रक्तरंजीत इतिहासाने भरले आहे त्यात देखील स्त्रियांनी सहगमन करून मरण्याचे उदाहरण नगण्य आहे. स्त्रीपर्वात आहे की कौरव-पांडवांच्या पक्षातील वीरपुरुषांच्या स्त्रियांनी सहगमन केले नाही. प्रभास क्षेत्री श्रीकृष्णलीला संवरणानंतर (समाप्तीनंतर) यदुवंशीय स्त्रियांनीपण सहगमन केले नाही. अर्जुन त्यांना घेऊन हस्तिनापूरास चालला असताना वाटेत भिल्लांनी अर्जुनाचा पराभव करून त्या स्त्रियांचे त्यांनी अपहरण करून त्यांना घेऊन गेले 'भीलन लूटी गोपिका, वही अर्जुन वही बान ।'

गीतेमध्ये सांगितले आहे की युध्दाचा परिणाम नरसंहार होईल, स्त्रिया दूषित होतील. या आशंकेने तो विकल झाला होता. (गीता १/४१) जर त्या सर्व स्त्रिया चितेत जळणार असत्या तर अर्जुनाला एवढे चिंतित होण्याची काय आवश्यकता होती? आणि ज्या सतीप्रथेने परमगती प्राप्त होते तर मग गीतेसारख्या धर्मशास्त्रात त्याची चर्चाही नाही हे आश्चर्य नव्हे का?

उलट गीतेत ९व्या अध्यायातील ३२व्या श्लोकात असे लिहिले आहे की स्त्री, वैश्य, शूद्र किंवा जे कोणी पापयोनी आहेत ते सर्व मला शरण आले तर त्यांना परमगती प्राप्त होते. म्हणजे सर्वांना परमगती प्राप्त करून घेण्यासाठी गीतेमध्ये एका परमात्म्याची भक्ती हाच मार्ग सांगितला आहे. स्त्रीसाठी वेगळा व पुरुषासाठी वेगळा असा मार्ग

सांगितलेला नाही. फक्त त्या परमात्म्याला भजणे हेच विधान- हाच उपाय- हाच मार्ग पुरुष व स्त्रीसाठी आहे.

गीतेच्या ८व्या अध्यायातील १२-१३ श्लोकात म्हटले आहे की मनाचा हृदयदेशात निरोध करून म्हणजेच त्याचा संयम करून-वश करून जो पुरुष शरीर त्याग करतो त्याला परमगती प्राप्त होते. म्हणजे परमगती प्राप्त करण्यासाठी प्रथम मनाचा निरोध व मग परमगती हा मार्ग आहे. पण मनाचा निरोध न करता आधी शरीरच जाळून घेतले तर कोठून मिळणार परमगती? साधन-धाम म्हणून जे शरीर मिळाले होते ते पण जाळून टाकायचे? हसत्या, खेळत्या घरातील कोणी पुरुष मरण पावला की, अमोद प्रमोदात जीवन व्यतीत करणाऱ्या स्त्रीला चितेवर चढवायचे ? अहो ज्या मनाला जाळायचे होते त्याचा संयम न करता देवदुर्लभ मानव शरीरास जाळून टाकायचे? यापेक्षा भयंकर चूक कोणती? तेव्हा सर्वांसाठी एकच मार्ग आहे व तो म्हणजे सर्वांनी भगवंताचे स्मरण केले पाहिजे.

## स्मृती

सती प्रथेला स्मृतिकारांनी प्रोत्साहन दिले. पाराशर स्मृतीमध्ये लिहिले आहे की जी स्त्री पती मेल्यानंतर अत्यंत संयमपूर्वक जीवन जगते तिलाच अंती स्वर्ग प्राप्त होतो; परंतु जी स्त्री पतीबरोबर सहगमन करून शरीरत्याग करते ती शरीरावर असणाऱ्या साडेतीन करोड केसांइतके दिवस स्वर्गात वास करते ज्याप्रमाणे गारुडी सापाला बिळातून शोधून काढतो त्याप्रमाणे अशी सती आपल्या पतीला शोधून काढते व त्याच्याबरोबर विहार करते. यावरून स्पष्ट दिसून येते की स्मृतिकारांना विधवांचे संयमित जीवन पसंत आहे; परंतु सहगमन करून स्वत:चे प्राण देणारी त्यांना विशेष पसंत आहे. कारण ती स्वर्गात राहणार असते. विधवा विवाह मात्र स्मृतिकारांना मान्य नाही कारण ती शुध्द होणे असंभव आहे.

याच स्मृतीच्या चौथ्या अध्यायात सांगितले आहे की जो ब्राह्मण अनिच्छेने पतीत स्त्री बरोबर पाच, दहा, बारा, पंधरा दिवस किंवा एक महिना, दोन महिने, सहा महिने किंवा जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत राहील तर त्याची शुध्दी असंभव आहे. शुध्दी करताना गोमूत्रात शिजवलेले जव खावे लागतात तसेच तप्तकृच्छ व्रत करावे लागते. परंतु जर वर्षापेक्षा एक दिवस जरी अधिक तो तिच्याबरोबर राहील तर त्याची शुध्दी

होणे पूर्णत: असंभव आहे. तो ज्यांच्याबरोबर राहतो तसाच होऊन जातो. आज ब्राह्मणांची अनेक मुले युरोप अमेरिकेला जातात, दोन-तीन वर्षे तेथे राहून येतात. दुबईसारख्या खाडी देशात लाच देऊन नोकरी मिळवणे, मुसलमानांच्या सहवासात राहणे, त्यांच्या बरोबर खाणे-पिणे अनेकांचे चालू असते. तेथे ते आपले नावसुध्दा बदलून घेतात. काही जण तर तेथे अंतरजातीय विवाहसुध्दा करतात. अशा मुलांना शुध्द करून घेण्याची काही व्यवस्था नसतानाही ही ब्राह्मण मुलं शुध्द झाली? एकही धर्माचार्य त्यांच्याकडे बोट सुध्दा दाखवू शकत नाही आणि तेच धर्माचार्य स्त्रियांना जाळण्यात स्वत:चा गौरव समजतात.

मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायात लिहिले आहे की ब्राह्मण पिता व शूद्र जातीच्या स्त्रीपासून निषाद किंवा केवट जन्माला येतो तेव्हा त्याने नाव चालवावी किंवा मासेमारीचा व्यवसाय करावा. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की पृथ्वीवर तीन भाग पाणी आहे, केवढ्या नद्या, केवढे समुद्र व केवढी सरोवरे ! या सर्व ठिकाणी मत्स्य व्यवसाय, विशाल समुद्री विभागाचे संचालन एक दोन ब्राह्मणांच्या चुकीच्या विवाह निर्णयाने शक्य नाही. कारण स्मृतिकारांच्या म्हणण्याप्रमाणे अशांच्या मुलांनीच मत्स्य व्यवसाय करावा किंवा नाव चालवावी. असे असेल तर ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात सूट देऊन निषादांची संख्या वाढावण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

अशा प्रकारे क्षत्रिय आणि ब्राह्मणांच्या संकराने निर्माण झालेल्या सूत पूत्रांनी घोड्याचे व रथांचे कार्य पाहावे असे म्हटले आहे. पूर्वी प्राचीन नरेशांजवळ चतुरंगिणी सेना असे त्यासाठी लाखो रथांची व लाखो घोड्यांची देखरेख पंचवीस-पन्नास सूत निर्माण केल्याने झाली नसती. शूद्र आणि ब्राह्मण स्त्रीपासून झालेल्या मुलाला चांडाळ म्हटले जाई व तो वध करण्याचे कार्य करीत असे. जेल विभाग त्याच्या स्वाधीन होता. ज्या वर्ण व वर्णसंकरासाठी जे कार्य निर्धारित होते ते कार्य दुसऱ्या वर्णातील लोक करत नसत. अन्यथा या स्मृतीमध्ये लिहिले आहे की राजाने अशा व्यक्तीला निर्धन करून देशातून हाकलून द्यावे. आता आपणच विचार करावा की उपर्युक्त विभाग राज्याचे प्रमुख अंग आहेत व त्यांना चालवण्याची व्यवस्था होती तर मग कोणी सती कसे होईल? अशा व्यवस्थेमध्ये पतिव्रता धर्म कोठपर्यंत सुरक्षित राहू शकणार?

प्राचीन समाजात वर्णसंकर पैदा करण्यास मुभा असलेली दिसून येते. त्याचे पुरावेही मिळाले आहेत एवढेच नव्हे तर ज्या माता-पित्यांनी वर्णेतर विवाह केला त्यांना दंड

किंवा शिक्षा तर लांबच पण त्यांना समाजाकडून कसला अपमानही सहन करावा लागला नाही. मात्र त्यांच्या निर्दोष मुलांना दोषी ठरवले गेले. आणि त्यांनी गावाबाहेर राहावे, मातीच्या भांड्यात खावे, प्रेताची उतरलेली वस्त्रे नेसावीत, झाडाखाली आज येथे तर उद्या तेथे असे राहावे. मनुस्मृती सांगते की शुध्द हृदयाच्या ब्राह्मणांनी ही व्यवस्था निर्माण केली आहे म्हणजे चूक मातापित्यांची व दंड प्रत्येक पिढीतील मुलांना? अशा व्यवस्थेचा त्रिवार धिक्कार असो.

## निष्कर्ष

सती प्रथा धर्म आहे की नाही? हे समजून घेण्यापूर्वी सर्वांनी धर्म म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. तर धर्म म्हणजे परमात्म्याशी संबंध जोडणे कारण तेच सुखाचे तसेच शाश्वत शांतीचे केंद्र आहे. परमात्मा सर्वत्र आहे. त्याला शोधण्याचे स्थळ मात्र प्रत्येक स्त्रीपुरुषाचे हृदयस्थान होय. म्हणजे ते स्थान हृदयाच्या अंतरंगात आहे बाहेर नाही. वेदातील पुरुष सूक्ताचा असा उद्‌घोष आहे की दैवी संपदेला हृदयात उतरवणाऱ्या पूर्व महापुरुषांनी जाणले होते, ब्रह्माने ज्याची स्तुती केली होती, इंद्राने ज्याला सर्वत्र व्याप्त असलेले पाहिले होते, त्या परम पुरुषाला जो जाणतो तो याच जन्मात अमृतपद प्राप्त करून घेतो. याव्यतिरिक्त अमर होण्याचा अन्य कोणताही मार्ग नाही. ''**यज्ञेन यज्ञमयजन्त देवस्तानि धर्माणि प्रथमान्यासन**'' (ऋग्वेद १०/९०/१-१६) दैवी गुणसंपन्न पुरुषांनी यज्ञस्वरूप महापुरुषाला लक्ष्य बनवून त्याचीच पूजा केली. व हाच धर्म आहे.

तेव्हा वेदानुसार धर्म काय आहे? त्या परम पुरुषाला जाणणे हाच धर्म होय. त्याला जाणण्यासाठी काय केले पाहिजे? मानसिक यज्ञ ! मनाचा निरोध ! तो कसा होईल? तर प्रत्येक ऋतूत त्या परमात्म्याच्या चिंतनाने ! बस एवढाच धर्म आहे. हाच सत्पथ आहे. व या सत्पथावर चालणारा सती आहे. ही स्थिती जीवित अवस्थेमध्येच प्राप्त होते. जाळून घेण्याने किंवा मरण्याने नाही.

बरोबर हाच गीतेचाही निर्णय आहे की ''इहैव तैर्जिता सर्गो येषां साम्ये स्थितं मन:'' ज्यांचे मन समत्वात स्थित आहे त्या पुरुषांकडून जिवंत अवस्थेत सर्व संसार जिंकला गेला ''निर्दोष हि समं ब्रह्म'' ब्रह्म सम आणि निर्दोष आहे आणि साधकाचे मनदेखील निर्दोष व समस्थितेचे बनले. समान गुणधर्मवाला बनण्याने ''तस्माद ब्रह्माणि

ते स्थिता:'' (गीता अध्याय ५, श्लोक १९) तो ब्रह्मामध्ये स्थित होतो. मग ब्रह्मामध्ये केव्हा स्थिती प्राप्त होते? जेव्हा संसाररूपी शत्रू जिंकला जाईल तेव्हा ! संसार केव्हा जिंकला जातो? जेव्हा मनाचा निरोध होईल तेव्हा ''महा अजय संसार रिपु जीति सकई. सो बीर ।''

ईश्वर प्राप्ती झालेल्या प्रत्येक महापुरुषाने मनाला जिंकण्याची गोष्ट केलेली आहे ''मन: एव मनुष्याणां कारणं बन्ध मोक्षयो:'' मनुष्याच्या मुक्तीचे आणि बंधनाचे कारण मन आहे. तेव्हा जोपर्यंत मन जिवंत आहे तोपर्यंत शरीर जाळण्याने किंवा न जाळण्याने काय होणार? मनाच्या निरोधासाठी तर साधन-भजन केले जाते. परंतु शरीर जाळण्याने ना मनाचा निरोध झाल्याचे कधी ऐकले आहे ना भजनाचा किंवा भक्तीचा हा खरा मार्ग आहे.

जगातील लोक परमेश्वर भक्तीच्या नावावर काही ना काही करीत असतात उदा. सकाळी स्नान करून सूर्याला, पिंपळात किंवा कोठे पाणी घातले जाते, धूप दीप केला जातो. चाळीसा म्हटली जाते, श्लोक-स्तोत्रे म्हटली जातात. स्त्रिया चौदा माई, सती माई किंवा विविध झाडाची किंवा जलाशयाची पूजा करतात. यामध्ये प्रत्येकाची पूजा सामग्री आणि पूजा पध्दती भिन्न असते. जसे कोणी बसून पूजा करते. कोणी झोपून तर कोणी एका पायावर उभे राहून पूजा करते. म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची पूजा सामुग्री आणि नैवेद्याच्या नावावर पशू, पक्षी तसेच स्त्रीपुरुषांचाही बळी देऊन समृध्दीबरोबरच परमधाम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो.

याच प्रकारे गृहत्याग केल्यानंतर कोणी एका दंडाला किंवा कोणी तीन दंडाना मोक्षाचा उपाय मानतात कोणी चंदनाच्या लेपाचे महत्त्व सांगातात, कोणी स्नानाचे तर कोणी मुंडणाचे महत्त्व सांगतात कोणी कुंडलांचे तर कोणी विभूतीचे महत्त्व सांगतात. संत बनलेले त्याग आणि तपस्येला महत्त्व देतात. येथे पोशाख सत्याचा असला तरी हे साधन नव्हे हे केवळ पाया आहे.

जैन साहित्यात याच आशयाची एक चांगली कथा सांगितली आहे की भगवान महावीर आपल्या पूर्वजन्मात सम्राट भरताचे पुत्र मरीचीच्या रूपात होते. कठोर साधनेपासून विचलित झाल्यानंतर त्यांनी विचार केला की मी आता काया, वाचा, मने विकारांपासून मुक्त आहे तेव्हा त्याचे प्रतीक म्हणून मी त्रिदंड धारण करेन. मी तपस्येने सुरभित नाही

तेव्हा ती उणीव भरून काढण्यासाठी चंदनाचा लेप करेन मोहाचे प्रतीक म्हणून छत्र धारण करेन. माझे अंत:करण पवित्र आहे याची आठवण ठेवण्यासाठी दिवसातून तीन वेळा मी स्नान करेन. वास्तविक वेष हा प्रतिज्ञेची सतत आठवण करून देण्यासाठी असतो. वेष सत्साधनेला प्रोत्साहनरूप असतो; पण वेष म्हणजे सत्साधन नव्हे. वेष कोणताही असला तरी जी सत्साधना करायला हवी ती सद्‌गुरूपासून मिळणारी विद्या एकच असते. त्यात पुष्कळ साधना नसते 'व्यवसात्मिका बुध्दिरेकेह कुरुनन्दन' (गीता, अध्याय २ श्लोक ४१) ती क्रिया एकच असते. आणि ती महापुरुषांकडून प्राप्त करावी लागते. बाह्य आचरण म्हणजे स्नान करणे-नहाणे वगैरे ना धर्म आहे ना अधर्म आहे. जर मनात विकार असेल तर नुसते शरीर स्वच्छ करून काय फायदा? भजन-भक्ती ही अशी एक क्रिया आहे ज्याने मन स्वच्छ केले जाते व संसारभर पसरलेले मन हळू हळू आपला पसारा आवरता घेते व मग मनाचा निरोध होतो. कपोलकल्पित कितीही गोष्टी केल्या तरी मनाला थांबविता येत नाही त्याला वश करता येत नाही ''साधन करिय विचार हीन मन शुध्द होय नहिं तैसे''। (विनय पत्रिका)

मनाचा संयम करण्यासाठी, निरोध करण्यासाठी वेदाने परमात्म्याचे सतत चिंतन करावयास सांगितले आहे. 'ग्रीष्म इधम: शरद्धवि' ग्रीष्म-शरद-वसन्त अशा प्रत्येक ऋतूत ईश्वराचे सतत चिंतनद्वारा मनाचे संकल्प विकल्प जेव्हा शांत होतात व त्या शांत मनाचाही जेव्हा विलय होतो तेव्हा तत्त्व प्राप्त होते. त्याचेच नाव मोक्ष आहे, परमगती आहे, परमधाम आहे. मनाचा निरोध करण्यासाठी ज्याने प्रयत्न केला नाही त्याला केवळ शरीर जाळून कसा मोक्ष मिळेल?

वायूप्रमाणे चंचल मनाचा निग्रह करणे दुष्कर आहे असे मानणाऱ्या अर्जुनाला योगेश्वर श्रीकृष्ण गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या अन्ती एक सुगम उपाय सांगतात की तू फक्त भक्ती कर. ''श्रध्दावान भजते यो माम स मे युक्ततमो मत:।'' त्या भक्तीचा आरंभ करणे म्हणजे हृदयात जो परमात्मा आहे त्याच्यावर (सद्‌गुरुवर) श्रध्दा ठेवणे-निष्ठा ठेवणे. फक्त या परमात्म्याचेच अस्तित्व आहे. दुसऱ्या कशाचेही अस्तित्व नाही. तेच फक्त सत्य आहे, अविनाशी आहे, तेच परमतत्त्व आहे. त्यालाच आपल्या जीवनाचा उद्देश्य बनवा आणि त्यानंतर त्याच्या प्राप्तीचे साधन ज्याचे नाव दैवी संपद आहे त्या गुणांना हृदयात प्रवाहित करा. इंद्रियांच्या बहिर्मुखी प्रवाहाला 'संयमाग्निषु जुहृति' संयमाच्या अग्नीत हवन करा. विषयोत्तेजक शब्दांच्या आशयाला वैराग्योत्तेजक

भावामध्ये बदला व त्यापासून स्वत:ला वाचवा. संपूर्ण इंद्रियांच्या व्यापाराला ईश्वरीय आदेशाच्या प्रकाशात संयमित करा.

त्याबरोबर आवश्यक आहे नाम जप. ज्याचा चढउतार श्वासावर अवलंबून आहे. ज्यांना श्वासाबरोबर नामजप करण्याची क्षमता नसेल तर आरंभी माळा, बोटे किंवा नाडीच्या स्पंदनाच्या आधारे नामजप करतात. परंतु लवकरच श्वासाबरोबर नामजप ते करू शकतात व मग माळा किंवा बाह्य उपकरणांची आवश्यकता राहात नाही. मग श्वासाबरोबरच जप सुरू होतो व तसाच जप सुरू झाला पाहिजे. श्वास केव्हा आत गेला ते पाहा, केव्हा बाहेर आला ते पहा, किती वेळ श्वास बाहेर राहिला ते पहा. ते समजून घ्या आणि मग श्वास आत जाताना त्याद्वारे नाम जपा. ध्यान श्वासामध्ये केंद्रित करा. श्वासामध्ये निर्माण होणाऱ्या शब्दाला पकडा. श्वास नामाशिवाय दुसरे काहीही म्हणत नाही. प्रारंभी आम्ही ऐकू लागलो तर नाम ऐकू येणार नाही. सन्न-सन्न, साँय-साँय असे ऐकायला येईल, परंतु वैखरी, मध्यमा यानंतर पश्यन्तीचा स्तर येता येता हे नाव श्वासात मिसळले जाईल. या प्रकारे श्वासाद्वारे जप केला पाहिजे. यालाच श्रीकृष्णाने प्राणापान म्हटले. गौतम बुध्दाने याला 'अनापानसति' असे म्हटले. असे करण्याने प्राणांचा याम म्हणजे निरोध होतो. आता या अवस्थेत आतून कसलेही संकल्प उठत नाहीत किंवा बाह्य वायुमंडलातील संकल्प आत शिरत नाहीत. यालाच प्राणायाम असे म्हणतात. हीच मनाची संपूर्ण निरोधावस्था आहे. आणि हे निरुद्ध मन जेथे विलय पावते तेथून भक्ती, भजन, यज्ञ या गोष्टी बाहेर येतात- यज्ञशिष्टामृत भुजो यान्ति ब्रह्म सनातनम (४/३१) यज्ञाच्या पूर्तिकाळात यज्ञं ज्याची रचना करतात त्या ज्ञानामृताचे पान करणारा योगी शाश्वत सनातन ब्रह्म परमात्म्यात प्रवेश करतो.

प्रारंभापासून शेवटपर्यंत या सर्व विवरणाचे तात्पर्य एवढेच की, भजन-भक्ती करणे हाच एक विधी आहे. हाच एक यज्ञ आहे. योगसाधना पण हीच आहे. परमात्म्यामध्ये विलीन करवणाऱ्या या क्रियेला योगेश्वर श्रीकृष्णाने यज्ञ असे म्हटले आहे. या संसाराशी संयोग-वियोगरहित अशा अविनाशी परमात्म्याच्या प्राप्तीच्या क्रियेला वेदाने पण यज्ञ असे म्हटले आहे. आणि या क्रियेवर अधिक भर दिला. तसेच सावधानीचा इशाराही दिला की, या यज्ञापासून रहित-वंचित अशा स्त्रीपुरुषांचे शरीरही सुखकारक असत नाही तर मग त्याला परलोक कोठून प्राप्त होणार?

योगेश्वर श्रीकृष्णाने या विधीने भजन करण्यासाठी खूप प्रोत्साहन दिले व सांगितले की या विधीपैकी कोणी काहीही केले तरी तो भजनाचा ज्ञाता आहे. तो यज्ञाला जाणतो असे समजावे. फरक इतकाच की कोणी आरंभिक स्तरावर आहे, तर कोणी मध्य स्तरावर तर कोणी उन्नत अवस्थेवर आहे. गीतेतील ४थ्या अध्यायातील श्लोक २४ पासून ३१ पर्यंतच्या ८ श्लोकांमध्ये तसेच चौदा भागांमध्ये हा विधी प्रस्तुत आहे.

सर्व बाजूंनी मन आवरून एका परमात्म्यावर साधक आपली निष्ठा जेव्हा केंद्रित करतो त्या क्षणापासून भजनाची सुरुवात होते. तेथपासून भजनाचे पहिले पाऊल उचलले गेले आहे. धर्माला जाणत नसलात तरी आपण धर्माचा मार्ग पकडला आहे. योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की- मयि चानन्य योगेन भक्तिरव्यभिचारिणी (अ १३/१०) तुमची भक्ती अव्यभिचारिणी असली पाहिजे. अनन्य भावाने माझ्याशी जोडलेली असली पाहिजे. महापुरुषांनी ज्याला सती म्हटले त्या भक्तीला अव्यभिचारिणी भक्ती असे म्हटले जाते. हेच आहे सतीसाठी योगेश्वर श्रीकृष्णांचे संबोधन ! स्त्रिया दूषित होतील असे अर्जुनाला भय वाटत होते या भयाला श्रीकृष्णांनी अज्ञान असे म्हटले आहे आणि सांगितले की साक्षात्कारी महापुरुषांनी जर आपल्या मागून येणाऱ्यांना भजनाचा सन्मार्ग दाखवला नाही. स्वत: करत असणारी भक्ती त्यांच्याकडून करवून घेतली नाही तर ते मागून येणारे लोक नुसती पाहिलेली गोष्ट किंवा क्रिया सोडून देतात आणि महापुरुषांच्या कृतीचे फक्त ढोंग मात्र आणतात. भक्तिमार्गामधील या ढोंगाला-विकृतीला योगेश्वर वर्णसंकर असे म्हणतात. महापुरुषाच्या दृष्टीने ईश्वराच्या प्राप्तीसाठी निर्धारित उपर्युक्त क्रियेशिवाय इतर जी काही क्रिया केली जाते ती क्रिया म्हणजे समाजातील संस्कार सृजनाचे कारण आहे ती समाजाची एक व्यवस्था आहे तो धर्म नव्हे. धर्माच्या नावावर भयंकर गैरसमजुतींचे भ्रामक कल्पनांचे सृजन झाले आहे. त्यापैकीच एक सती प्रथा आहे.

अयोध्येतील जनसभेला भगवान श्रीरामांनी भजनमार्ग समजावून सांगितलेला उल्लेख रामचरित मानसामध्ये आहे. या सभेमध्ये 'गुरु द्विज पुरवासी सब आये'' गृहस्थाश्रमात राहणारे लोकदेखील होते. मनुष्य शरीराच्या नश्वरतेचे वर्णन करून भगवान श्रीरामाने सांगितले की तुम्हांला जर परलोक हवा असेल, जर सुख हवे असेल तर या दोन्ही गोष्टींच्या प्राप्तीसाठी फक्त एकच मार्ग आहे व तो म्हणजे ''भगति मोरि ''माझी भक्ती करा. ''भगति मोरि पुराण श्रुति गाई'' माझ्या भक्तीचे गायनच पुराण आहे. माझ्या भक्तीचे गायन म्हणजेच वेद आहे. तेव्हा एका परमात्म्यावर दृढ निष्ठा हा भक्तीचा

चरण आहे. 'भक्ति सुतंत्र सकल सुखखानी । बिनु सत्संग न पावहि प्रानी ।।' या परमात्म्यावर श्रध्दा दृढ करण्यासाठी संतसेवा करणे आवश्यक आहे. सर्व संत चांगलेच असतात; पण जर ते अन्य देवी देवतांची पूजा करवत असतील, अनेक ठिकाणी भक्तांची श्रध्दा विखुरत असतील तर ते स्वत:च अद्याप भक्तीला स्थिर झालेले नाहीत. त्यांनी स्वत:लाच परमात्म्याच्या योग्य मार्गावर आधी आणले पाहिजे. एक परमात्म्याच्या प्रती निष्ठा हेच सतीचे लक्षण आहे.

परमात्म्याच्या नावावर डावे उजवे असे काही ना काही करत हळू हळू ते इतके खाली उतरले की पशुबली, भूतप्रेत उतरवण्याचे मंत्र, जादुटोणा, तंत्रविद्या अशा भ्रामक कृतींच्या ते आहारी गेले. जर जगातील प्रत्येक गोष्टीत परमेश्वराचा अंश आहे तर मग भूतेपण असणारच. मग करा ना त्यांची पण पूजा! भयंकर भ्रान्तीचा हा अंतिम चरण आहे. गोस्वामी तुलसीदासजींनी 'जे परिहरि हरिहर चरण, भजहिं भूत गन घोर' असे म्हणून त्याची निर्भत्सना केली. पण लोक तरीही मंत्र तंत्र जादुटोणे करीत बसतातच इकडे रामायणही वाचतात. भोळ्या भाळ्या स्त्रियांना दहशत घालून, भय दाखवून, मानसिक दबाव आणून वरील गोष्टी करण्यास त्यांना भाग पाडले जाते. त्यांनी आपले म्हणणे मान्य करावे यासाठी त्यांची प्रशंसा केली जाते की स्त्रियांनीच तर धर्म-कर्म टिकवले आहे. स्त्रिया या बहकवण्याने लवकर फसतात कारण त्यांना आजपर्यंत शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते. पूर्वी धर्मशास्त्र त्यांना ऐकवले जात नसे. आजपर्यंत त्यांना असे डांबून ठेवण्यात आले की ती बिचारी पिंजऱ्यातच बंद राहिली. पतीची इच्छा नसेल तर तिने जेवायचे नाही. तिने धर्म करायचा नाही. त्यांना सत्यापासून वंचित ठेवले गेले. भूतप्रेतांची पूजा, पिंपळाची-वडाची पूजा, इतर झाडे, पाने, ग्राम देवता, चार रस्ते, पुत्र जिवंत करणारी देवी अशा अनेक गोष्टी म्हणजे जे काही त्यांना सांगितले त्याला त्यांनी धर्म मानला व त्या व्रते उपवास करू लागल्या. नैवेद्यासाठी नाना प्रकारच्या मिठाया भगवंताला अर्पण करू लागल्या. स्त्रियांनी चुकून सुध्दा या भ्रामक गोष्टींमध्ये फसले जाता कामा नये. कसलेही भय बाळगता कामा नये कारण असे कोणतेही भूत या सृष्टीमध्ये नाही जे मनुष्यापेक्षा अधिक ताकदवान आहे. भूत म्हणजे प्राणी- ''ईश्वर सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।''

तेव्हा स्त्रियांनी मंत्र, तंत्र, तोडगे, जादुटोणे, चेटूक भूतभवानी अशा गोष्टीवर मुळीच विश्वासू ठेवू नये. हा अत्यंत चुकीचा मार्ग आहे. यामध्ये अधिकांश देवता

शाकाहारी आहेत परंतु त्यांच्या पत्नीना-देवींना मात्र मांसाहारी घोषित करून स्वतःच्या पोटपूजेसाठी एक साधन निर्माण केले गेले आहे. तेव्हा स्त्रियांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की स्त्रीपुरुषांसाठी नव्हे सर्वांसाठी भगवंताचे भजन-भक्ती हा एकच मार्ग आहे. आम्हा सर्वांचे एकच धर्मशास्त्र आहे आणि ते म्हणजे गीता. तुम्ही गीता, रामायण किंवा मूळ वेद पाहिलेत तरी तुम्हांला हेच दिसून येईल की, सर्वांनी एकच गोष्ट सांगितली आहे ती म्हणजे अविनाशी असा परमात्मा-परमतत्त्व त्या एकमेव परमात्म्यावर दृढ श्रध्दा ठेवा. त्याच्या ठिकाणी तुमची श्रध्दा समर्पित करा.

अयोध्येतील त्या जनसभेला म्हणूनच श्रीरामांनी परमात्म्यावरील निष्ठा म्हणजे भक्तीचा आरंभ आहे असे सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की या भक्तीला सुरुवात करण्यासाठी कोणत्याही योगाची, यज्ञ, जप, तप किंवा उपवास करण्याची आवश्यकता नाही. ''सरल सुभाव न मन कुटिलाई । जथा लाभ सन्तोष सदाई ॥'' ७/४५/२'' प्रयत्न फक्त एवढाच करा की आपला स्वभाव सरळ-निर्मळ ठेवा. त्यात कुटिलता आणू नका. आपल्या मनालाच सरळ करायचे आहे, सम करावयाचे आहे. जो काही लाभ मिळेल त्यातच संतोष माना. ''मोर दास कहाइ नर आशा । करइ त कहहु कहा विश्वासा ॥'' ७-४५/३ स्वतःला माझा दास म्हणवून घेतो आणि दुसऱ्याची आशा करतो; मग तुम्हीच सांगा की त्याने माझ्यावर कितपत विश्वास ठेवला? हा खरा माझा भक्त नव्हे. पुढे त्यांनी सांगितले की खऱ्या भक्ताने किंवा साधकाने कोणाशी वैर करू नये, झगडे-तंटे करू नये, सत्याच्या मार्गावर चालणाऱ्यांशी मैत्री करावी, माझ्या नामजपात मग्न असावे, ममता, मद आणि मोहाचा त्याग करावा. असे करण्याने जे सुख प्राप्त होईल त्याचा आनंद फक्त त्यालाच प्राप्त होईल. ज्याला परमानन्दाची रास प्राप्त झाली आहे. येथे भगवान श्रीरामांनी स्पष्ट सांगितले आहे की परमात्म्यावर दृढ श्रध्दा ठेवावी व सतत नामजपात रत राहावे- मग्न राहावे. हाच भजनाचा खरा मार्ग आहे. एवढे केल्याने आपला प्रवेश भक्तीच्या योग्य मार्गावर होईल.

कालान्तराने हीच भक्ती शबरीला सांगताना श्रीरामाने त्या भक्तीचे नऊ सोपान सांगितले. यामध्ये पहिली पायरी सांगितली संतांचा सहवास ''प्रथम भगति सन्तन्ह कर संगा ।'' कारण संगतीने परमात्म्याच्या संबंधित असणारे कथा प्रसंग तुम्हाला ऐकायला मिळतील. त्यामुळे तुमची समजशक्ती काम करू लागेल, मनातील सगळ्या शंका दूर होतील. तेव्हा ''गुरुपद पंकज सेवा तीसरि भगति अमान'' गुरुपासून त्यांची विद्या प्राप्त

होईल. ती धारण करणे म्हणजे गुणगान करणे होय. ही भक्तीची चौथी पायरी झाली. मग पाचवी पायरी आहे त्या नामाचा सतत जप ! ''मंत्र जाप मम दृढ विश्वासा'' एकमेव असणाऱ्या परमात्म्यावर दृढ विश्वास झाला म्हणजे ''विरति बहु कर्मा'' गृहस्थधर्मातील अनेक जबाबदाऱ्या हळू हळू कमी करा. त्या आपल्या मुलांवर- घरातील लोकांवर सोपवा. यामुळे कर्मांपासून लवकर विरक्त व्हाल. त्यासाठी घर सोडण्याची आवश्यकता नाही. याचा परिणाम सातव्या पायरीवर दिसेल ''सातव सम मोहि मय जग देखा'' सर्वत्र ईश्वराचा संचार दिसू लागेल. परंतु सर्वाधिक संचार दिसेल संतांमध्ये. कारण हे जग माझ्या एवढे आहे पण संत माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत म्हणजे या जगापेक्षा श्रेष्ठ आहेत. ''आठवा जघा लाभ सन्तोषा । सपनेहु नहि देखइ पर दोषा ॥'' परमात्म्याविषयी दोष पाहू नका. अंतिम पायरी आहे ''नवम सरल सब सन छल हीना । मम भरोस हिय हरष न दीना ।'' सरळ-निर्मळ मन ठेवा, काहीही प्राप्त करावयाचे असेल तर माझ्यावर भरोसा ठेवा, इतर कोणावर भरोसा किंवा श्रध्दा ठेवू नका. हेच भजन आहे, हीच भक्ती आहे. हाच भक्तीचा मार्ग आहे. या ९ पायऱ्यांपैकी एका पायरीवर जरी तुम्ही दृढपणे स्थिर व्हाल, म्हणजे तो स्तर आत्मसात कराल तरी भक्तिमार्गावर तुमचा प्रवेश होतो. म्हणूनच श्रीकृष्णांनी गीतेत म्हटले आहे असे भक्त यज्ञाचे जाणकार असतात.

एकाने संत कबीरांना विचारले की भजन म्हणजे काय? भक्ती म्हणजे काय? तेव्हा अत्यंत थोड्या शब्दांत त्यांनी सांगितले की 'भजन भगति हरिनाम है ।'' यावर त्यांना पुन्हा विचारले गेले की नामजपाशिवाय लोक ईश्वरासाठी ज्या इतर गोष्टी करतात त्यांना भजन किंवा भक्ती म्हणता येणार नाही का? कबीर म्हणतात, नाही ''दूजा दु:ख अपार'' त्या गोष्टी म्हणजे दु:खाचे कारण आहे. त्याला भजन म्हणता येत नाही. ''मनसा वाचा क्रमना, कबीर सुमिरन सारे ।'' एका परमात्म्याचे स्मरण हेच भजन आहे. या सर्वांचे तात्पर्य हेच की तुम्ही परमात्म्याला आपल्या जीवनाचा अंतिम हेतू बनवा. नामजपाने आणि हळू हळू दैवी संपत्ती प्राप्त करून आचरण करण्याने आपल्या आत्म्यावरील असणारे आवरण थोडे पातळ होईल. तेव्हा तुमचा आत्माच रथी बनून कोठे जायचे ते तुम्हाला सांगेल. तुमचा सद्गुरू कोण आहे तेही तुम्हांला सांगेल. जेव्हा सद्गुरू प्राप्त होतात तेव्हा मग मनातील संशय, भ्रम, नष्ट होतो. मग संपूर्ण समर्पण करून मार्गक्रमण करा. मात्र प्रथम त्या सद्गुरुला शोधू नका, प्रथम या ईश्वराला शोधा, परमेश्वरा प्रति असणाऱ्या श्रध्देला शोधा, दैवी संपदेमध्ये असणाऱ्या गुणांचा स्वत:मध्ये

शोध घ्या. म्हणजे तुमचा पुण्य-पुरुषार्थ तुम्हाला सद्‌गुरु शोधून देईल. या मार्गावर सर्वात कमी आवश्यकता आहे ती सद्‌गुरूला शोधण्याची त्यांना शोधण्याचा कुपरिणाम हा की आज सद्‌गुरूची मोठी रांग लागली आहे. परंतु संत किंवा सद्‌गुरू ज्या दृष्टीमुळे शोधले जातात ती दृष्टी पुण्यमयी आहे. तेव्हा प्रथम परमात्म्यावर अतीव श्रध्दा ठेवून रामजप करा, शुभ आचरण द्वारा, (आप्तपुरुषांची सेवा हा भजनाचा सर्वांत सुगम उपाय आहे) त्यांच्या सेवेद्वारा, केवळ आपल्या परिश्रमाच्या कमाईद्वारा, स्त्रियांच्याकडे पाहताना आईच्या व बहिणीच्या दृष्टीने पहाणे, इमानदारी, सच्चाई, सरळता, आपल्या शेजारच्याचे हित चिंतन इ. शुभ आचरणांनी पुण्य प्राप्त करा. ज्या दिवशी तुमचे पुण्य काट्यावर उभे राहिले तेव्हा संत किंवा सद्‌गुरू यांची ओळख होईल. ते स्वत: तुम्हाला येऊन भेटतील ''पुण्य पुंज बिनु मिलहि न सन्ता ।''

याच्या उलट आचरण करण्याने परमात्मा आमच्यापासून दूर निघून जातो. स्त्री असो किंवा पुरुष असो जोपर्यंत तो परमात्मा आपल्या बाहेर आहे असे ते समजतात, जोपर्यंत परमात्मा आपल्या हृदयात आहे व तो आपल्या मनमानसात उठलेला प्रत्येक विचारतरंग पाहत असतो (ज्याचा परिणाम संस्काररूपाने त्यालाच भोगावा लागतो) असे ते समजत नाहीत तोपर्यंत तो आत्मानुशासित होत नाही. केवळ आत्मानुशासित व्यक्तीच खरी सती आहे आणि ती व्यक्तीच रुढीजर्जर समाजाचा जीर्णोद्धार करण्याचे साहस करते.

तेव्हा स्त्रियांनी महासती अनूसूया, सीता, मदालसा किंवा मीरेने जी उच्च कोटीची भक्ती करावयास सांगितली तशीच भक्ती करावी, त्यांच्या आदर्शाचे अनुकरण करावे. त्या सर्वांचे एकच सांगणे आहे की त्यांनी एका परमात्म्यावरच श्रध्दा ठेवावी. स्वत:ला हळूहळू ईश्वराला समर्पित करावे. त्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे आपत्ती सिध्दीमध्ये बदलेल, दु:ख सुखामध्ये परिवर्तीत होईल आणि प्रभूच कृपा करतील तर डोक्यावर कोसळणाऱ्या डोंगरालादेखील धुलीकण बनवतील तुम्ही अशी भक्ती करून तर पाहा.

विषम परिस्थितीमध्ये आपल्या स्वत:च्या शीलरक्षणासाठी काहीही केले जाते. आपल्या अब्रूचे रक्षण करण्यासाठी आपल्या अमूल्य शरीराचा त्यागसुध्दा करावा लागतो. परंतु मुक्ती प्राप्त करण्यासाठी शरीरत्याग करावा लागत नाही. अशा शरीरत्यागाने

मनुष्याचे कल्याण कधीही होत नाही. तो धर्मही नव्हे. पतीच्या शवाबरोबर पत्नीने चितारोहण करणे ही एक केवळ रुढी आहे, अत्यंत चुकीची प्रथा आहे. या व्यतिरिक्त या कृतीला काहीही अर्थ नाही.

आपल्याला याबाबत विचार-विमर्श करावयाचा असेल तर-

**श्री परमहंस आश्रम जगतानन्द**
**मु.पो.- बरैनी,**
**जिल्हा- मिर्जापूर (उ.प्र.)**
**हे आपल्याला सहर्ष आमंत्रित करीत आहेत-**

**।। बोला श्री सद्गुरुदेव भगवानकी जय ।।**

**।।ॐ।।**

साधकाने आपल्या लंगोटीशी म्हणजेच स्वीकारलेल्या तत्त्वाशी, मार्गाशी, एकनिष्ठ राहिले पाहिजे. जो दुराचरणी आहे, ज्याला एकांत आवडत नाही, भौतिक वस्तूंचा जो त्याग करू शकत नाही त्याला अक्षयपद प्राप्त होऊ शकत नाही. ज्या वस्तू अधिक प्रमाणात प्राप्त झाल्याने मूर्खांना आनंद होतो त्या वस्तूंबाबत प्राज्ञ पुरुष उदासीन असतो. विषयांचा त्याग करणे दुर्लभ आहे, तत्त्वज्ञानाची प्राप्ती होणे दुर्लभ आहे. तेव्हा बंधूनो, अनुभवी सद्गुरूच्या सहवासात राहा. मनाने, आचरणाने व वाणीने त्याला शरण जावे. जेव्हा त्या महापुरुषापासून अंत:प्रेरणेचे स्रोत मिळायला लागतील, साधकाचा आत्मा जागृत होऊन, ते महापुरुष हृदयात निर्देश देऊ लागतील तेव्हा समजावे की साधनेचा अंत:प्रवेश झाला आहे. तो अंत:प्रवेश म्हणजे निवृत्तीचा निश्चित असा स्रोत आहे.

**परमपूज्य श्रीपरमहंस**

''जीवनादर्श एवं आत्मानुभूति''

मधून उध्दृत

# अवतार एक अनन्त तत्त्व आणि अधिकारी साधकानाच प्राप्य

- स्वामी अडगडानन्द

---

अवतार योग्याच्या अंतरंगात होत असतो. देश, जाती आणि काळाप्रमाणे परमेश्वराच्या अवताराची कल्पना म्हणजे केवळ एक भ्रम आहे, भ्रान्ती आहे. विशेष प्रक्रियेद्वारा महापुरुषांच्या माध्यमातून योग्याच्या अंत:प्रदेशात परमात्म तत्त्वाची अनुभूती होत असते.

---

# कबीर आणि अवतार

**सन्तो ! आवे जाय सो माया !**
**हे प्रतिपाल काल नहि वाके । ना कहुं गया न आया ।।१।।**
**का मकसूद मच्छ कछ होना, शंखासुर न संहारा ।**
**है दयाल द्रोह नही वाके, कहहु कौन को मारा ।।२।।**
**वै कर्त्ता नही बराह कहावे, धरणि धर्यो नहिं भारा ।**
**ई सब काम साहेब के नाही, झूठ कहै संसारा ।।३।।**
**सिरजनहार न व्याही सीता, जल पषाण नही बंधा ।**
**वै रघुनाथ एककै सुमिरै, जो सुमिरै सो अंधा ।।४।।**
**वै कर्ता नहि भये निकलंकी, नहि कालिंगहि मारा ।**
**ई छल बल सब माया कीन्हा, जत सत्त सब टारा ।।५।।**
**दश अवतार ईश्वरी माया, कर्त्ता कै जिन पूजा ।**
**कहहि कबीर सुनो हो संतो, उपजै खैप सो दूजा ।।६।।**

**(बीजक, शब्द प्रकरण, शब्द ८)**

कबीरांच्या वरील पदावरून दिसून येते की त्यात त्यांनी अवतार या कल्पनेचे पूर्णत: खंडन केले आहे. परंतु संत कबीरांनी सत्य-यथार्थ म्हणजे काय ते सांगून स्पष्टपणे सांगितले आहे की दहा अवतार म्हणजे ईश्वर नाही; परंतु ईश्वरीय तत्त्वाच्या आरंभापासून ते परमावधीपर्यंत ईश्वराच्या विस्ताराचे विवरण आहे. ''दश अवतार ईश्वरी माया'' दहा अवतार म्हणजे अधिकारी असणाऱ्या लोकांना ईश्वरामध्ये प्रवेश देणारी माया आहे. त्या ईश्वरीतत्त्वात प्रवेश केल्यानंतर तो पुरुष परमात्मा स्वरूपात परिपूरित होऊन जातो. ईश्वराचा परमबोध म्हणजेच पूर्णत्वाची प्राप्ती होय.

कबीराच्या चिंतनाचे नाव होते ''राम'' !

**राम न रमसि कवन दण्ड लागा । मरि जडबे का करिबे अभागा ।।**

प्रेरणादायी शब्दांत कबीर म्हणतात की, रामाचे भजन करीत जा.

**कबीर और जाने नही, एक राम नाम की आशा ।।**

‘‘अवतार एक अनंत तत्त्व व अधिकारी साधकांनाच प्राप्य’’- यामध्ये अवतारविषयीच्या भ्रामक समजुतींचे निराकरण व त्याच्या मौलिक मर्यादांचे शास्त्रसंमत विशुध्द स्वरूप प्रस्तुत केले आहे. या प्रकरणाचा प्रतिपाद्य विषय अनंत अवतारांची सम्यक वैज्ञानिक व्याख्या प्रस्तुत करणे हा आहे. आणि या प्रकरणाची मौलिकता त्या तथ्याच्या उद्घोषात आहे की, अवतार योग्याच्या अंतरंगात होत असतो. देश, जाती व काळाच्या विशिष्ट परिस्थितीमध्ये परमेश्वराच्या अवताराची कल्पना म्हणजे केवळ भ्रान्ती आहे. ती कल्पना भ्रममूलक आहे. साधनेच्या द्वारा अनुभवी महापुरुषांच्या माध्यमातून योग्याच्या अंतरंगात परमात्म तत्त्वाची अनुभूती म्हणजे अवतार. साधकाच्या अंत:करणातच प्रभू प्रकट होत असतो. अधिकारी व्यक्ती आज आणि सदैव अवतारासाठी सुपात्र आहे.

मनमानसात अवताराच्या अवधारणेचा पवित्रमय संदेश घेऊन हा आर्षग्रंथ आत्मदर्शनाच्या प्राप्तीच्या यौगिक प्रक्रियेच्या संदर्भात स्वत:स प्रस्तुत करीत आहे. आत्म्यामध्ये परमात्म्याची अनुभूती हा या महानतम ग्रंथाचा मूळ विषय आहे. मत्स्य, कासव, वराह, नृसिंह इत्यादी अनेक अवतार इष्टदेवाच्या संस्पर्शाच्या किंवा अभिन्नतेच्या वेळी हृदयदेशात अभिव्यक्त होत असतो. कृष्णावतारदेखील आत्म्याच्या सत, चेतन तसेच आनंदघन अवस्थेचा निर्देशक आहे. सारांश या प्रकरणातील विवेचन वाचकांच्या अंतरंगात प्रेरणात्मक स्रोताचे सर्जन करण्यासाठी आहे. कारण विवेच्य वस्तूचा संबंध तर मन-वाणीच्याही पलीकडे आहे.

# कच्छपावतार
# ''सागर-मंथन''

**दोहा- भव सागर मन्थन करि, रतन कह्यो सब देख ।**
**तेरह विष की बोलि हैं, अमिय पदारथ एक ।।१।।**

अर्थ- चिंतनाच्या या भावधारेत एका वेळेची अनुभूती आहे, भवसागराचे मंथन केले, त्याच्या परिणामस्वरूप त्यातून निघालेली तेरा रत्ने म्हणजे विषवृध्दी करणाऱ्या लतेप्रमाणे आहेत. केवळ अमृत हाच एक असा विलक्षण पदार्थ आहे की ज्यात अनेकता नाही. जो सर्वथा अद्वितीय आणि अनुपमेय आहे.

**दोहा- भवनिधि मन्थन कथा सुनि सन्तन मन दुःख चैन ।**
**लखि तेरह दुख विपुल भे, एक अमिय लखि चैन ।।२।।**

अर्थ- संसाररूपी सागर मन्थनाने मनामध्ये जे विकारतरंग निर्माण झाले त्यांची कथा ऐकून संत महात्म्यांच्या भावपटलावर निर्माण झालेला सुख व दुःखाचा द्वंद्वात्मक तणाव येथे स्पष्ट झालेला दिसून येतो. तेरा रत्ने संसारातील या वाईट स्थितीचे चित्रण करतात. त्यांचा प्रसार पाहून संतांचे मन दुःखी झालेले आहे. चिन्मय आंतरिक शांती उत्पन्न करणाऱ्या अमृताला पाहून संतांच्या मनात सुखात्मक अनुभूती निर्माण होऊ लागते ज्याचा परिणाम परम कल्याण आहे.

**दोहा- तेरह रत्न जग जीविका, विकसित भोग विलास ।**
**क्षण सुखकर परिणाम तन, जग जोनी की रास ।।३।।**

अर्थ- या संसारात ही तेरा रत्ने जीवाला अनेक योनींमध्ये अनेक प्रकारचे भोगविलास देतात व भौतिक सुखाच्या मार्गावरून स्वैर करवतात. परंतु हा सर्व मृगजळाचा विस्तार आहे. कारण विलासीपणाला- सुखाला एक मर्यादा असते. त्याला प्रोत्साहन दिल्याने जीव त्याच्या आहारी जातो. हे सुख क्षणिक आहे हे त्याला समजत नाही. तेरा रत्नांच्या क्षणिक चमत्कारितेचा हा दुष्परिणाम आहे. या सुखरूपी मृगजळाच्या विविध साधनांमध्ये जीव जन्ममृत्यूच्या चक्रात भटकत राहतो. म्हणजे सागरमंथनापासून प्राप्त झालेली तेरा रत्ने म्हणजे विविध योनी समूर्त करणारे अक्षय भांडार आहे. ज्याच्या नकली प्रकाशाच्या मोहामुळे जीव जन्ममृत्यूच्या येरझारा करीत बसतो.

**चौपाई- तेरह रत्न मिले दु:ख मानी ।**
**जतन प्रगट अमृत रस खानी ।।१।।**

अर्थ- मंथनाच्या अविरत प्रयत्नामुळे तेरा रत्ने प्राप्त झाली; परंतु सुखाचे सान्निध्य प्राप्त झाले नाही. उलट दु:खाची ग्लानी आली. परंतु तरीही प्रयत्न चालूच राहिला. त्या दृढ प्रयत्नामुळे, निष्ठेमुळे आणि संकल्पामुळे मानसामध्ये अमृताचा स्रोत निर्माण झाला, जेथे तो अनादिकालापासून या अलौकिक स्रोताचा साठा होता.

टीप- निष्ठापूर्ण प्रयत्नाची परिणती अमृत प्रकट होण्यात झाली. यावरून स्पष्ट होते की पूर्तीपर्यंत साधकाने चिंतन सोडता कामा नये. कारण चिंतनाची शृंखला तुटली की भवसंसारात घुमवणारी तेरा रत्ने पुन्हा प्रभावशील होऊ लागतात. या प्रकारे जीव पुन्हा संसाराच्या उत्थान-पतनाच्या चक्रात सापडून देहाभिमानाने व्याप्त होतो.

**यह तन विष की वेलरी, गुरु अमृत की खान ।**
**शीश दिए सतगुरु मिले, तो भी सस्ता जान ।।**

अविरत प्रयत्नशील असणारा साधकांना मंथनाच्या प्रक्रियेमध्ये निर्माण होणाऱ्या विलासी पदार्थांमध्ये अलौकिकतेचा भास होतो.

**चौपाई- अमिय विलेकी सुखी पर काजा ।**
**सकल लोक भव संशय भाजा ।।२।।**

अर्थ- अमृतासारख्या दिव्य पदार्थाच्या प्राप्ती नंतर मनुष्य चिंतनाच्या अनन्यतेमध्ये भावविभोर होऊन सुखसागरात पूर्ण डुबून जातो. भौतिकतेच्या पलीकडे असणाऱ्या जीवनशक्तीचा संचार करणाऱ्या आत्मतत्त्वाचे सान्निध्य प्राप्त केल्याने परमात्म तत्त्वाकडे उन्मुख होणारी आशातीत सफलता साधकाला प्राप्त होते. मृत्युलोक परलोक आदि अलौकिक लोकांबद्दल ज्या दिव्य-भव्य कल्पना असतात त्या या अमृततत्त्वाच्या प्राप्तीमुळे नष्ट होतात.

नाना प्रकारच्या भ्रान्तिपूर्ण संदेहास्पद विचारधारापण या अमृतत्त्वाच्या प्राप्तीमुळे मनमानसामध्ये लुप्त होतात. सारांश या दिव्य पीयूष रसाच्या आभ्यन्तरिक वृष्टीमुळे साधकाला पूर्ण स्थैर्य प्राप्त होऊन त्याच्या चित्तवृत्ती शांतिसागरात समाहित होतात व परमात्मतत्त्वाशी एकरूप होतात- अभिन्नतेच्या स्थितीमध्ये लय पावतात.

**जेहि जाने जग जाइ हेराई । जागे यथा सपन भ्रम जाई ।।**

प्रयत्नशील साधक जागृतीच्या काळामध्ये स्वत:च्या लक्ष्यामध्ये लीन झालेला असतो.

**चौपाई- अमिय भोक्ता हू मिटि जाई ।**
**तब पूरित परमारथ खाई ।।३।।**

क्रमशील आभ्यन्तरिक उपलब्धीच्या परिणामस्वरूप जेव्हा अमृत रस प्राप्त होतो; तेव्हा त्या रसाचे पान करणारा भजनानन्दीही शाश्वतात समाहित होतो. तेव्हा यथार्थाने असे म्हणता येईल की परमार्थ पथावर अवरोध करणाऱ्या दरीची खोली परिपूर्ण झाली.

टीप- साधकाच्या आत्मिक उपलब्धीची ही चरम सीमा आहे; जिचे निरुपण कबीर अशा प्रकारे करीत आहेत :-

**अवधू बेगम देश हमारा ।**
**जहाँ पहुँच फिर हंस न आवे भवसागर की धारा ।**
**तहाँ न माया कृत प्रपंच यह, लोक कुटुम्ब परिवार ।।**

हीच ती स्थिती होय जेथे पोहचल्यावर नारदाच्या वीणेला मधुर स्वर प्राप्त झाला. जेथे प्रलयंकर भगवान शंकरांचा डमरू निनादित झाला. जेथे मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामाला रावणावर विजय प्राप्त झाला. गीतेचे दिव्य ज्ञान याच भावभूमीची उपज आहे; जेथे शोधणारा लक्ष्यामध्येच सामावला जातो.

**चौपाई- आत्म दरश अमृत सुधि सोई ।**
**अवर कहै जन सुध बुध खोई ।।४।।**

टीका- साधकाला जेव्हा आत्मानुभूती होते तेव्हा हे स्पष्ट होते की अमृतवृष्टीच्या अलौकिक क्षणाचा अभ्युदय झालेला आहे. हाच अमृतरसाचा शोध आहे. जर एखाद्या साधकाने या आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियेचे वर्णन वेगळ्या प्रकारे केले तर निश्चितपणे समजावे की तो चिंतनपथापासून विचलित झाला आहे किंवा आपल्या लक्ष्यापासून वंचित होऊन मायेच्या जाळ्यात गुरफटला गेला आहे.

**दोहा- अमिय पदारथ अपर नहिं मृत सारा जप भोग ।**
**भजन पूर्ती काल महँ अमिय आत्म संयोग ।।४।।**

अर्थ- आत्मानुभूतीशिवाय अमृताची प्राप्ती अगदी अशक्य आहे. यौगिक चिंतनापासून समस्त उप भोगांचे क्षेत्र किंवा विस्तार नश्वरतेने भरलेला आहे. मग बाहेर शोध करून ते अनमोल रत्न कोठून मिळणार? त्या पीयूषरसाच्या अनुभूतीचा आल्हाद ज्यांनी ज्यांनी प्राप्त केला तो आत्मसाक्षात्काराच्या रूपातच केला आहे. भजनाच्या भक्तीच्या पूर्तिकालात त्या अमृततत्त्वाची प्राप्ती होत असते.

**चौपाई- तेहि प्रगटत सर मन्थन पूरा ।**
**मिलहि तबै वितरित हरि रूरा ।।५।।**

टीका- दिव्य अमृतरूपी रत्नाची प्राप्ती होते तेव्हा आत्मा आणि परमात्म्याचा संयोग होतो व मनुष्य मृत्यूच्या पलीकडे जातो. बरोबर याच अवस्थेमध्ये सागर मंथनाची यौगिक प्रक्रिया पूर्ण होते आणि ते अलौकिक ब्रह्म याच शरीरात आपल्या व्यापक सचेतनतेचा प्रसार करीत अंतरंगाला दिव्य तेजाने भरून टाकते. परंतु जेव्हा अमृतमय भगवान स्वत: सारथी बनून त्याचे संचालन करीत पीयूष वितरण करतात म्हणजे साधकाचे रथी म्हणून उभे राहतात तेव्हा त्या क्षणी त्या अनमोल रत्नाची अनुभूती साधकाला होते.

तुलसीदासांनी म्हटले आहे-

**सोइ जानइ जेहिं देहु जनाई ।**
**जानत तुम्हहिं तुमाहि होइ जाई ।।**
**तुम्हरिहि कृपा तुम्हहिं रघुनन्दन ।**
**जानहिं भगत भगत उर चन्दन ।।**

चिंतन प्रक्रियेमध्ये तुम्ही कितीही श्रम घेतलेत तरी ईश्वराच्या कृपेशिवाय जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देणारे परम अमृत तत्त्व उपलब्ध होत नाही. एक गोष्ट मात्र खरी की साधना कधी व्यर्थ जात नाही. योग्य वेळेची प्रतीक्षा मात्र करावी लागते.

**चौपाई- यह रूपक परमारथ माहीं ।**
**विषय भोग रत कर थिति नाहीं ।।६।।**

टीका- परमार्थपथावरील हे सागर मंथनाचे रूपक आहे. जे विषय भोगांत आसक्त आहेत किंवा चिंतनाचा मार्ग समजून घेऊन त्यासाठी काही प्रयत्न करतात पण वासनेला प्राधान्य देऊन परम कल्याणाला गौण समजतात अशा हीन मनोबल असणाऱ्या साधकांची बुध्दी सागरमंथनाच्या या अध्यात्मिक धारेत थकून जाते. अशा पुरुषांमध्ये पात्रतेची उणीव व क्षमतेचा अभाव आहे असे समजावे.

**चौपाई- विषय भोग तजि जो जन जागा ।**
**उर अभिषेक हरी संग लागा ।।७।।**

टीका- जो मनुष्य मनासहित इंद्रियांच्या विषय वासनेचा त्याग करून ''या निशा सर्वभूतानाम'' या प्रकारे तिमिराच्छन्न रात्रीमध्ये जागृत अवस्थेला प्राप्त करून घेतो, त्याचे हृदय त्या परमपिता परमेश्वराबरोबर निर्धारित होते. ध्येयाच्या अंकित झाल्यानंतर प्रयत्नशील साधकाचा आत्मा ब्रह्माभिषिक्त होऊन कृपारूपी मोती टिपत मनरूपी मानससरोवरात तल्लीन होऊन विहरतो.

**चौपाई- मन तन इन्द्रिय संयम होई ।**
**कूर्म अंग इव हृदया गोई ।।८।।**

टीका- मनुष्याच्या बाह्य परिकल्पनांची जिथपर्यंत दौड असते तिथपर्यंतचा विस्तार हा अधोमुखी विस्तार समजला पाहिजे. या मायावी धरेपासून दूर अनंतापर्यंत उडून परम लक्ष्याच्या प्राप्तीसाठी ज्याचा मनविहंग व्याकुळ आहे त्याला मनासहित इंद्रियांच्या बाह्य विचारांना, कल्पनांना संयमित करावे लागते. या प्रकारे जो इंद्रियांसहित मनाला मायावी स्पर्शापासून काबूत ठेवतो, त्याच्या अंतरंगातील दालनात कूर्मावताराची (कासव अवतार) अवस्था निर्माण होते. कासवाला प्रतिकूलतेची चाहूल लागताच डोक्यासह सर्व पाय आत ओढून घेऊन स्वत:ला लपवतो त्या प्रकारे साधकपण मनासहित सर्व इंद्रियांना हृदयदेशात कासवाप्रमाणे आवरून घेतो म्हणजेच त्यांचा संयम करतो. त्या क्षणी ईश्वराचा अवतार होतो.

**दोहा- ता क्षण प्रगटे परम प्रभु परम प्रकाश पुनीत ।**

**कूर्मा कृत इन्द्रिय मना, तव हरि राखी नीत ।।५।।**

टीका- तत्क्षणी दिव्य प्रकाशस्वरूप व पूर्ण पुनीत असा परम प्रभू प्रगट होतो. हे पीयूष प्लावन योग्याच्या हृदयरूपी देशात होते. जेव्हा साधक मनासहित इंद्रियांना हृदयाच्या अंतरंगात एकरूप करतो तेव्हा हरी त्याच्या मानसामध्ये अनुभूतीच्या रूपात जागृत होऊन त्या मंथनरूपी चिंतनाच्या नीतीचा विस्तार करीत त्याला समजावतो. परमपूज्य गुरुदेव भगवान म्हणायचे- ''मला परम प्रभू सांगत असतात, समजावत असतात.

**चौपाई- येहि विधि कूर्म अवतार बखाना ।**

**बिनु संयम के कबहुँ न जाना ।।९।।**

अर्थ- जो कासवाप्रमाणे मनासहित इंद्रियांना विषय वासनांपासून पूर्णपणे समेटून घेतो त्या साधकाला भगवंत सहाय्य करतो. आत्मसंयमाशिवाय ही गूढ रहस्यात्मक अवतारकथा अवगत होणे असंभव आहे.

**चौपाई- मन इंन्द्रिय कूर्माकृत जानी ।**

**प्रगटहि हरि अगणित गुणखानी ।।१०क।।**

**कूर्माकार भई जब इन्द्रि ।**

**विश्ववास प्रगटे हरि जिन्द्रि ।।१०ख।।**

शब्दार्थ- जिन्द्री- जीवनदाता

टीका- जेव्हा मनासहित इंद्रिये कासवाच्या स्थितीत येतात आणि बाह्य विषयांकडे धाव घेणाऱ्या मनाला वश करून त्याची धाव रोखून अंतर्मुख बनतात त्या क्षणी विश्वाच्या कणा कणामध्ये निवास करणारे, अपार गुणांनी विभूषित असणारे परम प्रभू प्रगट होतात.

टीप- परमात्मा संपूर्ण अंतरंगाला प्रकाशमय करून टाकतात.

**हुआ प्रकाश तमोमय मग में ।**

**मिला मुझे तत्क्षण तूँ जग में ।।**

**तेरा हुआ बोध पग पग में ।**

**मिटा सकल अज्ञान ।।**

**खोज मे हुआ वृथा हैरान ।**

**यही पर था तू हे भगवान ।।**

भगवान गुरुदेवांच्या वाणीत हीच स्थिती पाहा-

**जलत जलत ऐसी जली, जा को आर न पार ।**

**ईश्वर जीव ब्रह्म अरु माया, फूँक दियो संसार ।।**

**करुँ अब किसकी तल्लासी?**

**लावनी सुन बारहमासी ।।**

**चौपाई- सोइ कच्छप जन मन गहि राखा ।**

**मन अविचल मन्दराचल शाखा ।।११।।**

टीका- ते कासव, ज्याची इंद्रियाच्या ध्यानस्थ अवस्थेत उत्पत्ती आहे तेच परम प्रभू साधकाच्या मनाला पूर्णत: वेढून राहतात. मनाच्या या स्थितीविशेष निश्चलतेचे प्रतीकात्मक स्वरूप ''मंदराचल'' पर्वतामध्ये अभिहित केले आहे. पर्वत शब्दाचा पर्यायी शब्द भूधर देखील या अचलतेचे प्रतीक आहे.

**चौपाई- अचल करत मन साधन जाही ।**

**तिन पर सिन्धु सकल जरि जाही ।।१२।।**

टीका- ते परम दयाळू प्रभू प्रयत्नशील मनाला साधनेची माहिती पुरवतात व विशिष्ट युक्तिद्वारा अचल स्थिर बनवतात. अशा साधकांसमोर संसार-सागरातील समस्त बाह्य प्रवृत्ती उत्तेजित होतात. अचलतेकडे जाणाऱ्या साधकाबाबत माया इर्षाळू असते. व म्हणूनच ती मायाविनी चमत्कारिक आकृत्यांचे साधकाला प्रलोभन दाखवते व लक्ष्योन्मुख साधकाच्या मार्गात अवरोध उत्पन्न करते.

**चौपाई- स्वाँस सुरति संग विषय डुबावत ।**

**तब हरि कच्छ रूप विधि पावत ।।१३।।**

श्वास आणि विलासभोगांच्या संगतीने जेव्हा विषयवेग साधकाला संसार सागरात बुडवण्याचे प्रयत्न करतात तेव्हा व्याकुळतेच्या भोवऱ्यात अडकलेला साधक

कल्याणाच्या प्राप्तीसाठी आवाज देतो. अशा परिस्थितीमध्ये तत्क्षणी ते प्रभू इंद्रियांचा निरोधकाल म्हणजे कूर्माकार स्थितीमध्ये अंत:करणात प्रगट होऊन आपल्या लीला करतात. वास्तविक कूर्मअवताराचे प्रगटीकरण म्हणजे संयमाच्या कसोटीवर भर देणे होय.

**चौपाई- कर परसे मन गिरि सम गाढा ।**
**सिन्धु पैठ हरि परस प्रगाढा ॥१४॥**

अर्थ- सर्वप्रथम साधकाच्या हृदयात श्रीहरी जागृत होऊन त्याच्या मनाला स्पर्श करून त्याला पर्वताप्रमाणे स्थिर करतात. तर दुसरीकडे संसारसागरात त्याला सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या तेजाने त्याला योगक्षेमाचे आश्वासन देतात. या ठिकाणी गोस्वामी तुलसीदास यांनी प्रभूची कृपा किती स्वाभाविक आहे ते सांगितले आहे.

**करहुँ सदा तिनकर रखवारी । जिमि बालक राखइ महतारी ॥**

**चौपाई- सो मन अचल हेतु सुर सगा ।**
**स्वाँस वासुकी नाग सुरंगा ॥१५॥**

टीका- भगवंताच्या कृपेस पात्र असणाऱ्या साधकाचे मन विरह, वैराग्य, अनुराग व दैवी संपदेने संपृक्त होऊन मन्दराचल पर्वताप्रमाणे स्थिर बनते. श्वास म्हणजे वासुकी नाग होय. समुद्र मंथनाच्या पूर्वी हाच श्वास सांसारिक योनींचा विस्तार करतो व मायावी विकारांचे विष उगाळत जीवात्म्याला निरंतर डंख मारीत असतो. व म्हणून याला सर्प अशी संज्ञा दिली आहे. परंतु चिंतनाच्या सूक्ष्म भावभूमीवर पोहचताच या श्वास-प्रश्वासाची प्रक्रिया निर्दोष म्हणजेच सम बनते तेव्हा तो ईश्वराच्या स्वरूपाचे निरंतर वाहक बनल्यामुळे त्याला वासुकी या अलंकरणाने विभूषित केले जाते. श्वास-प्रश्वासाचे निरंतर चिंतन पुढील पंक्तींमध्ये पाहा-

**जागत मे सुमिरन करे, सोवत में लव लाय ।**
**सहजो एक रस है रहे, तार टूटि ना जाय ॥**

**चौपाई- देव निवास वासुकी स्वाँस ।**
**स्वर संग मथा सिन्धु हरि पासा ॥१६॥**

टीका- परमदेव परमात्म्याचा निवास श्वासामध्ये आहे, त्यामुळे स्वर हाच वासुकी आहे. याच स्वराच्या माध्यमातून संसारसागराचे मंथन होत असते; परंतु हे मंथन तेव्हाच शक्य आहे जेव्हा श्रीहरी अंतप्रेरकाच्या रुपाने साधकाच्या बरोबर राहतो. म्हणून तर तुलसीदासजीनीही म्हटले आहे की-

**''सो जानइ जेहिं देहु जनाई ।''**

**चौपाई- देवासुर मन की परमीती ।**
**मन मरणोत्तर छाँडत नीती ।। १७ ।।**

अर्थ- दैवी आणि आसुरी प्रवृत्ती या मनाच्या मर्यादा आहेत. मन मिटून जाताच या दोन्ही प्रवृत्ती आपले कार्य बंद करतात. जोपर्यंत मनात एखाद्या संकल्पाचा तरंगपण तरंगत राहतो तोपर्यंत त्या प्रवृत्ती जीवंत राहतात.

**चौपाई- मन संकल्प करत जग माहीं ।**
**रूप मिलत जन दुविधा जाहीं ।।१८।।**

अर्थ- मनाचे चांचल्य मोजण्याच्या पलीकडे आहे. या विश्वाचा विस्तार जेवढा जेथपर्यंत आहे तेथपर्यंत या मनाच्या संकल्पांचा विस्तार आहे. गोस्वामीपण हेच म्हणतात-

**गो गोचर चहँ लगि मन जाई । सो सब माया जानेह भाई ।।**

**सूरदासदेखील असेच मत व्यक्त करतात-**

**यह माया भ्रम जाल कहावै, सूर स्याम सिगरो ।**
**अबकी बेर नाथ मोहि तारो, नहि पन जात टरो ।।**

परंतु मनाच्या तरंगात स्थैर्य निर्माण होताच परम प्रभूचा अवतार (मनात) होतो व मग साधकाची द्विधा वृत्ती कायमसाठी नष्ट होते.

**दोहा- दैवी सम्पति राम की आसुरि सम्पति काम ।**
**लक्ष्य विरोधी दुहुन का, स्वर संग आठी याम ।।६।।**

भवार्थ- दैवी संपत्ती रामाकडे (म्हणजेच भक्तीकडे) प्रेरित करते तर आसुरी संपत्ती कामाकडे (विषयवासनेकडे) उत्प्रेरित करते. या दोन्ही परस्पर विरोधी संपत्ती

प्रकृतीच्याच आहेत. एक संसार सागरात बुडवणारी आहे व दुसरी संसार सागर पार करवणारी आहे. दोन्ही अहर्निश श्वासाबरोबर संघर्षरत असतात.

**चौपाई- मन्दराचल मन श्वास लपेटी**

**खँचत दुहुँ द्विशी दिशि भव जल पैठी ।।१९।।**

अर्थ- प्रवृत्तींच्या अविच्छलतेमध्ये हे मनच मंदराचल पर्वत आहे ज्याच्याभोवती चैतन्याचा संचार करणारा श्वास मथाटीच्या दोरीप्रमाणे लपेटलेला आहे. अमर्याद सागरातील पाण्याच्या मंथनामध्ये आसुरी संपत्ती आपल्याकडे ओढते व दैवी संपदापण श्वासाला स्वाभिमुख करण्याचा प्रयत्न करते. दोन्ही दलाच्या संघर्षाचे क्षेत्र साधकाचे अंत:करण आहे.

**चौपाई- दैवी सम्पद देव मिलाहीं ।**

**उर प्रेरक संग जिन बल नाहीं ।।२०।।**

भावार्थ- दैवी संपदा त्या परम देव परमात्म्याशी भेट घडवून आणते; परंतु याच दैवी संपदेबरोबर त्या प्रेरक महापुरुषाने राहणे अंत्यंत आवश्यक आहे. प्रेरकाच्या रूपात महापुरुष साधकाच्या अंतरंगात प्रविष्ट होऊन साधकाला गंतव्याकडे, परमतत्त्वाकडे चालवतो. प्रेरकशून्य दैवी संपदेचे आपले स्वत:चे काही बळ नाही.

**पुण्य पुञ्ज बिनु मिलहिं न सन्ता ।**

**सत संगति संसृति कर अन्ता ।।**

वरील दैवी संपत्ती ज्या देवाला- परमतत्त्वाला प्राप्त करून देते त्या देवाला येथे अमिय पदार्थ असे म्हटले आहे.

**चौपाई- अमिय पदारथ परम प्रकाश ।**

**भक्त देव गति आसुर नाशा ।।२१।।**

मृत्यूच्या पलीकडे असणारा अमिय- मौलिक पदार्थ म्हणजेच परमदेव होय की ज्याच्या दिव्यलोकातून संपूर्ण सृष्टी प्रकाशित होत असते. या अमृत तत्त्वाच्या श्रेष्ठत्वाने भक्त देवताच्या कोटीला पोहचतो व त्याच्या मानसपटलावरून संसाराच्या प्रपंचात ढकलणारी आसुरी संपदा सदासाठी- कायमची नष्ट होते.

कबीरांनी एका ठिकाणी असेच म्हटले आहे:-

**पाहन फोरि गंग एक निकसी, चहुँ दिशि पानी पानी ।**
**ओहि पानी दुइ पर्वत डूबे, दरिया लहर समानी ।।**

नोट- चौपाई २१ मध्ये इंगित 'देव' याचा अर्थ परमदेव परमात्मा आहे. आता आसुरी संपदेचा कार्य विस्तार पाहा.-

**चौपाई- आसुरि सम्पद भोग जगत के ।**
**उर अन्तर नित साल भगत के ।।२२।।**

अर्थ- आसुरी संपदा सांसारिक भोग विलासाच्या साधनांचा विस्तार करते. साधारण मनुष्याचे तर काय सांगायचे? पण भक्तांच्या हृदयात ती खिळ्याप्रमाणे बोचत असते.

या प्रचंड सेनेकडे तुलसीदासजींनी पुढील प्रकारे कटाक्ष केला आहे-

**व्यापी रह्यो संसारू महँ, माया कटक प्रचण्ड ।**
**सेनापती कामादि भट, दम्भ कपट पाखण्ड ।।**
**ज्ञानी तापस सूर कवि, कोविद गुन आगार ।**
**केहि के लोभ विडम्बना, कीन्ह न एहि संसार ।।**
**तात तीनि अति प्रबल खल, काम क्रोध अरु लोभ ।**
**मुनि विज्ञान धाम मन, करहिं निमिष महुँ क्षोभ ।**
**चौपाई- ऋध्दि सिध्दि लगि आसुरि बासा ।**
**सदा नचावत देख तमासा ।।२३।।**

अर्थ- ऋध्दि-सिध्दीपर्यंत आसुरी संपत्तीचा निवास आहे. ही आसुरी संपत्ती मोठमोठ्या साधकांनाही प्रलोभने दाखवून नाचवत असते आणि स्वत: काठावर उभी राहून हसत असते.

माया मायापतीच्या काबूत राहत असते. त्याच्या महत कृपेच्या छायेत राहणारा कोणी विरळाच या मायेच्या तावडीतून वाचतो व तोच तिला समजू शकतो. बाकी सर्व या मायेची मुलं आहेत.

**ज्ञान अखण्ड एक सीता बर । माया वस्य जीव सचराचर ।।**

**चौपाई- दोउ प्रवृत्ति महँ माया वासा ।**

**एक ईश बल एक उदासा ।।२४।।**

अर्थ- दोन्ही प्रवृत्तींमध्ये मायेचा निवास असतो. ईश्वराकडून प्रेरित होणारी दैवी संपदा विद्येच्या क्षेत्रातील आहे. तर अविद्येच्या क्षेत्रातील आसुरी संपत्ती विषयवासनेचा प्रसार करते.

गोस्वामी तुलसीदासांचा विचार याबाबतीत उल्लेखनीय आहे-

**एक दुष्ट अतिशय दुख रूपा ।**

**जा बस जीव परा भव कूपा ।।**

**एक रचड जग गुन बस जाके ।**

**प्रभु प्रेरित नहि निज बल ताके ।।**

**चौपाई- महा प्रबळ आसुर बल संगा**

**माया नाचत नाच अभंगा ।।२५।।**

अर्थ- माया आसुरी शक्तीने बलवान होऊन अत्यंत वेगाने साधकांचे ध्यान विचलित करते. नानाविध आकर्षणांनी असावध असणाऱ्या साधकांना ती मोहवते व त्यांना नाचवत राहते. तिचा हा मायावी प्रसार किंवा तिचे हे जाळे सहजरीत्या नियंत्रित करता येत नाही म्हणून तिला अभंग, अभेद्य, दुर्जय अशी संज्ञा दिली आहे.

**चौपाई- सो माया मिटती जिय संगा ।**

**ईश मिले जिय रूप अभंग ।।२६।।**

टीका- जेव्हा जीवात्म्याच्या अंतरंगातील जीवगत संस्कार पूर्णत: नष्ट होतात तेव्हा ही दुर्जय माया जीवात्म्याचा पिंड सोडते. आत्मा ईश्वराचे विशुध्द स्वरूप आहे. पण या जगात येताच त्याच्यात विषयात्मक संस्काराचा रंग इतका गढद होतो की जीवात्मा आणि परमात्म्यामधील अंतर वाढत जाते.

गोस्वामीजीनी लिहिले आहे-

**ईश्वर अंश जीव अविनाशी । चेतन अमल सहज सुखराशी ।।**
**सो माया बस परेउ गोसाई । बँधेउ कीर मरकट की नाई ।।**
**जड चेतनहि ग्रन्थि परि गई । जदपि मृषा छूटन कठिनई ।।**

परंतु अंतप्रेरकाच्या कृपेने मायेचा हा मळ जेव्हा संयमाच्या साबणाने धुऊन जातो तेव्हा हा जीवात्मा ईश्वरामध्ये स्वरूपाला विलीन करून त्याच्याबरोबर अखंड स्थिती प्राप्त करून घेतो.

**चौपाई- प्रथमहिं संयम सँग कर वासा ।**
**तिमि तिमि दातव रूप प्रकाश ।।२७।।**

टिका- उपर्युक्त उपलब्धीसाठी सर्वप्रथम सर्व इंद्रियांचा संयम अपरिहार्य आहे. संयमाबरोबरच साधकामध्ये अलौकिक प्रकाश पुंज पसरला जातो.

शब्दार्थ- दातव म्हणजे अदृश्य सत्तेद्वारा प्राप्त होणारा अलौकिक प्रकाश पुंज असा येथे अर्थ

**चौपाई- स्वाँस सुरत संग देव प्रकाशा ।**
**असुर अनी प्रथमहिं गहि स्वाँसा ।।२८।।**

संयमाचा अर्थ मन आणि इंद्रियांना श्वास आणि ध्यानापासून पूर्ण निरोधावस्था प्राप्त करणे असा आहे. श्वास आणि ध्यानाच्या संयोगापासून दैवी संपत्तीचा मानसामध्ये प्रकाश पडतो. येथे हेही लक्षात ठेवावे की आसुरी संपत्तीने या श्वासाच्या क्रियेला पूर्वीपासूनच आपल्या अधीन करून ठेवले आहे.

**दोहा- एक संग दोउ दल चले, खींच भाव अनुरूप ।**
**निज भावन में बिंध रहें, उर महँ कच्छ अनूप ।।७।।**

श्वास आणि प्रश्वासाच्या आरोह-अवरोहात दोन्ही दले साधकाच्या प्रवृत्तींना आपापल्याकडे खेचत असतात. आसुरी संपत्ती काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी अधोमुखी

प्राकृतिक जडतेकडे खेचते तर दैवी संपदा शम, दम, नियम, संयम व शाश्वत सत्तेकडे आकृष्ट करते. या दोन्हीना कार्यक्षेत्रात प्रवृत्त करणारा आधार तो एक तर श्रीहरी मात्र आहे ज्याच्या आश्रयामध्ये संसार सागराचे मंथन चालत असते.

**चौपाई- प्रथम सिन्धु महँ शंख अनूपा ।**
**करत निनाद विजय अनुरूपा ॥२९॥**

भावार्थ- चिंतनक्रमात धारावाही गती प्राप्त झाल्यानंतर मंथनाचा पहिला परिणाम म्हणजे शंखाचे प्रगट होणे; ज्याचा उद्घोष आहे की आता साधक देश, काल व परिस्थितीवर विजय मिळवून चिरंतन शांतीच्या शोधात यशस्वी होईल. याच्या प्राप्तीमुळे साधकात नवीन उत्साह, विश्वास आणि दृढतेचा आविर्भाव होतो.

**चौपाई- हय असवार विवेकी बाना ।**
**मन हय रूप सो चढत सयाना ॥३०॥**

टीका- विजयाची घोषणा होताच विवेक हाच साधकाचा बाणा बनतो. त्यामुळे नेहमी धावणाऱ्या त्याच्या अश्वरूपी मनावर आत्मज्ञानरूपी स्थिरता-स्थैर्य सवार होते.

कबीरांनीदेखील अश्वासीन होण्याच्या या क्रियेला एक विशेष प्राप्ती- उपलब्धी मानले आहे

**एक बार हरि घोडा भये, ब्रह्मा भये लगाम ।**
**चाँद सुरज रबिका भये, चढि गये चतुर सुजान ॥**

नोट- शास्त्राच्या गतीला अश्वशक्तीने आणि स्थायी सामर्थ्याला हस्तिबलाने मापण्याची प्रथा आहे. सूर्याच्या शीघ्र वेगावर घोड्याची कल्पना केली आहे. या प्रकारे 'अश्व' म्हणजे चंचलतेचे तसेच गतिशीलतेचे प्रतीक आहे. संसाररूपी सागरमंथनाची दुसरी उपलब्धी म्हणजे मनरूपी अश्वावर ज्ञानाचे आरूढ होणे ही होय.

**चौपाई- अब जन मन सन चढी खुमारी ।**
**चढि डोलत सुख सागर भारी ॥३१॥**

भावार्थ- जेव्हा साधक आपल्या मनावर नियंत्रण प्राप्त करतो तेव्हा चिंतनाच्या खुमारीने व भजनाच्या मस्तीने त्याचे अंत:करण भरून जाते. या अलौकिक नशेवर

आरूढ झालेला साधक सुखाच्या हिंदोळ्यावर झुलत राहतो. अर्थात अद्याप त्याच्या संसारसागराचा विस्तार समाप्त झालेला नाही.

कबीरांनी ब्रह्मानंदाच्या प्रेमरसाच्या खुमारीचे चित्रण पुढील प्रकारे केले आहे-

**हरि रस पीया जाणिये, कबहुँ न जाइ खुमारि ।**
**मै मंता घूमत रहै, नाहीं तन की सारि ।।**
**कबिरा प्याला प्रेम का, अन्तर लिया लगाय ।**
**रोम रोम मे रति रहा, और अमल क्या खाय ।।**

हरी म्हणजे रसपानाचा परिचय आहे. त्याची नशा स्थायी राहू दे. असा मनुष्य मदमस्त झालेल्या हत्तीप्रमाणे खाण्यापिण्याची पर्वा केल्याशिवाय शरीराबाबत उदासीन होऊन फिरत असतो.

**चौपाई- धनुष बाण कर साधन ध्याना ।**
**लखा न काहू असुर उताना ।।३२।।**

भावार्थ- हरिभक्तीच्या या कैफामुळे साधकाच्या ध्यानाची कसोटी होते आणि त्याच्या चित्ताची धारावाही लय म्हणजेच सतत चिंतनाची स्थिती- क्षमता त्याला प्राप्त होते. अंतर्मनाच्या स्थितीचे हे प्रतिकात्मक स्वरूप आहे जे बाह्य डोळ्यांनी पाहता येत नाही. ध्यानाच्या स्थिरतेचा प्रभाव इतका प्रबल आहे की त्याच्या विवेकरूपी तीक्ष्ण बाणांच्या प्रहाराने बेजार होऊन आसुरी प्रवृत्ती निष्प्राण होऊन जातात.

**चौपाई- चिद् विलास संसृति सर पूरा ।**
**येहि भवनिधि कहँ मथहि जे सूरा ।।३३।।**

चिद्विलास जगत हेच जन्ममरणाच्या लहरींनी भरलेला परिपूर्ण सागर आहे. यौगिक प्रक्रियेने त्याचे मंथन करून जे मोजके साधक अंतरंगात स्थित असणाऱ्या स्वात्म स्वरूपाचा शोध घेतात हेच खरे शूरवीर आहेत.

टीप- लौकिक चक्षूंनी दृष्टिगोचर न होणाऱ्या असंख्य असहनीय वेदनांच्या लहरी संसार सागरात तरंगत आहेत. फेसरूपी मायिक आकर्षणाच्या विषाने जीव सुकलेल्या गवताच्या काडीप्रमाणे तडफडत आहे. परंतु सशक्त आत्मा आपल्या अंशाच्या बाबतीत

निरंतर प्रयत्नशील राहतात. जेथून साधकाची सूक्ष्म पकड प्रारंभ होते तेव्हापासून भवसिंधू सुकायला लागतो व म्हणूनच महर्षी पातंजली आणि भगवान श्रीकृष्णाने चित्तनिरोधावर विशेष भर दिला आहे.

त्या अवस्थेचे चित्रण कबीराच्या एका साखीमध्ये पाहा-

**मैं मन्ता अविगत रता, अकलप आसातीत ।**
**राम अमिल माता रहै, जीवन मुकति अतीत ।।**

भक्ताला आपल्या जीवनकाळातच मुक्ती प्राप्त करता येते. बौध्द दर्शनामध्ये अशीच मान्यता व्यक्त केली आहे.

**चौपाई- चिद् विलास जिन सागर साधा**
**ते हरि रूप भये निरबाधा ।।३४।।**

भावार्थ- ज्यांनी चिद्‌विलास जगताला वश करून अनेक कामनांनी लहरत असणाऱ्या संसारसागराचे मंथन केले, तेच व्यष्टीच्या सीमेच्या पलीकडे जाऊन हरिस्वरूप होतात. अणूच सर्व व्यापक (प्रभू) बनतो. अशा अवस्थेतील लोक नेहमीसाठी मायिक बंधनांपासून मुक्त होतात. जर एक रेषमात्रजरी मन बहिर्मुख झाले तर माया त्याला लगेच एक झटका देते.

**चौपाई- नारद मन महँ माया त्यागी ।**
**भये अवतार तो लाग अभागी ।।३५।।**

देवर्षी नारद मायेचा त्याग करून अवतारकोटीमध्ये प्रवेश करणार इतक्यात एका बाजूने अभागिनी मायेच्या लहरी प्रवाहित झाल्या. सांगायचे तात्पर्य हे की इष्टापासून अल्पसे जरी अंतर असले तरी धोका आहे कारण संधी मिळताच माया आक्रमण करते.

**चौपाई- पातञ्जली स्वर सिन्धु सँभाला ।**
**योग दरश समरथ सम शाला ।।३६।।**

भावार्थ- महर्षी पातञ्जलीनी स्वरामध्ये स्थिरता प्राप्त केली आणि संसारसागराचा शोध करून योगद्वारा परमात्म स्वरूपाला प्रकट करण्यात समर्थ  झाले. ईश्वराचे प्रत्यक्ष

दर्शन करून ते भविष्यात येणाऱ्या पिढींसाठी एक उदाहरण बनले किंवा समत्व ज्ञानाच्या पाठशाळेचे गुरू बनले.

**चौपाई- रामचरित मानस कर दाता ।**
**नर हरि रूप राम सुख दाता ।।३७।।**

भावार्थ- भगवान श्रीरामाचे चरित्र जर मनात भरलेले असेल तर तेही एक प्रकारचे सागर मन्थन आहे. मनुष्याचा चरितार्थ चालवणाऱ्या भगवान श्रीरामाचे हेच सांगणे आहे की मानसाच्या अंतरंगात चिंतन करून नरातून नारायण प्राप्त केला जातो. म्हणजे मनुष्याला स्वयंम रामस्वरूप प्राप्त करता येते. व ज्याला कोणाला मिळते त्याला आभ्यान्तरिक चिंतनाच्या प्रक्रियेतूनच प्राप्त होते.

**चौपाई- जानत हरी हरी होइ जाइ ।**
**मन जीते बिनु लखा न भाई ।।३८।।**

भावार्थ- चिन्तनशील साधक आध्यात्मिक प्राप्तीची परीसीमा गाठून अंत:करणात जेव्हा त्याला अलौकिक विभूतीचा साक्षात्कार होतो तत्क्षणी तो त्या अलौकिक तत्त्वाचेच रूप बनून जातो. परंतु मनाच्या निरोधाशिवाय श्रीहरीच्या विश्वव्यापी सत्तेमध्ये प्रवेश असंभव आहे.

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात-

**असयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मति: ।**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायत: ।।६/३६।।**

जे मनाला वश करू शकत नाहीत त्यांच्यासाठी योग दुष्प्राय आहे. तो निरंतर अभ्यास व उत्कट वैराग्यानेच साधू शकतो.

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।।६/३५।।**
**दोहा- सब सन्तन की जीत में, एक अनोखी बात ।**
**मन सागर हरि मे मिले, एक अमिय रस मात ।।८।।**

भावार्थ- समस्त संत महात्म्यांना जय प्राप्त झाल्यानंतर म्हणजेच त्यांना साक्षात्कार झाल्यानंतर त्या उपलब्धी काळात प्रकृतीचा अंत होतो व परिणामस्वरूप मनात संचारित संसार सागरात विलीन होताच अमृतरसाचा आविर्भाव होतो; तो चिंतनशील भाविकांचे मातेप्रमाणे पालनपोषण करतो. एवढेच नव्हे तर तो पीयूषप्रेमी स्वयं अमृतमय होऊन जातो.

कबीरपण म्हणतात की आत्मा परमात्म्याला शोधत शोधत स्वत:लाच हरवून बसला. मिठाचा पुतळा सागराची खोली मापता मापता स्वत:च सागरात विलीन झाला:-

**हेरत हेरत हे सखी, रहा कबीर हेराइ ।**
**बूँद समानी समुद्र में, सो कत हेरी जाय ।।**
**लाली मेरे लाल की, जित देखू तित लाल ।**
**लाली देखन मै चली, मै भी हो गई लाल ।।**
**चौपाई- कृष्ण निशानन्दन लखि बाढा ।**
**जहाँ सिन्धु तहँ हरि रस गाढा ।।३९।।**

भावार्थ- योगेश्वर श्रीकृष्णांनी जेव्हा आत्मानंदात निमग्न होऊन आपल्या स्वरूपाचे अवलोकन केले तेव्हा स्वयं समष्टीमध्ये एकरूप होऊन ते सर्वव्यापक होऊन गेले. परिणामस्वरूप जेथे अपार भवसिंधू होता तेथे प्रगाढ ब्रह्मपीयूषाचे स्थान बनले.

टीप- बरोबर हीच स्थिती पूज्य परमहंसजी महाराजांचीपण आहे. या पुस्तकाच्या लेखकाचा प्रारंभी यावर विश्वास नव्हता; पण एक दिवस स्वप्नात एका विप्राचे दर्शन झाले. आम्ही त्या विप्राला विचारले की आमचे गुरुमहाराज कसे आहेत? तेव्हा त्या विप्राने सांगितले की, महापुरुषांमध्ये जी लक्षणे असतात व असायला पाहिजेत ती सर्व आपल्या गुरू महाराजांच्यामध्ये आहेत व तेच आपले गुरू महाराज आहेत. त्या दिवसापासून महाराजांवर माझा पूर्ण विश्वास बसला व त्या दिवसापासून पथ संचालनरूपी प्रमाणपण मिळू लागले. मनामध्ये उमेला पण (पार्वतीला) स्वप्नात दोन ब्राह्मणांनी आशीर्वाद दिल्याचा प्रसंग आठवला व माझ्या साधनेला एक वेग प्राप्त झाला- साधनेत नवा उत्साह संचारला. आणखी दोन असेच संकेत देणारे अनुभव आले व त्यामुळे माझा भ्रमनिराश दूर झाला.

परंतु असे विधान आहे की नेहमी अधिकारी व्यक्तीसमोरच महापुरुषाच ते स्वरूप आलोकित होत असते. उदाहरणार्थ अर्जुन इत्यादींनी त्यांना 'शिष्यस्तेऽहं' च्या रूपात पाहिले. शिशुपाल इत्यादींनी तर त्यांना शिव्या दिल्या. याच प्रकारे पूज्य गुरुदेवाला ओळखण्याची संख्या फार नव्हती. ज्यांनी त्यांना ओळखले त्यांनी आंतरिक अनुभवांनीच ओळखले होते. पुढील चौपाई पाहण्यासारखी आहे.

**चौपाई- सोइ स्वरूप गुरुवर छबि राखी ।**
**आज अनेक सन्त सुर साखी ।।४०।।**

भावार्थ- जे स्वरूप योगेश्वर कृष्णाचे होते तेच तेज परमपूज्य श्रीगुरुदेव भगवानांच्या छबीमध्ये होते. तेदेखील दिव्य अपार्थिव लक्षणांनी युक्त पुण्यवंत अशी विभूती होते. आजपण भाविकाना आपल्या अलौकिक छबीचे ते दर्शन देतात. प्रत्यक्षदर्शी संत आजपण या सत्याचे सुस्पष्ट प्रमाण आहेत.

टीप- गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की ''अर्जुना, मला कर्म बध्द करू शकत नाही कारण कर्माच्या परिणामाबाबत मी उदासीन असतो. जी स्थिती मला प्राप्त करावयाची होती ती मी प्राप्त केली आहे व मला या स्वरूपात जे जाणतात त्यांनाही कर्म बध्द करू शकत नाही.'' हे समजून घेऊनच मुमुक्षू पुरुषांनी कर्म करण्यास प्रारंभ केला की त्यास्वरूपाला जाणून मीपण तसाच बनेन. महापुरुषांचीही महान उपलब्धी पाहून भाविकजन प्रार्थना करतात- ''त्या अवस्थेला जाणून मीपण त्या स्वरूपात विलीन व्हावे. मला तेच ''स्वरूप प्राप्त व्हावे.'' प्रार्थना करण्याचे मूळ कारण आहे.

**चौपाई- हम विलपत तेहिं बेरियाँ काली ।**
**संस्कार गति काल कुचाली ।।४१।।**

भावार्थ- उपलब्धीसाठी तळमळणाऱ्या भावभूमीमध्ये रिक्ततेचा अनुभव झाल्याने आज आम्हीपण त्या उपलब्धीसाठी विकल आहोत, परंतु उद्या तोच क्षण येईल जेव्हा आम्ही पण आनंदविभोर होऊ. साक्षात्कारास विलंब लागण्याचे एकमात्र कारण म्हणजे कुसंस्कारांचे कुचक्र समजले पाहिजे. (विरह हा मिलनाच्या अनुभूतीचे सशक्त कारण आहे. म्हणून साधकपण मिलनाच्या आशेने निरंतर चिंतनामध्ये मग्न राहून सुसकारे सोडत राहतो).

कबीराची विरह-विदग्धता पाहा-

**जीभणियाँ छाले पडे, नाम पुकारि पुकारि ।**
**ऑंखिणियाँ जाले पडे, पथ निहारि निहारि ।।**
**नैना नीझर लाइया, रहट बहै निशि जाम ।**
**पपिहा ज्यौं पिव पिव करौ, कबहि मिलहुगे राम ।।**

**विरहाची साक्षात प्रतिमूर्ती असणाऱ्या मीरेची विकलता किती मार्मिक आहे पाहा:-**

**तुम देखा बिनु कल न पडत है, तलफि तलफि जिय जासी ।**

**चौपाई- आज मिले जग नाथ सराहा ।**
**मन टूटे हरि कृपण कराहा ।।४२।।**

भावार्थ- विरहांच्या अंतरंगात डुबकी खाता खाता जेव्हा साधकाला आत्मसाक्षात्कार होतो तेव्हा त्याला समग्र सृष्टीमध्ये प्रभूकृपेचा प्रसार झालेला दृष्टीगोचर होतो. परंतु या उलट जर एखाद्या दीनाचे हृदय निराशेने दुखवले गेले तर तो त्या परमउदार प्रभूला कृपण स्वभावाचा समजतो.

गोस्वामीपण म्हणतात-

**यद्यपि नाथ उचित न होत अस, प्रभु सन करउँ ढिठाई ।**
**तुलसीदास सीदत निशि दिन, देखत तुम्हारी निठुराई ।।**

**चौपाई- बालक की गति एक अनोखी ।**
**हरि तजि कतहुँ न मना मनोखी ।।४३।।**

भावार्थ- लहान बालकप्रमाणे साधकाचे समर्पण एकनिष्ठ असते. तो अन्य कोणत्याही देवी देवतांपासून कोणत्याही प्रकारची कामना करीत नाही.

पुढील पंक्तीत भक्तवर सुरदासजींची एकमेव असणाऱ्या इष्टदेवावरील असीम श्रध्दा पाहा.

**मेरो मन अनत कहाँ सुख पावै ।**
**जैसि उडि जहाज को पंछी, फिरि जहाज पर आवै ॥**
**कमल नयन को छाँडि पियासो, दुरमति कूप खनोवे ॥**
**जिन मधुकर अम्बुज रस चाख्यो, क्यो करील फल खावै ॥**
**सूरदास प्रभु कामधेनु तजि, छेरी कौन दुहावे ॥**

(मानसामध्ये भगवती उमा आणि सप्तर्षींचा संवाद या प्रसंगावर चांगला प्रकाश टाकतो अपर्णेची (पार्वतीची) निष्ठा पाहा-

**महादेव अवगुन भवन, विष्णु सकल गुण धाम ।**
**जेहिं कर मन रम जाहि सन, तेहि तेही सो काम ॥**
**स्वयं गोस्वामीजींची इष्टाच्या ठायी असणारी निष्ठा पाहा-**
**जौ तुम तजहु न भजौं आन प्रभु, यह प्रमान पन मोरे ।**
**सरग नरक सुरपुर नरपुर अहँ, तहँ रघुवीर निहोरे ॥**

मीरेची प्रतिज्ञा ऐका-

**''मेरे तो गिरधर गोपाल, दुसरो न कोई ॥''**

भगवान श्रीकृष्णाची अनन्य उपासिका असणाऱ्या गोपी उध्दवाची निंदा करताना म्हणत आहेत-

**ऊधौ ! मन नाही दस बीस ।**
**रह्यो एक सो गयो स्याम संग, को आराधै ईश?**

लेखकपण याच संकल्पासह भावनिधी गुरुदेव भगवानांच्या गुरुतेवर विश्वास ठेवून आहेत.

**चौपाई- जन पूरण हरि रूप विलोकी ।**
**तो कत रोवत व्यर्थ विसोकी ॥४४॥**

लेखकाकडे पुष्कळ भाविक लोक येतात व सांगतात की आपण तर पूर्ण झालेले आहात, आपण ब्रह्माप्रमाणे प्रशांत व आनंदघन आहात असे आम्ही अनुभवले आहे.

भाविकांचे हे कथन ऐकून लेखकाची व्याकुळता खूप वाढते जर 'अडगडा'ने हरीचे रूप पाहिले असेल तर मग त्यासाठी हे रडणे, ही मानसिक अशांती का आहे?

गोस्वामीजी श्री रामचरितमानसामध्ये उपलब्धीच्या नंतरची स्थिती वर्णन करताना म्हणत आहेत-

**राम भगति चिन्तामनि सुन्दर । बसइ गरुड जाके डर अन्तर ।।**
**परम प्रकाश रूप दिन राती । नहिं कछु चाहिय दिया घृत बाती**
**मोह दरिद्र निकट नहिं आवा । लोभ बात नहि ताहि बुझावा**
**व्यापहि मानस रोग न भारी । जिन्ह के बस सब जीव दुखारी**

अशी स्थिती अजून मला कुठे प्राप्त झाली आहे? म्हणून लेखक उपर्युक्त उपाधींनी विकल होत आहे.

नोट-जेव्हा एखादा योगाभ्यासी साधक ब्रह्माच्या अनुभूतीच्या अगदी समीप पोहचतो तेव्हा अनेक पुण्यात्मांना, श्रध्दासंपन्न भाविकांना त्यांच्या स्वरूपात भगवंताची अनुभूती होते. अशा साधकाचा चिन्मय ब्रह्मामध्ये प्रवेश कालांतराने होईल; परंतु अशा अवस्थेतील साधकांमध्ये भक्त व साधकांच्या कल्याण सृजनाची पूर्ण क्षमता असते.

**चौपाई- अब तुम नाथ क्षमा कर राजा ।**
**पूर गिले हरि परम अकाजा ।।४५।।**

भावार्थ- हे प्रभू माझ्यासारख्या दीन भाविकांच्या जन्मांतराच्या रहस्याना (कारणांना) क्षमा करा. शाश्वत आणि परिपूर्ण स्थिती प्राप्त होऊन व साधकाला भेटल्यानंतरही जर आपण माझ्यावर कृपादृष्टी करणार नसाल तर या विलंबामुळे साधकाची व्याकुळता आणखी वाढेल.

**चौपाई- यहि विधि सोच रहा मन लाजा ।**
**कपट किए तन परम अकाजा ।।४६।।**

भावार्थ- या प्रकारे मन व्यथित होते. मुखाने व्यक्त करायला लाज वाटते आणि अद्याप प्राप्ती न होण्याचे दौर्बल्य लोकांपासून लपवल्याने मनात हीनतेची भावना निर्माण

होऊन ते संकुचित होऊ लागते. कारण दुःखाची लेशमात्र उपस्थितीपण परम प्रभूला अभिमत नाही. मानसामधील भगवंताच्या श्रीमुखाची वाणी पाहा-

**निर्मल मन जन सो मोहिं पावा ।**
**मोहिं कपट छल छिद्र न भावा ।।**

हीनतेची भावना मनात निर्माण होणे मोठे हानिकारक आहे. यामध्ये परमतत्त्व प्राप्तीचे लक्ष्य दुखविले जाण्याचे भय असते. म्हणून हे भगवन, जे काही आहे ते सर्व तुमचेच आहे, तुमच्यापासून काहीही अलग नाही. या दीनाचा अंतर्कोष परम प्रभूलाच समर्पित आहे.

**मेरा मुझमें कछु नहीं, जो कछु है सब तोर ।।**
**तेरा तुझको सौंपते, क्या लागत है मोर ।।**

अंतर्यामी श्रीगुरुदेव भगवानांपासून मी दूर नाही. मी भला-बुरा कसाही असलो तरी त्यांचाच आहे हा विश्वास आहे. गोस्वामी तुलसीदासांनीपण आपले इष्टदेव भगवान श्रीरामासाठी हेच म्हटले आहे.

**कहँ लगि कहौं कुचाल कृपानिधी, जानत हौ गति जन की ।**
**तुलसीदास परिहरहु दुसह दुःख, करहु लाज निज पन की ।।**
**चौपाई- जन सोचत हरि रूप विशोका ।**
**हरि मिले जग को केहिं रोका ।।४७।।**

विरह व्यथित साधकाच्या अंतरंगात प्रकृतीची लेशमात्र लहर जोपर्यंत असेल तोपर्यंत तो विचार करीत राहतो, चिंता करीत बसतो. वास्तविक मनुष्यच चिंता करणारा असतो. बाकी श्रीहरीचे स्वरूप तर चिंताविरहित, शोकरहित आहे. विचार करण्यासाठी ना पुढे काही चिंता असते ना मागे शोक करण्यासाठी काही चिंता असते की ज्यासाठी शोक करावा. पुढे त्याच्याशिवाय कोणती सत्ताच नाही तर मग कोण कोणाला रोकणार? परंतु ती अदृश्य सत्ता जी परमात्मा त्यानेच रोकले आहे, व हीच या विकल झालेल्या दीनाच्या विकलतेचे कारण आहे. वास्तविक अनुभव काळ आणि कर्माचीच परिभाषा देत असतो.

**चौपाई- तो कत अनुभव काल धिरा सा ।**
**जन विचलित कत देख तमाशा ।।४८।।**

भावार्थ- जर ते तत्त्व मिळाले आहे व तो दीन जर शाश्वत स्वरूपात एकरूप झाला आहे तर अनुभव काळ व कर्माने घेरलेला का असतो? तो दिन भक्त विरहाच्या सागरात विकलतेच्या लाटांनी विचलित होत आहे तरी तुम्ही मात्र त्याच्या उपलब्धीचा- प्राप्तीचा तमाशा पाहात आनंदित होत आहात? आपल्या या लीलेने तो दीन भक्त- रंगमंचावरील ते पात्र विव्हल झाले आहे. हे लीलाधर, सुखान्त नाटकाचा हा पडदा कधी पडेल?

**दोहा- पत राखो पत रावरी**
**जो पत राखी होत ।**
**अब की ऐसन रूप दे,**
**पुनि दाता ना लेत ।।९।।**

भावार्थ- हे प्रभू, माझी आता एकच प्रार्थना आहे की या दीन भक्ताची तू लाज राख. यामुळे आपल्या न्याय वर्तनाचा विस्तार होईल. हे अखिलेश्वरा आपणच मर्यादेचे एकमात्र कारण आहात. तेव्हा आता मात्र मला ते रूप तुम्ही प्रदान करा की ज्यानंतर दात्याच्या रूपात मी आपल्यापासून अलग राहणार नाही आणि घेणाऱ्याच्या रूपात रेषमात्रही उरणार नाही.

श्री गुरुदेव भगवानांच्या वाणीमध्ये या स्थितीचे प्रस्फुटन पुढील प्रमाणे झाले आहे-

**जलत जलत ऐसी जली, जाको आर न पार ।**
**ईश्वर जीव ब्रह्म अरु माया फूँक दियो संसार ।।**
**करूँ अब किसकी तल्लासी ।**
**लावनी सुन बारहमासी ।।**

अशी निर्विकल्प अभिन्नता प्राप्त झालेले महापुरुष सहज समाधीमध्ये लीन असतात.

**संतो सहज समाधी भली ।**
**आँख न मूदूँ, कान न रूधूँ, काया कष्ट न धारूँ ।**

**उधरे नैना साहब देखूँ, सुंदर बदन निहारूँ ।।**

**दोहा- ऐसी दाता दात दे**

**मिट जाये तव मोर ।**

**ईश अंश ना ब्रह्म की,**

**शक्ती साधन छोर ।।१०।।**

भावार्थ- हे सर्वशक्तिमान ईश्वरा, मला आता अशी गती द्या की ज्यामुळे तुमच्यात व माझ्यात काही अंतर राहणार नाही, ते अंतर नष्ट होईल. ना ईश्वरी अंश असलेला जीवात्मा राहील ना अंशत: ब्रह्म वेगळे राहील. न योग राहील, ना बंधन राहील ना बंधमुक्त करणारा वेगळा राहील.

**चौपाई- अब लगि कहेउँ अपन कदराई ।**

**विकल व्यथित विलपत सुरराई ।।४९ क।।**

**पुनि सागर मन्थन कर लीला ।**

**प्रगटउँ सत्य शान्ति सुख शीला ।।४९ ख।।**

आतापर्यंत आपल्या विकलतेचे व प्रभूच्या परमोदारतेचे चित्रण केले. आता पुन्हा सागरमंथनाच्या लीलेला क्रमशील केले जात आहे. या सागर मंथनाचा परिणाम शाश्वत शांती आणि सुख आहे.

**चौपाई- जिमि जिमि सागर मन्थन कीना ।**

**रतन प्रगट पर शूल नवीना ।। ४९ ग।।**

जो जो सागराचे चिंतनरूपी मंथन केले तो तो त्यातून रत्न तर प्रगट होत गेले परंतु मुख्य रत्न जे ''अमृत तत्त्व'' अद्याप प्रगट न झाल्यामुळे कष्टदायी शूल नवनव्या स्वरूपात समोर येऊ लागले.

मन्थन अविरत सुरू राहिले त्यामुळे शूल निवृत्तीपण सुलभतेने होऊ लागली कारण त्यातून शूलनिवृत्तीचे साधनपण सुलभ होऊ लागले. त्या मंथनातून धनवन्तरी नावाचे वेदनांचे निदान करणारे रत्न प्रगट झाले.

**प्रगट धनन्तरि हर बहु शूला ।**
**करे करावत रोग अमूला ।। ५०।।**

भावार्थ- आध्यात्मिक संपत्ती हीच स्थिर संपत्ती आहे. धनवन्तरी चा अर्थ आहे धन आणि वन्तरी म्हणजे अलौकिक आध्यात्मिक संपत्तीच्या अंतरंगात प्रवेश प्राप्त होणे. या रत्नप्राप्तीमुळे उत्तरोत्तर रोगांचे शमन होत गेले. आता विचार करण्याची गोष्ट म्हणजे रोगाचे स्वरूप कसे आहे? पाहा-

**चौपाई- जनम मरण भव रोग अपारा ।**
**तेहिं जड काटत देत सहारा ।। ५१।।**

भावार्थ- जन्ममृत्यूची अपार शृंखला म्हणजेच भव रोग होय. तो रोग समूळ बरा करून धनवन्तरी हे रत्न साधकाला दिलासा देते.

**चौपाई- हरि प्रेरित संग निज बल नाही ।**
**प्रेरि चलावहिं संग न जाहीं ।। ५२ ।।**

भावार्थ- ''धनवन्तरि'' आत्मिक संपत्तीमध्ये प्रवेश देण्यामध्ये सहाय्यभूत होत असतो. याच्या सहयोगामुळे साधकाच्या भवरोगाचा तसेच विषयात्मक विस्ताराचा निरोध होतो; परंतु यामुळे पूर्णतया निवृत्ती मिळत नाही. त्या प्रेरकाच्या बळानेच हे रत्न साधकांना भव व्याधींपासून वाचवते. या भवव्याधीतून पार होत असतानाच हा धन्वन्तरीपण वेगळा होऊन जातो. मग ना राहात रोग ना राहात निदान !

**चौपाई- माया महँ गति रहनि अकाशा ।।**
**अमित रोग माया कर नाशा ।। ५३**

या धन्वन्तरीची गती मायेमध्ये आहे म्हणजे याच्या प्रवेशानंतरपण योग्याची गती मायेच्या अंतर्गतच असते. जरी मायेचा गुंता सुटलेला असला तरी त्याची पकड आकाशवत आहे. अगणित अशा रोगमयी मायेचा विनाश करणे हे त्याचे कार्य आहे. त्याची माहिती प्रेरकाला आधार देणारी आहे.

**चौपाई- श्रुति शाखा अवतार अनूपा ।**
**माया बल नहि मति अनुरुपा ।।**

श्रुतीमध्ये वर्णन केलेला शाखावतार म्हणजे चित्त सागरात मंथनातून प्रगट झालेला अनुपम प्रभूचा लीलावतार आहे. यामध्ये ना मायेचे बल असते ना बुध्दीचे.

मायापतीच्या प्रेरणेचे स्फुरण होताच माया अशक्त होते. ''मायापति कहँ जे भजहि चेरी होई ।''

**राम भगति निरुपम निरुपाधी ।**
**बसइ जासु उर सदा अबाधी ।।**
**तेहि विलेकि माया सकुचाई ।**
**करि न सकइ कछु निज प्रभुताई ।।**
**चौपाई- मानस रोग पीर जग रोगी**
**हरि करुणा पर जागत जोगी ।।**

हा मानस-मनाचा रोग आहे. या रोगामुळे अवघा संसार पीडित आहे. प्रभूच्या अनुकम्पेनेच योगी जागृत होत असतो म्हणजे प्रभूच्या द्रवित करुणेने योगी जागा होतो. (जागणे याचा अर्थ जगाच्या प्रपंचाशी सावध राहून वागणे.)

गोस्वामी तुलसीदासांच्या मानसामध्ये वरील विचार पुढीलप्रमाणे प्रगट झाला आहे.

**मानस रोग कछुक मै गाये । है सबके लखि बिरलन्ह पाये ।**
**मोह निसा सबु सोवनिहार । देखिय सपन अनेक प्रकार ।।**
**एहि जग जामिनि जागहि जोगी । परमारथी प्रपंच वियोगी ।।**
**जानिय तबहि जीव जग जागा । जब सब विषय विलास विरागा**
**चौपाई- पूरे सतगुरु पुर बसि राखे ।**
**ब्रह्म मिले ब्रह्महि गुण भाखे ।।५६।।**

जे पूर्ण महापुरुष आहेत ज्यांना गुरुत्वाची स्थिती प्राप्त झाली आहे, त्यांना हृदयात स्थापन करा, त्यांच्यावर पूर्ण निष्ठा ठेवा त्यांना पूर्ण पकडून ठेवा, या आंतरिक पकडीचा परिणाम म्हणजे ब्रह्माची उपलब्धी होय. गुरुवर पूर्ण निष्ठा असणारा शिष्य आपल्या

अंतरंगात हळूहळू गुरूच्या गुरुतेचा विकास करत म्हणजेच गुरुवरील आपली निष्ठा वाढवीत वाढवीत ब्रह्मज्ञानी बनतो. अशा गुरुत्वाची महती जाणून घेणारा साधक ब्रह्माचे गुणधर्म आत्मसात करतो व नंतर त्या ब्रह्मस्वरुपातच स्थिर होतो.

**चौपाई- सद्‌गुरु खोज खबर नहि पाही ।**
**ते भटकहि आनहि भटकाही ।। ५७ ।।**

ज्या साधकांनी गुरुचा शोध केला नाही ते चिंतन पथावर व्यर्थच श्रम करीत आहेत. असे लोक स्वत: तर भटकतातच पण साधूचा (गुरूचा) वेष घेऊन दुसऱ्यांनाही चिंतन पथावरून भ्रमित करत, भ्रष्ट करत भटकत आहेत.

टीप- कबीरदासही म्हणतात की अंधळ्याला अंधळा काय मार्ग दाखवणार?

**जाको गुरु है आन्हरा, चेला खरा निरन्ध ।**
**अंधहि अन्धन्ह ठेलिय दोऊ कूप परन्त ।।**
**बिन देखे वा देश की बात कहै सो कूर ।**
**आपै खारी खात है । बेचत फिरै कपूर ।।**

स्पष्ट आहे की गुरूच शाश्वत सत्तेची प्रत्यक्ष अनुभूती देणारा एकमात्र आधार आहे. आपल्या साधक अवस्थेमध्ये गुरूचे महत्त्व सांगताना कबीरदास म्हणतात :-

**मै भी भागा जाइया, लोक वेद के साथ ।**
**आगे से सतगुरु मिल्या, दीपक दीन्हा हाथ ।।**
**दीपक दीन्हा तेल भरि, बाती दई अधट्ट ।**
**पूरा किया बेसाहुणाँ, बहुरि न आवौ हट्ट ।।**

गुरूची महती ही की अनुकंपेनेच ते जन्ममरणापासून मुक्त झालेले आहेत.

**चौपाई- जप तप होम क्रिया कृत नाना**
**करि जे मानत स्वयं सयाना ।। ५८ क ।।**
**ते अल्पज्ञ भ्रमहिं युग नाना ।**
**गुरु बिनु नाशत ज्ञान व ध्याना ।।५८ ख ।।**

भावार्थ- जप, तप, होम, यज्ञ आणि नाना प्रकारच्या यौगिक चमत्कारांचा अभ्यास पूर्ण करून जो साधक आपल्याला शहाणा समजू लागतो तो अल्पज्ञ व दंभी असतो. अशा प्रकारचा दांभिकपणा सामान्य साधकात तर सोडाच पण चांगल्या साधकांमध्येही निर्माण होतो. वास्तविक ज्याला सद्‌गुरूची अंत:प्रेरणा प्राप्त झालेली नाही अशा साधकाने संपादित केलेले ध्यान व ज्ञान त्याला लक्ष्यापर्यंत पोहचवू शकत नाही. ते अर्थशून्य असते.

साधारण मनुष्याची तर गोष्टच सोडा पण शंकर व ब्रह्मास्थितीपर्यंत पोहचलेल्या साधकांपुढेपण तुलसीदासांनी प्रश्नवाचक चिन्ह ठेवले आहे.

**गुरु बिनु भवनिधि तरइ न कोइ ।**
**जो विरंचि शंकर सम होई ॥**

कबीरांनी तर स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, हृदयाच्या अज्ञानाला दूर करून सद्‌गुरुच दिव्य चक्षू प्रदान करतात. त्यांच्या तेजामध्येच ब्रह्मदर्शन संभव आहे.

**सतगुरु की महिमा अनंत, अनंत किया उपकार**
**लोचन अनंत उधारिया, अनंत दिखावत हार ॥**

हे एक निर्भेळ सत्य आहे की सद्‌गुरुशिवाय आजपर्यंत कोणालाही आत्मानुभूती झाली नाही व होणारही नाही.

**दोहा- सतगुरु पूरा सूरमा, तहँ मन जूझ अनेक ।**
**जनम कोटि की पोटली, पाप कटै हरि देख ॥११॥**

भावार्थ- वास्तविक सद्‌गुरूच प्रकृतीच्या काळकर्माचा अंत आणीत असतात. त्यामुळे तेच शूरवीर आहेत. सद्‌गुरुला मनाने पकडून अनेक माणसे संघर्ष करीत असतात. त्या सर्वांना संभाळून घेत सद्‌गुरू त्यांच्या अंतर्देशात जागृत होऊन त्यांना आत्मोत्कर्षाचे अनुभवात्मक निर्देश देत राहतात. त्यांच्या कृपेने अनेक जन्मांचे पाप नष्ट होते. पाप नष्ट झाले की ते परम पावन प्रभू प्रगट होतात. ज्यांच्या अलौकिक कृपेने अनेक जन्मांच्या पापाचा क्षय होतो. त्यांच्या सामर्थ्याविषयी त्यांच्या श्रेष्ठत्वाविषयी काय संदेह?

गोस्वामीपण त्यांच्या कृपेचे स्मरण करतात.

**जाकी कृपा लवलेस ते, मतिमन्द तुलसीदास हूँ ।**
**पायो परम विश्राम, राम समान प्रभु नाही कहूँ ॥**

**चौपाई- जिमि हरि साधि संयोग निवारा ।**
**तिमि करुणा निधि उर विस्तार ।।५९।।**

भावार्थ- परमात्म्याच्या संयोगासाठी साध्य वस्तूचा गुंता जसे जसे ते सोडवतात (प्रकृतीच्या द्वंद्वातून इष्टाकडे क्रमश: प्रवाहित करणे) तसे तसे ते करुणा सागर प्रभू साधकाच्या हृदयात (उरामध्ये) क्रमश: पसरतात- विस्तारतात. जसे जसे श्रीहरी आपल्या स्वरुपाचा साधकाच्या हृदयात विस्तार करतात त्या प्रमाणात कल्पवृक्षाच्या खाली साधकाला स्थान मिळते. आता विचारणीय हे आहे की कोणता सुपरिणाम विकासशील साधकाच्या मनात प्रगट होतो ?

**चौपाई- उर विस्तारित जिमि जिमि काया ।**
**तिमि तिमि कल्पवृक्ष तरु छाया ।।६०।।**

भावार्थ- या कायेमध्येच कल्पवृक्षाचे रहस्य आहे. साधनेमध्येच साध्य आणि श्रध्देमध्ये लक्ष्याचे ऐश्वर्य निहित आहे. कल्पवृक्ष म्हणजे कोण्या झाडाचे नाव नाही की ज्याच्या खाली बसण्याने कायेचा कल्प होतो.

टीप- 'मानसामध्ये अंगदाने रावणाच्या बुध्दीची कीव करीत विचारले होते-

**राम मनुज कस रे शठ बंगा । धन्वी काम नदी पुनि गंगा ।।**
**पशु सुरधेनु कल्पतरु रूखा । अन्न दान अरु रस पीयूष ।।**

वास्तविक साधकाच्या हृदयात जो जो प्रभूचा संचार होतो तो तो त्या साधकाला कल्पवृक्षाची छाया प्राप्त होते. क्रमश: आसक्तीचे प्राबल्य समाप्त होऊ लागते आणि या प्रकारे शरीरातच कल्पतरूचे प्रस्फुटन होते. याच दिव्य वृक्षाची चर्चा कबीरपण करतात.

**तरुवर तासु बिलम्बिए, बारह मास फलन्त ।**
**शीतल छाया गहर फल, पंछि केलि करन्त ।।**

दाता मिळावा तर असा की परत कोणाला काही मागावे लागू नये. कृपा मिळावी (प्राप्त व्हावी) तर त्या कृपानिधीची की, ज्याच्या शीतल छायेखाली हा जीवात्मा चिर प्रशान्तीमध्ये निमग्न होईल.

**चौपाई- काया कल्प होत प्रति स्वाँसा ।**
**जग जोनी कर होत विनाशा ।।६१।।**

भावार्थ- या नश्वर संसारात चराचर प्रकृतीमध्ये उत्पन्न होणारे काळ, कर्म व स्वभाव गुणांनी ग्रासलेले असल्याने निर्बल तसेच रोगीष्ट असतात. प्रकृतीमध्ये श्रेष्ठतम असणारा प्राणी मानवदेखील या गुणांनी ग्रासलेला आहे. त्यामुळे तोही विवश होऊन जगत असतो, मरत असतो. परंतु जो यातून निघून कायेचा कल्प करतो तो मृत्यूच्या गुणधर्मातून सुटून अविनाशी होऊ शकतो. जो जो ध्यानामध्ये श्वास टिकण्यास प्रारंभ होईल तो तो प्रतिक्षण कायेचा कल्प होत जाईल.

**चौपाई- सत्य कल्पतरू हरि की धारा ।**
**नित्य सुखद जीवन दातारा ।।६२।।**

भावार्थ- वास्तविक कल्पवृक्ष म्हणजे श्रीहरिचा प्रभाव-प्रताप आहे. त्याची कल्याणमयी शीतल छाया परम सुखद तसेच मांगलिक फल प्रदान करणारी आहे. त्याची अनुभूती झाल्यानंतर व्याधींचा अन्त होतो आणि चिरन्तन शांतीचा जीवन-स्त्रोत प्रवाहित होऊ लागतो. क्रमागत विकासामध्ये साधकाच्या इच्छा परिपूर्ण करणाऱ्या कामधेनूचा अविर्भाव असतो.

**चौपाई- कामधेनु बस पूरन कामा ।**
**मन इच्छित फल प्रगटे ठामा ।।६३।।**

भावार्थ- उत्तरोत्तर विकास करून घेत असणाऱ्या साधकासमक्ष एक दिवस एक अशी स्थिती येऊन उभी राहते की तेव्हा त्याची कोणतीही इच्छा सहजपणे पूर्ण होऊ लागते. मनोवांछित फल प्रदान करणारी तत्कालिक क्षमता अंतरंगाचीच एक विशिष्ट उपलब्धी आहे. कोणतीही बाह्य कल्पना नव्हे.

**चौपाई- योग क्षेम भजनानन्द कारी ।**
**गो गति संयम गो सुखकारी ।।६४।।**

भावार्थ- ती कामधेनू योगाचे रक्षण करणारी व भक्तीचा आनंद प्रसारित करणारी आहे. तिची उत्पत्ती गो गति म्हणजे इंद्रियांची गती पूर्ण संयमित झाल्यानंतर होत असते. पूर्ण निरोधावस्थेस पोहचल्यावरच इंद्रियेच मनोवांछित फल प्रदान करणारी कामधेनू

बनतात. कामधेनू म्हणजे कोणी गाय नाही की जिच्या आंचळातून इच्छांची पूर्ती करणाऱ्या अस्वाभाविक दुग्धधारेचा स्त्राव होतो.

**चौपाई- इन्द्रिय विषय संग मिटि जाई ।**
**तब कामोच्छित गो सुखदाई ।।६५**

इंद्रिये व त्यांच्या विषयाचा संयोग जेव्हा पूर्णतया नष्ट होतो तेव्हा विषय ग्रहणाच्या भावनेचा विलय होतो. तेव्हा इच्छित कामनांची पूर्ती करणारी व सदा सुख देणारी ती कामधेनू प्रगट होत असते.

टीप- कागभुशुण्डीनादेखील असाच आशीर्वाद प्राप्त झाला होता. त्याचा उल्लेख मानसमध्ये गोस्वामीजींनीपण केला आहे.

**जो इच्छा करिहउ मन माही । हरि प्रसाद कछु दुर्लभ नाही ।।**

जेव्हा इष्टदेवाची कृपा होते तेव्हा इच्छांची पूर्ती सहजपणे होऊ लागते. आता या अवस्थेत साधकाला काही इच्छाच राहात नाही ही गोष्ट वेगळी. तो अशा अवस्थेत प्रभूच्या हातातील फक्त यंत्र मात्र बनलेला असतो.

**चौपाई- तेहिं प्रभाव आशा जग नाहीं ।**
**हरि रँग पूर प्रगट मिल जाहीं ।।६६।।**

भावार्थ- त्या कामधेनूचा प्रभावच इतका विलक्षण असतो की जगतातील जेवढ्या कुत्सित कल्पना असतील किंवा कुत्सित विचार असतील ते मानस पटलावर निर्दोष होतात. केवळ अभौतिक इच्छाच प्रगट होऊन साधकाला परमात्म्याच्या स्वरुपाची अनुभूती देऊ लागतात आणि साधकाचे अंतरंग हरीच्या रंगाने रंगून जाते.

**चौपाई- कामधेनु संगत सुखकारी**
**राम नाम मणि प्रगट पसारी ।।६७।।**

भावार्थ- कामधेनूची संगत मिळताच रामनामरूपी रत्नाचा प्रगट प्रसार होतो म्हणजेच त्याच्या तेजाचा प्रसार होऊ लागतो.

याच रामनाम मण्याचा परिचय संत तुलसीदासांच्या वाणीमध्येही प्रगट झाला आहे.

**राम नाम मणि दीप धरु, जीह देहरी द्वारा ।**
**तुलसी भीतर बाहरेहु, जो चाहसि उजियार ॥**

ज्याला रत्न म्हटले जाते त्या रामनामाचा संबंध परावाणीमध्ये प्रवेशकाळातच शक्य असतो.

**चौपाई- परा वाणी परसत परतीती ।**
**मणि प्रगटे सत संसृति जीती ॥६८॥**

साधक चिंतनाच्या उच्च कोटीला पोहचला की त्याला परावाणीचा स्पर्श होतो व या स्पर्श कालात रामनामाचा प्रादुर्भाव होतो. तो अत्यंत ज्योतिर्मयी, अपार्थिव मणी प्रगट होताच साधकाला स्वरुपाची अनुभूती होऊ लागते. त्यानंतर आत्मोन्नतीच्या परम सीमेवर पोहचलेल्या साधकाच्या बाबतीत एकदा नव्हे तर शंभरदा अगदी निश्चितपणे सांगता येते की तो आता जन्ममरणाच्या बंधनापासून मुक्त होऊ शकेल. कारण स्वरुपाची प्राप्ती झाल्यानंतर भवपार करण्यासाठी साधकाला कोणतीही अडचण किंवा विघ्न आडवू शकत नाही. परावाणीच्या स्पर्शकालात रामनामरूपी रत्न प्रगट होणे म्हणजेच सृष्टीच्या सीमेचा अंत होय आता या रत्नाची पकड कशी असावी ते पाहू.

**दोहा- बैखरी चिन्तन मध्यमा मिले न मणिक उदोत ।**
**पश्यन्ती परसत कछुक परावाणि मणि ज्योत ॥१२॥**

वैखरी आणि मध्यमेच्या स्पर्शकाळामध्ये त्या रत्नाचा प्रकाश उत्पन्न होत नाही. पश्यन्तीच्या स्पर्शकाळामध्ये त्याचा प्रकाश थोडा थोडा अभासित होऊ लागतो आणि परावाणीचा स्पर्श होताच ते रत्न संपूर्णपणे प्रकाशित होते.

**चौपाई- शब्द अनादि ईश रुख पाई ।**
**प्रगट सुनत जग माति न साई ॥६९॥**

शब्दार्थ- मति = त्रिगुणात्मिका माया ।

भावार्थ- तो शब्द अनादि आहे आणि ईश्वराचा संकेत मिळताच तो ऐकायला येण्यास सुरुवात होते. त्या अनादि शब्दाने अंत:करण निनादित होताच तिच्या जयघोषाने या सृष्टीला जन्म देण्याचे एकमात्र कारण असणारी ती त्रिगुणात्मिका माया नष्ट होते.

**चौपाई- सो मणि जदपि सुप्त सब पाहीं ।**

**बिनु प्रेरक उर प्रगटत नाही ।।७०।।**

भावार्थ- प्रत्येक मनुष्याच्या अंतरंगात ते रत्न सुप्तावस्थेत असते. त्या प्रेरकाच्या कृपेशिवाय ते दृष्टिगोचर होणे असंभव आहे. सद्गुरु व परमात्मा हे एक दुसऱ्याचे पर्याय आहेत.

गोस्वामींच्या वाणीशी तुलना करीत पाहू:-

**सो मणि जदपि प्रगट जग अहई ।**

**राम कृपा बिनु कोउ नहि लहई ।।**

**चौपाई- प्रेरक हो परतीति बधावै**

**तेहि प्रतीति मध मणि सुख पावौ ।।७१।।**

जेव्हा इष्ट प्रेरक होऊन साधकाला समजावतो आणि हृदयात विश्वास जागृत करतो तेव्हा रत्नाची प्रतीती येऊ लागते व साधकाला त्या पावन मण्याचे सुख प्राप्त होते. वास्तविक या मण्याचा चढउतार श्वासावरच केंद्रित असतो की ज्या श्वासाला चिंतनाच्या शीर्षक सफलतेवरून जाणले जाते.

**चौपाई- अति सूक्ष्म जो मणि सुख पावै ।**

**श्री विस्तारित असुर रिझावै ।।**

मन जेव्हा अत्यंत सूक्ष्म बनून श्वासामध्ये निर्माण होणाऱ्या त्या शब्दाला पकडते तेव्हा ज्यामध्ये आसुरी संपत्तीचे लोक विश्वास करतात अशा 'श्री' लक्ष्मी वगैरे उपलब्धींचापण निरोध होतो. साधक तर या मौलिक तत्त्वाचा स्पर्श होताच निर्लिप्त व अनासक्त होतात. मात्र ज्यांच्या मनात आसुरी तत्त्वाचा अल्पसा जरी अंश शिल्लक राहतो ते या चमत्कारिक सिध्दीमध्ये रंगून जातात.

**चौपाई- तत सागर सुख समृध्दि ज्योती ।**

**हरि प्रतिबिम्ब प्रभा सुख श्रोती ।।७३।।**

भावार्थ- ती लक्ष्मी चिंतन-धारेमध्ये त्याच सागराच्या आतून सुखसमृध्दीचा वर्षाव करणाऱ्या प्रभेच्या रूपात प्रगट होते. ती ईश्वराची प्रतिछाया आहे. ती चमत्कारिक छटेच्या रूपात आविर्भूत होऊन सुखाचा स्रोत बनून प्रवाहित होते.

**चौपाई- तेहिं लखि भक्तन मिटी निराशा ।**

**अमृत बिन जग कौन निवासा ।।७४।।**

भावार्थ- लक्ष्मीच्या प्राप्तीची सुरुवात होताच भक्ताच्या हृदयातील निराशा नष्ट होऊ लागते आणि साधकाच्या मनात विश्वास निर्माण होतो की मृत्यूच्या पलीकडे अनुभूतीच्या धरातली अमृत नसेल तर मग जेथे सुख प्राप्त होईल असा जगात कोणता निवास आहे? याप्रमाणे लक्ष्मीची प्राप्ती होताच साधकामध्ये नवीन उत्साहाचा संचार होतो.

**चौपाई- श्री प्रभा आभा हरि केरी ।**

**भक्त हृदय प्रभु राशि बिखेरी ।।७५।।**

भावार्थ- ही लक्ष्मी म्हणजे त्या परम प्रभूची आभा आहे, प्रभा आहे, ती त्याची विभूती आहे. परम प्रभूमध्ये जे विशेष गुण पाहावयास मिळतात तेच आभा प्रगट करीत असतात. ती भक्ताच्या हृदयात प्रभूकृपेचा अविरत वर्षाव करीत असते.

**चौपाई- प्रभु महिमा जो अजर अबाधी ।**

**जन उर दर्शन पर सुख साधी ।।७६।।**

भावार्थ- ही प्रभा त्या परात्पर प्रभूच्या विशेष विभूतींचा- अजरत्व, अमरत्व, सर्वशक्तिमानता, सर्वज्ञता, चिन्मयता इत्यादींचा प्रसार करीत भक्ताच्या हृदयाकाशात वास्तव्य करते. ती भक्ताचा परम कल्याणमय पथ दोषरहित करीत त्या पथकाचे रक्षण करते.

**चौपाई- आसुर सम्पत्ति सकल विभाजन ।**

**क्षण प्रगटी रम्भा सुख छाजन ।।७७।।**

भावार्थ- वरील प्रकारे साधनेच्या प्रभावामुळे साधकाच्या क्रमशील विकासोन्मुखी चिंतनपटलावरून नाशवंत अशा आसुरी संपत्तीचा पूर्णपणे विध्वंस होतो. आसुरी संपदा नष्ट होताच क्षणभंगूर सुखाचा वर्षाव करणाऱ्या रंभेचा प्रभाव निष्प्रभ होऊन जातो. या प्रखर ज्योतिच्या स्नेहल स्पन्दनशीलतेचा भाविक हृदयात स्फुरण उत्पन्न करणारे एक

आवरण आहे. जगात पडदे समोर पुढे लावले जातात परंतु उर्ध्वरेता साधकाच्या अंतरंगात पडदा असतो. ज्याच्या चित्तवृत्तीमध्ये चमत्कारिक विक्षेपाचे आवरण पडते त्याच्या भावी प्रगतीचा मार्ग अवरुध्द बनतो.

**चौपाई- विषय वासना करत कामना ।**

**ते जन पावत विषय वाम ना ॥७८॥**

भावार्थ- असे भक्त तर भजन करतात; परंतु ज्यांच्या मनात सांसारिक विषयांची कामना वास करीत असते- लपून बसलेली असते ते लोक रंभा आदि बाह्य विषय प्राप्त होताच त्यांनी प्रभावित होतात.

एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की केवळ भजनाने किंवा भक्तीने सकामता पिंड सोडत नाही. जो तिच्यापासून वाचतो तोच पूर्णत्व प्राप्त करू शकतो.

**रत्न प्रगट दुइ सिन्धु मे, छोड बन्ध अलगाव ।**

**एक उबारे जगत सों दूसर बन्धन ताव ॥१३॥**

भावार्थ- साधारणत: दोन वेगवेगळे गुणधर्म असणारी रत्ने अन्वेषिणी चिंतनधारेमध्ये, भवसिंधूच्या अंतरंगातून प्रगट होऊन साधकाच्या समोर येतात, ज्यांमध्ये काही मायिक प्रवृत्तींमध्ये बध्द करणारी असतात, तर काही मायेच्या बंधनाना तोडून ईश्वरामध्ये प्रवेश देणारी असतात. (पहिल्या प्रकारातील रत्ने या जगातातून मुक्ती देणारी असतात. ज्यामध्ये कामधेनू, चंद्रमां, अमृत आदि अत्यंत उल्लेखनीय आहेत. तर दुसऱ्या प्रकारची रत्ने संसारिक प्रवृत्तींमध्ये बध्द करण्यात तत्पर असतात या रत्नांमध्ये गज, वारुणी, रम्भा, विष इत्यादी रत्ने उल्लेखनीय आहेत. या आवरणापासून दूर राहणारा साधकच आपले लक्ष्य प्राप्त करू शकतो.)

**चौपाई- विषय आश रत भजन सकामा ।**

**ता उर रत्न बाम बिधी जामा ॥७९॥**

भावार्थ- ऋध्दी, सिध्दी, मान सन्मान इत्यादी गौरव वाढवणाऱ्या भावनादेखील विषयात्मक आसक्तीच्या परिभाषेत अंतर्भूत होतात. जो साधक विषयांच्या कामनांमध्ये आसक्त असतो अशा साधकाच्या हृदयात विपरीत गुणधर्म असणारी बाह्य रत्ने उत्पन्न होतात किंवा प्रसार पावतात. ही रत्ने बाह्य प्रवृत्तींबाबत आवड निर्माण करतात. अर्थात

उपर्युक्त भाव सर्वांच्याच हृदयात निर्माण होत असतात. परंतु जे निष्काम झालेले आहेत त्यांच्या अंतरंगात मात्र ते निष्क्रिय झालेले असतात.

**चौपाई- रम्भा सबल शत्रु गति बामा ।**
**विषय आश धुत रत्न ललामा ।।८०।।**

भावार्थ- उक्ताभिव्यक्त सांसारिक प्रसार करणाऱ्या प्रवृत्तींमध्ये रंभेचा आविर्भाव बलवान शत्रूच्या स्वरूपात असतो. तिची गती लक्ष्याच्या नेहमी विपरीत बर्हिमुखी असते. या जगात जे लोक विषयांच्या नशेत आपली बुध्दी, आपले भान हरवून बसलेले असतात त्यांच्यासाठी हे एक विस्मयकारक मनोहर असे रत्न आहे.

**चौपाई- रम्भा उरबसि अतुल मैनका ।**
**जर उर अँकुरे सुजस लैन का ।।८१।।**

भावार्थ- रंभा वेळोवेळी अनेक नावांनी साधकांच्या जीवनात आलेली आहे. उर्वशी, अतुला, मेनका ही सर्व तिचीच विशेषणे आहेत. ही साधकाच्या अंतरंगात विषयाचा अंकुर उत्पन्न करणारी असून त्याचे यश धुळीस मिळवणारी आहे.

ज्या साधकांचे रक्षण परम प्रभू करीत असतात तेच हिच्यापासून वाचतात बाकीचे मायेच्या बाजारात लुटले जातात. गोस्वामींनी बरोबरच म्हटले आहे की-

**धरा न काहू धीर, सब के मन मनसिज हरे ।**
**जेहिं राखे रघुबीर, सोइ उबरे तेहिं काल महैं ।।**
**चौपाई- लोक दृष्टि महँ सुन्दर साजा ।**
**भक्त फँसावन परम अकाजा ।।८२।।**

समाजाच्या दृष्टीने ही एक सुंदर परी आहे परंतु ज्यांना भक्तिमार्गावर प्रवेश पाहिजे त्यांच्यासाठी ही रंभा म्हणजे पथ्यावरोध आहे. ती भोळ्या भक्तांना फसवणारी, आपल्या जाळ्यात पकडणारी व परम तत्त्वापासून त्यांना दूर नेणारी आहे. तिच्या प्रतिक्रियेचा परिणाम म्हणजे साधक अनिष्टकारी गोष्टींचा भोग बनण्यात किंवा शिकार बनण्यात होतो. महर्षी श्रृंगी इत्यादी महर्षींचे उदाहरण याबाबतीत उल्लेखनीय आहे.

**चौपाई- श्रृंगि पराशर कर गहि मारा ।**

**विश्वमित्र विलखि विस्तारा ।।८३।।**

भावार्थ- शृंगी ऋषी, महर्षी पराशर इत्यादी महंताना बलपूर्वक पकडून या मायाविनीने त्यांना पथभ्रष्ट केले. विश्वामित्र खूप धाडसी होते. ते अडचणींना घाबरणारे नव्हते ते सुध्दा मेनकेच्या सौदर्याने प्रभावित झाले. नंतर पश्चातापदग्ध होऊन त्यांनी या मायाविनीच्या सामर्थ्याचा स्वीकार केला. अर्थात, त्यांनी पुन्हा अथक परिश्रम केले व तिच्यापासून दूर राहून सावध राहून आपले लक्ष्य त्यांनी प्राप्त केले; परंतु एकवेळा तर या अबलेने त्यांच्या चित्तवृत्ती विचलित करून त्यांना त्यांच्या मार्गावरून बलपूर्वक भ्रष्ट करण्यात यश मिळवले होतेच.

**भजन प्रवेश करत विस्तारा ।**

**धैर्यवान प्रभू केर सहारा ।।८४।।**

भावार्थ- वास्तविक भजनप्रवेशाबरोबरच मायाविनी शक्ती रंभा, मेनका इत्यादींचाही प्रवेश व विस्तार होत असतो. यौगिक उपलब्धीमध्ये निश्चयात्मक मार्ग एकच आहे, त्याच एकतेमध्ये अनेकतेचा लय केल्यानंतरच शाश्वत शांती आणि सुखाचा स्रोत मोकळा होतो. जो स्वभावत:च धैर्यवान आहे, जो परमेश्वराच्या आधाराने चालतो तोच सर्व अडचणींतून सर्व प्रकारे वाचू शकतो.

**चौपाई- जेहि जन लगन लगी इक ओरा ।**

**तेहि चिन्तन मति कबहुँ न भोरा ।।८५।।**

भावार्थ- ज्याची विश्वान्तर्यामी प्रभूवर एकनिष्ठ श्रध्दा आहे तो त्या प्रभूशिवाय रम्भादि वस्तूंकडे स्वप्नातदेखील बघत नाही. अशा प्रकारचे साधक नेहमी त्या सर्वेश्वर ईश्वरावर अवलंबून असल्याने त्या सर्वेश्वरावर संपूर्ण श्रध्दा ठेवून असल्याने ते रेषमात्रही त्या मायाविनीच्या प्रलोभनाने प्रभावित होत नाहीत.

**चौपाई- तेहि संगत मन काम कुरुपा ।**

**गज प्रगटा सोइ काम स्वरूपा ।।८६।।**

भावार्थ- रंभा-मेनकादींच्या संगतीने मनामध्ये कामेच्छा निर्माण होते. त्यांच्यामध्ये रंगून गेल्यामुळे साधकाचे सूक्ष्म शरीर कुरूप बनू लागते. हत्ती हे कामाचे प्रतीक आहे.

समुद्र मंथनाच्या पौराणिक कथेमध्ये याच हत्तीला ऐरावत असे म्हटले आहे.

**चौपाई- गज प्रतीक कामातुर मनसा ।**

**मन मदमत्त फिरइ गज तन सा ।।८७।।**

भावार्थ- वास्तविक गजाचे प्रगट होणे म्हणजे मनाचा कामोन्मुखी प्रवाह प्रगट होणे आहे. मन जेव्हा विषयाच्या नशेमध्ये मदमत्त होते तेव्हा ते भजन-चिंतनरूपी अंकुशालाही जुमानीत नाही. भगवंताविषयी असणाऱ्या प्रेमबंधनाला देखील मत्त होऊन तो तोडतो. सत्कर्मरूपी स्तंभांना उखडून फेकून देतो. सांसारिक वासनांनी विचलित होणाऱ्या विलासी मनाची स्थिती विक्राळ गजेंद्रासारखी होते. या वृत्तीच्या निष्ठुर प्रहारांनी साधक विकल होऊन बेचैन बनतो. परंतु अशा स्थितीतसुध्दा इष्टदेव आपली कृपादृष्टी ठेवतो आणि भोळ्या साधकांना कामरूपी चिखलामध्ये पडण्यापासून वाचवतो.

**परम प्रभू विष्णूने आपला प्रिय भक्त नारदासाठी हेच तर केले.**

**जेहि विधि होइहै परम हित, नारद सुनहु तुम्हार ।**

**सोई हम करब न आन कछु, बचन न मृषा हमार ।।**

नारदाचे रक्षण तर झाले; परंतु त्याला त्याचा पश्चाताप अनेक दिवस होत होता. जेव्हा प्रभूची पुन्हा भेट झाली तेव्हा नारदाने विचारलेच की हे प्रभू तुम्ही मला विवाह करण्यापासून का रोकले? प्रभूंनी समजावले-

**सुनु मोनि तोहि कहउँ सह रोषा ।**

**भजहि जे मोहिं तजि सकल भरोसा ।।**

**करउँ सदा तिन्हकी रखवारी ।**

**जिमि बालक राखइ महतारी ।**

**दोहा- काम कला मन विव्हला, युक्ति न लागत एक ।**

**क्षण सुख चित चपल करे, बचे जे विमल विवेक ।।१४।।**

भावार्थ- काम प्रेरित मन विषयांनी विकल होते तेव्हा तो त्यांनी इतका वेडा होतो की शम, दम, नियम, ज्ञान, वैराग्य इत्यादींपैकी एकपण युक्ती काम करीत नाही. चित्त इतके चंचल बनते की ध्यानाची दोरीपण थरथरू लागते. अशा स्थितीत विशुध्द विवेकाबरोबर ब्रह्माच्या आश्रयाने राहणारे पुरुषच वाचू शकतात.

संत कबीरांनीदेखील त्यालाच सुरक्षित म्हटले आहे जो सर्वत्र संचार करणाऱ्या श्रीरामाकडून स्नेहाभिषिक्त झालेला असतो.

**नारी काली नागिनी, तीनों लोक मझार ।**

**राम सनेही बचि गये खाये सब संसार ॥**

**चौपाई- विषयासक्त मन्द मति पापी ।**

**अन्ध आयु सुख वारुणि व्यापी ॥८८॥**

भावार्थ- विषयामध्ये आसक्त होऊन जे मंदमती लोक मदांध होतात ते या क्षणभंगुर असणाऱ्या जीवनात सुखभोगरूपी मदिरेने व्याकुळ होतात. या मदिरेची नशा साधकाच्या संयमपूर्ण मार्गामध्ये अवरोधरूप बनते.

संतप्रवर तुलसीदासदेखील हे तथ्य सांगताना म्हणतात-

**मोह न अन्ध कीन्ह केहि केहि ।**

**को जग काम नचाव न जेही ॥**

**चौपाई- शुभ अरु अशुभ पुण्य दिन राती ।**

**पाप कहे जे, जे जनमाती ॥८९॥**

अर्थ- शुभ आणि अशुभ, पाप आणि पुण्य, दिवस आणि रात्र हे द्वन्द्वात्मक चक्र पापांचा प्रसार करते व जीवाला संसारामध्ये ओढते. याच्यात अडकलेला जीव या जगात अनेक योनींमधून भटकत विकल होऊन जातो.

**चौपाई- सकल विश्व समृध्दि दु:ख भारा ।**

**हेतु जनम जिय काल पसारा ॥९०॥**

भावार्थ- ह्या जगातील सर्व प्रकारची समृद्धी-वैभव दु:खाचे ओझे वाढवणारेच असते. समृद्धीमध्ये प्रगती करण्याने भौतिकतेचे ओझे रेषमात्र कमी होण्याचा संभव नसतो. सांसारिक इच्छाच जन्ममरणाला कारणीभूत असतात. या कामनांच्या प्रभावामुळेच सर्वत्र सर्व जीवांमध्ये काळाची विक्राळता व्यापकरीतीने पसरत असते.

**चौपाई- सकल सृष्टि सुख-दुख भारा ।**

**जहँ लगि जन्म विलय व्यवहारा ॥९१॥**

भावार्थ- या जन्ममृत्यूची सीमा जीथपर्यंत आहे तेथपर्यंत या चराचरातील जीव या कालचक्रात भरडले जात असतात. जन्मानंतर जोपर्यंत मनुष्य आत्मचिंतन करीत स्वत:ला परम प्रभूमध्ये स्थिर करीत नाही तोपर्यंत (जनमत  मरत दुसह दु:ख होई') ह्या अनिवार्य अशा काळचक्रात मुक्त होणार नाही. या संपूर्ण सृष्टीमध्ये सुख दु:खाचा विस्तार करणाऱ्या समस्त संभाव्य गोष्टींचे केंद्र म्हणजे हा संसार आहे.

**चौपाई- यह विषै संसृति दैव चलाया ।**

**विष काया शंकर गहि खाया ।।९२।।**

भावार्थ- ही सृष्टी म्हणजेच एक विष आहे. दैवाच्या इशाऱ्यावर चालणारी ही सृष्टी म्हणजे विषाचा विस्तार आहे. या सृष्टीरूपी कायेमध्ये विषयरूपी विष प्रवाहित झालेले आहे जे श्रीशंकरानी अत्यंत संयमाच्या सामर्थ्याने पचवले आहे.

**चौपाई- शंक मिटे तब शंकर रूपा ।**

**जहँ लगि संसृति शंक स्वरूपा ।।९३।।**

सर्व शंकांचे शमन-निरसन झाल्यावर शंकर स्थिती प्राप्त होते. जेथपर्यंत सृष्टीचा विस्तार आहे तेथपर्यंत संदिग्ध तर्कांचा विस्तार झालेला आहे असे समजले पाहिजे.

म्हणजे मनाने पूर्ण संयमित स्थिर आणि तर्कशून्य झाल्यानंतरच 'शिव' स्वरूपाची अनुभूती प्राप्त होण्याची शक्ती असते.

**सो स्वरुप भजनानन्द आशा ।**

**परसि परम सुख रूप उदासा ।।९४।।**

भजनानन्दाच्या माध्यमातूनच शिव स्वरूपाची आशा करता येते. त्या परम तत्त्व परमात्म्याचे दर्शन व स्पर्शाबरोबरच सदैव सुखदायी व परम उदासीन अशा शंकर स्वरूपाची प्राप्ती होते.

**चौपाई- तेहि स्वरूप प्रगटे विष खोया ।**

**विष पियूव मय सहयहि सोया ।।९५।।**

भावार्थ- ते शिव स्वरूप प्रगट होताच विष विलीन होऊन ते अमृतात परिवर्तीत होते आणि साधक सहज स्वाभाविक परात्पर सुखात निमग्न होऊन जातो. म्हणजेच या

स्थितीनंतर जन्ममृत्यूच्या येरझारा कायमच्या समाप्त होतात आणि मग आत्मा चिरन्तन सहजावस्थेत विलीन होऊन जातो. आता प्रश्न असा आहे की त्या अमृताची उत्पत्ती कशी आणि कोठून होते?

**चौपई- शशि पियूष संगत सुखकारी ।**
**जन जानत पद परस भिखारी ।।९६।।**

भावार्थ- चन्द्र आणि अमृताची सोबत नेहमी सुखदायक असते. ज्याच्या हृदयप्रदेशात ही अवस्था दशा प्रगट होते तोच भक्त ही सुखदायक सोबत जाणू शकतो. आणि याचा पदस्पर्श होताच तो तत्क्षणी शिव-स्वरूप बनतो, भिकारी बनतो.

शब्दार्थ- भिखारी- ज्या महापुरुषांची परम तत्त्वाची मागणी राहत नाही ते परम भिकारी होत. हेच स्वरूप शंकरांचे होते आणि सद्गुरु परमहंसाचेपण होते.

**चौपाई- मन ही शाशि थिर परसि अकाशा ।**
**ब्रह्म पियूष गहत भव नाशा ।।९७।।**

आकाशाला स्पर्श करून जेव्हा मन स्थिर बनते तेव्हा असे शून्यानुगत मन म्हणजेच चंद्र होय. श्रुतीमध्येदेखील ''चन्द्रमा मनसो जात:'' असे म्हटलेले असल्याने या तथ्याला पुष्टीच मिळते. गोस्वामीनीदेखील ''मन शशि चित्त महान'' असे म्हणत हेच सांगितले आहे. असे मनच अमृताचे पान करू शकते. ते या आंतरिक भावाचे निरंतर रसास्वादन करत राहते. यामुळे मायावी व्याधींचे जन्म जन्मांतरीचे बंधन तुटते. या प्रकारे कूटस्थ अमृतमय मन क्रमशः काल आणि कर्माच्या सीमेच्या पलीकडे जाते.

**चौपाई- जे काया नश्वर गति त्यागी ।**
**चरत आकाश स्वाँस सँग लागी ।।९८।।**

भावार्थ- ''कोउ अवकाश कि नभ विनु पावा'' शून्याला, पोकळीला आकाश म्हटले जाते. तात्पर्य हे की शून्याचा स्पर्श होताच त्या चंचल मनाला अवकाशाची प्राप्ती होते. जेव्हा हे मन शरीराचा संबंध तोडते व आकाशात स्थिर होते तेव्हा ईश्वराभिमुख होऊन श्वास प्रश्वासाच्या माध्यमातून त्या शून्यामध्ये ते प्रवाहित होते.

**दोहा- ईश संग जग भास ना, शून्य सुरा दरसात ।**
**ते चित्त चंदा अमर संग, निशि दिन पिय बरसात ।।१५।।**

भावार्थ- तेव्हा ईश्वराशी असे सख्य होते की जेथे जगाचा आभास होत नाही, ईश्वराची गती मनरूपी आकाशात प्रवाहित होऊ लागते. अशा आकाशवत मनालाच चंद्रमा म्हटले जाते. असे मन देवत्व प्रदायिनी अमर प्रवाहाने युक्त असते. याचा परिणाम असा होतो की प्रियतम परमात्मा सतत वर्षाव करीत राहतो म्हणजे परमात्म्याचा अनुभव देत राहतो.

याच सत्याचे निरुपण संत कबीरदासाच्या वाणीमध्ये पुढीलप्रमाणे केले गेले आहे.

**रस गगन गुफा से अजर झरै ।**
**बिनु बाजा झंकार उठे तहँ, समुझि परै जब ध्यान धरै ।**
**बिना ताल तहाँ कमल फुलाने, तेहिं चढि हंसा केलि करै ।**
**बिना चाँद उजियारी छिटकी, जहँ जहँ हंसा नजर परै ।।**

**चौपाई- अजर अमर प्रभु पिय पहिचाना ।**
**दैवि संग बिनु काहु न जाना ।।९९।।**

भावार्थ- जो प्रभू अजर, अमर आणि शाश्वत आहे तोच माझ्या जीवनाचा आधार आहे, तोच माझा प्रियतम आहे. परंतु त्याच्या या परिचयासाठी दैवी संपत्तीचा संग्रह असणे आवश्यक आहे. जर त्याचे साहचर्य मिळाले नाही तर त्या शाश्वताचे प्रत्यक्ष दर्शन होत नाही. व म्हणून या दैवी संपत्तीसाठी- ती प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**चौपाई- मथा सिन्धु जग हरि की छाया ।**
**शुभाशुभम जग रतन निकाया ।।१००।।**

भावार्थ- जेव्हा एखादा साधक प्रभूच्या कृपेस पात्र होतो तेव्हा तो प्रभूच्या छात्रछायेखाली समुद्र मंथन करतो. या भवसिंधूचे मंथन करण्याची व त्याच्या आतून मौलिक रत्ने प्राप्त करण्याची दुसरी पध्दत उपलब्ध नाही. या मंथनास प्रारंभ होताच शुभाशुभ रत्ने क्रमश: त्यातून बाहेर पडू लागतात. त्यातील काही रत्ने इतकी विलक्षण असतात की त्यांना सामान्य डोळ्यांनी पाहता येत नाही आणि बुध्दीने पारखलेही जात नाही. त्या अलौकिक उपलब्धीची प्राप्ती ही शरीराच्या आवाक्यातील गोष्ट नाही. ती तर केवळ ईश्वरीय आदेश आणि ईश्वरीय आवाजालाच शक्य असणारी गोष्ट आहे.

**चौपाई- सब संयोग देखि मन क्षोभा ।**
**अमिय परश रत्नाकर शोभा ।।१०१।।**

भावार्थ- या प्रकारे अनेक रत्नांच्या प्राप्तीनंतर देखील मनात क्षोभ आणि चिंता वाढतच जाते कारण त्यात अमृताचा अभाव असतो. अमृताचा स्पर्श होताच रत्नाकराची शोभा वाढते व चित्त निरंतर शांतीमध्ये समाहित होते. खर पाहता अमृताशिवाय त्या रत्नाकराला काय शोभा? तेव्हा अन्य उपलब्धीनंतरही मनात खळबळ होतच राहते. याबाबत पुढील चौपाई पाहा.

**चौपाई- पुनि सागर महँ हलचल रारी ।**
**अमृत बिन भव दु:खद सुरारी ।।१०२।।**

भावार्थ- अमृताचा अभाव असल्याने सागरात पुन्हा यथावत हालचाल सुरू झाली कारण त्या अमूल्य अशा प्राप्तीशिवाय सागरात स्थैर्य कोठून येणार? अमृताच्या अभावामुळे जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकवणाऱ्या आणि देवत्त्व प्रदान करणाऱ्या दैवी संपत्तीचा ऱ्हास करणाऱ्या आसुरी संपदा तेथे विद्यमान असतात. मग प्रश्न असा की अमृत म्हणजे काय?

**अमृतमय प्रभू परम आतमा ।**
**चिदाकाश परतीति आतमा ।।१०३।।**

भावार्थ- अमृतामध्ये सर्वव्यापक प्रभूच स्वयं अमृत आहेत. चित्त जेव्हा आकाशवत होते तेव्हा त्या आत्मतत्त्वाचा साक्षात्कार शक्य होत असतो. चित्ताचा निरोध करणारी ती अंतस साधना पध्दतीच त्याच्या प्राप्तीचे माध्यम आहे.

**सो अमृत रस दूसर नाहीं ।**
**परस प्रभात सिन्धु भरि जाहीं ।।१०४।।**

भावार्थ- तो अमृत रस म्हणजेच आत्मा होय त्याशिवाय दुसरे काहीही नाही. आत्मतत्त्वाला स्पर्श करताच तो जीवात्मा स्वयं प्रकाशस्वरूप होतो. जेव्हा पथिकाच्या अंतर्देशात ते आत्मतत्त्व प्रकाशित होते तेव्हा भवसिंधूचा सर्व विस्तार सुकून जातो. त्रिगुणात्मक 'प्रकृती'चा प्रभावपण मायावी अनर्थांसह 'पुरुषा'मध्ये विलीन होऊन जातो.

**चौपाई- जन हरि परसत हरि के रूपा ।**
**अमृत मय जन परसि स्वरूपा ।।१०५।।**

त्या अमृतमय परमात्म्याचा स्पर्श होताच भक्त हरिस्वरूप होऊन जातो. तेव्हा जीवात्मा स्वत: परमात्म्यामध्ये बदलतो. त्या स्वरूपात विलीन होण्याची क्षमता प्राप्त करणारा आत्मा दुसऱ्यांना अमरत्व प्रदान करणारा बनतो. अमिय आणि आत्म्याचा संयोगच पथिकांना परमात्म्याच्या परम स्वरूपात विलीन करीत असतो. संत कबीर ही गोष्ट स्पष्ट करताना म्हणतात-

**अवधू । बेगम देश हमारा ।**
**जहाँ पहुँच फिर हंस न आवै, भवसागर की धारा ।।**

**चौपाई- तेहिं क्षण अन्तर ध्यान हरीशा ।**
**को विलगाव जीव अरु ईश ।।१०६।।**

या विलयाबरोबरच साधकाबरोबर पूर्तिपर्यंत चालणारा तो आत्मप्रेरकपण अंतर्धान पावतो. साधकाला सहजस्वरूपाची प्राप्ती होते. अशा अवस्थेत जीव आणि ईश्वर यांना कोणीही वेगळे करू शकत नाही येथे. अंश अंशामध्ये लीन होऊन पूर्ण झाला. आता त्याला पृथक करणे अशक्य आहे. ही स्थिती अवर्णनीय आहे. हीच अवताराची पराकाष्ठा आहे. आता पुन्हा मूळ क्रियेकडे संकेत केला गेला आहे:-

**चौपाई- गुरुवर रूप धरा उर माहीं ।**
**दीर्घकाल नित जतन कराही ।।१०७।।**

भावार्थ- सत्य स्वरूपस्थ सर्वत्र व्यापक सद्गुरूंच्या स्वरूपाला ध्यानामध्ये पकडून हृदयात धारण करणे म्हणजेच त्याच्या (परमतत्त्वाच्या) प्राप्तीचे मूळ साधन होय. ते रूप सहजपणे पकडीत येणारे नाही. व म्हणून या दिशेने निरंतर प्रयत्न केला पाहिजे.

**चौपाई- परसत पद उर प्रेरक जागा ।**
**तब सागर सिधि सब दुख भागा ।।१०८।।**

भावार्थ- हृदयात सुप्तावस्थेत असणारे प्रभू प्रेरक बनून जेव्हा जागृत होतात आणि साधकाच्या हृदयाचा लगाम जेव्हा आपल्या हातात घेतात तेव्हा भवसिंधूच्या मंथनाची

क्रिया पूर्ण सफल होते. चतुर्दिक सफलतेचा अनुभव आल्यानंतर संसारसिंधूतून समस्त रत्ने प्रगट होतात आणि याबरोबरच समस्त दु:खांचाही अंत होतो. आणि मग ईश्वराच्या प्रेमवृष्टीमध्ये आत्मा न्हाऊन निघतो.

**दोहा- सागर मन्थन जोग जन, जन जीवन आभास ।**

**गुरुवर की सुधि ना मिली पुनि जग नरक निवास ॥१६॥**

भावार्थ- सद्गुरूला मनाने पकडताच म्हणजेच मनमानसात सद्गुरूंचे वास्तव्य होताच भक्ताला सागरमंथनाची योग्यता प्राप्त होते. आणि त्या क्षणीच भक्त व भगवंतामध्ये अनन्येतेचा भास प्रदर्शित होऊ लागतो. जर अशा साधकाला सद्गुरूची कृपा प्राप्त झाली नाही तर त्याला पुन्हा या नरकीय जगाच्या बंधनात वास्तव्य करणे भाग पडते.

गुरूच्या या महानतेचे वर्णन करताना कबीरांनी त्या भगवान गोविंदापेक्षा गुरूकृपा श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.

**गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागूँ पांय ।**

**बलिहारी गुरु आपने, गोविन्द दियो बताय ॥**

**चौपाई- योग प्रभाव ईश अवतारा ।**

**विषय प्रभावित तन विस्तारा ॥१०९॥**

भावार्थ- योगाच्या प्रभावानेच त्या ईश्वराचा म्हणजेच अंत:प्रेरक कासवाचा अवतार होतो. विषयासक्त पुरुषसुध्दा अतीव श्रध्देने त्यांना पाहू शकतो. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवावी की हा प्रसंग वेगळा आहे कारण या अवतरणाचे आद्योपान्त मूल माध्यम सद्गुरूच आहेत. योगाच्या सूक्ष्म जागृतीचे एकमात्र माध्यम म्हणजे सद्गुरू होय. आणि हे अबाधित सत्य आहे.

त्याच्या उग्दमासाठी सद्गुरूची कृपा अपेक्षित आहे. उदाहरणार्थ 'मानसा'मध्ये धनुष्यभंगाचे प्रकरण उल्लेखनीय आहे. यज्ञशाळेत उपस्थित असलेल्या देश-देशान्तरीच्या प्रबल पराक्रमी राजांनी आपापल्या इष्टदेवाचे स्मरण करीत धनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला; पण ते धनुष्य उचलणे व तोडणे तर दूर राहिले; परंतु ते रेषमात्रही त्यांच्याकडून हालू शकले नाही.

**परिकर बाँधि उठे अकुलाई, चले इष्ट देवन्ह शिर नाई ।।**

**रहेउ चढाउब तोरब भाई । तिल भर भूमि न सके छुडाई ।।**

ते धनुष्य ते कसे हलवू शकणार? कारण त्यांचा सारा मार्ग-प्रयास कामनांनी युक्त असणारा आहे-

**डिगइ न शंभु शरासन कैसे ।**
**कामी बचन सती मन जैसे ।।**
**सब नृप भये जोग उपहासी ।।**
**जैसे बिनु विराग संन्यासी ।।**

परंतु पावन सद्गुरूच्या आज्ञाधीन असणाऱ्या भगवान रामांनी अत्यंत सहजतेने तो भवचाप तोडून टाकला.

**गुरुहिं प्रणाम मनहिं मन कीन्हा ।**
**अति लाघव उठाय धनु लीन्हा ।।**
**तेहि क्षण राम मध्य धनु तोरा ।**
**भरे भुवन रब घोर कठोर ।।**

चित्ताचा लय होताच चेतनेचे स्वरूप प्रगट होते आणि ते व्यष्टीला समष्टीमध्ये विलीन करते.

विषयासक्त लोकदेखील आपल्या उच्चप्रतीच्या भावांनी- श्रध्देने ती उंची पार करू शकतात, पण पराभक्तीच्या द्वारा प्रत्यक्ष स्थिती प्राप्त करण्यात फक्त ज्ञानी भक्ताचीच पारख होते- तोच त्या कसोटीला उतरू शकतो. पराभक्तीची पराकाष्ठा म्हणजे ज्ञान-गरिमा प्रदायक व चरमोत्कृष्ट स्थिती होय. यासाठी पाहा-

**चौपाई- कच्छप हरि अवतार कहानी ।**
**भक्ति प्रभाव लखत विज्ञानी ।।११०।।**

भावार्थ- कूर्मावतार म्हणजे समस्त सृष्टीमध्ये चेतनेचा संचार करणाऱ्या त्या श्रीहरीचीच स्वत:ची कहाणी होय. पराभक्तीच्या अवस्थेमध्ये ज्ञानीजनांना त्या स्वरूपाचा

आभास होतो. ईश्वराला प्रत्यक्ष जाणणे याचेच नाव ज्ञान होय. भक्तिपूर्ण व विमल बुध्दीने प्रेरित असणारेच त्या ज्ञानाच्या कसोटीवर उतरत असतात.

जोपर्यंत पूर्वजन्मातील पुण्य आणि पुरुषार्थ जागृत होत नाहीत तोपर्यंत हृदयदेशात सद्‌गुरूचा पदरव होत नाही; तोपर्यंत कूर्मावतार शक्य असत नाही. गोस्वामींचे पुढील वचन पहा:-

**पुण्य पुन्ज बिनु मिलहि न सन्ता ।**
**सत सँगति संसृति कर अन्ता ।।**
**चौपाई - सब दिन सबहिं काल विधि पूरी ।**
**योग-युक्ति-अनुराग न दूरी ।। ११ ।।**

भावार्थ- प्रत्येक देश, काळ परिस्थितीमध्ये या अवताराचा विधी नेहमी एकरस म्हणजेच पूर्ण असतो कारण एकमात्र असणाऱ्या इष्टाच्या प्रती असणाऱ्या प्रेमालाच अनुराग असे म्हटले जाते. युगधर्माचा कोणताही प्रभाव याच्या समोर क्रियाशील नसतो. योग, युक्ती आणि अनुराग यांचा त्रिवेणी प्रवाह जर अंत:करणात प्रवाहित असेल तरच तो प्रभू प्रत्यक्ष प्रगट होणार. परंतु जेव्हा अनुरागपूर्ण हृदयात अनुभवी गुरूचे निर्देश प्राप्त होऊ लागतात तेव्हाच युक्ती काम करू  लागते.

**चौपाई- समरथ सम करि जग हरि राखा ।**
**ईश-अनीश न जीवन भाखा ।। १२ ।।**

भावार्थ- अर्थात ही सफलता स्वरूपस्थ महापुरुषाची कृपा झाली तरच शक्य आहे. जेव्हा त्यांचे चरण-रज ध्यानामध्ये पूर्णपणे ठसतील तेव्हाच हे यश- ही प्राप्ती सहज होईल. हरिनामामध्ये समत्व स्थापन करणारे हेच सद्‌गुरू होत ज्यांच्या ज्ञान रश्मीने व्दैताचा अंधकार नष्ट होतो. सद्‌गुरूच्या आलोक दर्शनानेच ईश्वर अनीश्वर माया, ब्रह्म यांमधील व्दंव्द दूर होते आणि मग साधकाला ती अवर्णनीय स्थिती प्राप्त होते.

**चौपाई- तिन प्रगटा भव हरण सहारा ।**
**अनायास गहि बाँह उबारा ।। ११३ ।।**

भावार्थ- ब्रह्मवेते, समर्थ सद्‌गुरूच हे भवभय दूर करणारे आहेत. परम कृपाळू ते सद्‌गुरूच (उर-प्रेरक) सुयोग्य-सुपात्र मनुष्याची बाही पकडतात म्हणजेच त्याच्यावर कृपा करतात. त्यांच्या आधारानेच पथिक हा अथांग भावसागर हळूहळू पार करू शकतो.

**चौपाई-जन उर सम्भव विमल कहनि ।**

**दरस-परस जे आज्ञा मानी ।। ११४ ।।**

भावार्थ- जो श्रीहरीला समर्पित होऊन त्याच्या प्राप्तीसाठी अत्यंत आर्त आहे अशा भक्तजनांच्या हृदयातच अवतार प्रगटत असतो- निर्माण होत असतो. अंतर्देशात घडणारी ही विवेकमयी विमल अशी कथा आहे. या स्वरूपाचे दर्शन तसेच आदेश त्याच पुरुषांसाठी आहे जे आज्ञाधारक आहेत, जे सतत प्रयत्नशील आहेत.

**आज्ञा कि विधि दूसर नाही**

**उर अन्दर हरि सर्व सुनाही ।। ११५ ।।**

भावार्थ- साधकाच्या आत्म्यामध्ये जागृत होऊन तेथून शब्द संचार करीत प्रभू त्याला समजावत पुढे नेतो. या प्रकारे क्रमश: स्थितींमधून नेत नेत ते प्रभू त्याला आपल्या स्वरूपात नेऊन उभा करतो. जेव्हा तो प्रभू आत्म्याशी अभिन्न होऊन जातो तेव्हा प्राकृतीमधील प्रत्येक वस्तूच्या माध्यमातून तो बोलू लागतो.

ही चर्चा ऐकल्यानंतर मी पूज्य गुरूदेवांना विचारले की भगवंत खरोखरच बोलतात का ? त्यावर गुरुदेव म्हणाले ''हो भगवंत तर तास न तास बोलत राहतात ध्यान मात्र लावले पाहिजे. म्हणजे ते बोलतात.''

वास्तविक या व्यतिरिक्त आज्ञापालनाला दुसरा पर्याय नाही. केवळ अंतर्देशामध्ये हरी जागृत झाल्यानंतर हे आदेश साधकाला मिळू लागतात.

**चौपाई- ऐसे हरि जो बोलत नाही ।**

**साधन श्रम सुख डर महँ नाही ।। ११६ ।।**

जर असे गुरूस्वरूप प्रभूंनी अंतरंगात प्रगट होऊन मार्गदर्शन केले नाही तर पाथिकाचे मन हताश होऊ लागते. जोपर्यंत साधकाच्या साधनेचे मूल्यांकन परमेश्वराच्या

दिग्दर्शनाप्रमाणे होत नाही तोपर्यंत साधकाला ती साधना भाररूप वाटते आणि मग त्याचे दिवस सुखमय राहात नाहीत.

**चौपाई-सदगुरु छवि राखहु उर अंतर ।**
**अनुभव गम्य ज्ञान गुण मन्तर ।। ११७ ।।**

भावार्थ- परम कृपाळू सद्गुरूच्या तत्त्वदर्शी स्वरूपाला आपल्या हृदयात ठसवून ठेवा. त्यांनी केलेल्या निर्देशांना आधार मानून अनुभवाच्या बाबतीत चाला. काही दिवसांच्या आंतरिक शुद्धीचा परिणाम हा होईल की साधकाची सत्यान्वेषणी बुद्धी, ज्ञान आणि गुणांचा मंत्र देणाऱ्या समर्थ पुरुषांच्या अनुभवगम्य श्रेणीमध्ये त्याला आणून ठेवील.

**चौपाई- प्रथम प्रवेश मिलहि गुरुमाही ।**
**जे अनुभव पर राह धरहि ।। ११८ ।।**

भावार्थ- या परमतत्त्वाची प्राप्ती करून देणाऱ्या चिंतन पथावर, सर्वप्रथम सद्गुरूची सोबत प्राप्त होते; जी प्रारंभापासून पूर्तिपर्यंत साधकाच्या अंतरंगात प्रवेश करून त्याला पथ संचलनाबाबत मार्गदर्शन करते. सद्गुरू अनुभवाच्या द्वारे साधकाला मनातच प्रेरणेचा उपदेश देऊन त्याला परमपथावर चालवतात. परमार्थ पथाचे मार्गदर्शन करणारे सद्गुरूच एकमात्र मूल आधार आहे.

गुरूच्या कृपेचा प्रभावच इतका विलक्षण आहे की शिष्य कृपापात्र बनताच आत्मोन्नतीच्या शिखरावर तो पोहचतो. सद्गुरूंच्या चरणांची पावन धूळ विवेक चक्षूंना स्वच्छ-निर्मळ करण्यासाठी अपरिहार्य आहे. संत तुलसीदासांच्या शब्दांत पाहा-

**गुरु-पद-रज मृदु मंजुल अंजन ।**
**नयन अमि दृग-दोष-विभंजन ।।**
**तेहि करि विमल विवेक विलोचन ।**
**बरनउँ राम चरित भव मोचन।।**
**गुरू के बचन प्रतीति न जेहीं ।**
**सपनेहुं सुगम न सुख सिधि तेहीं ।।**

**दोहा-गुरु रूठे पर हरि नही,**
**गुरू नही रूठन योगो**
**गहि राखे उर बीच में,**
**उर अवतरिया भोग ।। १७ ।।**

जर असे सद्गुरू मनाच्या जडतेमुळे साधकाला संभाळू शकले नाहीत, त्याच्यावर रागावले तर अशा स्थितीत असावध साधकांना श्रीहरीपण सहारा देत नाहीत आणि जर गुरू साधकाला सोबत-मार्गदर्शन करण्याचेच बंद करतील तर अशा अवस्थेत हरी राहतच नाही. परंतु महत्वाची गोष्ट ही आहे की गुरू कधी रागवत नाही. ते नेहमी दीनांच्या त्रुटी-दोष पोटात घालत असतात. ते साधकाच्या मानसिक प्रवाहाला ह्रदयात थांबवून ठेवतात. एवढेच नव्हे तर त्याच्या ह्रदयदेशात त्या अवताराच्या कार्य समूहाचा विस्तार करीत प्रेमरूपी प्रसाद वाटतात.

**दोहा-विमल विवेक विरति मति,**
**जे सतगुरु आधीन ।**
**ते जन पावन आतमा,**
**परमानन्द प्रवीन ।। १८ क ।।**
**वहॉ न जनमे ना मरे,**
**ना वहिं कलि विस्तार ।**
**व्यापक ब्रह्म स्वरूप सोइ**
**स्वात्म सृष्टि निस्तार ।। १८ ख ।।**

भावार्थ- जे पवित्र बुद्धीचे विरक्त साधक आपल्या ध्यानाचा दोर सद्गुरुच्या चरणाशी बांधतात ते चतुर पथिक स्वात्मला परमात्म्यामध्ये लीन करून परमानंदामध्ये कायमचे निमग्न राहतात. तेथे ना जन्म असतो ना मृत्यू, ना सुख असते ना दु:ख, तेथे ना यमराज पोहचू शकतो ना कलियुगाचा विस्तार ! अशा अवस्थेला पोहचलेले साधक स्वात्म सृष्टीला परमात्म्यांच्या रंगात दंग करून व्यापक ब्रह्माच्या शाश्वत रूपात स्वयं स्थिर होतात.

**सोरठा-विमल भोग अवतार,**
**तहँ यम कलि कर गम नही ।**
**सपदि उतारे पार,**
**विपद पुकारे नर हरी ॥ १ ॥**

भावार्थ- अवतारातील उपभोग सर्वथा निर्दोष व निर्मळ असतात. तेथे कलियुगाची व यमराजाची गती नष्ट झालेली असते. तर वर्णिलेली जागृती असेल तर ती अवतारित सत्ता (भगवान) त्वरित व निश्चितपणे साधकाला भवसागर पार करवते. सांसरिक विषयांमध्ये ज्यांना विपत्तीचे ज्ञान होते ते असह्य विपदांनी संत्रस्त होऊन त्या प्रभूला पुकारतात. अशा भाग्यशाली लोकांसाठी श्रीहरीचा अवतार असतो.

**सोरठा- संस्कार दे साथ**
**तब गुरू की महिमा बनी ।**
**सबके समरथ राम**
**तेहि बल सब जीवन**

भावार्थ- अनेक जन्मांचे शुभ संस्कार जेव्हा उघडपणे साथ देतात तेव्हाच आम्ही त्या दयाळू गुरूचे बनून जातो. वास्तविक प्रत्येकाच्या आत्म्यामध्ये त्या परम समर्थ श्रीरामाचे स्वरूप लपलेले असते. त्या रामाचा आभ्यन्तरिक प्रश्रय प्राप्त करणारा आत्मा या जगामध्ये असूनही ते धनवान आहेत. प्रत्येक मानवाला त्या भगवंताची प्राप्ती करून घेण्याचा अधिकार आहे. जर गुरूची अल्पमात्र जरी सोबत प्राप्त होईल तर अनेक जन्मांच्या येरझाऱ्यांपासून निर्बल पथिक पण साधन क्रमात संयुक्त होऊन स्वरूपात प्रवेश मिळवू शकतो.

॥ॐ॥

# मत्स्यावतार

कथा-कहाण्यांच्या माध्यमातून या जगातील नाना प्रकारची सत्ये, रहस्ये तसेच सिद्धांत सांगण्याची परंपरा प्राचीन आहे. सामान्य गोष्टींपासून मोठ्या गोष्टींपर्यंत कथांचा-कहाण्यांचा आधार घेतलेला दिसून येतो. कारण अगदी स्पष्ट आहे- कथा कहाण्यांचा परिणाम मनुष्याच्या मनावर लवकर होतो. त्यामुळे सृष्टीच्या विकासाबरोबरच मानवाचा कथासाहित्याशी संबंध जुळला गेला आहे. त्यामुळे गोष्टी ऐकणे व सांगणे ही मानवाची प्रवृत्ती बनली आहे. त्यामुळेच मनुष्याला प्रभावित करण्याचे हे एक प्रभावी साधन बनले आहे आणि कहाण्यांच्या स्वरूपात परिवर्तन होत असूनही त्यांचा प्रभाव अबाधित आहे.

आत्मदर्शी- तत्त्वदर्शी, तपोधन महात्म्यांनी गुढातिगूढ तत्त्वे, सृष्टीतील रहस्ये तसेच ब्रह्माच्या सत्तेला स्वानुभूतीच्या प्रकाशात या माध्यमातूनच व्यक्त केले आहे. परमार्थ मार्ग समजावून सांगण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या कथा रचल्या आणि विविध घटनांचे मौलिक सृजन केले. रूपकांच्या व प्रतिकांच्या आधारे अध्यात्म तत्त्व त्यांनी आमच्या समोर ठेवले. गूढ गोष्टींचे विवेचन कथानकांच्या माध्यामातून सरळ, सुंदर व हृदयग्राहि होते व म्हणूनच महात्म्यांनी अध्यात्म क्षेत्रात या कथा-कहाण्यांचा आधार घेतला.

ज्या तप:पूत ऋषींनी या कथा निर्माण केल्या, त्यांचा हेतू परमार्थ पथ समजावून सांगणे, स्पष्ट करणे हा होता. अध्यात्म समजावून सांगणे हेच त्यांचे ध्येय होते. पण कालांतराने या कथा-कहाण्यांचा उपयोग लौकिक प्राप्तीसाठी करण्यात येऊ लागला व त्याच्या मागे असणारा महान हेतू दबला गेला. त्या मागील रहस्य-हेतू डावलला गेला - दुर्लक्षित झाला.

मत्स्यावताराचे रहस्य समजून घेण्यापूर्वी एक प्राचीन कथा उदाहरण म्हणून येथे घेऊन वरील गोष्ट तपासून घेणे किंवा मूळ विषय स्पष्ट करणे उचित ठरेल. महाराज परिक्षित एका महात्म्याच्या शापाने प्रपीडित झाले. त्यामुळे व्यासपुत्र अवधूत शुकदेवाकडून कृपा प्रसादरूपी 'भागवत' त्याला ऐकावयास मिळाले. त्यामुळे राजाचे कल्याण झाले. कालांतराने भागवत कथन करणे हा पंडितांचा पेशा बनला आणि

कथेमागील रहस्य स्पष्ट करण्याचा हेतू गौण बनला. कालांतराने एका राजाने स्वत:चे कल्याण व्हावे म्हणून इच्छा व्यक्त केली. शेकडो विद्वानांनी राजाचे कल्याण व्हावे म्हणून भागवत कथेची व्यवस्था केली. राजाने कथेची सामग्री जमवली, द्रव्य जमवले व तो भागवत कथा ऐकण्यासाठी बसला. कथा समाप्त झाली; पण राजाचे कल्याण झाले नाही. हर्ष, शोक, भय हे विकार तसेच राहिले. आशा-तृष्णा यांचा वेग यथावत् राहिला. राजाला फार राग आला. त्याला वाटले की पंडितांनी त्याच्याभोवती षड्यंत्र रचले आहे. त्यामुळे त्याने सर्व पंडितांना तुरुंगात डांबले. पुन्हा त्यांनी अशा प्रकारचे षडयंत्र रचून त्याचा प्रसार करू नये असे राजाला वाटत होते. राजाने अनेकदा भागवत ऐकले पण त्याचे कल्याण झाले नाही. परिणाम असा झाला की तुरुंगातील विद्वानांची संख्या वाढू लागली. शेवटी अनिच्छेने पुरोहिताकडून (कुल-गुरुकडून) कथा ऐकली; पण कथा समाप्त होताच कुलगुरुला मात्र तुरुंगाची हवा खायला जावे लागले. कुलगुरूच्या मुलाला ही गोष्ट समजली. तेव्हा तो राजाजवळ गेला आणि म्हणाला, " राजन, मी आपल्या कल्याणासाठी प्रयत्न करेन. मला फक्त एक तासासाठी आपले राज्य द्या." राजाने मुलाचे म्हणणे ऐकले. त्याने आपला राज-पोशाख उतरवला व सिंहासनावरून उतरून खाली जाऊन बसला. सिंहासनावर कुलगुरूचा मुलगा विराजमान झाला. त्याने लगेच मंत्र्याला हुकूम सोडला, "या भूतपूर्व राजाला खांबाशी बांधा". मंत्र्याने आज्ञेचे पालन केले. सिंहासनरूढ मुलाने दुसरा आदेश दिला-"अमुक नावाच्या पंडिताला (आपल्या पित्याला) बाहेर काढा आणि राजाच्या बाजूला असणाऱ्या खांबाला बांधून टाका. आज्ञेचे पालन केले गेले. कुलगुरूला खूप राग आला. राजाने वेडेपणाने सर्व ब्राह्मणांना तुरुंगात डांबले, पण त्याच्या पुत्रानेपण तसेच करून पित्याला बांधले. तो थोडा वेळ बडबडत राहिला. जेव्हा तो शांत झाला तेव्हा मुलगा म्हणाला,-"पुरोहितजी, राजाची दोरी सोडा." यावर पुरोहित म्हणाला "तू मला बांधले आहेस, माझे हातपाय हलू देखील शकत नाहीत आणि तू मला राजाची दोरी सोडायला सांगत आहेस. तुला वेड तर लागले नाही ना ?"

मुलगा मग राजाला म्हणाला, "आपणच पुरोहितांची दोरी सोडा. आपण तर राजे आहात. काही युक्ती शोधून काढा".

यावर राजा उत्तरला, "मुला मलापण तू बांधलेले आहेस. तेव्हा मी तुझ्या पित्याची दोरी कशी सोडू?

शेवटी ब्राह्मण पुत्राने दोघांची दोरी सोडण्यास आदेश दिला. राजा पुन्हा आपल्या सिंहासनावर आरूढ झाला. मग ब्राह्मण पुत्र राजाला म्हणाला-''राजन् पंडित स्वत:च मोहपाशात जखडलेले आहेत, आपल्या परिवारासाठी रात्रंदिवस भलीबुरी कामे ते करीत आहेत, मायापाशात ते फार गुरफटलेले आहेत मग तुम्हाला ते बंधमुक्त कसे करतील? महाराजा परीक्षितानी ज्या शुकदेवांकडून कथा ऐकून स्वत:चे कल्याण केले ते शुकदेव परम विरक्त असे महापुरुष होते. तुम्हीदेखील अशा विरक्त महापुरुषाकडून कथा ऐका व आपले कल्याण करून घ्या''.

राजाला ही गोष्ट पटली व राजा अशा महापुरुषाच्या शोधात लागला. या कहाणीमधून पूर्णप्राप्तीवाल्या महापुरुषांचा शोध घेण्याची प्रेरणा मिळते आणि याच हेतूचा या कथेमध्ये निर्देश आहे. परंतु खूप कमी लोक या गोष्टीचा विचार करतात. ही फक्त एक कथाच राहिली. याच प्रकारे अवताराबाबतपण कथा आहे. त्या परम प्रभूला कशा प्रकारे प्राप्त केले जाईल, त्या व्यापक ब्रह्माचा अवतार आपल्या अंतर्देशात कसा होईल यांसंबंधित उपाय व साधनें या कथेमध्ये सांगितली आहेत.

मत्स्यावतार देखील एक शुद्ध रूपक आहे. समुद्रामधून एक छोटासा मासा बाहेर आला व मनूला म्हणाला ''आमच्या कुळामध्ये असा रिवाज आहे की मोठे व शक्तिमान मासे लहान आणि निर्बल माशांना खाऊन टाकतात. तेव्हा आपण माझे रक्षण करा. चराचराचा राजा मनूने त्या माशाला एका घड्यात ठेवले. घडा लहान पडताच त्याने त्याला तलावात सोडले व तेथे त्याची काळजी घेतली. तेथेही माशाची सतत वाढ होत राहिल्याने त्याला तलावपण कमी पडू लागला, तेव्हा मनूने माशाला गंगेच्या विस्तृत प्रवाहात सोडले. नंतर गंगेचे स्थानही कमी पडू लागल्यानंतर महाराज मनूने त्याला समुद्रात सोडण्याची व्यवस्था केली.

समुद्रप्रवेशानंतर मत्स्य म्हणाला-''राजन, आता मी निर्विघ्नपणे येथे राहीन. महाप्रलयाची वेळ येऊन ठेपली आहे. आपण एका नावेत सृष्टीचे कल्याणकारी बीज व सप्तर्षींना घेऊन अगदी निश्चिंतपणे त्यात बसा. नावेला एक मजबूत दोर बांधून ती माझ्या मस्तकावरील शिंगाला घट्ट बांधा. चराचरा-सहित त्रैलोक्याचा नाश करणारा तो महाकाल प्रगट झाल्यावर मी आपल्याला निर्दोष, अजर, अमर व शाश्वत स्थिती प्रदान करून पूर्णतेमध्ये स्थिर करेन.''

मनूने तसेच केले. त्यानंतर मत्स्य हजारो वर्षे मनूला परमार्थाचा उपदेश देत राहिला. कथानकामध्ये निर्दिष्ट केले आहे की त्या मत्स्याची गती निसर्गातील तीव्रतम गती असणारे प्राणी किंवा इतर माध्यमांहून अधिक होती. वायू, प्रकाश इत्यादीच्या गतीपेक्षाही त्याची गती अधिक होती. त्या गतीने जाऊन मत्स्याने नावेला हिमालयापर्यंत पोहचवले आणि त्या नावेला हिमालयरूपी शृंगाशी बांधून टाकले. मत्स्याने राजाला पुन्हा धीर दिला आणि तो अदृश्य झाला. थोड्या कालावधीनंतर महाप्रलयाचे ते दृश्य शाश्वत शांतीत बदलले. मनूने पुन्हा या कल्याणकारी बीजांना इकडे तिकडे चौफेर अंकुरित केले.

मनू!- मन हेच मनू आहे जे स्वयं सृष्टीची रचना करणारे आहे. ज्या महापुरुषांनी या मनाला वश केले त्यांनीच संसाराचा क्रम रोखला आहे. ''मन ही आये जगत बनाके, ऊँच-नीच तन पाया रे ''

या संसाररूपी समुद्रात अनंत योनींचा व्यवहार सुरू आहे. मन आणि इंद्रियांच्या आधोमुखी अशा अनंत प्रवृत्ती तेथे आहेत. या प्रवृत्ती म्हणजेच खोल खंदक व खड्डे आहेत. मन आणि इंद्रियांच्या ऊर्ध्वमुखी प्रवृत्ती म्हणजे निर्मलता व निवृत्तीच्या प्रतीक आहेत. बाकी अधिकांश प्रवृत्ती या संसाररूपी सागरात बुडणाऱ्या आहेत. परंतु एखाद्या काळामध्ये ''राम भक्ति जल मम मन मीना'' अशी इष्टोन्मुखी प्रवृत्ती प्रगट होते जी भक्तिरसात सुख मानणारी असते. ही मानसिक प्रवृत्ती म्हणजे मत्स्य होय. भक्तीच्या अल्प प्रवृत्तीला मायावी प्रवृत्ती खाऊन टाकतात, नष्ट करतात. म्हणून तर त्या दुर्बल मत्स्याने मनूला आपले रक्षण करण्याची विनंती केली. बरोबर तशीच स्थिती भक्ताच्या हृदयात होत असते. इष्टोन्मुखी प्रवृत्ती जागृत होताच भावविभोर भक्त स्वतःच आपल्या रक्षणाची विनंती करतो-''हे मना अनंत मायावी मनोवृत्तीपांसून (अनेक मत्स्यांपासून) वाचल्याने ही थोडीशी भक्तीची भावना मनात जागृत झाली आहे. म्हणून या मंतव्याच्या (मत्स्याच्या) रक्षणाची व्यवस्था करा.

रक्षणकार्याच्या प्रारंभी मनू या इष्टमयी प्रवृत्तीला घड्यामध्ये ठेवतो. येथे हृदयाला घट म्हटले आहे. अर्थात, मनू या प्रवृत्तीला हृदयात चांगल्या प्रकारे प्रवाहित करतात. हृदयातील दीर्घकाल सफल वास्तव्यामुळे हा मत्स्य (प्रवृत्ती) पुष्ट होतो आणि मग तो त्यागरूपी तलावात पडतो व त्यागाची पूर्णता प्राप्त करतो आणि पुरुषाला त्याग प्रधान

बनवतो. आता त्याग-पालनाची प्रक्रिया ठोस बनली. आता त्यात कसली अपूर्णतां नाहीं. ज्याचा संकेत ''मत्स्य तलावाच्या कानाकोपऱ्यात ठासून भरले गेले'' याच्या कडे आहे.

हृदयातील प्रवेशामुळे मनामध्ये ज्ञानाचे प्रस्फुटन होते. ''ज्ञान गंगा नहा ले प्यारे मना''. मनूच्या सहयोगाने अर्थात मनाच्या पूर्ण सहयोगामुळे थोडीशीही 'गळती' न होता ही मनोवृत्ती ज्ञानामध्ये प्रवाहित होते आणि ज्ञानाच्या व्यापकतेबरोबर क्षीर सागरात प्रविष्ट होऊन त्याचेच रूप घेते. हा क्षीर सागर म्हणजे ईश्वराचा विहार आहे, ईश्वराचे निवास-स्थान आहे. लक्षात ठेवा की एका बाजूला संसार सागर आहे तर दुसऱ्या बाजूला क्षीर सागर म्हणजे ईश्वरमय सागर स्वरूप आहे. संसार सागर मापता येतो; परंतु ईश्वरमय सागर मापता येत नाही. तो अनंत आहे. ईश्वराच्या निवासाच्या व्यापक उपलब्धीमध्ये मनोवृत्ती देखील पूर्णतेला पोहोचून अचल बनतात. इष्टोन्मुखी प्रवृत्ती त्या सागराच्या संयोगाने ईश्वरमयी लहरींमध्ये परिवर्तित होतात की ज्यामध्ये तिन्ही लोकांचा सामान्य आधार तसेच प्रसारण केंद्र जी पृथ्वी ती बुडून जाते. म्हणजेच संस्कारांच्या अंकुरांचे हृदयस्थान बुडून जाते.

मत्स्याच्या कृपेमुळे उपलब्ध असणाऱ्या नावेत सप्तर्षींसह मनू स्वत:ही बसले. क्रमश: सात टप्प्यांमध्ये ऋषित्वाची प्राप्ती म्हणजे सप्तर्षी होय. योग चिंतनाच्या सात भूमिकांमध्ये ऋषित्व प्राप्त करणारा पुरुषच नियमाच्या कसोटीवर चढू शकतो. नियम म्हणजेच नौका होय. शुभाशुभाचा अंत करणाऱ्या या नियमांप्रमाणे चालणे व योगाच्या सात अति सूक्ष्म भूमिकांमध्ये ऋषित्व प्राप्त करणे त्या ''उर प्रेरक'' प्रभूची देणगी होय. मनाच्या इष्ट चिंतनमय प्रवृत्तीमध्ये प्रेरकाच्या स्थानी स्वयं भगवान अवतरित होऊन उभे आहेत. भजन कितीही करा परंतु जोपर्यंत परमात्मा इष्टमयी प्रवृत्तीचे संचालन करीत नाही तसेच आपल्या स्थितीमध्ये जोपर्यंत त्याच्या हृदयाला एकरूप करीत नाहीत तोपर्यंत त्या ब्रह्माला समजून घेता येत नाही. अर्थात मानसिक प्रवृत्तींमध्ये सर्वत्र प्रेरकाच्या रूपामध्ये इष्टदेवाचे अवतारित होणे अनिवार्य आहे व तोच मत्स्य होय. मानसिक प्रवृत्तीचे प्रतीक असणारा तो मत्स्य परमात्म स्वरूपात संचलित आहे, यासाठी त्याला अवतार म्हटला जातो.

प्रेरकाच्या रूपात अवतारित असणारा तो प्रभू जेव्हा एखाद्या भक्ताला (अनुरागीला) घेऊन चालतो तेव्हा हजारो मानसिक प्रवृत्तींमध्ये असणारा रससंचार

जोपर्यंत त्याचा अंत होत नाही तोपर्यंत चालत असतो. यात्राकालात तो इष्टदेव असणारा मत्स्य निरंतर ब्रह्माचा उपदेश देत राहीला म्हणजे तो इष्टदेवच अनुरागी भक्ताला बरोबर उपदेश देत असतो. तेव्हा समजते की हाच यथार्थ उपदेश आहे. साधारणत: महाराजपण याच सामर्थ्यावर भर देत असत ''हरो.... भगवान पढाया करत है । मोके भगवान पढावत है, तोहूँ के पढै है ।'' अर्थात आपली स्थिती समजावत असतात. मनातील हजारो प्रवृत्तींचा अंत करून त्या आराध्याने त्या नावेला हिमालयाच्या शिखराला बांधले म्हणजे मानसिक शुभाशुभमध्ये संचारित संपूर्ण प्रवृत्तींची यात्रा पार केल्यानंतर अचल, शाश्वत ब्रह्मामध्ये समाहित होतात. हिमालय ब्रह्माचे द्योतक आहे. या हिमालयाला स्थिर पाहून ब्रह्माला वास्तविक अचलतेकडे इंगित केले गेले. हिमालय शांत आणि शीतल ब्रह्माचे प्रतीक आहे. सर्वत्र ब्रह्ममयता तर आली होती, सर्वत्र दिसत होती; पण पाहणारा बाजूला उभा होता त्यामुळे विलीनतेची अंतिम स्थिती म्हणजे हिमालयाचा अंतिम स्पर्श होय आणि त्याच्यामध्ये बध्द होणे होय- हिमालय म्हणजे अचल, शांत, शीतल व स्थिर अशी सत्ता होय; जिला ब्रह्म असे म्हटले आहे- तिच्यात विलीन होणे होय. वास्तविक त्या अचल ब्रह्मामध्ये पूर्णपणे विलीन झाल्यावर, त्याच्यात समाहित झाल्यावर प्रेरकपण अदृश्य होऊन जाते. कारण आता की कोणती भिन्न सत्ता राहिलेली नाही मग प्रेरणा कोणाला द्यायची?

**''सुरसरि मिले सो पावन कैसे ।**
**ईस अवनीसहि अन्तर जैसे ''**

या एकत्वामध्ये द्रष्टापण वेगळा राहिलेला नाही व म्हणून प्रलयकालीन दृश्यपण समाप्त झाले. लक्षात ठेवा की ब्रह्ममयताच जड चेतनसहित संपूर्ण सृष्टीला नष्ट करणारा महाप्रलय आहे. ब्रह्मामध्ये स्थिर झाल्यानंतर सृष्टी आणि ब्रह्म दोन्हीही राहत नाहीत. ते कैवल्यस्वरूप महापुरुषच फक्त शेष आहे, ज्यामध्ये-

**''ईश्वर ब्रह्म जीव अरू माया फूँक दिए संसार''**
**''बिना इंधन के परकासी''..... (लावणी)**

ज्यात तो स्वयं प्रकाशस्वरूप आणि प्रकाशक आहे. अशा महापुरुषाजवळ सृष्टीचे कल्याणकारी बीज असते. जो परम कल्याण करणारा आहे त्याच्याजवळ पतनाचे बीज असत नाही. कल्याणाचे विधान सदैव या परम स्थितीने युक्त असणाऱ्या सद्‌गुरूंशी

संबंधित असते; ज्याचे प्रतिपादन या कथानकात केले आहे. हिमालयाबरोबर बध्द झाल्यानंतर म्हणजे अंतीम स्थितीमध्ये, मनू महाराजांनी कल्याणकारी व निर्दोष बीज सर्वत्र फेकले. जो स्वयं कल्याणस्वरूपात स्थित आहे म्हणजे ज्याने आपले कल्याण केलेले आहे तोच अन्य पुरुषांचे कल्याण करू शकतो.

**नोट:**

१) *या कार्याच्या प्रवृत्तिकाळामध्ये मनूचे नाव सत्यव्रत झाले होते कारण सत्य व असत्य या दोन्ही प्रवृत्ती मनाच्या अंतरंगात आहेत; परंतु साधक जेव्हा इष्टाकडे जाऊ लागतो तेव्हा या दोन्ही प्रवृत्ती दबल्या जातात आणि सत्यव्रताची प्रवृत्ती सबल बनू लागते.*

२) *नियम म्हणजेच नौका होय जी ध्यानाच्या दोरीने व श्वासांच्या तारेने इष्टमयी मनोवृत्तीशी (मत्स्य) बांधली गेली आहे. अशा प्रवृत्तीच्या अंतरंगातच इष्ट स्वयं अवतारित होऊन गतिशील प्रवाह प्रदान करतात म्हणून हा अवतार आहे. अवताराचे स्वरूप आहे- आरंभाचा बिंदू ज्याच्यात संचालित होऊन अवताराला पूर्णत्व प्राप्त होईल. ज्याने कोणी अवताराला प्राप्त केले ते या स्वरूपातच प्राप्त केले.*

३) *अवतार- वास्तविक परम कल्याणकारी मनोवृत्ती तिलाच म्हटले जाते जी ईश्वराचा अवतार होते*

**‘‘मन बस होइ तबहि, जब प्रेरक प्रभु बरजे ।’’**

भजन अनेक जण करतात; पण ते सर्वच कल्याणकारी भजन नसते. जेव्हा त्यात प्रभूचा आविर्भाव होतो तेव्हाच ते कल्याणकारी भजन होते. त्या प्रेरकाकडून ते संचलित होताच अनुरागी साधकाची गती सर्वात वेगवान होते. ती गती साधकाला सरळ लक्ष्यापर्यंत पोहचवते आणि हे सर्वांना सदैव मान्य आहे.

# वराह-अवतार

हिरण्याक्ष- प्राचीन वैदिक भाषेत सूक्ष्म शरीराला हिरण्य असे म्हटले आहे. ब्रह्मापासून यावत् मात्र जगताला हिरण्यगर्भ असे म्हटले जाते. यामध्ये जन्म-जन्मातरांच्या संस्कारांचे 'रीळ' आहे. अर्थात मनाच्या अंतरंगात संसार स्थित आहे. 'तुलसीदास कह चिद्विलास जग बूझत बूझत बूझै ।'' तुलसीदास म्हणतात की चित्ताचा विलास म्हणजेच जगत आहे. दृष्टीला अक्ष असे म्हटले जाते. या प्रकारे संसारमयी दृष्टी म्हणजेच हिरण्याक्ष होय. हीच समस्त मायेचे मूळ आहे, आसुरी प्रवृत्तींचा उद्‌गम आहे. व म्हणून हिरण्याक्ष हा राक्षस आहे ज्याने शरीररूपी पृथ्वीला रक्त, मल-मूत्राने युक्त असणाऱ्या चराचरातील गर्भवासात फेकून दिले आहे. आणि जोपर्यंत तो ब्रह्मपथ मोकळा होत नाही- निर्दोष बनत नाही तोपर्यंत जीवात्म्याचा या दुर्गंधयुक्त पतन कुंडातून उध्दार होत नाही. व म्हणून पूर्वीच्या महापुरुषांनी उध्दाराचे जे मार्ग सांगितले आहेत त्यातला एक मार्ग आहे. वराह-अवतार.

वराह- 'व' म्हणजे परमात्मा आणि 'राह' म्हणजे रस्ता असा अर्थ आहे. ब्रह्माकडे जाण्याचा मार्ग म्हणजे वराह होय. तो परमात्मा जोपर्यंत आमच्या साधनेमध्ये उतरत नाही तोपर्यंत त्या ब्रह्मास्थित मार्गाचा म्हणजेच भजनाचा-भक्तीचा प्रारंभ होत नाही. पूज्य परमहंस महाराजांचेही असेच म्हणणे आहे की जोपर्यंत मनाला नियंत्रित करून भजनाला (ब्रह्म पथाला) प्रारंभ करीत नाही तोपर्यंत साधक उभा आहे तेथे तो प्रभू द्रवित होऊन उतरत नाही. भजन भगवान करत असतात. भगवान स्वत:बरोबर जेथे मलमूत्राचे आवरण नाही त्या निर्दोष स्थळापर्यंत चालवीत नेतात व तदाकार करतात. मग मलमूत्रयुक्त असणारे हे शरीर तसेच अनंत योनीत फिरणारी प्रकृती पुरुषत्वात विलीन होते, हे स्पष्ट करताना म्हटले आहे की वराहाने त्या मलमूत्र, रक्त पूरित अनंत योनित फिरणाऱ्या प्रकृतीला उदरस्थ केले आणि केवळ निर्मल प्रकाश निर्माण होताच तो अंतर्धान पावला. तो परमात्मा साधनेमध्ये उतरून आज्ञापालनात तत्पर असणाऱ्या व सर्वव्यापक परमात्म्याच्या ठिकाणी निरंतर ध्यान लावणाऱ्या भाविकाला स्वत:मध्ये पूर्णपणे समाहित करतो. बरोबर त्याच क्षणी त्या निरुद्ध चित्तामध्ये ज्याला सनातन परमात्मा म्हटले जाते असे परब्रह्म विकसित हा जीवात्मा परमात्माच बनतो. मग प्राप्त होण्यास योग्य कोणी

परमात्मा आता लेशमात्र शिल्लक राहात नाही, ना साधकामध्ये लेशमात्र काही शिल्लक राहते. त्याला मग सनातन, शाश्वत, सर्वत्र व्यापक, अजर, अमर व अपरिवर्तनशील सत्ता प्राप्त होते, प्रत्यक्षात उतरते. म्हणून हा अवतार अन्य अवतारांचा उपाय आहे. श्रध्दाशीलता, विरह-वैराग्यपूर्णता आणि सद्‌गुरूच्या ठायी कृपाश्रय हे अवतारासाठी प्रत्येक मानवाला आवश्यक आहे.

नोट- परमात्म्याची प्राप्ती झाल्यानंतर तो भिन्न राहात नाही- स्वयंमध्ये तो प्रविष्ट झालेला असतो. ''कै जाने जिउ आपना कैरे जानै पीव'' त्या परमात्म्याला तो स्वत:च जाणतो, कोणाला सांगू किंवा दाखवू शकत नाही. तो अनिर्वचनीय आहे, त्याचे अनुमान करता येत नाही, भक्ताला इशारा देतो व अंतर्धान पावतो. वास्तवात तो 'भूमिगत' आहे. ''सो केवल भगतन हित लागी'' असा तो असतो.

तेव्हा सतत प्रयत्न करा. योग्य वेळी यश तुम्हाला निश्चितपणे प्राप्त होईल. या मार्गात आणखी एक सुविधा अशी आहे की अनेक जन्मात थोडे-थोडे साधन केले तरी ते साधकाला कल्याणमय तेच स्थित करते. सारांश जो चालत राहतो म्हणजेच जो प्रयत्न करतो तो आपल्या लक्ष्यापर्यंत अवश्य पोहचतो.

॥ॐ॥

# नरसिंह अवतार

**जन्म कर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्वत: ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन: ।। गीता, अ ४ श्लोक ९**

अर्जुना, माझा जन्म व कर्म अलौकिक आहे. लौकिक म्हणजे पिंड रूपात येणे, म्हणजेच चर्मचक्षूंनी जे दिसते, बुध्दीने जे समजते ते लौकिक. अलौकिक म्हणजे जे मन-बुध्दीने पाहिले जात नाही, जाणले जात नाही ते. तत्त्वदर्शी महात्माच त्याला पाहू शकतो. वास्तविक त्याला जो पाहू शकतो तो या शरीराचा त्याग केल्यानंतर पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात पडत नाही. तो मला (भगवंताला) प्राप्त होतो. मग तर जे लोक भगवंताचा अवतार होईल व मग आम्ही त्याला पाहू अशा आशेने वाट पाहात आहेत तो त्यांचा भ्रम आहे. कारण कोट्यावधीमध्ये एखादाच तत्त्वदर्शी होत असतो.

नरसिंह अवतार- नर- हा मरणधर्मा मनुष्य परमात्म्याची प्राप्ती होताच हिरण्यगर्भरूपी काळाला कापून अदृश्य, सत स्वरूप असा सिंह बनतो. हा सिंह म्हणजे प्रकृतीच्या जंगलातील संरक्षण आहे आणि शरणागत, दैवी संपदेने संचालित पुरुषांचा अभयदाता आहे. प्रेमाद्वारे असेच होते. नरसिंहाची प्राचीन कथा म्हणजे याचेच रूपक आहे. हे त्या अवर्णनीय पुरुषाच्या प्राप्तीचे माध्यम आहे व म्हणून ऋषींनी याला अवतार असे म्हटले आहे. या कथेत कुठे कुठे नराचा नारायणाशी सहज संबंध आलेला असल्याने नर-नारायण अशीही त्याला संज्ञा दिली आहे. त्याच कथानकातील नराला येथे सिंहाची संज्ञा दिली आहे.

प्रेम म्हणजेच प्रल्हाद होय. हिरण्याकुश= हिरण्य + अंकुश- ब्रह्माच्या समस्त सृष्टीला म्हणजेच चराचर जगताला हिरण्यगर्भ असे म्हटले आहे. ज्यात जन्ममरणाच्या असह्य यातना आहेत. त्या सृष्टिक्रमातील शुळाला अंकुश असे म्हटले आहे. यालाच दुसऱ्या शब्दांत आम्ही कालक्रम असे म्हणतो. हा हिरण्यगर्भाचा अंकुश (शूळ) या प्रकृतीमध्ये सदैव दिलासा देत असतो. हाच भगवत् तत्त्वापासून साधकाला विमुख करतो. हिरण्यगर्भ म्हणजेच ब्रह्माच्या प्रपंचाबरोबर उत्पन्न झालेली अविद्या. हीच होलिका विषयाग्नीमध्ये साधकाला गोते खायला लावते. ती स्वत: विषयस्पर्शाने स्वत:चे रूप पुष्ट करते आणि परमात्म्यावर विश्वास ठेवणाऱ्या जीवांना जाळून टाकते. या

हिरण्यगर्भामध्ये दैवी प्रवृत्तीही आहे. देवर्षी नारदाच्या (कल्याणपथ निर्दोष करणारे सद्गुरू) उपदेशाने हिरण्याकुशद्वारा शासित दैवी प्रवृत्तीमध्ये प्रेमाचे प्रस्फुटन झाले. प्रेम म्हणजेच प्रल्हाद होय. प्रेम जागृत होताच हा हिरण्य अंकुश कालक्रमामध्ये बाधक बनून चूर चूर होऊन जातो. ''गृह कारज नाना जंजाला, ते अति दुर्गम शैल विशाला ।'' मोहयुक्त स्वजनांचे जे जाळे असते तेच या द्वैताचे विशाल आवरण तयार करते. हाच दुर्गम शैल आहे. हिरण्याकुश (काल-क्रमाचे बंधन) याच पर्वतावरून खाली पाडतो. आज तुम्ही भजन सुरू कराल तर उद्या विघ्नेच विघ्ने उभी. त्या धक्क्यामुळे प्रेमाची दोरी तुटून जाते. तो सागरात फेकतो. संसार हाच सागर आहे. तेव्हा संसृतीच्या त्या अथांग सागरात तो फेकतो. आपल्या बहिणीकडून जबरदस्तीने पकडून अग्नीमध्ये टाकतो. होलिका ही अविद्येचे प्रतीक आहे. एकाच अंत:करणात अविद्या व प्रेमाचा विस्तार असतो. त्यामुळे ही होलिका भाविकाला (प्रेमीला) पथभ्रष्ट करून जाळून टाकते. अविद्या पुष्कळ जुनी आहे आणि प्रेम हे सत पुरुषांच्या सहवासाने निर्माण झालेले नवीन प्रस्फुटन होय.

ही अविद्या प्रेमाला विषयाग्नीमध्ये ओढून घेते. परंतु इष्टाच्या संरक्षणासाठी जेव्हा प्रेमाचा प्रारंभ होतो तेव्हा अविद्या स्वत: जळून जाते कारण जेथे प्रेमाचे वास्तव्य असते तेथे अविद्या जन्य कृत्यांबाबत आसक्ती राहत नाही. हत्तीकडून तुडवले जाते ''मन-मतंग माने नही !''. मन जेव्हा कामवासनांनी युक्त झालेले असते तेव्हा मदांध हत्तीप्रमाणे दुर्जय होते. ते मनाला असमंजसपणात घालते की ज्याच्या मुळात हिरण्याकुश, हिरण्य अंकुरण असते. मनामध्ये कामाच्या जाळ्यात अडकवते. परंतु प्रेमाच्या इष्टदेवाच्या वरदहस्तामुळे त्यातून ते पार पडते. शेवटी माया स्वत: विघ्नरूप बनून उभी राहते. जेव्हा ग्रंथी सुटण्याची वेळ येते तेव्हा माया विक्राळ रूप धारण करून उभी राहते. ''छोरत ग्रन्थि देखि खगराया । विघ्न अनेक करइ तब माया ।''

स्तंभ प्रज्ज्वलित झालेला आहे व त्यावर अगदी लहान मुंगी स्तंभारूढ झाली आहे. तिला मारून टाकण्यासाठी निशाचर अजूनही उभा आहे. स्थिर श्वास म्हणजेच स्तंभ आहे- प्रेमाने संचालित असणारा स्वर इष्टच्या रूपामध्ये स्थायित्व प्राप्त करतो तेव्हा स्थायित्वालाच स्तंभ म्हटले जाते आणि मन नादान मुंगीप्रमाणे पूर्णपणे विलीन होण्याच्या स्थितीकालात अगदी सूक्ष्म होऊन जाते. त्यावेळी त्यालाच श्वासारूढ म्हटले जाते. स्तंभारूढ अग्नी दोन प्रकारचा असतो. एक विषयाग्नी आणि दुसरा ज्ञानाग्नी. ''ज्ञानाग्नी दग्ध कर्मणम '' ज्ञानाग्नी ईश्वरात प्रवेश घडवतो, कल्याण करतो आणि विषयाग्नी

जाळत राहतो आणि ईश्वराशी विमुख करून मायेमध्ये त्याला अडकवितो किंवा गुंतवून टाकतो. जेव्हा ही चित्तरूपी मुंगी स्थिर श्वासाची स्थिती प्राप्त करते व स्वर योगाग्नीने प्रज्वलीत होतो त्याच क्षणी तो परमात्मा, अलौकिक विभूतींनी युक्त परमात्मा प्रगट होतो. तो परमात्मा प्रगट होताच आसुरी प्रवृत्तींचा मूळ उद्‌गम असणाऱ्या हिरण्याच्या अंकुशाचे जाळे तुटून जाते. म्हणजेच हिरण्यकुश मारला जातो. या उपलब्धीलाच अवतार म्हटले जाते. श्वासाच्या स्थितीकाळामध्ये जीवात्मा स्व-स्वरूप प्राप्त करून सिंह बनतो. कालक्रम व आसुरी प्रवृत्तींमध्ये भरडणारा दुर्बल जीव प्रेमाच्याद्वारा पूर्णत्वाचे गंतव्य प्राप्त करून हिरण्यगर्भ काळाचा क्रम पूर्णपणे पार करून शाश्वत स्वरूपात- जो सर्वांचे रक्षण करणारा आहे त्याच्या स्वरूपात एकरूप होऊन जातो. ही अदृश्य सत्तेला प्रगट करण्याची युक्ती आहे ज्यामध्ये हिरण्यकुश म्हणजे ब्रह्माच्या विस्तृत योनीमधील नियोजित शूल म्हणजेच काळाचा क्रम अवताराचा उत्प्रेरक आहे. प्रेमद्वाराच अवताराची उत्पत्ती होत असते. भिन्न-भिन्न महापुरुषांनी भिन्न भिन्न काळात वातावरण, स्थिती तसेच परिस्थितीनुरूप भिन्न भिन्न रूपक प्रस्तुत केले आहे.

'नाद रंध्र: स: नारद' नारद एक सद्‌गुरू आहेत. नाद रंध्राची प्राप्ती ज्यांना झाली आहे त्यांनी एखाद्या महापुरुषाला प्राप्त करून घ्यावे आणि आपल्या हृदयात स्थित असणाऱ्या दैवी प्रवृत्तीला (दैवी संपत्तीला) बलवान करावे ज्यातून निर्दोष प्रेम उत्पन्न होईल. विरह वैराग्याचा उत्पत्तीकालात तुम्ही त्या सिंहस्वरूपाला पकडू शकता. स्वराचा प्रवाह ज्ञानाग्नीने ओतप्रोत स्थिर झाला की चित्ताच्या पूर्ण निरोध कालात त्याचे दर्शन नक्की होईल. आणि ही स्थिती सदैव राहणारी आहे. योग्यता प्राप्त करणे आवश्यक आहे. व ती सर्व काळात शक्य आहे. तात्पर्य बाह्य पिंडात कधी अवतार झाला नाही ना कधी होईल. आणि अशा बाह्य अवताराचा उल्लेख कोणत्याही शास्त्रामध्ये केलेला नाही.

॥ॐ॥

# अजमिलाचा उध्दार

हा आत्म्याचा उध्दार आहे. ज्याला महापुरुषांनी प्रत्येक मानवाला उपयोगी पडेल अशा गोष्टीचे रूप दिले आहे. कालांतराने भाषा, राहणी करणी तसेच मनुष्याची वृत्ती-विचार बदल्यामुळे मूळ कथानक व त्याचा हेतू अस्पष्ट होतो व ते कथानक वादाचा विषय बनते. अशा विषम परिस्थितीत महापुरुषांना पुन्हा नवीन रूप देऊन समजवावे लागते; परंतु गोष्टीचा मूळ उद्देश तोच असतो. आता आपल्या समोर आत्म कल्याणाची युक्ती समजण्यासाठी एक प्राचीन कथानक आहे- अजामिल उध्दार अज-अमल अर्थात अजर, अमर, निर्दोष आत्माच अजामिल आहे. 'गो' म्हणजे इंद्रियांचा समुदाय होय, जो संपूर्ण वासनांचा भार वाहत असतो. 'खाद्य-अखाद्य ही खाई' करण्यास योग्य-अयोग्य अशा सर्व गोष्टी करतो आणि आपला आपला विषय शोधतो. ही इंद्रिये म्हणजेच गणिका होत. ही इंद्रिये दहा-बारा भागांमध्ये विभक्त आहेत, परंतु सर्व मिळून विषयवासनेच्या संग्रहात एकाकडूनच संचालित होतात. या सर्वांचे मूळ म्हणजे मन होय आणि तेच भोग इच्छित असते. हा अजर-अमर, निर्दोष आत्माच या गणिकांच्या ('गो'च्या) आधीन आहे. नादरंध्रांची स्थिती ज्यांना प्राप्त झाली आहे त्या महापुरुष नारदांनी उपदेश केला आणि मग त्या परम कल्याणमय नारायणाबद्दल प्रेम जागृत झाले.

हा इंद्रिय समुदाय (गणिका) मायेचा मानवाचा भार वहन करणाऱ्या विषयांना वश करून मनामध्ये असणाऱ्या ध्यानाला ध्यानरूपी पोपटाला 'नारायण-नारायण' असे शिकवायला लागते. ही इंद्रियेदेखील भजनामध्ये सहयोग देण्यास सुरुवात करतात. परंतु इष्टप्राप्तीमध्ये एका दोऱ्याइतके जरी अंतर राहिले तरी इंद्रियरूपी गणिका त्याला भुलवते. दीर्घकालीन अभ्यासाचे फलस्वरूप मनाचा जेव्हा मृत्युकाळ आला तेव्हा ध्यान व नारायण हा शब्द दोन्ही तद्रूप झाले. मनाच्या विलीनीकरणाचा हा क्षणच मानवाचा वास्तविक मृत्यू आहे. ''मन आये ही जगत बना के ऊँच-नीच तन पाया'' वास्तवात मनच या जगताचा निर्माता आहे. या मनावर विजय प्राप्त केल्याशिवाय या जगातून कोणाचीही सुटका होत नाही. जेव्हा सर्व वासनांना विसरून ध्यानाची दोरी मनाकडून नारायणाशी गुंतते तेव्हा लगेचच यमराजाचे बंधन कापले जाते आणि विश्वाचे भरणपोषण करणाऱ्या परमात्म्याच्या कल्याणकारी सूत्रात बध्द होऊन आत्मा कल्याणस्वरूप बनतो. विष्णूच्या

दूताचे येणे आणि प्राण घेऊन जाणे हे हीच गोष्ट सुचवतात. ज्याला प्रत्येक क्षणी रक्षण हवे असते त्या प्रत्येक मानवाची हीच स्थिती आहे. त्याच्यासाठी ही साधना क्रमाक्रमाने बदलून त्याला सहाय्यरूप ठरते. मानवकल्याणासाठी समयानुकूल व उपयोगी व पर्याप्त असा हा साधनेचा पथ आहे.

॥ॐ॥

# गजराजाचा उध्दार

**मन मतंग मानै नहीं, जब लगि खता न खाय ।**
**जैसे विधवा नारि कोउ, गर्भ रहे पछताय ।।**

नानाविध कामनांनी लिप्त असणारे पशुवत आचरण करण्यास प्रवृत्त होणारे, महान उन्मादी आणि निर्दयतेला वश होणारे असे मनाचे स्वरूप पाहून महापुरुषांनी मनाला मदमस्त हत्तीची संज्ञा दिली आहे. गोस्वामी तुलसीदासांनीही म्हटले आहे-

**मन करि विषय अनल बन जरई ।**
**होइ सुखी जौ एहिं सर परई ।।**

मनरूपी हत्ती निरंतर विषयानलात जळत असतो. जर ब्रह्मरसाने पूरित भक्तीच्या सरी त्याच्यावर पडल्या तरच तो सुखी होईल. हे मदांध मनच पुरुषाच्या अंतरंगातील हत्ती आहे जो या भवतरीमध्ये पडलेला आहे, संसारसागरात तो डुबक्या घेत आहे. तो प्रार्थना करीत आहे की दु:सह पीडेतून सुटका कर. आता गज मुक्तता इच्छित आहे. त्याला नामजप माहीत आहे व म्हणून तो नामजपात रत आहे. जर त्याला आपण पशू मानले तर त्या योगेश्वर कृष्णाची व गोस्वामी इत्यादी सर्व महापुरुषांची वाणी खोटी ठरेल. 'कर्मानुर्बन्धाति मनुष्य लोके' योगेश्वर श्रीकृष्णाच्यानुसार मनुष्य योनीमध्ये त्याच्या कर्माप्रमाणे त्याला बध्द करणारी अहंता आणि ममतारूपी मुळे खाली आणि वर सर्वत्र पसरलेली आहेत. बाकीच्या शेष योनी केवळ भोग भोगण्यासाठीच आहेत. पशू इत्यादी योनी पूर्ण निवृत्तीस योग्य असत नाहीत गोस्वामींनी म्हटले आहे की :-

**नर तन भव वारिधि कहँ बेरो । सन्मुख मरुत अनुग्रह मेरो ।।**
**बडे भाग मानुष तन पावा । सुर दुर्लभ सब ग्रंथन्ह गावा ।।**
**साधन धाम मोक्ष कर द्वारा । पाइ न जे परलोक संवारा ।।**
**जो परन्त्र दुख पावई सिर धुनि-धुनि पछताय ।**
**कालहिं कर्महि ईश्वरहिं, मिथ्या दोष लगाय ।।**

या प्रकारे मानव तनच साधनेसाठी उपयुक्त आहे ''मनुज देह सुर साधु सराहत, सो सनेह सिय पी के''. सुर-साधु सुध्दा या मनुष्य देहाची इच्छा करीत असतात कारण कल्याणकारी प्रभूच्या चरणी या देहाद्वारे प्रेम अर्पण करता येते. गरुडराज, कागभुशुण्डी, हनुमान वानर, भालू जामवन्त ही सर्व संतांची नामे आहेत. या सर्व अनन्य भक्तांनी भजनाच्या पूर्तीसाठी असा कुवेष धारण केला होता.

**किए कुवेष साधु सनमानू । जिमि जग जामवन्त हनुमानू ।।**

या संतानी आपल्या भक्तीच्या रक्षणासाठी अशा प्रकारचा वेष परिधान केला होता. ते पशू नव्हते.

मगर हे काळाचे प्रतीक आहे. संसाराचे स्वरूप कसे आहे ते सांगताना गोस्वामी म्हणतात-

**रविकर नीर बसै तेहिं अन्दर मकर रूप तेहिं माहि ।**
**बदनहीन सो ग्रसै चराचर पान करन जे जाहीं ।।**

हा संसार म्हणजे मृगतृष्णेचा सागर आहे ज्यात एक मगर राहात आहे. त्या मगरीला शरीर नाही तरीही चराचराला त्याने ग्रासले आहे. काळ हाच तो मगर आहे जो चराचराला भक्ष्य समजून सतत त्याला ग्रासण्याचे कार्य करीत असतो. संसार सागराच्या तळाशी अडकलेले म्हणजेच मगराने ग्रासलेले मन जोपर्यंत आपली शक्ती पणाला लावून लढत असते तोपर्यंत काळाचे बंधन तुटत नाही. परंतु जेव्हा त्याचा वाचा मने-क्रमे आपल्या सामर्थ्यावरचा विश्वास उडून एका ईश्वरावर ते अवलंबून राहते. आणि मग चिंतनाची पकड, स्थिती नाममात्र शेष राहते तेव्हा मन नामामध्ये समाहित होऊन जाते. मनाच्या या नियमनामुळे परमात्मा स्वयं उतरून येतात आणि सर्वत्र पसरलेल्या त्या कालरूपी मगराचा अंत करून भक्ताचा उध्दार करतात. या भवसारितेमध्ये वाहत जाणाऱ्या मनुष्याचा वास्तवात हाच इलाज आहे जो सृष्टीकडून उध्दाराचा सदैव प्रयोगात्मक विधी-विशेष आणि मनुष्यासाठी सदैव कल्याणाचा प्रशस्त पथ आहे. सृष्टीमध्ये निर्माण झालेल्या पुरुषाची मन:स्थिती उपर्युक्त परिवेशात गजाप्रमाणे असते तसेच रक्षणासाठी तडफडपण तशीच असणार. प्रभुदर्शनाबरोबर मोक्षाची पण शक्यता असते.

या संघर्षामध्ये आणखी एक विशेषता ही होती की सहस्त्र वर्षांपर्यंत गज (मन) स्वत: लढत राहिला व शेवटी त्याने प्रभूचा धावा केला. मग इतक्या वर्षे तो जिवंत कसा राहिला? पाण्यामध्ये त्याला चारा कोठून मिळाला?

वास्तविक मनाच्या नियमनाची ही एक युक्ती आहे. चित्त सहस्त्र प्रवृत्तींमध्ये प्रवाहित झालेले असते त्याचा सतत काही ना काही धुमाकूळ चाललेलाच असतो. जसे या सहस्त्र प्रवृत्तींचा निरोध झाला, चित्त एका चिंतनात समाहित झाले, तद्रूप होऊन संपून गेले, त्याच क्षणी विष्णू (विश्वातील अणू सत्ता परमात्मा) प्रगट होऊन त्याचे बंधन कापून त्याला आपल्यात एकरूप केले. हाच उध्दार आहे. प्रभू सर्वस्वाचे हरण करून त्याला आपली स्वरूपस्थिती प्रदान करतो. व म्हणून अवतारांपैकी एक हा 'हरि' अवतार आहे.

॥ॐ॥

# अवताराचे विस्तृत दर्शन

# (१)''महापुरुष''

योगी म्हणजे अवतारात प्रवेश होय. किंबहुना योगीच अवताराचे प्राकट्य व प्रशस्तीचे मूळ माध्यम असते. परमात्म्याकडून निघालेल्या अलौकिक अवतरणाचा आरंभ याच महापुरुषांतून झालेला आहे. परमतत्त्वाचे दिग्दर्शन करणाऱ्या त्या तपोधन सद्‍गुरूंकडून परिचलित असणारा, साधना क्रम पूर्ण केल्याने सर्व प्राण्यांमध्ये स्थित असणाऱ्या आत्म्याचा साक्षात्कार करणारा योगी जोपर्यंत मूलभूत परमात्म स्वरूपात समाहित होत नाही तोपर्यंत तो माध्यम असतो. वास्तविक एकमात्र हा योगी म्हणजेच अवताराचा प्रवेश व विशद परमात्म्याच्या किरणांचा संचार असतो. जर महापुरुषाचा अंत:संयोग झाला नाही तर भगवान किंवा अवतार नावाच्या वस्तूचे सृजन तसेच स्रष्टा असंभव आहे.

भगवान कधी नष्ट होत नाहीत. भगवान म्हणजे सर्वांच्या जीवन धारेमध्ये व्यवस्थित तसेच अपरिवर्तनशील सत्ता आहे, जी कधी नष्ट होत नाही. भगवान सदैव व सर्वत्र विद्यमान आहेत. परंतु मनुष्याच्या उपभोगासाठी ते विद्यमान नाहीत. परमात्मा तसेच त्यांच्या नि:सृत वाणीचे प्रसारणाचे एकमात्र माध्यम म्हणजे तत्त्वस्थ महापुरुष आहेत. ब्रह्ममय महापुरुष अवताराच्या कार्यक्षेत्रापासून अगदी निष्काम व पलीकडे गेलेले असतात. तथापि अन्य मनुष्यांच्या अंत:करणात अवताराचे अलौकिक तसेच चमत्कारपूर्ण कल्याण सृजन करण्यासाठी ते पथ दर्शक बनतात.

संत कबीरांच्या जीवानातील एक उदाहरण पाहा-

एकदा कबीरांच्या भक्तीने आणि हृदय व्यथेने उत्प्रेरित होऊन गुरू आणि गोविंद दोघेही त्यांच्या समोर प्रकट झाले (ही योगाची पराकाष्ठा होय) त्यांना पाहून क्षणभर कबीर विचारात पडले की आता प्रथम नमन कोणाला करू?

**''बलिहारी गुरुदेव की, जिन गोविन्द दिया लखाय ।''**

असा विचार करून त्यांनी स्वत:ला प्रथम गुरुदेवांना अर्पित केले कारण त्यांच्या प्रसादाने परब्रह्माचे त्यांना दर्शन झाले आणि तत्क्षणी कबीरांना त्या रूपात प्रवेश मिळाला.

**''तहाँ न ईश्वर जीव न माया, पूजक पूज्य न चेरो''**

तेथे ना ईश्वर आहे ना जीव आहे ना माया आहे. तेथे ना कोणी पूजण्यास योग्य आहे ना इकडे-तिकडे फिरणारा चेला आहे. मग राहिले काय?

**''अवधू बेगम देश है मेरा ।''**

तो अगम्य आहे अथांग आहे, तेच माझे स्वरूप आहे तोच माझा देश आहे.

अशी निर्लेप उपलब्धी ज्यांच्याकडे आहे असे महापुरुष त्या परम चेतनात्माच्या उपलब्धीचा प्रारंभ करीत असतात; जो अवताराच्या परिवेशामध्ये येतो. त्यांच्या द्वारा उत्पन्न होणारी परमात्म्याची पावन संचालिका शक्तीचे नाव अवतार आहे. ते महापुरुष साधकाच्या अंतरंगात परमात्म्याच्या पावन शक्तीच्या संचाराचा उत्तरोत्तर विकास करतात व सर्वत्र ब्रह्ममयता प्रदान करीत, त्याचे अस्तित्व नष्ट करून अंतर्धान पावतात, मग तो योगी साधक राहत नाही, आता त्याला मानवमात्रामध्ये एक स्वरूप, शाश्वत सत्ता, प्रभूचेच प्रतिरूप दृष्टिगोचर होते. अशी स्थिती असणारे संत कबीर होते.

(असे महापुरुष आपल्या इच्छेप्रमाणे शरीराला चालवतात. कागभुशुण्डी, कबीर, श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादी महात्म्यांच्या जीवनावरून ते सिध्द होते. योगामध्ये ज्यांनी पराकाष्ठा गाठली आहे त्या प्रत्येक महापुरुषाचे हेच स्वरूप आहे)

महाप्रलयामध्येही ज्यांचा नाश होत नाही त्या कागभुशुण्डीजींनी गरुडाचा संदेह दूर करताना सांगितले की ''शरीराचा त्याग करणे किंवा जिवंत राहणे हे माझ्या इच्छेवर अवलंबून आहे''

**तजउँ न तन निज इच्छा मरना ।**
**तन बिनु भजन वेद नहि बरना ॥**

अनुसूया आश्रमात राहणारे श्री १००८ पूज्य परमहंसजी महाराज सत्संगामध्ये हा विषय निघाला की नेहमी म्हणत ''हो, आता मला मरायचे नाही. यमराज म्हणजे मायेचे बंधन तुटले आहे, काळाचा फास कापला गेला आहे. भगवंताने मला निवृत्ती दिली आहे हो, आता मला गोळीच मारली तर शरीराचा त्याग करून टाकू वाणीचा प्रहार सर्वात मोठा प्रहार आहे. साधकांच्या मुखातून वाणी निघू लागल्यानंतर मी समजेन की

आता यांना माझी आवश्यकता नाही. तेव्हा शरीराचा त्याग करेन''. अंती माझ्याकडून बेपर्वाईने निघालेल्या शब्दांचे माध्यम बनवून दोन चार वेळा पुन:पुन्हा ते म्हणाले ''बोलणे कसे असते? बंदुकीच्या गोळीप्रमाणे ते लागत असते. ते आरपार कसे छेदत जाते ते कसे सांगू?'' असे म्हणून ते हसू लागले आणि मग गप्प (मौन) झाले व नंतर उपदेश करू लागले. चार दिवस सतत चाललेल्या सत्संगामध्ये संपूर्ण साधना परायण पथिकांना संबोधित करताना पुढील साधनेस अनुकूल असणाऱ्या उक्तीवर भर दिला की-

**जब लगि राम नाम जीहा तू न जीप है ।**
**तौ लौ तूँ कहूँ जाई लिहूँ तिहूँ ताप तपि हैं ।।**

जोपर्यंत रामनामाचा जप तुम्ही करणार नाही तोपर्यंत तुम्ही कुठेही गेलात तरी ही क्लेशकारक पीडा तुमचा पिंड सोडणार नाही. तुमच्या लक्षात असेल की इंद्रिये वर बसली आहेत, मी खाली बसलो आहे. या प्रकारे मनात क्लेश होत राहील. यासाठी जप करा आणि श्वासावर दृष्टी केंद्रित करा. आणि या उपदेशानंतर पाचव्या दिवशी समाधी मुद्रेमध्ये पंचतत्त्व निर्मित या पार्थिव शरीराचा त्यांनी त्याग केला.

# ॥ॐ॥

# (२)श्रीकृष्ण परिचय

महायोगेश्वर श्रीकृष्णदेखील या स्थितीविशेषाने संयुक्त असे महापुरुष होते. त्यांनी स्वत: आपला परिचय योगामृताचा प्रसार करणाऱ्या 'गीता' शास्त्रामध्ये दिला आहे. याचे तात्पर्य हे आहे की श्रीकृष्ण एक योग प्रदाता महापुरुष आहेत. महर्षी व्यासांनीदेखील याचे समर्थन मुक्तकंठाने यथार्थात्व: परम पुरुष असे केले आहे. परंतु सुरदास, चैतन्य, जयदेव इत्यादी अनेक रसिक भक्तांनी म्हणजेच कवींनी वेगळ्या प्रकारे व वेगळ्या भावानिवेशात श्रीकृष्णाचे पावन चरित्र उद्धृत करीत त्यांच्या भगवत्तेला पुष्टी दिली आहे. योग क्रियेच्या जागृतीनंतर प्रत्येक साधकाने त्या महान ऐश्वर्यसंपन्न पुरुषांना याच परिवेशात प्राप्त केले आहे. त्यांना परात्पर ब्रह्म, परमात्म्याचा अवतार असे म्हटले आहे. योगेश्वर श्रीकृष्णाच्या पावन मुखातून प्रसरलेली तसेच नि:सृत वाणी जी गीता त्यामधून विदित होते की ते आत्मस्थित महापुरुष आहेत. भक्त अर्जुनाच्या कल्याणासाठी त्यांनी आपल्या शाश्वत वाणीने अनेक भ्रांन्तींचे निवारण केले आहे, जसे सनातन, शाश्वत, अजर, अमर, आत्मा तथा परमात्मा यातील भेद आणि स्थिती, वर्ण व्यवस्था, वर्ण-संकराचे स्वरूप, कर्म तथा अकर्म, ज्ञानमार्ग तथा योगमार्गाच्या कर्माचे विश्लेषण, मानवाची दोन रूपे, यज्ञ तथा कर्माची अभिन्न प्रणाली इत्यादी याबरोबरच त्यांनी आपल्या वास्तविक स्वरूपाचे विश्लेषण केले आहे की अर्जुना, मी देखील एक महापुरुषाप्रमाणे त्याच अवस्थेचा आहे. परमात्म तत्त्वमय स्थितीमधील महापुरुषांच्या वैशिष्टांशी तुलना करीत (जसे आत्म्यामध्येच तृप्त, अभिन्न तथा परिपूर्ण पावनता) त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की मी पण एक महापुरुष आहे. गीतेमधील तिसऱ्या अध्यायातील श्लोक १६ ते २३ या श्लोकात त्यांनी हे सांगितले आहे (क्रियात्मक तथा बोधगम्य शैलीत हृदयात ठसवावे):-

''जो मनुष्य मी निर्धारित केलेले यज्ञकर्म करीत नाही तो पापी पुरुष व्यर्थ जीवन जगत असतो. परंतु जो पुरुष आत्म्याच्या ठिकाणी संतुष्ट असतो, जो आत्मतृप्त असतो, जो आत्म्यामध्येच निमग्न असतो त्याच्यासाठी कर्माची आवश्यकता नसते. अशा मनुष्याला कर्म करण्याची काही गरजच भासत नाही. त्याने कर्म केले तरी त्यापासून

त्याला काही लाभ होत नाही व कर्म करावयाचे सोडले तरी त्याचे काही नुकसान होत नाही परंतु ही स्थिती कर्म केल्याशिवाय प्राप्त होत नाही. जनक इत्यादी महर्षिगणांनीदेखील हे निर्धारित कर्म करूनच परम सिध्दी (नैष्कर्म्य) प्राप्त केली. असे महापुरुष मागाहून येणाऱ्यांच्या हितासाठी त्यांचे मंगल व्हावे यासाठी व त्यांना बोध मिळावा यासाठी कर्म करीत असतात. कौन्तेया, मला प्राप्त होण्यासारखी लेशमात्रही वस्तू राहिली नाही, तरीही पाठीमागून येणाऱ्यांच्या हिताच्या इच्छेने मी कर्म करीत असतो. जर मी सावधपूर्वक कर्म न करेन तर समस्त प्रजेमध्ये (समाज) वर्णसंकर होऊन ती नष्ट-भ्रष्ट होईल आणि मी या प्रजेचा नष्ट करणारा ठरेन- दोषी ठरेन.''

टिप्पणी- जर आत्म्याचा परमात्म्याशी संयोग झाला तर प्रत्येक जीवात्मा हा शुध्द वर्णीय आहे व त्याची आकृती परब्रह्म परमात्मा आहे. यज्ञकर्म विस्मृत झाल्याने मनुष्य वर्णसंकरतेच्या गर्तेत पोहचतो. ते जागृत निर्धारित कर्म म्हणजेच जागृत यज्ञ कर्म, महापुरुषाशी संपर्क साधून प्रवाहरूप होत असते.

वास्तविक मानवाची बुध्दी एका विशिष्ट नियमाने बध्द आहे. महापुरुष जे आचरण कार्यरूपाने प्रमाणित करतात त्याचेच तो अनुसरण करतो व म्हणूनच महापुरुषांना कर्म करण्याची लेशमात्र जरूर नसली तरी पाठीमागून येणाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी चांगल्या प्रकारे त्यांनी यज्ञ कर्म करावे व त्यांच्याकडून करवून घ्यावे. त्या अज्ञानी लोकांच्या कर्मामध्ये त्यांनी चुकीचा भ्रम निर्माण करू नये.

श्रीकृष्णांनी आत्म स्थित महापुरुषांबरोबर तुलना करीत आपला परिचय दिला आहे की मी एक महापुरुष आहे. ते म्हणतात ''माझ्यासाठी कोणतेही एक कर्म करण्याची जरूर नाही'' या प्रकारे ''स्वरूपात स्थित आत्मसंतुष्ट पुरुषांनाही कर्म करण्याची आवश्यकता नाही. मीपण पाठीमागून येणाऱ्यांच्या हितासाठी कर्म करीत असतो आणि ते महापुरुष पाठीमागून येणाऱ्यांच्या कल्याणासाठीच कर्म करीत असतात. म्हणजे मागून येणाऱ्यांच्या कल्याणाच्या इच्छेनेच ते आराधना करीत असतात'' म्हणजे कर्माचा अर्थ आहे आराधना.

९व्या अध्यायामध्ये ११ ते १५ व्या श्लोकापर्यंत तसेच ७व्या अध्यायात ब्रह्मविद्येचा विज्ञानासहित परिचय देताना स्वत: सर्वांहून वेगळे स्थित असतानाही यौगिक प्रभावामुळे सर्वांच्या संपर्कात राहण्याचा परिचय देताना ते म्हणतात की, ''दोषयुक्त

दृष्टी असणारे मला अशा प्रकारे न जाणता माझ्याबाबत विपरीत समजूत करून घेतात. सर्व प्राणिभूतांचा महान ईश्वर, माझ्यासारखे स्थित अथवा परम भावास न जाणणारे मूर्ख लोक मला तुच्छ म्हणून संबोधतात. मनुष्य शरीराचा आधार असणाऱ्या माझ्या लहान आत्म्याला सामान्य मनुष्य समजतात. परंतु असे समजणाऱ्या व म्हणणाऱ्या वृथा आशा, वृथा कर्म आणि वृथा ज्ञान असणाऱ्या भ्रांतियुक्त चित्ताचे पुरुष, मोहित करणाऱ्या आसुरी किंवा राक्षसी वृत्ती धारण करणारे असतात. परंतु हे अर्जुना, दैविक प्रकृती आणि यथार्थ दृष्टी असणारे जे महात्मा जन आहेत ते मला सनातन व अविनाशी समजून अनन्य भावाने भजतात. पाहा येथे स्वयं भगवंतानी मनुष्य शरीरात राहणाऱ्या आपल्या मानसिक गतीला महान ईशत्वात व परमतत्त्वात स्थित असणारी सांगून स्पष्ट केले की मी एक योगी आहे. योगीदेखील शरीराच्या आश्रित राहत असतो, शरीरात स्थित असतो आणि मीदेखील त्या शरीराचा आधार आहे.

गीतेची समाप्ती झाल्यानंतर एकाग्रचित्त संजयला भगवत तत्त्व अक्षरश: समजले आणि त्याच्या प्रभावानेच त्याने स्वत:ला कृतार्थ तसेच परलोकवासीपण बनवले. त्याच संजयने भगवान श्रीकृष्णाचा पूर्ण परिचय ''योगेश्वर कृष्ण'' अगर 'योगेश्वर' या शब्दानी करून दिला. जो स्वत: योगी आहे व ज्याच्यात योग प्रदान करण्याची क्षमता आहे त्यालाच योगेश्वर असे म्हणतात. महाभारत संपल्यानंतर गीतेतील विषयावर चर्चा चालली असताना योगेश्वर श्रीकृष्ण म्हणाले ''मी आता सर्व विसरून गेलो आहे. अर्जुनाला पण आता त्याचे स्मरण राहिले नाही कारण पूर्णतेनंतर वस्तुस्थितीबरोबर साधनेविषयी असणारी माहिती पण त्या पूर्णत्वाच्या परम आनंदात तद्रूप तत्त्व स्वरूपच होऊन जाते. परंतु अन्यांसाठी ते केवळ एक विधान असते. पण संजय विसरलेला नव्हता. त्याने भगवंताचा अत्यंत स्पष्ट असा परिचय देत म्हटले.

**यत्र योगेश्वर कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।**

योगेश्वर अर्थात योगाचा ईश्वर, ज्यांचे योगावर स्वामित्व आहे असा हीच पूर्णता होय किंवा पूर्ण योग्याचे लक्षण आहे. म्हणून भगवंताने सांगितले आहे की ''महात्म्यांना शरण जा. त्यांना मनापासून दंडवत प्रणाम करा. त्यांच्या नियमांचे अनुकरण करा ज्यायोगे ते प्रसन्न होतील, त्यांच्यामागून आपल्या स्वत:चे हवन करा. ते तत्त्वाला जाणणारे

तुम्हाला त्याच तत्त्वाचा उपदेश करतील व तुम्हाला आपल्या तत्त्वाकडे खेचतील. अनुरागीच अर्जुन आहे आणि ते महापुरुष जाणतात की आज हा अनुरागी मला शरण आलेला आहे, परंतु दोन वर्षांनी (भविष्यात) जे अनुरागी असतील त्यांनी कोणाला शरण जायचे? व म्हणून एखाद्या योगेश्वरास शरण जा, कारण श्रीकृष्ण योगेश्वर होते.

श्रीकृष्णाने भविष्यात येणाऱ्या पिढीची, योग परंपरेची व भविष्यात होणाऱ्या साधकांचीही आपल्या शास्त्रात काळजी घेतली आहे. कारण त्यांनी सांगितले आहे की, माझ्यासाठी आता कोणतेही कर्म शिल्लक राहिलेले नाही तरीदेखील मागून येणाऱ्यांच्या हितासाठी मी कर्म करीत असतो. या प्रकारे तत्त्वदर्शी योग्यांसाठीपण कोणतेही कर्म शिल्लक राहिलेले नसते; परंतु मागून येणाऱ्यांसाठी तो कर्म करीत असतो.

*नोट- योगेश्वर श्रीकृष्ण आराधनेसच कर्म मानतात.*

महापुरुष स्वत:मध्ये पूर्ण, अवताराचे ज्ञान असणारे व पूर्ण ब्रह्ममयी स्थिती ने युक्त असतात. ते केवळ नुसते शरीर नसतात. हो, पण जेव्हा शरीराचा जीवनकाळ शेष राहिलेला असतो आणि योग्याचे योग साधन जे मूलतत्त्वाला स्पर्श करते तेव्हा अशा प्रकारची ब्रह्ममयी स्थिती शक्य असते. असा पुरुष परमात्ममायेमध्ये सदा समाहित, सदैव परमतत्त्वाचा निर्देश करणारा, परम भावामध्ये स्थित अशा परमात्म्याचे स्वरूप आहे. परंतु या शाश्वत सत्तेचे पावन विधान तसेच वैशिष्ट्य हे आहे की त्या परमात्म्याच्या परम भावाचा प्रकाट्याचा आधार मनुष्य शरीरच आहे.

*नोट- मानवामध्ये नर म्हणजे एक स्थिति विशेष आहे. स्त्री-पुरुष कोणीही नर असू शकतो. नर-शरीरातील आत्मा जागृत होऊन अवताराच्या भूमिकेमध्ये परमात्म्याचे प्रसारित होणे अशा महापुरुषांमध्येच शक्य आहे.*

अशा स्थितीने युक्त असणाऱ्या महापरुषांचे संरक्षण समर्पित मानवमात्राच्या अंत:करणात क्रमश: विभिन्न आश्चर्यांना प्रकट करीत, अवतारातील मधल्या स्थिती अवगत करीत, अजर, अमर, शाश्वत ब्रह्माच्या प्रत्यक्ष दिग्दर्शनाबरोबरच अवतारातील परम पावन स्थितीने अलंकृत होत असते. हा क्रम सदैव चालत राहणार आहे व अवतार अनंत काळपर्यंत मनुष्य शरीरात होत राहतील- हाच महापुरुषांच्या पावन जीवनातून बोध मिळतो.

परिपूर्ण आत्म्याने युक्त, परमात्म स्वरूप, महान तपोधन अशा सद्गुरूंमध्येच परमात्म्याचा अवतार प्रकट होत असतो. महापुरुष शाश्वत स्वरूप, अजर अमर स्थितीने परिपूर्ण किंबहुना त्यापलीकडे गेलेले, अनिर्वचनीय रूप-राशींनी युक्त असूनही भाविक भक्तांना परम बोध करण्यासाठी अवताराचे सृजन करतात. मनुष्य त्यांच्यापासून वेगळा झाला की मग मात्र त्याला अवतारजनित तृप्तीचा स्त्रोत मिळत नाही. यासाठी त्या परमहंसस्वरूप महान पुरुषांची आवश्यकता भासते, त्यामुळेच महापुरुषांच्या अंतरंगात अवताराची अभिव्यक्ती होत असते. कारण तेच परमात्म्याचे कार्यरूप देणाऱ्या परम स्रोताचे कारण आहे.

योगेश्वर श्रीकृष्ण स्वरूपस्थित महापुरुषांच्या व त्यांच्या स्वत:च्या राहणीतील समानतेचा परिचय देताना म्हणतात ''मी एक महापुरुष आहे व काळाच्या पलीकडे असणाऱ्या परमभावात स्थित झालेलो आहे'' म्हणजे श्रीकृष्ण शाश्वत सत्तेमध्ये स्थित असणारे महापुरुष आहेत; परंतु शास्त्राच्या भाषेत एक अवतार म्हणून! बरोबर याच प्रकारे आत्म्यामध्ये परमात्म्याचा निर्देष प्राप्त करणारा प्रत्येक महापुरुष श्रीकृष्णाच्या स्थितीप्रमाणे स्वरूपाप्रमाणे असतात. अर्थात आदि शंकराचार्यांनंतर अनेक रूढिप्रिय परिपाठी लोकांनी अवतारांची चोवीस संख्या देऊन अवताराच्या कल्पनेवर पूर्णविराम दिलेला असला तरी वास्तविक स्थितीने युक्त असणाऱ्या ऋषींवर याचा काही परिणाम झाला नाही, जसे कबीर, नानक, चैतन्य, रामकृष्ण परमहंस इत्यादींच्या जीवनात आपल्याला अवताराची संकल्पना पाहावयास मिळते. त्या पूर्वापार चोवीस अवतरांमध्ये मत्स्य, वराह, कच्छप, नरसिंह, गजेन्द्र उध्दार इत्यादी पाच सहा अवताराव्यतिरिक्त प्राय: महात्म्यांनाच अवतरित विभूतींचे श्रेय प्राप्त झालेले आहे. उदाहरणार्थ महर्षी कपिल, सनक, सनन्दन, सनातन, सनत्कुमार तसेच नारद हे सर्व अवतारी पुरुष होत. प्रल्हादासाठी जो अवतार झाला तो केवळ नारदांमुळेच झालेला आहे.

*नोट- या कथेत प्रकृतीच्या संपूर्ण दग्ध वातावरणातून प्रल्हादाचे सतत रक्षण करून भगवंताने त्याला आपल्या जवळ आश्रय दिलेला आहे.*

अवधूत महर्षी दत्तात्रेय तसेच अवधूत ऋषभदेव त्या २४ अवतारांमध्ये अवतार विशेष होते. कारण या महापुरुषांत एवढे विलक्षण सामर्थ्य होते की कोणत्याही वर्णातील कोणताही प्राणी असो त्याला योग्यता प्राप्त होताच भाविक भक्ताच्या अंत:करणात स्वयं जागृत होत होते.

*नोट १- स्वयंचा अर्थ योगेश्वर श्रीकृष्ण इत्यादी महापुरुषांप्रमाणे ते महापुरुष व परमात्मा एक दुसऱ्याचे पर्याय आहेत.*

*२.- ऋषभदेवावर श्रध्दा ठेवणारा प्राणी शुध्द सनातन धर्मीय असतो. ऋषभदेव सनातन धर्माचे अवतार विशेष आहेत, अन्य नाही. मन-मतान्तराचा वाद माया निर्माण करीत असते. जोपर्यंत जीव आहे तोपर्यंत झगडणे-लढणे हा स्वभावच असतो.*

परशुराम, वामन तसेच बुध्ददेखील अवतारच आहेत. विश्वामध्ये ज्यांना बुध्द म्हटले आहे ते साधनेमधील भिन्न भिन्न मार्गाचा अवलंब करून मनाच्या निर्बीज अवस्थेत निज स्वरूपाचे दर्शन तसेच व्यापक अहंला जाणून ज्यांना बौध-ज्ञान प्राप्त झाले त्यांना बुध्द म्हटले गेले. महामानवेतर महापुरुष भगवान वामन व परशुराम यांना हेच ज्ञान (उपलब्धी) प्राप्त झाले होते.

नोट- १ सिध्दार्थाचा जन्म राजपरिवारामध्ये झाला.जन्म होताच ज्योतिषांनी सांगितले की या मुलात योग्याची लक्षणे आहेत. हे ऐकताच मातापित्यानी मुलाला सत्पुरुषांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. साधारणत: भजनाची भक्तीची शक्यता दिसली की प्रत्येक माता-पिता मोहवश अशीच व्यवस्था करतात. रोगी, वृध्दावस्था व मृत्यूचे तांडव पाहून सिध्दार्थ पत्नीचा व मुलाचा त्याग करून अर्धरात्री सत्याच्या शोधासाठी बाहेर पडला. साधारणत: भगवंताच्या प्रत्येक प्रिय भक्ताच्या किंवा योग संस्कारयुक्त योगभ्रष्ट मनुष्याच्याबाबत हीच स्थिती निर्माण होते. सिध्दार्थ साधनेत प्रवृत्त झाले. त्यांनी ''संन्यास'', ''त्याग'', या मार्गाचे अनुकरण केले व त्यामुळे त्यांना परम विवेकी असे संबोधण्यात आले. परंतु परमशांती केवळ एक कहाणी बनली. सिध्दार्थाने खडतर साधना सुरू केली. विरहयुक्त हृदयाने ते निरंतर साधनेत बसले. परमात्म्याची तीव्र पिपासा असणारी ही साधना सफल झाली. बुध्दांनी आपल्या अंत:करणात परम चेतनाचे प्रतिबिंब पहिले. पूज्य गुरुदेव भगवान म्हणत असत, ''विरह-वैराग्याशिवाय ते सत्य (शाश्वत प्रभू) प्राप्त होत नाही. बहुतांशी महापुरुषांनी विषम परिस्थितीमध्येच परम पथ पार करून शाश्वत सत्य प्राप्त केले आहे.''

*२- गौतम बुध्ददेखील चोवीस अवतारांमधील एक आहेत. त्यांची सेवा करणारा सनातन धर्मापेक्षा वेगळा नाही. प्रत्येक सनातन धर्मीयांची पराकाष्ठा, शाश्वत दिग्दर्शनाचा परिणाम व स्वरूपाचा बोध म्हणजे बुध्द होय. केवळ भाषा भेद आहे, अन्यथा बौध्द सनातन महासत्याची इच्छा ठेवत असतो.*

प्रश्नोत्तरीमध्ये आचार्यदेखील म्हणतात-

**''बौध्दाद्धिको यस्तु विमुक्ति हेतुः ।''**

हे शाश्वत परब्रह्म सर्वोपरी सत्ताविशेष आहे. साधनेचे परिणामस्वरूप असे शुभाशुभच्या पलीकडील स्थिती प्राप्त झालेले श्रेष्ठ महापुरुष आत्मतत्त्वाच्या विकलतेने विकल झालेल्यासाठी परात्पर ब्रह्माची अवतार प्रसारिणी अलौकिक कलेच्या रूपात सर्व युगात सिध्द (प्रमाणित) झाले आहेत. ज्यांची प्रमाणिकता निरापद तसेच शाश्वत सत्य आहे. त्याच विशिष्ट परमात्म तत्त्ववेता पुरुषांमध्ये महाराज हंस, महर्षी व्यास, आदि राजा पृथू (राजयोगाचा आदि प्रणेता), यज्ञ (परमात्मा प्रेरकाच्या रूपात आत्म्याने प्रसारित होऊन, चराचर जगाच्या अस्तित्वाला दग्ध करून शाश्वत रूपात परिलक्षित होतो तो ब्रह्म-यज्ञजनित उपक्रम) म्हणजे अवताराची प्रतिष्ठा आहे, जे शाश्वत सत्याचा उत्प्रेरक आहेत.

हाच अवतार मत्स्य, कासवाच्या क्रियात्मक शृंखलेमध्ये पाहावयास मिळतो. हयग्रीव तसेच नर नारायणदेखील त्याच (कृष्ण, ऋषभ इ.) अवतारित विभूतींच्या पावन परंपरेतील आहेत. प्राचीन अवतार व त्यानंतरचे पूर्णत्व प्राप्ती झालेल्या सत्पुरुषांत कसलाही फरक नाही. परंतु अन्तर्दृष्टिहीन (आत्म्याचे बोल न समजणारे), विचारहिन बडबड करणाऱ्यांनी व काल्पनिक विचार करणाऱ्यांनी चोवीस अवतारांना रुढिगत भ्रांतीमध्ये बांधून टाकले. वास्तवाशी त्याचा काही संबंध नाही. चिरंतन विधान हे आहे की आत्मतृप्त, आत्मस्थ, विदितात्मा पुरुषांमध्ये ते सामर्थ्य-ती क्षमता सदैव विद्यमान आहे ज्यामुळे भाविकांमध्ये परमात्म्याची पिपासा तसेच विशुद्ध प्रेम जागृत होताच ते महापुरुष अवताराचा प्रत्यक्ष प्रकाश तसेच प्रभूच्या अनवरत पीयूष धारेचा कृपा प्रसाद देऊ लागतात.

अवतारांचे दोन प्रकार आहेत-एक व्यापक ब्रह्माला शून्यावस्थेतून जागृत करून अवताराच्या प्रक्रियेतून-श्रेणींतून पसार होत परममध्ये निरोध करीत स्थायी प्रकाशाने प्रकाशित करणारे अवतार प्रेरक आहेत. दुसरा प्रकार अवतारातून प्राप्त होणाऱ्या स्थितींचे अवलोकन आहे. दुसऱ्या शब्दांत या अवतारांत एक तर ब्रह्म स्वरूप महापुरुष आहे जो शरिराच्या आश्रयाने राहून पण परमशान्त तसेच समदृष्टीचा आहे. असे महापुरुष जागृती प्रदान करणाऱ्या अवतारांचे प्रेरक व जन्मदाते असतात.

दुसऱ्या प्रकारचे अवतार कथा-प्रसंगाच्या रूपात पाहावयास मिळतात, ज्यांना वैयक्तिक स्वरूप नसते- जसे मत्स्य, वाराह, कच्छप, यज्ञ, गजेन्द्र उध्दारक हरी तसेच नरसिंह इत्यादी. यांना बाह्य स्थायी पिंड नाही. विचार काळामध्ये देखील ते चित्रित होत नाहीत. त्यांचे फक्त विश्लेषण केले जाते. ते बाह्य प्राणिमात्रांचा विषय नसून हृदयदेशात प्रगट होणाऱ्या परमात्म्याचे वास्तविक प्रतिबिंब आहेत. ज्यांचा प्रभाव व प्रसार साधक स्वयं प्राप्त करीत असतो. त्यांचे कार्य क्षेत्र स्पष्ट आहे किंवा योगाच्या माध्यमातून योगानुशासित पुरुषासाठीच सर्वथा संभव आहे. भाविकांना स्वयं (कैवल्य पदाची) अनुभूती करण्यासाठी हा सार्वभौम स्थित आत्म्याचा साक्षात्कार करवत असतो. किंवा जोपर्यंत साधकाला शाश्वत सत्तेमध्ये उभे केले जात नाही तोपर्यंत उत्तरोत्तर अलौकिक शक्तींना साधकाचे मन चकित करून त्याच्या अंतरंगाला गती देत सुहृदाचा भार वहन करीत असतो.

मानस शीर्षस्थ अविनाशी (''स्वरूप'') श्रीरामपण याच परिघातील आहेत जे अलौकिक मर्यादेचे स्पष्ट व अनिर्वचनीय सत्तेचे प्रसार विशेष आहेत.

महापुरुषाच्या परिवेशातील उपयुक्त तथ्य सत्याचे प्रेरक, सर्जक तसेच महापुरुषाचे बोधक आहे. योग परकाष्ठेचे परिणामस्वरूप जे ज्ञानामृत त्याचा भोक्ता (प्राप्त होण्यास योग्य परमात्मा ज्यांना अप्राप्त नाही ते पुरुष) सहज प्राप्त असणाऱ्या परात्पर ब्रह्माशी अभिन्न असतात-एकरूप असतात. अशा साकार अवस्थेचे साधक कैवल्य धाम, चिन्मय पुरुष, शाश्वताच्या सादृश्यातून अवताराचे प्रकटन करतात. अशी अवस्था असणाऱ्या पुरुषांमध्ये सद्गुरूचे वैशिष्ट्य दिसून येते. या आत्मस्थित ब्रह्मवेत्यांमध्ये शाश्वत अनिर्वचनीय, अवर्णनीय तत्त्वाच्या अवतरणाचा प्रवाह संयोग झाल्याने होत असतो. हृदयपूर्व त्यांना स्पर्श करताच त्यांचे संरक्षण मिळण्यास सुरुवात होते. त्या महापुरुषांनी प्रयत्न केला नाही तरीपण शाश्वताच्या अवतरणाचा हा प्रवाह भाववश्यतेमुळे स्वत: प्रवाहित होतो. कारण ते तत्त्वरूपाशी अभिन्न आहेत. महापुरुष आपला परिचय स्वयं देत असतात. आता ही गोष्ट वेगळी आहे की हा परिचय जन्मजन्मांतरा पासून तो देत आला आहे, देत राहील किंवा स्वत:ला प्रेरित करेल. पुण्याचा संचय किंवा वृद्धी करून अशा अधिकारी महापुरुषाची स्थिती प्राप्त करणे हे आपले उत्तरदायित्व आहे - ते आपले कार्य आहे.

हा काही बौद्धिक विषय नाही त्यामुळे कल्पनेने त्याला समजून घेता येणे शक्य नाही. ही एक आनंदाभूती आहे व ती इष्ट जागृत होण्याने किंवा हृदय देशात इष्ट द्रवित होण्यानेच शक्य आहे. प्रारंभी मी पूज्य गुरुदेव भगवानांच्या मुखातून नि:सृत होणारा उपदेश ऐकून मी गोंधळून जायचो. कारण तेव्हा ही गोष्ट बुद्धीला पटतच नव्हती की भगवान अदृश्य रूपाने बोलू शकतात किंवा रक्षण करू शकतात.

एकदा श्री गुरुदेव भगवान सांगत होते ''मला भगवंत शिकवत असत कारण या शरीराने कधी शिक्षण घेतलेच नाही. आत्मा इंग्रजी बोलतो व मला ते ऐकायला येते-समजते. मला काही शंका आली की भगवान मला उत्तर देत असतात.''(अर्थात संकल्पाबरोबर राहात असत. संकल्प मागून येतो, ते पहिले चालातात) ''मी जरी पतीत व्हायचे ठरवले तरी तो होऊ देत नाही''.

यावर मी नम्रतेने विचारले की प्रभू, ईश्वरपण बोलत असतो का? तर म्हणाले- ''हो तोही बोलत असतो, मग ती रात्र असो व दिवस !'' त्यानंतर गुरुदेव भगवानांनी सांगितले की जोपर्यंत परमेश्वर भक्ताचे संचालन करीत नाही तोपर्यंत भगवान पथाचा आरंभच होत नाही. साधक परमेश्वराच्या कृपेमुळेच भवपार होत असतो. म्हणजे भगवान सदैव जवळ राहून भक्ताचे संचालन करीत असतो. या प्रकारे पूज्य गुरुदेव भगवान श्री परमहंसजी अवताराच्या प्रकाशात क्रमश: प्रवेश देणे तसेच व्यापकतेबरोबरच अवताराचे शांत होणे, समत्वात विलीन होणे व भक्तामध्ये मिसळून जाणे या गोष्टींचा स्वीकार करीत असत. - अर्थात भक्ताच्या विलीनीकरणानंतर परमतत्त्वाच्या स्पर्शाबरोबरच अवताराच्या स्थितीत बदलून ती अवतरित सत्तापण भिन्न राहत नाही, उलट अशा पुरुषामध्ये आत-बाहेर तसेच सर्वत्र सहज परमात्माच भरून राहतो.

नोट- हा अवतार पात्रता असणाऱ्या काही थोड्याच योग्यांच्या हृदयात होत असतो. तेव्हा प्रथम अत्यंत सूक्ष्म परिवेशात सद्गुरू साधनेला प्रस्फुटित करत तसेच क्रमश: कणाकणात (सर्वत्र) स्थित असणाऱ्या सर्व भूतमात्रांत समाहित असणाऱ्या आत्मस्वरूपाचे दर्शन करवत सर्वांत अनादि अशा अनिर्वचनीय ब्रह्माच्या '' अहम्'' च्या स्थितीमध्ये नेऊन आपल्यात तद्रूप करून त्याला आत्ममयी स्थिती प्रदान करतो. तोच सर्व प्रकारचे मार्गदर्शन करवणारा विश्वास परम चेतन भगवंताच्या अलौकिक श्रेत्रात द्रष्ट्या जीवात्म्याला सहज स्वरूपाची स्थिती देऊन आपण स्वत:पण त्याच

स्थितीत प्रतिष्ठित होतो. या प्रमाणे अवतार हा काही दुर्मिळ योग्यांच्या हृदयातील वस्तू आहे. ते सद्गुरूपण विरळच आहेत जे जीवाला जागृत करतात. मनुष्य शरीराने शुद्ध हृदयाच्या योग्यतेची स्थिती प्राप्त करावी. तीव्र अनुरागीसाठी अवताराची मान्यता सर्व युगांमध्ये समान रूपात आहे.

**''सो केवल भक्तन हित लागी ।''**

**''राम भक्त हित नर तन धारी''**

भक्ताचे शरीरच नर शरीर आहे. भक्ताच्या हितासाठी भगवान भक्ताचे तेच शरीर ग्रहण करतात किंवा पसंत करतात, ज्याच्या मनावर मायारूपी नारीचा प्रभाव असत नाही. योगेश्वर श्रीकृष्णांच्या गीतेमध्ये (अध्याय ४) पाहिले असता स्पष्ट होते की अवतार म्हणजे एखाद्या यौगिक प्रक्रियेत होणाऱ्या परमतत्व परमात्म्याचे आलोक प्रसारण आहे. तेव्हा त्या कृपेच्या (आराधनेच्या) जागृतीनंतर मग सर्व सुलभ आहे. योगामध्ये निश्चित अशी हीच क्रिया आहे. या संदर्भांत अनेक प्रकारच्या टीका किंवा मतमतांतरांचा विचार न करता, आता त्या (योगऐश्वर्य संपन्न) श्रीकृष्णाची वाणी पाहूया ।

**ॐ शांति: शांति: शांति:**

# ३-श्रीकृष्णाच्या शब्दांमध्ये 'अवतार'

अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न केला की ''अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वत: ।'' हे श्रीकृष्णा, तुमचा जन्म तर या वर्तमानात झाला आहे आणि सूर्याचा जन्म तर पुष्कळ काळापूर्वी झालेला आहे. मग तुम्ही कल्पाच्या आधी हा अविनाशी योग सूर्याला कसा काय सांगितला? यावर कसा विश्वास ठेवू? यावर योगेश्वर श्रीकृष्णाने आपल्या अवतारावर प्रकाश टाकताना म्हंटले की-

''बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन''

तुझे आणि माझे अनेक जन्म पुष्कळ पूर्वीपासून होत आले आहेत; परंतु हे परंतपा, (जो केलेल्या प्रतिज्ञेपासून ढळत नाही) तू त्या सर्वांना जाणत नाहीस (म्हणजे अवतार तसेच अवतार प्रकारांना जाणत नाहीस.) मी त्या समस्त अवतारांना जाणत आहे.

संबंध- भगवान श्रीकृष्णाच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे अनेक अवतार झाले आहेत. म्हणजे या स्थितीचे अनेक महापुरुष झाले आहेत. म्हणूनच अवतारासाठी बहुवचन वापरले आहे. श्रीकृष्णाच्या शब्दात अवतार पुष्कळ म्हणजे असंख्य, अनंत आहेत. मानसातील प्रति ब्रह्माण्ड राम अवतारा मधूनही यावर थोडा प्रकाश पडतो. काही पुराणांमध्ये ''अवतार'' चोवीसच आहेत व होतील अशी अवतार संकल्पना संख्याबद्ध करून टाकली. वास्तविक कोण्या एका काळात सत्याचे नावे खोट्या कल्पनेचा प्रसार करून असत्याची पूजा केली गेली होती. भ्रामक विचाराचीच पूजा केली गेली हा त्या भ्रामक विचाराचाच परिणाम आहे.

योगेश्वर श्रीकृष्णाचे ते अवतार अलौकिक आहेत.

**अजो ऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृती स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ।। (गीता ४/८)**

म्हणजे मी अव्ययात्मा (अविनाशी स्वरूप) अजन्मा व सर्व प्राण्यांचा ईश्वर म्हणजे मूळ प्राणामध्ये अधिष्ठित (प्रवाहित) असूनही आत्ममयी स्थिती देणाऱ्या यौगिक

प्रक्रियेच्या द्वारा आपल्या त्रिगुणमयी प्रकृतीच्या कार्यांना स्वाधीन करून-वश करून-प्रगट होतो. ''आत्ममाया'' म्हणजे आत्म्याचा साक्षात्कार करवणारी अत्यंत गोपनीय अशा विद्येचे हे नाव आहे. ती आत्म्यामध्ये प्रवेश देण्यास सक्षम असते. आत्म्यामध्ये प्रवेश देववणाऱ्या आत्ममायेचे दुसरे नाव योगमाया असे आहे.

*नोट- गीतेच्या सातव्या अध्यायात (२५ वा श्लोक) श्रीकृष्ण म्हणतात की '' मी आपल्या योगमायेमुळे झाकला गेलेलो असल्याने सर्वांना प्रत्यक्ष दिसत नाही. त्यामुळे आसुरी संपत्तीने युक्त असणारे अज्ञानी लोक अविनाशी अशा मला जाणत नाहीत, मला ते तुच्छ व सामान्य समजतात''. जोपर्यंत योग पराकाष्ठेला पोहचत नाही तोपर्यंत भगवान पूर्णरूपाने विदित होत नाही. प्रथम मायेच पडदा होता, आता योगाचेपण आवरण आहे ज्याने त्या शाश्वत स्वरूपाला झाकले आहे. तेव्हा या गोपनीय आत्ममयी प्रक्रियेच्या द्वारा प्रकृतीचे पूर्ण नियंत्रण केल्यानंतरच त्या चिरंतनाचे दर्शन होते. पूर्णता म्हणजे पराकाष्ठेची स्थिती !*

संबंध-आत्मिक क्रियेच्या पूर्तिकालात महापुरुष पूर्णरूपाने प्रकट होऊन भक्ताच्या आत्म्यामध्ये प्रवाहित होऊन शाश्वत स्वरूप प्रदान करतात. या प्रकारे अवताराच्या सृजनाचे माध्यम महापुरुष आहेत. परंतु असे कोणते विशेष कारण आहे की ज्यामुळे ते प्रभू अवतारित होतात ? यावर श्रीकृष्ण म्हणतात-

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्यानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। (गीता ४/७)**

अर्थात हे अर्जुना, जेव्हा जेव्हा धर्माला (परमात्मा) ग्लानी येते, हृदय भयंकर ग्लानीने भरून जाते (जसे ''मानस'' मध्ये महाराज मनूचे होते-''हृदय बहुत दु:ख लाग'' ।) आणि अधर्म अर्थात काम, क्रोध, तृष्णा यांची साधकाच्या हृदयात वृद्धी होते व अनेक प्रयत्नांतीपण साधक या विकारांना वश करू शकत नाही, परमात्म धर्मात भयंकर ग्लानी वाढते तेव्हा भगवंताच्या प्राप्तीसाठी अंत:करण ग्लानीने पूर्ण भरते म्हणजेच अधीर होते तेव्हा मी आपल्या स्वरूपाची रचना करू लागतो.

*नोट- ही यौगिक हृदयाची वस्तू आहे.*

संबंध-वरील श्लोकात अधर्माच्या ग्रंथींना वश न करता आल्याने म्हणजेच त्यांच्यावर नियंत्रण न ठेवता आल्याने परमात्म्याच्या 'धर्माच्या' भेटीसाठी अधीर झालेले मन- अंतरंग ईश्वराचा पुकार करू लागते तेव्हा परमात्मा प्रगट होतो. हे अव्यक्ताच्या अवताराचे कारण आहे. परंतु हा अवतार कोणत्या कार्याच्या पूर्तीसाठी असतो?

योगेश्वर श्रीकृष्णांच्या वाणीतच याचे उत्तर पाहा-

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (गीता ४/८)**

विभूतीला किंवा परमात्म्याला प्रकट करण्यासाठी आवश्यक ते साध्य पदार्थ म्हणजे विवेक, वैराग्य, इंद्रियांचे दमन, शम-दम, ध्यान-चिंतन तसेच भजनाच्या प्रवृत्तींना ''साधूनाम'' असे म्हटले जाते. याच्या पालनासाठी खूप श्रम करावे लागतात परंतु सफलता मिळत नाही. अविद्याजनित जधन्य विकारांनी दूषित कर्माला ''दुष्कृताम'' असे म्हटले जाते.

*नोट-काम, क्रोध, लोभ, मोह, मद मत्सर इत्यादी विकार मानवाला बाह्य प्रवृत्ती प्रदान करतात. हे विकार मानवाच्या अंत:करणात प्रसुप्तावस्थेमध्ये राहत असतात आणि संग दोषाने जागृत होतात. ते जेव्हा जागृत होतात तेव्हा दूषित गोष्टींना क्रियान्वित करतात. हेच दुष्कृतीचे मूल उद्गमस्थान आहे, ''दुष्कृताम'' आहे.*

या 'दुष्कृताम'चा विनाश करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी म्हणजेच धर्माला स्थापित्व देण्यासाठी मी युगा युगात प्रगट होत असतो. भगवंताच्या प्राप्तीसाठी किंवा अवतारासाठी कोणतेही युग अनुकूल अथवा बाधक असत नाही.

संबंध- ज्याप्रमाणे वरील श्लोकंमध्ये योगेश्वर श्रीकृष्णाने सांगितले की त्यांचा अवतार ''धर्म संस्थापनार्थाय'' असतो. पण धर्म म्हणजे काय? ''धारयति इती धर्म:'' अर्थात जो सर्वांना धारण करतो त्याला धर्म म्हटले जाते. सर्वांना धारण करणारा तो ब्रह्म सनातन आहे-''यान्ति ब्रह्म सनातनम्'' (गीत अ. ४ श्लोक ३१) ज्याला धर्म म्हटले जाते तोच एकमात्र सनातन धर्म आहे. पण सनातन म्हणजे काय?

योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात-

**अच्छेद्यो ऽयमदाह्यो ऽ यमक्लेद्योह्य शोष्य एव च ।**

**नित्य सर्वगत: स्थाणुरचलोऽयं सनातन: ॥**

गीता, अध्याय २/२४

हा आत्माच अपरिवर्तनशील, नित्य स्वरूप, न सुकणारा न जळणारा, न भिजणारा, न छेदला जाणारा, नित्य सर्वव्यापक अचल आणि सनातन आहे. तेव्हा या आत्म्याला साक्षात जाणणे आमचा तसेच मानव मात्राचा धर्म आहे. परंतु अजर-अमर, शाश्वत तसेच सर्वव्यापक गुणधर्माने युक्त असणारा आत्मा सर्वांमध्ये आहे तर मग कोणाला शोधायचे?

याचे उत्तर देताना योगेश्वर  श्रीकृष्ण म्हणतात आत्म्याला केवळ त्या विभूतींनी युक्त असणाऱ्या तत्त्वचिंतकांनी पाहिले. साधारण लोकांना आत्म्याचे हे गुणधर्म दिसत नाहीत. प्रत्येक दिवशी शोक, संताप, आणि मृत्यूचे कारण असणारी मायाच दिसते . श्रीकृष्ण म्हणतात-

**जन्म कर्म च मे दिव्यमेव यो वेत्ति तत्त्वत: ।**

**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥**

माझा हा जन्म, कर्म दिव्य तसेच अलौकिक आहे. उपयुक्त अलौकिक विभूतींनी युक्त असणारा जो मला जाणतो तोच तत्त्वदर्शी असतो. (अर्थात तत्त्वदर्शी लोकच मला जाणतात) मला जाणल्यानंतर शरीराचा त्याग केल्यावर त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही, तो माझ्यातच स्थित असतो.

*नोट- अवतार तर होतो, परंतु लाखो मनुष्यांमध्ये काही थोड्याच तत्त्वदर्शी पुरुषांनी त्याला पाहिले आहे. केवळ तत्त्वदर्शी लोकांनाच अवतार दर्शन होत असते. वास्तविक त्या परम तत्त्वाचे स्पंदन संपूर्ण जगातील मानवमात्रामध्ये समानच आहे तसेच अविभाजित रूपात किंवा प्रसुप्तावस्थे मध्ये ते अनावरत लहरत असते; परंतु तरीही एखाद्या तत्त्वस्थित महापुरुषातच ते तत्त्व जागृत होत असते म्हणजे शाश्वताचा अवतार होत असतो.*

आता लक्षात ठेवा की जे म्हणतात की आता यावेळेस कुमारी कन्येच्या पोटी किंवा दुसऱ्या अमुक अमुक प्रकारे अवतार होणार आहे ते सर्वजण भ्रामक समजुतीने ग्रासलेले आहेत. या प्रकारच्या अनेक मान्यता प्रचलित आहेत आणि होत राहतील.

परंतु सनातन धर्म व त्याचे प्रकटीकरण स्वरूपस्थ महापुरुषांत, महातमपुरुषांतच होते. तेथे भ्रामक विचारांना काहीही स्थान नाही. तेव्हा परम तत्त्वाच्या प्राप्तीसाठी तुम्ही परमतत्त्वास्थित तसेच स्वरूपस्थ महापुरुषाचा शोध घ्या. जो पुण्य शोध पुरुषार्थानेच करावा लागेल. तेव्हाच अवतार दर्शनाच्या महान गरिमेस तुम्ही सुपात्र बनाल.

**ॐ शांतिः शांतिः शांतिः**

# उपसंहार

ईश्वर सर्वशक्तिमान, सर्वव्यापी आणि अंतर्यामी आहे. या त्रिगुणात्मक सृष्टीचा प्रसार म्हणजे त्यांच्या लीलामयी दृष्टीचा विस्तार होय. संसार म्हणजे एक रंगमंच आहे. जेथे चराचरातील जीव द्वन्द्वात्म भूमिकेत लीलाधराच्या निर्देशनाखाली अभिनय करत आहेत. ''शुभ अस अशुभ करम फल दाता'' तो एकच आहे; परंतु अनेक रूपात वावरणारा, आपल्या मायेचा विस्तार करीत तो सर्वांना नाचवत असतो. सुखदु:ख, लाभ हानी, जय-पराजय आणि जीवन-मृत्यूच्या संकटामुळे, थप्पडीमुळे सर्वजण विकल आहेत. या भवसिंधूतील लाटा इतक्या विक्राळ आहेत की त्यांच्या आघाताने जीवात्मे तडफडत आहेत, ते किनारा शोधत आहेत, पण अंध:कारात तो कोठून मिळणार? येथे अथांग संसारसागर-मंथनाची यौगिक प्रक्रिया साधकाच्या मानसिक धरातलावर घटत जाते. तेव्हा मन आणि इंद्रियांचा समेट करून एखादा पथिक पूर्णत: सद्गुरूच्या अधीन होतो तेव्हा संयमित मन आणि इंद्रियांच्या परिणामस्वरूप त्याच्या अंत:करणात कूर्मावतार होतो. क्रमागत साधनेतून विशिष्ट उपलब्धी प्राप्त होऊ लागल्यानंतर प्रगतिशील साधक भवसिंधुमंथनाच्या अंतरंगात ते अमृततत्त्व प्रत्यक्ष मिळवतो, ज्याची अनुभूती होताच साधक तत्क्षणी शाश्वत सत्तेमध्ये लीन होऊन तो जन्ममरणाच्या कालचक्रातून कायमचा मुक्त होतो. मग लीलाधराची लीला संपून जाते आणि त्याचे स्वरूप प्रगट होऊन समोर येते आणि मग साधकाच्या रोमारोमातून ध्वनी उठू लागते-

**हम न मरब मरि है संसारा ।**<br>
**हमका मिल्यो जियावन हारा ।।**

बरोबर याच प्रकारे देशकालाच्या परिवर्तनाबरोबर भिन्नभिन्न कथांच्या रूपामध्ये ब्रह्मविद पुरुषांच्या वेदमयी वाणीद्वारा सत्य तसेच शाश्वत परमतत्त्वाचे अवतरण होते. कथानक अनेक आहेत मूळवस्तू एकच आहे. संसार परिवर्तशील आहे. सहस्त्राब्दि वर्षांचा अतीत, त्याचा मध्यकाल तसेच वर्तमानकाळ देखील अतीताच्या गर्भात विलीन होऊन जातील. साधारणत: दर शे-दोनशे वर्षानंतर भाषेमध्ये व भाषेच्या अभि प्रायातील सूक्ष्म घटांमध्ये पुष्कळ परिवर्तन येते. त्यामुळे भविष्यातील मनुष्याचे बोलणे-चालणे कशा प्रकारचे असेल हे सांगता येत नाही. युग-युगांतरापासून बदलत असणारी परिस्थिती

तसेच घटनाक्रमाने मनुष्य घायाळ होतो. त्यामुळे महापुरुषांच्या वचनामृतामध्ये लपलेल्या मूळ भावांपासून तो हळू हळू दूर होत जातो.

वरील विषम परिस्थिती मध्ये प्राक्कथित अवतारांची जागृती व त्यांचे कार्य याबद्दलच्या रूपककथा ब्रह्मविद ऋषींच्या द्वारा सांगितल्या गेल्या आहेत. भाषा शैली व प्रसंग यात जरी भिन्नता असली तरी मानवाच्या अंतरंगात त्यांची मौलिक उपलब्धी समान आहे. उपनिषदाचे असे सांगणे आहे की साधन-परायण हजारो पुरुषांमध्ये तोच आत्मतत्त्वाची स्थिती प्राप्त करू शकतो की ज्याची निवड परमात्मा स्वयं करतो. हा आत्मा प्रवचनाने, विशिष्ट बुद्धीने किंवा बहुश्रुत होण्याने प्राप्त होत नाही. तेव्हा मनुष्यमात्रात परम अधिकारी साधकाला हृदयपूर्वक सहयोग देणे, मित्राप्रमाणे त्याचा हात पकडून प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या परमतत्त्वाचा पथ दाखवणे, त्याला शाश्वताच्या सर्वव्यापी स्वरूपात स्थित करणे हाच अवताराचा अवधारणेचा केंद्र बिंदु आहे.

जरी प्रत्येक मानवाच्या अंत: करणात ते परमतत्त्व सदैव विद्यमान असले तरी ज्याच्या अंतरंगात ते तत्व जागृत आहे तोच त्याला जाणतो. जागृतीची यौगिक प्रक्रिया साधकाच्या मनासहित इंद्रियांना वश करून परमात्म्याच्या प्राप्तीची अभिलाषा तीव्र बनवते आणि तत्त्वदर्शी महापुरुषाच्या प्राप्तीसाठी पुण्यार्जन करते. प्रयत्नशील भाविकांना ते अलौकिक इष्ट-वचनामृत, इष्ट योगक्षेम सर्वथा शक्य आहे.

ही काही केवळ कल्पना नाही; परंतु परम चेतनाचे विधान असून ते अनादि सत्य तसेच शाश्वत आहे. या तात्त्विक परिवेशात चोवीस किंवा असंख्य अवतारांचा क्रियात्मक प्रसार महापुरुषांच्या कृपेने प्राप्त करावा. महापुरुषाच्या प्राप्तीवर मी येथे पुन्हा भार देत आहे. त्यांची यथा-संभव सेवा, सन्निध्य तसेच वचनामृत हृदयात ठसवून ठेवावे, कालांतराने परम तृप्तीची प्राप्ती होईल. जर साधनपथावर अधिक चालता आले नाही तर ''गुरुर्वाक्यम् सतत् गेयम्'' यानुसार गुरुदेव भगवानांच्या वचनामृताचे अवलोकन व अनुशीलन सतत करावे.

**ध्यानमूलं गुरोमूर्ति पूजा मूलं गुरोर्पदम् ।**
**मंत्रमूल गुरोर्वाक्यम मोक्षमूलं गुरो : कृपा ।।**

**ॐ शांति: शांति: शांति:**

# एका भाविकाचा प्रश्न

प्रश्न- महाराजश्री, तुम्ही या पुस्तकात असे सांगितले आहे की '' अवतार पिंडामध्ये होत नाही; परंतु तो शरीर धारण (ग्रहण) करतो म्हणून तो पिण्डवाला आहे '' चोवीस अवतारांपैकी अधिकांश महापुरुष आहेत ज्यांनी साधनेच्या माध्यमातून अवताराची स्थिती प्राप्त केली. परंतु भगवान राम तसेच श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये बाल्यापासूनच अलौकिक लीला पाहावयास मिळतात. म्हणजे साधना हे त्यांच्या अवताराचे माध्यम दिसून येत नाही. मग राम-कृष्ण हे अन्य अवतारांपेक्षा काही विशेष होते का?

उत्तर- महाभारतातील युद्धाच्या प्रारंभी युधिष्ठिर जय-पराजयाच्या चिंतेने घाबरू लागले. तेव्हा अर्जुनाने त्यांना समजावले-राजन् ! श्रीकृष्ण ज्यांच्या बाजूने उभे असतात विजय तेथेच असतो-असे नारदजींनी म्हटले आहे. श्रीकृष्ण गेल्या सहा जन्मांपासून महापुरुष राहिलेले आहेत. एका जन्मात त्यांनी प्रभास क्षेत्रातील स्थानिक जनतेला उपदेश केला. एका कल्पात (जन्मात) ते 'यत्र-सायं-गृह' मुनीच्या वेशात विचरण करीत राहिले. म्हणजे दिवसभर चालता चालता ज्या ठिकाणी रात्र संध्याकाळ होई, रात्री तेथेच ते निवास करीत असत. कल्पचा अर्थ  येथे जन्म असा घ्यावा. बारा वर्षे एका पायावर उभे राहून यज्ञ करीत राहिले. एका पायाचा अर्थ एका ध्येयावर एका लक्ष्यावर दृढ राहणे असा आहे. एका कल्पात ते बद्रिकाश्रमात घोर तपस्या करीत राहिले आणि या कल्पात श्रीकृष्ण साक्षात परमात्म्याच्या रूपात आहेत.  राजन् ! श्रीकृष्ण आपल्या पक्षात आहेत तेव्हा विजय निश्चितपणे आपलाच आहे.

या प्रकारे श्रीकृष्ण मागील सहा जन्मांपासून साधना करीत होते. वास्तविक 'अनेक जन्म संसिद्ध ! ततो याति परां गतिम्'' सतत प्रयत्न करणारा योगी अनेक जन्माच्या सिद्धिनंतर परम गती प्राप्त करीत असतो (गीता ६/४५). पुष्कळसे महात्मे भजन करता करताच महाविदेहावस्थेमध्ये पोहचतात; त्यांच्या अंत:करणात त्या परम चेतनाची अनुभूती प्राप्त करण्यापूर्वी शरीराची वेळ (आयुष्य) समाप्त होते. अशा वेळी त्यांना मुक्ती मिळत नाही. त्यांना पुन्हा जन्म घ्यावा लागतो.

परम तत्त्वाच्या उपलब्धीसाठी त्यांची साधना माध्यम बनत नाही; परंतु पुनर्जन्म हे माध्यम बनते. अशा योग्यांना ''भव प्रत्यय योगी'' असे म्हटले जाते. -''भव प्रत्ययो

विदेह प्रकृति लयानाम्'' (पातंजल योगदर्शन समाधि पाद १९) विदेह आणि प्रकृतिवाल्यांना जन्मापासूनच उपलब्धी प्राप्त झालेली असते. श्रीकृष्ण या स्तरावरील महापुरुष होते. रामचे पण हेच स्वरूप आहे.

केवळ भारतातच नव्हे तर विश्वभरात ज्यांना ज्यांना अवतार समजण्यात आले ते सर्व मनुष्यच होते. सामान्या माणसाप्रमाणे त्यांनी जन्म घेतला, त्यांच्या प्रमाणेच त्यांचेही पालन पोषण केले गेले. परंतु भक्तीच्या क्रियाशील मार्गावर चालून त्यांनी आपले लक्ष्य प्राप्त केले तेव्हा समाजाने त्यांना अवताराच्या रूपात जाणले. गौतम बुद्ध एका राजाचा मुलगा होता, येशू एका मेंढापाळाचा मुलगा होता तर हजरत महुम्मद एका साधारण व्यापारी होते. रामकृष्णापेक्षा ते कोणत्या अर्थाने कमी होते का ? आज एकट्या बुद्धांच्या अनुयायांची संख्या रामकृष्णाच्या अनुयायांपेक्षा दीडपट अधिक आहे. गौतमाला ते तेवढाच मान देतात जेवढा मान रामकृष्णाला हिंदु लोक देतात. परंतु सुविज्ञ हिंदू एकाच दृष्टीतून पाहत असतो. तसे बुद्धदेखील चोवीस अवतारांपैकी एक असून हिंदू धर्माची शुद्ध विभूती आहे.

हा जीवात्मा साधनेचा दोर पकडून क्रमश: उन्नती करत करत त्या परम तत्त्वाचा स्पर्श प्राप्त करतो ज्या तत्त्वाचा तो अंश आहे. वास्तविक भगवान जेव्हा एखाद्याचा स्वीकार करतात तेव्हा तो आपल्या स्वत:मध्ये त्याला समावून घेत असतो. प्रत्येक अवतार अशा प्रकारेच होत असतो. तत्वस्थित अशा जेवढ्या महापुरुषांना अवतार म्हटले आहे त्या सर्वांना या साधनेचा मार्गच अनुसरावा लागला आहे. श्रीकृष्णा सारख्यांना या जन्मात श्रम करावे लागले नाहीत; परंतु साधनेचा क्रम त्यांच्या पूर्व जन्मांमध्ये पाहावयास मिळतो. प्राप्ती व क्षमतेच्या दृष्टीने सर्व अवतार आणि तत्त्वदर्शी महात्मा एकाच स्तरावर असतात कारण तो परमात्मा एकच आहे. व म्हणूनच प्राप्तिकालात सर्व महापुरुषांना एकसारखीच अनुभूती झाली आणि ते सर्व समान सत्तेने अलंकृत झालेले आहेत. तुम्हाला महापुरुषाचे सतत सान्निध्य मिळावयास पाहिजे ज्यायोगे तुम्ही क्रियात्मक पद्धत आत्मसात करू शकाल. मग तुम्हाला कसलाच संदेह राहणार नाही.

॥ ॐ ॥

साधन काळात अनेक विघ्ने निर्माण होतात, पण साधकाने आपल्या ध्येयाशी चिकटून राहिले पाहिजे, खरा प्रतिज्ञावानच हा मार्ग आक्रमू शकतो. आपल्या ध्येयाला जो चिटकून राहून, भक्कम राहून सतत साधनेत जो रत राहतो त्याच्या विपत्ति संपत्तीत परीवर्तीत होतत जसे आपल्याला अर्जुनाच्या किंवा महर्षी काग यांच्या जीवनात दिसून येते. अर्जुनाने उर्शीला मातेच्या ठिकाणीच मानले. त्यामुळे उर्वशीच्या शापाने एक वर्ष नपंसुक बनून त्याला राहवे लागले. पण स्व:तच्या ध्येयापासून विचलित न झाल्याने तो शापपण अज्ञातवासात त्याला सहाय्यरूपच बनला, किंबहुना तो शाप त्या काळात वरदानरूप ठरला. कागभुशुण्डींच्याही दृढतेमुअळे त्यांना मिळालेले शाप त्यांच्यासाठी वरदानरूपच ठरले. सारंश, साधकाने आपल्या धर्मावर प्राणापणाने स्थिर रहिले पाहिजे.

**पूज्य परमहंस महाराजांचे वचन**

**‘‘जीवनादर्श एवं आत्मानुभूति’’**

पृष्ठ २९७-९८

संस्करण १९८९

# आस्तिकतेच्या नावावर

जो नश्वरांच्या मागे भटकतो

नश्वरांची पूजा करतो

तो **नास्तिक** असतो.

जो अस्तित्वाचा उपासक असतो

जो एकमात्र परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दावान असतो

तो **आस्तिक** असतो

# आस्तिकतेच्या नावावर

श्री परमहंस आश्रम जगतानन्दद्वारा प्रकाशित झालेल्या पुस्तकांवर (विशेषत: 'वर्ण व्यवस्था' 'पशू गाय धर्म नाही' आणि 'सनातन धर्म' यांवर) 'नास्तिक लोकांपासून सावधान' नावाचे आक्षेप घेणारे एक पुस्तक वाराणशीच्या श्री. मस्तरामजींनी प्रकाशित केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की जात-पात पाळणे हाच सनातन धर्म आहे असे वेदात सांगितले आहे. ज्यांनी संस्कृत आणि वेदाचे अध्ययन केलेले नाही, तो धर्म जाणू शकत नाही. ब्राह्मण हे वेदांचे रक्षक आहेत; त्यामुळे ब्राह्मणांच्या रक्षणासाठी ईश्वर अवतार घेत असतो. वेदामध्ये यज्ञाच्या आवश्यकतेवर खूप जोर दिला आहे, यज्ञामध्ये लागणाऱ्या पंचगव्यासाठी गाईची आवश्यकता आहे व म्हणून गाय हा धर्म आहे.....इत्यादी.

लेखकाच्या मनाकडे वळण्यापूर्वी लेखक महोदयांच्या भाषाशैलीबाबत दोन शब्द सांगणे अनुचित ठरणार नाही. परंपरागत क्लीष्ट भाषाशैली आणि दीर्घ प्रस्तावनेनंतर त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांना प्रश्न म्हणणेच असंगत होईल; कारण त्यांच्या लेखनात सिध्दान्तगत आक्षेप कमी आणि व्यक्तिगत कटूक्तीच अधिक आहे. त्यांनी आपल्या पुस्तकात पूज्य परमहंसजी आणि त्यांचे शिष्य कसे आहेत यावर लिहिण्याचेच श्रम अधिक घेतले आहेत.

लेखक महोदयांनी वारंवार सांगितलेले आहे की परमहंस गांजा ओढत होते. वास्तविक गांजा त्यांच्यासाठी औषध होते. आपल्या कोणत्याही शिष्यांना त्यांनी गांजा ओढायला शिकवले नाही. व परमतत्त्वाच्या प्राप्तीनंतर महापुरुषाचे कर्म अशुक्ल व अकृष्ण बनते. गीतेमध्ये म्हटले आहे.

**आपूर्यमाणमचल प्रतिष्ठं**
**समुद्रमाप: प्रविशन्ति यव्दत ।**
**तव्दत्कामा यं प्रविशन्ति सर्वे**
**स शान्तिमाप्नोति न कामकामी ।। (२/७०)**

म्हणजे भयंकर वेगाने वाहणाऱ्या हजारो नद्या समुद्राला मिळतात, पण समुद्राचे पाणी एक इंचभर देखील त्या ना वाढवू शकतात ना कमी करू शकतात. उलट त्याच

समुद्राशी एकरूप होतात. बरोबर त्याच प्रकारे स्थितप्रज्ञ महापुरुषांच्या कडे वेगाने उपभोग धाव घेतात; परंतु त्यांच्यातच ते मिसळून जातात. समुद्राप्रमाणे स्थितप्रज्ञ असणाऱ्या महापुरुष परमहंसांच्या नावावर शिंतोडे उडवणे म्हणजे स्वत:लाच कलंकित करणे होय. तसेच श्री करपात्री यांचा आम्ही सर्वजण आदर करत असतो. प्रयागपासून काशीपर्यंतच्या दीड वर्षांच्या निराधार विचरणामध्ये हातावर पडेल तेवढेच स्वल्प भोजन ते घेत म्हणून तर त्यांचे नाव 'करपात्री' असे पडले. ते त्यागी, विरक्त, निस्पृह आणि सरळ स्वभावाचे महात्मे होते. कर्मकाण्ड आणि गादीची स्थापना त्यांच्याकडून करवली गेली होती. त्यात त्यांचा काही दोष नव्हता. लेखक महाशयांनी त्यांना पण या विवादात कशाला ओढले आहे? जेव्हा परमहंसजींनी करपात्री यांना चित्रकूटातील रामराज्य परिषदीय राजनीतीच्या समारंभास येण्यास मना केले होते तेव्हा श्री करपात्री महाराजांच्या मुलाप्रमाणे लहान होते. महाराजश्रींना त्यांना सांगण्याचा समजवण्याचा पूर्ण हक्क होता. महान लोकांची गोष्टच वेगळी असते. त्याला लेखक महोदय स्वत:चा अपमान का समजतात? एवढ्याशा क्षुल्लक कारणाने पूर्वग्रहग्रस्त होता कामा नये.

कोणत्याही एखाद्या पुस्तकाची समीक्षा करताना त्याच्या लेखकाला वाटेल तसे संबोधित करणे उचित आहे का? असे करून या विद्वान लेखकांनी (ते वेदान्तचार्यही आहेत असे ऐकले आहे) शिष्टाचार दाखविण्याऐवजी स्वत:च्या वैचारिक कोतेपणाचा मात्र परिचय करून दिला आहे. ''जो रहे करवा वही बहे टोंटी'' त्या महाशयांनी ज्या विशेषणांचा किंवा भाषेचा प्रयोग केला आहे ती संतांची किंवा विद्वानांची भाषा प्रतीत होत नाही. आदि शंकराचार्याजींनी सांगितले होते ''जयति परमहंसो मुक्तिभावं समेति'' आणि या सज्जनांचे वाक्य आहे- ''वाह रे परमहंसी पोपलीला !'' मजेची गोष्ट तर ही आहे की महाशय स्वत:ला विद्वत्परिषदेचे अध्यक्षपण समजत आहेत. असो व्यक्तिपरक मूल्यांकन येथेच संपवून मूळ विषयाकडे वळू.

आश्रमद्वारा प्रकाशित पुस्तिकांमध्ये धर्माच्या नावावर प्रचलित रुढींचे खंडन केले आहे; परंतु या लेखक महाशयांनी ''व्यवसायात्मिक बुद्धि....'' श्लोकामध्ये प्रतिवादी लोकांच्या अर्थाला आमचा अर्थ समजण्याची चूक केली आहे. आमचे दुर्भाग्य हे की इतकी स्पष्ट गोष्ट ते समजू शकले नाहीत. त्यांनी पुस्तकांच्यावर जेवढे आक्षेप केलेत त्या सर्वांचे उत्तर पुस्तकांमध्येच सविस्तर दिलेले आहे. असे वाटते की त्यांनी पुस्तके संपूर्णपणे वाचलेलीच नाहीत. जर वाचली असतील तर सर्व पुस्तकांत जेवढे विषय

चर्चिले आहेत त्या सर्वांचे ससंदर्भ खंडन करायला हवे होते. त्यांनी सांगायला पाहिजे की आमचे कोणते म्हणणे वेदांतील ऋचेच्या विरुध्द आहे व आम्ही ज्या ऋचा उध्दृत केल्या आहेत त्या वेदांमध्ये नाहीत का?

सुरुवातीला एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे की लेखक महाशयांचा असा भ्रम आहे की ज्या धर्माची चर्चा आम्ही केली आहे अथवा आमच्या गुरुदेवांनी केली आहे तो आमच्या किंवा गुरुदेवांपूर्वी नव्हता, जसे आम्ही एखादा नवीन धर्म स्थापन करायला निघालो आहोत ! वास्तविक अशी काही गोष्ट नाही. आम्ही तर म्हणत आहोत की जगातील सर्व लोकांचा एकच धर्म आहे- व तो म्हणजे सनातन धर्म ! कसला आमचा? कसला तुमचा? कसला संप्रदाय? आम्हांला बरोबर तोच हवा आहे जो वैदिक ऋषींनी सांगितला आहे, जो उपनिषदात आहे, भगवान शिव, भगवान राम आणि भगवान श्रीकृष्णाने ज्याला दृढ केला आहे. गीतेमध्ये त्यांनी आपले स्वत:चे असे काही सांगितलेले नाही. तेराव्या अध्यायात ते म्हणतात- ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधै : पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमध्दिर्विनिश्चितै : ॥ (१३/४) जो ऋषींकडून सांगितला गेला, जो वेदांमध्ये आहे, जो ब्रह्मसूत्राच्या पदांमध्ये आहे तोच धर्म गीतेमध्ये वर्णिला आहे. महात्मा बुध्द, महावीर, मुसा, ईसा, मुहम्मद, कबीर किंवा नानक या सर्वांची मूळ शिकवण, सर्वांचा मूळ धर्म एकच आहे. त्यात कसलाही फरक नाही. धर्माचे हे शुध्द स्वरूप प्रत्येक मनुष्याला समजेल असे सांगणे, हा आमचा हेतू आहे.

धर्म नेहमी एकच असतो. त्यात कुरीती-कुरूढी घुसल्यामुळे सामाजिक विषमता जेव्हा वाढते तेव्हा कोणी महापुरुष त्याला समतेच्या धरातली खेचून आणतो. तो समानता आणतो म्हणून संप्रदाय म्हटले जाते. तेव्हा संप्रदाय काही नवा धर्म नाही. उलट विकृतींच्या परिमार्जनाचा एक संगठित प्रयास मात्र आहे. मनुष्याचे दुर्भाग्य हे आहे की जेव्हा कोणी सत्य सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा परोपजीवी लोकांनी ते नवीन आहे असे सांगून समाजाचा सत्याशी परिचय होऊ दिला नाही. कारण त्यांना भीती वाटत होती की जर लोकांना सत्य काय आहे ते समजले तर त्यांची रोजी-रोटी बंद होईल. त्यांचे भय सुरेन्द्राच्या भयाप्रमाणे अकारण होते. ज्यासाठी गोस्वामीजींनी सांगितले होते-

**सूख हाड लै भाग सठ, स्वान निरखि मृगराज ।**
**छीनि लेइ जनि जानि जड तिमि सुरपतिहिं न लाज ॥**

**(मानस-१/१२५)**

सर्वप्रथम तर त्यांनी दिलेले शीर्षकच चुकीचे व भ्रममूलक आहे ज्यात त्यांनी, आम्ही नास्तिक असल्याचे जाहीर केले आहे. आस्तिकता आणि नास्तिकता या दोन्हींच्या संबंधात त्यांचा मापदंड कोणताही असो, भगवान श्रीकृष्णोक्त गीतेमध्ये सांगितले आहे की अर्जुना, असत् वस्तूला अस्तित्व नाही आणि सत्य वस्तूचा तिन्ही काळात अभाव नाही. आत्मा हाच सत्य आहे आणि भूतादिकांचे शरीर नाशवान आहे ते नाहीच आहे. या परिभाषेनुसार जो अस्तित्वाचा उपासक आहे, जो सत्‌चा उपासक आहे, जो एकमात्र परमात्म्याच्या प्रति श्रध्दावान आहे तोच आस्तिक आहे आणि जो नश्वराच्या मागे भटकत आहे तोच नास्तिक आहे. ''आब्रह्मभुवनाल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन'' (८/१६) ब्रह्मा आणि ब्रह्मापासून उत्पन्न सृष्टी सूर्य, चंद्र, पृथ्वी, डोंगर, पाणी, अग्नि, आकाश झाडे-झुडपे इत्यादी नश्वर गोष्टींची पूजा करणारा नास्तिक आहे. या नश्वर कलेवरांच्या मागे जो भटकत आहे, जो त्यांच्यामागे लागून आपला वेळ घालवत आहे, जो त्यांना संतुष्ट करण्यासाठी धडपडत आहे तोच नास्तिक होय. लेखक महाशयांनी आश्रमीय साहित्याचा पुन्हा विचार करावा की ज्यात एका परमात्म्याच्या उपासनेवर भर दिला आहे किंवा नाही?

लेखक महाशयांनी सनातन धर्माच्या महान प्रचारकांमध्ये कुमारिलभट्ट, शंकराचार्य आणि उदायनाचार्य यांची नावे घेतली आहेत व आपल्याला त्यांच्या उत्तराधिकारी ते समजत आहेत. त्यांपैकी उदायनाचार्यांना किती लोक जाणत आहेत? सर्वसाधारण समाजाला या व्यक्तीचा किंवा तिच्या जीवनकार्याचा किंवा त्यांच्या वैशिष्ट्याचा परिचय नाही.

आता बाकी राहिले कुमारिलभट्ट ! असे म्हणतात की पुष्कळ दिवस ते गौतम बुध्दांबरोबर राहिले. परंतु लोक त्यांना जाणतात ते आचार्य शंकर कर्मकाण्डाच्या विरोधात त्यांच्याशी शास्त्रार्थ करायला गेले होते म्हणून. त्याच शंकराचार्यांच्या गादीवरून तुम्ही कुमारिलभट्टाची, शंकराचार्यांच्या विरोधकांची शिफारस करत आहात? त्या वेळी कुमारिल भट्ट प्रयागमध्ये तुषानलात आपले शरीर हठयोगाने जाळीत होते. त्यांनी शंकराचार्यांना आपला शिष्य मंडन मित्र याच्याबरोबर शास्त्रार्थ करायला सांगितले आणि स्वत: जळून गेले. कुमारिलभट्टाबरोबर शंकराचार्यांचा शास्त्रार्थ झालाच नाही. तर मग ते शंकराचार्यांचे समर्थक किंवा सनातनाच्या प्रचारकामध्ये कधीपासून गणले गेले?

शंकराचार्य ज्या सिध्दान्ताच्या प्रचारासाठी प्रसिध्द आहेत ते सिध्दांत आहे 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' त्यांचा श्लोक आहे-

**आब्रह्मस्तम्ब पर्यन्त सर्वं मायामयं जगत ।**
**सत्यं सत्यं पुनः सत्य हरेर्नामैव केवलम ।।**

अर्थात ब्रह्मापासून कीटकांपर्यंत संपूर्ण जगत नश्वर आहे. यामध्ये सत्य आहे फक्त हरी आणि हरीचे नाव । त्यासाठी 'करतल भिक्षा तरुतल बास' करायला लागला तरीही 'भज गोविन्दं'. एका परमात्म्याच्या भजनावर-भक्तीवर भर दिला. त्यांच्या गादीवरून तुम्ही कोट्यावधी देवी-देवतांची पूजा करायला सांगत आहात? शंकराचार्यांनी सांगितले की 'न मे जातिभेदः' तर लेखक महोदय जातिपातीलाच धर्म मानायला सांगत आहेत. ना श्रीरामाने आपल्या नावाबरोबर सिंह लावले ना श्रीकृष्णाने यादव लावले. शंकराचार्यांनी ना आपल्याला तिवारी म्हटले की शुक्ल? कर्मकाण्डाच्या बाबतीत शंकराचार्यांनी सांगितले-

**कुरुते गंगासागर गमनं, व्रत परिपालनमवा दानम् ।**
**ज्ञान विहीनं सर्वमतेन, मुक्तिर्नभवति जन्म शातेन ।।**

म्हणजे केवळ गंगाच नव्हे तर गंगासागरापर्यंतच्या तीर्थयात्रांनी, व्रतांनी अथवा दानांनी काहीही होणार नाही हे अगदी निर्विवाद सत्य आहे. आत्मज्ञानाशिवाय मुक्ती नाही असे आचार्यांचे मत आहे आणि त्यांच्याच गादीवर बसून तुम्ही कर्मकाण्डांची शिफारस करीत आहात?

शंकराचार्य बत्तीस वर्षांचे असतानाच त्यांची हत्या केली गेली हे सर्वज्ञात आहे. त्यांनी ज्या पाच हजार उध्दट कर्मकांण्डियांना शास्त्रार्थात हरवले त्यांना त्या वेळेच्या परंपरेनुसार शंकराचार्यांचे शिष्यत्व पत्करावे लागले. अर्थात ते शास्त्रार्थात भले निरुत्तर झाले तरी जीवनभर ते जे कर्मकांण्ड करीत होते, त्यातून त्याचे मन व बुध्दी कर्मकाण्डापासून मुक्त होऊ शकली नव्हती. दिग्विजयरत शंकराचार्यांच्या सान्निध्यात राहण्याचे अथवा त्यांच्यापासून प्रशिक्षण प्राप्त करण्याचे सौभाग्य त्यांना मिळाले नव्हते. असे वाटते की त्यांनी शिष्यत्वाचा नुसता अभिनय मात्र केला. याच कारणामुळे शंकराचार्यांचा मृत्यू होताच त्यांच्या गादीवरून कर्मकाण्डांचे समर्थन करणारे श्लोक आणि शंकराचार्यांच्या नावाने गीता आणि उपनिषदांवर भाष्ये लिहिली जाऊ लागली.

किती अंतर्विरोध आहे पाहा की जो महापुरुष 'एको ब्रह्म'चा उद्घोष आयुष्यभर करीत राहिला त्याच्या नावे विभिन्न देवी देवतांची स्तुती प्रचलित आहे. ज्या महापुरुषाने

सांगितले की ''क:पूजनीय: शिवतत्त्वनिष्ठ:''. पूज्यनीय कोण आहे? आचार्य म्हणतात की शिवतत्त्वामध्ये स्थित असणारा महापुरुष! परंतु आज स्वत:ला त्या महापुरुषाचे शिष्य आहोत असे सांगून कोणी गाई-बैलांची पूजा करायला सांगत आहे तर कोणी संध्या-गायत्रीची ! ज्या आचार्यांनी ''कि कर्म यत्रीतिकरे मुरारे'' असे म्हणून एकच प्रशस्त कर्म सांगितले. त्याच आचार्यांच्या नावे लिहिल्या गेलेल्या गीताभाष्यात कर्माचे पाच प्रकार सांगितले आहेत. दोन्हीपैकी कोणते पूज्य आचार्यांचे मानायचे व कोणते त्याज्य ठरवायचे?

विरक्त महापुरुषांचे स्थान जेव्हा साधनरहित व अर्धवट ज्ञान ग्रहण करणारे शिष्य ग्रहण करतात तेव्हा त्यांच्या हातून साधना होत नाही. आपल्या पूर्वीच्या गृहस्थ जीवनातील मतांपासून ते मुक्त होत नाहीत. त्यामुळे वास्तविक कृतीच्या जागी ते अनंत क्रियांचा प्रचार करू लागतात. ही त्यांचीच भेट आहे की एकमेव असणारा धर्म अनेक विपरीत धर्मांच्या स्वरूपात दिसू लागतो. जो कालान्तराने कलहाचे कारण बनतो. आचार्य जणांना नम्र विनंती आहे की पूज्य गुरुजनांना चुकीच्या स्वरूपात प्रस्तुत करून त्यांच्याविषयी लोकांच्या मनात अश्रध्देची भावना निर्माण करू नये.

लेखकमहाशयांची अशी चुकीची समजून झालेली दिसत आहे की वेदांना मानणे व त्यांच्या बाबतीत प्रामाणिकपणाने काही सांगण्याचा ठेका फक्त त्यांनाच मिळाला आहे. वेद फक्त त्यांचेच नाहीत. ते म्हणजे अखिल मनुष्यमात्राचा निधी आहे. परमात्म्याच्या शोधाचे विवेचन प्रथम वैदिक ऋषींद्वाराच झाले आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात की या जगात एकमेव असणाऱ्या परमात्म्याचेच अस्तित्व आहे. तेव्हा परमात्म्याचा शोध-ग्रंथ जे वेद त्यांना कोण नाकारू शकणार? वेदांचे महत्त्व यासाठी आहे की ते शाश्वत सत्य परमात्म्याला दृढ करीत आहे. परंतु जी गोष्ट वेदामध्ये नाही ती गोष्ट वेदामध्ये आहे असे सांगून श्रध्दाशील जनतेला भयभीत करू नये. आता प्रत्येक गोष्टीला धर्म समजून लोकांची दिशाभूल करण्यात औचित्य नाही कारण भारत आता साक्षर झाला आहे.

लेखकमहाशयांचा असा दावा आहे की वेदामध्ये कोणतीही तारीख दिलेली नसल्याने व ते मनुष्याने तयार केलेले नसल्याने सनातन आहेत. सनातनाचे हे कशा प्रकारचे लक्षण आहे? तारीख लिहावयाचे विसरून गेले की ती कृती सनातन बनली? इंग्रजी इतिहासकार म्हणूनच म्हणतात की भारताचे लोक इतिहास लिहिण्याचे जाणत

नाहीत. प्राचीन भारतीय वस्तूंचे तिथी निर्धारण अन्य देशातील तशा प्रकारच्या वस्तूंशी तूलना करीत ठरविण्याचा प्रयास सुरू आहे. तिथी (तारीख) न लिहिल्याने कोणतीही वस्तू प्राचीन बनत नाही किंवा तिचा गौरवही वाढत नाही.

जर वेद हाच लेखकाचा मुख्य ग्रंथ आहे तर मग खूपच चांगले होईल की त्यांनी आपल्या प्रवचनात लोकांना वेदातील ऋचांचा अर्थ सांगत जावा कारण वेद जाणण्याची गोष्ट तर लांबच, पण अधिकांश जनतेने त्या ग्रंथाना (पुस्तकांना) पाहिले देखील नाही. आणि ते पाहूही शकणार नाहीत कारण लेखकाच्या मते वेदांना पाहण्याचा व वाचण्याचा सर्वांना अधिकार नाही. आम्ही त्यांना असे विचारू इच्छितो की ज्या पुस्तकावर त्यांनी स्वत:चा शिक्का मारला आहे व ज्यांच्या मते त्या पुस्तकाचे वाचन मनन केल्याशिवाय मोक्ष मिळत नाही, त्यांच्याकडून अनुमोदित असणाऱ्या पाराशरादि स्मृतींमध्ये असे सांगितले आहे की शूद्राने त्या पुस्तकातील एक वाक्य वाचले तरी तो नरकात जाईल. म्हणजे हे पुस्तक आहे की नरकाचा दरवाजा? की खालच्या वर्गाच्या नरकाचे आरक्षण? ते तर शंकराचार्यांच्या खूप पूर्वीचे आहेत. त्यावर शंकराचार्यांचा एकाधिकार किंवा तुम्हा लोकांचा कब्जा केव्हापासून झाला? शंकराचार्यांच्या पूर्वी सनातन धर्म काय होता? की आदि शंकराचार्यांचेच मत सनातन आहे जे वि.सं. ८४५-८७७ मध्ये झाले होते?

लेखकाचे असे म्हणणे आहे की वेद हाच मोक्षाचा दरवाजा आहे; पण भगवान श्रीकृष्ण असे मानीत नाहीत. गीतेमध्ये म्हटले आहे की 'त्रैगुण्य विषया वेदा निस्त्रैगुण्यो भावार्जुना' (२/४५) म्हणजे वेद तीन गुणांपर्यंतच प्रकाश देत असते. त्याच्या पुढची स्थिती ते जाणत नाहीत. 'अर्जुना', तू तीन गुणांच्या पलीकडे जा. आत्मा नित्य आहे, त्यामध्ये स्थित हो'. म्हणजे जे तीन गुणांपर्यंत सिमीत आहे तो मोक्षाचा दरवाजा कसा?

तर मग वेदांचे काही महत्त्व नाही का? श्रीकृष्ण म्हणतात की महत्त्व आहे; परंतु एका मर्यादेपर्यंतच! म्हणजे किती? यावर ते सांगतात-

**यावानर्थ उदपाने सर्वत: संप्लुतोदके ।**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानत: ।। (२/४६)**

चारी बाजूंनी तुडुंब भरलेले स्वच्छ जलाशय प्राप्त झाल्यानंतर छोट्या-मोठ्या डबक्यांचा जितका उपयोग होतो तितकाच ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणाला वेदांचा उपयोग

होतो. योगेश्वर श्रीकृष्णानी 'वेद-वेद' ओरडणाऱ्या लोकांची 'वेदवादरता:' असे म्हणून निर्भत्सना केली आहे (पाहा, गीता २/४१-४४).

भगवत्पथामध्ये वेद कोठपर्यंत सहाय्यभूत आहेत? धार्मिक पोथ्यांचा किती उपयोग होतो? योगेश्वर श्रीकृष्ण म्हणतात की त्यांचा काही उपयोग नाही. त्या सहाय्यक नाही तर बाधक ठरतात.

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुध्दिस्तदा योगमवाप्स्यसि ।। (२/५३)**

म्हणजे वेदवाक्ये ऐकल्याने विचलित झालेली तुझी बुध्दी जेव्हा स्थिर होईल तेव्हाच तुला योग प्राप्त होईल. येथे श्रीकृष्ण म्हणतात की वेदवाक्ये ऐकल्याने बुध्दी विचलित होते.

समजा वेदामध्ये वर्णन केलेल्या धर्माचे पालन जर कोणी केले तर त्याला काय मिळेल? योगेश्वर श्रीकृष्ण सांगतात 'एवं त्रयी धर्ममनुप्रपन्ना गतागंत कामकामा लभन्ते' (९/२०) ते म्हणतात की वेदांमध्ये सांगितलेल्या धर्माचे पालन करणारे 'गतागतं लभन्ते' येरझऱ्या करीत राहतात, जन्ममरणाच्या कालचक्रात फिरत राहतात. यालाच आदि शंकराचार्यांनी 'पुनरपि जनन पुनरपि मरण पुनरपि जननी जठरे शयनम्' । असे म्हणून सर्वांना सावध केले आहे.

वेदांचे अध्ययन करून किंवा वेदान्तातील वाक्यांचे श्रवण करून ईश्वराला पाहता येते का? याबाबत श्रीकृष्णाचा निर्णय ऐका- अर्जुना, मी ना वेदाने, ना यज्ञाने, ना अध्ययनाने, ना दानाने, ना अनेक क्रियाविधीनी, ना उग्र तपांनी पाहिला जातो. परंतु हे परंतपा, अनन्य भक्तीच्या द्वारे मी केवळ पाहण्यासाठी नसतो पण तत्त्वाने जाणण्यासाठी व त्यात प्रवेश करण्यासाठी सुलभ आहे (११/४८, ५४)

या श्रीकृष्णांच्या वचनावरून वाटते भगवान श्रीकृष्ण वेदांना मानीतच नाहीत; परंतु खरी गोष्ट अशी नाही. ज्या वेदाला मानतात तो या चारी वेदांपासून वेगळाच असा वेद आहे.

**ऊर्ध्वमूलमध: शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।। (१५/१)**

उत्कृष्ट परमात्मा हाच ज्याचे मूळ आहे, प्रकृतिपर्यंत ज्याच्या शाखाप्रशाखा पसरलेल्या आहेत असा संसारूपी अविनाशी वृक्ष आहे. वेद म्हणजे त्याची पाने आहेत. जो या संसारवृक्षाला जाणतो अर्थात जो प्रकृतिसहित परमात्म्याला जाणतो तोच वेदवेत्ता आहे. पुढे म्हणतात वर आणि खाली सर्वत्र त्याची मुळे व शाखा पसरलेल्या आहेत. म्हणजेच परमात्मा व प्रकृती सर्वत्र आहे. प्रत्येक व्यक्तीत परमात्म्याचा निवास आहे. त्यामुळे ज्या क्षणी तो अनन्यभावाने परमात्म्याच्या ठिकाणी अत्यंत निष्ठावान होतो त्या क्षणी परमात्मा त्याच्यामध्ये जागृत होतो, त्याला अनुभूती प्रदान करू लागतो. हेच वेद होत, पोथी नव्हे. त्याला भगवंत शिकवत असतात. आजही असेच आहे आणि सदैव असेच राहील. या अर्थाने वेद अपौरुषेय आहेत. या अर्थाने वेद परमात्म्याचे नि:श्वास आहेत. परमात्मा कुठल्याही पानावर झोपून आराम करीत नाही आणि त्यांच्या श्वसनक्रियेतून वेदही लिहिले गेले नाहीत.

वेद ज्याची पाने आहेत त्या सुविरूढमूल अश्वत्थाची पूजा करावयाची नाही, परंतु ''असंग शस्त्रेण दृढेन छित्वा'' असंगरूपी शस्त्राने या वृक्षाला कापावयाचे आहे. तुम्ही असंग व्हाल तर कोणते वैदिक अनुष्ठान, कोणते कर्मकांड कराल? कोणतेही कर्मकांड करावयाची आवश्यकता नाही. ''तत: पदं तत्परिमार्गितव्यं'' त्या परमपदाचा शोध केला पाहिजे.

पंधराव्या अध्यायात भगवंत म्हणतात-

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो**
**मत्त: स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो**
**वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ।।१५/१५**

अर्जुना, मी सर्वांच्या हृदयात स्थित आहे. माझ्यातच स्मृती, ज्ञान, तर्कशक्ती आहे. जाणल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंमध्ये मीच जाणण्यास योग्य आहे. आणि जेव्हा मला जाणले जाते तेव्हा मीच वेदाचा कर्ता आणि मीच वेदवत्ता आहे म्हणजेच वेद जाणणारा आहे. आता पहिल्या श्लोकात म्हटले होते की जो जाणतो तो वेदवित्त आहे. येथे म्हणतात मी पण वेदवित्त आहे. म्हणजे तो जाणणारा, तसेच श्रीकृष्णपण वेदवित्त आहेत. परमात्म्याचे ज्ञान होणेच वेदाचा अंत किंवा वेदांत आहे. उपनिषदे किंवा महर्षी

बादनारायणाच्या नावावर प्रचलित उत्तरमिमांसा वेदान्त नाही. एकमात्र परमात्म्याच्या स्मरणासच योगेश्वर स्मृती मानतात. मनू किंवा कपिल यांच्या स्मृतीला नाही. तेव्हा आम्ही वेद मानीत नाही या आमच्यावर केले गेलेल्या आरोपात काही औचित्यच राहत नाही. आम्ही देखील वेदाला त्याच स्वरूपात व तितकेच मानत आहोत जेवढे योगेश्वर श्रीकृष्णांच्या गीता व उपनिषदांमधे आहे.

लेखकाने आम्हाला एक चांगली आठवण करून दिली की, आम्ही श्रौत आणि स्मार्तमधील अंतर जाणत नाही. ते म्हणतात की स्मार्त लोक वेददेखील मानतात मग तर श्रौत लोक स्मृतीही मानत असतील? मग दोन्हीमध्ये काय फरक राहिला? ज्या धर्मसूत्रांना-स्मृतींना-पुराणांना तुम्ही मानत आहात, आम्ही त्यातीलच उध्दरण देऊन श्रौत व स्मार्त कशाला म्हणतात ते सांगू इच्छितो-

**दाराग्निसम्बन्धमिज्य । श्रौतस्यं लक्षणम् ।**

**स्मार्तो वर्णमाश्रमाचारो यमैश्च नियमैर्युत: ।।**

श्रौतमध्ये त्या कृतींचा अंतर्भाव आहे ज्यांची नावे वेदांमध्ये आहेत आणि विधि-विधान, संहिता ग्रंथात तसेच ब्राह्मण ग्रंथात आहेत. जसे- अग्नीची स्थापना, दर्श पौर्णमासादि यज्ञ, सोमकृत्य इत्यादी. स्मार्तमध्ये त्या कृतींचा समावेश होतो ज्या स्मृतीमध्ये आहेत तसेच वर्णाश्रम आचार विचारांशी संबंधित आहेत- ''अग्र्याधान पूर्वकोऽधीत प्रत्यक्षवेद मूलो दर्श पूर्णमासादि श्रौत: । अनुमित परोक्ष शाखामूल: शौचचमनादि: स्मार्त:'' मजेची गोष्ट तर ही आहे की सर्व स्मृतीचे मूळ वेदात शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि ज्या आचरणाचा संबंध वेदामध्ये मिळत नाही तेथे म्हटले जाते की या संबंधित एखादी श्रुती असेल; पण ती आता हरवली गेली आहे किंवा लुप्त झाली आहे.

येथे आम्ही हेही रहस्योद्घाटन करू इच्छितो की लेखकांनी असे का लिहिले आहे की स्मार्त लोकही वेदांना मानतात? असे यासाठी म्हटले गेले आहे की स्मार्त नावाचा संप्रदाय आदि शंकराचार्यांद्वारा प्रवर्तित झालेला आहे. शंकराचार्यांच्यापूर्वी या नावाचा संगठित असा संप्रदाय नव्हता. स्मार्तानाममध्ये पंचदेवोपासना (विष्णू, शिव, गणेश, शक्ती आणि सूर्याची पूजा) अनिवार्य आहे. किती विडंबन आहे पाहा की ज्या महापुरुषाने म्हटले होते- ''एको ब्रह्म द्वितीया नास्ति'' (श्रुती 'एकं सत्' आहेत, वेदान्त आहे ''एको देवो'') त्याच शंकराचार्यांचे सुपात्र शिष्य पंचदेवाचा प्रचार करत आहेत.

वास्तविक पंचदेव असतच नाहीत. पंच तर महाभूते असतात. आप, तेज, वायू, आकाश व पृथ्वी यांना किंवा ग्रहांना-उपग्रहांना पाणी अर्पण करणे, पर्वत आणि वृक्षांची पूजा म्हणजे कोणता विधी नाही. श्रीकृष्ण म्हणतात अशा पूजेने फळ मिळाले तरी ते फळही नष्ट होते आणि पूजणारापण नष्ट होतो. तेव्हा पूजन करावयाचेच आहे तर त्या विधीनेच पूजन का करू नये ज्याचे फल कधी नष्ट होत नाही व पूजणाराही नष्ट होत नाही- 'न मे भक्त: प्रणश्यति' । शैव, वैष्णव व शाक्त संप्रदायांचे शंकराचार्यांनी तेव्हाच खंडन केले होते, आजचे स्मार्त त्यांचीच पूजा करीत आहेत. तेव्हा श्रौत-स्मार्त यांचे विशेषज्ञ लेखक महोदयांनी कृपया सांगावे की श्रुतिसम्मत असणाऱ्या परमात्म्याची पूजा करणे चूक आहे की स्मार्तांची पंचदेवोपासना चुकीची आहे?

त्याच प्रकारे महाराज किंवा मनुस्मृतीची निंदा करावयाचा आमचा विचार नाही. कारण त्यांचे धर्मशास्त्र ज्या रूपात आज उपलब्ध आहे त्याच रूपात बरीच भर घातली गेली आहे. काही काढून टाकले गेले आहे तर काही बदलून लिहिले गेले आहे. नारद स्मृतीमध्ये लिहिले आहे की मनूच्या धर्मशास्त्राचे संक्षेपण आणि परिवर्द्धन नारद, मारकण्डेय आणि सुमती भार्गवने केले आहे. काही स्मृतींमध्ये मनूच्या नावावर जे श्लोक दिले गेलेले आहेत ते मनुस्मृतीत आढळून येत नाहीत. हेमाद्रिने सांगितले की मनूच्या शास्त्राला भृगू, नारद, बृहस्पती आणि अंगिराने आपापल्या प्रकारे प्रस्तुत केले आहे. वर्तमान काळात उपलब्ध असणाऱ्या सर्व स्मृती पुष्यमित्र शुंगाच्या शासन काळात लिहिल्या गेल्या आहेत. याला मनुस्मृतीमधूनही पुष्टी मिळते कारण यात कम्बोज, शक पहलव आणि चिनी लोकांची नावे आहेत (१०/४४) ज्यांचा उल्लेख मौर्य सम्राट अशोकाच्या शिलालेखात आहे. त्यापूर्वी त्यांचा उल्लेख आढळत नाही. यावरून या स्मृती शासनानंतरच्या आहेत.

येथे आणखी एक स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. या प्रकरणात व अन्यत्रही अनेक आधुनिक कृतींची उध्दरणे दिलेली आहेत. याचा अर्थ त्या समग्र ग्रंथाशी सहमत आहोत असे नाही. त्यातून हाही अर्थ घेऊ नये की, आमच्या कामाच्या पंक्ती आम्ही घेतल्या व बाकीच्या विचारांपासून स्वत:ला वाचवले. उध्दरण तर आम्ही लेखकाच्या विरोधी पुस्तकातूनही घेत असतो तर मग काय त्या पुस्तकांशी आम्ही सहमत असतो? जे आपल्याला उचित वाटते तेच घ्यायचे असते- मानायचे असते. जिथे आवश्यक आहे तेथे समीक्षा करावी लागते. त्यांचा किंवा त्यांच्या विचारांतील पोकळपणा

दाखवण्यासाठी किंवा त्यांच्या विचारातील विसंगती दाखवण्यासाठीपण त्यांची उध्दरणे घ्यावी लागतात. याचा अर्थ असा नाही की आम्ही कोणतेही पुस्तक प्रमाण मानीत नाही. सर्वांगरूपाने आम्ही श्रीमद्‌भगवदगीतेला प्रमाण मानतो. आम्ही असेही मानतो की सद्‌गुरूचे एक वाक्य जरी मिळाले तरी ते कोट्यावधी शास्त्रापेक्षा श्रेष्ठ आहे आणि साधनेला आरंभ केल्यानंतर प्रभू जे आंतरिक निर्देश देतात ज्यांना ऋषींनी स्वानुभावाची संज्ञा दिली आहे ते बाह्य प्रमाणांपेक्षा श्रेष्ठ असून त्याच्या पश्चात पुस्तकांचा काही उपयोग उरत नाही. कृतीमध्ये उतरल्यानंतर गीता, सद्‌गुरु, आणि आंतरिक निर्देश यांमध्ये कोणताही संघर्ष नसतो. परमात्मा अपरिवर्तनशील आहे. लाखोवर्षांनंतरपण तो जे निर्णय देईल तो एकसारखाच असेल.

केवळ पोथीच प्रमाण नाही. संत कबीर म्हणतात ''तू कहता कागद की लेखी, मैं कहता आँखिन की देखी, मेरा तेरा मनवा कैसे एक होय'' पूज्य गुरुदेव म्हणत की उपासना लिहिता येत नाही. लिहिलीच जात नाही. भजन भगवंतच करून घेत असतात, हृदयात रथी बनतात. मार्गदर्शन करायला लागतात. त्यांच्या आज्ञेचे पालन म्हणजेच भजन होय. ते सर्व शास्त्रांपेक्षा श्रेष्ठ आहे, विधिनिषेधांच्या पलीकडे आहे; परंतु लेखक महोदयांची विवशता आहे की ते ज्या संप्रदयाला चिकटून बसले आहेत तेथे वेदांच्या व्यतिरिक्त स्वानुभवासाठी दुसरी काही जागाच उरली नाही. वेदाचा देखील ते तोच अर्थ ग्राह्य समजतात जो त्यांच्या सांप्रदायाने मान्य केला आहे. श्री रामानुजाचार्यांची व्याख्या त्यांना स्वीकार्य नाही. पाश्चात्य विद्वानांमध्ये मॅक्समूल्लर कीथ, मॅकडोनल, रास, जॉली इत्यादींचे भाष्य तसेच स्वामी दयानंद किंवा सातवळेकर इत्यादी भारतीय विद्वानांनी वेदाचा जो अर्थ लावला आहे तोही त्यांना मान्य नाही.

ते ईश्वरीय संकेत, अंतर्प्रेरणा, अनुभव किंवा ईश्वरीय आदेशासारखी कोणतीही गोष्ट स्वीकार करू इच्छित नाहीत. अन्यथा त्यांची आधारशिलाच ढासळेल. 'निज निज मुखन कही निज होनी', 'कवि उर अजिर नचावहिं बानी', 'उर-प्रेरक रघुवंश विभूषन,' 'उमा कहउँ मैं अनुभव अपना', 'उभय घरी महँ सब देखा', 'निज अनुभव अब कहउँ खणेसा' इत्यादी स्वानुभव प्रमाणाची कोणतीही व्याख्या त्यांच्याजवळ नाही. जेवढे वेदात लिहिले आहे तेवढेच खरे आहे, जेवढे बायबलमध्ये आहे तेवढेच खरे किंवा जेवढे कुरानात किंवा ग्रंथसाहेबामध्ये जेवढे सांगितले आहे तेवढेच खरे आहे. संकीर्णता, कट्टरता, सांप्रदायिकता आणखी दुसरी काय असते? असे सांगितले जाते

की एका सेनापतीने सिकंदरचे विशाल पुस्तकालय जाळून टाकले कारण त्याचे म्हणणे असे होते जर ही पुस्तके कुरानविरुध्द आहेत तर ती 'कुफ्र' आहेत (मुसलमान धर्माविरुध्द मत) व जर कुरानात आहे तेच या पुस्तकांमध्ये असेल तर या पुस्तकाची काय आवश्यकता? कुरान तर आहेच ना! असली आंधळी भावुकता ना प्रशंसनीय आहे ना अनुकरणीय आहे! पुस्तक कोणतेही असो, ती पूजेची वस्तू नाही. ते माईल स्टोनप्रमाणे आहे. (मैलाचे दगड) पाहा आणि पुढे रस्ता धरा. असो, आपण आता पुन्हा मनुस्मृतीकडे वळू.

ही स्मृती म्हणजे सत्ययुगाची रचना नव्हे. त्या मनुनेपण ती लिहिलेली नाही, ज्यांच्याबद्दल मानसमध्ये लिहिले आहे - ''स्वायंभुव मनु अरु शतरूपा । जिनसे भई नर सृष्टि अनूपा ॥'' त्यांना आदि पुरुष मानले जाते आणि जेव्हा भगवंताने वर दिला तेव्हा ते म्हणाले ''कश्यप अदिति महातप कीन्हा'' सर्व सृष्टी कश्यप आणि आदितीपासून मानली गेली आहे. या प्रकारे मनु-शतरूपा, कश्यप-अदिती आदि पुरुष आहेत, ते एकच आहेत. त्यांच्या संतानांमध्ये आहेत देवता व दानव, सुर आणि असुर, आर्य व दस्यू ज्यांचे वर्णन वेदांमध्ये आहे. आरंभी या दोन जातींचा उल्लेख मिळतो. त्यानंतर यक्ष आणि रक्ष जातीचे वर्णन मिळते. गंधर्व व किन्नरांची चर्चा आहे आणि वाल्मीकी रामायणापर्यंत मंडूर, हैहय, गज, वानर, ऋक्ष, गृध्द इत्यादी मानव जातींचे वर्णन मिळते. जामवन्त उत्तम प्रकारचे ज्योतिषी होते, हनुमान सुसंस्कृत परिमार्जित भाषा बोलत असत. त्या वेळपर्यंत याच जाती होत्या परंतु मनुस्मृतीमध्ये पाणके (भोई), कोळी, सोनार, तेली, लोहार, चांभार, मल्ल, लिच्छिवी इत्यादी जातींचे वर्णन आहे ज्या सर्व आधुनिक आहेत. बहुतांशी या स्मृती महाभारत काळानंतरच्या आहेत कारण त्यांच्यापैकी काही नावे तसेच शक, यवन, कम्बोज, द्रवीड, दरद, किरान या जातीचे वर्णन महाभारताच्या पूर्वीच्या कोणत्याही ग्रंथात दिसून येत नाही. असे वाटते की वर्तमान मनुस्मृती आणि वर्तमान महाभारत या दोन्हीमध्ये परिवर्तन झाले आहे.

महाभारत काळापर्यंत म्हैस हा जंगली प्राणी समजला जाई. तिच्यापासून दूध मिळू शकते याची कल्पनाच नव्हती. महाभारतात मेंढी, बकरी, गाय, गाढवीण आणि उंटीणीच्याही दुधाची चर्चा आहे, परंतु म्हशीच्या दुधाचा उल्लेख नाही. मनुस्मृतीमध्ये मात्र उल्लेख आहे की, जंगली पशूंमध्ये म्हशीचे दूध काढले जाते. असे वाटते की तेव्हा दुधासाठी म्हशींची धरपकड सुरू झाली होती. ज्याप्रमाणे आजकाल अफ्रिकेत हरिणीचे

दूध काढले जाते. मृगी डेरी फार्म देखील तिथे सुरू झाले आहेत. भारतात अजून हे दूध वापरले जात नाही. यावरून देखील स्पष्ट दिसून येते की, मनूच्या नावावर जी स्मृती उपलब्ध आहे ती सत्ययुगात लिहिली गेलेली नाही. या स्मृतीचा मनू गोष्टीतल्या काल्पनिक पात्राप्रमाणे आहे- कालिदासाच्या मेघदूताप्रमाणे !

या दूषित मनुस्मृतीमध्ये महाराज मनूच्या वास्तविक विचारांची झलक बऱ्याच ठिकाणी दिसून येते. ते विचार गीतेतील विचारांशी अनुरूप आहेत. उदा. दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे की, वेदामध्ये वर्णन केलेल्या हवन यज्ञादी क्रियांचे फळ नष्ट होणारे आहे, परंतु ओंकार कधी नष्ट पावत नाही. दर्श पौर्णमासादि यज्ञांपेक्षा, तसेच चार प्रकारच्या यज्ञांपेक्षा (पितृकर्म, हवन, बळी, वैश्वदेव) जपयज्ञ सोळा आणे उत्तम यज्ञ आहे (१/८४-८६) ज्याला लेखकाने द्रोण चाटण्याची संज्ञा दिली आहे.

चौथ्या अध्यायात मनूचे विचार गीतेप्रमाणे प्रशस्त आहे. हे विचार म्हणजे गीतेचेच अनुकरण आहे- तीच शैली, तेच शब्द की यज्ञशास्त्रातील जाणकार लोक ऋषियज्ञ (वेदाध्ययन), देवयज्ञ (होम), भूतयज्ञ (बळी), नृयज्ञ (अतिथी सेवा) आणि पितृयज्ञ (तर्पण) अशा महायज्ञांना न करता विषयांचे हवन करून या यज्ञांना संपादन करीत असतात. गीतेतील चौथ्या अध्यायात 'जुहृति' वाले बरेच श्लोक आहेत.

लेखकाने मनूच्या या उक्तीचा दुरुपयोग केला आहे की संपूर्ण कृतींचा अंतर्भाव ईश्वराच्या उपासनेत आहे (१२/८७) पण येथे मनाच्या क्रियांचा अंतर्भाव करून थापा मारल्या आहेत. पुढे ते म्हणतात की सनातन धर्मामध्ये भावनेला जेवढे महत्व आहे तेवढे कृतीला महत्व नाही. सर्वसाधारण काम पण चांगल्या भावनेने केले की तो धर्म आहे व तुमची जशी भावना असेल त्याप्रमाणे ती फळ देत असते. ज्याप्रमाणे गाय ही पशू असली तरी तिची पूजा केली की ती तुम्हाला तारते. परंतु या निष्कर्षांशी मनूचा काही संबंध नाही. अहो तुम्ही अत्यंत स्वच्छ व निर्मळ मनाने साप पकडलात तर तो तुम्हाला चावणारच! भावनेसाठी आधार पण तसाच प्रशस्त हवा.

ज्या कृतींचा अंतर्भाव ईश्वराच्या उपासनेत केला आहे त्यात मनूने सहा क्रिया सांगितल्या आहेत की वेदाभ्यास, तपस्या, ज्ञान, इंद्रियांचा संयम, अहिंसा आणि गुरुसेवा, परंतु आत्मज्ञान या सर्वांपेक्षा श्रेष्ठ मानले आहे. कारण ते सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ आहे आणि त्याच्यामुळेच अमृततत्त्वाची प्राप्ती होत असते (१२/८३-८५). मनूने सांगितल्या

कृती सहा, तर यांनी सांगितल्या सहाशे! आणि मनूच्या विरुद्ध एक तर्क केला आहे की या पंक्तीमधून कर्मकाण्डाची निंदा नाही परंतु आत्मज्ञानाची प्रशंसा आहे. अर्थात कोणाची प्रशंसा करायची असेल तर दुसऱ्यांची निंदा केली जाते. या तर्काचा आधार घेऊन लेखक महोदय व त्यांचा ग्रुप सांगतो की ज्या प्रसंगात वेदादिंना तुच्छ लेखले आहे ती वेदांची निंदा नसून तो भक्तीचा महिमा किंवा आत्मज्ञानाची महती सूचित केली आहे. मग तर लेखकाने हेही मानले पाहिजे की वेदामध्ये भक्ती किंवा आत्मज्ञान नाही. हे तर औषधाची महती सांगण्यासाठी कृपथ्याला प्रोत्साहन देण्यासारखे झाले.

समस्येचे मूळ तर स्वयं वेदच आहेत; कारण त्यात ९६ हजार मंत्र, कर्मकांड आणि अंतिम चार हजार मंत्र ज्ञानपरक सांगितले गेले आहेत ज्यात कर्मकांडांचा पोकळपणा दाखवला गेला आहे, अशा प्रकारे दोन्ही भाग परस्पर विरुद्ध आहेत. आदि शंकराचार्यांनी याबाबत असे समाधान केले आहे की जे अविद्येच्या पाशात बध्द आहेत त्यांच्यासाठी कर्मकांड आहे व ज्यांनी कर्मकांडातील निरर्थकता जाणली आहे व जे त्यापेक्षा श्रेष्ठत्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत त्यांच्यासाठी ज्ञानपरक उद्‍बोधन आहे. मीमांसावाले वेदातील ब्राह्मण भागाला (कर्मकांडाला) प्रधान मानतात आणि उपनिषदाच्या भागाला महत्त्व देत नाहीत. त्यांचे म्हणणे असे आहे की कर्मकांड केल्यानंतर ती योग्यता आपोआप येते. रामानुज म्हणतात की दोन्ही भाग सर्वांसाठी आहेत. गीतेतील निष्काम भावनेत प्रत्येक प्रकारचे कर्मकांड केले जाऊ शकते. कोणतेही अनुष्ठान फळाच्या इच्छेने करता कामा नये. अशा प्रकारे वेदांबद्दल अनेक परस्पर विरोधी सिध्दांत प्रचलित आहेत. या संबंधात गोस्वामी तुलसीदासांनीही आपले विचार व्यक्त केले आहेत- ‘‘श्रुति पुरान बहु कहे उपाई । छूट न अधिक अधिक अरुझाई ।’’ हा तर काही उपायच नाही. मग काय करावे? गोस्वामीजी म्हणतात- ‘‘गुरु कहयो राम भजन, मोहिं नीको, लगत राज डगरो सो’’ (विनय पत्रिकां)

मनुस्मृतीमध्ये लिहिले आहे की ज्या स्मृती वेदबाह्य आहेत, ज्या कुर्तकयुक्त आहेत, त्या परलोकासाठी व्यर्थ आहेत. यावरून स्पष्ट दिसते की बऱ्याचशा स्मृती वेदांच्या विपरीतपण आहेत. सर्व साधारण लोकांना त्या कोणकोणत्या स्मृती आहेत ते सांगितले पाहिजे. तेव्हा स्मृतीमध्ये सांगितले आहे म्हणून कोणतीही गोष्ट मानता कामा नये. कपिल मुनींची स्मृती वेदबाह्य आहे असे हे लोक म्हणतात परंतु गीतेमध्ये भगवान म्हणतात,

सिध्दांमध्ये मी कपिल आहे. ते माझी विभूती आहेत. यम-नियमाचा लेखक महोदयपण स्वीकार करतात; परंतु सांख्य आणि योग दर्शनला वेदमूलक मानले जात नाही.

लेखकाचा असा दावा आहे की ज्याने वेद वाचले नाहीत ते धर्म जाणू शकत नाहीत. त्यांना धर्माच्याबाबतीत काहीही सांगण्याचा अधिकार नाही. ब्रह्म वेदान्तैकवेद्य आहे अर्थात केवळ वेदान्तद्वारा ते जाणता येते. लेखक महोदय तर वेदान्ताचार्य आहेत. त्यांनी ब्रह्म जाणले आहे का? दुसरीकडे त्यांनी असेही लिहिले आहे की शबरी, रैदास या सर्व संतांनी ब्रह्माला जाणले आहे. वेद वाचल्याशिवाय ते संत कसे झाले? शबरीने कोणता वेद वाचला होता? रामकृष्ण परमहंसांनी कधी वेद वाचले? रैदासला भगवंताने संत बनवले होते. सनातन धर्माच्या ठेकेदारांनी तर पावलो पावली त्यांचा विरोध केला. आज किती धर्माचार्य आपल्या येथे रविदास जयंती करतात? फारतर काही हरिजन टाळ-मंजिरा वाजवून त्यांचे स्मरण करतात किंवा सरकारी प्रसरणामध्ये त्यांचे ओझरते स्मरण केले जाते.

संत रविदासाची गोष्ट सोडा पण काशीच्या लोकांनी तर गोस्वामी तुलसीदासांनापण सुखाने राहू दिले नाही. याचा पुरावा त्यांच्याच एका दोह्यात मिळतो.

**वासर ढासनि के ढका, रजनी चहुँ दिशि चोर ।**
**संकर निजपुर राखिये, चितै सुलोचन कोर ।।२३९**

अर्थात, दिवसा काशीच्या ठगांचे धक्के आणि रात्री चोरांचा उपद्रव हे शंकर भगवान, कृपा करून आपल्या नगरीत या लोकांपासून माझे रक्षण कर. त्यांचा दोष काय होता? केवळ इतकाच की देवभाषा संस्कृतच्या जागी त्यांनी लोकभाषा हिंदीचा उपयोग केला. तुलसीदासांचे असे मत होते की भगवंतासाठी भाषेचे महत्त्व नाही. प्रेमाचे महत्त्व असते.

**का भाषा का संस्कृत, प्रेम चाहिये साँच ।**
**काम जु आवै कामरी, का लै करे कुमाच ।। दोहा ५७२**

याच्या उलट लेखकाने इंग्रजीमधून एक उध्दरण देत सांगितले आहे की, ''संस्कृत इज द सिम्बॉल ऑफ इंडियन कल्चर ॲण्ड सिव्हिलायजेशन''. त्यांना पश्चाताप वाटत आहे की आम्ही तेवढे संस्कृत जाणत नाही की एखादा श्लोक रचू शकू. तसे आम्ही कोणत्याही भाषेचे समर्थक किंवा विरोधी नाही. भाषा तर विचार प्रचाराचे माध्यम मात्र

आहे. कोणतीही भाषा पवित्र किंवा अपवित्र नसते. हे वर्गीकरणच विसंगत आहे. आणि यालाही काही प्रामाणिकपणा म्हणत नाही की आम्ही बोलायचे हिंदीत, खायचे प्यायचे हिंदीत परंतु गौरव करायचा संस्कृतचा !

धर्माप्रमाणेच संस्कृत भाषापण एका वर्गाद्वारे आपल्या घरापर्यंत सीमित केली गेली आहे. आज दशमी आहे तर उद्या एकादशी असेल ते असे म्हणू शकत नाहीत. विद्वानाकडे (पंडिताकडे) जायलाच हवे. हेच कारण आहे की लोक इंग्रजी डेटने आपले काम चालवत असतात. याच प्रकारे दरबारात उर्दू प्रचारात आली, हिंदी आली, दुसऱ्या दुसऱ्या भाषांतून लोक आपले काम चालवू लागले. या भाषांनी राजभाषा होण्याचा गौरव प्राप्त केला आणि सर्व भाषांची जननी, देववाणी, लेखकाच्या भाषेत परमात्मा ज्या भाषेत बोलतो ती देववाणी संस्कृत भारतीय संविधानाने संरक्षण दिले असूनही शेवटचे श्वास घेत आहे. अधिक पैसे देऊन मुले कॉन्व्हेंटमध्ये शिकत आहेत, हिंदी-इंग्रजी शाळेत शिकत आहेत परंतु कोणीही पालक शिष्यवृत्ती, भोजन-वस्त्रादि सर्व सोयी ठेवूनही आपल्या मुलांना संस्कृत पाठशाळेत शिकवणे पसंत करीत नाही.

वैज्ञानिक शोधांचे वर्णन या भाषेत आहे असे म्हणता येणार नाही, परंतु संस्कृतमध्ये हे नियम आवश्य आहेत की कोण मंदिरात जाऊ शकतो? कोण जाऊ शकत नाही? कोण घर बनवू शकतो? कोण बनवू शकत नाही? कोण संपत्ती ठेवू शकतो कोण ठेवू शकत नाही? ऐतरथ ब्राह्मणात (ज्याला भगवती श्रुती म्हटले गेले आहे) लिहिले गेले आहे-

**शूद्रो अन्यस्य प्रेष्यः कामोत्याव्यः यवाकाम वध्यः (३५-३)**

अर्थात शूद्र दुसऱ्याकडून अनुशासित असतो. तो आज्ञा केल्यावरच उठू बसू शकतो. त्याची कधीही पिटाई करता येते- असे नियम संस्कृतमध्ये अवश्य आहेत. मनुष्या मनुष्यात घृणेचे बीज रुजवणारी, समाजाला कर्मकाण्डात जखडणारी भाषापण संस्कृतच आहे.

गोस्वामींनी या कर्मकाण्डाचे समर्थन न करता एका भगवंताच्या भक्तीवर रामभक्तीवर जोर दिला. ते ज्या काशीत राहत होतो तेथे मुक्ती मिळवण्यासाठी काही लोक स्वत:ला करवतीने कापून टाकत असत. काशीमध्ये मृत्यू येणे याचे मोठे महात्म्य

समजले जाते. परंतु ही गोष्ट ना कबीरांनी स्वीकारली ना गोस्वामी तुलसीदासांनी स्वीकारली. गोस्वामींच्या मते-

**काशी विधि बस तनु तजे हठि तनु तजे प्रयाग ।**
**तुलसी जो फल सो सुलभ राम नाम अनुराग ।।**

कर्मकाण्डी लोक त्यांना काष्ठमाला धारण करणारे समजत होते. ज्ञानमार्गी त्यांना ज्ञानविहीन म्हणत असत; तर उपासनामार्गीपण त्यांना आपले म्हणायला तयार नव्हते.

**करमठ कठमालिया कहै, ज्ञानी ज्ञान विहीन ।**
**तुलसी त्रिपथ विहाइगो राम दुआरे दीन ।।**

भजनाच्या नावावर अनेक मार्ग, जसे कर्मकाण्ड, ज्ञान मार्ग, उपासना मार्ग- प्रचलित आहेत; पण भजनात असे दहा-वीस मार्ग असत नाहीत. भजन स्वयं एक मार्ग आहे- केवळ एक आचरण आहे- कारण नम्रतापूर्वक परमात्म्याचे स्मरण करणे म्हणजे भजन! योगेश्वर श्रीकृष्णांचे हेच सांगणे आहे की, योगामध्ये निर्धारित क्रिया एकच आहे आणि भजनाच्या नावावर जो अनेक गोष्टी करतो तो अविवेकी आहे. (गीता (२/४७)

लेखकाने अंत:करणाच्या शुध्दीसाठी तसेच आत्मदर्शनासाठी यज्ञ, यज्ञोपवीत, ब्रह्मस्वरूपा संध्या-गायत्री सूर्यार्ध, दान, प्राणायाम, यम नियमादि आणि सत्यनारायण कथा करावी असे म्हटले आहे. त्यातून अहिंसा, सत्य इत्यादी यम तथा पवित्र-शुध्द स्वाध्यायादि नियम अंत:करण शुध्द करू शकतात कारण त्या क्रिया मानसिक आहेत. स्मृती स्मरणाबरोबरच या क्रिया केल्याने मनाचा निरोध होतो अन्यथा जपमाळ तर सरावाने हातात फिरत राहते.

**माला तो कर मे फिरे, जीभ फिर मुख माहिं ।**
**मनवा तो चहुँ दिशि फिरे, यह तो सुमिरन नाहि ।।**

असो, या मानसिक क्रियांमध्येपण परमात्म्याचे स्मरण अत्यंत आवश्यक आहे तेव्हाच आत्मशुध्दी संभव आहे, परंतु बाहेर वेदी बनवून येथील वस्तू उचलून तेथे ठेवण्याने किंवा अग्नीत विविध प्रकारच्या वस्तू जाळण्याने मनाचा निरोध कसा होईल? मनाच्या संयमासाठी एकांतवास व मनाचे पूर्णपणे नियमन करणे अपरिहार्य आहे. हा आत्मदर्शनाचा

विधी आहे. सूर्याला जल अर्पण करणे आत्मदर्शनाचा विधी नाही. सूर्याला त्या जमान्यात जल अर्पण करत होते, जेव्हा सात घोड्यांच्या रथामध्ये बसून उदयाचलापासून अस्तापर्यंत सीमित यात्रेत तो घामाघूम होत असे आणि जेव्हा त्याची पत्नी त्याचे तेज सहन करू शकत नाही. तेव्हा त्याच्या उदयाच्या वेळी राक्षस चारी बाजूंनी तिला घेरत असत. आता या पौराणिक रुपकामध्ये असणारे निहित सत्य कोणी सांगत नाही. कोणी जाणतही नाही. लोकांना आता अशा कथा ऐकण्यात रुचीही राहिली नाही. तेव्हा आता सूर्याला पाणी पाजून किंवा जलाशयाला दिवा दाखवून आत्मदर्शनाची अपेक्षा ठेवू नका. सनातन धर्माच्या नावावर विश्वातील लोकांना तुम्ही हे शिकवणार आहात का?

सत्यनारायण कथेमध्ये दोन-चार अवास्तव गोष्टींमधून श्रोत्यांच्या मनात कदाचित ही गोष्ट ठसली जाईल की ''सत्य एव नारायण:'' म्हणजे परमात्मा हेच सत्य आहे. पण तोपर्यंत सगळी कथाच पूर्ण होते. त्यामध्ये परमात्म्याच्या प्राप्तीसाठी आचरण कसे करावे हे सांगितले जात नाही. ज्यामध्ये ही क्रिया सांगितली नाही अशा कथेचा काय उपयोग? या कथेच्या संबंधात आश्रमातील एका पुस्तिकेत विस्ताराने लिहिलेले आहे. आम्ही केवळ एवढे सांगू इच्छितो की आत्मशुध्दीची ही पध्दत केवळ हिंदूपर्यंतच सीमित आहे कारण विश्वातील अन्य लोकांना तुम्ही हिंदू बनवू शकत नाही. ते तर ईश्वरच बनवू शकतो. आणि हिंदूमध्येही केवळ तीस टक्के लोकांनाच यज्ञोपवीत आणि गायत्रीमंत्राने शुध्द होण्याचा अधिकार आहे. बाकीच्या सत्तर टक्के शूद्रांना तसेच विश्वातील सर्व लोकांना आत्मशुध्दीसाठी दुसराच रस्ता शोधावा लागणार.

विश्वातील मानवमात्रांना कोणताही भेदभाव न राखता आमचे ऋषी आव्हान करीत आहेत ''श्रृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा:।'' योगेश्वर श्रीकृष्णांनी भेदभाव न ठेवता जगातील सर्व लोकांसाठी आत्मदर्शनाचा एकच विधी सांगितला आहे. मग तुम्हीच वेगळा मार्ग कशाला आचरता? भगवान राम, कृष्ण, शिव यांना तुम्ही जो मार्ग सांगत आहात तो माहीत नव्हता का? गीतेत पावलो पावली सांगितलेला विधी आपण का मानत नाही?

**सर्वद्वाराणी संयम्य मनो हृदि निध्रुध्यच ।**
**मूर्ध्र्याधायात्मन: प्राणमास्थितो योगधारणम ।।**

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन ।**

**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।। (८/१२-१३)**

म्हणजे इंद्रियांना सर्व बाजूंनी नियंत्रित करून मनाला हृदयदेशात स्थिर करून प्राणांचा अर्थात अंत:करणाच्या सर्व व्यापारांचा मस्तकात निरोध करून ब्रह्माचा परिचय करून देणाऱ्या 'ओम्'चा जप करा आणि माझे ध्यान करा. एखाद्या महापुरुषाचे ध्यान करा.

सहाव्या अध्यायात म्हणतात की अंत:करणाच्या शुध्दीसाठी माझे ध्यान करा (६/१२-१४). अठराव्या अध्यायात ते म्हणतात की आत्मदर्शनाचा विधी म्हणजे शुध्द (पवित्र) बुध्दीने एकांताचे सेवन, युक्ताहार-विहार, शब्दादि विषयांचा त्याग तसेच ध्यानयोगात युक्त होऊन वैराग्याचा आश्रय घेणे (१८/५२). महापुरुषाने स्वत: विधी दाखवला असताना त्या व्यतिरिक्त नवनवीन विधी शोधणे म्हणजे लोकांची दिशाभूल करणे व त्यांच्याकडून दक्षिणा उकळणे या हेतूसाठी केलेला स्वार्थी उद्योग होय.

गोस्वामींचा याबाबतीत स्पष्ट विचार आहे- पाहा-

**मति कीरति गति भूति भलाई ।**

**जब जेहिं जतन जहाँ जेहि पाई ।।**

**सो जानन सतसंग प्रभाऊ ।**

**लोकहु वेद न आन अपाऊ (बालकांड २/३)**

म्हणजे सद्बुध्दी, कीर्ती, परमगती, ऐश्वर्य आणि कल्याण या गोष्टी जेव्हा प्राप्त होतात तेव्हा तो सत्संगाचा परिणाम आहे असे जाणले पाहिजे. भगवंताच्या प्राप्तीचा दुसरा कोणताही उपाय वेदामध्ये सांगितलेला नाही तर तुम्ही गाय आणि ब्राह्मणाची पूजा केल्याने परमगती कोणत्या वेदातून सिध्द करत आहात? ज्या गोष्टी वेदामध्ये तुम्हांला दिसल्या त्या गोस्वामींना दिसल्या नाहीत का? वेदविरोधी तुम्ही आहात की गोस्वामीजी? ज्यांनी लिहिले आहे की,

**श्रुति पुरान बहु कहे उपाई ।**

**छूट न अधिक अधिक अरुझाई ।।**

मग तर तुम्ही त्यांनापण म्हणाल- ''चलत कुपंथ वेद मग छाँडे ।''

''अतुलित महिमा वेद की तुलसी कियो विचार'' गोस्वामीजी तुमच्या आमच्यापेक्षा अधिक वेद जाणत होते. वेदामध्ये काहीही लिहिलेले असो; परंतु गोस्वामीजींचा विचार आहे की,

**श्रुति सिध्दान्त इहइ उरगारी ।**
**भजिय राम सब काज बिसारी ।।**

वेदच नव्हेत तर सर्व पुराणांचे किंवा सर्व ग्रंथाचे तात्पर्य एवढेच आहे:-

**श्रुति पुराण सब ग्रन्थ कहाहीं ।**
**रघुपति भजन बिना सुख नाही ।।**

मनासहित इंद्रियांना सर्व बाजूंनी नियंत्रित करून परमात्म्याच्या ठिकाणी श्रध्दा स्थिर करणे हीच वैदिक अवधारणा आहे-

**सब कर मात खगनायक एहा ।**
**करिय राम पद पंकज नेहा ।।**

तर तुम्ही धावता कधी देवीच्या पूजेकडे तर कधी लक्ष चंडी यज्ञाकडे.

कृपया स्पष्ट उत्तर द्या की वेदांचा हा आशय उज्जैनच्या त्या ब्राह्मणांनी जाणला होता का की जे वेदाच्याच विधींनी शिवपूजा करीत होते व ज्यांनी शूद्राला शिव मंत्र दिला होता (एक बार हर मन्दिर जपत रहेऊं शिव नाम ।. तो शुद्र शिव मंदिरात घुसून बसला होता) की आजचे लोक वेदाचा आशय जाणतात ? ज्यांनी शूद्रांनी काशीतील मंदिरात प्रवेश केल्यानंतर दुसरे मंदिर बनवले व म्हणतात 'धर्मकी जय हो ।'- परंतु मंदिरात जाऊ नका. गेलाच नाहीत तर धर्म कोठून शिकणार? 'प्राण्यांमध्ये सद्भावना ठेवावी' असे म्हणायचे, परंतु आम्हांला स्पर्श करू नका. ही कसली सद्भावना? सापाला हात लावू नका, विंचवाला शिवू नका. ठीक परंतु मनुष्याने मनुष्याला स्पर्श करावयाचा नाही? 'विश्वाचे कल्याण व्हावे' असे म्हणायचे; पण समुद्र ओलांडून जावू नका असे सांगायचे?

धर्माच्या नावावर लोक आणि वेदात वर्णित क्रियांचे मूल्यांकनपण गोस्वामींनी केले आहे.

**तीर्थाटन साधन समुदाई । जोग विराग ज्ञान निपुनाई ।।**
**नाना कर्म धर्म ब्रत दाता । संयम दम जप तप मख नाना ।।**
**भूत दया द्विज गुरु सेवकाई । विद्या विनय विवेक बडाई ।।**
**जहँ लगि साधन वेद बरवानी ।**

**(रामचरित मानस १२६/३-४)**

वेदवर्णित या सर्व साधनांचे फळ आहे ''हरि भगति'' आणि ''सो रघुनाथ भगति श्रुति गाई'' श्रुतीमध्ये परमात्म्याच्या भक्तीचे गायन आहे; परंतु भक्ती मिळेल कोठे? या साधनांमध्ये? पुस्तकांमध्ये? नाही.

**भगति तात अनुपम सुख मूला ।**
**मिलइ जो सन्त होहिं अनुकूला ।।**

'धर्म से विरति' धर्म वैराग्यप्रधान आहे. 'निज निज धरम निरत श्रुति नीति ।' श्रुतिच्या नीतीप्रमाणे आपापल्या धर्मानुसार चालण्याचा परिणाम सांगतात 'एहि कर फल पुनि विषय विरागा ।' मुख्य हेतू हा की या कर्मकांडास त्याग करणे, मनात विषयांबाबत वैराग्य निर्माण करणे, त्यानंतर भगवतचरणी समर्पण- पूर्ण विरक्ती.

संपूर्ण रामचरितमानसामध्ये गोस्वामीजींनी एकाच कर्मावर भर दिला; परंतु आपण अनेक प्रकारच्या क्रियांची शिफारस केली आहे. कधी म्हणतील की सत्संगतीच्या महिम्यामध्ये हे सांगितले आहे, कर्मकांडाची निंदा नव्हे तर कधी भक्तीच्या महिम्याचे वर्णन करतील व पुन्हा इतर क्रिया सांगतील. गोस्वामीचा स्पष्ट आदेश आहे-

**नर विविध कर्म अधर्म बहुमत शोकप्रद सब त्यागहूँ ।।**
**विश्वास कर कहे दास तुलसी राम पर अनुराग हूँ ।।**

**(मानस/अरण्यकाण्ड)**

लेखकाचा असा आक्षेप आहे की आम्ही गीतेचा मनमानेल तसा अर्थ करतो; परंतु गोस्वामींची भाषा तर सरळ हिंदीमध्ये आहे. ती तर सर्वांना समजते ना ! येथे

गोस्वामीजी म्हणतात की विविध कर्म व विविध मते हा सर्व अधर्म आहे. आणि अधर्माचा नाश व्हावा असे लेखक महोदयांनाही वाटते. अधर्म हा शोकप्रद असतो त्याचा त्याग करा. मग करायचे काय? केवळ एकच श्रीरामाच्या चरणी उत्कट प्रेम करा.

लेखकाच्या पुस्तकाचे उपशीर्षक आहे ''चलत कुपंथ वेद मग छाडे''- परंतु त्यांनी स्पष्ट केले नाही की गोस्वामीजी मग वेद कशाला म्हणतात आणि कुपंथ काय आहे? या, गोस्वामीजींच्या शब्दातच पाहा-

**श्रुति सम्मत हरि भगति पथ, संयुक्त विरति विवेक ।**
**तेहि न चलहिं नर मोह वश, कल्पहि पंथ अनेक ।।**

**(उत्तरकाण्ड/१००)**

श्रुतिसम्मत मार्ग कोणता आहे? लेखकाची गोभक्ती? सत्यनारायण भक्ती? सूर्य भक्ती? कोणती भक्ती श्रुत सम्मत आहे? गोस्वामीजी म्हणतात की केवळ हरिभक्ती ! एकमात्र परमात्म्याची भक्ती ! हाच वेदाचा मार्ग आहे आणि केवळ एकच मार्ग आहे. नान्य: पन्था विद्यतेऽयानाय दुसरा कोणताही मार्ग नाही. याव्यतिरिक्त अनेक मार्ग, विविध साधना, विविध प्रकारचे रस्ते शोधतो त्यानांच गोस्वामी कुपंथी म्हणतात. मग 'चलत कुपंथ' हे शब्द कोठे लागू पडतील? गोस्वामीजींनी याचा प्रयोग आपली दीनता प्रकट करण्याच्या संदर्भात केला होता. ते आपल्या स्वत:मध्ये दोष शोधत होते; परंतु त्यांच्या मानसाची कथा वाचणारे काही विद्वान हे दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करीत आहेत.

''जन्मना जायते शूद्र'' हा श्लोक अत्री स्मृतीमधील नाही असे आम्ही का म्हटले? असा सवाल करून याबाबत त्यांनी आमच्यावर खूप झोड उठवली आहे. आम्ही त्यांना असे सांगू इच्छितो की अत्रीस्मृती अजूनपर्यंत मौखिक किंवा जशातशा हस्तलिखित स्वरूपात आहे आणि त्यातील श्लोकसंख्ये बाबत पण मतैक्य नाही. अत्रींच्या नावावर हा श्लोक कोणी महात्म्याने सांगितला होता; परंतु ही स्मृती अद्यापपर्यंत मुद्रित रूपात दिसून येत नाही व म्हणून या श्लोकाला समीक्षेतून वेगळे केले आहे. परंतु एवढ्याशा गोष्टीवरून जन्माने जातिव्यवस्था सिध्द झाली काय? दुसरी गोष्ट ते म्हणतात की ब्रह्म शब्दापासून ब्रह्मज्ञ बनतो ब्राह्मण बनू शकत नाही. हे असे तुम्ही कशाच्या आधारे लिहिले? यावर आम्ही सांगू इच्छितो की अथर्ववेदात हा शब्द ब्राह्मण या अर्थाने आलेला आहे

जसे- ब्रह्म च क्षत्रं च न विभीतो न रिष्यत: (२/१५/४). तैत्तरीय ब्राह्मणामध्येही आहे की- ब्रह्म वै ब्राह्मण: क्षत्रं राजन्य: (३/९/१४)

आश्चर्याची गोष्ट तर अशी आहे की अत्यंत चिकित्सक असणाऱ्या लेखक महोदयांनी गोस्वामी तुलसीदासांच्या नावावर एक दोहा रचला आहे. ''ब्रह्म ज्ञान जाना नही, कर्म दिया छिटकाय । सो नर पामर मूढ है, पुनि-पुनि नरकहिं जाय ॥''

अत्री तर अत्यंत प्राचीन ऋषी आहेत. त्यांच्या रचनेबाबत मतभेद होऊ शकतो परंतु गोस्वामींची रचना तर लोकांच्या जिभेवर घोळत आहे. त्यांच्या नावावर इतके भयंकर खोटे लिहून जिला देववाणी किंवा कल्पद्रुम म्हटले जाते त्या संस्कृत भाषेला कृतार्थ केले आहे!

**खल: सर्षपमात्राणि परछिद्राणि पश्यति ।**
**आत्मानस्तु बिल्वमात्राणि पश्यत्रपि न पश्यति ॥**

लेखक महोदयांचे म्हणणे आहे की, ज्याला व्याकरण येत नाही तो धर्म समजत नाही. आम्ही लेखकाच्या या मताशीही सहमत नाही. कारण ज्यांना ईश्वरानुभूती प्राप्त झाली होती ते बहुतांशी महापुरुष पार्थिव शिक्षणात शून्य होते. असे सांगितले जाते की व्याकरण ज्या सूत्रांवर आधारित आहे ती सूत्रे भगवान शंकरांच्या डमरूतून निघाली आहेत. या डमरूने कोणते व्याकरण शिकले होते? कठोपनिषदातील पुढील मंत्राची ही संगती कशी लावायची-

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ॥**
**(१/२/१३)**

ब्रह्मविद्येच्या प्राप्तीसाठी शिक्षण आणि व्याकरण यांचा कितपत उपयोग होतो याविषयी मुण्डक उपनिषदात एक विचार सांगितला आहे. या उपनिषदाच्या आरंभीच एक कथानक आहे की शौनक नावाचे एक प्रसिध्द मुनी होते. ते एका मोठ्या विश्वविद्यालयाचे कुलपती होते. पुराणांत असा उल्लेख आहे की त्यांच्या हाताखाली अठ्ठ्याऐंशी हजार ऋषी शिकत होते. ब्रह्मविद्या जाणण्यासाठी ते महर्षी अंगिरांना शरण गेले. (विचार करा की, जर ही विद्या पुस्तकात असती तर ते ऋषींकडे कशाला गेले असते?)

महर्षी अंगिरांनी त्यांना सांगितले की विद्या दोन प्रकारची असते- एक परा आणि दुसरी अपरा! यांपैकी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, शिक्षण, कला, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष या सर्व अपरा विद्या आहेत; परंतु ज्याने परमात्म्याला जाणले जाते तिला परा विद्या म्हणतात. लेखक महाशयानी आपल्या पुस्तकात आठव्या पानावर लिहिले आहे की व्याकरण, ज्योतिष, निरुक्त, कल्प यांसह वेदांचे अध्ययन केले पाहिजे. तर मुण्डक उपनिषदाचे ऋषी म्हणतात ब्रह्म जाणण्यासाठी ना व्याकरणाची आवश्यकता आहे ना शिक्षणाची! गंभीर गोष्ट तर ही आहे की ज्या वेदांना मीमांसकांप्रमाणे लेखक महाशयांनी त्याला अपौरुषेय- स्वयंसिध्द असे म्हटले आहे तर कोणी त्याला अति श्रेष्ठ सिध्द करण्याचा प्रयत्न करीत आहेत अशा या चारी वेदांनाच त्या महर्षींनी टाळले. आता लेखक महोदय त्यांनाही नास्तिक म्हणण्याचे धाडस करतील का? हे मुण्डक उपनिषद त्या अकरा उपनिषदांपैकी एक आहे जे आदि शंकराचार्यांनी शेकडो उपनिषदातून निवडले होते.

बरोबर अशाच प्रकारची गोष्ट छांदोग्य उपनिषदात आहे. एक दिवस सनत्कुमाराकडे नारदजी गेले आणि प्रार्थना केली की, भगवन, उपदेश करा. अधीहि भगव इति ह उपसपाद सनत्कुमार नारद । तं ह उवाच ''यद् वेत्थ तेन मां उपसीद ततः ते उर्ध्व वक्ष्यामी, इति । स ह उवाच ऋग्वेद भगवोऽयोगी यजुर्वेदं, सामवेदं, आथर्वण, चतुर्थ, इतिहास पुराणं पंचमं, वेदानां वेदं (व्याकरण) पित्र्यं, राशि दैव, निधिंवाको वाक्यं एकावनं देवविद्या, ब्रह्मविद्यां, भूतविद्यां, क्षत्रविद्यां, नक्षत्रविद्यां, सर्पदेवजन-विद्यां, एतद्भगवोऽध्येमि । सोऽहं, भगवो, मन्त्रविद एवऽस्मि, नात्मवित् । श्रुत हि मे भगद्दशेभ्यः, तरति शोक, आत्मविद इति । सोऽहं भगवः शोचामि तं मां भगवान शोकस्य पारं तारयतु ।'' येथे नारदानी आत्मज्ञानासाठी वेद-व्याकरणादि निरुपयोगी आहे असे सांगितले आहे. सनत्कुमारांनी त्यांना सांगितले की हे सर्व वाचेचे विषय आहेत. मन आणि बुध्दी त्याच्याही पुढे आहेत व ईश्वर त्याच्याही पलीकडे आहे. ध्यानद्वारा त्याला प्राप्त करता येते. ईश्वर पंचमहाभूतांच्या वर प्राणांचेपण प्राण आहेत. भूमी आहे, अमृत आहे, सर्वत्र आहे तो आत्मा आहे. सातव्या अध्यायात वर्णन केलेल्या या प्रकरणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी लेखक महोदयांनी तर्क केला आहे की हे कथन वेदादि शास्त्रांना तुच्छ लेखण्यासाठी नाही तर आत्मज्ञानाची महानता सूचित करण्यासाठी आहे. व्याकरणाचे पाठांतर करणाऱ्या साठी आदि शंकर म्हणतात-

**भज गोविन्दं भज गोविन्दं भज गोविन्दं मूढमते ।**
**प्राप्ते सन्निहिते मरणे, नहि नहि रक्षति डुकृञ्करणे ।।**

एवढ्या स्पष्ट इशाऱ्यालापण लेखक महाशय असे म्हणतील का की हा श्लोक व्याकरणाला तुच्छ लेखण्यासाठी नसून मृत्यूचा महिमा गाण्यासाठी लिहिला आहे? व्याकरणाचे पाठांतर करणाऱ्यांना शंकराचार्यांनी 'मूढमते' असे म्हटले आहे व फटकारले आहे की, मरण आल्यावर व्याकरणातील सूत्रे कामाला येणार नाहीत. तरीही लेखक व्याकरणाची शिफारस करीत आहेत? व्याकरणाची महती गाऊन ते आत्मज्ञान देत आहेत. असे वाटते की आदि शंकराचार्यांनी ज्या ज्या गोष्टींना वर्ज केले होते त्याच गोष्टी करण्यासाठी स्वयंभू पीठाधीश्वर लेखक महाशय सज्ज झाले आहेत. जर त्यांना संत कबीरांचे म्हणणे सांगितले "पोथि पढि पढि जग मुआ" केवळ मृत्यू हातात येतो तर त्यावर ते गरम होतात व म्हणतात ते तर 'कलम गह्यो नहि हाथ" यांच्यामधील आहेत. तेव्हा तुम्ही गोस्वामी तुलसीदासांच्या सल्ल्यानुसार विचार करा.

**वाक्य ज्ञान अत्यन्त निपुन भव पार न पावे कोई ।**
**निशि गृह मध्य दीप की बातन्ह तम निवृत्त नहिं होई ।।**
**जब लगि नहि निज हृदि प्रकास अरु विषय आश मन माही ।**
**तुलसीदास तब लगि जग योनि भ्रमत सपनेहु सुख नाही ।।**

**(विनय पत्रिका, १२३)**

तेव्हा बंधूनो, मानवशरीराची सार्थकता तेव्हाच आहे जेव्हा तुम्ही हृदयात प्रकाश निर्माण करण्यासाठी काही प्रयत्न कराल. स्वत:चा बचाव करण्यासाठी असा तर्क करू नका की हे तर हृदय-प्रकाशाची प्रशंसा करण्यासाठी सांगितले गेले आहे, वाक्य-ज्ञानाची तुच्छता वर्णन करण्यासाठी नाही. या नावेला छिद्र आहे या नावेत बसू नका नव्या नावेत बसा असे सांगितले जाते असे म्हणून जीर्ण-शीर्ण नौकेत बसू नका कारण हे तर नव्या नावेच्या प्रशंसेसाठी सांगितले गेले आहे.

संस्कृत आणि व्याकरणाचे स्वत:ला पंडित समजणाऱ्या लेखक महाशयांनी आपल्या पुस्तकातील १२व्या पानावरील "तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्यकार्य व्यवस्थितौ"- याचा अर्थ असा लिहिला आहे की धर्म-अधर्म, पाप-पुण्य, कार्य-अकार्य या सर्वांच्याबाबत निर्णय घेताना वेद प्रमाण मानावेत. या श्लोकाचा हा अर्थ

होतो का? येथे कोणत्या शब्दाचा अर्थ वेद असा सांगितला आहे? शास्त्र म्हणजे वेद असा अर्थ होतो का?

पंधराव्या अध्यायात शेवटी योगेश्वरांनी शास्त्र कशाला म्हणायचे ते स्वत: सांगितले आहे. गीता शास्त्र आहे ''इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्त मयानध'' (१५/२०) आणि सोळाव्या अध्यायातील या श्लोकामध्ये ते म्हणतात की कर्तव्य आणि अकर्तव्याच्या या व्यवस्थेमध्ये तुझ्यासाठी शास्त्र हेच प्रमाण आहे. तर मग तुम्ही शास्त्राच्या नावावर वेदाकडे कशाला धाव घेता? आणि तेही ज्या अवस्थेत की वक्ता स्वत: आपले शास्त्र काय आहे हे स्पष्टपणे सांगत आहे.

ज्या व्यासांनी वेदांचे संकलन केले त्यांनीसुध्दा वेदाला शास्त्र म्हटले नाही. तसेच ज्याला सहा शास्त्रामधील एक शास्त्र म्हटले जाते त्या व्यासांच्या नावावर असणाऱ्या उत्तर मीमांसेला किंवा वेदांताला त्यांनी शास्त्र म्हटले नाही मग शास्त्राच्या नावावर तुम्ही इकडे तिकडे कशाला धावता? महाभारतातील भीष्म पर्वाच्या त्रेचाळीसाव्या अध्यायात श्रीव्यास म्हणतात- ''गीता सुगीता कर्तव्या'' तुम्ही याला केवळ गीतेची स्तुती आहे असे मानू नका. कारण व्यासांनी अन्य शास्त्राना अनावश्यक म्हटले आहे- ''किमन्यै शास्त्रविस्तरै:'' शास्त्रे अनेक असली तरी ''सर्व शास्त्रमयी गीता'' असे श्रीव्यासांनी आपले निर्णायक मत दिले आहे. तर मग तुम्ही गीतेलाच आपले शास्त्र का मानत नाही? वेदाच्या नावावर त्या वेदान्त दर्शनाकडे का धावता की ज्याच्या पहिल्या अध्यायातच धर्म सांगताना म्हटले आहे की ब्रह्मविद्येचा किंवा वेदाध्ययनाचा शूद्राला अधिकार नाही. आणि याचा आधार सांगितला आहे स्मृतींचा 'श्रवणाध्यनादि प्रतिषेधात स्मृतेश्च' (१/३/३८)

आदि शंकराचार्यांनीदेखील अनेक धर्मग्रंथांमध्ये गीतेचेच नाव लिहिले आहे ''गेयं गीता नाम सहस्त्रं'' गाण्यास योग्य ती गीता होय. सहस्त्रनामाचा अर्थ विष्णु सहस्त्रनाम असा नाही परंतु त्या परमात्म्याची हजारो-असंख्य नावे आहेत त्यातील एका नावाचे गायन (जप)! ''भगवद्‌गीता किंचितधीता'' ज्याने गीतेचे थोडे जरी वाचन केले असेल त्याचे यमसुध्दा काही करू शकत नाही. वाचण्यासाठी त्यांनी फक्त गीता या ग्रंथाचीच शिफारस केली आहे. तुम्ही त्यांच्या निर्देशाला माना आणि गीतेला धर्मशास्त्र घोषित करून एकतेचे सूत्रधार बना.

विद्वान महाशयांचे म्हणणे आहे की वेदामध्ये यज्ञाचे वर्णन आहे व ते (यज्ञ) करणे म्हणजे धर्म होय येथे आम्ही लेखकाचे शब्दच उद्धृत करीत आहोत म्हणजे यज्ञाविषयीचे त्यांचे मत काय आहे ते समजेल. ते म्हणतात की यज्ञ दोन प्रकारचे असतात एक विहित व दुसरा अविहित! अविहित यज्ञ म्हणजे आमच्या दैनंदिन जीवनातील सर्व कर्म जसे तोंडाने जेवणे, पीठात पाणी घालणे इत्यादी. परंतु विहित यज्ञ म्हणजे मंत्रोच्चारपूर्वक अग्नीमध्ये आहुती अर्पण करणे. ती आहुती सूर्य मंडलात जाते. सूर्य मंडलातून पर्जन्याद्वारा वनस्पतींमध्ये अन्नात आणि प्राण्यांच्या वीर्यामध्ये येते आणि त्यांपासून प्राण्यांची उत्पत्ती होते. अशा प्रकारे सृष्टिचक्र सुरू असते. अग्निहोत्र, दर्शपौर्णमास लक्षाहुती यज्ञामध्ये गाईचे दूध, दही, तूप, शेण तसेच मूत्राची आवश्यकता असते. जर वेदशास्त्रानुमोदित धार्मिक यज्ञामध्ये गो जनित पंचगव्याचे अपरिहार्य महत्व आहे तर मग गाईला धर्म मानण्यात काय आपत्ती आहे?

अहो आपत्ती कसलीच नाही, आम्हीही मानले असते परंतु यज्ञामध्ये पंचगव्याचा उपयोग केल्याने गाय धर्म होत असेल तर यज्ञामध्ये तर अनेक वस्तूंचा प्रयोग होतो. यज्ञामध्ये समिधेची आवश्यकता असते मग झाडाला धर्म मानायचे का? जव, तीळ, दशांगही लागते मग त्याला धर्म का मानायचे नाही? यज्ञात मध लागतो मग मधमाशीला धर्म का नाही म्हणायचे? गाईपासून पाच नाही अनेक वस्तू मिळतात दुधापासून दही व तूप, पनीर बनते. तिच्या चामड्यापासून व हाडांपासूनही अनेक वस्तू बनवल्या जातात. परंतु पंचगव्यासारख्या विशिष्ट आविष्काराची चर्चा गीतेमध्ये केलेली नाही. गाईचे दूध नि:संदेह पौष्टिक आहे. अर्धा शेर दूध देणारी गायही निश्चितपणे संरक्षणीय आहे. मुलांच्या रूपात असणारा उद्याचा भारत नि:संदेह तिच्यावर अवलंबून आहे. त्यामुळे तिला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित केले पाहिजे; परंतु तिला धर्माचे स्वरूप देऊ नका कारण आपल्या पाराशर स्मृतीमध्ये आहे की शूद्र जर कपिला गाईचे दूध प्यायला तर तो नरकात जाईल. म्हणजे सत्तर टक्के मुलांसाठी गाय नरकदात्री बनली. ज्यांच्यासाठी ती धर्मस्वरूपा आहे ते तेच जाणो की ती का धर्मस्वरूपा आहे ते. आश्रमातील आमच्या पुस्तिकेत आम्ही गाईच्या उपयुक्ततेविषयी नाही म्हटलेलेच नाही. आमचा विरोध आहे ते तिच्या धार्मिकतेला, गाईचे शेपूट पकडून वैतरणा तरून जाण्याच्या कुप्रथेला. आश्रमाचा त्या पुस्तिकेत आम्ही 'गो' शब्दाचा अर्थ इंद्रिय आहे असे सर्वत्र लिहिले आहे. त्या पुस्तिकेत आम्ही लिहिले आहे की मानसमध्ये ७० वेळा गाय आणि तिच्या पर्यायवाचक शब्दांचा

उपयोग आहे- ज्यामध्ये १७ वेळा गाय पशुरूपात उदाहरणमात्र आहे. तेरा वेळा मौल्यवान संपत्तीच्या रूपात आहे आणि चाळीस वेळा 'गो' शब्द इंद्रिय या अर्थाने वापरला आहे. ईश्वर अवतार जरूर घेतो; पण एखाद्या पशूसाठी नाही तर पवित्र आत्मा असणाऱ्या भक्तांच्या सकलेन्द्रिय संयमासाठी !

पिठात पाणी मिसळणे, तोंडात घास घालणे किंवा अग्नीमध्ये एखादी वस्तू अर्पण करणे हा कोणता धर्म? गीतेमध्ये योगेश्वर श्रीकृष्णांनी चौथ्या अध्यायात एकाच यज्ञाच्या तेरा चौदा क्रिया सांगितल्या आहेत; पण यज्ञाची चर्चापण केलेली नाही. बहुतेक श्रीकृष्णांना अग्निहोत्र दर्शपौर्णमासादि यज्ञ माहीत नव्हता. अन्यथा गीतेमध्ये त्याची चर्चा अवश्य केली असती. योगेश्वरांनी जो यज्ञ सांगितला आहे त्या व्यतिरिक्त यज्ञ करणाऱ्यांना (जो खरोखर यज्ञ नाही; परंतु लोकांनी त्याला यज्ञाचे नाव दिले आहे) क्रूरकर्मी, नराधम आणि पापचारी असे म्हटले आहे आणि सोळाव्या अध्यायात अशा दांभिकांना ते बारा बारा आसुरी आणि अधम योनीत फेकतात- (१६/१७-१९).

या वैज्ञानिक युगामध्ये शहरातील कचरा अग्नीमध्येच जाळला जातो. मग झाला का हा यज्ञ? अग्निमध्ये स्वाहा म्हणण्याने ढग नव्हे पण कार्बन डाय ऑक्साइड बाहेर निघतो. याने वायू शुध्द होतो असे कोण म्हणेल? याने प्रदूषणाचा फैलाव होतो. अहो हा धूर सूर्यापर्यंत पोहचूच शकत नाही तर त्यातून ढग कसे तयार होतील? त्यातून पाणी मिळण्याचा सुतराम संभव नाही. लेखकाने जी व्याख्या दिली आहे त्यावरून असे वाटते की वेद परमात्म्याचे नि:श्वास किंवा परमात्म्याची कृतीच नाही कारण सृष्टीची रचना करणाऱ्याला एवढे तर ज्ञान अवश्य पाहिजे की ढग कसे बनले जातात. जर यज्ञाच्या धुरापासून सृष्टिक्रम चालत असेल तर ज्या देशात यज्ञ झाले नाहीत तेथे सृष्टीचा क्रम कसा चालत आहे? येथे तर सृष्टीचा क्रम लेखक महोदय चालवत आहेत (धूर करून) पण तेथे सृष्टी कोण चालवत आहे? आणि मंत्र म्हणजे तरी काय आहे हो? त्या युगातील जमान्यातील प्रचलित भाषेमध्ये केल्या गेलेल्या गद्यात्मक अथवा पद्यात्मक प्रार्थना ! असा गीतेचा पुरावा देऊन ज्या यज्ञांची लेखकाने पृष्ठ तेरावर चर्चा केली आहे ते गीतेमध्ये सांगितलेले नाही. त्यांनी लिहिले आहे की ''गीतेमध्ये फक्त श्रौत-स्मार्त यज्ञांनाच यज्ञ म्हटलेले नाही. तर चौदा प्रकारचे यज्ञ गीतेत सांगितले आहेत.'' गीतेमध्ये ज्या चौदा यज्ञांचे वर्णन आहे ते यज्ञ कोणते ते लेखकाने लिहिले असते तर सर्वांना स्पष्ट झाले असते. या सर्व यज्ञांना बाहेरची कोणतीही वस्तू लागत नाही. सर्व यज्ञ मानसिक

आहेत. लेखक महाशयांनी वर लेबल (शीर्षक) तर मारले गीतेचे पण आतील वस्तू आपल्या कुतर्कांने भरून टाकल्या आहेत.

ज्या श्रौत-स्मार्त यज्ञांवर लेखक जोर देत आहेत त्यातील वैदिक नियमांना आज समाज जाणतसुध्दा नाही. वेदातील काही शब्दांना यज्ञार्थक समजून त्याच्या विधींसाठी ज्या संहिता, आरण्यके, कल्प ग्रंथ (श्रौत, सूत्रादि) आणि ब्राह्मण ग्रंथ (शतपथ, ऐतरेय, ताड्य, गोपथ इं.) लिहिले गेले आहेत त्यांनाही चार वेदांच्या समान समजले गेले आहे. त्यात वर्णन केलेल्या सर्व यज्ञांमध्ये सात प्रकारचे यज्ञ प्रमुख आहेत- सोम यज्ञ, अग्निष्टोम, अत्याग्निष्टोम, उक्थ, षोडशी, वाजपेय, अतिरात्र व अप्तोयमि या सर्वांना सोळा सोळा पुरोहित लागतात व त्यांना सहस्त्र गाई दक्षिणा म्हणून द्याव्या लागतात.

राजसूय यज्ञामध्ये दोन लाख चाळीस हजार गाई दक्षिणा म्हणून द्याव्या लागतात सौत्रामणीमध्ये सुरेची आहुती आणि पशूंचा बळी दिला जातो. अश्वमेघ यज्ञामध्ये पट्टराणी मृत अश्वाच्या पार्श्व बाजूला झोपते आणि सर्व पुरोहित राणी आणि तिच्या तरुण दासींना अश्लील शिव्या देतात.

या यज्ञांशिवाय प्रत्येक ऋतूच्या संधिकाळात तीन-चार चातुर्मास्य जसे सीरीय वैश्वदेव, वरुण प्रघास, साकमेय व शुनाध, नवीन धान्य खाण्यापूर्वी आग्रण्य यज्ञ, निरुढ पशुबंध म्हणजे आतडे बाहेर निघालेल्या पशूची आहुती, पाऊस पडावा म्हणून ढगांप्रमाणे काळे कपडे घालून 'कारीरिष्ट', सुरक्षापूर्ण यात्रेसाठी 'सज्ञानी', पुत्रासाठी 'पुत्रकामेष्टी', सात प्रकारच्या हविर्यज्ञामध्ये अग्न्याधान, अग्निहोत्र, दर्श म्हणजे अमावस्येदिवशी केला जाणारा यज्ञ पौर्णमास इत्यादि यज्ञ आजीवन करण्याचा आदेश दिला गेला आहे. प्रत्येक यज्ञामध्ये यजमानाच्या पत्नीला पुरोहिताकडून सजवली जाते. तो विधी येथे लिहिणे आम्हाला उचित वाटत नाही. पण त्या प्रकारे मेखला घातल्यानंतरच यजमानाची पत्नी यज्ञामध्ये भाग घेऊ शकते.

पुष्कळसे यज्ञ एकाह म्हणजे एका दिवसात होतात जसे विश्वजित त्यामध्ये संपूर्ण संपत्तीचे दान केले जाते. गोसव यज्ञात यजमानाला एक वर्षपर्यंत पशूप्रमाणे पाणी पिणे, गवताचे जेवण करणे, आई, बहीण, मुलगी, पत्नी यांच्याबरोबर पशुवत पारिवारिक व्यवहार करणे या गोष्टी कराव्या लागतात. शुन: कर्णोग्निष्टोम यज्ञामध्ये यजमान आपले

सर्व काही पुरोहिताच्या स्वाधीन करून स्वर्गात जाण्यासाठी अग्नीमध्ये प्रवेश करतो. काही यज्ञ तीन दिवसांचे काही यज्ञ दहा दिवसांचे काही यज्ञ बारा दिवसांचे, काही एक वर्ष काही शंभर शंभर वर्षे तर काही हजार हजार वर्षे चालणारे यज्ञ आहेत. यामध्ये यज्ञसमाप्तीच्या आधीच्या रात्री सर्व स्त्रीपुरुष प्रजापतीला प्रसन्न करण्यासाठी सामुहिक रूपात मैथुन कर्मामध्ये प्रवृत्त होतात ज्याला महाव्रत असे म्हटले आहे.

हे आहेत अग्निहोत्रादि, दर्शपौर्णमासादि, श्रौत-स्मार्त यज्ञ ज्यांना लेखक महाशय श्रध्दाळू जनतेच्या गळ्यात बांधू इच्छित आहेत. परंतु विज्ञजनांना आमचे नम्र निवेदन आहे की वेदामध्ये यज्ञाचे हे स्वरूप कोठेही सांगितलेले नाही. पुरुष सूक्तात ज्या मानसिक यज्ञाची कल्पना आहे. तीच आणि तेवढीच गीतेत सांगितलेली आहे. वेदाच्या नावावर विविध प्रकारचे यज्ञ प्रयोजन सृजन नंतरच्या लोकांचे आहे. हजारो वर्षांत यामधील कोणताही यज्ञ झालेला दिसून आलेले नाही. कोणी ते करत नाहीत व कोणी ते करायला धजवणारही नाही इच्छिणारही नाही. जर ते प्रचलित असते तर आज सोम वनस्पती म्हणजे कोणती वनस्पती? ती कुठे मिळते? यांचे संशोधन करावे लागले नसते. विद्वान लेखकांनी ज्या यज्ञाची शिफारस केली आहे त्यातील एक जरी यज्ञ संपूर्ण विधीनुसार लिहून प्रकाशित केला असता तर यज्ञ, यज्ञ असे ओरडणाऱ्यांच्या उत्साहाची परीक्षा झाली असती. जनतेला पण समजले असते की त्या नियमांचे विधींचे कोण किती पालन करू शकतो ते आणि लेखक महोदयानी पण या विधींनी कोणता यज्ञ केला आहे किंवा करत असतात ते.

असे यज्ञ कोणी करीत नाही. त्यात इतकी जटिलता आहे की कोणी करूही शकत नाही. अनेक शब्दांच्या अर्थांचे विस्मरण झालेले आहे. अशा यज्ञांच्या उपयुक्ततेचे मूल्यांकन करताना मुण्डक उपनिषदाचे ऋषी म्हणतात की, स्वर्गाच्या प्राप्तीच्या लोभाने लोक हे यज्ञ करतात; पण या यज्ञाच्या क्रियेमध्ये थोडी तरी चूक झाली तरी हे यज्ञ त्या अग्निहोत्रींच्या सातही पुण्यलोकांचा नाश करतात. हा आहे त्या यज्ञांचा परिणाम !

उपनिषदांमध्ये या यज्ञाची निरर्थकता सांगताना म्हटले आहे की अठरा प्रकारच्या यज्ञ नौका भक्कम नाहीत त्यात सांगितलेले कर्म निम्नकोटीतील आहे. या यज्ञाना जे कल्याणाचा मार्ग म्हणतात, जे त्यांची प्रशंसा करतात ते मूर्ख आहेत आणि वारंवार ते जरा आणि मृत्यूला प्राप्त होतात (१/२/७)

त्यातून पुन्हा कोणी काही दुसरा सोयीचा मार्ग काढू नये म्हणून या मूर्ख लोकांना दहाव्या मंत्रात पुन्हा सावध करताना म्हणतात की इष्ट आणि पूर्त कर्मांना श्रेष्ठ मानणारे लोक 'प्रमूढा' म्हणजे अत्यंत मूर्ख आहेत. ते लोक श्रेय जाणतच नाहीत. ते कल्पित स्वर्गामध्ये त्यांचे फळ भोगून या मनुष्य शरीरात किंवा त्यापेक्षा हीन योनींमध्ये जातात.

(१/२/१०) आश्चर्याची गोष्ट म्हणजे अद्वैत हे लक्ष्य मानणारे लोकदेखील स्वर्गाचे अस्तित्व स्वीकारतात आणि त्याच्या प्राप्तीसाठी कर्मकांडाची शिफारस करतात. गीतेमध्ये सांगितलेला यज्ञ जर त्यांनी सांगितला असता तर अधिक चांगले झाले असते. ज्यामध्ये हवन आहे- श्वासाचे प्रश्वासाचे हवन, संकल्पांचे हवन त्या यज्ञाचा परिणाम मोक्ष आहे, जो मनुष्य शरीर असतानाच प्राप्त करता येतो. तो यज्ञ करण्याचा अधिकार फक्त मानवमात्रालाच आहे. भौतिक द्रव्यांनी होणाऱ्या यज्ञाला योगेश्वरांनी अत्यल्प म्हटले आहे, तुच्छ म्हटले आहे तर ज्या यज्ञाचा परिणाम अनंत आहे असा यज्ञ तुम्ही का करीत नाही?

लेखक महाशयानी गीतेचा आधार घेऊन जातिव्यवस्था सिध्द करण्याचा हास्यास्पद प्रयोग केला आहे कारण वेद आणि गीतेतील वर्ण म्हणजे आजची जातिव्यवस्था नव्हे. वर्ण याचा अर्थ आहे रंग किंवा आकृती जसे ऋग्वेदाच्या प्रथम मंडलात आहे. वेदात दैवी वर्ण व असुर वर्ण 'कृष्ण च वर्ण अरूण च' 'उभौ वर्णो' असे दोन वर्ण सांगितले आहेत. वर्ण शब्द गुणवाचक आहे, भजनाची क्षमता मापण्याचे ते माप आहे. तर जाती म्हणजे जन्माने ठरवलेला, निश्चित केलेला विवाह आणि खाण्यापिण्याच्या बाबतीत शिवाशिवीचा विचार, उदरनिर्वाहाचा ठराविक व्यवसाय, व्यवसाय भेदामुळे निर्माण झालेल्या अनेक उपजाती, उच्चनीच असा भेदभाव आणि बिरादरी पंचायती इत्यादींचा समावेश होतो. वेदामध्ये वर्ण या शब्दाचा अर्थ असा कुठेही सांगितलेला नाही आणि ज्या पुरुष सूक्तात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची चर्चा आहे पण आश्चर्याची गोष्ट अशी की त्यात वर्ण शब्दाचा प्रयोग कुठेही केलेला नाही.

गीतेतील ''अन्तवन्त इमे देहा'' या श्लोकाविरुद्ध लेखक म्हणतात की शरीर नाशवंत आहेत पण समष्टीत ते नाशवंत नाहीत. वास्तविक त्यांनी हेही सांगयला हवे की समष्टीमध्ये ब्राह्मण आणि शूद्र यांची विभागणीपण होते का?

समान प्रसवात्मिका जातिः समान वंशात समान संतान निर्माण करणाऱ्यांची एक जात मानली जाते. उदा. कुत्रा-कुत्रीपासून त्यांच्याप्रमाणेच प्रजनन ते करतात. बकरीपासून

कुत्रा जन्माला येणार नाही. या प्रकारे कुत्र्याची जात वेगळी आणि बकरीची जात वेगळी! न्यायदर्शनाच्या या सूत्राप्रमाणेच गोस्वामीपण म्हणतात- ''बडे भाग मानुष तन पावा'' मानवशरीर ही एक जात आहे. ब्राह्मण शरीर, क्षत्रिय शरीर असा अर्थ नाही. केवळ मनुष्य शरीर हाच अभ्यर्थ आहे. ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, शूद्र या आंतरिक योग्यतेच्या पदव्या आहेत परंतु समाजाची व्यवस्था लावणाऱ्यांनी त्याचा उपयोग सामाजिक स्तरीकरण करण्यासाठी करून समाजात एक भ्रम निर्माण केला. तेव्हा लक्षात ठेवा की वर्ण बाहेर असत नाही.

लेखक महाशयांनी आपल्या पुस्तकातील पान दोन व तीनचे पुनरावलोकन करण्याची कृपा करावी. येथे त्यांनी लिहिले आहे की, शम, दम, तप, शौच, शांती, आर्जव, ज्ञान, विज्ञान, आस्तित्व ब्राह्मणाचे स्वाभाविक कर्म आहे, उपर्जित नाही. तसेच परिचर्या (सेवा) शूद्राचे स्वाभाविक कर्म आहे उपर्जित नाही. विचार आणि कार्य गुणांच्या अधीन असतात. या गुणांच्या आधारे त्या त्या वर्णात जन्म होत असतो. त्याने ज्या शरीरातून जन्म घेतला तीच त्याची जात ठरवली गेली. पण परिष्कार मनाचा होत असतो तनाचा नाही. अर्थात, तुम्ही कितीही चांगली किंवा वाईट कृत्ये केली तरी जात बदलणार नाही. ते तर गुण-संस्कार पाहून शरीर बदलण्याच्या वेळेस ईश्वर पुन्हा तशा जातीत जन्माला घालेल.

येथे गीतेतील अठराव्या अध्यायातील ज्या श्लोकांचा आधार घेऊन जो अर्थ दिला आहे तो खरा अर्थ नव्हे. श्लोकात ''ब्रह्मकर्म स्वभावजम, क्षात्रं कर्म स्वभावजम'', वैश्य कर्म स्वभावजम आणि शूद्रस्यापि स्वभावजम. स्वभावजम याचा अर्थ स्वभाविक असा होतो का? 'उपर्जित नाही' हा अर्थ श्लोकातील कोणत्या शब्दांचा आहे? स्वभावजम म्हणजे स्वभावातून निर्माण झालेला, समासान्त ज चा अर्थ जायमान म्हणजे उत्पन्न झाला असा- उदा अंडज, जलज इत्यादी. मग आपल्यासारख्या संस्कृतच्या पंडिताच्या हातून चूक कशी झाली?

आता लेखकाने स्वभावातून उत्पन्नाच्या ऐवजी मुद्दाम 'स्वाभाविक' उपर्जित नाही. असा अर्थ का घेतला यावर थोडा विचार करू या. लेखक येथे सांगू इच्छित आहेत की स्वभाविक म्हणजे जन्मजात जन्माबरोबरच जे निर्माण झालेले आहेत, जे बदलता येत नाहीत तसे उदा. प्रकाश हा सूर्याचा सहज गुण आहे, आर्जित नाही. जळणे हा अग्नीचा सहज गुण आहे अर्जत नाही.

या प्रकरणात लेखकाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांचे कर्म तर सांगितले परंतु या श्लोकांच्या आधी असणारा एक श्लोक सोडून दिला आहे की ज्यात सांगितले

आहे की, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचे कर्म कसे ठरवले आहे? कोणतेही प्रकरण जेथून सुरू होते तेथूनच ते घेतले पाहिजे. आधार-पुरावा असताना त्यापासून कुठपर्यंत दूर पळाल? तो श्लोक पुढीलप्रमाणे आहे-

**ब्राह्मणक्षत्रियविशा शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्ताणि स्वभाव प्रभवैर्गुणै: ।।१८/४१**

'स्वभाव प्रभवै:' याचा अर्थ काय होतो? तोच का जो 'स्वभावजम'चा होतो? 'प्रभव:'चा अर्थ आहे उत्पन्न होणारा जन्माने नाही, स्वभावातून उत्पन्न होणारा. स्वभावातून उत्पन्न होणाऱ्या गुणांचे द्वारे या चौघांमध्ये गुण वाटले गेले. वाटण्याचे माप आहे गुण आणि वाटली जाणारी वस्तू आहे कर्म! 'कर्माणि प्रविभक्तानि' कर्म वाटले गेले आहे, मनुष्य नव्हे.

स्वभाव बदलत असतो. जर स्वभाव कधी बदलतच नसता तर मानव शरीराची सार्थकताच काय आहे? जर स्वभाव जन्म घेतल्याने ठरत असता तर त्या जातीमध्ये उत्पन्न होणाऱ्या सर्व लोकांमध्ये समान गुण पाहावयास मिळाले असते म्हणजे सर्व ब्राह्मण ज्ञान-विज्ञानसंपन्न झाले असते; परंतु असे पाहावयास मिळत नाही. मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे की केवळ जातीच्या नावावर जगणारा आणि केवळ नावाने ब्राह्मण असणारा ब्राह्मणपण राजाकडून धर्माचा प्रवक्ता होऊ शकतो परंतु शूद्र कधीही होऊ शकत नाही. (८/२०) का? जातीमध्ये जन्म तर स्वभावगत गुणांच्या आधारावर परमेश्वराने दिला होता तर मग निर्धारित कर्मे त्याच्याकडून का होत नाहीत? का भगवंताचीपण चूक होते?

वास्तविक असे काहीही नाही. स्वभाव व गुणांमध्ये परिवर्तन करणे प्रत्येक मनुष्याला साध्य असते. स्वभाव बदलला म्हणून तर वाल्मीकी महर्षी बनले. स्वभाव बदलला म्हणून तर तुलसीदास गोस्वामी झाले. योगेश्वर श्रीकृष्णसुध्दा स्वभाव आणि गुणांना परिवर्तनशील मानतात. गीतेच्या चौदाव्या अध्यायात ते म्हणतात-

**रजस्तमस्याभिभूयं सत्त्वं भवति भारत ।**
**रज: सत्त्वं तमश्चैव तम: सत्त्वं रजस्तथा ।।१४-१०**

अर्थात रजोगुण आणि तमोगुणांना दाबून सत्त्वगुण वाढत असतो. सत्त्व आणि

रजोगुणाला दाबून तमोगुण तसेच सत आणि तमोगुणाला दाबून रजोगुण वाढत असतो. म्हणजे तिनी गुणांपैकी कोणत्याही गुणाला घटवले जाते किंवा त्यात वाढ केली जाते. कारण गुणांमध्ये परिवर्तन होत असते.

विसाव्या श्लोकात ते सांगतात की पुरुष शरीराच्या उत्पत्तीस कारणरूप असणाऱ्या या तिन्ही गुणांवर मात करून जन्ममृत्यूपासून मुक्त होऊन अमृततत्त्वाला प्राप्त होतो.

यावरून स्पष्ट होते की गुणांना बदलता येणे शक्य असते. त्यांच्या पलीकडेही जाता येते. परंतु या गुणांच्या पलीकडे जाण्यासाठीच मानव शरीर मिळाले आहे. या गुणांच्या पलीकडे जाण्याचा मार्ग भगवान स्वयं सांगत आहेत.

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते**
**स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ।। १४/२६**

अर्जुना, जो कोणी माझी अव्यभिचारिणी भक्ती करतो म्हणजेच तो अनन्य भावाने भक्तिपूर्वक माझे स्मरण करतो तो तिन्ही गुणांच्या पलीकडे जाऊ शकतो आणि ब्रह्मतत्त्व प्राप्त करण्यास योग्य बनू शकतो.

जर याच शरीरात व याच जीवनात तीनही गुण बदलू शकतात तर तो वर्ण का नाही बदलणार? गुणांवर तर वर्ण आधारित होता. तेव्हा एकाच जन्मात प्रत्येक मनुष्य क्रमश: शूद्रातून वैश्य, वैश्यातून क्षत्रिय, व क्षत्रियातून ब्राह्मण बनू शकतो आणि अव्यभिचारिणी भक्तिद्वारे गुणांच्या पलीकडे जाऊन आदि शंकराचार्यांप्रमाणे उद्घोष करू शकतो की ''न ब्राह्मण न क्षत्रिय, ज वैश्यो न शूद्राश्चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहं ।'' तो तीन गुण आणि तज्जन्य चारी वर्णांच्या पलीकडे जाऊन स्वरूपाची स्थिती प्राप्त करतो.

योगदर्शनकार देखील स्वभावाला परिवर्तनशील मानतात 'वृत्ति सारूप्यमितरत्र जशी वृत्ती, तसा स्वभाव बनतो. इंग्रजीमध्येही लिहिले आहे 'स्टाइल इज द मॅन हिमसेल्फ' पूज्य महाराजश्री म्हणत असत ''गुन स्वभाव त्यागे बिना दुर्लभ परमानन्द''. यावरून स्पष्ट होते की स्वभाव बदलले जाऊ शकतात, त्यांचा त्यागही करता येतो. तात्पर्य वर्णामध्ये परिवर्तन स्वत: सिध्द आहे.

लेखकाच्या मते पूर्वजन्मातील कर्मजन्य संस्कार व तज्जन्य गुणांना पाहून ईश्वर

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्राच्या शरीरामध्ये जन्माला घालीत असतो. विचार करा की अशा प्रकारे ना ईसाई जन्माला येतो ना मुसलमान जन्माला येतो, ना पारसी ना जैन ना बुध्द ना शिख जन्माला येतो. या सर्व सृष्टीमध्ये फक्त भारत आणि भारतामध्येही मूठभर हिंदूच्या या चार जातींमध्ये जन्मण्यासाठी ईश्वराने काही वेगळी व्यवस्था केली आहे का?

आपल्या पुस्तकातील दुसऱ्या पानावर लेखकाने लिहिले आहे की तमोगुणाचे प्राबल्य झाल्याने शूद्राची रचना झाली. हे मत गीतेच्या विरुध्द आहे कारण तमोगुणांचे अधैक्य झाल्याने मूढ योनीमध्ये, कीटकपंत आदी योनीमध्ये जन्म मिळतो (१४/१५/१८). जर तमोगुणाचे प्राबल्य झालेले असताना मरण आलेले भारतातील शूद्रच बनतील तर मग कीटक-पतंग कोण बनेल? मग तर सृष्टीचे एक अंग अपूर्णच राहील.

गीतेतील अध्याय ४/३१ मध्ये सांगितले आहे की यज्ञ न करणाऱ्यांना मानव शरीर प्राप्त होत नाही, हा लोक मिळतच नाही आणि लेखक महाशय म्हणतात की शूद्राला यज्ञाचा अधिकारच नाही. मग या लोकी शूद्र कोठून निर्माण झाले? आणि नंतर त्यांना बिचाऱ्यांना मनुष्य शरीरपण कसे मिळेल? जैमिनीच्या पूर्वमीमांसेत आहे की अग्निहोत्र आणि वैदिक यज्ञ करण्याचा अधिकार शूद्रांना नाही. तैत्तरिय संहितेमध्ये लिहिले आहे- ''शूद्रो मनुष्यांना अश्व पशुनां तस्माच्छूद्रो यज्ञेनऽवक्लृप्त: (७-१-१-६) ज्याप्रमाणे पशूंमध्ये घोडा त्याप्रमाणे मनुष्यांमध्ये शूद्र आहे. शूद्र हा यज्ञासाठी लायकच नाही. ताण्ड्य महाब्राह्मणमध्ये लिहिले आहे-

**तस्माच्छूद्र बहुपशुरयज्ञियो विदेवो नहि तं काचन देवतान्व सृज्यन्त**
**तस्मात्पादावनेज्यं नाति वर्धते पत्तो हि सृष्ट: ॥(६-१-११)**

शूद्राजवळ पुष्कळ पशू असले तरी तो यज्ञ करण्यास पात्र नाही. तो देवविहीन आहे. त्याच्या साठी देवतांची रचना केली गेली नाही कारण त्याची उत्पत्ती पायांपासून झालेली आहे.

हे आहे आपले वैदिक साहित्य! काय हीच भगवती श्रुती आहे? काय हीच अपौरुषेय व्यवस्था आहे? नाही ही श्रुती नाही. श्रुतीचा आशय भगवान श्रीकृष्णाने जाणला होता. गीतेतील अध्याय ९/३२ शी तुलना करा. तेथे भगवान म्हणतात की स्त्री-पुरुष-वैश्य-शूद्र किंवा कोणी पापयोनीमधील असला तरी तोही जर मला अनन्यभावाने शरण आला

तर तो परमगतीला प्राप्त होतो. येथे शूद्राला आश्रय देणारा, शरण देणारा देव आहे. भजनाचा-भक्तीचा अधिकार सर्वांना समान आहे आणि परिणामस्वरूप परमगती ही सर्वांसाठी आहे. भगवंताजवळ कसला भेदभाव नाही.

लेखकाचा असा दावा आहे की स्मृतीमध्ये किंवा प्राचीन ग्रंथामध्ये कोणत्याही जातीच्या बाबत पक्षपात केलेला नाही. लेखकाच्या या विधानात किती सत्य आहे ते ताडून पाहूया. वैश्यांसाठी तैत्तिरीय संहितेमध्ये लिहिले आहे- ''वैश्यो मनुष्यांना गाव पशूनां तस्मात्त आधाअन्नधानादध्य सृज्यन्य तस्माद् भूयांसोऽन्येभ्य:'' (७/१/१/५) म्हणजे मनुष्यांमध्ये वैश्य आणि पशूंमध्ये गाय या दोन्ही गोष्टी अन्य लोकांच्या उपभोगाच्या वस्तू आहेत. त्या भोजनासाठी उत्पन्न केल्या गेल्या आहेत. आणि म्हणून त्या संख्येने अधिक आहेत.

क्षत्रियांसाठी लिहिले आहे की कोणत्याही कार्यास आरंभ करण्यापूर्वी त्याने एखाद्या ब्राह्मणाची आज्ञा घ्यावी. ब्राह्मण राजाशिवाय राहू शकतो पण एक राजा ब्राह्मणाशिवाय राहू शकत नाही. मनुस्मृतीत लिहिले आहे की दहा वर्षांचा ब्राह्मण आणि शंभर वर्षांचा क्षत्रिय या दोघांना पिता-पुत्र समजले पाहिजे. या दोघांत ब्राह्मण हा पिता आहे- पूज्य आहे (२/१३५).

आता ब्राह्मणांना दिलेल्या खास सोयींपण पाहा. मनुस्मृतीमध्ये लिहिले आहे की ''जन्मना ब्राह्मणो ज्ञेय:'' म्हणजे ब्राह्मण हा जन्मानेच होत असतो कारण लोक प्रश्न विचारू शकतात की आपले आचरण? त्यावर एकच उपाय आहे की आम्ही जन्मापासून बनत आलेलो आहोत. तैत्तरिय संहितेमध्ये लिहिले आहे की ब्राह्मण म्हणजे अशी देवता आहे की ज्याला आम्ही प्रत्यक्ष पाहू शकतो. शतपथ ब्राह्मणात लिहिले आहे की देवता दोन प्रकारच्या असतात. एक मूळ देवता आणि दुसरी देवता म्हणजे ब्राह्मण. जे पवित्र ज्ञानाचे अर्जन करतात ते मानव देवता आहेत (४-१-४-६). मनुस्मृतीमध्ये लिहिले आहे की ब्राह्मणाने चोरी केली तरी राजाने त्याला शिक्षा करू नये कारण राजाच्या मूर्खपणामुळेच तो ब्राह्मण भूक शमवण्यासाठी असे दृष्कृत्य करण्यास प्रवृत्त झाला. त्याला शिक्षा देण्याऐवजी राजाने त्याच्या कुटुंबाच्या भरण पोषणासाठी राज्याकडून काही वित्तीय व्यवस्था करावी (११/२१-२२). अन्यत्र अध्यायात लिहिले आहे की ब्राह्मण कोणत्याही जातीतील स्त्री ठेवू शकतो. पण दुसऱ्या जातीतील कोणीही मनुष्य ब्राह्मण कन्येबरोबर विवाह करू शकत नाही. असा विवाह दोषपात्र होय. मंत्रांनी शुध्द केलेले मांसदेखील ब्राह्मण खाऊ शकतो कारण ते देव-भोजन आहे, सनातन विधी

आहे (५/३६).

मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे की संपूर्ण जगाचा स्वामी ब्राह्मण असतो (१/९४) . जग म्हणजे केवळ भारत असा अर्थ घ्यायचा का? कारण जगातील किती लोक ब्राह्मणाला आपला स्वामी समजतात? पुढे असेही लिहिले आहे की चोरांकडून वसूल केलेल्या धनातील व जमिनीत पुरलेल्या धनातील अर्धे धन ब्राह्मणाचे असते (८/३७/३८). यज्ञासाठी ब्राह्मण कोणाचेही धन लुटू शकतो (११/२६). परंतु जो पापात्मा ब्राह्मणाचे धन चोरतो तो मेल्यानंतर त्याला गिधाडांनी टाकलेले घृणित पदार्थ खाण्यास मिळतात. ही ब्राह्मण वर्गाची सुरक्षा व्यवस्था नाही तर काय आहे? हा काय धर्म आहे?

लेखकाने आणखी एक विपत्ती उभी केली आहे की त्याने स्मृतीला आपला कायदा किंवा व्यवस्था मानली आहे हे कसे? हा तर सनातन धर्म आहे. आपणच विचार करा की ज्या नियमांनी मनुष्याच्या खाण्या-पिण्याच्या पध्दती, विवाह, राहणी-करणी, शिक्षण, दत्तक घेणे, व्यवसाय ठरवणे, तडजोड करणे, संपत्तीबाबत मुकदमा चालवणे, शिक्षा देणे या सर्व गोष्टी म्हणजे कायदे व्यवस्था नाही तर काय आहे? ज्यायोगे मनुष्याच्या बाह्य कृतींचे नियमन केले जाते व जे नियम राज्याकडून लागू केले जातात तो कायदा नाहीतर दुसरे काय आहे? धर्म म्हणजे आंतरिक अनुशासनाचे नियम आहेत.

लेखकाने सफाई देताना म्हटले आहे की मनुस्मृती शुद्रांप्रमाणेच ब्राह्मणांच्याबाबतीतही कठोरच आहे. कारण मनुस्मृतीत म्हटले आहे की ब्राह्मण जर दारू पीत असेल तर त्याला मरेपर्यंत उकळलेली दारू पाजावी (११/९०) परंतु तुम्हीच विचार करा की ही शिक्षा आहे की नाही या प्रकारे दंडित झालेल्या ब्राह्मणाचे उदाहरण संपूर्ण इतिहासात सापडत नाही. अहो, अशी शिक्षा कधी दिलीच जात नाही. कारण मदिरा, स्पिरिट तसेच पेट्रोल या अशा वस्तू आहेत की ज्यांना कधी उकळले जात नाही दारू व स्पिरीट उडून जाते पेट्रोल जळून जाते, त्याला आग लागते. आजदेखील अनेक ब्राह्मण लोक दारू पितात, दारूचे सरकारी ठेके घेतात, पण त्यांना दंड देऊन सनातन धर्माचे पालन करण्याचा कोणी विचारही करू शकत नाही.

मग अशी धमकी का? त्याच्या मागेही एक कारण आहे की अनंत सुखसोयींनी संपन्न ब्राह्मणांमध्ये कोणी दारूच्या नशेत या संपन्नतेचे भांडे फोडू नये व संपूर्ण जातीचे अहित होऊ नये यासाठी एका ब्राह्मणाला मारून टाकण्याची खबरदारी दाखवली आहे. अर्थात ही स्वत:च्या सुरक्षेची व्यवस्थाच आहे स्मृतिकारांचा उत्तम आशय किंवा

निष्पक्षता नाही. आणि म्हणून तर या स्मृतींना दुसऱ्यांनी वाचू नये असा निर्बंध आहे. पाराशर स्मृतीमध्ये लिहिले आहे की ही स्मृती विशेषत: ब्राह्मणांसाठी लिहिली गेली आहे. मनुस्मृतीमध्ये लिहिले आहे की ही स्मृती त्याच ब्राह्मणाला दाखवावी की ज्याचेवर गर्भधानापासूनचे सर्व संस्कार झाले आहेत व जो अंत्यसंस्कारापर्यंतचे सर्व मंत्र जाणत आहे कारण ज्याने या सर्व गोष्टी केलेल्या आहेत त्याला पुराव्याची जरूर आहे सपोर्ट किंवा बॅकिंगची आवश्यकता आहे केवळ त्यालाच हे दाखवावे.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की मुसलमान आपल्या मुलाकडून दहा बारा वर्षाचा होईपर्यंत त्याच्याकडून कुराण वाचून घेऊन त्याला 'हाफिज' (कुराण पाठ झालेला) बनवतो, लग्नाच्या वेळी कुराण आणि रेहल हुड्यांत दिले जात. ईसाई धर्मात दैनिक प्रार्थनेत पान न पान वाचून बायबल कंठस्थ करवून घेतले जाते. धर्मनिरपेक्ष समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतील हॉटेलमधील प्रत्येक खोलीत मासिकांच्या नावाखाली एकच पुस्तक ठेवले जाते व ते म्हणजे बायबल! आणि भारतीय धर्माचार्यांचा दूरदर्शीपणा पाहा की त्यांनी आपले ग्रंथ कोणाला दाखवू नये असे लिहून ठेवले आहे. म्हणजे आमच्या धर्माचे शास्त्र आम्हीच पाहायचे नाही?

आता शूद्रांची स्थितीपण पाहा. लेखक महोदय सांगतात की सनातन धर्म म्हणजे शूद्रांसाठी वरदान आहे. परंतु कोणताही शूद्र आपले हे वरदान घ्यायला तयार नाही. वरदानात काय आहे? हेच की शूद्राचे नाव घृणायुक्त ठेवले पाहिजे (२/३९). त्यांनी झाडाच्या खाली राहावे, मातीच्या भांड्यांत जेवावे. शूद्राचे स्वत:चे असे काही असत नाही. धन प्राप्त झाले की शूद्र ब्राह्मणालाच सतावतो व म्हणून ब्राह्मणाने शूद्राचे धन बेधडकपणे घ्यावे (मनु ८/४१७) मनुस्मृतीत आहे की एष: धर्म विधि: हा धर्म विधी आहे. हा धर्म आहे तर कोणता शूद्र तो मानेल?

मनुस्मृतीमध्ये दहाव्या अध्यायात सांगितले आहे की जीवन निर्वाहासाठी शूद्र अन्य जातीतील लोकांची सेवा करू शकतो; परंतु स्वर्गासाठी, लोक आणि परलोकासाठी ब्राह्मणाची सेवा केली पाहिजे. ब्राह्मणाने शूद्राला उष्टे अन्न द्यावे, कोरडे अन्न द्यावे, जुने वस्त्र, फाटलेले पांघरुण आणि जीर्ण बिछाना त्याला द्यावा. अशा प्रकारे राहून जेव्हा ब्राह्मणाकडून चांगला सेवक अशी शूद्राची प्रशंसा होते तेव्हा त्याला स्वर्ग प्राप्त होतो.

असेही लिहिले आहे की ब्रह्माने ब्राह्मणाच्या सेवेसाठी शूद्रांची सृष्टी निर्माण केली आहे 'दास्यायैव हि सृष्टोऽसौ ब्राह्मणस्य स्वयं भुवा ।' आज ते सेवा घेत आहेत. ब्रह्मदेवाच्या आज्ञेविरुद्ध आज शूद्र चांगले वस्त्र नेसतात, चांगले खातात आणि चांगले राहतात. त्यांना पुन्हा झाडाखाली राहण्यासाठी व फाटके वस्त्र परिधान करण्यासाठी कोणीही जबरदस्ती करू शकणार नाही.

लेखक महोदयांचा असा तर्क होता की, शूद्राला अध्ययनाने काही लाभ होणार नाही; तेव्हा त्यांनी निरर्थक अध्ययन कशाला करायचे? आज त्यांनी प्रत्येक पुस्तक वाचले आहे. देशाची घटनासुध्दा त्यांनी बनवली. स्मृतीच्या मते शूद्र कधी न्यायकर्ता होता कामा नये. आज ते जज्ज बनले आहेत. राज्यशासनात भाग घेण्यासाठी निवडणुकीत उभ्या राहिलेल्या पासवान सारख्यांनी मते मिळवण्यात कीर्तीमान केले. रुढीवाद, क्लेशकारक असणाऱ्या परंपरा आज अगदी नष्ट झाल्या आहेत, परंतु काही लोक आजपण प्रतिगामी अवशेषाना चिकटून बसले आहेत. म्हणतात जाती हाच धर्म आहे. हीच व्यवस्था असणारी आश्रमव्यवस्थापण होती. तिला पुनर्जीवित करण्याची त्यांना काही चिंता नाही. जर जातिव्यवस्था सनातन होती तर घर का सोडले? संन्यासी का बनले?

आज शूद्र आंदोलन करीत आहेत की सवर्ण जाती आर्य आहेत व त्या भारताच्या बाहेरून आलेल्या आहेत. मौर्य, कुर्मी अशा काही वैश्य जातींनी ब्राह्मणांच्या पूज्यतेला तिलांजली दिली आहे. बहुतांशी ब्राह्मणसुध्दा 'जन्माने पूज्य' या मताच्या विरुध्द आहेत. आता क्षत्रिय देखील विचार करू लागले आहेत की काय करावे? मग आता किती हिंदू तुमच्या जातिव्यवस्थेला धर्म म्हणण्यासाठी तुम्हांला पाठींबा देईल? कदाचित त्यापेक्षाही कमी म्हणजे मूठभर लोकच की ज्यांना तुम्ही मुसलमान म्हणता ते शेष राहिले आहेत.

घृणामूलक व्यवस्था वाचून शूद्र इतके खवळले आहेत की ते बुध्द, ख्रिश्चन, मुसलमान बनू लागले आहेत. कारण तेथे त्यांना समानतेचे प्रलोभन दिले जात आहे. तेव्हा प्रथम या जाणाऱ्या लोकांना आश्वासन द्या, त्यांचे समाधान करा मग आपल्या पूजनीयतेचा ढंढोरा पिटा, कारण अहो, हिंदू राहिलाच नाही तर तुम्हाला पंडित तरी कोण म्हणेल? अर्ध तजहिं बुध सरबस जाता' युगद्रष्ट्या गोस्वामींनी दिलेल्या सल्ल्याचा विचार करा-

**जलचर वृन्द जाल अन्तरगत, होत सिमटि इक पासा ।**
**एकहिं एक खात लालच बस, नहि जानत निज नाशा ।।**

राम-रावण युध्दाच्या वेळेस जेव्हा लक्ष्मणाला शक्ती लागली तेव्हा सुषेण वैद्याच्या विश्वसनीयतेवर कुणीतरी संदेह घेतला तेव्हा श्रीराम म्हणाले की सुषेण वैद्य आहे आणि वैद्य आपल्या धर्मापासून विमुख होणार नाही. व म्हणून धर्माचार्यांना आमचे निवेदन आहे की भारतातील ही भोळीभाळी जनता तुमच्याकडे आशेने पाहत आहे. त्यांना चुकीचा मार्ग दाखवून किंवा चुकीच्या गोष्टी सांगून त्यांची दिशाभूल करू नका. तेव्हा ब्राह्मण बंधूनी सुध्दा आता विचार करावा. ज्यांनी एक वेळ समाजाचे नेतृत्व केले होते त्या महान ऋषींचे वंशज आहेत तेव्हा त्यांची गौरवशाली परंपरा टिकवण्यासाठी व सामाजिक विघटनापासून समाजाला वाचवून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी कटिबध्द व्हावे.

लेखक महोदयांनी काही प्रश्न आमच्या पुढे ठेवून धार्मिक भ्रांतीचे निराकरण करण्याचा एक अवसर आम्हांला दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे खूप आभारी आहोत. कदाचित आमचे म्हणणे त्यांना समजले नसेल किंवा समजून देऊ शकलो नसू तर त्यांनी अवश्य आमच्या आश्रमात यावे. इतक्या जवळ राहत असून स्वत: न येता विरोध पुस्तिका पाठवून हा द्राविडी प्राणायाम करण्याची काय आवश्यकता होती?

आता राहिली गोष्ट शास्त्रार्थाच्या आव्हानाची! घरात बसून शास्त्रार्थाच्या गोष्टी करणे आपल्याला शोभत नाही. शास्त्रपरायण अशा आदि शंकराचार्यांचे आपण अनुकरण (नक्कल) करू इच्छिता पण ते तर स्वत: सर्वत्र पायी जाऊन शास्त्रार्थ करीत असत. आणि आजकाल तोंडी वादविवाद करण्यापेक्षा लिखित प्रश्नोतरे अधिक प्रामाणिक मानली जातात आणि मौखिक शास्त्रार्थाच्या जागी तुम्ही स्वत:च हा मार्ग निवडला आहे मग शास्त्रार्थ करण्याची हौस कशाला हवी? जर समोरा-समोर बसून प्रश्न-परिप्रश्न करायचेच असतील तर तुमच्या गल्लीतून थोडे बाहेर निघा. दिल्ली, कलकत्ता, मुंबई, मद्रास, काश्मीर अशा ठिकाणी आयोजन करा. परीक्षकांच्या पॅनलमध्ये प्रत्येक जातीचे प्रोफेसर विद्वान, कुलपती व राजकीय नेत्यांना ठेवा की ज्यांना या धर्मात राहावयाचे आहे, ज्यांना या धर्मात जगावयाचे आहे. त्यांच्या उपस्थितीत शास्त्रार्थ होणे अत्यंत उचित आहे. त्याची एक सुनिश्चित रूपरेखा प्रकाशित करावी. आणि जर शंकासमाधानच करवून घ्यायचे असेल तर आश्रमात अवश्य यावे आम्ही तुमचे स्वागतच करू

बोला श्री गुरुदेव भगवान की जय ।

**॥ॐ॥**

# वेदांच्या नावावर...

ऋचो अक्षरे परमे व्योमन
यस्मिन देवा अधिविश्वे निषेदुः ।
यस्तन वेद किमृचा करिष्यति
य इत्तद विदुस्त इमे समासते ।।

ऋग्वेद (१/१६४/३९)

सर्व ऋचा परम अविनाशी अक्षरात स्थित आहेत,
ज्यात संपूर्ण देवतादेखील स्थित आहेत
जो त्या अविनाशी तत्त्वाला जाणत नाही,
त्यासाठी ऋचा काय करेल?
जो त्याला जाणतो, तोच त्या अविनाशी तत्त्वात प्रवेश मिळवतो

# वेदांच्या नावावर

श्री परमहंस आश्रम जगतानन्दद्वारा प्रकाशित झालेल्या काही पुस्तकांवर आक्षेप घेणारी 'नास्तिकोंसे सावधान' नावाची वारणशीच्या श्री मस्तराम बाबांची पुस्तिका त्यांनी आमच्याकडे पाठवली होती. त्यांच्या प्रश्नांचे-शंकांचे समाधान करण्याचा प्रयत्न 'अस्तिकतेच्या नावावर' या पुस्तिकेत आम्ही केला आहे. परंतु 'नहले पर दहला (भाग १) नावाचे एक पुस्तक पुन्हा आमच्या पाहण्यात आले. त्याचे सद्‌भावनेने परामर्श करून आम्ही आमचे विचार सांगणार आहोत.

त्यांच्या पुस्तकाचे उपशीर्षक आहे ''गडबड संप्रदायाची दुर्दशा'' असे शीर्षक शोधण्यात त्यांची बरीच विद्वत्ता खर्ची पडली असेल. या पुस्तकाच्या पहिल्या पानावर एक श्लोक आहे. ज्यात त्यांनी आपल्या वेदान्ताला सिंहवत व अन्य शास्त्रांना जम्बूकवत असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. आश्चर्याची गोष्ट तर ही आहे की, जात-पात, शिवाशिव, कर्मकाण्ड आणि पंचदेव यांची शिफारस करणाऱ्या महानुभावांचा अद्वैत वेदान्ताशी काय संबंध?

वेदांत स्वयं एक संप्रदाय बनून राहिला आहे. त्याचे दहा उपसंप्रदाय आहेत. बादनारायणाच्या ब्रह्मसूत्राचा माध्वाचार्यांनी जो अर्थ लावला तो द्वैत असा आहे. निम्बार्कानी द्वैताद्वैत असा अर्थ केला. वल्लभचार्यांनी त्याच सूत्राचा अर्थ लावला शुध्दाद्वैत ! रामानुजाचार्यांनी त्याच सूत्रात वाचले विशिष्टाद्वैत. पंडित श्रीपतींनी अर्थ केला वीरशैव विशिष्टाद्वैत, विज्ञानभिक्षूंनी पाहिले- अविभागाद्वैत. शंकराचार्यानी व्याख्या केली निर्विशेषाद्वैत. त्याच सूत्रात भास्कराचार्यांना दिसला भेदाभेद तर बलदेवजीने अर्थ दिला अच्नित्या भेदाभेद. आचार्यांनी यापैकी स्वत:ची ओळख द्यावी की ते कोण आहेत? वेदान्तवादी असल्याने हे सर्व दहा सिंहवत आहेत की एकटे तेच? यांपैकी कोणी एकच सत्य आहे की सर्व जणच?

सूज्ञ विचार करतील तर त्यांना समजेल की वेदात द्वैत-अद्वैताचा झगडा बिलकूल नाही. वेदामध्ये आहे ''तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्मास्य बाह्यत:'' म्हणजे तो परमात्मा सर्वांच्या अंतरंगात आहे आणि तो बाहेरही आहे. तर मग त्याच्या व्यतिरिक्त अन्य वस्तू

व अन्य वस्तू त्याच्या अस्तित्वा व्यतिरिक्त कोठे राहू शकणार नाही. त्याचप्रमाणे अर्निर्वचनीय माया आणि माया विशिष्ट चैतन्याशिवाय त्या व्यापकाचे अस्तित्वच कोठे असू शकणार? आणि तो व्यापाशिवाय जो कोणाचा किंवा कशाचा व्यापक होऊ शकणार? तेव्हा असा कोणीही अद्वैतवादी नाही जो अनिर्वचनीय अशी एखादी वस्तू आणि मायामोहित जीवासारखा पदार्थ अनादि मानीत नसेल आणि असा कोणीही द्वैतवादी नाही की जो तिन्ही पदार्थांना व्याप्यव्यापक भावांनी एक मानीत नसेल. या प्रकारे अनिर्वचनीय माया आणि माया विशिष्ट चैतन्याला अनादि मानण्याने तसेच दोन्हीमध्ये परमात्म्याला ओत-प्रोत व्यापक मानण्याने द्वैत-अद्वैतामध्ये काही अंतर राहत नाही. वैदिकांमध्ये द्वैत-अद्वैत संप्रदायाची सृष्टीही अवैदिक आहे. तेव्हा विद्वान लेखकांचा तर्क की ''एकं ब्रह्म द्वितीयोनास्ति'' बाधानुबाधित वृत्तीने शंकराचार्यांसारख्या विरळ असणाऱ्या प्रपंचदर्शीपर्यंतच सीमित आहे. सामान्य लोकांसाठी तर द्वैतच असते- अद्वैताची ही व्याख्या ग्राह्य प्रतीत होत नाही.

आदि शंकराचार्यांच्या नावावर प्रचलित भाष्यांना आधार मानून काही विद्वानांनी त्यांची आलोचना केली आहे; पण ते विचार त्यांचे आहेत की त्यांच्या गादीवर बसणाऱ्यांचे आहेत हा संशोधनाचा विषय आहे. आमचा तर असाही विचार आहे की दशनामी संन्याशाचे संगठन आदि शंकराचार्यानी केलेच नव्हते. कारण मान्यता अशी आहे की आदि शंकराचार्यांचा शिष्य पद्मपादापासून तीर्थ आणि आश्रमाची शाखा सुरू झाली. तसेच हस्तामलकांच्या शिष्यांना वन आणि अरण्य म्हटले गेले. त्रोटकाचार्यांच्या शिष्यांना गिरी पर्वत आणि सागर म्हटले गेले. सुरेश्वराचार्यांचे शिष्य सरस्वती, भारती तसेच पुरी बनले. सशस्त्र मुसलमान फकिरांच्यामुळे या दशनाम्याच्या समाप्तप्राय संख्येला पूर्ण करण्यासाठी स्वामी मधुसूदन सरस्वतींनी क्षत्रिय व वैश्यांपासून सतनामी संन्याशाना दीक्षित केले, ज्यांच्या उपद्रवाच्या वर्णनाने इतिहास भरून गेला आहे. ज्या एका अद्वैतात एवढे द्वैत आहे तेथे एकतामूलक सरळ विचारधारेलादेखील सांप्रदायिक म्हटले गेले तर त्यात आश्चर्य कसले?

शंकराचार्यांच्या भाष्याबरोबरच एकादश उपनिषद गीता व ब्रह्मसूत्र हे आधुनिक वेदान्तदर्शनाचे आधार आहेत. या तिन्हीना प्रस्थानत्रयी म्हटले जाते. आणि ही नावे म्हणजे बौध्दांच्या त्रिपिटकाची नक्कल आहे. वेदान्त किंवा ब्रह्मसूत्र अथवा उत्तर मीमांसा वेदव्यासाने

लिहिले आहे की ज्यांनी गीतेचीही रचना केली आहे असे सांगितले जाते. या दर्शनात उपनिषदाना, श्रुती आणि गीतेला स्मृती बनविण्यात खूप जोर लावला आहे.

गीतेतील १३/४ मध्ये क्षेत्र-क्षेत्रज्ञाचे विभाजन ब्रह्मसूत्राच्या पदांमध्येही आहे. ब्रह्मसूत्रांचे समर्थन गीतेत केले जाते आणि येथे गीतेच्या समर्थनासाठी ब्रह्मसूत्रांचे नाव घेतले जात आहे. तेव्हा विचार करण्यासारखे आहे की गीतेच्या पूर्वी ब्रह्मसूत्र होते की ब्रह्मसूत्राच्या पूर्वी गीता होती किंवा दोन्हीही अनादि आहेत? शांकर भाष्यकारांचे मते ज्या वाक्यांनी ब्रह्म प्राप्त होते ते सर्व ब्रह्मसूत्र आहे (यद्यपि हे कथनच असंगत आहे तरीही जर असे असेल तर) तर मग केवळ उत्तर मीमांसेच्या सूत्रांनाच ब्रह्मसूत्र मानण्याचा व्यामोह कशाला?

वेदान्त दर्शनात विश्वविख्यात सांख्य योगादि शास्त्रांना स्मृती म्हटले आहे शास्त्र नाही आणि त्यांचे खंडन केले आहे. योग दर्शनावर महर्षि व्यासांचे भाष्य प्रसिध्द आहे. जर योगदर्शनाचे केलेले खंडन योग्यच असते तर व्यासांनी त्याच्यावर भाष्य कशाला लिहिले असते? यावरून असे सिध्द होत नाही का की योगाचे खंडन करणारे वेदान्त दर्शन म्हणजे महर्षी व्यासांची रचना नाही.

या प्रकारे आदि शंकराचार्यांच्या नावावर प्रचलित शारीरिक भाष्यात लिहिले आहे की ''या तु श्रुतिः कपिलस्य ज्ञानातिशयं प्रदर्शयन्ती प्रदर्शिता न तया श्रुतिविरुध्दमपि कपिलं मतं श्रध्दातुं शक्यम कपिलमिति श्रुतिसामान्यमात्रत्वात अन्यस्य च कपिलस्य सगरपुत्राणां प्रतप्तुर्वासुदेव नाम्नः स्मरणात'' (२-१-१-१) म्हणजे श्रुतीमध्ये ज्या अत्यंत ज्ञानी कपिलांचे वर्णन आहे त्यावरून श्रुतिविरुद्ध कपिल मतावर श्रध्दा ठेवता येणार नाही कारण उपनिषदांतील वर्णित कपिल आणि सांख्य स्मृती प्रणेता कपिल या दोघांमध्ये केवळ शब्द सादृश्य आहे. यज्ञीय अश्वाच्या रक्षणासाठी नियुक्त केलेल्या सगर पुत्रांना शाप देऊन जाळणारे दुसरे कपिल पण स्मृतीमध्ये प्रसिध्द आहेत; परंतु त्यांचे खरे नाव वासुदेव होते.

उक्त उध्दरणाच्या भाष्यकारांचा आशय आहे की कपिल अनेक होते. ज्या कपिलांची सांख्य स्मृति (शास्त्र) आहे ते मानण्यास योग्य नाही. मानण्यालायक वैदिक कपिल आहेत ज्यांचे काही साहित्यच मिळत नाही. गीतेवरील भाष्यात भाष्यकार महोदय

''सिध्दांमध्ये मी कपिलमुनी आहे (१०/२६)'' असे म्हणतात. कोणत्या कपिलला भगवंताची विभूति मानण्यात आले आहे ते समजत नाही. मस्तरामजींच्या मते वेदान्ताव्यतिरिक्त अन्य शास्त्रे (सांख्य, योग वैज्ञेषिक इत्यादी) जम्बूकवत आहे. कपिल जम्बूकवत आहे आणि व्यासजी सिंहवत ! धन्य आहे आपली अतुलनीय बुध्दी जिने या महानुभावांना सुध्दा तोलले !

ब्रह्मसूत्र जर व्यासांनी लिहिले असते तर त्यात बौध्दांच्या सिध्दान्ताचे खंडन नसते; परंतु वेदांत दर्शनात (२/२/१८) बौध्द संप्रदायांचे खंडन आहे महाभारतकालीन वेद व्यासांच्या दीड हजार वर्षांनंतर भगवान बुध्दांचा जन्म झाला आणि त्यांच्याही चारशे वर्षांनंतर बौध्दांमध्ये संप्रदायांचे विभाजन झाले, ज्याचे काल निर्धारण बौध्द संगीता तसेच देशविदेशच्या बौध्द विवरणावरून सिध्द होते. अशा स्थितीत हे सूत्र महर्षी व्यासकृत मानता येत नाही. हो नकली व्यासांची रचना असेल तर मग आमचे काही म्हणणे नाही. आता या हास्यापद तर्कातही काही दम राहिला नाही की बौध्दधर्म खूप जुना आहे. इतका जुना की लंकेचा राजा रावणाला त्रेतायुगात बुध्दाने उपदेश दिला होता. आज तर शाळकरी मुलांनाही माहीत आहे की लंकेमध्ये बौध्द धर्माचा प्रचार सम्राट अशोकाचा पुत्र महेन्द्र तसेच मुलगी संधामित्रा यानी केला होता.

मस्तरामांच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच मनुस्मृतीचे सूत्रवाक्य 'नास्तिको वेद निन्दक:'' असे लिहिले आहे; परंतु नास्तिकतेची ही परिभाषा सर्वमान्य नाही. जगातील अनेक पुस्तके आपल्याला ईश्वरप्रणीत घोषित करतात. वेद किंवा कोणत्या इतर पुस्तकाच्या समर्थनाची अपेक्षा करीत नाहीत. मग तर सर्वजण एक दुसऱ्यांना नास्तिक, काफिर किंवा दुसरे काहीही म्हणू शकतात. पाणिनीनी नास्तिक शब्दाची दुसरी व्युत्पत्ती सांगितली आहे- अस्ति नास्ति दिष्टं मति: (४-४-६०) म्हणजे 'परलोक नाही' असे ज्याचे मत आहे तो नास्तिक ! नास्तिक शब्द शिवीच्या रूपातपण वापरला जातो. स्वत:ला वैदिक समजणारे संप्रदाय एक दुसऱ्याला नास्तिक तसेच अवैदिक म्हणत असतात. शांकर भाष्यकारांनी वैष्णव मताला अवैदिक म्हटले आहे. (२/२/४२-४५) तर अनेकांनी त्यांच्या मायावादाला अवैदिक म्हटले आहे. प्रच्छन बौध्द ही उपाधी अलंकाराप्रमाणे त्यांनाच तर प्राप्त झाली आहे.

आश्रमाची पुस्तिका 'अस्तिकतेच्या नावावर' यामध्ये अस्तिकता व नास्तिकता यांवर विशद चर्चा केली आहे; पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून मस्तरामांनी मनुस्मृतीच्या

उक्त सूत्रवाक्याच्या आधाराने असे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे की, आश्रमीय प्रकाशनात वेदाचा अनादर केला आहे. पण ते पुस्तक वाचणारे सर्वजण उत्तम प्रकारे जाणतात की आम्ही वेदविरोधी कधीही नव्हतो व नाही आहोत. आम्ही वेदाच्या नावावर चाललेले शोषण, अंधश्रध्दा किंवा चुकीची व्याख्याने यांच्या विरोधी मात्र अवश्य आहोत.

या संदर्भात छांदोग्य उपनिषदात एक कथानक आहे. एकदा देवराज इंद्र आणि असुरांचा राजा विरोचन आत्म्याला जाणणाच्या इच्छेने प्रजापतीकडे गेले. गुरूने जे सांगितले त्यावर इंद्राने मनन चिंतन केले पण समाधान झाले नाही तर प्रश्न परिप्रश्न विचारले, तसेच तपस्या केली व तो सत्यापर्यंतच पोहचला. पण विरोचनाला पहिल्या भेटीत जे काही उलटे सुलटे समजले त्यालाच सिध्दांत समजून असुरांमध्ये प्रचार करायला लागला. येथूनच आसुर उपनिषदांचा प्रारंभ झाला. या कथानकातून दोन तीन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली तर ही की भगवत्पथात अंधविश्वासाला काही मूल्य नाही. दुसरी गोष्ट म्हणजे साधना, भजन-भक्ती हे केल्याशिवाय केवळ वाचून अगर ऐकून सत्यापर्यंत पोहचता येत नाही. आणि तिसरी गोष्ट म्हणजे सर्व उपनिषदे कल्याणकारी नाहीत . उपनिषदांच्या रूपात आसुरी विद्यापण आहे, प्राक्षिप्त अंशपण आहे.

वेदान्तींच्या जगन्मिथ्याचा आदर्श गीतेतील आसुरी स्वभाववाल्यांशी जुळतो की ''असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम'' (१६/८) याच प्रकारे ''अहं ब्रह्मास्मि'' चा जप करणारे तसेच गीतेच्या ''ईश्वरोऽमहं भोगी''चे (१६/१४) साम्य पाहून पुष्कळ लोक वेदान्ताला आसुर उपनिषदाचे परिमार्जित संस्करण समजतात.

व्यासांनी देखील वेदाच्या नावावर प्रचलित कुरीतीपासून सावधान केले आहे.

**सुरा मत्स्यान्मधुमांसमासवं कृसरौदनम ।**
**धूर्ते प्रवर्तितं ह्येतन्नेतद् वेदेषु कल्पितम ।।**
**(महाभारत, शान्तिपर्व २६५/९)**

म्हणजे यज्ञामध्ये मांस-मदिरादिचा उपयोग म्हणजे हा धूर्तांचा कारभार आहे. वेदांमध्ये त्याचा उच्चारही नाही.

मस्तरामांचा असा प्रश्न आहे की, वेदांशिवाय पण दुसरा वेद असतो का? जर तेही वेदांना चारच मानते तर किती चांगले झाले असते ! ते तर गोपथ ब्राह्मणालापण वेद म्हणतात, शतपथ आणि ऐतरेयाला पण वेद मानतात. अकरा उपनिषदांनादेखील वेद मानतात. शेष उपनिषदांना उपनिषद म्हणण्याचे नैतिक साहस त्यांच्यात नाही.

'आस्तिकतेच्या नावावर' नावाच्या पुस्तकात वेदाचा आशय आणि उपयुक्ततेवर पुष्कळ प्रकाश टाकला आहे. त्या सर्व गोष्टींची पुनरावृत्ती न करता आम्ही असे सांगू इच्छितो की वेद हे पुस्तक नाही. प्राचीन काळी वेद शब्द खूप महत्त्वाचा होता. त्यामुळे अनेक पुस्तके वेदाच्या नावावर सांगितली गेली. व म्हणून ''मन्त्रब्राह्मणर्योयेदनामधेयम'' मंत्र आणि ब्राह्मणग्रंथ दोन्हींना वेदच म्हटले जात असे. मंत्रात ऋग्वेद, यर्जुवेद, सामवेद आणि अथर्ववेद येतात. तसेच ब्राह्मणग्रंथात ऐतरेय किंवा आश्वलायन कौशीतकी किंवा सांख्यायन शतपथ, पञ्चविश, षडविश, गोपथ इत्यादींचा समावेश होतो.

महर्षी जैमिनी, सायण इत्यादींनी ठिकठिकाणी लिहिले आहे की ब्राह्मणग्रंथ मंत्रांची अर्थात चार वेदांची व्याख्या आहे. मूळ तर संहिता किंवा मंत्र आहेत ज्यांना व्यासांनी चार वेदाच्या रूपात संकलित केले आहे. तरीही एक दोन संप्रदायी या वीस पुस्तकांना वेद असे म्हणतात. गोपथ ब्राह्मणात या चार व्यतिरिक्त पाच अन्य वेदांचे वर्णन आहे- ''सर्पवेदं, विशाचवेदं, असुरवेदं, इतिहासवेद, पुराणवेदमिति'' (१/१०) एवढेच नव्हे तर इतिहासपण वेद पुराणपण वेद आहे. छांदोग्य उपनिषदाच्या सातव्या अध्यायाच्या प्रथम खंडात इतिहास, पुराणाला पाचवा वेद आणि वेदांचा पण वेद म्हणजे व्याकरण असे म्हटले आहे. या व्यतिरिक्त नाट्यवेद, आयुर्वेद, धनुर्वेद, गन्धर्ववेद तसेच महाभारतालाही पाचवा वेद असे म्हणतात. या समस्त प्रकरणांमध्ये वेदाचा अर्थ मौलिक शिक्षण असे आहे. वेदाचा खरा आशय भगवान श्रीकृष्णाच्या गीतेतील पंधराव्या अध्यायात आहे की जो संसार वृक्षाला त्याच्या मूळ परमात्म्यासहित जो जाणतो, दुसऱ्या शब्दात प्रकृतीला परमात्म्यासहित जाणतो तो वेदवित आहे. वेद नावाच्या पोथीचे पारायण करणाऱ्याला श्रीकृष्णाने वेदवित म्हटलेले नाही. हाच विचार 'आस्तिकतेच्या नावावर या पुस्तिकेत पृष्ठ ११ ते १४ वर मांडलेला आहे. वेद शब्द ज्ञानवाचक आहे आणि श्रीकृष्णाच्या शब्दांत 'तत्स्वयं योग संसिध्दिकाले आत्मनि विन्दति' ते ज्ञान योगाच्या पूर्णावस्थेमध्ये आपल्या अंतरात्म्यात विदित होते. योगाची क्रिया संपादित केल्याशिवाय ज्ञान अथवा वेद अशी दुसरी वस्तू नाही.

भगवंत जे काही सांगत आहेत ते साधकासाठी कोट्यावधी शास्त्रांपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. ईश्वर प्रदत्त त्या ज्ञानाच्या प्रकाशात त्या पोथ्यांमध्ये लिहिलेल्या गोष्टी तो तपासतो आणि पाहतो की जी अनुभूती त्याला होत आहे ती पूर्वीच्या ऋषींना झाली होती की नव्हती? या पुष्टीसाठीच प्रवचने व पुस्तकांचा उपयोग आहे. यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की तत्त्वदर्शीजन तुला ज्ञानाचा उपदेश करतील. ज्ञान मिळवण्यासाठी तत्त्वदर्शीजवळ जावे लागते. पोथी किंवा वादविवादाचे कोठेही विधान नाही. उलट पोथीजवळ जाणे (पोथी वाचणे) हीच भ्रान्ती आहे. भगवान बुध्द पोथीला प्रमाण मानत नव्हते पण स्वतला या अर्थाने वेदग (वेदज्ञ) असे म्हणत होते.

''ज्ञान शब्दाची चर्चा होत आहे तर बाबाजींच्या या आक्षेपावरपण विचार करू या की वेद म्हणजे ज्ञान, वेदान्त म्हणजे ज्ञानाचा अन्त. तर मग ज्ञानाचापण अंत होतो का? सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म ! ज्ञान किंवा आत्म्याचा अंत मानता आणि ज्ञानीपण बनता? अंत देहाचा होतो. ज्ञान तर अनन्त आहे'' इत्यादी 'नास्तिकोंसे सावधान' पृष्ठ १४-

येथे मस्तरामजींनी तैत्तिरीय उपनिषदाच्या ब्रह्मानन्द बल्लीमध्ये वर्णित ''सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म'' मधील उध्दरण दिले आहे. त्यांनी याबाबत ह्यांच्या संप्रदायाचे शांकरभाष्य जरी वाचले तरी असे आक्षेप करण्याची चूक त्यांनी कदापिही केली नसती. शांकर भाष्यकारांनी लिहिले आहे-'' सत्यादि शब्दा न परस्परं सम्बन्ध्यते परार्थत्वात विशेष्यार्था हि ते अथ एकैको विशेषण शब्द परस्परं निरपेक्षो ब्रह्म शब्देन संबन्धते सत्यं ब्रह्म, ज्ञानं ब्रह्मानन्तं ब्रह्मोति'' अर्थात, सत्यादि शब्द परार्थ असल्यामुळे परस्पर संबंधित नाही. तो तर विशेष्यासाठीच आहे. तेव्हा त्यातील प्रत्येक शब्द एक दुसऱ्याशी संबंधित नसून 'ब्रह्म सत्य आहे, 'ब्रह्म ज्ञान आहे' 'ब्रह्म अनन्त आहे' या प्रकारे ब्रह्म शब्दाशी संबंधित आहे. याच प्रकारे सत् शब्दाचा प्रयोग गीतेमध्ये आहे. ज्ञान अनंतच असते असे सांगताना विद्वत्प्रवर अन्वयव्यतिरेक विसरून गेले काय? रामचरित मानसामध्ये त्यांना दिसले नाही का की ''उपजई बिनसई ज्ञान जिमि पाइ कुसंग सुसं'' ज्ञान निर्माण होते आणि नष्टही होते.

वास्तवात प्रत्येक गुणाला दोन टोके असतात. एक आरंभिक अवस्था आणि दुसरी पराकाष्ठा ! गीतेमध्ये ठिकठिकाणी दिले आहे की ''ज्ञानो में भी उत्तम ज्ञान मै तेरे लिये कहूँगा'' ज्ञानीजन (तत्त्वदर्शी) तुला ज्ञानाचा उपदेश करतील. येथे साधकाचा ज्ञानामध्ये प्रवेश आहे, बीजारोपण आहे आणि जेथे ज्ञानाग्नीमध्ये सर्व कर्मे जळून जातात

तेथे ज्ञानाचा अंत होतो. ज्याला जाणायचे होते त्याला जाणल्यानंतर पुढे आता कोणाला शोधायचे कारण त्याच्यापेक्षा श्रेष्ठ सत्ता आता राहिलेलीच नाही. कोणासाठी कर्म करायचे? ज्याला जाणायचे होते तोपण आता भिन्न राहिला नाही. ही ज्ञानाची पराकाष्ठा आहे आणि त्याच्याही पुढील अवस्थेत ब्रह्म अनिर्वचनीय आहे. गीतेतील सत-असत संबंधी वर्णनात मस्तराम यांना जो विरोधाभास दिसला तो द्वंद्वात्मक जगतामुळे दिसला आणि जेथे ते ब्रह्म ना सत आहे ना असत आहे तेथे ती अनिर्वचनीय स्थिती आहे, अनुभवगम्य आहे. कोणत्याही पोथीमध्ये त्याच्या वर्णनाची काही पध्दत सांगितलेली नाही. पोथी तर फक्त अंगुल्यनिर्देष करून 'नेति-नेति' असे सांगून त्याच्या अगाधतेला फक्त व्यक्त करते.

जोपर्यंत प्रभू साधकाच्या हृदयात रथी होऊन मार्गदर्शन करत नाहीत तोपर्यंत निवृत्ती देणाऱ्या भजनास आरंभच होत नाही. ती विद्या भगवंतच शिकवतात. मस्तरामजींनी ह्याचा असा अर्थ लावला की महाराजजी भगवंतांच्या अनुमतीनेच बोलतात. असे महाराजश्रींनी कधीही म्हटलेले नाही. त्याच्या म्हणण्याचा सरळ अर्थ असा आहे की भगवंत साधकाच्या मुखाने बोलत असतात. अनेकाशी बोलताना, कोणाशीही ते बोलू शकतात. कोणाशीही बोलताना त्यांना कोणाचा आदेश थोडाच घ्यावा लागतो ! आणि असेही नाही की एखाद्या युगात ते बोलत आहेत आणि आता त्यांनी बोलणे बंद केले आहे.

साधक आणि त्या प्रभूचा वार्तालाप हे तर साधनेचे आकर्षण आहे, साधकाची ती पूंजी आहे हाच साधकाचा वेद आहे या नश्वर संसारात त्याच्यासाठी तेवढेच ध्रुवसत्य आहे; परंतु हे सत्य नितांत व्यक्तिगत व गोपनीय असते. अनुरागी-विरही साधकांच्या उत्साहवर्धनासाठी पूज्य गुरुदेव महाराज याकडे संकेत करीत असत. दुसऱ्यांमध्ये या अवस्थेच्या अन्वेषणाच्या स्थानी आपल्यामध्ये प्रभूकृपेच्या प्राकट्यासाठी प्रार्थना करणे अधिक श्रेयस्कर आहे.

आश्रमाच्या पुस्तिकेत वेदाबाबत लिहिले आहे की ''परमात्म्याच्या शोधाचे पहिले विवरण वैदिक ऋषींकडून प्राप्त झाले आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात की एका परमात्म्याचेच अस्तित्व आहे. तेव्हा परमात्म्याचा शोध ग्रंथ असणाऱ्या वेदांना कोण नाकारील? वेदांचे महत्त्व यासाठी आहे की ते शाश्वत सत्य जो परमात्मा त्याला दृढ करतात'' यामध्ये आपत्ती कोसळण्यासारखे काही नव्हते परंतु मान्यवर लेखकांनी वरील पंक्तींच्याकडे दुर्लक्ष केले आणि अंतिम पंक्तीचा अभिधात्मक अर्थ लावून विचारतात

की ‘‘परमात्मा इतका कमजोर कधीपासून झाला की ज्याला वेदाने दृढ करावे लागते. काय वेद म्हणजे सीमेंट आहे आणि परमात्मा म्हणजे काय खांब आहे जो सीमेंटमध्ये पुरून त्याला दृढ करावयाचा आहे? पृष्ठ १०

मस्तराम यांनी स्वत: न्यायीपणाने समीक्षा करावी व पाहावे की वरील पंक्तींचा खरोखर ते म्हणतात तसा आशय आहे का? अंतिम वाक्याचा जर स्वतंत्रपणे विचार केला तरी शाश्वत हा शब्द तुम्ही का सोडून दिलात? शाश्वताला काय सीमेंट लागले आहे का? अभिधाशिवाय लक्षणा आणि व्यंजना हेही असते. ‘‘अहो अकलेवर धोंडा ठेवलाय काय?’’ वाक्प्रचाराचा अर्थ स्वयंप्रसिध्द शब्दश: घेऊन कोणी खरेच का दगड शोधायला निघते? उध्दृत पंक्तीचा आशय केवळ एवढाच होता की शाश्वत सत्य केवळ परमात्मा आहे आणि वेद त्या परमात्म्याविषयी आमच्या मनात श्रध्दा स्थिर करते, दृढ करते तेव्हा मस्तराम यांचा हा आक्षेपपण अकारण आहे.

मस्तरामदेखील विद्वान आहेत. त्यात दुमत नाही; कारण ते समजतात की गीतेचा अर्थ तेच नव्हे तर त्यांच्या कडील प्रथम कक्षेचा विद्यार्थीही जाणतो. शांकरभाष्यात आहे ‘‘तद इदं गीताशास्त्रं समस्त वेदार्थ सार संग्रह भूत दुर्विज्ञेयार्थम्’’- म्हणजे हे गीता शास्त्र म्हणजे संपूर्ण वेदार्थाचे (उपनिषदे) सार आहे आणि त्याचा अर्थ समजायला अत्यंत कठीण आहे. शांकर भाष्यकारासाठी गीतेचा अर्थ समजणे अत्यंत कठीण होते पण त्यांच्या स्वयंभू पीठाधीश्वरांच्यासाठी हस्तामलकवत आहे- ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

मस्तरामजींनी एक चांगला तर्क केला आहे की ‘‘शंकराच्या डमरूने व्याकरण शिकले नव्हते, परंतु शंकरजी तर ज्ञान-निधान आहेत. महत्त्व हारमोनियमचे नसते तर तो वाजवणाऱ्याचे असते (पृष्ठ १०)’’ असे सांगून मस्तरामानी महाराजश्रींच्या म्हणण्याला पुष्टीच दिली आहे. आम्हीपण हेच सांगू इच्छितो की महिमा वेदाचा नाही परंतु बोलणाऱ्या परमात्म्याचा आहे. जो परमात्मा पूर्वी बोलला होता तो काय आज बोलू शकणार नाही का?

कोणी एक महापुरुष किंवा एखादी विशिष्ट पोथीच ज्ञानाचे केंद्र असती, ईश्वराच्या कडून ती खाली उतरली असती तर विभिन्न महापुरुषांना वेळोवेळी येथे यावे लागणे आणि वेगवेगळे ग्रंथ लिहिण्याची आवश्यकताच नव्हती. त्या पोथीनेच विश्वाचे काम झाले असते; परंतु पोथी म्हणजे काही माध्यम नाही. माध्यम जीवंत असले पाहिजे,

चेतन असले पाहिजे. साधकाच्या समकालीन असले पाहिजे. आणि म्हणूनच विश्वातील सर्व धर्मांनी गुरूची अनिवार्यता स्वीकारली आहे. पोथ्यांशिवाय काम चालू शकते. जड भरत, गौतम बुध्द, मीरा, संत कबीर, रामकृष्ण परमहंस इत्यादी अनेकांचे पोथीशिवाय काम चालले, संस्कृतशिवाय त्यांचे चालले, व्याकरणाच्या ज्ञानाशिवाय त्यांचे चालले, पण गुरुशिवाय मात्र चालत नाही.

याच संदर्भात संत कबीर म्हणतात- ''पोथी पढि पढि जग मुआ पण्डित भया न कोय ।'' हेच योगेश्वर श्रीकृष्णांनीपण सांगितले आहे की ''एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते'' म्हणजे तिन्ही वेदांच्या विविध धार्मिक क्रियांमध्ये रत असणारे पुरुष जन्ममरणाच्या चक्रात अडकून बसतात. या अर्थावर मस्तराम रुष्ट झाले. ते म्हणतात की महाराजांनी ''कामकामा'' शब्द सोडून दिला आहे. येथे वेदाची निंदा नाही तर सकामी पुरुषांची निंदा आहे इत्यादी.

महाराजजींनी ''बाबा वाक्यं प्रमाणं'' मानले असते. वेद शब्दाबद्दल त्यांना काही ॲलर्जी नाही. महाराजजींनी ही वेदाविषयीची गीतोक्त धारणा स्पष्ट केली होती. वेद शब्दापर्यंत सीमित आहे; पण परमात्मा अनिर्वचनीय आहे. तो शब्दामध्ये येऊ शकत नाही, पकडला जाऊ शकत नाही. या संदर्भात मस्तराम यांनी 'श्रुति विप्रतिपन्ना' हा गीतेतीलच श्लोक जाणून बुजून सोडला ज्यात भगवान श्रीकृष्णाने म्हटले की वेद वाक्ये ऐकून विचलित झालेली तुझी बुध्दी जेव्हा अचल व स्थिर होईल तेव्हा तुला योग प्राप्त होईल. भगवान श्रीकृष्णाप्रमाणेच वेदासंबंधी छांदोग्य उपनिषदकारांचे तसेच विचार आहेत-

**देवा वै मृत्योर्बिभ्यतस्त्रयीं विद्या प्राविश स्ते**
**छन्दोभिरच्छादयन्यदेभिरच्छादयँ स्तच्छन्दसां छन्दस्त्वम् ।**
**तानु तत्र मृत्युर्यथा मत्स्यमुदके परिपश्येदेवं पर्यपश्यदृचि**
**साम्नि यजुषि ।**
**ते नु विदित्वोर्ध्वा ऋचः साम्नो यजुषः स्वरमेव प्राविशन्**
**(१/४/२-३)**

म्हणजे मृत्यूला घाबरलेल्या देवतांनी ऋक्, यजुः आणि साम रूपाने तिन्ही वेदांत प्रवेश केला. त्यांनी गायत्री वगैरे छंदांना आपले कवच बनवले परंतु ज्याप्रकारे मासे

पकडणारा कोळी पाण्यामध्ये देखील माशाला पाहू शकतो तसेच देवतांना मृत्यूने ऋक्, साम तसेच यजुर्वेदाच्या मंत्रांच्या आवरणाखालीपण पाहिले. तेथेही त्याने त्यांचा पिंड सोडला नाही. देवतांपण हे समजले त्यामुळे ऋक्, साम व यजुर्वेदातील मंत्रांच्या पलीकडे जाऊन स्वरामध्ये म्हणजेच ओंकारात प्रवेश केला. त्या ॐचा आश्रय घेऊन देवता अमर आणि निर्भय झाल्या.

यावरून स्पष्ट होते की वेदांच्या आश्रित राहणाऱ्याला मृत्यू कधी सोडत नाही, जन्ममरणाच्या येरझऱ्या चालूच राहतात आणि गीतेमध्ये हेच दाखवले-सांगितले गेले तर मस्तरामनी आभाळ डोक्यावर घेतले. जी गोष्ट छान्दोग्यकारांनी सांगितली तीच श्री गुरू नानकपण सांगतात- एक ओंकार, सत्गुरू प्रसादि एक ओंकारच सत्य आहे; परंतु तोहि सद्गुरुचा कृपाप्रसादच आहे. सद्गुरूची भेट आहे.

**वेदाची अशी घोषणा आहे-**

**ऋचो अक्षरे परमे व्योमन**
**यस्मिन देवा अधिविश्वे निषेदुः ।**
**यस्तन्न वेद किमूचा करिष्यति**
**य इत्तद विदुस्त इमे समासते ।।**
**-ऋग्वेद १/१६४/३९**

म्हणजे सर्व ऋचा परम अविनाशी अक्षरात स्थित आहेत संपूर्ण देवतापण स्थित आहेत. जो त्या अविनाशी तत्त्वाला जाणत नाही, त्यांच्यासाठी ऋचा काय करेल? जो त्या तत्त्वाला जाणतो तोच अविनाशी तत्त्वात प्रवेश करू शकतो.

'नायमात्मा प्रवचनेन लभ्यः'च्या संदर्भात मस्तराम यांनी विचारले आहे की जर प्रवचनाने आत्मा प्राप्त होत नाही तर शिष्यांना प्रवचने देण्यात व उपदेश करण्यात काय उपयोग? आपले दुकान चालवण्यासाठी प्रवचन किंवा उपदेश केला जातो काय? खरोखर प्रवचनाचा असा उपयोग जाणणाऱ्या मस्तरामाची धन्य होय. महाराजश्री तर अर्थवेदातील गोष्ट सांगतात-

**यत्र देवा ब्रह्मविदो ब्रह्म जेष्ठमुपासते**
**यो वै तान विद्यात प्रत्यक्षं स ब्रह्मा वेदिता स्यात् (१०/७/२४)**

म्हणजे जेथे ब्रह्मविद् ब्रह्माची उपासना करतात तेथे जाऊन मुमुक्षूंनी त्यांना जाणण्याचा यत्न केला तर तो ब्रह्म होतो, ब्रह्मनिष्ठ बनतो. या मंत्रात ब्रह्मविदांचा सत्संग आवश्यक असल्याचे सांगितले आहे ''उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत'' (कठ १/३/१४) या उपनिषदातील वाक्याचा हाच आशय आहे. विचिकित्सा वा वृत्त विचिकित्सा वा स्यति ये तत्र ब्राह्मणा: सम्मर्शिन: । युक्ता अयुक्ता: । अलूक्षा धर्मकामा: स्यु: । यथा ते वर्तेरर्नें । तथा तत्र वर्तेथा: (१/११) म्हणजे तुम्हाला कर्माच्या बाबतीत अथवा सदाचाराच्या बाबतीत काही शंका असेल तर तेथे उत्तम विचार असणारा, परामर्श देण्यात कुशल असणाऱ्या तसेच योगात दक्ष असणारा ब्रह्मनिष्ठ ज्याप्रकारे वर्तन करतो तशाच प्रकारचे वर्तन तुम्हाला करायला पाहिजे. पुढे ते म्हणतात- हाच आदेश आहे, हाच उपदेश आहे, हेच वेदांचे रहस्य आहे. हेच अनुशासन आहे. या प्रकारे तुम्हाला अनुष्ठान करायला पाहिजे. तैत्तिरीयातील या वर्णनाने आचार्यश्रींना आता स्पष्ट झाले असेल की, उपदेशाची परंपरा आहे, त्याचा उपयोग शंका समाधानासाठी होतो; परंतु याने आत्मा विदित होत नाही. शंका किंबहुना कठ एवं मुण्डकोपनिषदाच्या 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यो' आणि उपदेशात कोणताही विरोधाभास नाही.

''नाह वेदैर्न तपसा न दानेन चेज्यया'' (गीता/५३) भगवंताने सांगितले की मला वेद, तप दान किंवा यज्ञाने पाहता येत नाही; तर मस्तरामांनी अर्थ सांगितला की भगवंताचा आशय आहे की भक्तीबरोबर वेदाध्ययन, भक्तीबरोबर यज्ञ , भक्तीबरोबर तप आणि भक्तीबरोबर दान इत्यादी द्वारा मला पहाता येते. प्रश्न असा निर्माण होतो की भक्ती मिसळल्याने काय या सर्व क्रिया या प्रशंसनीय बनतात का?

हा महत्त्वपूर्ण प्रश्न गीतेमध्ये तीन वेळा चर्चिला गेला आहे. दुसऱ्या अध्यायात आहे की या योगात निर्धारित क्रिया एकच आहे. अविवेकी लोकांची बुध्दी अनेक शाखांनी युक्त असते त्यामुळे ते अनेक क्रिया करीत बसतात. असे लोक स्वत:तर वाट चुकलेले असतातच पण दुसऱ्यांचीही ते वाट चुकवतात.

सोळाव्या अध्यायात सांगितले आहे की आसुरी स्वभावाचे ''यजन्ते नाम यज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम'' (गीता १६/१७) शास्त्रविधींनी रहित असणाऱ्या, केवळ नाममात्र अशा यज्ञांद्वारे यज्ञ होत नाही फक्त त्याला यज्ञाचे नाव दिलेले आहे. अशा यज्ञांद्वारे जे दंभपूर्वक यजन करतात, यज्ञाच्या नावावर काही ना काही करत राहतात ते मनुष्यात अधम आहेत, पाप योनीवाले आहेत असे योगेश्वर म्हणतात.

सतराव्या अध्यायात प्रारंभी अर्जुन विचारतो की जो मनुष्य शास्त्रविधीं न करता श्रध्देने भक्तीने यजन करतो त्यांना कोणती गती मिळते? भगवान म्हणतात की शास्त्रविधींचा त्याग करून श्रध्देने भजणारे सात्त्विक पुरुष देवतांना, राजसी पुरुष यक्ष राक्षसाना आणि तामसी लोक भूत प्रेतांना पूजतात. अगदी घोर तप करणारे देखील मला भजत नाहीत तर मग परमात्म्यापासून दूर जातात- अंतर निर्माण करतात. या सर्वांना तू असुर समज. यावरून स्पष्ट होते की शास्त्रविहित भक्तीचे काही मूल्य नाही.

भगवंताने गीतेमध्ये शास्त्रही सांगितले आणि विधीही सांगितला आहे. म्हणून या दोन गोष्टी घेऊन धावत सुटण्यात काही अर्थ नाही. कदाचित शास्त्र म्हणजे वेदांत शास्त्र, मीमांसा शास्त्र, न्याय शास्त्र किंवा शास्त्र म्हणजे गरूड पुराण किंवा पाराशर स्मृती असा भगवंताचा आशय आहे का? नाही असा त्याचा अर्थ नाही. भगवंतांनी स्वयं शास्त्र म्हणजे काय ते सांगितले आहे-

**इति गुह्यतमं शास्त्रमिदयुक्तं मयानघः ।**

**एतद्बुद्ध्वा बुध्दिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ।।१५/२०**

हे अनघ, हे अत्यंत गोपनीय शास्त्र माझ्याकडून सांगितले गेले आहे. कोणते? तर हीच गीता! म्हणजे योगेश्वरांच्या एवढ्याशा वाणीत पूर्ण शास्त्र सामावलेले आहे, त्यांचे हेच म्हणणे आहे की, ''किमन्यै शास्त्र विस्तरै:''। तेव्हा शास्त्राच्या नावावर केवळ गीता घ्यावी. हे विश्वातील सर्व लोकांचे अतर्क्य शास्त्र आहे. आता विधीदेखील योगेश्वर श्रीकृष्णांच्या शब्दात ऐका-

**यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम ।**

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानव १८/४६**

ज्या परमात्म्यापासून सर्व भूतांची (हिंदू, मुसलमान, यहूदी, ईसाई यांची) उत्पत्ती झाली आहे, ज्याने हे सर्व जग व्यापलेले आहे त्या परमात्म्याला आपल्या स्वभावातून उत्पन्न झालेल्या कर्माच्या द्वारा अर्चन करून मनुष्य परमसिध्दी प्राप्त करतो. तेव्हा फक्त एका परमात्म्याचे पूजन हाच विधी आहे. एकदेशीय, एकवर्गीय देवी-देवतांचे पूजन म्हणजे कोणताही विधी नव्हे.

आचार्यवरांनी लिहिले आहे की तत्त्वदर्शीसाठी वैदिक कर्मकाण्डाचा उपयोग भले नसेल; परंतु भारतातील सर्व लोक पूर्ण ज्ञानी आहेत का? त्यांच्यासाठी विधि-निषेध या आचार संहिता काही मानाल की नाही? ग्रंथ सर्वांच्या हितासाठी लिहिले जातात मग त्यांची निंदा का? पृष्ठ दोनवर ते लिहितात की वैदिक कर्मकाण्डाने जीवनात उपासना येते, उपासनेतून अमृत (ज्ञान) आणि ज्ञानातून मोक्ष प्राप्त होतो. केवळ उपासना नाही, केवळ कर्म नाही; परंतु दोन्ही बरोबर करायला पाहिजे. निष्काम भावाने केले जाणारे साधारण कर्मपण दिव्य बनते. निष्काम कर्म अंत:करणाच्या शुध्दीचे साधन आहे.

आचार्यश्रींच्या कर्माबाबत असणाऱ्या मतातून त्याबाबत त्यांची अत्यंत मलीन भावना परिलक्षित होत आहे. ते उपासनेला कर्म मानत नाहीत, परंतु कर्माला वेगळेवेगळे सांगतात. ते विधी-निषेध किंवा आचार संहितेला कर्म मानतात, कर्मकांडाला कर्म मानतात आणि खाण्यापिण्याच्या प्रत्येक क्रियेमध्ये सकाम आणि निष्काम क्रियेचाही समावेश करतात. त्यालाच अंत:करणाच्या शुध्दीचे कारण समजतात. योगेश्वर कृष्णांनी कर्म सांगितले नसते तर आम्ही काहीही करायला प्रवृत्त झालो असतो. वाटेल त्या क्रियेला गीतेने कर्म म्हटलेले नाही. अमृत म्हणजे ज्ञान नाही आणि कर्मकांड म्हणजे कोणती उपासना नाही. कारण वेदाचा हा विभाग जो यज्ञीय कृत्ये तसेच त्यांपासून मिळणाऱ्या फळाशी संबंध ठेवतो त्याला कर्मकाण्ड म्हणतात. वैदिक यज्ञाला (पृष्ठ १३वर) आपण नकार दिला मग आता कोणते कर्मकांड तुम्ही करवून घेऊ इच्छित आहात?

आपण गीतेच्या प्रकाशात कर्माला समजून घेण्याचा प्रयत्न करू, सर्वप्रथम तथ्य तर हे आहे की गीतेमध्ये निष्काम कर्म हा शब्दच नाही. मनोवैज्ञानिकांचा असा दावा आहे की कोणतेही कर्म निष्काम असत नाही. योगीपण ईश्वरप्राप्तीची कामना मनात ठेवूनच भजनाला प्रवृत्त होतो. या शब्दाचा खरा प्रयोग केवळ भजन क्षेत्रात आहे की भजन केले पाहिजे आणि तेही या विश्वासाने करावे की त्याचा परिणाम शुभच मिळेल. व म्हणून याचे फळ प्रभूवर सोडून द्यावे. मन भगवंताला दिले तर मग फळाची कामना कोण करेल?

कर्माची विशेषता सांगताना भगवान गीतेत म्हणतात-

(१) ''व्यवसायात्मिका बुध्दिकेह कुरुनन्दन'' या कर्मामध्ये निश्चयात्मक क्रिया

एकच आहे. अविवेकी लोकांची बुध्दी अनेक शाखांनी युक्त असते. त्यामुळे कर्माच्या नावावर ते अनंत क्रियांचा विस्तार मात्र करतात.

(२) ''नियत कुरु कर्म त्वं''- अर्जुना, तू नियत कर्म कर म्हणजे क्रिया अनेक आहेत पण त्या क्रिया म्हणजे कर्म नव्हे. गीतेमध्ये नियत कर्म करण्याची गोष्ट केलेली आहे.

(३) ''शरीरयात्रापि च ते न प्रसिध्दयेद कर्मण:'' (३/८) कर्म म्हणजे काही असा विधी आहे का की जो जन्मजन्मापासून चालत आलेल्या आत्म्याच्या शरीर यात्रेचा अंत करतो? काही विद्वान शरीर यात्रेचा अर्थ जीवन निर्वाह असे म्हणतात. परंतु श्रीकृष्णाने गीतेमध्येच अशा विचारांचे खंडन केले आहे की जो शरीरासाठी खातो, परिश्रम करतो तो पापी आहे. शरीर यात्रेचा अर्थ आहे शरीर धारण करणे व जन्म घेणे. आपणच विचार करा की कोणते कर्म केल्याने पुढचा जन्म घ्यावा लागणार नाही?

(४) हे नियत कर्म आहे कोणते? श्रीकृष्णाने स्पष्ट केले की ''यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धन:'' (गीता ३/९) अर्जुना, यज्ञाची प्रक्रिया म्हणजेच कर्म आहे. या व्यतिरिक्त तुम्ही आम्ही जे काही करू ते या लोकीचे बंधन आहे. कर्म नव्हे. अनेक व्याख्याकार यज्ञाच्या नावे 'यज्ञो वै विष्णु' विष्णूसाठी केलेले कर्म म्हणजे यज्ञ म्हणतात; तर कोणी 'यज्ञो वै ब्रह्म'' ब्रह्म हेच यज्ञ आहे असा अर्थ करतात. कोणी 'आत्मा वै यज्ञ: आत्मा हाच यज्ञ आहे असे म्हणतात तर कोणी 'यज्ञो वै श्रेष्ठतम कर्म' श्रेष्ठतम कर्म हेच यज्ञ आहे असे म्हणतात परंतु आपल्या मनात क्रिया करत राहतात. अर्थात यज्ञाच्या नावावरपण कुठे पळून जाता येणार नाही. कारण चौथ्या अध्यायात श्रीकृष्णांनी एकाच यज्ञाच्या तेरा-चौदा पायऱ्यांचे वर्णन केले आहे जो प्राण-अपानाच्याद्वारे (श्वास-प्रश्वास), ध्यानाच्या द्वारे चिंतन आणि इंद्रिय संयमाद्वारे होत असतो. या यज्ञासाठी बाहेरचे काही सामान लागत नाही. श्रीकृष्णाने स्पष्ट केले की भौतिक द्रव्यांनी होणारा यज्ञही आहे; परंतु त्याचे फळ अत्यल्प आहे, मग आपण त्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च केलेत तरी त्याचे फळ अत्यल्पच राहणार.

(५) कर्मासंबंधी भ्रान्ती श्रीकृष्णाच्या वेळेसही होती. गीतेतील अध्याय ४/१६ मध्ये ते म्हणतात की कर्म काय आहे? अकर्म म्हणजे काय आहे? या विषयाबाबत विद्वानांमध्येही भ्रम आहे. म्हणून मी तुला कर्माबाबत विशेष रूपाने स्पष्ट करून सांगेन

की जे जाणल्यानंतर तू अशुभ संसार बंधनातून मुक्त होशील. येथे कर्माची विशेषता सांगताना म्हणतात की ते कर्म करण्याने संसाराचे बंधन तुटते. आताच त्यांनी सांगितले की यज्ञाच्या व्यतिरिक्त तुम्ही काहीही केले तरी बंधन तयार होते. परंतु कर्म तेच असते जे संसार बंधनातून सोडवते. तेव्हा आता तुम्ही स्वयं निर्णय घ्या की कोणते कर्म करण्याने भवबंधन तुटेल? निष्काम भावाने नोकरी करण्याने. पूज्यश्रीने 'नहले पर दहला' या पुस्तकाच्या पृष्ठ २ वर लिहिले आहे, ''रात्री दोन दोन वाजेपर्यंत जागणे, उठल्याबरोबर चहा बिस्किट खाणे, पेपर वाचणे, स्वरूपाला विसरून जाणे हा सर्व मृत्यू आहे. या मृत्यूपासून बचाव करण्यासाठी वैदिक कर्म करा.'' त्यांचा आशय एवढाच आहे की नियमित वेळी झोपा, नियमित वेळी उठून स्नान संध्या करून खा. परंतु बिस्कीट खाण्या न खाण्याशी गीतेचा काही संबंध नाही. मंत्र म्हणत स्नान करणे हा गीतेचा धर्म नाही. मग आता विचार करा की गीता कोणाला धर्म म्हणत आहे?

(६) ''तदर्थ कर्म कौन्तेय मुक्तसङ्ग समाचार (३/९)'' नियत कर्मालाच तदर्थं कर्म किंवा यज्ञार्थ कर्म असे म्हटले आहे. यालाच 'कार्यम् कर्म', 'पुण्य कर्म' आणि 'शास्त्र विधानोक्त कर्म'पण म्हटले गेले आहे. वेगळे असे दुसरे कोणते पुण्य कर्म गीतेमध्ये नाही. पुण्याच्या नावावर जगात जेवढे पण कार्य केले जात आहे ती सामाजिक व्यवस्था आहे. गीतेमध्ये पुण्यकर्म एकच आहे- आराधना!

या प्रकारचे कर्म संगदोषापासून दूर राहून करावयाचे असते. भर्तृहरीचा अनुभव आहे- दौर्मन्त्र्यान्नृपतिर्विनश्यति यतिः सङ्गत- हेच मानसमध्येपण सांगितले आहे- संग ते यती, कुमंत्र ते राजा । ऋग्वेदात आहे- उपहरे गिरीणां सङ्गमे च नदीनाम धिया विप्रो अजायत । (८/६/२८) डोंगराच्या गुहेत तसेच नदीच्या संगमाचे ठिकाणी ध्यानादिंनी विप्रत्वाचा जन्म होतो. गीतेमध्ये ठिकठिकाणी एकान्तसेवनावर भर दिला आहे. एकांतात कोणते कर्म कराल?

**(७) यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः**
**ज्ञानाग्नि दग्ध कर्माणां तमाहुः पण्डितं बुधाः ।।४/१९।।**

कोणत्याही व्यक्तीकडून आरंभिलेले संपूर्ण कर्म जेव्हा इतके सूक्ष्म होते की ते कामनारहित (भोगेच्छारहित) व संकल्परहित होते तेव्हा ते ज्ञानाग्निमध्ये नेहमीसाठी दग्ध होते. पुढे काही कर्म करण्याची आवश्यकताच राहत नाही. यावरून स्पष्ट होते की

गीतेतील नियत कर्म व्यक्तीच्या संकल्पांचा निरोध करते. इतर कोणत्याही सांसारिक कर्मांनी, कोणत्याही विधि-निषेधांनी, कोणत्याही आचार संहितेने किंबहुना कोणत्याही कर्मकांडांनी संकल्पशून्यता येत असेल तर अवश्य करावी. ''मिटै कि काम अगिनि तुलसी कहे विषय-भोग बहु धी ते ।''

(८) आठव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुनाने प्रश्न केला की, भगवन कर्माची पूर्णता केव्हा होते? भगवंतांनी सांगितले- 'भूतभावेद्भवकरो विसर्ग: कर्मसंज्ञित प्राणिमात्रांचे ते भाव की ज्यात काही ना काही सतत निर्माण होत असते ते भाव म्हणजेच त्या भावना,ते विचार विसर्जित होणे, थांबणे म्हणजे कर्माची पूर्णता होय. मनातील संकल्प नेहमीसाठी थांबणे म्हणजेच कर्माची पराकाष्ठा होय.

(१०) गीतेमध्ये १६/२२ मध्ये ते म्हणतात की काम, क्रोध, लोभ ही नरकाची तीन दारे आहेत. यांचा त्याग केल्यानेच कार्यास आरंभ होतो ज्यामुळे परमगती प्राप्त होत असते. आता आचार्यश्रींनीच विचार करावा की कोणत्या कर्माने परमगती प्राप्त होत असते आणि कोणत्या कर्माने पितृलोक प्राप्त होत असतो? गीता कशाला कर्म म्हणते?

(११) गीतेतील १७/१७ मध्ये सांगितले आहे की कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधियते. त्या परमात्म्यासाठी नियत केलेले कर्मच सत्य आहे. तुलसीमानसात हेच सांगितले आहे- सत् हरि भजन, जगत सब सपना ।

योगेश्वर श्रीकृष्णांनी इतके ठासून सांगितल्यानंतरसुध्दा आचार्यश्री त्या नियत कर्माला डावलून कर्माचा विपरीत अर्थ करतात की जगात मनुष्याच्या हातून जे जे केले जाते ते सर्व कर्म होय. त्यासाठी कशाचाही त्याग करण्याची आवश्यकता नाही. फक्त फळाची इच्छा ठेवू नका. म्हणजे झाले निष्काम कर्म ! किती भ्रामक कल्पना आहेत ही ! म्हणतात अहो काहीही करा पण जे कराल ते ईश्वराला अर्पण करा म्हणजे झाला समर्पण योग परंतु हे समर्पण नव्हे. योग दर्शनकार म्हणतात की, ''समाधिश्वर प्रणिधानात'' ईश्वराला समर्पण करण्यानेच समाधी सिध्द होत असते कारण समर्पणाचा परिणाम आहे समाधी-सिध्द ध्यान ! समर्पणाने मन संकल्पविरहित बनत असते. मन तर इच्छा करीत असते. त्या मनालाच ईश्वरचरणी समर्पण केले की मन इच्छा करेलच कोणती? पण केवळ कामनांना रोकण्याने किंवा त्या नारायणाला समर्पण केल्या आहेत असे म्हणण्याने

इच्छा कधीही थांबत नाहीत. त्या कामना फक्त ईश्वराच्या चिंतनानेच नष्ट होतील किंवा थांबल्या जातील. नोकरी करणारे म्हणतात की आम्ही आमचे कर्तव्य समजूनच साहेबांच्या आदेशाचे पालन करीत असतो. आमची स्वत:ची त्यात काही इच्छा नसते. म्हणजे आम्ही आमच्या जीवनात निष्काम कर्मयोगाला उतरवले आहे. अहो, पण कर्म म्हणजे काय हेच तुम्हाला माहीत नाही तर निष्काम कर्मयोग कसला? जर श्रीकृष्णांनी कर्म म्हणजे काय ते स्पष्ट सांगितले नसते; तर मग तुम्ही काहीही करू शकला असता. पण जे सांगितले आहे त्याचे तर पालन करा. परंतु मनुष्य त्याचे तर पालन करीत नाही कारण अनेक रीतिरिवाज, पूजेच्या पध्दती परंपरेने मनुष्याच्या मनावर बिंबल्या गेल्या आहेत. बाह्य वस्तू विकून आम्ही त्या झटकून टाकू शकतो. पण पूर्वग्रहग्रस्त विचार, कुसंस्कार हे आमच्याबरोबरच डोक्यात सुरू असतात. मस्तक कापून कोणी वेगळे तर करू शकत नाही. हीच विवशता आचार्यश्रींचीपण आहे. नियत कर्माला सोडून त्यांनी इतर इतक्या गोष्टी कर्म म्हणून सांगितल्या आहेत की गीतोक्त कर्म म्हणजे काय तेच ते विसरून गेले आहेत.

मान्यवरांनी सांगितले आहे की, धर्म शब्द दोन अर्थांमध्ये प्रयुक्त होत असतो. एक निवृत्तिपरक आणि दुसरा प्रवृत्तिपरक ! विधिपरक पुण्य दान व व्रत यांना सामाजिक अभ्युन्नतीच्या हेतूने धारण करावे. पृष्ठ २० विधिनिषेधात्मक धर्म जीवनाला ते नियंत्रित किंवा ते व्यवस्थित करीत असते. असंस्कृत क्रिया-कर्माचा ते शोध घेत असते. पृष्ठ १८.

अहो, जर धर्मच दोन प्रकारचा झाला तर अधर्म कशाला म्हणायचा? मग अधर्म किती प्रकारचे झाले? विसाव्या पानावर मस्तराम लिहितात की जो चुकीचे कर्म करू देत नाही त्याचे नाव धर्म आहे. तर मग सरकारचे सर्व कायदे मनुष्याला चुकीचे कर्म करू देत नाहीत. मग तो काही धर्म झाला का? धर्म विधिनिषेधात्मक नसते; परंतु कर्म विधिनिषेधात्मक असते असे म्हटले गेले आहे- ''विधि निषेधमय कलिमल हरनी । करम कथा रवि नंदिनि वरनी ।'' विधि निषेध तर रस्त्याच्या नियमांतदेखील आहेत की हाताच्या डाव्या बाजूने चालावे, उजव्या हाताच्या बाजूने चालू नये तर मग काय तो धर्म झाला का? अत्यंत उपयुक्त असूनही हे विधि निषेध ना धर्म आहे ना गीतेचे नियत कर्म ! प्राचीन ग्रंथात शौच, दंतधावन स्नान, भोजन, निद्रा, जागरण, विवाह, नियोग इत्यादी अनेक कर्मांना विधिनिषेधात्मक कर्म असे म्हटले आहे. हे सर्व त्या वेळचे राष्ट्रीय

कायदे कानून आहेत, जीवनाला ते नियंत्रित आणि शिस्तबध्द करतात, असंस्कृत क्रिया कर्मांचा ते शोध घेतात, पण तरीही त्यांना नियत धर्म असे म्हणता येत नाही. ते केवळ स्वास्थ्य, स्वच्छता, अधिकार तसेच सदाचाराचे नियम आहेत. यातून देखील बहुतांसाठी उन्नत आविष्कार जन-जीवनात प्रचलित आहे. साबण तेल न वापरता आज किती लोक माती किंवा उटी लावायला तयार होतील? उपयुक्त किंवा निरपयुक्त अशा प्राचीन सर्व नियमांना अकारण धर्म म्हणून त्याला मानण्याचे आजच्या सुशिक्षित समाजात काहीही औचित्य नाही.

धर्माचे प्रयोजन सांगताना मस्तरामांनी श्रीमद्‌भागवतातील खालील श्लोक उदाहरणादाखल दिला आहे.

**धर्मस्यह्यापवर्ग्यस्य नार्थोऽर्थापकल्पते ।**
**नार्थस्य धर्मेकान्तस्य कामो लाभाय हि स्मृत ।।१/२/९।।**

आचार्यजींनी याचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे ''कोणत्याही अनुचित धनामध्ये आम्ही फसता कामा नये. जर त्यात फसलात-अडकलात तर त्यातून सोडवणारा धर्म असतो'' पृष्ठ १९. अशा प्रकारचा अर्थ एका वेदान्ताचार्याने करावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. आजकल अयोग्य अशा धनाच्या राशीत अडकणाऱ्यांची सुटका इन्कमटॅक्सचे वकील करतात, नेता करीत असतात. मग तर त्या सर्वांना आजचा धर्म समजला पाहिजे.

या श्लोकाचा खरा अर्थ पुढीलप्रमाणे होईल. ''धर्माचे फळ मोक्ष आहे. त्याची सार्थकता अर्थप्राप्तीमध्ये नाही. अर्थ केवळ धर्मासाठी आहे. भोग-विलास धनाची सार्थकता नाही.'' आपला निष्कर्ष काढताना मस्तरामाने भागवतातील अनेक प्रसंगांकडे दुर्लक्ष केले आहे. दुसऱ्या स्कंधातील दुसऱ्या अध्यायातील श्लोकात लिहिले आहे- ''वेदांची वर्णन शैलीच अशा प्रकारची आहे की लोकांची बुध्दी स्वर्ग आदि निरर्थक गोष्टीत अडकली जाते; परंतु त्या मायालोकांत खऱ्या सुखाची प्राप्ती कोठेही होत नाही. आश्चर्य आहे ! हा श्लोक मस्तराम यांना कसा काय दिसला नाही?

धर्माचे विशुध्द स्वरूप गीतेमध्ये दिसून येते. २/१६/२९ मध्ये भगवान श्रीकृष्णाच्या मते असत वस्तूचे अस्तित्व नाही आणि सत वस्तूचा कधी अभाव नसतो. परमात्माच

सत आहे; परंतु तो अचिंत्यपण आहे. जोपर्यंत चित्त आणि चित्तातील तरंग (विचारांचे भावनांचे) आहेत; तोपर्यंत त्याला (ईश्वराला) पाहता येत नाही. चित्ताचा निरोध करून त्या परमात्म्याला प्राप्त करण्याच्या विधीचे नाव आहे कर्म ! या कर्माला कार्यरूप देणे म्हणजे धर्म होय. अर्थात प्रभूशी ऐक्य करून देणाऱ्या कर्माप्रमाणे चालणे किंवा आचरण करणे म्हणजे धर्म होय.

गीतेतील २/४०मध्ये आहे की या कर्मरूपी धर्माचे अल्पसे साधन केले तरी जन्ममृत्यूच्या महान भयातून उध्दार होतो. अर्थात हे कर्म करणे हाच धर्म आहे.

या नियत कर्माला (साधना मार्गाला) साधकाच्या स्वभावात उपलब्ध असणाऱ्या क्षमतेप्रमाणे चार भागात विभागले आहे. कर्माला जाणून मनुष्य जेव्हा ते करण्यास आरंभ करतो तेव्हा त्या आरंभिक अवस्थेमध्ये तो शूद्र असतो. क्रमश: विधी त्याला प्राप्त झाले तर तो वैश्य होतो. प्रकृतीतील संघर्षाशी दोन हात करण्याची क्षमता आणि शौर्य (सामर्थ्य) प्राप्त झाल्यानंतर तीच व्यक्ती क्षत्रिय बनते आणि ब्रह्माशी तद्रूप होण्याची योग्यता (ज्ञान-विज्ञानादि) प्राप्त झाल्यानंतर तीच व्यक्ती ब्राह्मण बनते.

गीतेतील १८/४६-४७ मध्ये भगवान म्हणतात की स्वभावात प्राप्त होणाऱ्या क्षमतेनुसार कर्म करणे म्हणजे स्वधर्म होय. कमी प्रतीचे असले तरी स्वभावामध्ये उपलब्ध स्वधर्म (कर्म) श्रेयस्कर असतो; परंतु स्वत: प्राप्त केल्याशिवाय दुसऱ्यांच्या उन्नत धर्माची नक्कल हानिकारक असते. स्वधर्मात आलेला मृत्यू कल्याणकारी असतो. अशा मृत्यूनंतर जेथून साधना तुटली होती- खंडित झाली होती तेथून ती पुन: सुरू होते. सोपानश: चालून ती परमसिध्दी, ते अविनाशी पद त्याला प्राप्त होते.

ज्या परमात्म्यापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते जो सर्वत्र व्याप्त आहे त्याला स्वभावामध्ये असणाऱ्या क्षमतेनुसार पूज्य भावाने पूजून मानव परमसिध्दीप्रत जावू शकतो. म्हणजे एकमेव असणाऱ्या परमात्म्याचे चिंतन हाच एक निश्चित विधी आहे.

धर्म करण्याचा अधिकार कोणाला आहे? योगेश्वराने सांगितले आहे की अत्यंत दुराचारी व्यक्तीने जरी अनन्य भावाने म्हणजेच अन्य कोणालाही न भजता केवळ मलाच भजले तर ती देखील त्वरित धर्मात्मा बनते, तिचा आत्मा धर्माशी संयुक्त होऊन जातो. तेव्हा श्रीकृष्णानुसार जो अनन्य निष्ठेने एकमेव असणाऱ्या परमात्म्याची उपासना करतो

तोच खरा धर्मात्मा होय. जो परमात्म्याची उपासना करतो तोच खरा धर्मात्मा होय. जो परमात्म्याच्या प्राप्तीसाठी नियत कर्माचे आचरण करतो तो धर्मात्मा होय. जो स्वभावात नियत असणाऱ्या क्षमतेनुसार परमात्म्याच्या शोधात संलग्न असतो तो खरा धर्मात्मा होय.

शेवटी ते म्हणतात हे अर्जुना, सर्व धर्मांची चिंता सोडून मला शरण ये. म्हणजे एकमेव असणाऱ्या परमात्म्याच्या प्रती समर्पित व्यक्तीच धार्मिक असते. एका परमात्म्यात श्रध्दा स्थिर करणे म्हणजेच धर्म होय. या स्थितीला प्राप्त असणारे महापुरुष, आत्मतृप्त महापुरुषांचा सिध्दान्तच सृष्टीचा एकमात्र धर्म आहे. त्या महापुरुषांना शरण गेले पाहिजे व त्यांच्याकडून जाणून घेतले पाहिजे की, त्या महापुरुषांनी परमात्म्याला कशा प्रकारे प्राप्त करून घेतले? कोणत्या मार्गाने ते गेले? त्या मार्गाने चालणे म्हणजेच धर्म होय.

धर्म म्हणजे मनुष्याच्या आचरणाची वस्तू आहे आणि ते आचरण निर्धारित आहे नियत आहे त्या व्यतिरिक्त मनमानेल तसे काहीही करणे म्हणजे धर्म नव्हे. मग ते धर्माच्या नावावर केले तरी तो धर्म नव्हे यामध्ये निश्चित अशी क्रिया एकच आहे, ती म्हणजे विषयांच्याकडे धावणाऱ्या मनाचा निरोध करून त्याला इष्टाकडे वळवणे, इंद्रियांचे विकार आणि मनातील व्यापार यांचा संयम करून त्यांना आत्म्याकडे प्रवाहित करणे (४/२७) या संयमाविषयी गीतेमध्ये ठिकठिकाणी सांगितले आहे एकांत सेवन, स्वल्पाहार, ब्रह्मचर्य, ॐचा जप, सद्‌गुरूचे ध्यान या गोष्टी करणे म्हणजे धर्म होय आणि गीतेमध्ये असणारा सरळ, क्रमबध्द म्हणजेच पूर्ण साधनेला सोडून ग्रंथांच्या नावावर इकडे-तिकडे धावणे म्हणजे धर्म नव्हे.

कोणतीही लिहिलेली गोष्ट डोळे मिटून मानणे विवेक सम्मत नसते. तेव्हा वेदांच्या नावावर दहा ब्राह्मण ग्रंथ, आरण्यक, शेकडो उपनिषदे, वेदान्त किंवा अन्य शास्त्रे तसेच शेकडो स्मृतींना अपौरुषेय किंवा ईश्वर प्रणीत असे सांगून लोकांना त्यावर श्रध्दा ठेवायला सांगणे म्हणजे त्यांच्या श्रध्देचा दुरुपयोग आहे. लोकांनी जेव्हा पाहिले की, अपौरुषेय म्हणण्याने ग्रंथाचे महत्त्व वाढते तेव्हा ते प्रत्येक साहित्याला अपौरुषेय म्हणायला लागले. बृहदारण्यक उपनिषदात आहे की ऋक्, यजुः, साम, अथर्व, इतिहास, पुराण, उपनिषद, श्लोक, सूत्र, व्याख्यान, अनुव्याख्यान इत्यादी सर्व ईश्वराचे निःश्वास आहे, अपौरुषेय आहे. (बृहद् २-४-१०) या प्रकारे मत्स्यपुराणात भगवान मत्स्य म्हणतात-

**पुराणं सर्वशास्त्राणां प्रथमं ब्रह्मणा स्मृतम् ।**
**अनन्तरं च वक्तेभ्यो वेदाश्च विनिर्गत: ॥५३/३॥**

म्हणजे प्रथम ब्रह्माने पुराण बनवले आणि मग वेदाची रचना झाली. पुराणात असे लिहिलेले असल्याने ते खरे समजायचे का? पाचव्या सहाव्या श्लोकात मत्स्य भगवान म्हणतात की सर्व लोक नष्ट झाल्यानंतर मीच अश्वरूप घेऊन व्याकरणादि सहा अंगांसहित चार वेद, पुराण, न्याय शास्त्र, मीमांसा आणि धर्मशास्त्राचे संकलन केले होते. बृहदारण्यकात (६/२/१३) तसेच छान्दोग्यात (५/८-१-२) यज्ञाला दिलेल्या अश्लील उपमेला अपौरुषेय म्हणण्यात काय औचित्य आहे? सामवेद गायनाला दिलेली उपमा छांदोग्य उपनिषदात पाहा-

उपमन्त्रयते स हिंकारो ज्ञपयते स प्रस्ताव: स्त्रिया सह शेते स उदगीथ:, प्रतिस्त्री सह शेते स प्रतिहार:, कालं गच्छति तन्निधनं, पारं गच्छति तन्निधनमेतद्वामदेव्यं मिथुने प्रोतम् ।

स य एवमेतद्वामदेव्यं मिथुने प्रोतं वेद मिथुनी भवति मिथुनान्मिथुनात्प्रजायते सर्वमायुरेतिज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्या न कांचन परिहरेतद्व्रतम २/१३/१-२)

म्हणजे स्त्री-पुरुषांनी परस्परांना केलेला संकेत म्हणजे हिंकार (गाईचे हंबरणे) आहे, परस्परांची सहमती म्हणजे प्रस्ताव आहे, एका पलंगावर सह शयन करणे म्हणजे उद्गीथ आहे... इत्यादी येथे सामवेदाची तुलना मैथुनाबरोबर केली आहे. न कांचन परिहरेत् तत् व्रतम- अर्थात कोणत्याही स्त्रीला सोडता कामा नये. हेच व्रत आहे. शांकर भाष्यकारांनी त्याचा अर्थ असा केला आहे- न कांचन कांचदपि स्त्रियं स्वात्मतल्प प्राप्तां म परिहरेत समागमार्थनाम'' म्हणजे समागमाची इच्छा करणारी कोणतीही स्त्री जर तुमच्या शय्येवर आली तर तिला सोडता कामा नये. काय हिला भगवती श्रुती म्हणायचे का?

छांदोग्य उपनिषदात आहे, 'चन्द्र इव राहोर्मुखात प्रमुच्य' (८/१३/१) ज्याप्रमाणे चंद्र राहूच्या मुखातून सुटतो. चंद्राला राहू खाऊन टाकतो आणि पुन्हा बाहेर काढतो. सृष्टिकर्त्याला आपल्या सृष्टीचाच पत्ता नाही की ग्रहण कसे लागते ते?

बृहदारण्यकात आहे ''कस्मिन्नु खल्वादित्य लोका ओताश्च प्रोताश्चेति चन्द्रलोकेषु गार्गीति'' (३/६/१). गार्गीने विचारले होते की सूर्यलोक कशात स्थित आहे? याज्ञवल्क्यने सांगितले की चंद्रलोकामध्ये. येथे चंद्रलोकाला सूर्यापेक्षा मोठा म्हणजे सूर्याला चंद्रापासून निघालेला आहे असे सांगितले आहे. ऋषींच्या या वादविवादाला भगवंताची वाणी असे म्हणणे योग्य आहे का?

आदरणीय मस्तरामाचा हट्ट येथेही पाहण्यासारखा आहे. ते म्हणतात की ढग यज्ञाच्या धुरापासून बनतात. आपले म्हणणे सबल बनवण्यासाठी महाकवी कालिदास व पूज्य उडिया बाबांची घोषणा पुरावा म्हणून ते देतात. अहो, ढग तर जसे बनतात तसे बनतीलच. या महानुभावांचे नाव घेण्याने त्यांच्या निर्माण प्रक्रियेत काही परिवर्तन होणार आहे का?

ढग बनविण्यासाठी आचार्यश्री वेद, उपनिषद, पुराण आणि स्मृतीपासून कालिदासापर्यंत पोहचले. थोडे आणखी पुढे गेले असते तर त्यांना श्री प्रभुदत्त ब्रह्मचारी यांच्या चैतन्य चरित्रग्रंथातील प्रथम खंडात अनेक ग्रंथ तसेच वामन शिवराम आपटे यांच्या संस्कृत-हिंदी कोशात स्मृती धर्मशास्त्राच्या रूपात उध्दृत 'जन्मना जायते शूद्र...' हा श्लोकपण मिळाला असता.

कालिदासाचे आणखी एक वर्णन आहे- लोकालोक नावाचा एक पर्वत आहे. त्याने पृथ्वीला चारी बाजूंनी घेरले आहे. पृथ्वीचे सात द्वीप आहेत. सातव्या द्वीपाच्या बाहेर हा पर्वत आहे. त्याच्या पलीकडे अंधारच अंधार असतो. आणि त्याच्या अलीकडील बाजू सूर्याने प्रकाशित असते. म्हणजे हा पर्वत अंधार आणि प्रकाशाला पृथक् करतो कालिदासाने या पर्वताविषयी म्हटले आहे- प्रकाशश्चाप्रकाशश्च लोकालोक इवाचल: (रघुवंश १-६८) महाकवीजवळ कविसत्यही असते. त्यांचा चकोर अंगार खात असतो हे कविसत्य आहे. त्याचा हंस मानसरोवरात मोती टिपत असतो हेही एक कविसत्य आहे. कारण कवीजवळ उक्तीवैचित्र्य असते. वाग् विदग्धता असते, काव्य असते, त्याच्याकडून रसानुभूतीच अपेक्षित असते, वैज्ञानिक परीक्षण अपेक्षित नसते.

त्याचप्रकारे ऋषींजवळ ऋषिसत्य असते, योगपरक, शब्द असतात. श्री रामकृष्ण परमहंसांनी सांगितले की 'गीता गीता' असे तीन चार वेळा म्हणण्याने 'तागी तागी' म्हणजे त्यागी बनला जातो. आता तुम्ही म्हणाल की हा कोणता विधी आहे? वास्तविक

येथे त्यांनी गीतेचा खरा अर्थ सांगितला आहे.

संत कथनातील भाव जाणत असतात. संतांजवळ तुम्ही व्याकरण, छंद किंवा निरुक्त शिकायला जात नाही. तेव्हा कोणत्या शब्दात उपसर्ग कोठे, प्रत्यय कोठे, कृत आणि तध्दिते कोठे याचे समाधान करणे हे शिक्षणक्षेत्रातील गोष्ट आहे. धर्म त्याचे रणांगण कधीच नाही.

संत म्हणजे इनसाइक्लोपीडियाही नाही आहेत. कोणत्याही ग्रंथाचे पाठांतर करणे भगवत्पथात अनिवार्यही नाही. कितीतरी पुस्तके लिहिली गेली आणि कितीतरी अजूनही तोंडी, हस्तलिखित स्वरूपात प्राप्य आहेत. काही आता अप्राप्य झाली आहेत. प्रयत्नशील साधकाला या प्रश्नाचा देखील काही उपयोग नसतो. त्याबरोबरच हाच प्रश्न दोनदा विचारून पूज्यश्रींना संकोचात टाकणार नाही की 'नास्तिकांच्या...' या पुस्तकात गोस्वामी तुलसीदासांच्या नावावर हा दोहा त्यांनी केव्हा घातला की- ''ब्रह्मज्ञान जाना ही, कर्म दिया छटकाय सो नव पाँवर मूढ है पुनि पुनि नरकहि जाय ॥''

छांदोग्य उपनिषदात आहे की, हे सोम्य, राजकर्मचारी मनुष्याला हात बांधून आणतात आणि म्हणतात? की याने चोरी केली आहे. मग राजा लोखंडाचा परशू गरम करून त्याच्या हातावर ठेवतो. जर तो खरोखर चोर असेल तर तो जळून जातो (८/१३/१). आता आचार्यश्रींनी स्वत: निर्णय करावा की अज्ञानावर आधारित या प्रथेला अपौरुषेय म्हणत किती लोक त्याचे पालन करतील? निर्दोष असूनसुध्दा ते स्वत: अशी कसोटी द्यायला तयार होतील का? हे कथन अपौरुषेय आहे का?

ज्या प्रकारे या आर्ष ग्रंथांमध्ये प्रक्षिप्त अंश आहे त्या प्रकारेच त्यावरील भाष्यांमध्येही प्रदूषण स्पष्टपणे असलेले दिसून येते. उदाहरण पाहा. चौदाव्या शतकातील विजय नगरच्या राजा बुक्क यांच्या दीवान सायणाचार्यांनी पंडितांच्या सहाय्याने वेद आणि ब्राह्मण ग्रंथांवर भाष्य केले. त्यांच्यानंतर उबट व उबटनंतर महीधर झाले, ज्यांनी सायण व उबट यांना आधार मानून वेदांवर भाष्य केले. येथे यजुर्वेदातील तेविसाव्या अध्यायातील एकोणिसावी कण्डिका प्रस्तुत करीत आहे.

गणनां त्वा गणपति हवामहे प्रियानां त्वा प्रियपति हवामहे निधीनां त्वा निधिपति हवामहे वसो मम । आहमजाति गर्भधमा त्वमजसि. गर्धधम ।

यावर भाष्य करताना महीधर लिहितात ''अस्मिन मंत्रे गणपति शब्दादश्वो बाजी ग्रहीतव्य इति । तद्यथा महिषी यजमानस्यपत्नी, यज्ञशालायां पश्यतां सर्वेषामृत्विजामश्वसमीपे शेते शयानां सल्याह, हे अश्व ! गर्भथं गर्भ दधाति, गर्भद्यं गर्भधारकं रेत: अहं आ अजानि आकृष्य क्षिपामि त्व च गर्भधं रेत: आ अजासि आकृष्य क्षिपसि ।'' याचा अर्थ असा की यजमानाच्या पत्नीने यज्ञ करणाऱ्या पंडितांसमोर घोड्याजवळ झोपावे आणि त्याच्याकडून गर्भ धारण करण्यासाठी सांगावे.

सायणाचार्यांनी ऋग्वेदाच्या प्रथम मंडलातील सूक्त चोवीसपासून तीन पर्यंत केलेल्या भाष्यात शुन:शेषाची गोष्ट लिहून वेदामध्ये नरबळीचे भयंकर उदाहरण दिले आहे. आणि शुन:शेषाचा अर्थ 'शुन इव शेष: यस्य' अर्थात कुत्र्याचा असा केला आहे.

त्यांच्याच शैलीमध्ये आचार्यांनी आपल्या पुस्तकातील पृष्ठ बाराव्यावर वेदामध्ये जाती आहेत हे दाखवण्यासाठी आपस्तम्ब धर्मसूत्र, शतपथ ब्राह्मण, ऐतरेय ब्राह्मण, पातंजली योगदर्शन, तैत्तरीय आरण्यक तसेच निरुक्तातील उदाहरणे दिली आहेत. परंतु चार वेदांव्यतिरिक्त हे ग्रंथ म्हणजे सुध्दा वेद आहेत का? या उदाहरणांचा जातिपरक अर्थ लावून आचार्यांनी आपल्या विद्वत्तेचा दुरुपयोग केला आहे. उदाहरणादाखल पातंजली योगातील त्यांनी जे उध्दरण दिले आहे ते 'सतिमूले तद्विपाको जात्यायुर्भोगा' नावाच्या सूत्रात जाती शब्दाचा अर्थ भारतातील प्रचलित जाती व्यवस्था असा नाही. साधन पादाच्या या तेराव्या सूत्राच्या पूर्वी बाराव्या सूत्रात आहे की वासनांचे फळ वर्तमान तसेच पुढील जन्मात भोगावे लागते. तेराव्या सूत्रात हेच फळ जाती, आयुष्य व उपभोग असे सांगितले आहे. जातीचा अर्थ येथे जन्म असा आहे. मनुष्य, पशू, कीट पतंगादि योनींमध्ये जन्मजाती आहेत. इंद्रियांचे रूप-रसादिक विषय भोग आहेत. याच योगशास्त्रातील कैवल्य पादाचे दुसरे सूत्र पुढीलप्रमाणे आहे-'' प्रकृत्यापूरात जात्यन्तरपरिणाम: ।'' म्हणजे प्रकृती पूर्ण झाल्याने एक जात दुसऱ्या जातीत बदलली जाते. भारतातील जाती व्यवस्थेमध्ये हे लक्षण कोठे प्राप्त होते ?

हेच भागवतातील नवव्या स्कंधातील द्वितीय अध्यायातील श्लोकांत आहे की मनुपुत्र धृष्ट पासून धाष्ट्र्य नामक क्षत्रिय झाले व तेच शेवटी या शरीरातच ब्राह्मण बनले. मनुपुत्र नरिष्यन्तापासून चित्रसेन, त्याच्यापासून ऋक्ष, ऋक्षापासून मीटवान, त्याच्यापासून

उरूश्रवा, त्यापासून देवदत्त, त्यापासून अग्निवेश्य नावाचा पुत्र झाला. ज्याच्यापासून ब्राह्मणांतील अग्निवेश्यासन नावाचे गोत्र सुरू झाले. चौथ्या स्कंधातील चौदाव्या-पंधराव्या अध्यायात ब्राह्मणांद्वारे पुत्रहीन राजा बेनच्या जांघेपासून निषार तसेच भुजांपासून पृथू व अर्ची यांच्या जन्माचे वर्णन आहे, ज्यांनी आपापसात विवाह केला. मग ब्राह्मण विराटाच्या मुखातून जन्मले असे म्हणतात ते कसे? तिसऱ्या स्कंधातील बाराव्या अध्यायात ब्रह्माचे पुत्र मरिची इत्यादींना ऋषींनी सरस्वती संबंधी आसक्ती व्यक्त केल्याबद्दल त्यांना फटकारले आहे की, तुमच्या पूर्ववर्ती कोणत्याही ब्रह्माने असा संकल्प केला नव्हता यावरून स्पष्ट होते की, ब्रह्मा म्हणजे देखील एक व्यवस्थाकार होते. त्यांच्या पूर्वीही सृष्टी होती.

आश्रमाच्या पुस्तकात लिहिले आहे की झल्लमल्ल, लिच्छवी या जाती, ज्यांचे वर्णन मनुस्मृतीमध्ये आहे त्या महाभारतकालानंतरच्या आहेत. तर आमच्या या आचार्यांनी यजुर्वेदातील काही शब्दांचे साम्य जातींशी जोडून वेदामध्ये जातीची प्रथा रेखांकित करण्याचा अनावश्यक प्रयत्न केला आहे. या शब्दांना जातिसूचक मानणाऱ्या काही भाष्यकारांनी शुक्ल यजुर्वेदातील तिसाव्या अध्यायाला विभिन्न जातीतील व्यक्तींना बळी चढवणाऱ्या नरमेध यज्ञाचे वर्णन मानतो आहे. तेव्हा संपूर्ण तिसाव्या अध्यायावर विचार करायला हवा ज्यामध्ये एकूण बावीस मंत्र आहेत. पहिल्या मंत्रात ईश्वराला सत्कर्मासाठी प्रेरणा देण्यासाठी प्रार्थना केली आहे. दुसरा प्रसिध्द गायत्री मंत्र आहे, ज्यामध्ये सर्वत्र व्याप्त असणाऱ्या एका परमात्म्याप्रती समर्पण आहे. तिसऱ्या मंत्रात वाईट गोष्टींपासून दूर राहण्याची व सन्मार्गावर चालवण्याची प्रार्थना आहे. चौथ्यापासून बावीसाव्या मंत्रांपर्यंत उत्तम राहणी-करणीसाठी तसेच स्वकल्याणासाठी मनुष्याने काय केले पाहिजे याचे शिक्षण दिले आहे.

यजुर्वेदातील वरील मंत्रामध्ये एकशे चौऱ्याऐंशी प्रकारच्या ज्ञान-विज्ञान व कला कौशल्याचे वर्णन आहे. जर मस्तरामाच्या मतानुसार त्यातील छत्तीस शब्द जातिवाचक आहेत तर शेष एकशे अठ्ठेचाळीस शब्दांचे काय होईल? याच मंत्रांमध्ये आहे की 'योगाय योक्तारम' योगासाठी योग्याला 'प्रियाय प्रिय वादिनम'- प्रेम हेतू प्रिय वक्त्याला, 'सन्धये जारम' सख्यासाठी वृध्द व्यक्तीला, 'क्षेमाय विमोक्तारम' कल्याणासाठी मुक्तिदात्याला, भृत्यै जागरणम उन्नतीसाठी जागरणाला, 'वृध्दयै अपगल्भम' अभ्युदयासाठी गर्वहीनतेला निवडले पाहिजे. या मंत्रामध्ये प्रयुक्त मुक्तिदाता किंवा

योगी ही काही जात नव्हे. वृध्द म्हणजे जात नाही. जागरण, गर्वहीनता इत्यादी गोष्टी म्हणजेही काही जाती नव्हेत.

या मंत्रांमध्ये नरमेध लोक 'ब्रह्मणे ब्राह्मणम् आलभते'चा अर्थ लावतात की ज्ञानासाठी ब्राह्मणाचा बळी चढवला पाहिजे. येथे 'आलभ'चा अर्थ हनन असा करणे उचित नाही. त्याचा अर्थ असा आहे की ज्ञान प्राप्त करण्यासाठी ज्ञानी व्यक्तीजवळ गेले पाहिजे. हा तर वर्णन शैलीचा चमत्कार आहे की जो ब्राह्मण विद्या घेऊ इच्छित आहे त्याने आपले मस्तक कापून ब्राह्मणाचे मस्तक घ्यावे. याचा अर्थ आपल्या डोक्यातील रुढींचा त्याग करून विचारांना आपल्या डोक्यात उतरवणे असा होतो. संत कबीर असेच म्हणतात ''यह तो घर है प्रेम का खाला का घर नाहिं । सीस काटि चरननि घरै, तब पैठे घर माहिं ।'' विद्वजनांना विनंती आहे की या मंत्रांवर अधिक विचार करावा तसेच त्यांचा जातिवाचक किंवा नरमेधवाचक संदर्भ त्यांनी घेऊ नये.

असाच असंगत अर्थ गीतेतील 'धर्माविरुध्दो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।'' (७/११) दिसून येतो त्यांच्या मते याचा अर्थ असा की धर्मानुकूल काम म्हणजेच ऋतुकालात आपल्या पत्नीकडून पुत्र उत्पत्तीच्या हेतूने मैथुन करणे धर्म आहे- ''ऋतौ च मैथुनं धर्म्यं पुत्रोत्पति निमित्तत: ।'' ते म्हणतात की अशीच आज्ञा तैत्तरीय उपनिषदातील शीक्षावल्लीच्या नवव्या किंवा अकराव्या अनुवाक्मध्ये आहे. म्हणून असे न करणे पाप आहे. शांकर भाष्यकारानुसार प्राण्यांची जी कामना शास्त्राच्या अविरुध्द आहे उदा. देह धारण करण्यासाठी आवश्यक खाणे पिणे, विषयभोग करणे अशी ईश्वराची आज्ञा आहे. गीतेमध्ये आहे धर्म अविरुध्द, तर यांनी करून टाकले शास्त्र अविरुध्द. देह धारणासाठी आवश्यक असे खाणेपिणे विषय भोग हे आपल्या मनाशी त्यांनी जोडून दिले. तर मग जे गरीब लोक देह धारणेसाठी भोजन किंवा वस्त्रही मिळवू शकत नाहीत त्या सर्वांना भगवंताची विभूती मानायचे का? कदाचित म्हणूनच भगवंताला दीनबंधू किंवा दरिद्री नारायण असे म्हटले जात असावे.

जर गीतेचा वरीलप्रमाणे अर्थ घेतला तर केवढा अनर्थ होईल? याचा अगदी सरळ अर्थ आहे की परम धर्म परमात्मा ! त्याच्या अविरुध्द अर्थातच अनुकूल कामना म्हणजेच परमात्म्याच्या प्राप्तीची कामना होणे म्हणजे सुध्दा भगवंताचीच देणगी होय.

इच्छा सर्व वाईट आहेत फक्त एक इच्छा सोडून ! आणि ती इच्छा आहे परमात्म्याला प्राप्त करण्याची इच्छा! भगवंत गीतेमध्ये म्हणतात की 'माम् इच्छातुं धनंजय ।'' माझ्या प्राप्तीची इच्छा कर.

याच प्रकरणी कर्माची मनोरंजक व्याख्या गीतेवरील तथाकथित शांकर भाष्यात पाहा. अध्याय ३/४ ते म्हणतात ''ऋत्विग्यजमानयो : च व्यापार: कर्म'' ऋत्विक आणि यजमानाच्या व्यापाराचे (क्रियांचे) नाव कर्म आहे. या कर्मांतून यज्ञाची उत्पत्ती होते. अध्याय ४/१२ मध्ये लिहितात की वर्ण आणि आश्रम म्हणजे कर्म होय- मानुषे लोके वर्णाश्रमादि कर्माधिकारं पण गीतेमध्ये आश्रम व्यवस्था असा शब्दच आला नाही. अध्याय ८/३ मध्ये भाष्यकार महोदय लिहितात- देवतोद्देशेन चरु पुरोडाशादि: द्रव्यस्य परित्याग: स एष विसर्ग लक्षणो यज्ञ: कर्म संज्ञित एतस्माद् हि बीजभूताय वृष्ट्यादि क्रमेण स्थावर जंगमानि भूतानि उभ्दवन्ति । म्हणजे देवतांच्या उद्देश्याने चरू, पुरोडाश आदि हवन करून योग्य वस्तूंचा त्यागरूपी यज्ञाला कर्म असे म्हटले जाते. ज्यांपासून वृष्टि आदिच्या क्रमाने समस्त प्राणी उत्पन्न होतात. यावरून स्पष्ट होते की या भाष्यकार महोदयांनी ज्याला कर्म आणि यज्ञ असे म्हटले ते गीतेमध्ये कुठेच नाही.

भाष्यकाराचे मनोगत तैत्तरीय उपनिषदाच्या शिक्षावल्लीतील अकराव्या अनुवाकामध्ये समोर आली आहे. तेथे सांगितले आहे.- ''ये के चास्मच्छ्रेयांसो ब्राह्मण तेषां त्वयासनेन प्रश्वासेतव्यम'' म्हणजे आमच्या मधील श्रेयमार्गी ब्राह्मणांचा तुला आसनादिंनी सत्कार केला पाहिजे. त्यांचे शांकरभाष्य पाहा- ''ये के च विशेषता आचार्यत्वादि धर्मेरस्यदस्मत: श्रेयास: प्रशस्यतरास्ते च ब्राह्मणा, न क्षत्रियादय: तेषामासनेनासन दानादिना त्वचा प्रश्वसितव्यम्'' म्हणजे आचार्य तसेच धर्मामुळे जे आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत व ब्राह्मणही आहेत-म्हणजे क्षत्रियादि नव्हेत-त्यांचा आसनादि द्वारा सत्कार केला पाहिजे.

पूज्य आदि शंकराचार्यांच्या नावावर प्रचलित अशा या भाष्यांना पाहूनच स्वामी विवेकानंदानी त्यांच्याबद्दल म्हटले आहे ''शंकराचार्यांची बुध्दी क्षुरधारप्रमाणे तीव्र होती. ते पंडित होते व विचारकही होते. परंतु त्यांच्यात औदार्य नव्हते आणि असे वाटते की त्यांचे हृदयपण त्याच प्रकारचे होते. त्याशिवाय ब्राह्मणत्वाचा त्यांना फार अभिमान होता. एका दक्षिणी पुरोहिताप्रमाणेच ते ब्राह्मण होते, दुसरे काय? आपल्या वेदान्त

भाष्यात त्यांनी म्हटले आहे की ब्राह्मणांशिवाय अन्य जातीतील लोकांना ब्रह्मज्ञान होऊ शकत नाही. त्यांच्या विचाराची काय प्रशंसा करू? विदूराचा उल्लेख करून ते (शंकराचार्य) पुढे म्हणतात की पूर्वजन्मात ते शरीराने ब्राह्मण असल्याने ते ब्रह्मज्ञानी झाले होते. छान! म्हणजे सांप्रत एखाद्या शूद्राला ब्रह्मज्ञान प्राप्त झाले तर शंकराचार्यांच्या मतानुसार म्हणावे लागेल की पूर्वजन्मात तो नक्की ब्राह्मण असावा. ब्राह्मणत्वाची एवढी ओढाताण करण्याची काय आवश्यकता? शिवाय त्यांचे हृदय पाहा, शास्त्रार्थामध्ये अनेक बौध्द श्रमणानां पराजित करून त्यांना आगीत ढकलून त्यांनी मारून टाकले आहे. तेव्हा शंकराचार्यांचे कार्य म्हणजे त्यांच्या अभिमानातून निघालेला वेडाचार आहे. या व्यतिरिक्त त्याला दुसरे काय म्हणावे?'' (विवेकानंद साहित्य, खंड ६ पृष्ठ (१-८२)

वास्तविक वेद तसेच महापुरुषांच्या नावावर प्रचलित असणाऱ्या भाष्यांमध्ये अनेक प्रक्षिप्त अंश आहेत. तेव्हा त्या आदरणीय पूर्वजांवर शिंतोडे उडवण्याऐवजी त्यांच्या शिकवणीतल्या उपदेशाचे सार घेऊन आपली आणि समाजाची उन्नती करत पुढे जाणे हे जास्त श्रेयस्कर आहे. जो समाज आत्मचिंतन सोडून ग्रंथांना चिकटून राहतो त्या समाजावर मुडदे शासन करतात. तो समाज जीवंत राहू शकत नाही. सुविध लोकांना नम्र विनंती आहे की, वेदाच्या नावावर आतंक माजवून घृणित स्वार्थ-साधन बंद करावे.

प्रथम सनातनाच्या नावावर स्पृश्यअस्पृश्य धर्म मानला जात होता. कोणाला स्पर्श केल्याने, त्याच्या हातचा एक घास भात खाण्याने किंवा पाणी पिण्यानेही धर्म नष्ट होत होता. तर कधी देववाणी संस्कृत सोडून ग्रामीण भाषेत शास्त्र रचणे अधर्म होते. कधी समुद्र ओलांडून प्रवास करणे अधर्म समजले जाई. त्यासाठी कित्येकांना धर्मापासून बहिष्कृत करण्यात आले. आज तर मोठमोठे धर्माचार्य आजारी पडल्यानंतर आता दुसऱ्याचे रक्त चढवून घेत असतात. आज सर्व एकमेकांना शिवतात, सर्वांबरोबर खातात, पण आता त्यांचा धर्म बहिष्कृत होत नाही.

देऊन घेऊन धर्माच्या नावावर आता उरली आहे एक गाय. तिची धार्मिकता ते सिध्द करू न शकल्याने मस्तरामने स्वामी दयानंदांकडे बोट दाखवले आहे आणि १८५७ चे उदाहरण देऊन ते म्हणतात की त्यावेळची क्रांती गाईच्या चरबीमुळेच झाली होती. तसेच शिखांचे कुका आंदोलनपण गाईच्या सुरक्षेसाठीच झाले होते. सन सत्तावनच्या स्वातंत्र्य संग्रामासाठी डुकराच्या चरबीचापण प्रयोग झाला होता तर मग डुक्कर देखील

धर्म बनला का? किती चुकीची समजूत आहे की हिंदूसाठी शूकावतार परमेश्वर आहे व मुसलमानांसाठी ते पाप चिन्ह आहे ! धर्माचा उपयोग राजनैतिक झाला की असेच घडते. त्यामुळे कधी भाकरीसाठी क्रान्ती झाली तर कधी टॅक्स देण्या न देण्याच्या प्रश्नावर आंदोलन झाले आहे. याच्याशी खरोखर धर्माचा काय संबंध ! गाय ही धर्म आहे हे सांगण्यासाठी किंवा शाबित करण्यासाठी मस्तराम यांनी शिखांचा हवाला दिला आहे; पण ज्या आदर्शावर शिख धर्म टिकून आहे म्हणजे ईश्वर एक आहे, मूर्तिपूजा करणे निरर्थक, वर्ण व्यवस्था न मानणे इत्यादींकडे मात्र त्यांनी डोळे झाक केली आहे. गुरू नानकांचा मुख्य शिष्य मर्दाना मुसलमान होता परंतु मस्तराम या आदर्शाचे अनुकरण करू शकत नाहीत.

कुका आंदोलनाचा नेता रामसिंह याचा जन्म सन १८२४ मध्ये लुधियाना जिल्ह्यातील भैणी नगर येथे झाला होता. तरूण असताना महाराजा रणजित सिंह यांच्या सेनेत तो होता. त्याच्या अनुयायांना कुका म्हटले जात असे. कुका म्हणजे कूक करणारा. या पंथाचे लोक पूजेच्या वेळी डोके हालवतात व जोराने ओरडतात. शेवटी 'सत श्री अकाल' असे म्हणून भावावेशमध्ये येतात. प्रारंभी हा पंथ पुरोहितांचे कर्मकांड आणि सामाजिक कुरुढींना विरोध करण्यासाठी बनला. रामहिंसाने पंजाब प्रांताची २२ जिल्ह्यात विभागणी करून आपल्याकडून अध्यक्ष बनवले. तसेच, इंग्रजी शाळा, रेल्वे, तार, टपाल आणि कोर्टांवर बहिष्कार घालून आपली स्वत:ची व्यवस्था सुरू केली. त्याचे अनुयायी खादीचे कपडे घालीत असत. ते गोवधाच्या विरुध्द होते. त्याच्या अनुयायांकडून कसायांची हत्या झाल्यानंतर गुरू रामसिंहाला रंगून (काळे पाणी) येथे पाठवण्यात आले. १८८५ मध्ये तेथे त्याला मृत्यू आला. या संपूर्ण प्रकरणातून गाय हा सनातन धर्म आहे असा निष्कर्ष काढणे कितपत उचित आहे?

याच प्रकारे स्वामी दयानंद यांचे स्मरण केल्याबद्दल मस्तरामजी साधुवादास पात्र आहेत; परंतु दयानंदजींनी देखील 'गो करुणानिधि' नावाच्या पुस्तकात गो-हत्तेच्या विरुध्दच लिहिले आहे. गाईची धार्मिकता किंवा तिचे शेपूट पकडून वैतरणी पार करण्याच्या ढोंगाचे समर्थन दयानंदांच्या कोणत्याही पुस्तकात नाही. आश्रमाच्या पुस्तकातपण गाईची उपयुक्तता व गोवंश संवर्धनावर भर दिला आहे. तेव्हा आम्ही गाईच्या विरोधी आहोत असा दुष्ट प्रचार कशासाठी ?

गाय हाच धर्म शोधता शोधता बाबाजी, दयानंदजींच्या 'गो करुणानिधी'पर्यंत पोहचले. परंतु आश्चर्य आहे की दयानंदजींच्या 'सत्यार्थ प्रकाश' या पुस्तकातील ''शंकराचार्यांची हत्या केली गेली होती'' हे प्रकरण त्यांना का दिसू शकले नाही? बाबाजींचे शब्द पाहा, ते म्हणतात ''शंकराचार्यांची हत्त्या केली गेली ही गोष्ट केवळ अडगडानन्दांनाच माहीत आहे, बाकी दुसरे कोणी जाणत नाही. अहो कसे जाणणार? ईश्वराने त्यांनाच ट्रंकॉलद्वारा ही गोष्ट सांगितली होती. त्यामुळे ही गोष्ट त्यांच्याशिवाय कोणालाच माहीत नाही. कोणी अर्ध-विक्षिप्त व्यक्तीच असे लिहिणार''

आता 'सत्यार्थ प्रकाश' मधील एकादश समुल्लासातील शंकराचार्यजींच्या हत्तेसंबंधी स्वामी दयानंदजींचे विचार पाहा- ''जैन लोकांच्या जेवढ्या तुटलेल्या मूर्ती निघाल्या त्या शंकराचार्यांच्या वेळेसच तुटलेल्या होत्या. शंकराचार्यांनी आणि सुधन्या राजाने जैनांची मंदिरे तोडली नाहीत कारण त्यांना तेथे त्यांच्या पाठशाळा चालू करायच्या होत्या. पण त्यांना दोन जैन असे भेटले की वरून ते वेदमतवादी वाटत होते; पण आतून ते कट्टर जैनवादी म्हणजे कपटमुनी होते. त्यांच्यावर शंकराचार्य फार प्रसन्न होते. त्या दोघांनी संधी मिळताच शंकराचार्यांना असा एक विषारी पदार्थ खायला घातला की त्यामुळे त्यांची भूक मंद झाली, शरीरावर सर्व फोड उठले आणि सहा महिने शरीर आतून झिजत राहिले. याला विष देऊन मारून टाकले असे म्हणायचे नाही तर काय सद्गती दिली असे म्हणायचे? सद्गती देण्याच्या प्रयत्नात आजकाल ब्रह्मरंध्राला हातोडी मारून फोडण्याची प्रथापण निघाली आहे. हे कोणत्या शास्त्रात लिहिले आहे? 'ऊसर मरन विदेश ताहू पर कुछ' कधी काशीमध्ये करवतीने चिरून घेणे मोक्षदायक समजले जाते, तर कधी प्रयागमध्ये वटवृक्षावरून उडी मारून प्राण देणे मोक्षदायक मानले जाते. त्या वटवृक्षाला इंग्रजांनी कापले तर धर्माच्या नावावर आंदोलन उभारले गेले. त्या महान संतांशी तुलना करा की ज्यांनी या अवडंबरांना फटकारले आहे- 'जो काशी तन तजै कबीरा रामहि कौन निहोरा ।' आदि शंकराचार्यांचाही एक असाच श्लोक आहे-

**सम्पूर्ण जगदेव नन्दनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमा ।**
**गांगंवारि समस्तवारिनिवहा: पुण्या: समस्ता: क्रिया: ।**
**वाच: प्राकृत संस्कृता: श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी**
**सर्वावस्थितिरस्य वस्तुविषया दृष्टे परब्रह्मणि**

याचा आशय असा आहे की, ज्याने त्या परब्रह्माचा साक्षात्कार केला आहे त्याच्यासाठी हे संपूर्ण जगच नंदनवन आहे. समस्त वृक्ष कल्पवृक्ष आहेत, त्याची वाणी मग ती प्राकृत असो की संस्कृत असो ती वेदाची सारभूत आहे, त्याला समस्त भूमण्डल काशीक्षेत्र आहे, संपूर्ण जल गंगाजल आहे. त्याच्या सर्व हालचाली परमार्थमयी आहेत.

आश्रमाच्या पुस्तकात होते की परमात्मा एकच आहे. आणि म्हणूनच गीतेला पंचदेवोपासना संमत नाही. यावर आचार्य श्री म्हणतात की पंचदेव स्तोत्र शंकराचार्यांनी बनवले आहे व ते खूप प्रसिध्दही आहे. ''शंकराचार्यांनी दहा देवांचे स्तोत्र बनवले असते तर काय दहा देव झाले असते?'' बाबा वाक्यं प्रमाणं' असे सांगून किती लोकांना ते पटवणार? बृहदारण्यक उपनिषदातील तिसऱ्या अध्यायात, नवम ब्राह्मणमध्ये याज्ञवल्क्य आणि शकल्य यांचा संवाद देवतांच्या संख्येबाबतच आहे. त्यात एक देवता, दीड देवता, दोन देवता, तीन देवता, सहा देवता, तेहत्तीस देवता आणि तीन हजार सहा देवता इतक्या मोजल्या आहेत. सर्व देवता मनामध्ये असल्याचे सांगितले आहे; परंतु पंचदेवाचे वर्णन तेथेही नाही. पंचदेवोपासना म्हणजे भूतकाळात धर्माच्या नावावर विखुरलेल्या लोकांना संगठित करण्याचा एक सत्प्रयास होता.

बाबा मस्तराम यांनी लिहिले आहे- 'सनातन धर्म हा स्वाभाविक धर्म आहे तेव्हा अन्य मते मान्य करणे म्हणजे निव्वळ विकृती होय' याऐवजी त्यांनी असे लिहावयास हवे होते की, धर्म स्वाभाविक आहे आणि मानवमात्रासाठी तो एक आहे. कसला आमचा? कसला तुमचा? कसला त्यांचा? धर्म या शब्दाबरोबर सनातन हा शब्द जोडून त्याला संप्रदाय बनवणे ही सुध्दा शंकराचार्यांचीच समाजाला मिळालेली भेट आहे.

पुन्हा त्यांनी लिहिले आहे की ''अनार्यजुष्ट, अमर्यादित, अशास्त्रीय वर्णाश्रम विरोधी आचार विचार असल्याने गडबड संप्रदाय देखील एक विकार आहे.'' विद्वजनांना समजले असेल की, बाबाजींनी गीतेतून हे विशेषण घेतले; परंतु त्याचा उचित प्रयोग मात्र ते करू शकले नाहीत. गीतेमध्ये लिहिले आहे की, अर्जुन लढू इच्छित नव्हता. कारण त्याचा असा तर्क होता की या युध्दाने कुलक्षय होईल, कुळातील स्त्रिया भ्रष्ट होतील, वर्णसंकर उत्पन्न होईल, पिंडोदक क्रिया लुप्त होईल. हा प्रश्न एकट्या अर्जुनाचा नाही. तो संपूर्ण समाजाचा आहे. अधिकांश लोकांप्रमाणे अर्जुन देखील धर्माच्या नावावर काही ना काही मानत होता व त्यासाठी काही गोष्टी करतही होता. एवढेच नव्हे तर

धर्माचे रक्षण करण्यासाठी तो आपले प्राण द्यायलाही तयार होता; परंतु भगवंतांनी अर्जुनाच्या या विचाराला कश्मल म्हणजेच घाणेरडा, पापपूर्ण व 'अज्ञान' म्हटले आहे-

**कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।**
**अनार्यजुष्टम स्वर्ग्यम कीर्तिकरमर्जुन ॥ (२/२)**

अर्जुनाने म्हटले होते की- 'सनातन जाती धर्म, 'सनातन कुल धर्म', 'पिण्डा-पाणी धर्म' पण भगवंतानी या सर्व गोष्टींना अनार्यजुष्टम असे म्हटले आहे. गीतेमध्ये आश्रम धर्म कोठे सांगितलेलाच नाही. जातिधर्माला त्यांनी अनार्यजुष्टम असे म्हटले आहे आणि तुम्ही जात-पात, उच्च-नीच, शिवाशिव, मंदिर-मशीद, यांमध्ये घुसणे न घुसणे हे कोणत्या गीतेच्या आधारे सिध्द करीत आहात? गीतेसारख्या उदार ग्रंथात या संकीर्णतेला काही स्थान नाही. गीतेमध्ये अर्जुनाचे एकमात्र लक्ष्य आहे- श्रेयाची प्राप्ती !

आश्रमातील पुस्तकातून अर्धवट व ओढूनताणून उध्दरण देऊन पूज्यश्रीनी त्यांचा हृदयपक्षदेखील आमच्या सर्वांबरोबर नाही असे म्हणण्याची येथे संधी दिली आहे. आश्रमातील पुस्तकात आम्ही म्हटले आहे की केवळ पोथी हे प्रमाण नाही. तर बाबाजींनी 'केवळ' शब्द बुध्दिपुरस्कर सोडून दिला व घोषित केले की आम्ही पोथी प्रमाण मानीत नाही. गाईवरच्या आमच्या पुस्तकात असे लिहिले आहे की तुलसी मानसमध्ये गाय किंवा त्याचा पर्याय किती वेळा उदाहरणाच्या रूपात आहे, किती वेळा हा शब्द इंद्रिय या अर्थाने प्रयुक्त झाला आहे; परंतु नास्तिकतेवरील त्यांच्या पुस्तकात ते म्हणतात की गाय या शब्दाचा अर्थ आम्ही इंद्रिय असाच करतो.

याच प्रकारे वेदातील कर्मकांड आणि ज्ञानकांडाबद्दल काही आचार्यांच्या दृष्टिकोनांबद्दलची चर्चा आश्रमाच्या पुस्तकात केली आहे. परंतु महात्माजींनी भ्रमवश होऊन त्या मतांना ही आश्रमाची मते आहेत असे समजून अनेक पाने भरून त्या मतांचे खंडन केले आहे. नास्तिकतेवरच्या पुस्तकात महात्माजींनी 'व्यवसायात्मिका बुध्दी'' या श्लोकावर दुसऱ्यांचे विचार आमचे विचार म्हणून त्यांनी दडपून सांगितले आहे. आणि आस्तिकतेवरील पुस्तकात महात्माजींना त्यांची ही चूक दाखवून दिली तरी देखील 'नहला-दहला' यामध्ये त्यांनी ती पुन्हा आमचीच मते आहेत असे सांगितले आहे.

महात्माजी संपूर्ण स्वतंत्र आहेत, समर्थ आहेत त्यामुळे आपणच लिहिलेली गोष्ट ते नाकारतात. ते म्हणतात की त्यांनी व्याकरण ज्ञानावर कोठेही भर दिला नाही, वेदावरच

लिहिले आहे. तथापि त्यांच्या या कथनात विरोधाभास आहे. कारण व्याकरणाशिवाय ज्ञानाचे अध्ययन कसे होणार? तरीही त्यांनी नास्तिकतेवरील ज्ञानाचे अध्ययन कसे होणार? या आपल्या पुस्तकातील पृष्ठ ट, पृष्ठ चार इत्यादींचे पुनरावलोकन केले पाहिजे जेथे त्यांनी व्याकरण, ज्योतिष इत्यादी षडंगसहित वेद वाचण्यास सांगितले आहेत. असेच त्यांनी वैदिक यज्ञाबद्दलपण म्हटले आहे की ते आवश्यक नाहीत. पृष्ठ १२-१३ वर त्यांनी लिहिले आहे की ज्योतिष्टोम वाजपेय राजसूय यज्ञ सांप्रत कालात होत नाही, होऊ ही शकत नाही आणि तो अनिवार्य ही नाही.

या महात्माजींनी कुठे कुठे सुधारण्यासाठी काही गोष्टी सांगितल्या आहेत, पण त्या गोष्टी म्हणजे आश्रमीय विचारांचाच अनुवाद आहे. उदाहरणासाठी पूज्यश्रींना दु:ख होते की भगवंतानी महाराजश्रींना श्रौत आणि स्मार्त यामधील फरक का नाही सांगितला? करुणेने द्रवीभूत होऊन महात्माजींनी फरक सांगितला स्वत: आणि परत: प्रमाण होते. परंतु आस्तिकतेवरील पुस्तकात पृष्ठ १६ वर हे आधीच लिहून ठेवलेले आहे की- ''प्रत्यक्ष वेदमूलो दर्शपौर्णमासादि श्रौत: । अनुमित शाखामूल: शौचमाचनादि स्मार्त:'' बाबाजींनी या व्यतिरिक्त दुसरे काय सांगितले आहे? महाराजश्रींनी संस्कृतातील उध्दरण दिले आणि आपण त्याचा फक्त हिंदी अनुवाद केला. हा भाषेतील शैलीगत भेद आहे, भावगत नाही. पद्म पुराणातील उत्तर खंडात यालाच दुसऱ्या शब्दात म्हटले आहे की वेद आणि ब्राह्मण ग्रंथांत सांगितलेल्या पूजेला श्रौत म्हटले जाते व वशिष्ठी पध्दतीने केल्या जाणाऱ्या पूजेला स्मार्त असे म्हटले जाते. तर पांचरात्रमध्ये सांगितलेल्या विधानास आगम म्हटले जाते. आता याला काय म्हणाल? जर लिहिलेल्या गोष्टींमध्ये तुम्ही इतका गोंधळ करता, निराधार आरोप लादू शकता मग तोंडी-मौखिक गोष्टींचा तर ईश्वरच मालक आहे !

शेवटी यज्ञासंबंधींच्या प्रकरणावर विचार व्यक्त करायला हवेत. 'नहला-दहला' या आपल्या पुस्तकात आचार्यांनी लिहिले आहे की वैदिक यज्ञ सांप्रत होत नाहीत व होऊही शकत नाहीत. लाखो रुपयांची दक्षिणा सांगणारे हे यज्ञ भारतासारख्या गरीब देशासाठी नाहीच आहेत, की जिथले सोने विदेश जात आहे. कोणत्याही शास्त्रात ते यज्ञ अनिवार्य असल्याचे सांगितलेले नाही. पंचयज्ञ अनिवार्य आहे ज्यावर कोणी आक्षेप घेऊ शकत नाही. इत्यादी... (पृष्ठ १२-१३)

या वाक्याच्या समीक्षेपूर्वी मस्तराम बाबांच्या नास्तिकतेवरच्या पुस्तकाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. कारण त्यातील पृष्ठ १४ वर त्यांनी स्वत: श्रौत यज्ञ,

स्मार्त यज्ञ, गीतेतील चौदा प्रकारचे यज्ञ, अग्निहोत्र दर्श, पौर्णमास तसेच लक्षाहुत यज्ञ करणे म्हणजे धर्म होय असे म्हटले आहे. आश्रमातील पुस्तकात वैदिक यज्ञांना जटिल विधींनी युक्त असणारे असे म्हटले आहे; तर त्यांनी लिहिले आहे की वैदिक यज्ञांची आवश्यकता नाही. एकीकडे म्हणतात की वेद जाणणे आवश्यक आहे, येथे म्हणतात की यज्ञवाला भाग आवश्यक नाही. लाखो रुपये दक्षिणा दिल्याशिवाय वैदिक यज्ञ होतच नाही. काय ही भ्रान्ती आहे ! आता विचार करायला लागेल की यज्ञ करणे आवश्यक आहे की नाही? वैदिक यज्ञ काय फक्त सत्ययुगासाठीच होते?

आचार्यश्रींचे हे म्हणणे जर मान्य केले तर ज्यात यज्ञ करणे आवश्यक म्हटले आहे त्या मंत्रांचे काय? वेद यज्ञ करण्याची आज्ञा देतो. यावज्जीव अग्निहोत्र, यावज्जीवं दर्श पौर्णमासाभ्याम यजेत वशिष्ठ धर्मसूत्र उपनिषदात म्हटले आहे की तीन वैदिक अग्नी (आवहनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नी) प्रज्वलीत करणे व त्यात दर्श, पूर्णमास, अग्रयण इष्टि, चातुर्मास्य, पशू तसेच सोम यज्ञ करणे अनिवार्य आहे. या तीन अग्नीना त्रेतापण म्हणतात. या व्यतिरिक्त भोजन बनवले जाणाऱ्या अग्नीला लौकिक अग्नी व सभ्य लोकांकडे गारवा दूर करणाऱ्या अग्नीला साभ्य अग्नी असे म्हणतात. ज्याच्या घरी हे पंचाग्नी असतात त्याला पंक्तिपावन ब्राह्मण म्हटले जाते. काय ही भ्रान्ती !

या कर्मकांडांहून भिन्न अशा यज्ञाचे स्वरूप वेदात तसेच गीतेमध्ये सांगितलेले आहे. त्यात हेही लिहिले आहे की जो यज्ञ करीत नाही त्यासाठी मनुष्य शरीर, लोक-परलोक काहीही नाही. आणि मस्तराम बाबा लिहितात की यज्ञ अनिवार्य नाही. पण गीतेमध्ये लिहिले आहे की यज्ञ, दान आणि तप यांचा कोणत्याही अवस्थेत त्याग करू नये. आता हे खरे, की गीतेतील यज्ञ स्वाहा म्हणणारा यज्ञ नाही, परंतु मन आणि इंद्रियांनी होणारा हा यज्ञ आहे. एकांत ठिकाणी शांततेने बसून एकट्याने केला जाणारा यज्ञ आहे. बाह्य वस्तूंची त्याला जरूर पडत नाही. अमीर-गरीब असा त्यात प्रश्नच उद्भवत नाही. हिंदू, मुसलमान, ईसाई, पारसी, यहूदी किंवा इतर कोणीही गीतोक्त यज्ञ करू शकतो व त्या यज्ञात सर्व प्राणिमांत्रांना समान अधिकार आहे.

मस्तरामजींच्या शब्दात आता वैदिक यज्ञ अनिवार्य राहिला नाही. आता अनिवार्य आहे पंच महायज्ञ! वैदिक यज्ञ तर बिचारे यज्ञच राहिले, ते झालेत महायज्ञ ! तर आता यावरही विचार करूया. पहिली गोष्ट म्हणजे पंचयज्ञ हा शब्द वेदांमध्ये नाही. उत्तरकालीन व्यवस्थापकांनी घुसवला आहे. ते म्हणतात की पंचयज्ञ नित्य करण्याची आज्ञा आहे.

परंतु नित्य तर अनेक कर्म केली जातात, जसे- मैत्र कर्म (मल मूत्र त्याग), दत्तधावन, स्नान इत्यादी. तर मग हे काय धर्म झाले का? हे सर्व स्वास्थ्य तसेच स्वच्छतेचे नियम आहेत. याला धर्म म्हणण्याचा लोभ आतातरी सोडून द्या.

ज्या पाचांना महायज्ञ म्हटले जाते त्यांच्या बाबतीत स्मृतिग्रंथात म्हटले आहे की वेदाचे अध्ययन व अध्यापन ब्रह्मयज्ञ आहे. देवतांचे नाव घेऊन 'स्वाहा' शब्द बोलत अग्नीमध्ये हवी घालणे म्हणजे देवयज्ञ होय. आजकाल होम इत्यादींचे कार्य केमिकल अगरबत्तीने देखील चालवले जाते. तर्पण पितृयज्ञ आहे. शिजवलेल्या भोजनातून थोडा अंश काढणे भूतयज्ञ किंवा बळी वैश्वदेव आहे तसेच अतिथी पूजन नृयज्ञ आहे.

सूत्र तसेच स्मृतिग्रंथात पाच यज्ञांच्या अनिवार्यतेचे कारण सांगताना म्हटले आहे की प्रत्येक गृहस्थ १) चूल २) चक्की ३) झाडू ४) उखळ, मूसळ, सूप ५) पाणी ठेवण्यासाठी घडा ठेवण्यासाठी जागेचा उपयोग करीत असतो. या पाचही स्थानी हिंसा होत असते. तेव्हा त्यापासून बचण्यासाठी पाच महायज्ञ केले पाहिजेत. हारीती धर्मसूत्राला श्रध्दापूर्वक ऐकण्याचा प्रयत्न करा. या सूत्राच्या काही अंशाचा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे. ''आता वधस्थानाची व्याख्या करू. याला वधस्थान यासाठी म्हटले जाते की येथे चल-अचल प्राण्यांची हत्या केली जाते. पहिली हत्या ती आहे जी अचानक पाण्यात शिरण्याने, पाण्यात डुबकी घेण्याने, पाण्यात टक्कर झाल्याने कापडाने पाणी न गाळता पिण्याने किंवा गाडी चालवण्याने होत असते. दुसरी हत्या ती आहे जी अंधारात इकडे तिकडे चालण्याने, परिचित-अपरिचित कीडे व इतर कीटक अंगावर चढण्याने होत असते.''... इत्यादी !

यामध्ये सांगायची गरजच नाही की येथे प्रत्येक क्रियेला हत्त्या असे घोषित केले आहे. ही हत्त्या म्हणजे भोळ्याभाळ्या जनतेला आंतकित करून दान घेण्याचे क्षेत्र विस्तृत करण्याची एक योजना मात्र आहे ! यातून हाही अर्थ निघतो की जे लोक या पाच वधस्थानांचा उपयोग करीत नाहीत त्यांच्यासाठी पंचयज्ञ बेकार आहे. जल निगमाच्या नळांसमोर जलघाटाचा प्रयोग शिथिल पडला आहे. नदी, तलावात स्नान करणे, कपडे धुणे ही कामे आता कमी होत चालली आहेत. ऊखळ, मूसळ, चक्की जाते आता किती घरात पहावयास मिळते? पंचयज्ञांच्या मागे जर हीच कारणे असतील तर ती समाप्त झालीत असेच समजावे.

वास्तवात हे पंचयज्ञ वैदिक यज्ञाच्या नावावर कर्मकांडाच्या घुसण्याच्या प्रतिक्रियेमध्ये बनवले गेले आहेत. जटिल क्रिया करू न शकल्याने यज्ञ करण्याचे समाधान प्रत्येकाला मिळावे हाच एक हेतू हे सुरू करण्यामागे होता. या पाच कर्तव्यांमध्ये व्यावसायिक पुरोहित आणि पुष्कळ दक्षिणा देण्याचा प्रश्न नाही, वेदमंत्र म्हणणे न म्हणण्यांच्या अधिकाराचा प्रश्न नाही. ब्राह्मण आणि शूद्राचा प्रश्न नाही. वैदिक यज्ञांची प्रेरणा आहे- स्वर्ग, संपत्ती, पुत्र आदिंची कामना तर पंचयज्ञद्वारा विश्वाबाबत आपल्या कर्तव्याचे पालन करण्याचा प्रयास आहे. अग्नीमध्ये एक समिधा देऊनपण आम्ही परमात्म्याबद्दल आम्हांला वाटणारी श्रध्दा निवेदन करू शकतो, वायुमंडल शुध्द करू शकतो, एक-दोन श्लोक म्हणून प्राचीन ऋषींच्या साहित्याबद्दल व त्यांच्या संस्कृतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करू शकतो, एक ओंजळ पाण्याने पूर्वजांची प्रिय स्मृती जीवंत ठेवू शकतो. भोजनातील एका घासाने अशक्त लोक, पशु-पक्षी, जीव-जंतू यांच्याबद्दल मानवाच्या श्रेष्ठ दायित्वाचा बोध करू शकतो. यासाठीच ऋषींनी सांगितले होते की एकट्याने खाणे पाप आहे, तो जणू पाप खात असतो. त्या युगामध्ये प्रवासाची साधने विकसित झालेली नव्हती. भोजन, वस्त्र घेऊन पायीच प्रवास तेव्हा करावा लागत असे. ही गैरसोय दूर करण्यासाठी तसेच भ्रमंती करणाऱ्या महात्म्यांची व्यवस्था करण्यासाठी ऋषींनी अतिथि सत्कारास पण कोणत्याही कर्मकांडापेक्षा कमी प्रतीचे समजले नाही.

पंच यज्ञ नावाने प्रचलित असणाऱ्या या व्यवस्थेमध्ये इतिहास आहे, कृतज्ञता आहे, सन्मान आहे, प्रिय स्मृती आहे, सहिष्णुता तसेच उदारतापण आहे; परंतु याला रूढी किंवा ढोंग बनवणे म्हणजे धर्म नव्हे. सुविद्य लोकांना अशी विनंती आहे की, संपूर्ण विश्वात मानवमात्रासाठी एकमेव असणाऱ्या, व ज्याच्या निर्धारित क्रियेचे वर्णन श्रीकृष्णाने गीतेत केले आहे त्या धर्म शब्दाला त्याच्या मूळ रूपातच राहू द्या.

जगातील कोणताही मनुष्य (मग तो कोणत्याही धर्माचा असो) विचार करेल तर त्याच्या हे लक्षात येईल की भिन्नभिन्न महापुरुषांनी सत्याच्या ज्या किरणांशी त्याचा परिचय करून दिला होता ती सर्व किरणे एकट्या गीतेत प्रथमपासूनच दैदिप्यमान आहेत. आणि जे सांगायला त्यांच्या महापुरुषांना संधी मिळाली नाही ते सर्व काही गीतेमध्ये पूर्ण व संकलित रूपात सुरक्षित आहे, हे पाहून गीतेबद्दल त्यांच्या मनातील आदर व विश्वास वाढला पाहिजे. गीता म्हणजे त्यांच्या अपूर्ण शोधाला पूर्णतेकडे घेऊन जाणारा अमूल्य निधी आहे. कालभेदामुळे या सर्व धर्मांत तसेच त्यांच्या व्याख्यांमध्ये विकृती आलेल्या असल्या तरी त्या सर्वांचे समाधान आहे- 'यथार्थ गीता !'

जगामध्ये गीतेसारखे दुसरे कोणतेही धर्मशास्त्र नाही की ज्यामध्ये परमात्म्याच्या शोधात तत्पर व्यक्तीसाठी उपयोगी साधनांचे, घ्याव्या लागणाऱ्या सावधानतेचे एकाच ठिकाणी अत्यंत क्रमबध्द असे वर्णन सापडेल. जगात जेवढे धर्मग्रंथ आहेत ते सर्व एकत्र केले तरी गीतेद्वारा निरूपित सत्याचा दूरस्थ प्रतिध्वनी मात्र त्यात दिसून येतो. सत्याला अगदी जवळून पाहावयाचे असेल तर, अगदी व्यवस्थितपणे त्याला जाणायचे असेल तर ते गीतेच्या प्रकाशात पाहा.

गीता तुमची आहे, तुमच्यासाठी आहे. तिची अवहेलना करणे म्हणजे आपली स्वत:चीच अपूर्ण क्षती आहे. गीता म्हणजे धर्माचे परिमार्जित पुस्तक आहे, ते प्राचीन पुस्तक आहे. त्याला ईश्वराचा आवाज आहे. नंतर तोच ईश्वर मूसामध्ये बोलला, इसामध्ये बोलला, महावीर बुध्द-मुहम्मद-नानक आणि कबीरामध्ये बोलला. परंतु गीता म्हणजे परमात्म्याचा पहिला आवाज आहे. तिचा आदर करून तुम्ही ईश्वराच्या पहिल्या आवाजाचा आदर करीत आहात.

गीतेचा संदेश फक्त प्रामाणिक लोकांसाठीच नाही तो दुराचारी लोकांसाठीपण आहे. केवळ इस्राइलांसाठी नाही,परंतु विश्वातील सर्व लोकांसाठी आहे. जगातील अनेक धर्मग्रंथांमध्ये भविष्यवाणी आहे, जादू-टोणे आहेत, सामाजिक व्यवस्था आहे, ईश्वरद्वारे केल्या गेलेल्या उपकाराचे विवरण आहे, चमत्कारांची रेलचेल आहे. या सर्व गोष्टीमुळे आधुनिक विज्ञान प्रश्नचिन्ह ठेवत आहे. परंतु गीतेचे सिध्दान्त नितांत आध्यात्मिक आहेत, निर्विवाद आहेत. काही धर्मग्रंथांमध्ये ईश्वर पदोपदी हजारो स्वर्ग आणि नरकाची चेतावनी देत असल्याचे आढळून येते, तर काही धर्मग्रंथात चांगल्या पिकांचे व उपभोगांचे प्रलोभन दाखवले आहे. परंतु गीतेमध्ये परमात्मा आपल्याला जवळच्या मित्रासारखा भेटतो, परामर्श करतो, आपल्या समीप येतो आणि शेवटी आपल्याला स्वत:सारखे बनवून सोडतो. तेव्हा धर्माच्या बाबतीत या महान ग्रंथातून प्रेरणा घ्यावी व परमात्म्याशी तादात्म्य स्थापित करण्याच्या दिशेने पुढे जावे.

गीतेच्या बाबतीत पूज्यश्री मस्तराम यांचेही काही दुमत नाही. परंतु जगाच्या हितासाठी त्यांनी काही प्रश्न उभे केले. आपण सर्वांनी ते धैर्यपूर्वक वाचले- ऐकले त्यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**बोला गुरुदेव भगवान की जय !**

**कवि पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मेरेद्यः।**
**सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्ण तमसः परस्तात् ।।**

त्या युध्दाबरोबरच जो पुरुष सर्वज्ञ, अनादि, सर्व विश्वाचा नियंता, परमाणूपेक्षाही सूक्ष्म, सर्वांचे म्हणजे स्थूलसूक्ष्म जगाचे भरणपोषण करणाऱ्या, परंतु जो अचिंत्य-अगोचर आहे (जोपर्यंत चित्त व चित्तातील विचार लेशमात्र जरी शिल्लक असेल तोपर्यंत तो अगोचर असतो. जेव्हा चित्ताचा निरोध होतो व चित्ताचा त्याच्यामध्ये विलय होतो तेव्हाच तो प्रकट होतो. तेव्हाच त्याचे स्वरूप विदित होते), नित्य प्रकाशस्वरूप व अज्ञानरूपी अंधकाराच्या पलीकडे असणाऱ्या त्या परमात्म्याचे तो स्मरण करतो- मागे सांगितले की तो माझे चिंतन करतो, येथे सांगतात परमात्म्याचे चिंतन करतो. येथे परमात्म्याचे चिंतन (ध्यान) म्हणजे तत्त्वास्थित महापुरुषाचे ध्यान होय.

**'यथार्थ गीता: श्रीमद्‌भगवद्‌गीता**
(अध्याय ८ श्लोक ९)

# दान

दक्षिणावन्तो अमृतं भजन्ते ।
दक्षिणावन्त: प्रतिरन्त आयु: ।

दानी अमृत प्राप्त करतो
दानी दीर्घायुषी असतो.

ऋग्वेद १-१२५-६

# दान

**प्रगट चारि पद धर्म के कलि महै एक प्रधान ।**

**येन केन विधि दीन्हे, दान करइ कल्याण ।।**

सत्य, तप, दया आणि दान धर्माचे चार चरण आहेत; परंतु साधनेतील प्रवेशासाठी दानच श्रेष्ठ आहे. दान म्हणजे परमात्म्याच्या प्राप्तीचा आरंभ आहे. दान जगाचा त्याग करायला शिकवते. ज्या दिवसापासून तुम्ही अल्पशा दानाला जरी सुरुवात केलीत तरी त्या दिवसापासून तुम्ही या जगाच्या त्यागाची अल्प मात्रेत का होईना पण सुरुवात केली आहे असे समजा. सज्जन किंवा महात्मे लोक हळू हळू सर्व गोष्टींचा त्याग करतात. दानामध्ये गरीब आणि श्रीमंत असा काही प्रश्नच येत नाही. अनेक राजा-महाराजांनी देखील आपल्या वैभवाचा प्रसंगी त्याग केल्याचे दिसून येते. त्यानंतरही शांती प्राप्त झाली नाही तर त्यांनी इंद्रिय संयम केला, त्यांच्या भोगांचा त्याग केला, मनाला संयत केले. ज्या क्षणी मन संपूर्णपणे समर्पित झाले, अचल झाले, स्थिर झाले व विलय पावले तत्क्षणी त्यांना ईश्वरत्वाची प्राप्ती झाली. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे दान होय. व म्हणून दान प्रत्येक अवस्थेत कल्याणकारी आहे. ''**येन केन विधि दीन्हे दान करइ कल्याण ।**''- (रामचरित मानस ७/१०३ ख) कोणत्याही प्रकारचे दान हे नेहमी कल्याणकारी असते.

दान दुसऱ्याच्या कल्याणासाठी दिले जाते. प्रत्येक मनुष्याचे हे कर्तव्य आहे की त्याचा शेजारी कधीही उपाशी झोपता कामा नये. इतिहासामध्ये अशा कथा भरपूर उपलब्ध आहेत की प्राकृतिक प्रकोपामध्ये- जसे अति वृष्टी, अनावृष्टी, भूकंप इत्यादि- संपन्न व्यक्तींनी आपले सर्वस्व देऊन प्राण्यांचे रक्षण केले आहे. या संदर्भात राजा रन्तिदेवाचे उदाहरण प्रसिध्द आहे. त्याने अवर्षणाच्या वेळी अन्न भंडार व राजकीय भंडार प्रजाजनांना समर्पित केल्यानंतर चाळीस दिवसपर्यंत अन्न ग्रहण केले नव्हते. त्याचे असे म्हणणे होते की, प्रजा पुत्राप्रमाणे असते, प्राणाप्रमाणे असते. जर माझी प्रजा भुकेने मरत असेल तर मी अन्न कसे ग्रहण करू? दानी मनुष्य दुसऱ्यांच्या प्राणाला आपल्या प्रमाणे समजतो. आपल्याहून किंचितही भिन्न समजत नाही. हाच खरा दानी होय, तोच दान करू शकतो, सर्व नाहीत.

दानामध्ये देखावा असता कामा नये अन्यथा त्याला त्याचे फळ येथेच मिळते. कारण स्पष्ट आहे की त्याने समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी दान केले होते ती त्याला मिळते. पण हे दान खरे नव्हे. दान हे गोपनीय असले पाहिजे. ती एक गोपनीय क्रिया आहे. श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्या कथेत हाच आदर्श सांगितला आहे. सुदामा कृष्णाचा बालसखा ! त्याने एक दिवस श्रीकृष्णाच्या वाटणीचे चणे चोरून खाल्ले होते. याचा दुष्परिणाम असा घडला की सुदामा वृध्दावस्थेपर्यंत दरिद्री राहिला. सुदामा भक्त होता, तपस्वी होता. भिक्षान्नाने तो आपले उदरभरण करीत असे; परंतु तो स्वाभिमानी होता. एक दिवस त्याच्या पत्नीने अनुनय करून त्याला श्रीकृष्णाकडून सहाय्य मागण्यासाठी त्याच्याकडे पाठवले. हीन दीन दशेमध्ये सुदामा द्वारकेला पोहचला. द्वारपालने सुदामाचा परिचय दिला.

**शीश पगा न झगा तन पै प्रभु जाने को आहि बसै केहि ग्रामा**
**धोती फटी सी लटी दुपटी अरु पाय उपानह की नहि सामा ।**
**द्वार खडो द्विज दुर्बल एक रहयो चकि सो वसुधा अभिराम ।**
**पूछत दीन दयाल को धाम बतावत आपनो नाम सुदामा ।।**

**-नरोत्तमदास**

सुदाम्याचे नाव ऐकताच श्रीकृष्ण उठून उभे राहिले. धावत धावत सुदाम्याकडे गेले. त्याला कडकडून भेटले. सुदाम्याची दशा पाहून दु:खी झाले. त्याला उठवून आपल्या सिंहासनावर बसवले. आपल्या अश्रूंनी त्याचे चरण धुतले त्याला आपल्या महालात ठेवले. आगत-स्वागत केले. शेवटी जाण्याचा दिवस आला. श्रीकृष्णाने त्याला प्रेमाने निरोप दिला, दूरपर्यंत त्याला सोबत केली व पुन्हा उराउरी भेटून सुदाम्याचा निरोप घेतला.

सुदाम्याने पाहिले की श्रीकृष्णाने ना त्याचे कपडे बदलले ना हातातली काठी ! खांद्यावरचे जीर्ण शीर्ण उपरणे देखील तेच राहिले. मनात त्याला पश्चाताप झाला व वाटले की निष्कारण आपण इतक्या लांब आलो ! याच विचारात सुदामा आपल्या गावी पोहचला. घरी आला तर त्याची झोपडी तेथे नव्हती. त्या जागी एक मोठा महाल दिमाखाने उभा होता. सुदामा चक्रावला. इतक्यात दास दासींनी घेरलेली त्याची पत्नी बाहेर आली. सुदाम्याला पाहताच त्याच्या जवळ येऊन म्हणाली की हे सर्व वैभव आपले आहे. झोपडीच्या जागी सुदामपुरी उभी होती. श्रीकृष्णाने सुदाम्याला

आपल्याप्रमाणे सुबत्ता दिली. ज्याप्रमाणे द्वारेकेतील नागरिक संपन्न होते तसेच सुदामपुरीतील लोक देखील संपन्न जीवन जगू लागले. श्रीकृष्णाचे धाम नंतर समुद्रात बुडाले; पण सुदामपुरी मात्र वाचली. त्यांनी सुदाम्याला आपण काही देत आहोत असे सांगितलेसुध्दा नाही. परंतु त्याला आपले सर्वस्व दिले. गोपनीय दानच फलीभूत होते.

भाग्यवान याचकांच्या श्रेणीत भगवान मनूचे देखील नाव आहे. तो चक्रवर्ती नरेश होता. विश्वाचा स्रष्टा होता; परंतु त्याला एक मोठे दु:ख होते. एक त्रुटी त्याला खटकत होती की भक्तीशिवाय जीवन जगावे लागत होते. एक दिवस घर सोडले, नैमिषारण्य गेला, ऋषींना भेटला, साधना क्रम समजून घेतला आणि भजनाला लागला. त्याची अशी श्रध्दा होती की ब्रह्मा, विष्णू व महेश हे ज्यांच्या अंशापासून उत्पन्न होतात असा प्रभू पण भक्ताला वश झालेला असतो. तो आमची इच्छा अवश्य पूर्ण करेल. मनू आपले सर्वस्व देऊन प्रभूची प्रभूता इच्छित होता; त्याचे दर्शन त्याला हवे होते. मनाने प्रभूला समर्पित झाला. चित्ताचा निरोध होऊ लागला. आकाशवाणी झाली की मला महान दानी समजून वर माग. मनूने नम्रतेने केवळ प्रभूलाच मागितले. खरे आहे, अहो, मागायचेच आहे तर त्या प्रभूला मागा. तो महादानी आहे. आणि त्याच्याजवळ भगवंतालाच मागा कारण तो प्रभू आला तर त्याची भगवत्ता, त्याची विभूती, आलोक, ऐश्वर्य सर्व काही आपल्याजवळ येईल. व म्हणून प्रभूदर्शनाशिवाय अन्य कोणतीही क्षूद्र कामना करता कामा नये.

जगामध्ये दान दोन प्रकारचे असते आध्यात्मिक आणि भौतिक ! भौतिक दानाचेही तीन-चार प्रकार आहेत. जसे विद्या दान किंवा भिक्षा दान, स्वास्थ्य दान, अन्नदान- यात वस्त्र तसेच निवासाचा पण समावेश होतो. चौथे श्रमदान किंवा सेवा आहे. भौतिक दानामध्ये सर्वोपरी दान म्हणजे विद्यादान आहे- अन्नेन क्षणिक तृप्ति विद्या यावज्जीवनम् । अन्न क्षणिक तृप्ती देते परंतु विद्या म्हणजे जीवनाच्या अंतापर्यंतची शिदोरी आहे. संत-महात्मे, धनीक व्यक्ती तसेच सरकारद्वारा विद्यालयांची स्थापना केली जाते. जर एखाद्याला शिक्षण दिले तर त्याला सद्बुध्दी, सन्मान, अन्न, वस्त्र सर्व काही प्राप्त होते. जीवनाच्या हेतूला आवश्यक असे सर्व स्त्रोत त्याच्यासाठी मोकळे होतात. विद्याहीन देशाला आदिवासी असे म्हटले जाते, उदा. अफ्रिका. हंसांमध्ये कावळ्यांची जशी स्थिती होते तशीच विद्वानांमध्ये अशिक्षितांची स्थिती होत असते. कावळा केवळ स्वत: घाणेरडा असतो असे नाही तर आपल्या पिल्लांना तो तसेच शिकवतो व तसेच खायला घालतो. तेव्हा श्रेष्ठ सामाजिक संरचनेसाठी विद्या दान सर्वश्रेष्ठ आहे.

**स्वास्थ्य-दान-** उत्तम स्वास्थ्य लौकिक तसेच पारलौकिक प्राप्तीची आधारशिला आहे. दु:खाने विकल होणाऱ्या व्यक्तीला प्रथम निरोगी बनवणे आवश्यक आहे. पीडा दूर करणे म्हणजे खूप मोठे दान आहे. म्हणून अनेक समाजसेवकांनी मानव सेवा म्हणजेच ईश्वर सेवा होय असे समजून पीडित मानवांना तारण्यासाठी दवाखाने उभारले. स्वामी विवेकानंदानी असे एक मिशनच बनवले. मानवामध्ये ईश्वराच्या शोधाची संभावना असल्याने अनेक ऋषींनी आजीवन स्वास्थ्य दान देण्याचे व्रत घेतले. रॉकफेलर फाउन्डेशन सारख्या धर्मार्थ संस्था दानदात्यांच्या सौजन्यामुळे जगभर कार्यरत आहेत, काही रोग प्रतिकारक लशीही या संदर्भात मोफत दिल्या जात असतात. अर्थात कितीही पीडा दूर करण्याचा प्रयत्न केला तरी या शरीराला एक दिवस जायचेच आहे. मरणाच्या दु:खाचे निवारण या स्वास्थ्य दानाने किंवा कोणत्याही भौतिक दानाने संभव नाही. त्यामुळे अन्य भौतिक दानाप्रमाणे स्वास्थ्य दानदेखील एका सीमेपर्यंतच उपयुक्त आहे.

**अन्न दान -** ‘‘अन्न दान अरु रस पीयूजा’’ रामचरित मानसकारांनी अन्नदानाचा महिमा सांगताना म्हटले आहे की अन्न दान हे सामान्य दान नाही परंतु ते जीवन आहे. भुकेने तडफडणाऱ्या आत्म्याला ते तत्काल जीवन प्रदान करते व त्याला मृत्यूच्या जबड्यातून बाहेर काढते. अन्न हे शरीराचे इंधन आहे. त्याच्याशिवाय शरीर तग धरू शकत नाही, त्यामुळे अन्नासारखे दुसरे श्रेष्ठ दान नाही. परंतु हे अन्न कायमचे कोणाच्या प्राणांचे रक्षण करू शकत नाही. आयुष्याची मर्यादा पूर्ण होताच अन्न असूनही लोक मरतातच. अंतकाळी तर विद्या पण उपयोगी पडत नाही. अशा परिस्थितीत याहून श्रेष्ठ दान आहे.

**अभयदान -** ‘‘दानम परम किम त्वभयं सदैव’’- शंकराचार्य. भय प्रकृतीमध्ये आहे परमात्म्यात नाही. परमात्माच अभय आहे. शरणागताचे रक्षण करणे सर्वश्रेष्ठ दान आहे, परंतु प्रकृतीच्या द्वंद्वातून बाहेर काढून परमात्म्यामध्ये प्रवेश देणे हे योग्यांचे दान आहे जेथे मनुष्य पूर्णपणे निर्भय होतो.

**आध्यात्मिक दान** - ही योग्याच्या क्षेत्रातील वस्तू आहे. त्याच्याशिवाय दुसरे कोणीही हे दान देऊ शकत नाही. प्रकृतीच्या आधिपत्याखाली सर्व जीव व्याकूळ होत आहेत. तिचा अधिकार या भूमीवर चालतो. त्या प्रकृतीच्या नियंत्रणातून निघून आत्म्याचे आधिपत्य त्याला देणे याला अध्यात्म असे म्हणतात. ज्या पुरुषाला आत्मा विदित आहे, जो आत्म्याने ओत-प्रोत आहे आणि जो त्याच्यामध्येच स्थित आहे तो महापुरुष

योगी आहे आणि तोच आध्यात्मिक दान देऊ शकतो. भगवान बुध्द, महर्षी नारद इत्यादी या स्तरावरील दाते आहेत. झोपडीपासून अनेक चक्रवर्ती राजकुमारांना नारदजींनी ब्रह्मापर्यंत पोहचवले आहे. प्रचेताचे दहा हजार राजकुमार, दक्ष प्रजापतीची मुले, भक्त प्रल्हाद, भक्त ध्रुव, पार्वती आणि सीता या सर्वांचे गुरू नारद होते. कुंभकर्णासारख्या राक्षसालाही त्यांनी उपदेश केला आणि परमात्म्याकडे त्याला वळवले (रावणाला त्याने सांगितले- ''नारद मोहि ज्ञान जो कहा कहतेउँ तोहि समय निरवहा ।'') प्रत्येक महापुरुषाची हीच भूमिका असते.

सती अनुसूया आश्रमाचे पूज्य श्रीपरमहंसजी महाराज याच स्तरावरील महापुरुष होते. अनेक साधक त्यांना शरण गेले आहेत. महाराजांनी त्यांना जीवनोपयोगी व्यवस्था दिली तसेच त्यांना अनंत जीवनाकडे वळवले. स्वामी सच्चिदानंद महाराज धारकुण्डी यांच्याबद्दल एकदा त्यांनी सांगितले की ज्याला तुम्ही खूप मोठे समजता तो माझ्याकडे जेव्हा आला होता तेव्हा त्याचे आयुष्य आता फक्त सहा महिनेच राहिले असल्याचे भगवंताने मला सांगितले होते. त्याला मी जीवन दिले. त्याला मीच स्थिती दिली. आज तो जो काही आहे ते मी त्याला बनविले आहे.

गुरु महाराज माझ्याकडेही वळले म्हणाले की तुझेही आयुष्य कमी आहे. किंबहुना आता ते संपलेच आहे. त्यावेळी आमचे शरीर पहिलवानाप्रमाणे बलदंड होते त्यामुळे महाराजांचे कूट बोलणे आम्हांला समजले नाही.

महाराजश्रींच्या कृपाछत्राखाली आल्यानंतर अडीच वर्षांनी आम्ही आजारी पडलो शरीरात हाडे फक्त शिल्लक राहिली होती. एक दिवस स्वप्नात एक दृश्य अनुभवास आले. चार-पाच परिचित लोक मला प्रेमाने भेटले आणि घोर जंगलात घेऊन गेले. तेथे एक विशाल शस्त्रगार दिसले त्याचे दार १५-२० फूट रुंद होते. आम्ही सर्व तेथे पोहचताच दार आपोआप उघडले. आत विस्मित करणाऱ्या व झगमगत असणाऱ्या शस्त्रांनी तो कक्ष भरलेला होता. आम्ही सर्व आत शिरताच दार बंद झाले. बरोबर असणाऱ्या प्रत्येकाने तेथील एक-एक शस्त्र उचलले आणि आपआपसात म्हणाले, ''आता काय पाहताय? त्वरित याला मारून टाका''. त्यांची शस्त्रे जशी माझ्या जवळ येऊ लागली तसा आमच्या मनात विचार आला जर यावेळी आम्ही वाचलो असतो तर इतके भजन केले असते की या लोकांच्या तावडीत सापडलो नसतो. आम्ही त्यांना गयावाया करून सांगू लागलो

की, आम्हाला फक्त एक संधी द्या, फक्त एकदा सोडा; परंतु आमच्या सांगण्याचा त्यांच्यावर कसलाच परिणाम झाला नाही. ते पुढे येतच राहिले. जेव्हा ते जवळ आले तसे एकदम ते मागे सरकू लागले. फाटक वेगळे होऊ लागले, दूर जाऊन ते पडले. तेव्हा आम्ही त्यांना म्हणालो की मी इतका वेळ उगाचच तुम्हा लोकांपुढे गयावाया करीत होतो, उगाचच तुम्हाला घाबरत होतो ! अरे कालच महाराजांची छडी मला लागली होती आता तुम्ही लोक मला मारू शकत नाही. सकाळी महाराजांना या स्वप्नाची गोष्ट केली तेव्हा महाराज म्हणाले- बेटा, मोठी आपत्ती टळली. तुझ्याजवळ आयुष्य शिल्लकच नव्हते. आता तू निरंतर भजन कर, आता चुकू नकोस. ''मंत्र महामणि विषय व्याल के मेटल कठिन कुअंक भाल के।'' आपल्या भक्तीच्या प्रभावाने भाग्यातील असाध्य असे वाईट आकडेपण नष्ट होतात. महापुरुष आपल्या इच्छेने त्या वाईट घटना टाळतात. आमची श्रध्दाच त्यांच्याकडून कृपा बनून परत फिरते आणि आम्हाला फलदायी ठरते.

पूज्य महाराजश्री म्हणत असत ''या संसारात सर्वजण दानी तर बनले आहेत. पण खरा दानी मी आहे. मी मोक्ष देतो. सत्पुरुषांसारखे दानी दुसरे कोणीही या जगात नाही.'' महाराजश्रींनी अनेकांना जीवन दिले, साधना दिली आणि अनंत जीवन दिले व शाश्वत स्वरूपाकडे त्यांना नेले, ते सर्व साधक म्हणजे महाराजांच्या कीर्तीचे प्रामाणिक हस्ताक्षर आहे.

योगी प्रदत्त असे हे सर्वोत्कृष्ट दान प्राप्त करण्यासाठी साधकाला एक दान द्यावे लागते व ते आहे मनाचे दान, विचारांचे दान, मन क्रम-वाणीचे समर्पण! जर गुरू म्हणत असतील की हे आंब्याचे झाड आहे. मग भले ते बाभळीचे झाड असले तरी म्हणा की आंब्याचे झाड आहे. तुम्हाला आंब्याचेच फळ मिळेल. तुम्ही आजचा वर्तमान पाहत आहात, पण तो महापुरुष पुढे काय होणार आहे हे पाहत असतो. तो भविष्याची संरचना पाहत असतात व म्हणून गुरु वाणीमध्ये कधीही काही सोय, काही वाढ किंवा घट किंवा कसली शब्दांची खटपट करता कामा नये. अशा प्रकारे समर्पित साधक शीघ्र परमतत्त्व प्राप्त करू शकतो.

या संदर्भात राजश्री जनकाचे कथानक अनुश्रुतीमध्ये आहे. महाराज जनक पूर्वजन्मी कृतीशील योगी होते. योगांचे संस्कार त्यांच्यामध्ये प्रबळ होते. त्यामुळे राजकीय वैभव त्यांना सुखकारक वाटत नव्हते. त्यांनी एक स्वप्न पाहिले. त्यामुळे ते खूप घाबरले.

विद्वानांना बोलवून त्यांनी त्यांना प्रश्न केला की मी जे स्वप्न पाहिले ते सत्य आहे की जे पाहत आहे ते सत्य आहे? सर्वांनी आपापल्या परीने उत्तर दिले; पण महाराज जनकाचे समाधान झाले नाही. तेव्हा राजाने त्या सर्वांना जेलमध्ये बंद करून टाकले. अशी अनेक वर्षे गेली. राजाची व्याकुळता वाढली. विद्वान म्हणून जनकाच्या दरबारात जायला कोणी तयार होईना.

काही दिवसांनी जनकाच्या दरबारात अष्टावक्रजी आले. त्यांना पाहून जनकाचा दरबार हसू लागला. जेव्हा हसणे बंद झाले तेव्हा अष्टावक्रांनी हसायला सुरुवात केली. ते हसतच राहिले. जनक राजाला वाटले हा ऋषी वेडा तर नाही ना? त्यांनी विचारले, ''ऋषिवर, आपण का हसत आहात? अष्टवक्र म्हणाले -''प्रथम तुम्ही लोकच हसत होतात. तेव्हा हसण्याचे कारण काय ते प्रथम तुम्हीच सांगावे. तेव्हा दरबारी लोकांनी सांगितले की, राजाचा प्रश्न सोडवण्यासाठी एका पेक्षा एक विद्वान, रुपवान येथे येऊन गेले. ते जो प्रश्न सोडवू शकले नाहीत तो प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला आलेले पाहून आम्हांला हसू आले. आपले दात मागे गेलेले आहेत, डोळे उलटे आहेत, हात-पाय वाकडे आहेत. अशी ही आपली आकृती पाहून आम्ही सर्वजण हसलो.'' ऋषी म्हणाले ''राजन, मलाही म्हणूनच हसू आले की ही विद्वानांची सभा नाही परंतु चांभाराची सभा आहे. फक्त वरच्या चामड्याची त्यांना पारख आहे. आत्म्याचे दात काय वर असतात का? त्याचे डोळे बाहेर आलेले व पाय मागे आहेत का? शरीर हे राहण्यासाठी असणारे एक घर आहे. त्याचा आश्रय घेऊन आम्हांला आत्म्याचा शोध घ्यायचा आहे.'' दरबारात एकदम शांतता पसरली.

मग राजाने आपला प्रश्न ऐकवला. अष्टावक्र बोलले ''राजन, काही दान दे'' राजा म्हणाला- आपल्याला एक हजार गाई देतो. ऋषी म्हणाले, ''बास, एवढ्याच?'' तेव्हा राजाने दहा हजार सोन्याने शिंगे मढवलेल्या गाई देण्याचा प्रस्ताव ठेवला. ऋषी म्हणाले, यापेक्षाही मोठी अशी तुझी वस्तू दे. तेव्हा राजाने अर्धे राज्य देतो असे सांतिगले. अष्टावक्र संतापले- ''अरे कधी गाई दान द्यायला तयार आहेस तर कधी अर्धे राज्य? अरे हे राज्य तरी तुझे आहे का? तुझ्या पूर्वी येथे कोण राजा होता? तुझ्यानंतर हे राज्य दुसऱ्याचे होईल. मग हे राज्य तुझे कसे काय झाले? अरे, तुझी स्वत:ची वस्तू दे''. तरीही जनकाला काही समजले नाही ते म्हणाले, ''भगवन, मला माझ्या एखाद्या वस्तूची आठवण करून द्या''. यावर ऋषी म्हणाले ''आपले मन मला दान दे.''

जनक राजाने लगेच आपल्या मनाचा संकल्प सोडला. ते महापुरुष एका बाजूला बसले व ध्यानमग्न झाले. महाराजा जनक उभेच राहिले. मनात विचार करू लागले की यांनी तोंडाला येईल ते दान मागितले; परंतु यांनी मला बसायलापण सांगितले नाही व माझ्या प्रश्नाचे उत्तरही दिले नाही. महाराजांना राग आला पण लगेच लक्षात आले की अरे आम्ही मनाचे तर दान दिले होते. मग हा राग कोणाला आला? वाटते की हे मन अजून माझ्याजवळच राहिले आहे. ज्याला ते देऊन टाकले त्या महात्म्याचे मनन त्याने केले पाहिजे. जनक लगेच बसले आणि मुनीचे ध्यान करू लागले. संध्याकाळ होत असताना  राजाला समाधी लागली. त्या अवस्थेत महापुरुषाने जनकाच्या हृदयात सांगितले की स्वप्नामध्ये तू भिकारी बनून दारोदार फिरणे किंवा जागे झाल्यानंतर सिंहासनावर बसणे यापैकी काहीही खरे नाही. सत्य आहे फक्त परमात्मा! तो मिळवण्याचा प्रयत्न कर व प्राप्त करून घे. या प्रकारे सद्‌गुरुला अंत:करण समर्पण करणे हे साधकाचे खरे दान आहे.

दानवीरांच्या यादीत महर्षी दधिचींचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. असे म्हटले जाते की देवांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी आपल्या शरीरातील हाडांचे दान दिले होते. महर्षींची संपूर्ण कथा म्हणजे एक अध्यात्मक रूपक आहे. दधिची म्हणजे एक असे महापुरुष होते ज्यांची वृत्ती ध्यानात अचल स्थिर झालेली होती.- 'आस्थिमात्र होइ रहेउ शरीरा ।'' अशा अवस्थेतच आसुरी संपदेचा पूर्ण विनाश तसेच दैवी सम्पदेचे रक्षण केले जाते. आपल्या हाडांचे दान अत्यंत विरळ असा अधिकारी साधकच करू शकतो. तशी याची व्यवस्था सर्व आत असते. त्यामुळे साधक अत्यंत दृढ निश्चयी, व निष्ठावान असला पाहिजे. अशीच कथा राजा हरिश्चद्रांची पण आहे. या समस्त आध्यात्मिक कथांचा एकच आशय आहे की-

**रेग जारो में बगूलों के सिवा कुछ भी नही ।**
**साया ये अब्रे गुरेजाँ से हमे लेना भी क्या ?**

घोर रेगिस्तानात तप्त झालेल्या रेतीच्या उडणाऱ्या चक्रवाताशिवाय दुसरे काहीही नसते. चारी बाजूंनी होरपळणाऱ्या भीषण गर्मीमध्ये चक्रीवादळा बरोबर उडणाऱ्या ढगांची जीव घेणारी सावली काय गारवा देणार? वास्तविक सर्व संसार म्हणजे एक मरुस्थल आहे. त्यात पिता-पुत्र, पति-पत्नी, मित्र तसेच इतर नातेवाईकांची छाया, विद्या-स्वास्थ्य-अन्नादिचं वृहद भंडार, विपुल कोश, सुख देणारी सारी साधने रेतीमय

झंझावातामध्ये फिरणाऱ्या लहान मोठ्या ढगांद्वारे मिळणाऱ्या शीतलतेहून अधिक नाही. कोठे छाया मिळेल या आशेने इकडे तिकडे पाहणारा रेतीच्या ढिगाखाली दबला जातो. ''कल जो बैठा मंच पर आज मसाने दीख ।'' संसार इतका नश्वर आहे तरीही मोह इतका जबरदस्त असतो की लोक एक क्षणपण त्यापासून वेगळे राहू शकत नाहीत. या जगाचे क्षणभंगुरत्व दाखवून सहज स्वरूपाकडे साधकाला नेणे ही खऱ्या दानीची भेट आहे की ज्याला त्या भगवत्तेचा बोध झालेला आहे. रामचरित मानसाच्या उत्तरकांडात आहे-

**सोइ धर्मज्ञ गुणी सोइ ज्ञाता ।**
**सोइ महि मण्डित पण्डित दाता ॥**
**धरम परायन सोइ कुल ताता ।**
**राम चरन जा कर मन राता ॥**

तोच धर्मज्ञ आहे, धर्माचा विशेषज्ञ आहे, तोच गुणी आहे, तोच ज्ञाता म्हणजे सर्व काही जाणणारा आहे. तो पृथ्वीवर सन्यासास पात्र आहे. तोच पंडित आहे आणि तोच दाता आहे- ज्याच्याजवळच देण्यासारखे काही आहे. तोच देऊ शकतो. कोण? ''राम चरन जाकर मन राता'' परमात्म्याच्या चरण कमलांशी ज्याचे मन अनुरक्त आहे असे योगी संतच वास्तविक दान दाता आहे. एकीकडे परमात्मा महादानी तर दुसरीकडे संत दानी. अशा संत सत्पुरुषांच्या सान्निध्याचा लाभ मिळवावा. परंतु जो एका ईश्वराला सोडून अनेक स्थळी श्रध्दाचे विकेन्द्रिकरण करतो तो म्हणजे ईश्वर मार्गात निर्माण झालेला भोवरा आहे- धोंड आहे.

दान म्हणजे गृहस्थाश्रमाची शोभा आहे. अतिथि-सत्कार पण दानाच्या अंतर्गत येतो. एकदा जोधपूरच्या महाराजांचा जबरदस्त एक प्रबळ शत्रू त्यांच्या राज्याच्या सीमेजवळून चालला होता. महाराजांची सूचना मिळताच त्याचा पाठलाग सुरू झाला. रेतीच्या ढीगांतून धावत, तहानेने तडफडत तो एका घरात शिरला व म्हणाला मला फार तहान लागली आहे. माझ्या प्राणांची रक्षा करा. योगायोगाने ते घर महाराजांच्या एका विश्वस्त सरदाराचे होते. सरदाराने शत्रूला ओळखले पण त्याने त्याला पाणी दिले. दूध प्यायला दिले, त्याचे स्वागत केले आणि रस्ता दाखवून त्याला लगेच निरोपपण दिला. थोड्याच वेळात शत्रूला शोधत महाराज तेथे आले. त्यांनी त्या शत्रूबाबत सरदाराला विचारले. पण सरदार बोलला नाही. त्याचे मौन पाहून महाराज म्हणाले- ''अतिथि

समजून तू त्याला जाऊ दिलेस; पण मी त्याला शोधून काढेन.'' राजा जायला निघाला. सरदारानेपण तलवार घेतली व उंटावर स्वार होऊन राजाच्या सहाय्यतेला निघाला कारण शत्रू प्रबळ होता. या प्रकारे दरवाजावर आलेला शत्रूपण अवध्य समजणे, शरणागताला जीवन दान देणे, अतिथ्य सत्कार करणे हेही दानाचे एक प्रमुख अंग आहे.

महाराज हर्षाच्या वेळी चीनचा यात्रेकरू ह्युएनसांग बौध्द धर्माच्या अनुशीलनासाठी भारतात आला. पर्यटन करीत असताना त्याने लोकांना विचारले की येथे भोजनाची काय व्यवस्था आहे व भोजन कुठे मिळेल? ज्याला त्याने विचारले तो म्हणाला, ''भद्र, आपले स्वागत आहे'' असे म्हणून सन्मानाने त्याने त्याला घरी नेले, त्याला जेवायला घातले आणि मग निरोप दिला. अशी नि:शुल्क व्यवस्था त्याला प्रत्येक ठिकाणी मिळाली. भोजन व पाणी सर्वत्र मिळाले, अगदी आदरसहित प्राप्त झाले. गोड बोलणेही मिळाले हेही एक दान आहे. ह्युएनसंगाने आपल्या यात्रा वृतांतात लिहिले आहे की, भारताचे लोक अतिथि सत्कारात एकदुसऱ्याशी स्पर्धा करीत असतात. त्यांचे बोलणे अगदी मधुर आहे, भारत देवभूमी आहे. येथे माणसे राहत नाहीत, तर देवता राहत आहेत. प्रत्येक सद्‌गृहस्थाने या गोष्टीचा सदैव विचार केला पाहिजे व कोणत्याही भिक्षूला किंवा जरूर असणाऱ्याला खायला घालून मगच स्वत: जेवण करण्यात प्रसन्नता अनुभवली पाहिजे.

दानवीरांमध्ये कर्णाचेही नाव येते. त्याच्या दानाच्या तीन कथा प्रसिद्ध आहेत. एकदा त्याने आपल्या महालाचे सर्व दरवाजे तोडून दान देऊन टाकले. दुसऱ्या कथेत त्याने आपली कवच कुंडले दान दिली. आणि तिसऱ्या कथेत मरणासन्न अवस्थेत असतानाही आपले सोन्याचे दात दिले ही कथा आहे. सर्वात प्रथम काष्ठ तोडण्याची कथा पाहू या. श्रीकृष्ण नेहमी अर्जुनसमक्ष कर्णाच्या दानवीरतेची प्रशंसा करीत म्हणत की हे कर्णा, तू धन्य आहेस, तुझे दान धन्य आहे. असे सतत ऐकून ऐकून अर्जुन एक दिवस चिडला व तो म्हणाला ''भगवन, तुम्ही नेहमी कर्णाची प्रशंसा करता. पण युधिष्ठिर कर्णापेक्षा कशा प्रकारे उणे आहेत ते सांगाल का? वास्तविक कर्ण तर धूर्तांना साथ करीत आहे, त्यांच्या इशाऱ्यावर चालत आहे, परंतु युधिष्ठिरामध्ये असा काही दोष नाही. महाराज युधिष्ठिर आपले संपूर्ण राज्य दानात देऊ शकतात. कोणी मागितले तर प्राणपण देऊ शकतात. ते धर्मात्मा आहेत. श्रीकृष्णाने सांगितले की, या प्रश्नाचे उत्तर जेव्हा संधी मिळेल तेव्हा अवश्य देईन. असे म्हणून ती चर्चा त्यांनी तेथेच थांबवली.

काही दिवसांनी श्रीकृष्णांनी पाहिले की, अर्जुन ही गोष्ट आता विसरून गेला आहे. तेव्हा त्यांनी एक योजना घडवली. पावसाचे दिवस होते. सारखा पाऊस सुरू होता. श्रीकृष्णाने नगरातील सर्व व्यापारांना गुप्तपणे एक सूचना दिली की त्यांनी आपली चंदनाची लाकडे बाहेर पावसात ठेवावीत. महालातील चंदनपण असेच बाहेर ठेवले. आणि मग अर्जुनाकडे जाऊन त्यांनी सांगितले की वेश बदलून थोडे फिरून येऊ. अर्जुन आनंदाने या गोष्टीला तयार झाला. दोघांनी साधूचा वेश घेतला व भिक्षाटनास बाहेर पडले.

सर्वप्रथम ते दोघे राजा युधिष्ठिराच्या महालात गेले ''नारायण हरी'' असे म्हणून उभे राहिले. युधिष्ठिराने त्यांना साधू समजून विचारले, ''भगवन, काय आदेश आहे?'' विप्र बोलले ''भिक्षा !'' युधिष्ठिर म्हणाले ''प्रभू, सर्व काही तयार आहे. या, आसन ग्रहण करा.'' यावर दोन्ही साधू म्हणाले- ''राजन, आम्ही स्वयं पाकी आहोत. आम्ही स्वत:च्या हाताने बनवूनच खात असतो. त्यातही आम्हां लोकांचे एक व्रत आहे की या वर्षाऋतूत चंदनाच्या लाकडांवरच आम्ही स्वयंपाक करीत असतो. तेव्हा चंदनाची सुकी लाकडे व शिधा सामग्री आम्हांला द्या''. युधिष्ठिराने शिधा सामग्री तर दिली पण चंदनाची सुकी लाकडे महालात मिळाली नाहीत. तेव्हा नगरात लाकडे आणण्यासाठी नोकरांना पाठवले. नोकर दूरपर्यंत फिरून आले, पण चंदनाची सुकी लाकडे कोठेही मिळाली नाहीत. युधिष्ठिर उदास व खिन्न होऊन रिकाम्या हाताने परत आलेल्या नोकरांना पाहत होते. काही बोलण्यासारखे नव्हतेच. युधिष्ठिराची असहायता पाहून श्रीकृष्ण म्हणाले, ''राजन, काही हरकत नाही. आम्ही अन्यत्र भिक्षेची व्यवस्था करू'' असे म्हणून ते उठून गेले. युधिष्ठिर पाहतच राहिले.

तेथून ते दोघे कर्णाकडे गेले. त्यांना बघताच कर्ण उभा राहिला. त्याने त्या दोघांना साष्टांग नमस्कार केला. भोजनाचा आग्रह केला. श्रीकृष्णाने त्याला आपली अट सांगितली. येथेही कर्णाचे रथ नगरात लाकडे शोधून आले पण लाकडे मिळाली नाहीत. लाकडाची सालसुद्धा सुकी नाही असे ते म्हणाले. तेव्हा कर्ण लगेच उठला धनुष्य बाण उचलले आणि प्रथम चौकट पाडली, एक मोठा पलंग तोडला, मग खिडकी दरवाजे तोडले व चंदनाच्या लाकडाचा ढीग केला. आणि म्हटले- भगवन, आपण आयुष्यभर आपल्या सेवेची मला संधी द्या आणि सुक्या लाकडांवर आपले भोजन बनवा. त्या दोघा ब्राह्मणांना थोडेच काही खायचे होते? दोन तीन वाट्या बनवल्या व खाऊन बाहेर पडले.

सायंकाळी अर्जुन आणि श्रीकृष्ण स्वाभाविक वेशात युधिष्ठिराकडे गेले. तेव्हा ते तक्क्यावर डोके खाली घालून मुसमुसत होते. वैद्य, मंत्री, परिवारातील सर्व सदस्य उभे होते. परंतु ते काही बोलू शकत नव्हते. कंठ भरून येत होता. अश्रु थांबत नव्हते. श्रीकृष्णाने विचारले असे कोणते दु:ख आपल्याला झाले आहे? त्यावर ते म्हणाले, ''कृष्णा, केवळ एक गोष्ट सांगशील? मला आठवण का नाही झाली? अरे या महालाला आग का लागत नाही? कर्णापेक्षा शंभरपट अधिक चंदनाचे काष्ठोपकरण माझ्याजवळ आहे. पण माझ्या ते लक्षात का आले नाही? कर्णाने त्या भिक्षुकांना भिक्षा दिली आणि मी अभागा तसाच राहिलो. सांग कृष्णा मला का आठवण झाली नाही? माझ्या का लक्षात आले नाही?'' श्रीकृष्णाने सांगितले की जे हृदयात असते तेच प्रसंग आला असता आठवते. शास्त्रामध्ये लिहिले आहे नीती सांगत आहे तेव्हा ते केले पाहिजे असे म्हणून जो कोणी दान करण्याचा विचार करतो त्याला प्रसंग आला की आठवण होत नाही. पण दानी वृत्ती कर्णाच्या हृदयातच ठसून राहिलेली असल्याने त्यामुळे वेळेवर काय करावे ते त्याला आठवते.

सूर्याने वारंवार कर्णाला सावध केले होते व सांगितले होते की कवच व कुंडले हे तुझ्या प्राणांचे संरक्षक आहेत. ते देशील तर तुझे प्राण संकटात येतील. परंतु कर्णाने आपल्या प्राणांचा मोह न धरता आपले शरीर सोलून कवच कुंडलांचे दान केले आणि जगात दानवीर ठरला. यूध्दभूमीवर घायाळ होऊन जेव्हा कर्ण शेवटचा श्वास घेत होता तेव्हा वेष बदलून श्रीकृष्ण तेथेही त्याच्या दानवीरतेची परीक्षा घेण्यासाठी गेले. त्यावेळेही कर्णाने सोन्याने मढवलेला आपला दात श्रीकृष्णाला उपटून दिला. आपल्याजवळ देण्यासारखे काय आहे याचे स्मरण कर्णाला सतत राहत असे. श्रीकृष्णाने म्हटले की हे सोने तर उष्टे बनलेले आहे. कर्णाने बाण मारून भूमीमधून जलस्त्रोत निर्माण केला त्यात तो दात धुतला व मग श्रीकृष्णाला तो दात अर्पण केला. प्रसन्न होऊन भगवंताने आपले धाम त्याला अर्पण केले. सारांश हृदयापासून केलेले दान प्रत्येक परिस्थितीत कल्याणदायीच असते.

दाना संबंधी योगेश्वर श्रीकृष्णाने गीतेमध्ये भरपूर सांगितले आहे. भगवंताचा निर्देश आहे की यज्ञ, दान आणि तपरूप क्रियांचा त्याग करू नये. या क्रिया ऋषींनापण पवित्र करणाऱ्या आहेत.

गीतेतील सतराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने सांगितले की दान तीन प्रकारचे असते. सात्त्विक, राजस आणि तामस. ''दातव्यमिति यद्दानं'' दान देणेही कर्तव्य आहे. उपकाराची भावना न ठेवता देश-काल व सत्पात्र प्राप्त होण्याच्या भावनेने दिले जाते ते दान सात्त्विक दान होय. (१७/२०) जे दान क्लेशपूर्वक म्हणजे देण्याची इच्छा नसून द्यावे लागत आहे किंवा प्रत्युपकाराच्या भावनेने हे केले तर, हे मिळेल अथवा एखाद्या फळाच्या उद्देशाने दान दिले जाते त्या दानाला राजस दान म्हटले जाते. (१७/२१) जे दान सन्मान (आदर) केल्याशिवाय किंवा तिरस्कारपूर्वक, झटकून टाकल्यासारखे व अयोग्य देश-कालात आणि सत्पात्र नसलेल्यांना दिले जाते त्या दानाला तामस दान असे म्हटले जाते. दान म्हटलेले असले तरी देह-गेह यांचे ममत्व सोडून एकमात्र ईश्वरावर अवलंबून राहून त्याच्यासाठी जे दान केले जाते ते दान श्रेष्ठ होय. व ते दान म्हणजे सर्वस्वाचे समर्पण. संपूर्ण भावनांचा त्याग करून मनाचे समर्पण करणे म्हणजे श्रेष्ठ दान! जसे श्रीकृष्णाने म्हटले आहे ''मय्येव मन आधत्स्व (१२/८)'' माझ्यामध्ये तुमचे मन केंद्रित करा.- सारांश दान नितांत आवश्यक आहे.

**सो धन धन्य प्रथम गति जाकी ।**
**धन्य पुन्य रत मति सोइ पाकि ।। मानस, ७/१२६/७**

गोस्वामी तुलसीदासजी म्हणतात की ते धन धन्य आहे जे सत्कर्माच्या कामी लागते. भुकेलेल्याला भोजन आणि तहानेलेल्याला पाणी देण्यात कधी चुकू नका. गृहस्थाश्रमाचे हे दायित्व आहे की आपल्या दारातून कोणी भुकेले जाता कामा नये. दुसऱ्यांना खायला घालूनच त्याने खाल्ले पाहिजे. ज्या दिवशी कोणी अतिथि जेवायला येत नसे त्या दिवशी यजमानाला फार दु:ख होत असे. सुपात्र भिक्षूला खायला घालून मग स्वत: खाणे ही संस्कृती होती.

''दान परं किं सुपात्र दत्तं'' तेच दान श्रेष्ठ आहे जे सुपात्र व्यक्तीला दिले जाते. कुपात्र व्यक्तीला दान दिल्याने ते दातृत्व नष्ट होते. दानाचा महिमा बघून अनेक पुरोहितपण दान घेणारे बनले. काहीनी तर दानालाच आपल्या उदरनिर्वाहाचे साधन बनवले. कोठे देवता दाखवून, कोठे चमत्काराचे प्रदर्शन करून, कोठे स्वर्गाचे प्रलोभन दाखवून, कोठे प्रायश्चिताचे भय दाखवून दानाची व्याप्ती वाढवणे व ते प्राप्त करणे हा त्यांचा उद्योग बनला. श्रीमंतांच्या घरी सून आल्यानंतर जर त्या वर्षात त्यांच्याकडे कोणी मेले नाही तर

म्हणायचे सून दरिद्री नारायण आहे. समजा दहा-बारा लोक वारले, तर दहा-बारा गाद्या, तक्के, पलंग अशा वस्तू मिळाल्या की म्हणायचे सून अगदी साक्षात् लक्ष्मी आहे. हा दानाचा दुरुपयोग आहे. शहरामध्ये लहान मुलांचे अपहरण करून त्यांचे हात-पाय कापून त्यांना विकलांग बनवायचे आणि भीक मागायला योग्य अशी त्याची आकृती बनवायची. अशा या विकलांग बनवलेल्या मुलांना ट्रकमध्ये भरायचे व चौकाचौकात बसवायचे. अशी मुले दिवसभर पैशाची भीक मागत ओरडत राहतात. रात्री ट्रक येऊन त्यांना घेऊन जातो. असा धंदा चालवणारे त्या पैशांनी क्लब अटेण्ड करताना दिसतात. मुंबईसारख्या ठिकाणी भिक्षा मागण्याच्या जागेसाठी पागडी द्यावी लागते. आपआपसात पागडीची देवाण घेवाण करतात. भीक मागणाऱ्याला दान देणे म्हणजे अकर्मण्यतेला प्रोत्साहन देण्यासारखे आहे आणि कोणत्याही विकासोन्मुख राष्ट्रासाठी हा एक शाप ठरू शकतो.

तात्पर्य आवश्यकता असणाऱ्यालाच दान दिले पाहिजे. जो खरोखर भुकेला आहे त्याला दान दिले पाहिजे. ईश्वर चिंतनात सतत मग्न असणाऱ्या संन्याशाला दिलेले दान सर्वोत्कृष्ट होय. आपला सुखी परिवार सोडून जो भगवंताला समर्पित झाला तो दानाचा पहिला अधिकारी आहे. कारण आठ  तास बसून तो भोजन दात्यासाठी भजन करत असतो. जर यापेक्षा अधिक भजन केले तर ते त्याचे स्वत:चे असते. तेव्हा जे सतत भजनात तल्लीन असतात अशा भिक्षूंना भोजन द्यावे. ते सर्वश्रेष्ठ दान आहे. अनेक भिक्षूंचे असे कठोर व्रत असते की कोणी स्वत:हून खायला दिले तरच ते खातात. आमच्या गुरुदेवांनी देखील पोटासाठी कधी भिक्षा मागितली नाही. कारण आपण साधू बनू असे त्यांना कल्पनेतसुध्दा वाटले नव्हते. चांगला सुखी परिवार होता. परिवाराबद्दल अत्यंत प्रेम वाटत होते; परंतु आकाशवाणीच्या माध्यमातून भगवंतानी त्यांना साधू बनवले; तेव्हा त्यांच्या भोजनाची व्यवस्था तोच करेल असा त्यांना विश्वास होता. आणि खरोखर भगवान तसे करतही होते. ते निराधार विचरण करीत असताना कोणालाही स्वप्नात सांगितले जाई  की अमुक महात्म्याला भोजन द्यावे, कधी कोणाला आकाशवाणीने सांगितले जाई किंवा कोणाला अनायसे प्रेरणा होई आणि ती व्यक्ती भोजन घेऊन हजर होत असे तरीही दोन दोन दिवस उपवास पडे; पण तिसऱ्या दिवशी कोणी ना कोणी भोजन देत असे. सच्चे संत म्हणजे भगवंताचे अंतरंग असतात. भगवंताच्या इशाऱ्याशिवाय एक पाऊल देखील ते पुढे टाकीत नाहीत. साधुसेवेचे व्रत घेतलेल्या पुरुषांना अशा संतांना जेवायला-खायला घालण्याचे सौभाग्य अनायासच

मिळते. निर्मळ संत मनुष्यमात्र आपल्या आत्म्याचाच संचार पाहतात. ते विश्वात्मा असतात. त्यांना जेवायला घालणे म्हणजे विश्वाला भोजन घालण्यासारखे आहे. जग खूप लांब लचक आहे, परंतु भगवान त्याच्याकडून दान देववतात की ज्याचे कल्याण होणार असते. व म्हणून सत्पुरुषांच्या सेवेत कधी चुकता कामा नये.

दानाचे महत्त्व वैदिक काळापासून आजपर्यंत अक्षुण्ण आहे. त्यानंतर या पृथ्वीवर जेथे जेथे धर्माचा अंकुर फुटला तेथे तेथे दानाला प्रथम स्थान मिळाले. भारतीय आर्य संस्कृतीच्या सर्व संघटना सनातन, बौध्द, जैन, शिख इत्यादी तसेच पारसी, ताओ, इसाई, मुसलमान आणि विश्वातील सर्व लहान मोठ्या धार्मिक संघटनांच्या सूत्रधारांनी दानावर विश्वास ठेवला आहे. सर्व आपल्या उत्पन्नाचा एक निश्चित अंश मंदिर, मस्जिद, गुरुद्वार, चर्च इत्यादी समस्त देवस्थाने, पूजा व प्रार्थना स्थळे, तसेच लोक कल्याण केंद्रात दान करीत असतात, ज्याचा उपयोग ईश भजन किंवा मानव सेवेसाठी केला जातो.

दान सार्वभौम आहे व प्रत्येक महापुरुषाने त्याला आपल्या हृदयाच्या डोळ्याने पाहिले आहे. मोक्षाचा मार्ग दानातून निघत असतो. व म्हणून प्रत्येक महापुरुषांनी दानावर विधान केले आहे. बुध्दांनी म्हटले- जो भिक्षूंना दान करतो तो मलाच भोजन अर्पण करीत असतो. भगवंतानी सांगितले की जो भक्ताला खाऊ घालतो तो मलाच खायला घालत असतो. येशूंनी म्हटले- जो भिक्षूंना अन्न वस्त्र देतो ते मला दिल्यासारखेच आहे. या सर्व महापुरुषांच्या उपदेशात संतांना दान देणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले आहे.

**जा दिन सन्त पाहुने आवत**
**तीरथ कोटि स्नान किये फल तैसेइ दरसन पावत ।।**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः**

पूज्य श्री स्वामीजींद्वारा
विरचित

# ज्ञान-गंगा

(साधनेसाठी उपयुक्त दोहे)

# दोहे

**मत्स्यपालिका सूद्र तन, छाया छुए न कोय ।**
**काम शत्रु की मार से, पारासर रह रोय ॥१॥**

**भावार्थ-** या दोह्यामध्ये महापुरुषाने संकेत केला आहे की मत्स्यपालिका म्हणजे माशाचे पोषण करणारी मछोदरी त्या जातीची होती जिची छाया शिवणेही निषिद्ध समजले जात असे - 'मानस'शी तुलना करा- जासु छाँह छुइ लेइय सींचा।'' केवट प्रकरणात आले आहे की त्याच्या सावलीला स्पर्श केला तरी स्नान करावे लागते. मछोदरी-मत्स्यगंधा अशा अस्पृश्य जातीची होती. परंतु कामरूपी दुर्जय शत्रूच्या तडाख्याने पाराशर ऋषीही ढासळले आणि आपली तपस्या हरवून बसले त्याचा परिणाम काय झाला ते पुढील दोह्यात पाहा.-

**पाणिग्रहण की सुधि नहीं, प्रगटा बालक एक**
**मत्स्यपालिका सुअन का, ब्रह्म प्रकाश अनेक ॥२॥**

**भावार्थ-** वैदिक अथवा लौकिक अशा कोणत्याही रीतीने महर्षी पराशरांचा मत्स्यगंधेशी विवाह झालेला नव्हता परंतु त्या मुलीने अशा बालकाला अर्थात व्यासाला जन्म दिला की ज्यानी अनेक प्रकारचे गूढ- अद्भूत असे लिखाण केले आहे जसे- चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे, महाभारत इत्यादी तेच व्यास महर्षी नावाने प्रसिद्ध पावले.

**उरवशी उर में बसी, बरबस जीवन जोग ।**
**गुरु वसिष्ठ विदू ब्रह्म की, जननि शुभाशुभ भोग ॥३॥**

**भावार्थ-** या दोह्यात महापुरुष उर्वशीच्या कथानकाकडे इशारा करीत आहेत. उर्वशी, रंभा, मेनका इत्यादी वेश्यांची एक वेगळीच श्रेणी आहे. उदाहरणार्थ, जी दृष्टीस पडताच हृदयात ठसते ती उर्वशी. दृष्टीस पडताच काम वासनेचा संचार करते ती 'मेनका' आहे. ज्यांचे मन शिलाखंडाप्रमाणे स्थिर आहे अशा स्थिर चित्त असणाऱ्यांना देखील जी विचलित करते ती रंभा होय. (मोठ मोठ्या शिलाखंडाना लोखंडाचा जो गज उलटवतो त्याला रंभा म्हटले आहे) याच प्रकारे उर्वशी ही एक श्रेणी होती. ''बरबस जीवन जो'' म्हणजे भोळ्याभाळ्या लोकांशी ती संयोग प्राप्त करीत होती. तीच गुरू वशिष्ठांची

जननी झाली जिच्यामध्ये शुभ किंवा अशुभ अशा कोणत्याही वासना उरल्या नव्हत्या. तरीही महर्षी वशिष्ठांच्या ब्राह्मणत्वाबद्दल कोणालाही संदेह नव्हता.

**गाधि सुअन तप कारने, पहुँचे अवध सुधाम ।**

**सम राजा कुल छात्र तनु, पावा द्विज का ठाम ।।४।।**

**भावार्थ-** या चौथ्या दोह्यात महापुरुषाचा संकेत 'गाधि सुवनां'कडे आहे म्हणजे महाराज गाधीचा तपस्वी पुत्र विश्वामित्राकडे आहे. विश्वामित्र एकदा तप सुरक्षितपणे पार पडावे या हेतूने अयोध्येला गेले. ते दशरथ राजाच्या समानान्तरीय नरेश होते आणि एकाच कुळातील क्षत्रिय होते. परंतु ''पावा द्विज का ठाम''- जेव्हा विश्वामित्राने राम व लक्ष्मणाची मागणी केली तेव्हा राजा दशरथ दु:खाने म्हणाला ''चौथे मन पायउ सुत चारी । विप्र वचने नहि कहेउ विचारी ।।''

चक्रवर्ती राजा दशरथला चांगले माहीत होते की विश्वामित्र क्षत्रिय आहेत, तरीही त्यांना 'विप्र' म्हणून संबोधले आहे. म्हणजे त्यांच्या ब्राह्मणत्वाबद्दल कोणीही संशय घेतला नाही. पुढील दोह्यात विप्रत्वाचे माध्यम सांगितले आहे.

**क्षात्रि जाति अभिमान युत गणनायक भूपाल ।**

**योग निष्ठ रत कर्म कृत, मानस विप्र मराल ।।५।।**

**भावार्थ-** ''क्षात्रि जाति अभिमान युत'' विश्वामित्र जातीने क्षत्रीय व स्भाभिमानी होते, ते गणतंत्राचे नायक भूपाल होते; परंतु अनुरागपुरित हृदयाने योगाचरण करून ते मन:स्थितीने ''विप्र मराल'' म्हणजे विप्रश्रेष्ठ बनले.

**भील जाति करनी कुटिल धर्म सुना नहिं कान ।**

**सद्गुरु के कारन भिला, विप्र रूप सनमान ।।६।।**

**भावार्थ-** महर्षी वाल्मिकी जातीने भील्ल व कृतीने चांडाळ होते. त्यांनी धर्म कधी ऐकलाच नव्हता. परंतु सद्गुरूच्या कृपेने तेही विप्ररूपात सन्मानित झाले.

भगवान श्रीराम वनवास काळात हिंडता हिंडता ते वाल्मीकींच्या आश्रमात आले. तेव्हा त्या ब्रह्मर्षीच्या चरणी मस्तक झुकवून त्यांनी सादर प्रणाम केला. तेव्हा ''आशीर्वाद विप्रवर दीन्हा'' त्या विप्रश्रेष्ठाने आशीर्वाद दिला. तात्पर्य वाल्मीकीच्या विप्रवरेष्यतमध्ये संदेहाला जागा नव्हती ''वाल्मिकी भये ब्रह्म समाना''

**राजसूय यग कारने, पहुँचे विप्र अनेक ।**
**स्वपच रूप में विप्र एक राजत विमल विवेक ।।७।।**

**भावार्थ-** धर्मराज युधिष्ठिराने राजसूय यज्ञ करण्याचे ठरवले. अगदी मोठ्या धामधुमीने तयारी सुरू झाली. तेव्हा महाराणी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाला यज्ञ साफल्याच्या बाबत प्रश्न विचारला. श्रीकृष्ण म्हणाले की सर्वश्रेष्ठ ब्रह्मर्षी जेव्हा तुमच्या अंगणात भोजन करतील तेव्हा आकाशात घंटानाद होईल आणि यज्ञसाफल्याचे तेच प्रमाण आहे असे समज. यज्ञात व्यासादि अनेक महर्षींनी प्रसाद ग्रहण केला परंतु घंटानाद झाला नाही. तेव्हा द्रौपदीने श्रीकृष्णाला याचे कारण विचारले. योगेश्वराने ध्यान लावून पाहिले तेव्हा समजले की एक महर्षी अमुक ठिकाणी राहतात पण ते अद्याप आलेले नाहीत. भीम त्यांना घेऊन येऊ शकला नाही. तेव्हा भगवंताचा प्रिय सखा अर्जुन अत्यंत मिनतवारी करून त्यांना घेऊन आला. प्रसाद ग्रहण करताना त्या महात्म्याने द्रौपदीने अत्यंत श्रम घेऊन बनवलेले छपन्न प्रकारचे पदार्थ एकत्र केले. हे पाहताच द्रौपदी मनात दु:खी झाली. त्याच्याबद्दल तिच्या मनात अश्रध्दा निर्माण झाली. मी इतके कष्ट घेऊन सर्व बनवले आहे आता या महात्म्याला त्यांचा स्वाद कसा समजणार ?

पण त्यांनी प्रसाद ग्रहण केल्यावर पण घंटानाद झाला नाही. तेव्हा द्रौपदीने पुन्हा श्रीकृष्णाला घंटानाद का झाला नाही असे विचारले. भगवान श्रीकृष्ण उत्तरले की कोणाच्या तरी मनात अश्रध्दा निर्माण झालेली दिसते. द्रौपदीच्या मनातील अश्रध्दा नाहीशी होताच आकाशात घंटानाद झाला. प्रस्तुत दोह्यामध्ये सांगितले आहे की युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञामध्ये अनेक महर्षींनी भोजन केले परंतु घंटानाद झाला तेव्हा श्वपच सूपा भगतच्या रूपात एक विप्र तेथे आले. त्यांचे दर्शना नंतर व सेवे नंतरच तो यज्ञ सफल झाला.

आता पाहा भील्लाच्या घरी जन्म घेतलेला मनुष्य पण महर्षी, कृतीने चांडाळ असणाराही महर्षी, क्षत्रियपण महर्षी, तसे जन्माने कुलीन नव्हते ते वशिष्ठ पण ब्रह्मर्षी, मत्स्यगंधेचा पुत्र पण विप्रश्रेष्ठ मग विप्र स्वरूप म्हणजे काय? त्या विप्रत्वाच्या उपलब्धीचे मूल माध्यम काय आहे? विप्रत्व हे जन्माने प्राप्त होणारी उपाधी आहे की एखाद्या यौगिक क्रियेचा परिणाम आहे? यावरचा निर्णय पुढील दोह्यात पाहा.

**चार वरण चित्त दे चले, चेतन पथ निष्काम ।**
**प्रथम चरण में सूद्र है, विध्दत उर परिणाम ।।८।।**

**भावार्थ-** 'चार वरण चित्त दे चले'- जर तुम्हाला चार वर्णांची योग्यता प्राप्त करावयाची असेल तर परम चेतन परमात्म्याचा पथ जो निष्काम कर्म योग आहे- त्यावर चित्त केंद्रित करा. या योगाच्या प्रथम चरणात म्हणजे साधनेमध्ये प्रवेश करीत असताना ती व्यक्ती शूद्र श्रेणीवर असते आणि जेव्हा 'विद्वत' उर परिणाम अर्थात जेव्हा हृदयात तो परिणाम घोषित होतो म्हणजेच ठसतो तेव्हा तो विप्र बनत असतो तो विद (ज्ञाता) वत् (प्रमाणे) बनतो. वैश्याचा उल्लेख पुढील दोह्यात पाहा.

**आतम धन निज सम्पत्ति, मायिक चित जंजार ।**
**मति संयम रति राम मे, वैश्य विधी का सार ।।९।।**

**भावार्थ-** आत्मिक धन हीच खरी स्थिर संपत्ती आहे. एकदा तिला जिंकलेत म्हणजे प्राप्त केलेत की ती पुन्हा कधी नष्ट होत नाही. हे धन निश्चितपणे कल्याणच करते व म्हणूनच ते निज धन आहे. मायिक धन म्हणजे तर चित्त जंजाळ आहे. मायेची उपलब्धी म्हणजे मनाला बध्द करणारे जाळे आहे. 'मति संयम रति राम मे' अर्थात बुध्दी संयमित करून श्रीरामाच्या चरणी अनुराग निर्माण करण्याचा प्रयत्न करा. हेच वैश्याचे विशेष लक्षण आहे. यावर पुढील दोह्यात आणखी विचार केला आहे.

**राजस गुण वश विपुल में, स्वल्प सत्व तम धार ।**
**गो संयम रत आत्मा, समन वैश्य व्यवहार ।।१०।।**

**भावार्थ-** राजस गुणाचे प्राबल्य असते, काही तामस तसेच काही सात्त्विक गुण कार्यरत असतात पण 'गो संयम' अर्थात इंद्रियांचा संयम तथा आत्मचिंतनात अनुरक्ती असणे व मनाचे शमन होणे हे वैश्य स्तराचे विशेष गुण आहेत.

**बुध करणी सो होत है, वरण व्यवस्था जोग ।**
**पुण्य पुंज सतसंगति, राम कर्म संयोग ।।११।।**

**भावार्थ-** विवेकी पुरुष अहर्निश कर्तव्य करून वर्णव्यवस्थेला अनुकूल होण्याचा प्रयत्न करतात. पूर्वजन्माचा पुण्यसंचय व सत्संग यांच्या प्रभावाने त्या श्रीरामात प्रवेश

देणारे कर्म (विशेष आराधना) म्हणजेच त्या यौगिक क्रियेशी संयोग होतो. यातूनच श्रीरामाची प्राप्ती होते.

## क्षात्र

**सत्व विपुल कछु राजसी, ईस कर्म मन लीन ।**
**मति संघर्षन शान्त में, छात्र वन्त मन कीन ।।१२।।**

**भावार्थ-** सत्त्व गुणांचे जेथे प्राबल्य आहे, जेथे रजो गुण थोड्या प्रमाणात आहे, ''ईश करम मन लीन'' म्हणजे ईश्वर चिंतनात मन तल्लीन असते, ईश्वराची प्राप्ती करून देणाऱ्या यौगिक कर्मात मन मग्न असणे, शांत ब्रह्मासाठी बुध्दीमध्ये तेथे संघर्ष सुरू असतो- वास्तविक हेच खरे युध्द असते हे क्षत्रित्वाचे लक्षण आहे.

**कर्म से काटे काल को, कर्म से सूद्र प्रवीन ।**
**कर्म से क्षत्री विप्र है, विप्र ब्रह्म मे लीन ।।१३।।**

**भावार्थ-** ''करम से काटे काल को'' कर्माने काळाला कापता येते, काळाचा फास कापला जातो. कर्माने शूद्रपण वैश्य बनू शकतो. कर्माने क्षत्रिय विप्र बनू शकतो आणि विप्र त्या परात्पर ब्रह्मामध्ये विलय पावू शकतो. मग त्या ठिकाणी न ब्राह्मण न क्षत्रिय न वैश्य न शूद्र, चिदानन्द रूपो शिवो केवलोऽहं राहतो, मग प्रश्न निर्माण होतो की कर्माचे स्वरूप काय आहे?

## कर्म म्हणजे काय?

**मन काया करनी करै, हरि माया टकसार ।**
**आतम अनुभव सोध में, प्रगट करम का सार ।।१४।।**

**भावार्थ-** मन-कर्म-वचनाने काम करा ''हरि माया टकसार'' भगवंताची माया योग-माया व आत्म माया या एक दुसऱ्यांचे पर्याय आहेत, ही भगवंताची माया म्हणजेच कर्म करण्याचे क्षेत्र आहे. मायेमध्येच कर्म केले जाते, अन्यत्र नाही. आत्म्याचा अनुभव देणाऱ्याच्या संरक्षणामध्ये कर्माचे वास्तविक रूप प्रकट होत असते. यापुढील दोहा याला पुष्टी देणारा आहे.

**काया वचन मन लग रहे, आतम पथ व्यापार ।**
**कोटि विघ्न ते ना फिरे, मनवां शुभ संचार ।।१५।।**

मन-कर्म-वाणीने आत्मिक व्यापारात तल्लीन राहा. लाखो विघ्ने निर्माण झाल्यानंतर देखील शुभ संकल्पांपासून विचलित होऊ नका.

**काया वचन मन लग रहे, आतम पथ व्यापार ।**
**सो कर्ता विद् कर्म से, सो गुरु गीता सार ।।१६।।**

**भावार्थ-** मन, कर्म आणि वाणीने जो आत्मदर्शनामध्ये संलग्न होतो तोच कर्मांचा कर्ता असतो; तोच कर्माचा खरा ज्ञाता असतो. हाच सद्गुरु म्हणजे गीता इत्यादी शास्त्राचे सार आहे. श्रीकृष्ण ज्या कर्मावर सारखे जोर देत आहेत ते हेच कर्म होय- ते म्हणजे आराधना.

आत्म्याची अनुभूती देणारे कर्मच वास्तविक कर्म आहे. अर्थात केवळ असे मानण्याने काम होत नाही. त्याला कार्यरूप देण्यासाठी भाव आणि प्रेम हे मूळ माध्यम आहेत. या संदर्भात पुढील दोहा पाहा.-

**ज्ञान कर्म में ना मिले, अनुपम उर स्वर रूप ।**
**प्रियतम की सुधि तब मिले, प्रेम भाव अनुरूप ।।१७।।**

केवळ ज्ञान आणि कर्माच्या द्वारा उपमा रहित, स्वर-रूपात तो प्रभू प्राप्त होत नाही. त्या प्रियतमापर्यंत पोहचण्यासाठी ‘प्रेम-भाव अनुरूप’ म्हणजे जेव्हा प्रेम आणि भाव इष्टाशी तद्रूप होऊन प्रवाहित होतात. या कर्माबाबत महापुरुषाचा अंतिम निर्णय पाहा.-

**हरि पथ पावन कर्म है, करै जे पावन अंग ।**
**तेहि बिनु करनी कहत जे, भव बंधन का रंग ।।१८।।**

**भावार्थ -** भगवंताचा मार्ग हेच पावन कर्म होय. हे कर्म जे करतात त्यांच्या शरीरात (स्थूल, सूक्ष्म व कारण या तिन्ही) पवित्र सत्तेचा संचार होतो. पण जे या क्रियेबाबत अनभिज्ञ असूनही म्हणतात की ‘मी कर्म करीत असतो’ त्याचे मस्तक भवबंधनाच्या रंगाने अनुरंजित आहे असे जाणा.

# शिक्षण

**मानव तन का फल महा, प्रभु गुरु दर्शन सीख ।**
**बिनु दरसन के मानवा, जुग जुग मागे भीख ।।१९।।**

**भावार्थ-** प्रभू आणि सद्गुरुंचे दर्शन, त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण हे मानव शरीराचे महानतम फळ आहे. ज्याला सद्गुरूंचे दर्शन आणि त्यांचे मार्गदर्शन प्राप्त होत नाही तो जन्म-जन्मांतरापर्यंत भिक्षूच राहतो आणि पशु-पक्षांच्या योनीमध्ये तो इंद्रिय तृप्तीच्या अतृप्त याचनेसाठी भटकत राहतो. पुढील दोह्यात याबद्दल चेतावनी दिली आहे.

**धन सम्पत्ति सुत संग में, नित नव उमगत बोध ।**
**जिगर रोग कुसमय पडे, सच्ची सीख विरोध ।।२०।।**

**भावार्थ -** पुष्कळ धन आहे, वैभव आहे, मुलं-नातवंडांनी घर भरलेले आहे, त्यांच्यामुळे मनात आनंद भरून आहे; परंतु असाध्य रोग किंवा असाध्य आजारपण जेव्हा येते किंवा आपत्काळ येतो तेव्हाच ''सच्ची सीख विरोध'' वास्तविकतेचा बोध होत असतो. तेव्हा मनुष्याला समजते की ज्यांना आपण आपले म्हणतो, ज्यांना तुम्ही पापण्यांच्या पंखामध्ये जपलेत ते सुध्दा तुमचे नसतात. त्यांच्या तोंडूनदेखील अशा वेळी अपशब्द बाहेर पडतात.

**मन पंछी फन्दे पडा, निकलत हरि की डोर ।**
**सद्गुरु सेवन डोर है, परसि तमिस्रा भोर ।।२१।।**

**भावार्थ -** मनरूपी पक्षी तृष्णेच्या भयंकर फंदात पडला आहे. भगवंताशी त्याच्या मनाचा दोर दृढ होईल तर तो भवपार होऊन जाईल. परंतु भगवंत तर प्रत्यक्ष दिसत नाही. मग त्यांच्यांशी दोर कसा दृढ करायचा? त्यावर म्हणतात ''सद्गुरू सेवन डोर'' सद्गुरूची सेवा केलीत की हा दोर त्याच्या चरणी दृढ होत असतो. यौगिक क्रियेच्या सेवनामध्ये मन तल्लीन झाले की तमिस्रा मायेचा प्रपंच ईश्वरीय उष:कालामध्ये परिवर्तित होत असतो. परम चेतन स्वयं प्रकाशरूप आहे. माया म्हणजे नश्वर अंधाराचे प्रतीक आहे.

**नर कहँ माया नारि है, नारी कहँ नर होत ।**
**संग दोष विलगावते जो चाहे निज जोत ।।२२।।**

**भावार्थ-** मनुष्यासाठी स्त्री ही माया आहे. तर स्त्रीसाठी पुरुष माया आहे. तेव्हा जर आत्मानुभूती, आत्म दर्शन यांची इच्छा असेल तर संगदोषापासून मुक्त व्हा.

**भगवत् पथ की रोक है, काम परस्पर भोग ।**
**मन क्रम तृस्ना के तजे, जन पावे सहयोग ।।२३।।**

**भावार्थ-** भगवत्पथातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे काम म्हणजेच इंद्रियांचा पारस्परिक भोग- वासना! जो मनुष्य मन, कर्म, वचनाने तृष्णेचा त्याग करतो त्यालाच ईश्वराचा पूर्ण सहयोग प्राप्त होतो. परंतु या तृष्णेच्या पलीकडे एखादाच अतीव श्रमाने जाऊ शकतो.

**दीख सबल मुख झुर्रियाँ, दीख नयन द्युति हीन ।**
**कंचन वपु विलसन भई, देखी आस नवीन ।।२४।।**

**भावार्थ -** सुखी व संपन्न व्यक्तीच्या मुखावर सुरकुत्या दिसू लागल्या, नेत्र ज्योतिहीन झाले, कंचन काया निष्प्रभ झाली तरीही मनुष्याची तृष्णा थांबत नाही. नवीन आशा नवनवीन तृष्णा उत्तरोत्तर वाढतच जाते. याच्या विनाशाचा एकमेव उपाय आहे चिंतन!

**भजन करन में भय लगे, सत् त्यागे सुख होय ।**
**करम कामना से करै, काल धरोहर सोप ।।२५।।**

**भावार्थ-** मनाला भजन-भक्ती करायला भीती वाटते आणि सत्याचा त्याग करून असत्मध्ये प्रवृत्त होण्यात त्याला परम सुख वाटत असते. ते मन म्हणजेच तो मनुष्य थोडेबहुत कर्म (आराधना) करतो, पण ते करताना कामनाहेतूने करीत असतो. तो भगवंताला म्हणतो की हे भगवन, माझे अमुक काम पूर्ण होऊ दे. असा मनुष्य ‘‘काल धरोहर सोय’’ म्हणजे काळाची अनामत अर्थात ‘‘फिक्स्ड डिपॉझिट’’ आहे. तेव्हा कामनांचा संपूर्ण त्याग करूनच ईश्वर चिंतन केले पाहिजे. जर भजनास प्रारंभ केला आहे तर कल्याण निश्चितपणे होईल. मग कामना कोठून राहणार?

**पल पल शिक्षा देत है, मन मन्दिर इक तार ।**
**भक्तन के सिर भार जो, नाथ लगावे पार ॥२६॥**

योग स्थिती प्राप्त करण्याची गुरुकिल्ली आहे भगवंताला ऐकणे व धीर ठेवणे. यावर महापुरुष म्हणतात की ''पल-पल शिक्षा देत है मनमन्दिर इक तार'' मनाच्या अंतरालात इष्ट प्रत्येक क्षणी मार्गदर्शन करीत असतात. एवढेच नव्हे भक्ताच्या डोक्यावरचा भार स्वत:च्या डोक्यावर घेतात व भक्ताचे संकट स्वत: नाहीसे करतात. तेव्हा प्रत्येकाने भक्तिभावाचा आश्रय घ्यावा.

**बाहर झगडे होत है, जीत न देखी कोय ।**
**अन्तर जग की आत्मा, माया के सँग रोय ॥२७॥**

**भावार्थ -** जगामध्ये सतत झगडे होत असतात. पण जय कोणाचाच होत नाही. त्यामध्ये आपला जय झालाय असे जो मानतो वास्तविक त्याचाही विजय झालेला नसतो. या संघर्षात आत्मा मायिक द्वन्व्दातच शिरतो. जो ज्याला जेवढे दाबण्याचा प्रयत्न करतो, त्याला परिणामत: तेवढेच दबावे लागते. तेव्हा मायिक संघर्ष म्हणजे जन्म-जन्मांतरापर्यंत सुरू असणारी प्रतिक्रिया आहे. यामध्ये कल्याणाचा सुतराम संभव नाही.

**आतम तृप्ति एक में, बिना गुरु ना सीख ।**
**छत्रपति के पद लहे, तबहूँ दुखिया दीख ॥२८॥**

**भावार्थ-** आत्म्याची शाश्वत, संशयरहित तृप्ती सर्वशक्तिमान परब्रह्म परमात्म्यात आहे. सद्गुरुशिवाय परम प्रभूला प्राप्त करण्याचे शिक्षण मिळणे अशक्य आहे. ज्याला आत्मोपलब्धी प्राप्त झाली नाही असे राजे देखील दु:खाने दग्ध झालेले आपण ऐकले आहे.

**आशा तृष्णा पूर्ति महँ, चिंता चंगुल सीख ।**
**जिनकी तूती जगतमें, अन्त कडाही दीख ॥२९॥**

**भावार्थ-** एका आशेची पूर्ती अनंत आशांना जन्म देते- ''जिमि प्रतिलाभ लोभ अधिकाई।'' आशा आणि तृष्णेमुळेच मनुष्य चिंतेच्या जंजाळात सापडत असतो.

ज्यांचा डंका समग्र सृष्टीमध्ये वाजत आहे असे विश्वप्रसिद्ध लोक देखील या कामनांमुळे अन्ततोगत्वा अशा काळाच्या पकडीत सापडलेले दिसतात.

**सत् त्रेता कलि द्वैव युग, माया गुण कृति धार ।**
**साधन रत मन से कटे, लघु बड गुण व्यापार ।।३०।।**

**भावार्थ-** या दोह्यात महापुरुष युगधर्मावर विचार करीत आहेत. सत्ययुग, त्रेता, द्वापर, कलियुग हे सर्व मायेद्वारा नियंत्रित असणाऱ्या त्रिगुणांचा प्रसार आहे. साधनेमध्ये मन अनुरक्त झाल्यानंतर या लहान मोठ्या गुणांचे कार्य हळू हळू नाहीसे होत जाते.

**ज्यों सूरत गुरु संग से, चढे शून्य की सोध ।**
**त्योंतस युग बदले लखे, तीन त्याग सत् बोध ।।३१।।**

**भावार्थ-** सद्गुरुंच्या संगतीने ध्यान जस जसे शून्याच्या शोधात वर वर चढत जाते (शून्याचा शोध म्हणजे संकल्प विकल्परहित मनाची अवस्था आहे. अर्थात एक विशिष्ट स्थिती आहे ज्यात विशिष्ट अवकाश आहे, ज्याला चिदाकाश असे म्हणतात) तो तो क्रमशः युग धर्म बदलले जातात मग कली, द्वापर, त्रेता या युगांचा हळूहळू त्याग केला जातो व सत्याचा बोध होतो.

**सदा रहत त्याग लोक मे, दैवी सम्पति योग ।**
**साधन सों कलुषित कटे, क्षण-क्षण सत् संयोग ।।३२।।**

**भावार्थ-** सर्व युगे सदैव या लोकामध्ये अस्तित्वात असतात. दैवी संपदेच्या संयोगाने साधना, आराधना, चिंतन, या क्रिया प्रवृत्तींमुळे पाप परायण युगांचा पगभाव टळला जातो व मग त्या प्रमाणात सत्याचा संयोग प्राप्त होत जातो.

## संताचा नारीविषयी असणारा दृष्टिकोण ।

**संतन के चित पैठ के, लखा दीख सब मान ।**
**की भगिनी समदर्स है, की पुत्री सम मात ।।३३।।**

**भावार्थ -** संतांनी स्त्रीकडे नेहमी माता, बहीण किंवा मुलीच्या नजरेने पाहिलेले दिसून येते. साधनेत अनुरक्त व्यक्ती स्त्रीकडे नेहमी याच दृष्टीने पाहत असते.

**पूरे सतपुरुषन लखा, जहँ तहँ प्रभु का रूप ।**

**आँखि लबालब परम है, कहाँ समावे कूप ।।३४।।**

**भावार्थ** - परंतु जो पूर्ण महापुरुष असतो तो ''जहँ तहँ प्रभू का रूप'' म्हणजे जेथे दृष्टी पडते तेथे तेथे तो प्रभूलाच पाहतो, तो ज्या परममध्ये स्थित असतो त्याच परमाराध्याला तो सर्वत्र पहातो. ''आखिलबालब परम है'' त्याच्या दृष्टीमधे तर तो परमप्रभूच काठोकाठ- संपूर्ण भरलेला असतो. त्यामुळे अन्य काही त्यांच्या दृष्टीत नसतेच, मग जगातील कुत्सित विचार कुठून येणार?

**दरसन परसत ही थका, माया बल मन मौन ।**

**तत्क्षण अन्तर मे मिला, अडगड अवधू तौन ।।३५।।**

**भावार्थ** - ज्यांच्या नजरेत म्हणजेच हृदयात तो परमप्रभू पूर्ण भरलेला आहे, त्या आराध्याच्या दर्शनाचे फळ सांगताना प्रस्तुत दोह्यात म्हटले आहे की ''दरसत परसत ही थका'' त्या परमतत्वाचे दर्शन, स्पर्श होताच मायेचा प्रभाव शांत होतो आणि मन मग त्याच स्वरूपात तन्मय होऊन जाते. मनाच्या संपूर्ण निरोध अवस्थेत साधक अंतरंगात स्थित असणाऱ्या परमात्म स्वरूपात विलीन होत असतो. हेच अवधूताचे वास्तविक व शाश्वत स्वरूप आहे, ज्याचा आरंभ नाम व रूपातूनच होत असतो.

**येन केन विधि अन्त में, संकल्प हरि के होय ।**

**भजन भाव  पावन करे, मनुज रहे सुख सोय ।।३६।।**

**भावार्थ** - अंतिम क्षण मन भगवंताच्या स्वरूपात स्थित असावे अशा प्रकारचा सतत प्रयत्न करीत राहावे. ''भजन भाव पावन को'' वस्तुत: भजन-भक्तिभावच मनुष्याला पूर्ण पवित्रता प्रदान करीत असतो. हे पावित्र्य प्राप्त झाल्यानंतरच मनुष्य ईश्वराच्या स्वरूपात स्थित होत असतो.

भगवंत मार्गावरील साधकांना अनेकदा निंदा सहन करावी लागल्याने साधनेत अवरोध निर्माण होतो. त्यातून स्वत:चाच बचाव करण्यासाठी व निंदकांकडून साधनात्मक सहयोग प्राप्त करण्याचा निर्देश महापुरुष पुढील दोह्यात करीत आहे.

# निंदकाशी मित्रता

**विन वेतन डयुटी करै, सच्ची आठो याम ।**
**हरि कृपा निन्दक मिला, भूल बतावै थाम ।।३७।।**

**भावार्थ -** निंदक म्हणजे अष्टोप्रहर विना वेतन आपल्यावर पाहरा करण्याची डयुटी बजावणारा आपला हितैषी आहे. हरिकृपेनेच तो निंदक मिळत असतो. कारण तो आपला रस्ता अडवून आपल्याला आपल्या चुका तो दाखवत असतो. जर तो आपल्या चुका जनमानसात करतो की ह्याच्यामध्ये हा दोष आहे. बस दोषाचे कारण शोधत राहा.

**ऐसे मनुष्य नाथ है, निन्दक के तन पैठ ।**
**गुण संग्रहि अवगुण कथै, भजन भरोसे बैठ ।।३८।।**

**भावार्थ -** भगवान इतके अनुपम आहेत की निंदकाच्या शरीरात प्रवेश करून अवगुण सांगत राहतात व गुणांचा संग्रह करीत असतात. याचा उद्देश असा की आपल्यातील उणिवा समजून घ्या व भजनावर भरोसा ठेवून त्या उणिवा दूर करा.

**हरि दया कर हित करैं, निन्दक प्रगटे पास ।**
**जो तव त्रुटि ना मिलै, निन्दक करै प्रकास ।।३९।।**

**भावार्थ -** ईश्वर जेव्हा असीम दयेने द्रवित होतो आणि भक्ताचे जेव्हा त्याला मनापासून हित करावयाचे असते तेव्हा तो एखाद्या निंदकाला जवळच प्रकट करतो ''जा तव त्रुटि ना मिले'' म्हणजे साधकाला आपल्या ज्या चुका दिसत नाहीत त्या चुका निंदक प्रकाशात आणतो. तेव्हा त्या चुका समजून त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा.

**जनमो जग के शिखर पर, या पृथ्वी तल माहि ।**
**हरि सुमिरे सुख शान्ति है, अनल अन्त मरि जाहि ।।४०।।**

**भावार्थ -** एखाद्याने शीर्षस्थ स्थानी म्हणजे महाराजाधीराजाच्या रूपात जरी जन्म घेतला असला तरी, 'पृथ्वी तल माहि'' म्हणजे अगदी हलक्या कोटीत जन्म

घेऊनही त्या श्रीहरीचे सतत स्मरण करणाऱ्याला शांती, शाश्वत सुख प्राप्त होते. अन्यथा तो तीन ताप व विषयानलात होरपळून निघतो.

**मन करणी लौ जगत है, जनमत रहै अनेक ।**
**चक्षु मिले गुरु गोद में, जहँ देखा तहँ एक ।।४१।।**

**भावार्थ -** जेथपर्यंत मनाची धाव आहे तेथपर्यंत जग आहे. या परीघात अनेकानेक जन्म होतात, परंतु जेव्हा हृदयात त्या ईश्वराचा दृष्टिसंचार होतो तेव्हा ''गुरु गोद मे'' सद्गुरुच्या परिवेशात त्याला प्राप्त केले जाते. त्या रूपात जेथे जेथे दृष्टी जाते सर्वांचे स्वरूप एकच दिसते.

**सतपुरुषो की सोध में, माया बची न राम ।**
**मन की मनसा के मिटे, सहज न व्यापै काम ।।४२।।**

**भावार्थ -** सत्पुरुषांच्या व अनन्य भक्तांच्या शोधामध्ये ना माया उरते ना मायेची रूपे ! या शोधात राम देखील भिन्न राहत नाही. या सहज स्वरूपात कामनांचा प्रसार कधीही होण्याची शक्यता नसते.

**सबसे न्यारा रहत है, कबहुँन छाँडै साथ ।**
**प्रभा प्रसारण हौं मिला, तो कत व्यापैं रात ।।४३।।**

**भावार्थ -** असा पुरुष सर्वांपेक्षा वेगळा असतो तो वृत्तीने निर्लेप असतो. तो जेव्हा चराचराला प्रकाश देणाऱ्या ''प्रभा प्रसारण'' मध्ये विलीन होतो तेव्हा ''तो कल व्यापे रात'' जगतरूपी रात्र त्याला आवृत्त करू शकत नाही.

**अभिनय कारण ही लखै, माया मौलिक जीव ।**
**आयु दिन में चेतिये, जन प्रति पालै पीव ।।४४।।**

**भावार्थ -** ही दुस्सर माया ईश्वराचा मौलिक अंश जो जीवात्मा त्याला आपल्या अभिनयासाठी आपल्या जाळ्यात अडकविते. परंतु जो मनुष्य आयुष्य जगताना सावध होतो व निरंतर प्रभूभक्तीत लीन होतो अशा भाविक भक्ताचे प्रतिपालन प्रभू अवश्य करतात. परिणामत: त्या भक्ताचे परम कल्याण होते.

**माया अभिनय कारने, कटक संभारे धाय ।**

**काम क्रोध अंधियार भट, मोह धरातल जाय ।।४५।।**

**भावार्थ -** आपल्या स्वभावगत अभिनयासाठी माया साधकाचे ध्यानात अवरोध निर्माण करून आपले काटेरी जाळे ती पसरते. आणि काम, क्रोध, लोभ इत्यादी वीरांसह साधकाच्या अंत:करणात प्रवेश करून त्याचे अंत:करण मोहाने आच्छादित करून टाकते. ह्यातूनच नारकीय परिणामांचे सृजन होते. मायाच याला कारणीभूत असते.

**वीर विजेता बावला, सब जग त्यागी राग ।**

**विकल विरह अनुभव निरत, ताहि सलोने भाग ।।४६।।**

**भावार्थ -** जो पुरुष वीर, विजेता तसेच विरही आहे, कामनांचा त्याग करून जो अनुभवात अनुरक्त आहे; त्याच्यासाठी माया कल्याणकारी बनत असते. अशा पुरुषांचे भाग्य प्रशंसनीय आहे.

**वीर विजेता मानवा, जब जग त्यागी राग ।**

**रे मन तन जर्जर भया, चोंच संवारे काग ।।४७।।**

**भावार्थ -** तोच वीर, विजेता मानव आहे ज्याने समस्त जगतातील आसक्तीचा त्याग केला आहे. परंतु भक्त अजूनही आपल्या मनाला सतत कोसत राहतात की अरे मना, ''तन जर्जर भया'' हे तन जरेने जीर्ण होत चालले आहे, स्मशानातील कावळे त्याच्यावर चोच मारण्यासाठी तयार होऊन बसले आहेत. अरे तरीही तू जागा होत नाहीस? सावध होत नाहीस का?

## भावनेचे महत्त्व

**भाव हरि के पद सुने, भावे प्रीतम पाय ।**

**अड़गड़ मन भावी मिटै, जो मन भाव समाय ।।४८।।**

**भावार्थ -** भक्ताच्या अंतरंगातील भावनाच हरिपदांचे श्रवण करीत असतात. भावनेमुळेच त्या परम प्रियतमाची प्राप्ती शक्य आहे. ''भावे विद्यते देव'' भावनेमध्ये ती क्षमता आहे जी अदृश्य परमात्म्याला प्रकट करू शकते. मुर्धन्य महापुरुष म्हणतात की मन जर भावनेमध्ये स्थित झाले तर त्याच्या अंतरंगातील भावनाही नष्ट होऊ शकते.

## सद्‌गुरू महिमा

**सद्‌गुरु प्रेरितय में फले, पत राखे करतार ।**
**अड़गड़ मनसा गरब है, क्यों कर उतारे भार ।।४९।।**

**भावार्थ** - वास्तविक सद्‌गुरुच्या अंत:प्रेरणेनेच साधकाच्या चिंतनाचा पथ सफल होत असतो. या प्रेरणेच्या बळावरच प्रभू भाविकाची पत ठेवत असतो. पण जर मनात गर्व असेल तर मात्र संसृतीचा भार तो उतरू शकत नाही; त्यागू शकत नाही.

**स्वर्ण सुमेर केहि काम के, जहँ के तहँ अनमोल ।**
**मलय प्रशंसन हौं फिरो, बासत ढाक ककोल ।।५०।।**

**भावार्थ** - सोन्याचा सुमेर पर्वत काय कामाचा? तो जेथे आहे तेथे तो अनमोल असतो. मी तर त्या मलयगीरीची प्रशंसा करतो जो पळस आणि कंकोळालापण सुगंधित करतो. तात्पर्य संत असे परोपकारी असतात.

## माया-दल

**बिना इष्ट जीते नही, नख सिख इन्द्री भूत ।**
**किये कल्पना कब लहे, बाँझ सलोना पूत ।।५१।।**

इष्टदेवाच्या कृपेशिवाय केवळ ब्रह्मज्ञान कथनाने नखशिखान्त भौतिक संस्कारांवर अधिपत्य होत नाही. वांझ स्त्री पुरुषांनी कल्पनेत सुंदर पुत्राला जन्म देऊन काय अर्थ? तेव्हा साधना तसेच तिची पूर्ती करवणारा सद्‌गुरु या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

**आसिम अन्तर मे सदा, दात दीन मुनिराई ।**
**'अड़गड़' अन्तर ना फले, कैसे छुटे काई ।।५२।।**

**भावार्थ** - या श्लोकात साधकाच्या अवस्थेकडे महापुरुष निर्देश करीत आहेत. ''दात दीन्हि मुनिराई'' म्हणजे गुरुदेव अंतरंगातून आशीर्वादाच्या रूपात एक विशिष्ट वस्तू देत असतात, परंतु मनामध्ये ईश्वराविषयी केवळ प्रेम असून भागत नाही, त्यासाठी मनाची पकड, जिद्द व आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे. ते झाले नाही तर संचिताचा थर-मळ कसा नष्ट होणार?

**माया बिल्ली सब कहे, हरि दिल्ली का ताज ।**
**दिल दिल्ली अब सून है, अडगड बिल्ली राज ।।५३।।**

**भावार्थ -** ''माया बिल्ली सब कहे'' संतानी मायेला मांजराची उपमा दिली आहे. हिंदीमध्ये एक म्हणपण आहे ''बहुतै बचायो बिलारि चहै झपटी'' (फार वाचवलेत तरी मांजर त्याचा फडशा पाडेल.) हरीला हृदयरुपी दिल्लीचा सिरताज म्हटले जाते. परंतु हृदयाच्या दिल्लीमध्ये मायेला सिंहासनाधिष्ठित केले तर भगवंताला कोठे बसवाल?

**ढूंढत आनन खोल के, इन्द्री दस जहँ भोग ।**
**तहँ तहँ मोह विशेष मे, 'अडगड' मानस रोग ।।५४।।**

**भावार्थ -** जेथे इंद्रियांचे भोग आहेत तेथे दहाही इंद्रिये तोंड वासून धावत सुटतात आणि त्याचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतात. इंद्रिये जेथे जेथे भोग घेतात ''तहँ तहँ मोह विशेष''- तेथे तेथे विशेष आकर्षण, आसक्ती असते. महापुरुष म्हणतात की हाच मनाचा भयंकर रोग आहे. वास्तविक भोग आणि इंद्रियांची आसक्ती हेच मोहाचे मूळ कारण आहे.

**लोभ न देखे मात को, तात न जानन जोग ।**
**सुहृद नीति वह ना लखे, 'अडगड' लोलुप भोग ।।५५।।**

**भावार्थ -** जेव्हा मनुष्य लोभी बनतो तेव्हा तो माता पित्यालाही विसरून जातो. मित्रता तसेच नीतीचाही तो पुरुष त्याग करतो.

**मदमाता मनवां फिरे, लखे न आखिर अन्त ।**
**अहंकार बल अन्त मे, माया रोके संत ।।५६।।**

**भावार्थ -** मदाने मत्त झालेले मन जेव्हा इतस्तत: भटकत राहते. याचा परिणाम शेवटी सर्वनाशात होत असतो. वास्तविक अहंकार हाच असा शत्रू आहे की तो मायेच्या माध्यमातून संतांच्या मार्गात अवरोध निर्माण करतो व त्यांना त्यांच्या मार्गातून च्यूत देखील करतो.

**घर त्यागे बन-बन फिरे, मदन समाया बान ।**
**टूट समाधी फूट चित, अनल कीट सम जान ।।५७।।**

**भावार्थ -** घरदार सोडून वनामध्ये जाऊन ईश्वरचिंतनात सतत प्रयत्नशील असणाऱ्या साधकांमध्ये जेव्हा ''मदन समाया बान'' मदनाचा संचार होतो तेव्हा त्याचे चित्त विचलित होते, समाधी भंग पावते. ते मन दीपकावर झेपावणाऱ्या पतंगाप्रमाणे तुच्छ बनते व मग ते भजन करू शकत नाही.

**सूर हते संकट करे, माया तोषत धीर ।**
**सुख समृद्धि की वासना, वेधि जीव इक तीर ।।५८।।**

**भावार्थ -** एखादा शूर वीर जेव्हा आक्रमण करीत असतो तेव्हा तो प्रथमपासूनच प्रतिपक्षाला सावध करीत असतो. संकटाची चाहूल आधीच लागत असते. पण मायेचा प्रहार अचानक असतो व त्या प्रहाराने ती साधकाला धैर्य देते. सुख-समृध्दीच्या वासनारूपी एका तीराने जीव संमोहित होतो व जीवाची ओढ सत्तेकडे लागते व अशाप्रकारे माया जीवाला घायाळ करून परास्त करते. गोस्वामी पण हेच म्हणतात-

**नोगी तापस शूर कवि कोबिद गुन आगार ।**
**केहिं के लोभ विडम्बना कीन्ह न एहि संसार ।।**

## गृह-परिवार

**'अडगड' भय लज्जा करी, आज वो कायर दीख ।**
**काम कुसुम की मार से, लगे न साँची सीख ।।५९।।**

**भावार्थ -** साधारणत: सुशिक्षित बालक वडिलधाऱ्यांसमोर संकोच करीत असतो. परंतु कधी तोच मूलगा अत्यंत भित्रा व हीन लक्षणांनी युक्त बनतो. कारण ''काम कुसुम की मार से, लगे न साँची सीख।'' अर्थात काम कुसुमाच्या प्रहारामुळे त्याचे मन विचलित होते व खरी शिकवण त्याला पटत नाही. तेव्हा मुलांना सत्पुरुषांचा सत्संग अतीव महत्त्वपूर्ण आहे.

**काम करावे सो करे, रोक भगत की सीख ।**
**त्रयतापो की ज्वाल में, मन पतंग की भीख ।।६०।।**

**भावार्थ -** कामवासना ही एक अशी नशा आहे की, त्या नशेच्या इशाऱ्यावर मनुष्य चालतो, तसेच करतो. त्याच्या जाळ्यात अडकल्यावर भक्तीमध्ये अवरोध निर्माण

होतो. ''त्रय तापों की ज्वाल में मन पतंग की भीख'' तात्पर्य हे की मन तीन तापामध्ये होरपळत असतानाही पतंगाप्रमाणे विषयरूपी ज्योतीचाच ध्यास घेते.

**अमित बार आतम हता, चारों जुग में धाक ।**
**कुम्भकरन 'अडगड' मिला, सत योजन की नाक ।।६१।।**

अनेक वेळा ज्याने आत्म्याची हत्या केली आहे, चारी युगांमध्ये ज्याचा धाक आहे असा क्रोधरूपी दुर्जेय कुंभकर्ण येऊन मिळाला. ''शत योजन की नाक'' महापुरुष म्हणतात की असा हा कुंभकर्ण युगायुगांपासून अर्जित अशा मर्यादेला नष्ट करण्यासाठी कटिबद्ध आहे. नाक हे मर्यादेचे प्रतीक आहे.

**आतम हन करतूत का, क्रोध पसारा तार ।**
**सोवत में सहसा जगे, सद्‌गुरु पथ सो पार ।।६२।।**

**भावार्थ -** क्रोधाचा महिमा सांगताना महापुरुष इशारा देत आहेत की आत्महत्येच्या कारभारात क्रोधानेच मोठा भाग बजावला आहे. तो सदैव असत नाही. मनाच्या अंतरंगामध्ये झोपलेला असतो. प्रतिकूल स्वभाव प्राप्त होताच तो जागृत होतो. जो पुरुष सद्‌गुरुच्या मार्गाचा पथिक आहे त्यालाच त्याचे निदान समजते. दुसऱ्यांना नाही.

**भजन भाव संगत करी, दुर्बल लखा न कोइ ।**
**अगम पूर्तिक मे, सबल संत मति होइ ।।६३।।**

**भावार्थ -** भजन आणि भावाची सोबत करणारा कोणीही पुरुष दुर्बल राहत नाही. शबरी स्वत:ला अत्यंत दुर्बल, अधम समजत होती. परंतु एक वेळ अशी आली की भगवान श्रीरामचंद्रांनी तिला दर्शन दिले. ती संपूर्णतया सबल बनली. त्या अगम्य तत्त्वाच्या पूर्तिकालात पुरुष सामर्थ्यवान तसेच संताप्रमाणे बनतो.

**क्रोधहिं तन कम्पन लगे, क्रोध मिलावे छार ।**
**आतमहन बहु काण्ड मे, देखा क्रोध अपार ।।६४।।**

**भावार्थ -** क्रोधामुळे शरीरात कंपन जागृत होते आणि क्रोधच मनुष्याला नष्ट करतो. आत्महननामध्ये ''देखा क्रोध अपार'' क्रोधाचाच प्रभाव अधिक असल्याचे दिसून येते.

**मत्सर तृष्णा तोय में, विकसित व्यथा अनन्त ।**

**ईर्षा अन्तर जीव में, अहनिशी माया तंत ।।६५।।**

**भावार्थ -** ''मत्सर तृष्णा तोय मे'' तृष्णारूपी पाण्यात मत्सर सदैव स्थित असतो जो अनंत भोगांचा विस्तार करतो. जर जीवाच्या अंतर्मनात ईर्ष्या असेल- तिचा प्रभाव असेल तर ती नेहमी मायेचाच सूत्रपात करत असते.

**मत्सर तृस्ना तोय मे, विकसित विपुल विलास ।**

**जब लगि व्यापी जीव में, तब लगि रुके न स्वांस ।।६६।।**

**भावार्थ -** तृष्णारूपी पाण्यात मत्सराचा संचार असतो जो विभिन्न भोगविलासांचा विस्तार करतो. जोपर्यंत जीव त्याने वेढलेला असतो तोपर्यंत श्वासाची गती थांबत नाही.

**बिना संकल्प सून्य है, स्वॉस चरै ना माय ।**

**सर्वरूप सुधि आतमा, अन्दर प्रगटे काय ।।६७।।**

संकल्प-विकल्प रहित मनाची अवस्थाच शून्य समजली जाते. अशा अवस्थेत श्वास मायेचे चिंतन करीत नाही; तर त्यावेळी सर्वत्र व्याप्त असणाऱ्या आत्म्याचा संचारच या शरीरात परिलक्षित होत असतो. साधना काळातील दु:खावर प्रकाश टाकताना पुढील दोह्यात महापुरुष सांगतात-

**जग अँधियारी एक थी, हरि अँधियारी ठाट ।**

**चक्षु चौपट बाँध के कौश कहे चले बाट ।।६८।।**

शब्दार्थ- कौश- दढावणे, एखादी चूक झाल्यानंतर त्याबाबत वरचेवर रागावणे.

**भावार्थ -** या मार्गावर एक मोठी अडचण अशी की ''जग अँधियारी एक थी, हरि अँधियारी ठाट'' या जगामध्ये द्वन्व्द तर पहिल्यापासून होतेच पण परमेश्वराच्या भेटीला जाण्यासाठी प्रारंभिक निर्देशपण अस्पष्ट असतात. म्हणजे या मार्गावर सुध्दा धुसर आवरण आहे. डोळ्यावर चार पदरी पट्टी तर बांधलेली आहेच आता रस्त्याने नीट चला, नीट चला असे दटावत आहेत. बिचारा कसा चालेल? असे व्यवधान दिसल्यावर सुध्दा स्रष्टा, आराध्य बरोबरच राहतो. तेव्हा त्याच्यावर भार टाकून आश्वस्त राहा.

# नीति संग्रह

**बाँझहि व्यापित चपल मति, कुष्टी कुपित अधीर ।**
**निर्वन्सी 'अडगड' लखा, व्याकुल गृह की पीर ।।६९।।**

**भावार्थ -** वांझ लोकात वासनेचे चापल्य अधिक असते. कुष्ट रोग्याला राग अधिक येतो. त्याप्रकारे निर्वन्शी-लोक गृहस्थ धर्माचा प्रबंध करण्यात अधिक दक्ष असल्याचे दिसून येते.

**परम आतमा दरस की, एक अनूठी रीत ।**
**पथिकन में जेहि हरि गहे, तिन्हे मिले अलिखीत ।।७०।।**

**भावार्थ -** परमात्म्याच्या दर्शनाची एक वेगळीच विलक्षण रीत आहे. सहस्त्र साधकांपैकी प्रभू ज्या साधकाचा स्वत: स्वीकार करतात केवळ त्यालाच ''तिन्हें मिले अलिखीत'' जे लिहिता येत नाही म्हणजेच ज्याचे वर्णन करता येत नाही असे तत्त्व प्राप्त होते.

**बहुश्रुत वाणी ना मिले, गहनि मिले भगवान ।**
**विपुल बुध्दि सों ना मिले, मिले वो जतन करान ।।७१।।**

**भावार्थ -** प्रभूविषयी खूप श्रवण करण्याने, बोलण्याने किंवा प्रवचन करण्याने प्रभू मिळत नाही. तो मार्ग कशा प्रकारे प्राप्त करायचा त्याची त्याला माहिती हवी व त्याप्रमाणे कृती करण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न हवेत. विचक्षण बुध्दीने देखील ईश्वर प्राप्त होत नाही. जे अत्यंत प्रयत्नशील आहेत त्यांनाच ईश्वरप्राप्ती होते. योगेश्वर श्रीकृष्ण देखील हेच सांगतात की अर्जुना, प्रयत्न करूनच योगीजन ते तत्त्व प्राप्त करीत असतात.

**आतुर कोटिन संत मे, जिन्ह कहँ पकडा राम ।**
**करणी सफल बखानिये, बिनु स्त्रम पावहि धाम ।।७२।।**

**भावार्थ -** कोट्यावधी साधकांमधून ज्याचा हात पकडून भगवंत स्वत: त्याला चालवतात त्याचीच ''करनी सफल बरवानिये'' व त्याचेच चिंतन सफल होते. अशा प्रकारे ईश्वराकडून संरक्षित झालेला साधक अन्य परिश्रमाशिवाय परधामाची प्राप्ती करून घेऊ शकतो.

## शत्रू

**कुटिल कर्म ही शत्रु है, आतम हने दुकाम ।**
**महामित्र इक राम है, 'अडगड' करनी थाम ।।७३।।**

**भावार्थ -** मनुष्याचे कुटिल कर्म हाच त्याचा शत्रू आहे. दूषित कुकृत्य म्हणजेच आत्म्याची हत्या आहे. महानतम सहाय्यक फक्त एकमात्र श्रीराम आहे. जर त्या रामाला प्राप्त करायचे असेल तर कुटिल वृत्तीला मनाच्या अंतरंगातच डांबून टाका.

**महाशत्रू ग्रह धाम है, महामित्र सम राम ।**
**'अडगड' काया के रहे, सदगुरु के पद थाम ।।७४।।**

**भावार्थ -** मनुष्याचे घर व त्याचे शरीर (देह) हे महान शत्रू आहेत कारण गृहप्रपंचामध्ये मनुष्याने मन अधिक रत होत असते. परम हितैषी एकमात्र श्रीराम आहे. तेव्हा महापुरुषाचा असा सल्ला आहे की हा देह असतानाच मनामध्ये सद्‌गुरुच्या चरणांना स्थान द्या.

**सुख सों उपजत राग है, दु:ख से उपजत द्वेष ।**
**'अडगड' यहि संसार के, सुख दु:ख है परदेस ।।७५।।**

**भावार्थ -** अनुकूल पदार्थ प्राप्त झाल्याने सुखाची प्रतीती होते व त्यातून प्रेम-सुख उत्पन्न होते. याच्या उलट प्रतिकूल पदार्थांपासून दु:खाची अनुभूती होते. त्यातून द्वेष निर्माण होतो. राग-द्वेषाचा उदगम असल्याने सुख-दु:ख पर देश आहे ते आमचे धाम होऊ शकत नाही.

**सुरत डोर की संग में, गगन महल में जीव ।**
**'अडगड' का घर अन्त में, जहँ जन जीव न पीव ।।७६।।**

**भावार्थ -** जेव्हा प्रभू चरणी श्वास-प्रश्वासाची एकतानता होते, तेव्हा ''सुरत डोर के संग मे गगन महल मे जीव'' जीवात्मा आकाशवत होतो. या महापुरुषाचे घर त्या अनंतात आहे जेथे जन भक्त, जीव व स्थूल विलीन होतात.

**मन ज्योति अधिकार है, मन माया विसरात ।**
**'अडगड' तिन्ह को पार है, जहँ मन दीन्हा साथ ।।७७।।**

**भावार्थ-** मन ज्योतीचा अधिकारी आहे. मायेच्या जाळ्यात अडकल्याने मन सन्मार्गाला विसरून जाते. ज्याचे मन चिंतनात एकाग्र होते त्याच पुरुषाचे लक्ष्य पूर्ण होते, त्याचाच हेतू तडीस जातो. तेव्हा मनाला सतत सन्मार्गावर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**।।ॐ।।**

# दोहे-संग्रह

**अड़गड़ करनी करि गये, सब जग ऊसर रूप ।**
**जे 'अड़गड़' अवधूत है, सारे जग का भूप ।**
**'अड़गड़' करनी करि गये, जग भया ऊसर एक ।**
**स्वयं शरीरा जल गया, बचा न एक अनेक ।**
**बिना इष्ट जीते नहीं, नख सिख इन्द्री जाल ।**
**भूतऽरु भविता मे स्त्रवे, मनवाँ विष बौछाल ।**
**सूरत सों गुरु मूरती, स्वाँसा मा सत नाम ।**
**उर अंदर देखत रहे, अनुभव सारे काम ।।**
**जेहि घट सदगुरु पूर है, सो सब साँचा जान ।**
**ज्यों ज्यों घ्यावे रूप को, त्यों हरि काटे काम ।।**
**पुण्य पुरातन साथ दे, पुरुष चले गुरु ग्राम ।**
**जग की दुविधा भेट के, पहुँचे हरि के धाम ।।**
**योग अगनि की परत में, छिपा अमिट भगवान ।**
**'अड़गड़' सदगुरु सेव बिनु, योग तरंगित तान ।।**

**भावार्थ -** तो अपरिवर्तनशील अलख भगवान योगानलाच्या सूक्ष्म लहरीमध्ये लपलेला आहे. तो सद्‌गुरुच्या सेवेनेच प्राप्त होत असतो. जर उपर्युक्त योग्यता नसेल तर तो योग म्हणजे जादूगाराचा खेळ मात्र ठरेल.

**युग विधि आगी जगत में, तारन मारन भेद ।**
**अड़गड़ करनी एक मे, एक बढ़ावे खेद ।।**

**भावार्थ-** अग्नी दोन प्रकारचा असतो एक तारणारा योगानल आणि दुसरा मारणारा विषयानल ! योगाग्नी परमात्म्याचे दर्शन करवते आणि पूर्ण निवृत्ती प्रदान करते ज्यामध्ये ती 'अड़गड़ करनी' (अवधूत करनी) असते. विषयाग्नीचा परिणाम दुःखदायक असतो.

**योग अगिनि सदगुरु कृपा, जागत मन के बीच ।**
**अड़गड़ सदगुरु ना मिला, भजन जल्पना कीच ।।**

**भावार्थ -** सद्‌गुरुच्या कृपा प्रसादानेच मानवाच्या मनातील अंतरंगात योगाग्नी जागृत होतो. जर सद्‌गुरु मिळाले नाहीत तर भजन तर होईल; परंतु तो निरर्थक बडबड ठरेल. त्यातून मोक्ष-निवृत्ती प्राप्त होणे असंभव आहे. फक्त योगसाधनेत प्रवेश करायला मात्र असे भजन सहाय्यभूत ठरेल.

**त्रय तापों की ज्वाल से, जलते सकल जहान ।**
**अड़गड़ वे भी ना बचे, जिन्हें अनूपम भान ।।**

**भावार्थ -** दैहिक, दैविक व भौतिक तापाच्या दाहकतेने सर्व लोक सारखेच पोळून निघतात. कोणालाही निवृत्ती प्राप्त होत नाही. अवधूत स्थिती प्राप्त झालेले संत म्हणतात की जे लोक निरुपम बौध्दिक स्तर प्राप्त करतात ते सुध्दा या दाहकतेपासून वाचू शकत नाहीत.

**मन बुध्दी गति भान तक, परम रूप अनजान ।**
**अड़गड़ मन तद्रूप जे, पावा पूर समान ।।**

**भावार्थ -** मन आणि बुध्दीच्या गतीने केवळ लौकिक विषय प्राप्त होतात; परंतु ते परमतत्त्व तर मन बुध्दीच्या कल्पनेपलीकडचे आहे. त्यामुळे मन आणि बुध्दीला ते तत्त्व कधी समजत नाही. अवधूत स्थिती प्राप्त झालेले संत म्हणतात की जर मन मानसिक प्रवृत्तींना वश करून इष्टमध्ये तद्रूप झाले, परम स्वरूपामध्ये त्याचे ध्यान लागले तर अशी अवस्था प्राप्त करणारा भाविक पूर्णामध्ये समाहित होऊन इष्टवत स्वरूप प्राप्त करतो.

**मन युक्ती सों ही रुके, माला टालो लाख ।**
**सद्‌गुरु प्रेरक आत्मा, मानव का बल खाख ।।**

**भावार्थ -** मनाचा निरोध ही योगयुक्ती जागृत झाल्यानेच शक्य आहे. चित्तवृत्तीच्या निरोधाचे अन्य उपाय योगसाधनेत प्रवेश देण्यास फक्त सहाय्यभूत होतील. त्यांच्यामुळे मनाचा नितांत निरोध असंभव आहे. जेव्हा सद्‌गुरु साधकाच्या आत्म्याशी अभिन्न होऊन प्रेरकाचे कार्य करु लागतो तेव्हा त्या योगयुक्तीमध्ये पूर्णता संभव आहे. या प्रक्रियेमध्ये इष्टप्रेरित साधकाचा अहंकार नष्ट होतो.

**अन्दर का आदेश धर, चलता साधक शूर ।**
**बिन सद्गुरु अड़गड़ नही, निशिदिन प्रेरक नूर ।।**

**भावार्थ -** अंतर्जगतामधून मिळालेले आदेश घेऊन साहसी साधक साधनामार्गावर जाण्याचा प्रयत्न तर करतो परंतु प्रेरणा देणारे तेज जे सद्गुरु त्यांच्या शिवाय तो मार्ग पार करणे असंभव आहे. असे अवधूत स्थिती प्राप्त करणाऱ्या संताचे सांगणे आहे.

**भजन करत है हरि स्वयं, अड़गड़ का है साथ।**
**चलता बँध कर डोर में, डोर हरी के हाथ।।**

**भावार्थ -** वास्तविक श्रीहरी स्वयं भजन करवत असतात. अवधूत म्हणतात की परमेश्वर पथिकाची सतत सोबत करीत असतो. तो पथिक परमेश्वराच्या सूत्राने बांधला जातो आणि यंत्रवत् बनतो म्हणजे परमेश्वराच्या आदेशाप्रमाणे चालतो. जीवनाची जबाबदारी ईश्वराच्या हातात सोपवून तो निश्चिंत राहतो.

**अब प्रति बन्धन हू कटा, आज्ञा पालन केर।**
**अड़गड़ वे रुठत नही, अन्त दरश मे देर।।**

**भावार्थ -** या चिंतनाच्या मार्गात अशी पण एक वेळ येऊन ठेपते की तेथे आज्ञापालनाचा प्रणिबंधपण दूर होतो. साधनेच्या या अवस्थेत भगवंताचे विशेष वात्सल्य पथिकाला लाभते. त्यामुळे त्याने आज्ञा-पालन केले नाही तरी ईश्वर त्याच्यावर रागवत नाही; तथापि अद्याप त्याला ईश्वाराचे दर्शन झालेले नसते. या अवस्थेत प्रभू आता भेटतील मग भेटतील असा साधकाला आभास होत राहतो. हा स्तर-म्हणजे साधक आणि स्वामी या दोघांच्या अनुकलतेचा व वात्सल्याचा आहे.

**जवन लोक मे जना खडा, अड़गड़ मिलना आश।**
**डर अन्दर संचार ना, करे न माया पाश।।**

**भावार्थ -** प्रकृतीच्या ज्या स्तरावर साधक मिलनाच्या आशेने उभा आहे, त्या स्तरावर उतरून इष्ट स्वयं हृदयदेशात समहित होऊन जोपर्यंत अनुभवाचा संचार करीत नाही तोपर्यंत प्रकृतिजन्य फास नष्ट होण्याचा संभव नाही. म्हणजेच क्रियेचा प्रादुर्भाव प्रत्यक्ष प्रेरणेने होत असेल जो दर्शनाचा प्रारंभ असतो.

**अलख निरंजन ना लखे, जन के आरत थाव ।**
**उर अन्दर संचार ना, अड़गड़ डूबी नाव ।।**

**भावार्थ -** भवसागराच्या उसळणाऱ्या लाटांच्या आघातांनी त्रस्त झालेला, कायारूपी नावेत बसलेला जीव आपण आता बुडून जाणार या भयाने व्याकूळ होऊन आपले रक्षण करण्यासाठी त्या प्रभूची प्रार्थना करीत नाही आणि त्यांच्या आर्तनादाने द्रवित होऊन जोपर्यंत त्या पथिकाच्या हृदयाचा कर्णधार बनून अवतरत नाही तोपर्यंत जीवनरूपी नाव बुडली आहे असे समजा. म्हणजे तोपर्यंत नावेत नाविकाने स्थान ग्रहण केले नाही असे समजावे.

**गरभवास की राह में, खडा अकेला जीव ।**
**समरथ सारण न मिला, तो नहि पावे जीव ।।**

**संकेत-** प्रकृतीच्या क्षेत्रात स्थित असणारा जीवपण गर्भवासाच्या शृंखलेत बद्ध असतो.

**जेहि दल दल मे हो खडा, तहाँ न उतरें राम ।**
**परमधाम हरि छाडिको, जन नहि लेते नाम ।।**
**तब लगि साधक शूल है, एक सहारा नाम ।**
**चक्षु रोपित साधना, डगर भुलाना धाम ।।**

**संकेत-** मानस चक्षूमध्ये जोपर्यंत ते आरोपित होत नाहीत तोपर्यंत साधक परमतत्त्वाचा मार्ग विसरला आहे असे समजावे.

**भजन करो रति राम में, ध्यान धरो निरबाध ।**
**जेहि दिन हरि आदर करें, तेहि दिन पूरी साध ।।**
**ध्यान धरे सेवा करे, वंदन आठो याम ।**
**सद्गुण हरि आदर बिना, कबहुँ न आवे काम ।।**

**।।ॐ।।**

# प्रेरक दोहे

**उर प्रेरक नित संग में, छन संशय छन जान ।**
**जब लगि हरि सुमिरे नही, अनुभव में अज्ञान ।।**

**भावार्थ -** अनुरागी साधकाच्या जागृती स्तरातून जेव्हा हृदयस्थ असणारा प्रेरक प्रभू सतत बरोबर राहू लागतो तेव्हा ज्ञानाच्या प्रकाशात साधकाच्या सर्व शंकाकुशंकांचे तो निराकरण करतो. तो प्रभू साधकाच्या मनात संशय, संकल्प हे सर्व निर्माण होण्यापूर्वीच विद्यमान असतो. त्यामुळे मनात निर्माण होणाऱ्या शंकांचे तो समाधान करतो, कुतर्कांचे निराकरण करतो. पण साधक या ज्ञानाच्या अनुरूप आपल्या साधनेत अथवा चिंतनात प्रवृत्त झाला नाही तर त्याच्या अनुभवात अज्ञानाचा प्रवेश होतो.

**आपा काटन उतरे, बीच न राखे कोय ।**
**अनत कही अवतार ना, परम आतमा सोय ।।**

**भावार्थ -** साधकाच्या आपदांचा- जीवात्म भावाच्या संकीर्णतेचा उच्छेद करण्यासाठीच इष्ट त्या हृदय देशात अवतरित असतात. तो प्रभू साधकापासून लेशमात्रही दूर राहत नाहीत. ज्या आत्म्यामध्ये ते विदित होतात तोच परमात्मा असतो. हाच अवतार होय. अन्यत्र कोठेही अवताराचा प्रादुर्भाव होतच नाही.

**प्रेरक बन रस्ता चले, जो कोइ सेवक होय ।**
**स्वयं सीस चरनन धरे, दास कहावे सोय ।।**

**भावार्थ -** जो प्रभूचा सच्चा सेवक आहे त्याचा मार्ग प्रभू स्वत:च नक्की करीत असतात त्याला तशी प्रेरणा देत असतात. मात्र ती प्रेरणा मिळवण्यासाठी साधकाने स्वत:ला सर्वतोभावेत संपूर्णपणे समर्पण करणे आवश्यक आहे.

**चेतो अपने आप मे, छोडो मन की माख ।**
**मन मतिया अभिमान है, भजन मिलानी खाख ।।**

# देवता

**सभी जगत के देवता, जोर लगावे जाय ।**
**जब लगि सतगुरु सीख ना, मूरख गोता खाय ।।**
**प्रथम सीढि के देवता, अवसि लगावे पार ।**
**आगे सीढी अनत की, गुरु महिमा आधार ।।**
**देवन पूजा एक तक, अरथ पाय बस बोल ।**
**मन चाहो परतत्व को, सतगुरु संगत डोल ।।**

**भावार्थ -** देवी-देवतांची पूजा करणे हा साधनेचा प्रारंभिक स्तर आहे. या पूजेने साधकाला सिध्दी व संपत्ती मिळते. परंतु परमतत्वाचे मार्गदर्शन या स्तरावरून मिळणे असंभव आहे किंबहुना त्याच्या क्षमतेच्या ते पलीकडचे असते. तेव्हा जर हृदयपूर्वक परमतत्त्व प्राप्त करण्याची इच्छा असेल तर सद्गुरूंच्या सहवासात जा. त्यांच्या संकेताप्रमाणे वागा, त्यांच्या आदेशांचे पालन करा.

**देवी देवता सत्य है, आधी दूरी अन्त ।**
**आगे सतगुरु एक है, काटत बाधा जन्तु ।।**
**शब्दार्थ- जन्तु = क्षुद्र मायिक जीवन**
**भजन भरोसे एक लगि, अब हरि साधा मौन ।**
**जन वन्दन गति ना मिले, बन्धन काटे कौन ।।**
**करता धरता आप है, संत कटत कर जोर ।**
**जहँ गुरु प्रेरक ना मिला, अन्य मचावे शोर ।।**
**प्रभुवर पूरा करत है, उज्वल पूरा खेत ।**
**जग अधियारी तब मिटे, मन उजियारी लेत ।।**

# चेतावनी

**विष विषया के गर्त में, विष ही विष चिल्लाय ।**
**मन संतुलन मिट गया, सीख कहाँ ठहराय ।।**

**मदमाते ऐंठे फिरै, विजय आश दिन जात ।**
**अन्त समय पछतावना, रहा न संग कोउ साथ ॥**
**विषयानल में है पड़ा, जलता आठो याम ।**
**क्षण भंगुर सुख कारने, टूटा हरि का धाम ॥**
**आशा ऐसा जाल है, फँसे सयाने आय ।**
**श्रृंगी की परतीति ना, गुरु रहे विलमाय ॥**
**शब्दार्थ- विलमाय- पश्चाताप करीत सहन करणे**
**जब लगि हरि नहि आदरे, करम कटे न कोट ।**
**हरि अनुशासन ना मिली, भजन भाव मे खोट ॥**
**भोले बालक भक्त है, आज्ञा सहे न भार ।**
**माता सम पालन करे, हरि सभालें सार ॥**

**भावार्थ -** परमेश्वर मातेप्रमाणे भक्ताचे रक्षण करीत असतो, त्याच्या योगक्षेमाची काळजी वाहत असतो. भक्तामध्ये असणाऱ्या सारतत्त्वाचे रक्षण स्वत: भगवंतच करीत असतात, तसेच भक्ताला मार्गावर नीट ठेवण्याचे कार्यही भगवंतच करीत असतात.

## साधनेचा आरंभ

**जेहि क्षण हरि लीला करै, कारण करै जन हेत ।**
**सब जन ज्वाला पलक मे, कटै लगे हरि हेत ॥**

**भावार्थ -** साधकाच्या जीवनात ज्या वेळी श्रीहरिला काही लीला किंवा बदल करावयाचा असेल तेव्हा जन हिताच्या हेतूने तशाच प्रकारचे निमित्त उत्पन्न करतात किंवा संरचना करतात. ज्या प्रकारे गोस्वामी तुलसीदास तसेच राजा भर्तुहरीसाठी स्त्रीचे, गौतम बुध्दांसाठी जरा, शव, रोग इत्यादींचे तसेच परमहंस आणि इतर अन्य महापुरुषांसाठी आकाशवाणीचे तर काहींना स्वप्नसंदेशाचे निमित्त निर्माण केले. या लीलाधराच्या अनेक लीलांपैकी तीन कारणे मुख्य आहेत.-

(अ) कोणाच्या वाग्बाणांनी दु:खी होण्याने किंवा मान-मर्यादा न राखण्याने म्हणजेच अपमानित होण्याने

(ब) एखाद्या भयावह दृश्याने भयभीत झाल्याने

(क) ईश्वराचा आदेश आकाशवाणी, स्वप्न- इत्यादीतून झाल्याने.

प्रभूच्या कृपेने साधकाच्या मागे लागलेल्या संकटाच्या ज्वाला एका क्षणात नाहीशा होतात व तो साधक मग हरीचरणी लागतो.

**पल छिल करुना करत ही, रुचे न जग की रीत ।**
**सगे सबन्धी अस लगे, मरण कल की चीत ।।**

**भावार्थ -** क्षणमात्रासाठीपण ज्याला कोणाला प्रभूची करुणा प्राप्त झाली त्याला जगाचे रीती-रिवाज, लौकिक व्यवहार हे आवडेनासे होतात. आप्त सोयरे संबंधी लोक तर त्याला मृत्यूसारखे वाटतात.

**जो अनुरागा अंग मे, नख सिख व्यापी मूर ।**
**राति दिवस ना लखि पड़े, हरि हित लड़े जरूर ।।**

**भावार्थ -** साधकाच्या शरीरात प्रभूबद्दल जेव्हा अतीव प्रेम निर्माण होते प्रभूप्रेमाची मुळी किंवा मात्रा त्याच्या नखाशिखांत भरून जाते तेव्हा कोणाचीही पर्वा न करता पण हितैषी हरीला प्राप्त करण्यासाठी तो सतत प्रयत्न करतो किंवा संघर्ष करतो आणि मनसहित इंद्रियांच्या विषय प्रवाहाचा निरोध करण्यासाठी आणि त्यांना इष्टामध्ये समाहित करण्यासाठी प्रयत्नशील राहतो.

**जे अनुरागा अंग चढे, रुचे न सुख की रीत ।**
**पागलपन मन प्रीति मे, अजब अनोखी रीत ।।**

**भावार्थ -** जेव्हा प्रभूविषयीचे प्रेम साधकाच्या रोमारोमात भिनते तेव्हा त्याला सांसारिक सुखोपभोगात आणि रीतीरिवाजात त्याला बिलकूल रस वाटत नाही. असा अनुरागी साधक विचित्र व विलक्षण रीतीने वागतो. त्याची वागण्याची रीत वेड्यासारखी असते पण मनामध्ये मात्र ईश्वराविषयी प्रीती भरलेली असते.

**जे अनुरागा अंग चढे, सुने न काहू बात ।**
**शीत वात आतप सहे, संग रहे दिन जात ।।**

**भावार्थ** - जेव्हा अनुराग धारा शरीरामध्ये प्रवाहित होते तेव्हा भाविक अन्य कोणाचेही ऐकत नाही. तो थंडी वारा पाऊस, ताप हे सर्व काही सहन करूनसुध्दा तो अहर्निश प्रभूच्या स्मरणात दंग असतो; तो सतत प्रभूच्या संगतीत असतो.

**जो अनुरागा अंग चढे, भागे रुदन कराय ।**
**हरि के सुमिरन सुख मिले, जग के देखि डराय ।।**
**अनुरागी के उर बसे देखन हारा साथ ।**
**सदा सँभाले बाल ज्यों, करै करावै नाथ ।।**
**अनुरागी के उर बसे, तुष्ट रुष्ट दरसात ।**
**हरि परतीती जिन तजा, काहु न पूछी बात ।।**

## भय तथा अभय

**डर करनी डर परम पद, डर बिनु नरकहि जाय ।**
**सहज प्रीति के कारने, हरि संग डरि डरि जाय ।।**

**भावार्थ** भयाच्या जागृतीमुळेच वास्तविक मनुष्याच्या हातून सत्कार्य होत असते अन्यथा लोक वासनेच्या थेंबा थेंबात डुबत राहतात. मनामध्ये असणाऱ्या भयामुळेच परमपदाचा शोध घेण्यास प्रेरणा मिळते. यामुळे परमपदामध्ये असणारे अंतर कमी होते व साधक त्या स्वरूपातच राहतो. भीतीशिवाय मनुष्य अधोगतीकडे वळतो. तेव्हा परमेश्वराला सतत घाबरले पाहिजे. असे भयच अकुतोभयांची स्थिती प्राप्त करून देते.

**जो दिन सद्गुरु-डर गया, मिटा गर्व मे ज्ञान ।**
**दर दर भटका गर्भ मे, कउआ हरि जन जान ।।**

**भावार्थ** - ज्या दिवशी सद्गुरुचे भय नष्ट होते त्या दिवशी बौद्धिक उपलब्धीचा अहंकार साधकाच्या मनात घर करतो आणि त्या अहंकाराच्या प्रभावाने कल्याणकारी

ज्ञान नष्ट होते. त्यामुळेच भगवंताचे भक्त कागभुशुण्डी यांना अनेकदा गर्भवासाचे दुःख सहन करावे लागले.

**सब कोई डरता काल सों, मंझ महल लेइ जाय ।**
**एकरस जो हरि सों डरे, एकरस रूप कहाय ।।**

## इशारा (चेतावनी)

**जान माल रक्षा करन, सकल सलोने संग ।**
**बिना गुरु के ज्ञान रंग, सकल सहारा भंग ।।**

**भावार्थ** - तुमच्या जीवाचे व भौतिक गोष्टींचे रक्षण करण्यासाठी सर्व गोष्टी उपलब्ध असल्या व परिवार सेवेसाठी तत्पर असला तरी जोपर्यंत सदगुरूच्या अंतरीचा रंग तुम्हाला लागत नाही तोपर्यंत क्षणभंगुर आश्रयांनी कल्याण होत नाही. त्यातून पूर्णता प्राप्त होणे असंभव आहे.

**ईश्वर माया संग नही, जो जन पावा नन्द ।**
**निरभय निशि दिन अछत तन, कटा मलिन मन फंद ।।**
**भय भीतर मे मर गया, जब गति अगिनी जोग ।**
**सद्‌गुरु शरणागत नही, क्यों काटे भव रोग ।।**

**भावार्थ** - जेव्हा त्या अलख, आवाङमनसगोचर पुरुषाबरोबर संयोग होतो तेव्हा अंतर्मनाचे भय कायमचे नष्ट होऊन जाते. जर पूर्ण अनुभवी सद्‌गुरूच्या चरणी शरणागती मिळाली नाही तर भवरोगाचा अंत कोठून होणार ? म्हणजे पूर्ण सद्‌गुरूच्या अभावाने भवरोगापासून निवृत्ती मिळणे शक्य नाही.

**मुक्ति निरभयानन्द में, मुक्ति भय में भोग ।**
**सूक्ति सनेहा खपत है, हरि गुरु संगति जोग ।।**

शब्दार्थ- मुक्ति-भावबंधनापासून निवृत्ती, भुक्ति = भोग पदार्थ, सूक्ती- वेदांची सूक्ते.

## कर्म किंवा करणी म्हणजे काय?

**सद्गुरु की मुक्ती महा, करम से पावे जीव ।**
**काम क्रोध त्यागे बिना, करम अरम्भ न सीव ।।**

**भावार्थ** - सद्गुरूच्या कृपेने सुलभ महान मुक्तीला जीवात्मा आराधनेने प्राप्त करीत असतो. काम, क्रोध, मोहादि विकारांचा परित्याग केल्याशिवाय या कर्माला आरंभ होत नाही किंवा त्या कैवल्यधामामध्येही प्रवेश मिळत नाही. प्रश्न असा निर्माण होतो की कर्म म्हणजे काय?

**करम एक आराधना, पल पल रीझत राम ।**
**करम एक संशय नहीं, स्वांस सुमिरिनो नाम ।।**

**भावार्थ** - कर्म म्हणजे काय? त्या सत्याची आराधना! वास्तविक कर्म म्हणजे आराधनाच आहे. गीतेमध्ये तसेच सांगितले आहे. जो प्रति क्षण रामाला प्रसन्न करते ते कर्म म्हणजे आराधना! वास्तविक संशय शमन व कर्म एकच आहे; जे एखाद्या महापुरुषाच्या कृपेने प्राप्त होत असते. ते कर्म म्हणजे सुमिरन- स्मरण होय !

## ब्रह्मचर्य

**ब्रह्मचर्य विधी दोय में, तन संयम मन लीन ।**
**एक में बस इन्द्रिय करै, दो में ब्रह्म चलीन ।।**

**व्याख्या-** ब्रह्मचर्य पालनामध्ये दोन गोष्टींचे विशेष महत्त्व असते एक शरीराचा संयम म्हणजे मनाने ब्रह्मामध्ये लीन होणे. विषयवर्धक कामुक गोष्टींत रस घेणे, हाताने कोमल कामोत्तेजक स्पर्श करणे, तर का दुसरीकडे जननेन्द्रियावर नियंत्रण ठेवण्याची गोष्ट करणे या दोन्ही परस्पर विरोधी गोष्टी होणे अशक्य आहे. हे तर घट्ट तुपाला अग्नीजवळ ठेवल्याप्रमाणे आहे. तेव्हा सर्वप्रथम इंद्रियांना विषय वासनेपासून निवृत्त करून केंद्रित केले पाहिजे. त्यानंतर पूर्ण हृदयाने ब्रह्माच्या आचरणात मनाला प्रवृत्त करावे. हळू हळू साधकामध्ये जेव्हा ब्रह्माचा कृपाप्रसाद आलेकित होतो तो कामदींचा प्रभाव स्वत: दूर होतो आणि पूज्य श्री गुरुदेव भगवान याबाबत सांगत की तीन चार वर्षांचे मूल आणि स्वरूपस्थ महापुरुष यांच्या मनाची स्थिती समान असते ''शरिरात फरक असतो पण मानसिक स्थिती तशीच असते'' ज्याप्रकारे त्या अबोध शिशूमध्ये

आम्ही कामाची कल्पनापण करू शकत नाही. त्या प्रकारे स्वरूपस्थ महापुरुष विकाररहित असतात. हाच विचार पुढील श्लोकात मांडला आहे.

**प्रथम प्रबल इन्द्रिय महा, ममता मेटो धाय ।**
**सब इन्द्रिय संयम करै, तौ ब्रह्मचर्य कहाय**
**सब इन्द्रिय विषया चरै, खान पान रस भोग ।**
**जननेन्द्रिय रोका चहै, मूरख मलिन कुजोग ॥**
**मन से इन्द्रिय वश करै, मन से जवन निरोध ।**
**मन से शुभ सरिता चढै, मन संग मिटे विरोध ॥**

शब्दार्थ- जनन= जननेन्द्रिय, विरोध- मायिक विरोध

**भजन पूर्ती काल में, हरि प्रगटे मन लीन ।**
**सतम अंश मनवा चले, तो पुनि साधन कीन ॥**
**साधन श्रम करते बना, पता न पाया धाम ।**
**या हताश हर फंद में, पत राखी घनश्याम ॥**

**भावार्थ** - साधकाला साधना करावी लागते; परंतु इष्टच्या अगदी जवळचा स्तर असा पण असतो की जेथे साधनेची गती नसते. कारण भगवान मन-बुध्दीच्या पलीकडे आहेत. मनबुध्दीचा निरोध करण्यापर्यंत साधक स्वत: मार्ग आक्रमित असतो; पण त्याच्या नंतरचा मार्ग असा आहे की इष्टदेवच त्याला चालवत फिरवत आपल्या स्वरूपाचा बोध करवतात. हेच तथ्य या दोह्यात सांगितले आहे की, साधनेने श्रम केले पण अद्याप धामाचा पत्ता नाही. जेव्हा चिंतनाच्या प्रत्येक प्रयासात साधक जेव्हा हताश होतो तेव्हा भगवंतच त्याच्या साधनेची लाज राखतात आणि त्याला पूर्णता प्रदान करून स्वरूपाचा बोध करवतात.

**स्वयं हरी ने बन्द किया, साध्य समेटी चित्त ।**
**अब हम रुखे रेड ज्यों, विकल रहो भयभीत ॥**

**भावार्थ** - साधनेमध्ये एक स्तर असाही असतो की जेव्हा श्रीहरी साधकाची साधना बंद करवतो आणि स्वत:पण त्याला दर्शन देत नाही तेव्हा साधकाची दशा रुक्ष रेड प्रमाणे होते. प्रभूचे दर्शन न झाल्याने तो व्याकूळ बनतो.

# अनुभवाच्या अनंत शाखा आहेत त्यापैकी चार मुख्य आहेत.

**अनुभव अवतारी कहे, जब हित ही अवतार ।**
**हरि जन अन्दर बोलते, समझे सुरत सभार ॥**
**अनुभव सों संगति करै, अनुभव से जप जोग ।**
**जो अनुभव अरजी सुने, अवसि मिटे भव रोग ॥**

**भावार्थ -** भक्ताच्या परम कल्याणासाठी भगवंत आत्म्यात अभिन्न होतात व आत्मप्रसारित होऊन त्याला विविध अनुभव देतात. साधकाच्या हृदयातून स्वयं श्रीहरीच बोलतात त्याच्या ध्यानाची ते स्वत: काळजी वाहतात.

**अनुभव गुरु की बात है, हृदय बसे दिन रात ।**
**पलक पलक अरु स्वांस में, विपुल भेद दरसान ॥**
**अनुभव वाणी राम की, बिना ज्ञान का ज्ञान ।**
**ताते गुरुवार कह गये, अनुभव है विज्ञान ॥**

**भावार्थ -** अनुभव म्हणजे सर्वत्र व्याप्त असणाऱ्या परात्पर ब्रह्माचे किरण आहेत, त्या प्रभूची वाणी आहे. हे ज्ञानाशिवाय ज्ञान व विज्ञान आहे. ते विषय वस्तूंच्या संयोगातून विशुद्ध बुध्दीची अपेक्षा करीत नाही. म्हणून तत्त्वदर्शी सद्‌गुरू महर्षींच्या ऋतम्भरा प्रज्ञेने या अनुभवांच्या विज्ञानाची विशिष्ट पदावली विभूषित केली आहे.

**भव माने भव धार है, अनु माने कर अन्त ।**
**ताते अनुभव नाम धर, सन्त सँभारे कन्त ॥**

**भावार्थ -** अनुभव शब्द दोन शब्दांच्या संयोगातून निर्माण झाला आहे. अनु आणि भव. 'भव' म्हणजे सृष्टीचा विकृत प्रवाह-धारा, 'अनु' म्हणजे त्या धारेचा अंत करणे असा आहे, या प्रकारे आवागमनाचा अंत करून तो साधक त्या प्रभूला प्राप्त करतो.

**केवल कन्त हरि रूप है, सबको मूल एकन्त ।**
**मन गोचर गति ना मिले, अनुभव साधे सन्त ॥**
**अनुभव सों हरि देखिये अनुभव संगति कन्त ।**

**अनुभव सो इन्दिय तके, सुख दुख में भरमन्त ।।**
**अनुभव केवल पथ चले, जेहि विधि प्रगटै सोय ।**
**कहु संसारी बूझ में, फँसे विकल केहि रोय ।।**
**अनुभव धार अनन्त की, साधन की गति चार ।**
**जाहिं न गुरु लखि पड़े, क्यों कर बेडा पार ।।**
**साधन के सुख मूल में, निराकरण कर भूति ।**
**अंग न अनुभूती चढी, साधन रंग न दूति ।।**

शब्दार्थ- दूति- द्वैत

## स्वप्न-सुरा संबधित अनुभव

**प्रथम अनुभव स्वपन मे, बोले शुभ परतीति ।**
**प्रकट सराहै रूप को, प्रकटे माया जीति ।**
**शुभाशुभम नित लखि पड़े, भावी प्रकटे सोय ।**
**सपना सम सपना नहीं, जहाँ जगत रह रोय ।।**

## अंग-स्पन्दन-

स्वप्नाप्रमाणेच अंग स्फुरण हा दुसऱ्या प्रकारचा अनुभव आहे. याला स्थूल-सुरा संबंधी अनुभव असेही म्हणतात. अंग स्फुरण (फडफडणे) म्हणजे सद्‌गुरूच्या आदेशाची शृंखलाच आहे. यामध्ये पण साधकाला व्यवस्थित सहयोग मिळत असतो. मात्र साधकाने हे लक्षात ठेवावे की या अंग स्पंदनातून साधकाने इंद्रिये किंवा त्यांच्या विषयांची कामना करू नये. त्या अनुभवांचा उपयोग केवळ इष्ट निर्दिष्ट प्रशस्त मार्गामध्येच किंवा मार्गासाठीच करावा.

## स्थूल सुरा संबधी अनुभव-

**लगी लपेटी अनुभवी, अंग फडकनी रीत ।**
**पल पल मे परतीति दे, सब तन फडकी भीत ।।**

**सब अंग सिहरत हरि चले, चलते बात बतात ।**
**फडकत है फल देत है, निष्फल किरिया जात ॥**
**दैवी आसुरी सम्पती, युध्द चला अरराय**
**फडकन में सब लखि पड़े, दास रहे सुख पाय ॥**
**पूरा सद्‌गुरु सेवा कर, निरदेशन चलि जाय ।**
**ये दोनों प्रकटे प्रथम, आगे राह निकाय ॥**

## सुषुप्ती-सुरा संबंधी अनुभव

स्थूल आणि स्वप्न सुरा या संबंधीचे अनुभव सद्‌गुरूची सेवा केल्याने, तसेच त्यांच्या निर्देशानुसार साधना केल्याने येण्यास सुरुवात होतात. परंतु सुषुप्ती सुरा संबंधी अनुभव दीर्घकालच्या अभ्यासानेच जेव्हा मनाचे धारावाही ध्यान इष्टाकडे लागते तेव्हाच येऊ लागतात कारण हे क्रियात्मक अनुभव आहेत. सम-सुरा संबंधी अनुभव इष्टाच्या निकटच्या क्षेत्रात होतात.

## सुषुप्ती अवस्था

**शुभ में सोये सन्त जन, भजे तैक की धार ।**
**सुषुप्तावस्था प्रकट तन, जागत सुरत अधार ॥**
**गहरी निद्रा सोवते, स्वप्न न आया कोय ।**
**भ्रमवश सुषुप्ति कहत है, अन्त चले सब रोय ॥**

**भावार्थ** - संसारी लोक इतके गाढ झोपतात की जेथे लेशमात्रही स्वप्नाचा आभास होत नाही. भ्रमवश या निद्रेलाच लोक सुषुप्ती असे समजतात; परंतु शेवटी सर्व काही घालवून बसतात व निघून जातात. सुषुप्ती अवस्था साधनरत योग्याला त्याच्या निरंतर अभ्यासानेच उपलब्ध होत असते. जर गाढ निद्रेला सुषुप्ती समजले तर घोर अशा स्थूल बुध्दीमध्ये सतत कार्यरत असणाऱ्या शेतकऱ्यांना किंवा श्रमिकांना ती सहज प्राप्त होणारी आहे. परंतु वास्तवात तसे नाही.

**कृषक परिश्रम करत है, स्वप्न न दरसे कोय ।**
**योग युक्ति काहू मिले, गाढ नींद ना होय ।।**

**भावार्थ -** अती शारीरिक श्रमाने शेतकऱ्यांना इतकी गाढ झोप येते की त्यांना कसले स्वप्न दिसतच नाही. झोपले की सकाळीच उठतात. मधल्या काळात कसले भानच त्यांना नसते. परंतु वास्तविक सुषुप्ती योगयुक्तीच्या माध्यमातून काही विरळ साधकांनाच प्राप्त होते. सामान्य शेतकऱ्यांच्या गाढ निद्रेला सुषुप्ती समजणे अयोग्य आहे.

## सुषुप्ती सुरा संबंधी अनुभव

**भजन करत बहु काल तक, सुरति डोर लगि जाय ।**
**तब प्रकटे सुषुप्ति में, अनुभव नित्य तराय ।।**

**भावार्थ -** भजन चिंतनाच्या दीर्घकालीन अभ्यासामुळे इष्टाचे सतत ध्यान सुरू होते तेव्हा सुषुप्ती अवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव येतो. या अवस्थेचे अनुभव नेहमी सत्य किंवा मनुष्याला भवपार करणारे असतात. याला सुषुप्ती अवस्था म्हणतात, निद्रावस्था म्हणत नाहीत.

**जग से सुरत खींच के, प्रभु मे सुरत प्रवीन ।**
**ता छन अनुभव सुप्ति की, प्रगटे देख नवीन ।।**
**देह भान मिट जाय जो, मन सौ तन देख ।**
**अनुभव ऐसे में मिले, सुषुप्त सुरा की लेख ।।**

**भावार्थ -** सतत अभ्यासात मग्न असणाऱ्या साधकांचा भजन करता करता जेव्हा देहाचा मोह नष्ट होऊन त्यांचे मन इष्ट स्वरूपात विलीन होते व शरीर झोपी न जाता जागृत राहते तेव्हा अशा अवस्थेला सुषुप्ती-सुरा असे म्हणतात.

**तन की निद्रा जग लखे, मन की निद्रा सन्त ।**
**मन सोवत में लखि पडे, सुप्ति सुरा का तन्त ।।**

शब्दार्थ- तन्त- तात्पर्य- सत्त्व

**सुप्त सुरा मे जो मिले, सृजन विसृजन सार ।**
**कबहु न झूँठा होत है, संत चले निरधार ।।**

सम-सुरत (ध्यान) कालातील अनुभव

**सम सुरत सम ब्रह्म बिनु, उपजे ना परतीति ।**
**जो कछु ब्रह्म लखि पडे, सरबस मिटे अनीति ।।**
**सब बोले सब सुनत है, समदरसी जन एक ।**
**ऐसी वाणी अन्त की, हरिजन विमल विवेक ।।**
**बैठे लेटे चालते, करत सफल व्यवहार ।**
**सत् सौ डोरी यों लगे, कबहुँ न टूटे तार ।।**

**भावार्थ -** वास्तविक योग्याचे कर्म अशुक्ल आणि अकृष्ण असते. त्यांनी केलेल्या कर्मांचे शुभ किंवा अशुभ असे कोणतेही परिणाम होत नाहीत. योगी ब्रह्माच्या समकक्ष असतो. याच स्थितीचे वर्णन या दोह्यात आहे की बसता, उठता, चालता बोलता किंबहुना कोणताही व्यवहार करताना सत्याशी त्याचे मन (ध्यान) असे केंद्रित झालेले असते की ते कधीही खंडित होत नाही. ध्यानाचा दोर कधीही तुटत नाही.

**ऐसी करनी जब मिले, जन मन पूरा सार ।**
**सब जन में देखत रहे, सम सुरा उस पार ।।**

**भावार्थ -** जेव्हा शुभाशुभपासून निर्लेप कृती किंवा निर्लेप कर्म साधकाला प्राप्त होते तेव्हा मनामध्ये भक्तीचे सारतत्त्व पूर्णत: प्रकट होते. अशा प्रकारचा पुरुष चराचर जगताचा द्रष्टा असतो. तो सर्वत्र सम दृष्टीने पाहतो म्हणजेच सम सुरा प्रकृतीच्या पलीकडे तो गेलेला असून परमात्म्याच्या सामंजस्याचा तो परिचायक असतो.

**सम सुरा तब ही मिले, तन मन पूरा लीन ।**
**अनुभव सद्गुरु रूप है, शरण गये परवीन ।।**
**हरि उर अन्तर ऊतरे, बिसरे ना बल जोर ।**
**जहँ माया मृत वाहिनी, तहँ हरि व्यापा मोर ।।**

# भावना

**भली सुहासिन भावना, भरण करे जन हेत ।**
**आठ पहर आहे दुरे, भली बुरी कहि देत ।।**
**धीर बधावे भावना, आफत मे सन्तोष ।**
**जो हरि कबहुँक रुठते, लपकि चलावे पोष ।।**
**हरि तोषन जन औषधी, घट घट मे परसार ।**
**भजन भावना मिट गई, चौरासी की धार ।।**
**करुणामय हरि देत है, अविरल भाव अलेख ।**
**एक चरण तजि आश ना, तूँ क्यों सारत भेष ।।**
**हरि तोषन जन औषधी, हर उर में परसार ।**
**भावहीन सब बह गये, भव सरिता की धार ।।**
**भाव सकल बाधा हरे, जो मन चित से होय ।**
**भाव ही कृपा करत है, लौटत में हरि होय ।।**

**भावार्थ -** ''भाववस्य भगवान सुख निधान करुना अयन'' हृदयातील प्रबळभाव संपूर्ण विघ्नांना नष्ट करतो. खरा मनातील भावच कृपेचे कारण आहे, कर्ता आहे. तोच भाव हरिपदाला स्पर्श करून परत फिरताच साधकाला श्रीहरीच्या स्थितीने अलंकृत करतो.

**भाव भरत बाधा कटे, पलट कृपा को रूप ।**
**भाव हीन मृत लोक में, नीच पडे भव कूप ।।**

**भावार्थ -** हृदय पूर्णत: भावपूरित होताच समस्त विघ्ने नष्ट होतात. आमच्याच मनातील भाव इष्टदेवाच्या कृपेने कृपावंत होऊन परत फिरतो. भावहीन-श्रध्दाहीन व्यक्ती या मृत्युलोकात भवकूपाचा पथिक असतो.

**जन के बस में भाव है, भाव वस्य भगवान ।**
**भाव ही मुक्ती देत है, भाव संभारे ज्ञान ।।**

**भावार्थ -** वाग्विलासी, बहुश्रुत तसेच उपदेश करणारा बौध्दिक ज्ञानी सुध्दा परमतत्त्वाच्या उपलब्धीच्या सरितेत गटंगळ्या खात असतो. जर सद्‌गुरूची कृपा हृदयात प्रवाहित झाली नाही तर ज्ञानात अज्ञान विद्यमान आहे असे समजले पाहिजे.

## ज्ञान

**ज्ञानी गोता खात है । ध्यानी धूसर ध्यान ।**
**जो सद्‌गुरु बेधे नहीं, ज्ञानहुँ मे अज्ञान ।।**
**हरि दर्शन पर ज्ञान है, जो कहुँ परगट होय ।**
**प्रत्यक्ष दर्शन ना मिला, तो सब अंधक होय ।।**

**भावार्थ -** इष्टाच्या प्रत्यक्ष दर्शनाबरोबर मिळणाऱ्या बोधाचे नाव ज्ञान आहे. असे विदित होणे म्हणजेच परम सौभाग्य आहे जर त्या परमतत्त्वाची प्रत्याक्षानुभूती झाली नाही तर सर्व जण अंधारात चाचपडणारे वाटसरू ठरतील.

**दरशन पूरा ज्ञान है, बुध्दिमता अज्ञान ।**
**साधन का श्रम चलत है, कैहि पर करै गुमान ।।**

साधन काळात कोणी ज्ञानी नसते. केवळ ज्ञानप्राप्तीचा प्रयास मात्र असतो.

**सब कुछ श्रोता सुन गया, बाकी पूरी राह ।**
**अड़गड़ हरि पथ पूरा ना, कथा सुनावे काह ।।**
**साध मिटी साधन मिटा, जब देखा निज रूप ।**
**अब कहु भिन्न कि एक में, कहाँ पडे भव कूप ।।**

## अजामिल व गणिका

**गुरु सन ए अनुभव सुनी, रूपक कथा अनेक ।**
**नाम अजामिल जीव संग, नचनी इन्द्रि अनेक ।।**

**ज्ञानवन्त गणिका बिना, पूर ना पाया कोय ।**

**जेहिं घट गणिका अज तरे, संत मता है सोय ।।**

शब्दार्थ अज=अजामिल

**घट अन्दर गज गणकिया, अजामिल एक ओर ।**

**जब नारायण लखि पड़े, गणिक करै बर जोर ।।**

**भावार्थ -** घटाच्या आतच गज आहे, गणिका आहेत व एका बाजूला अजामिलपणा आहे. जेव्हा नारायण म्हणजेच इष्टोन्मुखी वृत्ती होण्यास सुरुवात होते तेव्हा इंद्रिये जबरदस्तीने विषयांकडे मनाला ओढण्याचा प्रयत्न करतात.

शब्दार्थ- गणिका=गो, इंद्रिय ।

**गणिका, गो रस हो लखे, हरि रस लखे तो रोय ।**

**अब गो गमनी कवन विधि, रोके नारायण कोय ।।**

**अजर अमर जो आत्मा, विधि गणिका गो बीच ।**

**नारायण की लगन ना, कौन छुडावे कीच ।।**

**संकेत- अजर-अमर आत्माच नारायणाचे प्रतीक आहे.**

**अजर अमर जो आत्मा, अजामिल की रेख ।**

**फँसा गणिक भव जाल में, फंद छोड जो देख ।।**

**भावार्थ -** अजर-अमर आत्माच अजामिलाचा विचार प्रवाह आहे. त्या गणिका म्हणजे मनासहित इंद्रिये भवजंजाळात गुंतली आहेत- गुरफटली आहेत. ज्याला सत्याचे दर्शन घडले आहे तोच या जंजाळातून मुक्त होतो.

**नारायण लौ लगत ही, प्रगटे पावन ज्ञान ।**

**यम फंदा भव भागि गा, सत प्रगटत परवान ।।**

**संकेत-** भगवंताविषयी असणारा प्रेमाचा अविर्भाव म्हणजेच मुलाचा जन्म होय. परमेश्वराठायी हृदयपूर्वक प्रेम-दृढ श्रध्दा निर्माण होण्याने भवबाधा नाहीशी होते व सर्व प्रकारची प्राप्ती होते.

अड़गड़ उल्टे नाम की, महिमा है सब कोय ।
जप गति अजपा मे ढले, उलटा जाने सोय ।।
नाम रुप दोउ संग है, हरि दर्शन का पोत ।
तेहिं चिन्ते बहु भेद में, प्रकटे लीला श्रोत ।।
नाम रूप उर जागते, उपजत लीला श्याम ।
लीलाधर परसत मिले, जन को जीवन धाम ।।
नाम जपे से नीचहु, परम धाम सिरमौर ।
अड़गड़ ते नर धन्य हैं, जिन्ह कहँ नाम सरोर ।।

।।ॐ।।

# शास्त्र सार

● संपूर्ण सृष्टीमध्ये धर्म एकच आहे - अमृत तत्त्वाची प्राप्ती, सदैव राहणारी शाश्वत शांती, अनंत सुख आणि त्याचा प्रारंभ आहे परमात्म्यावरील अतूट श्रध्दा.

● सत्य म्हणजे एकमात्र परमात्मा होय. जी या सत्याला बळकट करीत नाही ती धर्म नव्हे. जर धर्मात हे सत्य नसेल तर ते जीवन पण निरर्थक आहे.

● ज्या व्यक्तीची परमात्म्यावर अतूट श्रध्दा आहे व जो ॐ अथवा राम या परमात्म्याच्या परिचित नामाचे सतत स्मरण करतो तो धर्माचे स्वरूप जाणत नसला तरीही तो शुध्द धार्मिक आहे असे समजावे.

● जो शाश्वत आहे, अपरिवर्तनशील आहे, सनातन आहे तो धर्म आहे आणि जो आज आहे परंतु उद्या टिकणारा नाही तो धर्म नव्हे; तो अधर्म आहे, नश्वर आहे.

● जगामध्ये धर्म एकच आहे, एकमात्र शाश्वत अशा परमात्म्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न म्हणजे धर्म होय. परमात्मा जर दोन असतील तर ते धोक्याचे आहे. आणि समजा दुसरा भगवंत असेल तर त्यासाठी दुसरी सृष्टी पाहिजे - भगवंताला रहाण्यासाठी व्याप्त होण्यासाठी!


**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो ईस्टेट, गाळा नं. ५, मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई - ४०००६९ भारत. फोन : (०९१-२२) २८२५ ५३००
ईमेल : contact@yatharthgeeta.com वेबसाइट : www.yatharthgeeta.com